REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
(टपाल खर्चासह)
किरकोळ अंकास
दोन आणे.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष १० पुणें, बुधवार, तारीख ५ जानेवारी, १९४४ अंक १

"मॅनेजर पाहिजे."

बँकिंगच्या कामाची संपूर्ण माहिती असणारे, अनुभविक अशांनीं व बी. कॉम अगर जी.डी. ऐ. अगर जी. डी. सी. अशांनीं लायसेंसीच्या सर्टिफिकेटासह आपले अर्ज खालील पत्त्यावर तारीख २०।१।४४ चे आंत पाठवावेत. पगार लायसेंसीप्रमाणें देण्यांत येईल.

(सही) श. सि. पाटील,
चेअरमन

शनिवार, ७२३ सातारा जिल्हा लो. बों. प्राथमिक
सातारा, शहर. शिक्षक सहकारी बँक लि० सातारा

पुण्यांतील
आदर्श निवासस्थान व भोजनालय
छाया लॉजिंग व बोर्डिंग हाउस
बुधवार चौक, पुणें २.

ए. बी. सी. कॉइल्स
(डासांच्या उदबत्त्या)
बॉक्समध्यें १२. बॉक्स किं. १० आणे.
रात्रभर जळतात.
लायसॉफ
केसांतील उवांवर आश्चर्यकारक शोध.
उवा १ तासांत मरतात
बाटली किं. १ रु. ★ दोन वेळां उपयोग.
दि मागोरा केमिकल कं. लि.
— टिळक रोड, पुणें २. —

महाराष्ट्र टेक्टाइलस् लि., यांच्या
राजा रघुनाथराव मिल्स भोर
येथील माल, धोतरजोड्या, शर्टिंग, कोर्टिंग, मांजरपाट पुण्यांत कंट्रोल भावानें घाऊक व किरकोळ
मिळण्याचें ठिकाण—पायोनियर डाइंग हाऊस
दातेवाडी, भिकारदास मारुती रोड, सदाशिव पेठ, पुणें.

महायुद्धाची जाणीव ! कपड्यांच्या सचींत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

गिरगांव मुंबई नं. ४
महिंद्रकर ब्रदर्स
तयार कपड्याचे व्यापारी
बुधवार चौक, पुणें

विविध माहिती

मृत्यूचें प्रमाण

जपान्यांचे हातीं असलेले अमेरिकी दरसाल दर-हजारी ५० ह्या प्रमाणांत मरण पावत आहेत.

बिजेच्या बिलांत वाढ करण्याची मुंबई सरकारची मुभा

बिजेच्या उत्पादनासाठी वाफेचा उपयोग करणाऱ्या कंपन्यांना आपल्या गिऱ्हाइकांच्या बिजेच्या बिलांत मुंबई सरकारच्या पूर्व संमतीनें १०% पर्यंत वाढ करण्याची परवानगी देण्यांत आली आहे.

करमणुकीवरील करांत वाढ

मुंबई सरकारनें करमणुकीवरील करांत खालीलप्रमाणें वाढ केली आहे, ती १ जानेवारी १९४४ पासून अमलांत आली.

तिकिटाची निवळ किंमत	करमणुकीचा कर
४ आण्यांपर्यंत	१ आणा
८ आण्यांपर्यंत	२ आणे
१ रुपयापर्यंत	४ आणे
२ रुपयांपर्यंत	८ आणे
४ रुपयांपर्यंत	१ रुपया
५ रुपयांपर्यंत	१½ रुपया
१० रुपयांपर्यंत	२ रुपये

दहा रुपयांवरील प्रत्येक ५ रुपयांस २ रुपये कर आहे. ब्रिटिश व मित्रराष्ट्रांच्या मिलिटरी लोकांना पहिल्या चार आण्यांपर्यंतच्या तिकिटावरील कराची माफी आहे. ४ आण्यांपेक्षा जास्त परंतु ८ आण्यांपर्यंतच्या तिकिटावरील करांत १ आण्याची माफी मिळेल. रेस कोर्सवरच्या तिकिटाच्या किंमतीवरील २५% कर हा सर्वांनाच लागू आहे.

चीनचें उज्ज्वल भवितव्य

चीनची लोकसंख्या प्रचंड असून तेथील कामगार कुशल कारागीर आहेत. त्या देशांत कच्च्या द्रव्यांचा पुरवठाहि मुबलक आहे. तथापि, जमिनींतून कमाल उत्पादन काढण्यास व कच्च्या मालाचे पक्के जिन्नस करण्यास लागणारी यंत्रसामुग्री व भांडवल चीनजवळ नाहीं. युद्धसमाप्तीनंतर, अमेरिकेंतील कारखानदार आपली जुनी यंत्रसामुग्री चीनमध्यें नेऊन बसवितील, असा रंग दिसत आहे. चीनला परराष्ट्रीय भांडवलाचें प्राबल्य रुचणार नाहीं. चिनी व विदेशी लोक ह्या दोघांचा मिळून तेथील कारखान्यांत गुंतलेल्या भांडवलावर ताबा असावा, असा चीन प्रयत्न करील. कांहीं काळाचे अवधींत, चीन हा एक प्रबळ औद्योगिक देश होण्याचा संभव आहे, असें अलेक्झँडर हॅमिल्टन इन्स्टिट्यूट ऑफ अमेरिका ह्या संस्थेचें मत आहे.

नॅशनल सेव्हिंग्ज बँक लि.

वरील बँकेस तिच्या दुसऱ्या वर्षी १,०१,९८७ रुपये निवळ नफा झाला व भागीदारांस ६% करमाफ डिव्हिडंड मिळालें.

हिंदी गिरण्यांत हिंदी कपाशीचा उठाव

	सप्टेंबर १९४२ गाठी	सप्टेंबर १९४३ (१ गाठ ४०० पौंड)
ब्रिटिश हिंदुस्थान	२,४४,९६५	३,००,२७२
हिंदी संस्थानें	५४,०३५	६०,०९७
एकूण	२,९९,०००	३,६०,३६९

चांदी-सोनें

बाँबे बुलियन एक्सचेंजनें गेल्या वर्षी २,६६,०९,२६० तोळे चांदी व १,६३,४७१ तोळे सोनें विकत्तून त्याचे पाटले केले. ३ मे, १९४३ रोजीं चांदी-सोन्याच्या भावांनीं उच्चांक गाठला. सोन्याचा दर तोळ्यास ९७ रुपये व चांदीचा दर १०० तोळ्यास १३९ रुपये त्या दिवशीं झाला.

नैगेरियाशीं व्यापार कसा वाढेल ?

ग्रेट ब्रिटनच्या आफ्रिकन वसाहतींची लोकसंख्या ६ कोटि असून त्यांतील २ कोटि लोक नैगेरियामध्यें आहेत. त्यांपैकी शेकडा ८० ते ९० लोक शेतीवर उपजीविका करतात. आयात होणाऱ्या जिनसांची त्यांस माहितीहि नाहीं. सहाजीकच, नैगेरियाची आयात फारच कमी आहे व येणारा माल तद्देशीयांत खपत नाहीं. स्थानिक लोकांच्या गरजा वाढवून त्या भागविण्यासाठी ते अधिक मेहनत करून जास्त मजुरी मिळविण्यास उत्सुक होतील किंवा नाहीं, ह्यावर तेथील बाजारपेठेचें महत्त्व अवलंबून राहील, असें सर डोनाल्ड कॅमेरॉन ह्यांचें मत आहे.

धान्याचें उत्पादन वाढविण्यासाठी ३० लक्ष रुपये खर्च

मुंबई सरकार "अधिक धान्य पिकवा" मोहिम यशस्वी करण्यासाठी १९४४-४५ मध्यें बियांची खरेदी, साठवण व विक्री करण्याकरितां ३० लक्ष रुपये खर्च करणार आहे. बी वाटण्याच्या योजनेमुळें ८० लक्ष रुपयांचें १० लक्ष धान्य जास्त पिकेल, असा अंदाज आहे. ३० लक्ष रुपयांपैकी ७½ लक्ष रुपये परत वसूल होणार नाहींत. सरकारच्या शेती खात्यानें बियासाठीं धान्य विकत घ्यावयाचें, त्यासहि किंमतीचें नियंत्रण लागू आहे परंतु विशेष निवडक बियांसाठी १२½% पर्यंत जास्त किंमत देण्यास त्यांस मुभा आहे.

परस्पर-विरोधी युद्धोत्तर योजना

"गेल्या अठरा महिन्यांत, ग्रेट ब्रिटनमध्यें युद्धोत्तर योजना आखण्यांत कितीतरी शक्ति निष्कारण खर्च झाली आहे. युद्धानंतरच्या काळांत व्यापार व उद्योगधंदे ह्यांचेकडे लक्ष फारच थोडया योजनांत दिलेलें आढळतें. कोटयवधि रुपयांच्या सरकारी खर्चावरच बहुतेक योजना आधारलेल्या आहेत, परंतु पैसे येणार कोठून ह्याकडे कोणाचें लक्ष आहे ? नियोजकांत बहुंशीं कॉलेजचे प्रोफेसर, शास्त्रीय सोसायट्यांचे सभासद, सरकारी नोकर, वगैरेंचाच भरणा आहे; त्यांपैकी कोणासच मजुरांच्या व नोकरांच्या पगाराची तरतूद करण्याचें माहीत नाहीं. जाहीर झालेल्या योजना परस्पर विरोधी आहेत, हें राष्ट्रीय हिताचे दृष्टीनें एकपरी बरेंच आहे." मि. फ्रँक पॅचीं ह्यांचा न्यूयॉर्क जर्नल ऑफ कॉमर्समधील लेख.

कॉसमॉस को. बँकेच्या इमारतीचें उद्घाटन

कॉसमॉस को. अर्बन बँक लि. च्या कुंटे चौक, लक्ष्मीरोड, पुणें, येथील नव्या इमारतीचा उद्घाटन समारंभ रविवार, ता. २ जानेवारी रोजीं श्री. न. चिं. केळकर ह्यांचे हस्तें झाला. त्यासंबंधीं विस्तृत माहिती मागाहून देण्यांत येईल.

बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेटनें २ लक्ष रुपयांचा चेक दिला

बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि. नें डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या नवीन कॉमर्स कॉलेजसाठी २ लक्ष रुपयांची देणगी देण्याचें ठरविलें, त्याप्रमाणें २ लक्ष रुपयांचा चेक सोसायटीकडे पाठविण्यांत आला आहे, असें समजतें.

X. 2m, N35
M4
162618

अनुक्रमणिका

	पृष्ठ		पृष्ठ
१ विविध माहिती	... २	सची अर्थशास्त्रीय परिषद्—मौलिक शास्त्रें आणि राष्ट्रीय प्रगति	
२ हिंदी शेतीची सुधारणा	... ३	५ हिंदी लोकांचें आरोग्य	... ६
३ वाहतुकीच्या साधनांसाठी परावलंबन नको	... ४	६ कारखान्यांच्या सकीच्या विम्याची मुदतवाढ	... ६
४ स्फुट विचार	... ५	७ म्हैसूर संस्थानची ग्रामोद्धार योजना	... ७
१९४४ सालाच्या युद्ध-विषयक अपेक्षा—मद्रा-			

अर्थ

बुधवार, ता. ५ जानेवारी, १९४४

हिंदी शेतीची सुधारणा

सर मणीलाल नानावटी ह्यांचे विचार

युद्धोत्तर काळांत व्हावयाच्या आर्थिक पुनर्घटनेच्या योजना आखून सरकारनें त्यांच्या अंमलबजावणीची तयारी केली पाहिजे आणि विशेषतः शेतीच्या धंद्याची मूलग्राही सुधारणा करण्याच्या हेतूनें सहकारी संघटनाचा अधिकांत अधिक उपयोग करून घेतला पाहिजे असें आम्हीं "अर्था" च्या गेल्या अंकांत प्रतिपादलें होतें. शेतीच्या पुनर्घटनेविषयीं महत्वाचे उद्गार सर मणिलाल नानावटी, रिझर्व्ह बँकेचे माजी डेप्युटी गव्हर्नर, ह्यांनीं बालचंदनगर येथें नाताळांत भरलेल्या शेतीच्या अर्थशास्त्रास वाहिलेल्या "इंडियन सोसायटी ऑफ ऑप्लिकल्चरल इकॉनॉमिक्स" ह्या अलीकडे स्थापन झालेल्या संस्थेच्या परिषदेचे अध्यक्ष ह्या नात्यानें काढले, त्यांच्याकडे येथें लक्ष वेधावयाचें आहे. जीवनास अत्यावश्यक असलेलें अन्न आणि उद्योगधंद्यांस जरूर असलेली कच्ची सामुग्री ह्यांचा उगम आणि बहुसंख्य हिंदी जनतेच्या निर्वाहाचें एकमेव साधन ह्या नात्यानीं शेतीचें महत्व असामान्य आहे. तथापि, त्या धंद्याच्या स्थितीविषयींच्या प्रश्नांचा शास्त्रीय पद्धतीनें विचार करून ते सोडवण्याचे मार्ग सुचवण्याचें कार्य आस्थेनें व पद्धतशीरपणानें व्हावें तसें आजपर्यंत झालेलें नाहीं ही खेदाची गोष्ट आहे. शेतीची जमीन आणि पिकें ह्यासंबंधांत शास्त्रीय प्रयोग झाले आहेत आणि होत आहेत आणि इंपीरिअल कौन्सिल ऑफ ऑप्लिकल्चरल रिसर्चनें बरीच फलप्रद कामगिरी चालवली आहे. परंतु शेतीच्या स्थितीची व्यापक आर्थिक दृष्टया चर्चा झाल्यावांचून आणि आर्थिक संशोधनांतून निघणाऱ्या निर्णयांस अनुसरून ह्या धंद्याच्या सुधारणेसाठी संघटनात्मक उपाययोजना झाल्यावांचून प्रगतीचें उद्दिष्ट साध्य होणें अशक्य आहे. व्यापक आणि तपशीलवार आर्थिक संशोधनाची व चर्चेची सध्याची उणीव शेती-अर्थशास्त्राच्या अभ्यासास वाहिलेल्या इंडियन सोसायटी ऑफ ॲप्लिकल्चरल इकॉनॉमिक्स ह्या संस्थेकडून भरून काढली जात आहे ही गोष्ट अभिनंदनीय आहे.

सर मणीलाल ह्यांनीं आपल्या भाषणांत ह्या संस्थेचे उद्देश व कार्य ह्यांविषयीं माहिती दिली तीवरून तिचेकडून हलुहलु भरीव कार्य होईल असें वाटण्यास जागा आहे. शेतीचें उत्पन्न वाढवण्याचे आजपर्यंत करण्यांत आलेले प्रयत्न विशेष फलद्रुप झालेले नाहींत आणि हिंदी समाजाचें रहाणीचें मान असमाधानकारक राहिलें आहे असें त्यांचें मत आहे. धान्य पुरवठा वाढवण्याविषयींच्या मोहिमेसहि म्हणण्यासारखें यश आलेलें नाहीं आणि मध्यवर्ती सरकारनें योजनात्मक आर्थिक धोरण अमलांत आणल्यावांचून इच्छित प्रगति होणें शक्य नाहीं असा अभिप्राय त्यांनीं व्यक्त केला आहे. हिंदुस्थानच्या आर्थिक दुबळेपणाचीं प्रमुख कारणें सर मणीलाल ह्यांच्या मतानें वाढती लोकसंख्या, वाढतें जमीनदारांचें प्राबल्य, शेतांचें क्षेत्र लहान होण्याची प्रवृत्ति, शेतांचे होणारे तुकडे, जमीनींचें घटणारें उत्पादन सामर्थ्य, शेतकरी वर्गाची अपुरी प्राप्ति व कर्जबाजारीपणा, सेडेगावीं धंद्यांचा ऱ्हास, मोठ्या प्रमाणावरील धंद्यांचा मागसलेपणा, यंत्रसामुग्रीच्या व मूलग्राही कारखान्यांचा अभाव, हीं आहेत. युद्धपरिस्थितीमुळें हीं कारणें ठळकपणानें दृष्टोत्पत्तीस येत आहेत. हिंदुस्थानांत नैसर्गिक परिस्थिति अनुकूल आहे; पण तिचा योग्य फायदा मानवी प्रयत्नानें घेतलेला नाहीं. सामाजिक व आर्थिक घडी सदोष असून सरकारचें धोरण सहायक नाहीं ह्यामुळें ह्या देशाची शेतीविषयक प्रगति झालेली नाहीं. ह्यासाठी सरकारनें पुढाकार घेऊन पुनर्घटनेची योजना आखावी, तिच्यासाठी तज्ञ नेमावे व पैसे पुरवावे असें सर मणीलाल ह्यांनीं सुचवलें. अमेरिकेंत मध्यवर्ती सरकारनें आर्थिक प्रगतीचे प्रश्न स्वतःच्या हातीं घेतले असून शेतीच्या धंद्यास सहाय दिलें आहे. तेथील प्रांतिक सरकारें आपल्या स्वतंत्र हक्कांविषयीं विशेष जागृत असूनहि मध्यवर्ती सरकारास असें धोरण अंगिकारणें आवश्यक वाटतें तर हिंदुस्थानासारख्या देशांत त्यांचें अनुकरण करणें किती अगत्याचें आहे हें सहज ध्यानांत येण्यासारखें आहे. हिंदुस्थान सरकारास योजनात्मक आर्थिक पुनर्घटनेच्या महत्वाची जाणीव झाली आहे, पण करावयाचें कार्य एवढें मोठें आहे कीं त्या दिशेचा कार्यक्रम फार मोठ्या प्रमाणावर व्हावा लागेल.

शेतीच्या प्रगतीसाठी सुधारणा तीन मार्गांनीं होण्याची आवश्यकता सर मणीलाल ह्यांनीं प्रतिपादली. (१) जमीनधारणाची पद्धति, (२) कर व (३) कारभार ह्या तीन बाबींमध्यें सुधारणा झाली पाहिजे असें त्यांनीं सुचवलें. जमीनीचे तुकडे होत चालले आहेत आणि शेतांची मशागत करण्याचें सामर्थ्य शेतकऱ्यांमध्यें राहिलेलें नाहीं. जमिनदारीच्या प्रांतांत शेत करणाऱ्यांस प्राप्ती एवढी अल्प होते कीं त्यांच्यामध्यें आर्थिक किंवा शारीरिक त्राण दिसून येत नाहीं. रयतवारी पद्धतीच्या प्रांतांतहि जमिनी शेतकऱ्यांच्या हातांतून इतर वर्गांच्या हातीं चालल्या असल्यानें शेताची नीट निगा होत नाहीं. स्वतःच्या मालकीचीं शेतें करणाऱ्या लोकांच्या हातीं हा धंदा राहील अशी व्यवस्था सरकारनें कायद्यानें व द्रव्यसहायानें केली पाहिजे असें सर मणीलाल ह्यांचें म्हणणें आहे. शेतसारा ठरवणें व गोळा करणें ह्यांविषयींची सध्याची पद्धति सदोष आहे आणि शेतकऱ्यांवर पडणारा बोजा हलका होणें आवश्यक आहे असें त्यांचें मत आहे. सेडेगावांच्या कारभारांत आमूलाग्र सुधारणा होण्याच्या इष्टतेवरहि त्यांनीं जोर दिला आहे. सरकारी अधिकाऱ्यांत उत्साहाचा अभाव असतो आणि लोकांची प्रवृत्ति सुधारणेस अनुकूल अस-

त्याचें दिसत नाहीं. प्रत्येक खेड्यांत शाळा, पंचायत व सहकारी संस्था असल्या पाहिजे अशी त्यांची सूचना आहे. ही सहकारी संस्था मल्टिपर्पज सोसायटीच्या स्वरूपाची असावी आणि तिनें शेतकऱ्याच्या सर्वंद जीवनाचा परामर्श घ्यावा. सामान्य जनतेस शिक्षण देऊन स्वतःची उन्नति घडवून आणण्यास तिला समर्थ केलें पाहिजे. देशाची सर्वांगीण आर्थिक प्रगति होईल अशी व्यवस्था झाली नाहीं तर केवळ शेतीचीच प्रगति होणें कठीण आहे असें सर मणीलाल ह्यांचें मत असल्यानें सरकारनें ह्यासंबंधांत योजना आखून ती पुरी करण्याची जबाबदारी स्वतःच्या शिरावर घेतली पाहिजे असें त्यांनीं आग्रहानें सांगितलें आहे.

वहातुकीच्या साधनांसाठी परावलंबन नको

(हिंदुस्थानांत पक्के, मोटारचे हमरस्ते बांधण्याच्या आवश्यकतेचा प्रचार चालू आहे, त्याची दुसरी बाजू श्री. स. सी. नाईक, बी. ए., बी. एससी., एल. सी. ई. ह्यांनीं "खेडेगावास जाणाऱ्या रस्त्यांची योजना" ह्या आपल्या लेखांत मांडली आहे. त्याचा महत्त्वाचा भाग येथें उद्धृत केला आहे.)

सबंध हिंदुस्थानासाठी पक्के मोटरचे (आस्फाल्टचे) रस्ते पाहिजेत; त्यांपैकीं एक भाग म्हणून खेड्यांच्या पक्क्या रस्त्यांची योजना करा व ही योजना युद्धोत्तर सुधारणा म्हणून दर प्रांतास लागू करा असा प्रचार जो केला जात आहे तो आजच्या व आणखी पांचपंचवीस वर्षे पुढें पर्यंत दिसत असलेल्या आपल्या परिस्थितीप्रमाणें आमच्या हिताचा नाहीं असें आम्हांस वाटतें. आजपर्यंत सरकारनें हातीं घेतलेला मध्यवर्ती व दुय्यम रस्त्यांचा प्रश्न इतका महत्त्वाचा, खर्चाचा व व्यापक निघाला कीं इतर रस्त्यांच्या प्रश्नांस हात घालण्यास सवड झाली नाहीं. लढाईच्या परिस्थितींतील अडचणीमुळें खेड्यांच्या रस्त्यांची उणीव भासली व ते विचाराच्या कक्षेंत आले. त्यांच्या योजना करतांना त्या सयुक्तिक व माफ असल्या पाहिजेत. प्रमुख रस्ते व खेड्यांचे रस्ते यांपैकीं प्रत्येकास त्याचें योग्य तें स्थान दिलें पाहिजे. कारण ते एकमेकांस पोषक आहेत ही जाणीव पाहिजे.

दळणवळणाचे मार्ग म्हणजे रेल्वे व रस्ते; त्यासाठी वाहनें म्हणजे रेलगाड्या व इंजिनें; मोटारी व गाड्या, आगबोटी व तारवें होड्या वगैरे व विमानें; या सर्वांसाठी लागणाऱ्या वस्तू अगर माल, व शेवटीं शक्ति उत्पादन करण्यासाठी लागणारा कोळसा, तेल अगर वीज हीं सर्व शांतता नांदत असतां अगर लढाईच्या वेळीं आवश्यक जरूरीच्या वस्तूंमध्यें (Essential services and requirements) अग्रगण्य समजलीं पाहिजेत. कारण तीं मनुष्याच्या जीवनास व बचावास पदोपदीं लागणारीं असल्यामुळें प्रत्येक गोष्ट व वस्तू यांवर अवलंबून असते. या सर्वांमध्यें पूर्ण स्वावलंबन पाहिजे तरच राष्ट्र राष्ट्रीयत्वाप्रत पोहोंचेल. हीं सर्व साधनें अगर वस्तू राष्ट्रीय सरकारच्या मालकीच्या अगर हुकमतींतल्या पाहिजेत व शक्य तितक्या नजीक तयार झाल्या पाहिजेत.

आपली परिस्थिती या कामांत केविलवाणी आहे. रस्त्यांसाठी व रेल्वेसाठी लागणारी माती, मुरुम, लढी, चुना हीं येथील आहेत; कारण तीं बाहेरून आणतां येतच नाहींत. आजकाल सिमेंट हिंदुस्थानांत होतें, रेल्वेचे कांहीं रेल टाटानगरच्या कारखान्यांत होतात. जवळ जवळ येथें ही यादी संपली. रस्त्यांसाठी आस्फाल्ट ब्रह्मदेश, इराण अगर अमेरिकेतून येतें. रेलगाड्या व इंजिनें इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी अगर अमेरिका या देशांत आमच्यासाठी तयार होतात. विमानें तर्शीच. मोटारी याहीपेक्षां जास्त देशांतून फार तर काय बेल्जियम, इटाली इत्यादि लहान देशांतूनही येतात. त्यांसाठी लागणारीं उपकरणें व लहान भाग त्याच देशांतूनें येणें भाग आहे.

कोळसा कांहीं या देशांत, बिहार व मध्यप्रांत या ठिकाणीं थोडासा मिळतो. तो अतिशय अपुरा आहे व मुंबई, कराचीसारख्या बंदरांत व मुख्य कारखान्यांच्या ठिकाणीं परदेशांतून आलेल्या कोळशापेक्षांही महाग पडत असे अशी आमची समजूत आहे. कोळशाचे कारखानदार मालक, वहातुक करणाऱ्या रेल्वे व सरकार यांचा एकसूत्रीपणा नसल्यामुळें देशांतील कोळसा देशांत महाग पडत असे. लोसंड व पोलाद यांतही हीच अडचण असल्यामुळें टाटानगरचा कारखाना मदत देऊन पोसावा व जगवावा लागला.

पेट्रोल, क्रूड ऑइल, लुब्रिकेटिंग तेलें वगैरे सर्वच बाहेर देशांतून येतात. साखरेच्या कारखान्यांत फुकट जाणाऱ्या टाकाऊ मालापासून पॉवर अल्कोहॉल करण्याची परवानगी नसे, ती आतांशी मिळूं लागली आहे. ब्रह्मदेश, इराण, रशिया, अमेरिका वगैरे देशांतून हें जळण येत असे. वीज तयार करण्याचीं यंत्रें व त्यांचे भाग जबर किंमतीस बाहेरून आणावे लागत असल्यामुळें दोन-चार पै युनिट मूळ किंमतीची वीज आम्हांस दुप्पट चौपट किंमतीस तयार होते. ट्यूब, टायर व इतर सर्व कामासाठी लागणारा रबर मलाया, डच ईस्ट इंडीज वगैरे परदेशांतून घ्यावा लागत असे. अशा तऱ्हेनें सर्व बाबतींत आमचें आज परावलंबन आहे. लढाईच्या परिस्थितीमुळें कोणतीच वस्तू मिळत नसल्यामुळें जी आपणांवर आपत्ति कोसळत आहे ती पाहून तरी आमचे डोळे उघडतील अशी आशा आहे. ही सर्व सामुग्री शुद्ध स्वदेशी पाहिजे, कारखानेही आपल्या भांडवलाचे, आपल्या मालकीचे व आपल्या हुकमतीखालीं चालणारे पाहिजेत. अक्कलहुषारी असणारे तज्ज्ञ लोक व सर्व कामगारवर्ग आपला पाहिजे. तयार मालास लागणारे सर्व दुय्यम पदार्थ ट्यूब, टायर, मॅग्नेटो वगैरे सर्व आपल्याकडेच तयार होणारीं पाहिजेत. राष्ट्रीय हिंदुस्थान सरकारची या सर्व कारखान्यांवर मेहेरनजर पाहिजे. इतर सर्व देश या तत्त्वाचा पुरस्कार करतात व शांतता व लढाई असतांनाही आपला देश मजबूत बनवितात. आपण मात्र आजवर बेफिकीर राहिलों. यापुढें असेच राहिलों तर पूर्ण परावलंबी व निरुपयोगी बनून जाऊं. त्याचप्रमाणें दळणवळणाचे मार्ग, त्यांचीं वाहनें इत्यादि सर्व राष्ट्रीय हिंदुस्थानाच्या हुकमतीखालीं पाहिजेत.

रेशन ज्यास्त मिळावें, म्हणून दातांच्या कवळीची चोरी

आपल्या स्वतःच्या वाटचास रेशन ज्यास्त यावें, ह्यासाठी शिकागो येथील एका मनुष्यानें आपल्या पत्नीची कृत्रिम दातांची कवळी चोरली, हेतु हा कीं तिला खातां आलें नाहीं म्हणजे तिचें रेशन त्याला खायला मिळेल! पत्नीनें घटस्फोट मागतेवेळीं कोर्टांत ही हकीकत सांगितली, तेव्हां कोर्टानें घटस्फोट मंजूर करून दातांची कवळी पत्नीस परत देवविली.

स्फुट विचार

१९४४ सालाच्या युद्धविषयक अपेक्षा

ख्रिस्ती शकाच्या नूतन वर्षाचे प्रारंभी मित्रराष्ट्रांच्या आणि जर्मनी व जपान ह्या शत्रुराष्ट्रांच्या पुढाऱ्यांनीं येत्या बारा महिन्यांत युद्धास कसें वळण लागेल ह्या विषयीं स्वतःच्या आशा व अपेक्षा व्यक्त केल्या आहेत. नुकतेंच चालू झालेलें वर्ष हा प्रस्तुत युद्धांतला निर्वाणीचा कालखंड ठरणार ह्याची जाणीव सर्वांस आहे. युरोपांत दुसऱ्या आघाडीची तयारी इंग्लंड व अमेरिका ह्यांच्या सैन्याधिकाऱ्यांनीं केली आहे ह्याविषयींची माहिती प्रसिद्ध झालीच आहे. रशिया जर्मन फौजास झपाट्यानें पोलंड, रुमानिया व बाल्टिक समुद्र ह्यांच्या सरहद्दीकडे रेटीत आहे आणि पूर्व आघाडीवर शत्रूस कोठेच टिकाव धरतां येईनासा झाला आहे. इटलीमध्यें ब्रिटिश व अमेरिकन सैन्यांची मंदगतीनें पण निश्चितपणानें प्रगति चालली आहे. मित्रराष्ट्रांच्या विमानांच्या प्रचंड आघातांनीं जर्मनीच्या प्रमुख शहरांचा चुराडा होत आहे. ह्या सर्व परिस्थितीवरून एकच सिद्धांत निघतो आणि तो हा आहे कीं, मित्रराष्ट्रांस १९४४ सालांत जर्मनी विरुद्ध निर्णायक विजय प्राप्त होण्याचीं अनुकूल चिन्हें स्पष्ट दिसत आहेत. ब्रिटिश व अमेरिकन मुत्सद्यांच्या व सैनानींच्या नवीन वर्षविषयक संदेशांत व उद्गारांत आशावादाचा व उत्साहाचा ध्वनी उमटणें ह्यामुळें स्वाभाविक व समर्थनीय आहे, पण जर्मनी व जपान ह्यांच्या बतीनें नवीन वर्षांतील युद्धाच्या हालचालींविषयीं भविष्यें वर्तवण्यांत येत आहेत आणि आश्वासनें देण्यांत येत आहेत तीं कशाच्या आधारावर उभारलेलीं आहेत हें त्यांस स्वतःच सांगतां येणें अशक्य आहे. प्रत्यक्ष रणांगणांकडे पाहिलें असतां शत्रुराष्ट्रांस सर्वत्र थपडाच खाव्या लागत आहेत. लढाऊ सामर्थ्याचे संबंधांत इंग्लंड व अमेरिका ह्यांचा शस्त्रास्त्रांचा पुरवठा सारखा वाढत आहे आणि जर्मनी व जपान ह्यांस त्यांचा तुटवडा भासत आहे ह्या गोष्टी स्पष्ट आहेत. म्हणून जर्मनी व जपान ह्यांच्या प्रचारकांचा आत्मविश्वास केवळ दिखाऊ आहे ह्यांत शंका नाहीं. ह्याच्या उलट, मित्रराष्ट्रांचा उत्साह साधार आहे तरीहि त्यांच्या प्रतिनिधींची भाषा प्रौढीची नसून सावधगिरीची आहे हा फरक लक्षांत घेण्यासारखा आहे. शेवटची हार खाण्यापूर्वी शत्रू पिसाटपणाच्या निकरानें लढेल आणि आपणांस विजयाची भारी किंमत बायी लागेल ह्या जाणीवेनें आपण सर्वांनीं लढलें पाहिजे असें मित्रराष्ट्रांचे पुढारी सांगत आहेत हें दूरदृष्टी व्यवहार्यतेचें लक्षण आहे. नूतन सालांतली युद्धपरिस्थिति मित्रराष्ट्रांस निश्चितपणानें विजयाच्या ध्येयाजवळ नेईल अशी अनुकूल आहे आणि त्यांनीं आपला युद्धप्रयत्न अधिक नेटानें चालू ठेवला पाहिजे हें उघड आहे.

मद्रासची अर्थशास्त्रीय परिषद

गेल्या मार्चांत हिंदी अर्थशास्त्रज्ञांची परिषद मद्रासमध्यें डॉ. नारायणस्वामी नायडू ह्यांचे अध्यक्षतेखाली भरली होती. मद्रास विश्वविद्यालयाचे उपकुलगुरु डॉ. लक्ष्मणस्वामी मुदलियार, ह्यांनीं परिषदेचें उद्घाटन केलें. ह्या दोघांच्याहि भाषणांत हिंदुस्थानच्या युद्धोत्तर आर्थिक पुनर्घटनेविषयींचें विवेचन अग्रस्थानीं यावें हें उचितच होतें. अटलांटिक सनदेंत नमूद केलेल्या जागतिक पुनर्रचनेच्या योजनेस मूर्तस्वरूप प्राप्त झाल्यास पृथ्वीवर स्वर्ग अवतरल्यासारखें होईल असें म्हणून डॉ. लक्ष्मणस्वामी ह्यांनीं हिंदुस्थानांत उद्योगधंदे व शेती ह्यांची वाढ व सुधारणा कोणत्या रीतीनें होणें आवश्यक आहे ह्यासंबंधानें सूचनात्मक उद्गार काढले. अलीकडे सरकार व धंदेवाले ह्यांस अर्थशास्त्रज्ञांच्या सल्ल्याचें महत्व पटत चाललें आहे ह्याबद्दल त्यांनीं समाधान व्यक्त केलें आणि अर्थशास्त्रज्ञांनीं निःपक्षपातीपणानें आपला अभिप्राय देऊन आर्थिक प्रगतीस सहाय करावें असें ते म्हणाले. हिंदुस्थानची राजकीय घटना कोणत्याहि स्वरूपाची होवो, आर्थिक दृष्ट्या ह्या देशाचें धोरण एक राहिलें पाहिजे आणि ह्यासाठी पुनर्रचनेची योजना, देशाचें असंघटत्व व त्यांतील घटकांचें संवादित्व दृढमूल होईल अशा प्रकारची बनवणें अगत्याचें आहे असें आपलें मत त्यांनीं दिलें. परिषदेचे अध्यक्ष, डॉ. नारायणस्वामी नायडू, ह्यांनीं युद्धोत्तर काळांतील हिंदुस्थानांत कोणत्या पद्धतीनें आर्थिक पुनर्घटना झाली पाहिजे ह्याचें दिग्दर्शन केलें आणि ह्या देशापुढें येणाऱ्या महत्वाच्या आर्थिक प्रश्नांची चर्चा केली. हिंदी जनतेच्या दारिद्र्याचें व दुस्थितीचें निर्मूलन होण्यास स्वदेशी उद्योगधंदे, व्यापार व शेती ह्यांच्या उन्नतीस राष्ट्रीय सरकारास मदत करावी लागेल. युद्ध चालू असतांना सरकार आर्थिक व्यवहारांत कार्यक्षमता व उत्पादकता ह्यांचे दृष्टीनें हस्तक्षेप करीत आहे. युद्ध संपतांच हें धोरण त्यास एकदम सोडून देतां यावयाचें नाहीं. हिंदुस्थानासारख्या मागसलेल्या व दरिद्री देशांत आर्थिक प्रगतीचे बाबतींत राष्ट्रीय सरकारनें उदासीनतेची भूमिका घेऊन भागणार नाहीं. अशा रीतीनें सरकारनें करावयाच्या आर्थिक क्षेत्रांतील कर्तव्यावर डॉ. नारायणस्वामी ह्यांनीं जोर दिला. युद्धकालांतील आर्थिक नियंत्रणें, बँकिंगच्या धंद्याचें नियमन, चलन इत्यादि महत्वाच्या विषयांचीहि चर्चा मद्रासच्या परिषदेनें केली.

भौतिक शास्त्रें आणि राष्ट्रीय प्रगति

भौतिक शास्त्रांच्या अभ्यासास वाहिलेल्या सुप्रसिद्ध रॉयल सोसायटीची सभा दिल्ली येथें परवा म्हणजे सोमवारीं भरली आणि त्या बरोबरच हिंदी सायन्स काँग्रेसचें अधिवेशन झालें. गेल्या दोनशें वर्षांत तिच्या स्थापनेपासून आतांपर्यंत रॉयल सोसाय्टीची सभा इंग्लंडच्या बाहेर कधींही झाली नव्हती. प्रस्तुत योगायोग ह्या कारणासाठी अपूर्व गणला पाहिजे. व्हाइसरॉय व्हायकौंट वेव्हल, ह्यांनीं उद्घाटन प्रसंगीं भाषण करतांना हिंदुस्थानांत मेल्या पंचवीस वर्षांत भौतिक शास्त्रांच्या अभ्यासांत झालेल्या प्रगतीचा गौरवपूर्ण उल्लेख केला आणि विश्वविद्यालयें व शास्त्रीय मंडळें ह्यांनीं चालवलेल्या कार्याकडे बोट दाखवलें. भौतिक शास्त्रज्ञांचा युद्ध-सामुग्री व शस्त्रास्त्रें ह्यांचे संबंधांत सुधारणा होण्यास मोठा उपयोग झालेला आहे असें त्यांनीं सांगितलें. युद्धोत्तर काळांत हिंदुस्थानच्या आर्थिक उन्नतीस शास्त्रीय शोधांची मदत होणें इष्ट आहे असें म्हणून लोकांचें ह्या विषयाकडे अधिकाधिक लक्ष लागेल अशी आशा त्यांनीं प्रदर्शित केली. पारमार्थिक कल्याण व आर्थिक उन्नति ह्यांची सांगड घातली गेली पाहिजे आणि भौतिक शास्त्रांच्या व्यावहारिक उपयुक्ततेस ह्या देशांत पुष्कळ वाव आहे असें व्हाइसरॉय म्हणाले. ब्रिटिश मुख्य प्रधान, मि. चर्चिल, ह्यांनीं आपल्या संदेशांत आधुनिक शास्त्रीय शोधांचा दुरुपयोग मानवी संस्कृतीचा नाश करण्यांत होतो, पण तो बंद पाडून त्यांचा सदुपयोग शांतता व प्रगति ह्यांचेप्रीत्यर्थ आपण केला पाहिजे असें म्हटलें होतें. हिंदुस्थानांत चाललेल्या शास्त्रीय शोधांच्या प्रगतीचा अभिनंदनात्मक निर्देश फिल्ड मार्शल स्मट्स ह्यांनीं धाडलेल्या संदेशांत होता आणि ह्या देशाच्या नैसर्गिक साधनांचा विनियोग शास्त्रीय पद्धतीनें केला जाऊन येथील जनतेची उन्नति घडून यावी अशी इच्छा प्रदर्शित करण्यांत आली होती.

हिंदी लोकांचें आरोग्य

रॉकफेलेर्स फौंडेशनच्या इंटरनॅशनल हेल्थ विभागाचे डॉ. जॉन बी हॅट हांनीं हिंदुस्थानांतील आरोग्यावरील आपला रिपोर्ट तयार केला आहे, त्यांत नमूद केलेल्या गोष्टींवरून हिंदुस्थानांतील ह्या संबंधांतील परिस्थितीवर प्रकाश पडतो. ते म्हणतात: "हिंदुस्थानांतील ४० कोटि लोकांस उपचार करण्यासाठी ४२ हजार डॉक्टर (त्यांतील २८ हजार सरकारी परवान्याचे आहेत) व ५ हजार नर्सेस आहेत. गेल्या वर्षी एकूण ६½ हजार दवाखान्यांतून १½ कोटि लोकांस औषधपाणी मिळालें. संबंद हिंदुस्थानांत विश्वविद्यालयांस जोडलेलीं फक्त दहा डॉक्टरी शिक्षविणारी कॉलेजें आहेत व उत्कृष्ट शिक्षणास पात्र अशी त्यांतील एकहि संस्था नाहीं! १९३९ साली हिंदुस्थानांत १५ लक्ष लोक मलेरियानें मेले व कॉलऱ्यास १ लक्ष लोक बळी पडले. देवीच्या साथीनें ५० हजारांचा प्राण घेतला. क्षयरोग फैलावत आहे. बहुसंख्य लोकांना फक्त स्वस्त कार्बोहेड्रेट अन्नच (साखर व स्टार्चेस) परवडतें; कांहीं आवश्यक अन्नद्रव्यें त्यांस मिळूं शकत नाहींत. बंगालमधील लोकसंख्या ५ कोटि आहे, परंतु रुग्णालयांत फक्त ६ हजारच खाटांची व्यवस्था आहे. गिरण्यांत काम करणाऱ्या मजुरांच्या आरोग्याबद्दल सरकार जवळ जवळ कांहींच जबाबदारी घेत नाहीं; ती गोष्ट कारखानदारांवर सोपवलेली दिसते. हिंदुस्थानांत आरोग्यरक्षणावर होणाऱ्या ३ कोटि डॉलर्सच्या खर्चाचाहि पुरा उपयोग होऊं शकत नाहीं. हिंदुस्थानाचा निरक्षरता कमी झाल्याविना आरोग्याबाबत खरी प्रगति होऊं शकणार नाहीं."

कारखान्यांच्या सक्तीच्या विम्याची मुदतवाढ

दोन वर्षांपूर्वी हिंदुस्थान सरकारनें कारखान्यांच्या सक्तीच्या युद्धविषयक जोखमीच्या विम्याची योजना आखली, तिची मुदत मार्च, १९४४ अखेर संपत आहे. ह्या योजनेस अनुसरून सरकारनें आठ हप्त्यांत मिळून १६ कोटि रुपये वसूल केले, परंतु खर्चाचा आंकडा ७ लक्ष रुपयांवर गेलेला नाहीं. ह्या ७ लक्ष रुपयांपैकी, नुकसान भरपाईदाखल दिलेली रक्कम १ लक्ष रुपयेच भरेल; बाकीची रक्कम व्यवस्थेच्या खर्चास लागली. ज्या कारखान्यांनीं आठ हप्ते भरलेले आहेत, अशांकडून एप्रिल, १९४४ ते मार्च १९४५ ह्या बारा महिन्यांत आणखी हप्ते न घेतां, त्यांस विम्याचा फायदा मिळावा, असें फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्सनें सरकारास सुचविलें आहे व त्यासंबंधांत फेडरेशननें ऑस्ट्रेलियाचा दाखला दिला आहे. सर्व प्रातिनिधिक संस्थांचें म्हणणें विचारांत घेऊन सरकार आपला निर्णय जाहीर करील; परंतु जपानशीं चालू असलेलें युद्ध संपेपर्यंत विम्याची सक्ती रद्द होईल, अशी अपेक्षा करणें योग्य होणार नाहीं. विम्याचा हप्ता कमी होणें हें मात्र क्रमप्राप्त दिसतें.

महाराजांचें पेट्रोल बंद

इंदूरचे महाराज ह्यांच्या मोटारीस लॉस एंजल्समध्येंच वापरण्यासाठी पेट्रोल दिलें असतां तें त्यांनीं (काडीमोड करून दुसरा विवाह करण्यासाठी) रेनोळा जाण्याकरितां वापरलें, ह्याकरितां त्यांना एक वर्षभर पेट्रोल मिळणें बंद करण्यांत आलें. अर्थात्, महाराजांजवळ आणखी मोटारी असल्यामुळें, त्यांस पायी चालावें लागलें नाहीं.

दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.

हेड ऑफिस: पुणें शहर.
स्थानिक शाखा: डेक्कन जिमखाना, पुणें ४.
मुंबई शाखा: दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.
जळगांव शाखा: नवी पेठ, जळगांव.
नागपूर शाखा: गोखले बिल्डिंग, सितावर्डी, नागपूर.

भांडवल

अधिकृत व विकीस काढलेलें	सपलेलें	वसूल झालेलें
रु. १०,००,०००	रु. ६,७९,२००	रु. ३,३१,६००

एकूण सेठतें भांडवल रु. ६०,००,०००

बँकेच्या शेअरवर डिसेंबर १९४२ अखेर ४½% करमाफ डिव्हिडंड दिलें गेलें. बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदी-विक्री कसोशीनें करून दिली जाते.

मॅनेजर

दि बँक ऑफ इंडिया लि.

[स्थापना: १९०६]

अधिकृत भांडवल	... ...	रु.	३,००,००,०००
वसूल झालेलें भांडवल	... ...	रु.	१,००,००,०००
रिझर्व्ह फंड	... ...	रु.	१,२०,५०,०००

मुख्य कचेरी: ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

मुंबईमधील शाखा: बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

इतर शाखा: अहमदाबाद (भद्र, मुख्य ऑफिस), अहमदाबाद (एलिस ब्रिज शाखा), अहमदाबाद (स्टेशन शाखा), अमृतसर, अंधेरी (मुंबई शेजारी), बांद्रे (मुंबई शेजारी), कलकत्ता (क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्क्वेअर), जमशेदपूर, कराची, नागपूर (किंग्जवे), नागपूर (इतवारी बझार), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत, भुज (कच्छ).

लंडन एजन्ट्स: वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

डायरेक्टर्स: सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस. आय. (अध्यक्ष), श्री. अंबालाल साराभाई, सर जोसेफ के. नाईट, मि. ए. गेडिस, सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, के. सी. आय. ई., ओ. बी. ई., मि. दिनशा के. दाजी, श्री. रामनिवास रामनारायण.

करंट डिपॉझिट अकाउंट्स:

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षा कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

बिल्स व सेटलमेंट्स प्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते, सर्व तऱ्हेचें ट्रस्टींचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

बँकेसंबंधी नेहमींचा सर्वसामान्य व्यवहार केला जातो.

एजंट:—एच् ए. करीमभाई

खारे काजू, मसालेदार काजू

सर्व तऱ्हेचा खास पिस्ता, सुका मेवा, अक्रोड, काट्या खजूर, अंजीर वगैरे मिळतील.

द. ना. हेजीब
१० शुक्रवार, पुणें.

म्हैसूर संस्थानची ग्रामोद्धार योजना

(लि. आ. मा.)

हिंदुस्थानांतील एक प्रगमनशील संस्थान म्हणून म्हैसूर संस्थानचा लौकीक आहे. म्हैसूर संस्थानची औद्योगिक कामगिरी फार मोठी आहे. या संस्थाननें ग्रामोद्धाराच्या प्रश्नाकडेहि लक्ष दिलें असून त्याबाबत एक कार्यक्रमहि आंखला आहे.

ह्या संस्थानांत ग्रामपंचायती फार जुन्या आहेत. सन १९०४ सालापासूनच ग्रामोद्धार प्रश्नाकडे सरकारनें लक्ष दिलें आहे. सरकारला असें दिसून आलें कीं, खेडेगांवांतील पाण्यार्ची तळीं सुधारणें, स्थानिक जंगलाचें काम करणें, यासाठी पंचायतीच्या कमिट्या नेमल्या पाहिजेत. यासाठी पंचायतींकडे खेडेगांवचें सर्व विधायक काम देऊन त्या स्वायत्त करण्याकडे प्रयत्न सुरूं झाला.

१९२५ ते १९३५ या दहा वर्षांचे अवधींत सुमारें ११,००० पंचायती स्थापन झाल्या. प्रथम त्यांचेकडे असलेलें काम जरी आरोग्याबाबतचें असलें तरी पुढें त्यांकडे आर्थिक व सामाजी उन्नतीचे बाबत प्रयत्न करण्याचे सर्व अधिकार दिले आहेत.

सन १९३६ पासून ग्रामोद्धार योजनेस अनुसरून सरकारनें कांहीं खेडीं नमुनेदार म्हणून निवडून त्यांचें अनुकरण इतर खेडेगांवांनीं करावें असा प्रयत्न सुरू केला आणि अशीं सुमारें २२३ खेडीं निवडण्यांत आलीं.

ग्रामोद्धाराचें काम सरकारी आधिकारी यांचे मार्फत चालत असें व यामुळें निमसरकारी कार्यकर्ते या कार्यांत नसत. यासाठी सुमारें १३० निमसरकारी कार्यकर्ते नेमण्यांत आले.

ग्रामोद्धाराची ठोकळ योजना अशी कीं, संस्थानांतील ४० ते ५० खेडेगांवांचा एक गट असे गट करावयाचे. ५ वर्षांचे अवधींत ग्रामोद्धाराची संपूर्ण योजना अंमलांत आणतां येईल. ग्रामोद्धाराच्या योजनेसाठी अंदाजपत्रकांत १९४१।४२ सालासाठी दोन लांख रुपये राखून ठेवले होते यापैकीं ५० ते ६० हजार रुपये खर्च नोकरवर्गासाठी व बाकीची रक्कम पंचायतींना देणगीसाठी म्हणून उपयोगी पडावी, अशी योजना होती.

ग्रामोद्धार कामास उपयुक्त अशी माहिती मिळविण्याची व्यवस्था असून त्यांत खालील बाबींचा समावेश केला आहे.

(१) सर्वसाधारण (लोकसंख्या, क्षेत्रफळ, घरें वगैरे.)

(२) जमिनी. (यांत बागाईत, जिराईत, जनावरें, जंगलें, पाणीपुरवठा, जमीन धारण न करणारे रहिवाशी.)

(३) आरोग्य, पाणीपुरवठा, वाहुतकीचीं साधनें, शिक्षण, शेती, वैद्यकीय मदतीचीं साधनें, उद्योगधंदे, व व्यापार, सहकारी संस्था, पंचायतींची कामकाजपद्धत वगैरे. ह्या सर्व प्रश्नांची माहिती मिळवून त्याप्रमाणें कामास सुरवात करावयाची. प्रत्येक गटासाठी एक समिति असून त्यामध्यें त्या भागाचे सरकारी अधिकारी सभासद असतात व यांच्या सभा महिन्यांतून एकदां होतात.

★	★	★	★	★	★	जुले	सन १९४४				
★	★	आगस्ट	नोव्हेंबर	★	डिसेंबर	एप्रिल					
आक्टोबर	मे	फेब्रुवारी	मार्च	जून	सप्टेंबर	जानेवारी					
रविवार	सोमवार	मंगळवार	बुधवार	गुरुवार	शुक्रवार	शनिवार	१	८	१५	२२	२९
सोमवार	मंगळवार	बुधवार	गुरुवार	शुक्रवार	शनिवार	रविवार	२	९	१६	२३	३०
मंगळवार	बुधवार	गुरुवार	शुक्रवार	शनिवार	रविवार	सोमवार	३	१०	१७	२४	३१
बुधवार	गुरुवार	शुक्रवार	शनिवार	रविवार	सोमवार	मंगळवार	४	११	१८	२५	★
गुरुवार	शुक्रवार	शनिवार	रविवार	सोमवार	मंगळवार	बुधवार	५	१२	१९	२६	★
शुक्रवार	शनिवार	रविवार	सोमवार	मंगळवार	बुधवार	गुरुवार	६	१३	२०	२७	★
शनिवार	रविवार	सोमवार	मंगळवार	बुधवार	गुरुवार	शुक्रवार	७	१४	२१	२८	★

(हें कॅलेंडर श्री. जी. टी. सोनार, क्लार्क, नंदुरबार को. सु. युनियन, यांनीं तयार केलें आहे व लोकांच्या कागदार्चा बचत व्हावी, यासाठी " अर्था "मध्यें प्रसिद्धीसाठी त्यांनीं पाठविलें आहे.)

सध्याच्या टंचाईच्या काळांत जीवनद्रव्यें कमी पडतात.

जीवनद्रव्यांनीं (Vitamins) युक्त असे

टोमॅटो केचप (गोड) व

टोमॅटो सॉस [तिखट व आंबट]

आजच मागवा व जीवनद्रव्यांची वाटणारी

उणीव भरून काढा.

रुरल प्रॉडक्टस कंपनी लि. पुणें

बिझिनेस ऑफिस: ९१३ अ सदाशिव, पुणें २.

दत्त कंपनी

७१५ शुक्रवार पेठ, पुणें २. दाणेआळी पोलिसगेटाजवळ

सर्व तऱ्हेचे काटे, वजनें व मापें, वेळेवर, रिपेअर करून मिळतील.

'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

विमेदार नि हवाई हल्ला

शत्रुराष्ट्राकडून हवाई हल्ला अगर तत्सम इतर [illegible] लढाऊ नागरिकाच्या जीविताला येणाऱ्या धोक्याचा [illegible] पॉलिसीच्या अटींत होतो काय व त्यासाठी जादा प्रिमिअम [illegible] लागेल काय ! असा प्रश्न साहजिकच नागरिकांमध्यें चर्चिला जात आहे.

ट्रस्ट ऑफ इंडिया

विमा कंपनीच्या

विमा पॉलिसीमध्यें हवाई हल्ल्यामुळें जीविताला होणाऱ्या अपायाचा अंतर्भाव होतो त्याकरितां जादा प्रिमिअम नाहीं.

तरी विलंब न लावतां—

तुमचा नि तुमच्या आप्तेष्टांचा विमा

ट्रस्ट ऑफ इंडिया

विमा कंपनींतच उतरा.

अध्यक्षः—श्रीमंत सरदार जगन्नाथ महाराज पंडित

माहितीपत्रकें विनामूल्य पाठवूं

ट्रस्ट ऑफ इंडिया विमा कं. लि., लक्ष्मी रोड, पुणें २ } वि. ह. देशमुख, बी. ए. जनरल मॅनेजर

पुना गेस्ट हाऊस

१००, लक्ष्मी रोड, पुणें २.

Telephone 779

TELEGRAM Guest House Poona 2.

न्यू इंडिया इंडस्ट्रीज लि.

(Approved Re-traders and Approved Contractors)

२६ लॅमिंग्टन नॉर्थ, मुंबई ११.

अध्यक्षः—श्री. ग. स. मराठे, ॲक्चुअरी.

महाराष्ट्रांतील रबराचा प्रमुख कारखाना

★ गिरणीचे रोलर्स ★ रबरी हातमोजे ★ छापखान्यांचे रोलर्स
★ रीमोल्ड टायर्स ★ रबरी वॉशर्स ★ सॉलिड व्हील्स

व इतर रबरी माल तयार होतो.

पु. ग. मराठे
मॅनेजिंग डायरेक्टर.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२४।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3454

जाहिरातींचे दर.
आतील पहिल्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
(टपाल खर्चासह माफ)
किरकोळ अंकास
दोन आणे.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति। —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष १० पुणें, बुधवार, तारीख १२ जानेवारी, १९४४ अंक २

दि ब्रिटिश इंडिया जनरल इन्शुअरन्स कं. लि.

(स्थापना : १९१९)

आम्ही आयुर्विम्याखेरीज करून आग, मरीन, अपघात, इत्यादींचे सर्व प्रकारचे विमे स्वीकारतों.

—: चेअरमन व मॅनेजिंग डायरेक्टर :—

सर होमी मेहता, के. बी. ई., जे. पी.

पुणें शाखा :
मोति माणिक मॅन्शन,
लक्ष्मी रोड.

हेड ऑफिस :
मेहता हाऊस,
अपोलो स्ट्रीट, मुंबई.

पुण्यांतील
आदर्श निवासस्थान व भोजनालय
छाया लॉजिंग व बोर्डिंग हाउस
बुधवार चौक, पुणें २.

चटण्या तयार मिळतात!
लसूणाची, जवसाची, कारळेची वगैरेची नवरत्न चटणी, मँगो चटणी इ०
द. ना. हेजीब.
(३) २० शुक्रवार, पुणें.

महायुद्धाची जाणीव! कपड्यांच्या सर्वांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

गिरगांव मुंबई नं. ४

महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

विविध माहिती

मोटारींच्या उत्पादनास प्रारंभ !

बिर्ला बंधू लवकरच मोटारींच्या उत्पादनास प्रारंभ करूं शकतील, अशी कल्पना आहे. त्यासंबंधांतील पूर्वतयारी ते करीत आहेत.

विहिरी व तळीं झांसाठी २७ लक्ष रुपये

धारवाड, बेळगांव व कानडा जिल्ह्यांतील १,२०० विहिरी व ६०० तळीं दुरुस्त करून व तेथें आणखी ८०० विहिरी व ५०० तळीं खणून तांदूळाच्या लागवडीस पाटाचें पाणी उपलब्ध करण्याच्या योजनेसाठी २७ लक्ष रुपयांची एक योजना शेतकी खात्यानें मुंबई सरकारला सादर केली आहे. एकूण खर्चाच्या एक तृतीयांश खर्च सरकारनें सोसावा, अशी कल्पना आहे. ही योजना पुरी झाली तर २ लक्ष, ४० हजार मण अधिक धान्य पिकूं शकेल. विजापूर व सोलापूर जिल्ह्यांच्या दुष्काळी विभागांचाहि समावेश वरील योजनेंत आहे.

साखरेचें घरगुती उत्पादन

साखरेचें घरगुती उत्पादन करणाऱ्या सोप्या यंत्रसामुग्रीची बिहारी येथील शुगर रिसर्च अँड टेस्टिंग स्टेशननें रचना केली आहे, तिचे सहायानें शेतकऱ्यांस स्वतःच शेतावर, घरच्या लोकांच्या मदतीनें व बैलाच्या शक्तीवर दररोज २५ ते ३० मण ऊस गाळतां येईल. ह्या यंत्रावर काढलेल्या साखरेवर एक्साइस ड्यूटी पडणार नाहीं, कारण ती काढतांना वीज, तेल, कोळसा वाफ, इत्यादि कोणतीहि प्रेरक शक्ति वापरलेली नसते.

ब्रिटिश कोळशाच्या खाणींत इटालियन युद्धकैदी !

जर्मनी इटलीला दरसाल १½ कोटि टन कोळसा पुरवीत होता. आतां हा कोळसा पुरविण्याचें काम ग्रेट ब्रिटनकडे येईल. ह्या हेतूनें, ग्रेट-ब्रिटनमधील इटालियन युद्धकैद्यांना कोळशाच्या खाणींत कामास लावावयास हरकत नाहीं, असें तेथें सुचविण्यांत येत आहे. इटलीनें आतां संयुक्त राष्ट्रांस मदत करण्याचें ठरविलें आहे, व तेथील कारखान्यांस कोळसा लागेल तो पुरविण्याचा हा मार्ग आहे.

इंडियन आयर्न अँड स्टील कं. लि.

वरील कंपनीस ३१ मार्च, १९४३ अखेर संपलेल्या वर्षी ५० लक्ष रुपये नफा झाला.

बँक ऑफ इंडियाच्या भांडवलांत वाढ

बँक ऑफ इंडियाचें सध्याचें अधिकृत भांडवल २ कोटि रुपये व वसूल भांडवल १ कोटि रुपये आहे, तें अनुक्रमें ३ कोटि व १½ कोटि रुपये करण्यांत यावयाचें आहे. प्रत्येक दोन भागांस एक नवा भाग ह्या प्रमाणांत सध्याच्या भागीदारांस नवे भाग मिळतील, व ह्या नव्या भागासाठी ५० रुपये वाढावा यावा लागेल. म्हणजे १५० रुपये दिले, की १०० रुपयांचा ५० रुपये वसूल भांडवलाचा एक भाग त्यांस मिळेल व ५० रुपये प्रीमियम म्हणून बँकेकडे जमा होतील. भांडवलाच्या ह्या वाढीस बँकेनें हिंदुस्थान सरकारची संमति मिळविली आहे. ह्या संबंधांतील ठराव भागीदारांच्या सभेस यथाकाल सादर करण्यांत येईल. बँकेच्या भागाची आजच्या बाजारभावानें किंमत २२७ रु. ८ आ. आहे. १५० रुपयांस जुन्या भागीदारांना नवा भाग मिळणार आहे.

हिंदी कारखान्यांतील अपघात

(ताजे उपलब्ध आकडे)

	१९४०	१९४१
अपघातांची संख्या	४१,०१५	३८,९०८
नुकसान भरपाईची रक्कम (लक्ष रु.)	१५·८३	१९·३८
नुकसान भरपाईची सरासरी रक्कम (रु.)	४७·२	४०·७

अपघातांची संख्या व नुकसान भरपाईची रक्कम ह्या दोन्ही बाबतींत मुंबई प्रांत सहाजीकच अग्रेसर आहे. कमी मजुरी मिळणाऱ्या कामगारांत अपघातांचें प्रमाण जबर असतें, असें आढळलें. मुंबईमधील बहुतेक गिरणीवाले नुकसान भरपाईचा विमा उतरतात. कामगारांना नुकसान भरपाई मिळवून देण्याचे कामीं मजूर संघांनीं जास्त दक्षता बाळगणें जरूर दिसतें. कांहीं मालक मजुरांच्या दारिद्र्याचा फायदा घेऊन, नुकसान भरपाईची रक्कम देण्याचें टाळतात अथवा तडजोड करून कमी रक्कम देतात, ह्या अश्लाघ्य गोष्टीकडे रिपोर्टानें लक्ष वेधलें आहे.

नॅशनल सेक्युरिटीज बँक लि., मुंबई

वरील बँकेचे ५% क्यु. प्रेफरन्स, ऑर्डिनरी व डिफर्ड असे तीन प्रकारचे भाग होते, ते तिनें रिझर्व्ह बँकेच्या बँकांच्या भागांच्या रचनेसंबंधीं सूचनेप्रमाणें एकत्रित करून आतां फक्त ऑर्डिनरी भागच केले आहेत.

असोसिएटेड सिमेंट कंपनीज लि.

वरील कंपनीला ३१ जुलै, १९४३ अखेर संपलेल्या वर्षी ५९½ लक्ष रुपये नफा झाला. भागीदारांस प्रत्येक भागावर (१०० रु.) ७ रुपये करमाफ डिव्हिडंड मिळणार आहे.

उष्णतामान १° कमी, १३ हजार टन कोळशाची बचत

न्यूयॉर्कमधील पृष्ठभागाखालील रेल्वेजच्या डब्यांतील उष्णतामान १० डिग्रीनी कमी करून दरमहा १३ हजार टन कोळशाची बचत करण्याची योजना न्यूयॉर्क बोर्ड ऑफ ट्रान्स्पोर्टेशनपुढें आहे.

सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि.

वरील बँकेस १९४३ मध्यें १ कोटि, ७ लक्ष रुपये निवळ नफा झाला. भागीदारांस १०% डिव्हिडंड व २% बोनस मिळणार आहे. बँकेचें वसूल भांडवल १ कोटि, ६८ लक्ष रुपये आहे व तिचेकडे ७२½ कोटींच्या ठेवी आहेत.

आंतरराष्ट्रीय चलन परिषद

वॉशिंग्टन (अमेरिका) येथें युद्धोत्तर आंतरराष्ट्रीय चलनविषयक प्रश्नांचा विचार करण्यासाठी बोलाविलेली परिषद लवकरच सुरू होईल, असें दिसतें. रशियन आर्थिक तज्ञ वॉशिंग्टनला पोचले आहेत.

५० कोटि रुपयांचें नवीन कर्ज

हिंदुस्थान सरकार ३% व्याजाचें १९६६-६८ मध्यें परतफेडीचें, ५० कोटि रुपयांचें कर्ज काढणार आहे.

अमेरिकेची प्रचंड निर्मत

अमेरिकेनें १९४३ च्या पहिल्या ११ महिन्यांत १९½ अब्ज डॉलर किंमतीच्या मालाची निर्मत केली. १९४२ च्या मानानें हा आकडा ५९% नें जास्त आहे. अमेरिकन सैनिकांसाठी परदेशीं पाठविलेल्या साहित्याचा समावेश त्यांत झालेला नाहीं.

अनुक्रमणिका

	पृष्ठ		पृष्ठ
१ विविध माहिती ...	१०	शास्त्रीय व औद्योगिक शिक्षणाची व्यवस्था—मौलिक शास्त्रांचें संशोधन	
२ हिंदुस्थानांत ब्रिटिश धंदेवाल्यांचें भावी स्थान...	११	७ शिक्षणप्रसाराची विशाल योजना ...	१४
३ ग्रेटब्रिटन व अमेरिका ह्यांच्या युद्धसहायाची तुलना	१२	८ पुण्यानजिकचें नमुनेदार खेडें ...	१४
४ रोटींत व चपातींत मिश्रण	१२	९ शेअर बाजार ...	१५
५ पोंच ...	१२		
६ स्फुट विचार ... हिंदी दुष्काळावर उपाय—	१३		

अर्थ

बुधवार, ता. १२ जानेवारी, १९४४

हिंदुस्थानांत ब्रिटिश धंदेवाल्यांचें भावी स्थान

राजकीय सत्ता नवीन राज्यघटनेच्या मनूमध्यें पूर्णपणें हिंदी लोकांच्या हातीं जाईल तेव्हां ह्या देशांत स्थापन झालेल्या ब्रिटिश कारखानदारांचें व धंदेवाल्यांचें स्थान अबाधित राहून त्यांस अन्यायानें किंवा विषमतेच्या भावनेनें वागवलें जाऊं नये ह्या साठी पुरेसे कायदेशीर निर्बंध घातले जावे अशी मागणी करण्यांत येत असे. हिंदी राज्यघटनेमध्यें बदल करण्याबाबत होणाऱ्या चर्चेंत हा विषय नेहमी येत असतो. युरोपिअन व्यापारी मंडळ्यांच्या गेल्या महिन्यांत कलकत्ता येथें भरलेल्या सभेंत ह्या प्रश्नाचा उल्लेख केला गेला आणि स्वतंत्र हिंदुस्थानांतहि त्याच्या आर्थिक प्रगतीच्या दृष्टीनें ब्रिटिश धंदेवाल्यांचें सहकार्य उपयुक्त व अपरिहार्य ठरेल अशा अर्थाचे उद्गार काढण्यांत आले. मोठ्या प्रमाणावरील कारखाने व धंदे चालविण्याचें ज्ञान व अनुभव हिंदी लोकांस नव्हता तेव्हां ब्रिटिश धंदेवाल्यांचें उदाहरण स्वदेशी उद्योगांस स्फूर्तिदायक व सहायकारक झालें आहे ह्यांत शंका नाहीं. तथापि, कालाच्या व प्रगतीच्या ओघावरोबर ह्या देशांतील मोठाले धंदे हिंदी लोकांच्या हातीं यावे आणि त्यांपासून होणारा सर्व प्रकारचा फायदा एतद्देशीयांस मिळावा अशी महत्वाकांक्षा त्यांनीं बाळगणें अगदी स्वाभाविक आहे आणि ह्या कामीं राष्ट्रीय सरकारनें उत्तेजन व सहाय द्यावें अशी अपेक्षा त्यांनीं करणें अयोग्य नाहीं.

युद्ध संपतांच शक्यतितक्या लवकर हिंदुस्थानास स्वतःची राज्यघटना बनवण्याचें पूर्ण स्वातंत्र्य देण्यांत येईल असें आश्वासन ब्रिटिश सरकारनें दिलें आहे. अशा ह्या प्रकारानें प्रस्थापित होईल त्या हिंदी स्वराज्यांत ब्रिटिश धंदेवाल्यांची परिस्थिति काय होईल ह्यासंबंधाचा प्रश्न त्यांच्या तर्फेनें उपस्थित करण्यांत येत आहे ह्यांत नवल नाहीं. कलकत्त्याच्या स्टेटसमन पत्राचे माजी संपादक, सर आलफ्रेड वॉटसन, ह्यांनीं एका ब्रिटिश नियतकालिकांत प्रस्तुत विषयावर लेख लिहिला आहे त्याच्या प्रसिद्ध झालेल्या गोषवाऱ्यावरून हिंदुस्थानांतील ब्रिटिश धंद्यांच्या भवितव्याबाबत त्यांच्या हितसंबंध्यांचें मत काय आहे ह्याची कल्पना येते. युद्धोत्तर काळांत कारखानदारीच्या उत्कर्षास एवढा वाव मिळेल कीं हिंदी भांडवलवाल्यांची सांपत्तिक शक्ति ह्या प्रगतीस पुरी पडणार नाहीं आणि ब्रिटिश धंद्यांत हात घालण्याचें त्यांस साधणार नाहीं असें सर आल्फ्रेड म्हणतात. ब्रिटिश व्यवस्थेखालील धंद्यांविषयीं हिंदी जनतेस विशेष विश्वास वाटतो आणि त्यांमधील कामकऱ्यांत अधिक समाधान असतें; ह्यासाठी ह्या धंद्यांचा कित्ता स्वदेशी कारखानदारांच्या पुढें असणें इष्ट आहे असेंहि मत त्यांनीं व्यक्त केलें आहे. ब्रिटिश व हिंदी कारखानदारांची ह्या रीतीनें तुलना करून सर आल्फ्रेड ह्यांनीं स्वदेश बांधवांच्या उच्च कार्यक्षमतेची व विश्वासार्हतेची स्तुती केली आहे, तिच्याकडे हिंदी धंदेवाल्यांचें लक्ष जाणें अगत्याचें आहे. हिंदी धंद्यांची अलीकडे इतकी सर्वांगीण प्रगति झाली आहे कीं ते आणि ब्रिटिश मालकीचे धंदे ह्यांमध्यें वरील प्रकारचें अंतर आहे कीं काय ह्या प्रश्नास योग्य उत्तर मिळणें आवश्यक आहे. सर आल्फ्रेड ह्यांच्या विचारसरणींत कांहीं तथ्य असलें तरी हिंदी स्वदेशी धंद्यांस राष्ट्रीय सरकाराकडून उत्तेजन मिळण्याचें अगत्य त्यांस नाकारतां येणार नाहीं आणि त्यांच्या नकारास किंमतहि दिली जाणार नाहीं.

हिंदी कारखानदारी मागें प्राथमिक अवस्थेंत होती त्यावेळीं ब्रिटिश धंदे ह्या देशांत अग्रस्थानीं होते ही स्वाभाविक गोष्ट होय. परंतु गेल्या पंचवीस वर्षांत हिंदी मालकीच्या मोठ्या प्रमाणावरील धंद्यांनीं चांगली प्रगति करून युरोपिअन व्यवस्थेखालीं असलेल्या कारखान्यांशीं बरोबरीचें स्थान मिळविलें आहे. लोखंड, पोलाद, सिमेंट, कापड, साखर, कागद इत्यादिसंबंधांतील देशी धंद्यांत ब्रिटिश कारखान्यांच्या मानानें कमी कार्यक्षमता आहे आणि त्यांचेवर हिंदी जनतेचा विश्वास नाहीं असें म्हणतां यावयाचें नाहीं. सरकारी संरक्षण व उत्तेजन मागण्याचा कोणास हक्क असेल तर तो स्वदेशी उद्योगधंद्यांस आहे. संरक्षणाचें धोरण स्वीकारलें गेल्यापासून हिंदी कारखाने भरभराटीस आले आहेत हें स्पष्ट आहे आणि हिंदी जनतेच्या स्वार्थत्यागानें उदयास येणारे धंदे हिंदी भांडवलावर चालणारे व हिंदी व्यवस्थापकांच्या नियंत्रणाखालीं असले पाहिजेत ह्या तत्त्वास विरोध होण्याचे दिवस आतां राहिलेले नाहींत. मोठीं जहाजें, समुद्रावरील वहातूक, मोटारी, विमानें, रासायनिक द्रव्यें, ह्यांचे संबंधांतील हिंदी धंद्यांस सरकारचें साहाय्य मिळालें पाहिजे ही लोकांची मागणी आहे आणि राष्ट्रीय सरकारास ती डावलता येणार नाहीं. युद्धोत्तर आर्थिक पुनर्घटनेंत सर्व प्रकारचे महत्त्वाचे स्वदेशी धंदे स्थापन होण्याची तजवीज करावयाची नाहीं तर तिचा उपयोग काय? देशांत भांडवल, उत्साह व अनुभव ह्यांची आतां वाण नाहीं आणि युद्धप्रयत्नासाठी शिकवून तयार केलेले कुशल कारागीर ह्यांस कारखान्यांत काम पुरवावें लागणारच आहे. ब्रिटिश कारखानदारांस व धंदेवाल्यांस विषमतेनें मुद्दाम वागवलें जावें असें कोणीहि सुज्ञ मनुष्य म्हणणार नाहीं. पण आपल्या हितसंबंधांचें खास रीतीनें संरक्षण केलें जावें असा त्यांचा आग्रह असेल तर तो फोल आहे. विशिष्ट अनुकूल परिस्थितीचा फायदा आजवर त्यांस मिळाला आहे तो ह्यापुढे तसाच मिळत रहावा असें त्यांस वाटत असलें तर तेंहि चुकीचें आहे. स्वदेशी मालकीच्या धंद्यांस सवलती मिळूं नयेत आणि आंतरराष्ट्रीय व्यापार खुला रहावा हा पुराण तत्त्वाचें घोंडें युद्धोत्तर जागतिक पुनर्घटनेच्या सहकारी तत्त्वावर त्यांस दामटतां येणार नाहीं. सर्व राष्ट्रांची शक्य तितकी आर्थिक प्रगति घडवून आणण्याचें धोरण ह्या पुनर्घटनेंत अंतर्भूत नसेल तर ती यशस्वी होणार नाहीं.

ग्रेट ब्रिटन व अमेरिका ह्यांच्या युद्धसहायाची तुलना

अमेरिका ग्रेट ब्रिटनला व इतर संयुक्त राष्ट्रांना कर्ज-उसनवार पद्धतीनें फार मोठ्या प्रमाणावर मदत करीत आहे, त्या मानानें ग्रेट ब्रिटनची परत मदत फारच अल्प प्रमाणांत होत आहे, अशी कल्पना पसरलेली होती ती दूर करून ग्रेट ब्रिटनच्या सहायाचें स्वरूप स्पष्ट करणारें एक पत्रक ब्रिटिश सरकारनें प्रसिद्ध केलें आहे. युद्धाच्या प्रारंभाचें काळीं ग्रेट ब्रिटननें अमेरिकेंत रोखीनें खरेदी केली, त्यामुळें ग्रेटब्रिटनची अमेरिकेंतील जिंदगी संपुष्टांत येऊन मार्च, १९४१ मध्यें लंड-उसनवार पद्धतीनें अमेरिका ग्रेट-ब्रिटनला सहाय देऊं लागली. तेव्हांपासून दोन वर्षांचे अवधींत अमेरिकेनें संयुक्त राष्ट्रांस १० अब्ज, ३२ कोटि डॉलर्स किंमतीची मदत केली. त्यापैकीं ३ अब्ज, १२ कोटि डॉलर्सची मदत ग्रेट ब्रिटनकडे गेली. कॅनडानें १९४२ सालीं १ अब्ज डॉलर्सची व १९४३ मध्यें पुनः १ अब्ज डॉलर्सची ग्रेट ब्रिटनला देणगी देऊन ग्रेटब्रिटनला उपकृत केलें. ह्या उलट, ग्रेट ब्रिटननें ३० जून, १९४३ अखेर संपलेल्या वर्षी अमेरिकेसाठी खुद्द ग्रेट ब्रिटनमध्यें ५८ कोटि पौंड, रशियासाठी २० कोटि पौंड व इतर मित्र राष्ट्रांसाठी १९ कोटि पौंड खर्च केले. दिलेली व घेतलेली मदत ह्यांची तुलना करतांना अमेरिकेंतील उत्पादनाचा खर्च ५०% जास्त आहे हें लक्षांत घेतलें पाहिजे, असें ब्रिटिश सरकारी पत्रकांत म्हटलें आहे. त्याचा अर्थ १ पौंड = ६ डॉलर, असा हिशेब होतो. ग्रेट ब्रिटनच्या तिप्पट लोकसंख्या अमेरिकेची आहे. लोकसंख्या व संपत्ति ह्यांचा विचार करतां, ब्रिटिश सहायाचें दर माणशी प्रमाण अमेरिकन सहाय्याच्या दर माणशी प्रमाणाच्यापेक्षा अधिक आहे, असा सरकारी पत्रकाचा निष्कर्ष आहे. संयुक्त राष्ट्रांच्या युद्धसहायाचा खरा साहकार अमेरिका आहे, अशी असलेली प्रस्तुत कल्पना चुकीची आहे; ग्रेट ब्रिटनचा स्वार्थत्यागहि अमेरिकेच्या मानानेंहि अत्यंत मोठा आहे, असें ब्रिटिश सरकारचें म्हणणें आहे.

गव्हाच्या रोटींत व चपातींत इतर धान्यांचें मिश्रण

मुंबई शहरांत गव्हाबरोबर बार्लीहि लोकांना घ्यावी लागत आहे आणि हें धान्य सकस असल्याचें सांगण्यांत येत आहे. लायलपूर येथील बेकिंग व मिलिंग लॅबोरेटरीमध्यें गहू व इतर धान्यें ह्यांच्या मिश्रणासंबंधीं प्रयोग करण्यांत आले, त्यांत असें आढळून आलें कीं गव्हांत १५% बार्ली, १०% बाजरी, १०% ज्वारी, १०% मका ह्या प्रमाणांत कोणतेंहि धान्य मिसळलें तरी आकार, रंग, इत्यादि बाबतींत रोटींत कोणताहि कमीपणा येत नाहीं. ह्याहिपेक्षा अधिक प्रमाणांत हीं धान्यें गव्हांत घातलीं, तरी रोटी चांगली होऊं शकते. तांबूस मात्र त्यांत मिसळतां येत नाहीं. गव्हांत वरीलपैकी एकादेंच धान्य न घालतां सर्व धान्यें थोडथोड्या प्रमाणांत घातलीं, तरी गव्हाच्या चपात्या चांगल्या होतात, असे लायलपूरचे प्रयोग सांगतात. शास्त्रीय दृष्ट्या हें मिश्रण चांगलें ठरल्यावर गव्हांत इतर धान्यें मिसळण्याची सक्ती करण्यास हरकत कोठून उरणार?

दुष्काळ निवारणासाठी १० कोटि रुपये खर्च

चालू वर्षांत बंगाल सरकारचा दुष्काळ निवारणाप्रीत्यर्थ होत असलेला खर्च १० कोटि रुपयांवर जाईल, असें दिसतें.

पोच

पुणें अ. वि. गृहाची महाराष्ट्र-रोजनिशी व कॅलेंडर:— दरवर्षीप्रमाणें अ. वि. गृहाकडून वरील भेट आली आहे. रोजनिशींतील व कॅलेंडरांतील सर्व वैशिष्ट्यें कायम आहेत. अ. वि. गृहाच्या कार्याची आठवण सतत नजरेसमोर रहाण्यास त्यांचा उपयोग होईल.

सानप प्रिंटिंग प्रेसचें कॅलेंडर—ह्या कॅलेंडरांत ठळक रीतीनें इंग्रजी तारीखवार दिले आहेत व कामाच्या आठवणीसाठी प्रत्येक तारखेस एक ओळ ठेवली आहे.

"उद्यम" अन्न विशेषांक—उद्यमाचा २६ व्या वर्षाचा १ला अंक अन्न विशेषांक म्हणून काढण्यांत आला आहे. दुष्काळ, अन्नपुरवठा, इत्यादि प्रश्नांबाबत जनतेला मार्गदर्शन करण्याचा त्याचा उद्देश आहे व ह्या विषयावर माहितीपूर्ण लेख त्यांत आले आहेत.

"हेटकरी"—हेटकरी भंडारी मंडळाच्या ह्या अधिकृत मासिकाचा ५ व्या वर्षाचा १ला अंक प्रसिद्ध झाला आहे. हें मासिक हेटकरी भंडारी ज्ञातीच्या उत्कर्षास वाहिलेलें आहे व त्यानें संपादन, मांडणी, त्यांतील लेख, इत्यादि बाबी नमुनेदार आहेत.

दैनिक "तरुण भारत"—संपादक ग. त्र्यं. माडखोलकर. १९३१ सालीं कायदेभंगाच्या चळवळींत बंद पडलेलें हें वृत्तपत्र नरकेसरि कै. बॅ. अभ्यंकर स्मारक मंडळानें पुनः सुरू केलें आहे. कै. अभ्यंकरांच्या व्यापक लोकहित-साधनाचे दृष्टीनेंच तें चालविण्यांत येणार आहे, त्यांत आम्हीं त्यास यश चिंतितों.

गहू व बार्ली ह्यांचें मिश्रण

मुंबई शहर व उपनगरें ह्यांतील रेशनकार्डवाल्यांना ९ तारखेपासून १:३ ह्या प्रमाणांत बार्ली व गहू मिळूं लागले. नुसते गहूं मिळत नाहींत. हीं दोन्हीं धान्यें वेगवेगळीं दिलीं जातात परंतु कांहीं गव्हाच्या ऐवजी बार्ली खावी लागते. नुसता गहू घेतला नाहीं, तर सबंद आठवड्याच्या रेशनची बार्ली मिळूं शकते. बार्ली गव्हापेक्षा २५% हलकी असल्यामुळें, सबंद रेशनची बार्लीच घेणारास २५% अधिक धान्य मिळतें. १६ जानेवारीपासून पावाच्या गव्हामध्येंसुद्धा बार्ली मिसळली जाईल. आटासुद्धा बार्लीयुक्त असेल. बार्ली हें एक सकस धान्य असून उत्तर हिंदुस्थानांत त्याचा पुष्कळ प्रसार झालेला आहे व तें गव्हांत मिसळून त्याच्या केलेल्या चपात्या, पुऱ्या इत्यादि गव्हाच्या जिनसांप्रमाणेंच लागतात, असें म्हणतात.

जाकिटांचे खिसे वाढविण्याचा प्रयत्न

ग्रेटब्रिटनमध्यें, कापडाची व मजुरीची बचत करण्याचा एक मार्ग ह्या दृष्टीनें जाकिटांना दोनपेक्षा जास्त खिसे ठेवण्यास प्रतिबंध आहे. खिशांची संख्या चारपर्यंत वाढविण्यास परवानगी असावी, अशी नॅशनल फेडरेशन ऑफ मर्चंट टेलर्सनें सरकारास विनंति केली, परंतु ती अमान्य करण्यांत आली.

चीनच्या कंपनी-कायद्यांत दुरुस्ती

चीनला आपले उद्योगधंदे वाढविण्यासाठी विदेशी भांडवल व तज्ञ लोक ह्यांचें सहाय लागेल, तें सहजीं मिळावें ह्याकरितां चिनी कंपनी कायद्यांत दुरुस्ती करण्याचें चिनी सरकारनें ठरविलें आहे.

स्फुट विचार

हिंदी दुष्काळावर उपाय

हिंदुस्थानांतील सध्याच्या दुष्काळाची कारणमीमांसा आतांपर्यंत अनेकांनीं केली व त्यावर उपायहि सुचविले. परंतु, हे सर्व उपाय आवश्यक व तातडीचे असले तरी दीर्घगामी स्वरूपाचे नाहींत. हिंदुस्थानांत पडलेल्या धान्याच्या दुष्काळामुळें ह्या प्रश्नाचें महत्त्व ठळकपणें दिसून येऊं लागलें आहे. रेशनिंग, धान्याची सरकारमार्फत जमवाजमव, कांहीं विशिष्ट मालास प्राधान्य, किंमतींचें नियंत्रण, इत्यादि उपाय ज्या देशांत लोकांना पूर्ण भरपूर खावयास मिळत होतें व जेथें अशा योजना नीट पार पाडण्याची उत्कृष्ट व्यवस्था आहे, अशा ठिकाणीं धान्याचा पुरवठा प्रमाणशीर चालू ठेवण्यास उपयुक्त आहेत. परंतु, हिंदुस्थानासारख्या ठिकाणीं ह्या योजनांचाच केवळ अवलंब करून पुरवठ्याचा प्रश्न समाधानकारक सुटणार नाहीं. चांगलीं पिकें आलीं तरी हिंदुस्थानांतील लोकांना अर्धपोटी रहावें लागतें व रोगराईस लक्षावधि लोक बळी पडतात. हिंदी लोकसंख्येच्या वाढीच्या प्रमाणांत शेतीचें उत्पादन वाढत चाललेलें नाहीं, हें सत्य आहे. दुर्भिक्ष्य व दारिद्र्य हीं लोकसंख्येच्या वाढीस कारणीभूत होतात व वाढती लोकसंख्या दारिद्र्यांत भर घालते; इतर देशांत ज्या उच्च रहाणीच्या योगानें लोकसंख्येची वाढ नियमित झाली आहे, ती रहाणी हिंदी लोकांच्या वाट्यास येणार कशी व लोकसंख्या आणि अन्नपुरवठा ह्यांचें समीकरण बसणार कसें ? असा प्रश्न "एकॉनॉमिस्ट"नें केला आहे, तो खरोखर सबंद प्रश्नाचा पाया आहे. ज्या मानानें रोग मोठा, त्या मानानें औषधहि जहाल पाहिजे. त्याचप्रमाण, हिंदी दुर्भिक्ष्यावरील तोडगाहि प्रभावी व सर्वव्यापी पाहिजे. "सहकारी तत्त्वावर व सरकारी भांडवलाचे सहायानें शेतीचें उत्पादन रशियाप्रमाणें मोठ्या प्रमाणावर वाढविणारी आर्थिक क्रांतीच हिंदुस्थानांत घडून आली पाहिजे." असें "एकॉनॉमिस्ट"चें म्हणणें आहे. सध्याच्या दुष्काळासंबंधीं लिहितांना, त्या पत्राचें म्हणणें आहे कीं, ग्रेटब्रिटन व अमेरिका येथें दारूगोळ्याइतकेंच लोकांच्या जीवनोपयोगी जिनसांस प्राधान्य दिलें जातें. हिंदुस्थानांत मर्यादित अन्नपुरवठ्यामुळें लोकांच्या पोटावरील पट्टा इतका आवळला गेला आहे कीं तो आणखी ओढला जाऊन बकल बसण्यास त्यांत आतां भोकच उरलेलें नाहीं !

शास्त्रीय व औद्योगिक शिक्षणाची व्यवस्था

ब्रिटिश पार्लमेंटाच्या दोन्ही गृहांच्या सभासदांपैकीं ११६ सभासद व २८ शास्त्रीय आणि व्यावसायिक शिक्षणाच्या संस्थांचे प्रतिनिधी ह्यांची एक "पार्लमेंटरी अँड सायंटिफिक कमिटी" आहे. तिच्या उपसमितीनें युद्धोत्तर ग्रेट ब्रिटनमधील शास्त्रीय संशोधन व विश्वविद्यालयें ह्यांसंबंधीं एक रिपोर्ट तयार केला, तो कमिटीनें मान्य केला आहे. युद्धोत्तर जगांत ग्रेट ब्रिटनला आपलें पूर्वीचें स्थान टिकविण्याचें असेल तर शास्त्रीय संशोधन १९१९-३९ च्या मानानें फारच मोठ्या व पद्धतशीर रीतीनें चालू ठेवलें पाहिजे. अशी त्या उपसमितीची सूचना आहे. संशोधक शास्त्रज्ञांची संख्या वाढावयाची म्हणजे विश्वविद्यालयें, कॉलेजें व शाळा ह्यांतील शास्त्रीय शिक्षण सुधारलें पाहिजे हें ओघानेंच आलें. सध्या युद्धकार्यांत गुंतलेल्या परंतु पुढें रिकाम्या होणाऱ्या शास्त्रज्ञांचा शिक्षणक्रम पुरा होण्यास सवड मिळून त्यांच्या अनुभवास साजेल अशा जागा त्यांना मिळवून दिल्या पाहिजेत. विश्वविद्यालयांनीं आपल्या शास्त्रीय शाखांकडील विद्यार्थ्यांची संख्या तात्काळ वाढविली पाहिजे व त्यासाठी विश्वविद्यालयांचा विस्तार करावा लागेल व कांहीं संस्थांचें नव्या विश्वविद्यालयांतहि रूपांतर करावें लागेल, असें रिपोर्ट म्हणतो. इमारती व सामुग्री ह्यांचेवर पहिल्या पांच वर्षांत मिळून १ कोटि पौंड खर्चावे लागतील. सध्या सरकार विश्वविद्यालयांना २२½ लक्ष पौंड ग्रँट देतें, तीं ६० ते ७० लक्ष पौंड करणें आवश्यक आहे, प्रत्येक विश्वविद्यालयाचें स्वातंत्र्य व वैशिष्ट्य कायम ठेवलें तरी कार्याच्या सोईस्कर वाटणीसाठी एक सल्लागार मंडळ असावें; कारखान्यांत कामें करणाऱ्या होतकरू तरुणांची पार्टटाइम औद्योगिक शिक्षणाची सोय होणें जरूर आहे; प्रयोगशाळांत कामें करणारांचा पगार व दर्जा ह्यांत वाढ करणें आवश्यक आहे; इत्यादि सूचनांवरून ग्रेट ब्रिटनच्या युद्धोत्तर औद्योगिक शिक्षणाच्या पूर्वतयारीची कल्पना येते.

भौतिक शास्त्रांचें संशोधन

दिल्ली येथें भरलेल्या सायन्स काँग्रेसच्या व रॉयल सोसायटीच्या सभांच्या प्रसंगानें हिंदुस्थानांत भौतिक व यांत्रिक शास्त्रांच्या संशोधनास किती मोठें महत्त्व आहे ह्या विचारास चालना मिळाली आहे. हिंदी शास्त्रज्ञांच्या संशोधनास किती वाव आहे आणि ह्या देशाच्या आर्थिक प्रगतीस त्यांचें किती अगत्य आहे ह्याची कल्पना व्हाइसरॉय लॉर्ड वेव्हेल ह्यांनींहि प्रकट रीतीनें दिली आहे. अलीकडे नांव घेण्यासारखे भौतिक शास्त्रज्ञ हिंदुस्थानांत पुढें आले आहेत व त्यांच्या बहुमोल कामगिरीस मान्यता मिळाली आहे. युद्धप्रयत्नास त्यांच्या शोधांचें उत्कृष्ट सहाय्य झालें आहे ही गोष्ट आतां सुप्रसिद्ध आहे. युद्धोत्तर काळांत शास्त्रीय संशोधनास अधिक उत्तेजन मिळण्याची व्यवस्था होणें आवश्यक आहे ह्याची जाणीव सरकार व जनता ह्यांस झाली पाहिजे. ह्या बाबतींत हिंदुस्थान देश सध्या अतिशय मागसलेला आहे आणि पुढारलेल्या राष्ट्रांच्या मानानें येथें चाललेलें संशोधन कांहींच नाहीं असें म्हणावें लागतें. हिंदी उद्योगधंद्यांची वाढ ह्यापुढें जोरानें व्हावयाची असेल तर शेती व कारखाने ह्यांच्या प्रगतीसाठी राष्ट्रानें यांत्रिक व शास्त्रीय संशोधनाकडे अधिक लक्ष पुरवलें पाहिजे. इंग्लंड हा देश प्रस्तुत बाबतींत पुढारलेला आहे तरी तेथेंहि संशोधन कार्यावर अधिक खर्च सरकारनें करावा आणि विश्वविद्यालयें व स्वतंत्र शास्त्रीय संस्था ह्यांस उत्तेजन व सहाय्य द्यावें अशी मागणी केली जात आहे. युद्धोत्तर काळांत चुरशीची आंतरराष्ट्रीय आर्थिक स्पर्धा पुन्हां चालू होईल तेव्हां ब्रिटिश उद्योगधंद्यांचा नव्या युगामध्यें टिकाव लागण्यास असें सरकारी धोरण आवश्यक असल्याचें सांगण्यांत येत आहे. अमेरिकेंत शास्त्रीय संशोधनावर जेवढा खर्च होतो त्याच्या एक दशांशहि ग्रेट ब्रिटनमध्यें केला जात नाहीं अशी तक्रार आहे. इंग्लंडमध्यें एका समितीच्या निवेदनांत अशी सूचना करण्यांत आली आहे कीं युद्धोत्तर काळाच्या पहिल्या पांच वर्षांत ब्रिटिश विश्वविद्यालयांस इमारती व सामुग्री इत्यादिसाठी भांडवली खर्च १२ कोटि रुपये आणि वार्षिक ग्रँट म्हणून ९ कोटि रुपये सरकारनें पुरवावे. हिंदुस्थाननें ह्या सूचनेपासून योग्य तो बोध घेणें आवश्यक आहे.

शिक्षणप्रसाराची विशाल योजना

तेहेतीस वर्षांमागें नामदार गोखले ह्यांनीं हिंदुस्थानांत सक्तीचें मोफत प्राथमिक शिक्षण चालू करण्याविषयींची सूचना वगैरे कायदेमंडळापुढें मांडली असतां ती फेटाळण्यांत आली. त्यानंतर लोकनियुक्त मंत्र्यांच्या हातीं प्रांतिक सरकारांत सत्ता आली तेव्हां सक्तीच्या शिक्षणास प्रारंभ होऊन त्याची थोडीफार प्रगति झाली आहे. तसेंच, यांत्रिक व धंदेशिक्षण ह्यांची तरतूद केली जावी अशी मागणी सरकारकडे कित्येक वर्षें केली गेली असतां म्हणण्यासारखी फलनिष्पत्ती झाली नाहीं. युद्धसामुग्रीच्या कारखान्यांत कुशल कारागीर हवेत म्हणून हजारो हिंदी तरुणांस आज शिक्षण देण्यांत येत आहे आणि त्यांपैकीं कित्येकांस इंग्लंडमध्येंहि शिकवून तयार करण्यांत आलें आहे. ह्या कुशल लोकांचा उपयोग युद्धसमाप्तीनंतर हिंदी धंद्यांस होईल अशी अपेक्षा आहे. सर्वच बाबतींत हिंदुस्थान सरकारास बाहेरून तज्ञ आणावे लागतात. शिक्षणासारख्या विषयावर सल्ला देण्यासाठी त्यानें मि. सार्जंट ह्या तज्ञाची नेमणूक केली आहे. त्यांनीं युद्धोत्तर काळांत हिंदुस्थानांत होणें इष्ट असलेल्या शिक्षणप्रसाराची एक विस्तृत योजना तयार केली आहे. ती पुरी होण्यास चाळीस वर्षें लागतील आणि कोट्यवधि रुपये खर्चावे लागतील. ह्या योजनेंत मुलामुलींच्या प्राथमिक व मध्यम शिक्षणाची व्यवस्था सुचवण्यांत आली आहे आणि शेती, धंदे, व्यापार, वैद्यक वगैरे सर्व प्रकारांच्या शिक्षणास तींत योग्य स्थान देण्यांत आलें आहे. "सर्वारंभास्तंडुलाः प्रस्थमूलाः" ह्या न्यायानें अशा व्यापक शिक्षणयोजनेच्या पूर्तीसाठी पैसा कोठून आणावयाचा हा प्रश्न येथें उभा रहातोच. शिक्षणाच्या महत्त्वाची जाणीव आणि त्यासंबंधांतला उत्साह मि. सार्जंट ह्यांच्या अपेक्षेपेक्षा हिंदी जनतेंत अधिक आहे. शेतीची सुधारणा, उद्योगधंद्यांचा उत्कर्ष व प्राप्तीची वाढ ह्या मार्गांनीं शिक्षणास लागणारा पैसा उभा केला पाहिजे असें ते म्हणतात. ह्या बाबतींतहि सरकारचें योजनात्मक सहाय आवश्यक आहे. व्हायकौंट वेव्हल ह्यांच्या पुनर्घटनेच्या योजनेंत हिंदुस्थानांत रस्त्यांचें जाळें सर्वत्र पसरण्याच्या कल्पनेस अग्रस्थान देण्यांत आलें आहे आणि शिक्षण आरोग्यानंतर तिसरें आहे; आणि रस्त्यांच्या पूर्ण योजनेस साडेचारशें कोटि रुपये लागण्याचा अंदाज आहे. रेलवेजच्या दुरुस्तीस व विस्तारास एवढीच आणखी रक्कम लागण्याचा संभव आहे. मग शिक्षण सुधारणेस वाव कोठें राहिला? शेती व उद्योगधंदे ह्याविषयींच्या योजना अजून तयार व्हावयाच्याच आहेत. चलन, हुंडणावळ, व्यापार ह्यांच्या भवितव्याचा निकाल अजून लागावयाचा आहे. ह्या परिस्थितींत मि. सार्जंट ह्यांस स्वतःच्या शिक्षणयोजनेबाबत चिंता वाटल्यास त्यांत आश्चर्य नाहीं.

प्रेसिडेंट रूझवेल्ट ह्यांची अमेरिकन सरकारास देणगी

प्रेसिडेंट रूझवेल्ट व मिसेस रूझवेल्ट ह्यांनीं हाइड पार्क (न्यू यॉर्क) येथील आपलें घर व ३५ एकर जमीन अमेरिकन सरकारला दिली आहे. ह्या जागेचा उपयोग "राष्ट्रीय ऐतिहासिक स्थान" ह्या दृष्टीनें करण्यांत यावा व प्रेसिडेंट रूझवेल्ट व त्यांचे अगदी निकटचे नातेवाईक ह्यांस त्यांच्या हयातींत घर वापरण्यास मिळावें, अशी त्या देणगीची अट आहे.

पुण्यानजिकचें नमुनेदार खेडें

(लि. आ. मा.)

पुण्याच्या लकडी पुलापासून दीड मैलावर अनाथ बालिकाश्रम, हिंगणें या रस्त्यावर कोथरुड येथें ग्रामोद्धाराचें काम चालू असून सन १९४३ चे ऑक्टोबरमध्यें ग्रामोद्धार कार्याबद्दल सदर गांवास बक्षिस मिळालें आहे. या गांवीं प्रथम ग्रामोद्धार कार्यास सुरवात सन १९३७।३८ साली झाली. या कार्यांत गांवांतील पाटील मि. मोहीद्दीन इमामउद्दीन हे प्रामुख्यानें भाग घेतात. या कार्यास चालना देण्याचें सर्व श्रेय कर्मवीर आण्णासाहेब कर्वे व श्री. भा. घों. कर्वे यांना आहे. या गांवाहून हिंगणे या गांवास जाणारा रस्ता कॉलेजांतील मुलींनीं केला व नंतर रस्त्यास सरकारी ग्रँट मिळाली व रस्ता दुरुस्त झाला. पाणी पिण्याची उत्तम व्यवस्था केली. विहिरीस ज्या पायऱ्या होत्या त्या बंद करून या विहिरीस राहाट लावण्यांत आले. या कामीं जिल्हा डेव्हलपमेंट बोर्डाची ४६० रुपये मदत मिळाली. गांवांतील रस्त्यावर दगड वगैरे टाकून, ओढ्यामुळें होणारी खराबी बंद करण्यांत आली व त्या कामीं गांवकरी व सरकार यांची आर्थिक मदत मिळविली. गांवांतील लोकांना वैद्यकीय मदत मिळावी अशी खटपट करण्यांत आली. शाळेची इमारत बांधविण्यांत आली व त्याचप्रमाणें वाचनालयाकरितां पुस्तकें आणविण्यांत आलीं. या कामीं सरकार व हिंगणे आश्रमाची बरीच मोठी मदत झाली. गांवाचे बाहेर स्वतंत्र खडे खताकरितां केले आहेत. अशा खड्ड्यांची संख्या २५ आहे. गांवात ग्रामपंचायत अगर सहकारी सोसायटी नाहीं. फक्त ग्रामसुधारणा मंडळ आहे. रस्त्याशिवाय इतर कामासाठी सुमारें तीन हजार रुपये खर्च झाला आहे. गांवांतील अंतर्गत रस्ते सुधारण्यांत आले आहेत.

औषध विक्रेत्यांवर बंधन

१५ जानेवारीनंतर सरकारी परवान्याशिवाय औषधांची आयात घाऊक अगर किरकोळ विक्री किंवा त्यांचें उत्पादन कोणासहि करतां येणार नाहीं. ठिकठिकाणच्या एक्साइज सुपरिंटेंडेंटना परवाना-अधिकारी नेमण्यांत आले आहेत.

ए. वी. सी. कॉइल्स
(डासांच्या उद्वरत्या)
बॉक्समध्यें १२. बॉक्स कि. १० आणे.
रात्रभर जळतात.
लायसॉफ
केसांतील उवांवर आश्चर्यकारक शोध.
उवा १ तासांत मरतात
बाटली कि. १ रु. ★ दोन वेळां उपयोग.
दि मागोरा केमिकल कं. लि.
— टिळक रोड, पुणें २. —

शेअर बाजार

(श्री. व. वि. लोणकर एम.ए., बी. कॉम., २४ डे. जि. पुणें ४)

नाताळ नंतर बाजार उघडतांच सर्व विभाग एकदम चढूं लागले आहेत. सोमवारी डिफर्ड २०२०,२५, डाईंग २०९० पर्यंत होते. नाताळाच्या पूर्वी दहा दिवस सुट्टी येणार व न जाणो एकादे वेळेस पुन्हा जपानी विमानांची भेट यावयाची तेव्हां दूर असलेले बरें या भूमिकेमुळें बाजार सुस्त राहिले होतें. सुट्टींत कांहींच न घडलेंमुळें, तसेंच कांहीं गिरण्यांचे न भूतो न भविष्यति नफे जाहीर झाले त्यामुळें बाजाराला एकदम चेतना प्राप्त झाली. उदा. सोलापूर व न्यू व्हिक्टोरिया यांना ९० लाखांवर यंदा नफा झालेला आहे. इकडे बँक ऑफ इंडियाची होऊं घातलेली योजना एकदांची बाहेर पडली असून दोन जुन्या शेअरला एक शेअर नवा शंभराला असे मिळणार आहेत. सेंट्रल बँकेलाही एक कोटि सतरा लाखावर नफा मिळाला असून व्याजही जास्त म्हणजे वर्षाला तीन रु. करमाफ जाहीर झालें आहे. तसेंच ३॥ टक्का कागदही यंदा बरेच वर्षानंतर नाण्याच्या वैपुल्यामुळें ९९।२ पर्यंत चढला त्याला अनुसरून केवळ दीड रुपया व्याज देणारा १५ चा शेअर न्यू इंडिया रोल बोनस मिळणार या बाजार गप्पावर ९४ पर्यंत चढला.

या सर्व तेजीकारक घडामोडींत सरकारनें मुद्रित केलेले प्रांतोप्रांतचे लक्षावधि वार कापड व त्यामागे सरकारचा देशांतील एकूणएक जरूरीच्या वस्तूंचा कडक नियंत्रण करण्याचा निश्चय व सोडतीच्या स्वरूपांत नवें कर्ज उभारून कोठल्याही मार्गानें प्रजेची क्रय-शक्ति सच्ची करण्याचा निश्चय या सर्वांचा तेजीवाल्यास विस्मर कसा पडतो याचा अचंबा आहे. या तिमाहींत जाहीर होणारी गिरण्यांची व्याजें १९४३ च्या उत्पादनावरील असून मागील भरमसाट भावामुळें ती जास्त येतील याबद्दल वाद नाहीं पण १९४४ च्या पहिल्या सहामाहीचीं व्याजें, सरकार कापडाचे भाव दर तिमाहीनें निसंशय साली आणत असता व दडवून ठेवलेला माल-कापडच काय इतर सर्व-बाहेर काढीत असता चालू व्याजाइतकीं येणें अशक्यप्राय आहे. बाजारांतील कांहीं प्रमुख दलाल या दृष्टीनें व हिशेबयानंतर बोडक्याच अंबधींत जर्मनीचा स्त्रोतानें पाडाव होणार हे जमेस धरून गुंतविणारांना चढत्या भावांत मोकळे होण्याबद्दल एकसारखा आदेश देत आहेत. सध्याच्या उफाळींत ते अरण्यरुदनवत ठरत आहे. या आदेशाप्रमाणें मोकळे पैसे केलेल्याकरतां स्टील कॉर्पोरेशन ऑफ बेंगाल ५ टके करमाफ प्रेफरन्स १३१ पर्यंत मिळतो त्याकडे लक्ष पुरवावयास हवें अशी सूचना वावीशी वाटते.

पंजाबमध्यें यमुना-गंगेवर धरणें

पंजाबमध्यें यमुना नदीवर 'बरवारा' धरणें बांधण्याची योजना आखण्यांत आली आहे परंतु धरणाच्या जागेचें परीक्षण मि. सॅव्हेज हे अमेरिकन भूगर्भतज्ज्ञ पुनः करणार आहेत. हरद्वारचे उत्तरेस ५० मैलांवर गंगा नदीवरहि धरण बांधण्याच्या युक्तायुक्ततेचें परीक्षण मि. सॅव्हेज यांचेकडून पंजाब सरकार करून घेणार आहे.

नव्या दिल्लीचे रचनाकार

नव्या दिल्लीची रचना आखणारे आर्किटेक्ट, सर एडवर्ड लुटिन्स हे नुकतेच मरण पावले.

बंगालमधील तांदळाचें पीक

बंगालचें तांदळाचें हिवाळी पीक चांगलें असून उत्पादन ८३ लक्ष टनांचे घरांत जाईल असा अंदाज आहे. यापूर्वीच्या पिकाचे उत्पन्नापेक्षा हें उत्पादन ६६% अधिक आहे,

सभा कशा चालवाव्या ?

परिषदा कशा पार पाडाव्या ?

ते भरसभेंत कौरव-पांडवांतील लठ्ठालठ्ठी थांबविणाऱ्या

महात्मा विदुरांना विचारा !

आर्यन, पुणें : : मराठी बोलपट

महात्मा विदुर

दिग्दर्शक:—आळतेकर

इतर भूमिका:—मनोहर घटवाई, नायमपल्ली, प्रल्हाद

दरगोज ३ खेळ—दुपारी ३।, ६॥ व १० वा. व रविवारी सकाळी १० वा.

न्यू अपोलो, पुणें : : हिंदी बोलपट

रॉयल रत्न १८

महात्मा विदुर

कला : बाबुराव पेंटर, भूमिका:-विष्णुपंत पागनीस, दुर्गा खोटे

इतर भूमिका:-वशोधरा काटजू, सीता अल्हेरी

दरगेज दोन खेळ:—दुपारी ३ व रात्री ११ वाजतां

रिझर्वेशन सकाळी १० ते १२ दुपारी ३ चे पुढें. तिकिटांचे दर (सरकारी करासह):—बॉक्स रु. १-१२-०, फर्स्ट क्लास १-०-०, फॅमिली (आर्यन) सर्कल आ. १०, सेकंड क्लास आ. ९, इंटर क्लास आ. ५, थर्ड क्लास आ. ४, कुलीन स्त्रियांस आ. १० व आ. ५

सध्यांच्या टंचाईच्या काळांत जीवनद्रव्यें कमी पडतात.
जीवनद्रव्यांनीं (Vitamins) युक्त असे
टोमॅटो केचप (गोड) व
टोमॅटो सॉस [तिखट व आंबट]
आजच मागवा व जीवनद्रव्यांची वाटणारी
उणीव भरून काढा.
रुरल प्रॉडक्टस कंपनी लि. पुणें
बिझिनेस ऑफिस: ९१३ अ सदाशिव, पुणें २.

दत्त कंपनी
७१५ शुक्रवार पेठ, पुणें २. दाणेआळी पोलिसगेटाजवळ
सर्व तऱ्हेचे काटे, वजनें व मापें, वेळेवर
रिपेअर करून मिळतील.

'अर्थ' ग्रन्थमाला.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

विमेदार नि हवाई हल्ला
शत्रुराष्ट्राकडून हवाई हल्ला अगर तत्सम उपद्रव यापासून बिनलढाऊ नागरिकांच्या जीविताला येणाऱ्या धोक्याचा समावेश विमा पॉलिसीच्या अटींत होतो काय व त्यासाठी जादा प्रिमिअम भरावा लागेल काय ! असा प्रश्न साहजिकच नागरिकांमध्यें चर्चिला जात आहे.

ट्रस्ट ऑफ इंडिया
विमा कंपनीच्या
विमा पॉलिसीमध्यें हवाई हल्ल्यामुळें जीविताला होणाऱ्या अपायाचा अंतर्भाव होतो त्याकरितां जादा प्रिमिअम नाहीं.
तरी विलंब न लावतां—
तुमचा नि तुमच्या आप्तेष्टांचा विमा
ट्रस्ट ऑफ इंडिया
विमा कंपनींतच उतरा.
अध्यक्ष:—श्रीमंत सरदार जगन्नाथ महाराज पंडित
माहितीपत्रकें विनामूल्य पाठवूं
ट्रस्ट ऑफ इंडिया विमा कं. लि., लक्ष्मी रोड, पुणें २ | वि. ह. देशमुख, बी. ए. जनरल मॅनेजर

पुना गेस्ट हाऊस
१००, लक्ष्मी रोड, पुणें २.
Telephone 779
GUEST HOUSE
TELEGRAM Guest House Poona 2.

न्यू इंडिया इंडस्ट्रीज लि.
(Approved Re-traders and Approved Contractors)
२६ लॅमिंग्टन नॉर्थ, मुंबई ११.
अध्यक्ष:—श्री. ग. स. मराठे, ॲक्चुअरी.
महाराष्ट्रांतील रबराचा प्रमुख कारखाना
★ गिरणीचे रोलर्स ★ रबरी हातमोजे ★ छापखान्यांचे रोलर्स
★ रीमोल्ड टायर्स ★ रबरी वॉशर्स ★ सॉलिड व्हील्स
व इतर रबरी माल तयार होतो.
पु. ग. मराठे
मॅनेजिंग डायरेक्टर.

हें पत्र पुणें, पेठ शनवार क. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' शनवार, क. नं. ९२७।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
बाजीत पत्र्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाविलास' पुणें ४.

अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
(टपाल खर्चासह माफ)
किरकोळ अंकास
दोन आणे.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति। —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष १० पुणें, बुधवार, तारीख १९ जानेवारी, १९४४ अंक ३

चटण्या तयार मिळतात!
लसूणाची, जवसाची, कारळेची वगैरेची नवरत्न चटणी, मँगो चटणी इ०
द. ना. हेजीब.
(१) २० शुक्रवार, पुणें.

पुण्यांतील
आदर्श निवासस्थान व भोजनालय
छाया लॉजिंग व बोर्डिंग हाउस
बुधवार चौक, पुणें २.

ए. बी. सी. कॉइल्स
(डासांच्या उदबत्त्या)
बॉक्समध्यें १२. बॉक्स किं. १० आणे.
रात्रभर जळतात.
लायसॉफ
केसांतील उवांवर आश्चर्यकारक शोध.
उवा १ तासांत मरतात
बाटली किं. १ रु. ★ दोन वेळां उपयोग.
दि भागोरा केमिकल कं. लि.
— टिळक रोड, पुणें १. —

महाराष्ट्र टेक्टाइलस् लि., यांच्या
राजा रघुनाथराव मिल्स, भोर
येथील माल, धोतरजोड्या, शर्टिंग, कोटिंग, मांजरपाट पुण्यांत कंट्रोल भावानें घाऊक व किरकोळ
मिळण्याचें ठिकाण:--पायोनियर डाइंग हाऊस
खातेवाडी, भिकारदास मारुती रोड, सदाशिव पेठ, पुणें.

महायुद्धाची जाणीव! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.
गिरगांव मुंबई नं. ४
महिंद्रकर ब्रदर्स
तयार कपड्याचे व्यापारी
बुधवार चौक, पुणें

विविध माहिती

कोळशाची वाढती किंमत व निर्यात व्यापार

ग्रेटब्रिटनचा निर्यात व्यापार वाढणें तेथील उत्पादनावर अवलंबून आहे आणि उत्पादन हें यंत्रें चालविण्यास लागणाऱ्या कोळशाच्या उतरत्या पुरवठ्यानें व त्याच्या वाढत्या किमतीनें मर्यादित होणार आहे, असा इशारा इंपीरिअल केमिकल इंडस्ट्रीजचे चेअरमन, लॉर्ड मॅकगॉवन, ह्यांनीं दिला आहे. कोळसा काढण्याची किंमत ग्रेटब्रिटनमध्यें गेल्या सहा वर्षांत ७०% वाढली आहे. खाणींच्या तोंडाशी पडणारी कोळशाची दर टनी किंमत ग्रेटब्रिटनपेक्षा अमेरिकेंत ७½ रुपयांनीं कमी आहे. १९३३-३९ च्या ब्रिटिश कोळशाच्या उत्पादनाची वार्षिक सरासरी २२ कोटि ४० लक्ष टन होती; आतां उत्पादन १९ कोटि टनांवर आलें आहे. उत्पादनांतील घट थांबली व सध्याप्रमाणेंच उत्पादन चालू राहिलें आणि कोळशास युद्धाच्या पूर्वीइतकीच ग्रेटब्रिटनमध्यें मागणी राहिली, तर निर्यातीसाठी फक्त २ कोटि, २० लक्ष टन कोळसा राहील. १९३३-३९ मधील निर्यातीची सरासरी ५ कोटि, ४० लक्ष टन आहे!

वृक्षभक्षक आगकाड्यांच्या पेट्या

ग्रेट ब्रिटनमध्यें युद्धाच्या पूर्वीच्या काळांत आगकाड्यांच्या पेट्यांचा खप किती होत होता ह्याचे हिशेबी आकडे प्रसिद्ध झाले आहेत ते चित्तवेधक आहेत. त्या देशांत सरासरीनें दर दिवशीं प्रत्येक माणशीं पांच आगकाड्यांचा खप होत असे. प्रत्येक पेटींत पन्नास काड्या असतात असें समजलें तर प्रत्येक ब्रिटिशर दर रोज एकदशांश पेटी खपवीत असे असा हिशेब होतो. एक हजार पेट्या तयार करण्यास एक घनफूट लाकूड लागतें म्हणजे ब्रिटिश लोक दर दिवशीं चार हजार घनफूट लाकूड वापरीत होते असें झालें. एका वर्षांत ग्रेट ब्रिटन तीनशें एकरांचें जंगल आगकाड्यांसाठी फस्त करीत होते असा एकूण हिशेब होतो. युद्धपरिस्थितीमुळें हा लाकडाचा खप अर्थातच मर्यादित झालेला आहे.

पुस्तकें व मासिकें ह्यांच्या किंमतींचें नियंत्रण

आयात होणारीं पुस्तकें, मासिकें व वृत्तपत्रें ह्यांची किंमत सरकारनें नियंत्रित केली आहे. १ शिलिंगाचा १ रुपया व १ डॉलरचे पांच रुपये, ह्यापेक्षा ज्यास्त पैसे किरकोळ विक्रींत घेतां येणार नाहींत. मुंबई व कराची येथें विकण्यांत यावयाच्या पुस्तकांची किंमत शिलिंगास १४ आणे एवढीच राहील. मासिकें व वृत्तपत्रें ह्यांच्या किरकोळीच्या विक्रीची किंमत १ शिलिंग = १ रु. ४ आ. व १ डॉलर=६ रु. १२ ह्या हिशेबानें आकारली पाहिजे. म्हणजे, ५ पेन्सचे ८ आणे व १० सेंटचे ११ आणे असा आकार होतो.

बोला ज्योतिषीबुवा !

"प्रकाश"चा "रामराज्य" बोलपट अखिल भारतांत शहरोशहरीं गेल्या ऑगस्टपासून चालू आहे. पुण्यांत बारावा आठवडा चालू आहे. तरी खालील शहरीं कितव्या आठवड्यांत सुरू आहे हें सांगणाऱ्या

ज्योतिषीबुवांचा योग्य सन्मान करू !



१२ वा आठवडा !] मिनर्व्हा, पुणें [१२ वा आठवडा !

प्रकाश पिक्चर्सचा पौराणिक मराठी बोलपट!

रामराज्य

दिग्दर्शक : विजय भट्ट

भूमिका:—शोभना समर्थ, चंद्रकांत, काळे, सोहोनी.

रोज फक्त दोन खेळ ६।। व १० वा. दर शनि. रवि. सोम. व अितर सुटीचे दिवशीं जादा खेळ दुपारीं २।।। वा.

अनुक्रमणिका

	पृष्ठ		पृष्ठ
१ विविध माहिती ...	१८	धोरण—त्यांचा काँग्रेसला संदेश—आंतरराष्ट्रीय चलन व्यवस्था—, अमेरिकेंतील आंतरराष्ट्रीय परिषद	
२ गेल्या वर्षाचा आर्थिक आढावा ...	१९	६ पौंड-डॉलर स्पर्धा ...	३२
३ जपानवरील हल्ल्याची पूर्वतयारी ...	२०	७ अमेरिकन व्यापाऱ्यांची तक्रार ...	२२
४ हिंदी गिरण्यांतील कापडाचें उत्पादन ...	२०	८ बँकांच्या पासबुकासंबंधी जबाबदारी ...	२३
५ स्फुट विचार ...	२१		
प्रे. रूझवेल्ट यांचें ध्येयात्मक			

अर्थ

बुधवार, ता. १९ जानेवारी, १९४४

गेल्या वर्षाचा आर्थिक आढावा

मुंबई येथील शेअर, स्टॉक व फिनॅन्स ब्रोकर्स, मे. आर. आर. नावर ॲन्ड कं., यांनीं प्रतिवर्षाप्रमाणें "१९४३ चा आढावा व १९४४ संबंधीं अपेक्षा" * हें आपलें वार्षिक प्रसिद्ध केलें आहे. त्यांत त्यांनीं प्रथम १९४३ ची युद्धप्रगति थोडक्यांत वर्णून हिंदी आर्थिक परिस्थितीवरील तिचे परिणाम अंतर्गत राजकीय आंदोलनाचे मानानें कसे प्रभावी झाले, हें सांगितलें आहे. १९४३ चे प्रारंभींच इराकनें शत्रूराष्ट्रांशीं युद्ध पुकारलें व आठव्या सैन्यानें ट्रिपोली सर केली. यानंतर लवकरच स्टालिनग्राडची लढाई संपुष्टांत आली व पुढें दोन महिन्यांत संयुक्त राष्ट्रांची फौज सिसिलींत उतरली. २५ जुलै रोजीं मुसोलिनीनें राजीनामा दिला. इटली नंतर शरण आला. यापुढील युद्ध म्हणजे इटलींतून जर्मनीस बाहेर काढणें, रशियानें जर्मनीस मागें रेटणें व जर्मन औद्योगिक केंद्रांवर बाँबहल्ले करणें, या विविध स्वरूपाचें होतें. जपानचे हिंदी शहरांवरील बाँब हल्ले विध्वंसक ठरले नाहींत. ब्रह्मदेशावरील संयुक्त राष्ट्रांची मोहीम निराशाजनक ठरली तरी जपान्यांची पॅसिफिकमधील प्रगति थोपविण्यांत आली व चर्चिल-रूझवेल्ट-चँग काय शेक यांनीं चढाईच्या धोरणाची आखणी केली. जर्मनीची शक्ती क्षीण होत चालली आहे, असें म्हणण्यांत येत आहे, तर कांहीं निरीक्षकांच्या मतें, जर्मनी शरण जाण्याजोगें विशेष कांहींच घडलेलें नाहीं, अशी वर्षअखेरची परिस्थिति आहे. जर्मनीला पादाक्रांत केल्यानंतरच जपानचा विचार करावयाचा आहे.

युद्धविषयक खर्चाचा परिणाम हिंदुस्थान सरकारच्या अंदाजपत्रकांत कसा दिसून आला, याचें दिग्दर्शन करून, नावर कंपनीच्या आढाव्यानें पुढें भरमसाट चलनवृद्धीची व लंडनमध्यें साठलेल्या हिंदी येण्यांची कारणमीमांसा केली आहे. संयुक्त राष्ट्रांसाठी हिंदुस्थानांत होणारा रुपयांतील खर्च, त्याचा लंडनमधील शिलका वाढण्यांत होणारा परिणाम, त्यामुळें होणारी हिंदी चलनवाढ, महागाई, जिनसांचें दुर्भिक्ष, इत्यादींच्या परिणामांचें परिमाण हिंदुस्थानच्या लंडनमधील कर्जाची परतफेड, रेल्वे डिबेंचर्सची परतफेड, हिंदुस्थानांतील ब्रिटिश गुंतवणुकीची गुंडाळणी, इत्यादि उपायांनीं मर्यादित होऊं शकलें नाहीं, हें सांगितलें तक्ता दर्शवितो—

	१-९-१९३९	२५-१२-१९४२	१७-१२-१९४३
	(आकडे हजार रुपयांचे आहेत)		
प्रचलित चलनी नोटा	१८२,१३,१७	५७०,३६,०१	८२०,५६,२३
हिंदुस्थानाबाहेरील शिलका	१०,०८,३३	७०,९८,००	१२९,६९,३९
रिझर्व्ह बँकेच्या इश्यू खात्यांतील स्टर्लिंग रोखे	५९,५०,११	४०४,८३,३९	७१२,८३,९६
मुंबईतील मजुरांच्या राहणीच्या खर्चाचें मान	१०५	१८८	२४८(ऑक्टो.)
सोन्याचीं किंमत (मुंबई)	रु. ३९-५	रु. ६६-१३	रु. ७१-४
चांदीची किंमत (मुंबई)	रु. ५१-११	रु. ९८-८	रु. ११४-१०

चलनवृद्धीस आळा घालण्यासाठी सरकारनें कोणते प्रयत्न केले? मार्च, १९४२ नंतर सोन्या-चांदीच्या बाजारांत भयंकर स्थित्यंतरें घडून आलीं. २६ एप्रिल रोजीं सोन्याचा भाव ९८ रुपये व चांदीचा भाव १३९ रुपये झाला. सरकारच्या फडनवीसांनीं जालीम उपाय योजून ही सट्टेबाजी थांबविण्याची तयारी दर्शविली, तीस अनुसरून मुंबईच्या सोनें बाजारांत वायदाचे व्यवहार बंद करण्यांत आले व सोन्या-चांदीचे दर पुनः स्थिर झाले. डिलिव्हरीची मुदत सरकारनें १२ दिवसांची ठेवली होती, ती पुढें ४ दिवसांवर आणि नंतर फक्त दोन दिवसांवर आणून ठेवली. रिझर्व्ह बँकेनें ठराविक किंमतीस सोनें विकण्यास प्रारंभ केल्यापासून भावाचा चढीकडील कल नाहींसा झाला. वर्षअखेर सोनें व चांदी यांचा बाजारभाव अनुक्रमें ९८ रु. १२ आ. व ११० रु. १२ आ. असा राहिला. जादा नफ्यावरील कराचे संबंधांतील ऑर्डिनन्स काढून सुमारें १०० कोटि रुपये खेचण्याचा सरकारनें प्रयत्न केला व नवीन भांडवल उभारणी मर्यादित करणारे व ब्रिटिश हिंदुस्थानांतून संस्थानांत भांडवलाचें स्थलांतर बंद करणारे हुकूमहि सरकारनें सोडले. भावनियंत्रणाचेहि कसून प्रयत्न सरकारनें चालविले. सोनें-चांदी व इतर कांहीं माल यांचे तारणावरील कर्जाचें नियंत्रण सरकारनें केलें व पंजाबमधील बँकांजवळील गव्हाचे साठे ताब्यांत घेतले. कापड, औषधें, इत्यादि स्वस्त किंमतींत उपलब्ध करून देण्याची सरकारनें कोशीस केली व नफेबाजीविरुद्ध कुद्ध पुकारलें. हें सर्व करूनहि, चलनविस्तार व महागाई हीं मर्यादित होण्यास आवश्यक ती जनतेची हार्दिक पार्श्वभूमि आड़ून येत नाहीं व त्यामुळें चलनविस्तार आसडता घेणें सरकारास कठीण जात आहे असें दिसतें.

* "Review of the year 1943 and Prospects for 1944" पृ. सं. ६०. किं. २ रु.

जपानच्या मायभूमीवरील हल्ल्याची पूर्वतयारी

चीनला प्रभावी मदत करणे मिटेल !

जपानवरील अंतिम हल्ल्यास प्रारंभ कोठून व कसा केला पाहिजे, यासंबंधी लंडन टाइम्सच्या एका खास बातमीदारानें त्यासंबंधांतील माहितीवर आधारलेले आपले विचार व्यक्त केले आहेत. जपाननें आपल्या भोंवतालची बेटें काबीज करून आपलें आरमार व अंतर्गत दळणवळण सुरक्षित करून ठेवलें आहे, त्यास धक्का देण्यासाठी चीनमार्गानेंच मुख्यतः प्रारंभ केला पाहिजे, असें त्याचें म्हणणें आहे. पॅसिफिक महासागरांतील जपान्यांच्या वर्चस्वाखालील बेटांनीं जपानी समुद्र सुरक्षित केला आहे व ही कोंडी फोडली पाहिजे, असेंहि तो म्हणतो. विशेषतः हिंदुस्थानांतून करावयाच्या चढाईचें दिग्दर्शन उद्बोधक होईल, तें खाली दिलें आहे.

पूर्व आशियावर (ज्याला पूर्वी " अतिपूर्व " असें म्हणत व ज्याला अमेरिकन लोक " ओरिअंट म्हणतात) जपानचें आतां साम्राज्य पसरलेलें आहे. अगदी उत्तरेकडील कांहीं राशियन बेटें व स्वतंत्र चीनचे प्रांत, यांवरच फक्त जपानचें वर्चस्व नाहीं. हिंदुस्थानाची पूर्वेची सरहद्द आतांपर्यंत शांत होती व त्या बाजूनें कधी शत्रूची स्वारी होईल, अशी कल्पनाहि नव्हती. परंतु, जपान्यांनीं जंगलांतूनहि मार्ग काढतां येतो, हें दाखवून दिल्यामुळें, हिंदुस्थानाचा लष्करी दृष्टिकोन पार पालटला आहे. चीनचा गाभा म्हणजे छेवान व आसाम यांस जोडणारा शिकँग हा चिनी प्रांत आहे व त्याची रुंदी ५०० मैल आहे. हा सर्व डोंगराळ मुलूख आहे व कांहीं ठिकाणीं डोंगरांची उंची १२ हजार फुटांहून अधिक आहे. वाटेंतील दऱ्या ५ ते ७ हजार फूट खोल आहेत. त्यामुळें, रस्ता करण्यास हा प्रदेश सोईचा नाहीं. परंतु, वैमानिक वहातुक या मार्गानें होऊं शकेल व ब्रह्मदेशांतील तळांवरून या वहातुकीस अडथळा आणणें जपान्यांना शक्य होणार नाहीं. दक्षिणेकडे जसजसें यावें, तसतशी डोंगरांची उंची कमी होत जाते. पूर्वेकडे चीनचा युनान प्रांत व पश्चिमेकडे ब्रह्मदेश येतो. उत्तर ब्रह्मदेश डोंगराळच आहे व त्यांतूनच जाणारा " बर्मा-रोड " ब्रह्मदेश-युनानची सरहद्द कर्क-वृत्ताजवळ छेदतो. हिंदुस्थानांतून ब्रह्मदेशांत स्वारीसाठी निवडक फौजा पाठवून त्यांस विमानानें कुमक देतां आली, तरी ब्रह्मदेशांतून जपान्यांचें उच्चाटण करण्यास एवढा प्रयत्न पुरा पडणार नाहीं. बंगालच्या उपसागरांतून जलमार्गानेंच मोठा हल्ला करावा लागेल. बंगालचा उपसागर सिलोन व सुमात्रा यांस जोडणाऱ्या रेषेपासून सुरू होतो व या रेषेची लांबी १,००० मैल आहे. उपसागराचा गंगेच्या खोऱ्यापर्यंतचा दक्षिणोत्तर विस्तारहि १,००० मैलच आहे. उपसागराच्या मलाया ते ब्रह्मदेश-हिंदुस्थान सरहद्दीचा १५०० मैलांचा पूर्वकिनारा जपान्यांचे हातीं आहे व सुमात्रा, अंदमान व निकोबार हीं बेटेंहि जपान्यांचेच ताब्यांत आहेत. जपान सिंगापूरकडून या बेटांच्या पिछाडीनें ब्रह्मदेशास सैनिक व साहित्य पाठवूं शकेल. जपान ते रंगून हें अंतर ४ हजार मैल आहे. ब्रह्मदेश व सयाम यांतील रेल्वेचे रस्ते जोडून जपान्यांनीं सिंगापूर ऐवजीं बँगकॉक या १ हजार मैल जवळच्या बंदराचा उपयोग करण्यास प्रारंभ केला असणें शक्य आहे. ब्रह्मदेशावर जलमार्गानें स्वारी करावयाची, ती सुमात्रा व आराकान यांचेमधील ७०० मैल रुंदीच्या वाटेनेंच करावी लागेल. ती यशस्वी झाली, म्हणजे " बर्मा रोड " खुला होईल व चीनला प्रभावी मदत जाऊं शकेल. परंतु, त्या रस्त्यानें होणाऱ्या वहातुकीस मर्यादा आहे व त्या रस्त्याच्या उपयोगानेंच केवळ जपानशी निर्णायक युद्ध करतां येणार नाहीं. अर्थात, त्या रस्त्यावरून वहातुक सुरू केली, म्हणजे चीनला मदत मिळून यँगसी नदीच्या खोऱ्यांतून किनाऱ्यापर्यंत चिनी फौजा जाऊं शकतील व दोस्त राष्ट्रांना वैमानिक तळ उपलब्ध होऊन तेथून जपानी आगबोटींवर व कदाचित् प्रत्यक्ष जपानवरहि वैमानिक हल्ले करतां येतील. जपानी मातृभूमीच्या सभोवारच्या बेटांत जपानी विमानें व आगबोटी यांस आश्रय घेतां येतो. हीं सभोवारचीं बेटें काबीज करणें, हा जपानवरील अंतिम हल्ल्याचा एक मार्ग आहे. परंतु चीनला दारूगोळा व युद्धसाहित्य पुरविण्याचा प्रयत्न हा अधिक महत्त्वाचा आहे. जपान भोंवतालच्या समुद्रांवरहि अलेर वर्चस्व मिळवूनच जपानला शरण आणावें लागेल, हें उघड आहे.

हिंदी गिरण्यांतील कापडाचें उत्पादन

३१ मार्च, १९४३ अखेरच्या वर्षी हिंदी गिरण्यांत १५३½ कोटि पौंड सूत तयार झालें. १९४०-४१ चे मानानें हें उत्पादन १३७% ज्यास्त असलें तरी १९४१-४२ चे मानानें तें २·८% कमी आहे. कापडाचे उत्पादनांतहि घट झाली, हें खालील आकडे दर्शवितील.

वर्ष	उत्पादन (कोटि वार)
१९३८-३९	४२६
१९३९-४०	४०१
१९४०-४१	४२६
१९४०-४१	४४९
१९४२-४३	४१०

१९४२-४३ मधील कापडाच्या उत्पादनाचे तपशीलवार आकडे खाली दिले आहेत:—

	(कोटि वार)
मुंबई बेटें	१३९
अहमदाबाद	८५
सबंद मुंबई प्रांत	२५१
मद्रास	११
बंगाल	१७
संयुक्त प्रांत	३१
मध्यप्रांत-वऱ्हाड	१०
सबंद ब्रि. हिंदुस्थान	२३७
हिंदी संस्थानें	७४
सबंद हिंदुस्थान	४११

डावखोरे लोक

पाश्चात्य देशांत डावखोरेपणा कमी होत चालला आहे पण सैनिकांतील डावखोऱ्या लोकांचें प्रमाण वाढलें आहे. उजव्या हाताचाच उपयोग करणें योग्य आहे, ही समजूत चुकीची आहे असें आढळून आल्यापासून, डावखोऱ्या मुलांवर उजव्या हाताचा उपयोग करण्याची सक्ती आतां करण्यांत येत नाहीं.

स्फुट विचार

प्रे. रूझव्हेल्ट ह्यांचें ध्येयात्मक धोरण

इंग्लंड, रशिया व चीन ह्या राष्ट्रांस जर्मनी व जपान ह्यांचे विरुद्ध लढण्यांत अमेरिकेचें सांपत्तिक व मनुष्यबळ कार्यक्षम रीतीनें सहायकारक करून देण्यांत प्रे. रूझव्हेल्ट ह्यांचें ध्येयवादित्व व मुत्सद्देगिरी ह्यांनीं विलक्षण यश मिळविलें आहे. अमेरिकेच्या प्रेसिडेंटची निवडणूक चालू वर्षाचे अखेरीस व्हावयाची आहे, ह्या कारणानें त्या देशांत एव्हांपासून राजकीय स्वरूपाच्या विचारांचीं व चर्चेचीं आंदोलनें चालू झालीं आहेत. प्रे. रूझव्हेल्ट निवडणुकीस पुन्हां एकवार उभे रहाणार आहेत किंवा नाहीं हें अजून निश्चित झालेलें नाहीं. तथापि, त्यांची कारकीर्द इतकी दीर्घकालीन झाली आहे कीं अमेरिकन राष्ट्राच्या पुढारीपणाची धुरा आणखी चार वर्षांच्या मुदतीसाठी ते उचलतील किंवा कसें हें सांगतां येत नाहीं. चालू युद्धासारख्या अजस्र व जगद्व्याळ रणकंदनांत स्वतःच्या राष्ट्रास मोठ्या प्रमाणावरील स्वार्थत्याग करण्यास उद्युक्त करतांना त्यांनीं जागतिक शांतता, राष्ट्रांचें स्वातंत्र्य व सर्व लोकांचें आर्थिक स्वातंत्र्य ह्यांची प्राप्ती व संरक्षण ह्या विषयींचें ध्येय सतत डोळ्यांपुढें ठेवलें आहे आणि विरोधास न जुमानतां आपली उच्च भूमिका पुन्हां पुन्हां विशद करून सांगण्याची संधी ते वाया जाऊं देत नाहींत. युद्ध म्हटलें म्हणजे जनतेची गैरसोय व स्वार्थत्याग हीं अपरिहार्यच आहेत. आकुंचित वृत्तीचे टीकाकार ह्या गोष्टीचा फायदा घेऊन प्रे. रूझवेल्ट ह्यांच्या धडाडीच्या व ध्येयात्मक धोरणास नांवें मुरडीत आहेत आणि त्या प्रवृत्तींत राजकीय विरोधाचा भाग असावा असें मानण्यास जागा आहे.

त्यांचा कॉंग्रेसला संदेश

अमेरिकन कॉंग्रेसला पाठवलेल्या आपल्या वार्षिक संदेशांत प्रेसिडेंटांनीं टीकाकारांचा उत्कृष्ट समाचार घेतला आहे. जागतिक शांतता, राष्ट्रांचें स्वातंत्र्य व लोकांचें आर्थिक स्वास्थ्य ह्यांची प्राप्ती जर्मनी व जपान ह्यांच्या आक्रमक वृत्तीच्या नाशानें होणार असल्यानें अमेरिकन जनतेनें आपले युद्धप्रयत्न कसोशीनें चालू ठेवून शत्रूचा पूर्ण पाडाव होईपर्यंत ढिले होऊं देतां कामा नयेत असें त्यांनीं बजावलें आहे. तसेंच, युद्धोत्तर काळांत अमेरिकेची अंतर्गत पुनर्घटना व्हावी लागेल आणि सामान्य जनतेची राहाणी सुलाची व निर्भयतेची होईल अशी व्यवस्था करावी लागेल असेंहि त्यांनीं सांगितलें. आतां काय युद्ध संपल्यासारखेंच आहे ह्या भ्रामक समजुतीनें बेफिकिरपणानें वागणाऱ्यांची त्यांनीं कानउघाडणी केली असून, आंतरराष्ट्रीय व अंतर्गत राष्ट्रीय जीवनांत शांतता, समता व स्वातंत्र्य ह्यांची स्थापना न झाल्यास आतांपर्यंत झालेला व पुढें होणारा स्वार्थत्याग फुकट जाईल असें त्यांनीं म्हटलें आहे. कैरो व तेहरान येथें झालेल्या चर्चेंत गुप्त करार कोणतेहि झाले नसून युद्ध लवकर यशस्वी करणें व युद्धसमाप्तीनंतर जागतिक शांततेची भक्कम पायावर स्थापना करणें ह्या बाबतींतच एकमतानें निर्णय करण्यांत आले असें आश्वासन प्रेसिडेंट रूझवेल्ट ह्यांनीं देऊन शंकेखोर टीकाकारांस गप्प बसविलें आहे. त्यांचा सर्वच संदेश स्पष्टोक्तिपूर्ण व स्फूर्तिदायक असा आहे आणि त्याचा अनुकूल परिणाम युद्धाची गति व युद्धोत्तर व्यवस्था ह्यांचे वर झाल्यावांचून रहाणार नाहीं. अमेरिकन राष्ट्राचें नेतृत्व युद्ध संपून जगाची नवीन घडी बसेपर्यंत त्यांच्याच हातीं रहावें अशी सर्व सुवृत्त माणसांची इच्छा असणें स्वाभाविक आहे.

आंतरराष्ट्रीय चलन व्यवस्था

जगाची युद्धोत्तर पुनर्घटना समाधानकारक रीतीनें घडून येण्यास निरनिराळ्या राष्ट्रांचें स्वातंत्र्य, त्यांचे राजकीय हक्क व त्यांच्या राज्यांच्या मर्यादा ह्यांचा निश्चय सर्वांच्या अनुमतीनें व्हावा लागेल. असें न झाल्यास पुढील युद्धाचीं बीजें जागतिक भूमीमध्यें पेरून ठेवल्यासारखें होईल. रशियन सेना जर्मनीस मागें हटवीत मूळच्या पोलंडच्या प्रदेशांत येतांच तेथील राजकीय सत्तेचा अवघड प्रश्न इंग्लंडमध्यें वास्तव्य करीत असलेल्या स्वतंत्र पोलिश समितीनें उपस्थित केला ह्यावरून प्रदेशांच्या युद्धोत्तर वाटणीचें काम किती अवघड होणार आहे ह्याची कल्पना येण्यासारखी आहे. प्रस्तुत युद्धाचे प्रारंभीं रशियानें व्यापलेला पोलंड देशहि आपल्या सत्तेखाली आला पाहिजे असें पोलिश समितीचें म्हणणें आहे, पण त्यास पूर्णत्वानें मान्यता दिली जाईल असें दिसत नाहीं. राष्ट्रीय प्रदेशांच्या निश्चिती इतकेंच महत्त्व युद्धोत्तर काळांतील आंतरराष्ट्रीय देवघेवींच्या व्यवस्थेस येणार आहे. राष्ट्रांचें स्वातंत्र्य व सुस्थिति त्यांच्या आर्थिक अवस्थेवर अवलंबून रहाणें अपरिहार्य आहे आणि ही अवस्था आंतरराष्ट्रीय व्यापार व विनिमय ह्यांच्या आंतरराष्ट्रीय व्यवस्थेनें निश्चित होणार आहे. गेल्या महायुद्धानंतर चलन व हुंडणावळ ह्यांचे संबंधांत प्रमुख राष्ट्रांचें एकमत न होऊं शकल्यामुळें जगाच्या व राष्ट्रांच्या आर्थिक स्थितीवर अनिष्ट परिणाम झाले. हुंडणावळीच्या दराबाबत राष्ट्रांमध्यें स्पर्धा चालू झाली आणि तिच्यामुळें राष्ट्रीय उद्योगधंदे व व्यापार ह्यांची घडी नीट बसण्याचे मार्गांत अडथळे उत्पन्न झाले. ह्या कटु अनुभवावरून बोध घेऊन इंग्लंड व अमेरिका ह्या देशांत तज्ज्ञांचा आंतरराष्ट्रीय चलन व हुंडणावळ ह्यांची युद्धोत्तर घडी बसण्याचें हेतूनें योजना तयार करण्याचा उपक्रम चालू झाला. त्याप्रमाणें ब्रिटिश व अमेरिकन तज्ज्ञांनीं स्वतंत्र योजना आखल्या.

अमेरिकेतील आंतरराष्ट्रीय परिषद

आंतरराष्ट्रीय देवघेव सुलभ व्हावी म्हणून निरनिराळ्या राष्ट्रांच्या चलनाचे परस्पर संबंध निश्चित करणें आणि व्यवहारांत हे संबंध प्रभावी व्हावे ह्यासाठी जागतिक चलननिधीची तरतूद करणें हे मुख्य उद्देश ह्या दोन्ही योजनांच्या मुळाशीं आहेत. तथापि, ह्या निधीची घटना, त्यांचें स्वरूप व त्याचा उपयोग ह्यांचे संबंधांत दोहोमध्यें महत्त्वाचे फरक आहेत. ते नाहींसे किंवा मर्यादित करण्याचे प्रयत्न चालू असल्याची बातमी प्रसिद्ध झाली होती. अशा स्थितींत ह्या संबंध प्रश्नाची चर्चा करण्याकरितां जगांतील चव्वेचाळीस राष्ट्रांस आपापले प्रतिनिधि आपण भरवीत असलेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेस पाठवावे अशीं निमंत्रणें अमेरिकेनें पाठविलीं असल्याच्या ताज्या वृत्तामुळें इंग्लंडमध्यें वर्तमानपत्रें आश्चर्यचकित झालीं आहेत. आंतरराष्ट्रीय चर्चेचा हा प्रश्न विशद होण्याइतकी प्राथमिक तयारी झाली नसतां एकाएकीं प्रातिनिधिक स्वरूपाची जागतिक परिषद भरवण्याचें अमेरिकेनें ठरविलें कसें ह्याविषयीं त्यांनीं कुतूहल व चिंता प्रकट केली आहे. सोव्हिअट रशियास सुवर्णांधित आंतरराष्ट्रीय चलन व्यवस्था हवी आहे, आणि त्या राष्ट्राचे प्रतिनिधि नियोजित परिषदेच्या चर्चेंत भाग घेतील असें दिसतें. आंतरराष्ट्रीय चलननिधि व आंतरराष्ट्रीय देण्याघेण्याच्या व्यवस्थेसाठी जागतिक बँकेची स्थापना असल्या अमेरिकन व ब्रिटिश योजनांच्या अंगांविषयीं मात्र रशिया उदासीन आहे असें म्हणतात.

पौंड आणि डॉलर ह्यांची स्पर्धा

हिंदुस्थानांतील चलनवाढीवरोबर तिचा आधार म्हणून लंडनमध्यें जमा होणाऱ्या स्टर्लिंगच्या रकमा वाढत आहेत आणि युद्धाचे अखेरीस त्यांची बेरीज बाराशे-तेराशे कोटि रुपयांच्या घरांत जाईल असा अंदाज आहे. एवढी मोठी रकम हिंदुस्थानांत परत कशी आणावयाची हा मोठा विकट प्रश्न आहे. युद्ध चालू असतांना यंत्रसामुग्रीसारखा उत्पादक स्वरूपाचा माल इंग्लंडमधून आणून त्याच्या किंमतीची भरपाई त्या शिलकेमधून करणें शक्य दिसत नाहीं. युद्धोत्तर काळांत हिंदुस्थानास परदेशांतून माल आणावा लागेल त्यावेळीं लंडनमधील शिलकांचा उपयोग होईल आणि हुंडणावळीची अडचण न भासतां हा व्यवहार पुरा पाडतां येईल. परंतु अमेरिकेसारख्या अन्य देशांत ह्या देशांतील धंदेवाल्यांस व व्यापाऱ्यांस आवश्यक वाटणारा माल सोइस्कर व स्वस्त मिळण्यासारखा असेल तर हिंदुस्थानचे पैसे लंडनमध्यें शिल्लक आहेत ह्या कारणास्तव अमेरिकन मालाच्या आयातीच्या मार्गांत अडचणी उपस्थित होऊं दिल्या जाऊं नयेत अशी मागणी ह्या देशांत केली जात आहे, ती सरळ आहे. अमेरिकेंतून माल आणावयाचा म्हणजे डॉलर्समधल्या हुंड्या येथें उपलब्ध पाहिजेत आणि त्या देशांत जाणाऱ्या हिंदी मालावरच त्या निघणार. तेव्हां जरूर पडेल त्याप्रमाणें लंडननें हिंदुस्थानला डॉलर हुंड्या पुरवण्याची व्यवस्था करावी लागेल. युद्धपरिस्थितींतहि हिंदुस्थानच्या डॉलर हुंड्यांचें स्टर्लिंग पौंडांत ब्रिटिश सरकार रूपांतर करीत आहे आणि अशा रीतीनें अमेरिकन माल ह्या देशांत घेण्यास प्रतिबंध करीत आहे अशा आशयाच्या तक्रारी अमेरिकन व्यापारी करीत आहेत.

अमेरिकन व्यापाऱ्यांची तक्रार

त्यांचें असें म्हणणें आहे कीं, ब्रिटिश सरकारच्या सांगीवरून हिंदुस्थान सरकार शक्य तोंवर अमेरिकन माल न आणावयाचें धोरण अवलंबीत आहे आणि ह्या देशाचा व्यापार इंग्लंडच्या हातीं ठेवण्याचा प्रयत्न करीत आहे. ह्या आरोपाचा इन्कार ब्रिटिश पत्रें तींबतेनें करीत आहेत. हिंदुस्थानांत डॉलर हुंड्या मुळीं फारशा निघतच नाहींत आणि हा देश स्टर्लिंग गटाचा एक घटक असल्यामुळें त्याचीं परराष्ट्रीय देणीं स्टर्लिंगमध्यें इंग्लंडांत जमा होणें अपरिहार्य आहे व इतर देशांतून आयात होणाऱ्या मालाच्या किंमतीची फेड लंडनमार्फत होण्याची व्यवस्था आहे असें उत्तर ब्रिटिश पत्रें देत आहेत. डॉलर हुंड्या हिंदुस्थानांतून आल्या तर त्यांचा विनियोग इंग्लंड अमेरिकेचें देणें देऊन टाकण्याकडे करीत आहे आणि असें न केल्यास उधार-उसनवार पद्धतीनें अमेरिकेकडून इंग्लंडला माल घ्यावा लागेल. हिंदुस्थानचे लंडनमधील हजार-बाराशे कोटि रुपये मोकळे होण्यास इंग्लंडला त्या किंमतीचा माल ह्या देशास पुरवला पाहिजे किंवा त्या प्रमाणांत आपल्या हिंदी मालाची आयात मर्यादित करावी लागेल असें एक ब्रिटिश पत्र म्हणतें. युद्धसमाप्तीनंतर इंग्लंडला जरूरीचा परदेशी माल आयात करावा लागेल ह्या दृष्टीनें केवळ हिंदी बाजारपेठ आपल्या हातीं ठेवण्यासाठी हिंदी माल आयात न करतां इकडे स्वतःचा माल पाठवीत राहाणें इंग्लंडला परवडणार नाहीं असें स्वयःस्थितीचें समर्थन दुसऱ्या पत्रानें केलें आहे. डॉलर हुंड्यांचा तुटवडा पडून अमेरिकन मालाची आयात मर्यादित होईल हा अंदाजच ह्या पत्रास मान्य नाहीं. इंग्लंड व अमेरिका ह्यांचेमध्यें प्रस्तुत प्रश्नासंबंधानें निष्कारण गैरसमज उत्पन्न झाला आहे तो दूर होणें अगत्याचें आहे असें त्याचें म्हणणें आहे.

बँक ऑफ इंडिया लि.

३१ डिसेंबर १९४३ अखेर संपलेल्या वर्षी बँक ऑफ इंडियास मागील वर्षीतील ओढलेले ९,४४,५७९ रु. ० आ. ८ पै धरून एकूण झालेला नफा:—

	रु.	आ.	पै
	५२,४५,८२७	— ४	— ५
चालू वर्षाचा प्राप्तीवरील कर व सुपर टॅक्स देण्यास लागणाऱ्या रकमेची तरतूद	१५,००,०००	— ०	— ०
३० जून १९४२ रोजी पहिल्या सहामाहीचें ११% दरानें डिव्हिडंड जाहीर केलें त्याबद्दल दिलेली रक्कम	५,५०,०००	— ०	— ०
नफा वाटणीकरतां आतां ३१,९५,८२७ रु. ४ आ. ५ पै रहातात.			

३१ डिसेंबर १९४३ अखेरच्या सहामाहीचें ११% दरानें करमाफ डिव्हिडंड देण्याचें डायरेक्टर बोर्डानें सुचविलें आहे ५,५०,००० — ० — ०

प्रत्येक भागास ८ आ. (१% इतकें) बोनस १,००,००० — ० — ९

बँकेच्या मालमत्तेचे खातीं वर्ग ३,००,००० — ० — ०

मुख्य कचेरीच्या नव्या मालमत्तेसाठीं रिझर्व्ह ६,५०,००० — ० — ०

बँकेच्या रिझर्व्ह फंडाकडे वर्ग २,५०,००० — ० — ०

पुढील वर्षांत ओढण्यासाठी (नोकरवर्गास बोनस दिल्यास तो यांतून यावयाचा आहे) १३,५०,८२८ — ४ — ५

हिंदुस्थानांत पाठविण्याच्या नोकरांचें पूर्वशिक्षण

ईस्ट इंडिया कंपनीचे अमदानींत हिंदुस्थानांत पाठविण्यांत येणाऱ्या उमेदवारांना हिंदी भाषा, वाङ्मय व संस्कृति ह्यांचें शिक्षण देण्यांत येत असे व फोर्ट विल्यम येथें हिंदुस्थानांतहि त्यांच्या शिक्षणाची व्यवस्था होती. ही योजना पुनः सुरू केली पाहिजे; लष्करी व बिनलष्करी खात्यांतील नोकरांना त्याचप्रमाणें व्यापारी फर्ममधील नोकरांनाहि अशा तऱ्हेचें शिक्षण देण्यास प्रारंभ करणें आवश्यक आहे; कंपनीचें राजवटींत हिंदुस्थान व इंग्लंड ह्यांचेमधील दुवा आतांपेक्षा जास्त बळकट होता, असें मि. एच. जी. रॉलिन्सन ह्यांचें म्हणणें आहे.

डॉक्टर व औषध विक्रेत्यांवरील निर्बंध

औषध विक्रेत्यांवरील निर्बंध रोग्यांना औषधें देणाऱ्या डॉक्टरास लागू नाहीं.

अर्थशास्त्र

लेखक:—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे

पृष्ठसंख्या सुमारें ३००, किंमत ३ रुपये

या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

बँकर व खातेदार यांजवरील पासबुकासंबंधीं जबाबदारी

आपल्या खातेदाराच्या उपयोगासाठीं बँकेमधील त्याच्या खात्याचा उतारा बँकर त्यास एका पुस्तकांत लिहून देतो त्यास पासबुक असें म्हणतात. खातेदारानें स्वत:च्या व्हींत बँकेशी झालेल्या व्यवहारांच्या नोंदी जशा केल्या असत्या तशा नोंदी खातेदाराच्या पासबुकांत लिहून देण्याचा प्रकार कांहीं बँकांमधून अस्तित्वांत आहे.

कांहीं बँका खातेदारांना पासबुकें देण्याऐवजीं त्यांना त्यांचा खातेउतारा दर कांहीं ठराविक दिवसांनीं देत असतात. पास बुकें लिहून देण्याचा मूळ उद्देश खातेदार व बँकर यांचेमध्यें झालेल्या व्यवहारांचा चोख हिशेब दोघांनाही कळावा व तशा तऱ्हेचा लेखी पुरावा रहावा असा आहे. यासाठीं पासबुक लिहून झाल्यानंतर तें तपासून देण्याचा प्रघात आहे.

पास-बुकामध्यें खातेदारानें स्वत: कोणतीही नोंद अगर दुरुस्ती करावयाची नसते.

खातेदारानें स्वत: अगर कोणामार्फत तरी बँकेंतून आपलें पासबुक नेल्यानंतर तें स्वत:च्या हिशेबाशीं पडताळून पाहिलें पाहिजे. परंतु कित्येक वेळां सर्व खातेदार असें करतातच असें नाहीं. कित्येक वेळां तें तसेंच परत केलें जातें. वास्तवीक पहातां खातेदारानें बँकेंतून पुस्तक भरून नेल्यावर त्यांतील नोंदी आपल्या व्यवहाराशीं पडताळून पाहून त्यांत कांहीं चूक आढळल्यास योग्य मुदतींत ती चूक बँकरच्या नजरेस आणून दुरुस्त करून घेतली पाहिजे व तशा तऱ्हेचें बंधन अमेरिकेमध्यें खातेदारावर आहेही. परंतु आपणांकडे तशा तऱ्हेचें बंधन नसल्यामुळें पास-बुक बिनचूक भरून देण्याची जबाबदारी सर्वस्वी बँकरवर पडते.

पास-बुकामध्यें ज्या चुकीच्या नोंदी होतात त्या कधीं खातेदाराचे दृष्टीनें अनिष्ट अगर इष्ट असूं शकतात, परंतु सर्वचवेळीं चुकीच्या नोंदी होणें बँकरच्या दृष्टीनें अनिष्ट असतें. अशा चुकीच्या नोंदीचा उपयोग खातेदार बँकरविरुद्ध पुरावा म्हणून उपयोगांत आणूं शकतो.

खातेदाराच्या पासबुकांत चुकीनें जर जास्त शिल्लक दाखविली असेल व ती शिल्लक खरी आहे असें समजून जर खातेदारानें त्या रकमेचा चेक बँकेवर काढला तर तो चेक बँकरला सत्कारावा लागेल व त्याची नुकसानी बँकरला भरावी लागेल. मात्र बँकरनें दिलेल्या चुकीच्या नोंदीमुळेंच ही गोष्ट झाली असें खातेदाराला सिद्ध करतां आलें पाहिजे.

एकंदरींत पासबुकें भरून देतेवेळीं त्यांत लिहिलेल्या नोंदींची जबाबदारी खातेदारापेक्षा बँकरवर अधिक आहे हें ध्यानांत घेऊनच बँकरनें तीं पुस्तकें भरून देतेवेळीं त्या नोंदी बरोबर आहेत कीं नाहीं याची स्वत: पूर्ण खात्री करून पासबुकें खातेदारांस द्यावींत.

एच. व्ही. सहस्रबुद्धे

विषारी फूत्कार—!

एकेक शब्द म्हणजे विषारी सापाचे फूत्कार ! हा सर्प चावला.
पांडवांना पण विष भिनलें कौरवांना !
कौरवांचा नि:पात उडाला ! महात्मा विदूर विमानांतून स्वर्गीं गेले !

रॉयल रत्न १८ वें

★ महात्मा विदुर ★

दिग्दर्शक:—पार्श्वनाथ आळतेकर | कला:—बाबूराव पेंटर

भूमिका:—अखंड-अजोड नटरत्न विष्णुपंत पागनीस, अजोड अभिनय सम्राज्ञी दुर्गा खोटे,
मनोहर घटवाई, नायमपल्ली, अल्हाद, सीता जव्हेरी.

५ वा आठवडा— पुण्यांत ५ वा आठवडा —५ वा आठवडा

मराठी भाषेंत
आर्यन, पुणें
दररोज तीन खेळ दुपारी ३।, ६॥ व १० वाजतां.
व रविवारीं सकाळीं १० वाजतां.

हिंदी भाषेंत
न्यू अपोलो, पुणें
दररोज फक्त एक खेळ रात्रौ ११ वाजतां.

रिझर्व्हेशन सकाळीं १० ते १२ दुपारीं ३ चे पुढें. (आर्यन) तिकिटांचे दर (सरकारी करासह):—बॉक्स रु. १-१२-०, फर्स्ट क्लास रु. १-०-०, फॅमिली सर्कल आ. १०, सेकंड क्लास आ. ९, बिंटर क्लास आ. ५, थर्ड क्लास आ. ४, कुलीन स्त्रियांस आणे १०चा.

सध्यांच्या टंचाईच्या काळांत जीवनद्रव्यें कमी पडतात.
जीवनद्रव्यांनीं (Vitamins) युक्त असे
टोमॅटो केचप (गोड) व
टोमॅटो सॉस [तिखट व आंबट]
आजच मागवा व जीवनद्रव्यांची वाटणारी
उणीव भरून काढा.
रुरल प्रॉडक्टस कंपनी लि. पुणें
बिझिनेस ऑफिस: ९१३ अ सदाशिव, पुणें २.

दत्त कंपनी
७३५ शुक्रवार पेठ, पुणें २. दाणेआळी पोलिसगेटाजवळ
सर्व तऱ्हेचे काटे, वजनें व मापें, वेळेवर
रिपेअर करून मिळतील.

'अर्थ' ग्रन्थमाला.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

विमेदार नि हवाई हल्ला
शत्रुराष्ट्राकडून हवाई हल्ला अगर तत्सम उपद्रव यापासून बिनलढाऊ नागरिकांच्या जीविताला येणाऱ्या धोक्याचा समावेश विमा पॉलिसीच्या अटींत होतो काय व त्यासाठी जादा प्रिमिअम भरावा लागेल काय ? असा प्रश्न साहजिकच नागरिकांमध्यें चर्चिला जात आहे.

ट्रस्ट ऑफ इंडिया
विमा कंपनीच्या
विमा पॉलिसीमध्यें हवाई हल्ल्यामुळें जीविताला होणाऱ्या अपायाचा अंतर्भाव होतो त्याकरितां जादा प्रिमिअम नाहीं.

तरी विलंब न लावतां—
तुमचा नि तुमच्या आप्तेष्टांचा विमा
ट्रस्ट ऑफ इंडिया
विमा कंपनींतच उतरा.
अध्यक्षः—श्रीमंत सरदार जगन्नाथ महाराज पंडित
माहितीपत्रकें विनामूल्य पाठवूं
ट्रस्ट ऑफ इंडिया विमा कं. लि., लक्ष्मी रोड, पुणें २ | वि. ह. देशमुख, बी. ए. जनरल मॅनेजर

पुना गेस्ट हाऊस
१००, लक्ष्मी रोड, पुणें २.
Telephone 779
GUEST HOUSE
TELEGRAM Guest House Poona 2.

न्यू इंडिया इंडस्ट्रीज लि.
(Approved Re-traders and Approved Contractors)
२६ लॅमिंग्टन नॉर्थ, मुंबई ११.
अध्यक्षः—श्री. ग. स. मराठे, ॲक्चुअरी.
महाराष्ट्रांतील रबराचा प्रमुख कारखाना
★ गिरणीचे रोलर्स ★ रबरी हातमोजे ★ छापखान्यांचे रोलर्स
★ रीमोल्ड टायर्स ★ रबरी वॉशर्स ★ सॉलिड व्हील्स
व इतर रबरी माल तयार होतो.
पु. ग. मराठे
मॅनेजिंग डायरेक्टर.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व

REGISTERED No. B. 5434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
(टपाल हंशील माफ)
किरकोळ अंकास
दोन आणे.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष १० पुणें, बुधवार, तारीख २६ जानेवारी, १९४४ अंक ४

फणसपोळी, आंबेपोळी
किरकोळ व ठोक मिळेल.
द. ना. हेर्जीब, : : २० शुक्रवार, पुणें २.

पुण्यांतील
आदर्श निवासस्थान व भोजनालय
छाया लॉजिंग व बोर्डिंग हाउस
बुधवार चौक, पुणें २.

ए. बी. सी. कॉइल्स
(डासांच्या उदबत्त्या)
बॉक्समध्यें १२. बॉक्स किं. १० आणे.
रात्रभर जळतात.
लायसॉफ
केसांतील उवांवर आश्चर्यकारक शोध.
उवा १ तासांत मरतात
बाटली किं. १ रु. ★ दोन वेळां उपयोग.
दि मागोरा केमिकल कं. लि.
— टिळक रोड, पुणें १. —

पुना गेस्ट हाऊस
१००, लक्ष्मी रोड, पुणें २.
Telephone 779
GUEST HOUSE
TELEGRAM Guest House Poona 2.

महायुद्धाची जाणीव ! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.
गिरगांव मुंबई नं. ४
महिंद्रकर ब्रदर्स
तयार कपड्याचे व्यापारी
बुधवार चौक, पुणें

विविध माहिती

हिंदी बँकिंग परिस्थितीवर सर सी. डी. देशमुख ह्यांचा अभिप्राय

मुंबईच्या सिडनहॅम कॉलेजच्या बँकिंग असोसिएशनच्या वार्षिक संमेलनाचे अध्यक्ष ह्या नात्यानें रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर, सर सी. डी. देशमुख, ह्यांनी हिंदी बँकांच्या परिस्थितीचा आढावा घेतला व युद्धसमाप्तीनंतरच्या संक्रमण काळांत त्यांचेवर पडणारा बोडाफार ताण त्या योग्य तऱ्हेनें सोसूं शकतील, असें आपलें मत त्यांनीं व्यक्त केलें. व्यापार व उद्योगधंदे ह्यांची बँकांकडील कर्जावरील मदार अल्प प्रमाणांत आहे, ह्या गोष्टीचाहि त्यांनीं उल्लेख केला. नव्या बँकांची व शाखांची स्थापना बँकिंगच्या सर्वसाधारण मजबुतीस बाधक आहे, असेंच कांहीं नाहीं; त्या चालविण्यास तज्ज्ञ लोक मिळण्यावर त्यांचें यश अवलंबून आहे परंतु अशा लोकांचा आजच तुटवडा भासत आहे, असें ते म्हणाले. प्रत्येक शाखा तात्काळ फायदा दाखवूं लागेल, अशी अपेक्षा न बाळगणें इष्ट होय, असेंहि त्यांनीं सांगितलें.

विदेशी कपाशींतील सट्टेबाजीस आळा

ज्यांचेजवळ विदेशी कपाशीचा साठा आहे, अशांनीं आपला त्यां कपाशीचा साठा १५ फेब्रुवारीस प्रारंभ करून त्यानंतर प्रत्येक महिन्याच्या १५ तारखेस सरकारास कळविला पाहिजे व इजिप्शन कपाशीची खरेदी-विक्री सरकारी परवान्याशिवाय कोणीहि करतां कामा नये, असा जाहीरनामा हिंदुस्थान सरकारनें काढला आहे. विदेशी कपाशींतील सट्टेबाजीस आळा घालणें, हा त्याचा उद्देश आहे.

ट्रेझरी बिलांवर ८ आणे व्याजाचा दर

गेल्या आठवड्यांत रिझर्व्ह बँकेनें हिंदुस्थान सरकारचीं ८ कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकलीं, त्यांवर व्याजाचा सरासरी दर द. सा. द. शे. ८ आणे पडला.

युद्धोत्तर वैमानिक वहातुक

क्युनार्ड स्टीमशिप कंपनी ह्या ब्रिटिश आगबोट कंपनीनें आपला मेमोरँडम बदलून, वैमानिक वहातुक करणें हा उद्देश त्यांत घालून घेतला आहे. इतर ब्रिटिश कंपन्यांनींहि त्याचा कित्ता गिरवला आहे. युद्धोत्तर वैमानिक वहातुक काबीज करण्याची ही पूर्वतयारी आहे.

व्हाइसरॉयांच्या आवारासहि रेशनिंग लागू होणार

जुनी दिल्ली, नवी दिल्ली व दिल्ली कँन्टोनमेंट ह्यांत लवकरच रेशनिंगला प्रारंभ होणार आहे. व्हाइसरॉयांच्या आवाराचाहि रेशनिंगच्या योजनेंत समावेश केला जाईल व त्यांतील रहिवासी व इतर रहिवासी ह्यांत फरक केला जाणार नाहीं, असें कंट्रोलर ऑफ रेशनिंग, मि. ए. पी. ब्लूम, ह्यांनीं सांगितलें.

हिंदी कस्टम्सचें उत्पन्न

	लक्ष रुपये
डिसेंबर, १९४२	३२८
नोव्हेंबर, १९४३	४१८
डिसेंबर, १९४३	४७६

सर्वांत मोठा पगारदार

अमेरिकेंत सर्वांत ज्यास्त पगार मिळविणाराचें नांव मि. लुई बी. मेयर असें असून ते मेट्रो गोल्डविन स्टूडिओचे प्रमुख आहेत. गेली पांच वर्षें त्यांनीं सर्वांत मोठा पगारदार, हें आपलें स्थान कायम राखलें आहे. त्यांचा वार्षिक पगार सुमारें ३५ लक्ष रुपये आहे. परंतु, कर देऊन त्यांतील फक्त ५ लक्ष रुपये उरतात.

साखर

साखर फक्त उसापासूनच करतां येते असें नसून बटाटे, तांदूळ, भाज्या, गवत, रद्दी कागद, जुने दोर, माती, ह्यांपासूनहि साखर निघूं शकते. अर्थात्, ह्या साखरेचा दर्जा व गोडी हीं कनिष्ठ असतात, हें उघड आहे. मधांत साखर असते, हें प्रसिद्धच आहे. द्राक्षांतहि साखर आढळते. परंतु, उस व बीट ह्यांची साखर मोठ्या प्रमाणावर करून तिचा प्रसार करणें फायदेशीर ठरतें.

शस्त्रसंन्यास !

बलीदानाचे प्रसंगी महात्मा विदुरांनी शस्त्रसंन्यास केला !
प्रत्येक प्राणीमात्रांत त्यांना परमेश्वर दिसूं लागला !

तो चमत्कार जरूर पहा !

रॉयल रत्न १८ वें

★ महात्मा विदुर ★

दिग्दर्शक:—रेजिसॉर पार्श्वनाथ आळतेकर | कला:—बाबूराव पेंटर

भूमिका:—विष्णुपंत पागनीस, दुर्गा खोटे, मनोहर घटवाई, नायमपल्ली, प्रल्हाद, सीता जव्हेरी.

आर्यन, पुणें दररोज ३। ६॥ व १०
रविवारीं सकाळीं १० वा. जादा खेळ

पुण्यांत ६ वा आठवडा

अनुक्रमणिका

	पृष्ठ		पृष्ठ
१ विविध माहिती ...	२६	श्रमविभाग व परस्पर सहाय- औद्योगिक उन्नतीची प्रचंड योजना–दहा हजार कोटि रुपये खर्च	
२ सहकारी कर्जाच्या व्याजाचे दर ...	२७	६ शेअर बाजार ...	३०
३ विमा कंपनीच्या हप्त्यांच्या सवलतीची मुदत ...	२८	७ को. क्वार्टर्ली ...	३१
४ जमीन गहाणाच्या बँकांचा कारभार ...	२८	८ चलन व पैसा ...	३१
५ स्फुट विचार ...	२९	९ परचेस व सेल युनियनची स्थापना ...	३२
सोसायटयांची देखरेख व तपासणी–त्यांच्या मर्यादा–			

अर्थ

बुधवार, ता. २६ जानेवारी, १९४४

सहकारी कर्जाच्या व्याजाचे दर

सहकारी पतपेढ्या आणि सेंट्रल बँका

खेडेगावी सहकारी पतपेढ्यांच्या सभासदांस त्यांनीं घ्याव-याच्या कर्जावरील व्याजाचा दर भारी असून तो उतरणें आव-श्यक आहे असें मत कित्येक वर्षे प्रतिपादलें जात आहे. पैसा पुरवणाऱ्या बँकांचा सोसायटयांवर आकारण्याचा व्याजाचा दर कमी झाल्यावांचून हा उतार शक्य नाहीं हें उघड आहे. सोसा-यट्यांस दिलेलीं कर्जे अल्प मुदतीचीं असलीं तरी वेळेवर त्यांची फेड न झाल्यानें तीं लांबमुदतीचीं होतात आणि सूट व सवलत ह्यांचा आश्रय करावा लागतो. थकलेलीं व्याजें व मुद्दल सोडून देऊन सोसायटया स्वतःच्या पायांवर उभ्या राहूं शकतील ह्या बेतानें तडजोड करणें बँकांस आवश्यक होतें. ही मूलभूत परि-स्थिति लक्षांत घेतली असतां बँकांचें एकमेव नसलें तरी प्रमुख गि-हाईक ज्या सोसायटया, त्यांस अल्प व्याजानें कर्जे कां मिळत नाहींत, ह्या प्रश्नास उत्तर मिळतें. बँकांचा पैसा तरता व निश्चित-पणानें परत येणारा असा असता तर जॉईंट स्टॉक बँकांप्रमाणें सहकारी बँकांसहि आपला व्याजाचा दर हलका करतां आला असता. ह्या संबंधांत तुलना करावयाची तर ती शहरी मोठ्या बँकांशीं न करतां खेडेगावी सावकारांशीं केली पाहिजे. आतां, सहकारी चळवळीच्या बाहेर असणाऱ्या शेतकऱ्यांस जें व्याज यावें लागतें त्या मानानें पतपेढ्यांस त्यांच्या सभासदांस. यावें लागणारें व्याज कितीतरी कमी असतें ही प्रत्यक्ष अनुभवाची गोष्ट असल्यानें तिला सिद्ध करण्यास निराळा पुरावा नको. शेतकऱ्यांशीं व्यवहार करणाऱ्या बँकांचा खर्च एवढा होतो आणि त्यांच्या मार्गांत वसुलीच्या इतक्या अडचणी असतात कीं त्यांस व्याजाचा दर विशिष्ट मर्यादेच्या पली-कडे खाली नेणें परवडत नाहीं. सहकारी बँकांच्या व्यवस्थेंत पतपेढ्यांच्या प्रतिनिधींचा बहुतेक निर्णायक असा हात असतो आणि सोसायट्यांची बँकांच्या मांडवलांत महत्त्वाची भागीदारी असते हें येथें विसरतां कामा नये. ह्या कारणानें बँकांचें हित तें सोसायट्यांचें हित आणि सोसायट्यांचा फायदा तो बँकांचा फायदा अशी वास्तविक स्थिति आहे आणि ह्या दोन प्रकारच्या संस्थांमध्यें अनभिज्ञ किंवा पूर्वग्रह दूषित माणसांस वाटतें तसा परस्पर विरोध असणें शक्य नाहीं.

मामुली व्यवहारांच्या स्वरूपाची ही गोष्ट झाली. अलीकडे युद्धपरिस्थितीमुळें समाजांत मुबलक पैसा खेळत असून त्याचें मोल उतरलें आहे. सहकारी बँकांस नकोत इतक्या ठेवी त्यांचे-कडे येत आहेत आणि ह्या पैशाचा विनियोग कसा करावा हें त्यांस समजेनासें झालें आहे. ह्या संस्थांनीं ठेवीवर यावयाच्या व्याजाचे दर पुष्कळच कमी केले आहेत, ह्यामुळें त्यांचा व्या-जाच्या बाबीवरील खर्च पूर्वापेक्षां खाली गेला आहे. त्याचाच अर्थ असा कीं बँकांनीं यावयाचा आणि घ्यावयाच्या दरांमधलें अंतर मोठें झालें आहे आणि शेती पतपेढ्यांस आकारावयाच्या व्याजाचा दर कमी करण्यास त्यांच्या प्राप्तिमध्यें कूस रहात आहे. ह्या अनुकूल परिस्थितींत कांहीं बँकांनीं सोसायट्यांस अंशभागी करण्याचें धोरण कमीअधिक प्रमाणांत स्वीकारलें आहे, तें हिशेबी पद्धतीच्या भक्कम पायावर उभें करणें आवश्यक आहे. येथें दोन गोष्टी मात्र ध्यानांत घेतल्या पाहिजेत. पहिली आणि महत्त्वाची गोष्ट ही आहे कीं बँकांकडे स्वस्त दरानें ठेवी आल्या आहेत त्यांतला मोठा भाग सरकारी रोख्यांत, पैसा तरता ठेवण्यासाठी गुंतवावा लागत आहे आणि त्यावर अडीच-तीन टक्के इतकेंच व्याज सुटतें. म्हणजे, बँका घेत असलेल्या व देत असलेल्या व्याजाच्या दरांत, बऱ्याच मोठ्या रकमेचे बाबतींत, वाटतो तेवढा फरक रहात नाहीं आणि त्या मानानें त्यांची प्राप्ति मर्यादित होऊन सोसायट्यांस आकारावयाच्या व्याजांत घट करण्याचें त्यांचें सामर्थ्यहि मर्यादित होतें. तसेंच, युद्ध परिस्थि-तीमुळें बँकांच्या नोकरांच्या पगाराचा व इतर खर्च वाढला आहे ही गोष्टहि विसरतां कामा नये. शेतीच्या मालास चांगले भाव येत असल्यानें सोसायट्यांमध्यें कर्जे फेडण्याची व नवीन कर्जे मर्यादित प्रमाणांत घेण्याची प्रवृत्ति अभि-नंदनीय रीतीनें दिसून येत आहे. शेतकऱ्यांनीं बचतीचा पैसा शिल्लक म्हणून गुंतवून ठेवावा, सध्यांच्या महागाईच्या काळांत त्याचा खर्च होऊं नये असा योग्य सल्ला त्यांस देण्यांत येत आहे, त्याच्या मुळाशीं वरील प्रवृत्तीच आहे. बँकांच्या व्याजाच्या प्राप्तीवर मात्र तिचा प्रतिकूल परिणाम होत आहे आणि त्याबद्दल त्यांनीं तक्रार करण्याचें कारण नाहीं. तथापि, बँकांनीं कर्जावरील व्याजाच्या दराचा विचार कर्तव्य असतां ही बाब हिशेबांत घेतली पाहिजे. ज्या थोड्या बँकांनीं शेत-मालाच्या तारणावर कर्जे देण्याचा व्यवहार वाढवला आहे, त्यांस आपला पैसा कर्जरोख्यांत गुंतविण्यापेक्षां अधिक किफायतशीर रीतीनें उपयोगांत आणण्याचा मार्ग उपलब्ध झाला आहे आणि सोसायट्यांस यावयाच्या मामुली कर्जांत होणारी घट भरून काढण्याची नवीन सोय झाली आहे. ज्या प्रमाणांत हा व्यवहार वाढला आहे त्या मानानें बँकांच्या वर निर्दिष्ट केलेल्या तक्रारींस कमी जागा उरत आहे. मालाच्या तारणावर कर्जे देण्याचें काम दुहेरी रीतीनें उपयुक्त आहे. सोसायट्यांच्या सभा-सदांस आपल्या मालाच्या विक्रीची तरतूद सहकारी तत्त्वानें करतां येऊन चांगला भाव मिळून लवकर पैसा हातीं येण्यास सहाय होत आहे. त्याबरोबरच, बँकांचा पैसा गुंतवण्याचें जादा साधन त्यांच्या हातीं येत असून सोसायट्यांस दिलेल्या कर्जाच्या वसुली-वर अनुकूल परिणाम होण्याचाहि हा मार्ग आहे. मध्यवर्ती बँका

सहकारी पतपेढ्यांस व इतर सहकारी संस्थांस पैसा पुरवण्याकरतांच अस्तित्वांत असल्यानें स्वतःच्या सुरक्षितेची काळजी घेऊन त्यांनीं हें आपलें कार्य शक्य तितक्या सवलतीनें व स्वस्त दरानें करणें अगत्याचें आहे. सर्व बँकांची ह्या बाबतींतली परिस्थिति सारखी नाहीं. तथापि, त्यांपैकी प्रत्येक संस्थेस ठेवी अल्प दरानें मिळत आहेत, तोंपर्यंत सोसायट्यांस उतरत्या व्याजानें कर्जे देण्याची व्यवस्था करतां आली पाहिजे. ही व्याजाची सवलत बँकांच्या सांपत्तिक परिस्थितीचा नीट विचार होऊन निश्चित करण्यांत येणें आवश्यक आहे. हा प्रत्यक्ष हिशेबाचा प्रश्न आहे आणि तो व्यावहारिक रीतीनें सोडवतां येण्यासारखा आहे. वर म्हटल्याप्रमाणें, हें धोरण कित्येक बँकांनीं अंगिकारलें आहे. त्यास व्यवस्थित व हिशेबी स्वरूप बँकांनीं द्यावें हें उचित आहे.

विमा कंपनीच्या हप्त्यांच्या सवलतीची मुदत

कलकत्ता हायकोर्टाचा निवाडा

श्री. सुधीरचंद्र मलिक हे १० फेब्रुवारी, १९४१ रोजीं मरण पावल्यावर त्यांची पत्नी, श्री. वृंदाराणी देवी ह्यांनीं श्री. मलिक ह्यांच्या विम्याच्या रकमेची को-ऑपरेटिव्ह ॲशुअरन्स कं. लि. कडे मागणी केली. २० जानेवारी, १९४१ रोजीं विमा पॉलिसी, तिचा हप्ता न भरल्यामुळें, रद्द झाली तेव्हां कंपनी देणें लागत नाहीं, असें श्री. वृंदाराणी ह्यांना कळविण्यांत आलें. विमेदारास कोणताहि रोग नाहीं अशा प्रतिज्ञेच्या दाखल्याचे आधारावर कंपनीनें ५ फेब्रुवारी रोजीं पॉलिसी पुनः चालू केली होती, परंतु त्यास क्षयरोग होता असें नंतर आढळून आलें. ह्या संबंधांतील वैद्यकीय रिपोर्ट चुकीचा आहे असें वादीचें म्हणणें नव्हतें परंतु हप्त्याचे पैसे सवलतीच्या मुदतींत भरलेले आहेत असा वादीचा युक्तिवाद होता. विमा कंपनीची मुख्य कचेरी लाहोर येथें आहे व तिची कलकत्ता येथेंहि कचेरी आहे व तिच्या नोटपेपरवर कलकत्त्याच्या कचेरीचा पत्ता छापलेला असतो. ह्यावरून कंपनीचा कारभार कलकत्त्यास चालतो असें हायकोर्टानें ठरवून निवाडा केला.

विमेदाराच्या विम्याच्या हप्त्याची तारीख ६ जानेवारी ही होती. विमेदारास १५ दिवस सवलत मिळते, त्याप्रमाणें हप्ता भरण्याची अखेरची तारीख २१ जानेवारी ही होती व त्याच दिवशीं हप्ता भरलेला आहे. ६ जानेवारीचा दिवस धरून सवलतीचे दिवस मोजावे अशी कंपनीनें मागणी केली व त्याप्रमाणें हप्त्यास एक दिवस उशीर झाला असें तिचें म्हणणें होतें. हप्ता येणें असलेला दिवस सवलतीची मुदत मोजतांना लक्षांत घ्यावयाचा नसतो, हें स्पष्ट करून विमेदारानें आपला हप्ता मुदतींत भरला, असा हायकोर्टानें निवाडा केला. विमा कंपनी विमेदारास दरमहा हप्त्याची नोटीस पाठवीत असे, त्यांत सवलतीची मुदत मोजतांना हप्ता येणें असलेला दिवस मोजला जाईल असें लिहिलेलें असलें तरी सुद्धा विमा कंपन्यांच्या संबंधांतील कागद व करार ह्यांत अस्पष्टपणा असल्यास कंपनीचे विरुद्ध त्याचा अर्थ लावावा, असा दंडक आहे. त्याचा आधार घेऊन हायकोर्टानें खालीलप्रमाणें निवाडा केला:—

"ह्या कोर्टास दावा चालविण्याचा अधिकार आहे. १० फेब्रुवारी रोजीं पॉलिसी चालू होती. वादीस २ हजार रुपये व त्यावरील १० फेब्रुवारीपासूनचा बोनस व व्याज हें मिळावें. दाव्याचा खर्चहि मरून मिळावा"

जमीन-गहाणाच्या बँकांचा कारभार

कांहीं सूचना

सातारा जिल्हा जमीन गहाण बँकेच्या व्यवहारांचे अनुभवावरून सुचलेल्या विचारांचें एक टाचण श्री. बापूसाहेब राजाज्ञा ह्यांनीं तयार केलें आहे, तें श्री. वैकुंठराय मेथा ह्यांनी आम्हांस दाखवलें. टाचणांतील प्रमुख बाबींचा उल्लेख येथें केला आहे. बँकेची स्थापना व घटना ह्यांची त्रोटक माहिती प्रथम देण्यांत आली आहे. बिगर कर्जदार ३८ सभासद असून त्यांचें भांडवल १५,२०० रुपये आहे आणि ८८० कर्जदार मेंबरांचें भांडवल १५,८५० रु. आहे. अशा प्रकारच्या मोठ्या भांडवलाची ही एकच बँक मुंबई प्रांतांत आहे. वाटेल तेवढीं कर्जे सर्वांस मिळतील ह्या समजुतीनें कर्जदार सभासदांनीं हें भांडवल घातलें आहे. पण विशिष्ट मर्यादा असल्या कारणानें थोड्या लोकांस कर्ज मिळूं शकतें आणि तें मिळण्यासहि अर्ज केल्यापासून फार वेळ लागतो. ह्या बाबतींत सुधारणा होण्याची आवश्यकता आहे. बहुतेक कर्जे जुन्या कर्जाच्या फेडीसाठी घेतलेलीं आहेत आणि जमीन सुधारणेकरितां घेतलेल्या कर्जाचें प्रमाण अत्यंत अल्प आहे. कर्जाचे अर्जांत यावयाची माहिती आणि तिची कायदेशीरपणाविषयींची छाननी ह्यांचे संबंधांत पुष्कळ वेळ जातो, तो वाचवला जावा ह्याकरितां जरूर असलेल्या सुधारणा होणें इष्ट आहे. बँक सर्वांच जिल्ह्याकरितां असली तरी चांगल्या जमिनी व पाऊसपाणी बरें आहे अशा भागांतील लोकांसच तिचा उपयोग होतो आणि जमीनीचें क्षेत्र विशिष्ट मर्यादेपेक्षां अधिक असेल तरच तिचा फायदा शेतकऱ्यांस मिळूं शकतो. मद्रास प्रांतांत जमीन गहाणाच्या बँका स्थापन होऊन अधिक वर्षे झालीं आहेत, तेथेंहि अनुभव अशाच प्रकारचा आहे. जमीन गहाण बँकांनीं दिलेल्या कर्जाचे हप्त्यांचे वसूलीसंबंधांत त्यांस विशेष सवलती असणें आवश्यक आहे. तडजोडीनें सावकारी कर्जांत सूट मिळवण्याची सध्याची व्यवस्था पद्धतशीर व नियमबद्ध अशी हवी. सुधारणेचे दृष्टीनें खालील सूचना करण्यांत आल्या आहेत:—सोसायटीचे जे मेंबर बँकेकडे कर्ज मागतात त्यांचे बाबतींत रिझर्व बँकेचें पुस्तक २ पान ३८ वरील सूचनेप्रमाणें माहिती आली पाहिजे. लँड व्हॅल्युएशन ऑफिसरनें सब-रजिस्ट्रार कचेरींतील माहिती घेतल्यानंतर हप्त्याचे तारखेपर्यंत बोजांची माहिती योग्य फी घेऊन कां होईना सब-रजिस्ट्रारकडून वेळेवर मिळाली पाहिजे. गावकामगारांचें सहकार्य हवें. त्यांनीं जरूर ती माहिती व मदत दिली पाहिजे. बँकांची वार्षिक परिषद भरणें जरूर आहे. त्यांच्या बोर्डात शेतकी खात्याच्या अधिकाऱ्यांचा समावेश व्हावा. बँकांचें ऑडिट मद्रासप्रमाणें मोफत असावें.

मुंबई शहरांतील भिक्षेकरी बंद होणार?

मुंबई शहरांत रस्त्यांवर भटकणारे भिकारी गोळा करून त्यांतील आंधळे, पांगळे व आजारी भिकारी योग्य त्या संस्थांत ठेवून व धडधाकट भिकाऱ्यांस कामधंदा शिकवून त्यांस पोटापाण्यास लावण्याची एक योजना मुंबई सरकार एका कायद्याचे द्वारा अंमलांत आणणार आहे. ह्या संबंधांत तपशीलवार सूचना करण्यासाठी एक लहान कमिटी नेमण्यांत आली आहे.

स्फुट विचार

सहकारी सोसायट्यांची देखरेख आणि तपासणी

सहकारी मध्यवर्ती बँकांनीं सोसायट्यांस हल्लींपेक्षा कमी व्याजाच्या दरानें कर्जे देण्याची आवश्यकता आणि शक्यता ह्या विषयाचें विवेचन आम्हीं आजच्या अग्रलेखांत केलें आहे. व्याजाचा दर उतरवणें त्यांस शक्य व्हावें म्हणून बँकांनीं स्वतःच्या खर्चांत काटकसर करावी, अशी एक सूचना पुढें आली आहे. वाजवीपेक्षां अधिक खर्च होत असल्यास त्यास कात्री लावणें कोणत्याहि संस्थेच्या हिताचें असून काटकसरीनें स्वतःचा कारभार चालवणें तिचें कर्तव्यच आहे. सहकारी बँकांच्या मध्यवर्ती संस्थेनें ह्या सूचनेचा विचार केला आहे आणि चौकशीअंतीं खर्च कमी करण्यास जागा नसल्याचें तिला आढळून आलें आहे. सध्याच्या युद्ध परिस्थितींत महागाईमुळें तर सर्व खर्च वाढले आहेत आणि नोकरवर्गाच्या प्राप्तींत वाढ करणें अपरिहार्य झालें आहे. कागद, टपाल, छपाई हीं सर्व महागलीं आहेत. ह्या अडचणींवर अशी एक तोड सुचवली गेली आहे कीं सोसायट्यांची तपासणी करणारे बँकांचे इन्स्पेक्टर आणि त्यांची देखरेख करणारे सुपरव्हायझर ह्यांचीं कामें कांहीं बाबतींत एकाच स्वरूपाचीं असल्याकारणानें त्यांचे संबंधांत सुपरव्हायझिंग यूनियन्स व बँका ह्यांस दुहेरी खर्च करावा लागतो, त्यांत बचत करतां आली पाहिजे. आज असें झालें आहे कीं यूनिअन्सचा खर्च त्यांस मिळणारी सोसायट्यांची फी, सरकारी ग्रँट व बँकांची मदत ह्यांच्या उत्पन्नांतून भागत नाहीं. सुपरव्हायझरना योग्य महागाई भत्ता देणें तर जरुर आहे आणि तो यावयाचा म्हटल्यास यूनिअन्सच्या उत्पन्नांत त्यास वाव नाहीं. सरकार आपली ग्रॅन्ट वाढवून ही तूट भरून काढण्यास तयार नाहीं. तेव्हां बँकांनीं सध्याच्या त्यांच्या वार्षिक मदतींत पांच हजार रुपयांची भर घालून हा तुटीचा प्रश्न सोडवण्यास मदत करावी असा सहकारी खात्याचा आग्रह आहे. सोसायट्यांस दिलेल्या कर्जाच्या एकूण रकमेवर सध्याच्या शेकडा ४ आण्यांच्या ऐवजीं ६ आणे इतकी मदत बँकांनीं वाढवावी अशी ही सूचना आहे. सुपरव्हिजन व इन्स्पेक्शनचीं कामें अनुक्रमेंकरून यूनिअन्स व बँका ह्यांचे अधिकारी आज करीत आहेत. त्यांच्या कामाची जुळणी काटकसरीनें केली गेल्यास दोन्ही संस्थांच्या खर्चांत बचत होईल आणि त्याचा फायदा सोसायट्यांस मिळूं शकेल असा येथें युक्तिवाद केला जात आहे. यूनिअन्सचे सुपरव्हायझर्स कर्जाचे तक्के, त्यांची वसुली, जमीनींच्या किंमतींची आकारणी इत्यादि संबंधांत पर्यायानें बँकांचेंच काम करीत नाहींत काय ? मग यूनिअन्सच्या उत्पन्नास अधिक हातभार त्यांनीं कां लावूं नये ? आणि आपले इन्स्पेक्टर व सुपरव्हायझर ह्यांच्या कामांत जुळणी व काटकसर कां घडवून आणूं नये ? असे प्रश्न विचारण्यांत येत आहेत. देखरेखीचें काम यूनिअन्सच्या तंत्रानें चालण्याच्या ऐवजीं तें युनिअन, बँक व सहकारी खातें ह्यांच्या संयुक्त अधिकाराखाली प्रयोगादाखल चालवलें जावें आणि त्याचा अनुभव अनुकूल वाटल्यास ही व्यवस्था सार्वत्रिक करावी अशीहि एक सूचना पुढ मांडण्यांत आली आहे.

देखरेख आणि तपासणी ह्यांच्या मर्यादा

वरील विषय अत्यंत महत्त्वाचा, मूलभूत तत्त्वाचा व योग्य पद्धतीचा असल्यानें त्याची नीट चर्चा होणें अगत्याचें आहे. येथें त्यांत उपस्थित होत असलेले प्रमुख मुद्देच तेवढे नमूद करतां येतील. सोसायट्यांची देखरेख म्हणजे काय, ती कशी व कोणी करावयाची, तिच्या संबंधांत सोसायट्या व त्यांचे सभासद आणि यूनिअन्स व सुपरव्हायझर ह्यांच्या जबाबदाऱ्या व कर्तव्यें कोणतीं, तसेंच, बँकेकडून होणाऱ्या तपासणीचा उद्देश व मर्यादा कोणत्या, तिचा युनिअननें करावयाच्या देखरेखीशीं संबंध किती व कोणता आहे, देखरेखीच्या खर्चास मदत म्हणून बँकांनीं कोणत्या कारणासाठीं व किती ग्रँट द्यावयाची, सरकारनें युनिअनला द्यावयाच्या ग्रॅन्टचें प्रमाण काय असावें व त्या संस्थेचें स्वतःचे फीचे वगैरे उत्पन्न वाढवण्याचे मार्ग कोणते, इत्यादि बाबी ह्या विषयाचा निर्णय करतांना विचारांत घेतल्या जाणें आवश्यक आहे. यूनिअन्स बँकांच्या कर्जाच्या वसुलीचें महत्त्वाचें काम करतात आणि म्हणून त्यांनीं त्या संस्थांस द्रव्यसहाय दिलें पाहिजे ह्या म्हणण्यांत कितीसा तथ्यांश आहे ? वस्तुतः बँक ही सोसायटी ह्या संस्थेस कर्ज देते, तिच्या सभासदांस नाहीं; आणि सोसायटी त्या पैशाची वांटणी, जरूरी व लायकी ह्यांस अनुसरून, आपल्या सभासदांमध्यें करते. सहकारी तत्त्वाप्रमाणें सोसायटीच्या सभासदांनीं एकमेकांच्या व्यवहारांवर नजर ठेवली पाहिजे आणि आपल्या संस्थेची पत बँकेकडे रहावी व तिच्याकडून वेळोवेळीं सवलतीनें कर्जे मिळावीं ह्यासाठीं सुपरव्हायझरमार्फत व्यवस्था व कारभार ह्यांवर देखरेख केली पाहिजे आणि कर्जाची वसूली केली पाहिजे. बँकेकडून कमी अधिक प्रमाणांत घेतलेल्या कर्जाची सभासदांकडून योग्य वसूली करणें हें सोसायटीचें स्वतःच्या हिताचें असें आय कर्तव्य आहे, तें तिला बँकेवर लोटून देतां येणार नाहीं.

श्रमविभाग व परस्पर सहाय

सोसायट्या व त्यांचे सभासद ह्यांचेमध्यें स्वतःच्या जबाबदारीची जाणीव व शिस्त हीं असावींत तशीं नाहींत अशी हिंदुस्थानांतील सहकारी चळवळीसंबंधानें नेहमीची तक्रार आहे. यूनिअन्सचे सुपरवायझर व बँकांचे इन्स्पेक्टर ह्यांच्या कामाची गल्लत केल्यानें ही असमाधानकारक परिस्थिति अधिकच बिघडणार आहे. सुपरवायझर्सना स्वतःचें असें पुष्कळ काम आहे. त्यांस बँकेच्या इन्स्पेक्टरच्या कामाचा भाग आणखी उचलतां येणार नाहीं. तसेंच, इन्स्पेक्टरला सुपरव्हायझरचें दैनंदिन व चिकट काम जमावयाचें नाहीं. " जेनो काम तेनो थाय " हाच न्याय येथें लागू पडतो. यूनिअन्स व बँका ह्यांनीं शक्य तेथें परस्परांस मदत ही केलीच पाहिजे आणि सहकारी चळवळीच्या प्रगतीसाठीं बँकांनीं यूनिअन्सना व सोसायट्यांस द्रव्यसहायहि दिलें पाहिजे. पण बँकांच्या एजंटांस व इन्स्पेक्टरांस स्वतःचें असें काम आहे तें सोडून किंवा कमी करून, सद्हेतूनें कां होईना, सोसायट्यांच्या अंतरव्यवस्थेंत त्यांनीं हात घालूं नये हें चांगलें. बँकांनीं सोसायट्या व यूनिअन्स ह्यांस मदत करावयाची ती मुख्यतः आपला व्याजाचा दर शक्य तेवढा कमी करून याची हें उचित दिसतें. सहकारी संघटनांत श्रमविभागाचें तत्त्व आहे हें विसरून चालावयाचें नाहीं आणि त्याला धरून सर्व सहकारी संस्थांनीं परस्पर सहाय केलें असतां कर्तव्यें व जबाबदाऱ्या ह्यांचा गोंधळ उडणार नाहीं. प्रस्तुत दृष्टी ठेवून सहकारी कार्यकर्त्यांनीं वर नमूद केलेल्या प्रश्नांची चर्चा करावी. सरकारनें तरी स्वतःची यूनिअन ग्रँट सध्याच्या परिस्थितींत न वाढवतां बँकांस तसें करण्यास कां सांगावें ?

औद्योगिक उन्नतीची प्रचंड योजना

श्री. बिर्ला, श्री. टाटा, सर पुरुषोत्तमदास ठाकुरदास इत्यादि प्रमुख हिंदी कारखानदारांनीं पंधरा वर्षांत पुरी व्हावयाची एक औद्योगिक प्रगतीची प्रचंड योजना ह्या देशाकरतां तयार करून प्रसिद्ध केली आहे. युद्धोत्तर काळांत केल्या जावयाच्या आर्थिक पुनर्घटनेची एक सर्वांगीण योजना हिंदुस्थान सरकारनें बनवावी अशी मागणी लोकांकडून केली जात आहे आणि त्या सरकारनें ह्या विषयाच्या चर्चसाठी निरनिराळ्या समित्या नेमल्या आहेत. त्यांचें काम विमेपणानें चाललें आहे आणि त्यांचा दीर्घसूत्रीपणा एक टीकेचा विषय होऊन बसला आहे. हिंदुस्थानच्या आर्थिक योजनेची रुपरेखा तयार करणें हें पुष्कळ जिकीरीचें काम आहे ह्यांत शंका नाहीं आणि राष्ट्रीय योजना समिती ह्या नांवानें प्रसिद्ध असलेल्या तज्ज्ञसमूहानें त्याचे दिशेनें कांहीं कार्य केलेंहि आहे पण त्याची प्रगति बंद झाल्यासारखें झालें आहे. तुम्ही सरकारला आर्थिक योजना तयार करावयास सांगतां तें काम तुम्हींच का करीत नाहीं असा प्रश्न हिंदी औद्योगिक नेत्यांस विचारला जातो त्यास उत्तर म्हणून वर निर्दिष्ट केलेली योजना पुढें मांडण्यांत आली आहे. तिच्या प्रीत्यर्थ पंधरा वर्षांत दहा हजार कोटि रुपये खर्च व्हावे, अशी कर्त्यांची सूचना आहे.

दहा हजार कोटि रुपये खर्च

हिंदी जनतेचें दारिद्र्य नाहींसें होऊन तिची रहाणी आधुनिक अपेक्षांस धरून वरच्या दर्जाची व्हावी हा प्रस्तुत योजनेचा हेतु आहे. आजवर चारपांचशें कोटि ही हिंदुस्थानांत फार मोठी रकम समजण्यांत येत असे. परंतु किंमतीमध्यें भलती वाढ, प्रचंड युद्धकालीन खर्च, चलनाचा बेसुमार विस्तार, इत्यादि कारणांमुळें शंभर दहा सारखें झाले आहेत. पैशाचें मोल सध्या उतरलें असलें तरी पंधरा वर्षांत दहा हजार कोटि रुपयांचा खर्च ही गोष्ट "उचलली जीभ लावली टाळयाला" ह्या विलक्षण स्वरूपाची आहे असें अनेकांस वाटल्यावांचून रहाणार नाहीं. तथापि हिंदुस्थानचें दारिद्र्य व आर्थिक दुःस्थिति ह्यांचा रोग इतका दृढमूल आहे कीं त्यांच्या उचाटनास उपायहि जालीम पाहिजे ह्या विचारसरणीचा अवलंब पुढें आलेल्या औद्योगिक योजनेच्या पुरस्कर्त्यांनीं केला असला पाहिजे. एकूण दहा हजार कोटि रुपयांपैकीं ४४८० कोटि उद्योगधंद्यांवर, १२४० कोटि शेतीवर, ९४० कोटि रस्त्यांवर, ४९० कोटि शिक्षणावर, ४५० कोटि आरोग्यावर, २२०० कोटि घरांच्या पुरवठ्यावर व २०० कोटि किरकोळ बाबींवर खर्चले जावयाचे आहेत. खर्चाची ही व्यवस्था ठीक आहे, पण असल्या अवाढव्य रकमा उभ्या कशा करणार? ह्या प्रश्नास योजनेच्या कर्त्यांचें उत्तर पण आहे. लोकांची शिलकी बचत, बाहेरील कर्जे, हिंदुस्थानची लंडनमधली जमलेली शिल्लक व चलनांत वाढ असल्या मार्गांनीं आवश्यक असलेला पैसा गोळा व्हावयाचा आहे. ह्या योजनेवर टीका करण्यास आणि तींत दुरुस्त्या सुचवण्यास अर्थातच पुष्कळ जागा आहे आणि अशी विधायक टीका व्हावी अशी आराखड्याच्या निर्मात्यांचीं इच्छाहि आहे.

शेअर-बाजार

(ले. श्री. व. वि. लोणकर, एम्. ए., बी. कॉम्. २४ डे. जि. पुणें४)

मंडिळ नागपूर गिरणी कोळशाच्या अभावी बंद ठेवण्यांत आली आहे यामुळें साहजिकच कोळशांच्या खाणींची तरी काय परिस्थिति या युद्धांत आहे याकडे लक्ष वेधलें जातें. नुकतेंच खाणीमध्यें स्त्रियांना उतरूं यावें यावर पार्लमेंटांत प्रश्नोत्तरें होऊन अमेरी साहेबांना आपली बायको घेऊन आपण खाणींत खाली जाल काय? इत्यादि प्रश्न ऐकावे लागले.

मागील वर्षी कोळशाचा तुटवडा भासत होता त्याचें कारण वाघिणींचा पुरवठा, इतर माल, सैन्य, वगैरे वाहतुकीच्या दडपणामुळें कमी पडून खाणीच्या माथ्यावर माल पडून राहात होता. वाचकांना स्मरत असेल कीं सिमेंटचा शेअर एकदा याच बातमीवर २२९ वरुन २०९पर्यंत येऊन गेला होता. त्यानंतर परीस्थिति अशी झाली होती कीं कधीं वाघिणींचा तुटवडा तर कधीं कोळशाच्या उत्पादनांतच घट त्यामुळें वाघिणी मोकळ्या पडून धंद्यांना अपुरा कोळसा, त्यांतच दामोदर नदीचें धरण फुटून वाहतुकीस अडथळा आणखी आला. कोळशाच्या उत्पादनांतच घट सुरु झाल्यास हिंदुस्थानच्या सर्व उद्योगधंद्यांस, वाहतुकीस, विज उत्पादनास व इतर जिव्हाळ्याच्या हालचालींस धोका उत्पन्न होतो व युद्ध प्रयत्नास कोठल्याही राजकीय आंदोलनामुळें उत्पन्न होणार नाहीं इतका अडथळा निर्माण होतो. यां घटींचें एकच कारण म्हणजे मजुरांचें निर्गमन.

जर जमिनीच्या पृष्ठावरच राहून काम करतां आलें व पोटाला मिळालें तर पृथ्वीच्या पोटांत, उष्णतेंत, अंधारांत, धोक्याच्या जागेंत जाऊन काम करण्याची जरूरी काय? जेव्हां युद्ध नव्हतें तेव्हां सगळीकडेच नोकरीचा नन्ना म्हणून खाणीला भरपूर मजूर मिळणें शक्य असतें. पण युद्धामुळें सैन्यांत, वरच्या कारखान्यांत मजुरांना भरपूर मागणी आल्यानें व सर्वांत महत्वाची गोष्ट अन्नाचा तुटवडा सुरू झाल्यानें खाणींच्या मजुरांचें निर्गमन सुरू झाल्यास नवल नाहीं.

तेव्हां आतां सरकारचा व खाणी मालकांचा मजुरांची संख्या कायम राखण्याकरतां आटापिटा चालू आहे. मुख्यतः व्यवस्थित अन्न पुरवणें, शक्ती व प्रकृति चांगली राखण्याकरतां औषधपाणी देणें इत्यादि उपाय चालू आहेत आणि नुकतीच तुटवडा भरून काढण्याकरतां १९२४ सालापासून करण्यांत आलेली स्त्रियांना खाणीं उतरण्याची बंदी दूर करण्यांत आली आहे व त्यामुळेंच सर्व देशभर दुसरी एक असमाधानाची लाट उत्पन्न झाली आहे. स्त्रियांना खाणींत काम करू द्यावें कीं नाहीं हा जो वाद चालला आहे त्यांत स्त्रियांच्या शारीरिक मर्यादा, नवरा-बायको संबंधाचा एकाद्या न्यायालयांत चालतो त्याप्रमाणें चाललेला चिवडा, इत्यादि गोष्टी वाचणें हें भांडवली साम्राज्याचें स्वरूप समजण्याचे दृष्टीनें उद्बोधक व मनोरंजकही आहे. असो.

खाणींचे सर्व शेअर अत्यंत तेजींत आहेत. इकडील मंडळींनीं लक्ष घालण्यासारखे शेअर्स सांगावयाचे तर बंगाल कोल, अमलगमेटड, (४६½) व्या. १ रु. स. मा. इक्विटेबल, (५५ व्या.८अ. स. मा.) इत्यादि होत. अजून व्याज नाहीं असा ताळचेर करून ठेवण्यास हरकत नाहीं. बंगाल कोल ही शंभर वर्षे चाललेली कंपनी आहे हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. याचा शंभराच्या शेअर्सचा भाव ६०५ पर्यंत असून बावीस रुपये करमाफ व्याज मिळतें.

बॉंबे को-ऑपरेटिव्ह क्वार्टर्ली

शेती सुधारणा : रशियन व सहकारी पद्धत

मुंबई प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूटच्या विद्यमानें प्रसिद्ध होणाऱ्या वरील त्रैमासिकाच्या ताज्या अंकांत प्रारंभीं रशियांतील शेतीचें उत्पादन व शेतकऱ्यांचें जीवन ह्यासंबंधांतील संघटना व संघटनेची सहकारी पद्धत ह्यांची तुलना करणारा प्रो. काळे ह्यांचा एक विस्तृत लेख छापण्यांत आला आहे. हिंदुस्थानास शेतीचें उत्पादन व अन्नपुरवठा ह्यांची वाढ करावयाची आहे तर मग उत्पादनाच्या सध्याच्या जुन्या पुराण्या शेतीच्या पद्धतीचे ऐवजी रशियन पद्धत सुरू करण्यास हरकत कोणती ? ह्या प्रश्नाची साधक बाधक चर्चा त्या लेखांत करण्यांत आली आहे. रशियांतील सामुदायिक शेतीची पार्श्वभूमि, तिचा इतिहास, तिचे परिणाम इत्यादींची इतर देशांतील सहकारी पद्धतीशीं तुलना करतां, सहकारी चळवळीची उपयुक्तता व तिचें सर्वांगीण महत्त्व अधिक आहे, असें प्रो. काळे यांनीं सांगितलें आहे. हिंदुस्थानांत सहकारी चळवळीचे सुपरिणाम उत्कटतेनें दिसून येत नाहींत हें खरें; परंतु त्याचें कारण ध्येयनिष्ठ, उत्साहपूर्ण, सतत व एकजुटीच्या प्रयत्नांचा अभाव हेंच आहे असें दिसून येईल व ह्याच संबंधांत मात्र रशियन प्रयत्न आदर्श आहेत असें लेखकानें दर्शविलें आहे. सहकारी क्षेत्राचा व्याप वाढून त्यांत शेतीच्या धंद्याच्या व शेतकऱ्यांच्या जीवनाच्या सर्व अंगांचा समावेश झाला पाहिज. संयुक्त राष्ट्रांच्या अन्न व शेती ह्यासंबंधांतील परिषदेनें लोकांच्या आर्थिक सुधारणेसाठी प्रत्येक राष्ट्रानें कसून प्रयत्न प्रयत्न केले पाहिजेत असें सांगितलें आहे, त्याकडे लक्ष वेधून प्रो. काळे ह्यांनीं मध्यवर्ती व प्रांतिक सरकारांची त्याविषयक जबाबदारी सूचित केली आहे. प्रो. काजी ह्यांचें मुंबई येथील सहकारी दिनाचे प्रसंगीं झालेलें भाषण व श्री. वैकुंठराय मेहता ह्यांचा " दि सोशल वेल्फेअर "मधील " खेडेगांवांतील पाऱ्याच्या बँका " हा लेख हीं उद्धृत करण्यांत आलीं आहेत. सहकारी चळवळीस जोमाची चालना देण्याची योजना श्री. एम. एस. कुळकर्णी ह्यांनीं आपल्या लेखांत दिली आहे. ग्रंथावरील अभिप्राय, ताजीं प्रकाशनें, संपादकीय स्फुटें, सहकारी बातम्या, इन्स्टिट्यूटचें कार्य इत्यादि नेहमीचीं सदरें अंकांत आहेतच.

चलन व पैसा ह्यासंबंधांतील युद्धोत्तर धोरण

युद्धोत्तर पुनर्घटनेच्या दृष्टीनें सर्वसाधारण योजना ठरविणाऱ्या, हिंदुस्थान सरकारच्या जनरल पॉलिसी कमिटीची बैठक दिल्ली येथें नुकतीच भरली होती. त्या बैठकींत चलनविषयक प्रश्नावर चर्चा झाली. संयुक्त राष्ट्रांपैकीं कोणत्याहि इतर राष्ट्राप्रमाणेंच हिंदुस्थानहि पैसा व चलन ह्या संबंधांत स्वतःचें धोरण आखण्यास स्वतंत्र आहे व हिंदी लोकमतानुसार मध्यवर्ती सरकार निर्णय करून धोरण ठरवील, त्यांत भारतमंत्री ढवळाढवळ करणार नाहींत, असें आश्वासन हिंदुस्थान सरकारचे फडनवीस, सर अरेमी रेसमन ह्यांनीं सदर बैठकींत दिलें. हिंदुस्थानाचें इंग्लंडमधील येणें लवकर व व्यवस्थितपणें कसें वसूल करण्यांत येईल व रुपया-पौंडाची हुंडणावळ कशी ठरविली जाईल, ह्यावरूनच फडनवीसांच्या आश्वासनाची खरी किंमत कळून येईल, असें त्यावर कित्येक सभासदांनीं भाष्य केलें. युद्धोत्तर योजनांचे बाबतींत हिंदुस्थान सरकारची हालचाल फारच सावकाश होत असल्याविषयींहि तक्रार कमिटींत करण्यांत आली.

सातारा स्वदेशी कमर्शिअल बं. लि.

वरील बँकेस ३० जून १९४३ अखेर संपलेल्या वर्षीं ३,५८२ रुपये नफा झाला. साधारण भागीदारांस ८% डिव्हिडंड मिळालें. कंपनीकडे जमा असलेल्या ठेवींच्या मानानें भांडवल व रिझर्व्ह हीं कमी आहेत म्हणून रिझर्व्ह फंडांत भर घालण्याचें व भांडवलांत वाढ करण्याचें बोर्डाचें धोरण आहे. कंपनीचे १४ लक्ष रुपये इन्व्हेस्टमेंट खातीं असून लोकांकडील येणें १० लक्ष, ६३ हजार रुपये आहे.

बेळगांव जिल्हा सें. को. बँकेची ज्युबिली

बेळगांव जिल्हा सें. को. बँकेचा रौप्यमहोत्सव ता. ७ फेब्रुवारी रोजीं साजरा होणार आहे. पूर्वी बेळगांव जिल्ह्यांतील सहकारी सोसायट्यांस मुंबई प्रांतिक सहकारी बँक कर्जे देत असे. १७, डिसेंबर १९१८ रोजीं जिल्हा सें. को. बँक नोंदण्यांत आली व तिनें १३½ हजार रुपयांचें सेळतें भांडवल व २६ व्यक्ती आणि ९ सोसायट्या मिळून ३५ सभासद ह्या स्वरूपांत कामास प्रारंभ केला. ३०-११-४३ च्या आकड्यांप्रमाणें बँकेचें वसूल भांडवल २,७०,९०० रुपये, रिझर्व्ह आणि इतर फंड २,४०,९७९ रुपये, ठेवी ३०,२८,३८७ रुपये, सोसायट्यांकडील येणें ७,६१,५५४ रु., व्यक्तींकडून येणें १२,९५,२४४ रु., असा तिच्या व्यवहाराच्या प्रगतीचा तपशील आहे. १९४२-४३ मध्यें बँकेस ३७,६८१ रुपये नफा झाला व भागीदारांस ६% डिव्हिडंड मिळालें. बँकेच्या २५ वर्षांच्या प्रगतीबद्दल तिचें अभिनंदन करून आम्ही तिची आणखी भरभराट होवो, असें चिंतितों. श्री. व्ही. बी. अगरगोळ, बी. ए., एल.एल.बी. हे बँकेचे अध्यक्ष आहेत.

बॉम्बे को-ऑपरेटीव

इन्शुअरन्स सोसायटी लि.

सहकारी संस्थांच्या सभासदांस विशेष सवलत

एकंदर कामकाज ... १। कोटीहून अधिक
एकूण मालमत्ता ... १८ लाखांहून अधिक
आगविमा फंड ... १६ लाखांहून अधिक

एजन्सीच्या अटी अगर पॉलिसीच्या विशेष माहितीकरितां चौकशी करा:—

मुख्य ऑफिस:—

को-ऑपरेटीव इन्शुअरन्स बिल्डिंग,

सर फिरोजशहा मेथा रोड, फोर्ट, मुंबई.

हिंदुस्थानच्या आघाडीवरील सहकारी विमा संस्था

जेऊर येथें करमाळा तालुका अग्रि. को. परचेस अँड सेल युनिअन लि. ची स्थापना

सोलापूर जिल्ह्यांतील करमाळा तालुक्यांत सहकारी सोसायट्यांची वाढ जशी व्हावयास पाहिजे तशी झाली नाहीं असें तेथील स्थानिक पुढाऱ्यांना व सहकारी खात्यांतील अधिकाऱ्यांना वाटूं लागलें होतें. तशा परिस्थितींत या तालुक्यांतील मध्यवर्ती असणारें रेल्वे स्टेशनचें गांव जेऊर येथें सहकारी खरेदीविक्री संघ स्थापन केल्यास या तालुक्यांतील शेतकरी वर्गाची सोय होणार असून नवीन सोसायट्या स्थापन होण्याचे कामीं या संघाची बरीच मदत होईल या उद्देशाने या तालुक्यांतील स्थानिक पुढारी, श्री. गणपतराव पाटील, यांनीं याबाबत गेल्या महिन्यांत मे. असि. रजिस्ट्रारसाहेब यांचेशीं बरीच वाटाघाट केली. पोट नियमांचा मसुदा केल्यानंतर शेअर भांडवल जमवावयास सुरवात होऊन आतांपर्यंत रु. सात हजारचें शेअर भांडवल जमविण्यांत आलें व लौकरच ही रक्कम रुपये दहा हजारचे वर जाईल अशी अपेक्षा आहे.

ह्या संघाचा उद्घाटन समारंभ व पहिली साधारण सभा तारीख ६-१-४४ रोजीं जेऊर येथें मोठ्या थाटानें व उत्साहानें पार पडली. श्री. गणपतराव पाटील यांनीं प्रास्ताविक भाषण केलें. सहकारी चळवळीचा थोडक्यांत इतिहास सांगून सहकारी सोसायट्यांबद्दल शेतकरी समाजामध्यें जे गैरसमज निर्माण झाले आहेत त्यांचें त्यांनीं निराकरण केलें. तसेंच, या खरेदीविक्री संघानें शेतकऱ्यांचा कोणत्या प्रकारें फायदा व्हावयाचा आहे याबद्दल त्यांनीं कळकळीचें भाषण केल्यानंतर संघाचें उद्घाटन करण्यास मे. असिस्टंट रजिस्ट्रारसाहेब यांना विनंती केली.

मे. के. आर. कुलकर्णीसाहेब, असिस्टंट रजिस्ट्रार को. सो. सोलापूर, यांनीं टाळ्यांचे गजरांत संघाचें उद्घाटन जाहीर करून अशा खरेदीविक्री संघांची उपयुक्तता पटवून दिली. अशा प्रकारचे संघ कर्नाटक, खानदेश वगैरे जिल्ह्यांत कशा प्रकारें लोकोपयोगी कामें करीत आहेत याचें वर्णन करून अशा प्रकारचा संघ काढल्याबद्दल स्थानिक पुढाऱ्यांचें त्यांनीं अभिनंदन केलें. या संघास पांच मैलांचे आंतील शेतकऱ्यांना पीक निर्माण करण्यासाठी बीं बियाणें, बारदान कर्ज देतां येतील हें या संघाचें वैशिष्ट्य आहे हें त्यांनीं नमूद केलें.

उद्घाटन समारंभानंतर त्याच ठिकाणीं तालुक्याचे मामलेदार, मे. महंमद उस्मानसाहेब, यांचे अध्यक्षतेखालीं या संघाची पहिली साधारण सभा भरली. सभेंत पोट नियम मंजूर करण्यांत येऊन पंचकमिटीची निवड करण्यांत आली व तेथील स्थानिक पुढारी, मि. हुंडेकरी, यांची सो. चे चेअरमन म्हणून एकमतानें निवड झाली. यानंतर मार्केटिंग इन्स्पेक्टर, डि. को. ऑफिसर व सेंट्रल बँकेचे मॅनेजर यांनीं समयोचित भाषणें केल्यानंतर अध्यक्षांनीं शेतकऱ्यांना अशा उपयुक्त संस्थेचे शेअर्स शक्य तितक्या लवकर खरेदी करण्यास विनंती केली. तसेंच, ही संस्था जसजशी उपयुक्त कामगिरी करण्यास सुरवात करील तसतशी लोकप्रियता मिळवूं शकेल व अशा संस्थेस सरकार योग्य ती मदत करण्यास तयार होईल असें आश्वासन दिलें. अध्यक्षांचे भाषणानंतर, हारतुरे अर्पण करण्यांत आले व सभा बरखास्त झाली.

या समारंभाचे वेळीं श्री. पवार यांनीं सर्व लोकांस सहज समजतील अशीं उपदेशपर पदें उत्तम रीतीनें गाऊन दाखवलीं व लोकांचें मनोरंजन केलें. श्री. पवार ह्यांस, सहकारी चळवळीसंबंधानें अगर ग्रामसुधारणेसंबंधानें कविता केल्यास त्यांचा चांगला उपयोग होईल.

दत्त कंपनी

७३५ शुक्रवार पेठ, पुणें १. दाजेआळी पोलिसगेटाजवळ
सर्व तऱ्हेचे काटे, वजनें व मापें, वेळेश्वर
रिपेअर करून मिळतील.

दि इंडियन रियल इस्टेट कार्पोरेशन लिमिटेड

बालमुकुंद रोड, रविवार पेठ, पुणें

सर्व तऱ्हेच्या बांधकामाचीं कॉन्ट्रॅक्टस्, व लँड डेव्हलपमेंटच्या योजनांचे व्यवहार होतात.

—ठेवी घेणें आहेत—

मुदत		दर	
६	महिने	४	टक्के
१२	„	४॥	„
२४	„	५	„

माहिती व अर्जाकरितां मॅनेजर यांस लिहा.

तुमची ताई !

छकुल्यांनो— चिमुकल्यांनो—
छोट्या प्रेक्षकांनो—

लुकलुकती चिमणे डोळे ! जिभली ही चुटुचुट बोले
वासंतीचें गोड गाणें तुम्हांस फार आवडेल !

—१३ वा आठवडा—

प्रकाश पिक्चर्सचा पौराणिक मराठी बोलपट

रामराज्य

दिग्दर्शक—विजय भट्ट
भूमिका—शोभना समर्थ, चंद्रकांत, काळे, सोहोनी.

मिनर्व्हा, पुणें

वेळा रोज—६। व १० वा.
दर शनि. रवि. सोम. व इतर सुटीचे दिवशीं जादा खेळ दुपारीं २॥ वाजतां

हें पत्र पुणें, पेठ मांजुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' मांजुर्डा, घ. नं. ९२४।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
बाराशे रुपयांवर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ३
(टपाल खेरीज माफ)
किरकोळ अंकास
दोन आणे.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति। —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष १० पुणें, बुधवार, तारीख २ फेबुवारी, १९४४ अंक ५

फणसपोळी, आंबेपोळी
किरकोळ व ठोक मिळेल.
द. ना. हेर्जीब, : : २० शुक्रवार, पुणें २.

पुण्यांतील
आदर्श निवासस्थान व भोजनालय
छाया लॉजिंग व बोर्डिंग हांउस
बुधवार चौक, पुणें २.

ए. बी. सी. कॉइल्स
(डासांच्या उद्बरया)
बॉक्समध्यें १२. बॉक्स किं. १० आणे.
रात्रभर जळतात.
लायसॉफ
केसांतील उवांवर आश्चर्यकारक शोध.
उवा १ तासांत मरतात
बाटली किं. १ रु. ★ दोन वेळां उपयोग.
दि मागोरा केमिकल कं. लि.
— टिळक रोड, पुणें १. —

पुना गेस्ट हाऊस
१००, लक्ष्मी रोड, पुणें २.
Telephone 779

TELEGRAM Guest House Poona 2.

महायुद्धाची जाणीव ! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.
गिरगांव मुंबई नं. ४
महिंद्रकर ब्रदर्स
तयार कपड्याचे व्यापारी
बुधवार चौक, पुणें

दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड, पुणें

प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग

अधिकृत भांडवल	रु. १०,००,०००
विक्रीस काढलेलें भांडवल	५,००,०००
खपलेलें भांडवल	३,११,१००
वसूल भांडवल	१,०६,६१५
खेळतें भांडवल	१९,९०,०००

डायरेक्टर्स—

चेअरमन	व्हा. चेअरमन
रा. ग. रा. साठे,	रा. रा. दा. ग. बापट,
रा. श्री. म. जोशी	रा. जी. यू. चितळे
रा. एस. के. भांवे	रा. एल्. आर. धडफळे
रा. डब्ल्यू. पी. वैद्य	रा. सी. टी. चितळे

रा. एस. जी. केणी, व्यापारी मुंबई, खातेदारांतर्फे डायरेक्टर.

बँकेचे सर्व व्यवहार केले जातात. मुंबई, अहमदाबाद, बेळगांव, नगर, मद्रास व सोलापूर वर ड्राफ्टस् दिले जातात.

शेअर्स व इतर माहितीसाठी बँकेकडे चौकशी करावी—

जी. डी. जोगळेकर — चिं. त्रिं. चितळे

बी. ए. (ऑ.)., बी. कॉम., एल्एल. बी., मॅनेजर — मॅ. डायरेक्टर

विविध माहिती

विहिरींचा पाणीपुरवठा वाढविण्याची सरकारी योजना

मुंबई प्रांतांतील दुष्काळी भागांतील विहिरींची परिस्थिति सुधारण्यासाठी मुंबई सरकारनें ३½ लक्ष रुपयांची एक योजना आखली आहे. ह्या रकमेपैकीं निम्मा खर्च हिंदुस्थान सरकार देणार आहे. ही योजना पुरी होण्यास दोन वर्षे लागतील. २ हजार विहिरींचा पाणीपुरवठा सुधारून ५०० एकर उसासाठी व ७०० एकर धान्यासाठी पाणी उपलब्ध करणें व त्यापासून ६० हजार मण गूळ व ७० हजार मण धान्य अधिक उत्पादन होण्यास सहाय करणें, हा प्रस्तुत योजनेचा हेतु आहे.

मुंबई शहरांतील टॅक्सीचा दर

मुंबई शहरांतील भाड्याच्या मोटारींचा दरमैली अधिकृत आकार पूर्वी सहा आणे होता, तो जानेवारी, १९४२ मध्यें आठ आणे करण्यांत आला. २० जानेवारी १९४४ पासून तो दहा आणे करण्यांत आला आहे. तथापि टॅक्सी ड्रायव्हर्स युनियनचें तेवढ्यानें समाधान झालेलें नाहीं. हा दर आणखी वाढवून घेण्याचा प्रयत्न ते करणार आहेत.

सिलोनमध्यें इटालियन युद्धकैद्यांचें आगमन

कित्येक इटालियन युद्धकैदी लष्करी कामाच्या कांहीं प्रारंभींच्या गोष्टी करण्यांसाठी सिलोनमध्यें दाखल झाले आहेत. संयुक्त राष्ट्रांस विजय प्राप्त होईपर्यंत ते मदत करणार आहेत. जरा ते स्थिरस्थावर झाल्यावर त्यांना थोडीशी मोकळीक देण्यांत येईल.

हिंदी काममारांची संख्या वाढली

फॅक्टरी ॲक्ट लागू असलेल्या कारखान्यांत काम करणाऱ्या काममारांची संख्या १९४१ सालीं २१ लक्ष, ५६ हजार होती ती १९४२ सालीं २२ लक्ष, ६१ हजार झाली.

ब्रिटिश मोटारींच्या धंद्याचें युद्धोत्तर स्थान

युद्धापूर्वी ग्रेट ब्रिटनमध्यें दरसाल ५ लक्ष मोटार गाड्या तयार होत असत. अमेरिकेचें वार्षिक उत्पादन ५० लक्ष मोटार गाड्या एवढें होतें. युद्धानंतर अमेरिकन चढाओढीस तोंड देऊन व इतर देशांतील उत्पादनाचा अडथळा टाळून ब्रिटिश मोटारींची निर्गत कशी चालू राहील व वाढेल ह्यासंबंधीं खलबतें चालू आहेत. चीन व पूर्व आशिया ह्यांत हमरस्त्यांची प्रचंड आखणी करण्यांत येत आहे व तेथें मोटारगाड्या पूर्वीपेक्षा ज्यास्त खपतील, अशी अपेक्षा आहे.

न्यूझीलंडचें औद्योगीकरण

युद्धामुळें न्यूझीलंडमध्यें उद्योगधंद्यांची वाढ झाली आहे, ती युद्धसमाप्तीनंतरहि चालू कशी राखतां येईल, ह्यासंबंधीं तेथील कारखानदारांच्या संघानें नुकतीच चर्चा केली. अधिक लोकांना किफायतशीर काम मिळावें, ह्यासाठी न्यूझीलंडमध्यें उद्योगधंदे वाढले पाहिजेत, असें संघाचे अध्यक्ष म्हणाले.

युनायटेड किंग्डम कमर्शिअल कॉर्पोरेशन

१९३९ मध्यें तुर्कस्तानच्या एकूण आयातीच्या ५% आयात ब्रिटिश मालाची होती; आतां तें प्रमाण ३०% झालें आहे. यु. कि. क. कॉर्पोरेशन तुर्कस्तानांत दरसाल ३० ते ४० लक्ष पौंडांची खरेदी करीत आहे. ५ कोटि पौंडांचा माल कॉर्पोरेशननें रशियाकडे पाठविला. उत्तर व पश्चिम आफ्रिकेशीं व्यापार वाढविण्याची योजना कॉर्पोरेशननें आखली आहे. ह्या उद्योगांत कांहीं नुकसान आलें तरी तें सोसण्याची कॉर्पोरेशनची तयारी असते.

रेल्वे इंजनांची आयात

युद्धास प्रारंभ झाल्यानंतर १९३९ सालापासून हिंदुस्थानांत रेल्वे इंजनांची आयात बंद होती, ती १९४३ पासून थोड्या प्रमाणावर पुनः सुरू झाली. परंतु, ह्या आयातीचा प्रवाह अद्याप मर्यादितच आहे.

हिंदी रेल्वेजवरील युद्धकालीन ताण

हिंदी रेल्वेजवरील लष्करी वहातूक कमालीची वाढली आहे. १९३८-३९ मध्यें ह्या वहातुकीचा आकडा ५ लक्ष टन होता, तो १९४२-४३ मध्यें १ कोटि, २९ लक्ष टन झाला. युद्धापूर्वी दरसाल ३०० ते ३५० खास लष्करी गाड्या सुटत असत; आतां दर महिन्याला ह्यापेक्षा ज्यास्त स्पेशल्स सुटतात. ह्या गाड्यांचा प्रवासहि ८०० ते १००० मैल इतका दीर्घ असतो. बिनलष्करी वहातुकींत धान्याच्या वहातुकीस प्राधान्य आहे. १९४२ ४३ सालीं २५ लक्ष टन धान्याची हिंदी रेल्वेजनीं वहातूक केली.

रशिया-पोलंड वांध्यांत अमेरिकन मध्यस्तीस नकार

रशिया व पोलंड ह्यांचेमधील वांध्यांत मध्यस्ती करण्याची अमेरिकेनें तयारी दर्शविली होती, परंतु रशियानें अमेरिकेच्या चांगुलपणाबद्दल आभार मानून अद्याप अशा मध्यस्तीची आवश्यकता निर्माण झालेली नाहीं असें कळविलें.

आगीमुळें १८ लक्ष रुपयांचें नुकसान

मुंबई येथील क्राउन स्पिनिंग अँड मॅन्युफॅक्चरिंग मिल्सच्या कपाशीच्या गोडाउनला नुकतीच आग लागली, तीमुळें १८ लक्ष रुपयांची नुकसानी झाली.

अनुक्रमणिका

	पृष्ठ		पृष्ठ
१ विविध माहिती	... ३४	युरोपांतील आघाड्यांवर जर्मनीची पीछेहाट–बाहेरील औद्योगिक तज्ज्ञांच्या नेमणुका– ब्रिटिश साम्राज्य परिषद– इंडियन रिअल एस्टेट कॉर्पोरेशन लि.– ज्वारीचें व बाजरीचें पीक	
२ आर्थिक अभिवृद्धीची योजना	... ३५		
३ हिंदुस्थानांतील दुष्काल-निवारणार्थ मदत	... ३६		
४ विचित्र मनोवृत्ति व विचारसरणी	... ३६		
५ स्फुट विचार	३७	६ आर्थिक नियोजन	... ३९

अर्थ

बुधवार, ता. २ फेब्रुवारी, १९४४

आर्थिक अभिवृद्धीची योजना

हिंदुस्थानांतील लोकांचें दारिद्र्य, निरक्षरता, रोगटपणा, अल्पायुषीपणा इत्यादि गोष्टींमुळें ह्या देशास जगांत निकृष्टतेचें स्थान प्राप्त झालें आहे. त्याच बरोबर युद्धोत्तर काळांत करावयाच्या आर्थिक पुनर्घटनेच्या योजनांची सर्वत्र भाषा बोलली जात आहे. अशा योजनेचें कोठें विशेष अगत्य असेल, तर तें हिंदुस्थानांत आहे. ह्या दृष्टीनें हिंदुस्थान सरकारच्या वित्तमानें कांहीं योजनांचा विचार चालू आहे. हिंदी उद्योगधंद्यांशीं प्रत्यक्ष संबंध असणाऱ्या लोकांच्या पुढाऱ्यांस देशाच्या आर्थिक अभिवृद्धीविषयीं कळकळ वाटणें स्वाभाविक असून आणि त्या संबंधांतल्या स्वतःच्या कल्पना योजनेच्या स्वरूपांत जनतेपुढें मांडणें आपलें कर्तव्य आहे असें वाटलें असल्यास त्यांत आश्चर्य नाहीं. सर पुरुषोत्तमदास ठाकुरदास प्रभृति औद्योगिक पुढाऱ्यांनीं प्रसिद्ध केलेल्या योजनेच्या मुळाशीं हाच विचार आहे. कित्येकांनीं तिचें स्वागत केलें आहे, ह्याचें कारण तिच्या योगानें आर्थिक पुनर्घटनेच्या चर्चेस चालना मिळणार आहे, हें आहे. योजना भरमसाट, एककल्ली, अपुरी आहे अशा आशयाचींहि विविध मतें व्यक्त करण्यांत आलीं आहेत. परंतु योजनेच्या कर्त्यांनीं स्वतःच तिच्या मर्यादा काय आहेत हें स्पष्ट केलें आहे. आर्थिक अभिवृद्धी कशी घडवून आणावी, योजनेचें नेतृत्व कोणाकडे असावें व त्यांनीं कोणतीं साधनें वापरावीं, त्याचप्रमाणें वाढणाऱ्या राष्ट्रीय संपत्तीची वांटणी कोणत्या पद्धतीनें व तत्त्वावर व्हावी आणि राष्ट्रीय सरकाराचा योजनेच्या अंमलबजावणीशीं कोणता संबंध असावा वगैरे जिव्हाळ्याच्या बाबींचा विचार आपण अजून करीत आहों असें त्यांनीं म्हटलें आहे. देशाच्या आर्थिक अभिवृद्धीची दिशा व उद्देश ह्यांचें स्थूलमानानें दिग्दर्शन करावें एवढेंच तूर्त अभिप्रेत आहे असें त्यांनीं प्रस्तावनेदाखल सांगून टाकलें आहे.

योजनेच्या कर्त्यांच्या मतानें कांहीं बाबी मूलग्राही स्वरूपाच्या आहेत. युद्धसमाप्तीनंतर लवकरच ह्या देशांत आर्थिक प्रश्नांचा असेरचा निकाल लावण्याचा अधिकार असलेली मध्यवर्ती राष्ट्रीय सत्ता स्थापन होईल आणि प्रांतिक व संस्थानी सरकारांत राज्यकारभार वाटला गेला तरी आर्थिक राष्ट्रीय धोरणांत एकसूत्रीपणा आणण्याचा अधिकार त्या सत्तेच्या हातीं राहील असें योजनेंत गृहीत धरण्यांत आलें आहे. हिंदुस्थानाच्या निरानेराळ्या भागांत निरनिराळीं आर्थिक तत्त्वें व धोरणें अंमलांत आणलीं गेल्यास देशाच्या उन्नतीची आशा करणें अशक्य आहे असा त्याचा अर्थ आहे. भिन्न भिन्न हितसंबंधांच्या प्रतिनिधींची एक समिती नेमण्यांत यावी आणि तिनें आर्थिक पुनर्घटनेची व्यापक व तपशीलवार योजना तयार करावी आणि ती अंमलांत आणण्याचें काम मध्यवर्ती सरकारच्या नेतृत्वाखालीं एका वरिष्ठ आर्थिक समितीकडे सोपवलें जावें अशी सूचना सर पुरुषोत्तमदास प्रभृतींनीं केली आहे. हिंदी जनतेची वार्षिक प्राप्ति सध्याच्या दुप्पट व्हावी हें प्रस्तुत योजनेचें मुख्य उद्दिष्ट आहे आणि तें पंधरा वर्षांच्या अवधींत साध्य केलें जावयाचें आहे. ह्या काळांत देशांतलें शेती, उद्योगधंदे, व्यापार इत्यादींचें उत्पन्न वाढेल, पण त्या बरोबर लोकसंख्येतहि भर पडेल आणि दर माणशीं सरासरीची प्राप्ति त्या मानानें प्रमाणशीर व्हावी लागेल ही गोष्ट येथें हिशेबांत धरण्यांत आली आहे. शेतीचें उत्पन्न दुपटीनें आणि उद्योगधंद्यांचें पाच पटीनें वाढावें अशा अपेक्षेनें अभिवृद्धीच्या योजनेची रचना करण्यांत आली आहे. देशाचे धंदे.अत्यंत मागसलेल्या अवस्थेंत असल्यानें हें विशिष्ट प्रमाण निश्चित केलेलें आहे. योजना पंधरा वर्षांनीं पूर्ण झाल्यावरहि हिंदुस्थान देश कृषिप्रधान राहील हें उघड आहे, पण त्यांत शेती व धंदे ह्यांचें परस्पर प्रमाण सध्याच्या मानानें अधिक समाधानकारक होईल. योजना चालू होईल तेव्हां प्रारंभीं यंत्रें व प्रेरक शक्ती ह्यांच्या उत्पादनास प्राधान्य देण्यांत येईल. यंत्रसामुग्रीसारख्या मूलभूत साधनांच्या अभावामुळें हिंदुस्थानास लढाऊ सामुग्री व युद्ध काळांत आवश्यक असलेला माल इच्छा व मागणी ह्यांस अनुसरून बनवतां आला नाहीं ह्या अनुभवावरून हा कार्यक्रम आखण्यांत आला आहे. तथापि, यंत्रसामुग्री, बीज वगैरेंचें उत्पादन जोरानें हातीं घेतलें जाईल तेव्हां जनतेस नित्याच्या उपयोगास लागणाऱ्या वस्तूंचा तुटवडा पडूं नये म्हणून मध्यम व लहान प्रमाणावरील धंद्यांनीं ह्या प्रकारचा माल बनाविला पाहिजे असें योजकांनीं सुचवलें आहे. त्यांची योजना अंमलांत आणावयाची म्हटल्यास तिच्या मार्गांत येणाऱ्या अडचणींची त्यांस जाणीव असून त्यांनीं त्यांचा निर्देश केला आहे. प्रारंभीच्या वर्षांत जनतेस गैरसोयी सोसाव्या लागतील; राजकीय स्वरूपाच्या मतभेदांमुळें योजनेच्या अंमलबजावणीचें यंत्र उभारलें जाणें कठिण होईल; आंतरराष्ट्रीय परिस्थिति प्रतिकूल होईल. ह्या प्रकारचे अडथळे आल्यास योजनेची अंमलबजावणी लांबण्याचा संभव आहे. तिच्या पूर्ततयारीसहि चार पांच वर्षे लागतील. तथापि, आपल्या कल्पना स्थूलमानानें हिंदी जनतेस पसंत पडल्यास विधायक कृति अडचणींमुळें स्थगित होणार नाहीं असा विश्वास योजनाकर्त्यांस वाटत आहे. बहात्तर हजार कोटि रुपये योजनेप्रीत्यर्थ लागतील ह्या एका हिशेबानेंच कित्येक लोक बुजून जातील. पण हिंदी राष्ट्रानें मनाचा पक्का निर्धार केल्यास हा पैसा उभारणें अशक्य नाहीं असें त्यांस खात्रीलायक वाटत आहे.

रेल्वे इंजनांस दररोज १६ हजार टन कोळसा

एल. एम. एस. ह्या ब्रिटिश रेल्वेच्या २७,००० इंजनांत दररोज १६,००० टन कोळसा जळतो.

हिंदुस्थानांतील दुष्काळ निवारणास संयुक्त राष्ट्रांची मदत

युद्धामुळें उध्वस्त व व्यथित झालेल्या देशांतील लोकांस अन्नपुरवठा करून पुन्हा सुस्थितीवर आणून ठेवण्याचे उद्देशानें मित्रराष्ट्रें व त्यांचे सहकारी ह्यांच्या प्रतिनिधींनीं अमेरिकेंत गेल्या वर्षी एकत्र येऊन चर्चा केली आणि ह्या परिषदेंत निश्चित झालेल्या धोरणास मूर्तस्वरूप देण्यासाठी एक कार्यकारी मंडळ नेमलें. बंगालमध्यें आलेल्या दुष्काळाच्या आपत्तीचें निवारण ह्या कार्याच्या कक्षेमध्यें येतें किंवा नाहीं ह्याविषयीं शंका होती आणि प्रत्यक्ष शत्रुकृत आपत्तीचाच त्यांत समावेश होतो अशी एक कल्पना होती. ही शंकास्पद स्थिति दूर होण्याच्या मार्गांत आतां आहे, असें अमेरिकेच्या कॉंग्रेसमध्यें आपत्ती निवारणासाठी यावयाच्या रकमेच्या मंजूरीचा कायदा विचारासाठी पुढें आला असतां त्यांत झालेल्या दुरुस्तीवरून स्पष्ट होतें. उध्वस्त व व्यथित झालेल्या देशांसाठी अमेरिकेनें १३५ कोटि डॉलर्सपर्यंत खर्च करण्यास हाउस ऑफ रेप्रेझेंटेटिव्हसनें मान्यता दिली आहे आणि तसें करतांना अशी व्यवस्था ग्रथित केली आहे कीं मित्रराष्ट्रांच्या युद्धकार्यास महत्त्वाचा असलेला एखादा देश दुष्काळ किंवा रोग ह्यांनीं पीडित झाल्यास त्यास सहाय देण्यासाठी मित्रराष्ट्रांनीं उभ्या केलेल्या दुःखनिवारण फंडाचा उपयोग केला जावा. ह्या कायद्यांत व विशेषतः त्याच्या दुरुस्तींत हिंदुस्थानचा प्रत्यक्ष नामनिर्देश नाहीं. तथापि, हा देश मित्रराष्ट्रांच्या एशियांतील आघाडीचें लढाऊ मूलस्थान झाला असल्यानें बंगाल आणि आसाममधील व्यथित लोकांस मदत देणें हें दुःखनिवारण व्यवस्थेच्या कक्षेंत येईल असें मत व्यक्त करण्यांत आलें आहे. अमेरिकन कॉंग्रेसची सूचना मित्राष्ट्रांच्या परिषदेंत नेमल्या गेलेल्या कार्यकारी समितीपुढें येईल तेव्हां तिला मान्यता मिळून हिंदुस्थानच्या बाबतींत तिची अंमलबजावणी केली जाईल असें वाटतें. हिंदुस्थानच्या दृष्टीनें ही अत्यंत महत्वाची गोष्ट होईल.

THE BANK OF MAHARASHTRA, Ltd.

Notice of Special Resolution.

Notice is hereby given that the following Resolution amending the Articles of Association of the Bank will be moved as a Special Resolution at the Ordinary General Meeting of the Shareholders to be held on 27-2-1944 at 4 P. M. at the Registered Office of the Bank, Kakakuwa Mansion, Laxmi Road, Poona City.

Resolution :—

(A) "That in Article 109 the words 'for a fixed term which shall not exceed five years at a time' shall be substituted in place of 'either for a fixed term or without any limitation as to the period for which he or they is or are to hold such office.'"

(B) "That in Article 80 the figure '100' be substituted in place of '25'."

Poona City,
28th January, 1944

By Order of the Board,
C. V. JOAG,
Manager.

विचित्र मनोवृत्ति व विचारसरणी !

मिस कॉर्नेलिया सोराबजी ह्या बाईचें लंडनच्या टाइम्समध्यें एक पत्र प्रसिद्ध झालें आहे, त्यांत त्यांनीं बंगाली लोकांच्या उपासमारीसंबंधीं खालीलप्रमाणें कांहीं मासलेवाइक विधानें केलीं आहेत. "बंगालचें मुख्य पीक तांदूळ हें आहे. तेथील लोक उपाशी मरतील पण बाहेरून आणलेला गहूं खाणार नाहींत, इतकेंच नव्हे तर बंगालमध्यें न पिकलेला तांदूळ हि खाण्यास उपाशी बंगाली लोक तयार नसतात ! बाहेरून येणारा तांदूळ चांगला असला तरी तो खाण्याची त्यांची तयारी नाहीं ! अन्नछत्रांत देण्यांत येणारें अन्न खाण्यास उपाशी लोकांना प्रवृत्त करण्यांत सहानुभूति व युक्ति ह्यांस यश येईल, अशी आशा करण्यापलीकडे जास्त काय शक्य आहे ! त्यामुळें "अन्नछत्रांत जेवलेल्यां" ची नवी स्थानिक जात निर्माण होईल !"

मिस सोराबजी ह्यांचीं हीं विधानें कितपत वस्तुस्थितिनिदर्शक आहेत, हें ब्रिटिश जनतेपेक्षा हिंदी जनतेस अधिक चांगल्या-प्रकारें लक्षांत येईल, हें उघड आहे.

THE BANK OF MAHARASHTRA, Ltd.

NOTICE.

Notice is hereby given that the Ninth Ordinary General Meeting of the Shareholders of the Bank of Maharashtra, Ltd., will be held at the Registered Office of the Bank, Kakakuwa Mansion, Laxmi Road, Poona City, on Sunday the 27th day of February 1944, at 4 P. M. to transact the following business :—

(1) To receive and consider the Balance Sheet, the Profit and Loss Account, and the reports of the Directors and of the Auditors for the year ended 31st December 1943.

*(2) To declare a Dividend.

(3) To elect four Directors in places of the retiring Directors and to elect a Director in the place of one who ceases to be a Director, these being eligible for re-election and election respectively.

(4) To appoint Auditors and to fix their remuneration.

(5) To pass a Special Resolution amending Articles 109 and 80 as per accompanying special notice.

(6) To transact such other business as may be allowed by the Chairman.

Poona City,
28th January, 1944.

By Order of the Board,
C. V. JOAG,
Manager.

N. B.—The transfer books of the Bank will be closed from the 25th day of February, 1944 to the 3rd of March 1944 both days inclusive.

*The Dividend when sanctioned will be payable on and after Friday the 17th of March, 1944 and the Dividend Warrants will be posted to the registered addresses of the shareholders. Change of address, if any, should immediately be communicated to the Bank.

स्फुट विचार

युरोपांतील आघाड्यांवर जर्मनीची पीछेहाट

युरोपांतील पूर्व आघाडीवर रशियन सेनेची सारखी प्रगति चालली आहे आणि जर्मनीस एक दिवसहि स्वास्थ्य मिळालें नाहीं एवढेंच नाहीं तर प्रत्येक ठिकाणीं जबर नुकसान सोसून मागें हाटणें भाग पडत आहे. उत्तरेकडे लेनिनग्राडच्या विभागांत रशियानें चढाईस प्रारंभ करून शत्रूच्या माऱ्याच्या जागा हस्तगत केल्या आहेत. त्याचबरोबर आघाडीच्या दक्षिण टोकापाशी कर्चच्या द्वीपकल्पांत रशियन फौजा शत्रूवर चाल करून जात आहेत. ह्या रीतीनें हिवाळ्यांत स्वस्थ रहाण्याऐवजीं रशियानें जर्मनीस पश्चिमेकडे ढकलीत ढकलीत पोलंडमध्यें पिटाळलें असून आघाडीच्या इतर भागांवर पद्धतशीर हल्ले चढवण्याचें धोरण अबाधित चालू ठेवलें आहे. युरोपच्या पश्चिम भागांत इंग्लंड व अमेरिका ह्यांच्या संयुक्त फौजा दुसरी व तिसरी आघाडी कोठें उघडणार ह्याचा अंदाज न लागल्यामुळें हिटलरची डोकेदुखी वाढली आहे. पश्चिम जर्मनीमधलीं बर्लिन आदिकरून प्रमुख औद्योगिक शहरें जमीनदोस्त व बेचिराख झालीं आहेत. दुसऱ्या व तिसऱ्या आघाडींची भित्तराट्टांची तयारी जय्यत चालली असल्यानें पश्चिम युरोपाच्या बचावाची व्यवस्था करण्याची हिटलरनें धडपड चालवली आहे. इटलीमध्यें अमेरिकन व ब्रिटिश सैन्यें हळुहळु पण निश्चयानें रोमच्या बाजूनें पुढें सरकत आहेत. येथें शत्रू-प्रतिकाराची शिकस्त करीत आहे तरी मित्र राष्ट्रांच्या जबर लढाऊ सामर्थ्यापुढें त्यास माघार घ्यावीच लागत आहे.

बाहेरील औद्योगिक तज्ञांच्या नेमणुका

आधुनिक यांत्रिक कला आणि औद्योगिक कार्यपद्धती ह्यांचें ज्ञान व अनुभव ह्यांचा हिंदुस्थानांतील त्यांच्या नाबीन्यपूर्ण आगमनामुळें, अभाव नाहीं तरी तुटवडा कांहीं वर्षांमागें हिंदवासीयांमध्यें होता ह्यांत नवल नाहीं. तथापि, गेल्या पांच पंचवीस वर्षांत स्वदेशी उद्योगधंद्यांच्या प्रगतीच्या ओघांत हिंदी औद्योगिक व यांत्रिक तज्ञांची संख्या वाढत चालली आहे. ह्या कारणानें मोठमोठाल्या उद्योगधंद्यांत हिंदी कार्यकर्त्यांच्या नेमणुकी केल्या जाणें अपेक्षित व आवश्यक आहे. औद्योगिक कारभाराची जबाबदारी हिंदी लोक जसजशी उचलीत जातील, तसतसें हिंदी धंद्यांच्या उन्नतीस अधिकाधिक उत्तेजन मिळत जाईल. सध्याच्या युद्धपरिस्थितींत हिंदी कारखानदारीचें महत्त्वाचें साहाय्य लढाऊ सामुग्रीच्या उत्पादनांत होत आहे आणि ह्यासंबंधांत हिंदी धंदेवाल्यांची कार्यक्षमता सिद्ध झाली आहे. राज्यकारभारांत हिंदी लोकांस जबाबदारीचें स्थान दिल्याचा परिणाम अनुकूल असा झालेला आहे ह्यांत आतां शंका नाहीं. त्याचप्रमाणें सरकारी नोकऱ्यांत हिंदी लोक मोठ्या जबाबदारीचीं कामें समाधानकारक रीतीनें करीत आहेत. अशा स्थितींत लायक यांत्रिक तज्ञ उपलब्ध असतांना जबाबदारीच्या औद्योगिक जागांवर बाहेरच्या लोकांच्या नेमणुका झाल्या म्हणजे त्यांचेविरुद्ध धंदेवाल्यांच्या मंडळींनीं तक्रार करावी हें साहाजिक आहे. हिंदुस्थानांत पोलादाचा व कोळशाचा पुरवठा ह्यांचेसंबंधांत व्यवस्था पहाण्यासाठी ब्रिटिश व अमेरिकन तज्ञ नुकतेच नेमण्यांत आले आहेत, त्यांचे बाबतींत फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ह्या संस्थेच्या कार्यकारी समितीनें आपली नापसंती हिंदुस्थान सरकारास कळवली आहे. आपापल्या कार्यास वरील लोक सर्वस्वी लायक असतील आणि ते तसे आहेत म्हणूनच त्यांच्या नेमणुका झाल्या आहेत. असें उत्तर सरकारकडून मिळेल हें ठरलेलें आहे. परंतु येथें प्रश्न आहे तो त्यांच्या योग्यतेचे तज्ञ हिंदुस्थानांत उपलब्ध नव्हते काय ? असा आहे. उच्च दर्जाच्या जबाबदारीच्या जागा हिंदी लोकांस याववाच्या सरकारी धोरणाच्या विरुद्ध प्रस्तुत नेमणुका आहेत असें फेडरेशननें म्हटलें आहे. परंतु नेमणुका तर होऊन गेल्या आणि आतां हें केवळ मतप्रदर्शन आहे. तथापि, मप्प बसण्यापेक्षा अभिप्राय निर्भीडपणानें व्यक्त करणें बरें.

ब्रिटिश साम्राज्य परिषद

ग्रेट ब्रिटनचे मुख्य प्रधान, मि. चर्चिल, ह्यांनीं ब्रिटिश साम्राज्यांतील स्वतंत्र देशांच्या म्हणजे डोमिनिअन्सच्या मुख्य प्रधानांची परिषद चालू वर्षांत लंडन येथें भरवण्याचें ठरवलें आहे. अशी परिषद १९३७ सालांत भरली होती आणि युद्ध चालू असतांना डोमिनिअन्सच्या मुख्य प्रधानांस आपापले देश सोडून लंडनला चर्चेसाठी जातां येईल किंवा कसें ह्याची शंका असल्यानें तिचें अधिवेशन आतांपर्यंत होऊं शकलें नाहीं. परंतु ह्या संबंधांतली परिस्थिति अनुकूल असल्याकारणानें साम्राज्य परिषद् यंदा भरवण्यास हरकत नाहीं असें मि. चर्चिल ह्यांस वाटत आहे. ब्रिटिश साम्राज्याच्या हिताचे प्रश्न मधून मधून उपस्थित होतात आणि त्यांचा विचार करून सर्वांस पसंत पडेल असें धोरण साम्राज्य परिषदेंत निश्चित केलें जातें. इंग्लंड व डोमिनिअन्स ह्यांचे व्यापार, चलन, उद्योगधंदे, परराष्ट्रांशीं व्यापारी व इतर करार, इत्यादि बाबतींत परस्पर संबंध कसे असावे, ब्रिटिश साम्राज्याच्या मजबुतीसाठी कोणते उपाय योजिले जावे, वगैरे विषयांची चर्चा युद्धपरिस्थितींत व युद्धोत्तरकाळासाठी नेहमीपेक्षा अधिक महत्त्वाची वाटत असल्यास त्यांत नवल नाहीं. हिंदुस्थानास डोमिनिअनचा दर्जा नसल्यामुळें साम्राज्य परिषदेंत निराळें स्थान नाहीं हें उघड आहे. हिंदी प्रतिनिधीची जागा हिंदुस्थानचे सेक्रेटरी ऑफ स्टेट भरून काढतील. इंग्लंडमधील युद्ध कौन्सिलवर हिंदुस्थानचे प्रतिनिधी ब्रिटिश सरकारनें नेमले आहेत, ते साम्राज्य परिषदेचे वेळीं लंडनमध्यें असतील आणि जरूर तेव्हां त्यांचा सल्ला घेणें सोयीचें होईल असें म्हटलें जात आहे त्याचा अर्थ हिंदुस्थानच्या सध्याच्या राज्यघटनाविषयक दर्जावरून उघड होत आहे. डोमिनिअन्सच्या बरोबरीचें स्थान हिंदुस्थानास युद्धानंतर देण्याचें इंग्लंडनें उदक सोडलें आहे. तेव्हां होऊं घातलेल्या साम्राज्य परिषदेंत ह्या देशाचे लोकनियुक्त प्रतिनिधी घेण्यांत आल्यास तें मुत्सद्देगिरीचें व हितावह धोरण ठरेल. ह्या परिषदेंत हिंदुस्थानच्या हिताशी संबंध येणाऱ्या महत्त्वाच्या प्रश्नांची चर्चा होईल. असें असल्यानें ह्या देशाचें मत स्वतंत्रपणानें तेथें व्यक्त केलें जाणें योग्य होणार आहे. साम्राज्यपरिषदेंत हिंदुस्थानचें सहकारित्व हा देश, इंग्लंड व डोमिनिअन्स ह्या सर्वांचेच दृष्टीनें हितावह आणि उपकारक होणार आहे.

दि इंडियन रिअल एस्टेट कार्पोरेशन लि., पुणें

वरील कंपनीस कामास प्रारंभ करण्याचें सर्टिफिकेट १७ नोव्हेंबर १९४१ रोजीं मिळालें. खरेदीनें अथवा दीर्घ संडानें जमिनी घेऊन त्या सुधारून वसाहती स्थापणें; इमारती, रस्ते,

ड्रेनेज इत्यादींच्या बांधणीची कंत्राटी कामें घेणें; इत्यादि कंपनीचे प्रमुख उद्देश आहेत. मुंबई, अहमदाबाद, सोलापूर, जळगांव, बेळगांव, अहमदनगर, पुणें, सांगली, इत्यादि ठिकाणीं नव्या विटांच्या बांधणीस पुष्कळच वाव आहे. हातेवंदीच्या पद्धतीनेंहि घरें बांधून विकण्याचा कंपनीचा उद्देश आहे. "अ" वर्गाचे ठेकेदार म्हणून मध्यवर्ती पी. डब्ल्यू. डी. मध्यें कंपनी दाखल आहे व कंपनीनें कित्येक कामें मिळवून चालू व पुरीं केलीं आहेत. कंपनीचें वसूल भांडवल व आगाऊ भरलेलें भांडवल सुमारें ३ लक्ष रुपये आहे व ती ठेवीहि स्वीकारते. ३१ जुलै १९४३ अखेरच्या वर्षी तिला २३ हजार रुपये निवळ नफा झाला. त्यांतून गेल्या वर्षीचा तोटा वजा करतां नफा वाटणीसाठी १९½ हजार रुपये राहिले. भागीदारांस ६% दरानें डिव्हिडंड देण्यांत आलें. राजा पन्नालाल बन्सीलाल पिट्टी हे कंपनीचे अध्यक्ष असून कर्वा आणि कं० (प्रोप्रायटर: श्री. नारायणदास रामकिसन कर्वा) हे तिचे मॅनेजिंग एजंट्स आहेत. कंपनीच्या कार्यास मुबलक वाव आहे व तिच्या डायरेक्टरांत श्रीमान्, अनुभवी व कर्तबगार लोक आहेत. या दृष्टीनें तिच्या कार्यांत उत्कृष्ट यश येण्याची अपेक्षा नमूद करणें अगत्याचें आहे.

मुंबई प्रांतांतील ज्वारीचें व बाजरीचें पीक

मुंबई प्रांतांतील ब्रिटिश हद्दींतील खरीफ ज्वारी पिकाची लागवड १० ऑक्टोबर, १९४३ अखेर २६,९३,००० एकरांत झालेली होती. गेल्या दहा वर्षांतील सरासरी लागवडीच्या क्षेत्राचे मानानें हें क्षेत्र २४·१% मोठें आहे. गेल्या वर्षीच्या मानानें वाढ मात्र फक्त ०.५% अधिक आहे. पाऊस, कीड, इत्यादि कारणांमुळें गुजरातमधील उत्पादन मामुली उत्पादनाच्या ६८ ते ९२% होईल अशी अपेक्षा आहे. महाराष्ट्रांत ८३% व कर्नाटकांत ६७ ते ७५% उत्पादन होईल, असें दिसतें. सबंद प्रांतांतील ब्रिटिश हद्दीमधील उत्पादन (६,४३,०००) टन गेल्या दहा वर्षांच्या सरासरीच्या मानानें २६·४% अधिक व गेल्या वर्षीच्या मानानें ४·१% अधिक होईल, असा अंदाज आहे.

बाजरीखालील अंदाजी क्षेत्र ५१,८०,००० एकर म्हणजे गेल्या दहा वर्षांच्या सरासरीपेक्षा व गेल्या वर्षापेक्षा अनुक्रमें ३४·४% व ५·१% अधिक आहे. मामुली उत्पादनाच्या ६८% ते ८३% उत्पादन गुजरायमध्यें, ६७% ते ८३% महाराष्ट्रांत व ६७% ते ७५% कर्नाटकांत येईल, असें दिसतें. ब्रिटिश हद्दींतील उत्पादन (६,३०,००० टन) गेल्या दहा वर्षांतील उत्पादनापेक्षां ३२·८% अधिक परंतु गेल्या वर्षापेक्षां ४·०% कमी होणार, अशी अपेक्षा आहे. विहिरींची खोली वाढविणें, त्या स्वच्छ करणें, इत्यादींसाठीं शेतकऱ्यांस मदत करण्यांत सरकारी योजनेंतील रकम खर्च व्हावयाची आहे.

लायब्ररी उद्घाटन समारंभ

झोडगे को. ऑ. के. सोसायटी, (ता. मालेगांव, जि. नाशिक) या संस्थेच्या नेतृत्वाखाली उभारलेल्या लायब्ररीचा उद्घाटन समारंभ श्री. मोतीलाल रामलाल भंडारी, कंधानें, ह्यांचे अध्यक्षतेखालीं १ जानेवारी, १९४४ रोजीं साजरा झाला. त्यावेळीं सुमारें २०० चे वर समाज हजर होता. आरंभीं श्री. पी. एस. कुळकर्णी, ग्रुप सेक्रेटरी ह्यांनीं अहवाल व ताळेबंद वाचून थोडक्यांत माहिती सांगितली. नंतर श्री. महाजन, श्री. निरंतर वगैरे वक्त्यांचीं समयोचित भाषणें झाल्यावर अध्यक्षांनीं बोधपर भाषण करून लायब्ररीस ५१ रुपये देणगी दिली व जोंपर्यंत लायब्ररी चालूं आहे तोंपर्यंत अव्याहत ११ रुपये दर सालीं देण्याचें कबूल केलें. शिवाय गांवांतील सद्गृहस्थांकडून सदर दिवशीं एकूण रुपये १४७-८-० इतकी रकम देणगी म्हणून मिळाली. श्री. देवराव पाटील सरपंच यांनीं अध्यक्ष व आलेली मंडळी ह्यांचे आभार मानले व शेवटी वंदनगीत व चहापान होऊन सभेचें काम संपलें.

दत्त कंपनी

७३५ शुक्रवार पेठ, पुणें २. दाणेआळी पोलिसचौकीजवळ
सर्व तऱ्हेचे काटे, वजनें व मापें, वेळेवर
रिपेअर करून मिळतील.

दि इंडियन रियल इस्टेट कॉर्पोरेशन लिमिटेड

बालमुकुंद रोड, रविवार पेठ, पुणें

सर्व तऱ्हेच्या बांधकामाचीं कॉन्ट्रॅक्टस्, व लँड डेव्हलपमेंटच्या योजनांचे व्यवहार होतात.

—ठेवी घेणें आहेत—

मुदत		दर
६	महिने	४ टक्के
१२	"	४॥ "
२४	"	५ "

माहिती व अर्जाकरितां मॅनेजर यांस लिहा.

दि बँक ऑफ इंडिया लि.

[स्थापना : १९०६]

ऑथोरिझ्ड भांडवल ... ... रु. २,००,००,०००
वसूल झालेलें भांडवल ... ... रु. १,००,००,०००
रिझर्व्ह फंड ... ... रु. १,२०,५०,०००

मुख्य कचेरी: ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

मुंबईमधील शाखा: बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

इतर शाखा: अहमदाबाद (भद्र, मुख्य ऑफिस), अहमदाबाद (एलिस ब्रिज शाखा), अहमदाबाद (स्टेशन शाखा), अमृतसर, अंधेरी (मुंबई शेजारी), बांद्रे (मुंबई शेजारी), कलकत्ता (क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्क्वेअर), जमशेदपूर, कराची, नागपूर (किंग्जवे), नागपूर (इतवारी बझार), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत, भुज (कच्छ).

लंडन एजन्ट्स: वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

डायरेक्टर्स: सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस. आय. (अध्यक्ष), श्री. अंबालाल साराभाई, सर जोसेफ के. नाईट, मि. ए. गेडिस, सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, जी. बी. ई., के. सी. आय. ई., मि. दिनशा के. दाजी, श्री. रामनिवास रामनारायण.

करंट डिपॉझिट अकाउंट्स:

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर १½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षां कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

बिल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते, सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

एजंट:—एच्. ए. करीमभाई

आर्थिक नियोजन

(ले. संजय)

श्री. पुरुषोत्तमदास प्रभृतींची आर्थिक उन्नतीची योजना ५५ पृष्ठांत विसुरलेल्या ९९ परिच्छेदांमध्यें मांडण्यांत आली आहे. हिंदुस्थानसारख्या अवाढव्य देशाच्या आर्थिक उन्नतीच्या नियोजनाची ही कल्पना अत्यंत मोजक्या पण परिणामकारक शब्दांत सुलभतेनें मांडलेली व राष्ट्राच्या विचारास जोरदार चालना देणारी आहे. राष्ट्रीय नियोजनासारखी अवाढव्य योजना यशस्वी होण्यास जनतेच्या विश्वासास पात्र असें जबाबदार मध्यवर्ती सरकार असणें अत्यावश्यक आहे ही मूलग्राही गोष्ट असंदिग्ध शब्दांत सांगून सर पुरुषोत्तमदास यांनीं, वृत्तपत्रांच्या प्रतिनिधींना योजनेची पार्श्वभूमि समजावून देत असतांना, सध्यांची राजकीय परिस्थिति सुधारेल असा आपला आशावादहि प्रगट केला.

योजनेचा उद्देश

ही योजना परिपूर्ण नसून विचारास चालना देण्याच्या दृष्टीनें हिंदुस्थानांत आर्थिक नियोजन करतांना त्याचें ध्येय काय असावें, त्याप्रत जाण्यास मार्ग कोणते, त्याकरितां राष्ट्राला किती व कोणत्या प्रकारची किंमत यावी लागेल याची रूपरेषा मांडण्यांत आली असून ही देश व्यापी प्रचंड योजना प्रत्यक्ष व्यवहारांत कशी उतरवायची याबाबतचा विचार चालू आहे व त्या प्रश्नाचें स्वतंत्र विवेचन करण्यांत येईल असें सांगितलें आहे. "आम्हीं दर्शित केलेल्या अडचणी एकवेळ योजनेची अंमलबजावणी लांबणीवर टाकूं शकतील, पण तिला यशस्वी होणेंच अशक्य करतील, असें नाहीं. आम्हांला आशा वाटते कीं आम्हीं पुढें ठेविलेला कार्यक्रम जर देशाला पटला तर योजनापूर्तीला आवश्यक तें वातावरण निर्माण करण्यास त्याचा आपोआपच उपयोग होईल.

कार्यक्रमास सुरुवात झाल्यापासून १५ वर्षांत दर माणशीं उत्पन्न आज आहे. त्याच्या दुप्पट करावें असा या योजनेचा मुख्य हेतू आहे. हिंदुस्थानांत दर माणशीं उत्पन्न इतकें कमी आहे कीं अन्न, वस्त्र व निवाऱ्याला जागा, शिक्षण व औषधपाणी या जीवनाच्या मूलभूत गरजाहि त्यांत भागूं शकत नाहींत. कृषि प्रधान हिंदुस्थानामध्यें पुरेसें खावयालाहि मिळत नाहीं, अशांचें प्रमाण भयानकपणें मोठें आहे. त्याहिपेक्षा मोठें प्रमाण योग्य प्रकारचें अन्न खावयास न मिळणारांचें आहे!! पोटास भरपूर अन्न नाहीं, नेसायला वस्त्र नाहीं, रहायला निवाऱ्याची जागा नाहीं, औषधपाण्याच्या नीटशा सोई नाहींत, रोगराई प्रतिबंधक उपचार अपुरे पडत आहेत, पाण्याच्या नीटशा सोई झालेल्या नाहींत, शिक्षणाकरितां पैसा नाहीं, सोईस्कर शाळा नाहींत, या सर्व बाबतींत तावडतोब सुधारणा होणें निकडीचें आहे. या सुधारणांचा उपभोग घेण्यास निदान दुपटीनें तरी दर माणशीं उत्पन्न वाढलें पाहिजे.

उद्योगधंद्यांची वाढ

तथापि ही गोष्ट राष्ट्रीय उत्पादन, लोकसंख्येची १५ वर्षांतील वाढ लक्षांत घेऊन, तिप्पट वाढल्यासेरीज शक्य नाहीं. त्याकरितां योजना अशी:-शेतीच्या उत्पन्नांत १३० टक्के वाढ, उद्योग-धंद्यांच्या उत्पन्नांत ५०० टक्के वाढ व इतर उत्पन्नांत २०० टक्के वाढ करण्यांत यावी.

१९३१-३२च्या आकड्यांवरून उद्योगधंदे १७ टके, शेती ५३ टके व इतर २२ टके अशी ब्रिटिश हिंदुस्थानांतील राष्ट्रीय उत्पन्नाची वर्गवारी पडते. सुचविलेल्या योजनेप्रमाणें, हें प्रमाण अनुक्रमें ३५,४० व २०टके होईल. याचा अर्थ असा कीं, हिंदुस्थान कृषिप्रधान देश राहील, पण शेतीवरील बराचसा बोजा कमी होऊन शेती व उद्योगधंदे यांचेमध्यें थोडीतरी प्रमाणबद्धता निर्माण होईल.

कालवे व पाट-बंधारे बांधून, उत्तम दर्जाचें बियाणें पुरवून व सहकारी पद्धतीनें शेती करून शेतीच्या उत्पादनांत अपेक्षित वाढ होईल. देशांत बीज, लोसंड-पोलाद, यंत्रसामुग्री, रंग, खतें, रसायनें, रेल्वे इंजिनें, सीमेंट, दारुगोळा, औषधें, इत्यादि तयार करण्याचे, तसेंच रबर व इतर प्लास्टिकसदृपासून निरनिराळ्या वस्तु बनविण्याचे कारखाने प्रथम काढणें अत्यावश्यक आहे. त्यांच्याबरोबरच कापड, कागद, काच, तेल व कातडीं यांचे कारखाने वाढविले जातील.

शेतीच्या व औद्योगिक उत्पादनांत वाढ झाल्यानें वहातुकीच्या प्रश्नास महत्त्व येतें. त्याकरितां २१,००० मैल रेलवे रस्ते आणि ३००,००० मैल इतर वहातुकीचे रस्ते नवीन बांधावे लागतील. तसेंच बंदरांत मालाच्या चढ-उतराच्या अधिक सोई करण्यांत येतील.

योजनेच्या खर्चाची तरतूद

योजनेच्या खर्चाची वाटणी खालीलप्रमाणें सुचविण्यांत आली आहे.

कारखाने	रु. ४,४८०	कोटी
शेती	१,२४०	,,
वहातूक	९४०	,,
शिक्षण	४९०	,,
आरोग्य	४५०	,,
घर बांधणी इ०	२,२००	,,
इतर	२००	,,
	रु. १०,०००	

या खर्चाची तोंडमिळवणी अशी

सांठवलेलें गुप्त धन रु.	३००	कोटी
स्टर्लिंग रोखे	१,०००	,,
आयात-निर्यातीतील अनुकूल तफावत	६००	,,
परदेशीं कर्ज	७००	,,
बँका वगैरेंतील शिल्लक	४,०००	,,
निर्माण केलेलें चलन	३,४००	,,
	रु. १०,०००	

वर सुचविलेल्या मार्गानें अपेक्षिलेला पैसा मिळेल किंवा नाहीं, तसेंच सरकारी पतीवर नवीन पैसा उभारणें कितपत श्रेयस्कर होईल याबाबत शंका घेणाऱ्यांना उत्तर असें आहे कीं "राष्ट्राच्या आर्थिक जीवनाचा पैसा हा देव नसून दास आहे." राष्ट्राची सरी संपत्ति देशांतील उपलब्ध साधनसामुग्री व मानवी शक्ति ही असून त्यांचा विशिष्ट प्रकारें उपयोग करून घेण्याचें पैसा हें एक साधन आहे. राष्ट्रीय संपत्ति वाढविण्याच्या प्रयत्नांत मुद्राम निर्माण केलेलें चलन वापरण्यांत कांहीं चूक नाहीं."

खडा मारायचां झालातर!

★ ★ ★

पाणवठ्यावरून परत येणाऱ्या ह्या घागरवालीचें
प्रेमगीत पुणेकरांस अक्षरशः वेड लावील !

प्रकाश पिक्चर्सचा

प न घ ट

भूमिका:—रत्नमाला, उमाकांत, जीवन

ग्लोब पुणें, येथें

येत्या शनिवारीं सुरूं होणार !

—१३ वा आठवडा—

प्रकाश पिक्चर्सचा पौराणिक मराठी बोलपट

रामराज्य

दिग्दर्शक:—विजय भट्ट.

भूमिका:—शोभना, समर्थ, चंद्रकांत, काळे, सोहनी.

मिनर्व्हा, पुणें

रोज फक्त दोन खेळ

६। व १० वाजतां

दर शनि. रवि. सोम. व इतर सुटीचे दिवशीं जादा खेळ
दुपारीं २॥। वाजतां

रॉयल रत्न १८ वें मराठी भाषेंत

महात्मा ★ विदुर

दिग्दर्शक:—रेजिसॅर पार्श्वनाथ आळते र
कला:—बाबूराव पेंटर

भूमिका:—कै. विष्णुपंत पागनीस, दुर्गा खोटे, मनोहर घटवाई, नायमपल्ली, प्रल्हाद, सीता जव्हेरी.

पुण्यांत ७ वा आठवडा

आर्यन, पुणें

दररोज तीन खेळ
३। ६॥ व १० वाजतां
दर रविवारीं सकाळीं १० वा.
मिझर्व्हेशन सकाळीं १० ते १२ दुपारीं ३ चे पुढें.

तिकिटांचे दर—(सरकारी करासह) बॉक्स रु. १०।१२. फर्स्ट क्लास रु. १, फॅमिलीसर्कल आ. १०, सेकंड क्लास ९ आणे, इंटर क्लास ५ आ. थर्ड क्लास ४ आणे. कुलीन स्त्रिया १० आ. व ५ आ.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनी 'दुर्गाविलास,' भांबुर्डा, घ. नं. ९२४।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.

खालील पत्त्यावर चौकशी करावी.

व्यवस्थापक, अर्थ.
'दुर्गाधिवास' पुणें ४.

अर्थ

वर्गणीचे दर.

वार्षिक वर्गणी
रु. ४
(टपाल खेरीज माफ)
किरकोळ अंकास
दोन आणे.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति। —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष १० पुणें, बुधवार, तारीख ९ फेब्रुवारी, १९४४ अंक ६

दि ब्रिटिश इंडिया जनरल इन्शुअरन्स कं. लि.

(स्थापना : १९१९)

आम्ही आयुर्विम्याखेरीज करून आग, मरीन, अपघात, इत्यादींचे सर्व प्रकारचे विमे स्वीकारतों.

—: चेअरमन व मॅनेजिंग डायरेक्टर :—

सर होमी मेहता, के. बी. ई., जे. पी.

पुणें शाखा :
मोति माणिक मॅन्शन,
लक्ष्मी रोड.

हेड ऑफिस :
मेहता हाऊस,
अपोलो स्ट्रीट, मुंबई.

पुना गेस्ट हाऊस

१००, लक्ष्मी रोड, पुणें २.

Telephone 779

GUEST HOUSE

TELEGRAM Guest House Poona 2.

महायुद्धाची जाणीव ! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

गिरगांव मुंबई नं. ४

महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

विविध माहिती

जर्मनीची हानी

जर्मनीनें गेल्या सबंद महायुद्धांत आघाडीवर जेवढे सैनिक गमावले, त्यापेक्षाहि अधिक जर्मन सैनिक चालू युद्धांत आतांपर्यंत कामास आले आहेत. झारिकी शेकडा ९० सैनिक रशियावरील युद्धांत मरण पावले. ब्रिटिश मंत्री, मॉर्ड सेटबोर्न, ह्यांनी वरील माहिती नुकतीच सांगितली.

सरकारी कारकुनांच्या पगारांत वाढ

कारकुनांच्या युद्धापूर्वीच्या पगाराचें मान सध्याच्या युद्धजन्य परिस्थितींत त्यांस आकर्षक वाटत नसल्यामुळें लायक लोक कामास मिळणें हिंदुस्थान सरकारास अवघड जात आहे. इतर ठिकाणच्या तत्सम नोकरांस ज्यास्त पगार मिळत आहे. सरकारी नोकरीची आकर्षकता कायम राखण्याचे दृष्टीनें कारकुनांचा सुरवातीचा पगार ४० रुपयांऐवजी ५० रुपये करण्याचा हिंदुस्थान सरकारचा विचार आहे. हिंदुस्थान सरकारनें ह्यासाठीं नेमलेले खास अधिकारी, मि. बी. सी. ए. बुक ह्यांनी नुकतींच मुंबईमधील हिंदुस्थान सरकारच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशीं चर्चा केली.

अ. भा. कारखानदार संघ

अ. भा. कारखानदार संघाचें चौथें वार्षिक अधिवेशन नागपूर येथें सर एम. विश्वेश्वरअय्या ह्यांचे अध्यक्षतेखाली २६ व २७ फेब्रुवारी रोजीं होणार आहे. सर माधवराव देशपांडे हे स्वागत समितीचे अध्यक्ष आहेत.

कॉमन्स सभेस अध्यक्षांच्या खुर्चीची देणगी

ब्रिटिश कॉमन्स सभेची नवी इमारत बांधण्यांत येईल, तीमधील अध्यक्षांची खुर्ची ऑस्ट्रेलिया देणगी म्हणून ब्रिटिश सरकारास देणार आहे. ब्रिटिश सरकारनें ऑस्ट्रेलियाच्या देणगीचा स्वीकार केला आहे. सभागृहाचा नकाशा व लाकडाची निवड झाल्यावर खुर्चीची योजना केली जाईल.

ब्रिटिश व अमेरिकन हितसंबंधी लोकांची हिंदुस्थान सरकारांतील वरिष्ठ जागीं नेमणूक

हिंदुस्थान सरकारनें मि. फ्रँक पार ह्यांस पोलादाचे कमिशनर, मि. मॅकलम् ह्यांस त्यांचे मदतनीस व मि. यंग ह्यांस कोळसा कमिशनर नेमलें आहे. ह्या तिघांचा ब्रिटिश व अमेरिकन उद्योगधंद्यांशीं आजवर संबंध असल्यामुळें, ते हिंदुस्थान सरकारची नोकरी कितपत स्वामिभक्तीनें करतील ह्याबद्दल लोकांना काळजी, इतकेंच नव्हे तर शंका वाटणें संभवनीय आहे. ह्या गोष्टीकडे फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स ॲन्ड इंडस्ट्रीनें हिंदुस्थान सरकारचें लक्ष वेधलें आहे. पोलाद व कोळसा ह्या धंद्यांच्या हितसंबंधाबाबतच त्यांचें कार्यक्षेत्र आहे, म्हणून काळजी जास्तच वाटते व त्यांची नेमणूक वरिष्ठ नोकरांच्या हिंदीकरणाच्या सरकारी धोरणास धरून नाहीं, असेंहि फेडरेशनमध्यें सरकारच्या नजरेस आणलें आहे.

लेबेरियानें युद्ध पुकारलें.

लेबेरियानें २६ जानेवारी रोजीं जर्मनी व जपान ह्यांचे विरुद्ध युद्ध पुकारलें. आफ्रिकेच्या पश्चिम किनाऱ्यावर लेबेरिया देश आहे. त्याचें क्षेत्रफळ ४३ हजार चौ. मैल आहे. अमेरिकेतील निग्रो लोकांची गुलामगिरी बंद केल्यावर त्यांना रहाण्यासाठीं लेबेरियाची योजना करण्यांत आली. सरकारी भाषा इंग्रजी आहे. देशांतील नागरिक बहुतेक सर्व निग्रो प्रॉटेस्टंट पंथाचे आहेत.

देशरी बिड्यांवर १० आ. ४ पै ह्याज

रिझर्व्ह बँकेनें गेल्या आठवड्यांत हिंदुस्थान सरकारचीं ८ कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकलीं. त्यांवर व्याजाचा सरासरी दर द. सा. द. शे. १० आ. ४ पै एवढा पडला.

जमीन महाणाच्या बँकांचें एकत्रीकरण

ठाणें (पूर्व) व कुलाबा जिल्हा लँड मॉर्गेज बँक आणि ठाणें (पश्चिम) व मुंबई उपनगर जिल्हा को. लँड मॉर्गेज बँक लि. पाटणकर ह्या दोन जमीन-महाणाच्या बँकांचें एकत्रीकरण होऊन त्या ह्यापुढें "ठाणें, कुलाबा व मुंबई उपनगर जि. को. लँड मॉर्गेज बँक लि. ठाणें" ह्या नांवानें व्यवहार करतील.

कॅनडामधील रेड इंडियन

कॅनडामध्यें सुमारें १,२०,००० रेड इंडियन आहेत. श्वेतवर्णीयांचा व त्यांचा प्रथम संबंध आला तो रेड इंडियन वंशाच्या वृद्धीस घातुक ठरला, परंतु १८२५ नंतर त्यांची लोकसंख्या वाढूं लागली. त्यांचेवर लष्करी नोकरीची सक्ती आहे. कॅनेडिअन श्वेतवर्णीयांपेक्षां अधिक प्रमाणांत रेड इंडियन लोकांनीं स्वखुषीनें लष्करांत नोकरी पत्करली आहे, ह्यामुळें नोकरीच्या सक्तीबद्दल त्यांची तक्रार आहे. अमेरिकेंतील निग्रो लोकांच्या प्रश्नाइतका कॅनडांतील रेड इंडियन लोकांचा प्रश्न बिकट नाहीं. रेड इंडियनबद्दल कनेडिअनास तुच्छता वाटत नाहीं, असा मात्र त्याचा अर्थ नाहीं. "आम्हांस केवळ रेड इंडियन असें न मानतां कनेडिअनचा आम्हांस दर्जा द्या. सत्य, न्याय व राजनिष्ठा ह्यांचे आधारावर वर्णद्वेषाचें निर्मूलन करून एकजुटीचा कॅनडा निर्माण करण्यास आम्हांस सवड द्या" अशी त्यांची मागणी आहे.

मुंबई कॉर्पोरेशनचें बजेट

मुंबई कॉर्पोरेशनच्या १९४४-४५ च्या अंदाजाप्रमाणें कॉर्पोरेशनचें अपेक्षित उत्पन्न ४ कोटि, २०¾ लक्ष रुपये आहे.

वस्तऱ्याच्या पाती व फाउन्टनपेन्स ह्यांच्या कमाल किंमती

वस्तऱ्याच्या पाती, सिगारेटस, फाउन्टनपेन्स, खेळण्याचे पत्ते, टेनिसचे चेंडू, गोल्फचे चेंडू, इत्यादींच्या कमाल किंमती हिंदुस्थान सरकारनें ठरवून दिल्या आहेत. निर्गत होणाऱ्या मालास हा ऑर्डिनन्स लागू नाहीं.

हिंदुस्थान सरकारास १९४२-४३ मध्यें ११२ कोटि रुपये तूट

हिंदुस्थान सरकारास १९४२-४३ मध्यें १७७¾ कोटि रुपये उत्पन्न होऊन त्याचा खर्च २१४¾ कोटि रुपये झाला व निव्वळ तूट ११२ कोटि रुपयांची आली, असे आकडे हिंदुस्थान सरकारनें प्रसिद्ध केले आहेत. दुरुस्त अंदाज पत्रकांत ९४¾ कोटि रुपयांची तूट येईल अशी अपेक्षा होती. ताज्या आकड्यांत पुढें कांहीं किरकोळ दुरुस्त्या झाल्या, तरी त्यांनीं महत्त्वाचे फेरबदल होण्याचा संभव नाहीं. उत्पन्नाच्या बाजूस रेल्वेजकडून मिळालेले २० कोटि रुपये व पोस्ट आणि तार खात्याचा, ४¾ कोटि रुपयांचा बाढावा ह्या त्या बाबी आहेत. खर्चाच्या बाजूस २१४¾ कोटि रुपयांचा लष्करी खर्च दाखविण्यांत आला आहे.

हिंदी मिरण्यांत हिंदी कपाशीचा उठाव

	गांठी (१ गांठ = ४०० पौंड)
ऑक्टोबर, १९४२	३, १२, ६८३
ऑक्टोबर, १९४३	३, ४०, ४६३
सप्टेंबर-ऑक्टोबर, १९४२	६, ११, ६८३
सप्टेंबर-ऑक्टोबर, १९४३	७, ०१, ३५५

अनुक्रमणिका

	पृष्ठ
१ विविध माहिती	... ४२
२ आर्थिक अभिवृद्धीची योजना	... ४३
३ द. आफ्रिकेंतील निग्रो मजूर	... ४४
४ स्फुट विचार	४५
उद्योगधंद्यांत नवें भांडवल–कारखान्यांचें प्राधान्य–हिंदी पेठेबाबत ब्रिटन-अमेरिका स्पर्धा–जपानच्या हातांतील ब्रिटिश युद्धकैद्यांचा छळ–त्यामुळें मित्रराष्ट्रांचा निश्चय दृढतर होणार– हिटलरी वक्तव्य— युद्धोत्तर हिंदी शिक्षणाची योजना.	
५ महाराष्ट्र बँकेची प्रगति	... ४६
६ प्रेसिडेन्सी इं. बँकेचें गेल्या वर्षांतील कार्य	... ४७

अर्थ

बुधवार, ता. ९ फेब्रुवारी, १९४४

आर्थिक अभिवृद्धीची योजना

(२)

सर पुरुषोत्तमदास ठाकुरदास प्रभृति पुढाऱ्यांनीं हिंदुस्थानच्या आर्थिक अभिवृद्धीची योजना तयार करून देशापुढें मांडली आहे, तिचे पांच भाग आहेत. पहिला विभाग प्रास्ताविक स्वरूपाचा आहे आणि त्याचा परामर्श आम्हीं या विषयावरील मागील लेखांत घेतला आहे. हिंदी जनतेचें किमान राहाणीचें मान कोणत्या दर्जाचें असावें आणि तें तसें कां असावें याचा विचार दुसऱ्या भागांत केलेला आहे. तिसऱ्या भागांत आर्थिक योजनेचें स्पष्टीकरण आहे. चौथ्यांत तिला लागणाऱ्या पैशाविषयीं विवेचन आहे आणि शेवटच्या विभागांत अभिवृद्धि कशी क्रमाक्रमानें घडवून आणावी ह्या विषयींची माहिती देण्यांत आली आहे. सर्वसाधारण जनतेची राहाणी सुधारून अधिक आरोग्यकारक व सुखदायी व्हावी हा आर्थिक अभिवृद्धीचा मूळ हेतु असल्यानें ह्या महत्त्वाच्या बाबीच्या चर्चेस अग्रस्थान देण्यांत आलें आहे हें योग्यच आहे. हिंदुस्थान देश कृषिप्रधान आहे तरी अनेक लोकांस पुरेसें अन्न मिळत नाहीं आणि त्याहिपेक्षा अधिकांस मिळणारें अन्न निकस असतें हें आतां सिद्ध झालें आहे. प्रत्येक लहान-मोठ्या व्यक्तीस पुरेसें व सकस अन्न मिळण्यास दर डोक्यास वार्षिक खर्च आणि किमान उत्पन्न ६५ रुपये असावयास पाहिजे असें हिशेबानें ठरतें आणि म्हणून ३९ कोटि लोकसंख्येच्या अन्नाप्रीत्यर्थ प्रतिवर्षी २१०० कोट रुपये खर्ची पडले पाहिजेत असें योजनेच्या पुरस्कर्त्यांनीं ठरवलें आहे. अन्नाच्या खालोखाल जनतेची गरज कपड्याविषयींची आहे. सबंध जगांतील लोकांचा विचार केल्यास १९२८–२९ सालच्या परिस्थितीवरून दर माणशीं कापसाच्या कापडाचा सरासरी खप ४२ वार होता असा हिशेब होतो. हिंदुस्थानांतली १९९९ मधली सरासरी १६ वार होती. ह्या देशाच्या निरनिराळ्या विभागांत कापडाचा वापर भिन्न भिन्न आहे. तथापि एकंदरीनें पहातां प्रत्येक माणशीं सालीना तें ३० वार्ड पुरवतां आलें तर तें समाधानकारक होईल असें म्हणावयास हरकत नाहीं. ह्या हिशेबानें १९४१ च्या सानेशुमारीच्या लोकसंख्येस ११६७ कोटिवार कापड लागेल आणि दर वारास साडेतीन आणे प्रमाणें कापडाच्या एकूण पुरवठ्यास २५५ कोटि रु. खर्च येईल. योजनाकर्त्यांचा हा आकडा प्रत्यक्ष वस्तुस्थितींत तिप्पट-तरी होईल.

अन्न आणि वस्त्र ह्यांच्या नंतर राहाण्याची घरें, आरोग्य, औषधपाणी, सार्वजनिक आरोग्य व लोकशिक्षण त्यांचा विचार येतो आणि त्यांची समाधानकारक व्यवस्था होण्यास किती किमान खर्च येईल त्याचा अंदाज करण्यांत आला आहे. प्रत्येक माणशी शंभर चौरस फूट एवढी बंदिस्त जागा जनतेस पुरवावयाची म्हटल्यास १४४० कोटि रुपये खर्चले पाहिजेत आणि साडेसात टक्के व्याजानें प्रतिवर्षी २५८ कोटि रुपये खर्च येईल. आरोग्याविषयीं सध्याची व्यवस्था अत्यन्त अपुरी आहे हें दर्शविणारे आकडे योजनाकारांनीं दिले आहेत आणि शुद्ध पाण्याचा पुरवठा, दवाखाने, रुग्णालयें ह्यांच्या प्रीत्यर्थ शहरांत व खेडेगावांत जरूर तो खर्च केला पाहिजे असें म्हणून प्रस्तुत बाबींवर किती पैसा पुरवला गेला पाहिजे त्याचा अंदाज त्यांनीं दिला आहे. सार्वजनिक आरोग्य व पाणीपुरवठा यांस रु. १०० कोटींचा खर्च येऊन प्रतिवर्षी साडेसात कोटि रुपयांची तरतूद करावी लागेल. प्रत्येक खेडेगावांत एक दवाखाना चालण्यास इमारती व प्राथमिक सामुग्री ह्यांचा भांडवली खर्च १३२ कोटी रुपये येईल आणि दरवर्षी तितकीच रक्कम खर्चली जावी लागेल. प्रसूतिगृहें, विशिष्ट रोगांनीं पीडितांकरितां खास गृहें ह्यांचीहि तरतूद करावी लागेल. ह्या आरोग्यविषयक निरनिराळ्या बाबींप्रीत्यर्थ एकूण भांडवल २८१ कोटि व वार्षिक खर्च १८५ कोटि लागेल. प्राथमिक व प्रौढ शिक्षणाचा प्रसार झाल्याबाचून कोणतीच प्रगति शक्य नाहीं ही गोष्ट आतां सर्वमान्य झाली आहे आणि ह्याकरितां शाळागृहें व शिक्षक ह्यांची पुरी तजवीज केली गेली पाहिजे. ह्या संबंधांतील हिशेबावरून असा अंदाज करण्यांत आला आहे कीं, मुलगे व मुली ह्यांस ६ ते ११ ह्या वयांत प्राथमिक शिक्षण सक्तीनें देण्यास भांडवली खर्च ८६ कोटि व चालू वार्षिक खर्च ८८ कोटि रुपये इतका करावा लागेल आणि प्रौढ शिक्षणासाठी आणखी ६६ कोटि रुपये लागतील.

जनतेच्या किमान राहाणीस सरासरीनें एकूण खर्च किती येईल आणि त्याकरितां राष्ट्राची वार्षिक प्राप्ती किती वाढली पाहिजे ह्याची कल्पना वर दिलेल्या आकड्यांवरून येईल. ह्या निरनिराळ्या बाबींसाठीं राष्ट्रास स्थूल मानानें वार्षिक किती रकमा आवश्यक आहेत हें दर्शविणारे आकडे खाली दिले आहेत.

बाब	खर्च होण्यास लागणारी प्राप्ती (कोटि रुपये)
अन्न खर्च	२,१००
कापड „	... २६०
घरांचा चालू खर्च	... २६०
आरोग्याचा „	... १९०
प्राथमिक शिक्षणाचा	... ९०
एकूण खर्च	... २,९००

हिंदी जनतेच्या किमान प्रतीच्या राहाणीसाठी दर माणशी निदान ७४ रुपये इतकी वार्षिक प्राप्ती आवश्यक आहे हें वरील आकड्यांवरून सिद्ध होतें. १९३१-३२ सालच्याकरतां हिंदी दर

हाणशी उत्पन्नाचा आकडा ६५ रुपये आहे. गेल्या बारा वर्षांत लोकसंख्येंत मर पडली असल्यानें हा सरासरीचा आकडा, विशेष आर्थिक प्रगतीच्या अभावीं, ह्याहिपेक्षा कमी करावा लागेल. युद्ध-समाप्तीनंतरच्या काळांत पदार्थांच्या किंमती वगैरे बाबतींतले होणारे फरक पुढें हिशेबांत घ्यावे लागतील. तथापि, स्थूल मानानें पहातां हिंदी जनतेची सध्याची प्राप्ती आणि किमान दर्जाच्या समाधानकारक रहाणीसाठी जरूर असलेलें दर माणशी उत्पन्न ह्यांचेमध्यें मोठें अंतर आहे ह्यांत शंका नाहीं. शिवाय, उत्पन्नाचे आकडे सरासरीचे आहेत आणि सामान्य जनतेची रहाणी त्यांवरून दिसणाऱ्या स्थितीपेक्षा निकृष्ट असली पाहिजे हें येथें विसरून चालतां येणार नाहीं. ह्या परिस्थितीवर उपाय म्हणून आर्थिक अभिवृद्धीची योजना तयार करण्यांत आली आहे. दर माणशी उत्पन्न वाढवण्याचे मार्ग तीमध्यें सुचवण्यांत आले आहेत.

दक्षिण आफ्रिकेंतील नीग्रो मजूर

ब्रिटिश वृत्तपत्रांची ब्रिटिश कामगिरीची प्रशंसा

"दक्षिण आफ्रिकेचें श्वेतवर्णीय मनुष्यबळ २२ लक्ष, त्या देशाचा विस्तार व त्यांतील नैसर्गिक संपत्ति ह्यांचे मानानें अत्यंत अपुरें आहे. त्या देशांतील मजूर वर्ग म्हणजे बंटू (निग्रो) लोक असून त्यांची संख्या ७५ लक्ष आहे. तेच सर्व शारीरिक कामें करतात. सोन्याच्या खाणींत काम करण्यासाठी ते ९ महिने ते ५ वर्षे मुदतीनें येतात व करार संपल्यावर त्यांना परत धाडण्यांत येतें. खाणींत कामावर असतांना त्यांना रस्त्यावर भटकूं दिलें जात नाहीं. कडक शिस्त राखण्यांत येते. शहरांत नोकर, झाडू, वगैरे कामें करणारांची रहाण्याची सोय शहराचे कडेस स्वतंत्र केलेली असते येथेंहि त्यांचेवर पोलिसांची देखरेख असते. आपली हद्द सोडून शहरांत जाणाऱ्या प्रत्येकाला परवान्याचा पास दाखवावा लागतो. दर रविवारीं संध्याकाळीं असें जाण्यासाठी मालक लोक बहुधा पास देतात, परंतु ते देण्याची मालकांवर सक्ती नाहीं. निग्रो लोकांना शस्त्रें देणें कायद्यास संमत नाहीं. त्या कारणानें युद्धपरिस्थितींतील त्यांचीं कामें शांततेच्या वेळच्या कामापेक्षा विशेष वेगळीं नाहींत. निग्रो हा खरासुरा मजूर आहे. दक्षिण आफ्रिकेच्या फौजेंत कांहीं निग्रो आहेत, परंतु लढणाऱ्या पलटणींत त्यांचा समावेश नाहीं. निग्रो लोक ब्रिटिशांच्या पूर्णपणें बाजूचे आहेत. बोअर लोकांना निग्रोंचा पूर्ण तिटकारा आहे व निग्रो लोकांना पुनः गुलामगिरींत लोटण्यास ते तयार होतील, परंतु ब्रिटिश तसें करूं देणार नाहींत. ब्रिटिशांची सहानुभूति नसती तर बोअर लोकांनीं निग्रो मजुरांस केव्हांच नामशेष केलें असतें; तथापि, बोअर व निग्रो ह्यांतील मतभेद तूर्त बाजूस ठेवण्यांत आले असून, काळे पांढरे सर्व लोक लोकशाहीसाठी एकजुटीनें लढत आहेत."

—ए. बॉ. वीकली

हिंदी रेलवेजचें उत्पन्न

गेल्या एप्रिल महिन्याच्या प्रारंभापासून डिसेंबर अखेरच्या नऊ महिन्यांत हिंदुस्थान सरकारच्या हिशेबांत येणाऱ्या रेलवेजचें एकूण उत्पन्न १३० कोटि रुपये झालें. त्या पूर्वीच्या सालांतील तत्सम अवधींतल्या उत्पन्नापेक्षा हा आकडा १७ कोटि ८७ लक्ष रुपयांनीं अधिक आहे. १९४१-४२ च्या मानानें तो आकडा ३२ कोटि रुपयांनीं मोठा आहे.

श्री दत्त कंपनी

७३५ शुक्रवार पेठ, पुणें १. दाणेआळी पोलिसगेटाजवळ
सर्व तऱ्हेचे काटे, वजनें व मापें, वेळेवर रिपेअर करून मिळतील.

दि इंडियन रियल इस्टेट कॉर्पोरेशन लिमिटेड

बालमुकुंद रोड, रविवार पेठ, पुणें

सर्व तऱ्हेच्या बांधकामाचीं कॉन्ट्रॅक्टस्, व लँड डेव्हलपमेंटच्या योजनांचे व्यवहार होतात.

—ठेवी घेणें आहेत—

मुदत		दर ४ टक्के
६	महिने	
१२	"	४॥ "
२४	"	५ "

माहिती व अर्जाकरितां मॅनेजर यांस लिहा.

दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.

हेड ऑफिस : पुणें शहर.
स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.
मुंबअी शाखा : दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबअी.
जळगांव शाखा : नवी पेठ, जळगांव.
नागपूर शाखा : गोखले बिल्डिंग, सितावर्डी, नागपूर.

भांडवल

अधिकृत व विकीस काढलेलें	खपलेलें	वसूल झालेलें
रु. १०,००,०००	रु. ६,८०,६५०	रु. ३,४०,३२५

एकूण सेळतें भांडवल रु. ७०,१०,०००

बँकेच्या शेअरवर डिसेंबर १९४२ अखेर ४½% करमाफ डिव्हिडंड दिलें गेलें. बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदी-विक्री कसोशीनें करून दिली जाते.

सी. व्ही जोग,
B. Com., Cert. A. I. B. C. A. L L B.
मॅनेजर

साखरआंवा, मोरआवळा—सफरचंदाचा, माजराचा, आवन्याचा, बेलफळाचा, महाकुंगाचा, आल्याचा, हिरड्याचा वगैरे.

द. ना. हेजीब, २० शुक्रवार, पुणें.

स्फुट विचार

उद्योगधंद्यांत नवें भांडवल

पदार्थ विकत घेण्याच्या सामर्थ्याचा म्हणजे पैशाचा ओघ सरकारच्या तिजोरीकडे वळावा आणि त्याचा महागाई उत्पन्न करणारा परिणाम हतबल करावा ह्या हेतूनें हिंदुस्थान सरकार अनेक उपाय योजीत आहे. औद्योगिक व व्यापारी मंडळ्यांमध्यें घालण्यांत येणाऱ्या भांडवलाचें नियमन करणें हा त्यांपैकीच एक मार्ग आहे. युद्धपरिस्थितीमुळेंच नवीन उद्योग चालू करणें किंवा जुन्यांमध्यें जादा भांडवल घालणें ह्या गोष्टी आवश्यक होतात आणि त्यांचे मार्गांत अडथळे उत्पन्न करणें हें केव्हांहि श्रेयस्कर होणार नाहीं. परंतु ज्यांची युद्धपरिस्थितींत आवश्यकता नाहीं किंवा ज्यांच्या स्थापनेनें अथवा विस्तारानें व्यवहारांत पैसा निष्कारण खेळत रहाण्याचा संभव आहे अशा भांडवली योजनांची छाननी केली जाणें अयोग्य नाहीं. नवीन भांडवलाची गुंतवण आपापल्या व्यवहारांत करूं इच्छिणाऱ्या कंपन्यांनीं हिंदुस्थान सरकारकडे अर्ज पाठवून आगाऊ मान्यता मिळवली पाहिजे अशी योजना सध्या अंमलांत आहे. तिच्या प्रारंभापासून पहिल्या सहामाहींत नव्या व जादा भांडवलाचे संबंधांत काय घडामोडी झाल्या ह्याची माहिती प्रसिद्ध झाली आहे ती बोधप्रद आहे.

कारखान्यांचें प्राधान्य

ह्या अवधींत सरकारकडे गेलेले पाचशे अर्ज मान्य झाले आणि त्यांचे अन्वयें १५ कोटि रुपयांच्या भांडवलाच्या व्यवहारांस परवानगी देण्यांत आली. कारखानदारीच्या स्वरूपाचे धंद्यांची अर्जदारांमध्यें ५६४ एवढी संख्या होती आणि त्यांची मागणी २० कोटि रुपये भांडवलाची होती. ह्या एकूण अर्जांपैकीं ६६ म्हणजे १२ टक्के नामंजूर झाले आणि त्यामुळें मागणीपैकीं २२ टक्के भांडवलास परवानगी नाकारण्यांत आली. कापसाच्या गिरण्यांचे विषयीं ६८ अर्ज होते आणि त्यांत ४ कोटि रुपये भांडवलाबद्दलची मागणी होती, ती मान्य झाली. लोखंड व पोलाद ह्यांच्या बनावटीबाबत १ कोटि, ७० लक्ष रुपयांचे ५७ अर्ज मंजूर झाले. रसायनें, औषधें वगैरेसाठी दीडकोटीच्या ६३ मागण्या मान्य झाल्या. चित्रपटांचे धंद्याविषयीं १२ लक्ष रुपयांच्या १५ अर्जांस मान्यता मिळाली. महत्त्वाच्या धंद्यांसंबंधांतले ठळक आकडे येथें देण्यांत आले आहेत; त्यांवरून युद्धपरिस्थितींतल्या औद्योगिक प्रगतीच्या प्रवृत्तीची कल्पना येण्यासारखी आहे. युद्धकाळांत दुर्मिळ होणाऱ्या व प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रीतीनें लढाऊ तयारीस उपयोगी पडणाऱ्या जिनसांच्या उत्पादनास सहाय्य व्हावें अशा बेतानें भांडवलाच्या औद्योगिक गुंतवणुकीस मान्यता दिली जात आहे हें त्यांवरून दिसेल.

हिंदी बाजार पेठेबाबत ब्रिटन–अमेरिका स्पर्धा

युद्धोत्तर काळांत आवश्यक असलेल्या आंतरराष्ट्रीय सहकार्याची भाषा एकीकडे बोलली जात आहे आणि त्याच वेळीं दुसरीकडे व्यापार व उद्योगधंदे ह्यांचे संबंधांत इंग्लंड व अमेरिका ह्यांचेमध्यें व्हावयाच्या स्पर्धेविषयीं ओरडहि चालली आहे. युद्ध संपल्यावर आपल्या व्यापाराचें बस्तान कसें बसेल आणि जागतिक पुनर्घटनेंत स्वतःस मोठा हिस्सा कसा मिळेल ह्याची चिंता वरील देशांतील धंदेवाल्यांस लागून राहिली आहे. युद्ध चालू असतांना लढाऊ जहाजें इंग्लंडनें बांधावीं आणि व्यापारी जहाजें बांधण्याचें काम अमेरिकेनें करावें अशी श्रमविभागाची तजवीज ह्या दोन राष्ट्रांनीं केली आहे. पण युद्धोत्तर काळांत जागतिक व्यापारांत अमेरिकेचें वर्चस्व ह्या व्यवस्थेमुळें होऊन इंग्लंड त्या बाबतींत मागें पडेल अशी भीति ब्रिटिश नाविक धंदेवाल्यांस वाटत आहे. वैमानिक वहातुकीचे संबंधांतहि अशाच तऱ्हेचे विचार ब्रिटिश धंदेवाल्यांच्या डोक्यांत घोळत आहेत. हिंदुस्थानच्या व्यापारांत इंग्लंडला आज अग्रेसरत्व आहे. तें ह्यापुढें हिरावून घेण्याचा पद्धतशीर प्रयत्न अमेरिकन व्यापारी करीत असल्याची तक्रार ब्रिटिश वृत्तपत्रांतून केली जात आहे. इंग्लंडनें अमेरिकेचा कित्ता गिरवून हिंदुस्थानशी होणारा परराष्ट्रीय व्यापार स्वतःचे हातीं ठेवण्याचा व्यवस्थित यत्न केला पाहिजे असें आग्रहपूर्वक सांगण्यांत येत आहे. हिंदुस्थानशी होणाऱ्या नाविक वहातुकीचा योग्य हिस्सा हिंदी स्वदेशी मंडळ्यांच्या हातीं येण्यास येथील सरकारनें जरूर तें उत्तेजन द्यावें अशी मागणी आज कित्येक वर्षें चालू आहे. आर्थिक पुनर्घटनेच्या योजना आखण्याचें काम दिल्ली येथें मध्यवर्ती सरकारच्या मार्फत चाललें आहे, त्यांत नाविक आणि वैमानिक वहातुकीचा प्रश्न ह्या देशाच्या दृष्टीनें समाधानकारक रीतीनें सोडवला जाण्याची व्यवस्था होणें अगत्याचें आहे. युद्धोत्तरकाळांत व्यापारी व औद्योगिक स्पर्धा मोठ्या प्रमाणावर होण्याचा रंग दिसत आहे आणि तीमध्यें हिंदुस्थानाच्या हिताचें पूर्ण रक्षण केलें जाण्याची तरतूद एव्हांपासून दूरदृष्टीनें व निश्चयानें झाली पाहिजे.

जपानच्या हातांतील ब्रिटिश युद्धकैद्यांचा छळ

जपानच्या हातांतील ब्रिटिश युद्धकैद्यांच्या छळासंबंधीं व वाईट वागणुकीसंबंधीं माहिती ब्रिटिश परराष्ट्रमंत्री, मि. ईडन, ह्यांनीं कॉमन्स सभेंत नुकतीच सांगितली. युद्धकैद्यांच्या पत्रांतील मजकुरावरून त्यांची स्थिति समाधानकारक होती असें दिसलें तरी प्रत्यक्ष परिस्थिति भयंकर आहे, असें ते म्हणाले. युद्धकैद्यांपैकीं शेंकडा ८० ते ९० लोक फिलिपाइन बेटें, नेदरलंड्स ईस्ट इंडीज, बोर्निओ, ब्रह्मदेश, मलाया, सयाम व इंडोचायना येथें आहेत. त्यांच्या तळांची तटस्थांनीं पहाणी करण्यासहि जपानची तयारी नाहीं. युद्धकैद्यांची संख्या व नांवेंहि जपाननें कळविलेलीं नाहींत. ब्रिटिश सरकारला मिळालेल्या माहितीप्रमाणें ब्रिटिश साम्राज्याचे हजारो युद्धकैदी सयाममध्यें ठेवलेले आहेत, त्यांच्या खाण्यापिण्याची व औषधपाण्याची अत्यंत आबाळ होत आहे. रेल्वे व रस्ते ह्यांचें बांधकाम त्यांचेकडून करवून घेण्यांत येत आहे. त्यांची प्रकृति ढासळत असून, त्यांपैकीं बहुसंख्य अत्यंत आजारी आहेत व हजारो युद्धकैदी मरण पावले आहेत. हाँगकाँग, फोर्मोसा, शांघाई, कोरिया व जपान येथील युद्धकैद्यांचे तळ तटस्थांनीं पहाण्यास जपान सरकारनें हरकत घेतलेली नव्हती. तेथील परिस्थिति कमी असमाधानकारक आहे अशी माहिती मिळते. केवळ आंतरराष्ट्रीय कराराचाच भंग जपाननें चालविला आहे, असें नसून माणुसकीच्या साध्या तत्त्वाचाहि त्यास विसर पडलेला आहे, असें मि. ईडन म्हणाले. स्विस सरकारचे मार्फत ब्रिटिश सरकारनें जपानकडे जोराच्या तक्रारी केल्या, त्यांस आलेलीं उत्तरें अळंटाळं करणारीं व असमाधानकारक होतीं. सुधारलेल्या राष्ट्रानें आपल्या युद्धकैद्यांच्या जीवितासाठी व आरोग्यासाठी काय केलें पाहिजे,

ह्याची जपानला जाणीव असूनहि तो असा वागत आहे. "जपानच्या छुप्पी अधिकाऱ्यांच्या कृत्यांचा विसर पडणार नाही, हें जपानी सरकारनें वेळीच ध्यानांत आणावें" असा इशारा मि. ईडन ह्यांनी दिला.

त्यामुळें मित्रराष्ट्रांचा निश्चय दृढतर होणार

लढाईत हातीं सांपडलेल्या प्रतिस्पर्ध्यांच्या सैनिकांस जपानी सरकार अमानुष, क्रूर व रानटी प्रकारानें वागवीत आहे. ह्या संबंधांत प्रसिद्ध झालेली माहिती तिटकारा व त्वेष उत्पन्न करणारी आहे. युद्ध झालें तरी त्यांतील बागणुकींना कांहीं सर्वमान्य नियम आहेत. त्यांचें उल्लंघन जपान बेमुर्वतपणानें करीत आहे. मित्र राष्ट्रांनी ह्याविषयीं मार्गेच नापसंती व्यक्त केली होती आणि तक्रारीहि केल्या होत्या. कैद्यांची नांवें त्यांच्या राष्ट्रीय सरकारास कळवणें, त्यांस पत्रव्यवहाराच्या सवलती देणें, रेडक्रॉसच्यामार्फत होणाऱ्या त्यांच्याविषयींच्या कार्यास मदत करणें, इत्यादि साध्या शिष्टाचाराच्या गोष्टी आहेत आणि त्या आधुनिक काळांत सर्वत्र प्रचारांत आहेत. पण जपानी सरकारानें आपल्या धुंदींत त्यांस पायाखाली तुडवलें आहे. ह्या बाबतींतल्या जपानी दुष्कृत्यांच्या हकीकती बाहेर येत आहेत त्या अत्यंत किळसवाण्या आहेत आणि त्या विश्वसनीय असल्यानें त्यांची सारवासारव करणें जपानला शक्य नाहीं. जगाची नवीन घडी बसवण्याच्या गप्पा जर्मनी व जपान ह्यांमधील पुढारी मारीत आहेत, पण त्यांचे दुष्ट उद्देश आणि दुर्वर्तन ह्यांची चांगली कल्पना जगास आली आहे हें त्यांनीं खूप समजावें. दगलबाजी करून जिंकलेले एशिया खंडांतील प्रदेश जपानला पचणार नाहींत आणि त्याच्या अमानुष वर्तनाच्या हकीकतींनें ह्या शत्रूचा पूर्ण बीमोड करण्याचा मित्रराष्ट्रांचा निश्चय अधिक दृढ होणार आहे. हिंदी जनता आपला काय उत्कृष्ट रीतीनें जाणत आहे हें त्या राष्ट्राच्या पुढाऱ्यांनीं लक्षांत ठेवावें.

हिटलरी वक्तव्य

हिटलरच्या प्रकट भाषणांची लांबी व खोली हीं अलीकडे कमी कमी होत आलीं आहेत यावरून जर्मनीच्या खालावलेल्या लढाऊ परिस्थितीची कल्पना येण्यासारखी आहे. स्वतःच्या वर्चस्वाच्या स्थापनेचा अकरावा वाढदिवस साजरा करण्याच्या निमित्तानें जर्मन जनतेस उद्देशून त्यानें जें भाषण केलें त्यांत नेहमींचा चढेलपणा, पाल्हाळ किंवा चढाईची वृत्ती यांचा जवळ जवळ अभावच होता. पूर्व आघाडीवर लालसेनेच्या चढाईपुढें टिकाव न लागल्यामुळें जर्मन फौजा मागें हटत आहेत. जर्मनीतील प्रमुख शहरांवर प्रत्यहीं होणाऱ्या ब्रिटिश व अमेरिकन वैमानिक हल्ल्यांमुळें जर्मन लोक त्रस्त झाले आहेत. इटालिअन आघाडीवरहि जर्मन सेनानींच्या पदरीं अपयशच पडत आहे. अशा स्थितींत हिटलर चढाईची दर्पोक्ति कशी उच्चारणार ? युरोपांतील राष्ट्रांचें बॉल्शेव्हिकांपासून रक्षण करण्याचें पवित्र कार्य जर्मनीनें स्वीकारलें असून त्यांत आपण अखेर यश मिळवणार अशी नाझींची अढळ श्रद्धा असल्याचें सांगून हिटलरला आपल्या लोकांस धीर द्यावा लागला आहे. असल्या भाषणानें जर्मन जनतेचें सांत्वन कसें होणार आणि तिचा खचत असलेला उत्साह कसा जागृत होणार हें समजणें कठीण आहे. नात्सी पक्षाची जर्मन जनतेवर मजबूत पकड आहे, तिच्या आधारावरच केवळ विसंबून हिटलरला युद्धाचें होमकुंड पेटत ठेवावें लागत आहे. मि. क्लेमंट ॲटली ह्यांनी ह्या गोष्टीचा एका भाषणांत उल्लेख करून नात्सींची प्रतिकारशक्ति नष्ट होईपर्यंत प्रस्तुत युद्ध जिंकतां येईल अशी कल्पना कोणीहि करून घेऊं नये असें ब्रिटिश जनतेस बजावलें, त्याचें रहस्य लक्षांत येणें आवश्यक आहे. हिटलरशाही अजून नष्ट व्हावयाची आहे आणि सर्वांत अवघड युद्धकार्य पुढेंच आहे अशी सावधगिरीची सूचना त्यांनीं केली आहे.

युद्धोत्तर हिंदी शिक्षणाची योजना

हिंदुस्थान सरकारचे शिक्षण सल्लागार, मि. सार्जंट, ह्यांची चाळीस वर्षांत पुन्या व्हावयाची शिक्षणप्रसाराची योजना प्रसिद्ध झाल्यापासून ह्या विषयाच्या चर्चेस चालना मिळाली आहे. सेंट्रल बोर्ड ऑफ एजुकेशननें त्या योजनेच्या आधारानें स्वतःच्या सूचना तयार करून त्या व्हाइसरॉयांच्या कार्यकारी मंडळाच्या पुनर्घटना समितीकडे पाठविल्या आहेत. राष्ट्रीय शिक्षणाची संपूर्ण योजना अमलांत येईल तेव्हां तिला २७७ कोटि रुपये खर्च येईल आणि चाळीस वर्षे लागतील. पहिलीं पांच वर्षे पूर्वतयारी व प्रचार ह्यांत घालवावीं लागून सात पंचवार्षिक हप्त्यांनीं ती पुरी केली जावी असें बोर्डाचें म्हणणें आहे. सहा ते चवदा वर्षांच्या मुलांस आणि मुलींस प्राथमिक व मध्यम प्रतीचें शिक्षण सक्तीनें देण्यांत आलें पाहिजे अशी त्यांची सूचना असून वर्धा शिक्षण योजनेंतलें हस्तव्यवसायाचें तत्त्व त्यानें मान्य केलें आहे. मुलांनीं स्वतः बनवलेल्या वस्तूंच्या विक्रीचा पैसा येईल त्यामधून शिक्षणाचा खर्च भागवण्याची वर्धा योजनेंतली कल्पना मात्र बोर्डास पसंत नाहीं. प्राथमिक शिक्षणांत इंग्रजी भाषेच्या अभ्यासास स्थान असूं नये आणि स्थानिक अपवाद सोडल्यास हाच नियम मध्यम दर्जाच्या शिक्षणक्रमास लागू करावा असा त्याचा आग्रह आहे. शिक्षणाचा चांगुलपणा कर्तबगार शिक्षकांवर अवलंबून असल्यानें शिक्षकांचा दर्जा व त्यांचें वेतन ह्यांत सुधारणा झाल्या पाहिजेत आणि स्त्री-शिक्षकांची संख्या वाढवली पाहिजे असेंहि त्यानें म्हटलें आहे. ह्या प्रकारची शिक्षणाची व्यवस्था झाल्यास तिला दर वर्षी २०० कोटि रुपयांचा खर्च येईल. हायस्कुलांत पात्रता असलेलीं मुलेंच निवडून घ्यावीं आणि त्यांत यांत्रिक व धंदेविषयक शिक्षणाची शाखा असावी. ह्या व्यवस्थेस वर्षांचे ५० कोटि रुपये लागतील. विश्वविद्यालयांस द्यावयाच्या सार्वजनिक ग्रँटसची योग्य वांटणी करण्यासाठी एक स्वतंत्र कमिशन असावें. ह्याबाबतच्या बोर्डाच्या योजनेचा वार्षिक खर्च पावणे सात कोटि रुपये होईल.

महाराष्ट्र बँकेची प्रगति

बँक ऑफ महाराष्ट्र लि. ला ३१ डिसेंबर, १९४३ अखेर संपलेल्या वर्षी ३६ हजार रुपये निवळ नफा झाला. त्यांतून भागीदारांना गतवर्षीप्रमाणेंच ४½% करमाफ डिव्हिडंड द्यावें अशी डायरेक्टरांची शिफारस आहे. रिझर्व्ह फंडांत १५ हजार रुपयांची भर पडणार आहे. अहवालाचें वर्षी बँकेनें जळगांव व नागपूर येथें शाखा उघडल्या. स्वतःच्या इमारतीकरितां बँकेनें १ लक्ष, ५ हजार रुपयांस जागा खरेदी केली आहे. हिंदुस्थान सरकारनें कांहीं अटींवर ठरलेले माल विकण्याची बँकेस परवानगी दिली आहे व त्या अटीप्रमाणें आर्टिकल्समध्यें सुधारणा करण्यांत याव-याची आहे. बँकेचें खेळतें भांडवल ७२½ लक्ष रुपयांवर गेलें आहे.

दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक लि., पुणें

[अध्यक्ष श्री. रा. ग. रा. साठे, यांनीं ता. ६ फेब्रुवारी रोजीं ७ व्या वार्षिक साधारण सभेचे वेळीं केलेलें भाषण.]

आज आपल्या बँकेच्या ७ व्या साधारण सभेच्या प्रसंगीं मी आपलें स्वागत करतों. चालूं सालींही बँकेनें बराच पुढचा टप्पा गांठला आहे. प्रगतीचे कांहीं ठोकळ आकडे आपल्या मुद्दाम निदर्शनास आणतों.

चालूं भांडवलांत वाढ रु.	८,८७,०००	९० टके.
खात्यांचे संख्येंत वाढ	७५९	६४ „
वसूल भांडवलांत वाढ रु.	३२,९४५	४२ „
नफ्यांत वाढ.		तिप्पट

बँकेचा व्यवहार नेहमीप्रमाणेंच शक्य त्या बाबतींत काटकसरीचा पण जरूर त्या बाबतींत–उदाहरणार्थ नोकर लोकांस बोनस व महागाई भत्ता–सढळ असाच ठेवण्यांत आला आहे.

चालूं सालीं खर्चाचें प्रमाण ·८२% होतें. तेंच गेल्या वर्षी १·२% होतें.

आपली बँक केवळ नफा मिळविण्याच्या हेतूनें निघालेली नसून कांहीं विशिष्ट उदात्त हेतू पुढें ठेवून स्थापन करण्यांत आली आहे, हेंही आपणांस माहीत आहेच, व सुरवातीपासून संचालक मंडळाचें धोरणही त्याच हेतूस धरून आखण्यांत आलें आहे. आपणांस कळविण्यास आनंद वाटतो कीं चालूं सालीं आपल्या बँकेनें केलेल्या एका व्यवहारामुळें महाराष्ट्राच्या आर्थिक व्यवहारांत एक क्रांतिकारक घटना निर्माण केली व तो व्यवहार म्हणजे " कॉमनवेल्थ कंपनी "स दिलेलें जीवदान–नुसतेंच जीवदान नव्हे तर महाराष्ट्रांतच तिचें वास्तव्य कायम राखणें. या व्यवहारांत एक अतिशय मोठी जोखीम पत्करावयास पाहिजे होती व ती बँकेचे व्यवहारास तोषीस लागूं न देतां बँकेच्या संचालक मंडळीनीं वैयक्तिक जबाबदारीवर पत्करली. महाराष्ट्राचा आर्थिक इतिहास कधीं काळीं लिहिला गेल्यास त्यांत हा व्यवहार क्रांतिकारक म्हणून सुवर्णाक्षरांनींच नमूद केला जाईल अशी मला खात्री वाटते. या मोठ्या व्यवहाराशिवाय इतरही, जे कांहीं व्यवहार आपल्या बँकेनें केले त्यामुळें निरनिराळ्या कारखान्यांस डोकें वर काढण्यास मदत झाली आहे हेंही नमूद करण्यास मला आनंद वाटत आहे.

तथापि, आपण लक्षांत ठेवणें जरूर आहे कीं, बँकेच्या यशाची व उपयुक्ततेची खरी कसोटी युद्धोत्तर कालांत ठरणार आहे. युद्ध परिस्थितींत हिंदुस्थानांत अनेक नवीन धंदे निघाले पण महाराष्ट्र औद्योगिक क्षेत्रांत आधींच मागासलेला व व्यापारी मनोवृत्ति नसलेला असल्यामुळें युद्धामुळें मिळालेल्या संधीचा मुंबई सोडल्यास महाराष्ट्रानें फारच थोडा उपयोग करून घेतल्याचें दिसून येतें.

राजकीय कोंडी फुटून आर्थिक स्वातंत्र्य हिंदुस्थानचे वाट्यास न आल्यास युद्धोत्तरकालीं जागतिक चढाओढीस व विशेषतः ब्रिटिश व अमेरिकन मालाचे चढाओढीस हिंदी धंद्यास तोंड यावें लागणार आहे व तें विशेषतः महाराष्ट्रांतील छोट्या व असंघटित धंद्यास विशेष जाचण्याचा संभव आहे. अशा कठीण वेळीं महाराष्ट्रांतील धंद्यास औद्योगिक बँकेची खरी गरज भासणार आहे व त्याकरतां आपल्या बँकेनें थोडीफार तयारी करून ठेवणें जरूर आहे. चालूं वर्षाच्या नफ्याच्या वाटणीकडे आपण लक्ष दिल्यास अशी तरतूद आपण अंशतः कां होईना करून ठेवीत आहों हें आपल्या लक्षांत येईल.

ए. बी. सी. कॉइल्स

(डासांच्या उदबत्त्या)

बॉक्समध्यें १२. बॉक्स किं. १० आणे.

रात्रभर जळतात.

लायसॉफ

केसांतील उवांवर आश्चर्यकारक शोध.

उवा १ तासांत मरतात

बाटली किं. १ रु. ★ दोन वेळां उपयोग.

दि मागोरा केमिकल कं. लि.

— टिळक रोड, पुणें २. —

पुण्यांतील

आदर्श निवासस्थान व भोजनालय

छाया लॉजिंग व बोर्डिंग हाउस

बुधवार चौक, पुणें २.

विमेदार नि हवाई हल्ला

शत्रुराष्ट्राकडून हवाई हल्ला अगर तत्सम उपद्रव यापासून बिनलढाऊ नागरिकांच्या जीविताला येणाऱ्या धोक्याचा समावेश विमा पॉलिसीच्या अटींत होतो काय व त्यासाठी जादा प्रिमिअम भरावा लागेल काय ! असा प्रश्न साहजिकच नागरिकांमध्यें चर्चिला जात आहे.

ट्रस्ट ऑफ इंडिया

विमा कंपनीच्या

विमा पॉलिसीमध्यें हवाई हल्ल्यामुळें जीवितालाहोणाऱ्या अपायाचा अंतर्भाव होतो त्याकरितां जादा प्रिमिअम नाहीं.

तरी विलंब न लावतां—

तुमचा नि तुमच्या आप्तेष्टांचा विमा

ट्रस्ट ऑफ इंडिया

विमा कंपनीतच उतरा.

अध्यक्ष—श्रीमंत सरदार जमखाय महाराज पंडित

माहितीपत्रकें विनामूल्य पाठवूं

ट्रस्ट ऑफ इंडिया विमा कं. लि., लक्ष्मी रोड, पुणें २ | वि. ह. देशमुख, बी. ए. जनरल मॅनेजर

आंधळा अंपायर !

WHAT'S THAT?

कौरवपांडवांचा द्यूताचा सामना चालूं असतां महात्मा विदुरांनीं कपटी शकुनीमामांचें कारस्थान हेरून खुद्द धृतराष्ट्रांस हा सवाल केला ! पण तो बिचारा काय उत्तर देणार ?
आधींच आंधळा ! त्यांतून पुत्रमोहानें मोहांध !!

रॉयल रत्न १८ वें मराठी भाषेंत

★ महात्मा विदुर ★

दिग्दर्शक:—रेजिसॉर, पार्श्वनाथ आळतेकर कला:—बाबूराव पेंटर

भूमिका:—के. विष्णुपंत पागनीस दुर्गा खोटे, मनोहर घटवाई, नायमपल्ली, प्रल्हाद, सीता जव्हेरी.

आर्यन, पुणें — दररोज तीन खेळ दुपारीं ३। ६॥ व १० वाजतां दर रविवारीं सकाळीं १० वा. — ८ वा आठवडा

जादा खेळ

मुंबईच्या मार्गावर !

मुंबईत "रामराज्या" चा रौप्यसमारंभ साजरा होत आहे. इतर शहरें मुंबईचाच मार्ग आक्रमण करीत आहेत.

—१५ वा आठवडा—

प्रकाश पिक्चर्सचा पौराणिक मराठी बोलपट

रामराज्य

दिग्दर्शक:—विजय भट्ट.

भूमिका:—शोभना, समर्थ, चंद्रकांत, काळे, सोहनी.

मिनर्व्हा, पुणें

रोज फक्त दोन खेळ

६। व १० वाजतां

दर शनि. रवि. सोम. व इतर सुटीचे दिवशीं जादा खेळ दुपारीं २॥। वाजतां

आडाचं पानी लई खोल !

कविवर्यांची प्रतिभा जागृत करणाऱ्या पनघटावरील पनिहारीस तिच्या मैत्रिणीनें इषारा दिला कीं बाई गं—

" लचक न जाना.....
.....घडा है तेरा भारी "

—ग्लोब पुणें—

शनिवार ता. ५ पासून सुरू—

प्रकाश पिक्चर्सचा

पनघट

भूमिका:—रत्नमाला, उमाकांत, जीवन

दररोज ६॥ व १० वाजतां

शनि. रवि. सोम. दुपारीं ३॥ वाजतां जादा खेळ.

दररोज सकाळीं १० ते १२ व दुपारीं ४ चे पुढें तिकिटें रिझर्व्ह केलीं जातील.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनी 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
हालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
(टपाल खेरीज माफ)
किरकोळ अंकास
दोन आणे.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. मो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष १० पुणें, बुधवार, तारीख १६ फेब्रुवारी, १९४४ अंक ७

न्यू इंडिया इंडस्ट्रीज लि.
(Approved Re-traders and Approved Contractors)
२६ लॅमिंग्टन नॉर्थ, मुंबई ११.
अध्यक्ष:—श्री. ग. स. मराठे, ॲक्चुअरी.
महाराष्ट्रांतील रबराचा प्रमुख कारखाना
★ गिरणीचे रोलर्स ★ रबरी हातमोजे ★ छापखान्यांचे रोलर्स
★ रीमोल्ड टायर्स ★ रबरी वॉशर्स ★ सॉलिड व्हील्स
व इतर रबरी माल तयार होतो.
पु. ग. मराठे
मॅनेजिंग डायरेक्टर.

पुना गेस्ट हाऊस
१००, लक्ष्मी रोड, पुणें २.
Telephone 779
GUEST HOUSE
TELEGRAM Guest House Poona 2.

महायुद्धाची जाणीव ! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.
गिरगांव मुंबई नं. ४
महिंद्रकर ब्रदर्स
तयार कपड्याचे व्यापारी
बुधवार चौक, पुणें

विविध माहिती

अमेरिकेंत अन्नसामुग्रीचें वाढतें उत्पादन.

गेल्या वर्षी हवापाणी विशेष अनुकूल नसताहि अमेरिकेंत सर्व पदार्थांच्या उत्पादनानें उच्चांक गाठला. ओळीनें एकामागून एक सात वर्षांच्या अवधींत अमेरिकेंत पिकें चांगलीं आलीं आहेत. १९३५-३९ च्या सरासरीच्या मानानें, १९४३ मध्यें सर्वपदार्थांचें अमेरिकेंतील उत्पादन ३२ टक्क्यांनीं अधिक होतें.

मुंबई प्रांतिक बँकेची येवले येथील उपशाखा

मुंबई प्रांतिक सहकारी बँकेच्या येवले उपशाखेचा उद्घाटन समारंभ ता. ३० जानेवारी १९४४ रोजीं झाला.

नारिंग पोळी

नारिंगें, मोसंबीं व संत्रीं ह्या जातींच्या फळांवर पॅलेस्टाइनमध्यें प्रयोग चालले आहेत आणि त्यांची कणसू पोळीसारखी पोळी बनवतां येऊन त्यांचा मूळचा स्वाद तीमध्यें कायम राहील अशी अपेक्षा आहे.

पाइनपासून पेट्रोल

पाइन झाडांच्या बुंध्यांपासून पेट्रोल तयार करण्यांत एका चिनी शास्त्रज्ञानें यश मिळवलें आहे. हें पेट्रोल सध्या चीनमध्यें वापरण्यांत येत आहे आणि ह्या युद्धोपयोगी साधनाच्या तुटवड्याचा प्रश्न सोडवण्यास त्या देशास मदत होत आहे.

टेकडीवर
★ ★ ★
दोन विहिरींच्या
पाण्याची सोय !
★ ★ ★

रामबाग कॉलनी

१८७ पैकीं ११५ प्लॉटस् खपले!

प्रत्येक प्लॉटची किंमत रु. ५०० ते १०००.

टेकडीखालीं
★ ★ ★
तीस फुटी
अकरा रस्ते.
★ ★ ★

उत्तर



पश्चिम पूर्व

दक्षिण

पुढील प्लॉटस् विकणें आहेत (टेकडीखालीं) नं. १, २, ३, १३, १४, ५५, ६०, ६१, ७२, ९३, ९४, ९५, ९८, ९९, १००, १०१, १०४, १०९, ११०, ११७, ११८, ११९, १२०, १२१, १२४. (टेकडीवरील) १२९, १३०, १३१, १३२, १३३, १३४, १३५, १३६ १३७, १३८, १३९, १४०, १४४, १४५, १४६, १४७, १४८, १४९, १५०, १५१, १५२, १५३, १५४, १५५, १५७, १५९, १६०, १६१, १६२, १६३, १६४, १६५, १६६, १६७, १७०, १७१, १७२, १७३, १७४, १७५, १७६, १८१, १८२, १८३, १८४, १८५, आणि १८७—एकूण ७२.

खालील पत्त्यावर भेटावें:—
समक्ष भेटण्याची वेळः—दररोज रात्रौ ८ ते १०
फक्त रविवारीं सकाळीं ९ ते १२.

म. य. दातार,
"दयानिवास" नं. १२, कॉमनवेल्थ कॉलनी, पुणें नं. २.

अनुक्रमणिका

	पृष्ठ
१ विविध माहिती	... ५०
२ गेल्या वर्षाचा आर्थिक आढावा (२)	...५१
३ विभेदारांच्या परस्पर हित-संबंधांची प्रमाणबद्धता	...५२
४ स्फुट विचार ... संयुक्त राष्ट्रांच्या अन्नपुरवठा योजनेंत हिंदुस्थानचा भाग–कोळशाच्या खाणींत काम करणाऱ्या स्त्रिया-कोळशाच्या खाणींतील मजुरांसाठीं सुखसोयी–हिंदी धंदेवाल्यांची राष्ट्रीय सरकारविषयीं मागणी	...५३ ...
५ युद्धाचा चलन व बाजार भाव यांवरील परिणाम	...५५
६ वालचंदनगर इंडस्ट्रीज लि.	...५५

अर्थ

बुधवार, ता. १६ फेब्रुवारी, १९४४

गेल्या वर्षाचा आर्थिक आढावा

(२)

वरील शीर्षकाखाली ता. १९ जानेवारीच्या " अर्था " मध्यें मुंबई येथील शेअर ब्रोकर्स, मे. आर. आर. नाबर आणि कंपनी यांच्या " Review of the year 1943 and Prospects for 1944" या वार्षिक पुस्तकाचा परामर्श घेतांना आंतरराष्ट्रीय लष्करी परिस्थिती, युद्धखर्च, चलनवाढ व महागाई, सट्टेबाजीस आळा घालण्याचा प्रयत्न इत्यादि गोष्टींचा उल्लेख करून आम्हीं उद्योगधंद्यांची पार्श्वभूमी स्पष्ट केली. आतां सरकारी रोखे, प्रेफरन्स भाग व बँका आणि विमा कंपन्यांचे भाग यांसंबंधीं विवेचन येथें करावयाचें आहे. सरकारी रोख्यांस सतत मागणी राहिल्याकारणानें त्यांचे भाव चढीचे राहिले व रिझर्व्ह बँक चार नवीं कर्जे यशस्वीरीतीनें विकूं शकली. युद्धाच्या शेवटासंबंधाच्या अपेक्षांत अनुकूल सुधारणा, कर्जविषयक धोरणांतील चातुर्य, इत्यादि कारणांमुळें हा फरक घडून आला. हिंदुस्थान सरकारच्या प्रत्येक नव्या कर्जाच्या अटी सरकारास अधिकाअधिक अनुकूल व कर्ज देणारास प्रतिकूल होऊं लागल्या व जुन्या कर्जाच्या किंमती वाढूं लागल्या. सरकारनें रोख्यांच्या किमान किंमती २ मार्च, १९४३ रोजीं प्रथम ठरविल्या, त्यांत २ सप्टेंबर रोजीं व ११ डिसेंबर रोजीं पुनः वाढ करण्यांत आली. अर्थात्, रोख्यांच्या बाजारांतील प्रत्यक्ष किंमती किमान किंमतीपेक्षा ज्यास्तच होत्या. २३ डिसेंबर, १९४२ ते २३ डिसेंबर, १९४३, या बारा महिन्यांतील रोख्यांच्या किंमतीमधील तुलनात्मक वाढ खालील तक्त्यांत दर्शविली आहे:—

रोख्यांचे बाजारभाव

	२३-१२-१९४२ रु. आ.	२३-१२-१९४३ रु. आ.
३½% सरकारी रोखे	९३–१०	९७–१०
३% १९५३–६५	९३–१०	९८–८
४% म्हैसूर १९५३-६३	११७–०	१२४–०
३% सी. पी. लोन, १९५५	९७–१२	९९–६
४% मुंबई पोर्टट्रस्ट (दीर्घ मुदत)	१०८–०	११३–०

रोखे धारण करणारांना त्यांच्या रकमांवर २·६८% निवळ व्याज सुटतें. युद्धाच्या प्रारंभीं ३·२७% व्याज सुटत होतें. म्हणजे, ०·५९% व्याज कमी सुटूनहि सरकारी रोख्यांची किंमत वाढत आहे, ही गोष्ट विशेष उल्लेखनीय आहे. जोंपर्यंत व्याजाचें दर स्वस्त राखण्याचें सरकारी धोरण कायम आहे, तोंपर्यंत सरकारी रोखे खाली उतरणें संभाव्य नाहीं.

प्रातीवरील करमाफ प्रेफरन्स भागांना गेल्या वर्षी विशेष मागणी होती. त्याचप्रमाणें, ज्या प्रेफरन्स भागांना यापूर्वी डिव्हिडंड मिळालें नाहीं त्यांचें बाकी राहिलेलें डिव्हिडंड मिळण्याची अपेक्षा व कांहीं प्रेफरन्स भागांना ऑर्डिनरी व इतर प्रेफरन्स भागांचें डिव्हिडंड देऊन झाल्यावर पुनः नफावाटणींचा हिस्सा मिळण्याची आशा, अशा विविध कारणांमुळें प्रेफरन्स भाग कायम तेजींत राहिले. या संबंधांत खालील तक्ता उद्बोधक आहे:—

प्रेफरन्स भागांचे बाजारभाव

	वसूल भांडवल	२३–१२–४२ रु.	२३–१२–४३ रु.
न्यू व्हिक्टोरिया	५	१०–१२	१५–२
५% स्टील कॉर्पो *	१००	११२–०	१३०–०
५% सें. इंडिया *	५००	६८२–८	७३१–४
७½% टाटा स्टील ड्. प्रे.	१००	१२५–०	१५४–८
६½% प्री. कन्स्ट्रक्शन	१००	१२३–०	१३६–८
३% ब्रँडबरी मिल्स	२५०	२८२–८	५५५–०
५½% टाटा मिल्स	२५	३७–०	१४१–८

(*) कर माफ)

१९४२ हें वर्ष बँकांना फारच चांगलें गेलें व बहुतेक सर्व बँकांच्या नफ्यानें उच्चांक गांठला. रिझर्व्ह बँकेस ३० जून, १९४३ अखेरच्या वर्षी ७ कोटि, ७० लक्ष रुपये नफा झाला. ३० जून, १९४४ अखेरच्या नफ्याचा आकडा यापेक्षाहि वाढणार हें उघड आहे. युनायटेड कमर्शिअल बँक, भारत बँक, जयपूर बँक, हिंदुस्थान कमर्शिअल बँक, या बँका गेल्या वर्षी नव्यानेंच स्थापन झाल्या व त्यांचें अधिकृत भांडवल अनुक्रमें ४ कोटि रुपये, १० कोटि रुपये, २ कोटि रुपये, व ५ कोटि-रुपये आहे. सर्वच बँकांचे भाग तेजींत राहिले व नव्या बँकांचें पहिलें वर्ष पुरें होण्याचे अमोदरच त्यांच्या भागांची किंमत वसूल भांडवलाच्या जवळ जवळ दिढीपर्यंत चढली !

बँकांच्या भागांचे बाजारभाव

	वसूल भांडवल	२३–१२–४२ रु.	२३–१२–४३ रु.
रिझर्व्ह बँक	१००	१००–८	१३१–०
इंपीरिअल	५००	१६५०–०	१९७०–०
बँक ऑफ इंडिया	५०	१५५–०	२२३–८
बँक ऑफ बरोडा	५०	१२९–०	१४६–०
सेंट्रल बँक	२५	५६–८	८७–८
पंजाब नॅशनल	१००	२२०–०	३७५–०

विमा कंपन्यांचे भाग

बँकांप्रमाणें विमा कंपन्यांसहि १९४२ हें वर्ष चांगलें गेलें व आयुष्याच्या विम्याप्रमाणें इतर विम्याचेहि कामांत वाढ झाली.

मरमसाठ बोनस देण्याचे चाईवर विमासातें आळा घालीत आहे व कंपन्या आपल्या हप्त्यांचे दरहि बदलेल्या परिस्थितीस अनुसरून सुधारून घेत आहेत. ज्या कंपन्यांचे सर्च बेसुमार होते किंवा ज्यांना प्रमाणाबाहेर नुकसान आलें, अशा कंपन्यांवर आपले व्यवहार सुधारण्यास सक्ती झाली व ज्या कंपन्यांची स्थिति मर्यादेपलीकडे बिघडली, अशांना काम बंद करावें लागलें. चांगल्या कंपन्यांचे मात्र १९४२ साली तेजीत राहिले; ती तेजी मात्र प्रमाणाबाहेर होती, असें म्हणावें लागतें. खालील तक्त्यांत प्रमुख कंपन्यांच्या मार्गाच्या किंमतीमधील वाढ दाखविली आहे:-

	१-९-३९	२२-१२-४२	२१-१२-४३
	रु.	रु.	रु.
ओरिएंटल	४,३००	४४१०	६१६०
न्यू इंडिया	३५-१२	५६-४	८८-०
ग्लकन	७-१	११-१२	१७-८
न्युपिटर	१२-१०	१६-१०	३०-४

विमेदारांच्या परस्पर हितसंबंधांची प्रमाणबद्धता

नफ्यासह व नफ्याविरहित विमा

व्याजाचे दर उतरत चालले आहेत, त्याचा परिणाम विमा-कंपन्यांच्या उत्पन्नावर झाला आहे. आयुर्विम्याचे हप्ते ठरवितांना ज्या गोष्टी ध्यानांत घ्यावयाच्या असतात, त्यांपैकी कंपनीस मिळावयाच्या व्याजाचा अपेक्षित दर, ही एक बाब असते. व्याजाचे दर उतरत चालले, तर त्या प्रमाणांत साहजिकच कंपन्यांचें उत्पन्न घटतें. ग्रेटब्रिटनमधील विमा कंपन्या आपले पैसे खुषीनें मोठ्या प्रमाणांत सरकारी रोख्यांत गुंतवीत आहेत व हिंदुस्थानांतील कंपन्यांना कांहीं ठराविक प्रमाणांत सरकारी रोख्यांचा अवलंब करणें भाग पडत आहे. परंतु दोन्हीं ठिकाणीं कंपन्यांचें व्याजाचें उत्पन्न कमी झालें आहे. हिंदी कंपन्यांचें मूल्यमापन आतां २½% दरानें करण्याची पाळी आली आहे. हिंदी कंपन्यांचें मूल्यमापन गेलीं कित्येक वर्षे ५%, ४½% अशा दरानें करण्यांत आलेलें आहे. ह्यावरून आतां परिस्थितींत किती पालट झालेला आहे, हें लक्षांत येईल. ह्याचा परिणाम मूल्यमापनांत कमी वाढावा उरण्यांत अथवा तूट येण्यांत होईल व विमा कंपन्यांना आपले खर्च कमी करून उत्पन्न वाढविण्यासाठीं हप्त्यांचीं कोष्टकेंहि सुधारून घ्यावीं लागतील.

(१) ज्या विम्यांना नफ्यांत भागी नसते व (२) ज्या विम्यांना नफ्यांत भागी मिळते अशा दोन प्रकारचे आयुर्विमे असतात. पहिल्या प्रकारांत, विमा मंडळीला होणारा नफा विमेदारांना मिळत नाहीं; परंतु नफ्यासह विम्यांना बोनस मिळतो. नफ्यासह योजनेंत नफ्याशिवाय योजनेपेक्षा जास्त हप्ता भरावा लागतो, हें उघड आहे. अर्थात्, ज्यास्त घेतला जाणारा हप्ता तेवढाच नफा म्हणून विमेदारांस परत मिळतो, असें नाहीं. विम्याचा धंदा कंपनीनें फायदेशीर केला, तर नफ्याशिवाय विम्याचे योजनेस त्या नफ्याची वांटणी मिळत नाहीं; परंतु वाटणी मिळण्यासाठीं ज्यास्त हप्ता देणारांना मात्र वाटणींत भागी मिळूं शकते. चांगल्या कंपन्यांच्या बोनसचा दर पुष्कळ मोठा असतो व नफ्यासह योजनेंतील विमेदारांना जादा हप्ता देणें किफायतशीरच ठरतें. ह्या बोनसच्या अपेक्षेनें लोक नफ्यासह विम्याचाच अवलंब करतात. असें दिसून येतें.

आतां काय परिस्थिति झाली आहे ! विमा कंपन्यांना पूर्वीप्रमाणें नफा होणें अशक्यप्राय झालें आहे व त्यांचे बोनसचे दर उतरले आहेत. कांहीं कंपन्यांचा बोनस बंदहि झाला आहे. आपणांस बोनस मिळेल, ह्या अपेक्षेनें जादा हप्ता भरणारे विमेदार नफ्याविरहित योजनेंतील विमेदारांचे बरोबरीनेंच येऊन बसले आहेत, ह्यामुळें विमेदारांत, एकमेकांचे हितसंबंध लक्षांत घेतां, विषमता उत्पन्न झालेली आहे. नफ्याविरहित योजनेंतील विमेदारांनाहि नफ्यासहित विमेदाऱ्यांप्रमाणेंच, सद्यःस्थितिजन्य परिणाम कां भोगावा लागूं नये, असा प्रश्न उपस्थित होतो. बोनसच्या अपेक्षेनें ज्यांनीं जादा हप्त्यांचा बोजा स्वीकारला, त्यांनींच सध्याच्या परिस्थितीचा परिणाम प्रथम भोगला पाहिजे, ह्या म्हणण्यांत तथ्य नाहीं, असें नाहीं. तथापि, विमाकंपन्यांच्या अधिकाराबाहेरील परिस्थितीचा विमेदारांपैकी एका विवक्षित वर्गावरच विशेष प्रतिकूल परिणाम होत आहे, हें मात्र निश्चित. ही परिस्थिति अपेक्षित नव्हती, म्हणून तिच्या दुष्परिणामांचा सबंद बोजा त्यांचेवरच बसूं नये, हें म्हणणें विमापत्रकांतील करारास अर्थातच धरून नाहीं.

विमेदारांना योग्य बोनस मिळूं लागणें, हाच ह्या घटनेवर सर्वांत चांगला उपाय आहे. त्यासाठी हप्ते वाढविले पाहिजेत. विम्याचे हप्ते वाढवितांना, नफा वाटणीस पात्र नसलेल्या विम्यांचे हप्ते सध्या मुळींच परवडत नाहींत म्हणून त्यांत वाढ करावयाची व नफ्यासह विम्याचे हप्ते त्या मानानें वाढवावयाचे नाहींत, असें धोरण ठेवणें चुकीचें होईल. दोन्ही प्रकारच्या विम्यांचे हप्त्यांत, विमेदारांना मिळावयाच्या रकमांचे प्रमाणांतच वाढ झाली पाहिजे, हें उघड आहे. त्याचप्रमाणें एकाच गटांतील वेगवेगळ्या विम्यांच्या अटीहि सर्व विम्यांचे दृष्टीनें योग्यायोग्य विचार करूनच ठरविल्या पाहिजेत. बोनसच्या वाटणीच्या नियमांतहि कांहीं सुधारणा करणें शक्य होईल. नफ्यासह व नफ्याविरहित विम्यांचे स्वतंत्र हिशेब राखणेंहि अशक्य होणार नाहीं, व ते तसे ठेवले तर नुकसानीचा बोजा दोन्हीं प्रकारच्या विम्यांवर योग्य प्रमाणांत टाकतां येणें शक्य होईल. विमेदारांनीं भरलेल्या हप्त्यांचे व अपेक्षेचे प्रमाणांत नफा नुकसानीची वाटणी आज होत नाहीं व ती काटेकोरपणानें होणें कठीण आहे. तथापि, ह्यासंबंधांतील एक महत्त्वाचा मुद्दा ह्या दृष्टीनें वरील विवेचन विमेदारांस मार्गदर्शक होण्याजोगें आहे. विमा कंपन्यांनीं हप्ते बदलण्यास उशीर लावला तर कोणत्या प्रकारचा विमा आपणांस सध्याच्या परिस्थितींत फायदेशीर आहे, हें विमेदारांस कळणें अगत्याचें आहे. अर्थात व्याजाचें उत्पन्न, मृत्यूंचें प्रमाण, इत्यादि संबंधांतील स्थिति बदलली तर आजचा निर्णय हाच योग्य निर्णय ठरेल, असें मात्र नाहीं. विम्याचा करार दीर्घ मुदतीचा असतो, ह्या दृष्टीनेंच त्याचा विचार केला पाहिजे. अल्पकालीन गोष्टींचा विम्याचे धंद्यावर दीर्घकालीन अनुकूल वा प्रतिकूल परिणाम जसा होत नाहीं त्याचप्रमाणें धंद्याची परिस्थिति सुधारण्यासहि थोडा काळ पुरा पडत नाहीं, हें ध्यानांत घेऊनच विमा कंपन्यांनीं आपल्या व्यवहाराची पुनर्रचना केली पाहिजे व विमेदारांनीं आपल्या विमा पॉलिसींची निवड केली पाहिजे.

हिंदुस्थानांतील मायका

मायका ह्या खनिज धातूचा सबंद जगांत जेवढा पुरवठा होतो, त्यांपैकी ८० टक्के हिंदुस्थानांतील मायक्याचा असतो.

स्फुट विचार

संयुक्त राष्ट्रांच्या अन्नपुरवठा-योजनेंत हिंदुस्थानचा भाग

शत्रूच्या तावडींतून मुक्त केलेल्या देशांस युद्ध संपतांच अन्न, कापड इत्यादि जीवनास जरूर असलेल्या जिनसांचा पुरवठा करावा लागेल, त्यासाठी चवेचाळीस संयुक्त राष्ट्रांनीं जी व्यवस्था उभारली आहे तींमध्यें हिंदुस्थान सरकार भाग घेत आहे. शत्रूनें उध्वस्त केलेल्या देशांसच ही मदत मर्यादित न होतां त्याच्याशी होणाऱ्या लढायांच्या दृष्टीनें महत्वाचे असलेले हिंदुस्थानांतील बंगाल, आसामसारखे प्रांतहि त्या योजनेंत यावे अशा आशयाची सूचना अमेरिकन कॉंग्रेसमध्यें केली गेली आहे आणि ती चवेचाळीस राष्ट्रांच्या संघटनेस मान्य होईल अशी अपेक्षा आहे. आतां हिंदुस्थानपुढें प्रश्न आहे तो प्रस्तुत संयुक्त राष्ट्रांच्या उपक्रमास लागणाऱ्या खर्चापैकीं किती भाग हिंदी सरकारनें सोसावा ह्याविषयीं आहे. मध्यवर्ती कायदेमंडळाच्या येत्या अधिवेशनांत ह्या खर्चास सरकारला मान्यता मिळवावी लागेल. संयुक्त राष्ट्रांच्या योजनेपासून हिंदुस्थाननें फटकून रहाणें अनिष्ट व अशक्य आहे ह्यांत वाद नाहीं. ह्या देशास तिच्या अंमलबजावणीचा किती खर्च झेपेल आणि त्यानें किती वर्गणी व सहाय्य द्यावें हाच येथें महत्त्वाचा मुद्दा आहे.त्याचा निर्णय करतांना हिंदुस्थानची आर्थिक परिस्थिति व सांपत्तिक शक्ती हीं लक्षांत घ्यावीं लागतील. खर्चाच्या दोन बाबी आहेत. चालू व्यवस्थेस लागणारा खर्च आणि आपद्ग्रस्त देशांस द्यावयाची मदत. ह्यांतला किती अंश हिंदुस्थानच्या वाट्यास यावा हेंच ठरवणें महत्वाचें काम आहे. मूळ कल्पनेप्रमाणें १९४४ सालचा चालू खर्च एक कोटि डॉलर्स होईल त्यापैकीं ४० टक्के अमेरिका सोशील आणि इंग्लंड व रशिया ह्यांच्या वाट्यास प्रत्येकी १५ टक्के येतील. चीनचा वाटा ५ टक्के व हिंदुस्थानचा ४ टक्के आहे. दुसऱ्या प्रकारच्या खर्चास द्यावयाच्या वर्गणीबाबत असें ठरलें आहे कीं जून, १९४१ अखेरच्या वर्षांतलें प्रत्येक सभासद राष्ट्राचें जें उत्पन्न असेल त्याचा १ टक्का त्यानें द्यावा. हिंदुस्थानसारख्या देशाच्या दृष्टीनें हा वर्गणीचा बोजा असह्य आहे. कारण ही रक्कम २०-२५ कोटि रुपये होईल. म्हणून प्रत्येक देशाची परिस्थिति लक्षांत घेतली जाऊन हा आकडा ठरवण्यांत येईल अशी व्यवस्था मूळ घटनेंत आहे आणि हिंदुस्थानास हा अपवाद लागू करावा लागेल. शिवाय, स्वतः हिंदुस्थान मदतीस पात्र व्हावयाचा आहे तेव्हां एका हातानें त्यास सहाय्य घ्यावयाचें आणि दुसऱ्या हातानें मदतीचा हिस्सा त्याचेकडून घ्यावयाचा हें शक्य व उचित होणार नाहीं. अमेरिकन कॉंग्रेसपुढें आलेली सूचना सर्वमान्य झाल्यास हिंदुस्थाननें द्यावयाच्या आणि घ्यावयाच्या सहायाची बजावाट होऊन ह्या देशास मिळणें योग्य असलेल्या मदतीची बरीच मोठी बाकी शिल्लक उरेल.

कोळशाच्या खाणींत काम करणाऱ्या स्त्रिया

कोळशाच्या खाणींत स्त्रियांनीं काम करणें अपायकारक आणि अनिष्ट असल्यानें त्यांना अशा प्रकारचें काम करण्यास लावण्यास कायद्यानें हिंदुस्थानांत बंदी केलेली होती, ती विशिष्ट युद्धपरिस्थितींत काढून घेण्यांत आली आहे. दगडी कोळशाचा तुटवडा त्याची निर्गत होते म्हणून भासत आहे असें मानणें वस्तुस्थितीस सोडून आहे आणि त्याच्या अपुऱ्या पुरवठ्याचीं कारणें निराळीं आहेत असा खुलासा सरकारच्या वतीनें करण्यांत आला आहे. खाणींत काम करण्याची स्त्रियांस परवानगी देण्यांत आली आहे ती सध्याच्या विशिष्ट परिस्थितीच्या मुद्दतीपुरतीच आहे आणि आपल्या स्त्रिया स्वतःच्या बरोबर काम करण्यास असाव्या असा पुरुष कामकऱ्यांचा आग्रह असल्यानें व त्यांची संख्या घटूं नये, ह्या उद्देशानें प्रस्तुत नवी व्यवस्था अमलांत आणली गेली आहे असेंहि त्यांत म्हटलें आहे. खाणींत काम करणाऱ्या लोकांस उत्तेजन मिळावें म्हणून त्यांच्या गैरसोई दूर केल्या जात आहेत आणि त्यांस अधिक सवलती देण्यांत येत आहेत. स्त्री कामकऱ्यांसंबंधांतली बंदी सरकारनें उठवली आहे, त्याविषयीं कांहीं बाजूंनीं नापसंती दर्शविण्यांत येत आहे आणि तिचा प्रतिध्वनि ब्रिटिश कॉमन्स सभेंत कामकरी पक्षाच्या प्रतिनिधींनीं हिंदी सेक्रेटरी ऑफ स्टेटला विचारलेल्या प्रश्नांत उठला आहे. ह्यापैकीं एकास उत्तर देतांना मि. एमेरी ह्यांनीं खालील माहिती सांगितली. कायद्याप्रमाणें कोणाहि कामकऱ्यास एका आठवड्यांत सहा दिवसांपेक्षा किंवा एकूण चोपन्न तासांपेक्षा अधिक वेळ कामास लावतां येत नाहीं. एका दिवसांत खाणीच्या आंत नऊ तास व वरती दहा तास ह्यापेक्षा अधिक काळपर्यंत काम देतां येत नाहीं. १९४२ सालीं खाणीच्या आंत कामकरणारांची दररोजची मजुरी सरासरी १ रु. १० आ. ९ पै ते १० आ. ९ पै त्यांच्या दरम्यान खाणींच्या ऐपतीप्रमाणें होती. अलीकडे मजुरीचे दर वाढवण्यांत आले आहेत आणि ते युद्धापूर्वीच्या काळापेक्षा ५० टक्के अधिक आहेत. १९४२ मध्यें खाणींत २८७ अपघात झाले आणि त्यांत ३४२ माणसें प्राणास मुकून दीड हजारांस जबर व दहा हजारांस किरकोळ दुखापती झाल्या. खाणींत काम करणारांची एकूण संख्या सुमारें साडेतीन लक्ष होती. खाणींत काम करणारांस उत्तेजन मिळावें म्हणून आवश्यक असे उपाय योजले जात असल्याचें आश्वासन स्टेट सेक्रेटरींनीं दिलें.

कोळशाच्या खाणींतील मजुरांसाठीं सुखसोयी

हिंदुस्थानांतील दगडी कोळशाच्या खाणींत काम करण्यास आणखी मजूर हवे आहेत. कोशळाचा मध्या भासत असलेला तुटवडा भरून काढण्यास त्याचें उत्खनन वाढणें आवश्यक आहे. स्त्रियांना खाणींत काम करण्याची कायद्यानें केलेली बंदी ह्यासाठीच उठवण्यांत आली आहे. पुरेसे मजूर खाणींसाठीं मिळण्याकरितां त्यांतलें काम अधिक आकर्षक कां करीत नाहीं असा प्रश्न ब्रिटिश कॉमन्स सभेंत विचारला गेला असतां ह्यासंबंधांत जरूर ती तरतूद करण्यांत येत आहे असें उत्तर देण्यांत आलें होतें. ह्या बाबतींत हिंदुस्थान सरकारचा काय उपक्रम आहे ह्याचें दिग्दर्शन नुकतेंच करण्यांत आलें आहे. खाणींतील मजुरांस सुखसोयी पुरवण्यास पैसा लागणार आहे त्याकरितां एक फंड उभारण्याचें सरकारनें ठरवलें आहे. ब्रिटिश हिंदुस्थानांतील कोळशाच्या खाणींतून निघालेला कोळसा वहातुकीसाठीं रेल्वेजवर येईल तेव्हां त्याच्या प्रत्येक टनामागें एक आणा ते चार आणेपर्यंत पट्टी गोळा केली जाईल. खाणींचे मालक व मजूर ह्यांचे प्रतिनिधी असलेली एक सल्लागार समिती नेमण्यांत येईल आणि ह्या पट्टीचा दर तिच्या सल्ल्यानें ठरवला जाईल. हें काम तात्काळ चालू व्हावें ह्याकरितां हिंदुस्थान सरकारनें एक वटहुकूम काढला आहे आणि त्यास अनुसरून

कोळशावरील पट्टी बसवण्याचा अधिकार स्वतःस घेतला आहे. खाणींतील मजुरांची स्थिति सुधारण्याची सरकारची योजना स्वागतार्ह आहे. तिचा अपेक्षित इष्ट परिणाम मजुरांच्या संख्येवर, रहाणीवर आणि उत्पादकतेवर होऊन स्त्रियांस खाणींत काम करण्याची परवानगी तात्पुरती देण्यांत आली आहे तिची लवकरच आवश्यकता रहाणार नाहीं अशी आशा आहे.

हिंदी धंदेवाल्यांची राष्ट्रीय सरकाराविषयीं मागणी

लोकांच्या विश्वासांतलें आणि त्यांस जबाबदार असें मंत्रिमंडळ हिंदुस्थानच्या मध्यवर्ती सरकारांत स्थापन झाल्यावांचून या देशाच्या आर्थिक उद्धाराचा प्रश्न समाधानकारक रीतीनें सुटावयाचा नाहीं हें मत हिंदी उद्योगधंद्यांतील पुढाऱ्यांकडून स्पष्टपणें व्यक्त केलें जात आहे. युद्धोत्तर आर्थिक संवर्धनाची कोणतीहि योजना मध्यवर्ती सरकाराच्या विधायक कार्यक्रमानेंच यशस्वी होऊं शकणार आहे. भांडवलवाल्यांनीं त्यांस योग्य वाटतील ते धंदे काढावे किंवा चालवावे अशी बेफिकीरीची वृत्ती सरकारची असून चालणार नाहीं. राष्ट्रीय योजना म्हटली कीं तीमध्यें सरकारचा हात आलाच. शिवाय, युद्धपरिस्थितींत इतकीं सरकारी नियंत्रणें आज अमलांत आहेत कीं तीं एकदम दूर करणें घोटाळा उत्पन्न होण्यास कारणीभूत होतील. युद्धोत्तर आर्थिक घडी बेतावातानें सहेतुक रीतीनें बसवावी लागेल. यासाठीं लोकमतानुवर्ती मध्यवर्ती राज्यव्यवस्थेचें अगत्य आहे. पुनर्घटनाहि सरकार आणि जनता यांच्या सहमतानें व्हावी लागेल आणि ती अशी होईल तरच तिला यश येईल. मुंबईच्या इंडिअन चेंबर ऑफ कॉमर्सच्या वार्षिक सभेंत भाषण करतांना अध्यक्ष, श्री. हरिदास माधवदास यांनीं असें सांगितलें कीं, हिंदी धंदेवाल्यांच्या मतें या देशांत जबाबदार राष्ट्रीय सरकार स्थापन झाल्यावांचून स्वदेशी उद्योग व व्यापार यांची उन्नति होणें अशक्य आहे. हिंदुस्थान व ग्रेट ब्रिटन या देशांतील औद्योगिक पुढाऱ्यांचा विचारविनिमय घडवून आणण्याची एक योजना शिजत आहे तिला उद्देशून ते म्हणाले कीं सभ्यांचें परस्परांविषयींच्या अविश्वासाचें वातावरण शुद्ध झाल्याविना नुसत्या चर्चेचा कांहीं उपयोग होणार नाहीं. हिंदी व्यापार व धंदे यांतला आपला हिस्सा कमी किंवा नाहींसा होण्याची भीति ब्रिटिश धंदेवाल्यांस वाटते आणि या देशांतील मुख्य धंदे हिंदी वर्चस्वाखालीं राहिले पाहिजेत असा येथील औद्योगिक पुढाऱ्यांचा कटाक्ष आहे. हा अभिप्राय वर निर्दिष्ट केलेल्या इंडियन चेंबरच्या सभेंत श्री. प्राणलाल यांनीं व्यक्त केला. हिंदुस्थानांतील राजकीय वातावरण स्वच्छ होऊन सरकार लोकसत्ताधिष्ठित केलें जाण्याची आवश्यकता हिंदी धंदेवाले प्रतिपादित आहेत, त्याच्या मुळाशी देशाच्या आर्थिक नियोजनाचीं सूत्रें राष्ट्रीय वृत्तीच्या मध्यवर्ती सत्तेच्या हातीं असण्याचें सर्वांस वाटत असलेलें महत्त्व आहे. व्हायकौंट व्हेवेल यांनीं जें घडाडीचें आणि जनतेचें सहकार्य मिळवण्याचें धोरण स्वीकारलें आहे त्याचेयोगानें या प्रकारची अपेक्षा जागृत झाली आहे.

मद्रास अॅन्युइन्स फंड

दुष्काळितांसाठी उपयोगांत येणाऱ्या मोठागाड्या सार्वजनिक देणग्यांमधून लष्करांस देण्यासाठीं मद्रास प्रांतांत फंड गोळा करण्यांत येतो, त्याच्या तर्फेनें अशा १०६ गाड्या आतांपर्यंत हिंदी सैन्यास बहाल करण्यांत आल्या आहेत.

श्री दत्त कंपनी
७३५ शुक्रवार पेठ, पुणें २. दाणेआळी पोलिसचेटाजवळ
सर्व तऱ्हेचे काटे, वजनें व मापें, वेळेवर रिपेअर करून मिळतील.

दि इंडियन रियल इस्टेट कॉर्पोरेशन लिमिटेड
बालमुकुंद रोड, रविवार पेठ, पुणें
सर्व तऱ्हेच्या बांधकामाचीं कॉन्ट्रॅक्टस्, व लँड डेव्हलपमेंटच्या योजनांचे व्यवहार होतात.
—ठेवी वेणें आहेत—

मुदत		दर शेकडा
६	महिने	४
१२	„	४½ „
२४	„	५ „

माहिती व अर्जाकरितां मॅनेजर यांस लिहा.

दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.
हेड ऑफिस : पुणें शहर.
स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.
मुंबई शाखा : दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.
जळगांव शाखा : नवी पेठ, जळगांव.
नागपूर शाखा : गोखले बिल्डिंग, सिताबर्डी, नागपूर.
भांडवल

अधिकृत	विकीस काढलेलें	सपलेलें	वसूल झालेलें
रु. १०,००,०००	रु. ६,८०,६५०	रु. ३,४०,३२५	

एकूण खेऊतें भांडवल रु. ७०,००,०००
बँकेच्या शेअरवर डिसेंबर १९४२ असेर ४½% करमाफ डिव्हिडंड दिलें गेलें. बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदी-विक्री कसोशीनें करून दिली जाते.
सी. व्ही जोग,
B. Com., Cert. A. I. B. C. A. L I. B.
मॅनेजर

खारे काजू, मसालेदार काजू
सर्व तऱ्हेचा खास पिस्ता, सुका मेवा, अक्रोड, काळा खजूर, अंजीर वगैरे मिळतील.
द. ना. हेजीब
१० शुक्रवार, पुणें.

युद्धाचा चलन व बाजारभाव ह्यांवरील परिणाम

तुर्कस्तान, इजिप्त, इराक व सायप्रस येथील आर्थिक परिस्थिति.

(दि ऑटोमान बँकेच्या अध्यक्षाचा आढावा)

तुर्कस्तान हा देश तटस्थ असला, तरी युद्धजन्य परिस्थितीचा त्याच्या सर्वच आर्थिक संसारावर प्रतिकूल परिणाम झाला आहे. हवा प्रतिकूल होती व कित्येक शेतकरी लष्करांत दाखल झाले आहेत. त्यामुळें धान्याचें उत्पादन कमी झालें. आवश्यक मालाचा तुटवडा व चलनवृद्धि ह्यांचा परिणाम बाजारभाव चढण्यांत झाला. घाउक मालाच्या किंमतींचा इंडेक्स नंबर १९४१ मध्यें २२२ होता तो १९४२ मध्यें ५२१ झाला. म्हणजे, १९४१ चे मानानें १९४२ सालीं महागाई १३५% वाढली. कांहीं तुर्की मालास. बाहेर चांगली मागणी आल्यामुळें इंटणावळ सुधारली व सेंट्रल बँकेजवळील सुवर्णसंचय वाढला.

१९४२ मध्यें जर्मन फौजा अॅलेक्झँड्रियाचे समीप येऊन ठेपल्या, त्यावेळीं इजिप्तमध्यें थोडी गडबड उडाली. तथापि, बँका त्यांतून निभावल्या. कपाशीचा धंदा बीट चालू होता. १९४१ चे मानानें १९४२ सालीं सरकारी धोरणानुसार कपाशीची लागवड निम्यावर आणण्यांत आली. त्यामुळें इतर पिकांस सवड मिळून धान्यांची आयात कमी करतां आली. मालाची आयात फारच कमी झाली व बाजारभाव वाढले.

उत्तर आफ्रिकेंतून जर्मनींची हकालपट्टी होण्यास प्रारंभ होईपर्यंत इराकमधील राजकीय व आर्थिक परिस्थिति अस्थिर होती. संयुक्त राष्ट्रांचा खर्च व निर्मितीसाठी भारी दरानें धान्य खरेदी ह्या कारणांमुळें इराकमधील प्रचलित चलनी नोटा १·१ क्रोटि इराकी दिनारांवरून २·२ दिनारांवर गेल्या. स्थानिक दिवल धान्याच्या किंमतींत युद्धपूर्व किंमतीच्या मानानें ८००% ते १०००% वाढ झाली. सरकारनें रहाणीच्या खर्चाचें वाढतें मान मर्यादित करण्यासाठी एक कमिटी नेमली.

पॅलेस्टाइनमधील परिस्थितींत सुधारणा होत गेली. लष्करी खर्चांत वाढ व मालाचा तुटवडा ह्यामुळें येथेंहि रहाणीचा खर्च वाढला व जमिनी भयंकर महागल्या. प्रचलित चलनी नोटांतहि वाढ झाली. सायप्रसमध्येंहि अशीच परिस्थिती होती.

वालचंदनगर इंडस्ट्रीज लि.

मार्सलंड प्राइस अँड कंपनी लि. चें वालचंदनगर इंडस्ट्रीज लि. असें नामांतर करण्यांत येणार आहे. मार्सलंड प्राइस अँन्ड कंपनी १९०८ सालीं नोंदण्यांत आली व कॉंक्रिटचें आणि पोलादी बांधकाम हें तिचें वैशिष्ट्य होतें. १९२० पर्यंत कंपनीची आर्थिक परिस्थिति समाधानकारक नव्हती. १९२० सालीं श्री. वालचंद हिराचंद ह्यांनीं कंपनीची व्यवस्था स्वतःकडे घेतली. १९२६-२७ पर्यंतच तिची इतकी भरभराट झाली कीं, ती ६ लक्ष रुपयांचीं डिबेंचर्स फेडून, प्रेफरन्स भागांवरील शिल्लक डिव्हिडंड देऊं शकली. एका वर्षीं तिनें ऑर्डिनरी भागास २०% डिव्हिडंड दिलें. पुढें मंदीच्या काळांत कंपनीचें कामहि मंदावलें. सासरेस सरकारनें संरक्षण दिलें, तेव्हां ह्या इंजिनिअरिंग कंपनीचें सासर कंपनींत रूपांतर झालें. कळंब (आतां वालचंदनगर) येथें श्री. वालचंद ह्यांनीं १९३२ सालीं रोजीं १५० ते २५० टन ऊस गाळण्याची यंत्रसामुग्री बसविली. १९३५-३६ मध्यें उसाखालीं ९७२ एकर जमीन होती, ती १९४२ सालीं ३,५०० एकर झाली व ऊस गाळण्याचे यंत्रसामुग्रीचें सामर्थ्य रोजचें १,००० ते १,१०० टन झालें. १९३४ सालीं फक्त ९ हजार टन ऊस गाळला गेला; १९४१ सालीं १½ लक्ष टन ऊस गाळण्यांत आला. डेअरी, तेलाची गिरणी, वनस्पती तुपाचा कारखाना, इत्यादि उद्योगहि वालचंदनगरमध्यें चालू आहेत. पॉवर अल्कोहोलची यंत्रसामुग्रीहि आतां बसविण्यांत आली आहे. वालचंदनगरच्या कारखान्यांत व मळ्यांत मिळून ८ हजारांवर कामगार आहेत. मार्सलंड प्राइस अँड कंपनीचे उद्देश बदलण्यासंबंधीचें काम ज्या न्यायाधीशापुढें चाललें, त्यास कंपनीचें हें रूपांतर पाहून अचंबा वाटला! आतां कंपनीचें नामांतर होऊन नवें सार्थ नाम तिला देण्यांत येत आहे. वालचंदनगर येथें गेल्या नाताळांत शेतीच्या अर्थशास्त्रास वाहिलेल्या 'इंडियन सोसायटी ऑफ ॲग्रिकल्चरल इकॉनॉमिक्स' संस्थेची परिषद् भरली होती, हें वाचकांस स्मरत असेलच.

मुंबईत घरदुरुस्तीचा ७४ कोटि रु. खर्च येईल

मुंबई शहरांतील दाट व कोंदट वसती काढून टाकून सामान्य स्थितींतल्या कुटुंबांसाठी सोयीचीं व आरोग्यकारक घरें युद्धोत्तर काळांत बांधून द्यावयाचीं झाल्यास ७४ कोटि रुपये खर्च येईल असा अंदाज आहे. मुंबई शहरांत एक खोली असलेल्या रहाण्याच्या जागांची संख्या दोन लक्ष, एकुणचाळीस हजार एवढी आहे. पुनर्रचनेंत ह्या राहत्या जागा जाव्या लागतील.

पुण्यांतील
आदर्श निवासस्थान व भोजनालय
छाया लॉजिंग व बोर्डिंग हाउस
बुधवार चौक, पुणें २.

ए. बी. सी. कॉइल्स
(डासांच्या उदवस्था)
बॉक्समध्यें १२. बॉक्स कि. १० आणे.
रात्रभर जळतात.
लायसॉफ
केसांतील उवांवर आश्चर्यकारक शोध.
उवा १ तासांत मरतात
बाटली कि. १ रु. ★ दोन वेळां उपयोग.
दि मागोरा केमिकल कं. लि.
— टिळक रोड, पुणें २. —

प्रेमामृताचा प्याला !

✣ ✣ ✣ ✣ ✣ ✣

प्रथम-प्रेम-परिचय-प्रसंगीं-प्रीतीच्या पनघटावर-प्रियकर-प्रणयिनींनीं-प्रेमामृताचा प्याला प्राशन करतांना गायिलेलीं प्रेमगीतें श्रवण करतांना प्रेमीजनांच्या मानसमंदिरांच्या

फुलबागेंतील मनोवेल पानोपान बहरतें !

भाव-मोर थयथय् नाचतो !!

शनिवार ता. १२ पासून सुरू—

प्रकाश पिक्चर्स, एव्हरग्रीन-रिलीज

२ रा आठवडा

पनघट

भूमिका:-रत्नमाला, उमाकांत, जीवन

—ग्लोब फोन ६९१ पुणें—

दररोज ६॥ व १० वाजतां
शनि. रवि. सोम. दुपारीं ३॥ वाजतां जादा खेळ.

दररोज सकाळीं १० ते १२ व दुपारीं ४ चे पुढें ग्लोबमध्यें वरच्या दराचीं तिकिटें रिझर्व्ह केलीं जातील

'भारतसेवक-समाजा'चे अध्यक्ष, [पंडित हृदयनाथ कुंझरू]

'भारतीय अस्पृश्यता-निवारक संघ' चे सेक्रेटरी [श्री. अमृतलाल ठक्कर]

पण्डिता क्षमाबाई राव, प्रोफेसर मा. दा. आळतेकर

इत्यादि अनेक विद्वानांच्या प्रशंसेस पात्र झालेला व हजारों प्रेक्षकांना आवडलेला

रॉयल रत्न १८ वें

पागनीस, दुर्गा खोटे यांची एकत्र भूमिका असलेला भक्त-पट

महात्मा विदुर

आर्यन, पुणें

दररोज तीन खेळ दुपारीं ३।, ६॥ व १० वाजतां
दर रविवारीं सकाळीं १० वा.
जादा खेळ

आजपासून वाढत्या लोकप्रियतेचा

९ वा आठवडा

प्रकाश पिक्चर्सचा पौराणिक मराठी बोलपट

रामराज्य-१६

चार शहरांत रौप्यमहोत्सव

वा आठवडा—

दिग्दर्शक:-विजय भट्ट.

मिनर्व्हा, पुणें

भूमिका:-शोभना समर्थ, चंद्रकांत, काळे, सोहनी.

रोज फक्त दोन खेळ ६। व १० वाजतां

दर शनि. रवि. सोम. व इतर सुटीचे दिवशीं जादा खेळ दुपारीं २॥ वाजतां [एव्हरग्रीन-रिलीज]

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यानीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर बोलणी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाविलास' पुणें ४.

अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
(टपाल खर्चासह माफ)
किरकोळ अंकास
दोन आणे.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति। —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष १० पुणें, बुधवार, तारीख २३ फेब्रुवारी, १९४४ अंक ८

चटण्या तयार मिळतात!
लसूणाची, जवसाची, कारळेची वगैरेची नवरत्न चटणी, मँगो चटणी इ०
द. ना. हेजीब.
(३) २० शुक्रवार, पुणें.

ए. बी. सी. कॉइल्स
(डासांच्या उदबत्त्या)
बॉक्समध्यें १२. बॉक्स किं. १० आणे.
रात्रभर जळतात.
लायसॉफ
केसांतील उवांवर आश्चर्यकारक शोध.
उवा १ तासांत मरतात
बाटली किं. १ रु. ★ दोन वेळां उपयोग.
दि मागेरा केमिकल कं. लि.
— टिळक रोड, पुणें १. —

पुण्यांतील
आदर्श निवासस्थान व भोजनालय
छाया लॉजिंग व बोर्डिंग हाउस
बुधवार चौक, पुणें २.

पुना गेस्ट हाऊस
१००, लक्ष्मी रोड, पुणें २.
Telephone 779

TELEGRAM Guest House Poona 2.

महायुद्धाची जाणीव! कपड्यांच्या सर्वांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.
गिरगांव मुंबई नं. ४
महिंद्रकर ब्रदर्स
तयार कपड्यांचे व्यापारी
बुधवार चौक, पुणें

जिकडे तिकडे प्रशंसा

इमिटेशन दागिन्यांवर रासायनिक क्रिया करून सन्या सोन्याचा पत्रा चढविला जातो त्यामुळें दागिना कध्धींही खराब होत नाहीं, ही पूर्ण खात्री झाली. सोन्याचा पत्रा चढविलेल्या चार बांगड्या किं. आठ रु. गॅरंटेसह दागिना परत करणें झाल्यास वर चढविलेल्या सोन्याचे सर्वच्या सर्व पैसे परत देऊं.

भट कं. सांगली, S. M. C.

भट कंपनी शाखा—बुधवार पेठ, पुणें २.

विविध माहिती

पुणतांबें येथील जिल्हा शेतकी प्रदर्शन

कोपरगांव तालुक्यांत पुणतांबे येथें जिल्हा शेतकी प्रदर्शन ता. १० ते १२ जानेवारी १९४४ ला मि. टॉटन, सेक्रेटरी टु गव्हर्मेंट यांचे हस्तें उघडण्यांत येऊन भरविण्यांत आलें. या प्रदर्शनांत शेतकी खातें, सहकारी खातें, आरोग्य खातें, औद्योगिक संस्था व औषधालयें यांचे स्टॉल्स होते व जनावरांचेंही प्रदर्शन होतें.

सोसायट्यांना बक्षिसें

नगर जिल्हा रूरल डेव्हलपमेंट बोर्डाचे शिफारसीवरून कोपरगांव तालुक्यांतील खालीं दिलेल्या दोन सोसायटयांना बक्षिसें जाहीर करण्यांत आलीं.

१ पुणतांबें शेतकी सहकारी पतपेढी रु. २५/-
२ पोहेगांव „ रु. १५/-

वरील दोन सोसायट्यांस कामकाजाचे प्रगतीबद्दल व त्यांनी ग्रामोद्धाराचें कार्य हातीं घेतल्याबद्दल बक्षिसें मिळालीं आहेत.

राष्ट्रीय युद्ध आघाडी

हिंदुस्थानच्या निरनिराळ्या भागांत राष्ट्रीय युद्ध आघाडी (नॅशनल वॉरफ्रंट) वर सवेतन आणि निर्वेतन मिळून एकूण ९२,००० वक्ते प्रचारकार्य करीत आहेत. ह्या आघाडीच्या विद्यमानें दर महिन्यास सरासरीनें १५,००० सभा भरवल्या जातात आणि त्यांत भाषणें होतात.

धान्याच्या किंमती ठरवण्यासाठी सल्लागार समिती

हिंदुस्थानच्या निरनिसळ्या भागांत धान्याच्या किंमती ठरवण्यासाठी मध्यवर्ती सरकारनें एक प्रातिनिधिक स्वरूपाची सल्लागार समिती नेमली आहे. त्या सरकारचे आर्थिक सल्लागार, सर थिओडोर ग्रेगरी हे, ह्या समितीचे अध्यक्ष आहेत.

हिंदी रेलवेजवरील लष्करी वहातूक

हिंदुस्थानांतील रेलवेजवर लष्करी सामानाची वहातूक युद्धपरिस्थितीमुळें अर्थातच पुष्कळ वाढली आहे. १९३८-३९ सालीं ही वहातूक सुमारें ५ लक्ष टन भरली होती, पण १९४२-४३ मध्यें सुमारें १३० लक्ष टन झाली.

दगडी कोळशाच्या वहातुकीचें मोठें प्रमाण

दगडी कोळशाच्या खाणी हिंदुस्थानाच्या विशिष्ट भागांतच असल्यामुळें ह्या मालाची रेलवेवरील वहातूक फार मोठ्या प्रमाणावर होऊन सबंद देशास त्याचा पुरवठा होतो. एक टन वजनाचा माल किती मैल रेलवेचा प्रवास करतो असा हिशोब केला असतां, हिंदी रेलवेजवरच्या वहातुकीपैकी ४२ टक्के वहातूक दगडी कोळशाची होते असें आढळतें.

परिमाणित (स्टॅन्डर्ड) कापड

गेल्या डिसेंबर अखेरपर्यंत ७८ कोटि वार स्टॅंडर्ड कापडाची मागणी हिंदी गिरण्यांकडे नोंदली होती. त्यांपैकी ४० कोटि वार कापड तयार होऊन निरनिराळ्या प्रांतांत व संस्थानांत पाठवण्यांत आलें आहे. शक्य तेथें ह्या कापडाची विक्री नेहमीच्या पद्धतीनें कापड व्यापाऱ्यांचे मार्फत करण्यांत आली असून इतरत्र सरकारनें विक्रीची स्वतः निराळी व्यवस्था केली आहे.

युद्ध नोकरांस मुंबई सरकारच्या सवलती

युद्धासंबंधाची नोकरी करणारांसाठी मुंबई सरकारनें आपल्या नोकरींत खास जागा राखून ठेवण्याचें ठरवलें आहे. सर्व सरकारी खात्यांत रिकाम्या होणाऱ्या जागांपैकीं निम्म्या जागा ह्या रीतीनें मोकळ्या ठेवल्या जातील व वयाच्या मर्यादेचे बाबतींत युद्ध काळांतील नोकरीची मुदत हिशेबांत घेतली जाईल. अर्थात अशा रीतीनें नेमावयाच्या लोकांची युद्धनोकरी समाधानकारक ठरली असली पाहिजे आणि त्यांची आपापल्या जागांसाठीं जरूर ती लायकी असली पाहिजे.

जर्मनीवर बाँबहल्ल्यांचें वाढतें प्रमाण

चालू युद्धास प्रारंभ झाल्यापासून १९४३ अखेर जर्मनीवर ब्रिटिश विमानांनीं एकूण २,०२,००० टन बाँब टाकले, त्यांपैकी एकट्या १९४३ मध्यें टाकलेल्या बाँबचें वजन १,३६,००० टन भरलें. जर्मनव्याप्त युरोपांतील केंद्रावर टाकलेल्या बाँबचें वजन २०,००० टन होतें. अमेरिकन विमानांनीं जर्मनीवर बाँबफेक करण्यास ऑगस्ट १९४२ मध्यें प्रारंभ केला, तेव्हांपासून १९४३ अखेर त्यांनीं ५०,००० टन बाँब टाकले आहेत. त्यांपैकीं २०,००० टनांचे बाँब १९४३ मध्यें टाकण्यांत आले. जर्मनीवरील व जर्मनव्याप्त युरोपावरील ब्रिटिश विमानांच्या बाँबफेकीची प्रगति खालीलप्रमाणें आहे:—१९३९-४० मध्यें दररोज सरासरीनें १ टन, १९४०-४१ मध्यें ५५ टन, १९४१-४२ मध्यें ९० सरासरीनें टन व १९४३ मध्यें ३७७ टन.

प्रोड्यूसर गॅस प्लँटमुळें २ कोटि गॅलन पेट्रोलची बचत

प्रोड्यूसर गॅसवर चालणारीं सुमारें १३½ हजार वाहनें आतां हिंदुस्थानांत आहेत, त्यांत ५½ हजार बसेस, ३½ हजार लॉऱ्या व १½ हजार मोटारगाड्या ह्यांचा समावेश होतो. त्यांतील मोटारगाड्या सोडल्या तरी १२ हजार बसेस व लॉऱ्या ह्यांच्या प्रोड्यूसर गॅसवरील संचारामुळें दरसाल २ कोटी गॅलन पेट्रोलची बचत होते. एकट्या मद्रास प्रांतामध्यें ४ हजार वहानांवर प्रॉड्यूसर गॅस प्लँट बसविण्यांत आले आहेत. त्याच्या खालोखाल मुंबई व पंजाब ह्या प्रांतांचा अनुक्रम येतो. त्रावणकोर संस्थानांत प्रोड्यूसर गॅसवर चालणारीं ४ हजार वहानें आहेत. प्रोड्यूसर गॅस प्लँटची रचना अवघड किंवा गुंतागुंतीची नसली, तरी शुद्ध गॅस देणारे प्लँट नसतील तर इंजनांची तात्काळ खराबी होते. हिंदुस्थानांत सुमारें ५५ वेगवेगळ्या प्रकारचे गॅस प्लँट तयार करण्यांत येतात, त्यांपैकी सुमारें निम्म्यांची गॅस टेस्ट झालेली आहे. प्रोड्यूसर गॅस प्लँटची यशस्विता खालील गोष्टींवर अवलंबून असते:—(१) चांगला व अचूक काम देणारा प्लँट, (२) चांगला निवडक कोळसा, (३) चांगला ड्रायव्हर, (४) गॅस प्लँटची व्यवस्थित दुरुस्ती, (५) ३० मैलांपेक्षा कमी वेग ठेवणें व भरमसाट ओझें टाळणें. गॅस प्लँटसाठी १½" ते ¾" घनफळाच्या सढ्यांचा, पाण्याचा अंश १०% पेक्षा कमी असलेला कोळसा सीलबंद पोत्यांतून विकतां आला, तर सोईचें होईल.

अनुक्रमणिका

	पृष्ठ
१ विविध माहिती	... ५८
२ सहकारी देखरेख आणि तपासणी	... ५९
३ हिंदी बँकिंगचा गेल्या वर्षाचा आढावा	... ६०
४ स्फुट विचार ... ६१	
व्हायकौंट वेव्हेल ह्यांचें भाषण— सुपरव्हिजनबाबत समिती— सहकारी संवर्धनाची योजना	
५ प्रांतिक सहकारी बँकेची शाखा कमिटी	... ६२
६ हिंदी रेल्वेजचें अंदाजपत्रक	... ६३

अर्थ

बुधवार, ता. २३ फेब्रुवारी, १९४४

सहकारी देखरेख आणि तपासणी

प्राथमिक सहकारी संस्थांमध्यें देखरेखीचें विशेष महत्व आहे तें नीट लक्षांत येणें आवश्यक आहे. पतपेढ्यांचे हिशेब ठेवणें, त्यांच्या सभासदांच्या कर्जमागणीचा तक्ता तयार करणें, कर्जाची वसुली वेळेवर करून तीमधून बँकेचें देणें देऊन टाकणें, इत्यादि कामें संस्थेच्या सेक्रेटरीस करावयाचीं असतात. पेढ्यांच्या सभासदांमध्यें शिकलेले व जाणते लोक हिंदुस्थानच्या परिस्थितींत थोडे असल्यानें आणि हिशेबाचीं व दप्तराचीं कारकुनी कामें योग्य रीतीनें केलीं जाणें अगत्याचें असल्यामुळें पगारदार सेक्रेटरी ठेवणें अपरिहार्यच असतें. तथापि, पतपेढ्यांचें देणें—घेणें आणि नफा हीं मर्यादित असतात, आणि त्यांस लायक सेक्रेटरीचा पगार झेपत नाहीं, आणि असा मनुष्य गांवकऱ्यांमध्यें पुष्कळ वेळां मिळतहि नाहीं. तीन-चार सोसायट्यांच्या गटांत एक सेक्रेटरी नेमणें आणि त्याचेकडून ह्या पेढ्यांचीं कामें करून घेणें आवश्यक झालें आहे तें ह्यासाठीच होय. गटवार सेक्रेटरींची पद्धति समाधानकारक नाहीं असें सांगण्यांत येतें, त्यांत पुष्कळ तथ्य आहे. सोसायटीच्या गांवचा रहिवासी सेक्रेटरी नसला आणि त्यास अनेक पेढ्यांचीं कामें करावीं लागलीं म्हणजे कारभार नीट होऊं शकत नाहीं, पण गटवार सेक्रेटरींची व्यवस्था नाइलाजानें पत्करावी लागत आहे. शिकवून तयार केलेले सेक्रेटरी मिळूं शकतात, पण त्यांचा पगार देण्याची ऐपत असलेल्या सोसायट्या थोड्या आहेत. लायक, केवळ पतपेढ्यांच्या कामास वाहिलेले आणि भरपूर पगाराचे सेक्रेटरी नेमतां आल्यास सुपरव्हायजर्सच्या देखरेखीचा प्रश्न सोपा होऊन वार्षिक हिशेब तपासणीनें सोसायट्यांचें काम भागेल, आणि बँकांच्या इन्स्पेक्टरांसहि फारसें काम पडणार नाहीं. इतर कित्येक देशांत सुपरव्हायजर्स व इन्स्पेक्टर्स ह्यांची जरूरी भासत नाहीं आणि तेथें सोसायट्यांच्या युनिअनन्स असतात, त्या केवळ हिशेबतपासणी आणि सहकारी प्रगतीच्या विषयींचे प्रश्न ह्यांचेसंबंधांतच असतात. ह्याचें कारण प्राथमिक सोसायट्यांच्या स्वतंत्र कारभाराची कार्यक्षमता हेंच आहे. ह्या कामीं आमची सहकारी संघटना लंगडी आहे आणि तिच्या परिस्थितीस अनुसरूनच येथें उपाययोजना करावी लागली आहे आणि लागत आहे. तथापि, ती सुधारण्याचे मार्ग शोधून काढणें व त्यांचा अवलंब करणें अगत्याचें आहे. मल्टिपर्पज सोसायट्यांचा कारभार मोठ्या प्रमाणांत होऊन त्यांमध्यें चांगल्या पगाराचे व कुशल कामगार नेमणें शक्य आहे.

व्यक्तिशः सोसायट्यांस हिशेबाचीं, कायदेकानूंच्या अंमलबजावणीचीं, कर्जमागणीचीं वगैरें कामें वर लिहिल्याप्रमाणें स्वतंत्रपणानें व पूर्णतेनें करतां येत नाहींत म्हणून पंचवीस-तीस संस्थांच्या गटामार्फत तीं करवून घेण्याची कल्पना निघाली आणि देखरेखीच्या युनिअन्सची स्थापना झाली. विशिष्ट टापूमधील पंचवीस-तीस सोसायट्यांनीं बँकेच्या कर्जाचे फेडीची संयुक्त हमी घेतली असतां त्या सर्वांची पत वाढेल, आणि तिच्या आधारावर हलक्या व्याजानें पैसा मिळूं शकेल; तसेंच बँकेसहि इन्स्पेक्शनची दगदग व खर्च पडणार नाहीं ह्या विचारानें प्रथम परस्पर हमीच्या म्हणजे "गॅरंटिंग" युनिअन्स स्थापल्या गेल्या. पण मुळांतच सोसायट्यांचा कारभार व्यवस्थित होण्याची तजवीज नसल्यानें ह्या प्रकारच्या गटसंस्था कार्यक्षम व यशस्वी होऊं शकल्या नाहींत. ह्या कारणानें गॅरंटिंग युनिअन्सच्या जागीं सध्याच्या सुपरव्हायजिंग युनिअन्स आल्या. अलीकडे शिकलेले व चांगल्या पगाराचे सुपरव्हायजर्स नेमण्यांत आले आहेत आणि आपल्या गटांतील सोसायट्यांची देखरेख व त्यांचीं बाहेरचीं कामें ते करीत आहेत. त्यांचें कार्य ज्या प्रमाणांत चोख व सर्वगामी होईल, त्या प्रमाणांत सोसायट्यांची पत वाढेल आणि त्या संस्थांस स्वस्त पैसा बाहेरून मिळेल. कर्जाबद्दलची मागणी योग्य रीतीनें व योग्य वेळीं करणें, कर्जवसुली वेळच्यावेळीं होऊन सोसायट्यांचीं पत राखणें, लवादाची, लिलावांचीं वगैरे कामें रीतसर होण्याची दक्षता बाळगणें, सेक्रेटरींच्या कारभारावर नजर ठेवणें, सभासदांस सहकाराचें शिक्षण देणें, पेढ्यांच्या ताळेबंदांची व्यवस्था पहाणें, प्रचार करणें, इत्यादि प्रकारचा कार्यक्रम पार पाडणें हें सुपरव्हायजर्सच्या कक्षेंत येतें. येथें बँकेचा प्रत्यक्ष संबंध येत नाहीं आणि सोसायट्यांच्या अंतर्गत व्यवस्थेकडे पहाणें हें तिचें स्वतःचें कामहि नाहीं. त्या संस्थांची पत कशी आहे आणि त्यांचेकडून येणारे कर्जाविषयींचें अर्ज योग्य आहेत कीं नाहीं एवढेंच तिच्या इन्स्पेक्टरांनीं पहावयाचें आहे.

देखरेख आणि इन्स्पेक्शन ह्यांच्या मर्यादा नीट ओळखल्या न गेल्याकारणानें सोसायट्या, त्यांच्या युनिअन्स व बँका ह्यांच्या परस्पर कर्तव्यासंबंधानें गैरसमज व घोटाळा झालेला दिसतो. ह्या विषयाचें विवेचन आम्हीं गेल्या महिन्याच्या शेवटच्या अंकांत केलें होतें. ह्याबाबतींत आणखीहि एक मुद्दा विचार करण्यासारखा आहे. सोसायट्यांस लागणारें सगळें भांडवल बँकेकडून घ्यावें लागत नाहीं, त्यांचें स्वतःचें भांडवल हळुहळु वाढत असून मुंबई प्रांतांतल्या पतपेढ्यांमध्यें तें त्यांच्या एकूण खेळत्या भांडवलाच्या निम्यापर्यंत येऊन पोहोंचलें आहे. ह्या भांडवलाच्या व्यवस्थेची जबाबदारी सर्वस्वी सोसायट्या व त्यांच्या युनिअन्सवर पडते आणि बँकेस तीमध्यें कांहींच भोग घेतां येणार नाहीं. म्हणजे बँकेच्या इन्स्पेक्टराचें ह्यासंबंधांत कांहींच काम नाहीं. सोसायट्या, त्याचप्रमाणें, ठेवीं स्वीकारून बँकेच्या मदतीवांचून आपली भांडवलाची गरज भागवूं शकतील एवढेंच नव्हें, तर त्यांनीं तसें करण्यास समर्थ होणें इष्ट आहे असें सांगण्यांत येत

आहे. हा मताचा आशय ध्यानांत घेणें आवश्यक आहे. सोसायट्यांची कांहीं कामें सुपरव्हायजर्स व बँकांचे इन्स्पेक्टर्स ह्यांचेकडून दुबार होतात. त्यांतली द्विरुक्ती काढून टाकण्यांत आल्यास वेळ व पैसा ह्यांची बचत होईल असें म्हणणाऱ्यांच्या विचारांत कसा गोंधळ होत आहे हें वरील विचारसरणीवरून आणि माहितीवरून सहज समजून येईल. सोसायट्यांचे सर्व अंतर्गत व्यवहार त्यांत्रा नोकरवर्ग व यूनिअन्सचे सुपरव्हायजर्स ह्यांनींच पाहिले पाहिजे. हें त्यांचें काम आणि बँकांचें काम हीं सर्वस्वी भिन्न आहेत आणि राहिलीं पाहिजेत. असें झालें तरच सोसायट्यांचा कारभार चोख आणि कार्यक्षम होईल. सुपरव्हायझर्स आणि बँकांचे इन्स्पेक्टर्स ह्यांनीं एकमेकांची कामें करणें म्हणजे अव्यापारेषु व्यापार होय. त्या योगानें जबाबदाऱ्यांचा गोंधळ उडून सेडेगांवीं सहकार्याचा पाया जो प्राथमिक पतपेढी तो मक्कम होणार नाहीं आणि सर्वंच संघटना कच्ची राहील.

हिंदी बँकिंगच्या गेल्या वर्षाचा आढावा

बेळोवेळ बदलणाऱ्या देशाच्या आर्थिक परिस्थितीचें प्रतिबिंब त्यांतील बँकांच्या व्यवहारांचे स्वरूपांत उमटलेलें पहावयास सापडणें स्वाभाविक आहे. सध्याच्या युद्धाच्या काळांत वाढता युद्ध-खर्च, चलनाचा विस्तार, महागाई, लढाऊ उपयोगाच्या जिनसांच्या उत्पादनावर भर, विविध मालाच्या किंमतींचें सरकारी नियंत्रण, पेशाची सरकारी रोख्यांत गुंतवण, वहातुकीच्या अडचणी इत्यादि बाबींचे परस्परांवर झालेले परिणाम एकंदर आर्थिक परिस्थितीच्या घटावामध्यें दिसून येतात. समाजांत चलन विपुलतेनें खेळल्यामुळें त्याचा ओघ बँकांकडे वळला. ह्याचा परिणाम, व्याजाचे दर उतरले तरी, बँकांतील ठेवींत वाढ होण्यांत झाला. ह्याचाच दुसरा परिणाम नवीन बँकिंगच्या संस्था स्थापल्या जाण्यांत झाला आणि जुन्या बँकांनीं नवीन शाखा चालू केल्या. हिंदुस्थान सरकार ब्रिटिश सरकाराच्या वतीनें ह्या देशांत युद्ध-खर्चाप्रीत्यर्थ कोट्यवधि रुपयांचा पुरवठा करीत आहे आणि त्यासाठीं रिझर्व्ह बँकेस नोटा काढाव्या लागत आहेत. १९४२ च्या डिसेंबर अखेर एकूण नोटांची किंमत ५७० कोटि रुपये होती ती १९४३ च्या डिसेंबर अखेर ८४० कोटि रुपये झाली. युद्धाचे प्रारंभापासून नोटांमध्यें ६६८ कोटि रुपयांची वाढ झाली. ह्या मार्गानें समाजांत खेळणारा पैसा सरकारी तिजोरीकडे खेचून घेण्याचे प्रयत्न हिंदुस्थान सरकार करीत आहे आणि बाजारभावांचें नियंत्रण आदिकरून उपायहि योजण्यांत येत आहेत. सट्टेबाजी आणि महागाई ह्यांस आळा घालण्यासाठीं बँकांनीं धान्य व सोनें-चांदी ह्यांच्या तारणावर कर्जे देऊं नयेत असा निर्बंध घातला आहे.

वरील उपायांचा थोडाबहुत परिणाम होत असला तरी कांहीं वर्गांच्या हातांत किंमती चढल्यामुळें व मालाच्या तुटवड्यामुळें फाजील पैसा खेळत आहे आणि त्याचा ओघ बँकांच्या मांडवलाकडे व ठेवींकडे वळला आहे. शेडयूल्ड बँकांच्या प्रमुख व्यवहारांच्या गेल्या तीन वर्षांच्या आकड्यांची तुलना केली असतां ह्या परिस्थितीवर चांगला प्रकाश पडतो. हे आकडे खालीं दिले आहेत:—

शेडयूल्ड बँकांचे मुख्य व्यवहार

(कोटि रुपये)

	३१-१२-४३	३१-१२-४२	१-९-३९
बिनमुदत ठेवी ...	५००	३३७	१३४
मुदत ठेवी ...	१५७	१११	१०२
रोकड ...	२७	१६	६
रिझर्व्ह बँकेंत ...	८८	४५	२५
कर्जे ...	१६०	९७	१०१
हुंड्यांची खरेदी ...	६	२	३

वरील तक्त्यावरून असें दिसून येईल कीं युद्धाच्या प्रारंभापासून बँकांच्या ठेवी ४२१ कोटि रुपयांनीं वाढल्या आहेत. नुसत्या गेल्या सालांतला वाढावा २०९ कोटि रुपयांचा आहे आणि बिनमुदत ठेवींच्या रकमेंत तो विशेष आहे. युद्धपरिस्थितींत आपला पैसा तरता ठेवण्याची लोकांची प्रवृत्ति ह्यावरून प्रतीत होते. बिनमुदतीच्या ठेवींचें प्रमाण वाढल्यामुळें बँकांस अधिक रोकड व तरत्या रकमा जवळ ठेवाव्या लागत आहेत. गेल्या वर्षांत रोकड ११ कोटींनीं आणि रिझर्व्ह बँकेकडील शिल्लक ४३ कोटींनीं वाढली आहे. नियमाप्रमाणें बँकांनीं रिझर्व बँकेकडे विशिष्ट प्रमाणांत आपली शिल्लक ठेवावयाची असते. या मर्यादेपेक्षां ६० कोटींनीं अधिक इतकी ही रक्कम १९४३ अखेर होती. त्याच्या पूर्वीच्या वर्षी ही फाजील रक्कम २६ कोटि रुपये होती. बिन शेडयूल्ड बँकांच्या ठेवींमध्यें अशाच तऱ्हेची वाढ झालेली दिसून येते. ह्या बँकांमध्यें, शेडयूल्ड बँकांच्या मानानें मुदतीच्या ठेवींचें प्रमाण अधिक आहे. शेडयूल्ड बँकांनीं दिलेल्या कर्जांत गेल्या वर्षी पुष्कळ वाढ झाली. सट्टेबाजी आणि युद्धजन्य सांपत्तिक व व्यवहार परिस्थिति ह्यास कारणीभूत झालेली आहे. सरकारी रोख्यांमध्यें बँकांनीं केलेली गुंतवणहि बरीच वाढली आहे. त्यांच्या जवळील ठेवींच्या निम्या इतकी ही गुंतवण आहे आणि एकूण सरकारी कर्जाच्या तीस टक्क्यांच्या घरांत ती गेली आहे. बँकांच्या मार्फत जनतेचा पैसा सरकारी रोख्यांत किती गुंतत आहे ह्याची यावरून कल्पना येते. गेल्या वर्षी शेडयूल्ड बँकांनीं आपला व्यवहार नवीन शाखा स्थापून विस्तृत केला. १९४२ अखेर ह्या शाखा व कचेऱ्या एकूण १,४५० होत्या त्या १९४३ मध्यें ४१० नीं वाढून वर्षअखेर १,८६० झाल्या. नवीन १४ बँका रिझर्व्ह बँकेच्या यादींवर आल्या त्यांच्याच शाखा ११५ होत्या. सेंट्रल बँक ऑफ इंडियानें ५४ नव्या शाखा काढल्या, पंजाब नॅशनल बँकेचा आकडा १८ होता आणि भारत बँकेनें १२९ नव्या शाखा स्थापल्या. पूर्वी शेडयूल्ड किंवा इतर मोठ्या बँकांचा जेथें व्यवहार नव्हता अशा ५३ ठिकाणीं गेल्या वर्षी नव्यानेंच शाखा काढण्यांत आल्या.

सोन्याची सरकारी विक्री

रिझर्व्ह बँकेमार्फत हिंदुस्थानच्या बाजारांत सोनें विकण्यांत आलें आहे त्याविषयीं मध्यवर्ती असेंब्लींत माहिती विचारण्यांत आली असतां ती देणें राष्ट्रीय हिताचें नाहीं ह्या मुद्यावर सरकारचे फडनवीस, सर जेरेमी रेस्मन, ह्यांनीं ती देण्याचें नाकारलें.

स्फुट विचार

व्हायकौंट वेव्हेल ह्यांचें भाषण

व्हाइसरॉयांच्या मध्यवर्ती कायदेमंडळाच्या संयुक्त अधिवेशनांत झालेल्या भाषणानें चालू अवघड राजकीय प्रश्न सोडवला जाण्यास सहाय होईल असा नवा मार्ग किंवा उपाय सुचवलेला नाहीं. त्यांत जपानला हिंदुस्थानच्या सरहद्दीजवळून हाकून देण्यासाठी होणाऱ्या प्रयत्नास सर्वतोपरी सहाय देण्याचा निश्चय अप्रभागीं नमूद करण्यांत आला आहे हें योग्यच आहे. हा युद्धप्रयत्न यशस्वी होऊन जपानच्या पाशवी शक्तीचें निर्मूलन झाल्यावांचून ह्या देशास किंवहुना सबंद जगास शांतता, स्वास्थ्य व सुस्थिति अनुभवता येणें शक्य नाहीं असें म्हणून सद्यरहु उद्दिष्ट साध्य होण्यास हिंदुस्थानचे आर्थिक प्रश्न सोडवले जाण्याचें महत्त्व व्हायकौंट वेव्हेल ह्यांनीं प्रतिपादलें. ह्या प्रश्नांमध्यें त्यांनीं अन्नपुरवठ्यास पहिल्या प्रतीचें महत्त्व दिलें आणि त्याबाबतींतलें मध्यवर्ती सरकारचें धोरण विशद केलें. धान्याच्या पैदाशींत वाढ, व्यापाऱ्यांच्या नफेबाजीचें व किंमतीचें नियंत्रण, शेतकरी व इतर जनता ह्यांस सोयीचें होईल असें बाजारभावांचें प्रभावी नियमन आणि ह्या सर्व संबंधांत प्रांतिक व संस्थानी सरकारांचें सहकार्य इत्यादि प्रमुख मुद्दे त्यांनीं पुढें मांडले. युद्धकाळांत आणि त्याचे समाप्तीनंतर हिंदुस्थानांत अन्नपुरवठा वाढवण्याच्या प्रश्नाकडे विशेष लक्ष पुरवण्यांत आलें पाहिजे आणि ह्यासाठी शेतीचा विस्तार व तिच्या उत्पादनेंत सुधारणा घडवून आणण्याच्या महत्त्वावर त्यांनीं जोर दिला. बंगालमधील दुष्काळाची आपत्ति वरीच आटोक्यांत आली आहे आणि धान्याची देशांतील पैदास व त्याची होणारी आयात ह्यांचे योगानें मागणी व पुरवठा ह्यांची तोंडमिळवणी होऊं शकेल अशी आशा व्हाइसरॉयांनीं प्रकट केली. चलनाच्या विस्ताराचा बाजारभावांवर होणारा परिणाम हा विषय आपल्या सरकाराचे फडनवीस अंदाजपत्रकावरील स्वतःच्या भाषणांत हाताळतील असें म्हणून त्यांनीं हा प्रश्न तसाच सोडून दिला. आर्थिक पुनर्घटनेचाहि त्यांनीं उल्लेख केला. देशाच्या आर्थिक उन्नतीच्या दृष्टीनें हिंदुस्थानास एकजिनसी राज्यव्यवस्था व धोरण आवश्यक असल्याचें त्यांनीं सांगितलें आणि उदाहरणें देऊन त्यांची शक्यता व इष्टता प्रतिपादली.

सुपरव्हिजनबाबत समिती

प्रांतिक सहकारी बँकांच्या असोसिएशनच्या मध्यवर्ती बँकांच्या विभागाची एक सभा अलीकडे भरून आजच्या अग्रलेखांत चर्चिलेल्या विषयाचा तीमध्यें विचार झाला. सभेपुढें सुपरव्हायझिंग युनिअन्सना बँकांनीं नेहमीपेक्षां पांच हजार रुपयांची जादा ग्रँट देऊन त्यांच्या खर्चांतली तूट भरून काढण्यास मदत करावी अशी रजिस्ट्रार ह्यांची सूचना होती आणि तिच्या मुळाशीं सुपरव्हिजन व इंस्पेक्शन ह्यांच्या परस्पर संबंधाचा महत्त्वाचा प्रश्न होता. सुपरव्हायझर्सना मिळणारा महागाईभत्ता अपुरा असल्यानें त्यांत वाढ करणें आवश्यक होतें, पण युनिअन बोर्डाच्या उत्पन्नांत कुस नसल्यामुळें बँकांची जादा मदत मागण्यांत आली होती. युनिअन्सच्या उत्पन्नास सरकारनें नेहमीपेक्षां अधिक ग्रँट देऊन हातभार लावला होता. पण तीमध्यें आणखी वाढावा करण्याची त्याची तयारी नव्हती. यूनिअन्सची सांपत्तिक स्थिति असमाधानकारक असून ती सुधारण्याची आवश्यकता आहे आणि त्याचप्रमाणें सुपरव्हायझर्सना जादा भत्ता मिळणें अगत्याचें आहे ह्याविषयीं मतभेद नव्हता असें असलें तरी बँकांनीं यूनिअन्सना जादा ग्रँट कां द्यावी आणि ह्या बाबतींत जबाबदारी कां टाकण्यांत यावी हा तत्त्वाचा प्रश्न उपस्थित झाला. बँकांच्या इंस्पेक्टर्सनीं करावयाचीं कांहीं कामें यूनिअन्सचे सुपरव्हायझर्स करीत असल्यानें आणि विशेषतः कर्जवसुलीमध्यें त्यांची महत्त्वाची मदत होत असल्यानें बँकांनीं आपली ग्रँट वाढवणें न्याय्य आहे असा एक मुद्दा उपस्थित करण्यांत आला होता. तसेंच, इन्स्पेक्टर्स व सुपरव्हायझर्स ह्यांच्या कामाची नीट जुळणी झाल्यास खर्चांत काटकसर होऊन बँकांस आपली युनिअन्सची ग्रँट वाढवणें शक्य होईल असाहि कोटिक्रम करण्यांत आला. सहकारी अधिकारी व बँकांचे प्रतिनिधी ह्यांनीं ह्या विषयाबाबत आपलीं मतें स्पष्टपणानें पुढें मांडल्यावर असोसिएशनच्या वर उल्लेखिलेल्या सभेंत प्रस्तुत प्रश्नाची विशेष छाननी करण्यासाठी एक लहान समिती नेमण्यांत आली. हा निकाल निःसंशय समाधानकारक आहे. यूनिअन सुपरव्हायझर्स व बँक इंस्पेक्टर्स ह्यांचीं कामें मूलतःच भिन्न असल्यानें तीं ह्या किंवा त्या अधिकाऱ्यांच्या हातीं एकवटतां येणें शक्य नाहीं असा सामान्यतः सभेचा अभिप्राय दिसून आला. सहकारी अधिकाऱ्यांनीं सुचवल्याप्रमाणें वरील अधिकाऱ्यांच्या कामाची निराळ्या रीतीनें वाटणी केली तरी देखरेखीच्या खर्चांत बचत म्हणण्यासारखी व्हावयाची नाहीं असें सर्वसाधारण मत आढळून आलें, तरीहि प्रस्तुत सबंद प्रश्नाची चौकशी केल्यानें कांहीं बिघडत नाहीं ह्या समजुतीनें त्याचा अहेरचा निकाल समितीच्या शिफारसीवर अवलंबून ठेवला आहे.

सहकारी संवर्धनाची योजना

युद्धोत्तर काळांत व्हावयाच्या आर्थिक पुनर्घटनेंत सहकारी संघटनेचें स्थान कोणतें असावें ह्यासंबंधानें विचार केला जाण्याची आवश्यकता आम्हीं प्रतिपादली आहेच. पुनर्घटनेच्या इष्टेविषयीं कोठेंच वाद नाहीं. सरकार, धंदेवाले व सामान्य जनता ह्यांची त्या बाबत एकवाक्यता आहे. शेती, उद्योगधंदे, व्यापार, वहातुकीचीं साधनें ह्या सर्वांचे संबंधांत संवर्धनाचें कार्य योजनात्मक पद्धतीनें करावें लागणार आहे आणि सहकारी संघटनेचा उपयोग ह्या कार्यक्रमांत केला जाणें अगत्याचें आहे. शिक्षण, वहातुकीचीं साधनें, सार्वजनिक आरोग्य, ह्यांच्या अभिवृद्धीसाठी कोट्यवधि रुपये खर्चावे लागतील. सर्व प्रांतिक खात्यांचें कार्यक्षेत्र वाढणें आणि त्यांवर अधिकाधिक पैसा खर्चला जाणें अपरिहार्य आहे. अभिवृद्धीच्या ह्या कार्यक्रमांत सहकारी चळवळीप्रीत्यर्थ मुंबई सरकारानें अधिक पैसा खर्च केला पाहिजे. ह्यासंबंधांत सहकारी योजना सरकार व सहकारी कार्यकर्ते यांनीं तयार करणें अगत्याचें आहे, प्रॉव्हिन्शल को-ऑपरेटिव्ह इन्स्टिट्यूटनें हा प्रश्न हातीं घेतला असून त्यासाठी योजना तयार करण्याची व्यवस्था चालवली आहे असें समजतें. योजना बनवली जाण्यास मुंबई सरकारची संमती असून इन्स्टिट्यूटच्या विद्यमानें तें कार्य लवकरच चालू व्हावयाचें आहे ही समाधानाची गोष्ट आहे. ह्याकरितां मोठी कमिटी आणि विस्तृत चौकशी ह्यांची आवश्यकता नाहीं. रजिस्ट्रार ह्यांनी इन्स्टिट्यूटचे व प्रांतिक बँकेचे अध्यक्ष ह्यांस सहकारी संस्थांचीं मतें मोळा करून सहकारी चळवळीचे प्रश्न सोडवण्याचे मार्ग सुचवतां येतील. ह्या प्रकारच्या समितीचें कार्य लवकर चालू होऊन सहकारी कार्यकर्ते तिच्यापुढें आपलीं मतें व कल्पना मांडतील अशी आशा आहे.

मुंबई प्रांतिक सहकारी बँकेची नाशिक शाखा कमिटी

बँकेचे अध्यक्ष, श्री. आर. जी. सरव्या, यांचे भाषण

नाशिक हें यात्रेचें व पाविऱ्याचें ठिकाण आहे पण व्यापारी दृष्ट्या तें पुढारलेलें नाहीं. मुसार मालाकरितां लासलगांव व कापूस-मुरमुगाकरितां मालेगांव हीं या जिल्ह्यांत प्रामुख्यानें व्यापारी केंद्रें आहेत. परंतु सटाणा, सिन्नर, चोंटी याही पेठा आतां पुढें येत आहेत व नाशिकही त्यांच्या मागोमाग व बरोबरीनें जमत आहे यामुळें व्यापारी व सहकारी बँकांची जरूरी आहे. करितां आपली येथील शाखा भरभराटीस येईल याविषयीं मला मुळींच शंका वाटत नाहीं.

येथें जिल्हा सहकारी बँक होती, परंतु १९३० पासून जी शेतकी धान्यांची मंदी सुरू झाली तिचा परिणाम शेतकी पतपेढ्यांवर बराच वाईट झाला व बऱ्याच सोसायट्या डबघाईस आल्या. त्याचा सहाजिक परिणाम त्यांची जिल्हा बँक तितकीशी जुनी नसल्यामुळें व स्वतःचे रिझर्व्ह बळकट करण्यास पुरेसा अवधी न मिळाल्यामुळें त्या बँकेवर झाला व तिला आपलें काम बंद करणें जरूर पडलें. शेतकरी हा आपला धंदा कर्ज घेतल्याशिवाय करूं शकत नाहीं, तशांत शेतकी धंद्याला मंदी आली होती. कर्ज फेडल्यावर परत कर्ज मिळूं शकत नाहीं, असें झाल्यावर बहुतीवर त्याचा बराच अनिष्ट परिणाम झाला. सरकारनें तगावी कर्ज देण्याची योजना मंजूर केली. परंतु त्याच्या अटी सभासदाला मान्य करणें जड जाऊं लागलें, इतकेंच नव्हे तर तें कर्ज खर्चाच्या दृष्टीनें महाग पडून वेळेवर मिळणेंही मुष्किलीचें झालें. सभासदांना व्याजाच्या मुबलक सवलती देऊनही, परत कर्ज देण्याच्या सुलभतेच्या अभावीं पतपेढ्यांचे पुनर्जीवन करणें मुष्किलीचें भासूं लागलें. त्यामुळें कांहीं ठिकाणीं नाशिक बँकेची बाकी देऊन टाकून सोसायट्यांचे सर्व संबंध आमच्या बँकेनें आपल्याशीं जोडून घेतले, तर कांहीं सोसायट्यांच्या व्यक्तिशः सभासदांची ऐपत व बागणूक बरोबर असल्यास त्यांसच कर्ज देण्याकरितां म्हणून डबघाईस आलेल्या सोसायट्यांसही कर्ज देण्यास मान्यता दिली. याप्रमाणें दिलेल्या कर्जाची रक्कम जरी फार नसली तरी हें आश्वासन सोसायट्या बरतीं आणण्यास बरेंच उपयोगीं पडलें व पडत आहे असें म्हणण्यास मला खात्री वाटत आहे. नाशिक बँकेच्या ७५ सोसायट्यांपैकीं पहिल्या वर्षी १४ सोसायट्या वरील घोरणास अनुसरून वर्ग करण्यांत आल्या व आतां त्यांची संख्या ३१ आहे. सर्वसाधारण माहितीवरून असें कळतें कीं, आतां मोडावयास लागणाऱ्या सोसायट्यांची संख्या हाताच्या बोटांपेक्षां जास्त राहूं शकणार नाहीं व हा भाग २-४ वर्षांत, हल्लीप्रमाणें सुधारत राहिल्यास, खात्रीनें पूर्ण सुधारेल.

शाखा कमिटी-तिचीं कामें व अधिकार

ही सुधारणा घडण्यास स्थानिक पुढाऱ्यांची मदत असणें अत्यावश्यक आहे. येथील सुपरवायझिंग युनियन्स हींही तहकुबींत (Under suspension) आहेत. नाशिक बँकेकडून वर्ग केलेल्या सोसायट्या मालेगांव शाखेला जोडल्या होत्या म्हणून स्थानिक सहकारी पुढाऱ्यांची मदत मिळूं शकत नसे. या सर्व गोष्टींमुळें नाशिक येथें या बँकेची शाखा उघडावी अशी मागणी झाली व त्याचा मान देऊन ९-११-४३ रोजीं येथील शाखा उघडली. वास्तविक नाशिक तालुक्यांत सोसायट्या फारच थोड्या आहेत व त्या दृष्टीनें नाशिक हें ठिकाण कांहीं तितकेंसें बरोबर नाहीं व शाखाही तोट्यांतच चालण्याचा संभव होता. परंतु आतां नवीन सोसायट्या-कंझूमर्स स्टोअर्स, माजीपाला सोसायट्या वगैरे-निघत आहेत. त्याचप्रमाणें निफाड भाग हाही, बागाईत भाग असल्यामुळें तेथेंही बराच वाव आहे. हा भागांत कांदे बरेच पिकत असल्यामुळें कांदे स्टोअर्सही होणें आहेत. अशा वेळीं स्थानिक पुढाऱ्यांचें सहकार्य, वाईट सोसायट्या सुधारण्यास व नवीन नाना प्रकारच्या सोसायट्या काढून हा भाग सहकारी दृष्ट्या पुढें आणण्यास, फारच जरूरीचें आहे. शिवाय या भागांतील अडचणी वरचेवर कळणें शक्य झाल्यास त्या दूर करणें सुलभ होईल. त्याचप्रमाणें येथील व्यवहार शक्य तितका स्थानिक पुढाऱ्यांच्या मदतीनें करणें इष्ट व फायदेशीर होय. म्हणून करितां येथें एक शाखा कमिटी स्थापन करण्याची आवश्यकता माझ्या बोर्डास वाटत आहे व ती आपण निवडून द्यावी ही विनंती आहे.

या कमिटीचीं कामें व अधिकार आज आपल्यापुढें स्वीकारण्याकरितां जे पोट नियम ठेवण्यांत येणार आहेत त्यांत समाविष्ट केलेले आहेतच. पण थोडक्यांत सांगावयाचें झाल्यास ते खालीलप्रमाणें आहेत:—

(१) बँकेच्या बोर्डावर संलग्न सोसायट्यांतर्फे डायरेक्टरांची निवड करणें.

(२) सोसायट्यांस कर्ज तहकुबी वगैरेसंबंधीं बँकेचें बोर्ड अधिकार देईल त्याप्रमाणें व त्यास अनुसरून मंजूर करणें अगर शिफारस करणें.

(३) शाखेची शिल्लक तपासणें, कर्ज नोंद व शाखेनें घेतलेले कर्ज रोखे पहाणें, सरकारी तपासणी यादी, इन्स्पेक्शन याचा पाहाणें व त्याबद्दल विचार करणें, हुंडी लिमिटस्, माल तारण, कर्जाच्या मर्यादा, ठेवीदारांचा वारस वगैरेसंबंधीं हेड ऑफिसकडे शिफारस करणें.

(४) वाईट व स्थगित सोसायट्या सुधारण्याकरितां इन्स्पेक्टर्सना वेळोवेळीं सूचना देणें व मदत करणें व जरूर तेथें स्वतः भेट देणें.

(५) शाखेच्या क्षेत्रांत सुधारणा व प्रगति होण्यासाठीं मार्ग सुचविणें. सोसायट्यांच्या तक्रारी असल्यास त्या बँकेकडे कळवून दाद लावून घेणें.

(६) बँकेच्या बोर्डानें मंजूर केलेल्या ग्रँटप्रमाणें कमिटीचा खर्च करणें व व्यवहार चालविणें.

(७) वार्षिक सर्व साधारण सभेकरितां कमिटीचा व शाखेचा अहवाल तयार करणें.

(८) शेतींची सुधारणा निरनिराळ्या गांवीं कशी करतां येईल व ती करण्यास कसें उत्तेजन बँकेनें द्यावें याबद्दल शिफारस करणें.

(९) आर्थिक बाबतींत सोसायट्यांना सूचना व सल्ला देणें व सभासदांस सहकारी पैशापासून स्वतःचा फायदा कसा जास्त होतो व तो कोणत्या रीतीनें करून घेतां येईल याचें ज्ञान व समजूत देणें. शक्य झाल्यास ही कमिटी सोसायट्यांवर सुपरवायझिंग युनियन्सचे अभावीं देखरेखीचेंही काम हातीं घेऊं शकेल अशी आशा आहे.

हल्लीं शेतकऱ्यांना त्यांच्या मालाची किंमत जरा योग्य व किफायतशीर मिळत आहे. पैसा मिळवणें हें जरी कठीण असलें

तरी तो राखून ठेवणें त्याहीपेक्षां कठीण आहे. हल्लीं झालेला फायदा जर बरोबर राखून ठेविला नाहीं तर लढाईनंतर शेतकऱ्यास परत पश्चात्ताप करावा लागेल. हल्ली जमिनीच्या किंमती वाढल्या आहेत; त्याचप्रमाणें सोन्या-चांदीच्या किंमतीही जबर झाल्या आहेत. तरी ह्या गोष्टींत पैसा गुंतवल्यास तो जेव्हां परत लागेल त्यावेळीं जमीन व सोनें-चांदी विकून उभारावा लागेल परंतु त्यांच्या किंमती उतरल्यामुळें ह्या पैशांत तूट येईल. म्हणून पैसा रोखीनें शिल्लक ठेवणें जरूर आहे. परंतु रोख पैसा जवळ ठेवणें शेतकऱ्यास तेवढेंच जमत नाहीं. म्हणून हा पैसा ठेव म्हणून सोसायट्यांत त्यांनीं ठेवावा म्हणजे सभासदांस व्याजरूपानें थोडीशी कमाई होऊन मुद्दलांत घट होणार नाहीं, इतकेंच नव्हे तर आपल्या सहकारी सभासदांसही त्यामुळें मदत केल्याचें श्रेय येईल. तरी ह्या सूचनेचा सर्वांनीं विचार करून फायदा घ्यावा ही विनंती आहे.

रेल्वे प्रवासाच्या दरांत वाढ

गेल्या एप्रिल महिन्याच्या पहिल्या तारखेपासून रेलवे प्रवाशांच्या तिकिटांवर २५ टक्के अधिक घेतले जाणार असें सर एडवर्ड बेंथॉल ह्यांनीं मध्यवर्ती असेंब्लींत रेलवेजचें १९४४-४५ चें आपलें अंदाजपत्रक पुढें मांडतांना सांगितलें. सर्व वर्गांच्या रेलवे प्रवाशांच्या तिकिटांचे दरांत एवढी मोठी वाढ एकदम करण्याच्या ह्या योजनेवर कडक टीका सर्वत्र होत असल्यास त्यांत नवल नाहीं. चलनवृद्धीमुळें होणाऱ्या महागाईस आळा घालण्याचा आणि रेलवेवर पडत असलेला ताण कमी करण्याचा हा उपाय आहे असें ह्या दरवाढीचें समर्थन सर एडवर्ड ह्यांनीं केलें आहे. दरवाढीची कडू गोळी शर्करावगुंठित करण्यासाठी त्यांनीं असें सांगितलें आहे कीं, वाढाव्यामुळें होणारें जादा उत्पन्न सरकारच्या मामुली उत्पन्नांत जमा केलें जाणार नसून त्याचा स्वतंत्र फंड बाजूस काढून ठेवण्यांत येईल आणि त्याचा विनियोग युद्धोत्तर काळांत तिसऱ्या वर्गाच्या प्रवाशांच्या सुखसोयी वाढवण्याकडे केला जाईल. ह्या शेवटच्या आश्वासनानें कोणाचेंहि समाधान झालेलें नाहीं आणि होईल असें वाटत नाहीं. तिसऱ्या वर्गाच्या सोयींची व्यवस्था अपुरी असल्याची आणि त्यांची कुचंबणा होत असल्याची तक्रार जुनी आहे. ती दूर होण्याची आशा युद्धपरिस्थितींत नाहीं आणि पुढें व्हावयाच्या सुधारणेच्या आश्वासनाचा आज उपयोग नाहीं ही साधी गोष्ट सर एडवर्ड ह्यांच्या लक्षांत यावयास हवी होती. रेलवेनें प्रवास करणाऱ्या जनतेचे हाल सध्या कसे होत आहेत ह्याची कल्पना त्यांस असावी असें दिसत नाहीं. युद्धकाळांत लष्करी प्रवासुकीची वाढ होणें, सामान्य लोकांच्या उपयोगाच्या आगगाड्यांची संख्या कमी होणें आणि प्रवाशांस गैरसोय सोसावी लागणें अपरिहार्य आहे, हें समजण्यासारखें आहे. पण रेलवेनें प्रवास करणाऱ्या जनतेची विलक्षण गैरसोय एकाबाजूनें चालली असतां तीस जादा पंचवीस टक्क्यांचा भार सोसावयास लावणें समर्थनीय नाहीं. रेलवेजवरचा ताण कमी करण्याचे दुसरे मार्ग सरकारनें शोधाव्यास हवे होते. सध्याच्या स्थितींत केवळ चैनीखातर प्रवास करणारांची संख्या म्हणण्यासारखी आहे असें मानण्यास जागा नाहीं. युद्धपरिस्थितीमुळेंच वाढता रेलवेप्रवास आवश्यक झाला आहे, हा मुद्दा येथें सर एडवर्ड ह्यांनीं ध्यानांत घ्यावयास पाहिजे होता. पंचवीस टक्क्यांची रेलवेदरांत वाढ हा चलनवृद्धीचें नियमन करण्याचा एक उपाय म्हणून सुचवतांना रेलवेप्रवासाच्या सध्याच्या एकंदर परिस्थितीचा विचार त्यांनीं केला असता तर आपल्या ह्या सूचनेचा अनिष्टपणा त्यांस पटला असता. रेलवेप्रवास अगोदरच जाचक झालेला सुधारण्याचा प्रयत्न करण्याचें अभिवचन देण्याऐवजी सर एडवर्ड ह्यांनीं तोहि प्रवास अधिक सर्चाचा होईल अशा प्रकारची दरवाढीची सूचना केल्यामुळें असेंब्लीमध्यें तिला सर्व लोकप्रतिनिधींचा जोराचा विरोध झाल्यास त्यांत आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं. सरकारनें आपल्या घोरणाचा फेरविचार करून लोकमतास मान देणें आवश्यक आहे.

दि इंडियन रियल इस्टेट कॉर्पोरेशन लिमिटेड

बालमुकुंद रोड, रविवार पेठ, पुणें

सर्व तऱ्हेच्या बांधकामाचीं कॉन्ट्रॅक्टस्, व लँड डेव्हलपमेंटच्या योजनांचे व्यवहार होतात.

—ठेवी घेणें आहेत—

मुदत	६ महिने	दर ४ टक्के
१२	„	४॥ „
२४	„	५ „

माहिती व अर्जाकरितां मॅनेजर यांस लिहा.

बॉम्बे को-ऑपरेटीव इन्शुअरन्स सोसायटी लिं.

सहकारी संस्थांच्या सभासदांस विशेष सवलत

एकंदर कामकाज ... १। कोटींहून अधिक
एकूण मालमत्ता ... १८ लाखांहून अधिक
आयुर्विमा फंड ... १६ लाखांहून अधिक

एजन्सीच्या अटी अगर पॉलिसीच्या विशेष माहितीकरितां चौकशी करा:—

मुख्य ऑफिस:—

को-ऑपरेटीव इन्शुअरन्स बिल्डिंग,
सर फिरोजशहा मेथा रोड, कोट, मुंबई.

हिंदुस्थानच्या आघाडीवरील सहकारी विमा संस्था

क्षणोक्षणीं हास्याची खसखस पिकविणारा, खमंग, खुसखुशीत, खुमासदार विनोदाचा

दिलखुष नमुना

पहावयाचा असेल तर

पनघटच पाहिला पाहिजे

शनिवार ता. १९ पासून–

३ रा आठवडा

प्रकाश पिक्चर्सचा मनोरंजक बोलपट

पनघट

– एव्हरग्रीन रिलीज–

–: भूमिका :–

रत्नमाला, उमाकांत, जीवन

–ग्लोब फोन ६९१ पुणें–

दररोज ६॥ व १० वाजतां

शनि. रवि. सोम. दुपारीं ३॥ वाजतां जादा खेळ.

दररोज सकाळीं १० ते १२ व दुपारीं ४ चे पुढें

ग्लोबमध्यें वरच्या दराचीं तिकिटें रिझर्व्ह केलीं जातील

धर्मवीर डॉ. मुंजे

यांनीं प्रशंसिलेला प्रकाशचा

– प्रचंड बोलपट –

१७ वा आठवडा

प्रकाश पिक्चर्सचा

पौराणिक मराठी बोलपट

रामराज्य

दिग्दर्शक:–विजय भट्ट.

–: भूमिका :–

शोभना समर्थ, चंद्रकांत, काळे, सोहनी

मिनर्व्हा, पुणें

रोज फक्त दोन खेळ

६। व १० वाजतां

दर शनि. रवि. सोम. व इतर सुटीचे दिवशीं

जादा खेळ दुपारीं २॥। वाजतां

[एव्हरग्रीन–रिलीज]

सणसणीत संवादाच्या, दणदणीत

बोलपटांच्या सप्ताहांचें दशक !

शकुनीचें कारस्थान ! भगवंतांस अटक करण्याचा डाव फसला !!

१० वा आठवडा !

रॉयल रत्न १८ वें

पागनीस, दुर्गा खोटे यांची एकत्र भूमिका असलेला भक्त–पट !

महात्मा विदुर

दररोज तीन खेळ दुपारीं ३।, ६॥ व १० वाजतां.

दर रविवारीं सकाळीं जादा खेळ १० वाजतां

आर्यन, पुणें

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२४।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.

खालील पत्त्यावर चौकशी करावी.

व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

अर्थ

वर्गणीचे दर.

वार्षिक वर्गणी
रु. ४
(टपाल खेरीज माफ)
किरकोळ अंकास
दोन आणे.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष १० पुणें, बुधवार, तारीख मार्च १, १९४४ अंक ९

दि ब्रिटिश इंडिया जनरल इन्शुअरन्स कं. लि.

(स्थापना : १९१९)

आम्हीं आयुर्विम्याखेरीज करून आग, मरीन, अपघात, इत्यादींचे सर्व प्रकारचे विमे स्वीकारतों.

—: चेअरमन व मॅनेजिंग डायरेक्टर :—

सर होमी मेहता, के. बी. ई., जे. पी.

पुणें शाखा :
मोति माणिक मॅन्शन,
लक्ष्मी रोड.

हेड ऑफिस :
मेहता हाऊस,
अपोलो स्ट्रीट, मुंबई.

पुना गेस्ट हाऊस

१००, लक्ष्मी रोड, पुणें २.

Telephone 779

GUEST HOUSE

TELEGRAM Guest House Poona 2.

महायुद्धाची जाणीव ! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

गिरगांव मुंबई नं. ४

महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

विविध माहिती

औषधांची आयात

हिंदी लोकांस आवश्यक होणाऱ्या औषधांपैकी ८१% औषधांच्या आयातीस 'आगबोटींत जागा मिळवून देण्यांत आली आहे, असें मि. पिछे ह्यांनी असेंब्लीत सांगितलें.

द. आफ्रिकेंतील सोन्याचें उत्पादन

दक्षिण आफ्रिकेंतील सोन्याच्या खाणींचें उत्पादन घटलें असल्यामुळें त्याचा त्या देशाचे उत्पन्नावर बराच प्रतिकूल परिणाम झाला आहे. ही युद्धजन्य अडचण दीर्घ काळ टिकणार नाहीं, अशी अपेक्षा आहे.

इमारत खाली करण्याचा हुकूम

मुंबई शहरांतील मेयो रोडवरील बॉटलू मॅन्शन ह्या मोठींच्या महाराजांच्या इमारतींत श्री. हवेलीराम शेट्टी हे एक भाडेकरू होते. महाराजांना ही इमारत स्वतःच्या योग्य वापरासाठी हवी असल्याचें रेंट कंट्रोलरनें सर्टिफिकेट दिलें. ह्या सर्टिफिकेटाच्या योग्यायोग्यतेचा कोर्टास विचार करतां येणार नाहीं, हा सरकारी हुकुमांतील नियम प्रांतिक सरकारच्या कक्षेबाहेर आहे, असा हायकोर्टानें निवाडा करण्याबाबत श्री. शेट्टी ह्यांचा अर्ज आहे व त्याचा विचार मुंबई हायकोर्टांत चालू आहे.

रेल्वेखातील नोकरांत हरिजनांचें प्रमाण

हिंदुस्थानांतील सरकारी रेल्वेंत ६७ हजार हिंदू कामावर आहेत, त्यांपैकीं १,९०० हरिजन आहेत. कंपन्यांच्या व्यवस्थेखालील रेल्वेखातील ९७ हजार हिंदूंपैकीं २,८०० हरिजन आहेत.

लष्करी अधिकाऱ्यांची उर्दू परीक्षा

सुमारें १६ हजार ब्रिटिश लष्करी अधिकारी सोप्या उर्दूच्या परीक्षेंत उत्तीर्ण झाले आहेत. ही परीक्षा प्रत्येक महिन्यास घेण्यांत येते, तिला दरमहा १,६०० अधिकारी बसतात त्यांपैकीं सरासरीनें ४०० उत्तीर्ण होतात.

भाकड जनावरांचा संभाळ

सुमारें ४½ हजार भाकड जनावरें वाळगून तीं दुभतीं झाल्यास मुंबईस पाठविण्याची, बाँबे ह्युमॅनिटी लीगची ३७½ हजार रुपयांची योजना मुंबई सरकारनें मान्य केली आहे. ह्या खर्चापैकीं ३२½ हजार रुपये सरकार देणार आहे.

डॉ. जोशी ह्यांच्या संशोधनाचा अमेरिकेंत गौरव

अमेरिकेंतील न्यूयॉर्क विश्वविद्यालयांत रासायनिक संशोधनासाठीं बनारस विश्वविद्यालयाच्या रसायन शास्त्रचे प्रमुख, डॉ. एस. एस. जोशी ह्यांच्या विद्यार्थ्यास वार्षिक १ हजार डॉलर्सची फेलोशिप देण्यांत येईल, असें डॉ. जोशी ह्यांस कळविण्यांत आलें आहे. डॉ. जोशी ह्यांचे विद्यार्थी श्री. सोळंकी ह्यांच्या डीएस. सी. च्या निबंधाचें परीक्षण प्रो. नीडर्ल ह्यांजकडे सोपविलें होतें. त्यांच्यामध्यें डॉ. जोशी ह्यांच्या उत्कृष्ट संशोधनकार्याबद्दल आदर निर्माण झाला व त्यांनीं वरीलप्रमाणें तो व्यक्त केला.

कोळशाच्या खाणींतील स्त्रीकामगार

कोळशाच्या खाणींत काम करणाऱ्या स्त्रिया वैद्यकीय दृष्ट्या लायक असल्यासेरीज त्यांना खाणींत कामास घेण्यांत येऊं नये, असें सरकारनें खाणीवाल्यांना कळविलें आहे.

सिंध सरकारचें अंदाजपत्रक

सिंध सरकारच्या १९४४-४५ च्या अंदाजपत्रकांत ११ लक्ष रुपयांचा वाढावा दाखविण्यांत आला आहे.

मेलगाड्यांत थर्डक्लासचे डबे नाहींत!

ईस्टर्न बेंगाल रेल्वेचे माजी एजंट श्री. एल. पी. मिश्रा हे रेल्वेजसाठीं एक पंचवार्षिक कार्यक्रम आखीत आहेत. तिसऱ्या वर्गाच्या उतारूंस १९½ इंचांऐवजीं २४ इंच जागा देणें, उतारूंच्या सामानासाठी फळ्यांची व्यवस्था वाढविणें, कलकत्ता व मुंबई येथें रेल्वेसंबंधीं म्यूझियम स्थापणें, इंजनें सध्यां चाळीस प्रकारचीं आहेत त्यांचे प्रकार सातावर आणणें, पॅसेंजर गाड्यांस पहिल्या वर्गाचें डबे व मेल गाड्यांस तिसऱ्या वर्गाचे डबे न जोडणें वगैरे, सुधारणा त्यांत समाविष्ट आहेत, असें समजतें.

न्यू ब्रिटन

युद्धसमाप्तीनंतर न्यू ब्रिटन अमेरिकेच्या स्वाधीन करण्याचा विचार कोणतेंहि ऑस्ट्रेलियन सरकार एक क्षणभरहि करणार नाहीं, असें ऑस्ट्रेलियाचे परराष्ट्र मंत्रि, डॉ. इव्हॅट, ह्यांनीं तेथील विधिमंडळांत सांगितलें.

मुंबईमधील बंगाली दुष्काळ-ग्रस्त

बंगालमधून मुंबईस आलेल्या १६२ दुष्काळग्रस्तांचें मुंबई सरकारनें बंगाल सरकारच्या खर्चानें पोषण केलें. हे लोक बंगालकडे आतां परत पाठविण्यांत आले असून तेथून त्यांस त्यांच्या खेडेगांवांकडे पोंचविण्यांत आलें आहे.

नोबेल बक्षीस मिळविणाऱ्या २७ शास्त्रज्ञांचें अमेरिकेंत वास्तव्य

नोबेल प्राइझ मिळविणाऱ्या २७ शास्त्रज्ञांचें वास्तव्य सध्यां अमेरिकेंत आहे. त्यांपैकी नाझी जाच टाळण्यासाठी युरोपांतून आलेले १७ अमेरिकन शास्त्रज्ञ आहेत. आणखीहि दोघे शास्त्रज्ञ असेच निसटून आले होते, ते त्यानंतर मरण पावले.

पॉलिसी बेचन करणारास विमा कंपनीवर दावा आणतां येतो काय?

श्री. एस. एच. देशपांडे ह्यांनीं स्वतःच्या व पत्नीच्या आयुष्याचा ट्रस्ट ऑफ इंडिया विमा कंपनींत २ हजार रुपयांचा हयातीमधील विमा उतरला होता व त्यांनीं तो विमा दुसऱ्याचे नांवें बेचन केला होता. हें बेचन कंपनीकडे नोंदण्यांत आलें होतें. श्री. देशपांडे ह्यांची पत्नी, जानेवारी, १९४०मध्यें निवर्तली व त्यांनीं विम्याचे पैसे मिळण्याबद्दल दावा आणला. बेचन घारण करणारा वादी होण्यास तयार नसल्यामुळें त्यास प्रतिवादी करण्यांत आलें. विमेदारानें आपला विमा एकदां बेचन केल्यानंतर त्यास विमा कंपनीवर दावा लावण्याचा अधिकार उरत नाहीं; त्याचे विमापत्रकांतील सर्व अधिकार बेचनवाल्यास प्राप्त होतात; बेचन हें केवळ तारणासाठी असलें तरी मूळ विमेदाराचे अधिकार नष्ट होतात, असा मुंबई हायकोर्टानें निवाडा केला.

घरभाडें वाढविण्यास परवानगी द्या

मुंबई शहरांतील घर मालकांची वार्षिक साधारण सभा नुकतीच भरली होती, तीमध्यें भाषण करतांना अध्यक्षांनीं भाडें वाढविण्यास परवानगी देण्याबद्दल सरकारास विनंति केली. निदान सरकारनें मालमत्तेवरील कर तरी रद्द करावा, असें ते म्हणाले. मालमत्तेची व्यवस्था पहाण्यांचा व ती दुरुस्त ठेवण्याचा खर्च २००% वाढला आहे, ही गोष्ट सरकारनें विचारांत घ्यावी, अशी त्यांची सूचना आहे.

अनुक्रमणिका

	पृष्ठ		पृष्ठ
१ विविध माहिती	... ६६	३१९ कोटि रु. खर्च— जीवनोपयोगी वस्तूंचा पुरवठा वाढवा— स्टँडर्ड क्लॉथची वांटणी	
२ रेल्वे दरवाढीची असेंब्लीत चर्चा	... ६७		
३ चलनमधील महर्घता व युद्धनिष्ठा	... ६८	६ महाराष्ट्र बँकेची वार्षिक सभा	... ७०
४ गिऱ्हाईकाच्या रोख्यांवर बँकेचा हक्क	... ६८	७ के. नानलशाखी	... ७०
५ स्फुट विचार	... ६९	८ जर्मनीचें वाढतें राष्ट्रीय कर्ज	७१
बँकेसंबंधी कायद्यांत दुरुस्ती— हिंदी रेल्वेजवर		९ पेशानें काय विकत मिळत नाहीं !	७१

अर्थ

बुधवार, ता. १ मार्च, १९४४

रेल्वे दरवाढीची असेंब्लीत चर्चा

अंदाजपत्रकांत दाखल झालेल्या कोणत्याहि रकमेस कायदेमंडळानें संमति देण्याचें नाकारल्यास सरकारला तिचें अगत्य वाटत असेल तर तसें नमूद करून तिचा पुन्हां अंतर्भाव करण्याचा अधिकार गव्हर्नर जनरलला कायद्यानें दिला आहे ही गोष्ट ढोळ्यांपुढें असूनहि मध्यवर्ती असेंब्लीनें सर एडवर्ड बेंथॉल ह्यांची रेलवेच्या तिकिटांचे दर पंचवीस टक्क्यांनीं वाढविण्याविषयींची सूचना पांच मतांच्या अधिक्यानें नामंजूर केली. सर्व पक्षांच्या सभासदांच्या मतैक्यामुळें सरकारचा हा पराभव घडून आला. सरकारच्या मतानें दरवाढ आणि तिच्या योगानें येणाऱ्या दहा कोटि रुपयांचा फंड ह्यांचें अत्यंत मोठें महत्व होतें. ह्याच्या उलट, दरवाढ अनिष्ट व अनावश्यक आहे असें लोकप्रतिनिधींच्या मनानें घेतलें होतें. ह्यामुळें सरकारचे मंत्री आणि भिन्नभिन्न पक्षांचे सभासद ह्यांनीं आपापल्या भाषणांत उपयोगांत आणलेल्या मुद्यांनीं ते परस्परांचें समाधान करूं शकले नाहींत. युरोपियन प्रतिनिधींवांचून सर्व लोकनियुक्त सभासदांनीं सरकारच्या विरुद्ध मतें दिलीं ही गोष्ट येथें लक्षांत ठेवण्यासारखी आहे. दरवाढीच्या पैशाचा उपयोग तिसऱ्या वर्गाच्या सुखसोयी वाढवण्याकडे करण्याचा सरकारचा हेतु होता आणि त्यासंबंधानें लोकप्रतिनिधी बेफिकीर होते असें म्हणतां यावयाचें नाहीं आणि जनतेचें हित सरकारला अधिक कळतें हाहि मुद्दा बळकट ठरावयाचा नाहीं. ह्या कारणानें लोकमतास मान देण्याचे बाबतींतली सरकारची जबाबदारी अधिकच वाढली.

सरकारच्या रेलवेजच्या प्रवासाचे दर वाढवण्याच्या योजनेवर प्रत्यक्ष रीतीनें मतदान झालें नाहीं. ह्या प्रश्नाची विस्तृत चर्चा झाली, पण तो अप्रत्यक्षपणानें निकालांत निघाला. दहा कोटि रुपयांची स्वतंत्र गंगाजळी निर्माण करण्याची अंदाजपत्रकांतील सरकारी योजना असेंब्लीपुढें मंजुरीस आली असतां ती रकम दहा कोटींनीं कमी केली जावी अशी दुरुस्ती श्री. दास ह्यांनीं सुचवली. दहा कोटींची गंगाजळी नामंजूर झाली म्हणजे दरवाढहि नामंजूर झाली असें वास्तविक होत नाहीं. ह्या गोष्टीचा उल्लेख करून सर एडवर्ड बेंथॉल म्हणाले कीं, दहा कोटींची स्वतंत्र गंगाजळी असेंब्लीच्या नकारामुळें बाजूस काढून ठेवणें अशक्य झाल्यास ही रकम मध्यवर्ती सरकारच्या मुख्य तिजोरींत जमा होईल. दहा कोटी रुपये जनतेच्या हातून सरकारच्या ताब्यांत आले असते तर चलनवाढीमुळें महागाई वाढण्यांस मदत होत आहे तिला थोडासा आळा बसला असता आणि हा पैसा युद्धसमाप्तीनंतर त्या वर्गाच्या उतारूंच्या सुखसोयी वाढवण्यास उपयोगी पडला असता. असेंब्लीच्या आडमुठेपणामुळें जनता ह्या दोन्ही फायद्यांस मुकत आहे असें उद्गार सर एडवर्ड ह्यांनीं काढले. त्यांत ध्वनित केलेला दोष दूर व्हावा म्हणून एका सभासदानें त्यासंबंधांत स्वतंत्र सूचना करण्याचा विचार केला, पण ही एकाच विषयाची पुनरुक्ति होईल ह्या मुद्यावर त्या सूचनेस मान्यता देण्याचें अध्यक्षांनीं नाकारलें.

सरकारच्या बाजूनें सर जेरेमी रेसमन ह्यांनीं प्रस्तुत प्रश्नाविषयीं स्वतःची बाजू पुढें मांडली आणि चलनप्रसाराच्या योगानें बाजारभाव वाढले आहेत, त्यांस मर्यादा घालण्यासाठी लोकांच्या जवळचा पैसा सरकारच्या तिजोरीकडे आकर्षून घेण्याकरितां दरवाढ आवश्यक आहे ह्या मुद्यावर मुख्यतः जोर दिला. सर्व चंदेबाजांनीं आपल्या किंमती चढवल्या आहेत आणि राष्ट्रीय हिताच्या दृष्टीनें सरकार हीच गोष्ट करूं पहात असतां तिला विरोध केला जात आहे अशी त्यांनीं तक्रार केली. चलनप्रसारजन्य महागाईच्या आपत्तीच्या मानानें जनतेच्या रेल्वे प्रवासाच्या गैरसोयी क्षुल्लक होत, असेंहि त्यांनीं बजावलें. सर एडवर्ड बेंथॉल ह्यांनीं दरवाढीचा बोजा सामान्य रेल्वेप्रवाशांवर पडणार नसून त्यांच्या अंतिम हितासाठीच ती करण्यांत येत आहे असें सांगितलें. युद्धोत्तर पुनर्घटनेंत रेल्वेजच्या सुधारणेसाठी एव्हांपासून गंगाजळी निर्माण करण्याचें अगत्यहि त्यांनीं प्रतिपादलें. असेंब्लीतल्या युरोपिअन सभासदांच्या गटानें ह्या मुद्यावरच भर दिला आणि दर वाढ करण्याची आवश्यकता आहे असें सांगितलें. रेल्वे प्रवासावर पंचवीस टके अधिक खर्च करण्याइतकी सामान्य हिंदी जनतेची ऐपत वाढली आहे हें सर एडवर्ड ह्यांचें म्हणणें लोकनियुक्त सभासदांस पटलें नाहीं आणि फडनवीसांच्या आग्रहामुळेंच रेल्वे मंत्र्यांचा दरवाढीचा सर्व खटाटोप आहे असें त्यांनीं बोलून दाखवलें. रेल्वे बोर्डानें आगगाड्यांची संख्या कमी केल्याकारणानें प्रवाशांची विलक्षण गैरसोय होत आहे. रेल्वे प्रवासाचें हें रेशनिंगच होय. कोणत्याहि वस्तूचें एकदा रेशनिंग झालें म्हणजे पुन्हां ती ग्राहकांस आणखी महाग करणें हें चुकीचें धोरण आहे. लोकांस आगगाड्यांत बसावयास जागा मिळत नाहीं, स्टेशनांवर तासन्तास ताटत बसावें लागतें किंवा फेरी करत जावें भाग पडतें. गाड्यांत दिवे नाहींत आणि प्रवाशांस अंधेरांत चाचपडावें लागतें. ह्या सर्व गैरसोयी अपरिहार्य मानल्या तर त्यांच्यासाठी आणखी पैसा लोकांस द्यावा लागणें ह्यांत दुहेरी अन्याय आहे हें सरकारानें लक्षांत घ्यावयास हवें होतें. फडनवीसांच्या दडपणामुळें प्रवासाच्या दरांत वाढ करण्यास आपण प्रवृत्त झालों अशी कबूली प्रत्यक्ष सर एडवर्ड बेंथॉल ह्यांनीं दिली आहे आणि युद्धोत्तर काळांत केल्या जावयाच्या सोयींच्या किंमतीची मरपाई लोकांनीं आज करावें ओझें सोसून करावी असा कोटिक्रम त्यांस उलटवावा लागला आहे.

चीनमधील आजची महर्गता व युद्धनिष्ठा

चीन आज त्याच्या उत्पन्नाच्या प्रमुख तीन बाबींस—कस्टम्सचें उत्पन्न, मिठावरील कर व करारांखालील बंदरांतील कारखान्यांवरील कर-मुकला असल्याकारणानें, केवळ पतीवरच त्याला आपला संसार चालवावा लागत आहे. त्यामुळें चलनवृद्धि व महागाई तेथें बोकाळली आहे. परराष्ट्रीय व्यापार अजिबात बंद आहे व चीनमध्येंच उत्पादन करावें म्हटलें तर त्यास लागणाऱ्या यंत्रसामुग्रीचा पूर्ण अभाव आहे. सहाजिकच, मालाच्या किंमती भरमसाट वाढल्या आहेत. युद्धापूर्वीच्या किंमतीच्या मानानें आजच्या किंमती शेकडो पटीनें ज्यास्त आहेत. जेथें जावें तेथें महागाई व नफेबाजी ह्यांबद्दलच भाषा व तक्रार ऐकूं येते. चीनची जपाननें पूर्णपणें नाकेबंदी केली आहे, हें चिनी लोक जाणतात व युद्धापेक्षा ह्या नाकेबंदीनेंच त्यांना जेरीस आणलें आहे. चुंगकिंग शहरांत खर्च होत असलेला पैसा पाहिला, म्हणजे तेथें श्रीमंती आहे, असें वाटतें. थिएटरें भरलेलीं असतात; खाद्यगृहांत गर्दी असते. चीनमध्यें कारखाने अगदीच थोडे आहेत. जे चालू आहेत, त्यांची व्यवस्था सरकारकडे आहे. कारखान्यांतील कामगार तेथेंच भात खातात व झोपतात. कारखान्यांच्या हद्दीबाहेर ते क्वचितच जातात. कित्येक कामगारांना आतां दरमहा २ ते ३ हजार चिनी डॉलर वेतन मिळतें, त्यावर बेफाम चलनवाढीनें निर्माण झालेल्या महागाईस तोंड देणें त्यांस शक्य होतें. सरकारी नोकरांचा पगार वाढत्या महागाईस अपुरा पडतो. त्यांना सरासरीनें प्रत्येकी दरमहा १ हजार डॉलर पगार असतो, परंतु ती एकट्या पगारदारासच कसाबसा पुरतो; सबंध कुटुंबाचें पोषण करण्यास तो असमर्थ असतो. चिनी शेतकऱ्यांच्या धान्यास भाव आला, तरी तोहि सुखी नाहीं. १९३७ सालीं चीनवर युद्धाचें संकट आलें, तेव्हांपासून अद्याप चीनमध्यें मोठ्या प्रमाणावर दुष्काळ पडलेला नाहीं. परंतु होनान व कँटन येथें लोकांना झाडाच्या साली, गवत, उंदीर, इत्यादि खाण्याची पाळी आली हजारो लोक उपासमारीनें मरण पावले. स्थानिक दुष्काळाचे दुष्परिणाम वहातुकीच्या साधनांच्या कार्यक्षमतेचे अभावीं अधिकच घोर होतात, असें तेथें आढळून आलें. शेतावर एका मजुरास कामावर ठेवावयाचें, म्हणजे दरसाल १० हजार डॉलर खर्च येतो! चीन हा युद्धाच्या आधीपासूनच दरिद्री देश आहे. तेथील दर माणशीं वार्षिक उत्पन्न अमेरिकेंतील दर माणशी उत्पन्नाच्या एक सत्तरांश सुद्धां नाहीं. पोटभर भात मिळाला म्हणजे संतोष मानण्याची लोकांची चीनमध्यें प्रवृत्ति होते, त्याचें खरें कारण दारिद्र्य हेंच आहे. अमेरिकेंतील कारखान्यांमधील कामगारास आपण मालक व्हावें असें वाटतें व त्यासाठी एकसारखा तो झटत असतो. चीनमधील माणसास अशा प्रकारचा विचार शिवतहि नाहीं. खंडकरी, आपण स्वतः शेत घेऊं, अशी कधींच मनीषा बाळगीत नाहीं. व शिंप्याच्या दुकानांतील उमेदवारास स्वतःचें दुकान थाटण्याचें मनांत येत नाहीं. रिक्शा ओढणारास स्वतः रिक्शांत बसण्याचें स्वप्न कधींच पडत नाहीं. चिनी लोकांना शिस्तीची सवय नाहीं व किंमतींचें नियंत्रण वगैरे प्रकार त्यांना निष्कारण बंधनकारक वाटतात. तथापि, कायद्याबद्दल त्यांना आदर आहे. ह्या सर्व पार्श्वभूमीवर महागाई वाढत चालली आहे. एका चिनी वर्तमानपत्रांतील जाहिरातींत हरवलेला कुत्रा सापडून देणारास ५०० डॉलर बक्षीस देऊं केलें होतें; हरवलेल्या मुलास सापडून देणारास ४०० डॉलर देऊं करणारी दुसरी जाहिरात शेजारींच छापलेली होती. ह्याचा अर्थ इतकाच, कीं किंमतीमध्यें ताळतंत्र उरलेला नाहीं व त्यांत प्रमाणशीरपणा राहिलेला नाहीं. अर्धा पौंड चॉकोलेटची किंमत ३८० डॉलर, एक पौंड कॉफीची किंमत ४०० डॉलर, अर्धा शेर लोणी ४०० डॉलर, अशा चीनमध्यें किंमती आहेत. ह्या परिस्थितींतहि स्वातंत्र्यासाठी चिनी लोक निष्ठापूर्वक आपलीं कर्तव्यें पार पाडीत आहेत.

गिऱ्हाइकाच्या रोख्यांवर बँकेचा हक्क

कोर्टाचा निकाल

रोचलदास गिडूमल आणि कं. च्या वेरोमल ह्या भागीदारानें कोलंबो येथें मर्कंटाईल बँक ऑफ इंडिया लि. मध्यें ३,५०० रु. भरले आणि ती रकम कराची येथें रोचलदास गिडूमल आणि कं. स तारेनें पाठवावी असें सांगितलें. बँकेनें कराची येथें रकम दिली नाहीं आणि रोचलदास गिडूमल आणि कं. नें स्वीकारलेल्या दोन हुंड्यांचे पैसे आपणांस त्या न पटल्यामुळें मिळावयाचे होते त्याच्या पोटीं ती जमा केली. बँकेचें म्हणणें असें होतें कीं, रोचलदास गिडूमल आणि कं. कडून येणें असलेल्या रकमा व तिला देणें असलेल्या रकमा ह्यांची वजावाट करण्याचा आपणांस कायद्याप्रमाणें हक्क आहे. रोचलदास गिडूमल आणि कं. नें ३,५०० रुपये मिळण्याबद्दल मर्कंटाईल बँकेवर फिर्याद केली. वादीचें म्हणणें असें होतें कीं आपण कोलंबो येथें बँकेस विशिष्ट कामासाठी रकम दिली आणि तिचा उपयोग बँकेला दुसऱ्या कामासाठी म्हणजे दुसऱ्या पैशाच्या वसुलीसाठी करण्याचा हक्क नाहीं. कोर्टानें या प्रकरणांतलें कायद्याचें तत्त्व स्पष्ट केलें तें असें:—गिऱ्हाईकानें बँकेकडे ठेवलेल्या सर्व रोख्यांवर तिचा हक्क आहे, परंतु विशिष्ट रोख्यांबाबत दोघांमध्यें कोणताहि करार असेल तर हा हक्क तेवढ्यापुरता चालू शकणार नाहीं. गिऱ्हाइकाच्या एका खात्यांत येण्याची दुसऱ्या खात्यांतील देण्याशीं बँकेस वजावाट करतां येईल. बँकर्सना गिऱ्हाईकांच्या रोख्यांवर हक्क आहे. पण गिऱ्हाइकांनीं ठराविक उद्देशानें व निश्चित कामासाठी पैसे भरले असल्यास त्यांवर बँकेस हक्क सांगतां येणार नाहीं. प्रस्तुत दाव्यांतील ३,५०० रुपयांची रक्कम बँकेकडे गिऱ्हाइकानें ठेवली होती असें मानतां येत नाहीं. तारेची हुंडी बँकेनें विकली आणि तिचे पैसे कराची येथें वादीस देण्याचा करार केला. येथें वादीचा संबंध ठेवीदार ह्या नात्याचा नसून हुंडीचा खरेदीदार असा आहे आणि प्रतिवादी बँक विक्रेती असून विकलेला जिन्नस वादीच्या स्वाधीन करण्याची जबाबदारी तिच्यावर आहे. ३,५०० रुपयांची रकम विशिष्ट कामासाठीं प्रतिवादी बँकेस देण्यांत आली होती आणि गिऱ्हाइकांच्या पैशावर बँकांस जो सर्वसाधारण हक्क असतो त्याचा उपयोग वादीविरुद्ध प्रस्तुत प्रकरणीं प्रतिवादीस करतां येत नाहीं. आपल्या हक्काचा असा उपयोग करण्याच्या अटीवर बँकेनें प्रस्तुत रकम स्वीकारली नसल्यानें तिचा त्या रकमेवर हक्क राहिला नाहीं. वरील मुद्यावर कोर्टानें वादीस ३,५०० रुपयांची रकम प्रतिवादी बँकेकडून देववली.

(इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ बँकर्सच्या जर्नलवरून)

स्फुट विचार

बँकांसंबंधी कायद्यांत दुरुस्ती

रिझर्व्ह बँकेच्या सेंट्रल बोर्डानें युद्धास प्रारंभ झाल्यानंतर हिंदी बँकिंगचा धंदा बेत असलेलें वळण विचारांत घेऊन, सदरहू धंदा नियंत्रित करण्यासंबंधींचे आपले विचार १९४२ च्या डिसेंबरमध्यें मध्यवर्ती सरकारास कळविले. युद्धकाळांत विस्तृत कायदा करणें शक्य नाहीं, असें सरकारनें रिझर्व्ह बँकेस जुलै १९४१ मध्यें कळविलें होतें; तेव्हां फक्त महत्त्वाच्याच दुरुस्त्या बँकेनें सुचविल्या व त्याप्रमाणें सरकारनें कंपनी कायद्यांत सुधारणा करण्याचें ठरवून मध्यवर्ती असेंब्लींत बिल मांडलें आहे. कंपनी कायद्याच्या २७७ एच कलमानें बँकेची व्यवस्था मॅनेजिंग एजंटाकडे सोपविणें बेकायदा ठरविलें आहे, परंतु कित्येक बँकांच्या मॅनेजिंग डायरेक्टरांच्या करारांत मॅनेजिंग एजन्सीच्या स्वरूपाच्याच अटी असतात (उ. १५ ते २० वर्षांची नेमणूक, बँकेच्या नफ्यांत भागीदारी, इ.) व ही गोष्ट कायद्याचे विरुद्ध कदाचित नसली तरी त्याच्या उद्देशाशीं पूर्णपणें विसंगत आहे. म्हणून असे करार अशक्य करणारी दुरुस्ती सरकारनें कंपनी कायद्यांत सुचविली आहे. दुसरी दुरुस्ती बँकांचे भांडवलाच्या संबंधांतील आहे. अधिकृत भांडवलाचा मोठा रुबाबदार आकडा आणि प्रत्यक्ष वसूल भांडवल थोडें असणें हितकारक नाहीं व अधिकृत, विकलें गेलेलें व वसूल भांडवल यांचे मध्यें प्रमाणबद्धता (१०० : ५० : २५) असणें आवश्यक आहे. त्याचप्रमाणें भागांची प्रेफरन्स, ऑर्डिनरी व डिफर्ड यांमध्यें वाटणी ठेवीदारांचे हितास विघातक होण्याचा संभव असतो. विशेषतः लहान रकमांचे डिफर्ड भाग काढून व ऑर्डिनरी भागांच्या रकमेपैकी अगदीं थोडी रकम वसूल करून ते धारण करणारांस अवास्तव मताधिकार देणें व एकांवा वर्षी बँकेस मोठा नफा दाखवून डिफर्ड भागीदारांची चंगळ करण्याचा मोह चालकांस होण्याची शक्यता रहाणें ह्या गोष्टी रिझर्व्ह बँकेस अत्यंत अनिष्ट वाटल्या व त्याप्रमाणें सरकारनें आतां दुरुस्ती सुचविलेली आहे. ह्या सर्व सुधारणा बँकिंगच्या धंद्याच्या दृष्टीनें योग्य आहेत, हें उघड आहे. मॅनेजर अथवा मॅनेजिंग डायरेक्टर यांचा करार पांच वर्षांपेक्षां ज्यास्त मुदतीचा असूं शकला नाहीं, तरी तो वेळोवेळ वाढविण्याचा अधिकार डायरेक्टर बोर्डास असावा, ही श्री. जमनादास मेहता यांची सूचना सर अर्झाझुल हक यांनीं मान्य केली. बँकांना आपल्या शेअर भांडवलाची विभागणी नव्या दुरुस्तीस अनुसरून घडवून आणण्यासाठी सर्व प्रकारच्या सवलती दिल्या जातील, असें सरकारतर्फे आश्वासन देण्यांत आलें.

हिंदी रेल्वेजवर युद्धोत्तर काळांत ३१९ कोटि रुपये खर्च होणार

मध्यवर्ती असेंब्लींतील युरोपियन गटानें रेल्वेजच्या अंदाजपत्रकांत सुचविलेल्या कपातीवर भाषण करतांना, युद्धानंतरच्या सात वर्षांत रेल्वेजची सुधारणा व पुनर्घटना यांचेशीतयर्थ ३१९ कोटि रुपये खर्चण्यांत यावयाचे आहेत, असें सर एडवर्ड बेंथॉल यांनीं सरकारच्या वतीनें सांगितलें. रेल्वेज पूर्ववत् स्थितींत आणण्यासाठी १२५ कोटि रुपये, रेल्वे नोकरांच्या सुखसोयीसाठी ४८ कोटि रुपये, तिसऱ्या वर्गाच्या उतारूंच्या सुखसोयीसाठी ४५ कोटि रुपये व प्रत्येक वर्षी ५०० मैल नवी रेल्वे बांधण्यासाठी एकूण ५६ कोटि रुपये खर्चिले जातील. पहिल्या वर्षी १६ कोटि रुपये, दुसऱ्या वर्षी २१ कोटि रुपये व पुढें दरसाल ५० कोटि रुपये खर्ची पडतील व त्याची तरतूद मुख्यतः घसारा फंड व रिझर्व्ह फंड यांतील रकमांतून होईल. १०० कोटि रुपये कमी पडतील, त्यांची कांहींतरी व्यवस्था करावी लागेल, असेंहि सर एडवर्ड यांनीं सांगितलें. ह्या सर्व खर्चावर प्रत्यक्ष व्याज सुटण्याची आशा नाहीं, हेंहि त्यांनीं स्पष्ट केलें.

जीवनोपयोगी वस्तूंचा पुरवठा वाढवा

धान्य निर्मितीस उत्तेजन देऊन व धान्यांची किंमत मर्यादित राहून अन्न-पुरवठ्याचा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न सरकार करीत आहे, परंतु शेतकऱ्यांना रोज लागणाऱ्या आवश्यक वस्तू त्यांस योग्य किंमतींत उपलब्ध करून देण्याचे संबंधांत सरकारनें कांहीं केलेलें नाहीं तें त्यानें हातीं घ्यावें, अशा अर्थाचा ठराव मि. हुसेन इमाम यांनीं कौन्सिल ऑफ स्टेटमध्यें मांडला, तो मंजूर झाला. शेतीच्या प्रश्नांकडे कौन्सिल लक्ष पुरें लागलें आहे, हें पाहून सर जोगेंद्रसिंह यांनीं समाधान व्यक्त केलें व सरकारतर्फे भाषण करतांना मि. एस. आर. सेन यांनीं, सरकार शेतकऱ्यांच्या हातीं आवश्यक वस्तू कशा पडतील यासंबंधी प्रयत्नांची शिकस्त करीत असल्याचें सांगितलें. शेतीचीं अवजारें उत्पादन करण्याची व्यवस्था होत आहे; ६० लक्ष बुटांच्या पुरवठ्याबाबत सरकारनें बाटा शू कंपनीशीं करार केला आहे; तयार होणाऱ्या लोकरी मालापैकीं निम्मा माल गिऱ्हाइकांसाठी उपलब्ध केला जाईल; कागद, कपडा इत्यादींचें उत्पादन कसें वाढविता येईल यासंबंधांत विचार चालू आहे; घासलेटाचा पुरवठा वाढविण्याचे प्रयत्न चालू आहेत; अमेरिका व ग्रेटब्रिटन या देशांकडून माल मोठ्या प्रमाणावर आयात करण्याची खटपट चालू आहे, वगैरे माहिती मि. सेन यांनीं सांगितली. ठरावास विरोध करण्याचें सरकारला कारणच नसल्यामुळें तो मंजूर झाला.

स्टँडर्ड क्लॉथची वाटणी

गरिबांच्या सोईच्या स्टँडर्ड क्लॉथच्या, ७९ कोटि वारांच्या मागणीपैकी ४१ कोटि वारांची मागणी १९४३ च्या डिसेंबर अखेर पुरी पाडण्यांत आली. हें कापड शक्यतोंवर व्यापाऱ्यांचे मार्फतच वाटण्याची व्यवस्था झालेली आहे. कांहीं प्रांतांनीं घाऊक व्यापाऱ्यांची नेमणूक केली आहे, तर कांहीं प्रांतांत किरकोळ व्यापाऱ्यांनाच सरकार कापड देतें. किरकोळ व्यापाऱ्यांना ३% नफा घेतां येतो व सरकार स्वतःच्या खर्चासाठी १% रकम घेतें. विशेषतः शेतकऱ्यांना हें कापड उपलब्ध व्हावें, असा प्रयत्न करण्यांत येतो. ज्या प्रांतांनीं व संस्थानांनीं प्रत्येकीं एक कोटि वारांपेक्षां अधिक कापड घेतलें आहे, अशांचा तपशील खालीं दिला आहे.

प्रांत अथवा संस्थान	वार कापड (लक्ष)
आसाम	११८
बंगाल	४५०
बिहार	३८९
मुंबई	२६७
मध्यप्रांत—बऱ्हाड	२४३
मद्रास	५६१
ओरिसा	११७
पंजाब	३९८
सिंध	११६
संयुक्त प्रांत	६७९
हैद्राबाद	१४८
रजपुताना स्टे. एजन्सी	१४६

बँक ऑफ महाराष्ट्र लि. ची वार्षिक सभा

बँक ऑफ महाराष्ट्र लि. ची वार्षिक सभा रविवार, ता.२७ रोजी भरली होती. बँकेचा ३१ डिसेंबर, १९४३ असेरचा ताळेबंद, नफा तोटा पत्रक, डिव्हिडंची वाटणी, इत्यादींस मंजुरी देऊन सभेनें निवृत्त होणाऱ्या सर्व डायरेक्टरांची एकमतानें निवडणूक केली. श्री. गो. द. आपटे व मेसर्स कुलकर्णी ॲन्ड खानोलकर हांची ऑडिटर्स म्हणून नेमणूक झाली. बँकेला तिचे उरलेले भाग विकण्यास सरकारनें परवानगी दिली, त्यासंबंधांत आर्टिकल्समध्यें दुरुस्ती सुचविण्यांत आली होती तिचा व भागीदारांच्या मताधिकाराची कमाल मर्यादा २५ मतांची होती ती १०० मतें करणाऱ्या आर्टिकल्समधील दुरुस्तीचा ठराव हे विशेष ठराव म्हणून पास झाले. बँकेचें विकीस काढलेलें सर्व भांडवल खपून गेल्यामुळें हापुढें नवीन अर्जदारांना भाग मिळूं शकणार नाहींत व मागणीचे प्रमाणांत यथाक्रम भागांची वाटणी केली जाईल, असें अध्यक्षांनीं जाहीर केलें. बँकेचें वसूल भाग भांडवल आतां ५ लक्ष रुपये होत असल्यामुळें ती शेडयूल्ड बँक होणार आहे.

के. आयुर्वेदाचार्य नानलशास्त्री : दुखवट्याची सभा

भांडारकर रिसर्च इंस्टिट्यूट, भारत इतिहास संशोधक मंडळ, वेदशास्त्रोत्तेजक सभा, महाराष्ट्र मंडळ, हिंदु महासभा, आयुर्वेद रसशाळा, आयुर्वेद महाविद्यालय, शेठ ताराचंद रामनाथ आयुर्वेदीय हॉस्पिटल, वैद्यक मंडळ, अष्टांग आयुर्वेद महाविद्यालय, भीवंडी वाग्वर्धनी सभा, वेद पाठशाळा, महाराष्ट्र ब्राह्मण सभा, कऱ्हाडे ब्राह्मण संघ, सार्वजनिक सभा, हरिकीर्तनोत्तेजक सभा, डेक्कन जिमखाना, महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी वगैरे संस्थांतर्फे रविवार ता. २०-२-४४ रोजी आयुर्वेदाचार्य पु. ग. नानलशास्त्री यांच्या अकाली निधनाबद्दल दुःखप्रदर्शन करण्याकरितां आयुर्वेद महाविद्यालयांत उमरावतीचे प्रसिद्ध वैद्य हेर्लेकरशास्त्री यांच्या अध्यक्षतेखालीं सभा झाली. वैद्य ना. व्यं. जोशी, प्र. माटे, श्री. केळकर वकील, श्री. चित्रावशास्त्री, वैद्यभूषण मणेशशास्त्री जोशी, वैद्य ह. वा. देशपांडे, नागपूर, वैद्य पुरोहित यांची नानलशास्त्री यांच्या गुणवर्णनपर भाषणें झालीं व त्यांनीं आयुर्वेदाच्या उज्जीवर्थ आपला देह कसा झिजविला हाबद्दल सर्वांना माहिती दिली व पुढील ठराव सर्वांनीं उभे राहून मंजूर केला.

"पुण्याचे सुप्रसिद्ध वैद्य आयुर्वेदाचार्य पुरुषोत्तमशास्त्री यांच्या अकाली मृत्यूबद्दल पुणें शहरवासियांच्या या सभेस अत्यंत दुःख होत आहे. त्यांनीं आमरण कष्ट सोसून पुणें शहरास भूषणभूत अशा संस्था निर्माण केल्या. त्यांच्या निधनानें आयुर्वेद शास्त्राची फार मोठी हानी झाली आहे. त्यांच्या कुटुंबांतील मंडळीवर हा वज्राघातच आहे. त्यांच्या असह्य दुःखांत ही सभा सहभागी आहे."

अध्यक्ष हेर्लेकर शास्त्री यांनीं समयोचित भाषण करून नानलशास्त्री हे आयुर्वेद शास्त्रांतील असंतुष्ट क्रांतिकारक कसे होते तें सांगितलें व वैद्य लागवणकरांचा बाप्पट सांप्रदाय आयुर्वेदसंशोधनाला कसा अनुकूल आहे त्याचें विवरण केलें. नानलशास्त्री यांनीं आपल्यापुढें जें मोठें ध्येय ठेवलें होतें, त्या दृष्टीनें झालेलें कार्य आरंभाच्या स्वरूपाचें आहे, असेंच त्यांना कसें वाटत होतें व तें पुरें करण्याची जबाबदारी सर्वांवर कशी पडली आहे तें सांगून व त्या जबाबदारींतील आपला हिस्सा आपण सांभाळूं त्याबद्दल उचलूं असें आश्वासन देऊन अध्यक्षांनीं आपलें भाषण संपविलें व जड अंतःकरणानें सभा बरखास्त झाली.

शेडयूल्ड बँकांच्या व्यवहाराचे आंकडे

हिंदी शेडयूल्ड बँकांकडील ठेवींचा आकडा आतां ६ अब्ज, ८४ कोटि रुपयांवर गेला आहे. त्यांपैकी २४ कोटि रुपये रोख शिल्लक आहेत व त्यांनीं रिझर्व्ह बँकेत ५९ कोटि रुपये ठेवले आहेत. शेडयूल्ड बँकांनीं दिलेल्या कर्जाची रक्कम १ अब्ज, ९० कोटि रुपये भरते व त्यांनीं डिस्काँट केलेल्या हुंड्यांची रक्कम ८½ कोटि रुपये आहे.

मलेरियावरील क्रांतिकारक हिंदी शोध

मागोरा पिल्स

अवघ्या ४ दिवसांत मलेरिया थांबतो.

१६ गोळ्यांच्या डबीस रु. १

— १०० गोळ्यांचें पॅकिंगही मिळतें. —

मागोरा केमिकल कं. लि.

टिळक रोड, पुणें २.

रक्तवर्धक प्रमाणेंच लोकप्रिय

दोन उपयुक्त औषधें.

ओजस — पौष्टिक पेयान्न

आबाल वृद्ध स्त्रीपुरुषांस उपयुक्त

मुलांचे करितां — अँटी ग्राइप मिक्श्चर

दांत सुलभतेनें येण्यावर व मुलांचे अपचनाचे विकारावर

केंद्रे:-मुंबई, पुणें, नागपूर, उमरावती, सांगली, कोल्हापूर, हुबळी.

पुणें मुख्य दुकान:-गणपती चौक, लक्ष्मीरोड पुणें.

आयुर्वेद रसशाळा

पुणें लि० पुणें ४.

जर्मनीचें वाढतें राष्ट्रीय कर्ज

चार वर्षांत जर्मनीचें राष्ट्रीय कर्ज ६००% वाढलें आहे व खेळत्या चलनी नोटांत ३००% वाढ झाली आहे. अल्पमुदतीच्या कर्जाचें प्रमाण जर्मनीस विशेष चिंताजनक आहे. १९३९-४० मध्यें एकूण कर्जाशीं अल्प मुदतीच्या कर्जाचें प्रमाण ३२.९% पडत असें तें १९४२ ४३ मध्यें ५५.७% वर गेलें आहे.

(आकडे अब्ज मार्काचे आहेत)

ऑगस्ट अखेर	एकूण	पैकी अल्प मुदतीचें कर्ज (%)	प्रसृत चलनी नोटा
१९३९	३७.४३	३२.९	१०.०१
१९४०	६६.३०	४६.७	१३.०३
१९४१	१११.२२	४९.३	१६.५०
१९४२	१६७.०२	५२.६	२१.८१
१९४३	२२९.८६	५५.७	२९.०३

१९४२-४३ मध्यें जर्मन सरकाराजवळ खर्चण्यासाठी ११० अब्ज मार्क उपलब्ध होते. त्यांपैकी ३५ अब्जांची वसुली करांचे मार्गानें झाली, २१ अब्ज मार्क जर्मनव्याप्त प्रदेशांकडून जमा करण्यांत आले, ८० अब्ज घरांवरील पट्टीचे आगाऊ एकदम वसूल केले त्याचे जमा झाले व ५६ अब्ज मार्कांचें कर्ज उभारण्यांत आलें.

पैशानें काय विकत मिळत नाहीं !

पैसा जवळ असला म्हणजे वाटेल तें विकत घेतां येतें अशी सामान्य समजूत आहे. पण खालील उद्गारांचें मनन करा:—

" पैशानें अनेक वस्तूंवरच्या साली व फोलपटें विकत घेतां येतात, परंतु त्यांच्या आंतला खरा गाभा मिळूं शकत नाहीं. पैशानें अन्न मिळतें, पण भूक मिळत नाहीं; औषध मिळतें, पण आरोग्य मिळत नाहीं; लोकांचीं ओळख होते, पण मित्र मिळत नाहीं; नोकर मिळतात, पण प्रामाणिकपणा मिळत नाहीं; आनंदाचे दिवस मिळतात, पण सुख व शांति मिळत नाहीं. "

" उद्यम "

फेब्रुवारी महिन्याच्या " उद्यमा " चे अंकांत युद्धोत्तर कालनि पुनर्घटना व अन्नपुरवठा ह्या विषयावर स्फुटोक्तींनें भरलेले संपादकीय स्फुट विचार आहेत आणि वसई येथील प्रख्यात मूर्तीकार श्री. यशवंत नानाभाई हाटकर ह्यांचा अल्प परिचय आहे. तसेंच भाजीपाल्यांची लागवड, नांगरण्याची कला, मुरांकरितां विविध प्रकारच्या झाडपाल्यांची वैरण ह्या विषयांवर तज्ज्ञांचे लेख आहेत. संशोधन-संकलन व जिज्ञासु जग ह्या मथळ्यासाली विविध प्रकारची उपयुक्त माहिती देण्यांत आली आहे.

" हेटकरी "

नेहमीप्रमाणें " हेटकरी " मासिकाचा फेब्रुवारी महिन्याचा अंक आकर्षक व वाचनीय आहे. ह्या मासिकाचा विशिष्ट समाजाच्या उन्नतीविषयक प्रश्नांशीं अत्यंत निकट व आपुलकीचा संबंध असला तरी त्यांतील लेख भारदस्त, विचारपरिप्लुत व माहितीनें भरलेले असे असतात आणि सर्व महाराष्ट्रीय वाचकांस बोधप्रद होईल अशीच त्यांची मांडणी व शिकवण असते. प्रस्तुत अंकांत प्रासंगिक विचार, शेतकरी शिक्षण, मंडारी समाज व आर्थिक धोरण हीं सदरें वाचनीय आहेत आणि त्यांतील लघुकथा मनोरंजक आहेत. इतर सदरांत आलेली माहितीहि उपयुक्त आहे.

दत्त कंपनी

७३५ शुक्रवार पेठ, पुणें २. दाभेआळी पोलिसलेटाजवळ
सर्व तऱ्हेचे काटे, वजनें व मापें, वेळेवर रिपेअर करून मिळतील.

दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.

हेड ऑफिस : पुणें शहर.
स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.
मुंबई शाखा : दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.
जळगांव शाखा : नवी पेठ, जळगांव.
नागपूर शाखा : गोखले बिल्डिंग, सिताबर्डी, नागपूर.

भांडवल

अधिकृत व विकीस काढलेलें	वसूल झालेलें	वसूल झालेलें
रु. १०,००,०००	रु. ६,८०,६५०	रु. ३,४०,३२५

एकूण खेळतें भांडवल रु. ७०,००,०००

बँकेच्या शेअरवर डिसेंबर १९४२ अखेर ४½% करमाफ डिव्हिडंड दिलें गेलें. बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदी-विक्री कमीशनें करून दिली जाते.

सी. व्ही जोग,
B. Com., Cert. A. I. B. C. A. I. I. B.
मॅनेजर

दि इंडियन रियल इस्टेट कॉर्पोरेशन लिमिटेड

बालमुकुंद रोड, रविवार पेठ, पुणें

सर्व तऱ्हेच्या बांधकामाचीं कॉन्ट्रॅक्टस्, व लँड डेव्हलपमेंटच्या योजनांचे व्यवहार होतात.

—ठेवी घेणें आहेत—

मुदत	दर ४ टक्के
६ महिने	३½ टक्के
१२ "	४½ "
२४ "	५ "

माहिती व अर्जाकरितां मॅनेजर यांस लिहा.

पुण्यांतील
आदर्श निवासस्थान व भोजनालय
छाया लॉजिंग व बोर्डिंग हाउस
बुधवार चौक, पुणें २.

आत्मा-थंड-गार!

खुमासदार विनोदानें काठोकांठ भरलेल्या विहिरीवर-करमणुकीच्या कड्यावर-पनघटावर शेंकडो रसिक

घटकाभर मौज-मजेचें-घडाभर

आनंदानें आकंठ पान करीत आहेत!

शनि. ता. २६ पासून- ४था आठवडा

प्रकाश पिक्चर्सचा मनोरंजक बोलपट

पनघट

-: भूमिका :-
रत्नमाला, उमाकांत, जीवन

- एव्हरग्रीन रिलीज -

-ग्लोब फोन ६९१ पुणें-

दररोज ६॥ व १० वाजतां शनि. रवि. सोम. दुपारीं ३॥ वाजतां जादा खेळ.
दररोज सकाळीं १० ते १२ व दुपारीं ४ चे पुढें
ग्लोबमध्यें वरच्या दराचीं तिकिटें रिझर्व्ह केलीं जातील

धावरे-रामरा ऽऽ या ऽऽ! "राम"भक्त वृद्ध "रमा" काकूंचे "रामा" विरुद्ध तक्रार!

१८ वा आठवडा

बाओ-बाओ-बाओ! पोरानं भुच्चादं मांडला! कापूस पिंजण्यांची धनुकली पळविली! हव-कुश यांची धनुर्विद्या पाहून छोटा राम् धनुर्धारी बनला!

प्रकाश पिक्चर्सचा पौराणिक मराठी बोलपट

रामराज्य

दिग्दर्शक:-विजय भट्ट.

-: भूमिका :-
शोभना समर्थ, चंद्रकांत, काळे, सोहनी

मिनर्व्हा, पुणें

रोज फक्त दोन खेळ
६। व १० वाजतां
दर शनि. रवि. सोम. व इतर सुटीचे दिवशीं
जादा खेळ दुपारीं २॥ वाजतां
[एव्हरग्रीन-रिलीज]

११ वा अकरावा अवतार! ज्याप्रमाणें भाविक देवाधिदेवांच्या दशावतारांकडे भक्तीनें पहातात त्याचप्रमाणें देवांच्या लाडक्या महात्मा विदुराकडे

अकराव्या आठवड्यांत. जणुं काय अकराव्या अवताराप्रमाणें प्रेमानें पहाणार!

दिग्दर्शः— पार्श्वनाथ आळतेकर
कलाः— बाबुराव पेंटर

रॉयल रत्न १८ वें

मराठी भाषेंत

महात्मा विदुर

११ वा आठवडा!

भूमिकाः—कै. विष्णुपंत पागनीस, दुर्गा खोटे, नायमपल्ली, प्रल्हाद, सीता जव्हेरी.
दररोज तीन खेळ दुपारीं ३।, ६॥ व १० वाजतां.
दर रविवारीं सकाळीं जादा खेळ १० वाजतां.

आर्यन, पुणें

हें पत्र पुणें, पेठ सांवुर्डा क. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' सांवुर्डा, प. नं. १२७।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
(टपाल खर्चासह)
किरकोळ अंकास
दोन आणे.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष १० पुणें, बुधवार, तारीख मार्च ८, १९४४ अंक १०

न्यू इंडिया इंडस्ट्रीज लि.

(Approved Re-traders and Approved Contractors)
२६ लॅमिंग्टन नॉर्थ, मुंबई ११.
अध्यक्षः—श्री. ग. स. मराठे, ॲक्चुअरी.

महाराष्ट्रांतील रबराचा प्रमुख कारखाना

★ गिरणीचे रोलर्स ★ रबरी हातमोजे ★ छापखान्यांचे रोलर्स
★ रीमोल्ड टायर्स ★ रबरी वॉशर्स ★ सॉलिड व्हील्स

व इतर रबरी माल तयार होतो.

पु. ग. मराठे
मॅनेजिंग डायरेक्टर.

पुना गेस्ट हाऊस

१००, लक्ष्मी रोड, पुणें २.

Telephone 779

GUEST HOUSE

TELEGRAM Guest House Poona 2.

महायुद्धाची जाणीव ! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

गिरगांव मुंबई नं. ४

महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

विविध माहिती

पश्चिम आफ्रिकेतील फौजांचें हिंदुस्थानांत आगमन

पश्चिम आफ्रिकेंतील सैनिक हिंदुस्थानांत आले आहेत, ते मुख्यतः नायेरिया, गोल्ड कोस्ट, सिएरा लिओन व गँबिया ह्या वसाहतींतील आहेत आणि त्यांत ख्रिस्ती, मुसलमान व इतर ह्यांचा सारखाच भरणा आहे. आपल्या घरापासून थोडे मैल सुद्धां आजवर दूर न गेलेलेच त्यांतील बहुसंख्य सैनिक आहेत व त्यांनीं ॲबिसिनियाच्या लढाईत भाग घेतलेला आहे.

म्हैसूर संस्थानांत शेतीचीं स्वस्त अवजारें

शेतकऱ्यांच्या बैलगाड्यांच्या चाकांच्या धावा, बैलांच्या पायाचे नाल, नांगर, कोयते, इत्यादींसाठी म्हैसूर सरकारनें गेल्या वर्षांत १,५०० टन लोखंड उपयोगांत आणलें व आणखी तितकेंच लोखंड त्यासाठी उपलब्ध केलें आहे, त्यामुळें शेतकऱ्यांना ह्या वस्तू बाजार-भावाच्या एक तृतीयांश किंमतीस पडतात. येत्या आठ महिन्यांत खर्चण्यासाठी म्हैसूर सरकारनें ७ लक्ष रुपयांची तरतूद केली आहे. ह्या कार्यक्रमांत ४ हजार नांगर, नागरांचे १½ लक्ष फाळ, चाकांच्या २० हजार धावा, ५ लक्ष नाल व २ हजार गाड्या तयार करण्यासाठी ४६ हजार घनफूट लांकूड ह्यांची व्यवस्था केलेली आहे.

शेतकऱ्यांच्या इंजनांसाठी व पंपासाठी क्रूड ऑइल

शेतीसाठी उपयोगांत येत असलेल्या ऑइल इंजनांस व पंपांस लागणारें क्रूड ऑइल शेतकऱ्यांस त्यांच्या १९४१ मधील खरेदीच्या ७५% प्रमाणांत मिळण्याची व्यवस्था मुंबई सरकारनें केलेली आहे. १९४१ नंतर ज्यांची इंजनांची खरेदी आहे किंवा त्या वर्षी ज्यांचीं इंजनें सतत चालू नव्हतीं, अशांनीं ठराविक तेलाच्या खरेदीच्या परवान्यासाठी कंट्रोलर ऑफ ऑइल सप्लाइज, मुंबई, ह्यांचेकडे अर्ज करावा.

फळांची प्रतवार लावण्याची व्यवस्था

मुंबई प्रांतांत राहुरी (अहमदनगर जिल्हा) व सासवड (पुणें जिल्हा) येथें ॲगमार्क योजनेप्रमाणें फळांची प्रतवार लावण्याची व्यवस्था आहे. पूर्व खानदेश जिल्ह्यांतहि संत्रीं व मोसंबी ह्यांची प्रतवार लावण्यांत येते. ह्या सर्व ठिकाणीं कित्येकांना अशी प्रतवार लावण्याचा परवाना दिलेला आहे. सहा महिन्यांत १½ लक्ष फळांची ह्या पद्धतीनें प्रतवार लावली गेली, त्याचा फायदा शेतकऱ्यांस फळांची किंमत चांगली येण्यांत झाला. हापूस आंब्यांची प्रतवार लावण्यास मुंबईच्या बाजारांत त्यांचा उत्तम भाव मिळूं शकतो. ज्यांना प्रतवार लावण्याच्या परवान्याचा दाखला पाहिजे असेल, अशांनीं चीफ मार्केटिंग ऑफिसर, मुंबई, ह्यांचेकडून अर्जाचा नमुना मागवून घ्यावा. सहकारी खात्याच्या मार्केटिंग विभागामार्फत प्रतवार लावण्याचें शिक्षण देण्याची व्यवस्था केली आहे.

हिंदुस्थान सरकारचा उत्पन्न-खर्च

एप्रिल ते डिसेंबर, १९४३ ह्या नऊ महिन्यांत हिंदुस्थान सरकारनें आपल्या उत्पन्नापेक्षा १०६½ कोटि रुपये अधिक खर्च केला. ह्या मुदतींत सरकारच्या कर्जांत १५२ कोटि रुपयांची भर पडली.

हिंदी रेल्वेजवरील अधिकारी

हिंदुस्थान सरकारच्या रेल्वेजवरील ६७ हजार नेमणुकींपैकी १,११२ अधिकारी आहेत. त्यांपैकीं ३९३ युरोपियन आहेत. युद्धजन्य वाढत्या कामासाठीं रेल्वेजवर ५४१ तात्पुरत्या अधिकाऱ्यांच्या जागा निर्माण करण्यांत आल्या, त्यांपैकी १०० जागांवर पेन्शनींत निघणाऱ्या जुन्या अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यांत आली व ३७१ अधिकाऱ्यांस बढती मिळाली. नोकरीची मुदत वाढवून मिळालेल्या १०० अधिकाऱ्यांपैकी ४५ युरोपियन आहेत.

सातारा स्वदेशी कमर्शिअल बँक लि.

वरील बँकेस ३० जून, १९४३ अखेरच्या वर्षी ३,५८१ रुपये नफा झाला. ऑर्डिनरी भागीदारांस करमाफ ८% डिव्हिडंड मिळालें. बँकेकडे २४½ लक्ष रुपयांच्या ठेवी आहेत, त्यांतील १५½ लक्ष रुपये मुदतबंद ठेवींत आहेत. रिझर्व्ह फंडाचा आंकडा आतां ४४½ हजार रुपये झाला आहे. बँकेनें १४½ लक्ष रुपये रोख्यांत व १०½ लक्ष रुपये कर्जात गुंतविलेले आहेत. श्री. वा. ग. चिरमुले ह्यांच्या नेतृत्वाखालीं बँकेची प्रगति होत आहे.

जनावरांची शिरगणती

मुंबई शहरांतील बैल, गाई, म्हशी, वासरें, मेंढ्या, बकऱ्या, इत्यादींच्या शिरगणतीचें काम चालू आहे.

अमेरिकन सैनिकांची हानि

चालू युद्धांतील अमेरिकन सैनिकांच्या हानीच्या ताज्या आकड्यांप्रमाणें, आतांपर्यंत १,५७,८६५ सैनिक कामास आले आहेत. त्यांपैकी ३६,००५ मृत, ५४,८६७ जखमी, ३५,८३० बेपत्ता व ३१,१६३ युद्धकैदी आहेत.

प्रवासी आकर्षण्याचा धंदा

ग्रेट ब्रिटनमध्यें बाहेरील देशांतील प्रवासी आकर्षून, त्यांना ग्रेट ब्रिटनमध्यें पैसे खर्च करण्यास लावण्याचा व त्यामार्गानें ग्रेट ब्रिटनेची अदृश्य निर्गत वाढविण्याचा मोठ्या प्रमाणावर प्रयत्न करण्याची आवश्यकता ट्रॅव्हल असोसिएशनचे अध्यक्ष, सर डगलस हॅकिंग, ह्यांनीं लंडनमध्यें प्रतिपादन केली. कोळशाच्या युद्धपूर्व निर्गतीची बरोबरी हा अदृश्य निर्गत व्यापार करूं शकेल, असें ते म्हणाले.

ग्रेट ब्रिटनवरील बॉम्ब हल्ल्यांतील मनुष्य हानी

	मृत	जखमी होऊन इस्पितळांत दाखल	एकूण मृत्यु व जबर दुखापत झालेले
सप्टें. १९३९ ते ऑग. १९४०	१,४९४	१,९८०	३,४७४
सप्टें-डिसें. १९४०	२२,२८२	२८,५२२	५०,८०४
१९४१	२०,८६३	२१,८३९	४२,७०२
१९४२	३,२२१	४,१४९	७,३७०
१९४३:—			
जाने.-जून	१,८३०	२,५१५	४,३४५
जुलै	१६७	२१७	३७७
ऑगस्ट	१०८	१६४	२७२
सप्टें.	५	११	१६
ऑक्टो.	११८	२८३	४०१
	५०,०८८	५९,६७३	१,०९,७६१

अनुक्रमणिका

	पृष्ठ
१ विविध माहिती ...	७४
२ मध्यवर्ती सरकारचें अंदाज-पत्रक ...	७५
३ मॅक्चुअरींच्या धंद्याचें नियंत्रण	७६
४ श्रीज्ञानेश्वरी कथामृत ...	७६
५ स्फुटविचार ...	७७
धान्य नियमनाविषयीं...	
प्रांतिक सरकारचें घोरण– २२½ कोटि रुपयांचे नवीन कर-नवीन करांविषयीं लोक-मत-धान्यपुरवठ्याच्या बाबी-साठीं शेतकऱ्यांस मदत-प्रांतावरील करांचे काय...	
दांत दुरुस्ती ...	७८
६ माजीपाल्याची लागवड	७८
७ दुष्काळजन्य रोगांवर उपाय	७९
८ हिंदी रेल्वेनें वाहतें उत्पन्न ...	७९

अर्थ

बुधवार, ता. ८ मार्च, १९४४

मध्यवर्ती सरकारचें अंदाजपत्रक

हिंदुस्थान सरकारचे फडनवीस, सर जेरेमी रेस्मन, ह्यांनीं १९४४–४५ सालाबाबतचें आपलें अंदाजपत्रक मध्यवर्ती असेंब्लीपुढें मांडलें आणि त्याच्या स्पष्टीकरणार्थ विस्तृत भाषण केलें. वाढता खर्च, उत्पन्नांत त्याच्या मानानें येणारी तूट, ती भरून काढण्यासाठी सुचवलेली करवाढ व शिल्लक तुटीची कर्जाच्या मार्गानें भरपाई हीं युद्धकालीन सरकारी उत्पन्न-खर्चाच्या परिस्थितीचीं लक्षणें त्यांत उत्कट रीतीनें प्रतीत होतीं. मध्यवर्ती सरकारच्या उत्पन्न-खर्चाच्या १९४४-४५ सालाविषयींच्या अपेक्षा काय आहेत आणि त्यांचेसंबंधांत फडनवीसांच्या योजना कोणत्या आहेत.त्यांचें दिग्दर्शन करण्यापूर्वी मागील व चालू वर्षांतल्या जमा-खर्चाच्या स्थितीची कल्पना येणें आवश्यक आहे. १९४२-४३ सालीं फेर अंदाजपत्रकाप्रमाणें ९४ कोटि रुपयांची तूट येईल असें वाटत होतें, पण पक्के हिशेब पुरे झाल्यावर हा आकडा प्रत्यक्ष रीतीनें ११२ कोटि रुपयांवर गेलेला दिसून आला. चालू साली म्हणजे १९४३-४४ मध्यें उत्पन्न २५४ कोटि रुपये होईल म्हणजे मूळ अंदाजपत्रकाच्या पेक्षा ३५ कोटींनीं अधिक होईल असा अंदाज आहे. परंतु खर्चांत ८७ कोटींचा वाढावा होऊन असेर ९२ कोटींची तूट येईल असा आजचा अजमास आहे. सरकारी खर्चाची रकम वाढत्या लष्करी खर्चानें फुगली आहे हें सांगावयास नको. चालू सालच्या दुरुस्त अंदाजपत्रकाप्रमाणें मामुली व मांडवली लष्करी खर्च अनुक्रमें २६२ व ३८ कोटि असा होईल. वाढलेले बाजारभाव, लष्कराचा विस्तार इत्यादि कारणांमुळें खर्चाचें हें प्रमाण बर गेलें आहे. बिनलष्करी खर्चातहि सुमारें ८ कोटींची वाढ झालेली दुरुस्त अंदाजपत्रकांत दिसते. निर्वासितांसाठी दोन कोटि रुपये, अधिक धान्य विकण्याविषयींच्या प्रयत्नास उत्तेजन म्हणून प्रांतिक व संस्थानी सरकारांस मदतीसाठी दोन कोटि, बंगालमधील दुष्काळासाठी तीन कोटि रुपये हीं सदरहु वाढीचीं कारणें आहेत. रेल्वेज व लष्कर ह्यांचेशिवाय इतर मध्यवर्ती सरकारी नोकरांस वाढत्या महागाई भत्त्याकरितां सवा दोन कोटि रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे.

ही पार्श्वभूमि लक्षांत घेऊन १९४४-४५ सालांतील उत्पन्न-खर्चाचा अंदाज काय आहे तो आतां पहूं. चालू वर्षाच्या दुरुस्त अंदाजपत्रकांतील उत्पन्नापेक्षा येत्या वर्षांतलें उत्पन्न ३० कोटि रुपयांनीं अधिक धरलें आहे. वहातुकीचीं साधनें वाढवून माल आवश्यक उपलब्ध होऊं शकतील ह्या अपेक्षेनें आयात जकातींचें उत्पन्न सुमारें एक कोटि रुपयांनीं अधिक होईल अशी आशा आहे. एक्साइजच्या उत्पन्नांत सवा कोटि रुपयांची भर होईल आणि तंबाखूवरची पट्टी ९ कोटींच्या ऐवजी १०½ कोटि रुपये होईल असा अजमास आहे. प्रांतीवरील करांचें उत्पन्न (फाजील नफ्याचे ७८ कोटि धरून) १७४ कोटि धरण्यांत आलें आहे आणि प्रांतिक सरकारांचा ह्या करांतील हिस्सा २३ कोटि रुपयांच्या वर होईल. पोस्ट व तारखात्याच्या उत्पन्नाचा अंदाज ११ कोटि रुपये आहे. सर्वांच्या वाचींकडे वळल्यास लष्करी खर्चास पहिलें स्थान आहे असें आढळतें. त्याची रकम २७६ कोटि रुपये असून त्याशिवाय सुमारें २५ कोटींचा मांडवली खर्च येणार आहे. बिनलष्करी खर्चांत ह्या मानानें केवळ अल्पवाढ आहे. वरील सर्व आकडे एकत्र केले असतां १९४४।४५ च्या अंदाजपत्रकांतील उत्पन्न-खर्च ढोबळपणानें साली दिल्याप्रमाणें होईल.

	(कोटि रुपये)
लष्करी खर्च	२७६·३
बिनलष्करी खर्च	८६·६
एकूण	३६३·२
चालू करांच्या आधारानें उत्पन्न	२८४·९
तूट	७८·२

ही सबंद अपेक्षित तूट जुने करे वाढवून किंवा नवीन कर बसवून नाहींशी करतां येणें शक्य नाहीं, ह्याची जाणीव फडनवीसांस आहे. तथापि, ती सर्वस्वी कर्जानें भरून काढणें इष्ट वसून शक्य तितकें करांचें उत्पन्न वाढवणें आवश्यक वाटून त्यांनीं त्यासंबंधांतल्या योजना अंदाजपत्रकांत दाखल केल्या आहेत. हिंदुस्थान सरकारास सध्याच्या युद्धपरिस्थितींत आपला लष्करी व बिनलष्करी खर्च भागवण्यासाठी पैसा उभा करावा लागत आहे त्याचप्रमाणें ब्रिटिश आणि अमेरिकन सरकारांस ह्या देशांत सर्वांच्या लागणाऱ्या पैशाच्याहि पुरवठ्या तात्पुरता करणें जरूर झालें आहे. ह्या दुहेरी कामांकरितां चलनवृद्धि होत आहे आणि तिचे योगानें महागाई पसरली आहे. ह्या प्रवृत्तीस आळा घालण्यासाठी सरकार अनेक उपाय योजीत आहे आणि जनतेच्या पैशाचा ओघ स्वतःच्या तिजोरीकडे खेचीत आहे. करवाढ हा त्यांपैकी एक मार्ग आहे आणि १९४४-४५ सालीं त्यांत सरकारला २२½ कोटि रुपयांचें अधिक उत्पन्न होईल असा अंदाज आहे. अपेक्षित तूट एवढ्या रकमेनें कमी होईल आणि बाकीची कर्जाच्या द्वारानें नाहींशी केली जाईल. रेल्वेजच्या दरांत वाढ, सरकीच्या व सुतीच्या लोकांच्या सरकारकडे ठेवी, भावनियंत्रण इत्यादि साधनांनीं एकूण सर्वांना लागारा पैसा, आणि तिजोरींत येणारा पैसा ह्यांची बरीचशी तोंडमिळवणी होऊन चलनविस्तारास आटा बसेल अशी आशा फडनवीसांनीं व्यक्त केली आहे. प्रांतीवरील कर, त्यास पात्र असलेल्या लोकांनीं

अगाऊ ठेव म्हणून सरकारी तिजोरीत भरण्याची योजना त्यांनी आंखली असून ती अमलात आणण्याचें ठरवलें आहे. विशिष्ट मर्यादेवरच्या प्रतिवरील कराच्या दरांत आणि तंबाखूवरच्या पट्टींत वाढ आणि सुपारी, चहा व कॉफी यांचे वर नवीन पट्टी हा करांचें उत्पन्न वाढवण्याच्या हेतूनें या बाबी अमलांत यावयाच्या आहेत. सुमारें २१ कोटि रु. जादा उत्पन्न देणाऱ्या करांच्या या बाबींची चर्चा स्फुट विचारांत आम्हीं आजच्या अंकांत केली आहे.

अॅक्चुअरींच्या धंद्याचें नियंत्रण

विमा कायद्यासंबंधीं दुरुस्ती

हिंदी विमा कायद्याच्या ११४ व्या कलमानें हिंदुस्थान सरकारला विमा कायद्याचा उद्देश पार पाडण्याचे दृष्टीनें योग्य वाटतील ते नियम करण्याचा अधिकार दिलेला आहे. १९३९ च्या विमाविषयक नियमांत सरकारनें आतां कांहीं दुरुस्ती सुचविली आहे, ती ११४ व्या कलमांत सांगितल्याप्रमाणें, १९ फेब्रुवारीच्या सरकारी गॅझेटांत जाहीर करण्यांत आली आहे. या दुरुस्तीच्या मसुद्यासंबंधीं कोणास कांहीं सूचना करावयाच्या असल्यास, त्या सरकारकडे १० मार्चपूर्वी पोचल्या पाहिजेत.

सध्याचा व नवा नियम

विमा कायद्यांत वर्णिलेला अॅक्चुअरी हा (१) इन्स्टिटयूट ऑफ अॅक्चुअरीज लंडन अथवा स्कॉटलंडमधील फॅकल्टी ऑफ अॅक्चुअरीज यांचा फेलो किंवा (२) ज्याला वरच्या नियमान्वयें सर्टिफिकेट देण्यांत आलें आहे असा वरील इन्स्टिटयूट अथवा फॅकल्टीचा असोसिएट किंवा अॅक्चुअरीचे ज्ञान असलेला मनुष्य यासच विमाकायद्यानें अॅक्चुअरी म्हणून मान्यता दिलेली आहे. सर्टिफिकेट मागतांना अर्जदारानें (असोसिएट किंवा इतर कोणीहि) आपली लायकी नमूद करावी लागते व सुपरिंटेंडेंट ऑफ इन्शुअरन्सला ती पटली तर तो त्याप्रमाणें सर्टिफिकेट देतो.

सुचविण्यांत आलेला नियम खालीलप्रमाणें आहेः—"इन्स्टिटयूट ऑफ अॅक्चुअरीज, लंडन किंवा स्कॉटलंडमधील फॅकल्टी ऑफ अॅक्चुअरीज यांचा फेलो हा अॅक्चुअरीचें काम करूं शकेल. तथापि, एकाद्या विमाकंपनीनें सुपरिंटेंडेंट ऑफ इन्शुअरन्सकडे अर्ज करून वरील संस्थांपैकीं एकादीचा असोसिएट किंवा दुसरा कोणीहि लायक इसम यांची अॅक्चुअरी म्हणून नेमणूक केल्यास्तेरीज त्या कंपनीस कायद्याचीं बंधनें पाळतां येणार नाहींत असें सुपरिंटेंडेंटला पटवून दिलें, तर तो अशा अर्जाचा विचार करून विशिष्ट परिस्थितीपुरती त्या असोसिएटला किंवा इसमाला योग्य त्या अटींवर अॅक्चुअरी म्हणून सही करण्यास परवानगी देईल".

फेलो व असोसिएट यांतील भेद

यापुढें विमाकंपन्यांची अॅक्चुअरीचीं कामें शक्यतोंवर फेलोजकडूनच करविलीं जावीं, असा सरकारचा आग्रह आहे आणि फेलोज मिळूं शकले नाहींत, तरच तेवढ्यापुरती असोसिएटसना सुपरिंटेंडेंट ऑफ इन्शुअरन्सच्या मर्जीनुरूप परवानगी मिळावी, असा या दुरुस्तीचा स्पष्ट अर्थ आहे. फेलोज व असोसिएट्स यांमध्यें भेद करून, असोसिएटसची लायकी आतां इतकी का कमी ठरविण्यांत आली आहे, हें समजत नाहीं. खुद्द ग्रेट ब्रिटनमध्यें असा भेदाभेद नाहीं, असें समजतें. हिंदुस्थानांत फक्त १३ फेलोज आहेत, त्यांपैकी ६ फेलोज सरकारी नोकरींत आहेत. फक्त दोघेजण अॅक्चुअरीचा स्वतंत्र धंदा करीत असून बाकीचे विमा कंपन्यांतच नोकरीवर आहेत. एका कंपनींतील नोकर-अॅक्चुअरीनें दुसऱ्या कंपन्यांचें मूल्यमापन करणें कितपत इष्ट व शक्य होईल, हा प्रश्नच आहे. अशा परिस्थितींत, निदान कांहीं किमान अनुभवाच्या असोसिएटला तरी फेलोचे अधिकार देणें योग्य आहे. नवीन नियम अमलांत आल्यामुळें, कित्येक नामवंत व अनुभवी हिंदी विमागणित्यांना सुद्धा आपला अॅक्चुअरींचा धंदा पूर्वीप्रमाणें चालवितां येणें अशक्य होणार आहे. पूर्वी असोसिएटला स्वतः अर्ज करतां येत असे. नव्या नियमानुसार विमाकंपनीसच फक्त यासंबंधांत अर्ज करतां येईल. असोसिएट असलेल्या अॅक्चुअरींच्या कामाबद्दल सुपरिंटेंडेंट ऑफ इन्शुअरन्सची तक्रार आहे, असें मानलें तरी फेलोजनीं केलेलें मूल्यमापन त्यास समाधानकारक वाटेलच, अशी तरी खात्री कोठें आहे ? मूल्यमापनासंबंधीं कडक नियम घालून देऊन ते पाळावयास लावण्याचा अधिकार सुपरिंटेंडेंटला असतांना, आतांपर्यंत अॅक्चुअरींचा धंदा करीत आलेल्या असोसिएटसवर राग काढण्याचें प्रयोजन समजत नाहीं.

"श्रीज्ञानेश्वरी–कथामृत"

तृतीय खंड

(श्री. शं. दी. करंदीकर, २११, चर्नी रोड, मुंबई ४, किं. ३ रु.)

ज्ञानेश्वरीचें आकलन सामान्य बुद्धीच्या मराठी वाचकांस व्हावें या हेतूनें ग्रंथकारानें तिचें सुलभ आणि रसाळ स्पष्टीकरण करण्याचा प्रयत्न चालवला आहे व त्याचा हा तिसरा हप्ता आहे व त्यांत गीतेच्या सहाव्या अध्यायाची मजल मारली आहे. श्री. करंदीकरांच्या कार्यास जनतेचा वाढता पाठिंबा मिळत असून श्रीज्ञानेश्वरी–कथामृताचें रूपांतर हिंदी, गुजराथी व इंग्रजी भाषांत होत आहे ही गोष्ट समाधानकारक व अभिनंदनीय आहे. त्यांच्या उद्योगाच्या उपयुक्ततेचा व लोकप्रियतेचा हा उत्कृष्ट पुरावा आहे. पहिल्या दोन खंडांप्रमाणें प्रस्तुत तृतीय खंड चटकदार झाला आहे आणि पुढील खंडाच्या प्रसिद्धीस ग्रंथकर्त्यांस आवश्यक तें सहाय मिळेल अशी आम्हांस आशा आहे.

अंदाजपत्रकांतील तुटीचे भव्य आकडे

(कोटि रुपयांचे आकडे)

	१९४३-४४ अंदाज	१९४३-४४ दुरुस्त अंदाज	१९४४-४५ अंदाज
उत्पन्न	१९९.३०	२५४.५०	२८४.९७
खर्च	२५९.५९	३४६.९३	३६३.१८
तूट	६०.२९	९२.४३	७८.२१

हिंदी गिरण्यांत हिंदी कपाशीचा उठाव

सप्टेंबर ते डिसेंबर	गांठी
१९४३	१३,१०,४८४
१९४४	१४,२४,०३८

स्फुट विचार

धान्य-नियमनाविषयीं प्रांतिक सरकारचें धोरण

मुंबई प्रांत धान्य पुरवठ्याचे बाबतींत तुटीचा असल्या कारणानें गेल्या खरीप पिकांचें नियमन करून त्याची वांटणी व किंमत मर्यादित व्हावी म्हणून एक योजना अमलांत आणली होती. उत्पादकांकडून त्यांच्या पिकाचा नियमित भाग आपल्या ताब्यांत घेऊन धान्याचा पुरवठा व विक्री ठराविक दरानें करण्याची व्यवस्था सरकारनें केली होती आणि ती निरनिराळ्या जिल्ह्यांत अधिकाऱ्यांच्या विद्यमानें अमलांत आणली गेली. पण ती अपेक्षेप्रमाणें यशस्वी झाली नाहीं असें प्रांतिक सरकाराच्या वतीनें आतां सांगण्यांत आलें आहे. खरीपाच्या संबंधानें आलेल्या अनुभवापासून बोध घेऊन रब्बीच्या पिकांचें नियमन करण्याची सुधारलेली योजना सरकारनें आखल्याचें जाहीर झालें आहे. धान्याच्या किंमती व वांटणी हीं परिणामकारक होण्यास तें जमा करण्याची व विक्रीची कार्यक्षम व्यवस्था सरकारच्या अधिकारांत झाली पाहिजे. मोठ्या शेतकऱ्यांकडून ठराविक प्रमाणांत धान्य घेऊन त्याची विक्री स्वतःच्या अधिकारानें व ठराविक लोकांच्या व दुकानांच्या मार्फत सरकारनें करणें आवश्यक आहे. धान्याची खरेदी–विक्री व त्याच्या किंमती ह्यांचें नियंत्रण बिनचूक झाल्यावांचून तुटीच्या भागांस धान्य योग्य भावानें पुरवणें शक्य होणार नाहीं ही गोष्ट सरकारच्या ध्यानांत आली असून त्याप्रमाणें त्यानें योजना अमलांत आणण्याचें ठरवलें आहे. खरीप पिकाच्या बाबतींतल्या योजनेच्या अंमलबजावणीविषयीं तक्रारी अनेक ठिकाणांहून सरकारच्या कानांवर घालण्यांत आल्या आहेत. ह्यापुढें तसल्या तक्रारींना जागा रहातां कामा नये.

२३½ कोटि रुपयांचे नवीन कर

हिंदुस्थान सरकारास १९४४-४५ मध्यें ७८ कोटि, २१ लक्ष रुपये तूट येणार आहे, अशी अंदाजपत्रकांतील अपेक्षा आहे. त्यापैकी २३½ कोटि रुपयांची भरपाई नव्या करांचे वसुलीनें करण्यांत येणार आहे. सुपारी, कॉफी व चहा ह्यांवर प्रत्येक पौंडामागें २ आणे एक्साइज पट्टी बसविण्यांत येणार आहे. सुपारीच्या पट्टीचे २ कोटि व चहाकॉफीच्या पट्टीचे २ कोटि, मिळून एकूण ४ कोटि रुपयांचें उत्पन्न होईल. इन्कमटॅक्समधील वाढ १५ हजार रुपयांच्या प्राप्तीवरील उत्पन्नास लागू पडणार आहे व कंपन्यांसहि जास्त टॅक्स भरावा लागणार आहे. कस्टम्स ड्यूटीजवरील सरचार्ज कायम रहाणार असून तंबाखूवरील करांतील वाढ आणखी १० कोटींची भर करणार आहे. बिगर-शेतकी वारशावरील करांमुळें प्रांतिक सरकारांचें उत्पन्न वाढेल, ह्या दृष्टीनें त्या कराची योजना पुढें करण्यांत यावयाची आहे. आयुर्विमा कंपन्यांवरील इन्कमटॅक्स व सुपरटॅक्स ह्यांची एकूण आकारणी रुपयांत ६३ पै पेक्षा अधिक होऊं नये, अशी व्यवस्था करण्यांत येणार आहे. जादा नफ्यावरील कर देणारांच्या सक्तीच्या डिपॉझिटची रक्कम वाढविण्यांत आली आहे. इनकमटॅक्स तिमाही हप्त्यांनीं आगाऊ वसूल होण्यास प्रोत्साहन मिळेल, अशी व्यवस्था सुचविलेली आहे. नवीन कर्जाच्या बाबींमुळें, सरकारच्या अंदाजपत्रकांतील तुटीचा आकडा २३½ कोटि रुपयांनीं कमी होऊन अपेक्षित निव्वळ तूट ५४ कोटि, ७१ लक्ष रुपयांवर येईल. नवीन कर, रेल्वेजच्या दरांतील वाढ व सक्तीचीं डिपॉझिटस, ह्यांचेमुळें १०० कोटि रुपये व्यवहारांतून बाहेर काढले जातील व त्यामुळें चलनवृद्धीस आळा बसण्यास सहाय होईल, अशी अपेक्षा सरकारी फडनवीसांनीं व्यक्त केली.

नवीन करांविषयीं लोकमत

सर जरेमी रेस्मन ह्यांच्या करवाढीच्या योजनेवर निरनिराळ्या वर्गांच्या प्रतिनिधींची टीका प्रसिद्ध झाली आहे ती बरीचशी प्रतिकूल आहे. तंबाखू व चहा ह्या गरीब लोकांच्या जरूरीच्या जिनसा नवीन पट्टीमुळें अधिक महाग होतील म्हणून त्या करांचा निषेध करण्यांत आला आहे. ह्या टीकाकारांत कामगार वर्गाचे प्रतिनिधी आहेत हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. प्राप्तीवरील कर आणि कंपन्यांकडून घेण्यांत येणारा उत्पन्नावरील कर ह्यांत वाढ सरकारच्या फडनवीसांनीं सुचवली आहे तिचे विरुद्ध धंदेवाले व कारखानदार ह्यांनीं जोराचा अभिप्राय व्यक्त केला आहे. त्यांचें म्हणणें असें आहे कीं, हिंदुस्थानच्या आर्थिक सामर्थ्याचे मानानें करांचें ओझें जबर झालें आणि ह्यासंबंधांत इंग्लंडच्या करपद्धतीशीं तुलना करण्यांत कांहीं हंशील नाहीं. लष्करी खर्चाची वाटणी इंग्लंड व हिंदुस्थान ह्यांमध्यें केली जात आहे. तीमध्यें बदल होऊन ह्या देशावरचें खर्चाचें ओझें कमी करण्यांत आलें पाहिजे असें टीकाकारांचें म्हणणें आहे. युद्धपरिस्थितीमुळें सर्वच उद्योगधंद्यांस जादा फायदा होत आहे असें नसून वाढत्या प्राप्तीवरील कराचा बोजा मात्र सर्वांस सारखाच सहन करावा लागणार आहे, अशी धंदेवाल्यांची टीका आहे. जादा कर आणि सरकारकडे आकर्षल्या जाणाऱ्या ठेवी ह्यांच्या मार्गानें चलनविस्तारास आळा घालण्याचा फडनविसांचा उद्देश आहे तो सफल होण्यास लष्करी खर्च मर्यादित करणें आणि मालाच्या उत्पादनास ह्या देशांत उत्तेजन देऊन त्याच्या किंमती उतरवणें हे उपाय सुचवण्यांत आले आहेत.

धान्यपुरवठ्याच्या वाढीसाठी शेतकऱ्यांस मदत

चलनाचा पुरवठा मर्यादित करून महागाईस आळा घालणें आणि देशांत धान्याचें उत्पादन वाढवणें हे दोन उद्देश साध्य करण्याचा प्रयत्न सरकारनें चालवला आहे. ह्या धोरणास अनुसरून मध्यवर्ती असेंब्लीमध्यें श्री. देशमुख ह्यांनीं एक ठराव पुढें मांडून सरकारनें दहा कोटि रुपयांचें खास कर्ज काढावें आणि त्या पैशाचा विनियोग अधिक धान्य पिकवण्यास शेतकऱ्यांस द्रव्यसहाय देण्याकडे करावा असें सुचवलें. हा प्रश्न प्रांतिक व संस्थानी सरकारांच्या कक्षेंतील असला तरी हिंदुस्थान सरकार तो सोडवला जाण्याचे कामीं त्यांस आवश्यक ती मदत करीत आहे आणि त्यासंबंधांत कोणतीच अडचण भासलेली नाहीं किंवा तक्रार करण्यांत आलेली नाहीं असें सरकारतर्फेनें सांगण्यांत आलें. ठरावाच्या दुहेरी हेतूविषयीं आपणांस पूर्ण सहानुभूति आहे, तथापि कर्ज व त्याचा सुचवलेला विनियोग ह्यांची पद्धति आपणांस मान्य नाहीं असें फडनवीस सर जरेमी रेस्मन म्हणाले. विशिष्ट कामासाठी कर्ज काढणें आणि त्याचा पैसा ठराविक उद्दिष्टावर खर्चणें ह्या गोष्टी सरकारच्या मामुली पद्धतीस धरून नाहींत असा मुद्दा त्यांनीं पुढें मांडला. निरनिराळ्या द्वारांनीं तिजोरींत येणारा पैसा एकत्र केला जातो आणि सरकारास जरूर वाटणारा सर्व खर्च त्यामधून होत असतो; अमक्या बाबीवर खर्चावयाची अमकी

रक्कम असें विशिष्टीकरण तिजोरीच्या मामुली पद्धतींत नसतें अशा विचारसरणीचा त्यांनीं अवलंब केला. सरकार ठराविकांशीं सहमत असल्यानें आणि तें शेतकऱ्यांस अनेक रीतींनीं सहाय देत असल्यानें श्री. देशमुख ह्यांनीं आपली सूचना परत घ्यावी असें त्यांनीं सांगितलें. परंतु ठरावास असेंब्लींतल्या बहुमताचा पाठिंबा आहे असें दिसून आल्यावरून सरकारनें मतनोंदणीचा आग्रह धरला नाहीं आणि श्री. देशमुख ह्यांची सूचना मान्य झाली. ठरावाची अमलबजावणी सरकार कशी करतें तें पहावें.

प्राप्तीवरील कराचे कायद्यांत दुरुस्ती

लोकांना विम्याच्या स्वरूपांत पैशाची बचत करण्यास प्रोत्साहन मिळावें, ह्या दृष्टीनें त्यांनीं विमा कंपनीस भरलेल्या हप्त्यांवर (ही हप्त्याची रकम त्यांच्या एकूण उत्पन्नाच्या ½ पेक्षा जास्त नसेल तर) प्राप्तीवरील कराची माफी देण्यांत यावी, असा इनकमटॅक्सचा कायदा आहे. परंतु, कित्येक लोक केवळ इनकमटॅक्स टाळण्यासाठीं एक किंवा दोन वर्षें मुदतीचे विमे उतरतात व त्यांवरील हप्ते करमाफ असतात, त्याचा कायदेशीर पण अवास्तव फायदा घेतात. विमा कंपनींत विमा उतरून, हप्त्यांच्या ९०% ते ९५% इतकी त्यांची सोडकिंमत घ्यावयाची म्हणजे भारी कराऐवजी ५% किंवा १०% इतक्याच रकमेची तूट सोसावयाची असा हा व्यवहार असतो. अशा तऱ्हेचे विमे सध्या, इनकमटॅक्सच्या चढीच्या दराचे काळांत, विशेष लोकप्रिय झालेले आहेत व कित्येक विमा कंपन्या अशा फायदेशीर विम्यांचा प्रसार करण्याची खटपटहि करीत असतात. ह्या प्रवृत्तीस आळा घालण्यासाठी, प्राप्तीवरील कराच्या माफीस पात्र असलेलें उत्पन्न सध्यां एकूण उत्पन्नाच्या ½ इतकें आहे त्याऐवजीं ते व्यक्तींच्या एकूण उत्पन्नाच्या ७% इतकें करण्यांत यावें, अशी इनकमटॅक्स कायद्यांत दुरुस्ती सुचविणारें बिल सर जरेमी रेस्मन ह्यांनीं असेंब्लींत नुकतेंच मांडलें. विमा पॉलिसी सुमारें १२ वर्षें चालू असली, तरच नव्या नियमाचा तिला फायदा मिळूं शकेल व त्यामुळें कराची माफी देण्याचा मूळ उद्देश पूर्णपणें सफळ होणार नाहीं, अशी श्री. कृष्णम्माचारी ह्यांनीं तक्रार केली. फडनविसींनीं सिलेक्ट कमिटींत तिचा विचार करण्याचें मान्य केलें. प्राप्तीवरील कर त्रैमासिक हप्त्यांनीं आगाऊ भरणारास, ह्या रकमांवर २% व्याज यावें, अशी दुसरी एक दुरुस्तीहि इनकमटॅक्स कायद्यांत सुचविण्यांत आली आहे. मागील सालांतील कराची आकारणी लक्षांत घेऊन किंवा नव्या आकारणीसंबंधीं स्वतःच्या कल्पनेनें हे आगाऊ हप्ते भरले जातील, परंतु हा अंदाज प्रत्यक्ष आकारणीचे मानानें ८०% इतका बरोबर आला नाहीं, तर जेवढी रक्कम कमी भरली जाईल, तिचेवर ६% व्याज दंडादाखल आकारलें जाईल.

प्राप्तीवरील कराचे सुचविलेले नवे दर

(१) दोन हजारांखालील उत्पन्नावर कर नाहीं. (२) पहिले ७५० रुपयांचें उत्पन्न वगळून १,५०१ ते २,००० रुपये ह्यामधील उत्पन्नावर गेल्या वर्षी रुपयास ६ पै अशी पट्टी बसविली होती, ती काढून टाकण्यांत येत आहे. (३) दोन ते दहा हजारांमधील उत्पन्नावरील करांत बदल नाहीं. (४) दहा हजारांवरील उत्पन्नावरील कर वाढविण्यांत आला आहे.

उत्पन्नाचा टप्पा रु.	मूळ सध्याचा दर	सुचविले. सध्याच्या करांची सरचार्ज	करांत वाढ सरचार्ज	आकारणी
पहिले १,५८०	...	...	...	...
पुढील ३,५००	९पै	६पै	६पै ...	२७३-७
पुढील ५,०००	१आ.३पै	१०पै	१०पै ...	६५१-१
पुढील ५,०००	२आ.	१आ.४पै	१आ.६पै २पै	१,०९३-१२
पुढील उत्पन्न	२आ.६पै	१आ.८पै	२आ. ४पै	...

लहान जागेंत घराचे आवारांत भाजीपाल्याची लागवड

मोठमोठ्या शहरांत शिधापद्धति सुरू झाल्यापासून नेहमींप्रमाणें भरपूर अन्न मिळेनासें झालें आहे. शिवाय मिळणारें अन्न सर्वांचे प्रकृतीस मानवणारेंच असतें असें नाहीं. अशा परिस्थितींत लोकांचें आरोग्य बिघडून रोगराई सुरू होण्याची मोठीच भीति आहे. ह्यावर लोकांचे हातीं असलेला एक उपाय म्हणजे नियंत्रण नसलेल्या पदार्थांचें सेवन करून प्रस्तुत प्रसंगास तोंड देणें हें होय. प्रत्येकाच्या आहारांत भरपूर भाजीपाला असल्यास त्यामुळें आरोग्य उत्तम राहण्याकरितां लागणारीं उपयुक्त जीवनसत्त्वें व क्षार ह्यांचा पुरवठा होऊन पोट भरण्यासहि मदत होते असें अलीकडील शोधामुळें सिद्ध झालें आहे. परंतु सर्व भाजीपाल्यावर नियंत्रण नसलें तरी त्यांच्या किंमती गरीब व मध्यम लोकांच्या शक्तीबाहेर गेल्या आहेत व एकंदर बाजारांत येणाऱ्या भाजीपाल्याचें प्रमाणहि अत्यंत कमी झालें आहे. ह्यावर स्वावलंबनाचा उपाय म्हणून डेक्कन ॲग्रिकल्चरल असोसिएशनच्या कांहीं समासदांनीं पुणें येथील घरमालकांना तज्ज्ञ सल्ला व बी-बियाणें, खतें व रोगनिवारक औषधें ह्यांच्या बाबतींत शक्य ती मदत देऊन घरोघर भाजीपाल्याचें उत्पादन करण्याची मोहीम सुरू केली आहे. ह्या मोहिमेच्या मदतीकरितां लागणारी माहिती अनायासें मुंबई सरकारच्या शेतकी खात्यानें १९४२ च्या चवथ्या पत्रकांत इंग्रजींत प्रसिद्ध केली आहे. त्या पत्रकाचें मराठींत रूपांतर करून "शेती आणि शेतकरी"च्या ताज्या अंकांत दिलें आहे. त्याशिवाय निरनिराळ्या हंगामांत कोणत्या भाज्या लावाव्यात व त्या किती दिवसांत तयार होतील ह्यासंबंधींची माहिती कांहीं वर्षांमागें शेतकी आणि शेतकरींत प्रसिद्ध झालेली पुन्हा परिशिष्ट २ म्हणून मुद्दाम दिली आहे. खेड्यांत रहाणाऱ्या लोकांनाहि ही माहिती उपयोगी पडेल. सध्यां खेडेगांवच्या लोकांना भाजीपाल्याची फारशी आवड नाहीं. परंतु लहान प्रमाणावर भाजीपाला लावण्याची माहिती त्यांनीं काळजीपूर्वक वाचून तिचा उपयोग केल्यास त्यांच्या आहारांत योग्य दिशेनें सुधारणा होऊन त्यांचें आरोग्य सुधारेल असा "शेतकी आणि शेतकरी"च्या संपादकांस भरंवसा वाटतो.

आंबे व द्राक्षें ह्यांच्या झाडांवर गंधकाची पूड

मुंबई प्रांतांतील आंबे व द्राक्षें ह्यांच्या झाडांवर गंधकाची पूड उडाविण्यासाठी शेतकी खात्यानें ६० टन गंधक उपलब्ध केलें आहे. गरजू लोकांनीं सरकारच्या प्लँट पॅथॉलॉजिस्ट (पुणें)कडे अर्ज करावेत.

दुष्काळामुळें होणाऱ्या रोगांवर नवीन उपाय

"ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक हेल्थ" या संस्थेच्या मदतीनें वैद्यक खात्यांतील तज्ज्ञांनीं कलकत्त्यांत दुष्काळामुळें पसरलेल्या रोगांवर कांहीं नवीन उपाययोजना शोधून काढिल्या आहेत. त्यामुळें उपासमारीनें जर्जर झालेल्या रोग्यांचे आतड्याचे विकार शे. ९४ टक्के बरे झाले आहेत. ह्या निराश्रित लोकांमध्यें अतिसार व आंत्रदाह हे विकार बऱ्याच मोठ्या प्रमाणावर आहेत असें दिसून आलें. पूर्वपरिचित उपायांनीं फारसा गुण आला नाहीं पण "सल्फा-ग्वानिडिन" हें ह्या रोगांवर फारच उपयोगी असल्याचें दिसून आलें. या रोग्यांना झालेलें अन्न पचत नाहीं. ग्लूकोज शिरेंतून दिलें तर फक्त चार ते बारा तासच उपयोग होतो. पण पचनशक्ति सुधारेपर्यंत शिजविलेलें मांस व ग्लूकोज शिरेंतून दिल्यास फायदा होतो. या रोग्यांमध्यें नागव्रणाचे रोगी बरेच आढळतात. हा व्रण फार दुष्ट असून तो ज्या ठिकाणीं झाला असेल त्याच्या सभोवतालचा शरीरभाग तो त्वरेनें सडवितो, त्यामुळें रोग्याच्या जिवासहि धोका असतो. व्रणावरील सडका भाग कापून टाकून त्यावर "सल्फानिल-अमाइड" या द्रव्याची पूड टाकिली व रोग्यास सात्विक अन्न दिलें तर रोगी सुधारतो असें दिसून आलें आहे.

दुष्काळ-पीडित रोग्यांना सुरुवातीस बार्लीचें पाणी, साखर व लिंबाचा रस द्यावा लागतो. लहान मुलांना दूध, ब्रेड वगैरे असलेला आहार पथ्यकारक होतो. रोग्यांच्या प्रकृतिमानाप्रमाणें आहारांत फरक करण्यांत येतो.

हिंदी रेल्वेजचें वाढतें उत्पन्न

मध्यवर्ती असेंब्लीमध्यें सर एडवर्ड बेंथॉल ह्यांनीं हिंदी रेल्वेजचें १९४४-४५ सालचें अंदाजपत्रक पुढें मांडून त्यावर भाषण केलें. त्याचा रोख रेल्वेजचें वाढतें उत्पन्न, त्याची हिंदुस्थान सरकारच्या तिजोरीस होणारी अधिकाधिक मदत आणि त्याची मोठी युद्धोत्तर पुनर्घटना ह्यांच्या महत्त्वावर होता. खाली दिलेल्या आंकड्यांवरून रेल्वेजच्या सांपत्तिक स्थितीची कल्पना येईल:—

(कोटि रुपये)

	१९४३-४४	अंदाज १९४४-४५
उत्पन्न ...	१७८	१९२
एकूण खर्च ...	१०८	११४
बाढावा ...	४३	५२
हिं. सरकारच्या उत्पन्नांत भर	३२	३१
तिसऱ्या वर्गाच्या प्रवाशांच्या युद्धोत्तर सुखसोयीसाठी फंड ...		१०
रिझर्व्ह ...	११	१०

सरकारी खात्यांतील लांचलुचपतीस आळा

युद्ध, पुरवठा व रेल्वे खात्यांत मोठ्या प्रमाणावर चालू असलेल्या लांचलुचपतीच्या व पैसेखाऊपणाच्या वाईट प्रवृत्तीची सरकारास जाणीव आहे व त्याचा प्रतिकार करण्यासाठी सरकारनें खास पोलिस व्यवस्था केली आहे. त्यांनीं १९४३ मध्यें ४२९ प्रकरणांची चौकशी केली. महत्त्वाच्या प्रकरणांची विशेष रीतीनें चौकशी करून विशेषतः वरिष्ठ अधिकाऱ्यांवर खटले भरण्याबद्दल सरकारनें सूचना दिलेली आहे. वरील माहिती श्री. त्रिवेदी ह्यांनीं असेंब्लींत सांगितली.

जिकडे तिकडे प्रशंसा

इमिटेशन दागिन्यांवर रासायनिक क्रिया करून खऱ्या सोन्याचा पत्रा चढविला जातो त्यामुळें दागिना केव्हांही खराब होत नाहीं, ही पूर्ण खात्री झाली. सोन्याचा पत्रा चढविलेल्या चार बांगड्या किं. आठ रु. गरजेस्तव दागिना परत करणें झाल्यास वर चढविलेल्या सोन्याचे सर्वच्या सर्व पैसे परत देऊं.

भट कं. सांगली, S. M. C.
भट कंपनी शाखा—बुधवार पेठ, पुणें २.

मलेरियावरील क्रांतिकारक हिंदी शोध

मागोरा पिल्स

अवघ्या ४ दिवसांत मलेरिया थांबतो.

१६ गोळ्यांच्या डबीस रु. १

— १०० गोळ्यांचें पॅकिंगही मिळतें. —

मागोरा केमिकल कं. लि.

टिळक रोड, पुणें २.

दि इंडियन रियल इस्टेट कॉर्पोरेशन लिमिटेड

बालमुकुंद रोड, रविवार पेठ, पुणें

सर्व तऱ्हेच्या बांधकामाचीं कॉन्ट्रॅक्टस्, व लँड डेव्हलपमेंटच्या योजनांचे व्यवहार होतात.

—ठेवी घेणें आहेत—

मुदत		दर ४ टक्के
६	महिने	
१२	"	४॥ "
२४	"	५ "

माहिती व अर्जाकरितां मॅनेजर यांस लिहा.

पुण्यांतील

आदर्श निवासस्थान व भोजनालय

छाया लॉजिंग व बोर्डिंग हाउस

बुधवार चौक, पुणें २.

दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.

हेड ऑफिस : पुणें शहर.
स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.
मुंबअी शाखा : दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबअी.
जळगांव शाखा : नवी पेठ, जळगांव.
नागपूर शाखा : गोखले बिल्डिंग, सिताबर्डी, नागपूर.

भांडवल

अधिकृत व विक्रीस काढलेलें	खपलेलें	वसूल झालेलें
रु. १०,००,०००	रु. ६,८०,६५०	रु. ३,४०,३२५

एकूण खेळतें भांडवल रु. ७०,००,०००

बँकेच्या शेअरवर डिसेंबर १९४२ अखेर ४½% करमाफ डिव्हिडंड दिलें गेलें. बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदी-विक्री कसोशीनें करून दिली जाते.

सी. व्ही जोग,
B. Com., Cert. A. I. B. C. A. I. I. B.
मॅनेजर

दि बँक ऑफ इंडिया लि.

[स्थापना : १९०६]

अधिकृत भांडवल	रु.	२,००,००,०००
वसूल झालेलें भांडवल	रु.	१,००,००,०००
रिझर्व्ह फंड	रु.	१,२३,००,०००

मुख्य कचेरी : ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

मुंबईमधील शाखा : बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

इतर शाखा : अहमदाबाद (भद्र, मुख्य ऑफिस), अहमदाबाद (एलिस ब्रिज शाखा), अहमदाबाद (स्टेशन शाखा), अमृतसर, अंधेरी (मुंबई शेजारीं), बांद्रे (मुंबई शेजारीं), कलकत्ता (क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्क्वअर), जमशेदपूर, कराची, नागपूर (किंग्जवे), नागपूर (इतवारी बझार), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत, भुज (कच्छ).

लंडन एजन्ट्स : वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

डायरेक्टर्स : सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. (अध्यक्ष), श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के. नाइट; मि. ए. गेडिस; सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, जी. बी. ई., के. सी. आय. ई., मि. दिनशा के. दाजी; श्री. रामनिवास रामनारायण.

करंट डिपॉझिट अकाउंट्स :

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षां कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते, सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

एजंट :—एच्. ए. करीमभाई

⊳। दत्त कंपनी ।⊲

७३५ शुक्रवार पेठ, पुणें २. दाणेआळी पोलिसगेटाजवळ
सर्व तऱ्हेचे काटे, वजनें व मापें, वेळेवर
रिपेअर करून मिळतील.

५ वा आठवडा

ग्लोब—पुणें

प्रकाश पिक्चर्सचा प्रेक्षणीय बोलपट
एव्हरग्रीन रिलीज

प न घ ट

: भूमिका :
रत्नमाला, उमाकांत, जीवन

रोज २ खेळ ६॥ व १० वाजतां बुध. ता. ८ गुरु. ता. ९ शुक्र. ता. १० रोजीं व शनि. रवि. सोम. दुपारीं ३॥ वाजतां

१९ वा आठवडा

प्रकाश पिक्चर्सचा पौराणिक मराठी बोलपट

रामराज्य

दिग्दर्शक :—विजय भट्ट.

—: भूमिका :—
शोभना समर्थ, चंद्रकांत, काळे, सोहनी

मिनर्व्हा, पुणें

रोज फक्त दोन खेळ
६। व १० वाजतां

दर शनि. रवि. सोम. व बुध. ता. ८ गुरु. ९ व शुक्र. ता. १० रोजीं सुटीचे दिवशीं जादा खेळ दुपारीं २॥। वाजतां

[एव्हरग्रीन—रिलीज]

१२ वा आठवडा !

रॉयल रत्न १८ वें

महात्मा विदुर

दिग्दर्शक :—पार्श्वनाथ आळतेकर
कला :—बाबुराव पेंटर

भू.—के. पागनीस, दुर्गा खोटे, यांची एकत्र भूमिका असलेला भक्तिपट. मनोहर घटवाई, नायमपल्ली, प्रल्हाद

आर्यन, पुणें

दररोज तीन खेळ दुपारीं ३।, ६॥ व १० वाजतां

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२७।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
(टपाल खर्चासह)
किरकोळ अंकाची
दोन आणे.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिल्य अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष १० पुणें, बुधवार, तारीख १५ मार्च, १९४४ अंक ११

महाराष्ट्राची पहिली शेड्यूल्ड बँक
न्यू सिटिझन बँक ऑफ इंडिया लि.
(हेड ऑफिस : मुंबई)
अधिकृत भांडवल : ३०,००,००० रु.
रोख जमा झालेलें भांडवल : ६,००,००० रु.
एकूण खेळतें भांडवल : ९५,००,००० रु.
—: शाखा :—
सोलापूर, नाशिक, नाशिक रोड, देवळाली, कोल्हापूर, इचलकरंजी, सांगली, मिरज, महाड, लोणंद, अहमदनगर, पुणें, धुळें, जळगांव, दिल्ली, अमरावती, मालेगांव, सिन्नर, संगमनेर.
D. N. Gandekar, B. A., LL. B. पुणें ब्रँच मॅनेजर
D. D. Deshpande, B. A, मॅनेजिंग डायरेक्टर

प्रगतिपथावरील नवा
मै ला चा — द ग ड
सन १९४३ अखेर
मध्या कामांत ११० टक्के वाढ
चालू कामांत १०० टक्के वाढ
आयुर्विमानिधींत ८० टक्के वाढ
— आपला विमा किंवा एजन्सी आजच घ्या —
दि औंध म्यूच्युअल लाइफ ॲश्युरन्स सोसायटी लि., पुणें.
आर. जी. साठे सुपरिंटेंडेंट
व्ही. जी. जोशी मॅनेजिंग डायरेक्टर

दत्त कंपनी
७३५ शुक्रवार पेठ, पुणें २. बाजेआळी पोलिसस्टेशनजवळ
सर्व तऱ्हेचे काटे, वजनें व मापें, वेळेवर रिपेअर करून मिळतील.

पुना गेस्ट हाऊस
१००, लक्ष्मी रोड, पुणें २.
Telephone 779

TELEGRAM Guest House Poona 2.

स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.
गिरगांव मुंबई नं. ४
महिंद्रकर ब्रदर्स
तयार कपड्याचे व्यापारी
बुधवार चौक, पुणें

विविध माहिती

सैनिकांच्या करमणुकीवरील हिंदुस्थान सरकारचा खर्च

	१९४२-४३	१९४३-४४
	रु.	रु.
हिंदी सैनिक	१,१४,०००	६०,०००
ब्रिटिश सैनिक	३,६०,०००	१,७५,०००

बुद्धाच्या चित्रपटास विरोध

एक हिंदी फिल्म कंपनी गौतम बुद्धाच्या चरित्रावर बोलपट तयार करीत आहे, त्यास बंदी करण्याची हिंदुस्थान सरकार-मार्फत व्यवस्था करण्यांत यावी, अशा अर्थाचा ठराव सिलोनच्या विधिमंडळानें मंजूर केला आहे.

अमेरिकेतून शेतीच्या यंत्रसामुग्रीची आयात

ऑक्टोबर, १९४३ अखेर सुमारें ४० लक्ष रुपयांची, शेती-विषयक यंत्रसामुग्री अमेरिकेतून खंड-उसनवार पद्धतीनें हिंदुस्थानांत आणविली आहे, ती मुख्यतः हिंदी लष्करी डेअऱ्यांस पुरविण्यांत आलेली आहे.

हिंदी कोळशाची निर्मत

जानेवारी व फेब्रुवारी, १९४४ मध्यें मिळून सिलोनकडे ६० हजार टन हिंदी दगडी कोळसा पाठविण्यांत आला. कोळशाच्या रेशनिंगची योजना यशस्वी झाली, तर हिंदी मागणी पुरी पाडल्यावर उरणारा कांहीं कोळसा मध्य-पूर्वेकडे पाठविण्याचा हिंदुस्थान सरकारचा विचार आहे.

सोन्याची किरकोळ विक्री

सरकारच्या मुंबई येथील टाकसाळीच्या शिक्क्याचे पांच तोळे व एक तोळा वजनाच्या सोन्याच्या चिपा रिझर्व्ह बँकेच्या कलकत्ता, कानपूर, दिल्ली, कराची, लाहोर व मद्रास येथील कचेऱ्या व इंपीरिअल बँकेच्या आग्रा, अमृतसर, बनारस, लखनौ, लायलपूर, मुलतान व पाटणा येथील शाखा येथें विकत मिळण्याची व्यवस्था करण्यांत आली आहे.

अरबी समुद्रांत अमेरिकन आगबोट बुडाली

अमेरिकेची एक मालवाहू आगबोट अरबी समुद्रांत जपानी पाणबुडीनें जानेवारीमध्यें बुडविली, अशी माहिती अमेरिकन सरकारनें प्रसिद्ध केली आहे.

आणखी औषधांच्या किंमती नियंत्रित होणार

हिंदुस्थान सरकारनें सध्या १,४०० औषधांच्या किंमती नियंत्रित केल्या आहेत. ही यादी वाढविण्याचा सरकारचा विचार आहे, म्हणून यादींत आणखी कोणतीं औषधें समाविष्ट करावींत, त्यासंबंधांत लोकांनीं सूचना कराव्यात, असें सरकारनें जाहीर केलें आहे.

टपाल लवकर येऊं लागलें

ग्रेट ब्रिटनमधून हिंदुस्थानांत समुद्रमार्गानें टपाल येण्यास पूर्वी ७५ दिवस लागत असत; आतां ५३ दिवसांत तें येऊं लागलें आहे. विमानमार्गानें टपालास पूर्वीच्या २२ दिवसांपेक्षांजीं फक्त १०½ दिवस पुरतात.

ब्रिटिश मालमत्ता व उत्पन्न हांची वाटणी

ग्रेट ब्रिटनमधील ८०% खासगी मालमत्ता फक्त ७% लोकांच्या मालकीची आहे, व त्यांस एकूण उत्पन्नाच्या २८% इतकें उत्पन्न दरसाल मिळतें.

नोटीस

दी औंध स्टेट बँकिंग अँड इन्शुअरन्स कं. लि., औंध

नोटीस देणेंत येते कीं, दी औंध स्टेट बँकिंग अँड इन्शुअरन्स कंपनी लि. च्या भागीदारांची विशेष साधारण सभा शनिवार ता. ८ एप्रिल, १९४४ इ. रोजीं दुपारीं ४-३० वाजतां (स्टँ. टा.) अगर त्या दिवशीं बोलाविलेल्या साधारण सभेचें काम संपल्याबरोबर लगेच औंध येथें श्रीयमाई देवीचे मंडपांत, भागीदारांचेकडे अगाऊ तपशीलवार पाठविलेल्या, विशेष ठरावाचा विचार करणेस व योग्य वाटलेस तो मंजूर करणेसाठीं भरणार आहे.

अशीही नोटीस देणेंत येते कीं, वरील ठराव मंजूर झालेस तो कायम करणेकरितां कंपनीच्या भागीदारांची दुसरी विशेष साधारण सभा रविवार ता. २३ एप्रिल, १९४४ रोजीं दुपारीं ४.३० वाजतां (स्टँ. टा.) औंध येथें श्रीयमाई देवीचे मंडपांत भरेल, व सदर सभेंत पहिल्या सभेंत मंजूर झालेला विशेष ठराव कायम करणेंत येईल.

बोर्डाचे हुकुमावरून,

औंध. ता. १ मार्च १९४४

बी. आर. वर्तक
जनरल मॅनेजर

नोटीस.

दी औंध स्टेट बँकिंग अँड इन्शुअरन्स कं. लि., औंध.

नोटीस देणेंत येते कीं:—

कंपनीच्या भागीदारांची सहावी साधारण सभा शनिवार तारीख ८ एप्रिल, १९४४ रोजीं दुपारीं ४ वाजतां (स्टँ. टा.) औंध येथें श्रीयमाई देवीचे मंडपांत खालील कामांकरितां भरणार आहे.

१ ३१ डिसेंबर १९४३ अखेर संपलेल्या सालाबद्दलचा डायरेक्टरांचा अहवाल, ताळेबंद, नफातोटापत्रक व ऑडिटर यांचा रिपोर्ट स्वीकारून मंजूर करणें.

*२ डिव्हिडंड जाहीर करणें.

३ व्यक्तिशः भागीदारांतर्फे दोन डायरेक्टर व सहकारी सोसायट्यांतर्फे एक डायरेक्टर यांची निवडणूक करणें.

४ नवीन सालाकरितां ऑडिटर यांची नेमणूक करणें व त्यांचें वेतन ठरविणें.

बोर्डाचे हुकुमावरून

औंध, ता. १ मार्च, १९४४

बा. रा. वर्तक,
जनरल मॅनेजर.

वि. सू.:—कंपनीची ट्रॅन्सफर बुकें ता. ८-४-४४ ते २३-४-४४ अखेर दोन्ही दिवस धरून बंद राहतील.

*डिव्हिडंड मंजूर झाल्यानंतर तें सोमवार ता. २४ एप्रिल १९४४ पासून दिलें जाईल. डिव्हिडंड वारंट्स् भागीदारांच्या नोंदलेल्या पत्त्यावर टपालानें पाठविलीं जातील. पत्ता बदलला असल्यास कंपनीकडे सत्वर कळवावें.

अनुक्रमणिका

	पृष्ठ		पृष्ठ
१ विविध माहिती	... ८२	अमेरिकन सोन्याची विक्री–अमेरिकेचा युद्धोत्तर परराष्ट्रीय व्यापार	
२ असेंब्लीत फडनवीसांचें टीकाकारांस उत्तर	... ८३		
३ आयुर्विमा कंपन्यांवरील कर	... ८४	६ यु. किंग्डम कमर्शिअल कॉर्पोरेशन	... ८६
४ लाळेबंदीतील रिसर्व्ह व तरतुदी	... ८४	७ विहिरींस उत्तेजन	... ८६
५ स्फुटविचार	... ८५	८ शेअर बाजार	... ८६
प्रांतिक रूरल डेव्हलपमेंट बोर्डांची सभा—ब्रिटिश व		९ सरकारचा युद्धकालीन खर्च	... ८७

अर्थ

बुधवार, ता. १५ मार्च, १९४४

असेंब्लीत फडनवीसांचें टीकाकारांस उत्तर

नेहमीच्या प्रघातास अनुसरून मध्यवर्ती असेंब्लीत सर जेरमी रेस्मन ह्यांच्या अंदाजपत्रकावर सभासदांचीं सर्वसाधारण स्वरूपाचीं टीकात्मक भाषणें झालीं. कौन्सिल ऑफ स्टेटमध्येंहि असेंच मतप्रदर्शन झालें. बहुतेक वक्त्यांनीं एकाना दुसऱ्या मुद्यावर अंदाजपत्रकाविषयीं नापसंती दर्शविली. लष्करी खर्चात व तुटींत वाढ आणि जादा कर, विशेषत: चहा, सुपारी व तंबाखू ह्यांसारख्या पदार्थांवरील योजिलेली पट्टी, ह्या बाबी तीव्र टीकेचा विषय झाल्या. कित्येक सभासदांचीं भाषणें विशेष कडक झालीं. हिंदुस्थानास करावा लागणारा लष्करी खर्च देशाच्या ऐपतीच्या मानानें भारी आहे आणि चलनविस्तारामुळें झालेली महागाई जाचक आहे असें कित्येकांनीं बोलून दाखवलें आणि गरीब वर्गाच्या जरूरीच्या जिनसांच्या जबर किंमती व त्यांवरील कर ह्यांचे संबंधानें खरमरित टीका केली. अंदाजपत्रकांतील खर्च व उत्पन्न हीं सबंद सरकारच्या राज्यकारभारविषयक धोरणावर अवलंबून असतात परंतु त्यांचें समर्थन करण्याची जबाबदारी फडनवीसावर येऊन पडते. मध्यवर्ती असेंब्लीच्या लोकनियुक्त हिंदी सभासदांची टीका त्यांस किती बोचक वाटली ह्याची कल्पना सर जेरमी ह्यांनीं बजेटाच्या सर्वसाधारण चर्चेस दिलेल्या उत्तरावरून येते.

युद्धामुळें उपस्थित झालेल्या स्वाभाविक पण विकट परिस्थितींतून, तिची झळ न लागतां, लोकांस सुरक्षित व सुखी बाहेर काढण्याची जबाबदारी फडनवीसांवर टाकणाऱ्या सभासदांच्या मनोवृत्तीविषयीं त्यांनीं तक्रार केली. युद्धाची आपत्ती देशावर येऊन पडली असतां सरकारचा खर्च वाढणें अपरिहार्य झालें, यांत फडनवीसांचा दोष काय? असें त्यांनीं विचारलें. हिंदुस्थानांत कार्यक्षम विमानदल नसल्याची कांहीं कालामागें ओरड करणाऱ्या सभासदांनीं आतां अशा दलावर खर्च करतां म्हणून फडनवीसांस विचारावें ह्याबद्दल त्यांनीं आश्चर्य प्रकट केलें. जपानच्या चढाईपासून देशाचें रक्षण करण्यासाठीं विमानगृहें उभीं करणें अत्यावश्यक होतें आणि त्यांवरचा खर्च अपरिहार्य होता. अशा स्थितींत कांहीं सभासदांनीं ह्या खर्चास विरोध करावा हें विपरीत आहे असें सर जेरमी म्हणाले. हिंदुस्थानच्या सरहद्दीपलीकडे होणाऱ्या लष्करी खर्चाचा बोजा हिंदी सरकारावर पडत नाहीं आणि ब्रह्मदेशांत लढणाऱ्या सर्व सैन्याचा खर्च ब्रिटिश सरकार सोशीत आहे अशी माहिती त्यांनीं दिली. अमेरिकन सैन्याचा खर्च अमेरिकन सरकारावर पडतो असेंहि त्यांनीं सांगितलें. लष्करी खर्चाचा बोजा हिंदुस्थानावर शक्यतितका कमी पडावा असा सरकारचा प्रयत्न आहे आणि असें असूनहि त्यावर केली जाणारी प्रतिकूल टीका असमर्थनीय आहे असें फडनवीसांच्या उत्तराचें सार होतें. चलनविस्तार आणि तज्जन्य महागाई ह्यांचे बाबतींत आपणांस देण्यांत येणाऱ्या दोषाविषयीं बोलतांना सर जेरमी ह्यांनीं ह्या परिस्थितीचें खापर सरकारशीं युद्धप्रयत्नांत सहकार्य न करणाऱ्यांच्या डोक्यावर फोडलें. सरकार व चलन ह्यांचेवरचा लोकांचा विश्वास नाहींसा करणाऱ्यांच्या कारवायांमुळें चलन व्यवहारांत खेळत राहतें आणि महागाईस त्याची मदत होते असा युक्तिवाद त्यांनीं केला. राष्ट्रीय वृत्तीचें सरकार अस्तित्वांत असतें तर असा प्रकार घडला नसता असा मुद्दा पुढें मांडणाऱ्यांस त्यांनीं असें उत्तर दिलें कीं हा कोटिक्रम इतिहासदृष्ट्या पहातां खरा नाहीं. चीन देशांत राष्ट्रीय सरकार आहे, मग तेथें हिंदुस्थानापेक्षा किती तरी अधिक तीव्र स्वरूपांत महागाई आहे, ती कां? इजिप्तमध्यें तसेंच राष्ट्रीय सरकार आहे, तेथेंहि चलनविस्तार आणि महागाई आहे, ती कां? अशी पृच्छा करून फडनवीसांनीं असा ऐतिहासिक सिद्धांत मांडला कीं जनतेस जबाबदार असलेल्या मंत्रिमंडळाचा प्रस्तुत प्रश्नाशीं अर्थाअर्थीं संबंध नसून कोणत्याहि राज्यघटनेंत फाजील चलनविस्तार आणि मालाचा तुटवडा व महागाई असे प्रकार विशिष्ट आर्थिक परिस्थितींत घडणें अपरिहार्य आहे. हा ऐतिहासिक सिद्धांत पुढें मांडतांना दुसरें एक महत्त्वाचें ऐतिहासिक सत्य सर जेरमी विसरले आणि तें हें कीं लोकनियुक्त, राज्यघटनेंत फटनवीसास जनतेसंबंधानें त्यांच्यासारखी तक्रार करण्याचें कारण कधींच पडत नाहीं. आमचें धोरण पसंत नसेल तर दुसऱ्या मंत्रि-मंडळानें अधिक यशस्वी कारभार करून दाखवावा असें त्यांस आव्हानपूर्वक म्हणतां येतें. हिंदुस्थानांत फडनवीसांस व इतर मंत्र्यांस असें सांगतां येत नाहीं हें महत्त्वाचें सत्य आहे. ह्या देशांत लोकप्रिय मंत्रिमंडळ स्थापन झाल्यास युद्धप्रयत्न अधिक जोराचा व ज्यास्त कार्यक्षम होईल अशी हिंदी टीकाकारांची मागणी आहे आणि असेंब्लीमधील निरनिराळ्या पक्षांच्या व गटांच्या सभासदांच्या भाषणांत ती व्यक्त झाली तिचें रहस्य सर जेरमी ह्यांनीं दृष्टीआड केलें आहे. जनतेनें सरकारशीं युद्धप्रयत्नांत अधिक सहकार्य केल्यास चलनवृद्धीचा व महागाईचा वेग सुटण्यास सहाय होईल ह्यांत संशय नाहीं. परंतु अशी अनुकूल परिस्थिति सरकारनें निर्माण करावी असा तगादा देशांतील सन्मान्य पुढारी करीत आहेत त्याचा विचार किंवा उल्लेख सर जेरमी ह्यांच्या भाषणांत नाहीं हें जबाबदार मंत्रिमंडळाच्या अभावाचेंच द्योतक आहे.

इंग्लंड आणि अमेरिका ह्यांच्या खालीनें रिसर्व्ह बँक ह्या देशांत सध्याच्या चढीच्या भावानें सोनें विकत आहे. त्याबद्दल असेंब्ली व कौन्सिल ऑफ स्टेट ह्यांच्या सभासदांनीं केलेल्या टीकेस फडनवीसांनीं उत्तर दिलें तें समाधानकारक नाहीं. सोन्याच्या ह्या

विक्रीमुळें जनतेच्या हातांतील चलन रिझर्व्ह बँकेकडे परत आकर्षिलें जात आहे. ही गोष्ट खरी व चांगली आहे. पण ब्रिटिश व अमेरिकन सरकारांस सोन्याच्या विक्रीपासून जो फायदा होत आहे तो हिंदुस्थान सरकारनें स्वतःच्या पदरांत का पाडून घेतला नाही हा टीकाकारांच्या प्रश्नास सर जेरेमी झांच्या भाषणांत उत्तर दिलेलें दिसत नाहीं. इतर जिनसांच्या मानानें सोनें हा देशांत स्वस्त आहे. गेल्या तीस वर्षांत हिंदी शेतकऱ्यास आपल्या मालाच्या मोबदल्यांत तें इतक्या स्वस्ताईनें कधींच मिळालें नाहीं असें सांगून त्यांनीं वेळ मारून नेली. महागाईवर तोडगा म्हणून जरूरीच्या मालाच्या उत्पादनास हा देशांत सरकारनें उत्तेजन द्यावयास हवें होतें हा सूचनेस अनुलक्षून फडनवीस म्हणाले की यंत्रसामुग्री व कच्चा माल झांची आयात शक्य झाल्याबरोबर असें उत्तेजन देणें आवश्यक व इष्ट आहे. जरूरीच्या मालाचा पुरवठा वाढवण्याचे सरकारी खात्याचे प्रयत्न चालू आहेत त्यांचा उल्लेख त्यांनीं झासंबंधांत केला. सरकारी नोकरांची संख्या व त्यांचे पगार झांत काटकसर करण्याची आवश्यकता फडनवीसांचे नजरेस आणण्यांत आली होती. परंतु युद्धपरिस्थितींत ह्या गोष्टी अव्यवहार्य असल्याचें त्यांनीं सांगितलें.

आयुर्विमा कंपन्यांवरील इनकमटॅक्सचा कमाल दर

हिंदी आयुर्विमा कंपन्यांवरील इनकमटॅक्सचा बोजा कमी करण्यांत यावा, झासंबंधीं दीर्घ काळ प्रयत्न चालू होता. ग्रेट ब्रिटनमधील परिस्थितीचा आदर्श हिंदुस्थान सरकारनें स्वतः पुढें ठेवावा, अशीहि त्याकडे मागणी करण्यांत येत होती. हिंदी आयुर्विमा कंपन्या १९३९-४० सालीं रुपयांत ४२ पै इनकमटॅक्स भरीत असत; १९४०-४१ मध्यें हा कर ४५½ पै झाला; १९४१-४२ मध्यें त्यांत वाढ होऊन तो ५६ पै झाला. १९४२-४३ मध्यें ६३ पै पर्यंत तो वाढला व १९४३-४४ मध्यें तर त्याने ७४ पै ची मजल गाठली. हिंदी आयुर्विमा कंपन्यांवरील इनकमटॅक्सचा बोजा रुपयांत ६३ पै पेक्षा जास्त असूं नये व १९४३-४४ च्या कर आकारणीसहि हाच दर लागू करावा, असें फडनवीसांनीं आपल्या १९४४-४५ च्या बजेटाचे वेळीं सुचविलें. सरकारनें हिंदी आयुर्विमा कंपन्यांच्या मागणीस तत्त्वतः मान्यता दिल्याचें चिन्ह, झा दृष्टीनें ही सवलत स्वागताहं आहे. परंतु, आयुर्विमा कंपन्यांस झापेक्षा जास्त सवलत मिळाली तर हवी होती.

भाकड जनावरांची जोपासना

चांगलें दूध देऊं शकणारीं जनावरें कत्तलखान्यांत जाऊं नयेत, झा दृष्टीनें मुंबई सरकारनें सुमारें ३०० भाकड जनावरांच्या सोईसाठी फार्म चालविण्याकरितां १,९७,३८० रुपये मंजूर केले आहेत. ठाणें जिल्ह्यांतील पालघर तालुक्यांत त्याची स्थापना होईल. लोकांना आपलीं भाकड जनावरें फार्मवर पाठवितां येतील, त्याला मासिक खर्च ३० रुपये पडेल.

सुधीम म्यूच्युअॅल ॲशुअरन्स कं. लि.

वरील विमा कंपनीस १९४३ अखेर मिळालेल्या कामाचे आकडे खालीलप्रमाणें असल्याचें जाहीर झालें आहे:—

	रुपये
आलेले विमा अर्ज	१४,२३,३५०
स्वीकारलेलें काम	१२,१४,८५०
पुरें केलेलें काम	११,०६,४००

ताळेबंदांतील विविध रिझर्व्ह व तरतुदी

कंपन्यांच्या ताळेबंदांवरून त्यांच्या सांपत्तिक स्थितीची योग्य कल्पना यावी झासाठी हिशेबाचीं मांडणी विवक्षित स्पष्ट रीतीनें करणें इष्ट असतें. निरनिराळ्या हिशेबाच्या बाबींमध्यें कोणत्या रकमांचा समावेश व्हावा किंवा होऊं नये हें झाकरितां निश्चित करावें लागतें. झासंबंधांत अस्पष्टपणा राहिला असतां ताळेबंद पहाणारांची गैरसमजूत व भलता ग्रह होण्याची भीति असते. हिशेब तपासून ते बरोबर आहेत असा शेरा देणाऱ्या हिशेबतपासणीदारांनीं झा गोष्टींत सूक्ष्म लक्ष घालणें अगत्याचें आहे. इंग्लंडमध्यें "इंस्टिटयूट ऑफ चार्टर्ड अकौंटंटस" झा नांवाची हिशेब तपासणारांची प्रसिद्ध संस्था आहे. तिनें ताळेबंदाच्या स्वरूपांत कोणत्या सुधारणा होणें आवश्यक आहे झा प्रश्नांत मन घालून तिच्या कार्यकारी मंडळानें कित्येक महत्त्वाच्या शिफारसी केल्या आहेत झाणि त्या इंस्टिटयूटच्या सभासदांनीं अमलांत आणाव्या असें सुचवलें आहे. झा सूचना महत्त्वाच्या असल्यानें त्यांचेकडे येथें लक्ष वेधावयाचें आहे. ताळेबंदांत निरनिराळ्या जातींचे रिझर्व्ह, गंगाजळया व पुढें येणाऱ्या खर्चाच्या बाबींच्या तजविजी असतात. त्यांचें स्पष्ट वर्गीकरण व स्पष्टीकरण केलें जावें म्हणजे ताळेबंदाच्या समजुतींत घोटाळा उडणार नाहीं, अशी एक सूचना आहे. कांहीं गंगाजळया "मोकळया" असतात, म्हणजे पुढें व्हावयाच्या विशिष्ट खर्चाचा बोजा त्यांचेवर मुद्दाम पडावयाचा नसतो. नफ्यांतून किंवा इतर वाढाव्यामधून बाजूस काढलेल्या अशाच रकमांस "रिझर्व्ह" ही संज्ञा असावी आणि पुढें संभाव्य परंतु आज अनिश्चित अशा खर्चाच्या किंवा नुकसानीच्या व्यवस्थेसाठी तयार ठेवलेल्या रकमांस रिझर्व्ह न म्हणतां तरतूद किंवा "प्रोव्हिजन" म्हणावें ही सूचना सर्वथा चित्त्य व ग्राह्य होण्यासारखी अशी आहे. विशिष्ट बाबींत गुंतवलेल्या व सहज हातीं येण्याजोग्या बाजूस काढलेल्या पैशास "रिझर्व्ह फंड" म्हणावें अशीहि एक सूचना आहे. असे अनेक फंड असूं नयेत आणि नफा म्हणून वाटतां न येण्यासारखे रिझर्व्ह स्वतंत्र व स्पष्ट दाखवले जावे असेंहि सुचवण्यांत आलें आहे. सर्व रिझर्व्ह व तरतुदी ताळेबंदांत दाखवल्या जाण्याच्या नियमास एक अपवाद सांगितलेला आहे आणि तो म्हणजे अशा प्रकारची एखादी रक्कम स्वतंत्र व स्पष्ट रीतीनें दाखल करणें कंपनीच्या हितास बाधक होण्यासारखें असेल तरची आहे. अशाहि प्रसंगी ही रक्कम दुसऱ्या एखाद्या बाबींत अंतर्भूत केली जावी आणि तसें केलें असल्याची नोंद असावी. झा वरील सर्व सूचना वर म्हटल्याप्रमाणें हिशेबाच्या चोखपणाच्या व स्पष्टपणाच्या दृष्टीनें विचाराई असून शक्य तितक्या त्या अमलांत आणणें इष्ट आहे.

पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि. च्या
सभासदांस विनंति

पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेची सहामाही चर्चात्मक साधारण सभा रविवार ता. १९ मार्च १९४४ रोजीं दुपारीं ५-३० वा. बँकेच्या मुख्य दिवाणखान्यांत (बुधवार पेठ, लक्ष्मी रोड, पुणें शहर) भरणार आहे. तरी सभेस बँकेच्या सर्व सभासदांनीं अगत्य यावें अशी विनंति आहे. बोर्डाच्या हुकुमावरून

पुणें — द. वि. चितळे
ता. ६-३-४४ — मॅनेजिंग डायरेक्टर

स्फुट विचार

प्रांतिक रूरल डेव्हलपमेंट बोर्डाची सभा

मुंबई प्रांताच्या रूरल डेव्हलपमेंट बोर्डाची सहामाही सभा गेल्या आठवड्यांत मुंबई येथें भरली होती. धान्य पुरवठ्याचे बाबतींत प्रांतिक सरकारनें नवी योजना निश्चित केली आहे तिची सभेमध्यें चर्चा झाली. विशिष्ट मर्यादेपेक्षा अधिक धान्य पिकवणाऱ्यांकडून त्यांच्या जमिनीच्या साऱ्याच्या वाढत्या प्रमाणांत सरकार धान्य ठरावीक किंमतीस विकत घेईल आणि त्याचा बाजारभाव स्थिर राखले जाऊन त्याची योग्य वांटणी सर्वत्र व्हावी ह्या बेतानें उपयोग केला जाईल. आतांपर्यंत सरकारी धान्य खरेदी सक्तीची नव्हती. ह्यामुळें अपेक्षेइतकें धान्य जमा झालें नाहीं आणि त्याचा पुरवठा समाधानकारक रीतीनें होऊं शकला नाहीं. ह्या अनुभवावरून निघणारा बोध घेऊन सरकारनें नवीन योजना आखली आहे. मुंबई प्रांत धान्याचे बाबतींत तुटीचा असल्यानें धान्याचें उत्पादन वाढवण्याचा प्रयत्न शेतीखात्यानें चालवला आहे. शेतकऱ्यांस चांगलें बीं व खत पुरवण्यांत येईल आणि त्याकामीं येणारें सुमारें अर्धा कोटि रुपयांचें नुकसानहि तें सोशील. ह्या रीतीनें धान्याचें प्रांतिक उत्पादन बरेंच वाढेल अशी आशा आहे. जमिनींत बांध घालून तिची उत्पादकता वाढवण्यासाठी सरकारनें कित्येक योजना अमलांत आणल्या आहेत, त्यांस बोर्डानें मान्यता दिली. जमीनदारांच्या कुळांच्या संरक्षणासाठी प्रांतिक कायदेमंडळानें मागेंच एक कायदा केला आहे. तो रत्नागिरी व कुलाबा त्या जिल्ह्यांस लागू नव्हता, तो अपवाद आतां दूर करण्यांत आला आहे. कालव्याच्या पाण्यानें भिजणाऱ्या जमिनींत पिकांचें उत्पन्न वाढावें त्या हेतूनें सरकारनें योजना तयार केली आहे आणि तिच्या बाबत कायदाहि तयार केला आहे. पाण्याचा अधिकांत अधिक चांगला उपयोग करण्याची जबाबदारी ह्या योजनेनें जमीन मालकांवर टाकण्यांत आली आहे. शेतकरी कर्ज निवारण कायदा सध्यां प्रयोगादाखल प्रांताच्या कांहीं भागांत अमलांत आणलेला आहे. ह्या अमलबजावणीच्या अनुभवाचा विचार करून त्यांत सुधारणा सुचवण्यासाठी सरकारनें एक छोटी समिती नेमली होती. तिच्या शिफारशींस अनुसरून मूळच्या कायद्यांत कांहीं दुरुस्त्या करण्याचें सरकारनें योजलें आहे. त्यांची चर्चा रूरल डेव्हलपमेंट बोर्डाच्या सभेंत झाली. कापसाच्या कापडाच्या किंमतींचें नियंत्रण कसें अमलांत आलें आहे ह्याची माहिती श्री. वेलोडी ह्यांनीं बोर्डास दिली आणि हिंदुस्थान सरकारची नफेबाजी व साठेबाजी ह्यांचे विरुद्ध मोहीम चालली आहे तिचा तपशील श्री. देसाई ह्यांनीं समजून सांगितला. डॉ. जॉन मथाय ह्यांनीं युद्धोत्तर आर्थिक संवर्धनाच्या पंधरा वर्षांच्या योजनेचें विवेचन बोर्डाच्या माहितीसाठी केलें.

ब्रिटिश व अमेरिकन सोन्याची विक्री

रिझर्व्ह बँक हिंदुस्थानच्या बाजारांत सोनें विकीत असल्याच्या बातम्या अलीकडे मधून मधून प्रसिद्ध होत होत्या आणि त्यांचें लोकांस गूढ वाटत होतें. सरकारनें त्या संबंधांत अधिकृत अशी माहितीहि प्रसिद्ध न केल्यामुळें जनतेचें कुतूहल अधिकच वाढलें होतें. अंदाजपत्रकाच्या स्पष्टीकरणार्थ केलेल्या आपल्या भाषणांत सर जेरेमी रेस्मन ह्यांनीं सदरहु बाबतींत खुलासा केला आणि कौन्सिल ऑफ स्टेटमध्यें मि. जोन्स ह्यांनीं तिच्यावर प्रकाश पाडला. ह्यासंबंधांतली वस्तुस्थिति अशी आहे कीं ग्रेट ब्रिटन आणि अमेरिका हिंदुस्थानचें देणें अंशतः फेडण्यासाठी ह्या देशास सोनें पाठवीत असून त्याची विक्री रिझर्व्ह बँकेच्या मार्फत होत आहे. ज्याप्रमाणें हिंदुस्थान इंग्लंड व अमेरिका ह्या देशांस येथील बाजारभावाप्रमाणें माल पुरवीत आहे त्याप्रमाणेंच ते देश हिंदी बाजारांतील प्रचलित किंमतीनें येथें सोनें विकीत आहेत. हिंदी किंमत लंडनच्या भावापेक्षा सत्तर टक्के अधिक आहे आणि सध्याचा येथील सोन्याचा भाव गेल्या चार वर्षांत दोनशे टक्क्यांनीं चढला आहे. इंग्लंड आणि अमेरिका ह्यांस त्यांच्या सोन्याचा किफायतशीर भाव मिळत असून अनुकूल परिस्थितींत हिंदुस्थानचें देणें देऊन टाकतां येत आहे. चढीच्या भावानें हिंदुस्थानांत सोनें विकलें गेल्यामुळें त्या मानानें व्यवहारामधून चलन रिझर्व्ह बँकेकडे परत जात आहे आणि महागाईस आळा बसवण्याच्या सरकारच्या धोरणास सहाय होत आहे ही त्यांच्या दृष्टीनें इष्टापत्ती आहे. ह्या दृष्टीनेंच हिंदुस्थान सरकारनें सोनें-विक्रीस मान्यता दिली एवढेंच नव्हे तर तिचें हार्दिक स्वागत केलें, असें मि. जोन्स ह्यांनीं स्पष्ट सांगितलें. इंग्लंडच्या ह्या देशास देणें होत असलेल्या रकमा स्टर्लिंगमध्यें लंडन येथें शिलक पडण्यापेक्षा त्या देशानें. हिंदुस्थानांत यंत्रें, सोनें, वगैरे माल मोबदल्यांत पुरवावा अशी सूचना सरकारास हिंदी जनतेच्या वतीनें आणि चलन-विस्ताराचें नियमन होण्यासाठी करण्यांत आली होती. तीस धरूनच सध्याची सोन्याची विक्री आहे. सोन्याच्या चढलेल्या भावामुळें त्याच्या विक्रींत तें विकणाऱ्या देशांस फायदा होत आहे तो हिंदुस्थान सरकारनें स्वतःच्या म्हणजे हिंदी राष्ट्राच्या पदरांत पाडून घ्यावयास हवा होता असा टीकाकारांच्या विचारसरणीचा गोंस दिसतो. लंडनच्या भावानें किंवा येथील प्रचलित किंमतीपेक्षा कमी दरानें सरकारनें सोनें घेण्याचें व तें महाग विकण्याचें योजिलें असतें तर तो व्यवहार शक्य झाला असता किंवा काय हा प्रश्न येथें विचारांत घेतला पाहिजे. किफायतशीर भाव न मिळाल्यास इंग्लंड व अमेरिका ह्यांनीं आपलें सोनें येथें कां विकावें ! तें न विकतांहि त्यांचा कार्यभाग होतच आहे.

अमेरिकेचा युद्धोत्तर परराष्ट्रीय व्यापार

अमेरिकेची आंतरराष्ट्रीय क्षेत्रांतील सावकारी वाढत चालली आहे, त्यामुळें युद्धोत्तर परिणामांकडे तेथील लोकांचें लक्ष लागून राहिलें आहे. आतां अमेरिका स्वतःला लागणारें सर्व रबर स्वदेशांतच उत्पादन करूं लागली आहे, याचा अर्थ पूर्वीप्रमाणें ह्यापुढें अमेरिकेला बाहेरून रबर आणावें लागणार नाहीं. अमेरिकेंतून बाहेर जाणारे डॉलर त्या प्रमाणांत अमेरिकन मालाच्या खरेदीला त्यामुळें उपलब्ध होणार नाहींत हें उघड आहे. म्हणजे, अमेरिकेचा निर्गत व्यापार त्यामुळें कमी होईल. अमेरिका आजवर इतर देशांच्या आमदनीतूनच आपला माल पाठवीत असे; अमेरिकेच्या स्वतःच्या आमदनी तयार झाल्या म्हणजे इतर देशांना माल बहातुकीसाठीं भाडें देण्याचें कारण उरणार नाहीं व त्यामुळें अमेरिकन माल घेण्याचें त्यांचें सामर्थ्य त्या प्रमाणांत कमी होईल. युद्धसमाप्तीनंतर इतर देशांशीं व्यवहार कसा करावयाचा हा मोठा भवघट प्रश्न अमेरिकेपुढें आजपासूनच उभा आहे.

यु. किंग्डम कमर्शिअल कॉर्पोरेशनचें कार्य

युनायटेड किंग्डम कमर्शिअल कॉर्पोरेशन लि. ह्या संस्थेला ब्रिटिश सरकारचें भांडवलाचें पाठबळ असून तिची व्यवस्था मात्र तज्ज्ञ व्यापाऱ्यांचे हातीं आहे. ह्या कॉर्पोरेशननें ब्रिटिश निर्यात व्यापार वाढविण्याचे कामीं मिळविलेल्या यशाचें वर्णन तिचे मॅनेजिंग डायरेक्टर, सर फ्रँक निक्सन, ह्यांनीं नुकतेंच केलें. ते म्हणाले, "कॉर्पोरेशनचे ६५ भाग सरकारच धारण करीत आहे व तिचें धोरण ठरविण्याचा अंतिम अधिकार सरकारासच आहे. कॉर्पोरेशनची स्थापना १९४० सालीं झाली व जगाच्या वेगवेगळ्या भागांसाठी तिच्या दुय्यम कंपन्या आहेत. बाल्कन्स व तुर्कस्थान ह्यांमधून ग्रेट ब्रिटनला जर्मनी बाहेर ढकलून देत होता. ह्या देशांचा माल खरेदी करून त्याची किंमत जर्मनी मार्क नाण्यांत देई व त्यांचा विनियोग जर्मन माल घेण्यांतच करणें शक्य होई. अशा रीतीनें जर्मनीचें तेथें वर्चस्व प्रस्थापित झालें. त्यास तोंड देण्यास ब्रिटिश व्यापारी व्यक्तिशः असमर्थ होते, म्हणून सरकारच्या पाठबळानें कॉर्पोरेशनची स्थापना करावी लागली." अशा रीतीनें, जर्मनीस मिळत असलेला माल ग्रेट ब्रिटनलाहि मिळविता येणें शक्य झालें. बाल्कन्समध्यें, अर्थातच, विशेष घडवून आणतां आलें नाहीं परंतु तुर्कस्तानचे हातीं क्रय साधन देऊन ब्रिटिश मालाचा प्रसार तेथें सुरू करतां आला. "आंतरराष्ट्रीय व्यापारावरील बंधनें दूर होऊं शकलीं तर उत्तमच; नाहीं तर यु. कि. कमर्शिअल कॉर्पोरेशन सारख्या निमसरकारी संस्थेचें महत्त्व युद्धानंतरहि कायम रहाणार आहे" असें सर फ्रँक निक्सन म्हणाले.

विहिरी खणण्यास व सुधारण्यास सरकारचें उत्तेजन

विहिरींच्या पाण्यावरील शेतीस शक्य तेवढें उत्तेजन देण्याचें मुंबई सरकारनें ठरविलें आहे व त्यासाठी पुणें, अहमदनगर व सोलापूर जिल्ह्यांतील शेतकऱ्यांस सरकारनें कांहीं सवलती जाहीर केल्या आहेत. नवीन विहीर खणणारास एकूण सर्चाच्या एक तृतीयांश अथवा ३०० रुपये ह्यापेक्षा अधिक होईल तीं रक्कम सरकार देईल. विहिरीच्या सुधारणेवर केलेल्या सर्चाच्या निम्मा हिस्सा अथवा १०० रुपये ह्यांतील अधिक होईल ती रक्कम सरकारकडून मिळेल. मात्र, सरकारी मदत घेणारानें नवीन खोदलेल्या विहिरींच्या पाण्यावर किमान पांच एकर धान्य व सुधारणा केलेल्या विहिरीवर तीन एकर धान्य पेरलें पाहिजे, अशी सरकारची अट आहे. ज्यांना सरकारी मदत हवी असेल, त्यांनीं ॲग्रिकल्चरल इंजिनिअर, पुणें ह्या पत्त्यावर अर्ज पाठवावेत.

मुंबई शहरांतील रस्ते व झाडूवाले

मुंबई शहरांतील रस्त्यांची एकूण लांबी २६८ मैल, म्हणजे मुंबई ते सोलापूर ह्यांतील अंतराइतकी आहे. हे सर्व रस्ते दररोज झाडले जातात. कांहीं रस्ते तर दिवसांतून सहा वेळा स्वच्छ करण्यांत येतात. ह्यासेरीज, २३६ मैल लांबीचे फुटपाथ व १०४ मैलांचे बोळ हेहि स्वच्छ करावे लागतात. या सर्वांची बेरीज ६०८ मैल होते. म्हणजे, मुंबई ते आग्रा ह्या अंतराइतका रस्ता रोज झाडून होतो, असा हिशेब आहे. ह्यासाठी ३ हजार झाडूवाल्यांची योजना केलेली आहे व त्यांच्या वार्षिक पगाराची रक्कम २० लक्ष रुपये होते.

शेअर बाजार

(श्री. व. वि. लोणकर, एम. ए., बी. कॉम., २४ डे. जि. पुणें. ४)

उंदीर चावतांना फुंकर घालतो त्यामुळें चावलेल्याला दंश समजत नाहीं व विषबाधा मात्र होते. तसेंच रेसमन साहेबांनीं हिंदी अर्थ पुरुषाचे, चालू अंदाजपत्रकांत नवे कर बसवून व जुनें वाढवत वाढवत चालू वर्षाला एकदम वाढवून चावें घेतलें आहेत. शेअर बाजाराला प्रथम रेसमन साहेबांच्या खुबीमुळें पत्रक "सारं छे" असेंच वाटलें व खाजगींत बाजार वर गेलेपण सक्तीनें ठेवाव्या लागणाऱ्या रकमांचे जादा नफ्यांतील वाढलेलें प्रमाण व त्यांचे परिणाम ध्यानांत आल्याबरोबर बाजाराला जी एकदम उतरती कळा लागली ती अजूनहि स्थिरावली आहे असें म्हणतां येत नाहीं.

या करवाढीमुळें—विशेषतः कंपन्यावरील जादा आकारणीमुळें—व सक्तीनें शंभर टक्क्यांपर्यंत अनामत रकमा भराव्या लागणार, त्यामुळें, नुकतेंच कॉमनिकल पत्रांत दाखविल्याप्रमाणें ज्यांचे प्रमाणित नफे कमींत कमी आहेत, त्यांना नफा असा शिल्लक रहात नाहींच. उलट कराची व सक्तीच्या ठेवींची भरपाई करण्याला सिशांतून काढून रकमा भराव्या लागतील. जो कर भरला असतां कर भरणाराला पूर्वीपेक्षा जास्त भिकारी करून सोडतो तो कर दुष्ट होय असें आर्थिक वचन आहे. जाणूनबुजून चलनाला लगाम घालण्याच्या मिषानें रेसमन साहेबांनीं हिंदी व्यापार-उद्योगाला अशा रीतीनें आवळून टाकलें आहे. यामुळें उत्पादकवर्ग व उत्पादनोत्सुक या दोघांनाही खच्ची केल्यासारखें होऊन हिंदी उत्पादनास ओहोटी निसंशय लागेल असा इषारा यावासा वाटतो.

यापुढें जो वर्ग शेअरच्या व्याजावर विसंबून राहतो त्याची वाट काय ? बहुतेक कंपन्यांचे प्रमाणित नफे मामुली असल्यानें त्यांतून प्राप्तीवरील कर, जादा आकार आणि घसारा टाकून, भागीदारांना यावयास अक्षता तरी राहतील कीं नाहीं याबद्दल शंका वाटते. याचा परिणाम शेअरच्या किंमतीवर तर झालाच आहे. आणखी बाजार पडतात का तें पाहणें आहे.

भागीदारांना आशेचा किरण

या सर्व अंधकारांतून आशेची एक चांदणी निःसंशय दिसूं शकते. ज्याअर्थी सरकारकडे जास्त ठेवी ठेवल्या जाणार आहेत व त्या परत मिळणार आहेत त्याअर्थी प्रमाणित नफ्यांतून घसारा वेगळा असा टाकण्याचें कारण नाहीं. यामुळें प्राप्तीवरील कर जरी आणखी थोडासा जास्त द्यावा लागला तरी भागीदारांना १९४१-४२ च्या सरासरीनें व्याज देतां येण्यास हरकत येऊं नये. असा वेगळा घसारा ब्रिटिश इंडिया कॉर्पोरेशननें टाकला नाहीं व मागील वर्षाचें व्याज कायम ठेवलें आहे असें त्या कंपनीच्या काल-परवा आलेल्या ताळेबंदावरून दिसून येतें व यास अनुसरून बाकीच्या कंपन्यांनाही आपलीं व्याजें देतां येतील. निदान जितकी जास्त ठेव सरकारांत ठेवली तितक्याच प्रमाणांत व्याज कर्जरोख्याच्या स्वरूपांत टाटा स्टील कं. नें दोन वर्षांखाली दिलें होतें तसें तरी कां होईना देता आलें पाहिजे व सर्व कंपन्यांनीं त्यांच्या भागीदारांच्या हिताच्या दृष्टीनें असें व्याज यावें अशी शिफारस करणें इष्ट वाटतें. कारण गुंतवणाऱ्यांच्या भांडवलाची नुकसानी टाळण्याचा तो एकमेव उपाय होय. हें होऊं शकेलच शकेल म्हणून बाजार आणखी खालीं पडूं नयेत व कमी व्याजाच्या दराच्या दृढपणामुळें वर येऊन टिकावेत.

हिंदुस्थान सरकारचा युद्धकालीन खर्च

हिंदुस्थान सरकारचा १९३९-४० ते १९४३-४४ हा पांच वर्षांतील खर्च १० अब्ज रुपयांचेवर झाला आहे. युद्धपूर्व खर्चाच्या तुलनेचे मानानें पांच वर्षांचा खर्च ४½ अब्ज रुपयांचेपेक्षा अधिक झाला नसता. म्हणजे ५½ अब्ज रुपये हे युद्ध-परिस्थितीमुळेंच अधिक खर्च झाले, असा अर्थ होतो. एकटा लष्करी खर्चच घेतला, तर तो ७ अब्ज, १५ कोटि रुपये म्हणजे मामुली खर्चापेक्षा ४ अब्ज, ८४ कोटि रुपये अधिक झाल्याचें आढळून येतें. युद्धकाळांतील वाढलेल्या खर्चाची वर्गवारी खालील-प्रमाणें आहे—

	कोटि रु.
लष्करी खर्चांत वाढ	४८४
राज्यकारभाराचे खर्चांत वाढ	१७
इतर खर्चांत वाढ	७७
एकूण	५७८

गेल्या पांच वर्षांतील हिंदुस्थान सरकारचा एकूण खर्च व त्यांतील लष्करी खर्चाचा वाटा, याची कल्पना खालील तक्त्या-वरून येईल—

	एकूण खर्च (कोटि रु.)	लष्करी खर्च (कोटि रु.)
१९३८-३९	८५·१५	४६·१८
१९३९-४०	९४·५७	४९·५४
१९४०-४१	११४·१८	७३·६१
१९४१-४२	१४७·२६	१०३·९३
१९४२-४३ (दुरुस्त अंदाज)	३५२·१७	२६८·५०
१९४३-४४ (अंदाज)	२९६·५८	२१९·८०

१९४२-४३ चा दुरुस्त अंदाज व १९४३-४४ चा खर्चाचा अंदाज देतांना, लष्करी खर्चाची वांटणी (१) भांडवली व (२) बिनभांडवली खर्च अशी करण्यांत आली आहे व त्याप्रमाणें लष्करी खर्च दाखविण्यांत आला आहे. १९४२-४३ च्या लष्करी खर्चापैकी ४९·१४ कोटि रुपये भांडवली स्वरूपाचे आहेत व १९४३-४४ च्या लष्करी खर्चांत १६·८५ कोटि भांडवली खर्च अंतर्भूत आहे. वैमानिक तळ, औद्योगिक वाढीसाठीं खर्च, नवीन आगबोटींची बांधणी, तार व टेलिफोनचा भांडवली खर्च, इत्यादींचा अंतर्भाव भांडवली खर्चांत केलेला आहे, कारण त्या खर्चाचें फळ नाहींसें होणार नसून पुढेंहि मिळत रहाणार आहे.

सैनिकांची युद्धोत्तरची व्यवस्था

सध्या हिंदी लष्करांत सुमारें १७½ लक्ष सैनिक आहेत व ही संख्या दरमहा २० हजारांनीं वाढत आहे. युद्धसमाप्तीनंतर त्यांना पुनः शेतकाम लागावें, ह्या दृष्टीनें शेतें पुरवून व उद्योगधंद्यांचें शिक्षण देऊन त्यांची सोय करण्याची हिंदुस्थान सरकारची योजना आहे. सुमारें १० कोटि रुपयांचा फंड त्यासाठी उपलब्ध होईल, अशी अपेक्षा आहे.

पुणें अनाथ विद्यार्थी गृह

प्रवेश मिळवूं इच्छिणाऱ्या स्पृश्य हिंदूंनीं (वय १२ ते १५; शिक्षण मराठी ७ वी पास अगर यंत्र बसवारे किंवा इंग्रजी ३,४,५ इयत्ता झालेले) ८४ चीं पोस्टाचीं तिकिटें पाठवून छापील अर्ज नमुना व नियम मागवून १० एप्रिलचे आंत अर्ज करावेत.

जिकडे तिकडे प्रशंसा

इमिटेशने दागिन्यांवर रासायनिक क्रिया करून खऱ्या सोन्याचा पत्रा चढविला जातो त्यामुळें दागिना कध्धींही खराब होत नाहीं, ही पूर्ण खात्री झाली. सोन्याचा पत्रा चढविलेल्या चार बांगड्या कि. आठ रु. गरजेस्तव दागिना परत करणें झाल्यास वर चढवि-लेल्या सोन्याचे सर्वच्या सर्व पैसे परत देऊं.

भट कं. सांगली, S. M. C.
भट कंपनी शाखा–बुधवार पेठ, पुणें २.

मलेरियावरील क्रांतिकारक हिंदी शोध

मागोरा पिल्स

अवघ्या ४ दिवसांत मलेरिया थांबतो.

१६ गोळ्यांच्या डबीस रु. १

— १०० गोळ्यांचें पॅकिंगही मिळतें. —

मागोरा केमिकल कं. लि.
टिळक रोड, पुणें २.

पुण्यांतील
आदर्श निवासस्थान व भोजनालय
छाया लॉजिंग व बोर्डिंग हाउस
बुधवार चौक, पुणें २.

सध्यांच्या टंचाईच्या काळांत जीवनद्रव्यें कमी पडतात.
जीवनद्रव्यांनीं (Vitamins) युक्त असे
(सप्राय खात्यानें मान्यता दिलेले)
टोमॅटो केचप (गोड) व
टोमॅटो सॉस [तिखट व आंबट]
आजच मागवा व जीवनद्रव्यांची वाटणारी उणीव भरून काढा.
रुरल प्रॉडक्टस कंपनी लि. पुणें
बिझिनेस ऑफिस : ९२३ अ सदाशिव, पुणें २.

देवघरांतील धनुकल्या पळविणाऱ्या धनुर्धारी

बंडखोर बालवीरांची बंडाळी

देवांच्या कानावर कामाळी

" देवा आतां कापूस कसा पिंजावा !
रामा आतां वाती कशा कराव्या ?"

२० वा आठवडा

प्रकाश पिक्चर्सचा पौराणिक मराठी बोलपट

रामराज्य

दिग्दर्शक:—विजय भट्ट.

भूमिका: शोभना समर्थ, चंद्रकांत, काळे, सोहनी

मिनर्व्हा, पुणें रोज फक्त दोन खेळ ६। व १० वाजतां

दर शनि. रवि. सोम. व बुधवार ता. १५ रोजीं रंगपंचमी निमित्त खास जादा खेळ दुपारीं २॥ वाजतां

[एव्हरग्रीन-प्रकाशन]

शेवटचा
१३ वा आठवडा !

रॉयल रत्न १८ वे

महात्मा विदुर

दिग्दर्शक:—पार्श्वनाथ आळतेकर

कला:—बाबुराव पेंटर

पागनीस, दुर्गा खोटे

यांची एकत्र भूमिका असलेला भक्त-पट

नायमपल्ली, मनोहर घटवाई, प्रल्हाद

रविवारीं सकाळीं जादा खेळ १० वाजतां

दररोज तीन खेळ ३।, ६॥ व १० वाजतां

आर्यन, पुणें

ध्यास! आणि प्यास!!

तिला त्याचा ध्यास लागला होतां !

त्याला तिच्या प्रेमाची प्यास लागली होती !

ध्यास-प्यासाचें मधुर मीलन !

ग्लोब—पुणें ! ६ वा आठवडा !

एव्हरग्रीन प्रकाशन — प्रकाश पिक्चर्सकृत

पनघट

भूमिका

रत्नमाला, उमाकांत, जीवन

रोज ६॥। व १० वा.

दर शनि. रवि. व बुधवार ता. १५ रोजीं रंगपंचमीनिमित्त ३॥ वा. जादा खेळ

हें पत्र पुणें, पेठ सांगडा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास' सांगडा, घ. नं. ९२४।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.

खालील पत्त्यावर चौकशी करावी.

व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

अर्थ

वर्गणीचे दर.

वार्षिक वर्गणी
रु. ४
(टपाल खर्चासह)
किरकोळ अंकास
दोन आणे.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष १० पुणें, बुधवार, तारीख २२ मार्च, १९४४ अंक १२

न्यू इंडिया इंडस्ट्रीज लि.

(Approved Re-traders and Approved Contractors)

२६ लॅमिंग्टन नॉर्थ, मुंबई ११.

अध्यक्षः—श्री. ग. स. मराठे, ॲक्चुअरी.

महाराष्ट्रांतील रबराचा प्रमुख कारखाना

★ गिरणीचे रोलर्स ★ रबरी हातमोजे ★ छापखान्यांचे रोलर्स
★ रीमोल्ड टायर्स ★ रबरी वॉशर्स ★ सॉलिड व्हील्स

व इतर रबरी माल तयार होतो.

पु. ग. मराठे
मॅनेजिंग डायरेक्टर.

पुना गेस्ट हाऊस

१००, लक्ष्मी रोड, पुणें २.

Telephone 779

GUEST HOUSE

TELEGRAM Guest House Poona 2.

स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

गिरगांव मुंबई नं. ४

महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

विविध माहिती

रेशनिंगमुळें वजन घटत नाहीं

युद्धजन्य रेशनिंगमुळें ब्रिटिश लोकांचें वजन घटत नाहीं; असें आढळून येतें. १९४०-४१ मध्यें मात्र, अन्नांत विविधता नसल्याकारणानें, लोकांचीं वजनें थोडीं कमी झालीं होतीं. शाळांत जाणाऱ्या विद्यार्थ्यांची वाढ पूर्वी सारखीच समाधानकारक चालू आहे.

बँकेत सापाचीं अंडीं

बँकांच्या सेफ डिपॉझिट व्हॉल्टमध्यें दागिने, रोकड रक्कम, महत्त्वाचे दस्तऐवज, रोखे, इत्यादि ठेवण्यांत येत असतात. लिव्हरपूल येथील एका बँकेकडे एका मनुष्यानें सापाच्या अंड्यांची पेटी व्हॉल्टमध्यें ठेवण्यासाठीं आणली, परंतु बँकेनें त्याची जोखीम स्वीकारली नाहीं. बंदिस्त खोलींतील उबेमुळें अंड्यांतून साप बाहेर पडावयाचे !

चीन आगबोटी विकत घेणार व बांधणार

चीन देश युद्ध समाप्तीनंतर स्वतःच्या आगबोट-वहातुकीचा धंदा मोठ्या प्रमाणावर वाढविण्याचा विचार करीत आहे. अमेरिकेकडून चीन ५०० मालवाहू आगबोटी विकत घेण्याच्या विचारांत आहे व अमेरिकन तज्ज्ञांचे नेतृत्वाखालीं स्वतः आगबोटी बांधण्याचीहि त्याची कल्पना आहे.

धान्याचा साठा

कराची येथें व आणखी दोन केंद्रांत लक्षावधि टन धान्याचा साठा हिंदुस्थान सरकार करीत आहे, त्याचा उद्देश हें धान्य विशेष अडचणीच्या प्रसंगीं उपयोगांत आणतां यावें, असा आहे.

सुएझच्या कालव्यातून बोगदा

सुएझच्या कालव्यातून बोगदा खणून त्यांतून रेल्वे नेण्याचा इजिप्तच्या सरकारचा विचार आहे. हा युद्धोत्तर योजनेस सुमारें ३ कोटि रुपये खर्च येईल.

हैदराबाद को. इन्शुअरन्स सोसायटी

गेल्या वर्षी वरील कंपनीनें २९३ लक्ष रुपयांचें नवीन काम पुरें केलें.

हिंदी तांदळाचें उत्पादन

१९३७ ते ४२ ह्या पांच वर्षांतील तांदळाच्या हिंदी उत्पादनाची वार्षिक सरासरी २ कोटि, ५४ लक्ष टन होती, १९४२-४४ च्या दोन वर्षांतील उत्पादनाची वार्षिक सरासरी २ कोटि, ७७ लक्ष टन पडली. चालू वर्षांतील उत्पादनाचा अंदाज २ कोटि, ६ लक्ष टनांचा आहे. फक्त १९१७-१८ मध्यें ह्यापेक्षा जास्त तांदळाचें उत्पादन झालेलें होतें.

कोहिनूर मिल्स कं. लि.

कोहिनूर मिल्स कं. लि. नें १९४३ सालीं ५ कोटि रुपयांच्या मालाची विक्री केली. १९४१ सालांतील विक्रीचा आकडा ३ कोटि, १७ लक्ष रुपये होता व १९४१ सालीं २ कोटि, ३१ लाखांची विक्री झाली होती. कंपनीला १९४३ सालीं १ कोटि, ८३ लक्ष रुपये ढोक नफा झाला. त्यापैकी १ कोटि, ३० लक्ष रुपये कर भरण्यासाठी राखून ठेवले आहेत. मॅनेजिंग एजंट्स (मेसर्स किलिक निक्सन आणि कं.) ना कमिशनचे ८३ लक्ष रुपये मिळाले. भागीदारांस ४०% डिव्हिडंड मिळणार आहे.

हिंदी सैनिकांचा पगार

हिंदी सैनिकांचा पगार सप्टेंबर, १९४२ मध्यें वाढविण्यांत आला होता, तो आतां पुनः वाढविण्यांत येत असल्याचें सर सेनापतींनीं कौन्सिल ऑफ स्टेटमध्यें जाहीर केलें. सैनिकाचा युद्धापूर्वी मूळ पगार १६ रु. आहे, तो तेव्हां १८ रुपये करण्यांत आला होता. पगार, लायकी-पगार, डिफर्ड पगार व भत्ता मिळून लढाईवर जाणाऱ्या सैनिकाचा पगार ३७ रु. ८ आ. होईल. हिंदुस्थानाबाहेर गेल्यास त्याला आणखी ७ रुपये मिळतील.

इंडिया ऑटो ॲण्ड वर्क्स लि.

मोटारींची आयात व निर्गत करण्याच्या धंद्याची "दि इंडिया ऑटो ॲण्ड वर्क्स लि." नांवाची १० लक्ष रुपयांची खासगी लिमिटेड कंपनी शेठ गुलाबचंद हिराचंद ह्यांनीं नोंदविली आहे.

प्राप्तीवरील कराचे नवीन दर

(इनकमटॅक्स, सुपरटॅक्स व सरचार्ज प्रमाणें १० हजारांवरील उत्पन्नास द्यावा लागणारा कर.)

उत्पन्न	कर
११,०७०	१,१४३
१२,०००	१,३३२
१३,०००	१,५८१
१४,०००	१,८००
१५,०००	२,०१८
१८,०००	२,८६२
२१,०००	३,७०६
२४,०००	४,५५०
२७,०००	५,६४३
३०,०००	६,८६२
३३,०००	८,०८१
३६,०००	९,४२५
४०,०००	११,५५०
५०,०००	१६,८६२
६०,०००	२२,६४३
७०,०००	२८,८९३
८०,०००	३५,१४३
९०,०००	४१,३९३
१,००,०००	४७,६४३
१,५०,०००	८१,२३७
२,००,०००	१,१७,१७५
३,००,०००	१,९५,३००
४,००,०००	२,७६,५५०
५,००,०००	३,६०,९२५
१०,००,०००	८,२९,६७५
२०,००,०००	१७,६७,१७५
३०,००,०००	२७,०४,६७५

दत्त कंपनी लि.

७३५ शुक्रवार पेठ, पुणें १. दाणेआळी पोलिसगेटाजवळ

सर्व तऱ्हेचे काटे, वजनें व मापें, वेळेवर रिपेअर करून मिळतील.

अनुक्रमणिका

	पृष्ठ		पृष्ठ
१ विविध माहिती ...	९०	६ बँकांच्या ठेवी व त्यांनी दिलेली कर्जे ...	९४
२ संयुक्त हिंदी व्यापारी मंडळाचें मतप्रदर्शन ...	९१	७ भारत इं. बँक लि. ...	९४
३ चेक पाठविण्यासाठी यंत्रांचा उपयोग ...	९२	८ ऑस्ट्रेलियापुढील लोकसंख्येचा प्रश्न ...	९५
४ ओध स्टेट बँकिंग कंपनी	९२	९ मध्यप्रांतांतील उद्योगधंद्यांस वाव ...	९५
५ स्फुट विचार ...	९३	१० आयुर्विम्यास प्रारंभ ...	९५
रस्त्यांच्या विस्ताराची योजना—रस्ते विस्तारांतील ठळक बाबी—रेल्वे-मोटार वहातुक		११ युद्धोत्तर शिक्षणाची योजना ...	९५

अर्थ

बुधवार, ता. २२ मार्च, १९४४

संयुक्त हिंदी व्यापारी मंडळाचें मतप्रदर्शन

फेडरेशन ऑफ इंडिअन चेंबर्स ऑफ कॉमर्स ह्या हिंदी व्यापारी मंडळाच्या संयुक्त संस्थेची वार्षिक परिषद् दिल्ली येथें नुकतीच भरली होती आणि तीमध्यें हिंदुस्थानच्या युद्ध परिस्थितींतिल उद्योगधंदे व व्यापार यांचे संबंधांतल्या महत्त्वाच्या प्रश्नांवर ठराव मान्य करण्यांत आले. युद्ध चालू असतांना आणि युद्धोत्तर काळांत हिंदी धंद्यांबाबत सरकारचें धोरण कोणतें असावें ह्या विषयीं परिषदेनें विधायक सूचना केल्या. प्रातिनिधिक स्वरूपाचीं मंत्रिमंडळें देशांत स्थापन होण्याची आवश्यकता अध्यक्षांनीं प्रतिपादली आणि हिंदी आर्थिक हितसंबंधांची जोपासना जेणेंकरून होईल असें धोरण सरकारनें अंगिकारावें ह्या आशयाची सूचना केली. परिषदेंत चर्चिल्या गेलेल्या विषयांमध्यें युद्धोत्तर पुनर्घटना, अन्नपुरवठा, युद्धकालीन नव्या धंद्यांची जोपासना, देशांत जरूरीचा माल तयार होण्याची आवश्यकता, हिंदुस्थानच्या लंडनमधील शिलकींचा योग्य विनियोग, हे प्रश्न प्रमुख होते.

हिंदुस्थानच्या आर्थिक अभिवृद्धीविषयींची पंधरा वर्षांची योजना औद्योगिक पुढाऱ्यांनीं तयार केली आहे तिला परिषदेनें हार्दिक पाठिंबा देणें उचित व अपेक्षित होतें. ही योजना म्हणजे आकाशांतला चंद्र नसून ती पूर्णपणें व्यवहार्य आहे आणि तिच्या योगानें सामान्य हिंदी जनतेची रहाणी सुधारण्याची खात्री आहे असे आत्मविश्वासाचे उद्गार वक्त्यांनीं काढले. ती अमलांत आणण्याची सध्याच्या सरकाराकडून कोणीहि अपेक्षा करीत नाहीं; त्यानें तिच्या मार्गांत अडथळे आणूं नयेत आणि आर्थिक बाबींविषयींचे विश्वसनीय आकडे तयार करून पुरवावे म्हणजे झालें असेंहि एका प्रमुख वक्त्यानें बोलून दाखवलें. धान्याचा पुरवठा व त्याची वांटणी ह्यांचे संबंधांत आपलें एकसूत्री धोरण सबंद देशभर अंमलांत येईल अशी व्यवस्था मध्यवर्ती सरकारनें करावी असें ह्या प्रश्नाबाबतच्या परिषदेच्या ठरावांत सुचवण्यांत आलें आहे. धान्याच्या निर्मितीची वंदी, त्याच्या आयातीची तरतूद आणि त्याच्या उत्पादनाचा विस्तार ह्या मार्गाचा अवलंब सरकारनें करावा आणि दुष्काळाची पुनरावृत्ति न होऊं देण्याची दक्षता बाळगावी असेंहि त्यांत म्हटलें आहे. युद्धकाळांत आवश्यक म्हणून काढण्यांत आलेल्या नवीन धंद्यांचें पुढें शांततेच्या युगांत काय होणार हा प्रश्न दूरदृष्टीनें विचार करण्यासारखा आहे. आज भाव चांगले आहेत आणि विशिष्ट मालास मागणी असतांहि त्याची आयात बंद किंवा मर्यादित झाली आहे म्हणूनच कित्येक धंदे निघाले आहेत किंवा विस्तार पावले आहेत. युद्धोत्तरकालीन परकीय स्पर्धेमुळें ते चालणें कठिण होणार आहे. तेव्हां सरकारनें त्यांस सहाय देण्याची व्यवस्था करून ठेवली पाहिजे. इंग्लंडमध्यें अशी तरतूद केली जात आहे तिच्या धर्तीवर खास समितीकडे अशा धंद्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न सोपवावा असा अभिप्राय परिषदेनें प्रकट केला आहे.

जनतेच्या मामुली उपयोगाच्या जिनसांचा तुटवडा सध्यां तीव्रतेनें भासत आहे आणि हा माल बाहेरून आयात करावा लागतो. तसें करण्याच्या ऐवजीं स्वदेशी धंद्यांस लागणारीं यंत्रें व कच्ची सामुग्री आयात करून सरकारनें त्यांस पुरविली तर देशांतल्या देशांत जरूरीचे जिन्नस उपलब्ध होऊन हिंदी उद्योगांच्या प्रगतीस उत्तेजन मिळेल असें मत परिषदेंत व्यक्त करण्यांत आलें. युद्धकालीन कर योजनेचा देशी धंद्यांवर होणारा परिणाम लक्ष्यांत घेऊन करांची मांडणी व आकारणी केली जावी अशी सूचना परिषदेच्या एका ठरावांत नमूद आहे. अमेरिका व हिंदुस्थान ह्यांचे दरम्यान होणाऱ्या देवघेवींत त्या देशाचें जें येणें निघतें तें अमेरिकेच्या नांवावर चढवून ठेवण्यांत यावें आणि त्याचें रूपांतर स्टर्लिंग पौंडांत केलें जाऊं नये अशी मागणी परिषदेनें केली आहे. अमेरिकेकडून घ्यावयाच्या डॉलर्सपैकी कांहीं रक्कम ह्याप्रमाणें बाजूस काढून ठेवली जाईल असें आश्वासन सर जेरेमी रेस्मन ह्यांनीं दिलें आहे. परंतु त्या येण्याची सबंध रक्कम हिंदुस्थानच्या उपयोगासाठी खास बाजूस ठेवावी म्हणजे पुढें जरूरीप्रमाणें तिचा ह्या देशास उपयोग करतां येईल असें परिषदेचें म्हणणें आहे. ह्या संबंधांत ब्रिटिश व अमेरिकन धंदेवाल्यांची चुरस लागून राहिली आहे आणि हिंदुस्थानास मिळावयाच्या डॉलर्सचा उपयोग अमेरिकन व्यापारी करतील आणि ह्या देशाच्या बाजार पेठांत आपलें वर्चस्व स्थापतील अशी भीति ब्रिटिश धंदेवाल्यांस वाटत आहे. ह्या दृष्टीनें परिषदेच्या वरील मागणीचें रहस्य ध्यानांत येण्यासारखें आहे.

यांत्रिक शक्तीवर चालणाऱ्या मागांची सवलत

जे स्वतःच्या गिरण्यांत सूत काढीत नाहींत, अशांच्या कापडाचे उत्पादनास किंमतीचें नियंत्रण लागू नाहीं. ज्यांचेजवळ १ जानेवारी, १९४४ रोजीं २५ पेक्षा कमी पॉवर लूम होते, अशांना ही सवलत चालू राहील परंतु ज्यांचेजवळ २५ अगर २५ पेक्षा अधिक माग होते, अशांची ही सवलत १ मे पासून रद्द होणार आहे. ह्या तारखेनंतर त्यांना आपल्या कापडावर किंमतीचे शिक्के मारावे लागतील.

कपाशीची लागवड वाढली

हिंदुस्थानांतील कपाशीच्या लागवडींत १९४३-४४ मध्यें २% वाढ झाली. लांब धाग्याच्या कपाशीची लागवडच मुख्यतः वाढली आहे, ही विशेष गोष्ट आहे.

अमेरिकन सैनिकाच्या कुटुंबीयांस चेक पाठविण्यासाठी यंत्रांचा उपयोग

अठरा मजली इमारतीमधील प्रचंड कचेरी

फौजेंत दाखल होणाऱ्या प्रत्येक सैनिकास त्याच्या कुटुंबीयांच्या हितसंबंधाची काळजी सरकार वहात आहे, अशी खात्री वाटली, म्हणजे त्याचें चित्त स्थिर राहून त्याची कार्यक्षमताहि वाढते. ह्या गोष्टीच्या महत्त्वाची जाणीव अमेरिकन सरकारास आहे. सैनिकाची पत्नी, मुलें, वृद्ध माता-पिता, इत्यादींस वक्तशीर अलावन्स पोंचता करणें, त्यांच्या सर्व प्रश्नांस नीट उत्तरें देणें, त्यांच्या अडचणींत त्यांस मदत करणें, इत्यादींसाठी अमेरिकन सरकारनें "ऑफिस ऑफ डिपेंडन्सी बेनिफिट्स" (ओ. डी. बी.) ह्या नांवाची एक मोठी कचेरी स्थापन केली आहे. नेवार्क (न्यू जर्सी) येथील एका विमा कंपनीची १८ मजली प्रचंड नवी इमारत ह्या कचेरीच्या स्वाधीन करण्यांत आली आहे. कचेरीतील कामाची पद्धत अत्यंत नमुनेदार अशी आहे व त्यासाठी अद्यावत यंत्रांची योजना केलेली आहे, त्यांतून दरमहा ४० कोटि रुपयांचे २५ लक्ष चेक लिहून पाठविले जातात. चेकसचा हा प्रवाह सैनिकांस आपल्या कुटुंबीयांच्या सुशालीबद्दल निःशंक राखण्याचें महत्त्वाचें कार्य करीत असतो. सैनिकाच्या कोणत्या नातलगास किती रक्कम मिळावयाची, हें नियमांनीं ठरवून टाकलेलें असतें. सैनिकानें लिहून दिल्याप्रमाणें त्याच्या पगारांतून कापलेले पैसे वक्तशीरपणें त्याच्या कुटुंबीयांस पाठविले जातात अथवा सेव्हिंग्ज बँकेत किंवा विमा कंपनींत भरले जातात. सार्जंटपर्यंतच्या दर्जाच्या सैनिकास आपल्या १७५ रुपये पगारांतून दरमहा ८० रुपये आपल्या पत्नीस घाडतां येतात व त्यांत अमेरिकन सरकार ९५ रुपयांची भर घालून पत्नीकडे १७५ रुपयांचा चेक पाठवितें. पहिल्या अपत्यास दरमहा ४२ रुपये व पुढील प्रत्येक अपत्यास ३५ रुपये मिळतात. सैनिकावर अवलंबून असलेल्या पित्यास अगर मातेस १३० रुपये व बहिणींस १०० रुपये मिळतात. आई, बाप, बहीण, इत्यादींस अलावन्स मिळावा, अशी सैनिकाची मागणी असेल तरच त्यांस तो दिला जातो, परंतु त्यापूर्वी हे नातेवाईक सैनिकावर खरोखरचे अवलंबून आहेत, अशा अर्थाचा शपथपूर्वक दाखला त्यांत हितसंबंध नसलेल्याकडून घेतला जातो. परंतु, पत्नी व अपत्यें ह्यांच्या बाबतींत मात्र, सैनिकाची इच्छा नसली, पत्नीस स्वतःचें भरपूर उत्पन्न असलें व सैनिकाचें व त्याच्या पत्नीचें पटत नसलें तरीसुद्धा दरमहा १७५ रुपये मिळतात. त्यापैकीं अर्थातच ८० रुपये सैनिकाच्या पगारांतून कापलेले असतात. "ओ. डी. बी." मध्यें दररोज शेकडो स्त्री-पुरुष आपल्या अलावन्स संबंधीं चौकशी करण्यासाठी व शंकांचें समाधान करून घेण्यासाठी येतात. १५ लोक त्यांची समजूत करण्याचें काम दिवसभर करीत असतात. १० लोक टेलिफोनवरील प्रश्नांचीं उत्तरें देण्यांत गुंतलेले असतात. स्वतः येणारे व पत्रानें चौकशी करणारे ह्यांचें प्रमाण एकास हजार असें पडतें. ह्या पत्रांचीं उत्तरें देण्यासाठी ७५० कारकुनांची योजना केलेली आहे. प्रत्येक पत्राचें उत्तर देण्यांत येतें. अमेरिकेच्या विधिमंडळांतील सभासदांनीं आपल्या मतदारांतर्फे लिहिलेलीं पत्रें मोजलीं तर त्यांची रोजची संख्या ३०० ते ४०० भरते. कित्येक सैनिकांचे कुटुंबीय लोक मदत नाकारतात; तेवढीच रक्कम सरकारला इतरांचेवर खर्चता येईल, अशी त्यांची राष्ट्रीय भावना असते. कोणास किती रक्कम मिळावयाची, हें एकदां ठरलें, म्हणजे सैनिक, त्याचे नातेवाईक व त्यांस मिळावयाची रक्कम ह्या सर्वांस विशिष्ट नंबर दिले जाऊन स्टेन्सिलवर ठराविक भोकांचे स्वरूपांत त्यांस चिरस्थायित्व प्राप्त होतें. कोणाची पत्नी मेली, कोणास मूल झालें, कोणाच्या कन्येचा विवाह झाला, की स्टेन्सिलमधला तपशील तावडतोब बदलावा लागतो. परंतु, एकदा स्टेन्सिल तयार झालें, कीं त्यावरील भोकांच्या मार्गदर्शनानुसार यंत्रें बिनचुक चेक लिहितात, त्यांवर सहीहि यंत्रें करतात, स्टेन्सिलबरहुकूम चेक झाला किंवा नाहीं हें तपासण्याचें कामहि दुसरें एक यंत्रच करतें, पाकिटांत चेक घालून तें बंद करण्याचें कामहि यंत्रांकडेच आहे, इतकें नव्हे तर एकाच पाकिटांत दोन चेक जाऊन एकादें पाकीट कोरेंच जात नाहींना, ह्याची तपासणीसुद्धा यंत्रेंच करतात. एकाद्या पाकिटाबद्दल यंत्रास शंका आली, कीं तें पाकीट बाहेर फेकलें जातें. स्टेन्सिलवरील माहिती अचुक आहे किंवा नाहीं, हें पहाण्याचें व राखण्याचें काम तेवढें माणसांकडे आहे. यंत्रें चालविण्यासाठी तज्ञ लोकांची नेमणूक केलेली आहे.

दि ओंध स्टेट बँकिंग अँड इन्शुअरन्स कं. लि.

३१ डिसेंबर, १९४३ अखेरच्या वर्षी वरील कंपनीच्या खेळत्या भांडवलांत दोन लाखांचेवर वाढ झाली आहे. निवळ नफ्याचा आकडा काढण्यापूर्वी प्राथमिक खर्च खातीं असलेले १ हजार रुपये पूर्णपणें काढून टाकण्यांत आले आहेत; ओंध स्टेट बँकेच्या कर्जात आलेली ४½ हजारांची तूट खर्चांत घातली आहे; बुडीत व संशयित फंडांकडे २,२४० रुपये वर्ग केले आहेत व ५५० रुपये थकित व्याज फंडाकडे जमा केले आहेत. हें सर्व करूनहि वर्षअखेर ६,१५७ रुपये निवळ नफा राहिला, त्यांत मागील वर्षांतील ३,०५५ रुपयांचा शिलकी नफा मिळवून नफा वाटणीसाठी ९,२१२ रुपये राहिले त्यांतून ४% डिव्हिडंडसाठी ५,३९५ रुपयांचा विनियोग बोर्डानें सुचविला आहे. रिझर्व्ह फंडांत १,८६५ रुपयांची भर पडेल व १,३६६ रुपये पुढील वर्षाच्या हिशेबांत ओढले जातील. अहवालाचे साली कंपनीनें केलेली प्रगति समाधानकारक आहे व वाढत्या-खेळत्या भांडवलावरोबर तिचा नफाहि वाढत जाईल हें उघड आहे. कंपनीचे ६ लक्ष रुपये रोख, बँकांत व सरकारी रोख्यांत आणि शेअर्समध्यें तरते आहेत आणि ह्या उलट कंपनीकडील ११½ लाखांच्या ठेवींपैकी फक्त ३½ लाखांच्या ठेवी सेव्हिंग्ज व करंट खात्यांतील म्हणजे सहज काढतां येण्याजोग्या आहेत, ही गोष्ट ताळेबंदावरून स्पष्ट दिसून येते. कंपनीच्या आटपाडी, बिचूद, कुंडल व ओगलेवाडी ह्या चारहि शाखा फायद्यांत आहेत. संस्थानचें ट्रेझरीचें काम बँकेकडेच चालू आहे. कंपनीचें विमाखातें १९४१ सालीं बंद करण्यांत आलें, परंतु नांवांत फरक करण्याचा राहिला होता. तेव्हां कंपनीचें नांव ह्यापुढें "दि बँक ऑफ ओंध लि." असें असावें, अशी बोर्डाची सूचना मंजूरीसाठी भागीदारांच्या विशेष साधारण सभेंत मांडण्यांत येईल. श्री. श्रीपादराव ओगले हे कंपनीचे अध्यक्ष असून श्री. बा. रा. वर्तक हे जनरल मॅनेजर आहेत. "दि बँक ऑफ ओंध लि." ला आम्हीं सुयश चिंतितों.

स्फुट विचार

रस्त्यांच्या विस्ताराची योजना

शेती, उद्योगधंदे, व्यापार, शैक्षणिक व सांस्कृतिक प्रगति ह्यांच्या उत्तेजनासाठी स्वस्त व सुलाच्या वहातुकीच्या साधनांची आवश्यकता आहे. हिंदुस्थानांत हीं साधनें पुरेशीं व समाधानकारक नाहींत हें सुप्रसिद्ध आहे. रस्त्यांची लांबी वाढवणें व त्यांची सुधारणा करणें ह्या खर्चाच्या गोष्टी आहेत. पण युद्धोत्तर काळांत व्हावयाच्या सुधारणांच्या सामान्य कल्पना आतां आकाशांत उंच भराऱ्या मारूं लागल्याकारणानें शेकडो कोटि रुपयांच्या खर्चाचें कोणासहि विशेष वाटेनासें झालें आहे. युद्धपरिस्थितींत सरकारचा व व्यक्तींचा खर्च एवढा वाढला आहे कीं मोठ्या रकमा लोकांच्या मानसिक सवयीच्या झाल्या आहेत. हिंदी जनतेची उत्पादक शक्ति व प्राप्ति वाढल्यावांचून आणि तिचें कर देण्याचें सामर्थ्य निश्चितपणानें वाढल्यावांचून अवाढव्य खर्चाच्या राष्ट्रीय आर्थिक योजना तिच्या पचनीं पडावयाच्या नाहींत हें येथें लक्षांत ठेवलें पाहिजे. पंधरा वर्षे मुदतीच्या अभिवृद्धीच्या औद्योगिक पुढाऱ्यांनीं तयार केलेल्या योजनेंतहि मोठ्या खर्चाच्या रस्तेविस्ताराला महत्त्वाचें स्थान देण्यांत आलें आहे. ह्या परिस्थितींत हिंदुस्थान सरकारचे मंत्री, सर महमद उस्मान, ह्यांनीं रस्त्यांच्या सुधारणेस लागणाऱ्या साडेचारशे कोटि रुपयांच्या अंदाजानें घाबरून जाण्याचें कारण नाहीं असें बोलून दाखवलें असल्यास त्यांत आश्चर्य नाहीं. गेल्या डिसेंबर महिन्यांत प्रांतिक चीफ इंजिनिअरांची परिषद भरविली होती, तिनें ४५० कोटी रुपये खर्चून चार लक्ष मैल लांबीचे रस्ते बीस वर्षांत पुरे करण्याची योजना निश्चित केली आणि युद्धोत्तर पुनर्घटनेचा विचार करणाऱ्या मध्यवर्ती सरकारच्या दुय्यम समितीनें तिची छाननी केली. ह्या दोहोंचे अभिप्राय सरकारनें आतां लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध केले आहेत. ह्या योजनांचा स्थूलमानाची कल्पना देणें आवश्यक आहे.

रस्तेविस्तारांतील ठळक बाबी

राष्ट्रीय हमरस्ते व त्यांस जोडावयाच्या पुस्त्या, प्रांतिक रस्ते, जिल्हा रस्ते व खेडेगांवी रस्ते असें चतुर्विध वर्गीकरण इंजिनिअरांच्या रिपोर्टांत केलें अहे. युद्धसमाप्तीबरोबर करावयाच्या रस्त्यांच्या दुरुस्त्या आणि मोठ्या प्रमाणावरील रस्त्यांचा विस्तार अशी त्यांची दुहेरी योजना आहे. राष्ट्रीय महत्त्वाचे रस्ते हा सबंद रस्ते विस्ताराचा सांगाडा असून त्यांत बाकीच्या तीन प्रकारांच्या रस्त्यांची मांडणी बसवली जावयाची आहे. राष्ट्रीय हमरस्त्यांचा भांडवली व चालू खर्च मध्यवर्ती सरकारनें करावयाचा असून इतर रस्त्यांच्या खर्चाची जबाबदारी प्रांतिक सरकारावर पडेल. एकूण रस्त्यांपैकीं एक लक्ष सतैचाळीस हजार मैल लांबीच्या रस्त्यांचा पृष्ठभाग लढीसारख्या कठिण द्रव्याचा केला जाईल आणि दोन लक्ष बेपन हजार मैल लांबीचे रस्ते मातीचे असतील. या दोन जातींच्या रस्त्यांची सध्याची लांबी अनुक्रमें ७९ हजार व १,६३,००० मैल अशी आहे. ह्या तुलनात्मक आंकडयांवरून योजलेल्या रस्त्यांच्या विस्ताराची कल्पना येईल. प्रांतिक सरकारांनीं आपापल्या योजना प्रथम स्थूलमानानें तयार करून त्या येत्या ऑगस्ट अखेरपर्यंत मध्यवर्ती सरकारकडे पाठवाव्या आणि तपशीलवार योजना वर्षअखेर तयार व्हाव्या अशी सूचना आहे. सर्व रस्ते सुस्थितींत ठेवण्याचा वार्षिक खर्च सोळा कोटि रुपये येईल असा अंदाज आहे. युद्धाचे अखेरीस सैन्यांतून बेमेरे परत येणाऱ्या लोकांस रस्त्यांच्या बांधणीच्या कामीं रोजगार देतां आल्यानें अशा लोकांच्या बेकारीचा प्रश्न सुटेल. तसेंच, युद्धासाठी उपयोगांत आलेलीं व रिकामीं झालेलीं वेंचें, हत्यारें इत्यादि रस्त्यांच्या कामासाठी वापरणें सोयीचें व अल्पखर्चाचें होईल असें समितीचें म्हणणें आहे. रस्ते बांधून वसविण्यासाठी बराशे खेडे लागतील, त्यांची मागणी एप्रिलपासून केली जावी असें तिनें सुचवलें आहे. रस्त्यांच्या संबंधांत उद्भवणाऱ्या प्रश्नांचा निकाल लावण्यासाठी एक स्वतंत्र बोर्ड स्थापन करण्यांत यावें आणि त्यानें एकसूत्री धोरण, कार्यक्रम व व्यवस्था ह्याविषयींची काळजी घ्यावी अशी समितीची सूचना आहे.

रेलवे-मोटार वहातुक

देशांत चांगल्या रस्त्यांचा विस्तार झाला म्हणजे मोटारींची वहातुक मोठ्या प्रमाणांत वाढणें स्वाभाविक आहे, किंबहुना, खेडेगांवांचा व्यापाराच्या बाजारपेठांशीं निकट संबंध जोडला जाण्यावर आर्थिक प्रगति पुष्कळांशीं अवलंबून राहणार आहे. आतांपर्यंत रेलवेज आणि मोटारी ह्यांची वहातुकीचे बाबतींत स्पर्धा होत आली आहे आणि त्यांच्या हितसंबंधांचा मेळ घालणें अडचणीचें झालें आहे. सरकारी समितीचें असें मत आहे कीं, रेलवेजना करतां न येण्यासारखें वहातुकीचें किती तरी काम मोटारबसेसना करावें लागेल आणि त्यांत स्पर्धेचा प्रश्न उद्भवूं शकत नाहीं.. मोटारवहातुक खेडेगांवी भागांत सर्वत्र संचरली पाहिजे आणि तिनें शेतीच्या मालाची वहातुक करून आर्थिक व सामाजिक प्रगतीस सहाय दिलें पाहिजे. ह्यासाठीं मोटारवहातुकीस उत्तेजन देण्याचा उपक्रम सरकारनें युद्धकाळांतच करावा असें समितीचें सांगणें आहे. ह्या धोरणाच्या योगानें पुढची प्रगति सोपी होईल असें तिचें मत आहे. युद्धांत मोटारी हाकण्याचें काम केलेले हजारों इसम मोकळे होतील, त्यांना ह्या वाढत्या वाहतुकींत काम मिळेल अशी अपेक्षा आहे. थोडक्या अंतरावर व्हावयाच्या शेतीच्या मालाच्या ने-आणीसाठी मोटार वहातुकीस उत्तेजन दिलें जावें आणि लांब पल्ल्याच्या वहातुकीचा धंदा रेलवेजनीं करावा अशी समितीची कल्पना आहे. प्रवाशांच्या वहातुकीचे बाबतींत रेलवेज आणि मोटारी ह्यांचेमध्यें अनिष्ट स्पर्धा होऊं देतां कामा नये. त्यांचीं क्षेत्रें पायाशुद्ध रीतीनें निश्चित केलीं जावीं आणि ह्याविषयींची व्यवस्था प्रत्येक प्रांतानें स्वतःसाठी करावी. तसेंच वहातुकीचें स्वतंत्र असें मध्यवर्ती बजेट असावें आणि हिंदुस्थान सरकार व प्रांतिक सरकारें ह्यांचे भरम्यान मांडवली व इतर खर्चाची प्रमाणशीर वाटणी केली जावी अशी समितीची शिफारस आहे. सबंद हिंदुस्थानासाठी एक रोड बोर्ड स्थापलें जावें आणि विस्ताराच्या योजनेची अंमलबजावणी त्याकडे सोपवण्यांत यावी अशी तिची सूचना आहे. हिंदुस्थान सरकारनें वरील योजना आणि शिफारसी अजून मान्य केलेल्या नाहींत. लोकांकडून त्यांवर सूचना केल्या जातील त्या सरकार विचारांत घेईल आणि नंतर स्वतःचें मत बनवील असें प्रसिद्ध झालें आहे. प्रांतिक सरकारें स्वतःच्या गरजा आणि सांपत्तिक सामर्थ्य ह्यांच्या दृष्टीनें आपापल्या योजना बनवतील त्यांची आणि अखिल भारतीय योजनेची छाननी सबंद राष्ट्रचें हित व व्यवहार्यता ह्यांचे दृष्टिकोनांतून व्हावी लागेल.

बँकांच्या ठेवी व त्यांनीं दिलेलीं कर्जे

हिंदी बँकांच्या ठेवी वाढत चालल्या आहेत, परंतु त्या प्रमाणांत त्यांनीं दिलेलीं कर्जे वाढत नाहींत, हें त्या बँकांच्या व्यवहाराच्या आकड्यांवरून स्पष्टपणें दिसून येतें. १-९-३९ रोजीं शेडयूल्ड बँकांकडे २३७ कोटि रुपयांच्या ठेवी होत्या व त्यांनीं १०५ कोटि रुपयांचीं कर्जे दिलेलीं होतीं. ११-१२-४३ चे तत्सम आकडे ६५८ कोटि रुपयांच्या ठेवी व १६८ कोटि रुपयांचीं कर्जे असे आहेत. म्हणजे, कर्जांचें ठेवींशीं प्रमाण ४४·४२% पडत होतें, तें २५·४७% वर आलें आहे. अर्थात, बँकांच्या रोख शिलकी व सरकारी रोख्यांतील गुंतवणूक वाढली आहे. ग्रेट ब्रिटनमधील बँकांच्या व्यवहाराची परिस्थिति हाच प्रकारची आहे. तेथील बँकांकडील ठेवींची रक्कम १९३८ साली २२७ कोटि पौंड होती, ती १९४३ अखेर ४०० कोटि पौंडांवर गेली आहे. त्यापैकी फक्त १८·४% रकमेचीं कर्जे देण्यांत आलीं आहेत व बाकीचा पैसा मुख्यतः सरकारी रोख्यांत गुंतलेला आहे. लॉइड्स बँकेचे अध्यक्ष, लॉर्ड ब्रॉकिंग्टन, यांनीं ह्या प्रश्नावर विचार व्यक्त करतांना "एका प्रकारें बँकांजवळ कर्जे देण्याचा हा रिझर्व्ह फंडच निर्माण झालेला आहे" असे उद्गार काढले. साधारणतः ठेवींच्या निम्म्या रकमेइतकीं कर्जे बँका देऊं शकतात, या हिशेबानें ब्रिटिश बँका सरकारी रोख्यांतून १२७ कोटि पौंड काढून तेवढ्या रकमेचीं कर्जे देऊं शकतील, असें त्यांचें म्हणणें आहे. अर्थात, युद्ध संपल्यानंतर पुनर्घटनेचें काम पुरें होण्यास बरींच वर्षे लागतील व बँका कडून घेतलेले पैसे किफायतशीर गुंतविण्याची खात्री असल्याविना कर्जे कोणी घेणार नाहींत. हिंदी बँकांजवळहि, १९३९ च्या तुलनेनें, आणखी १०० कोटि रुपयांचीं कर्जे देण्याचा रिझर्व्ह निर्माण झालेला आहे व तो सरकारी रोख्यांत आज गुंतलेला आहे, असें म्हणतां येईल. बँकांनीं सढळ हातानीं कर्जे देणें, म्हणजे तारणाकडे दुर्लक्ष करणें नव्हे, हें उघड आहे. तथापि, बँकांचे अधिकाधिक पैसे कर्जांत गुंतविण्यांत यावयाचे असतील, तर कर्जे देण्याची त्यांची पद्धत अधिक सोपी करावी लागेल व कर्जे देतांना प्रत्यक्ष तारणाइतकेंच महत्त्व कर्ज घेणारांच्या सचोटीस व लायकीस देऊन उद्योन्मुख कर्तबगार लोकांना बँकांनीं वाव द्यावा लागेल. युद्धोत्तर बँकिंगच्या पद्धतींत, संस्थेच्या मजबुतीस बाध न आणतां कर्जदारास अधिकाधिक पैसा कसा उपलब्ध करून देतां येईल, ह्याचा काळजीपूर्वक विचार त्यांना करणें जरूर पडेल.

भारत इंडस्ट्रिअल बँक लि. पुणें

वरील बँकेनें १९४३ सालीं उल्लेखनीय प्रगति केली आहे. बँकेचें सेळतें भांडवल आतां सुमारें १८ लक्ष रुपये झालें आहे. बँकेनें ५½ लक्ष रुपयांचीं कर्जे दिलेलीं आहेत व तिचे सरकारी रोख्यांत ६ लक्ष, ६१ रुपये आहेत. १९४३ सालीं बँकेस निवळ नफा १५ हजार रुपये झाला, त्यांत रोख्यांच्या विक्रींतील नफ्याचे ८ हजार रुपये आहेत. नफ्यापैकीं ३,०२५ रुपये रिझर्व्ह फंडांत टाकून, ४ हजारांचा प्राथमिक खर्च बँकेनें जिंदगीच्या बाजूकडून काढून टाकला आहे. ऑर्गनायझेशन खर्चाची बाब ३ हजारांनीं कमी करून टाकण्यांत आली आहे. क्यु. पे. भागांस ६% व ऑर्डिनरी भागांस ४% डिव्हिडंड मिळालें. पुणें कॅन्टोन्मेंट व बारामती येथें शाखा व खोपोली (जि. कुलाबा) येथें पे ऑफिस उघडण्यांत आलें आहे व त्या सर्वांचें काम समाधानकारक चालू आहे.

जिकडे तिकडे प्रशंसा

इमिटेशन दागिन्यांवर रासायनिक क्रिया करून खऱ्या सोन्याचा पत्रा चढविला जातो त्यामुळें दागिना केव्हांही खराब होत नाहीं, ही पूर्ण खात्री झाली. सोन्याचा पत्रा चढविलेल्या चार वांगड्या कि. आठ रु. गरजेस्तव दागिना परत करणें झाल्यास वर चढविलेल्या सोन्याचे सर्वच्या सर्व पैसे परत देऊं.

मट कं. सांगली, S. M. C.
मट कंपनी शाखा—बुधवार पेठ, पुणें २.

मलेरियावरील क्रांतिकारक हिंदी शोध

मागोरा पिल्स

अवघ्या ४ दिवसांत मलेरिया थांबतो.

१६ गोळ्यांच्या डबीस रु. १·

— १०० गोळ्यांचें पॅकिंगही मिळतें. —

मागोरा केमिकल कं. लि.
टिळक रोड, पुणें २.

पुण्यांतील
आदर्श निवासस्थान व भोजनालय
छाया लॉजिंग व बोर्डिंग हाउस
बुधवार चौक, पुणें २.

सध्यांच्या टंचाईच्या काळांत जीवनद्रव्यें कमी पडतात.
जीवनद्रव्यांनीं (Vitamins) युक्त असे
(सप्लाय खात्यानें मान्यता दिलेले)
टोमॅटो केचप (गोड) व
टोमॅटो सॉस [तिखट व आंबट]
आजच मागवा व जीवनद्रव्यांची वाटणारी
उणीव भरून काढा.
रुरल प्रॉडक्टस कंपनी लि. पुणें
बिझिनेस ऑफिस: ९१३ अ सदाशिव, पुणें २.

ऑस्ट्रेलियापुढील लोकसंख्येचा प्रश्न.

ऑस्ट्रेलियाची लोकसंख्या त्या देशाच्या विस्ताराचे मानानें अत्यल्प आहे व युद्धांत बरेच ऑस्ट्रेलियन लोक कामास येतील, ह्या दृष्टीनें लोकसंख्येचा प्रश्न तेथें युद्धानंतर अधिकच अवघड होऊन बसणार आहे. गेल्या पन्नास वर्षांत ऑस्ट्रेलियांतील जननाचें प्रमाण सुमारें ५०% उतरलें आहे. १९११ मध्यें ऑस्ट्रेलियन कुटुंबांत सरासरीनें ३·३ मंडळी असत; १९४० चा तत्सम आकडा २·४ होता. ह्या कुटुंबाच्या आकारानें लोकसंख्येंत फारशी वाढ होणें अशक्य आहे. ऑस्ट्रेलियांत २ ते ३ कोटि लोकांस, सध्यांच्या रहाणीच्या दर्जानें सुद्धां, सहज रहातां येईल, असें तज्ञांचें मत आहे. पश्चिम ऑस्ट्रेलिया, दक्षिण ऑस्ट्रेलिया व उत्तर ऑस्ट्रेलिया मिळून हिंदुस्थाना एवढा मुलूख होतो परंतु त्यांतील लोकसंख्या १० लाखांपेक्षां अधिक नाहीं ! बाकीच्या ऑस्ट्रेलियांत ६० लोखांची वस्ती आहे. ऑस्ट्रेलियाच्या आत्मरक्षणासाठी निदान २ कोटि लोकसंख्येची आवश्यकता आहे, असें त्या देशाचे मुख्य प्रधान, मि. कर्टिन, हें सांगतात. बाहेरून रहिवासी आकर्षून केवळ ही वाढ होणार नाहीं. प्रत्यक्ष ग्रेटब्रिटनमधूनहि फारसे लोक ऑस्ट्रेलियांत स्थाइक होण्यासाठी जाऊं शकतील, अशी ग्रेट ब्रिटनमधील प्रजावृद्धीची परिस्थिति नाहीं. ज्यांचे वडील युद्धांत अथवा बाँब हल्ल्यांत मरण पावले, अशा मुलांना ऑस्ट्रेलियांत पाठविल्यास सर्वांचीच सोय होणार आहे, असें सुचविण्यांत येत आहे. युरोपांतूनहि कांहीं लोक ऑस्ट्रेलियांत जाण्यास तयार होतील. कित्येक अमेरिकन लोकांस ऑस्ट्रेलिया उद्योगधंद्यासाठी पसंत पडण्याचा संभव आहे व तेथें अमेरिकन भांडवलाच्या गुंतवणुकीस मोठा वाव आहे. सहाजिकच, सध्याच्या मुख्यतः ब्रिटिश रक्ताच्या ऑस्ट्रेलियांत त्यामुळें बिगर-ब्रिटिश रक्तांच्या लोकांस वाव मिळेल, परंतु लोकसंख्या वाढविण्यासाठी बाहेरील योग्य लोकांना आकर्षण्यावाचून त्या देशास गत्यंतर नाहीं. ब्रिटिश, अमेरिकन, स्कँडिनेव्हिअन व बाल्कन्समधील लोक ह्यामधूनच ऑस्ट्रेलिया आपल्या पाहुण्यांची निवड करील; हिंदी लोकांना तेथें जागा नाहीं, हें उघड आहे.

मध्यप्रांत-वऱ्हाडांत उद्योगधंद्यांच्या वाढीस वाव

मध्यप्रांत व वऱ्हाडमध्यें कापसाच्या एकूण १० गिरण्या आहेत, त्यांत ६,०७७ माग व ३,३६,४०२ चात्या आहेत. गिरणी कामगारांची संख्या सुमारें २४ हजार आहे, परंतु सध्या रात्रपाळी चालू असल्यामुळें ती जवळ जवळ दुप्पट झाली आहे. मध्यप्रांत वऱ्हाडांतून दरसाल २५ लक्ष मण कपास निर्गत होते, तेव्हां त्या प्रांतांत आणखी गिरण्या निघण्यास सहज वाव आहे. नागपूर येथील एम्प्रेस मिल सुप्रसिद्धच आहे. कपाशीच्या जिनिंग व प्रेसिंग फॅक्टरींत २५½ हजार लोकांना काम आहे. तेलाच्या गिरण्यांची संख्या ४७ असून त्यांत १,८०० काममार आहेत. कटणी, मेहगांव व किमोर येथें सिमेंटचे कारखाने आहेत त्यांतील फक्त शेवटच्या ठिकाणचाच कारखाना चालू आहे. गोंदिया व जबलपूर येथें प्रत्येकीं एक आणि नागपूर येथें दोन असे काचकारखाने आहेत. जबलपूर गनकॅरेज फॅक्टरीस सध्यां युद्धामुळें महत्त्व प्राप्त झालें झालें आहे. मध्यप्रांत-वऱ्हाड ह्यांत नैसर्गिक संपत्तीची विपुलता आहे. विशेषतः त्या प्रांतांतील लोखंड, मॅंगनीज, बक्साइट, ह्यांच्या उत्खननास पुष्कळ वाव आहे. बुलढाणा जिल्ह्यांतील लोणार तलावांच्या पाण्यांत सोडियम कार्बोनेट आढळतो त्यापासून सोडा ॲशचें उत्पादन किफायतशीर रीतीनें करतां येण्याजोगें आहे.

हिंदुस्थानांत आयुर्विम्यास प्रारंभ

हिंदुस्थानांतील मुख्यतः युरोपियन रहिवाशांचे विमे उतरण्यासाठी ब्रिटिश विमा कंपन्यांनीं १९ व्या शतकाच्या मध्याचे सुमारास हिंदुस्थानांत शाखा स्थापन केल्या. ओरिएंटल विमा कंपनीची स्थापना १८१८ सालीं कलकत्ता येथें झाली (मुंबईची सुप्रसिद्ध ओरिएंटल विमा कंपनी ही नव्हे) परंतु १८३४ मध्यें ती बुडाली. मद्रास इक्विटेबल इं. कंपनीची १८२९ सालीं स्थापना झाली; ही पहिली खरीखुरी हिंदी विमा कंपनी होय. ती गेल्या महायुद्धानंतर लवकरच बुडाली. स्टँडर्ड लाइफ ॲशुअरन्स कंपनी ऑफ एडिंबरोनें १८४६ मध्यें हिंदी क्षेत्रांत प्रवेश करून आयुर्विम्याचें काम मिळविण्यास प्रारंभ केला. तिचे मागोमाग इतरहि ब्रिटिश व विदेशी कंपन्या आल्या. गेल्या शतकाचे अखेरीस कांहीं हिंदी कंपन्या अस्तित्वांत आल्या परंतु त्यांच्या संख्येंत खरी वाढ चालू शतकाचे प्रारंभींच झाली. श्री. ए. वैद्यनाथन ह्यांनीं वरील माहिती " इंडियन पॉलिसी होल्डर " मधील आपल्या लेखांत दिली आहे.

युद्धोत्तर शिक्षणाची योजना

हिंदुस्थानांतील युद्धोत्तर शिक्षणप्रगतीची आपली योजना सेंट्रल ॲडव्हायसरी बोर्डानें व्हाइसरॉयच्या कार्यकारी मंडळाच्या पुनर्घटना समितीस सादर केली आहे, ती मुख्यतः सरकारचे शिक्षणतज्ञ, मि. जॉन सार्जंट, ह्यांच्या खर्ड्यावरच आधारलेली आहे. हिंदुस्थानांतील सर्व मुलांना किमान कांहींतरी शिक्षण मिळावें व लायक विद्यार्थ्यांस हायस्कुलें व कॉलेजें ह्यांत प्रवेश मिळावा, व्यावसायिक शिक्षणाची इतर शिक्षणाचे बरोबरीनें व्यवस्था व्हावी, शिक्षकांच्या शिक्षणाचीहि सोय असावी, सहा ते चौदा वर्षांपर्यंत शिक्षण सक्तीचें असावें, प्राथमिक व मिडल स्कूल शिक्षणास फी आकारण्यांत येऊं नये, हायस्कुलांत फक्त निवडक मुलांसच प्रवेश मिळावा, शिक्षकांचा दर्जा सुधारण्यांत यावा, ही सर्व योजना ४० वर्षांत पुरी करावी, ४० वर्षांनंतर शिक्षणाच्या वार्षिक खर्चांत ३१२ कोटि रुपयांची भर पडेल तोंपर्यंत हा खर्च दरसाल हळुहळु वाढत जावा, इत्यादि सूचना ॲडव्हायसरी बोर्डानें केलेल्या आहेत.

मलेरिया-जपान व अमेरिका ह्या दोघांचाहि शत्रू

पॅसिफिक महासागरांतील बेटांमधील मलेरियाशी टक्कर देणें जपानचा पराभव करण्यापेक्षाहि बिकट आहे, असा अमेरिकेला अनुभव येत आहे. मलेरियाप्रतिबंधक सर्व इलाज हाताशी असूनहि मलेरिया हटविणें कठीण जात आहे. तेथें दररोजच पाऊस पडून डबकीं साठतात व डोक्याइतकें उंच गवत वाढतें, त्यावर मलेरियाचे डास फोफावतात. अशा प्रकारच्या मुलुखांतच सैन्यास सर्व हालचाली कराव्या लागतात. ॲटब्रीननें मलेरिया घालवितां येईल ही अपेक्षा आतां खोटी ठरली आहे. लष्करी डॉक्टर मलेरियाचा प्रतिबंध कसा करतां येईल ह्यासंबंधीं संशोधन करीत आहेत. मलेरियाचा त्रास फक्त अमेरिकन सैनिकांनांच होतो, असें नाहीं; जपानी सैनिकहि मलेरियास बळी पडत आहेत. पकडलेल्या जपानी युद्धकैद्यांस तपासलें तर ते पूर्वी मलेरियानें पछाडलेले असल्याचेंच आढळून येतें. अमेरिका व जपान ह्यांचे एकमेकांवरील डावपेच युद्ध लवकर संपविण्यास जेवढ्या प्रमाणावर कारणीभूत होतील, तेवढ्याच प्रमाणावर मलेरियाचा यशस्वी प्रतिकारहि कारणीभूत होईल, असें सांगण्यांत येतें.

मानापमान—स्वयंवर

संयुक्त प्रयोग !

नाहीं मी बोलत—

आतांपासून तो थेट खडा मारायचा झाला तर...
पर्यंतचे रुसव्या—फुगव्याचे—लटक्या अबोल्याचे
हसी—खुषीचे—लडीवाळपणाचे
अभिनय कौशल्याचे सारे सारे प्रकार ह्या पनघटावरील
प्रेमपुतळींत आढळतात !

७ वा आठवडा !

प्रकाश पिक्चर्सचा प्रेक्षणीय बोलपट — एव्हरग्रीन रिलीज—

पनघट

भूमिका :—रत्नमाला, उमाकांत, जीवन

ग्लोब पुणें— रोज ६॥। व १० वा.

शनि. रवि, सोम. दु. ३॥ वाजतां जादा खेळ.

गेल्या शनिवारीं

" राम-कृष्ण " भेट !

" श्रीकृष्ण " मंदिरांत
श्रीरामचंद्र प्रभु अवतरले !

प्रकाशाचा प्रेक्षणीय मराठी बोलपट

रा म रा ज्य

दिग्दर्शकः—विजय भट्ट
भूमिकाः शोभना समर्थ, चंद्रकांत, काळे, सोहनी

श्रीकृष्ण, पुणें दररोज ३ खेळ ३—६ व १० वा.

२१ वा आठवडा !

खास लोकाग्रहास्तव

आणखी एक आठवडा वाढला !

१४ वा आठवडा !

रॉयल रत्न १८ वें

महात्मा विदुर

भू.—कै. विष्णुपंत पागनीस, दुर्गा खोटे
नायमपल्ली, मनोहर घटवाई, प्रल्हाद

आर्यन, पुणें दररोज तीन खेळ ३।, ६॥ व १० वाजतां

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व
रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' भांबुर्डा, घ. नं. ९२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.

खालील व्यवस्थेवर चौकशी करावी.

व्यवस्थापक, अर्थ.
'दुर्गाविलास' पुणें ४.

अर्थ

वर्गणीचे दर.

वार्षिक वर्गणी
रु. ४
(टपाल खेरीज माफ)
किरकोळ अंकास
दोन आणे.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष १० पुणें, बुधवार, तारीख २९ मार्च, १९४४ अंक १३

★ नगर बॉंबे ट्रेडिंग कंपनी ★

चिनाब, लाइम ज्यूस कॉर्डीअल, ऑरेंज व लेमन स्क्वॉश, टोमॅटो सॉस,
मँगो जॅम, मध, कोको, बेकिंग पावडर, सॅनिटरी टॉवेल्स,
दुध पेस्ट, दुध ब्रश, वगैरे मालाचे
स्टॉकिस्ट.

शाखा:—
माणिक चौक, अहमदनगर

हेड ऑफिस:—
पूना गेस्ट हाऊस, पुणें २

महाराष्ट्रांत लेखी गॅरंटी देणारे
पहिले व फक्त १ च
गोल्ड् मेडॅलिस्ट् व मराठी वळणाचे स्पेशॅलिस्ट्
पेन्टर बेडेकर, ए. जी.,
बुधवार चौक, पुणें २ (सिटी)
बाहेरगांवचीं कामें रेल्वे, मोटार अगर पोस्टानें पाठवूं.

जिकडे तिकडे प्रशंसा
इमिटेशन दागिन्यांवर रासायनिक क्रिया करून सन्या सोन्याचा पत्रा चढविला जातो त्यामुळें दागिना कध्धींही खराब होत नाही, ही पूर्ण खात्री झाली. सोन्याचा पत्रा चढविलेल्या चार बांगड्या कि. आठ रु. सरजेस्तव दागिना परत करणें झाल्यास वर चढविलेल्या सोन्याचे सर्वस्वी सर्व पैसे परत देऊं.
भट कं. सांगली, S. M. C.
भट कंपनी शाखा—बुधवार पेठ, पुणें २.

पुना गेस्ट हाऊस
१००, लक्ष्मी रोड, पुणें २.

Telephone 779

TELEGRAM Guest House Poona 2.

स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

गिरगांव मुंबई नं. ४

महिंद्रकर ब्रदर्स
तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

प्रगतिपथावर—

नवीन काम

१९४२ – रु. २२,९३,५८३

१९४३ – रु. ३९,२५,०००

नवीन कामांत ७०% वाढ

एकंदर चालू विमे

रु. १,५५,००,०००

हप्त्यांचें उत्पन्न

रु. ९,४०,००० वर

धि वॉम्बे कोऑपरेटिव्ह इन्शुअरन्स सोसायटी लि.

अध्यक्षः—शेठ माधवलाल मकनजी भट्ट, जे. पी.

मॅनेजरः—श्री. जी. एच. ठाकोर, एम. ए. (कँटाब.)

मुख्य कचेरीः—को-ऑपरेटिव्ह इन्शुअरन्स बिल्डिंग, सर फिरोजशाह मेहता रोड, कोट, मुंबई

महाराष्ट्र व कर्णाटकचे चीफ ऑर्गनायझर्सः

मेसर्स कुळकर्णी आणि कं., मुंबई

विविध माहिती

हुंडा घेणें गुन्हा, परंतु देणें हा गुन्हा नाहीं

हुंड्याच्या पद्धतीस आळा घालण्यासाठी सिंध सरकारनें एक कायदा केला आहे, त्या अन्वयें हुंडा घेणें बेकायदा ठरविण्यांत आलें आहे. विवाहापूर्वी ३ वर्षे किंवा त्यानंतर ३ वर्षे पर्यंत वधूच्या पक्षाकडून बक्षीस स्वीकारणें हा त्यामुळें गुन्हा ठरत आहे. हुंडा देणें हा मात्र गुन्हा नाहीं.

पोलसन लि., मुंबई

वरील कंपनीनें आपला सुवर्णमहोत्सव नुकताच साजरा केला.

ब्रिटिश सैनिकांची पगारवाढ

ग्रेट ब्रिटनच्या सैनिकांचा पगार वाढवून तो अमेरिकन व ब्रिटिश साम्राज्यांतर्गत इतर देशांच्या सैनिकांच्या पगाराचे बरोबर करावा, अशी मागणी पार्लमेंटांत करण्यांत आली. ही मागणी सरकारनें मान्य केल्यास वार्षिक ४० कोटि पौंडांची तरतूद करावी लागेल व त्यासाठी भरमसट चलनवृद्धी करण्याची पाळी येईल, असें युद्धमंत्री म्हणाले. तथापि; ह्या प्रश्नाचा विचार करण्याचें आश्वासन सभागृहाचे नेते, मि. ईडन, ह्यांनीं दिलें.

बंगालमधील १९४३ मधील मृत्यु

बंगालमध्यें १९४३ सालीं एकूण १८ लक्ष, ७४ हजार मृत्यू घडून आले. त्या पूर्वीच्या पांच वर्षांच्या सरासरीचे मानानें हा आंकडा ५८% नें मोठा आहे. म्हणजे सरासरीपेक्षा ६ लक्ष, ८९ हजार मृत्यू जास्त झाले.

युद्ध सपत्नाची प्रगति

मुंबई प्रांतांतील मध्य भागांतील जानेवारी, १९४४ मधील आंकडेः—

जिल्हा	युद्धकंड रु.	रेडक्रॉस फंड रु.	डिफेन्स सर्टिफिकिटें	३% युद्ध कर्जरोखे रु.	बिन व्याजाचे रोखे
नगर	...	१६	...	४००	...
पू. खानदेश	५२	४	...	१०,०००	...
प. खानदेश	२०१	७,६००	...	...	...
नाशिक	११	१,९४,४०९	...	...	...
पुणें	१०९	३१	...	२१,०००	...
सातारा	१०८	६,११८	...	...	...
सोलापूर	३४	३२	...	५००	...

युद्धमंडळावर काश्मीरचे महाराज

हिंदुस्थानाचे प्रतिनिधि म्हणून सर फिरोझखान नून ह्यांचे बरोबर युद्धमंडळावर काम करण्यास येण्याबद्दल विनंति व्हाइसरॉयांनीं काश्मीरच्या महाराजांस केली, ती त्यांनीं मान्य केली आहे.

अमेरिकेचा आशिया खंडाशीं व्यापार वाढणार

येत्या शतकांत आंतरराष्ट्रीय व्यापाराचे दृष्टीनें रशिया, आशिया व दक्षिण अमेरिका हे प्रदेश फार महत्त्वाचे होतील. रशिया व आशिया ह्यांतील लोकसंख्या जगाच्या लोकसंख्येच्या निम्मी भरेल. अमेरिकन मालाची वहातुक मुख्यतः अटलांटिक महासागरं ओलांडूनच आतांपर्यंत होत असे; ह्यापुढें पॅसिफिक महासागरास महत्त्व येणार. अमेरिकेचे व्हाइस प्रेसिडेंट, मि. वॅलेस, ह्यांचेंच असें म्हणणें आहे.

अमेरिकेचें विमानांचें उत्पादन

अमेरिकेंत आतां दररोज ३५० विमानांचें उत्पादन होऊं लागलें आहे.

ट्रॅक्टर्सची आयात

हिंदुस्थान सरकारनें अमेरिकेकडून १०० ट्रॅक्टर्स मागविले आहेत, त्यांपैकीं ४ ट्रॅक्टर्स मद्रास सरकार घेणार आहे.

रेशनिंगच्या योजनेंत २½ कोटि लोकांचा समावेश

हिंदुस्थानांत सध्या १३३ शहरांत रेशनिंग सुरू आहे व २½ कोटि लोक आतां प्रमाणित वाटचाच्या योजनेप्रमाणें अन्न खात आहेत.

ब्रह्मदेशांतील तांदळाचा धंदा

ब्रह्मदेशांतील तांदुळाच्या धंद्याचें पुनः बस्तान बसविण्याची योजना आंखण्याचें काम ब्रह्मदेशाच्या सरकारनें नेमलेली एक कमिटी सिमला येथें करीत आहे.

अमेरिका-हिंदुस्थान वैमानिक वहातुक

अमेरिका व हिंदुस्थान ह्यांचेमध्यें वक्तशीर वैमानिक वहातुक १६ नोव्हेंबर १९४३ पासून सुरू आहे. येण्या-जाण्याचें २८ हजार मैलांचें अंतर तोडण्यास ८ दिवस पुरतात व दर आठवड्यास अशा कित्येक सफरी होतात. विमानांच्या मुख्य मार्गासारख्या अत्यंत जरूरीच्या मोठ्ठी विमानांतून हिंदुस्थानांत येतात व परत जातांना तीं विमानें जखमी अमेरिकन सैनिक व सल्लामसलतीसाठी अमेरिकेस जाणारे लष्करी अधिकारी ह्यांना घेऊन जातात.

अनुक्रमणिका

	पृष्ठ		पृष्ठ
१ विविध माहिती ...	९८	६ के. रामदास पंटलु	१०२
२ शेतकरी कर्ज विमोचन	९९	७ मातार्चे पीक ...	१०२
३ पिकांवरील कर्जाची सहकारी व्यवस्था ...	९९	८ पुणें सें. बँक ...	१०३
४ कागद करण्याचा यामोयोग	१००	९ डे. जि. को. के. सोसायटी	१०३
५ स्फुट विचार ...	१०१	१० पेटबिटनमधलि येण्याचीं वस्तुली	१०३
धान्य खरेदी-वाटणीची योजना-धान्य चतुःसूत्रीची अंमलबजावणी — जर्मन सुधारणा योजना कायद्यांत दुरुस्ती.		११ कपाशीच्या स. वि. सोसायट्या	१०३
		१२ अ. भा. चरखा संघ	१०४

अर्थ

बुधवार, ता. २९ मार्च, १९४४

शेतकरी कर्ज–विमोचन

ह्या प्रांतांतील शेतकऱ्यांच्या डोक्यावर चढलेल्या कर्जाचा बोजा हलका करून त्यांस आपल्या पोटाचा धंदा किफायतशीरपणानें चालवतां यावा ह्या हेतूनें मुंबई सरकारानें केलेला कायदा कांहीं निवडक तालुक्यांत प्रयोगादाखल अंमलांत आणण्यांत आला आहे. कर्जफेडीच्या शेतकऱ्यांच्या सामर्थ्याचे मर्यादेंत त्यांचें देणें आणावयाचें आणि ह्या हलक्या केलेल्या कर्जाची फेड हप्तेबंदीनें होण्याची व्यवस्था करणें हें त्या कायद्याचें मुख्य कार्य आहे. न्यायदानाचा अनुभव असलेल्या लोकांकडून कर्जाची व ऋणकोंच्या पात्रतेची खातरजमा केली जाते आणि अखेरचा निर्णय दिला जातो. कांहीं काळाच्या अवधींत कर्ज-विमोचन कायद्याच्या अंमलबजावणीचा आलेला अनुभव लक्षांत घेऊन त्यामध्यें इष्ट वाटणाऱ्या दुरुस्त्या करणें आणि तो प्रांताच्या इतर भागांत लागू करणें हे प्रश्न सरकारापुढें होते. कायद्याच्या आतांपर्यंतच्या अनुभवाची व अडचणींची चौकशी सरकारनें दोन तज्ज्ञांकडून करून घेतली आणि त्यांच्या सूचनांस अनुसरून कायद्यांत विशिष्ट दुरुस्त्या करावयाचें ठरवलें. ह्या दुरुस्त्यांचा विचार एका खास समितीनें केला आणि त्यासंबंधींतला आपला अभिप्राय व्यक्त केला. त्यानंतर हें सर्व प्रकरण प्रांतिक रूरल डेव्हलपमेंट बोर्डापुढें नुकत्याच भरलेल्या सभेंत त्याचें मत अजमावण्यासाठीं सरकारनें मांडलें. युद्ध परिस्थितींत शेतीच्या मालाच्या किंमती चढल्या आहेत त्यांचा फायदा शेतकऱ्यांस मिळावा ह्या उद्देशानें प्रचलित कायद्यांत कांहीं बदल सुचवण्यांत आले आहेत. त्यांमध्यें, कमी करण्यांत येणाऱ्या कर्जाच्या रकमेची फेड ज्या हप्त्यांनीं व्हावयाची त्यांची संख्या मर्यादित केली जावी अशी एक सूचना आहे. आपलें देणें जितक्या लवकर देऊन टाकतां येईल तितक्या लवकर शेतकऱ्यांस तें फेडतां यावें आणि शेतमालाच्या अनुकूल भावाचा त्यांस ह्या कामीं पूर्ण फायदा घेतां यावा हा सदरहू सूचनेचा हेतु आहे. कर्जदारास आपलें देणें सोयीनें व सुखानें देतां यावें ह्यासाठी हप्तेबंदी असते, पण कमी हप्त्यांत हें त्यास करतां आलें तर कर्जविमोचन लवकर होतें ही गोष्ट इष्ट आहे. तथापि, कमी हप्ते म्हणजे प्रत्येक हप्ता मोठ्या रकमेचा आणि शेतमालाच्या किंमती चांगल्या येतील तोंवरच ही रक्कम सोयीनें देण्याची शक्यता, हें उघड आहे. दोनचार वर्षांत परिस्थिति-चक्राच्या फेऱ्यांत बाजारभाव उतरल्यास मोठे हप्ते डोईजड वाटल्यावांचून रहावयाचे नाहींत, ह्या दृष्टीनें प्रसंग आल्यास हप्तेबंदीची मुदत वाढवण्याचा अधिकार सरकारला कायद्यानें द्यावा अशी सूचना रूरल बोर्डाच्या सभेंत करण्यांत आली ती योग्य आहे. कर्ज-विमोचनाच्या कायद्याची अंमलबजावणी प्रांताच्या सर्व भागांस लागू करण्यांत घेण्याचें महत्त्वहि सरकारच्या ध्यानांत येईल अशी आशा आहे.

शेतकरी वर्गाच्या ऋणमुक्ततेच्या संबंधांत, ज्यांचीं कर्जे ऐपतीच्या आटोक्यांत आणलीं जातील अशा शेतकऱ्यांस पिकें काढण्यासाठी लागणाऱ्या सेळत्या भांडवलाचा पुरवठा होण्याबाबतचा प्रश्न उभा रहातो. जुन्या कर्जाचा हप्ता आणि नवीन घेतलेलें पिकाच्या तारणावरचें सेळत्या भांडवलाचें कर्ज यांची फेड वार्षिक पिकाच्या उत्पन्नामधून व्हावयाची असते. सेळतें भांडवल देणारी संस्था किंवा व्यक्ती हिचा अग्रहक्क वार्षिक पिकावर असतो आणि त्याची वासलात लावण्याच्या शेतकऱ्याच्या स्वातंत्र्यावर धनकोच्या हितसंरक्षणार्थ कायदेशीर निर्बंध घालण्यांत आले आहेत. पिकाच्या तारणावरील चालू भांडवलाचें कर्ज शेतकऱ्यांस बेताच्या व्याजानें मिळालें नाहीं तर शेतीचा धंदा चालण्याचे मार्गांत व्यत्यय येऊन कर्जमुक्ततेचा कायदा विफल होईल. ह्याकरितां शेतीच्या चालू खर्चासाठी शेतकऱ्यांस कर्ज मिळण्याचें खास महत्त्व आहे. सहकारी संस्थांनीं पिकाच्या तारणावर ऋणमुक्त झालेल्या शेतकऱ्यांस कर्ज देण्याचें काम स्वतःकडे घ्यावें, अशी इच्छा मुंबई सरकारच्या जबाबदार मंत्र्यांनीं व अधिकाऱ्यांनीं अनेक वेळां व्यक्त केलेली आहे. सहकारी संस्थांनींहि शेतकऱ्यांस कर्जे देऊन त्यांस सहाय करण्याची कामगिरी आपले क्षेत्रांत पडत असल्यानें ती उचलण्याची तयारी दर्शविली आहे.

पिकांवरील कर्जाची सहकारी व्यवस्था

कर्जनिवारण आणि कर्जफेडीची सोयीची हप्तेबंदी ह्यांची व्यवस्था लागल्यावर शेतकरी पुन्हां कर्जबाजारीपणाच्या खड्ड्यांत आणि सावकारांच्या जाळ्यांत सांपडूं नयेत ह्यासाठी सरकारनें सावकारी नियंत्रणाचा कायदा तात्काळ करावा असें रूरल बोर्डानें सुचवलें आहे. बहुतेक सर्व प्रांतांत अशा प्रकारचे कायदे आतां अमलांत आहेत. मुंबईमध्यें सावकारी नियमनाच्या कायद्याचा मसुदा विधिमंडळापुढें मांडण्यापर्यंत प्रांतिक सरकारची मजल गेली होती, पण त्याची प्रगति तेथेंच कुंठित झाली. तें प्रकरण सरकारनें पुन्हां हातीं घेणें कर्जनिवारण कायद्याच्या यशस्वीपणाच्या दृष्टीनें अगत्याचें आहे ह्यांत मुळींच संशय नाहीं. सहकारी पद्धतीनें कर्जे दिलीं गेलीं आणि वसूल केलीं गेलीं असतां शेतकऱ्यांच्या हितसंबंधांचें योग्य रक्षण होऊन तो वर्ग शिक्षित, कार्यक्षम व स्वावलंबी होऊं शकतो. ह्यासाठीं कर्जनिवारणाच्या कायद्यास अनुसरून ज्यांस हप्तेबंदी मिळेल अशा शेतकऱ्यांस लागणारें चालू भांडवलाची आणि त्यांच्या मालाच्या विक्रीची व्यवस्था सहकारी संस्थांच्या मार्फत होणें इष्ट आहे.

अशा हजारों शेतकऱ्यांची सोय आतां करावी लागणार आहे आणि त्यासंबंधांतली सर्व तयारी सहकारी संस्थांनीं केली पाहिजे. हें मोठ्या जबाबदारीचें आणि प्रचंड कार्य आहे आणि तें पतपेढ्या व मध्यवर्ती बँका यांनीं केलें पाहिजे. सहकारी बँकांच्या असोसिएशनच्या सभेनें चालू महिन्याचे प्रारंभीं त्या प्रश्नाची रजिस्ट्रारांच्या समवेत विस्तृत चर्चा केली. हलक्या व्याजाच्या दरानें बँकांनीं पतपेढ्यांस "पीक कर्जे" द्यावीं आणि त्या सवलतीचा फायदा सोसायट्यांनीं स्वतःच्या सभासदांस यावा याविषयीं एकमत सभेंत झालें. तथापि कर्जे देण्याच्या व्यवहारांचा विस्तार होईल तेव्हां बँकांस अधिक सेल्टें मांडवळ ठेवण्याचा संभव आहे आणि परिस्थिति पुढें-मागें प्रतिकूल झाल्यास त्यांत नुकसानहि येईल. मांडवळ-पुरवठा व अंशतः नुकसानभरपाई यांचे बाबतींत बँकांस सरकारनें सहाय्य देणें योग्य व आवश्यक आहे. तसेंच, कर्जदार सभासदांच्या मालाची "विक्री सोसायट्यांस करतां यावी म्हणूनहि त्यांस सरकारचें सहाय्य लागेल. एका बाजूनें कर्जावरील व्याजाचा दर कमी करणें आणि दुसऱ्या बाजूनें देखरेख व मालविक्री यांचेसंबंधांत अधिक खर्च करणें या दुहेरी ताणाच्या तडाख्यांत बँका सांपडतील. तेव्हां, आपले व्यवहार त्यांस सुरळीत रीतीनें चालवतां यावे म्हणून सरकारच्या मदतीची विशेष आवश्यकता असल्याचें बँकस असोसिएशननें स्पष्ट केलें आहे. सहकारी संघटनेचा पद्धतशीर विस्तार आणि शेतकरी वर्गाच्या आर्थिक स्थितींत सुधारणा होण्याचें अगत्य या दोन्हीं दृष्टींनीं सरकारनें सहकारी बँका व सोसायट्या यांस आवश्यक असलेलें सर्व प्रकारचें सहाय दिलें पाहिजे. युद्धोत्तर आर्थिक पुनर्घटनेमध्यें सहकारी संस्थांस अग्रतेचें स्थान दिलें जाणें योग्य व अपरिहार्य आहे. खेडेगांवांच्या सुधारणेवर मनुष्यबळ आणि द्रव्यबळ मोठ्या प्रमाणांत यापुढें खर्चावें लागणार आहे आणि सहकार व सरकार यांचें हार्दिक परस्पर सहाय होईल तर मोठा कार्यभाग घडून येणार आहे. मुंबई सरकार प्रस्तुत प्रश्नाकडे व्यावहारिक सहानुभूतीनें पहात आहे असें समजतें आणि ती फलद्रूप होऊन शेतीच्या सहकारी संघटनाचें पाऊल जोरानें पुढें पडेल अशी आशा व्यक्त करण्यास हरकत नाही.

श्री. आपटे यांची अभिनंदनीय निवडणूक

रूरल प्रॉडक्टस कं. लि. चे मॅनेजिंग डायरेक्टर, श्री. न. मं. आपटे, बी. एजी., एम. एस. सी., यांची इंपीरिअल कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चरल रिसर्चच्या गव्हर्निंग बोर्डावर फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स ॲन्ड इंडस्ट्रीजतर्फे पुढील तीन वर्षांकरितां ४६ पैकी २६ मतें मिळून नुकतीच फेरनिवडणूक झाली. श्री. आपटे यांनीं गेल्या तीन वर्षांत गव्हर्निंग बोर्डात केलेली कामगिरी हिंदुस्थानांतील व्यापारी व कारखानदार संघांना पसंत पडल्याचा हा दाखला आहे.

हॉटेलांत उतरणाऱ्यांवर नियंत्रण

हॉटेलांत उतरणाऱ्या लोकांनीं पांच दिवसांपेक्षा अधिक काळ हॉटेलांत राहूं नये, अशा प्रकारचें नियंत्रण अमेरिकेंत घालण्यांत येणार आहे असें समजतें. युद्धजन्य गर्दीमुळें असें नियंत्रण आवश्यक झालें आहे. जरूरीचें काम असणाऱ्यांना प्राधान्य मिळणार आहे.

कागद करण्याचा ग्रामोद्योग*

हातानें कागद बनविण्याचा धंदा हिंदुस्थानांत प्राचीन काळापासून चालत आलेला असला, तरी यंत्रांचे सहायानें तयार होणारा कागद मोठ्या प्रमाणावर आयात होऊं लागल्यापासून हा धंदा बसला. अखिल भारत ग्रामोद्योग संघाची १९३४ साली स्थापना झाल्यानंतर, त्यानें कागदाच्या धंद्याच्या पुनरुज्जीवनाचा प्रश्न हातीं घेतला. प्रथम वर्धा येथें प्रयोग व उत्पादन केंद्र होतें व त्यानंतर पुणें येथील केंद्रांत मोठ्या प्रमाणावर ते प्रयत्न चालू झाले. श्री. के. बी. जोशी यांनीं दीर्घ काळ कागद करण्याच्या संशोधनास व प्रसारास वाहून घेतलेलें असून त्याचे ते तज्ज्ञ आहेत. हातानें कागद करण्याच्या क्रिया, त्यास लागणारीं साधनें, इत्यादींचें सविस्तर वर्णन करणारें त्यांचें पुस्तक १९३८ मध्यें प्रथम प्रसिद्ध झालें. त्यानंतर संशोधनांत आलेल्या अनुभवांस अनुसरून (उ. रांधा करण्यासाठी यांत्रिक शक्तीचा उपयोग) अधिकाधिक माहिती जमूं लागली, तिचा उपयोग पुस्तकाच्या नव्या नव्या आवृत्तींत करण्यांत आला. १९३९ साली पुस्तकाची दुसरी आवृत्ति निघाली, तिचें १९४१ साली पुनर्मुद्रण झालें, १९४२ साली तिसरी आवृत्ति निघाली व चवथी आवृत्ति नुकतीच प्रसिद्ध झाली आहे. युद्धजन्य परिस्थितीमुळें हातकागदाकडे सरकारचें व लोकांचें विशेष लक्ष वेधलें गेलें व युद्ध समाप्तीनंतरहि हात कागदास मागणी राहून या धंद्याचा चांगला विस्तार होऊं शकेल, असा आतां विश्वास निर्माण झाला आहे. अ. भा. ग्रामोद्योग संघाचें व्यापक कार्य व श्री. जोशी यांचे तज्ज्ञ देखरेखीखालील निष्ठेचे प्रयत्न यांचाच हा परिणाम आहे.

श्री. जोशी यांनीं प्रस्तुत पुस्तकांत प्रथम हातकागदाच्या सर्व साधनांची माहिती देऊन त्यांवर करावयाच्या रासायनिक व इतर क्रिया वर्णिल्या आहेत. रद्दी कागद, चिंध्या, बांबू, गवत, अंबाडी, इत्यादि प्रथम स्वच्छ करून व कापून ते रासायनिक व इतर क्रियांसाठीं तयार करावे लागतात व त्यांचें रांध्यांत रूपांतर करावें लागतें. यांतपर्यंतचें हें विध्वंसक कार्य म्हणतां येईल व येथून पुढें कागद तयार होण्यास प्रारंभ होतो. कागदाचा तक्ता तयार करणें, त्यानें पाणी खाऊं नये म्हणून त्यावर कलप करणें, कागद गुळगुळीत करणें व त्याचे योग्य आकाराचे तुकडे कापणें, हा त्यानंतरच्या क्रिया होत. या सर्व क्रियांचे, वेगवेगळ्या प्रकारच्या कागदांच्या बाबतींत तपशीलवार, तांत्रिक व व्यावहारिक वर्णन श्री. जोशी यांनीं केलें आहे व जरूर तेथें चित्रें, नकाशे व फोटो भरपूर दिले आहेत. उत्पादनाचे संबंधांतील इतर बाबींचीहि सर्व सामान्य माहिती, (कारखान्याची जागा, पाणी, उत्पादनाचा विशेष) त्यांनीं दिली आहे. हातकागदाच्या धंद्यास प्रारंभ करूं इच्छिणाऱ्यांस प्रस्तुत पुस्तक अत्यंत उपयोगी व मार्गदर्शक होईल. ग्रामोद्योगाच्या अभ्यासू लोकांनाहि पुस्तक मननीय वाटेल.

* Paper Making (as a Cottage Industry) लेखक:—के. बी. जोशी, पुणें येथें तयार झालेल्या हातकागदावर छापलें. अ. भा. ग्रा. संघाचें प्रकाशन, पृ. सं. २१६, किं. ४ रु.

स्फुट विचार

धान्य खरेदी-वाटणीची नवी सरकारी योजना

मुंबई प्रांतांत धान्याची वाटणी योग्य मानानें व लोकांच्या गरजेप्रमाणें सुरळीत व्हावी ह्या हेतूनें सरकारनें उत्पादनाच्या विशिष्ट प्रमाणांत स्वत: खरीपाचीं पिकें जमा करून तीं बाजारांत जनतेस विकत मिळावीं अशी व्यवस्था अमलांत आणली होती. सरकारी धान्य खरेदीची ही योजना सक्तीची नसल्यामुळें मोठे जमीनदार व शेतकरी ह्यांचेकडून अपेक्षेस अनुसरून धान्य मिळालें नाहीं आणि ती पुष्कळांशीं अयशस्वी झाली. सरकारला कल्पनेइतकें धान्य जमा करतां आलें नाहीं आणि "काळ्या बाजारा"ची चलती चालू राहिली. धान्याचा सरकारचा साठा मोठा असेल तरच त्यास बाजारभाव स्थिर ठेवतां येतील आणि धान्याची समान वाटणी करतां येईल, असा गेल्या खरीपाच्या पिकांचे संबंधांत अनुभव आला. धान्य पिकवणाऱ्या खेडेगावांतच त्यांची टंचाई झाली आणि अनेक कुटुंबांस धान्य मिळेनासें झालें. धान्य पुरवठ्याचें नियमन सरकारनें करावयाचेंच तर तें अर्धवट होऊन चालत नाहीं, तें पूर्णत्वानें झालें पाहिजे असा बोध अनुभवानें शिकवला. ह्यावरून सरकारनें आतां नवी आणि सक्तीची योजना निश्चित केली असून तिच्या अंमलबजावणीस प्रारंभहि झाला आहे. नवीन व्यवस्थेचीं चार अंगें आहेत:—(१) पीक करणाऱ्याकडून सक्तीनें आणि निश्चित प्रमाणांत सरकार धान्य खरेदी करील, (२) जमीनदार व शेतकरी ह्यांचेकडून ह्या रीतीनें धान्य गोळा झाल्यावर त्यांस शिलकी मालांतून कांहींची विक्री करणें असल्यास तो माल सरकारकडून किंवा त्यांच्या मार्फतच खरीदला जाईल, वाटेल त्यांस तो विकत घेतां येणार नाहीं, (३) धान्याच्या जागेवर सरकारचें सक्त नियंत्रण राहील आणि (४) शहरांत व खेडेगावांमध्यें धान्याची वाटणी सरकारमार्फतच होईल.

धान्य चतुःसूत्रीची अंमलबजावणी

शेतकऱ्यांकडून सक्तीनें धान्य सरकारनें त्यांच्या पैदाशीच्या कोणत्या प्रमाणांत घ्यावें? प्रत्येक शेतांत प्रत्यक्ष पिकलेल्या धान्याचा हिशेब करून त्याचा ठराविक अंश गोळा करावयाचा असें म्हटलें तर या कामांत अनिश्चितपणा व गोंधळ उद्भवण्याचा संभव रहातो. जमीन महसुलाच्या विशिष्ट प्रमाणांत धान्य घेण्याची पद्धति ह्याकरितां सरकारनें योजिली आहे. सामान्य शेतकऱ्यांच्या कुटुंबास सरासरीनें वर्षाकाठीं २७½ मण धान्य लागतें असा हिशेब करून ह्या मर्यादेपर्यंतच्या धान्याची मागणी शेतकऱ्यांकडून केली जाणार नाहीं. ह्या मर्यादेपेक्षा अधिक धान्य पिकवणारांकडून वाढत्या प्रमाणांत म्हणजे ज्या मानानें पीक ज्यास्त त्या मानानें सरकारी खरेदी ज्यास्त ह्या हिशेबानें धान्य घेतलें जाईल. धान्य देण्यांस वाव अधिक तसा सरकारनें घ्यावयाचा हिस्सा अधिक असें हें तत्त्व लहान व मध्यम स्थितींतल्या शेतकऱ्यांस सोयीचें व न्यायाचें होईल. शेतसारा आणि आबेवारी ह्यांच्या सहायानें निरनिराळ्या भागांत आणि खेड्यांत पिकांचा मगदूर व सरकारनें घ्यावयाचा धान्याचा अंश ठरवण्यांत येणार आहे. प्रत्येक टापूच्या परिस्थितीस अनुसरून धान्याचा साठा, त्याची ने-आण व खरेदीविक्री हीं समाधानकारक रीतीनें होतील अशी व्यवस्था करण्याची जबाबदारी अर्थातच सरकारवर पडते आणि ती त्यानें स्वीकारली आहे. बिगरशेतकरी लोकांस खेडेगांवामध्यें धान्य मिळण्यास अडचण पडते, त्यांचे खरेदीसाठीं खास दुकानांची तरतूद करावी लागेल आणि धान्याचा पुरवठा जेथें अपुरा असेल तेथें तो पुरा करणें आवश्यक होईल. ह्या कार्यक्रमाच्या मार्गांत अडचणी येणें अपरिहार्य आहे. त्या दूर होण्याची व्यवस्था सरकारनें करणें अगत्याचें आहे आणि त्याकामीं लोकांची सहानुभूति त्यानें मिळवली पाहिजे. प्रस्तुत नवी योजना सोलापूर, विजापूर आणि अहमदनगर ह्या जिल्ह्यांतील रबीच्या पिकांस तात्काळ लागू केली जात आहे. पुढील खरीपाच्या पिकांचे बाबतींत प्रांताच्या सर्व भागांत तिची अंमलबजावणी केली जाईल. तिची यशस्विता सरकारी अधिकाऱ्यांच्या कार्यक्षमतेवर आणि तितक्याच प्रमाणांत जनतेच्या सहकार्यावर अवलंबून राहील. हा सर्वांसच जिव्हाळ्याचा असा हा प्रश्न आहे आणि तो त्यांनीं परस्पर सहायाच्या भूमिकेवरून सोडवला पाहिजे. लोकांच्या अडचणी सरकारच्या कानांवर घालण्यांत आल्या आहेत आणि त्या त्यास माहीतहि आहेत. आतांपर्यंतच्या अनुभवाचा फायदा त्या दूर करण्यांत घेतला जाणें इष्ट आहे. शहरें व खेडीं, शेतकरी व बिगरशेतकरी ह्या सर्वांचे हितसंबंध प्रस्तुत योजनेंत गोंवलेले असल्यानें ती यशस्वी होणें अत्यंत महत्त्वाचें आहे.

जमीन सुधारणा योजना कायद्यांत दुरुस्ती

बॉंबे लँड इंप्रूव्हमेंट् स्कीम्स ॲक्ट (१९४२) मध्यें कांहीं दुरुस्त्या सुचविणाऱ्या एका बिलाचा खर्डा मुंबई सरकारनें प्रसिद्ध केला आहे. जमीन सुधारणेच्या योजनांचा अधिकांत अधिक फायदा मिळावा ह्या दृष्टीनें योजनांस पोषक असे कांहीं नियम करून ते अमलांत आणणें इष्ट आहे, असें अनुभवांती सरकारचें मत झालें आहे. वरील कायद्यान्वयें केलेलीं कामें दुरुस्तींत राखण्याची जबाबदारी जमिनींच्या मालकांवर टाकण्यांत आलेली आहे, परंतु जमीन मालकांनीं ती पार पाडली नाहीं, तर कलेक्टर हें काम कोणाकडूनहि करवून घेऊं शकतो व त्याचा सर्वहि वसूल करून घेण्याचा कलेक्टरास अधिकार आहे. तथापि, सर्चाच्या वसुलीबरोबर कांहीं दंडहि त्या जमीनमालकांवर लादला जाणें आवश्यक आहे. त्यामुळें जमिनींच्या मालकांच्या जमीन सुधारणेच्या दुरुस्तीबाबत आपल्या कामांत दुर्लक्ष करण्याच्या प्रवृत्तीस आळा बसण्यास मदत होईल, ह्या हेतूनें कायद्यांत दुरुस्ती सुचविण्यांत येत आहे. सरकारनें केलेल्या योजनेवरील सर्चाच्या बाकी हप्त्यांची वसुली सरकारी सारा प्रमाणें वसूल करण्याचा अधिकार प्रांतिक सरकारास देण्याची तरतूदहि विलाच्या खर्ड्यांत केलेली आहे. दुष्काळ पडलेल्या किंवा जेथें दुष्काळ पडण्याचा संभव आहे, अशा ठिकाणीं जमीन सुधाराईची योजना अंमलांत आणण्याचा मुंबई सरकारास अधिकार आज आहे. प्रांतिक सरकारांकडून मदत मिळणाऱ्या योजना, एकाद्या ट्रस्टच्या देणगींतून चाललेल्या योजना, लष्करी सैनिकांच्या हितासाठीं चालू केलेल्या योजना, इत्यादींचें संबंधांतहि वरील अधिकार लागू पडावा, ह्या दृष्टीनें कायद्यांत सुधारणा सुचविलेली आहे. सध्याच्या कायद्यांतील जमीन सुधारणेच्या योजना पार पाडण्यासंबंधीचे नियम लहान तुटक प्रश्नांचे दृष्टीनें केलेले आहेत; तथापि मोठ्या व्यापक योजनांची अंमल बजावणी प्रारंभीं सरकारी सर्चानेंच करणें सोईस्कर पडतें असा अनुभव आहे. जमीन मालकाच्या वाट्याच्या सर्चाचा हिस्सा मागाहून वार्षिक हप्त्यांनीं वसूल करण्याची सवड कायद्यांत असणें आवश्यक आहे व त्यासाठीं दुरुस्ती करण्यांत येत आहे.

श्री. रामदास पंटलु यांचें सहकारक निधन

मद्रासचे श्री. रामदास पंटलु यांची प्रकृति गेलीं दोन-तीन वर्षें खालावत चालली होती आणि त्यांचें नुकतेंच देहावसान झालें हे ऐकून हिंदुस्थानच्या सर्व भागांतील सहकारी कार्यकर्त्यांस दुःख झाल्यावांचून रहाणार नाहीं. सर टल्लुभाई सामळदास यांच्या निधनानंतर हिंदी सहकारी संघटनेच्या नेतृत्वाची धुरा श्री. रामदास यांनीं उचलली होती आणि तें कार्य त्यांनीं शेवटच्या क्षणापर्यंत निष्ठेनें व उत्साहानें पार पाडलें. अखिल भारतीय सहकारी इंस्टिट्यूट आणि प्रांतिक बँका यांच्या मध्यवर्ती मंडळाचे ते अध्यक्ष होते आणि सहकारी संघटनाविषयींच्या प्रश्नांचा अभ्यास व माहिती यांचे बाबतींत त्यांचा हात धरणारा सबंद हिंदुस्थानांत कोणीहि नव्हता. थोड्याच वर्षांमागें आंतरराष्ट्रीय सहकारी परिषदेच्या कार्यक्रमांत भाग घेण्यासाठी ते इंग्लंडला गेले होते. अनेक प्रांतिक सहकारी परिषदांचे अध्यक्ष या नात्यानें श्री. रामदास यांनीं प्रांतिक सहकारी संघटना संबंधानें उपयुक्त भाषणें केलीं आहेत आणि त्यांच्या सल्ल्याचा फायदा सर्व हिंदुस्थानभर लोकांस मिळालेला आहे. अखिल भारतीय सहकारी त्रैमासिकाचे ते संपादक होते आणि सबंद देशांतील सहकारी संस्थांची माहिती देणारें अत्यंत उद्बोधक असें वार्षिक त्यांच्या परिश्रमानें अलीकडे प्रसिद्ध झालें होतें. हिंदी सहकारी संघटनाबाबत अधिकारवाणीनें बोलण्याचा व लिहिण्याचा मान त्यांनीं प्राप्त करून घेतला होता आणि ते आपला पुष्कळसा वेळ या कामींच खर्चीत असत. हिंदी शेतकऱ्यांचें व कारागिरांचें आर्थिक जीवन सहकारी पद्धतीनें कसें सुधारतां येईल यांच्या विवंचनेंत त्यांचा बहुतेक काळ जात असे. सरकारी व बिगर-सरकारी सहकारी त्यांचा सल्ला घेत आणि तेहि हिंदुस्थान सरकार, रिझर्व्ह बँक व प्रांतिक सरकार यांच्या आर्थिक व कारभारविषयक धोरणांवर विधायक टीका करून त्यांस मार्गदर्शन करीत. असा अखिल भारतीय नेता नाहींसा झाल्यानें हिंदी सहकारी चळवळीची अपरिमित हानि झालेली आहे आणि ती भरून निघणें अत्यंत कठीण आहे.

कोंकणांतील भाताचें पीक वाढविण्यासाठी प्रयत्न

भुरमुगाच्या पेंडीच्या खताचा प्रसार

कोंकणांतील तांदळाचें दर एकरीं उत्पादन अत्यंत कमी आहे, ही गोष्ट सुप्रसिद्ध आहे. हें उत्पादन वाढविण्याचा एक मार्ग खतांचा उपयोग, हा आहे. भुरमुगाच्या पेंढीच्या ४,००० टन खताचा रत्नागिरी व कुलाबा जिल्ह्यांत प्रसार करण्याची योजना तयार आहे. या जिल्ह्यांत बंदरांचें ठिकाणीं डेपो उघडण्यांत येणार आहेत. सरकार प्रत्येक टनास ४० रुपयांची मदत करणार आहे. पेंढीचा भाव ७५ रुपयांस टन याप्रमाणें निश्चित केलेला आहे. म्हणजे, शेतकऱ्यास १२ आण्यांस १ मण (१४ शेर) या दरानें हें खत मिळूं शकेल. भाताच्या पिकासाठीच हा खताचा उपयोग केला पाहिजे व दर एकरी ४२५ पौंड खत निश्चित केलेलें आहे. दर एकरामागे १२ रुपये ज्यास्त खर्चल्यास उत्पादन सवापट होऊन ३५ रुपयांची जादा प्राप्ती होऊं शकेल, अशी अपेक्षा आहे.

महाराष्ट्राची पहिली शेड्यूल्ड बँक

न्यू सिटिझन बँक ऑफ इंडिया लि.

(हेड ऑफिस : मुंबई)

अधिकृत भांडवल : १०,००,००० रु.
रोख जमा झालेलें भांडवल : ६,००,००० रु.

एकूण खेळतें भांडवल : ९५,००,००० रु.

—: शाखा :—

सोलापूर, नाशिक, नाशिक रोड, देवळाली, कोल्हापूर, इचलकरंजी, सांगली, मिरज, महाड, लोणंद, अहमदनगर, पुणें, धुळें, जळगांव, दिल्ली, अमरावती, मालेगांव, सिन्नर, संगमनेर.

D. N. Gandekar. B.A., LL.B. पुणें ब्रँच मॅनेजर

D. D. Deshpande. B.A. मॅनेजिंग डायरेक्टर

दत्त कंपनी

७३५ शुक्रवार पेठ, पुणें १. दाणेआळी पोलिसचौकीजवळ
सर्व तऱ्हेचे काटे, वजनें व मापें, बेअरिंग रिपेअर करून मिळतील.

मलेरियावरील क्रांतिकारक हिंदी शोध

मागोरा पिल्स

अवघ्या ४ दिवसांत मलेरिया थांबतो.

१६ गोळ्यांच्या डबीस रु. १

— १०० गोळ्यांचें पॅकिंगही मिळतें. —

मागोरा केमिकल कं. लि.

टिळक रोड, पुणें २.

पुण्यांतील

आदर्श निवासस्थान व भोजनालय

छाया लॉजिंग व बोर्डिंग हाउस

बुधवार चौक, पुणें २.

पुणें सें. को. बँक लि.

"सर परशुरामभाऊ कॉलेज" शाखेचें उद्घाटन

पुणें सें. को. बँकेच्या "सर परशुरामभाऊ कॉलेज" शाखेचा उद्घाटन समारंभ पाडव्याचे मुमुहूर्तावर शनिवार ता. २५ रोजीं प्रो. वा. गो. काळे ह्यांचे हस्तें झाला. समारंभास प्रांतिक सहकारी बँकेचे अध्यक्ष श्री. आर. जी. सरदेसाई, श्री. वैकुंठराव मेहता, प्रि. धनंजयराव गाडगीळ, श्री. बा. सी. कामत, इत्यादींचे संदेश आले होते. पुणें सें. को. बँकेचे अध्यक्ष, रावसाहेब खोले, ह्यांनीं आपल्या प्रास्ताविक भाषणांत बँकेच्या प्रगतीचें दिग्दर्शन करून बँकेनें स्थानिक जनतेंत बँकिंगच्या व्यवहारांची आवड निर्माण करण्यांत कसा पुढाकार घेतला हें सांगितलें व नव्या शाखेचे मार्फत सर परशुरामभाऊ कॉलेजचे विद्यार्थी व त्या भागांतील रहिवासी ह्यांची सेवा करण्याची बँकेस संधी मिळत असल्याबद्दल संतोष व्यक्त केला. प्रिन्सिपॉल करमरकर व प्रो. औतुरकर ह्यांच्या समयोचित भाषणानंतर प्रो. वा. गो. काळे ह्यांनीं थोडेसें विस्तृत भाषण करून, मध्यवर्ती बँकांना ह्यापुढें उज्ज्वल काल असल्याचें सांगितलें. समाजाची गरज भागवून त्याची सेवा करण्याचें सहकारी बँकांचें ध्येय असतें, त्याप्रमाणें पुणें सें. को. बँकेनें किती महत्त्वाचें कार्य केलें आहे, त्याचें त्यांनीं वर्णन केलें. "सर परशुरामभाऊ कॉलेज" शाखेचें उद्घाटन जाहीर करून व तिला यश चिंतून त्यांनीं आपलें भाषण संपविलें. श्री. व्ही. जे. करंदीकर ह्यांनीं आभार मानल्यावर सभेचें काम संपलें.

डेक्कन जिमखाना को. कंझ्यूमर्स सोसायटी लि.

उद्घाटन समारंभ

डे. जि. को. कंझ्यूमर्स सोसायटीचा उद्घाटन समारंभ पाडव्याचे मुमुहूर्तावर, शनिवार ता. २५ रोजीं, बो. पी. जी. दाणी यांच्या हस्तें थाट पडला. त्या प्रसंगीं सोसायटीचे चेअरमन, श्री. एस. टी. पपु, ह्यांनीं सुंदर भाषण करून सोसायटीच्या कार्याची व सभासदांवरील जबाबदारीची माहिती करून दिली. सभासदांस मार्गदर्शक म्हणून त्यांनीं "दहा आज्ञा" वाचून दाखविल्या, त्या येथें उद्धृत केल्या आहेत.

कंझ्यूमर्स सोसायटीच्या सभासदांसाठी "दहा आज्ञा"

(१) सोसायटीच्याच दुकानीं सर्व माल खरेदी करा. (२) खासगी दुकानदारांच्या आमीषांना बळी पडूं नका. (३) सोसायटीचे भाग खरेदी करून तिला शक्य तें सहाय करा. (४) सोसायटीचे सभासद होण्याविषयीं आपल्या मित्रांचें मन वळवा. (५) सोसायटीचें ध्येय व तत्त्व हीं माहीत करून घेण्यापूर्वी तिचेवर टीका करूं नका. (६) आपली कांहीं तक्रार असल्यास तिचा निष्कारण बोभाटा व बभ्रा न करतां ती कमिटीकडे खुलासेवार लेखी कळवा. (७) सहकारी घडामोडींची माहिती देणारीं वृत्तपत्रें काळजीपूर्वक वाचीत जा. (८) नेहमी रोखीनें व्यवहार करा. (९) नेहमी सोसायटीच्या हिताचे दृष्टीनें आपलें मत नोंदवा (१०) सोसायटीच्या साधारण सभांस हजर राहून, आपल्या ज्ञानाचा व अनुभवाचा फायदा तिला द्या.

ह्या खेरीज, (१) नेहमी मोड घेऊन सोसायटीच्या दुकानांत जा व (२) रेशनच्या ठराविक दिवशीं, न चुकतां, आपलें रेशन न्या, अशा दोन व्यावहारिक सूचनाहि श्री. पपु ह्यांनीं केल्या.

ग्रेटब्रिटनमधील येण्याची वसुली

"हिंदुस्थानाच्या ग्रेटब्रिटनमधील येणें शिलकी बाहतं आहेत, तो हिंदुस्थानानें पुरविलेल्या मालाचा व केलेल्या कामाचा मोबदला आहे हें खरें असलें तरी हिंदुस्थानाचें स्वास्थ्य बिघडवूं पहाणाऱ्या शत्रूच्या प्रतिकारासाठीं त्याचा उपयोग केला गेलेला आहे हें विसरतां कामा नये. ग्रेट ब्रिटननें हें देणें भागविण्याचें म्हटलें म्हणजे तेथील निर्यात मालाच्या कांहीं उद्योगधंद्यांस भरपूर काम मिळेल हें उघड आहे. परंतु, त्याचा ग्रेट ब्रिटनला फायदा काय? हिंदुस्थान आज युद्धखर्च करीत आहे, त्याचा बराच मोठा भाग ब्रिटिश माल आयात करून त्यास परत मिळवितां येईल, असें म्हणणारांनीं ग्रेट ब्रिटन किती काळ आपला माल हिंदुस्थानाकडे फुकट पाठवूं शकेल, ह्याचा विचार केला पाहिजे." फिनॅन्शिअल टाइम्सनें हिंदुस्थानाच्या ग्रेट ब्रिटनमधील येण्यावर वरील प्रकारचें विचार व्यक्त केले आहेत. हिंदुस्थानानें युद्धखर्च केला, तो मुख्यतः स्वतःवरील आपत्ती टाळण्यासाठी केला व आज ग्रेट ब्रिटन हिंदुस्थानचा देणेकरी दिसत असला तरी वरील गोष्ट लक्षांत घेऊन आणि ग्रेट ब्रिटनची माल विनामूल्य बाहेर पाठविण्याची मर्यादित शक्ति ध्यानांत बाळगूनच कर्जफेडीच्या प्रश्नाचा निकाल लावला पाहिजे, हा वरील म्हणण्याचा मथितार्थ आहे.

कपाशीच्या सहकारी विक्रीच्या सोसायट्या

जरीला कपाशीच्या बियांचा प्रसार करण्यासाठी व जरीला कपाशीची विक्री करण्यासाठी कपास विक्रीच्या सहकारी सोसायट्या पूर्व खानदेश जिल्ह्यांत स्थापन करण्यांत आल्या आहेत. त्यांपैकीं आठ सोसायट्या १९४२ सालीं व सात सोसायट्या १९४३ सालीं सुरू झाल्या. १९४२ सालीं स्थापन झालेल्या आठ सोसायट्यांनीं १९४२-४३ च्या मोसमांत २,२८,७५५ रुपयांच्या ५,८२७ मण कपाशीची व ४८,६४९ रुपये किंमतीच्या १०,६०७ मण कपाशीच्या बियांची विक्री केली. सबंद मोसमभर कपाशीची विक्री चालू असते व मोसमाचे अखेर सरासरीनें हिशेब करून प्रत्येक सभासदास त्याच्या मालाचे पैसे त्याच्या सोसायटी मार्फत दिले जातात. १९४२-४३ च्या मोसमांत सभासदांना प्रत्येक मणामागें १० ते २० रुपये ज्यास्त मिळूं शकले, ह्यावरून सहकारी विक्रीच्या योजनेचा फायदा लक्षांत येईल.

सैनिकांसाठी सहकारी प्रचंड योजना

युद्धसमाप्तीनंतर मोकळ्या होणाऱ्या हिंदी सैनिकांसाठी संरक्षण साठ्याचा एक भाग म्हणून, सहकारी योजना आखून त्या पार पाडण्याकरितां सबंद हिंदुस्थानाकरितां एक को-ऑपरेटिव्ह कोन्सिलची स्थापना करावी, अशी संरक्षण साठ्याचे प्रमुख, सर फिरोझखान नून, ह्यांची कल्पना आहे. सायकलींचे सुटे भाग, कपडे, बूट, घड्याळें, इत्यादींचें उत्पादन त्याचप्रमाणें फळबागा लावणें, फळें बाटल्यांत भरून साठवणें, इत्यादि उद्योग सहकारी तत्त्वावर चालू करतां येतील. शेतीच्या व इतर मालाची विक्रीहि सहकारी पद्धतीनें सुरू करणें, सैनिकांसाठी स्वतंत्र सहकारी सेव्हिंग्ज बँक स्थापन करणें, इत्यादिहि त्यांच्या सूचना आहेत. त्या सर्वांची व्यवहार्यता अर्थातच आतांपर्यंतच्या अनुभवावरून ठरविली पाहिजे.

पूना मर्चंटस को. बँक लि.

वरील बँकेच्या डायरेक्टरांनीं आपल्या सभासदांस व हितचिंतकांस पाडव्याचे दिवशीं पानसुपारीस बोलाविलें होतें.

खादीच्या प्रसारासंबंधी अ. भा. चरखा संघाचें धोरण

प्रत्येक कुटुंबास कापडापुरतें खादीचें द्वारा स्वयंपूर्ण करणें व कपास पेरणाऱ्यांपासून खादी विणणाऱ्यांपर्यंतच्या सर्वांचे, विशेषतः अखंडी कमी वेतन मिळविणाऱ्या सूत काढणाऱ्यांचें, हितसंवर्धन करणें हें अ. भा. चरखा संघाचें पहिल्यापासूनचें ध्येय आहे. तथापि संघानें आतांपर्यंत खादीचें उत्पादन व तिचा प्रसार करून खादी-संबंधांतील आर्थिक तत्वज्ञानकडे लोकांचें लक्ष वेधण्याचेंच काम मुख्यतः केलें. त्यामुळें, मूळ उद्देशाकडे सहाजिकच पुरेसें लक्ष दिलें गेलें नाहीं. खादीचें उत्पादन व खप ह्यांची वाट त्यासाठीं ठिकठिकाणीं सहकारी सोसायट्या काढून करावी व संघानें त्या सोसायट्यांच्या कामास मदत करावी, असें नवें धोरण संघानें जाहीर केलें आहे.

युद्धोत्तर वैमानिक वहातुकीची योजना

युद्धोत्तर हिंदुस्थानांतील वैमानिक वहातुकीची पांच वर्षांची योजना सर महमद उस्मान ह्यांच्या खात्यानें तयार केली आहे. वार्षिक वहातुकींत अंतराचे संबंधांत पांच पट वाढ व माल वहाण्याचें संबंधांत पंधरा पट वाढ ह्या योजनेंत अंतर्भूत आहे. ह्या योजनेस मांडवली खर्च १½ कोटि रुपये येईल व वार्षिक खर्च २ कोटि, ५२ लाखांवरून उतरत जाऊन पांचव्या वर्षी तो १ कोटि, ९० लाख रुपये होईल. पहिल्या वर्षी योजनेस १ कोटि, ६० लक्ष रुपये तूट येईल, परंतु पांच वर्षांचे अखेरीस ती १३ लाखांचा फायदा दाखवूं लागेल, अशी अपेक्षा आहे.

हिंदुस्थानांतील स्त्री-डॉक्टर

हिंदुस्थानांतील ४० कोटि लोकसंख्येस उपचार करण्यासाठी १९४० साली फक्त ४० हजार डॉक्टर होते. म्हणजे १० हजार लोकांस एक डॉक्टर असें प्रमाण पडलें. ग्रेटब्रिटनमध्यें हें प्रमाण एक हजार लोकांस एक डॉक्टर असें पडतें. हिंदुस्थानांतील ४० हजार डॉक्टरांपैकीं फक्त ३ हजार स्त्रिया आहेत व त्यांपैकी निम्म्यासुद्धां विश्वविद्यालयाच्या पदवीधर नाहींत. हिंदी स्त्री पदवीधर डॉक्टरांपैकीं एक पंचमांश दिल्लीच्या लेडी हार्डिंज मेडिकल कॉलेजमधून पास झालेल्या आहेत.

आयातींत प्राधान्य मिळणाऱ्या वस्तू

कोणत्या मालाच्या आयातीस हिंदुस्थान सरकार प्राधान्य देतें हें अधिकृत रीत्या सांगतांना सरकारच्या प्रतिनिधीनें, स्त्रिया ओठ रंगविण्यासाठी वापरत असलेल्या लिपस्टिकच्या आयातीचा उल्लेख केला. लिपस्टिकसारख्या वस्तू जनतेच्या अत्यावश्यक गरजांचे सदरांत येत नसल्या, तरी युद्धपरिस्थितीच्या तीव्रतेचा विसर पाडून प्रसन्नता कायम राखण्यास त्यांचा उपयोग होतो, असें त्यांनीं सांगितलें.

अँग्लो इंडियनांचें युद्धोत्तर योजनेंत स्थान

युद्धसमाप्तीनंतर परतणाऱ्या अँग्लो-इंडियन सैनिकांच्या नोकरीची सोय पहाण्यांत कसूर होतां कामा नये व देशाच्या आपत्तीचे काळीं त्याचे सहायास धावून गेलेल्यांचा युद्धोत्तर आर्थिक पुनर्घटनेचे योजनेंत विसर पडतां कामा नये, असें मि. फ्रँक ॲन्थनी ह्यांनीं नागपूर येथील आपल्या भाषणांत सांगितलें.

ग्रेट ब्रिटनचा युद्धखर्च

गेले कांहीं आठवडे ग्रेट ब्रिटनचा रोजचा युद्धखर्च सुमारें २२½ कोटि रुपये झाला, असें ब्रिटिश फडनवीसांनीं कॉमन्स सभेंत नुकतेंच सांगितलें.

२१ वा आठवडा !

'प्रकाश' पिक्चर्सचा मराठी बोलपट

रामराज्य

दिग्दर्शक—विजय भट्ट

भूमिका: शोभना समर्थ, चंद्रकांत, काळे, सोहनी

श्रीकृष्ण, पुणें दररोज ३ खेळ ३–६॥ व १० वा.

— एव्हरग्रीन प्रकाशन —

८ वा आठवडा !

प्रकाश पिक्चर्सकृत – एव्हरग्रीन रिलीज–

पनघट

भूमिका :—

रत्नमाला, उमाकांत, जीवन

—ग्लोव पुणें—

रोज २ खेळ ६॥ व १० वा.

शनि. रवि. सोम. दु. ३॥ वाजतां जादा खेळ

मुक्काम

आणखी एक आठवडा वाढला !

१५ वा आठवडा !

रॉयल रत्न १८ वें

महात्मा विदुर

भू.—कै. विष्णुपंत पागनीस, दुर्गा खोटे

नायमपल्ली, मनोहर घटवाई, प्रल्हाद

आर्यन, पुणें दररोज तीन खेळ ३, ६॥ व १० वाजतां

हें पत्र पुणें, पेठ सांगुडा ब. नं. ११५१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि पटवर्धन, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' सांगुडा, ब. नं. ११७११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
(टपाल खेरीज माफ)
किरकोळ अंकास
दोन आणे.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति। —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष १० पुणें, बुधवार, तारीख ५ एप्रिल, १९४४ अंक १४

★ नगर बॉंबे ट्रेडिंग कंपनी ★

चिनाब, लाइम ज्यूस कॉर्डीअल, ऑरेंज व लेमन स्क्वॉश, टोमॅटो सॉस,
मँगो जॅम, मध, कोको, बेकिंग पावडर, सॅनिटरी टॉवेलस्,
टुथ पेस्ट, टुथ ब्रश, वगैरे मालाचे
स्टॉकिस्ट.

शाखाः— माणिक चौक, अहमदनगर

हेड ऑफिसः— पूना गेस्ट हाऊस, पुणें २

दत्त कंपनी
७३५ शुक्रवार पेठ, पुणें २. दाणेआळी पोलिसचेटाजवळ
सर्व तऱ्हेचे काटे, वजनें व मापें, वेळवर
रिपेअर करून मिळतील.

'अर्थ' ग्रन्थमाला.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

पुना गेस्ट हाऊस
१००, लक्ष्मी रोड, पुणें २.

Telephone 779

TELEGRAM Guest House Poona 2.

स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

गिरगांव मुंबई नं. ४

महिंद्रकर ब्रदर्स
तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

विविध माहिती

दोन मोठ्या रेल्वेज सरकार मालकीच्या झाल्या

मद्रास आणि सदर्न मराठा रेल्वे व साउथ इंडियन रेल्वे ह्या दोन रेल्वेज १ एप्रिल रोजी सरकारच्या मालकीच्या झाल्या. त्या दोन्ही रेल्वेजची एकूण लांबी ५,२८८ मैल आहे.

कामगारांच्या मुलांसाठी दूध

गिरणी कामगारांच्या तीन ते पांच वर्षांच्या अशक्त मुलांस पिण्यासाठी दूध देण्याची मुंबई शहरांतील योजना तीन महिने चालू आहे. आतांपर्यंत दर आठवड्यास सरासरीनें ८० शेर ह्याप्रमाणें ७२१ शेर दूध आजवर वाटून झालें. प्रत्येक मुलास दररोज पावशेर दूध मिळतें.

चीनच्या पुनर्घटनेसाठी पेट्रोल व बूट

युद्धसमाप्तीनंतर, पेट्रोल व बूट पुरवून चीनच्या पुनर्घटनेस मदत करण्याची मेक्सिकोची तयारी आहे, असें मेक्सिकोच्या चीनमधील वकिलानें नुकतेंच सांगितलें.

रशिया-जपान व्यापारी करार

रशिया व जपान यांचेमध्यें एक व्यापारी करार झाला आहे.

महागाई भत्त्यांत वाढ

मुंबई प्रांतिक सरकारनें आपल्या नोकरांच्या महागाई भत्त्यांत वाढ जाहीर केली आहे. सध्या १५० रुपयांवरील मुंबई शहर, अहमदाबाद व मुंबई उपनगर येथील पगारदारास भत्ता मिळत नाही; पगाराची नवी मर्यादा २५० रुपये आहे. ४० रुपयांखालील पगारास सध्या ११ रुपये भत्ता मिळतो, तो ह्यापुढें १४ रुपये मिळेल. त्यावरील पगारदारास मिळणाऱ्या १५ रुपयांऐवजीं आतां १८ रुपये मिळतील. इतर ठिकाणच्या २०० रुपयांखालील ४० रुपये पर्यंतच्या पगारास ११ रुपये व त्यापुढील पगारास १४ रुपये भत्ता मिळेल. पूर्वीची भत्त्यास पात्र असलेल्या पगाराची कमाल मर्यादा १२० रुपये होती व भत्ता अनुक्रमें ८ रुपये व १० रुपये होता.

सहकारी सोसायट्या व स्टोर्ससाठी शिक्षण वर्ग

अहमदाबाद शहरांत रेशनिंगसाठी किरकोळ विक्रेते म्हणून १५८ सहकारी स्टोर्सना व सोसायट्यांना मान्यता देण्यांत आली आहे. त्यांत कामें करणाऱ्यांना योग्य तें मार्गदर्शन करण्याचे उद्देशानें मुंबई प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूटच्या अहमदाबाद जिल्हा शिक्षण समितीनें एक वर्ग चालवून त्यांत सोसायट्यांची व्यवस्था व हिशेब ठेवण्याचें शिक्षण दिलें.

जर्मनीवरील बॉंबवर्षाव

जर्मनी, इटली व जर्मनव्याप्त युरोप ह्यांवर १ मे, १९४० ते ३१ डिसेंबर, १९४३ ह्या मुदतींत एकूण २,४६,४२५ टन वजनाचे बॉंब टाकण्यांत आले, त्यांपैकीं २,०३,००० टन वजनाचे बॉंब एकट्या जर्मनीच्या वाट्यास आले.

प्रो. हिल यांच्या भेटीची फलश्रुति

ब्रिटिश शास्त्रज्ञ, प्रो. ए. व्ही. हिल, ह्यांनीं हिंदुस्थानास नुकतीच भेट दिली, त्याचा खर्च १७ हजार रुपये आला. स्वगृहीं पोचल्यानंतर प्रो. हिल हे सूचनात्मक रिपोर्ट लिहिणार आहेत.

"व्हेलॉन"

पेट्रोलियम व समुद्राचें पाणी ह्यांपासून "व्हेलॉन" करण्यास प्रारंभ झाला आहे. त्याचें सध्या मच्छरदाणीचें कापड बनविण्यांत येत आहे; परंतु पायमोजे, हॅंडबॅग्ज, हॅट, बूट, इत्यादिहि त्यापासून होऊं शकतील. त्यावर डाग पडत नाहीं, तें फाटत नांहीं व विरतहि नाहीं. कपास व लोकर ह्यांच्या धाग्यावरोबर तें विणतां येतें. जळत्या मेणबत्तीवर धरलें, तर तें विरघळतें परंतु जळत नाहीं.

अमेरिकन मालाची प्रचंड आयात

अमेरिकेनें हिंदुस्थानास लेंड लिजिंग पद्धतीनें ११ मार्च, १९४१ ते ३१ डिसेंबर, १९४३ ह्या मुदतींत ८१ कोटि, ९४ लक्ष डॉलर्स किंमतीचा माल दिला. अमेरिकेची ही निर्यात १९४१ व १९४२ मिळून झालेल्या निर्यातीपेक्षा ७०% अधिक आहे. युद्धसाहित्य, शेतीचीं अवजारें, रेल्वे इंजिनें, वाघिणी, रस्ते व विमानतळ करण्यास लागणारी यंत्रसामुग्री, मशीनटूल्स, पोलाद, तारें, अल्युमिनियम, इत्यादींचा समावेश त्यांत झालेला आहे. हिंदुस्थानानें अमेरिकेकडे ताग, अभ्रक, मॅंगेनीज, शेलॅक, इत्यादि माल पाठविला. ह्या मालाचें उत्पादन वाढण्यास सहाय करणारी यंत्रसामुग्री तयार करून अमेरिकेनें हिंदुस्थानांत धाडली.

घटस्फोटांची वाढती संख्या

ग्रेट ब्रिटनमध्यें ४० वर्षांपूर्वी दरसाल ७५० घटस्फोट होत असत. गेल्या महायुद्धाचे काळांत त्यांची वार्षिक सरासरी ३ ते ४ हजार झाली, व आताची वार्षिक सरासरी १२ हजार आहे! हें वाढतें काम आवरण्यासाठी घटस्फोटाचे दावे चालविणाऱ्या न्यायाधीशांची संख्या वाढविणें अपरिहार्य झालें आहे.

पॉंक सुधारण्यासाठी ९० लक्ष रुपयांची योजना

तांदळाचें सुधारलेलें बीं व खत ह्यांचा प्रसार करण्यासाठी मद्रास सरकारनें ९० लक्ष रुपयांची योजना केली आहे. ह्यापैकी निम्मी रक्कम हिंदुस्थान सरकार बिनव्याजी कर्जाऊ देणार आहे. बी व खतें विकत घेण्याकडे ९० लक्ष रुपयांचा विनियोग करून शेतकऱ्यांस मूळ किंमतीस तीं दिलीं जातील.

पू. खानदेश जिल्ह्यांत जरिला कपाशीची सक्ती

पूर्व खानदेशांत कपास पेरणारांनीं जरिला जातीचीच कपास लावली पाहिजे, असें मुंबई सरकारनें जाहीर केलें आहे.

शास्त्रज्ञांस निमंत्रण

ग्रेट ब्रिटनमधील शास्त्रीय व औद्योगिक संशोधन संस्थांस भेट देण्याचें निमंत्रण सात प्रमुख हिंदी शास्त्रज्ञांस आलें आहे.

फिनॅन्स बिलास कायदेशीरपणा प्राप्त झाला

मध्यवर्ती सरकारच्या फिनॅन्स बिलास गव्हर्नर जनरलनें ३१ मार्च रोजीं मान्यता देऊन त्यास कायद्याचें स्वरूप दिलें व हा कायदा १ एप्रिलपासून अंमलांत यावा असें फर्माविलें. रेल्वे दरांतील वाढीसहि असेंब्लीनें बहुमतानें विरोध दर्शविला होता, त्यासंबंधांत सरकारचें घोरण अद्याप जाहीर झालेले नाहीं. तें जाहीर होईपर्यंत पूर्वीचेच रेल्वे दर चालू राहतील.

अनुक्रमणिका

	पृष्ठ
१ विविध माहिती ...	१०६
२ मुंबई प्रांताचें अंदाजपत्रक	१०७
३ वड्याचें तेल वांग्यावर !	१०८
४ शेड्यूल्ड बँकांच्या शाखा	१०८
५ स्फुट विचार ...	१०९
मध्यवर्ती कायदेमंडळांत कर-विषयक बिल—बहुमतास निर्णायक महत्त्व नाहीं—कृत्रिम वातावरण—धान्याची पिकें काढण्याची सक्ती—सोनें बाजारांतील खळबळ	
६ ब्रिटिश कापडाचा धंदा	१११
७ सुरत सें. को. बँक ...	१११
८ औंध न्यू. विमा कं. ...	१११

अर्थ

बुधवार, ता. ५ एप्रिल १९४४

मुंबई प्रांताचें अंदाजपत्रक

ह्या प्रांतांत सध्या कायदेमंडळाचें कार्य स्थगित आहे आणि त्यास जबाबदार असणारें मंत्रिमंडळ अस्तित्वांत नाहीं; राज्यकारभाराची सर्व जबाबदारी घटना कायद्यास अनुसरून गव्हर्नरांनीं उचलली आहे आणि सरकारी अधिकाऱ्यांच्या सल्ल्यानें ते ती पार पाडीत आहेत. ह्या कारणानें मुंबई प्रांताच्या सरकारचें १९४४-४५ सालाबाबतचें अंदाजपत्रक त्यांनीं पसंत करून गेल्या आठवड्यांत जनतेच्या माहितीसाठी त्यास प्रसिद्धी दिली. वृत्तपत्रांच्या प्रतिनिधींच्या पुढें अंदाजपत्रकांतील ठळक बाबी मांडून त्यांचें स्पष्टीकरणहि गव्हर्नरांनीं केलें. वाढतें उत्पन्न, वाढता खर्च आणि त्यामधून पुनर्घटना व आर्थिक अभिवृद्धि ह्यांचेकरितां केलेली गंगाजळ्यांची व खर्चाची तरतूद असें ह्या अंदाजपत्रकाचें त्रोटक रीतीनें वर्णन करतां येईल. प्रांतिक जमा-खर्चाचे आकडे कसे फुगत आले आहेत ह्याची कल्पना खालील तुलनात्मक आकड्यांवरून येण्यासारखी आहे:—

प्रांतिक जमा-खर्च

(कोटि रुपये)

	१९४२-४३ पक्के हिशेब	१९४३-४४ दुरुस्त अंदाज	१९४४-४५ अंदाज
जमा	१९·७	२३·८	२४·८
खर्च	१७·७	२२·२	२४·८
शिल्लक	१·९	१·६	८६ हजार

सरकारचें उत्पन्न सारखें वाढत जाऊन मोठमोठ्या शिलका त्याच्यापाशीं उरतात, तर करांचें प्रमाण कमी कां करीत नाहीं असा प्रश्न सहजच सुचतो. चलनवृद्धीमुळें होणाऱ्या महागाईस आळा घालण्यासाठीं आणि युद्धोत्तर पुनर्घटनेसाठीं जनतेकडून सरकारी तिजोरीकडे अधिक पैशाचा ओघ वळवणें हा आपल्या अंदाजपत्रकविषयक धोरणाचा हेतु आहे असें उत्तर त्यास गव्हर्नरांनीं आपल्या खुलाशाच्या भाषणांत दिलें आहे. ह्या परिस्थितीची पार्श्वभूमि अशी आहे. १९४३-४४ च्या प्रारंभीं सरकारची सर्वसाधारण शिल्लक ४ कोटि, ८८ लक्ष रुपये होती, ती वर्षअखेरीस ६ कोटि, ३० लक्ष झाली. आर्थिक व सामाजिक संवर्धनासाठी खास गंगाजळी बनवली जात आहे, तीमध्यें १ कोटि १२ लक्ष रुपये होते, त्यांतून कांहीं खर्च झाला तरी बारा महिन्यांचे शेवटीं २ कोटि ८८ लक्ष रुपये ह्या फंडांत उरले. वर्षाचे अवधींत त्यांत दीड कोटि, रुपयांची भर घालण्यांत आल्यानें ही वाढ झाली. युद्धोत्तर पुनर्घटनेसाठी दुसरी गंगाजळी १९४२-४३ मध्यें स्थापन करण्यांत आली. १९४३-४४ च्या प्रारंभीं तीमध्यें १ कोटि, ३९ लक्ष रुपये होते. ह्या रकमेंत वर्षाच्या अवधींत भर घातली गेली आणि ती आतां अडीच कोटि रुपये झाली आहे. विजापूर जिल्ह्यांतील दुष्काळाप्रीत्यर्थ एक कोटि रुपये अपेक्षेच्या पलीकडे खर्चावे लागले तरी मामुली खर्च भागून वरील शिलका व फंड ह्यांचेमध्यें वाढ कशी होऊं शकली ? ह्या प्रश्नाचें असें उत्तर देण्यांत आलें आहे कीं, प्राप्तीवरील कराच्या वसुलीपैकी मुंबई सरकारच्या हिश्शांत वाढ होऊन त्यास सुमारें दीड कोटि रुपये मिळाले, एक्साइज पट्ट्यांचें उत्पन्न दीड कोटि रुपयांनीं वाढलें आणि अलीकडे करवाढ करण्यांत आली आहे तिनें उत्पन्नांत थोडी भर घातली.

करांच्या मार्गानें मामुली गरजेच्या मानानें अधिक उत्पन्न सरकारी तिजोरींत येत आहे ही गोष्ट गव्हर्नरांच्या भाषणांत मान्य करण्यांत आली आहे, पण तिचें त्यांनीं समर्थनहि केलें आहे आणि तें द्विविध आहे. त्यांचा पहिला मुद्दा समाजांत खेळणारें फाजील चलन करांच्या साधनानें सरकारच्या तिजोरींत खेचलें जाण्याच्या आवश्यकतेविषयींचा आहे. १९४४-४५ च्या अंदाजपत्रकांत करवाढ नाहीं, पण प्रांतिक तिजोरीच्या सुस्थितीच्या दृष्टीनें करांत कपातहि नाहीं. ह्याचें एक कारण वरील मुद्यांत समाविष्ट झालें आहे. युद्धोत्तर काळांतील पुनर्घटना आणि आर्थिक अभिवृद्धीचीं चालू कामें ह्यांसाठी मोठमोठ्या रकमा आवश्यक आहेत आणि त्यांची तरतूद व्हावी म्हणून सरकारचें उत्पन्न मोठें असलें पाहिजे आणि त्यांतून शिलका बाजूस काढून ठेवतां आल्या पाहिजेत हा अंदाजपत्रकाच्या समर्थनांतला दुसरा महत्त्वाचा मुद्दा पुढें मांडण्यांत आला आहे. १९४३-४४ सालांत बेटिंग, करमणुकी व स्टँप्स ह्यांच्यासंबंधांतील करांत वाढ करण्यांत आली आणि तिचें बारा महिन्यांतलें उत्पन्न १ कोटि, ३० लक्ष रुपये होईल. १९४४-४५ सालीं हे कर तसेच कायम राहणार आहेत. शहरांतील स्थावर मिळकतीवर कर अगदीं अल्प प्रमाणांत कमी करण्यांत येणार आहे. त्यायोगें तूट येईल ती अबकारी उत्पन्नाच्या वाढीनें भरून निघेल. हिंदुस्थान सरकारचें कर्ज फेडण्यासाठीं प्रांतिक सरकारनें १९४३-४४ मध्यें साडेतीन कोटि रुपयांचें कर्ज उभारलें, त्यामुळें व्याजांत बचत झाली आणि चलनवृद्धीस पायबंद बसला. धान्याच्या किंमतीचें व वाटणीचें नियंत्रण करण्यासाठी सरकारास त्याच्या खरेदींत पैसा गुंतवावा लागला आहे आणि त्याची रकम दहा कोटि रुपये झाली आहे. सरकारच्या शिलकांतून हा भांडवली स्वरूपाचा खर्च करण्यांत आला आहे.

वड्याचें तेल वांग्यावर !

विमा कंपन्यांच्या आजच्या परिस्थितीस जबाबदार कोण ?

(ले:—श्री. ग. स. मराठे, एम. ए., ए. आय. ए., ॲक्चुअरी)

असोसिएटला आपुढें ॲक्चुअरी म्हणून काम करण्यास सध्या प्रमाणें परवानगी न देतां, प्रत्येक विशिष्ट कामासाठीं, सरकारी खात्यानें योग्य वाटल्यास तेवढ्यापुरती परवानगी यावी, अशा अर्थाची विमा कायद्यासालील नियमांत दुरुस्ती करण्याचा विचार आहे. ह्या नियमाची अनिष्टता "अर्था" च्या ता. ८ मार्चच्या अंकांत तपशीलवार स्पष्ट करून सांगितलेलीच आहे. हिंदी आयुर्विमा कंपन्यांच्या गेल्या कांहीं वर्षांतील बिघडलेल्या परिस्थितीचा व नियमदुरुस्तीचा संबंध दिसतो. आयुर्विमा कंपन्यांच्या मूल्यमापनासंबंधीं आपल्या विमाविषयक कांत चार-दोन पॅरिग्राफ लिहिण्यापलिकडे सरकारनें आजवर काय केलें ? ॲक्चुअरींचें काम करणारे फेलोज व असोसिएटस ह्यांच्याशीं विमा कंपन्यांची परिस्थिति व ते सुधारण्याचा मार्ग ह्याविषयीं चर्चा करण्याचा सुपरिंटेंडेंट ऑफ इन्शुअरन्सनें आजवर कधींतरी प्रयत्न केला आहे काय ? विमा कंपन्यांच्या सल्लागार समितीशीं त्यानें मधून मधून चर्चा केली हें खरें आहे, परंतु कंपन्यांच्या व्यवस्थापकांपेक्षा विमा शास्त्रांतील तज्ज्ञ व अनुभवी अशा ॲक्चुअरींचा सल्ला घेणें अधिक जरूर नव्हतें काय ?

...हिंदी आयुर्विमा कंपन्यांची प्रगति इष्ट मार्गानें होत नसेल, तर त्याचा दोष मुख्यतः कंपन्यांच्या चालकांकडे जातो; ॲक्चुअरीवर त्याचें खापर फोडणें अयोग्य आहे. माझ्या तीस वर्षांच्या अनुभवांत, विम्याची चांगली माहिती असलेले पंधरा वीस सुद्धां उत्तम कर्तबगार कंपनी व्यवस्थापक माझ्या आढळांत आले नाहींत. व्यवस्थापकाच्या कामाचें तंत्र माहीत असलें, तरी बहुतेकांत जबाबदारीच्या जाणीवेचा अभाव होता, त्याचा परिणाम गळेकापू स्पर्धेमध्यें झाला. समक्ष भेटींत मी त्यांना शक्य तेवढा सल्ला व सूचना देत असे; परंतु त्याचा तात्काळ विसर पडे; विम्याच्या धंद्यांत, पडणारी किंमत व नफ्याचें प्रमाण, हीं अवश्य हिशेबांत घ्यावीं लागतात, परंतु कंपन्यांच्या डायरेक्टरांना त्याचा पत्ताहि नसल्याचें कित्येक प्रसंगीं आढळलें. त्यामुळें, चांगल्या व्यवस्थापकासहि डायरेक्टरांस काटकसरीचें व किफायतशीर गुंतवणुकीचें महत्त्व पटवून देणें अवघड जाई. पैसे गुंतविण्याचे कामीं एका टोकास भरमसाटपणा तर दुसऱ्या टोकास भलतीच सावधगिरी असल्याचेंहि दृश्य मूल्यमापनाचे वेळीं दृष्टीस पडे, विमाकंपन्यांचे चालकांस कांहीं किमान लायकी (उ. चार्टर्ड इन्स्टिट्यूट ऑफ लंडनचें असोसिएट अथवा फेलो) कायद्यानें निश्चित करण्याची वेळ आली आहे, असें माझें ठाम आहे. इंग्लंडमध्यें असा कायदा नसला, तरी हिंदुस्थानांतील विशिष्ट परिस्थितींत तशा प्रकारची तरतूद आवश्यक आहे. अर्थात्, ही सक्ती तात्काळ अमलांत आणणें योग्य होणार नाहीं व अनुभवी आणि लायक व्यवस्थापकांचे बाबतींत अपवाद करणें योग्य होईल. अशा प्रकारच्या व्यवस्थापकांचें नेतृत्वाखालीं चाललेल्या कंपन्यांच्या डायरेक्टरांचे कांहीं अधिकार कमी केले तर तें हिताचेंच होईल. परंतु वर सांगितलेलीं विमा कंपन्यांच्या आजच्या परिस्थितीचीं मूळ कारणें दूर करण्याचा प्रयत्न न करतां असोसिएटसवर घसरून त्यांच्या धंद्यास दूषण देण्याचा प्रयत्न करणें हें अगदीं अयोग्य आहे.

शेडयूल्ड बँकांच्या शाखांत दररोज एका शाखेची भर

हिंदी बँकांची संख्या गेल्या दोन वर्षांत बरीच वाढली आहे व त्यांच्या शाखांच्या संख्येंत तर अजूनहि एकसारखी भर पडत आहे. ३१-१२-४१ अखेर एक्सचेंज बँका वगळून एकूण ४५ शेडयूल्ड बँका होत्या, त्यांची संख्या १९४२ अखेर ४७ झाली व १९४३ अखेर ती ६० इतकी आहे. सर्व शेडयूल्ड बँकांच्या शाखा मोजल्या, तर त्या १९४० अखेर १३५१ होत्या. १९४२ अखेर त्यांची संख्या १४५३ च होती. म्हणजे दोन वर्षांत १०२ शाखा वाढल्या. परंतु १९४३ च्या पहिल्या तिमाहीचे अखेर शाखांची संख्या १५१२ झाली; दुसऱ्या सहामाहीचे अखेर ती १६०७ वर गेली व ३०-९-४३ अखेर ती १७२५ भरली. म्हणजे १९४३ च्या पहिल्या नऊ महिन्यांच्या २७३ दिवसांत बँकांच्या शाखांत २७२ शाखांची भर पडली. दरमहा ३० नव्या शाखा, असा हा हिशेब होतो व हिंदुस्थानांत शेडयूल्ड बँकांपैकी कोणत्या तरी एका बँकेची दररोज एक नवीन शाखा कोठेंतरी उघडण्यांत येत आहे, असा त्याचा अर्थ आहे. शाखावाढीची प्रवृत्ति वाढत आहे. बँकिंगचा प्रसार वाढण्याची इष्टता निर्विवाद आहे, परंतु झपाट्यानें काढण्यांत येणाऱ्या शाखा पुढेहि चांगल्या चालू राहिल्या, तरच त्यांचा खरा उपयोग आहे. बँकिंगच्या धंद्याची खरी कसोटी युद्धसमाप्तीनंतरच आहे. शाखांची संख्यावाढ व त्यांची प्रगति ह्या संबंधांत सर्वच बँकांस सारखें यश येईल असें नाहीं. नव्या बँकांच्या स्थापनेवर सरकारनें निर्बंध घातले, तसे त्यांच्या शाखांचे संख्येवरहि निर्बंध घालण्याची वेळ अद्याप आलेली नाहीं काय ? बँकेचें भांडवल व तिच्याकडील ठेवी ह्यांचे तिच्या शाखांशीं कांहीं प्रमाण असणें आवश्यक नाहीं काय ? इंपीरिअल बँकेच्या शाखांची संख्या १९४० अखेर ३९० होती. ३०-९-४३ अखेर ती ३९३ आहे. प्रमुख पांच हिंदी जॉइंट स्टॉक बँकांनीं ह्याच मुदतींत आपल्या शाखांत १२७ ची भर घातली त्यांपैकी ७२ शाखा १९४३ च्या पहिल्या नऊमाहींत स्थापन झालेल्या आहेत. एक्सचेंज बँकांच्या शाखांची संख्या १९४० अखेर १०३ होती ती १९४३ अखेर ८५ वर आली व ३०-९-४३ अखेरहि तीच संख्या कायम आहे. इतर शेडयूल्ड बँकांनीं १९४१ व १९४२ मध्यें ६३ शाखा वाढविल्या व १९४३ च्या पहिल्या नऊ महिन्यांत मात्र १९९ शाखांची भर घातली त्यांपैकी तब्बल १०० शाखा १९४३ च्या तिसऱ्या सहामाहींत निघालेल्या आहेत. शाखावाढीची प्रवृत्ति अद्याप कायम आहे, हें वरील आकड्यांवरून दिसून येईल.

दी भारत इंडस्ट्रिअल बँक, लि.

हेड ऑफिस : पुणें शहर
शाखा : पुणें कॅन्टोन्मेंट, बारामती
पे-ऑफिस : खोपोली

—: खेळतें भांडवल रु. १९ लाखांचे वर :—

कळविण्यास आनंद वाटतो कीं, दि. २५-३-४४ रोजीं गुढीपाडव्याचे मुहूर्तावर बँकेची शाखा लोणावळा येथें उघडण्यांत आली.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

मॅनेजिंग डायरेक्टर्स

स्फुट विचार

मध्यवर्ती कायदेमंडळांत करविषयक बिल

ब्रिटिश मंत्रिमंडळाचा शिक्षणविषयक बिलाच्या एका कलमावर कॉमन्स सभेंत पराभव झाला आणि स्त्री शिक्षक व पुरुष शिक्षक ह्यांचें वेतन सारखें असावें अशी सूचना त्याच्या धोरणाविरुद्ध मान्य झाली. जबाबदार मंत्रिमंडळाचा पराभव होणें हें कायदेमंडळांतील बहुसंख्य सभासदांच्या त्यावरील अविश्वासाचें स्पष्ट लक्षण समजलें जातें आणि आपल्या जबाबदारीच्या जागांचा त्याग करणें आपलें कर्तव्य आहे असें त्यांनीं समजण्याचा प्रघात आहे. परवाचा ब्रिटिश मंत्रिमंडळाचा पराभव हा त्यावरील अविश्वासाचा द्योतक नसून मि. चर्चिल ह्यांस कॉमन्स सभेचा पूर्ण पाठिंबा आहे, असें आश्वासन देण्यांत आलें तरी मुख्यप्रधानांनीं आपणांवरील विश्वास प्रत्यक्ष कृतीनें सभेनें व्यक्त करून दाखवावा असा आग्रह धरला आणि त्याप्रमाणें मंत्रिमंडळाच्या बिलांतील मूळ कलम पुन्हां त्यांत दाखल करण्याची सूचना प्रचंड बहुमतानें मंजूर केली. ब्रिटिश लोकशाहीची राज्यपद्धति आणि हिंदुस्थानांतील राज्यघटना ह्यांचेमध्यें कसें जमीन-अस्मानाचें अंतर आहे ह्याची स्पष्ट कल्पना त्याच सुमारास हिंदी मध्यवर्ती असेंब्लींत कार्यकारी मंडळाचें फिनॅन्स बिल बहुमतानें फेटाळून दिलें गेलें तरी ह्या पराभवाचा कांहींच परिणाम झाला नाहीं ह्या गोष्टीवरून येते. असेंब्लींतील लोकनियुक्त सभासदांच्या बहुमतानें हिंदुस्थान सरकारचें एखादें बिल किंवा सूचना नापास केली असत, राज्यघटनेच्या कायद्यास अनुसरून गव्हर्नर जनरलला सदरहु बिल किंवा सूचना अगत्याची आहे, ह्या मुद्यावर स्वतःच्या अधिकारांत ती कायदेशीर आहे असें जाहीर करतां येतें.

बहुमतास निर्णायक महत्त्व नाहीं

करांबाबतच्या सरकारच्या योजना एकत्र करून त्यांचें बिल सर जरेमी राइस्मन ह्यांनीं असेंब्लीपुढें मान्यतेसाठी मांडलें असतां दोन वेळां त्याचा विचार करण्यास बहुमतानें नकार दिला. अशा स्थितींत मध्यवर्ती मंत्रिमंडळास स्थानत्याग करण्याची आवश्यकता भासली नाहीं आणि विरुद्ध पक्षाच्या बहुमताचा त्याचेवर किंवा त्याच्या धोरणावर कोणताच परिणाम झाला नाहीं. कायदेमंडळांतील लोकनियुक्त सभासदांच्या बहुमतास निर्णायक महत्त्व हिंदी घटना कायद्यानें दिलेलें नाहीं हें ह्यांचें कारण आहे. सरकारच्या करविषयक बिलास आपण विरोध करीत आहों तो विरोध युद्धप्रयत्नास नाहीं आणि त्याचा रोख केवळ सभ्यांचें मंत्रिमंडळ लोकमताचें प्रतीक नाहीं हें स्पष्टपणानें दर्शविण्याकडे आहे असें असेंब्लीच्या कित्येक सभासदांनीं बोलून दाखवलें आणि लोकमतास मान्य असलेलें निराळें मंत्रिमंडळ स्थापन केलें जावें असें सुचवलें. कौंसिल ऑफ स्टेटमध्यें सरकारच्या बाजूचें बहुमत असल्यानें तेथें गव्हर्नर जनरलनीं पाठवलेलें व असेंब्लीनें नाकारलेलें फिनॅन्स बिल मंजूर झालें. अशा रीतीनें त्यास कायद्याचें स्वरूप प्राप्त झालें आहे.

कृत्रिम वातावरण

हिंदुस्थान सरकारचें अंदाजपत्रक आणि करविषयक कायद्याचें बिल ह्यांची मध्यवर्ती असेंब्ली व कौंसिल ऑफ स्टेट ह्यांमध्यें जी चर्चा झाली तीमध्यें अथपासून इतिपर्यंत कृत्रिमपणा भरला होता. सरकारनें सुचवलेल्या कांहीं सवलतीच्या बाबींस कपातीच्या उपसूचना असेंब्लींत त्याच्या धोरणासंबंधानें नापसंती व्यक्त करण्यासाठीं पुढें मांडण्यांत आल्या आणि त्या मंजूर झाल्या आणि करविषयक कायद्याचें बिल गव्हर्नर जनरल ह्यांच्या शिफारशीनें आलें असतांनाहि नामंजूर झालें. असेंब्लींतील बहुमताचा विरोध चहा, सुपारी इत्यादि वरील करांस अंशतः असला तरी मुख्यत्वेंकरून तो राज्यघटनाविषयक व राजकीय स्वरूपाचा होता. ह्या कारणानें आपल्या करयोजनेच्या टीकाकारांस उत्तर देण्यास सर जरेमी राइस्मन ह्यांस फारसा वावच राहिला नाहीं. जनतेचा पाठिंबा असलेल्या मंत्रिमंडळाच्या स्थापनेची मागणी आणि सभ्यांच्या कार्यकारी मंडळावरील अविश्वास व्यक्त करण्याचा निश्चय ह्या स्पष्ट उद्देशानेंच प्रेरित होऊन असेंब्लीमधील हिंदी सभासदांच्या गटांनीं एक होऊन फदनविसांचें करविषयक बिल फेटाळलें. लोकपक्षाच्या गटांचें ऐक्य कायम राहून त्यांचे प्रतिनिधी आमच्या बाजूच्या जागा घेतील तर आपणांस आनंदच होईल असें सांगण्यापलीकडे अधिक त्यांस कांहीं करतां आलें नाहीं. सरकारच्या प्रस्तुत पराभवाचा योग्य परिणाम होऊन मध्यवर्ती मंत्रिमंडळाची राष्ट्रीय पायावर पुनर्घटना करण्यांत आल्यास युद्धप्रयत्नाच्या दृष्टीनें व देशांतील राजकीय पेचप्रसंग सुटण्याच्या दृष्टीनें ती इष्ट अशीच गोष्ट होईल. हिंदुस्थानच्या विशिष्ट परिस्थितींत युद्धकाळांत उत्पन्न होणारे चलनविस्तारासारखे प्रश्न समाधानकारकरीतीनें सोडवण्याचा प्रयत्न आपण करून केला असल्याचें सर जरेमी ह्यांनीं असेंब्लींत टीकाकारांस उत्तर देतांना सांगितलें आणि स्वतःच्या मार्गातील दुर्लभ्य अडचणीचा उल्लेख केला. मध्यवर्ती विधिमंडळांत बेजबाबदारी व बेफिकीरपणा ह्यांचें वातावरण सभ्या पसरलें आहे तें जितक्या लवकर दूर होईल तितकें सरकार व जनता ह्यांचे दृष्टीनें आवश्यक आहे.

हिंदुस्थान व ब्रह्मदेश ह्यांच्या सीमेवर लढाऊ हालचाली

ब्रह्मदेशांतील आराकानच्या भागांत हिंदुस्थानांतून गेलेल्या सैन्याची जपानी फौजांशीं लढत चालू असतांच जपाननें मणीपूर संस्थानांत शिरून त्या बाजूनें ह्या देशावर स्वारी केली असल्याचें प्रसिद्ध झालें. ही बातमी सामान्य कल्पनेच्या पलीकडची असल्यानें तिच्या योगानें लोकांस आश्चर्य वाटलें असल्यास त्यांत कांहीं विशेष नाहीं. मध्यवर्ति असेंब्लींत ह्या आश्चर्याचा प्रतिध्वनि उठला आणि सभासदांनीं अधिकृत माहितीविषयीं पृच्छा केली. तिचें समाधान करण्याच्या हेतूनें हिंदुस्थानचे सर सेनापती, जनरल सर क्लॉड ऑकिन्लेक, ह्यांनीं ब्रह्मदेशाच्या सरहद्दीवरील परिस्थिति असेंब्लीस समजावून दिली. हिंदुस्थान आणि ब्रह्मदेश ह्यांच्या सीमेवरील डोंगराळ प्रदेश आणि त्यांतील दलदलयुक्त विलक्षण अडचणी ह्यांचें चित्र त्यांनीं रेखाटलें आणि जपानी सैन्याच्या तुरळक तुकड्या ह्या देशांत थोडें अंतरपर्यंत आंत शिरल्या असल्या तरी त्या हालचालींस ह्या देशावर जपानची स्वारी असें म्हणणें किती अतिशयोक्तीचें आहे हें त्यांनीं दाखवलें. हिंदुस्थानला जपानच्या स्वारीचें मुळींच भय नाहीं आणि शत्रूची चाल लवकरच थोपवण्यांत येईल, एवढेंच नव्हे, तर सरहद्दीच्या पलीकडे स्वस्थळीं त्यास हाकून दिलें जाईल असें सर सेनापतींनीं आश्वासन दिलें. ह्या देशावर स्वारी करतां येण्यासारखें बळ जपानजवळ नाहीं आणि इकडे येऊन प्रगति करणें आणि येथील

मुद्दल दाबून बसणें त्यास शक्य नाही हें स्पष्ट आहे. कांहीं जपानी सैन्य डोंगराळ प्रदेशांतून हा देशांत आलें असलें तरी असल्या तुरळक हल्ल्यास विशेष महत्व देण्याचें प्रयोजन नाहीं. सर सेनापतींनी जबाबदार व अधिकारी वाणीनें आश्वासन दिलें आहे, तें समाधानकारक मानलें पाहिजे.

धान्याचीं पिकें काढण्याची सक्ती

मुंबई प्रांतांत धान्याचें उत्पादन कमाल मर्यादेपर्यंत व्हावें ह्या हेतूनें येथील सरकारानें विशिष्ट भागांत विशिष्ट पिकें काढण्याची सक्ती शेतकऱ्यास करण्याचा उपक्रम हातीं घेण्याचें ठरवलें आहे, त्याकडे लक्ष वेधणें आवश्यक आहे. धान्य पुरवठ्याचे बाबतींत हा प्रांत स्वयंपूर्ण नाही आणि कित्येक जिल्हे विशेष तुटीचे आहेत: सबंद प्रांतास आणि तुटीच्या जिल्हांस बाहेरून आणलेल्या धान्याचा पुरवठा, प्रयत्न करूनहि, न होण्याचा संभव आहे. अशा स्थितींत प्रांतांत व जिल्ह्यानिहाय शक्य तितकें अधिक धान्य पिकवलें जाण्याची आवश्यकता स्पष्टच आहे. शेतकऱ्यांनीं अधिक धान्य पिकवावें म्हणून गेल्या एक दोन वर्षांत जोराचा प्रचार चालला आहे आणि ह्या कामीं बीं व खत पुरवण्याची व्यवस्थाहि सरकारनें केली आहे. तथापि, कपास व तंबासू पिकवण्याची वहिवाट कित्येक जिल्ह्यांत आहे तिला मर्यादा घालून त्यांचे ऐवजीं धान्याचीं पिकें काढण्यास शेतकऱ्यांस प्रवृत्त करण्याचें अगत्य सरकारास वाटत आहे. शेतकऱ्याच्या किती जमीनींत ह्या दोन प्रकारांचीं पिकें लावलीं जावीं हें ठरवण्याचा अधिकार स्वतःकडे घेण्याचें त्यानें ह्याकरितां ठरवलें आहे. एकाच जमीनींत तंबासू किंवा कपास असलें पीक दरवर्षी काढून कांहीं शेतकरी तिची खराबी करण्याची भीति असल्यानें हा प्रकार घडणार नाहीं अशी सक्ती सरकारास करावी लागेल. असल्या सक्तीच्या कायद्याची अंमलबजावणी चोटाळ्याची व कित्येक ठिकाणीं जाचक होण्याचा संभव आहे ह्याची जाणीव सरकारास आहे. शेतकऱ्यांचें सबंद पीक ठराविक स्थिर भावानें खरेदी करण्याची आणि त्याच भावानें त्याचा पुरवठा जरूरीचे प्रसंगीं करण्याची व्यवस्था करून त्यांची गैरसोय किंवा नुकसान होणार नाहीं अशी खबरदारी सरकार घेणार आहे. शेतकऱ्यांसु प्रस्तुत कायद्याच्या अंमलबजावणींत कांहीं सवलती लागतील त्या देण्याचा सरकारचा विचार आहे. नियोजित कायदा हा एक अभिनव उपक्रम आहे आणि कित्येक जिल्ह्यांत पुरेसें धान्य न पिकवलें गेल्यानें तो हातीं घेणें अगत्याचें झालें आहे असें सरकारचें म्हणणें आहे. कोणत्याहि कायद्यासाठीलं नियम आणि त्यांची योग्य अंमलबजावणी ह्या गोष्टी त्यांच्या हेतुपेक्षा अधिक महत्वाच्या असतात हें येथें विसरून चालणार नाहीं. सबंद जनतेचें हित साधलें जात असतां कोणत्याहि शेतकऱ्यास कायदा जाचक होणार नाहीं ह्या विषयीं दक्षता बाळगली गेली पाहिजे.

सोनें बाजारांतील खळबळ

गेल्या आठवड्यांत मुंबईच्या सोनें बाजारांत खळबळ उडून गेली आणि तिचे परिणाम देशांतील प्रमुख शहरीं प्रत्ययास आले. आज कित्येक महिने रिझर्व्ह बँक इंग्लंड व अमेरिका ह्यांचें सोनें हा देशांत विकींत आली आहे आणि त्यामुळें ह्या धातूचे बाजारभाव मर्यादेंत व स्थिर राहिले आहेत. जनतेच्या हातांतलें चलन सोन्याच्या मोबदल्यांत बँकेकडे आकर्षून घेणें हा ह्या विक्रीचा हेतु आहे आणि इंग्लंड व अमेरिका ह्या देशांस हिंदुस्थानचे देणें देऊन टाकण्याची चांगली संधीहि ह्या योगानें मिळाली आहे. सोन्यास हिंदुस्थानांत नेहमीच मागणी असते आणि कांहीं वर्षांमागें येथून कोट्यवधि रुपये किंमतीचें सोनें परदेशीं गेल्यानें सद्यःहू मागणी विशेष तीव्र होणें स्वाभाविक आहे. हातांतला मोकळा पैसा सोन्यांत गुंतवण्याची लोकांची प्रवृत्तिहि युद्धकाळांत बळावते. गेल्या आठवड्यांत सोमवारीं रिझर्व्ह बँकेनें सुमारें पांच लाख तोळे सोनें ७१ रुपयांच्या भावानें विकलें. ही विक्री थांबतांच हा भाव ७२ रुपये ४ आण्यांपर्यंत चढला. दुसरे दिवशीं रिझर्व्ह बँकेनें दोन लक्ष तोळ्यांची ७१ रुपयांच्या दरानें विक्री केली. बुधवारीं एक लक्ष तोळे सोनें विकलें गेलें आणि त्याचा भाव ७२ रुपये करण्यांत आला. किंमतीच्या चढीचा परिणाम सोन्यास जरूर मागणी येऊन त्याचा भाव ८० रुपयांपर्यंत वर जाण्यांत झाला. गुरुवारीं बँकेनें टेंडरच्या पद्धतीनें सुमारें एक लाख तोळे सोनें विकले आणि त्याचा भाव ७८ रुपये पडला. गुरुवारीं भाव ८१ रु. १२ आण्यांपर्यंत चढला. ह्या परिस्थितींत सोन्याच्या खरेदीस सट्टेबाजीचें स्वरूप प्राप्त झालें आणि सर्व मोठ्या शहरांतून व्यापारी लोक सोन्याची मागणी करूं लागले. रिझर्व्ह बँकेत व इंपीरिअल बँकेत खरेदीदारांची सारखी झड लागून राहिली. आठवडा अखेर मागणी ओसरली आणि सोन्याचा भाव पुन्हां ७२–७३ रुपयांवर आला. फिनॅन्स सेक्रेटरी मि. जोन्स ह्यांनी कौन्सिल ऑफ स्टेटमध्यें सोनें-चांदीच्या व्यवहार करणाऱ्या धंदेवाल्यांस उद्देशून असें सांगितलें कीं, सोनें बाजारांतली सट्टेबाजी न थांबल्यास तिच्या विरुद्ध सरकारास कडक उपाय योजावे लागतील. त्यासंबंधांत मुंबईच्या बुलियन एक्सचेंजचें असें म्हणणें आहे कीं, रिझर्व्ह बँकेनें सोन्याची किंमत न बदलतां तें ७१ रुपयांनीं विकण्याचा क्रम चालू ठेवला असता आणि त्या भावानें ठराविक तोळे विकीस रहाण्याचा आपला निश्चय जाहीर केला असता तर बाजारांत गडबड उडाली नसती. ह्या प्रकारचें धोरण रिझर्व्ह बँकेनें चालू ठेवावें अशी एक्सचेंजची सूचना आहे. कांहीं झालें तरी सामान्य जनतेनें सोन्याच्या सट्टेबाजीपासून दूर रहाणें आवश्यक आहे. भावाच्या चढउतारांचा फायदा घेण्याचा यत्न करणें हा सट्टेवाले आणि व्यापारी ह्यांचा धंदा आहे. त्यांत पडण्यांत सामान्य लोकांचें हित नाहीं.

झेकोस्लोव्हेकियांत बनविलेली यंत्रसामुग्री

युद्धापूर्वी हिंदुस्थानांत झेकोस्लोव्हेकियामध्यें बनविलेली यंत्रसामुग्री मोठ्या प्रमाणावर आयात होत असे. स्कोडा वर्क्सची प्रसिद्धि फार पूर्वीपासून आहे. रेल्वे इंजनें, साखर कारखान्यांची यंत्रसामुग्री, टर्बाइन्स, बॉयलर्स, विजेचीं यंत्रें, इत्यादींबद्दल झेकोस्लोव्हेकियाची ख्याति होती. युद्धसमाप्तीनंतर, झेकोस्लोव्हेकियाचीं यंत्रें हिंदुस्थानांत पुनः आयात होऊं लागतील, अशी अपेक्षा आहे. बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेटची मशिनरी झेकोस्लोव्हेकियातूनच आणलेली आहे व ती बसविण्यासाठी त्यांचाच इंजिनियर आला होता, हें प्रसिद्ध आहे.

ब्रिटिश कापडाचा धंदा

ब्रिटिश कपास कापडाच्या धंद्याच्या युद्धोत्तर अडचणींचा विचार करण्यासाठी नेमण्यांत आलेल्या कॉटन बोर्ड कमिटीचा रिपोर्ट त्या धंद्याच्या अडचणींवर प्रकाश पाडतो. लँकेशायरच्या अडचणींचा परिणाम इतर देशांतील धंद्यावर बरा-वाईट होण्याचा संभव असल्याकारणानें रिपोर्टांतिल माहिती हिंदुस्थानांतील लोकांना उद्बोधक वाटेल. १९२८-२९ सालीं जगाच्या व्यापारी एकूण मागणीपैकी ४४% मागणी ग्रेट ब्रिटननें पुरविली, १९३७-३८ मध्यें हें प्रमाण २५%वर घसरलें. ज्या देशांत ब्रिटिश निर्गतीस विशेष सवलती आहेत अशाच ठिकाणीं ब्रिटिश कापड खपूं शकलें. पाऊण शतकाचे अवधींत ब्रिटिश कापडाचा धंदा तिसऱ्या हिश्श्यानें बसला. १९३७ सालीं ह्या धंद्यांत ४,५९,००० लोक गुंतलेले होते. १९४३ सालीं त्यांची संख्या २,४२,००० वर आली. लँकेशायरचा निर्गत व्यापार प्रतिस्पर्ध्यांच्या हातीं जाऊं देणें भाग पडलें. हिंदुस्थानानें १९३७ सालीं ग्रेट ब्रिटनमधून ३२½ कोटि चौरस वार कापड घेतलें; १९४२ सालाचा तत्सम आकडा ६० लक्ष चौरस वार असा आहे! जेथें प्रत्यक्ष युद्ध चालू नाहीं अशा ठिकाणीं कापडाचें उत्पादन वाढलें आहे. ग्रेट ब्रिटनमधील उत्पन्न १९३७ चे मानानें १९४२ सालीं निम्में झालें तर अमेरिकेंत व ब्राझीलमध्यें पुष्कळच वाढलें आहे. हिंदुस्थानानें १९३७ सालीं १२ कोटि चौरस वार कापड निर्गत केलें होतें; १९४२ सालीं ९४ कोटि चौरस वार हिंदी कापड परदेशीं गेलें! ब्राझीलची निर्गत ७० लक्ष चौरस वारांची २५ कोटि चौरस वार झाली! कापडाचा धंदा पूर्वस्थितीस येण्यास कित्येक वर्षे लागतील. वरील माहितीवरून लँकेशायरचे गिरणीवाले युद्धोत्तर काळांत आपलें वस्त्रान पुनः बसविण्याची शिकस्त कां करतील, हें लक्षांत येईल.

सुरत सें. को. बँकेच्या मांडवी शाखेचें उद्घाटन

सुरत जिल्हा को. बँक लि. च्या मांडवी शाखेचें उद्घाटन २५ मार्च रोजीं श्री. आर. जी. सरय्या, ओ. बी. ई., ह्यांच्या हस्तें झालें. बँकेचे चेअरमन, दि. ब. गांधी, ह्यांनीं आपल्या प्रास्ताविक भाषणांत नव्या शाखेसंबंधी अपेक्षा समजावून सांगिल्यानंतर श्री. सरय्या ह्यांनीं भाषण केलें. ते म्हणाले, "सुरत जिल्हा बँकेचा संबंद प्रांतांतील उत्कृष्ट बँकांत अत्यंत वरचा नंबर लागतो. तिचेजवळ शिलकी पैसा मुबलक आहे, परंतु तो सहकारी कामांत तिला गुंतवितां येणें अशक्य झालें आहे. तालुक्यांतील माग्रसलेल्या जातींच्या उद्धारासाठी मांडवी शाखेमार्फत बँकेच्या पैशाचा विनियोग व्हावा असें मला वाटतें." सेल आणि परचेस युनियन व बँक ह्यांचे सहकार्यानें लोकांच्या उद्धाराच्या सहकारी चळवळीचे द्वारां उत्तेजन कसें मिळूं शकेल, हेंहि त्यांनीं स्पष्ट करून सांगितलें.

ओंध म्यूच्युअल लाइफ अॅ. सोसायटी लि. पुणें

वरील म्यूच्युअल विमा कंपनीनें १९४३ मध्यें ३,८५,४५३ रुपयांच्या विम्याचें काम पुरें केलें. १९४२ चे मानानें हा आकडा ११०% वाढ दाखवितो. आयुर्विमा निर्धीत ११,९४६ हजारांची भर पडून तो २९,०७० रुपये झाला आहे. कंपनी स्थापन झाल्यापासून १९४३ अखेर तीन वर्षांत तिचेंकडे एकहि क्लेम आलेला नाहीं, ही विशेष उल्लेखनीय गोष्ट आहे. मेसर्स आर. आर. नाबर आणि कं. चे प्रोप्रायटर श्री. वा. पुं. बर्वे हे कंपनीचे चेअरमन असून श्री. वि. गो. जोशी हे मॅनेजिंग डायरेक्टर आहेत.

दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.

हेड ऑफिस : पुणें शहर.
स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.
मुंबअी शाखा : दलाल स्ट्रीट, फोर्ट.
जळगांव शाखा : नवी पेठ, मेन रोड.
नागपूर शाखा : गोखले बिल्डिंग, सिताबर्डी.

भांडवल

अधिकृत व विकीस काढलेलें	खपलेलें	वसूल झालेलें
रु. १०,००,०००	रु. १०,००,०००	रु. ७,९६,१७०

एकूण खेळतें भांडवल रु. ७४,००,०००

बँकेच्या शेअरवर डिसेंबर १९४३ अखेर ४½% करमाफ डिव्हिडंड दिलें गेलें. बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदी-विक्री कमिशनीनें करून दिली जाते.

बँकेनें रु. ५ प्रीमिअमनें काढलेले सर्व शेअर्स विकले गेले. विशेष माहितीसाठी भेटा अगर लिहा.

सी. व्ही जोग,
B. Com., C. A. I. B., C. A. I. I.,B.
मॅनेजर

जिकडे तिकडे प्रशंसा

ईमिटेशन दागिन्यांवर रासायनिक क्रिया करून खऱ्या सोन्याचा पत्रा चढविला जातो त्यामुळें दागिना कध्धींही खराब होत नाहीं, ही पूर्ण खात्री झाली. सोन्याचा पत्रा चढविलेल्या चार वांगड्या किं. आठ रु. गरजेस्तव दागिना परत करणें झाल्यास वर चढविलेल्या सोन्याचे सर्वच्या सर्व पैसे परत देऊं.

भट कं. सांगली, S. M. C.
भट कंपनी शाखा-बुधवार पेठ, पुणें २.

मलेरियावरील क्रांतिकारक हिंदी शोध

मागोरा पिल्स

अवघ्या ४ दिवसांत मलेरिया थांबतो.

१६ गोळ्यांच्या डबीस रु. १

— १०० गोळ्यांचें पॅकिंगही मिळतें. —

मागोरा केमिकल कं. लि.
टिळक रोड, पुणें २.

पुण्यांतील
आदर्श निवासस्थान व भोजनालय
छाया लॉजिंग व बोर्डिंग हाउस
बुधवार चौक, पुणें २.

महाराष्ट्रांत लेखी गॅरंटी देणारे
पहिले व फक्त १ च
गोल्ड मेडलिस्ट व मराठी वळणाचे स्पेशॉलिस्ट
पेन्टर, वेडेकर, ए. जी.,
बुधवार चौक, पुणें २ (सिटी)
बाहेरगांवची कामें रेल्वे, मोटार अगर पोस्टानें पाठवूं.

प्रगतिपथावरील नवा
मे ला चा — द ग ड
सन १९४३ अखेर
नव्या कामांत ११० टक्के वाढ
चालू कामांत १०० टक्के वाढ
आयुर्विमानिधींत ८० टक्के वाढ
— आपला विमा किंवा एजन्सी आजच घ्या —
दि ऑंध म्यूच्युअल लाइफ ॲश्युरन्स सोसायटी लि., पुणें.
आर. जी. साठे, सुपरिंटेंडेंट
व्ही. जी. जोशी, मॅनेजिंग डायरेक्टर

दि बँक ऑफ इंडिया लि.
[स्थापना : १९०६]
अधिकृत भांडवल ... ... रु. २,००,००,०००
वसूल झालेलें भांडवल ... ... रु. १,००,००,०००
रिझर्व्ह फंड ... ... रु. १,२३,००,०००
मुख्य कचेरी: ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.
मुंबईमधील शाखा: बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.
इतर शाखा: अहमदाबाद (मद्र, मुख्य ऑफिस), अहमदाबाद (एलिस ब्रिज शाखा), अहमदाबाद (स्टेशन शाखा), अमृतसर, अंधेरी (मुंबई शेजारी), बांद्रे (मुंबई शेजारी), कलकत्ता (क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्क्वेअर), जमशेदपूर, कराची, नागपूर (किंग्जवे), नागपूर (इतवारी बझार), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत, भुज (कच्छ).
लंडन एजन्ट्स : वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.
डायरेक्टर्स : सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय्.(अध्यक्ष), श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के. नाईट; मि. ए. गेडिस; सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, जी. बी. ई., के. सी. आय. ई., मि. दिनशा के. दाजी; श्री. रामनिवास रामनारायण.
करंट डिपॉझिट अकाउंट्स :
दररोजच्या रु. १०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षां कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.
विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते; सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अजमावून मागवावेत.
एजंट:—एच्. ए. करीममाई

पैसाच पैसा !

बालकांनो ! बालिकांनो !
नेमका नेम मारा
व "धनुर्धारी" कॉंपिटिशनमधील
बक्षिसें मिळवा
रोख १६० रुपयांचीं वीस बक्षिसें
विशेष माहिती श्रीकृष्णचे मॅनेजरांचे कचेरींत दररोज ४ ते ६ मिळेल.

२३ वा आठवडा !

'प्रकाश' पिक्चर्सचा मराठी बोलपट
रामराज्य
दिग्दर्शक:—विजय भट्ट
भूमिका:—शोभना समर्थ, चंद्रकांत, काळे, सोहनी
श्रीकृष्ण, पुणें दररोज ३ खेळ ३–६॥ व १० वा.
— एव्हरग्रीन प्रकाशन —

हें पत्र पुणें, पेठ शनवार घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' शनवार, घ. नं. ९२४।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर,
खालील पत्त्यावर चौकशी करावी,
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

अर्थ

वर्गणीचे दर,
वार्षिक वर्गणी
रु. ३ .
(टपाल खर्चासह)
किरकोळ अंकास
दोन आणे.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष १० पुणें, बुधवार, तारीख १२ एप्रिल, १९४४ अंक १५

दि ब्रिटिश इंडिया जनरल इन्शुअरन्स कं. लि.
(स्थापना : १९१९)
आम्हीं आयुर्विम्याखेरीज करून आग, मरीन, अपघात, इत्यादींचे सर्व प्रकारचे विमे स्वीकारतों.
—: चेअरमन व मॅनेजिंग डायरेक्टर :—
सर होमी मेहता, के. बी. ई., जे. पी.
पुणें शाखा : मोति माणिक मॅन्शन, लक्ष्मी रोड.
हेड ऑफिस : मेहता हाऊस, अपोलो स्ट्रीट, मुंबई.

पुना गेस्ट हाऊस
१००, लक्ष्मी रोड, पुणें २.
Telephone 779
GUEST HOUSE
TELEGRAM Guest House Poona 2.

स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.
गिरगांव मुंबई नं. ४
महिंद्रकर ब्रदर्स
तयार कपड्याचे व्यापारी
बुधवार चौक, पुणें

विविध माहिती

मिडलंड बँकेचे आठ हजार तरुण नोकर सैन्यांत दाखल

ग्रेट ब्रिटनमधील मिडलंड बँकेच्या नोकरांपैकी २०१ नोकर युद्धाच्या आघाडीवर मरण पावले, २९ बेपत्ता आहेत व १०९ युद्धकैदी झाले आहेत. २५ नोकर ग्रेट ब्रिटनवरील बाँब हल्ल्यास बळी पडले. युद्धास प्रारंभ झाल्यापासून आतांपर्यंत या बँकेच्या नोकरवर्गापैकी ८ हजार तरुण लोक सैन्यांत दाखल झाले आहेत. सध्या बँकेच्या पटावर ११,१०० नोकर आहेत; म्हणजे युद्धपूर्वीच्या मानानें त्यांची संख्या आतां ८५% आहे.

कलकत्ता शहरांतील लष्करी लॉऱ्यांचे अपघात

कलकत्ता शहरांत १९४३ साली मिलिटरी लॉऱ्यांचे १,९८० अपघात झाले, त्यांपैकी १५२ प्राणघातक ठरले. या संबंधांत १९ खटले भरण्यांत आले. त्यांपैकी ३ खटल्यांतील गुन्हेगारांस शासन मिळालें. शहरांतील लष्करी वहातुकीचा घातकीपणा लष्करी अधिकाऱ्यांच्या नजरेस आणण्याचें काम बंगाल सरकारनें केलें आहे.

कोळशाचा साठवडा

ग्रेट ब्रिटनमध्यें कोळशाची एक मोठी पट्टी निदर्शनास आली आहे, तिचा त्या देशांतील कोळशाचा पुरवठा टिकण्यास चांगला उपयोग होणार आहे.

बँक ऑफ इंग्लंडचे नवे गव्हर्नर

बँक ऑफ इंग्लंडचे गव्हर्नर, मि. मॉटेग्यू नॉर्मन, यांनीं प्रकृतीचे कारणास्तव आपल्या जागेचा राजीनामा दिला आहे. त्यांचे जागीं लॉर्ड कॅटो यांची नेमणूक झाली आहे. मि. नॉर्मन हे गेलीं २४ वर्षे बँक ऑफ इंग्लंडचे गव्हर्नर आहेत. ता. १४ एप्रिल रोजीं ते सेवानिवृत्त होतील.

चहाचा साठा

मुंबई शहर व उपनगर यांतील १०० पौंडापेक्षा अधिक चहाचा साठा धारण करणाऱ्यांस दर आठवड्यास आपला साठा सरकारास कळवावा लागत असे. यापुढें तो प्रत्येक महिन्यास कळविण्याचा आहे.

जंगलाचें क्षेत्र वाढविण्याचा विचार

ब्रिटिश हिंदुस्थानाचें क्षेत्रफळ सुमारें ८ लक्ष चौरस मैल आहे. त्यांपैकीं सुमारें १ लक्ष चौरस मैलांत जंगल आहे. आणखी १ लक्ष चौरस मैलांचें जंगल करण्याचा हिंदुस्थान सरकारचा विचार आहे.

अमेरिकेचें रशियाला सहाय

चालू वर्षाच्या पहिल्या दोन महिन्यांत अमेरिकेनें रशियाकडे लेंड-लीज सनदीनें १० लक्ष टन युद्धसाहित्य पाठविलें, १९४२ च्या जानेवारी-फेब्रुवारीचा तत्सम आकडा २ लक्ष टन होता. १९४३ च्या जानेवारी-फेब्रुवारींत ६½ लक्ष टन युद्ध साहित्य रशियाकडे गेलें होतें.

शेतकी कॉलेजांतील विद्यार्थी

पुण्याच्या शेतकी कॉलेजांत येत्या वर्षापासून १०० ऐवजीं १५० विद्यार्थ्यांस प्रवेश मिळूं शकेल.

नवीन लसीचा शोध

रशियांतील शास्त्रज्ञांनीं इन्फ्लुएन्झा प्रतिबंधक लस शोधून काढली आहे.

मुंबई येथील कामगारांच्या राहाणीच्या खर्चाचे मान

जून १९३४ असेरच्या वर्षांतील राहाणीच्या खर्चाचा आकडा १०० मानल्यास फेब्रुवारी, १९४४ मध्यें तो २३० झाला. जानेवारी, १९४४ मध्यें तो २३८ होता. म्हणजे, जानेवारी, १९४४ पेक्षा फेब्रुवारी १९४४ मध्यें महागाई किंचित् कमी होती.

लामडीच्या जमिनींचें नुकसान

व्हेसुव्हियसचा ज्वालामुखी प्रज्वलित झाल्याकारणानें दक्षिण इटलीमधील ५० हजार एकर जमीन चालू वर्षी निरुपयोगी झाली आहे व आणखी २ लक्ष एकर जमिनींचा पूर्णपणें उपयोग होणें अशक्य झालें आहे.

अमेरिकेंत स्त्रियांची वाढती संख्या

अमेरिकेची लोकसंख्या १ जुलै, १९४२ रोजीं, परदेशीं गेलेले सैनिक वगळून, १३ कोटि, ४३ लक्ष भरली. १९४० साली ती १३ कोटि, २८ लक्ष होती. लोकसंख्या वाढत असली तरी तिचेमधील पुरुषांचे प्रमाण घटत आहे. १९४० मध्यें स्त्रियांचे पेक्षा पुरुष ४½ लक्ष अधिक भरले, तर आतां पुरुषांपेक्षा स्त्रिया ६½ लक्ष ज्यास्त आहेत.

इंग्लंडमधील "बचत करा" मोहीम

लहान-मोठ्या रकमांची बचत लोकांनीं करावी आणि त्या सरकारी रोख्यांत गुंतवाव्या यासाठी इंग्लंडमध्यें जोराची मोहीम गेलीं चार वर्षे चालू असून तिला स्पृहणीय यशहि प्राप्त झालें आहे. अशा बचतीची रकम १९४०-मध्यें १२५ कोटि पौंड होती, ती १९४१ मध्यें १७५ कोटि व १९४२ साली १९९ कोटि पौंड भरली. गेल्या वर्षी हा आकडा १९० कोटि पौंड झाला. वरील चार वर्षांत एकूण ६६१ कोटि पौंडांची बचत ब्रिटिश जनतेनें केली. रुपयांमध्यें ही एकूण रकम सुमारें ८,८२० कोटि रुपये होते.

ब्रिटिश बँकांचा नफा

ब्रिटिश बँकांनीं भागीदारांस वाटलेलें डिव्हिडंड यंदां पूर्वीच्या वर्षाइतकेंच आहे. तथापि, त्यांस झालेल्या नफ्यांत थोडी वाढ झाली आहे. सर्वसाधारणपणानें कर देऊन शिलक राहिलेल्या नफ्यापैकी ६० टक्के डिव्हिडंडमध्यें त्यांनीं खर्च केला असून १६ टक्के रिझर्व्हस (मामुली आणि खास) मध्ये, ८ टक्के मालमत्ता व रिपेअर्ससाठी, सुमारें ६ टक्के युद्धपरिस्थिति रिझर्व्हसाठी, ७ टक्के पेन्शनांसाठी व २½ टक्के पुढील साली ओढण्यासाठी अशी त्याची वाटणी करण्यांत आली आहे. या आकड्यांवरून ब्रिटिश बँकांच्या साधनसंपत्तीच्या घोरणाची कल्पना येते.

सोन्याच्या किंमतीमधील वाढीचा बँकांवर परिणाम

सोन्याच्या वाढत्या मागणीमुळें बँकांकडेहि पैशाची मागणी ज्यास्त आली, त्याचा परिणाम शेड्यूल्ड बँकांच्या रिझर्व्ह बँकेकडील ठेवींवर झाला; हें खालील तक्त्यावरून स्पष्ट होईल:—

१९४४	रिझर्व्ह बँकेकडील ठेवी (कोटि रु.)
जानेवारी पहिला आठवडा	८८·७२
फेब्रुवारी "	७५·३७
मार्च "	५७·०८
२४ मार्च	५३·४२
३१ मार्च	४९·९१

बँकांकडे सरकारी रोखे व सोनें यांच्या तारणावरील कर्जमागणीचे अर्ज पुष्कळ आले व बँकांची त्यांतील गुंतवणूक झपाट्यानें वाढली.

अनुक्रमणिका

	पृष्ठ		पृष्ठ
१ विविध माहिती	... ११४	५ स्फुट विचार	... ११७
२ ब्रिटिश बँकांची परिस्थिति आणि भवितव्य	... ११५	कापसाचें धंद्यांत, नकेबाजी—विरजीवाल्यांच्या तक्रारी—हिऱ्यांचा जागतिक व्यापार	
३ वैद्यकीय उपचारांच्या सोयी	... ११६	६ माल घेणाराची सोय पहा	११८
४ उद्योगधंदे कोणते काढा !	११६	७ पुनः आखूड कपास !	११९

अर्थ

बुधवार, ता. १२ एप्रिल १९४४

ब्रिटिश बँकांची परिस्थिति आणि भवितव्य

(१)

इतर धंद्यांप्रमाणें बँकांच्या व्यवहारावर युद्धपरिस्थितीचें विशिष्ट परिणाम झाले आहेत आणि त्या संस्थांस स्वतःची व्यवस्था नवीन चढामोडींशीं जुळती करून घ्यावी लागली आहे. लोकांकडून येणाऱ्या वाढत्या ठेवी आणि सरकारी रोख्यांत अधिक गुंतवण हे बँकांच्या व्यवहारांत दिसून येणारे ठळक युद्धकालीन बदल असल्याचा अनुभव हिंदुस्थानांत येत आहे. हा संबंधांत ब्रिटिश बँकांची स्थिति कोणत्या प्रकारची आहे याची तुलनात्मक माहिती बोधप्रद झाल्यावांचून रहाणार नाहीं. ह्या बँकांचे गेल्या डिसेंबर अखेरचे ताळेबंद प्रसिद्ध झाले आहेत आणि त्यांच्या अध्यक्षांनीं स्पष्टीकरणार्थ केलेली भाषणेंहि आतां उपलब्ध आहेत. आपल्या बँकांची सद्यःस्थिति कशी आहे आणि युद्धोत्तर काळांत त्यांचेपुढें कोणते प्रश्न उभे रहाणार आहेत याची चर्चा ह्या अध्यक्षांनीं केलेली आहे आणि ती विचारप्रवर्तक आहे. ह्या देशांत बँकांचा विस्तार सध्या झपाट्यानें चालला आहे आणि त्यांनींहि युद्धोत्तर परिस्थितीस तोंड देण्याच्या प्रश्नाचा काळजीपूर्वक विचार करणें आवश्यक आहे. युद्धसमाप्तीनंतर जागतिक व राष्ट्रीय आर्थिक स्थितीची घडी नीट बसण्याचे मार्ग इतर धंद्यांप्रमाणें बँकांसहि शोधले पाहिजेत. ब्रिटिश बँकिंगच्या नेत्यांनीं ह्या मोहीकडे लक्ष दिलें आहे आणि आपल्या उद्योगाचें स्थान टिकवण्यासाठी योजावयाच्या उपायांचें चिंतन ते करीत आहेत. लंडनमधील प्रमुख बँकांच्या ताळेबंदांतील व्यवहाराचे ठळक आकडे तुलनात्मक रीतीनें खाली दिले आहेत, त्यांवरून युद्धपरिस्थितीचा परिणाम त्यांचेवर कसा झाला आहे हें दिसून येईल:—

(आकडे दशलक्ष पौंडांचे आहेत)

वर्ष अखेर	१९३८	१९४०	१९४२	१९४३
ठेवी ...	२,२५४	२,८००	३,६२९	४,०३२
रोकड ...	२४३	३२४	३९०	४२३
वाटेवरील बाबी ...	७१	१३५	१८६	२०१
अल्प मुदत कर्जे...	१५९	१५८	१४२	१५१
हुंड्या ...	२५०	२६५	१९३	१३३
ट्रेझरी रिसीट्स ...	...	३१४	८९६	१,३०७
त्वरित येणें	७२३	१,१९६	१,८१२	२,२१४
„ % ...	३२%	४२%	४९.९%	५४.९%
रोख्यांत गुंतवण...	६३१	७७१	१,१२०	१,१५४
कर्जे ...	९६६	९०६	७७३	७४३

युद्धाचे प्रारंभापासून ब्रिटिश बँकांच्या व्यवहारांस नवीन वळण लागलें तेंच ठळक रीतीनें गेल्या सालीं त्यांच्या ताळेबंदांत दृष्टीस येतें. बँकांकडील लोकांच्या ठेवी वाढून त्यांनीं १९४३ मध्यें उच्चांक गाठला आणि त्यांची रक्कम ४०३ कोटि पौंडांवर (सुमारें साडेपाच हजार कोटि रुपये) गेली. त्यांनीं दिलेल्या कर्जांत पुन्हां घट झाली आणि ट्रेझरी डिपॉझिट रिसीटसमधली रक्कम वाढली. तरत्या व तात्काळ हातीं येणाऱ्या पैशाचें प्रमाण पुष्कळच चढलें आहे. रोकड, हुंड्या, इत्यादींच्या येण्याचें ठेवींशीं प्रमाण युद्धापूर्वी ३० टके असलें म्हणजे तें योग्य आहे असें म्हणण्याचा प्रघात होता. पण हें प्रमाण, विशेषतः ट्रेझरी डिपॉझिट रिसीटसमध्यें बँका गुंतवण करूं लागल्यानें, ५५ टक्क्यांपर्यंत चढलें आहे. बँकांच्या तरत्या पैशाच्या प्रमाणांत विलक्षण वाढ युद्धपरिस्थितींत झाली आहे हा त्याचा अर्थ आहे; आणि त्याच मानानें बँकांचा मुख्य व्यवहार कर्जे देण्याचा असतो, तो मर्यादित झाला आहे हें स्पष्ट आहे.

बँकिंगच्या व्यवहारांतली ही मंदी कशी दूर होईल आणि आपला पैसा पुन्हां व्यापाराच्या व उद्योगधंद्यांच्या मदतीसाठी कसा कर्जाऊ दिला जाईल याकडे बँकर्सचें लक्ष लागलें आहे. लॉइड्स बँकेचे अध्यक्ष, लॉर्ड वॉर्डिंग्टन, यांनीं म्हटल्याप्रमाणें सध्या बँकांचे ताळेबंद ' इनव्हेस्टमेंट ट्रस्ट्स ' च्या म्हणजे रोख्यांत व कंपन्यांच्या भागांत पैसा गुंतवण्याचा धंदा करणाऱ्या मंडळांच्या ताळेबंदासारखे झाले आहेत. त्यांच्या मतें युद्धसमाप्तीनंतर आर्थिक पुनर्रचना हातीं घ्यावी लागेल आणि तिच्यासाठी भांडवलास मागणी उत्पन्न होईल ती कर्जांच्या मार्गानें भागवण्याची संधी बँकांस मिळेल. नवीं घरें बांधलीं जातील, रस्ते करण्यांत येतील आणि यंत्रसामुग्रीची पुनर्घटना होईल. येथें बँकांचा पैसा गुंतूं शकेल. हिंदुस्थानांत ह्या दिशेच्या संवर्धनास पुष्कळच वाव आहे हें खरें आहे. तथापि, दुसऱ्या बाजूस कांहीं बाबी आहेत, त्याहि हिशेबांत घेतल्या जावें अगत्याचें आहे. व्यक्तींचा व कंपन्यांचा पैसा आज ठेवींमध्यें अडकला आहे तो युद्धसमाप्तीनंतर आर्थिक पुनर्रचनेंत घातला जाईल हें विसरतां कामा नये. सरकारच्या ठेवी आज सरकारपाशीं ठेवण्यांत येत आहेत, त्या युद्धसमाप्तीनंतर मोकळ्या होतील आणि त्यांचा उपयोग करणें कंपन्यांस सोयीचें व फायद्याचें होईल. ह्या कारणानें ब्रिटिश बँकांनीं दिलेल्या कर्जांत फार मोठी वाढ होईल अशी अपेक्षा करणें सुरक्षित नाहीं, असें वाटण्यास जागा आहे. मात्र आर्थिक संवर्धनाची मोठी योजना हिंदुस्थानांत हातीं घेतली गेल्यास बँकांच्या साहाय्याची त्यांत आवश्यकता भासेल.

वैद्यकीय उपचाराच्या सोयींची आवश्यकता

डायरेक्टर जनरल ऑफ मेडिकल सर्व्हिस, जनरल हॅन्स, हांनीं आपल्या दिल्ली येथील एका भाषणांत, प्रत्येक देशाच्या सरकारनें आपल्या प्रजेच्या आरोग्याकरितां किमान कोणत्या गोष्टी केल्या पाहिजेत, ह्याची एक तपशीलवार यादी दिली. तिचेवरून हिंदुस्थानांत ह्यासंबंधांत सरकारी प्रयत्न अद्याप किती मोठ्या प्रमाणावर होणें आवश्यक आहे, ह्याची कल्पना येईल. त्यांच्या म्हणण्याप्रमाणें प्रत्येक नागरिकास खालील सोयी उपलब्ध पाहिजेत:—

(१) नेहमीं
- (अ) पुरेशा व स्वच्छ पाण्याचा पुरवठा
- (ब) पुरेशा स्वच्छतेचा अन्नपुरवठा
- (क) आरोग्यदायक घर
- (ड) ज्या रोगांचा प्रतिबंध होऊं शकेल अशांपासून संरक्षण.

(२) आजारी पडल्यावर—अचूक रोगनिदान व जरूर ती शुश्रूषा.

प्रत्येक स्त्रीला—
- (अ) गर्भवती असतांना योग्य काळजी व सल्ला.
- (ब) प्रसूतीचे वेळीं सहाय्य.
- (क) बाळंतपणीं आईची व अर्भकाची तज्ज्ञाकरवीं काळजी.

प्रत्येक मुलास—
- एकसारखी वैद्यकीय देखरेख व जरूर तेव्हां उपचार.

वरील ध्येय आपल्या आवाक्याबाहेरचें आहे, असा समज होण्याचा संभव आहे. परंतु रशियांतील २० वर्षांपूर्वीची परिस्थिति हिंदुस्थानच्या आजच्या परिस्थितीसारखीच असतांना त्यानें वरील गोष्टी साध्य केलेल्या आहेत. हिंदुस्थानांतील दळणवळणाचीं साधनें रशियांतील त्या वेळच्या साधनापेक्षां चांगलीं आहेत, ही अनुकूल बाजूहि येथें ध्यानांत बाळगली पाहिजे. डॉक्टर, परिचारिका, दायी, इस्पितळें, ह्या सर्वच बाबतींत हिंदुस्थानाची प्रगति अद्याप पुष्कळच व्हावयाची आहे.

नवीन उद्योगधंदे कोणते काढा ?

ऑल इंडिया मॅन्युफॅक्चरर्स ऑर्गनायझेशननें सर विश्वेश्वरय्या ह्यांचे नेतृत्वाखालीं प्रत्येक प्रांतांत मूलग्राही उद्योगधंदे स्थापन होण्याविषयींच्या प्रचाराचें महत्त्वाचें कार्य चालविलें आहे. मोटारी, विमानें, आगबोटी, इंजनें, कारखान्यास लागणारी यंत्रसामुग्री, मशीन टूल्स, लोसंड व पोलाद, वीज, युद्धसाहित्य, ॲसिडें, क्लोरिन, सोडा ॲश, रंग, रेयॉन्स इत्यादींच्या उत्पादनाचे धंदे हे मूलग्राही उद्योगधंदे मानण्यांत आले आहेत, व त्यांच्या प्रगतीवर कोठल्याहि देशाची औद्योगिक भरभराट अवलंबून असते. ह्यासंबंधांत एक छोटेखानी पुस्तक ऑ. इं. मॅ. ऑर्गनायझेशननें प्रसिद्ध केलें आहे व त्यांत प्रत्येक प्रांतांतील विद्यमान मूलग्राही धंदे व योजिलेले धंदे ह्यांची माहिती दिली आहे. मुंबई प्रांतांत कपास कापडाच्या गिरण्या ह्याच अर्थानें आज महत्त्वाच्या आहेत. संबंध हिंदुस्थानांतील कपास कापडाच्या गिरण्यांत गुंतलेल्या भांडवलाच्या ५०% पेक्षां अधिक भांडवल एकट्या मुंबई प्रांतांतील गिरण्यांत गुंतलेलें आहे.

दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.

हेड ऑफिस : पुणें शहर.
स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.
मुंबई शाखा : दलाल स्ट्रीट, फोर्ट.
जळगांव शाखा : नवी पेठ, मेन रोड.
नागपूर शाखा : गोखले बिल्डिंग, सिताबर्डी.

भांडवल

अधिकृत व विकीस काढलेलें	खपलेलें	वसूल झालेलें
रु. १०,००,०००	रु. १०,००,०००	रु. ४,९६,१००

एकूण खेळतें भांडवल रु. ७४,००,०००

बँकेच्या शेअरवर डिसेंबर १९४३ अखेर ४½% करमाफ डिव्हिडंड दिलें गेलें. बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदी-विक्री कमिशनीनें करून दिली जाते.

बँकेनें रु. ५ प्रीमिअमनें काढलेले सर्व शेअर्स विकले गेले. विशेष माहितीसाठी भेटा अगर लिहा.

सी. व्ही जोग,
B. Com., C. A. I. B., C. A. I. I. B.
मॅनेजर

जिकडे तिकडे प्रशंसा

इमिटेशन दागिन्यांवर रासायनिक क्रिया करून खऱ्या सोन्याचा पत्रा चढविला जातो त्यामुळें दागिना केव्हांही खराब होत नाहीं, ही पूर्ण खात्री झाली. सोन्याचा पत्रा चढविलेल्या चार बांगड्या कि. आठ रु. गरजेस्तव दागिना परत करणें झाल्यास वर चढविलेल्या सोन्याचे सर्वच्या सर्व पैसे परत देऊं.

भट कं. सांगली, S. M. C.
भट कंपनी शाखा—बुधवार पेठ, पुणें २.

पुण्यांतील
आदर्श निवासस्थान व भोजनालय
छाया लॉजिंग व बोर्डिंग हाउस
बुधवार चौक, पुणें २.

मलेरियावरील क्रांतिकारक हिंदी शोध
मागोरा पिल्स
अवघ्या ४ दिवसांत मलेरिया थांबतो.
१६ गोळ्यांच्या डबीस रु. १
— १०० गोळ्यांचें पॅकिंगही मिळतें. —
मागोरा केमिकल कं. लि.
टिळक रोड, पुणें २.

स्फुट विचार

कापडाचे धंद्यांत नफेबाजी

बाजारभावांचें नियंत्रण सरकारनें केलें तरी तें प्रभावी होत नाहीं आणि त्याच्या अंमलबजावणींत धंदेवाल्यांस पळवाटा सापडतात तोंपर्यंत गिऱ्हाइकांस सरकारी धोरणाचा पुरेसा फायदा मिळत नाहीं आणि महागाईचा जाचकपणा शिल्लक रहातो. कापड व्यापाऱ्यांनीं माल विक्रीस काढला पाहिजे आणि त्यावर छापलेल्या किंमतीस तो विकला पाहिजे असा निर्बंध सरकारनें घातल्यामुळें किंमती थोड्या उतरल्या. तथापि, नियंत्रणाच्या कचाटींतून कांहीं धंदेवाले निसटत असल्याचें दिसून आलें असून त्यांचे विरुद्ध उपाययोजना करण्याची आवश्यकता भासली आहे. कापड नियंत्रण समितीची बैठक गेल्या आठवड्यांत मुंबई येथें भरली होती, त्यावेळीं ह्या प्रश्नाचा विचार झाला आणि टेक्सटाईल कमिशनरला नियंत्रणाच्या कडक अंमलबजावणीचे कामीं सहाय देण्याचें ठरलें. समितीचे अध्यक्ष, श्री. कृष्णराज ह्यांनीं गिरण्यांचें, त्यांनीं अलीकडे कापडाच्या किंमती आणखी उतरवल्याबद्दल अभिनंदन केलें आणि त्यांचेवर होणाऱ्या प्रतिकूल टीकेचा अन्यायीपणा निदर्शनास आणला. कापडाचें नियंत्रण मुळांतच बेताचें यशस्वी होत असतां तेंहि निष्फळ करणाऱ्या कांहीं गिरण्या व व्यापारी ह्यांचा त्यांनीं निषेध केला आणि ह्या बाबतींत कडक उपाय तात्काळ न योजले गेल्यास नियंत्रणाचा सर्वच ग्रंथ आटपणार आहे असें स्पष्ट सांगितलें. सामान्य जनतेच्या हिताच्या दृष्टीनें हा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा व तातडीचा आहे. गिरणीवाल्यांच्या प्रमुख प्रतिनिधींनेंच कापडाच्या बाजारांत चाललेल्या गर्ह नफेबाजीचें आविष्करण करून तिच्याविरुद्ध कडक उपाययोजनेचें अगत्य प्रतिपादिलें ही गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. कापड, गिरण्या व मोठे बाजार ह्यांतून लहान गांवांत जाऊन पोहोचण्याचे मार्गांत वहातुकीच्या अडचणी येत आहेत त्यांचेकडे श्री. कृष्णराज ह्यांनीं हिंदुस्थान सरकारचें लक्ष वेधलें आणि दगडी कोळशाच्या तोकड्या पुरवठ्याचा कापडाच्या उत्पादनावर होत असलेल्या अनिष्ट परिणामाचाहि उल्लेख केला.

गिरणीवाल्यांच्या तक्रारी

कापड व सूत ह्यांच्या बाजारांतील नफेबाजीचें जें कृष्णचित्र श्री. कृष्णराज ह्यांनीं रंगविलें आहे त्यायोगानें गिरणी मालक व घाऊक व्यापारी ह्यांचेविषयीं महागाईनें गांजलेल्या जनतेस सहानुभूति वाटणें कठिण आहे. कृष्णकारवाया करणारे धंदेवाले अल्पसंख्याक असले तरी त्याचे योगानें कापडाच्या सबंद धंद्यास वट्टा लागण्याची भीति आहे हें विसरतां कामा नये. टेक्सटाईल कमिशनरनीं पांच सहा गिरण्या व चाळीस घाऊक व्यापारी ह्यांचे विरुद्ध उपाय योजले आहेत आणि ह्या प्रकरणीं त्यांस अधिक अधिकार देण्यांत आले आहेत. त्यांस पाठिंबा देण्याचें गिरणीवाल्यांच्या प्रतिनिधींनीं अभिवचन दिलें आहे ह्यामुळें कापडनियंत्रण अधिक कडक व फलद्रूप होण्याची आशा उत्पन्न होत आहे. छिटाचें कापडनियंत्रण योजनेंतून वगळलें गेलें आहे ह्या गोष्टीचा अवास्तव फायदा कित्येक धंदेवाले घेत आहेत त्यांचा बंदोबस्त सरकारांनीं करावा असें सुचवण्यांत आलें आहे. वहातुकीच्या सोयी करून देऊन देशाच्या सर्व भागांत कापडाची वाटणी व्यवस्थित रीतीनें होईल अशी तजवीज सरकारनें करणें ही सूचना योग्य आहे. डोंगराळ व अडचणीच्या प्रदेशांत कापड विकणारांस कूस राहील ह्या बेतानें मालाच्या किंमती ठरवल्या जाव्या हेंहि सरळ आहे. स्थानिक जकाती, मालविक्रीवरील कर इत्यादीमुळें धंदेवाल्यांस मिळणारा नफा वाजवीपेक्षा अधिक मर्यादित होतो ही तक्रार विचार करण्यासारखी आहे. जादा नफ्याच्या सध्याच्या योजनेमुळें गिरण्यांस युद्धापूर्वीच्या कालाचे मानानें निम्मा नफा सुटत नाहीं आणि ह्यायोगानें त्यांस उत्पादनाचे बाबतींत उत्साह वाटत नाहीं ह्या गोष्टीकडे श्री. कृष्णराज ह्यांनीं हिंदुस्थान सरकारच्या फडनविसांचें लक्ष वेधलें आहे. गिरण्यांच्या धंद्यास यंत्रसामुग्रीच्या दुरुस्तीसाठी वगैरे पैशाचा पुरवठा करण्याची सवड ठेवण्यांत आली नसल्यानें त्यावर विलक्षण ताण पडत असून त्यांचें भवितव्य धोक्यांत येण्याचा संभव आहे, ह्यासाठी फडनविसांनीं आपल्या करविषयक धोरणाचा फेरविचार करावा असें त्यांनीं म्हटलें आहे. आतांपर्यंत गिरण्यांनीं मिळवलेल्या नफ्याकडे आणि सर्व जनतेवर पडणाऱ्या आर्थिक बोजाकडे पाहिलें असतां ही ओरड किती साधार आहे ह्याचा विचार करावा लागेल.

हिऱ्यांचा जागतिक व्यापार

दागिन्यांत हिऱ्यांचा उपयोग होतो, तसा तो उद्योगधंद्यांतहि होतो. युद्धकाळांतहि सोनें-चांदीस मोठी मागणी असून ह्या धातूंची किंमत वाढलेली आहे, तेव्हां हिऱ्यांचा व्यापार आणि उपयोग युद्धाच्या कठिण परिस्थितींत बंद पडला नसल्यास त्यांत आश्चर्य नाहीं. १९४३ सालांत हिऱ्यांच्या व्यापाराची उलाढाल २० ते २५ कोटि रुपयांपर्यंत सबंद जगांत झाली असल्याचा अंदाज आहे. १९३८ मध्यें हा आकडा फक्त ५ कोटींचा आणि १९४२ सालीं १३ कोटींचा होता. हिऱ्यांचें जागतिक उत्खनन १९४० मध्यें १ कोटि ३० लक्ष मेट्रिक कॅरॅटस होतें तें १९४२ सालीं ९२ लक्ष कॅरॅटसपर्यंत खालीं आलें आणि गेल्या वर्षी तें सुमारें १ कोटि कॅरॅट्स झालें असावें असा अजमास आहे. हें जागतिक उत्पादन प्रामुख्यानें पश्चिम आणि दक्षिण आफ्रिकेंत होतें व चालू सालीं त्यांत विस्तार होण्याचा रंग आहे. हिऱ्यांच्या जागतिक उत्पादनाची १९४२ सालीं सुमारें ९ कोटि रुपये इतकी किंमत भरली आणि १९४३ बाबतचा तत्सम आकडा ह्याहून मोठा असण्याचा संभव नाहीं. हिऱ्यांच्या जागतिक साठ्यांत गेल्या दोन वर्षांत बरीच घट झाली आहे, तथापि त्यांच्या व्यापारास धोका येण्याचा संभव नाहीं. बाजारासाठी पक्के हिरे तयार करण्याचा धंदा युद्धापूर्वी मुख्यत्वेंकरून ॲम्स्टरडॅम व ॲंटवर्प येथें चालत असे, तो युद्धपरिस्थितीमुळें इंग्लंड, अमेरिका, पॅलेस्टाइन व दक्षिण आफ्रिका ह्या देशांत विभागला गेला असून युद्धोत्तर काळांत तो आपल्या हातीं ठेवण्याचा ह्या देशांचा प्रयत्न आहे. तथापि, हॉलंड व बेल्जम ह्यांचें हिऱ्यांच्या धंद्यांतलें स्थान पूर्ववत् प्रस्थापित व्हावें अशीहि खटपट चाललेली आहे. बेल्जम कॉंगोमध्यें हिऱ्यांचें उत्खनन फार मोठ्या प्रमाणांत होत असल्यानें बेल्जमचें प्राबल्य नाहींसें होणें अशक्य आहे.

माल घेणाराची शोध पहा

बूथबेल मेन कंपनी लि. चे मॅनेजिंग डायरेक्टर मि. हेंपसन ह्यांनी एका स्पॅनिश व्यापाऱ्यास "तूं ब्रिटिश मालाचा व्यापार का करीत नाहींस?" असें विचारलें. त्यावर तो म्हणाला, "तुम्ही विकण्यास उत्सुक दिसत नाही. प्रत्येक यार्डास ७½ पेन्स, अथवा प्रत्येक हंड्रेडवेटला १२३ शिलिंग वजा २५% अधिक १०% वजा २%, एफ. ओ. बी. लिव्हरपूर, रेल्वे व शिपिंगच्या पावत्या रोखीनें सोडवून घेणें, अशा किचकट प्रकारचा तुमचा व्यवहार असतो. तुमचा जर्मन प्रतिस्पर्धी मला पिसेटोजमध्यें (स्पेनचें नाणें) व किलोग्रॅममध्यें (स्पेनमधील वजन) किंमत सांगतो; रेल्वे व शिपिंगचें भाडें, विमा, आयात जकात, इत्यादि सर्व भरून घरबोच माल तो आणून देतो. ह्याशिवाय ६० दिवसांच्या हुंडीच्या आधारावर तो मला पैसे भरण्याची सवड देतो. तुमच्या मालापेक्षा जर्मन माल जास्त चांगला असतो, हें मला मान्य आहे. कदाचित तुमचा माल स्वस्तहि पण असेल. परंतु, ७½ पेन्स म्हणजे मी काय समजूं? एक यार्ड म्हणजे किती मीटर व हंड्रेडवेटांत किती किलोग्रॅम असतात, ह्याचा हिशेब प्रत्येक वेळेस कोण करणार? लिव्हरपूलपासून ह्या बंदरापर्यंतच्या माझ्याचा आकार पिसेटाजमध्यें किती होतो? माल मिळण्यापूर्वी त्याची किंमत मी देऊं शकतों, परंतु ब्रिटिश व्यापाऱ्यांनीं मला ६० दिवसांची उधारी दिली, तर बँकेचें डिस्कौंट व इतर चार्जेस भरूनहि मी पुष्कळ बचत करूं शकेन." परदेशी व्यापाऱ्यांच्या अडचणींचें ब्रिटिश व्यापाऱ्यांनीं काळजीपूर्वक निरीक्षण केलें पाहिजे, हें सांगताना मि. हेंपसन ह्यांनी वरील उदाहरण दिलें. "ही माझी किंमत; बाटेल तर घे नाहीं तर नको" ह्या पद्धतीनें ह्यापुढें व्यापार चालणार नाहीं. आतांपर्यंत निर्गत व्यापारावर ब्रिटिशांची भरभराट झाली, परंतु विक्रीच्या तंत्रांत सुधारणा घडवून आणणें अधिकाधिक आवश्यक होत आहे त्याकडे ब्रिटिश व्यापाऱ्यांनीं लक्ष द्यावें, अशी त्यांची सूचना आहे.

श्री. गोखले स्टॉक एक्सचेंजचे सभासद झाले

महाराष्ट्र बँकेचे पूर्व व्यवस्थापक श्री. म. वि. गोखले ह्यांना मुंबईच्या स्टॉक एक्सचेंजनें सभासद म्हणून निवडलें आहे. स्टॉक एक्सचेंजच्या सुमारें ४०० सभासदांपैकीं महाराष्ट्रीय सभासदांची संख्या दहा-बारा सुद्धां नाहीं व त्यांत श्री. गोखले ह्यांची भर पडली आहे: त्यांची कचेरी २१, वटाल स्ट्रीट, कोट, मुंबई, येथें आहे.

कलकत्ता शहरांतील कोळशाचा तुटवडा

कलकत्ता शहरांतील कोळशाच्या तुटवड्याची कारणमीमांसा बंगाल विधिमंडळांत नुकतीच करण्यांत आली, त्या वेळीं मंत्रि मि. सुरावर्दी म्हणाले, "गेल्यावर्षी दरमहा ३,६०० वाघिणी मिळत असत. गेल्या नोव्हेंबरपासून त्यांची संख्या २,००० करण्यांत आली. मार्च १९४४ मध्यें ती १९४२ करण्यांत आली; त्यापैकीं फक्त ९६० वाघिणी कलकत्त्याच्या वाट्यास येत. जानेवारीपासून दरमहा ९०० पेक्षा कमी वाघिणी कोळसा येऊं लागला; जानेवारींत ६११ व फेबुवारींत ५२८ वाघिणी कोळसा आला. मूळ योजनेप्रमाणें वाघिणी येत नाहींत, त्यास बंगाल सरकार जबाबदार नाहीं."

अर्थशास्त्र

लेखक—प्रो. वा. मो. काळे व प्रो. ह. मो. कर्वे

पृष्ठसंख्या सुमारें १००, किंमत १ रुपये

या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वमान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

महाराष्ट्राची पहिली शेडयूल्ड बँक

न्यू सिटिझन बँक ऑफ इंडिया लि.

(हेड ऑफिस : मुंबई)

अधिकृत भांडवल : १०,००,००० रु.
रोख जमा झालेलें भांडवल : ६,००,००० रु.

एकूण खेळतें भांडवल : ९५,००,००० रु.

—: शाखा :—

सोलापूर, नाशिक, नाशिक रोड, देवळाली, कोल्हापूर, इचलकरंजी, सांगली, मिरज, महाड, लोणंद, अहमदनगर, पुणें, धुळें, जळगांव, दिल्ली, अमरावती, मालेगांव, सिन्नर, संगमनेर.

D. N. Gandekar, B.A., LL.B. — पुणें ब्रँच मॅनेजर
D. D. Deshpande, B.A. — मॅनेजिंग डायरेक्टर

रक्तवर्धक प्रमाणेंच लोकप्रिय

दोन उपयुक्त औषधें.

ओजस — पौष्टिक पेयान्न

आबाल वृद्ध स्त्रीपुरुषांस उपयुक्त

मुलांचे करितां — अँटी ग्राइप मिक्श्चर

दांत सुलभतेनें येण्यावर व मुलांचे अपचनाचे विकारावर

केंद्रें—मुंबई, पुणें, नागपूर, अमरावती, सांगली, कोल्हापूर, हुबळी.

पुणें मुख्य दुकान—गणपती चौक, लक्ष्मीरोड पुणें.

आयुर्वेद रसशाळा

पुणें लि० पुणें ४.

पुनः आखूड धाग्याच्या कपाशीची लागवड !

आखूड धाग्याच्या कपाशीऐवजीं लांब धाग्याच्या कपाशीचें उत्पादन हिंदुस्थानांत कसें वाढत आहे, व दर एकरी उत्पादनांतहि हळुहळु कशी सुधारणा होत आहे ह्याची माहिती इंडियन सेंट्रल कॉटन कमिटी, मुंबईचे सेक्रेटरी श्री. मेहता ह्यांनीं एकत्रित करून त्याचा निबंध लंडनच्या रॉयल सोसायटी ऑफ आर्टसकडे पाठविला, तो त्या सोसायटीच्या सभेंत त्यांचेतर्फे सर फ्रँक नॉइस ह्यांनीं वाचून दाखविला. श्री. मेहता ह्यांनीं दिलेल्या माहितीस सर फ्रँक नॉइस ह्यांनीं आपल्या नंतरच्या भाषणांत पुस्ती जोडून इंडियन सेंट्रल कॉटन कमिटीच्या कार्याचें त्यांनीं सविस्तर वर्णन केलें. हिंदी कपाशीचें उत्पादन व त्याचा गिरण्यांतील उठाव हीं चित्ररूपानें त्यांनीं पडद्यावर दाखविलीं. मि. रूडॉल्फ ॲन्स्टेड ह्यांनीं हिंदी आंखूड धाग्याच्या कपाशीच्या युद्धोत्तर परिस्थितीसंबंधीं काढलेले उद्गार महत्त्वाचे आहेत. "अमेरिका व युरोप येथील लोकांच्या कपड्यांत फारच मोठा बदल घडून येण्याचा संभव दिसतो. कपाशीची जागा कृत्रिम रेशीम घेईल, इतकेंच नव्हे तर रेयॉनप्रमाणें नेयॉनहि येईल. कृत्रिम रेशमाच्या बनावटीस सेल्युलोज लागतें, त्याकरितां आंखूड धाग्याची कपास मोठ्या प्रमाणावर उपयोगांत येईल. असें झालें, तर हिंदुस्थानांत पुनः आंखूड धाग्याच्या कपाशीस उत्तेजन देण्याचा प्रसंग येईल, कारण तिची लागवड सोपी आहे व कृत्रिम रेशमाचे संबंधांत धाग्याची लांबी महत्त्वाची नाहीं. कॉटन कमिटीला हा प्रश्न आणखी २५ वर्षे पुरेल."

लांब धाग्याच्या कपाशीस उत्तेजन

सुमारें २० वर्षांपूर्वी १ इंच व त्यापेक्षां जास्त लांब धाग्याच्या कपाशीचें हिंदुस्थानांत उत्पादन जवळ जवळ नव्हतेंच, असें म्हटलें तरी चालेल. १९४१–४२ मध्यें तें उत्पादन ४,१५००० गांठी भरलें. १९४२–४३ मधील उत्पादनाचा आकडा ५,००,००० गांठीचे आसपास आहे. आंखूड धाग्याच्या (¾" व त्यापेक्षां कमी लांबीच्या) कपाशीच्या उत्पादनाचा १९२३–२६ मधील वार्षिक सरासरीचा आकडा ३७,०१,००० गांठी होता; १९४१ ४२ मध्यें तो २४,५८,००० झाला व १९४२–४३ मध्यें तो १२,५५;००० गांठींवर आला. म्हणजे, एकूण उत्पादनाशीं आंखूड धाग्याच्या कपाशीच्या उत्पादनाचें प्रमाण ६४% वरून ४१% व त्यावरून २८% वर आलें आहे.

चालू युद्धानें लांब धाग्याच्या कपाशीच्या उत्पादनास एकदम उत्तेजन दिलें. युरोपकडे दरसाल हिंदुस्थानांतून ८½ लक्ष गांठी कपास जाते, ती बंद झाली. १९४०–४१ मध्यें हिंदी गिरण्यांनीं नेहमीपेक्षां ६ लक्ष गांठींचा जास्त उठाव केला, त्यामुळें निर्मत थांबल्याचा दुष्परिणाम बराच कमी झाला. जपाननें युद्धांत प्रवेश केल्यानंतर मात्र, दरसाल १५ लक्ष गांठींचा उठाव करणारी बाजारपेठ हिंदुस्थानास बंद झाली व हिंदुस्थानांतील कपाशीची–विशेषतः आंखूड धाग्याच्या कपाशीची–लागवड कमी करण्याची मोहीम सुरू करण्यांत आली. "अधिक धान्य पिकवा"ची मोहीम, आंखूड धाग्याच्या कपाशीच्या स्थलांतरावर मुंबई सरकारनें घातलेले निर्बंध, जरिला (¾) कपाशीस "कॉटन कॉन्ट्रॅक्ट"चे चालीं मिळालेलें स्थान, ह्या सर्वांचा कपाशीची लागवड नियंत्रित होण्यावर परिणाम झाला व जरिला कपाशीची लागवड मध्य प्रांत, वऱ्हाड व खानदेश ह्यांत विशेषेंकरून वाढली.

दर एकरीं उत्पादन

कपाशीच्या एकूण उत्पादनाप्रमाणें तिचें दर एकरी उत्पादनहि वाढत जालेलें आहे. १९२२ ते १९२७ ह्या पांच वर्षांच्या मुदतीचे मानानें १९३० ते १९४२ ह्या मुदतींत दर एकरी उत्पादन ९६ पौंडांवरून ११० पौंडावर गेले आहे. म्हणजे दर एकरीं उत्पादन १५% वाढलें आहे. सिंध व पंजाब येथें पाटाचे पाण्यावर कपास लावली जाते, त्याचा हा कांहीं अंशीं परिणाम असला, तरी उत्पादन वाढण्याचीं प्रमुख कारणें बियांत सुधारणा, सतींत सुधारणा व पिकांची अदलून बदलून लागवड हीं आहेत. अर्थात्, इतर देशांचे मानानें हिंदी दर एकरीं उत्पादन वाढण्यास अवाप किती तरी वाव आहे !

१९२३–१९२८ ह्या पांच वर्षांचे मुदतींत हिंदी गिरण्यांनीं १९,६२,००० गांठी हिंदी कपास उठवली म्हणजे, एकूण हिंदी उत्पादनाच्या ३५% कपास त्यांनीं घेतली. ह्याच मुदतींत हिंदी गिरण्यांचा २०' खालील उत्पादनाचा आंकडा ३३ कोटि पौंड म्हणजे एकूण उत्पादनाच्या ४५% होता. हिंदी गिरण्यांचें उत्पादन हळुहळु वाढत जाऊन १९३९ सालीं त्यांनीं ३१,५१,००० गांठी हिंदी कपास घेतली, त्यापैकीं २३% आंखूड धाग्याची होती. १९४१–४२ सालीं हेच आंकडे अनुक्रमें ४०,२५,००० गांठी व २४% असे झाले. १९४३–४४ चे आंकडे आहिपेक्षां समाधानकारक आढळतील. युद्धामुळें हिंदी कपाशीची बाजारपेठ नाहींशी झाल्यामुळें १९३९–४० मधील निर्गतीचा आंकडा २३,४०,००० गांठी होता तो १९४१–४२ मध्यें ८,७५,००० गांठींवर आला.

सेंट्रल कॉटन कमिटी

हिंदी कपाशीचा दर्जा वाढवून चांगल्या कपाशीच्या उत्पादनास प्रोत्साहन देण्यास इंडियन सेंट्रल कॉटन कमिटीचें कार्य हेंच मुख्यतः कारणीभूत झालेलें आहे. हिंदुस्थानांत लांब धाग्याच्या कपाशीचें उत्पादन वाढविण्याची तीव्र आवश्यकता गेल्या महायुद्धानें पटवून दिली व १९१७–१८ च्या इंडियन कॉटन कमिटीच्या रिपोर्टाचा इंडियन सेंट्रल कॉटन कमिटी हा दृश्य परिणाम आहे. ह्या कमिटीच्या खर्चाची, हिंदी गिरण्यांत खपणाऱ्या किंवा निर्मत होणाऱ्या कपाशीच्या दर गांठीवर दोन आणे पट्टी बसवून व्यवस्था करण्यांत आली आहे. ह्या उत्पन्नांतून कमिटी दरसाल १० लक्ष रुपये संशोधन व सुधारणा ह्यांवर खर्च करूं शकते. कमिटीजवळ आतां सुमारें १३½ लाखांचा रिसर्च्ह फंड शिल्लक आहे. इंडियन सेंट्रल कॉटन कमिटीचें कार्य बादशाही शेतकी कमिशनला पसंत पडून त्याच धर्तीवर इंपीरियल कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चरल रिसर्चची स्थापना करण्याविषयीं कमिशननें सुचविलें. तागासाठीहि त्याच धर्तीवर कमिटीची योजना केलेली आहे. कपाशीच्या उत्पादक देशांत हिंदुस्थानाचा दुसरा अनुक्रम लागतो. जागतिक उत्पादनापैकीं ४८% उत्पादन अमेरिकेंत व १८% उत्पादन हिंदुस्थानांत होतें. लागवडीचें क्षेत्र व उत्पादन ह्यांची तुलना करतां, हिंदुस्थानांतील परिस्थिति असमाधानकारक आहे व ती सुधारणें हें सेंट्रल कॉटन कमिटीचें एक महत्त्वाचें कार्य आहे.

प्रगतिपथावरील नवा

मै ला चा — द ग ड

सन १९४३ अखेर

नव्या कामांत ११० टक्के वाढ
चालू कामांत १०० टक्के वाढ
आयुर्विमानिर्भीत ८० टक्के वाढ

— आपला विमा किंवा एजन्सी आजच घ्या —

दि ऑंध म्यूच्युअल लाइफ ॲश्युरन्स सोसायटी लि., पुणें.

आर. जी. साठे सुपरिंटेंडेंट
व्ही. जी. जोशी मॅनेजिंग डायरेक्टर

सध्यांच्या टंचाईच्या काळांत जीवनद्रव्यें कमी पडतात.
जीवनद्रव्यांनीं (Vitamin's) युक्त असे
(सप्रमाण खात्यानें मान्यता दिलेले)

टोमॅटो केचप (गोड) व टोमॅटो सॉस [तिखट व आंबट]

आजच मागवा व जीवनद्रव्यांची वाटणारी उणीव भरून काढा.

रुरल प्रॉडक्टस कंपनी लि. पुणें

बिझिनेस ऑफिस: ९११ अ सदाशिव, पुणें २.

☆ नगर वॉंबे ट्रेडिंग कंपनी ☆

चिनाब, लाइम ज्यूस कॉर्डीअल, ऑरेंज व लेमन स्क्वॉश, टोमॅटो सॉस
मँगो जॅम, मध, कोको, बेकिंग पावडर, सॅनिटरी टॉवेल्स,
टुथ पेस्ट, टुथ ब्रश, वगैरे मालाचे
स्टॉकिस्ट.

शाखा:— माणिक चौक, अहमदनगर

हेड ऑफिस:— पूना गेस्ट हाऊस, पुणें २

'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

दत्त कंपनी

७३५ शुक्रवार पेठ, पुणें २. दाणेआळी पोलिसचौकीजवळ
सर्व तऱ्हेचे काटे, वजनें व मापें, वेळेवर
रिपेअर करून मिळतील.

न्यू इंडिया इंडस्ट्रीज लि.

(Approved Re-traders and Approved Contractors)
२६ लॅमिंग्टन नॉर्थ, मुंबई ११.

अध्यक्ष:—श्री. ग. स. मराठे, ॲक्चुअरी.

महाराष्ट्रांतील रबराचा प्रमुख कारखाना

☆ गिरणीचे रोलर्स ☆ रबरी हातमोजे ☆ छापखान्यांचे रोलर्स
☆ रीमोल्ड टायर्स ☆ रबरी वॉशर्स ☆ सॉलिड व्हील्स

व इतर रबरी माल तयार होतो.

पु. ग. मराठे
मॅनेजिंग डायरेक्टर.

हें पत्र पुणें, पेठ सांगली क. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व
रा. मोरेश्वर वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' सांगली, क. नं. १२४।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
(टपाल हंशील माफ)
किरकोळ अंकास
दोन आणे.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष १० पुणें, बुधवार, तारीख १९ एप्रिल, १९४४ अंक १६

प्रगतीचें श्रेय आपणांकडे

सह्याद्रि विमा कंपनीनें १९४३ सालीं खालीलप्रमाणें काम केलें आहे.

आलेलें काम	रु. २१, ४४, ४७१	१९४२	५ लक्ष ३ हजारानें
मंजूर काम	रु. १८, ३५, ७१४	पेक्षां	२ लक्ष ९० हजारानें
पूर्ण विमा काम	रु. १६, १९, ७७५	वाढ	४ लक्ष ७ हजारानें

या सर्व प्रगतीचें श्रेय कंपनीचे विमेदार, प्रतिनिधी, प्रचाराधिकारी, भागीदार व हितचिंतक यांनाच आहे व त्याच्याबद्दल आम्हीं त्यांचे आभारी आहोंत. विमा—योजना त्याचप्रमाणें एजन्सी याच कंपनीची अत्यंत आकर्षक.

नासिक | मॅनेजिंग डायरेक्टर,

अन्न तुटवडा

सध्यां अन्न नियंत्रणामुळें जीवनास पुरेसें व चांगलें अन्न मिळत नाहीं. ही पडणारी तूट अन्नाचे गुणधर्म असलेल्या पेयानें भरून काढतां येईल.

"गोल्डन कोको"

हें असें एक पेय आहे. त्यांत चहा—कॉफीचे दुष्परिणाम नाहींतच, पण अन्न या दृष्टीनें एक कप कोको दोन अंड्याचे बरोबर असल्याचें तज्ज्ञाचें मत आहे.

—सर्वत्र मिळतो—

कारखानदार : साठे कोको व चॉकोलेट फॅक्टरी, पुणें नं. २.

'अर्थ' ग्रन्थमाला.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह-बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

दत्त कंपनी
७३५ शुक्रवार पेठ, पुणें २. दाणेआळी पोलिसमेटाजवळ
सर्व तऱ्हेचे काटे, वजनें व मापें, वेळेवर
रिपेअर करून मिळतील.

विविध माहिती

किनले मटांतील गिरण्यांचा नफा

मेसर्स जेम्स किनले अँड कं. लि. कडे मॅनेजिंग एजन्सी असलेल्या किनले मिल्स लि. ला १९४३ साली ९९ लक्ष, ८९ हजार रुपये ढोक नफा झाला. भागीदारांस प्रत्येक भागास करमाफ २५ रुपये डिव्हिडंड मिळालें. प्रत्येक भाग १०० रुपयांचा आहे. १९३९ मध्यें नफ्याची रकम २,१४,५८० रुपये व डिव्हिडंडचा दर ५% होता. गिरणींत ४६,०७२ चात्या व ७८४ माग आहेत. परेळ येथें ही गिरणी आहे.

स्वान मिल्स लि. ला ६८ लक्ष रुपये नफा झाला. भागीदारांस प्रत्येक भागावर (१०० रु.) ३५ रुपये करमाफ डिव्हिडंड मिळालें. १९३९ सालीं नफ्याची रकम १,२६,४५८ रुपये होती व डिव्हिडंडचा दर ५% होता. गिरणींत ३०,४२८ चात्या व ५१८ माग आहेत. न्यू सेवरी रोड येथें ही गिरणी आहे.

गोल्ड मोहोर मिल्स लि. नें १ कोटि, ४ लक्ष रुपये नफा दाखविला आहे. प्रत्येक १०० रुपयांच्या भागास करमाफ ४० रुपये डिव्हिडंड मिळालें. १९३९ सालीं गिरणीस ९½ लक्ष रुपये तोटा झाला होता व ताळेबंदाचे जिंदगीचे बाजूस ६४ लक्ष रुपये तोटा दिसत होता. गिरणींत ३७,७६८ चात्या व १०२० माग आहेत. ही गिरणी दादर येथें आहे.

युद्धकार्यासाठी देणगी

अमेरिकेंतील ४० हजार लोकांनीं तेथील सरकारास युद्धकार्यासाठी ५० लक्ष डॉलर्सची देणगी दिली आहे.

अपर सिंध लाइट रेल्वे

वरील रेल्वे ३१ मार्च १९४५ रोजीं सरकारच्या ताब्यांत जाणार आहे.

दक्षिण व्होडेशियाचें सोन्याचें उत्पादन

गेल्या वर्षी दक्षिण व्होडेशियांत सोन्याचें उत्पादन ६,५६,००० औंस झालें. १९४२ चे मानानें हें उत्पादन १ लक्ष औंसांनीं कमी आहे.

पंजाबी सैनिक

गेल्या महायुद्धाचे मानानें चालू युद्धास पंजाबनें दुप्पट सैनिक पुरवले आहेत. तथापि, नाविक व वैमानिक दलांत पंजाबी लोकांची संख्या अत्यल्प आहे.

आस्ट्रेलियाचे ९० हजार सैनिक परतणार

बारा महिन्यांत आपले ९० हजार लोक सैन्यांतून काढून घेण्याचें ऑस्ट्रेलियाच्या सरकारनें ठरविलें आहे. ऑस्ट्रेलियांत मनुष्यबळाचा तुटवडा असल्यानें असें करणें आवश्यक झालें आहे.

क्रोमिअमची तुर्कस्तानांतून जर्मनीकडे निर्यात

चालू युद्धास प्रारंभ झाल्यापासून तुर्कस्तानची जर्मनीकडील क्रोमची निर्यात तिपटीनें वाढली आहे. १९४३ मध्यें तुर्कस्ताननें ३०,००० टन क्रोमिअम जर्मनीकडे पाठविलें. क्रोमिअम धातूचें इतर धातूंशीं मिश्रण सहज व चांगल्या तऱ्हेनें होतें व पोलादांत तें घातलें असतां पोलादाचा कडकपणा वाढतो.

कपाशीची लागवड व उत्पादन

	लागवड (हजार एकर)	उत्पादन (हजार गांठी)
१९४२-४३	१८,८०४	४,४९२
१९४३-४४	१९,२६१	४,९३४
वाढ	२%	१०%

कपाशीच्या एकूण लागवडीपैकी २४.६% लागवड मुंबई प्रांतांत व १५.५% लागवड मध्यप्रांत-वऱ्हाडांत आहे. ह्या दोन्ही प्रांतांतील "आधिक धान्य पिकवा" मोहिमेमुळें १९४३-४४ मधील लागवड त्यापूर्वीच्या वर्षापेक्षा कमी असल्याचें आढळतें.

इराणमध्यें सोन्याचें वाढतें महत्त्व

इराणमधील चलनास तेथील राजाचीं रत्नें-माणकें आधार असत. इराणच्या राष्ट्रीय बँकेच्या ताळेबंदांत त्यांची किंमत सुमारें २६½ लक्ष पौंड दाखविलेली आहे. त्यांची बाजारभावानें होणारी किंमत ह्यापेक्षा अर्थातच ज्यास्त आहे. रत्नें-माणकें ह्यांची जागा ह्यापुढें सोन्यास मिळणार आहे. दक्षिण आफ्रिका व अमेरिका येथून इराणमध्यें बऱ्याच सोन्याची आयात झालेली आहे. संयुक्त राष्ट्रांच्या तेथील सर्वासाठी लागणारें चलन व्यवहारांत सेळतें रहातें तें सेचून घेण्यासाठीं हें सोनें तेथें पाठविण्यांत आलेलें आहे. लोक सोनें घेऊन तें कुलुपांत टाकतात व अशा रीतीनें सोनें-विक्रीचा उद्देश सफल होतो.

ग्रेट ब्रिटनमधील आयुर्विम्याचें काम

ग्रेट ब्रिटनमधील आयुर्विमा कंपन्यांनीं १९४३ मध्यें १९४२ चे मानानें ४% अधिक विम्याचें काम स्वीकारलें.

ब्रिटिश हिंदुस्थानांतील विमा कंपन्यांस संस्थानांत सवलत

हिंदुस्थान सरकार आणि बडोदें, म्हैसूर व त्रावणकोर संस्थानें ह्यांचेमध्यें हिंदी विमा कायद्याच्या कांहीं बाबींसंबंधीं परस्पर व्यवस्था पुऱ्या झाल्या आहेत. ह्यापुढें ब्रिटिश हिंदुस्थानांतील विमा कंपन्यांनीं म्हैसूर व बडोदें संस्थानांत अनामत पैसे ठेवण्याचें कारण नाहीं. त्रावणकोरमध्यें आवश्यक असलेली डिपॉझिटची रक्कम थोडी कमी करण्यांत आली आहे. बाकी सर्व हिंदी संस्थानांत पूर्वीप्रमाणेंच डिपॉझिट्स ठेवावीं लागणार आहेत.

हिंदी सैनिकांसाठी ब्राझीलचा तांदूळ

निर्गतीसाठी ब्राझीलमध्यें तांदळाचीं ५० लक्ष पोतीं तयार आहेत. त्यांपैकी बहुतेक तांदूळ हिंदी सैनिकांसाठी ग्रेट ब्रिटनकडे पाठविण्यांत येईल.

रशिया-जपान करार इंग्लंड-अमेरिकेस अनुकूल

रशिया व जपान ह्यांचेमध्यें नुकताच एक करार झाला, तो अमेरिका व इंग्लंड ह्यांच्या हिताचाच आहे, असें अमेरिकेचे माजी असिस्टंट सेक्रेटरी ऑफ स्टेट हे म्हणाले.

रिझर्व्ह बँकेच्या चलनी नोटा

रिझर्व्ह बँकेच्या चलनी नोटांपैकीं १० कोटि रुपयांच्या नोटा तिच्या बँकिंग विभागांत असून ८ अब्ज, ९३½ कोटि रुपयांच्या नोटा व्यवहारांत सेळत आहेत. ४४ कोटि, ४१ लक्ष रुपयांचें सोनें; ७ अब्ज, ८५ लक्ष रुपयांचे ब्रिटिश स्टर्लिंग रोखे; १६ कोटि रुपयांचीं नाणीं व ५८½ कोटि रुपयांचे हिंदुस्थान सरकारचे रोखे ह्यांचा वरील नोटांस आधार आहे.

सरकारी रोख्यांची विक्री

२७ फेब्रुवारी, १९४४ ते ३१ मार्च, १९४४ अखेर मध्यवर्ती सरकारच्या कर्जरोख्यांत एकूण २०½ कोटि रुपये मुंतविले गेले.

अनुक्रमणिका

	पृष्ठ
१ विविध माहिती ...	१२३
२ धान्याचा कीटकांपासून बचाव ...	१२४
३ स्फुट विचार ...	१२५
गिरणी मालक संघाच्या अध्यक्षांचीं भाषणें— स्वदेशी कापड गिरण्या— युद्धाच्या अलीकडील हालचाली	
४ कराराची पूर्तता अशक्य झाली ...	१२६
५ व्यापारवृद्धीसाठीं चित्रपटांचा उपयोग ...	१२६
६ मालतारणावर कर्जें देण्याचा धंदा ...	१२७
७ चेकचे पैसे चुकून दिलें, तर ! ...	१२७

अर्थ

बुधवार, ता. १९ एप्रिल १९४४

ब्रिटिश बँकांची परिस्थिति आणि भवितव्य

(२)

युद्धसमाप्तीनंतरचीं कांहीं वर्षें, विशेषतः आर्थिक पुनर्घटना स्थिर पायावर उभी राहीपर्यंतचीं संधिकाळाची वर्षें व्यापार व उद्योगधंदे ह्यांस अडचणीचीं जाणार असल्याकारणानें ह्यापुढें उपस्थित होणाऱ्या परिस्थितीस ब्रिटिश बँकिंगनें कसें तोंड द्यावें ह्याविषयीं त्या धंद्यांतील पुढाऱ्यांनीं सूचनात्मक विचार व्यक्त केले आहेत. हिंदुस्थानच्या आर्थिक गरजा इंग्लंडच्या परिस्थितीशीं तुलना करतां अर्थातच भिन्न असल्याकारणानें ब्रिटिश बँकांपुढील प्रश्न आणि ते सोडवण्याचे मार्ग निराळे असणें स्वाभाविक आहे. तथापि, युद्धोत्तर काळांतील दोन्ही देशांमधल्या परिस्थितींत ब्रिटिश व हिंदी बँकांच्या व्यवहारांस पुनर्घटनेच्या दृष्टीनें जें वळण द्यावें लागणार आहे त्यांत पुष्कळ साम्य अनुभवास आल्यावांचून रहाणार नाहीं. चलन, हुंडणावळ, बाजारभाव, सरकारी नियंत्रणें ह्यांची व्यवस्था युद्धसमाप्तीनंतर कशी राहील ? आज युद्धसामुग्री बनवणाऱ्या कारखान्यांतील भांडवल व कामकरी ह्यांचा उपयोग पुढें कसा होईल ? आर्थिक अभिवृद्धीच्या योजना कशा अमलांत आणल्या जातील ? परराष्ट्रीय व्यापारास कोणती नवी दिशा लागेल आणि परदेशी कारखान्यांची स्पर्धा स्वदेशी धंद्यांस किती सोसावी लागेल ? ह्यांसारखे अनेक प्रश्न येथें विचार करणारासमोर उभे राहतात आणि त्यांस निश्चित उत्तरें देणें कठिण आहे. ह्या प्रकारच्या अनिश्चित स्थितींतहि प्रत्येक धंद्यांतील पुढाऱ्यांनीं स्वतःच्या उद्योगाचा गाडा संक्रमणाच्या व पुनर्घटनेच्या काळांत सुरक्षित रीतीनें हाकला जाण्याची व्यवस्था दूरदृष्टीनें करणें अगत्याचें आहे. ह्या मार्गानें इतर धंदेवाल्यांच्या बरोबरीनें ब्रिटिश बँकर चालले आहेत आणि त्यांचें धोरण हिंदुस्थानांत स्वीकारलें जाणें इष्ट आहे.

जनतेच्या बचतीचा पैसा सुरक्षित राखून व्यापार व उद्योगधंदे ह्यांच्या व्यवहारांसाठी तो गरजू धंदेवाल्यांस पुरवणें हें बँकांचें मुख्य कार्य आहे आणि बदलत्या परिस्थितींतहि त्यांस तें करीत रहाणें शक्य आहे असा विश्वास मिडलंड बँकेचे अध्यक्ष मि. स्क्रिस्टोफर्सन ह्यांना वाटत आहे. कोणत्याहि धंद्याचें यश तो करणारांच्या कार्यक्षमतेवर अवलंबून असतें आणि अशा व्यक्तींस त्यांची दानत व कार्यतत्परता पाहून व त्यांच्या मालकीच्या मालमत्तेवरच केवळ विसंबून न रहातां पैसा पुरवला गेल्यास उद्योगधंद्यांस लागणारें भांडवल उपलब्ध होईल आणि बँकांस धंदा मिळेल असें त्यांचें म्हणणें आहे. लॉइडस बँकेचे लॉर्ड वॉर्डिंग्टन ह्यांनीं ही सूचना अधिक स्पष्ट करून मांडली आहे. युद्ध समाप्त होतांच भांडवलाच्या उपयोगावरचें सरकारी नियंत्रण एकदम सबंध काढून घेतलें जाणार नाहीं आणि औद्योगिक पुनर्रचनेमध्यें अनेक धंदेवाल्यांस पैसा लागेल आणि तो बँकांनीं पुरवला पाहिजे असें मत व्यक्त करून ह्याकरितां सदरहू संस्थांनीं कर्जें देण्याविषयींचें मामुली धोरण बदललें पाहिजे असें त्यांनीं सुचवलें आहे. व्यापारी बँका उद्योगधंद्यांस चालू खर्चास लागणारा पैसा पुरवतात पण लांब मुदतपर्यंत यंत्रसामुग्री, इमारती इत्यादींमध्यें गुंतून रहाणारें भांडवलें धंदेवाल्यांस त्या कर्जाऊ देत नाहींत. त्यांच्याकडच्या ठेवी अत्यंत अल्प मुदतीच्या आणि केव्हांहि काढून घेण्यास पात्र अशा असल्यानें बँकांस आपल्या गिऱ्हाइकांस अल्प मुदतीचींच कर्जें द्यावीं लागतात. लांब किंवा मध्यम मुदतींत बँकांनीं दिलेल्या कर्जाचा पैसा गुंतून राहिला आणि ठेवीदार स्वतःच्या रकमा काढून घेऊं लागले तर ह्या संस्थांच्या मुळावरच घाव पडेल. म्हणून कर्जें देण्याचा बँकांचा सध्याचा प्रघात तत्त्वतः योग्य आहे; तथापि सध्या बँकांची सांपत्तिक स्थिति अत्यंत बळकटीची असून त्यांचेजवळ तरता पैसा भरपूर आहे. तेव्हां औद्योगिक पुनर्घटनेमध्यें चालू धोरणास थोडीशी मुरड घालण्यास हरकत नाहीं असा लॉर्ड वॉर्डिंग्टन ह्यांचा युक्तिवाद आहे.

ही विचारसरणी हिंदुस्थानांतील बँकांनीं नेहमीच लक्षांत बाळगण्याची आवश्यकता आहे, कारण स्वदेशी उद्योगधंद्यांच्या उदयकाळांत येथें होतकरू धंदेवाल्यांस भांडवलाची नड तीव्रतेनें भासते. तथापि रिझर्व्ह व तरता पैसा ह्यांचें कर्जाशीं होणारें प्रमाण हिंदी बँकांनीं सतत नजरेपुढें ठेवून आपल्या जवळील ठेवींचा विनियोग करण्यावरच त्यांची सुरक्षितता अवलंबून रहाणार आहे. बँकांकडे ठेवी मोठ्या प्रमाणांत आल्या आहेत ह्याचें कारण लोकांस शिलकी पैशाचा उपयोग करण्यास पुरेसा वाव आज नाहीं हें होय. युद्ध संपल्यावर उद्योगधंद्यांस पैशाची गरज भासेल ती ह्या ठेवींतून आणि कर्ज रोख्यांच्या केलेल्या रोकडींतून प्रथम भागवली जाईल. धंदेवाल्या मंडळ्यांचे पैसे सरकाराकडे ठेव म्हणून आहेत, ते हळु हळु परत येतील आणि त्यांचा विनियोग पुनर्घटना व विस्तार ह्यांचेकडे प्रथम केला जाईल. त्या मर्यादेबाहेरची भांडवलाविषयींची मागणी भागवण्याची संधी बँकांस मिळेल आणि तिचा त्यांनीं पूर्ण फायदा घेतला पाहिजे. म्हणजे आज जो बँकांचा पैसा मामुली प्रमाणाबाहेर रोख्यांत गुंतला आहे तो धंदेवाल्यांस कर्जाऊ देतां येईल. युद्धसमाप्तीनंतर चलनाचें संकोचन करण्याची घाई सरकार करणार नाहीं आणि बाजारभाव व व्याजाचे दर स्थिर राखण्याचा तें प्रयत्न करील. संधिकाळांत भांडवलास जोराची मागणी येईल आणि सर्व स्थिरस्थावर होत असतां पुन्हां आर्थिक घडी हळु हळु बसेल. ह्या आंदोलनांत आर्थिक प्रगतीस सहाय देण्याचें कार्य बँकांस उपयुक्त रीतीनें करतां येण्याजोगें आहे आणि त्याकरितां त्यांनीं आपली सांपत्तिक स्थिति मजबुतीची करून ठेवणें आवश्यक आहे. अनेक वर्षांच्या अनुभवानें ब्रिटिश बँकांनीं स्वतःच्या धंद्याची इमारत बळकट करून ठेवली आहे हें ह्या देशांतील तत्सम संस्थांनीं ध्यानांत बाळगलें पाहिजे.

धान्याचा कीटकांपासून बचाव

धान्यास कीड लागू नये म्हणून त्यांत राख मिसळणें किंवा त्यांस माती लावणें हे उपाय आपल्या परिचयाचे आहेत. युद्ध-परिस्थितीमुळें धान्य साठविण्याची आवश्यकता मागूं लागताच निरनिराळ्या पदार्थांच्या भुकट्या त्या कामीं कशा वापरतां येतील याकडे शास्त्रज्ञांचें लक्ष लागलें आहे. भुकट्यांच्या योगानें कीटक मरतात ते कसें हा महत्त्वाचा प्रश्न आहे. कीटकांच्या श्वसनेंद्रियामध्यें या भुकट्या शिरल्यामुळें किंवा त्या कीटकांच्या पोटामध्यें गेल्यामुळें ते मरत असावे अशी समजूत होती. पण मृत कीटकांचें अंतरंग सूक्ष्मदर्शकाच्या योगानें तपासून पाहतां तशी वस्तुस्थिति नाही असें आढळून आलें. कीटक मरण्याचें कारण त्यांच्या अंगांतील आर्द्रता भुकट्यांच्या योगानें नाहींशी केली जाते हें आहे. भुकट्यांमुळें हें कसें होतें हें जरी अजून नीटसें समजलेलें नाहीं, तरी कीटकांच्या शरिरावरील आवरणाशीं या क्रियेचा संबंध पोचतो हें सिद्ध झालें आहे. एकाद्या भुकटीच्या रासायनिक गुणधर्मापेक्षां भुकटीच्या कणांची कमी अधिक सूक्ष्मता, त्यांचा कठीणपणा किंवा मऊपणा व तिच्यावर केले जाणारे संस्कार यावरच तिची कार्यक्षमता मुख्यतः अवलंबून असते असें दिसून आलें आहे. दोन हजार वर्षांपूर्वीपासून अशा भुकट्यांचा उपयोग इजिप्शन लोक करीत आलेले आहेत. कीटकांच्या शरिराच्या घनफळाचे मानानें त्यांच्या आवरणाचें क्षेत्रफळ पुष्कळच ज्यास्त असतें व त्यामुळें कीटकांच्या अंगांतील आर्द्रता कमी होणें त्यांस घातुक ठरतें. विशेषतः कोरड्या अभ्रावर रहाणाऱ्या कीटकांना आर्द्रतेची फारच आवश्यकता असते. भुकट्या ही आर्द्रता शोषून घेत नाहींत, परंतु पाण्याच्या बाष्पीभवनास त्या प्रवृत्त करतात. भुकट्यांमुळें कीटकांच्या कवचांस अपाय होतो, हेंहि खरें नाहीं; कारण कवचापेक्षा मऊ भुकट्याहि कीटकांस घातुक ठरतात असें आढळून आलें आहे. फर्ग्युसन कॉलेजांतील डॉ. के. के. डोळे यांनीं धान्य टिकविण्यासाठी पाल्याच्या कांड्यांचा उपयोग शोधून काढला आहे त्यांचें वर्णन मुंबई विश्वविद्यालयाच्या मासिकांत पूर्वी आलेलें आहे, त्याचा येथें उल्लेख करणें आवश्यक आहे. अशा तऱ्हेच्या कीटनाशक भुकट्यांचा किडीवर कोणत्या प्रकारें परिणाम होतो, याची माहिती वर दिली आहे.

शेअर बाजार

(ले. व. वि. लोणकर, एम. ए., बी. कॉम.)

जपान्यांच्या आसाम मणिपूर प्रदेशावरील दडपणामुळें विशेषतः टाटा स्टील, इंडियन आयर्न इत्यादि लोखंड पोलादाचे शेअर गडगडून खालच्या पातळीवर आले आहेत. पावसाळा सुरू होण्यास अवकाश असल्यानें तोपर्यंत आणखी हें दडपण बंगालचे दिशेनें वाढल्यास बाजार आणखी खाली जातील हें सांगावयास नको. आतांपर्यंत कापड गिरण्या मात्र चांगल्याच टिकून राहिल्या आहेत. पण त्यांच्यांतहि सर्वसाधारण स्वरूपाची वेचाण केव्हां येईल हें सांगतां येत नाहीं. गेलें अंदाजपत्रक व जपानची स्वारी या महत्त्वाच्या घटना होऊन मुद्दाम भाव आहेत हे टिकून राहिलेत यावरून चलनाचा भावावर किती परिणाम होतो हें दिसून येईल. गिरण्यांचे भाव आणखी खालीं पडले तर गुंतविणारास कोहिनूर, गोकाक, विष्णु, मदुरा, कानपूर स्वदेशी, राजलक्ष्मी, इत्यादि शेअर उचलण्यास चांगलीच संधि मिळेल. साडेतीन टक्का कागद ९५-१४ पर्यंत खालीं येऊन पुन्हा ९६-११ पर्यंत वर आला हें थोडेसें सट्टेबाजांच्या हालचालींचेंच निदर्शक होय.

महाराष्ट्रांत लेखी गॅरंटी देणारे
पहिले व फक्त १ च
गोल्ड मेडॅलिस्ट व मराठी वळणाचे स्पेशॅलिस्ट
पेन्टर वेडेकर, ए. जी.,
बुधवार चौक, पुणें २ (सिटी)
बाहेरगांवचीं कामें रेल्वे, मोटार अगर पोस्टानें पाठवूं.

प्रगतिपथावरील नवा
मै ला चा — द ग ड
सन १९४३ अखेर
नव्या कामांत ११० टक्के वाढ
चालू कामांत १०० टक्के वाढ
आयुर्विमानिधींत ८० टक्के वाढ
— आपला विमा किंवा एजन्सी आजच घ्या —
दि औंध म्यूच्युअल लाइफ
ॲश्युरन्स सोसायटी लि., पुणें.
आर. जी. साठे, सुपरिंटेंडेंट
व्ही. जी. जोशी, मॅनेजिंग डायरेक्टर

रक्तवर्धक प्रमाणेंच लोकप्रिय
दोन उपयुक्त औषधें.
ओजस — पौष्टिक पेयान्न
आबाल वृद्ध स्त्रीपुरुषांस उपयुक्त
मुलांचे करितां — अँटी ग्राइप मिक्श्चर
दांत सुलभतेनें येण्यावर व मुलांचे अपचनाचे विकारावर
केंद्रें:-मुंबई, पुणें, नागपूर, उमरावती, सांगली, कोल्हापूर, हुबळी.
पुणें मुख्य दुकान:—गणपती चौक, लक्ष्मीरोड पुणें.
आ यु र्वे द र स शा ळा
पुणें लि० पुणें ४.

स्फुट विचार

गिरणी-मालक संघांच्या अध्यक्षांचीं भाषणें

मुंबई आणि अहमदाबाद येथील गिरणी मालकांच्या संघांच्या वार्षिक सभा गेल्या आठवड्यांत भरल्या आणि त्यांमध्यें या संस्थांच्या अध्यक्षांनीं कापडाच्या गिरण्यांचे धंद्याची सद्यःस्थिति व त्यांच्यापुढें असलेले प्रश्न यांचे बाबतींत भाषणें केलीं. कापडाचे भाव अलीकडे उतरले असल्याबद्दल दोघांनीं समाधान व्यक्त केलें आणि कांहीं गिऱ्हाईकवाले व व्यापारी वाजवीपेक्षा अधिक भावानें कापड विकीत असल्याविषयीं खेद प्रदर्शित केला. सरकारी भावनियंत्रण अशा रीतीनें चाल्यावर बसवलें जावें आणि त्यासंबंधांत जबाबदार गिरणीवाल्यांच्या पुढाऱ्यांनीं निषेध करण्यापर्यंत मजल यावी ही गोष्ट खेदजनक आहे. अलीकडे हिंदी गिरण्यांस चांगला फायदा मिळत असला तरी त्यांच्या भवितव्याविषयीं जागरूकपणानें योजना आखण्याचें महत्त्व दोन्ही अध्यक्षांनीं प्रतिपादिलें. अहमदाबाद गिरणी मालकांच्या संघाचे अध्यक्ष, श्री. साकरलाल बालाभाई यांनीं सांगितलें कीं, सध्याच्या युद्धकाळांतली एकंदर परिस्थिति गेल्या युद्धापेक्षां सर्वस्वी भिन्न असल्यानें आतां केवळ राजकीय नव्हे तर आर्थिक कल्पना व घटना यांचा फेरविचार व पुनर्रचना करणें अगत्याचें झालें आहे. यासाठी व्यक्तिशः आणि सपाईक रीतीनें विचार करून पुनर्घटनेची योजना आखण्याचें कार्य लोकांनीं हातीं घ्यावें असें त्यांनीं सुचवलें. मुंबईच्या संघाचे अध्यक्ष, सर विठ्ठल चंदावरकर, यांनीं कोळशाच्या तुटवड्याचा परिणाम गिरण्यांच्या उत्पादनावर कसा प्रतिकूल होत आहे हें सांगितलें आणि सरकारनें यासंबंधांत जरूर ती व्यवस्था करून कोळशाच्या पुरवठ्याचें निश्चित आश्वासन द्यावें असें सांगितलें.

स्वदेशी कापड-गिरण्या

प्रत्येक स्वदेशी धंद्याच्या चालकांनीं युद्ध चालू असतां त्याचे स्वतःच्या उद्योगावर होत असलेले परिणाम डोळ्यांत भरून घेतले पाहिजेत, त्याचप्रमाणें युद्धसमाप्तीनंतर उद्भवणाऱ्या परिस्थितींत त्याचा योगक्षेम कसा चालेल याचाहि विचार करणें इष्ट असतें. मुंबईच्या कापड-गिरण्यांच्या संघाचे अध्यक्ष, सर विठ्ठल चंदावरकर, यांनीं ही दुसरी कामगिरी चांगली बजावली आहे. युद्ध संपतांच जर्मनीतील राष्ट्रांस कापड पुरवण्याची जबाबदारी इंग्लंड, अमेरिका व हिंदुस्थान या देशांवर येऊन पडेल आणि कापडाची वाटणी निर्बंधित योजनात्मक पद्धतीनें सर्व देशांत करावी लागेल. यासाठी हिंदी गिरण्यांचें उत्पादन युद्धसमाप्तीनंतर कमाल प्रमाणांत केलें जावें याकरितां सरकारनें आवश्यक असलेलें सहाय दिलें पाहिजे असें त्यांनीं सुचवलें आहे. आगामि शांतता प्रस्थापित झाल्यानंतर स्वदेशी गिरण्यांनीं कोणतें व किती कापड काढावें आणि त्यासाठी कोणती यंत्रसामुग्री लागेल याचा विचार गिरणीवाल्यांनीं करावा अशी त्यांची दुसरी सूचना आहे. गिरण्यांस लागणारीं यंत्रें या देशांत बनवलीं जाण्याची व्यवस्था करण्याच्या महत्त्वावरहि त्यांनीं जोर दिला. युद्ध संपतांच यंत्रसामुग्रीस फार मोठी मागणी येईल आणि गिरण्यांस पाहिजे असलेलीं यंत्रें वेताच्या किंमतीनें मिळणें कठिण होईल या मुद्दाकडे त्यांनीं लक्ष वेधलें. सरकारनें यंत्रसामुग्रीच्या खरेदीचे कार्यी सहाय करावें असें ते म्हणाले. कामकरी वर्गाच्या रहाणींत सुधारणा घडवून आणण्याचे प्रयत्न सरकारनें चालवले आहेत त्यांस अनुलक्षून सर विठ्ठल म्हणाले कीं, हिंदी कापडाच्या गिरण्यांचें मुख्य गिऱ्हाईक शेतकरी आहेत आणि त्यांची प्राप्ती वाढवण्याची कसून खटपट केल्याखेरीज कारखान्यांतील मजुरांच्या आर्थिक स्थितीचा प्रश्न हातीं घेणें हें एकांगीपणाचें व चुकीचें धोरण आहे. शेती सुधारणा अमलांत आणण्याची आहे, याविषयीं दुमत नाहीं, पण ती घडून येईतोंपर्यंत गिरणी कामगारांच्या रहाणींत सुधारणा केली जाऊं नये असें सुचवणें चमत्कारिक आहे.

युद्धाच्या अलीकडील हालचाली

युरोपांत पूर्वेकडील आघाडीवर रशियन सेनापतींचे जर्मन फौजांस मागें हटवीत त्यांच्या देशांच्या सरहद्दीपर्यंत रेटण्याचे प्रयत्न विलक्षण रीतीनें यशस्वी झाले आहेत. या आघाडीच्या मध्याचे व विशेषतः दक्षिणेचे बाजूकडे जर्मन सैन्यें रशियन रमाट्यांत कोठेंच टिकाव धरूं शकलेलीं नाहींत आणि त्यांस हटतां हटतां पुरेवाट झाली आहे. कायमियाचें द्वीपकल्पहि सोडणें त्यांस भाग पडत आहे आणि रशियन सैन्यें रूमानिया व हंगेरी हा जर्मनीच्या दोस्तांच्या देशांत घुसूं पहात आहेत. ब्रिटिश व अमेरिकन वैमानिक दलांचे हल्ले अलीकडे विशेष विस्तृत आणि हानिकारक होत आहेत आणि त्यांचें अप्रत्यक्ष रीतीनें रशियन चढाईस सहाय होत आहे. युगोस्लाव्हियासारख्या जर्मनव्याप्त देशांत स्थानिक चळवळी जर्मनीविरुद्ध बळावत आहेत. याच स्थितींत युरोपांत चालू व्हावयाच्या दुसऱ्या आघाडीचा क्षण जवळ येत आहे असें सांगण्यांत आलें असल्यानें जर्मनीचा कोंडारा होत चालला आहे यांत शंका नाहीं. इटलींत मित्रराष्ट्रांच्या युद्धाचा डाव पुढें सरकत नसला तरी तेथें जर्मनीची मोठी सेना गुंतून पडली आहे आणि त्या योगानें रशियन व पश्चिम आघाडीचा मार्ग सुलभ झाला आहे. आसामच्या आघाडीवर जपानी फौजा प्रथम हपाट्यानें आंत घुसल्या असल्या तरी त्यांच्या पुढील हालचाली कुंठित केल्या जात आहेत आणि वहातुकीचे मार्ग तोडण्याचा जपानी प्रयत्नांचा प्रतिकार केला जात आहे. सर सेनापती, लॉर्ड लुई माँटबॅटन, यांनीं आपलें ठाणें दिल्लीहून सिलोनला बदललें आहे यावरून मि. चर्चिल यांनीं अलीकडे उल्लेखिलेल्या जपानविरुद्ध उभारावयाच्या आरमारी चढाईची मित्रराष्ट्रांची तयारी चालू झाली आहे असें उघड होतें. यासंबंधांत सिलोनमधील बंदरें सोयीचीं व मोक्याचीं आहेत. पॅसिफिक महासागरांतील जपानच्या ताब्यांतील बेटांमध्यें अमेरिकन सैन्यें व विमानदलें यांस वाढतें बळ मिळत आहे आणि या रीतीनें जपानभोंवतीं आक्रमणाचा पाश हळू हळू पण पद्धतशीरपणानें आवळला जात आहे. जपाननें मणिपूरमध्यें चांगली बरीच चालवली आहे पण प्रत्यक्ष ब्रह्मदेशांत या उपक्रमाच्या विलाडीस उत्तर, मध्य व दक्षिण भागांत त्याच्या विरुद्ध चाललेल्या चढाईची गति आहे ही गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे.

ओरिएंटल बिल्डिंग कं. लि.

ओरिएंटल बिल्डिंग कंपनीनें १९४१ साली १५ कोटि रुपयांचें काम पूर्ण केलें. १९४२ चे मानानें हा आकडा ५१ कोटि रुपयांनीं जास्त आहे.

युद्धामुळें करारची पूर्तता अशक्य झाली

मुंबई हायकोर्टाचा निवाडा

दोन लक्ष रुपये किंमतीच्या, ऑइल रिफायनिंग व हेड्रोजनेटिंगची यंत्रसामुग्रीसाठी दोन जर्मन कंपन्यांशी गोविंदराम सक्सेरिया ह्या फर्मनें करार केला होता. पुढें त्या फर्मनें हा करारांतील हितसंबंध भारत वनस्पति प्रॉडक्टस लि. ला विकले. जर्मन कंपन्यांच्या मालमत्तेची माहकी कस्टोडियन ऑफ एनिमी प्रापर्टीकडे गेली. त्यांचें म्हणणें असें कीं, जुलै १९३९ मध्यें यंत्रसामुग्रीपैकी नऊदशांश माल मुंबईत दाखल झाला व प्रतिवादींकडून ९६ हजार रुपये घेऊन तो त्यांस देण्यांत आला. दिलेल्या मशिनरीची किंमत १ लक्ष ८१ हजार रुपये होती. युद्ध सुरू झाल्यामुळें यंत्रसामुग्री पुरविण्याचा करार रद्द झाला, तेव्हां कॉन्ट्रॅक्ट ॲक्टाच्या ६५ व्या कलमानुसार वादीचा (कस्टोडिअन ऑफ एनिमी प्रॉपर्टी) पुरविलेल्या मशिनरीची येणें रक्कम (८७ हजार रुपये) त्यास मिळावी, असा गोविंदराम सक्सेरिया व भारत वनस्पति प्रॉडक्टस लि. ह्यांवर दावा होता. पुरविलेली मशिनरी अपुरी असल्याकारणानें ती कुचकामाची ठरली, तेव्हां वादीनेंच नुकसानभरपाई भरून द्यावी, असें प्रतिवादीनें सांगितलें. वादी अथवा प्रतिवादी ह्यांपैकी कोणाचाच फायदा झाल्याचें सिद्ध झालें नाही, ह्या कारणास्तव हायकोर्टानें दावा काढून टाकला. कांहीं अनपेक्षित व आवाक्याबाहेरील परिस्थितीमुळें कराराची पूर्तता करतां आली नाहीं, तर त्या करारामुळें कोणाचाहि कांहीं फायदा झाला असल्यास त्यानें तो परत दिला पाहिजे, असा कराराचा कायदा आहे, व त्या कायद्यास अनुसरून वादीनें वरील दावा आणला होता. परंतु, प्रतिवादीस मशिनरी मिळाली तरी ती निरुपयोगी ठरल्यामुळें, प्रतिवादीचा फायदा झाल्याचें सिद्ध होऊं शकलें नाहीं. त्याचप्रमाणें वादीचाहि कांहीं फायदा झाला असल्याचें सिद्ध झालें नाही. म्हणून हायकोर्टानें दोन्ही पक्षांचीहि मागणी अमान्य ठरविली. वादीचे हातीं मशिनरीची पुरी किंमत आली नाही व प्रतिवादीचे हाती आलेली मशिनरी निरुपयोगी असल्यामुळें दिलेली रकमहि वाया गेली, अशा परिस्थितींत कोणाचाच अवास्तव फायदा झाला नाहीं असें हायकोर्टास आढळून आलें.

व्यापारवृद्धीसाठी चित्रपटांची मदत

चित्रपटांचा ब्रिटिश मालाची निर्गत वाढविण्याकडे कसा उपयोग करून घेतां येईल, याची चर्चा मिस मेरी फील्ड ह्यांनी इन्स्टिट्यूट ऑफ एक्सपोर्टर्सच्या सभेंत नुकतीच केली. युद्धापूर्वी जर्मनियांत एका विशिष्ट प्रकारच्या शिवण्याच्या यंत्रांस मागणी आली, त्यांचें मूळ अमेरिकन प्रचार पटांत आढळलें; त्याचप्रमाणें ब्रह्मदेशांत अमेरिकन जाहिरातीच्या फिल्ममध्यें शेतीस कृत्रिम खतांचा कसा उपयोग होतो हें दाखविण्यांत आलें त्याचा परिणाम ह्या खतांचा खप वाढण्यांत झाला, असें मिस फील्ड ह्यांनी सांगितलें. "आमचा माल वापरा" अशा प्रकारच्या जाहिरातीपेक्षा अप्रत्यक्ष रीतीनें मालास मागणी निर्माण करण्याची अमेरिकन कला चांगली आहे, असें सांगून ब्रिटिश साम्राज्यांत आपण त्याचें अनुकरण केलें पाहिजे, असें त्या म्हणाल्या. लघुपटांचे निर्माते व निर्गत व्यापारी ह्यांच्या संस्थांमध्यें सहकार्य वाढवून ही गोष्ट सहज घडवून आणतां येईल, असें सुचवून आरेग्याच्या काळजीबाबत चित्रपट दाखवून टुथपेस्ट वगैरेंचा खप कसा वाढवितां येईल, याचें दिग्दर्शन त्यांनी केलें. युद्धोत्तर काळांत सुधारलेले देश आपला माल इतर देशांत खपविण्यासाठी कसा युक्तीचा व पद्धतशीर प्रयत्न करतील, याचें वरील हें केवळ एक उदाहरण आहे. त्यावरून, हिंडल्यानापुढें येणाऱ्या विकट प्रश्नांचें स्वरूप चांगलें ध्यानांत येईल.

दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.

हेड ऑफिस : पुणें शहर.
स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.
मुंबई शाखा : हलाल स्ट्रीट, फोर्ट.
जळगांव शाखा : नवी पेठ, मेन रोड.
नागपूर शाखा : गोखले बिल्डिंग, सिताबर्डी.

भांडवल

अधिकृत व विकीस काढलेलें	खपलेलें	वसूल झालेलें
रु. १०,००,०००	रु. १०,००,०००	रु. ७,१६,१७०

एकूण खेळतें भांडवल रु. ७४,००,०००

बँकेच्या शेअरवर डिसेंबर १९४२ अखेर ४½% करमाफ डिव्हिडंड दिलें गेलें. बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदी-विक्री कमीशनवर करून दिली जाते.

बँकेनें रु. ५ प्रीमियमनें काढलेले सर्व शेअर्स विकले गेलें. विशेष माहितीसाठी भेटा अगर लिहा.

सी. व्ही जोग,
B. Com., C. A. L. B., C. A. L. L. B.
मॅनेजर

जिकडे तिकडे प्रशंसा

इमिटेशन दागिन्यांवर रासायनिक क्रिया करून खऱ्या सोन्याचा पत्रा चढविला जातो त्यामुळें दागिना केव्हांही खराब होत नाहीं, ही पूर्ण खात्री झाली. सोन्याचा पत्रा चढविलेल्या चार बांगड्या कि. आठ रु. गरजेस्तव दागिना परत करणें झाल्यास वर चढविलेल्या सोन्याचे सर्वच्या सर्व पैसे परत देऊं.

भट कं. सांगली, S. M. C.
भट कंपनी शाखा—बुधवार पेठ, पुणें २.

पुण्यांतील
आदर्श निवासस्थान व भोजनालय.
छाया लॉजिंग व बोर्डिंग हाउस
बुधवार चौक, पुणें २.

मलेरियावरील क्रांतिकारक हिंदी शोध
मागोरा पिल्स
अवघ्या ४ दिवसांत मलेरिया थांबतो.
१६ गोळ्यांच्या डबीस रु. १
— १०० गोळ्यांचें पॅकिंगही मिळतें. —
मागोरा केमिकल कं. लि.
टिळक रोड, पुणें २.

लहान गावांतील बँकांचा मालतारणावर कर्जे देण्याचा धंदा

आपल्या ठेवीदारांकडून कमी व्याजाचे दरानें घेतलेल्या ठेवी जवळ्या गावीं सुरक्षित रीतीनें व किफायतशीर दरानें गुंतवण्याचे दृष्टीनें व्यापाऱ्यांना मालतारणावर कर्जे देणें हा एक उत्तम मार्ग आहे. व्यापाऱ्यानें सुगीच्या दिवसांत घेतलेल्या मालास अधिक किंमत येण्याचे दृष्टीनें तो माल कांहीं दिवस ठेवून टाकणें आवश्यक असतें व त्या मालांत गुंतलेला पैसा त्याच मालावर कर्ज काढून दुसऱ्या व्यवहाराकरितां मोकळा करावा लागतो व अशा तऱ्हेनें लागणारा पैसा हुकमी रीतीनें पुरवणें बँकांना शक्य असतें.

ज्या व्यापाऱ्यास अगर इसमास कर्ज द्यावयाचें त्याची जिंदगी किती आहे, त्यास किती रक्कम दिली असतां त्यानें ताब्यांत दिलेल्या मालाचे किंमतींत कितीहि चढउतार झाला असता देखील त्याची फेड बिनतक्रार होऊं शकेल इत्यादि गोष्टी लक्षांत घेऊन त्यास द्यावयाच्या कर्जाची जास्तींत जास्त मर्यादा ठरवतात व त्या मर्यादेच्या आंत त्यास वेळोवेळीं त्याला जरुर लागेल त्याप्रमाणें त्याचेकडून माल तारण घेऊन भावाच्या चढउताराकरतां योग्य फूस ठेवून त्यास कर्ज देतात. अर्थात त्यानें ताब्यांत माल देतेवेळीं त्या मालाचा विमा उतरलेला आहे कीं नाहीं, तो माल ज्या गोडाउनमध्यें ठेवला आहे तेथें तो सुरक्षित राहूं शकेल किंवा नाहीं, तें गोडाउन योग्य तऱ्हेनें त्याच्या ताब्यांत आलें आहे किंवा नाहीं, तो माल त्याचाच आहे किंवा कसें, शिवाय, त्या गोडाउनजवळ अपघातानें आग वगैरे लागल्यास ती विझविण्याची व्यवस्था केली आहे कीं नाहीं इत्यादि गोष्टींची चौकशी व खात्री योग्य ते कागदपत्र पाहून करावी लागते. ही चौकशी इतक्या सहज रीतीनें व कौशल्यानें केली पाहिजे की त्यायोगें त्या इसमास कोणत्याही तऱ्हेनें आपणाविषयीं तिरस्कार अगर अपमान वाटता कामा नये. शहरांतील व्यापाऱ्यांना बँकांकडून कर्ज काढण्याची पद्धत लागून गेली असल्यामुळें त्यांना अशा चौकशीचें विशेष कांहीं वाटत नाहीं पण जेथें या पद्धतीचा फारसा प्रचार नाहीं तेथें अशा तऱ्हेनें चौकशी करणें व्यापाऱ्यांना कमीपणाचें वाटतें व केवळ अशा बाबतींत थोडासा मतभेद झाल्यामुळेंच कित्येक व्यापाऱ्यांनीं कर्जेंच घ्यावयाचीं नाकारल्याचीं उदाहरणें आहेत.

त्याचप्रमाणें दुसरी मोठ ऑफिसच्या वेळेसंबंधीं. शहरांतील बँकांना ऑफिस टाइममध्येंच सर्व कामें उरकतां घेतात; परंतु लहान गावांतील बँकांना ऑफिसच्या वेळेच्या बाबतींत इतका काटेकोरपणा करून भागत नाहीं. याचा अर्थ असा नव्हे कीं, बँकांनीं केव्हांही आपले व्यवहार करावेत.

एक तर लहान गावांत शहराप्रमाणें व्यापाऱ्यांचे सर्व व्यवहार अमुक वेळींच होतात असें नाहीं. व्यवहार थोडे व स्पर्धा जास्त, त्यामुळें अमेल त्यावेळीं आपले व्यवहार उरकून टाकावयाची त्यांची प्रवृत्ति असते. एकादेवेळीं बँक सुरू होण्याचे थोडा वेळ आधींच अगर बंद झाल्यावर त्यांना त्यांचे खात्यांतील रक्कम काढण्याची जरुरी पडते. अशा वेळीं त्यांच्या चेकचे पैसे देणेंही कित्येक वेळा आवश्यक ठरतें. अशा वेळीं ज्यानें चेक काढला असेल त्यासच त्या चेकचे पैसे दिले तर 'स्टॉप पेमेंट' चीही भीती राहणार नाहीं व त्या इसमाचेंही काम होईल. अर्थात अशा मोठी वारंवार करणें केव्हांही चांगलें ठरणार नाहीं.

लहान गावांतील बँकांचे व त्यांच्या खातेदारांचे हरघडी येणारे जिव्हाळ्याचे प्रसंग व बँकिंगच्या व्यवहारांची आवड निर्माण करण्याची जरुरी इत्यादी गोष्टी लक्षांत घेऊनच अशा तऱ्हेचीं बंधनें बँकांना थोडीशीं ढिली करावीं लागतात व अशा तऱ्हेचीं बंधनें थोडीशीं ढिली केल्यानेंच लहान गावांतील लोकांना देसील बँकेशीं व्यवहार करण्याची गोडी लागून तेथें बँकेच्या धंद्यास अधिकाधिक क्षेत्र मिळत असल्याचें अनुभवास येतें.

ह. वा. सहस्रबुद्धे.

चेकचे पैसे चुकून दिले, तर बँकेस ते वसूल करतां येत नाहींत

मेसर्स सुखदेव सिंह ज्योतिप्रसाद यांनीं मर्केंटाइल बँक ऑफ इंडिया लि. दिल्ली या बँकेंत ओव्हरड्राफ्टची व्यवस्था केली. १४ सप्टेंबर, १९२२ रोजीं त्यांनीं बँकेवर पंजाब इंडस्ट्रिअल एजन्सी लि. च्या नांवें एक चेक काढला, परंतु हा चेक बँकेकडे पोंचण्यापूर्वीच ३ जानेवारी १९२३ रोजीं चेकचे पैसे न देण्याविषयीं बँकेस कळविलें. २ फेब्रुवारी, १९२३ रोजीं पंजाब इंडस्ट्रीअल एजन्सीनें बँकेंत चेक दाखल केला व चेकचे पैसे न देण्याविषयींची सूचना विसरली जाऊन बँकेनें चेकची रक्कम दिली. १९ मार्च रोजीं बँकेला आपली चूक कळून आली व तिनें पंजाब इं. एजन्सीकडे चेकचे पैसे परत मागितले, ते एजन्सीनें देण्याचें नाकारलें व बँकेनें वेशाच्या वसुलीसाठी दावा लावला. खालच्या व अपील कोर्टानीं बँकेतर्फे निशडा केला, तेव्हां शेवटीं हायकोर्टात प्रकरण गेलें. "चेक धारण करणारास त्याचे पैसे मिळाले, म्हणजे चेक लिहिणारानें त्याचे पैसे दिले असाच अर्थ होतो. येथें तर मेसर्स सुखदेव सिंह ज्योतिप्रसादच्या खाती पंजाब इ. एजन्सी लि. नें चेकची रक्कम जमा केली आहे. ज्यास रक्कम मिळावयाची होती, त्यासच ती मिळालेली आहे व कांहीं चूक झाली असल्यास ती बँकेचीच आहे." असा हायकोर्टानें निवाडा करून अर्जदार पंजाब इंडस्ट्रिअल एजन्सी लि. चा सर्व खर्च भरून देववला.

दी भारत इंडस्ट्रिअल बँक, लि.

हेड ऑफिस : पुणें शहर
शाखा : पुणें कॅन्टोन्मेंट, बारामती
पे-ऑफिस : लोणी

—: खेळतें भांडवल रु. १९ लाखांचे वर :—

कळविण्यास आनंद वाटतो कीं, दि. २५-३-४४ रोजीं मुदतीपाडण्याचे मुहूर्तावर बँकेची शाखा लोणावळा येथें उघडण्यांत आली.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

मॅनेजिंग डायरेक्टर्स

पुना गेस्ट हाऊस

१००, लक्ष्मी रोड, पुणें २.

Telephone 779

GUEST HOUSE

TELEGRAM Guest House Poona 2.

स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

गिरगांव मुंबई नं. ४

महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

☆ नगर बाँबे ट्रेडिंग कंपनी ☆

चिनाब, लाइम ज्यूस कॉर्डीअल, ऑरेंज व लेमन स्क्वॉश, टोमॅटो सॉस मँगो जॅम, मध, कोको, बेकिंग पावडर, सॅनिटरी टॉवेलस्, टुथ पेस्ट, टुथ ब्रश, वगैरे मालाचे स्टॉकिस्ट.

शाखाः— माणिक चौक, अहमदनगर

हेड ऑफिसः— पूना गेस्ट हाऊस, पुणें २

न्यू इंडिया इंडस्ट्रीज लि.

(Approved Re-traders and Approved Contractors)

२६ लॅमिंग्टन नॉर्थ, मुंबई ११.

अध्यक्षः—श्री. ग. स. मराठे, ॲक्चुअरी.

महाराष्ट्रांतील रबराचा प्रमुख कारखाना

★ गिरणीचे रोलर्स ★ रबरी हातमोजे ★ छापखान्यांचे रोलर्स
★ रीमोल्ड टायर्स ★ रबरी वॉशर्स ★ सॉलिड व्हील्स

व इतर रबरी माल तयार होतो.

पु. ग. मराठे
मॅनेजिंग डायरेक्टर.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२७/१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
ओळीस पहिल्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाविलास' पुणें ४.

अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
(टपाल खर्चासह)
किरकोळ अंकास
दोन आणे.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष १० पुणें, बुधवार, तारीख २६ एप्रिल, १९४४ अंक १७

दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक लि.

मुख्य कचेरी : प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग, बुधवार, पुणें.

अधिकृत भांडवल रु. १०,००,००० : विकीस काढलेलें रु. ५,००,०००
खपलेलें भांडवल रु. ३,९५,१०० : जमा भांडवल रु. १,३२,९०५

खेळतें भांडवल रु. २२ लक्षांच्या वर

मुंबई शाखा अक्षय तृतीयेच्या मुहूर्तावर उघडण्यांत आली.

आगा : इस्माइल बिल्डिंग. ३८१ हॉर्नबी रोड, मुंबई.

संचालक मंडळाचे अध्यक्ष : श्री. ग. रा. साठे

गोपाळ धोंडोपंत जोगळेकर, बी. ए. (ऑनर्स) बी. कॉम., एलएल. बी., मुख्य कचेरीचे मॅनेजर.

श्री. चिं. नि. चितळे मॅनेजिंग डायरेक्टर.

मुंबई शाखेचे सल्लागार मंडळ

श्री. गोविंदराव आनंदराव कुलकर्णी, मालक, कन्सॉलिटेटेड मिल सप्लाईज, मुंबई (अध्यक्ष)
श्री. विष्णु गोविंद गांगल, भागीदार, काळे सेल्स असोसिएशन, मुंबई, सभासद
शेठ भगवानदास हिरालाल मंडेरिया, भागीदार, डायमंड इलेक्ट्रिक कंपनी, मुंबई, सभासद
श्री. मोरेश्वर मार्तंड गद्रे, बी. ई. (बनारस) भागीदार, युनिव्हर्सल सप्लाय अँड ट्रेडिंग कंपनी, मुंबई, सभासद
श्री. लक्ष्मण महादेव जोशी, बी. कॉम., सी. ए. आय. आय. बी. मुंबई

श्री. गोविंद हनमंत जोग, बी. ए.
मुंबई शाखा एजंट

★ नगर वाँबे ट्रेडिंग कंपनी ★

चिनाब, लाइम ज्यूस कॉर्डीअल, ऑरेंज व लेमन स्क्वॉश, टोमॅटो सॉस
मँगो जॅम, मध, कोको, बेकिंग पावडर, सॅनिटरी टॅबलेट्स,
टुथ पेस्ट, टुथ ब्रश, सगेरे मालाचे
स्टॉकिस्ट.

शाखा:— माणिक चौक, अहमदनगर

★

हेड ऑफिस:— पूना गेस्ट हाऊस, पुणें २

प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँकेच्या मुंबई शाखेचें उद्घाटन

अध्यक्ष, श्री. जी. आर. साठे, यांचें भाषण

प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक लि. च्या मुंबई शाखेचें उद्घाटन २५ एप्रिल रोजी झालें. त्याप्रसंगी बँकेचे चेअरमन, बिस्किट व कोको फॅक्टरीचे मालक श्री. जी. आर. साठे, यांनीं बँकेच्या आतांपर्यंतच्या प्रगतीचा आढावा घेतला. औद्योगिक संस्थांस भांडवल पुरविण्यासाठी आजवर करण्यांत आलेल्या प्रयत्नांची त्यांनीं माहिती दिली. त्याचप्रमाणें, बँकेस ज्या व्यक्तींचे व संस्थांचें सहाय झालें, त्यांचा नामनिर्देश करून आभार मानले. नंतर ते म्हणाले, "बँकेनें ज्यांस सहाय करून भरभराटीस आणलें, अशा सर्वांचा उल्लेख करतां येणें शक्य नसलें, तरी डेक्कन पेपर मिलबाबत कॅनरा पेपर अँण्ड पल्प कं. लि. चा व्यवहार, पैसा फंडाची उर्जितावस्था, कॉमनवेल्थ कंपनीचा पुनर्जन्म, इत्यादि संबंधांतील प्रेसिडेन्सी बँकेची कामगिरी जनतेस पूर्ण परिचयाची आहे. गिऱ्हाइकांना सवरती देत असतांनाच बँकेची परिस्थिति मजबूत होत गेलेली आहे व बँकेची स्वतःची इमारत असणाऱ्या अत्यंत थोड्या बँकांच्या पंक्तीस ती येऊन बसली आहे. मुंबईमध्यें शाखा उघडून बँक आपल्या व्यवहाराचा विस्तार करीत आहे व आपल्या अंतिम विस्तृत ध्येयसिद्धीच्या नजीक जात आहे."

बँकेची प्रगति

वर्ष	वसूल भांडवल	खेळतें भांडवल	डिव्हिडंड (करमाफ)
१९३८	३८,३८०	२,०३,०००	२½
१९३९	४८,९१५	१३,९७,०००	२½
१९४०	५८,०८०	४,३७,०४०	२½
१९४१	६८,४३०	६,०६,०००	२½
१९४२	७३,६८०	११,०४,०००	३%
१९४३	१,०१,२९५	१९,९१,७००	४%
१९४४	१,३२,९०५	२२,००,०००	

महाराष्ट्राची पहिली शेडयूल्ड बँक

न्यू सिटिझन बँक ऑफ इंडिया लि.

(हेड ऑफिस : मुंबई)

अधिकृत भांडवल : १०,००,००० रु.
रोख जमा झालेलें भांडवल : ६,००,००० रु.

एकूण खेळतें भांडवल : ९५,००,००० रु.

—: शाखा :—

सोलापूर, नाशिक, नाशिक रोड, देवळाली, कोल्हापूर, इचलकरंजी, सांगली, मिरज, महाड, लोणंद, अहमदनगर, पुणें, धुळें, जळगांव, दिल्ली, अमरावती, मालेगांव, सिन्नर, संगमनेर.

D. N. Gandekar, B.A., LL.B. — पुणें बँच मॅनेजर
D. D. Deshpande, B.A. — मॅनेजिंग डायरेक्टर

विविध माहिती

गोकाक मिल्स लि.

वरील कंपनीला १९४३ साली ६५ लक्ष, ६७ हजार रुपये नफा झाला व भागीदारांस करमाफ २३% डिव्हिडंड मिळालें. या कंपनीच्या दोन्ही गिरण्या गोकाक येथें असून त्यांत ७४,३२८ चात्या आहेत. मेसर्स फोर्बस फोर्बस कँबेल अँड कंपनी लि. कडे मॅनेजिंग एजन्सी आहे.

एम्पायर ऑफ इंडिया ॲशुअरन्स कं. लि.

वरील कंपनीनें १९४३ साली २ कोटि, ६२ लक्ष रुपयांचें काम मिळविलें. कंपनीनें १९४३ अखेर आपले हप्त्यांचे दर वाढविले आहेत.

भाजीसाठीं अमेरिकन बीं

अमेरिकेंतून इंग्लंडमध्यें भाजीच्या बियांचीं ८० हजार पाकिटें येऊन दाखल झालीं आहेत, त्यांपासून ५० हजार टन भाजी निघूं शकेल. प्रत्येक पाकिटांत वेगवेगळ्या बियांच्या १८ पुड्या आहेत, त्यापासून येणारी भाजी पांचाच्या कुटुंबास वर्षभर पुरेल.

अमेरिकेची ग्रेट-ब्रिटनमधील गुंतवणूक

ग्रेट-ब्रिटनमधील अमेरिकनं भांडवलाच्या गुंतवणुकीचा आकडा आतां ३ अब्ज, ३५ कोटि रुपये झाला आहे.

जरीला कपाशीचा प्रसार

नवापूर पेटा व तळोदें तालुका वगळून बाकी सर्व प. खानदेश जिल्हा व नाशिक जिल्ह्यांतील मालेगांव बागलाण, नांदगाव, कळवण आणि येवला हे तालुके ह्यांत जरीला कपाशीखेरीज दुसरी कोणतीहि कपास पेरण्यास व जरिलामध्यें दुसऱ्या कपाशीची भेसळ करण्यास बंदी करण्याचा मुंबई सरकारचा मानस आहे. त्याचप्रमाणें, इतर कोणत्याहि जातीची कपास बाळगणें, वापरणें अथवा खरेदीविक्री करणें ह्यांस मनाई करण्याचा किंवा त्यांवर निर्बंध घालण्याचा सरकारचा विचार आहे. ह्या संबंधांत कोणास कांहीं सूचना करावयाच्या असल्यास त्या त्यांनीं २९ जून पूर्वी सरकारकडे पाठवाव्यात.

बँक ऑफ इंग्लंडच्या गव्हर्नरांची निवडणूक

बँक ऑफ इंग्लंडचे नवे गव्हर्नर, लॉर्ड कॅटो व डेप्युटी गव्हर्नर मि. बेसिल कॅटर्नस, ह्यांची निवडणूक ता. १८ रोजीं झाली. निवडणूक बिनविरोध होती, तरी वहिवाटीप्रमाणें त्याच्या समारंभास पांच तास लागले.

इस्पितळांतील मूकघळी

कलकत्ता शहर व इतर ठिकाणचीं इस्पितळें ह्यांत ३१ मार्च अखेरच्या साडेपांच महिन्यांत १४,१०५ निराश्रित मरण पावले असें अधिकृत रीत्या प्रसिद्ध झालें आहे.

तिरुपति देवस्थानाच्या पैशाचा विनियोग

तिरुपति देवस्थानाच्या उत्पन्नाचा कांहीं अंश एक चांगल्या दर्जाचें कॉलेज चालविण्याकडे करण्याचा मद्रास सरकारचा उद्देश आहे. ह्या कॉलेजांत हिंदूंप्रमाणें इतर धर्माच्या विद्यार्थ्यांसहि प्रवेश मिळावयाचा आहे. ह्यासंबंधांतील कायद्याचा मसुदा लोकमत अजमावण्यासाठी सरकारनें प्रसिद्ध केला आहे, त्यास विरोध होत असल्याचें दिसतें.

अनुक्रमणिका

	पृष्ठ
१ विविध माहिती ...	१३०
२ अन्नपुरवठा आणि सहकारी कार्य ...	१३१
३ शेअर बाजार ...	१३२
४ द. आफ्रिकेंतील सोन्याची हिंदुस्थानांत विक्री ...	१३२
५ स्फुट विचार ... सहकार संवर्धनाची युद्धोत्तर योजना—श्री. मसानी ह्यांचे विचार—होळकर संस्थानांतील सहकारी प्रगतिबाँबे को. क्वार्टली ...	१३३
६ मिरजोळे शे. स. पतपेढी	१३४
७ धान्य वाटपासाठीं सहकारी संघटना ...	१३५
८ हातमाग टिकवले व वाढवलें पाहिजेत ...	१३६

अर्थ

बुधवार, ता. २६ एप्रिल, १९४४

अन्नपुरवठा आणि सहकारी कार्य

नवीन शेतीचा हंगाम जसजसा जवळ येत चालला आहे तसतसे धान्याचें उत्पादन आणि त्याची वाटणी ह्यांचे संबंधांतले प्रश्न अधिक महत्त्वाचे होत आहेत. मुंबई प्रांताच्या दृष्टीनें विचार करतां वाढत्या स्थानिक उत्पादनाचें अगत्य विशेष आहे हें ध्यानांत बाळगलें पाहिजे. मागें ह्या प्रांतास धान्याचा तुटवडा कधींच भासला नाहीं, मग तो आतांच कां भासावा असें कित्येकजण विचारतात. त्यांस हेंच उत्तर आहे कीं, मामुली परिस्थितींत ह्या प्रांतांत बाहेरून धान्य येत असें तसें तें युद्धकाळांत येऊं शकत नाहीं. ब्रह्मदेशांतून यावयाचा तांदूळ बंद झाल्यामुळें ह्या धान्याचा तुटवडा सर्व देशभर भासत आहे आणि त्या राष्ट्रीय पुरवठ्याची प्रांतानिहाय वाटणी होईल तींत मिळणाऱ्या हिश्शावर प्रत्येक प्रांतास आपला गुजारा करणें प्राप्त आहे. वहातुकीच्या अडचणी आणि इतर प्रांतांतील पिकांची बरी वाईट स्थिति ह्यांनीं धान्याची ह्या प्रांतांत होणारी आयात मर्यादित केली जाणें स्वाभाविक आहे. सुबत्तेच्या प्रांतांतून तुटीच्या प्रांतांस धान्याचा शक्य तेवढा पुरवठा करण्याचें मध्यवर्ती सरकारनें ठरवलें आहे तरी असल्या सहायावर स्वतःची तूट भरून काढण्यासाठीं मुंबईनें अवलंबून रहाणें इष्ट नाहीं आणि ह्या प्रांतानें आपल्यापुरतें उत्पादन शक्य तितक्या प्रमाणांत वाढवणें आवश्यक आहे. उत्पादन वाढवण्याचे प्रांतिक सरकारनें प्रयत्न चालवले आहेत त्यांस जमीनदार वर्गानें सहाय देणें अगत्याचें आहे. पुष्काळांत तेरावा महिना ह्या न्यायानें मुंबईंत परवां स्फोट होऊन इतर मालमत्तेबरोबर धान्याचा मोठा साठा नष्ट झाला. अशा पावसाच्या वगैरे दैवी आपत्ति उत्पादन व पुरवठा ह्यांच्या अंदाजांत हिशेबांत घेणें आवश्यक असल्यानें ह्या प्रांतानें धान्यांच्या पिकांचें क्षेत्र सरकारच्या वतीनें सुचवलें गेल्याप्रमाणें शक्य तितकें वाढवणें किती आवश्यक आहे हें दिसून येणार आहे.

युद्धोत्तर काळांत आर्थिक संवर्धनाच्या कोणत्या योजना हातीं घ्याव्या ह्याची चर्चा सध्या सर्वत्र चालली आहे. पण प्रत्यक्ष युद्ध परिस्थितींत असल्या योजनांचें आणि त्यांत मूलभूत असलेल्या सरकारी नियंत्रणाचें अगत्य अधिक आहे हें विसरून चालणार नाहीं. धान्याचा प्रश्न हा जनतेच्या जीविताचा विषय आहे आणि ह्यासाठीं कपास, तंबाखूसारखीं पिकें मर्यादित करून त्यांचे जागीं जोंधळा, बाजरी, महूं इत्यादि पिकें काढणें आवश्यक आहे. मामुली काळांत कोणतीं पिकें करावीं हें प्रत्येक जमीनदार स्वतःच्या इच्छेप्रमाणें ठरवतो, पण राष्ट्रीय अडचणीचे प्रसंगीं जमीनदारांचें हें स्वातंत्र्य मर्यादित करणें अपरिहार्य असतें. ह्या बाबतींत सक्तीचें धोरण अवलंबण्याचें मुंबई सरकारनें ठरवलें आहे तें ह्यासाठीच होय. धान्य वाटणींत उत्पादकांनीं स्वतःच्या गरजेपुरतें धान्य ठेवून बाकीचें सरकारास विकलें पाहिजे असा नियम करण्याचा उद्देश स्पष्ट आहे. अशा सक्तीच्या व नियंत्रणाच्या योजनेंत ठराविक किंमतीनें सर्वांस योग्य प्रमाणांत धान्य मिळत जाईल अशी समाधानकारक व्यवस्था करण्याची जबाबदारी सरकारवर पडते आणि ती त्यानें स्वीकारली आहे. ह्याबरोबरच जनतेस भासणाऱ्या अडचणी समजून घेण्याची आणि त्या शक्य तितक्या दूर करण्याची आपली तयारी असल्याचें आश्वासन सरकारनें दिलें आहे. शहरांत व खेडेगावांत पुरवठा, साठा, खरेदी, विक्री ह्यांविषयींची योजना व्यापक व गुंतागुंतीची होणार आहे. ह्यासाठीं सरकार आणि जनता ह्यांचें पूर्ण सहकार्य घडून येणें अगत्याचें आहे. कोणत्याहि योजनेचा चांगुलपणा तिच्या यशस्वी अंमलबजावणीवर अवलंबून रहातो हें सरकारनें ध्यानांत बाळगलें पाहिजे. धान्याच्या पिकांचा विस्तार आणि धान्याची वाटणी ह्यांचे बाबतींत सहकारी संस्थांस सरकारी योजनेंत महत्त्वाचा भाग घेतां येण्यासारखा आहे. पिकें वाढवण्यासाठीं शेतकऱ्यांस बीं, खियाणें, खत वगैरे लागेल तें सहकारी संस्थांच्या मार्फत सरकारनें पुरवावें. ह्या संस्थांनीं ह्याप्रकारचें कार्य अनेक ठिकाणीं यशस्वी रीतीनें केलें आहे. त्याचा विस्तार केला जावा.

ह्या प्रांतांत कित्येक लक्ष एकरांच्या जादा क्षेत्रांत पिकें लावण्यांत येणार आहेत आणि कोकणपट्टीच्या खाऱ्या जमिनींतहि भाताचें पीक काढण्याचा प्रयत्न होईल. ह्याकरितां लागणारें भांडवल सहकारी संस्थांस पुरवतां येईल. धान्याच्या विक्रीचें काम कांहीं शहरांत सहकारी स्टोअर्सच्या मार्फत आज यशस्वी रीतीनें चाललें आहे आणि ह्या पद्धतीचा विस्तार होणें आवश्यक आहे. विशेषतः खेडेगांवांत उत्पादक वर्गास व बिनशेतकरी लोकांस धान्याचा पुरवठा होण्याची जरूरी अलीकडील अनुभवावरून तीव्रतेनें भासत आहे. विशिष्ट मर्यादेपलीकडील धान्य सरकार स्वतः शेतकऱ्यांकडून विकत घेऊन त्याचा साठा करणार आहे आणि त्याच्या विक्रीची तजवीज खेडेगांवांत करणार आहे. ही व्यवस्था शक्य तेथें सहकारी सोसायट्यांकडे सोंपवण्याचें सरकारनें ठरवलें आहे आणि ह्या संधीचा फायदा सहकारी संस्थांनीं पूर्णपणानें करून घेतला पाहिजे. सदरहु कामगिरी यशस्वी रीतीनें पार पाडली जावी ह्यासाठीं सहकारी संस्थांस लागणाऱ्या सवलती सरकारकडून मिळणें अगत्याचें आहे. धान्य सक्तीनें जमवणें, त्याचा साठा करणें आणि त्याची ठराविक किंमतीनें शहरांत व खेडेगांवांत वाटणी करणें याविषयींची मुंबई सरकारनें हातीं घेतलेली योजना प्रचंड आहे आणि तिच्या योगानें शिधापद्धतीचा अंमल सर्व प्रांतभर होणार आहे. त्या संबंधांत अनेक दोष व अडचणी टीकाकारांनीं पुढें मांडल्या आहेत, त्यांचा विचार काळजीपूर्वक केला जाईल अशी आशा आहे. सहकारी संस्थांच्या कार्यकर्त्यांस जनतेच्या आर्थिक गरजा सांघिक पद्धतीनें भागवण्याचा अनुभव आहे; हें कार्य मोठ्या विस्तृत क्षेत्रांत आतां केलें जावयाचें आहे आणि त्याची जबाबदारी सहकारी संस्थांनीं उचलणें अगत्याचें आहे.

शेअर बाजार

(ले. श्री. व. वि. लोणकर, एम्. ए., बी. कॉम.)

मुंबईतील स्फोटामुळें विमा कंपन्यांच्या शेअर्सना तितकाच मोठा धक्का बसला आहे. स्फोटामुळें झालेलें नुकसान शेकडों कोटींवर घोटलें जात आहे. इतकें नुकसान विमा कंपन्यांना काळजी देतां येईल की नाही अशी शंका प्रदर्शित केली जात आहे. कारण आगीचें काम करणाऱ्या देशी विमा कंपन्यांचे संचय दहा पांच कोटींवर नाहींत. परदेशी कंपन्यांची गोष्ट थोडीशी वेगळी आहे. जर विमा कंपन्यांनी नुकसानी दिली नाहीं तर ज्या व्यापारी मंडळींनीं गोदींतील मालाच्या तारणावर बँकांकडून कर्जे काढलीं होतीं त्यांना बँकांच्या रकमा फेडणें दुर्घट होऊन बँकांना फार मोठाल्या रकमांवर तुळशीपत्र ठेवावें लागेल, या भीतीमुळें बँकांचेहीं शेअर बरेच उतरूं लागले आहेत.

तेव्हां, या स्फोटामुळें नुकसानीची जबाबदारी कायद्यानें कोणावर येते व कोण ती भरून देणार आहे हा अत्यंत जिव्हाळ्याचा प्रश्न उभा राहतो. प्रथमतः आगीच्या विमा उतरवितांना त्यांतून स्फोटामुळें झालेलें नुकसान वगळलें जात असतें. तेव्हां या विमापत्रकांतील अपवादाचा विमा कंपन्या फायदा जरूर घेऊं पाहतील. जेव्हां एकादा स्फोट प्रथम होऊन मग आग लागते व नुकसान होतें तेथें विमा कंपन्यांची भूमिका बरोबर ठरते. पण समजा प्रथम लहानशी आग लागून ती चालूं असता ती पसरून ज्वालाग्राही पदार्थांपर्यंत पोहोंचून मग स्फोट झाला व नुकसानी झाली तर त्या ठिकाणीं नुकसानीचें तात्कालिक कारण जरी स्फोट असलें तरी मूळ कारण आगच ठरते, अशा प्रसंगीं विमा कंपनीला नुकसानी भरून द्यावी लागतें. परवांच्या स्फोटाबाबत आतां असें जाहीर झालेलें आहे कीं प्रथम सकाळीं ११ च्या सुमारास एका गोदामास आग लागून ती पसरल्यामुळें स्फोट झाला. तेव्हां वर सांगितलेल्या युक्तिवादाच्या आधारें जबाबदारी विमा कंपन्यांच्या अंगावर बसूं पाहते.

जर विमा कंपन्यांना भरपाई द्यावी लागणार असेल तर ती सरकारच्या मदतीशिवाय देता येणें शक्य नाहीं. हल्लीं सर्व मालाचा युद्ध-विमा उतरविला जात असतो व नुकसानभरपाई सरकारकडून मिळणेची असते. प्रस्तुत नुकसानी युद्ध-विमा या कक्षेंत बसूं शकते किंवा नाहीं हा पुढील प्रश्न उभा राहतो व जर तसा तो बसत असेल तरच सरकार नुकसानी भरून देऊं शकेल. या बाबतींत युद्ध-विम्यासंबंधीचे नियम पाहणें उद्बोधक ठरेल. अर्थात् या नुकसानीचा निर्णय न्यायमंदिरांतच लावून घेणें इष्ट होईल यांत शंका नाहीं. मात्र यापुढें नैतिक जबाबदारी सरकारवर पडते हें जो दारूगोळा पेटला तो साम्राज्यरक्षणासाठीच होता हें लक्षांत घेतल असतां दिसून येईल.

न्यू इंडिया विमा ८९ वरून ६५ व नंतर ७४-८, वल्कन २० वरून १२, ज्युपिटर ३९ वरून २९ इतके विमा शेअर खाली पडले आहेत व इंडिया बँक १८१ वरून १७१, सेंट्रल ७७ वरून ७० व नंतर ७३, युनियन १०-११ वरून ८-१२ इतके बँकांचे शेअर्स बाकले आहेत.

द. आफ्रिकेंतील सोन्याची हिंदुस्थानांत विक्री

दक्षिण आफ्रिकेंतील सोन्याच्या हिंदुस्थानांतील विक्रीसंबंधीं सुटाश त्या देशाच्या फडनविसांनीं नुकताच केला आहे. दक्षिण आफ्रिकेच्या असेंब्लींत या प्रश्नावर बरीच चर्चा झाली. इंग्लंड १६८ शिलिंगांस एक औंस या दरानें दक्षिण आफ्रिकेचें सोनें विकत घेऊन हिंदुस्थानांत त्याचे ३२० शिलिंग करते, या गोष्टीचा त्यांत उल्लेख करण्यांत आला. आम्हांला हिंदुस्थानांत सोनें विकावयाचें आहे, असें ब्रिटिश सरकारनें दक्षिण आफ्रिकेच्या सरकारास कांहीं महिन्यापूर्वी कळविलें. हिंदुस्थानांत, चलनविस्तार भारी झाला व त्यामुळें येथील ब्रिटिशांची खरेदी महागाईची होऊं लागली तरी पौंड-रुपया हुंडणावळींत हिंदुस्थान सरकारनें बदल केला नाहीं. हिंदुस्थानांतील बाजारभावानें तेथें कोनें विकलें, तर ब्रिटिशांस प्रतिकूल वाटणाऱ्या हुंडणावळीचा परिणाम थोडा फार टळेल व हिंदी चलनविस्तारासहि आळा बसेल, असा ब्रिटिश सरकारनें विचार केला. दक्षिण आफ्रिकाहि कांहीं मालाची खरेदी हिंदुस्थानांत करते व त्या प्रमाणांत हिंदी चलनविस्ताराचा दुष्परिणाम द. आफ्रिकेसहि भोगावा लागतो. तेव्हां, हिंदुस्थानांत सोन्याची किंमत वाढली आहे तिचा योग्य फायदा द. आफ्रिकेसहि मिळावा, अशी तेथील सरकारनें मागणी केली. तेव्हां द. आफ्रिकेच्या आयातीच्या प्रमाणांत तेथील सरकारास सुवर्णविक्रीच्या नफ्यांत वाटा देण्याचें ब्रि. सरकारनें मान्य केलें. द. आफ्रिकेनें आपल्या सोन्याचें सर्वच उत्पादन हिंदुस्थानांत विकण्याचें ठरविलें, तर द. आफ्रिकेचें हिंदुस्थानाकडून येणें तुंबेल व त्याचा त्या देशास उपयोग नाहीं. तसेंच, सोनें पाठविण्यास आगबोटी कोण देणार, त्याच्या विम्याची जोखीम कोण पत्करणार, इत्यादि मुद्देहि महत्त्वाचे आहेत. सोन्याच्या किंमतींत सट्टेबाजी व चढउतार होणें द. आफ्रिकेच्या हिताचें नाहीं; किंमत स्थिर रहाणेंच त्या देशाच्या फायद्याचें आहे. बँक ऑफ इंग्लंडशीं व्यवस्था करून दक्षिण आफ्रिकेनें सोन्याच्या व्यवहारांत सुमारें १५ कोटि रुपयांचा नफा मिळविला आहे. द. आफ्रिकेच्या स्वतःच्या व्यापारासाठीं लागणारें सोनें वगळून बाकी सर्व सोनें त्यानें बँक ऑफ इंग्लंडच्या स्वाधीन करावें व बँक ऑफ इंग्लंडनें लंडन येथील चालू बाजारभावानें सोन्याची किंमत द्यावी असें ठरलें. अशा रीतीनें, बँक ऑफ इंग्लंड द. आफ्रिकेचें सोनें विकत घेऊन हिंदुस्थानांत नफा मिळवीत असली, तरी या व्यवहारांत द. आफ्रिकेचें नुकसान नाहीं. ग्रेट ब्रिटन हिंदुस्थानांत सध्याच्या फुगलेल्या दरानें मालाची किंमत देत आहे, तेव्हां येथीलच चालू दरानें सोनें विकून ती दिली जाणें क्रमप्राप्तच आहे, असा व्यवहारसंबंधांतील युक्तिवाद आहे.

पशुवैद्यकास उत्तेजन

मुंबई येथील पशुवैद्यकाच्या कॉलेजांत येत्या तीन वर्षांत नांवें दाखल करणाऱ्या उमेदवारांना मुंबई सरकार कांहीं विशेष सवलती देणार आहे. त्यांत कॉलेजच्या व परीक्षेच्या फीची माफी व ६० शिष्यवृत्त्या यांचा समावेश होतो.

स्फुट विचार

सहकार संवर्धनाची युद्धोत्तर योजना

राष्ट्राच्या आर्थिक जीवनाचें संवर्धन युद्धोत्तर कल्पांत कसें केलें जावें ह्याची चर्चा अधिकारी व बिगर अधिकारी गोटांत चालली आहे. सहकारी चळवळीच्या प्रगतीचे पुनर्घटनेचे बाबतींत अशीच चर्चा होण्याची आवश्यकता आम्ही प्रतिपादली असून प्रांतिक इन्स्टिट्यूटनें हा प्रश्न हातीं घेतला असल्याचें लिहिलें होतें. इन्स्टिट्यूटचे अध्यक्ष, प्रांतिक बँकेचे अध्यक्ष व रजिस्ट्रार ह्यांच्या समितीकडे हें काम सरकारनें सोपवलें आहे आणि तिनें आपला पहिला रिपोर्ट सरकारला सादर केला आहे ही माहिती सर जनार्दनराव मदन ह्यांनीं मुंबई शहरांतील सहकारी संस्थांची परिषद नुकतीच भरली होती, तिचें उद्घाटन करतांना दिली. त्यापलीकडे समितीच्या सूचना काय आहेत ह्याचें दिग्दर्शन त्यांनीं केलें नाहीं. मुंबई सरकार ह्या प्रांताच्या युद्धोत्तर पुनर्घटनेची योजना आखीत आहे तिच्यामध्यें सहकारी संवर्धनाचा अंतर्भाव करतां यावा ह्या हेतूनें वरील पहिला रिपोर्ट समितीनें सादर केला आहे आणि त्यांत खेडेगावांतील सहकारी संस्थांचा विचार करण्यांत आला असल्याचें सर जनार्दन ह्यांनीं सांगितलें आहे. सहकारी चळवळ मुख्यत्वेंकरून ग्रामीण स्वरूपाची असल्या कारणानें तिला अग्रस्थान दिलें जावें हें स्वाभाविक आहे. शहरांचे संबंधांत औद्योगिक सोसायट्या, मजुरींचीं कंत्राटें घेणाऱ्यांच्या संस्था व दूध पुरवणाऱ्या सोसायट्या ह्यांचेविषयीं पुनर्घटना समितीनें सूचना केल्या आहेत असें सर जनार्दन म्हणाले. ह्या शिफारशी काय आहेत ह्याची कल्पना सहकारी कार्यकर्त्यांस येण्यासाठी त्यांस लवकर प्रसिद्धि दिली जाणें आवश्यक आहे. पुनर्रचना ह्या नांवास शोभण्यासारखी व्यापक व घडाडीची योजना तयार केली जावी अशी आमचीं अपेक्षा आहे. पुरेसें द्रव्यसामर्थ्य, मनुष्यबळ व कार्यविस्तार ह्यांचा मिलाफ पुनर्घटनेच्या योजनेंत झाला पाहिजे आणि तो केवळ डागडुगीच्या स्वरूपाचा असता कामा नये.

श्री. मसानी ह्यांचे सहकाराविषयीं विचार

गेल्या महिन्यांत मुंबई शहरांत भरलेल्या सहकारी परिषदेचे अध्यक्ष ह्या नात्यानें श्री. एम. आर. मसानी ह्यांनीं केलेलें भाषण उद्बोधक असें झालें. अनेक व्यक्तिनिष्ठ भांडवलवाले एका बाजूस आणि सबगोलंकारी हुकूमशहा दुसऱ्या बाजूस ह्यांचा मध्यबिंदु सहकारी संघटनेनें साधला असल्यानें ती श्रेष्ठ स्वरूपाची आहे असा अभिप्राय त्यांनीं व्यक्त केला तो सर्वथा मननीय आहे. देशाची आर्थिक व्यवस्था योजनात्मक पद्धतीनें व्हावयाची असतांहि लोकसत्ता व वैयक्तिक स्वातंत्र्य ह्यांचें संरक्षण करण्याची क्षमता शेती व कारखाने ह्यांतील उत्पादन सहकारी तत्त्वाच्या पायावर उभारलेल्या घटनेंतच आहे ही गोष्ट त्यांनीं स्पष्ट रीतीनें पुढें मांडली. कारखानदारी व जमीनदारी ह्यांच्या मानानें सहकारी चळवळ हिंदुस्थानांत उपेक्षणीय ठरली आहे ह्याचें कारण तिला चळवळ हें नांवच शोभत नाहीं आणि ती सरकारच्या धोरणाचें एक अंग आहे इतकेंच, ह्या शब्दांत श्री. मसानी ह्यांनीं तिचें थोडक्यांत वर्णन केलें आहे. युद्धपरिस्थितीमध्येंहि हिंदी सहकारी चळवळ जुन्या चाकोरीमधून बाहेर पडलेली नाहीं. कर्जे देणें आणि उपभोग्य वस्तूंचा पुरवठा करणें ह्यांचे दिशेनें त्या देशांत थोडेंबहुत सहकारी संघटन झालें असलें तरी उत्पादन जोंपर्यंत व्यक्तिगत आहे तोंपर्यंत संपत्तीची वाटणी समाधानकारक होऊं शकत नाहीं. त्याकरितां आधुनिक शास्त्रांच्या सहायानें लहान प्रमाणावर धंदे व शेती चालवणें आवश्यक झालें आहे. म्हणून सहकारी पद्धतीनें त्या दिशेनें आर्थिक पुनर्रचना हिंदुस्थानांत केली जाणें अगत्याचें आहे असें श्री. मसानी ह्यांनीं प्रतिपादिलें.

होळकर संस्थानांतील सहकारी प्रगति

इंदूरच्या सहकारी खात्याचा १९४१-४२ चा सप्टेंबर १९४२ अखेरचा ताजा अहवाल प्रसिद्ध झाला आहे. ह्या वर्षांत सहकारी खात्याचा एकूण खर्च २३,१७६ रुपये झाला. "खात्याकरितां खर्चाची तरतूद अत्यंत अपुरी आहे व सरकारनें पुष्कळच अधिक तरतूद केली पाहिजे." असें अहवालांत म्हटलें आहे. संस्थानांत ५ मध्यवर्ती बँका, ७८५ शेतकी व ८८ बिगर शेतकी सोसायट्या आहेत. सोसायट्यांच्या सभासदांची संख्या ३१,७३१ आहे. प्रत्येक सोसायटींत सरासरीनें ३६ सभासद आहेत. सर्वांच सहकारी चळवळींचें खेळतें भांडवल ९५ लक्ष रुपये आहे. प्रत्येक सोसायटीच्या खेळत्या भांडवलाची सरासरी १०,८०८ रुपये आहे. सोसायट्यांच्या स्वतःच्या भांडवलाचें खेळत्या भांडवलाशीं प्रमाण ३३% पडतें. संस्थानांतील सुमारें १ लक्ष ६० हजार म्हणजे १०% लोकसंख्येचा (एका कुटुंबांत ५ लोक असतात ह्या हिशेबानें) सहकारी चळवळीशीं संबंध आलेला आहे. संस्थानांतील ३,७०० खेड्यांपैकी ८६५ खेड्यांत सोसायट्या आहेत. सोसायट्या सेंट्रल बँकांकडून ९% व्याजानें कर्जे घेतात व आपल्या सभासदांस १२% व्याजानें तीं देतात. कोणी प्रसंगीं सभासदांकडून १५% व्याजहि घेण्याची पाळी येते. सहकारी खात्याच्या आपल्या अहवालांत रजिस्ट्रार, रावरत्न व. जी. शेजेकर, ह्यांनीं आपल्या अडचणी खुलासेवार मांडल्या आहेत. शेतकऱ्यांच्या उन्नतीच्या प्रयत्नांत सहकारी संस्थांचें महत्त्व सरकारास नीट पटल्यासेरीज सहकारी खात्याचें काम कार्यक्षम होणार नाहीं. इंदूर संस्थानांत सहकारी चळवळीस केवढा वाव आहे व त्याबाबत रजिस्ट्रार साहेबांचे प्रयत्न व अडचणी काय आहेत, ह्याची कल्पना अहवालावरून चांगली येते. त्यांच्या सूचना विचारार्ह आहेत.

बँके को. क्वार्टर्ली

वरील त्रैमासिकाचा मार्च, १९४४ चा अंक प्रसिद्ध झाला आहे. चीनमधील सहकारी औद्योगिक संस्थांचें वर्णन करणारा सर जे. बी. टेलर ह्यांचा लेख त्रैमासिकांत आला आहे. "खेड्यांतील लोकांची स्थिति सुधारण्याची आवश्यकता चीन इतकीच हिंदुस्थानांतहि तीव्र आहे. कांहीं लेखकांना शहरांत कामगार म्हणून नेण्यानें प्रश्न सुटणार नाहीं. शहरांतील औद्योगिक प्रगति, खेड्यांतीलहि उद्योगधंदे मारून टाकून तेथील स्थिति बिघडवते, असा अनुभव आहे. चीनमधील सहकारी औद्योगिक मंडळ्यांच्या पद्धतीप्रमाणें हिंदुस्थानांतहि संस्था निर्माण झाल्या पाहिजेत." अशा त्यांनीं लेखाचा शेवट केला आहे. सर पुरुषोत्तमदास ठाकूरदास प्रभृतींच्या आर्थिक योजनेचें परीक्षण श्री. वैकुंठराव मेहता ह्यांनीं आपल्या लेखांत केलें आहे. शिवांमधील सहकारी चळवळीच्या प्रसाराची माहिती श्री. एस. के. भागवत ह्यांनीं दिली आहे. श्री. एन. व्ही. नायक ह्यांच्या लेखांत पूर्व खानदेशांतील सहकारी कपास विक्री सोसायट्यांच्या कारभाराची विस्तृत माहिती आली आहे. मुंबई शहरांत सहकारी चळवळीच्या प्रसारास कसा वाव आहे, हें श्री. एम. जी. कोठिवाल्कर ह्यांनीं दाखिलें आहे.

मिरजोळें शेतकी सहकारी पतपेढी
(लि. मा. म.)

रत्नागिरी जें. को. इन्स्टिट्यूटच्या प्रयत्नानें १९२७ साली वरील सोसायटीची स्थापना झाली. १८ मार्च १९२८ रोजीं तिच्या कार्यास प्रारंभ झाला. सध्या तिचे पटावर ५७ सभासद आहेत. सोसायटीच्या रिझर्व्ह फंडाचे ९९१ रुपये, व माल मांडवटाचे ८५३ रुपये, हा स्वतःच्या मांडवळावरच तिचा व्यवहार मुख्यतः चालतो. सभासदांकडील येणें कर्ज सुमारें १,७८० रुपये आहे. नेहमीच्या व्यवहारापेक्षा ज्यास्त असा आंबे विक्रीच्या व्यवस्थेचा उपक्रम सोसायटीनें १९२९ साली केला व त्याच्या यशाबद्दल तिला रत्नागिरी येथील आंब्यांच्या प्रदर्शनांत सुवर्ण-पदक मिळालें. सोसायटीनें वेळोवेळ देण्या देऊन, फेब्रुवारी १९४१ मध्यें आठ सभासदांचीं घरें आग लागून जळालीं त्या वेळीं स्वतः सहाय करून व सरकारकडून १२० रुपयांची मदत मिळवून देऊन, पाचोळ्याच्या खताचे खड्डे व लायब्ररी यांचा प्रारंभ करून व शेतकऱ्यांत वाटण्यासाठीं २५ टन मुंईमुगाच्या पेंडीच्या खतांची खरेदी करून आपल्या सभासदांची व इतर शेतकऱ्यांची सामाजिक व आर्थिक उन्नति घडवून आणण्याची खटपट सोसायटी करीत आहे. सोसायटीनें योग्य किंमतीस धान्य विकी करणारें एक दुकानहि नुकतेंच उघडलें आहे.

मोडी लिपीचा लघुलिपीप्रमाणें उपयोग होण्याची शक्यता

मराठी भाषेंतील द्रुतलिपी म्हणून पूर्वी मोडी लिपीचा फार प्रसार होता. मोडी लिपीला सर्व ठिकाणीं स्थान होतें; परंतु अलीकडे मोडी लिपी हळू हळू मागसत चालली असून ती आतां अधिकाधिक दुर्बोध होत चालली आहे. सर्वसाधारणपणें मनुष्य ज्या वेगानें बोलतो, त्या वेगांत मोडी लिपी लिहितां येते. बाराखडी लिपी शब्दांच्या उच्चारावरच सामान्यतः बसवली असल्यानें कोणत्याहि भाषेंतील उच्चार आपल्या लिपींत लिहितांना फारशी अडचण पडत नाहीं.

या मोडी लिपींतच थोड्याशा सुधारणा केल्या असतां तिचा लघु लिपीप्रमाणें उपयोग होण्याची शक्यता आहे. लघु लेखन कला जाणणाऱ्यांनीं या बाबतींत थोडेसें लक्ष घातल्यास मराठी व इंग्रजी या भाषांकरतां लघु लिपींचें एक उत्कृष्ट माध्यम निर्माण होण्याचा संभव आहे व शिवाय मोडी लिपीची एक लुप्त होत चाललेली कलाही पुन्हां उदयास आणतां येईल हें निराळेंच.

एच. व्ही. सहस्रबुद्धे

स्वदेशी मिल्स कं. लि.

वरील कंपनीनें १९४३ मध्यें ३ कोटि, १४ लक्ष रुपयांची विक्री केली; १९४० मधील विक्री ५२ लाखांची होती. नफा ३ लाखांवरून १ कोटि, १४ लाखांवर गेला. १९४० साली करासाठीं ५ हजार रुपये लागले. १९४३ चा कराचा आंकडा ८४ लक्ष रुपये आहे. डिव्हिडंडचा दर १९४० साली ७% होता. १९४३ असेर तो ३५% आहे. कंपनीचें वसूल मांडवळ ४५ लक्ष रुपये आहे.

वॉम्बे को-ऑपरेटिव
इन्शुअरन्स सोसायटी लि.

सहकारी संस्थांच्या सभासदांस विशेष सवलत

एकंदर कामकाज ... १। कोटीहून अधिक
एकूण मालमत्ता ... १८ लाखांहून अधिक
आयुर्विमा फंड ... १६ लाखांहून अधिक

एजन्सीच्या अटी अगर पॉलिसीच्या विशेष माहितीकरितां चौकशी करा:—

मुख्य ऑफिस:—

को-ऑपरेटिव इन्शुअरन्स बिल्डिंग,
सर फिरोजशहा मेथा रोड, कोट, मुंबई.

हिंदुस्थानच्या आघाडीवरील
सहकारी विमा संस्था

पुण्यांतील
आदर्श निवासस्थान व भोजनालय
छाया लॉजिंग व बोर्डिंग हाउस
बुधवार चौक, पुणें २.

मलेरियावरील क्रांतिकारक हिंदी शोध
मागोरा पिल्स
अवघ्या ४ दिवसांत मलेरिया थांबतो.
१६ गोळ्यांच्या डबीस रु. १
— १०० गोळ्यांचें पॅकिंगही मिळतें. —
मागोरा केमिकल कं. लि.
टिळक रोड, पुणें २.

धान्य वाटपासाठी सहकारी संघटनेचा उपयोग

प्रां. सहकारी इन्स्टिट्यूटचे चेअरमन, सर जे. ए. मदन यांचें सभासदांस पत्रक

धान्य गोळा करण्याची एक व्यापक योजना मुंबई सरकारनें नुकतीच स्वीकृत केली आहे, त्यांतील मुख्य बाब, जमीन धारण करणाराकडे ठराविक प्रमाणांत सरकारला धान्य विकण्याची केलेली सक्ती, ही होय. धान्याच्या व्यापाराचा एकमेवाद्वितीय अधिकार सरकारनें स्वतःकडे राखून घेतला आहे. या दोन्हीं गोष्टींमुळें, खेडेगांवें, लहान गांवें व व्यापारी केंद्रें येथें धान्य वाटपाची पद्धतशीर व्यवस्था आंखणें अगत्याचें झालें आहे. ही व्यवस्था करण्यासाठीं शक्यतोंवर वेगवेगळ्या सहकारी संस्थांच्या संघटनेचा उपयोग करून घेण्याचा सरकारचा विचार दिसतो, असें गेल्या कांहीं आठवड्यांत सरकारतर्फे काढण्यांत आलेल्या कांहीं उद्गारांवरून अनुमान निघतें. जे स्वतः धान्य पेरीत नाहींत व ज्यांना धान्यासाठीं स्थानिक साप्ताहिक बाजारांवरच अवलंबून रहावें लागतें, अशा खेडेगांवीं जनतेच्या गरजा भागविण्याचा, प्रस्तुत सरकारी धोरणाचा मुख्य हेतु आहे. अशा लोकांना धान्यपुरवठा वक्तशीर व शक्य तितका स्वस्त केला जाणें आवश्यक आहे.

धान्य वाटण्याचें काम प्राधान्येंकरून सहकारी संस्थांकडे सोपविण्याची सरकारची इच्छा आहे व त्यासाठी असिस्टंट रजिस्ट्रारांनीं आपल्या क्षेत्रांतील कार्याची आखणी करावी, अशा अर्थाचें पत्रक सहकारी सोसायटयांच्या रजिस्ट्रारनीं असिस्टंट रजिस्ट्रारांकडे पाठविलें आहे. धान्य वाटपासाठीं प्रत्येक तालुक्यांत दहा ते बारा केंद्रें असावींत. यांपैकीं कोणत्या केंद्रांची व्यवस्था (१) मल्टिपर्पज सोसायटी, (२) व्यापक व्यवहाराची पतपेढी, (३) कंझूमर्स स्टोर्स अथवा (४) मध्यवर्ती बँकेनें, सेंट्रल स्टोर्सनें किंवा पर्चेस अँड सेल युनियनने उपलब्धेलें योग्य किंमतीच्या धान्याचें दुकान, यांपैकीं कोणाकडे सोंपवावी हें ठरवावें लागेल. तेव्हां, सहकारी कार्यकर्त्यांनीं आपल्या क्षेत्रांतील असिस्टंट रजिस्ट्रारला सत्वर भेटून, त्यांतील कार्याची योजना वरील प्रमाणें आंखण्यास त्यास साहाय्य करावें. वेगवेगळ्या तालुक्यांत धान्याची वांटणी करणाऱ्या अधिकाऱ्यांशीं तपशिलवार चर्चा करण्यांत असिस्टंट रजिस्ट्रारबरोबर सहकारी होण्याची आवश्यकता पुढें कदाचित वाटेल.

जेथें सहकारी संस्थामार्फत धान्यवाटणी सुरू होईल तेथें मांडवलाचा पुरवठा, धान्याचा साठा व कामाची देखरेख यासंबंधींचा तपशीलहि ठरवावा लागेल व यावावतींतहि सहकारी कार्यकर्त्यांच्या सूचना व मार्गदर्शन हीं उपयुक्त होतील.

सहकारी चळवळीच्या कार्यापैकी आजच्या मितीस अत्यंत जबाबदारीचें असें हें कार्यक्षेत्र आहे, हें येथें नमूद करणें आवश्यक आहे. सध्यासारख्या अभूतपूर्व अडचणींचे प्रसंगीं, सहकारी सोसायटयांचे सभासद व असंघटित खेडेगावी जनता यांची सेवा करण्याची ही संधी आहे व तिचा चांगला उपयोग केल्यास सहकारी चळवळीस श्रेय मिळेल व तिचा दर्जा वाढेल. खेडेगांवांतून वाटपाची सहकारी संघटना करण्याची मुहूर्तमेढ रोवण्यास सहकारी कार्यकर्त्यांना ही चांगली संधी आहे. या संघटनेंतून सहकारी चळवळीचें एक नवें महत्त्वाचें अंग कालांतरानें निर्माण होणें अगदीं शक्य आहे. या सर्व दृष्टींनीं विचार करून, सहकारी कार्यकर्त्यांनीं वरील प्रश्नाचा विचार करावा व यासंबंधांतील आपल्या तालुक्यांतील अथवा जिल्ह्यांतील कार्याच्या प्रगतीची माहिती इन्स्टिट्यूटकडे वक्तशीर पाठवावी.

पुना गेस्ट हाऊस

१००, लक्ष्मी रोड, पुणें २.

Telephone 779

TELEGRAM Guest House Poona-2.

स्वतःची खात्री करा व पैशांचा मोबदला घ्या.

गिरगांव मुंबई नं. ४

महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

दत्त कंपनी

७३५ शुक्रवार पेठ, पुणें २. खाजेआळी पोलिसचेटाजवळ

सर्व तऱ्हेचे काटे, वजनें व मापें, वेळेवर रिपेअर करून मिळतील.

हातमाग आजवर टिकले; पुढेंहि टिकवले व वाढवले पाहिजेत

आवडी-निवडींत बदल

लोकांच्या कपड्यासंबंधीं आवडी-निवडींत होणाऱ्या फरकांमुळें हातमागांच्या कापडाची जागा गिरण्यांचें कापड घेऊं लागलें आहे. सगळीकडेच पगड्या व फेटे ह्यांचा वापर कमी झाला आहे; सुटे व कुडतीं वाढलीं आहेत; चादरी व अंगवस्त्रें ह्यांस मागणी पूर्ववत् राहिलेली नाहीं. स्त्रिया पोलकीं अधिकाधिक वापरूं लागल्या आहेत. उत्तर हिंदुस्थानांत घागरा, लेंगा, सलवार, कुडता, इत्यादींची जागा साड्या घेऊं लागल्या आहेत. पुरुष गंजिफाक वगैरे वापरूं लागले आहेत. एकट्या संयुक्त प्रांतापुरतेंच पाहिलें, तर तेथील शहरी स्त्रियांतील लेंगा वापरणाऱ्या स्त्रियांचें प्रमाण गेल्या वीस वर्षांत ९५% वरून ५% वर आलें आहे व खेडेगांवांतून तें १००% वरून ४०% वर आलें आहे. ह्याच्या उलट, साडी नेसणाऱ्या स्त्रियांचें प्रमाण शहरांतून ५% वरून ९५% वर गेलें आहे व खेडेगांवांत साड्यांचा प्रसार अजिबात नव्हता तेथें आतां ४०% स्त्रिया त्यांचा अवलंब करीत आहेत. त्याच मुदतींत डोक्यावर फेट्याऐवजीं टोपी घालणाऱ्या शहरी पुरुषांची संख्या ५०% ची ८५% झाली आहे व खेडेगांवांत पूर्वीच्या ५% ऐवजी ३५% लोक टोप्या वापरूं लागले आहेत.

सध्या हातमागांवर जें कापड निघतें, त्यांत स्त्रियांच्या साड्या व लुगडीं, लेंग्याचें व सलवारचें कापड व चोळखण ह्यांचा मुख्यतः समावेश होतो. पुरुषांच्या कापडापैकी धोतरें, लुंग्या, चादरी, अंगवस्त्रें, पगड्या, फेटे, सद्याचें कापड, इत्यादींचें कापड, त्याचप्रमाणें टॉवेल, मच्छरदाणीचें कापड, लॉंगक्लॉथ, इत्यादींचें कापड हातमागांवर निघूं शकतें. मुंबई, मद्रास, बंगाल व मध्यप्रांत ह्यांतील हातमागांवर मुख्यतः साड्याच काढण्यांत येतात. संयुक्तप्रांत व पंजाब येथें भरड खादी निघते. मुंबई प्रांतांतील हातमागाच्या उत्पादनापैकी ९५% उत्पादन साड्यांचेंच आहे; मद्रास प्रांतांत हें प्रमाण ४४%, मध्यप्रांतांत ७५%, व बंगालमध्यें ४०% आहे. संयुक्त प्रांतांतील उत्पादनाच्या ६०% उत्पादन व पंजाबमधील ४३% उत्पादन खादीचें आहे.

त्याचा हातमागावर परिणाम

गिरण्यांच्या कापडाची हातमागाच्या कापडाशीं स्पर्धा गेलीं कित्येक वर्षें चालू आहे. १९०१-०२ ते १९३६-३७ ह्या मुदतींत हिंदी गिरण्यांचें उत्पादन ७०६% वाढलें. हातमागांच्या उत्पादनांत फक्त ५३% ची वाढ झाली. तथापि, गिरणीचें कापड हातमागाच्या कापडाचा पराभव करूं शकलें नाहीं; आयात होणाऱ्या कापडावरच हिंदी वाढत्या उत्पादनाचा प्रतिकूल परिणाम झालेला आहे. बंगालमध्यें पांढऱ्या कापडाचा वापर जास्त आहे. तेथें गिरण्या व हातमाग ह्यांचेमध्यें विशेष स्पर्धा आढळते. ज्या प्रांतांत रंगीत कापड लोकप्रिय आहे तेथें हातमागाच्या कापडाचें उच्चाटण होऊं शकलें नाहीं. पंचवीस वर्षांपूर्वी स्त्रिया गिरण्यांतील साड्या वापरीत नव्हत्या, पांढऱ्या साड्या तर अशुभ समजल्या जात. धोब्याच्या धुलाईचे व इस्त्रीचे कपडे वापरण्याचा प्रघात वाढल्यापासून शहरांतून गिरण्यांत तयार झालेल्या स्वस्त, पांढऱ्या व मंद रंगाच्या साड्या लोकप्रिय झाल्या. कामगार स्त्रिया मात्र हातमागावरील साड्या महाग पडल्या तरी त्याच घेतात, मध्य व उच्च वर्गाच्या स्त्रियांना फार काळ न टिकणाऱ्या, स्वस्त व नव्या नव्या डिझाइनच्या साड्याच पसंत पडतात. ह्या साड्यांची संख्याहि जास्त लागते व साहाजिकच गिरण्यांच्या उत्पादनांत त्यामुळें भर पडते.

हातमागांची आजची स्थिति

सबंध हिंदुस्थानांतील एकूण सुमारें २० लक्ष हातमागांपैकी १७ लक्ष हातमाग चालू आहेत. त्यांपैकी सुमारें १४ लक्ष मागांवर कपास कापड निघतें व ३¾ लक्ष मागावर रेशमी कापड निघतें. कोष्ट्यांची संख्या सुमारें २४ लक्ष भरेल. त्यांपैकी १४¾ लक्ष लोकांच्या उदरनिर्वाहाचें हातमाग हें एकमेव साधन आहे. ह्या २४ लक्ष कोष्ट्यांपैकी प्रत्येकावर सरासरीनें तिघांचें पोषण अवलंबून आहे, असें मानल्यास एक कोटि लोकांचे हितसंबंध ह्या धंद्यांत प्रत्यक्ष गुंतलेले आहेत, असा अर्थ होतो. यंत्रावर चालणाऱ्या मागांची संख्या १९४१ मध्यें सुमारें १२ हजार होती, त्यांपैकीं निम्म्यापेक्षां ज्यास्त मुंबई प्रांतांतच होते. म्हैसूर व कोल्हापूर ह्यांचा नंतर अनुक्रम लागला. हातमाग म्हणजे खेड्यांतच असणार, अशी सामान्य समजूत आहे. तथापि बहुसंख्य कोष्टी आतां शहरांतच आहेत, असें आढळून येतें. कच्च्या मालाची-सुताची-खरेदी व तयार मालाची विक्री ह्या दोन्ही बाबतींत विणकऱ्यास नुकसानकारक दरानीं व्यवहार करावा लागतो व मध्यस्थांच्या दलालीचा बोजा त्याचेवर पडतो. २० वरील नंबराच्या धाग्याचें कापड, सोनेरी व रुपेरी धागे मिसळलेलें कापड, रंगबेरंगी डिझाइन्सचें कापड, नक्षीदार व विशेष सुमारीचें कापड, नवारीसारखें अगदीं कनिष्ट कापड, ह्यांचे बाबतींत हातमागांस विशेष सवड असते. तथापि, विणीमध्यें सारखेपणाचा अभाव, लांबीरुंदीमध्यें तफावत, फिनिशचा अभाव, इत्यादि त्यांत दोषहि येतात.

हातमागांचें राष्ट्रीय महत्त्व

शेतीच्या खालोखाल कोष्ट्यांचाच धंदा महत्त्वाचा आहे. हिंदुस्थानांतील कापडाच्या उत्पादनापैकी ६८% उत्पादन गिरण्यांत होतें, तरी त्यांतील कामगारांची संख्या ५ लक्षच आहे. ह्या उलट २५% ते ३०% कापड उत्पादन करणाऱ्या हातमागांवर, कापडाच्या धंद्यांतील कामगारांच्या ८५% कामगार आपलें पोट भरीत आहेत. ह्यावरून हातमागांच्या धंद्याचें राष्ट्रीय महत्त्व व तो धंदा बंद पडला तर येणारी आपत्ती ह्यांची कल्पना येईल. हिंदुस्थानांतील बेकारीस आळा घालण्यास मोठाले कारखाने व गिरण्या ह्यांचा फारसा उपयोग होत नाहीं. साखर, कापड, लोखंड, पोलाद, सिमेंट, ताग, इत्यादींच्या कारखान्यांत १५ लक्ष कामगारांसच जेमतेम उद्योग मिळालेला आहे. भांडवल कमी लागावें व पुष्कळ लोकांना काम मिळावें, ही दृष्टि हिंदी आर्थिक रचनेंत ध्यानांत बाळगली पाहिजे. हातानें सूत कातणें व विणणें ह्यावर महात्मा गांधींचा भर ह्या कारणासाठींच आहे.

"अधिक धान्य पिकवा" मोहिमेंतील बिनसरकारी सहाय्यकांना बक्षिसें

मुंबई प्रांतांतील "अधिक धान्य पिकवा" मोहीम यशस्वी झाली, त्यांत बिनसरकारी लोकांचा—शाळा मास्तर, विद्यार्थी व इतर यांचा वाटा आहे. हें लक्षांत घेऊन, चालू मोसमांत ह्या मोहिमेस हातभार लावणाऱ्या लायक बिनसरकारी लोकांना बक्षिसें देण्यासाठीं मुंबई सरकारनें तीनहि कमिशनरसच्या भागांना प्रत्येकीं १,००० रुपये दिले आहेत.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२७।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
(टपाल खेरीज माफ)
किरकोळ अंकाम
दोन आणे.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष १० पुणें, बुधवार, तारीख ३ मे, १९४४ अंक १८

दि ब्रिटिश इंडिया जनरल इन्शुअरन्स कं. लि.

(स्थापना : १९१९)

आम्ही आयुर्विम्याखेरीज करून आग, मरीन, अपघात, इत्यादींचे सर्व प्रकारचे विमे स्वीकारतों.

—: चेअरमन व मॅनेजिंग डायरेक्टर :—

सर होमी मेहता, के. बी. ई., जे. पी.

पुणें शाखा : मोति माणिक मॅन्शन, लक्ष्मी रोड.

हेड ऑफिस : मेहता हाऊस, अपोलो स्ट्रीट, मुंबई.

पुण्यांतील
आदर्श निवासस्थान व भोजनालय
छाया लॉजिंग व बोर्डिंग हाउस
बुधवार चौक, पुणें २.

दत्त कंपनी
७३५ शुक्रवार पेठ, पुणें २. दाजेआळी पोलिसगेटाजवळ
सर्व तऱ्हेचे काटे, वजनें व मापें, बेलेश्वर रिपेअर करून मिळतील.

मलेरियावरील क्रांतिकारक हिंदी शोध
मागोरा पिल्स
अवघ्या ४ दिवसांत मलेरिया थांबतो.
१६ गोळ्यांच्या डबीस रु. १
— १०० गोळ्यांचें पॅकिंगही मिळतें. —
मागोरा केमिकल कं. लि.
टिळक रोड, पुणें २.

दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.
हेड ऑफिस : पुणें शहर.
स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.
मुंबई शाखा : दलाल स्ट्रीट, फोर्ट.
जळगांव शाखा : नवी पेठ, मेन रोड.
नागपूर शाखा : मोखले बिल्डिंग, सितावर्डी.
भांडवल
अधिकृत व विकीस काढलेलें रु. १०,००,००० वसूल झालेलें रु. १०,००,००० वसूल झालेलें रु. ५,००,०००
एकूण खेळतें भांडवल रु. ७४,००,०००
बँकेच्या शेअरवर डिसेंबर १९४३ अखेर ४½% प्रमाणे डिव्हिडंड दिलें गेलें. बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदी-विक्री कमिशनेंकरून दिली जाते.
बँकेनें रु. ५ प्रीमियमनें काढलेले सर्व शेअर्स विकले गेले. विशेष माहितीसाठी भेटा अगर लिहा.
सी. व्ही. जोग,
B. Com., C. A. I. B. C. A. I. I. B.
मॅनेजर

जाहीर नोटीस

दी ऑध स्टेट बँकिंग अँड इन्शुअरन्स कंपनी लि. चे भागीदारांच्या ता. ८-४-४४ रोजी भरलेल्या विशेष साधारण सभेंत ठरलेंप्रमाणें कंपनीचें नांव ता. १-५-१९४४ पासून खालीलप्रमाणें होईल व त्याप्रमाणें त्या नांवानें पुढील व्यवहार सुरूं होईल.

"दी बँक ऑफ औंध लिमिटेड"

कळवें, ता. १।५।१९४४ इ.

बी. आर. वर्तक,
जनरल मॅनेजर.

अन्नमहागाई निदर्शक नवे आंकडे

पैशाची किंमत स्वस्ताई-महागाईप्रमाणें बदलत जाते व हा फरक मोजण्याकरितां इंडेक्स नंबर्सचा उपयोग करण्यांत येतो. कांहीं प्रातिनिधिक जिनसांची निवड करून एका ठराविक वर्षांच्या त्याच्या सरासरी किंमतीस १०० असें मानण्यांत येतें व त्यानंतर दरमहा अथवा दरसाल ह्या मूळ किंमतीशीं तुलनात्मक असे आंकडे तयार करून प्रसिद्ध केले जातात, त्यावरून भावांतील फरक, महागाई, रहाणीच्या खर्चाचें मान, इत्यादींतील सूक्ष्म फरक कळण्यास मदत होते. ज्यांच्या किंमतीची तुलना करावयाची, त्यांची निवड योग्य होण्यावरच इंडेक्स नंबर्सची उपयुक्तता अवलंबून रहाते. मनुष्याच्या आहारांत किंवा वापरांत जिन्नस ज्या प्रमाणांत जास्त आवश्यक असेल त्या प्रमाणांत त्याची पट करून हिशेब करावा लागतो. मिठाची किंमत दुप्पट होण्यानें मनुष्याच्या रहाणीचा खर्च जेवढा वाढेल, त्यापेक्षा तांदूळ अथवा ज्वारी ह्याची किंमत चढल्यानें तो कितीतरी अधिक वाढेल. हिंदुस्थानांतील अन्नाच्या किंमतीचे निदर्शक आंकडे आंजच्या अपूर्व परिस्थितींत वस्तुस्थिति निदर्शक राहिलेले नाहींत, हें लक्षांत घेऊन सरकारनें २६ ऑगस्ट, १९३९ रोजींची तांदूळ, गहूं, ज्वारी, बाजरी, तूर, डाळ, चहा, कॉफी, साखर, गूळ व मीठ ह्यांची किंमत त्यांतील कांहीं बाबींचें आहारांतील विशेष महत्त्व ध्यानांत घेऊन १०० अशी मानली व त्या १०० शीं तुलना करणारे साप्ताहिक आंकडे प्रसिद्धि करण्यास नुकतीच सुरुवात केली. त्याचे ताजे आंकडे खाली दिले आहेत, त्यावरून अन्नाच्या किंमतींत झालेला चढउतार ध्यानांत ठेवण्यास सहाय होईल.

२६ ऑगस्ट १९३९ रोजींची किंमत = १००

अखेरचा आठवडा	नवा इंडेक्स नंबर
५-२-४४	२३८·६
१२-२-४४	२४३·२
१९-२-४४	२४७·१
२६-२-४४	२४४·७
फेब्रुवारीची सरासरी	२४३·४
४-३-४४	२४२·८
११-३-४४	२३३·६
१८-३-४४	२३४·८
२५-३-४४	२३३·७
मार्चची सरासरी	२३६·२
१-४-४४	२३१·८

विविध माहिती

सहशिक्षण बंद

रशियानें मुलगे व मुली ह्यांचें सहशिक्षण बंद केलें आहे.

आंतरराष्ट्रीय मजूर परिषदेंत रशिया का नाहीं ?

फिलॅडेलफिया येथें आंतरराष्ट्रीय मजूर परिषदेचें अधिवेशन चालू आहे. राष्ट्रसंघाचें एक पिल्लू, ही त्या परिषदेची आजची स्थिति आहे ती पालटून संयुक्त राष्ट्रांची ती एक प्रातिनिधिक संस्था व्हावी, असें रशियाचें म्हणणें आहे व त्यासाठींच रशिया परिषदेंत भाग घेत नाहीं.

चेक्सची देवघेव

मुंबई बँकर्स क्लिअरिंग हाऊसमध्यें २१ एप्रिल अखेर संपलेल्या आठवड्यांत ३६ कोटि, ६५½ लक्ष रुपये किंमतीच्या १,२३,७७४ चेक्सची देवघेव झाली.

"आगीमुळें झालेलें नुकसान भरून देण्याची जबाबदारी आम्हांवर नाहीं."

मुंबई शहरांतील ता. १४ एप्रिलचा स्फोट व आग ह्यामुळें झालेल्या नुकसानींच्या भरपाईची मागणी आगीच्या विमा कंपन्यांकडे आली असतांना, कंपन्या आज त्यांच्या माहितीप्रमाणें नुकसानभरपाईस जबाबदार नाहींत, असें उत्तर विमेदारांस देण्यांत आलें. विमापत्रकांतील अटी वाचल्या म्हणजे खुलासा होईल, असेंहि त्यांस कळविण्यांत आलें. झालेलें नुकसान विम्याच्या जोखमींत येत नाहीं, असा विमा कंपन्यांचा अभिप्राय आहे.

सर्वांत जास्त पगाराचा धंदेवाईक

मेट्रो गोल्डविन मेयर कंपनीचे मि. लुई बे मेयर ह्यांची १९४३ साली प्राप्ती ११,३८,९९२ डॉलर भरली. अमेरिकेंतील सर्वांत जास्त पगाराचा धंदेवाईक, हें त्यांचें स्थान आज १० वर्षें टिकलें आहे.

सी. पी. अँड बेरार चेंबर ऑफ कॉमर्स

वरील चेंबरचा उद्घाटन समारंभ ७ मे १९४४ रोजीं नागपूर येथें श्री. जी. एल. मेहता ह्यांचे हस्तें होणार आहे.

इंडिया युनायटेड मिल्स लि.

पूर्वी मेसर्स ई. डी. ससुन अँड कंपनीच्या मॅनेजिंग एजन्सीकडे व आतां मेसर्स अगरवाल अँड कंपनीच्या मॅनेजिंग एजन्सीकडे असलेल्या, इंडिया युनायटेड मिल्स लि. च्या (पूर्वीच्या ई. डी. ससुन युनायटेड मिल्स लि. च्या) गिरण्यांच्या गटानें १९४३ सालीं ११ कोटि, ६५ लक्ष रुपये किंमतीच्या मालाची विक्री करून ३ कोटि, ४५ लक्ष रुपये नफा दाखविला. करापायी ह्यांतील २½ कोटि रुपये खर्च होतील. ऑर्डिनरी भागीदारांस १२½% व डिफर्ड भागीदारांस ३१¼% डिव्हिडंड मिळालें. १९४१ सालाचें डिव्हिडंडचे दोन्ही दर ६¼% होते.

स्वीडन-जर्मन व्यापार

स्वीडननें जर्मनींकडे जाणाऱ्या आपल्या युद्धसाहित्याची निर्गत थांबवावी, अशी मागणी त्या देशाच्या सरकारकडे अमेरिकन सरकारनें केली, तिला स्वीडिश सरकारनें नकारार्थी उत्तर दिलें. संयुक्त राष्ट्रांची विनंति मान्य केल्यास स्वीडनच्या तटस्थतेचा भंग होईल, जर्मनीशीं असलेल्या व्यापारी कराराचाहि भंग होईल व स्वीडनच्या आयातीपैकी ८३% आयात जर्मनींतून होते, तिचेवरहि त्याचा परिणाम होईल, असें स्वीडनचें म्हणणें आहे. स्वीडन जर्मनीला पाठवीत असलेल्या युद्धसहायांत बॉल बेअरिंगचा समावेश होतो.

अनुक्रमणिका

	पृष्ठ
१ महागाई निदर्शक आकडे	१३८
२ विविध माहिती ...	१३८
३ नवी आंतरराष्ट्रीय चलन व्यवस्था ...	१३९
४ हायकोर्टांचा निर्णय ... व माडेकरू ...	१४०
५ स्फुट विचार ...	१४१
ब्रिटिश सरकारचें अंदाज-पत्रक-मुंबई प्रांतास बाहेरून धान्य मिळालें पाहिजे-धान्य सल्लागार समितीच्या सूचना-वेमानिक पहातूक-बँक ऑफ ओंध लि.-नव्या कंपन्यांची स्थापना	१४१
६ शेअर बाजार ...	१४२
७ शेडयूल्ड बँक म्हणजे काय ! ...	१४३

अर्थ

बुधवार, ता. मे ३, १९४४

नवी आंतरराष्ट्रीय चलन व्यवस्था

युद्ध चालू असतांच मित्रराष्ट्रांनीं परस्पर देणें-घेणें आणि त्या बाबतची हुंडणावळ ह्यांचे संबंधांत विशिष्ट नियंत्रणात्मक व्यवस्था तात्पुरती केली आहे. पण युद्धसमाप्तीनंतर जगांतील सर्व देशांच्या परस्पर देण्याच्या फेडीची आणि तिच्या मुळाशी असावयाच्या आंतरराष्ट्रीय चलन प्रमाणाची कायमच्या स्वरूपाची योजना अमलांत यावी लागेल. युद्ध काळांत आंतरराष्ट्रीय देणींघेणीं कागदपत्रीं राहून जमेल त्या रीतीनें त्यांची बिल्लेवाट करणें अपरिहार्य असतें. शांततेची परिस्थिति पुन्हां निर्माण झाली म्हणजे युद्ध काळांतले हिशेब पुरे करावयाचे असतात, एवढंच नव्हे तर राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय व्यापाराची घडी बसवावयाची असते. मागील महायुद्धानंतर आंतरराष्ट्रीय देवघेवींच्या व हुंडणावळीच्या व्यवस्थेची सर्वमान्य अशी योजना तयार होऊं शकली नाहीं आणि इंग्लंड व अमेरिका ह्यांच्या अनुक्रमें पौंड स्टर्लिंग व डॉलर ह्या चलनाभोवती दोन मोठे राष्ट्रांचे गट बनले. जर्मनीनें युरोपांत आपल्या नेतृत्वाखालीं स्वतंत्र अशी योजना चालू केली. ह्या कटु अनुभवापासून बोध घेऊन इंग्लंड व अमेरिका ह्या राष्ट्रांनीं प्रस्तुत युद्धानंतर असला घोटाळा उद्भूं नये म्हणून अगोदरपासून आंतरराष्ट्रीय चलन व्यवस्थेच्या चर्चेस प्रारंभ केला आहे. ह्या दोन राष्ट्रांच्या तज्ज्ञांनीं स्वतःच्या दृष्टीनें योग्य दिसणाऱ्या योजना तयार केल्या. त्या दोहींचा मुख्य उद्देश एकच असला तरी त्यांच्या तपशीलांत महत्वाचे फरक दिसून आले आणि त्यांवर टीका-प्रति-टीका असे प्रकार आजवर बराच कालपर्यंत चालत आले आहेत. नियोजित आंतरराष्ट्रीय व्यवस्थेंत स्वतःचें आर्थिक स्थान नीट रहावें आणि स्वतःचें वस्तान चांगलें बसावें अशी इंग्लंड व अमेरिका ह्यांची इच्छा असणें सहाजिक आहे. तीस अनुसरून त्यांच्या तज्ज्ञांनीं योजनेच्या कांहीं वैशिष्ट्यांस महत्व दिलें असल्यास त्यांत नवल नाहीं. पहिल्या योजनेस मुरड घालून तज्ज्ञांनीं सर्वमान्य होईल अशी एक नवी व्यवस्था तयार केली आहे आणि तिचा विचार करण्यासाठीं अमेरिकेंत एक परिषद लवकरच भरणार आहे असें प्रसिद्ध झालें आहे. हिंदुस्थानच्या वतीनें प्रतिनिधी तीमध्यें उपस्थित होणार आहेत. परिषदेचे निर्णयसुद्धा ठीक बंधनकारक होतील असें नाहीं कायम स्वरूपाच्या आंतरराष्ट्रीय चलन व्यवस्थेस समाधानकारक आकार देण्यास तिच्यामध्यें होणाऱ्या चर्चेचा उपयोग होईल. तथापि, इंग्लंड, अमेरिका व रशिया ह्यांच्यासारख्या बलाढ्य राष्ट्रांस मान्य होणाऱ्या चलन व्यवस्थेंत हिंदुस्थानासारख्या मागासलेल्या व दुर्बल देशाच्या हितसंबंधांचें रक्षण योग्य रीतीनें होईल ह्या विषयीं खबरदारी घेण्यांत आली पाहिजे.

युद्धापूर्वी सुवर्ण परिमाण राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पद्धती चालू होती तेव्हां देशांच्या चलनाचें मोल सोन्यामध्यें व्यक्त होत होतें आणि त्यांची परस्परांचीं देणींघेणीं ह्या प्रमाणबद्ध हिशेबानें भागवलीं जात असत. प्रस्तुत युद्धानंतर सुवर्ण परिमाणाचा त्याग केला जाणार नाहीं, पण सोन्याचा पुरवठा अमेरिकेजवळून अन्य देशांचे जवळ उरला नसल्यानें त्यांस प्रसंग पडेल तेव्हां सोनें निर्गत करून आपलें देणें भागवतां येणार नाहीं म्हणून सुवर्णाचा आधार कायम ठेवून कर्जफेडीची दुसरी कांहीं व्यवस्था केली पाहिजे. ह्या नव्या योजनेंत किंमतींचें सामान्य माप सोन्यामध्यें निश्चित केलें जाईल खरें, तथापि आंतरराष्ट्रीय देण्याघेण्यांची वजावाट सोन्यांत व्हावयाची नाहीं. ह्याकरितां एक आंतर-राष्ट्रीय फंड निर्माण केला जाईल आणि त्यांत सोनें व हुंड्या चालण्यांत येतील. इंग्लंड व अमेरिका ह्यांचा हिस्सा अर्थातच मोठा राहील. राष्ट्रांशीं देणीं व घेणीं ह्या फंडाच्या हिशेबांत त्यांच्या खात्यावर नमूद करण्यांत येतील आणि त्यांच्या जरुरीप्रमाणें देशांची कर्ज फेडीची सोय केली जाईल आंतर राष्ट्रीय व्यापार सुरळीत रीतीनें चालावा आणि सोन्याचा पुरवठा तोकडा पडला म्हणून देशांचें अडूं नये हा ह्या व्यवस्थेचा हेतु आहे. आंतरराष्ट्रीय फंडाचें कार्य राष्ट्रीय मध्यवर्ती बँकांच्या मार्फत केलें जाईल. त्याचा उपयोग आर्थिक पुनर्घटना किंवा आंतरराष्ट्रीय कर्जफेड ह्यांसाठी केला जाणार नाहीं. भांडवल गरजू राष्ट्रांच्या उद्योगधंद्यांच्या अभिवृद्धीकरितां पुरवणें हा येथें उद्देश नसून देशादेशांत होणाऱ्या व्यापारास लागणाऱ्या पतीच्या पैशाची व्यवस्था करणें हा मुख्य हेतु आहे. फंडाच्या व्यवस्थापकांनीं कोणत्याहि राष्ट्राच्या अंतर्गत आर्थिक धोरणावर टीका करावयाची नाहीं किंवा त्यांत ढवळाढवळ करावयाची नाहीं. कोणत्याहि सभासद राष्ट्रास फंडाच्या व्यवस्थेंतून बाहेर पडतां येईल. त्यानें फंडाचें देणें देऊन टाकलें म्हणजे झालें. दुसऱ्या राष्ट्रावरील हुंड्या कांहीं मर्यादेपर्यंत आंतरराष्ट्रीय फंडांतून सभासदांस मिळू शकतील. हिंदुस्थानच्या परराष्ट्रीय हुंडणावळीचा दर काय राहील ? ह्या देशाचा व्यापार व उद्योगधंदे ह्यांचे दृष्टीनें तो अनुकूल असेल किंवा नाहीं ? हिंदुस्थानच्या मोठ्या शिलका लंडनमध्यें पौंड-स्टर्लिंगमध्यें जमल्या आहेत, त्या कशा परत येतील ? नवीन योजनेचा येवील बाजारभावावर कोणता परिणाम होईल ? इत्यादि प्रश्नांची समाधानकारक उत्तरें मिळाल्यावांचून आंतरराष्ट्रीय फंडाच्या योजनेसंबंधानें मतप्रदर्शन करणें कठिण आहे. हिंदुस्थान आतां पूर्वीप्रमाणें नकदी देश राहिलेला नसून त्याचे इंग्लंडमधून कोट्यवधि रुपये येणें झालें आहेत हें येथें लक्षांत ठेवलें पाहिजे. पौंड स्टर्लिंगवर आधारलेलें चलन वापरणाऱ्या ब्रिटिश कॉमनवेल्थारख्या देशांचा गट पूर्वीप्रमाणें पुढेंहि व्यवहार करीत राहूं शकेल किंवा असले स्वतंत्र अस्तित्व नवीन योजनेप्रमाणें शक्य होणार नाहीं असा प्रश्न कॉमन्वेल्थेंत विचारण्यांत आला असतां स्टर्लिंग गट

अबाधित राहण्यास हरकत नाही असें उत्तर ब्रिटिश फडनविसांनीं दिलें. अमेरिकेंत आंतरराष्ट्रीय चलनयोजनेवर प्रतिकूल टीका होत आहे तर इंग्लंडमध्यें तिचे विषयीं समाधान व्यक्त केलें जात आहे. स्वतःच्या हिताच्या दृष्टीनें हिंदुस्थाननें ह्या योजनेची छाननी करण्याचें महत्त्व किती आहे याची ह्या परिस्थितीवरून कल्पना येईल.

मुंबई हायकोर्टाचा निर्णय व त्याचे माडेकरूंवरील परिणाम

(ले.:-श्री. श्री. वि. माडगीळ, एम. ए., एल्एल. बी., वकील, अध्यक्ष, पुणें घरमाडेकरू संघ)

मुंबई हायकोर्टानें माडेकरू व मालक यांच्या संबंधांत जो नुकताच एक निर्णय दिला त्यामुळें मोठमोठ्या शहरांतील घरमालक व माडेकरू वर्गांत बरीच खळबळ उडून गेली आहे.

१९३९ च्या सप्टेंबरांत महायुद्धाची घोषणा झाल्यापासून युद्धकालीन परिस्थिति आटोक्यांत आणण्याकरितां व युद्धप्रयत्न जोरांत चालावेत म्हणून भारतसंरक्षण कायदा १९३९ मध्यें जारी करण्यांत आला व त्या कायद्याखाली जीवनांतील निरनिराळ्या गरजांचें नियंत्रण क्रमाक्रमानें करण्यांत आलें व त्यांतच १९४२ साली मुंबई इलाख्यांत घरभाड्याचें नियंत्रण करण्यांत आलें. त्याकरितां १९४२ चा घरभाडें नियंत्रण हुकूम प्रसिद्ध करण्यांत आला आहे.

हा हुकूम भारतसंरक्षण कायद्याखाली जे नियम तयार करण्यांत आले आहेत त्या नियमांपैकी नियम ८१ पोट नियम २ पोट भाग ब व फ या अन्वयें जे अधिकार प्रांतिक सरकारांना दिले आहेत त्या अन्वयें काढला आहे. हा हुकूम प्रथमतः मुंबई शहरास २२-४-१९४२ रोजीं लागू करण्यांत आला व त्यानंतर जसजशी जरूर वाटली त्याप्रमाणें प्रांतांतील निरनिराळ्या शहरांना लागू करण्यांत आला व त्याप्रमाणें पुणें शहर व उपनगर यांस हा हुकूम २० जुलै १९४२ रोजीं लागू करण्यांत आला.

भारत संरक्षण कायद्यानें निर्माण केलेला हा हुकूम व १९३९ मध्यें काँग्रेस सरकारच्या अमदानींत तयार झालेला मुंबई भाडें नियंत्रण कायदा अशा दोन कायद्यांतील कलमांप्रमाणें मुंबई शहरांतील घरभाड्याचें नियंत्रण १९४२ पासून होऊं लागलें.

१९३९च्या काँग्रेस सरकारच्या कायद्यानें ८० रुपयांखालील भाडेकरूंच्या भाडेवाढीविरुद्ध निर्बंध घालण्यांत आले. १९४२ सालच्या हुकुमान्वयें ८० रुपयांवरच्या भाडेकऱ्यांबाबतही निर्बंध घालण्यांत आले. ही झाली मुंबई शहरापुरती बाब. परंतु मुंबईशिवाय इतर पुणें, सोलापूरसारखीं जीं ठिकाणें ह्या हुकुमाच्या कक्षेंत आलीं त्यांना १ रु.पासून कितीहि रुपयांपर्यंत हा एकटाच हुकूम लागू लागला व त्याच्या जोरावर भाडेकऱ्यांना कांहीं विशिष्ट हक्क प्राप्त झाले.

ह्या हुकुमांत स्टँडर्ड रेंट ठरविलें आहे व त्या ठराविक भाड्याहून जास्त भाडें घेऊं नये असा सर्व साधारण नियम केला जाहे. ठराविक भाड्याची व्याख्या अशी करण्यांत आली आहे कीं, जागेचें भाडें १९४० च्या सप्टेंबरांत जें असेल तें त्या जागेचें ठराविक भाडें समजण्यांत यावें व त्याहून जास्त भाडें घेण्यास या हुकुमानें बंदी केली आहे.

ह्याच हुकुमानें जिल्हानिहाय भाडेंनियंत्रणासाठी एक एक अधिकारी नेमला असून त्यास रेंट कंट्रोलर असें म्हटलें आहे.

याप्रमाणें व्याख्या असून कलम ४ प्रमाणें ह्या हुकुमापूर्वी रगअ नंतर जी भाड्यांत वाढ झाली असेल ती वसूल करतां येणार नाहीं असें म्हटलें आहे व त्याकरतां कांहीं अपवाद सांगितले आहेत.

या हुकुमाच्या कलमांची अंमलबजावणी व्यवस्थित व्हावी म्हणून कलम ८ मध्यें अशी योजना केली कीं, भाडेकरू जर ठराविक भाडें नियमित देत असला व त्याचें भाडें थकलें नाहीं तर मालकाला भाडेकरूकडून घराचा कबजा मागता येणार नाहीं. परंतु जर मालकाला स्वतःला जागा पाहिजे असेल किंवा भाडेकरूचा शेजाऱ्यांना उपद्रव होत असेल व तसें सर्टिफिकेट रेंट कंट्रोलर कडून मिळत असेल तर भाडेकरूंस कायदेशीर रीत्या काढून टाकतां येईल.

कलम ९ मध्यें, याप्रमाणें मालकानें सर्टिफिकेट मिळविलें व पुढें ज्या कारणाकरतां सर्टिफिकेट मिळविलें त्याकरतां जर ती जागा वापरली नाहीं व तीन महिन्यांत दुसऱ्या भाडेकऱ्यांस जर जागा दिली तर मूळ भाडेकऱ्यांस ती जागा रेंट कंट्रोलरकडे अर्ज करून मागता येते.

कलम १० मध्यें, जादा भाडें दिलें असल्यास तें भाडेकरूस परत घेतां येतें असें म्हटलें आहे व कलम ११ मध्यें १९४० च्या नंतर बांधलेल्या इमारतींचें भाडें ठरविण्याचा अधिकार रेंट कंट्रोलर यास देण्यांत आला आहे.

कलम १२त अपीलाचा अधिकार कलेक्टरकडे देण्यांत आला आहे.

स्थूलमानानें भाडें नियंत्रण हुकुमाची रचना वरीलप्रमाणें आहे.

ह्या हुकुमाच्या कक्षेंत येणाऱ्या वाटर्लु मेन्शन या मुंबईतील इमारतीमध्यें राहणाऱ्या भाडेकरूमधील व इमारतीचे मालक मोर्वीचे महाराजा यांच्यामधील दाव्याच्या अपीलांत मुंबई हायकोर्टानें ह्या हुकुमांतील कलम ८, ९ व १२ हीं कलमें बेकायदा ठरविलीं आहेत. अर्थात् या निकालानें मुंबई शहरांतील ८० रु. वर भाडें देणाऱ्या भाडेकरूंची व मुंबई बाहेरील सर्व भाडेकरूंची मोठी दुर्दशा होणार आहे. खुद्द मुंबई शहरांत ८० रु. खालील भाडेकरूंना या निकालापासून कांहींच त्रास पोंचणार नाहीं. कारण त्यांना १९३९ सालचा कायदा लागूं आहे व त्यानें त्यांचें संरक्षण चांगलें होत आहे.

मुंबई हायकोर्टानें हुकुमांतील फक्त ८, ९ व १२ एवढींच कलमें बेकायदा ठरविलीं आहेत व त्यामुळें नियमित भाडें दिलें म्हणजे मालकांची पर्वा करण्याचें बिऱ्हाडकरूंना कारण उरलें नव्हतें ती परिस्थिति गेली. आतां मिळकतीच्या कायद्याप्रमाणें जरूर असणारी १५ दिवसांची नोटीस दिली कीं, भाडेकरूंना घरांतून काढून टाकतां येईल व त्यामुळें या युद्धकाळांतील इतर हालांत लोकांवर रस्त्यांत उघडे पडण्याची भीति उत्पन्न झाली आहे.

याप्रमाणें जरी कलम ८, ९ व १२ हीं बेकायदा ठरलीं असलीं तरी बाकीचा हुकूम अंमलांत आहेच व त्या हुकुमाप्रमाणें मालकांना भाड्यांत वाढ मात्र करता येणार नाहीं व एक भाडेकरी काढून त्या जागीं दुसरा ठेवून जास्त भाडें काढतां येणार नाहीं. कारण जागेच्या भाड्यांत वाढ करण्यास या हुकुमानें बंदी केली आहे.

भाडेकरूंवर ओढवणाऱ्या या दुर्दशेंतून वाट काढण्याकरतां १९३९ सालचा मुंबई शहरांत लागूं असलेला कायदा सर्वत्र लागू केला तर भाडेकऱ्यांचे हाल मोठ्या प्रमाणावर वांचणार आहेत. त्या कायद्यांत रेंट कंट्रोलचे अधिकार कोर्टास देण्यांत आले आहेत व त्याबद्दल कोणाची तक्रार असणार नाहीं.

असा नवीन हुकूम अगर कायदा तावडतोब सर्वत्र अंमलांत येणें अत्यावश्यक आहे.

स्फुट विचार

ब्रिटिश सरकारच्या अंदाजपत्रकांत सुमारें ३ अब्ज कोटींची तूट

ब्रिटिश सरकारचें अंदाजपत्रक कॉमन्स सभेस सादर करतांना फडनवीस, सर जॉन अँडरसन, ह्यांनीं, गेल्या वर्षीच्या उत्पन्न-खर्चाचा आढावा घेतला. एकूण उत्पन्न अपेक्षेपेक्षा १३ कोटि, १० लक्ष पौंड अधिक येऊन त्याची रकम ३ अब्ज, ५ कोटि पौंड भरली. उत्पन्नापेक्षा खर्च २ अब्ज, ७६ कोटि पौंडानीं अधिक झाला. सरकारास २३ अब्ज पौंडांचें कर्ज काढावें लागलें. बीर दारू व तंबाखू ह्यांवरील करांत आणखी वाढ केली, तरी ह्या जिनसांचा खप वाढला व अपेक्षित करापेक्षा त्यांनीं १ कोटि, ८० लक्ष पौंड जास्त दिले. ग्रेट ब्रिटनमधील रहाणीच्या खर्चाचें प्रमाण युद्धपूर्व सालाचे मानानें फक्त २८% वाढलें आहे. किंमती आवाक्यांत ठेवण्याचे बाबतींत ग्रेट ब्रिटनला किती यश आलेलें आहे, हें ह्यावरून सिद्ध होतें. युद्धोत्तर काळांत, उत्पादनाचा उठाव ग्रेट-ब्रिटनमध्येंच होऊं देण्यापेक्षा निर्गत व्यापारास प्राधान्य देण्याचें महत्त्व सर जॉन अँडरसन ह्यांनीं प्रतिपादन केलें व उद्योगधंद्यांस सरकार मदत करील, असें आश्वासन दिलें. १९४४-४५ मधील ब्रिटिश सरकारी खर्चाचा अंदाजी आकडा ५ अब्ज, ९४ कोटि पौंड आहे. उत्पन्न ३ अब्ज, १० कोटि पौंड भरेल व उत्पन्न-खर्चांत येणारी तूट कर्ज उभारून भागविण्यांत येईल. एकूण खर्चापैकी निम्म्या खर्चाची भरपाई करांच्या वसुलींतूनच होईल, हें एक वैशिष्ट्य आहे. खर्चाच्या रकमेपैकीं एवढी मोठी रकम चालू उत्पन्नांतून भागविता येण्याजोगी ग्रेट ब्रिटनची चांगली परिस्थिति आहे किंवा तेथील लोक एवढा स्वार्थत्याग करून युद्धाचा शेवट जवळ आणण्यास सहाय करीत आहेत, असा त्याचा अर्थ आहे. चलनविस्ताराचा अवलंब न करतां बचतीमधून व अन्य मार्गांनीं खर्च भागविणें ग्रेट ब्रिटनच्या आवाक्यांत आहे, असें त्यांनीं सांगितलें.

मुंबई प्रांतास बाहेरून धान्य मिळालें पाहिजे

शिधापद्धतीचा उपक्रम यशस्वी करून दाखवल्याचें श्रेय मुंबई प्रांतानें संपादलें आहे आणि त्याचा धडा दुसरे प्रांत गिरवीत आहेत. आपली धान्याची नैसर्गिक तूट भरून काढण्याची आणि त्याची वाटणी शक्य तितकी समाधानकारक करण्याची शिकस्तहि ह्या आमच्या प्रांतानें चालवली आहे. शक्यतोवर स्वतःच्या पायावर उभें राहून परावलंबन कमी करावें हा त्या व्यवस्थेचा हेतु आहे. प्रांतिक गरज भागवण्यास पुरें इतकें धान्य उत्पन्न करण्याची व्यवस्था मुंबई सरकारनें केली आहे आणि बाहेरून धान्य येण्याची आवश्यकता आतां उरलेली नाहीं असें अनुमान मात्र ह्यावरून काढलें जाऊं नये अशी काळजी घेण्यांत आली पाहिजे. तुटीच्या प्रांतांस धान्य पुरवण्याची जबाबदारी मध्यवर्ती सरकारची आहे आणि मुंबई प्रांत स्वतःचें उत्पादन वाढवून त्याची खरेदी आणि वाटणी योजनात्मक रीतीनें करीत आहे ह्याचा अर्थ बाहेरून पुरवठा होण्याची येथें आवश्यकता नाहीं असा मुळींच नाहीं. ह्या दृष्टीनें पहातां प्रांतिक अन्नसल्लागार समितीनें मुंबई सरकारास गेल्या आठवड्यांत भरलेल्या आपल्या सभेंत प्रस्तुत प्रश्नाबाबत केलेली सूचना महत्त्वाची आणि योग्य आहे. मध्यवर्ती सरकारानें मुंबई प्रांतास बाहेरून धान्य आणून पुरवण्याचें अगत्य प्रांतिक सरकारानें त्या सरकारच्या मनावर ठसवावें असा सल्लागार समितीचा आग्रह आहे. स्वतः विशेष खटपट न करतां तुटीची ओरड करणाऱ्या प्रांताकडे मध्यवर्ती सरकारचें लक्ष प्रामुख्यानें जाईल आणि मुंबई प्रांताच्या गरजेकडे दुर्लक्ष होण्याचा संभव आहे म्हणून हिंदुस्थान सरकारकडे प्रांतिक सरकारनें तगादा लावला पाहिजे आणि त्यांचेकडून शक्य तेवढें धान्य मिळवलें पाहिजे.

धान्य सल्लागार समितीच्या सूचना

जमीनदारांनीं आपल्या शेतांच्या विशिष्ट भागांत धान्याचीं पिकें काढलीं पाहिजेत आणि विगर धान्याचीं पिकें करतां कामा नयेत अशी सक्ती करणारा कायदा मुंबई सरकार करीत आहे ह्यावरून धान्य पुरवठ्याच्या वाढीची शिकस्त ह्या प्रांतांत कशी होत आहे याची कल्पना येईल. धान्याच्या उत्पादनाचा विस्तार हा प्रांतिक जनतेच्या जीवनाचा जिव्हाळ्याचा प्रश्न असल्यानें अशा प्रकारची सक्ती समर्थनीय ठरते. तथापि हें नियंत्रण आणि विशिष्ट मर्यादेपलीकडील उत्पादन शेतकऱ्यानें सरकारास ठराविक भावानें विकलें पाहिजे अशी करण्यांत येणारी सक्ती हीं आवश्यक असलीं तरी ह्या धोरणाचा परिणाम धान्य पिकवणाऱ्यांवर काय होतो आणि त्यानें करावयाच्या स्वार्थत्यागास कोणत्या मर्यादा आहेत ह्याचा विचार होणें आवश्यक आहे. धान्याच्या उत्पादकांस दिल्या जाणाऱ्या किंमती आणि शेतकऱ्यांस स्वतःच्या धंद्यास व उपजीविकेस येणारा खर्च ह्यांचा तुलनात्मक दृष्टीनें हिशेब केला जाऊन अधिक धान्य पिकवण्यास लागणारें सहाय सरकारनें पुरवलें पाहिजे. धान्यांच्या किंमतींची अनिश्चितता, जरूरीच्या जिनसांची महागाई, आउतें, बीं, खत, बैल इत्यादींची दुर्मिळता ह्या गोष्टी सरकारनें लक्षांत घेऊन त्यांचे बाबतींत शेतकऱ्यांस मदत व सवलती देणें आवश्यक आहे. प्रांतिक अन्न सल्लागार समितीनें शेतकऱ्यांच्या अडचणी पुढें मांडून त्यांचे निवारणार्थ सरकारास उपयुक्त सूचना केल्या आहेत. शेतकऱ्यांकडून सक्तीनें धान्य जमा करण्याची योजना लोकांस नीट समजली पाहिजे आणि ह्यासाठी तिला योग्य प्रसिद्धी देण्यांत आली पाहिजे ह्यावर सल्लागार समितीनें जोर दिला आहे. शहरें आणि मोठीं गांवें ह्यांत देण्यांत येणाऱ्या शिध्याचें परिमाण व त्यांतल्या धान्यांचें प्रमाण ह्यांत एकसूत्रीपणा असावा असेंहि तिनें सुचवलें आहे.

हिंदुस्थानांतील वैमानिक वहातुक

युद्धसमाप्तीनंतर वैमानिक वहातुकीचा प्रश्न महत्त्वाचा होणार आहे. हिंदुस्थान सरकारनें विमानगृहांच्या बांधणीसाठी १० वर्षांत १५½ कोटि रुपये खर्च करण्याचें ठरविलें आहे. एक लाखापेक्षा जास्त वस्तीच्या ५५ शहरांपैकी ४६ शहरांजवळ विमानगृहें तयार केलीं जातील. त्याचप्रमाणें ५० हजार लोकवस्तीच्या गांवापैकी २९ गांवांजवळ व ५० हजारांखालील लोकवस्तीच्या गांवापैकी ३६ गांवांजवळ विमानगृहें बांधण्यांत येतील. ह्या १११ विमानगृहांपैकीं ९१ आजच चालू आहेत व २४ नव्यानें बांधण्यांत येतील. कराची येथील विमानगृहाला अमून १००

प्रवाशांना पुरेल एवढें मोठें हॉटेल उभारण्यांत येईल. कलकत्ता, दिल्ली व मुंबई येथें उभारावयाच्या हॉटेलांत प्रत्येकी ५० उतारूंची सोय होईल. १११ विमानगृहांच्या व्यवस्थेसाठी मोठे अधिकारी, मजूर मिळून सुमारे ७,००० लोक कामावर ठेवावे लागतील.

दि बँक ऑफ औंध लि.

औंध स्टेट सेंट्रल बँक लि. चा व्यवहार १९३८ मध्यें औंध स्टेट बँकिंग अँड इन्शुअरन्स कं. लि. नें १९३८ मध्यें आपल्या ताब्यांत घेतला व विमा शाखा सुरू केली. तथापि, विमा विभागांत व औंध स्टेट प्रॉ. इं. कंपनीच्या भाग भांडवलांत कंपनीचे पैसे अडकून पडले. विमा व्यवसायाच्या ह्या प्रयोगाचा बँकिंग विभागावर ताण पडूं लागला व त्याचा दुष्परिणाम कंपनीस भोगावा लागून तिचेवर प्रमाणाबाहेर आर्थिक जबाबदाऱ्या व अडचणी आल्या. कंपनीनें वेळींच १९४१ साली औंध म्यूच्युअल अॅ. सोसायटी लि. ची स्थापना करून तिला सढळपणें सहाय केलें. कंपनीचा बँकिंग विभाग पूर्वीपासून फायदेशीर होताच, तो पुनः वाढीला लागला. कंपनीचें वसूल भांडवल व फंडस ह्यांचें एकूण खेळत्या भांडवलाशीं पडणारें प्रमाण समाधानकारक आहे व तिचेकडील ठेवीहि वाढत आहेत. अशा रीतीनें, कंपनीचें पाऊल, मध्यंतरीच्या अडचणी दूर होऊन, जोमानें पुढें पडत आहे. विमा खातें बंद केलें तरी, कंपनीच्या नांवांत बदल करण्याचें राहिलें होतें. हा फरक आतां करण्यांत आला असून, "बँक ऑफ औंध लि." ह्या भारदस्त नांवासाठीं कंपनीचा व्यवहार ह्यापुढें चालणार आहे. बँकेची असंड प्रगति होवो.

कंपन्यांच्या स्थापनेसंबंधांत नवें धोरण

मे १९४३ मध्यें हिंदुस्थान सरकारनें ९४ वा डिफेन्स ऑफ इंडिया नियम म्हणून नव्या कंपन्यांचे स्थापनेवर एक बंधन जाहीर केलें व मध्यवर्ती सरकारचे पूर्णसंमतीशिवाय भांडवल उभारण्यास व जाहीर रीतीनें रोखे विकण्यास बंदी केली. युद्धानंतरच्या काळांत ज्या कंपन्या टिकण्याचा संभव नाहीं, अशा कंपन्या अस्तित्वांत येणेंच अशक्य करून पैसे गुंतविणारांचे हितसंरक्षण करणें प्रस्तुत नियमाचा उद्देश असल्याचें प्रसिद्ध झालें होतें. युद्धपरिस्थिति थोडीशी निवळतांच औद्योगिक उत्पादनाच्या वाढीस वाट पहावी न लागतां तें हातीं घेण्यासाठी चांगल्या कंपन्या सुसज्ज असाव्या ह्या दृष्टीनें भांडवल उभारणीवरील निर्बंध थोडेसे ढिले करण्याचें हिंदुस्थान सरकारनें आतां ठरविलें आहे. सध्यां नव्या योजना हातीं घेणें अशक्य आहे, परंतु युद्धोत्तर काळांत त्या हातीं घेण्याची पूर्वतयारी करणें आवश्यक आहे. अशा योजनांसाठी भांडवल उभारणीस आतां परवानगी मिळणार आहे. उभारलेलें भांडवल तूर्त सरकारी रोख्यांतच गुंतवावें लागेल.

स्वदेशी मिल्स लि.

मुंबई (कुर्ला) येथील स्वदेशी मिल्स कं. च्या १९४३ मधील १ कोटि, १३¾ लक्ष रुपयांच्या नफ्यांपैकी कर व सक्कीची ठेव ह्यांची तरतूद करून १६¼ लक्ष रुपये उरले त्यांतून भागीदारांस करमाफ ३५% डिव्हिडंड मिळालें. टाटा सन्स लि. कडे कंपनीची मॅनेजिंग एजन्सी आहे. मिलमध्यें ७९,२८८ चात्या व २,१५० माग आहेत.

शेअर बाजार

(श्री. व. वि. लोणकर, एम. ए., बी. कॉम.)

अपोलो—गिरणीचा अहवाल नुकताच हातीं आला तो समाधानकारक आहे असें दिसून येईल. गिरणीला १९४३ च्या डिसेंबर अखेर संपणाऱ्या वर्षांत एकूण पेंशी लाख, बीस हजारावर नफा झाला असून त्यापैकी जादा नफ्यावरील कर भरणीला ५९ लक्ष रुपये बाजूला काढावे लागले असून पांच लाख घसारा टाकण्यांत आला आहे. भागीदारांच्या वांटणीला एकूण १९,४२,२९९ रुपये आलेले असून पूर्वी शेअरला तीन आणे नफा वाटलेला आहे व नवीन आणखी तीन आणे मिळणेचा आहे. मागील वर्षी भागीदारांना करमाफ ४॥ आणे व यंदा सहा आणे करमाफ वाटण्यांत आले आहेत. शेअरचा चालू भाव रु. ५ सव्वाज घ्यानांत घेतां गुंतविणाराला सुमारें ७॥ टके करमाफ व्याज सुटेल.

ताळेबंदांतील विशेष गोष्ट ही कीं, मूळ मालमत्तेची किंमत जी सुमारें ८० लाखापर्यंत ती आज फक्त २९,३८,७२९ पर्यंत कागदावर दाखविण्यांत येत आहे. हें निःसंशय मजबुतीदर्शक आहे.

तसेंच नफ्यापैकी दहा लाखावर रक्कम पुंढील सालाकरतां ओढण्यांत आलेली आहे. गिरणीच्या एकूण २५ लाख (प्र. रु. २ च्या) विभागावर सहा आणे प्रमाणें व्याज देण्यास फक्त ९,३७,५०० रु. लागतात. म्हणजे आज गिरणीजवळ पुढील सालचे सहा आणे भागीदारांना देण्यास नगद शिल्लक आहे. याचा अर्थ असा कीं मंदीवाले मंडळींनीं कापडाचें भाव पडणार, व्याजें कमी होणार, म्हणून कितीही रान उठविलें तरी नवीन सालचे होणाऱ्या नफ्यांतून ही गिरणी सर्व कर, घसारा, इत्यादि देणी देऊन टाकून व्याज कायम राखूं शकेल. पुण्याकडच्या मंडळींजवळ बरेच अपोलोचे शेअर्स आहेत व आज बरेच दिवस भाव पडून असल्यामुळें गुंतविणारे सचिंत दिसत असत, त्यांना सांगावेसें वाटतें कीं बाजार गप्पावर लक्ष न देतां आपल्या शेअर्सना चिकटून रहावें. सध्यांच्या अनिश्चित लढाईच्या वातावरणामुळें बाजार मंद आहेत पण एकादे वेळेस दिवाळीच्या सुमारास बाजार हुरुपांत येतात त्या वेळेस हा शेअर उचल खाल्ल्याशिवाय रहाणार नाहीं.

विमा कंपन्यांनीं स्फोटामुळें झालेली नुकसानी भरून देण्याचें नाकारल्यामुळें विमाशेअर पुन्हा मजबुतींत आहेत.

इकडील गुंतविणारांचे मद्रासकडील मिडलँड रबर या कंपनीच्या (मूळ रु. १०) १७ रु. च्या आसपास मिळणाऱ्या व १॥ रु. व्याज देणाऱ्या कंपनीकडे लक्ष वेधावेसें वाटतें. साधारण रबर कंपन्यांची भांडवलें २।३ लाखापर्यंत असतांना या कंपनीचें भांडवल १२ लाखापर्यंत असून ही कंपनी लवकरच आणखी एक 'राणी' नांवाचा मळा घेणार आहे व त्याकरता आणखी भांडवल वाढविणार आहे. कंपनीचे चालक प्रसिद्ध ए. व्ही. थॉमस ही कंपनी असून, कंपनीजवळ १०॥ लाखांची जिंदगी व दोन लाखांवर गंगाजळी आहे. सिलोनी रबराचे भाव नुकतेच वाढविण्यांत आले आहेत व इकडील भावही वाढण्याचा बराच संभव आहे हें लक्षांत घेतां हा शेअर भरपूर व्याज व भांडवली वाढ दिल्याशिवाय राहणार नाहीं.

" शेडयूल्ड " बँक म्हणजे काय ?

कित्येक हिंदी बँकांच्या जाहिरातींत " शेडयूल्ड " बँक म्हणून प्रामुख्यानें लिहिलें जातें व कित्येक बँका आपणांस " शेडयूल्ड " बँकेचा दर्जा प्राप्त झाल्याचें विशेषत्वानें जाहीर करतात. हा दर्जा कोणत्या प्रकारचा असतो ? बँकेस शेडयूल्ड बँकांच्या यादींत स्थान मिळालें, एवढ्यानें तिच्या परिस्थिती-संबंधीं कांहीं अनुमान काढतां येतें काय ? वगैरे प्रश्न नेहमी विचारण्यांत येतात.

हिंदुस्थानांत मध्यवर्ती (रिझर्व्ह) बँकेच्या स्थापनेपासून, जॉइंट स्टॉक बँकांची दोन मुख्य वर्गांत विभागणी केली जाते—शेडयूल्ड बँका व शेडयूलमध्यें नसलेल्या बँका. रिझर्व्ह बँकेच्या दुसऱ्या शेडयूलमध्यें (परिशिष्टांत) ज्यांचा समावेश केलेला आहे, अशा बँकांना शेडयूल्ड बँका म्हणतात व उरलेल्या बँका नॉन—शेडयूल्ड बँका असतात. ह्या दुसऱ्या परिशिष्टांत बँक दाखल होण्यापूर्वी बँकेनें कोणत्या अटी पार पाडल्या पाहिजेत, हें रिझर्व्ह बँक कायद्याच्या ४२ (६) व्या कलमांत सांगितलेलें आहे. (१) ब्रिटिश हिंदुस्थानांत बँकिंगचा धंदा करणाऱ्या व (२) ज्यांचें वसूल भांडवल व रिझर्व्ह ह्यांची मिळून "किंमत" किमान पाच लक्ष रुपये आहे व (३) ज्यांस कंपनी कायद्याच्या २ (२) कलमाप्रमाणें कंपनी म्हणतां येते किंवा हिंदुस्थानाबाहेरील कायद्यान्वयें ज्या कंपन्या नोंदण्यांत आलेल्या आहेत, अशा वरील तीनहि अटी पुऱ्या करणाऱ्या बँकांस " शेडयूल्ड " बँकांच्या यादींत स्थान मिळूं शकतें.

शेडयूल्ड बँकांची वर्गवारी

शेडयूल्ड बँकांच्या यादींत १९४३अखेर७७ बँका होत्या. म्हणजे एका वर्षांत १३ बँकांची शेडयूल्ड बँकांच्या यादींत भर पडली. ह्या ७७ शेडयूल्ड बँकांपैकी १७ बँका ब्रिटिश हिंदुस्थानाबाहेर नोंदण्यांत आलेल्या एक्सचेंज बँका आहेत. परराष्ट्रीय व्यापारास भांडवल पुरविणें हेंच त्यांचें प्रमुख कार्य असतें व हिंदुस्थानांतील महत्त्वाच्या बंदरांत व प्रमुख व्यापारी केंद्रांत त्यांच्या शाखा आहेत. इतरहि व्यापारास व धंद्यास त्या बँका पैसे देतात व लोकांकडून ठेवी स्वीकारतात. शेडयूल्ड बँकांपैकीं इंपीरिअल बँक ऑफ इंडिया ही सर्वांत मोठी व महत्त्वाची आहे व तिचे सालोसाल सेंट्रल बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ इंडिया, अलाहाबाद बँक, बँक ऑफ बरोडा व पंजाब नॅशनल बँक ह्या इतके दिवस येत असत. गेल्या कांहीं वर्षांत आणखी कित्येक बँकांनीं ठेवी व शाखा ह्यांचे बाबतींत उत्कृष्ट प्रगति करून, शेडयूल्ड बँकांच्या यादींत बरती अनुक्रम मिळविला आहे. ज्यांचें वसूल भांडवल व रिझर्व्ह ह्यांची बेरीज ५ लक्ष रुपये भरते, अशा बँकांचा उरलेल्या शेडयूल्ड बँकांत समावेश होतो.

वसूल भांडवल व रिझर्व्ह ह्यांची किमान "किंमत"

रिझर्व्ह बँकेच्या " शेडयूल "मध्यें प्रवेश मिळविणाऱ्या बँकेचें वसूल भांडवल व रिझर्व्ह ह्यांची " किंमत " किमान ५ लक्ष रुपये असली पाहिजे, असें वर सांगितलें आहे. ह्याचा अर्थ असा, कीं वरील ५ लक्ष रुपयांचे किंमतीची जिंदगी बँकेजवळ सरोसरच आहे, अशी रिझर्व्ह बँकेची खात्री पटवून दिली पाहिजे. केवळ ताळेबंदांत ५ लक्ष रुपयांचें वसूल भांडवल व रिझर्व्ह दाखवून भागत नाहीं. बँकेचा व्यवहार मुंढाळण्याची पाळी आली, तर सर्व देणें देऊन टाकून, किमान ५ लक्ष रुपये तरी वसूल भांडवल व रिझर्व्ह ह्यांचे पोटीं शिल्लक राहिले पाहिजेत, असा त्याचा अर्थ आहे. जिंदगीचे बाजूस कृत्रिम देणें दाखवून ५ लक्ष रुपयांची भरपाई बँकांना करतां येणार नाहीं. बुडीत कर्जे, डेव्हलपमेंट खर्च, शेअरविक्री खर्च, तोटा, इत्यादि जिंदगीचे बाजूकडील बाकी वजा टाकूनच किमान ५ लक्ष रुपये मोकळे राहिले पाहिजेत. वसूल भांडवल व रिझर्व्ह ह्यांची किंमत ५ लक्ष रुपयांचे खाली जाईल, तर शेडयूल्ड बँकांचें शेडयूलत्व हिरावून घेतलें जाईल. ह्यावर उपाय रोख रकमांचे द्वारा वसूल भांडवल व रिझर्व्ह हीं वाढवणें हा होय. कांहीं शेडयूल्ड बँकांचें यादींतून नांव गळाल्याचें मधून मधून प्रसिद्ध होतें, त्याचें स्पष्टीकरण वरील खुलाशानें होईल. ठराविक रकमेसाठी वसूल भांडवल व रिझर्व्ह ह्यांचा आकडा मेळ, किंवा बँक मुंढाळण्यांत आली किंवा इतर कारणानें तिनें बँकिंगचा व्यवहार थांबविला, तर तिचें शेडयूल्ड बँकांतून नांव काढून घेण्यांत येतें. एकादी बँक शेडयूल्ड बँक आहे, एवढ्यावरूनच तिचेवर भलभपणाचें शिक्कामोर्तब झालेलें आहे, असें समजण्याचें कारण नाहीं. सरकारास शंका आली, तर बँक शेडयूल्ड बँकांचे यादींत बसण्याच्या लायकीची आहे किंवा नाहीं, ह्याची चौकशी करवून निर्णय करण्याचा अधिकार सरकारास आहे.

बंधनें व सवलती

प्रत्येक शेडयूल्ड बँकेनें आपल्या चालू व सेव्हिंग्ज खात्यावरील ठेवींच्या ५% व मुदतबंद ठेवींच्या २% रकम रिझर्व्ह बँकेकडे ठेवलीच पाहिजे, असा कायदा आहे, हिंदी बँकिंगचें नियंत्रण करण्यास मदत व्हावी, हा वरील नियमाचा उद्देश आहे. इतर बँकांवर अशा तऱ्हेचें बंधन नाहीं. ठराविक माहितीचा साप्ताहिक तक्ता रिझर्व्ह बँकेकडे भरून पाठविण्याचें बंधन सर्व शेडयूल्ड बँकांवर आहे. रिझर्व्ह बँक सर्व बँकांची माहिती संकलित करून दर आठवड्यास आकडे प्रसिद्ध करते. रिझर्व्ह बँकेकडे ठराविक रोख रकमा ठेवण्याचें एकाद्या बँकेनें टाळलें, तर रिझर्व्ह बँक तिचेकडून दंडादाखल व्याज घेऊं शकते; नवीन ठेवी स्वीकारण्यास प्रतिबंध करणें व जाणून बुजून नियम मोडल्याबद्दल बँकेच्या डायरेक्टरांस शासन करणें हेहि अधिकार रिझर्व्ह बँकेस आहेत. साप्ताहिक तक्ता पाठविण्यास विलंब लागला, तर प्रत्येक दिवसाच्या विलंबास १०० रुपये दंड पडेल, असा कायदा आहे.

रिझर्व्ह बँकेच्या कायद्याचीं हीं बंधनें शेडयूल्ड बँकांना पाळावीं लागतात, त्याचप्रमाणें त्यांना रिझर्व्ह बँकेकडून कांहीं सवलतीहि मिळतात. योग्य अटींवर व तारणांवर शेडयूल्ड बँकांना रिझर्व्ह बँकेकडून तात्पुरतीं कर्जे मिळण्याची तरतूद करण्यांत आलेली आहे. शेडयूल्ड बँकांच्या हुंड्याहि रिझर्व्ह बँक डिस्काँट करते. पैशाची एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी बदलीबदली करण्याचे संबंधांत शेडयूल्ड बँकांना विशेष सवलती मिळतात.

(३१ डिसेंबर, १९४३ अखेर एकूण ७४ शेडयूल्ड बँकांनीं रिझर्व्ह बँकेकडे माहिती पाठविली. त्यांचेकडील एकूण ठेवींची रकम ६५८ कोटि रुपये होती. त्यांनीं रिझर्व्ह बँकेकडे ११९३ कोटि रुपये ठेवले होते. वास्तविक, नियमाप्रमाणें त्यांनीं ५९ कोटि रुपयेच फक्त रिझर्व्ह बँकेकडे ठेवले असते तरी चालले असते. १९४२ अखेर त्यांनीं असेच अवश्यकतेपेक्षा अधिक १२ कोटि रुपये रिझर्व्ह बँकेत ठेवले होते. हाताशी असलेल्या शिलकी रकमा वाढत जाण्याचा हा परिणाम आहे.)

पुना गेस्ट हाऊस

१००, लक्ष्मी रोड, पुणें २.

Telephone 779

GUEST HOUSE

TELEGRAM Guest House Poona 2.

स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

गिरगांव मुंबई नं. ४

महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

★ नगर वाँवे ट्रेडिंग कंपनी ★

चिनाब, लाइम ज्यूस कॉर्डीअल, ऑरेंज व लेमन स्क्वॉश, टोमॅटो सॉस
मँगो जॅम, मध, कोको, बेकिंग पावडर, सॅनिटरी टॉवेल्स,
टुथ पेस्ट, टुथ ब्रश, वगैरे मालाचे
स्टॉकिस्ट.

★

शाखा:— माणिक चौक, अहमदनगर

हेड ऑफिस:— पूना गेस्ट हाऊस, पुणें २

न्यू इंडिया इंडस्ट्रीज लि.

(Approved Re-traders and Approved Contractors)

२६ लॅमिंग्टन नॉर्थ, मुंबई ११.

अध्यक्ष:—श्री. ग. स. मराठे, ॲक्चुअरी.

महाराष्ट्रांतील रबराचा प्रमुख कारखाना

★ गिरणीचे रोलर्स ★ रबरी हातमोजे ★ छापखान्यांचे रोलर्स
★ रीमोल्ड टायर्स ★ रबरी वॉशर्स ★ सॉलिड व्हील्स

व इतर रबरी माल तयार होतो.

पु. ग. मराठे
मॅनेजिंग डायरेक्टर.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा ब. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' भांबुर्डा, ब. नं. १२७।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
(टपाल हंशील माफ)
किरकोळ अंकास,
दोन आणे.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष १० पुणें, बुधवार, तारीख १० मे, १९४४ अंक १९

प्रगतीचें श्रेय आपणांकडे

सह्याद्रि विमा कंपनीनें १९४३ सालीं खालीलप्रमाणें काम केलें आहे.

आलेलें काम	रु. २१, ४४, ४७१	१९४२	५ लक्ष ३ हजारानें
मंजूर काम	रु. १८, ३५, ७१४	पेक्षां	२ लक्ष ९० हजारानें
पूर्ण विमा काम	रु. १६, १९, ७७५	वाढ	४ लक्ष ७ हजारानें

या सर्व प्रगतीचें श्रेय कंपनीचे विमेदार, प्रतिनिधी, प्रचाराधिकारी, भागीदार व हितचिंतक यांनाच आहे व त्याच्याबद्दल आम्हीं त्यांचे आभारी आहोंत. विमा—योजना त्याचप्रमाणें एजन्सी याच कंपनीची अत्यंत आकर्षक.

नासिक } मॅनेजिंग डायरेक्टर

दि बँक ऑफ इंडिया लि.

[स्थापना : १९०६]

अधिकृत भांडवल	... ... रु.	२,००,००,०००
वसूल झालेलें भांडवल	... ... रु.	१,००,००,०००
रिझर्व्ह फंड	... ... रु.	१,२३,००,०००

मुख्य कचेरी: ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

मुंबईमधील शाखा: बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

इतर शाखा: अहमदाबाद (भद्र, मुख्य ऑफिस), अहमदाबाद (एलिस ब्रिज शाखा), अहमदाबाद (स्टेशन शाखा), अमृतसर, अंधेरी (मुंबई शेजारीं), बांद्रे (मुंबई शेजारीं), कलकत्ता (क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्क्वेअर), जमशेदपूर कराची, नागपूर (किंग्जवे), नागपूर (इतवारी बझार), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत, भुज (कच्छ).

लंडन एजन्ट्स : वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

डायरेक्टर्स : सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. (अध्यक्ष), श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के. नाईट; मि. ए. गेडिस; सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, जी. बी. ई., के. सी. आय. ई., मि. दिनशा के. दाजी; श्री. रामनिवास रामनारायण.

करंट डिपॉझिट अकाउंट्स :

दररोजच्या रु. १०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षां कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते, सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

एजंट:—एच्. ए. करीमभाई

पुण्यांतील

आदर्श निवासस्थान व भोजनालय

छाया लॉजिंग व बोर्डिंग हाउस

बुधवार चौक, पुणें २.

दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.

हेड ऑफिस : पुणें शहर.
स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.
मुंबअी शाखा : दलाल स्ट्रीट, फोर्ट.
जळगांव शाखा : नवी पेठ, मेन रोड.
नागपूर शाखा : गोखले बिल्डिंग, सिताबर्डी.

भांडवल

अधिकृत व विक्रीस काढलेलें	खपलेलें	वसूल झालेलें
रु. १०,००,०००	रु. १०,००,०००	रु. ५,००,०००

एकूण खेळतें भांडवल रु. ७४,००,०००

बँकेच्या शेअरवर डिसेंबर १९४३ अखेर ४½% करमाफ डिव्हिडंड दिलें गेलें. बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदी-विक्री कसोशीनें करून दिली जाते.

बँकेनें रु. ५ प्रीमिअमनें काढलेले सर्व शेअर्स विकले गेले. विशेष माहितीसाठी मेटा अगर लिहा.

सी. व्ही. जोग,
B. Com., C. A. I. B., C. A. I. I. B.
मॅनेजर

WE ARE THE TRUSTEES OF YOUR SAVINGS

We are the experts who handle your investments, so that you may receive the maximum return on your money painfully saved.

You can command our services in this by taking out a Life Insurance Policy.

THE SUPREME MUTUAL ASSURANCE COMPANY LIMITED, POONA.

Assures its Policy Holders of maximum returns on their investments.

Economic Management. Sound organisation are the unique features of this LEADING MUTUAL LIFE OFFICE IN WESTERN INDIA.

For appointment as Inspector of Agencies on monthly salary, write to :—

HEAD OFFICE :— 7 Nagesh Peth, POONA CITY.

V. N. Mysore, M. A., LL. B. *Manager.*

विविध माहिती

हिंदी कापडाचें उत्पादन

जानेवारी, १९४४ मध्यें डिसेंबर १९४३ व जानेवारी १९४३ या महिन्यांचे मानानें हिंदी गिरण्यांत कपाशीचा उठाव कमी झाला, त्याचा परिणाम अर्थातच त्यांचे उत्पादनावर झाला.

मुंबई प्रांतांतील औद्योगिक वांधे

जानेवारी १९४४ मधील मुंबई प्रांतांतील १८ औद्योगिक वांध्यांत एकूण १०,४८४ कामगारांचे कामाचे २८,६६१ दिवस बुडाले. १८ पैकीं ११ वांधे मुंबईमधीलच होते.

बॉबे डॉकीज, लि.

वरील कंपनीस ३१ ऑक्टोबर, १९४३ अखेरच्या वर्षी करासाठीं ७,७३,२४१ रुपये बाजूस काढून १,५८,४७३ रुपये नफा झाला. ऑर्डिनरी भागीदारांस ७% करमाफ डिव्हिडंड मिळालें.

मुंबईमधील बँका ता. १ जुलै रोजीं बंद

मुंबईतील बँकांना आपले सहामाही हिशेब पुरे करण्यास अवधि मिळावा, यासाठी १ जुलै १९४४ रोजीं त्यांना सुटी देण्यांत आल्याचें मुंबई सरकारनें जाहीर केलें आहे.

बँक ऑफ म्हैसूर लि.

वरील बँकेच्या मुंबई शाखेचा उद्घाटन समारंभ ता. ३ मे रोजीं सर एम. विश्वेश्वर अय्या यांचे हस्तें झाला.

मेल्या तीन महिन्यांतील हिंदी चलनी नोटांत वाढ

१९४४	चलनी नोटांत वाढ
जानेवारी	१२·८८ कोटि रु.
फेब्रुवारी	१३·८२ „ रु.
मार्च	१४·९९ „ रु.

३१ मार्च, १९४३ अखेर संपलेल्या बारा महिन्यांत चलनविस्तार २६२ कोटि रुपयांचा झाला. त्यापूर्वीच्या बारा महिन्यांतील विस्तार २०८ कोटि रुपयांचा होता.

चीनकडे जाणारें टपाल

हिंदुस्थानांतून चीनकडे खुष्कीच्या मार्गानें जाणारें टपाल डिसेंबर, १९४२ पासून इराण व रशिया यांचे द्वारा जात असे. आतां नव्या जवळच्या रस्त्यानें तें जाऊं लागेल व टपाल २ महिन्यांत चीनला पोंचण्याची व्यवस्था होईल.

रासायनिक खतांचें उत्पादन

हिंदुस्थानांत रासायनिक खतांचें उत्पादन सुरू करण्यासाठीं यंत्रसामुग्री, कारखान्यांची जागा, इत्यादिसंबंधांत सरकारास सल्ला देण्याकरितां ब्रिटिश तज्ज्ञांना हिंदुस्थानांत बोलावण्यांत येणार आहे.

मालमत्तेच्या नाशाची खबर द्या

मुंबई शहरांतील ज्यांच्या इमारती पाडून टाकण्यांत आल्या असतील, अशांनीं म्युनिसिपल कमिशनरकडे खबर द्यावी; नाहीं तर त्यांच्या मालमत्तेवरील कर चालूच राहील अशी सूचना देण्यांत आली आहे.

जाहिरातींवरील खर्च

ग्रेटब्रिटनमधील वर्तमानपत्रांत प्रसिद्ध होणाऱ्या वेगवेगळ्या धंद्यांच्या जाहिरातींची तुलना केली, तर १९३८ चे मानानें १९४३ साली जाहिरातींवरील खर्च निम्म्यावर आल्याचें आढळतें. बुटांच्या धंद्यानें जाहिरातींचा खर्च वाढविला आहे, तर सिगारेट्सच्या जाहिराती १३% इतक्याच राहिल्या आहेत. जादा नफ्यावरील कर भरण्यापेक्षां जाहिरातींवरील खर्च वाढविण्याचें धोरण कांहीं कंपन्यांनीं स्वीकारल्याचें दिसतें.

खेडेगांवीं लोकांना पाणीपुरवठा

ग्रेट ब्रिटनमधील खेडेगांवीं जनतेपैकी सहा सप्तमांश लोकांना नळाचें पाणी उपलब्ध आहे.

बँका व कर्जाची मुदत

बँकांनीं व्यापाऱ्यांना व दुकानदारांना द्यावयाचीं कर्जे स्वल्प मुदतीचीं असावीं, असा बँकिंगच्या धंद्याचा प्रघात आहे. सध्यांच्या युद्धजन्य परिस्थितीमुळें कित्येकांचे धंदे बसले आहेत, ते पुनः भक्कम पायावर उभे करण्यासाठीं अशी कर्जे उपयोगीं पडणार नाहींत; दीर्घ मुदतीचीं कर्जे देण्याचें धोरण बँकांनीं पत्करणें आवश्यक आहे, असें लॉर्ड वार्डिंग्टन हे आपल्या लंडन येथील भाषणांत नुकतेच म्हणाले.

खेडेगांवांच्या तोंडाचे रस्ते

खेडेगांवांच्या तोंडाचे रस्ते करण्यासाठी मुंबई सरकारनें चालू वर्षाच्या अंदाजपत्रकांतून खालीलप्रमाणें भागवार पैशाची वाटणी केली आहे:—

	रुपये
मध्य भाग	१,५८,०००
दक्षिण भाग	९८,०००
उत्तर भाग	९४,०००
एकूण	३,५०,०००

ग्रेटब्रिटनमधील प्रमुख बँका

(१) मिडलंड, (२) बार्कलेज, (३) लॉइड्स, (४) वेस्टमिन्स्टर, (५) नॅ. प्रॉव्हिन्शिअल, (६) मार्टिन्स व (७) डिस्ट्रिक्ट या ग्रेट ब्रिटनमधील पहिल्या प्रतीच्या सात बँका आहेत. त्यांपैकीं शेवटच्या दोन मोठ्या असल्या तरी इतर पांचांचे मानानें त्या लहानच आहेत. मिडलंड, बार्कलेज व लॉइड्स या जवळजवळ सारख्याच आकाराच्या आहेत व शेवटच्या दोन्ही बँका मिळून मुद्दां या तीन्हींपैकीं कोणत्याच बँकेच्या निम्यामुद्दां आकाराच्या भरत नाहींत.

अनुक्रमणिका

	पृष्ठ		पृष्ठ
१ विविध माहिती ...	१४६	नाऱ्या योजनेचें रहस्य—साम्राज्य मुख्य प्रधानांची परिषद्-सरकारी रोख्यासंबंधीच्या कायद्यांत सुधारणा-श्री. माणलाल ह्यांच्या सूचना	
२ प्रमुख राष्ट्रें कोणतीं !	१४७		
३ "सभांचा कायदा व ... कार्यपद्धति" ...	१४८		
४ बाँब ह्ल्ल्यांचे बळी ...	१४८		
५ नागपूर हायकोर्टाचा निर्णय	१४८		
६ स्फुट विचार ...	१४९	७ शेअर बाजार ...	१५०
शास्त्रीय संशोधन आणि प्रो. हिल-आर्थिक संबंध-		८ पोस्ट ह्ल्ल्याचें वाढतें काम	१५१
		९ फेडरल कोर्ट ...	१५१

अर्थ

बुधवार, ता. १० मे, १९४४

प्रमुख राष्ट्रें कोणतीं ?

चालू युद्धांत प्रामुख्यानें पुढें आलेलीं महत्त्वाचीं राष्ट्रें कोणतीं हें सांगतां आलें तरी "प्रमुख" ह्या विशेषणास पात्र होण्याच्या अटी कोणत्या, हें स्पष्टपणें सांगणें कठीण आहे. प्रमुख राष्ट्रेंच युद्ध तडीपर्यंत चालवूं शकतात व शांततेच्या काळांत निर्णायक राजकीय गोष्टी ठरवितात. तात्विक दृष्ट्या प्रत्येक राष्ट्र स्वतंत्र आहे. परंतु प्रमुख राष्ट्रें इतर राष्ट्रांवर वजन पाडूं शकतात.

केवळ लोकसंख्येचा विचार करून राष्ट्रांचें तुलनात्मक महत्त्व ठरविणें चुकीचें ठरेल. जगाच्या एकूण लोकसंख्येचे पांच साधारण सारखे भाग केले, तर त्याची वाटणी खालीलप्रमाणें होईलः—

	लोकसंख्या (कोटि)
(अ) प्रमुख तीन राष्ट्रें (रशिया, अमेरिका, ग्रेटब्रिटन व त्याच्या वसाहती)	३९·०
(ब) चीन	४६·०
(क) युरोप	३६·०
(ड) हिंदुस्थान व ब्रह्मदेश	४०·४
(इ) उरलेलें जग	५८·६

वरील आकड्यांवरून दिसून येईल कीं, केवळ लोकसंख्येवर राष्ट्रांची मातब्बरी अवलंबून असती तर चीन व हिंदुस्थान ह्यांकडे आज जगाचें नेतृत्व आलें असतें ! देशांच्या क्षेत्रफळावरहि त्यांचें महत्त्व अवलंबून नाहीं. आर्थिक उत्पादन व व्यापार ह्यांवर मात्र देशांचें महत्त्व बऱ्याच अंशीं अवलंबून असतें. केवळ आर्थिक संपत्तीवरूनहि राष्ट्रांच्या शक्तीची कल्पना करतां येणार नाहीं. जनतेच्या किमान गरजा भागवून झाल्यानंतर किती आर्थिक संपत्ति शिलक राहून बल प्रभावी करण्यास उपयोगी पडते, ही गोष्ट महत्त्वाची आहे. हिंदुस्थानाचें राष्ट्रीय उत्पन्न जनतेच्या गरजा भागविल्यानंतर फारसें शिलक उरत नाहीं, हें असिद्धच आहे. म्हणजे लोकसंख्या व विस्तार ह्यांचे दृष्टीनें हिंदुस्थानाचा दर्जा मोठा असला तरी प्रभावी सामर्थ्य त्याचेपाशीं नाहीं. खालील तक्ता पहाः—

आर्थिक संपत्ति

	प्रमुख तीन राष्ट्रें	चीन	युरोप	हिंदुस्थान व ब्रह्मदेश	इतर जग	एकूण
कोळसा (कोटि टन, १९३७)	८५·९	३·७	३८·५	२·५	६·२	१३९·८
पोलाद (,, ,, १९३७)	८·५	·०४	४·२६	·१०	·६	१३·५
लोखंड (,, ,, १९३७)	५·७	·०२	२·९	·१९	·७	९·६
पेट्रोल (,, ,, १९३९)	२०	...	·८	·१४	७·४	२८·५
आयात-निर्गत (कोटि डॉलर, १९३८)	९६९	५५	१०१९	९२	५८६	२७२१
दर माणशीं व्यापार (डॉलर, १९३८)	२४	१½	३०	२½	१०	१२½
आगबोटी (हजार टन, १९३९-४०)	३२,५०४	२५८	२६,३६३	२३८	८,९३४	६८,२९७
सोन्याचें उत्पादन (हजार किलो १९३८)	८५५	...	१९·	१०	२६४	१,१४८

राष्ट्राचें भौगोलिक स्थानहि त्याचें महत्त्व ठरविण्यास कारणीभूत होत असतें. ज्या राष्ट्रांच्या सरहद्दींस स्वाभाविक संरक्षण मिळतें, ज्यांना शक्ति एकवटण्यासाठीं वहातुकीच्या साधनांवर ताण टाकावा लागत नाहीं, अशीं राष्ट्रें इतरांपेक्षा जास्त सामर्थ्यवान ठरतात; आपल्या स्वतःच्या प्रभुत्वाखालील संपत्ती ज्यास एकवटतां येऊन लढाई करतां येतें, तें राष्ट्र बलवान ठरतें. ह्या दृष्टीनें अमेरिका, रशिया व जर्मनी ह्यांचा अनुक्रम सर्वांत वरती लागतो. ग्रेटब्रिटनचें सामर्थ्य ब्रिटिश साम्राज्याच्या एकीवर व अमेरिकेच्या मैत्रीवर अवलंबून आहे. जपान हें राष्ट्र आज सामर्थ्यवान झालें आहे, परंतु जर्मनीचा पराभव झाला तरी जर्मन राष्ट्र थोड्याच अवधींत पुनः प्रभावी होऊं शकेल तशी जपानची भौगोलिक परिस्थिति नाहीं. चीनचा दर्जा चालू युद्धांत बराच वाढलेला दिसतो, परंतु त्याचीं कारणें वेगळीं आहेत. संयुक्त राष्ट्रांपैकीं इतर कोणत्याहि राष्ट्रापेक्षा चीननें युद्धाचे आघात जास्त काळ सहन केलेले आहेत, ह्या दृष्टीनें व श्वेतेतर वर्णाच्या राष्ट्रांपैकीं एकादें राष्ट्र संयुक्त राष्ट्रांच्या पंक्तीस असणें आवश्यक आहे ह्या कल्पनेनें चीनला महत्त्व देण्यांत येत आहे. चीनला रशिया, ग्रेटब्रिटन, अमेरिका, इत्यादींची बरोबरी करतां येणार नाहीं. चीनला मिळालेला दर्जा हा त्यानें आपल्या गुणावर मिळविलेला नसून, इतर संयुक्त राष्ट्रांनीं तो चीनला बहाल केलेला आहे. सहाजिकच, युद्धोत्तर व्यवस्थेंत चीनवर इतर संयुक्त राष्ट्रांच्या बरोबरीची जबाबदारी टाकण्यांत येणार नाहीं. फ्रान्ससारखें राष्ट्र सध्या जरी दुय्यम दर्जाचें झालें असलें, तरी युद्धानंतर त्याचा प्रमुख राष्ट्रांत पुनः समावेश होण्याचा रंग दिसतो. मोठाल्या जागतिक परिषद्‌तून दुय्यम राष्ट्रांना प्रतिनिधित्व मिळालें, तरी प्रमुख राष्ट्रांकडेच पुढारीपण राहातें व महत्त्वाच्या मसुद्यांवर व करारावर सही करण्याची संधी मिळाल्यानें केवळ राष्ट्रांचा दर्जा वाढत नाहीं. किती ताकद, नित्याचे व्यवहार चालू ठेवूनहि, वृद्धीसाठी उपयोगांत आणतां येईल, ह्या गोष्टीवरच राष्ट्राचें अंतिम सामर्थ्य अवलंबून असतें. ह्या दृष्टीनें, हिंदुस्थानास आपला दर्जा वाढविण्यासाठी पुष्कळच प्रगति घडून आणली पाहिजे. दिलेला पोकळ मान व अंतिम सत्तेच्या बळावर मिळविलेला दर्जा ह्यांतील फरक फार महत्त्वाचा आहे.

सभांचा कायदा व कार्यपद्धति *

सभा चालविण्याचें कांहीं ठराविक शास्त्र असतें व विशिष्ट नियमानुसारच सभा चालवाव्या लागतात, परंतु त्यासंबंधांतील नियमांची माहिती फारच थोड्यांस असते. सभेंत भाग घेणाराला जसे कांहीं अधिकार असतात, त्याचप्रमाणें त्यावर कांहीं बंधनेंहि असतात. सभेचें स्वरूप, सभेचा प्रकार, तिचा प्रसंग, तिचा उद्देश, इत्यादींवर तिची कार्यपद्धति अवलंबून असते. शिष्टसंमत नियम कांहीं सभांस लागू पडतात, तर कांहीं सभांचे नियम कायद्यानें चालून दिलेले असतात. प्रस्तुत पुस्तक हें या विषयांवरील पहिलेंच पुस्तक असून त्यांत "विवेचन विभाग" व "नियम विभाग" असे दोन भाग आहेत. पहिल्या भागांत सभाशास्त्राच्या विस्ताराचें तात्विक विवेचन करण्यांत आलें आहे व दुसऱ्या भागांत ग्रामपंचायती, नगरपालिका, जिल्हा लोकलबोर्डे, सहकारसभा, इत्यादींच्या नियमांचे नमुने दिले आहेत. सभेचें काम कायदेशीर व यशस्वी रीतीनें पार पडणें हें केवळ नियमांनीं साध्य होत नाहीं; सभेंत भाग घेणाराच्या सहकार्यावर व सद्हेतूंवरच सभेचें खरें यश अवलंबून रहातें. तथापि, अनुभवांतीं व व्यावहारिक दृष्टीनें विचार करूनच नियम बसविलेले असतात. यासाठी त्या नियमांची व त्यांच्या पार्श्वभूमीची प्रत्येकास माहिती असणें आवश्यक आहे. सहकारी संस्था, जॉइंट स्टॉक कंपन्या, स्थानिक स्वराज्य संस्था, विविध मंडळें, या सर्वांच्या कामकाजाची माहिती त्यांत प्रत्यक्ष भाग घेण्यास प्रारंभ करण्यापूर्वीच प्रत्येकानें करून घेणें इष्ट असतें. प्रस्तुत पुस्तक सार्वजनिक व्यवसायांत पडणारांस उपयुक्त व मार्गदर्शक होईल. अत्यंत अवघड विषय सोपा करून सांगण्याचा पुस्तककर्त्याचा प्रयत्न फलदायी होवो.

ग्रेट ब्रिटनमधील बॉम्बहल्ल्यांचे बळी

ताजे आकडे

		जखमी	
१९४१—	मृत.	इस्पितळांत ठेवले	एकूण बळी
ऑक्टोबर	११८	२८३	४०१
नोव्हेंबर	११९	२३८	३५७
डिसेंबर	१०	४१	५१
१९४४—			
जानेवारी	१०७	२७०	३७७
फेब्रुवारी	९६१	१,७१२	२,६७३
सप्टें. १९३९ ते फे. १९४४ अखेर	५१,२८५	६१,९३४	१,१३,२१९

फेब्रुवारीमधील बॉंबहल्ल्यांत सांपडलेल्या लोकांच्या संख्येइतकी मोठी संख्या मे, १९४१ नंतर कोणत्याच महिन्यांत भरली नव्हती.

ऑक्सफर्ड विश्वविद्यालयांत रशियन

ऑक्सफर्ड विश्वविद्यालयानें रशियन भाषेसाठी एक स्वतंत्र शाला उघडण्याचें ठरविलें आहे.

---

*लेखक व प्रकाशक: श्री. शंकरराव जोशी, बी. ए., एल्एल. बी. अकील न्यायदीप मंदिर, बेळगांव पृ. १०५ किं. २ रु. ८ आ.

नागपूर हायकोर्टाचा महत्त्वाचा नवीन निर्णय

लहान गहाण-ऋणकोचा हक्क पुनः प्रस्थापित झाला.

शेतीवर अवलंबून असणाऱ्या लोकांच्या कर्जाचा भार हलका व्हावा म्हणून लवाद कायदा व रिलीफ कोर्टाचा कायदा मध्यप्रांत सरकारनें अंमलांत आणला. गहाणी कर्जाच्या या कायद्यानें किस्ती व्हाव्या हा उद्देश होताच, तथापि नागपूर हायकोर्टातील दाऊ बलवंतसिंग वि० विंदाचाई या दिवाणी रिव्हिजनमध्यें लहान गहाणावरून कच्ची डिक्री झाल्यावर ज्याला रिलीफ कायद्यांतील अर्थानें कर्ज म्हणतां येईल असें कर्ज जज्जमेंट डेटरवर शिल्लक रहातें काय, हा महत्त्वाचा प्रश्न होता.

लहान गहाणाचा व्यवहार ज्या दिवशीं झाला असेल त्याच दिवशीं गहाणी इस्टेटींतील ऋणकोचा हक्क तात्पुरता नष्ट होतो. त्या गहाणाची फेड करण्यासाठी जी मुदत ठरली असेल त्या मुदतींत ऋणकोनें जर कर्जाची फेड केली नाहीं तर त्याचा (ऋणकोचा) त्या (गहाणांतील) इस्टेटींतील हक्क कायमचा नष्ट होतो. ठरलेल्या मुदतींत ऋणकोनें गहाणाची फेड केली नाहीं व करार मोडला तरी कायदा असें म्हणतो कीं, त्याला गहाणी इस्टेट परत मिळविण्याची आणखी एक संधी देण्यांत यावी. कायद्यानें ऋणकोला दिलेल्या अशा प्रकारच्या सवलतीला 'कर्ज अथवा देणें' म्हणतां येत नाहीं. रिलीफ कायद्यांत 'कर्जा'ची जी व्याख्या देण्यांत आली आहे तिच्यांत गहाणी कर्जाचा समावेश करण्यांत आला आहे हें खरें आहे, परंतु गहाणावरून डिक्री होण्यापूर्वीची परिस्थिति व डिक्री झाल्यानंतरची परिस्थिती या दोहोंत फरक असतो. लहान गहाणावरून कच्ची डिक्री झाल्यानंतर त्याच्यावर कोणत्याही प्रकारचें 'कर्ज' अथवा 'देणें' शिल्लक रहात नसल्यामुळें त्या कर्जाचे बाबतींत ऋणकोनें दिलेला अर्ज स्वीकारण्याचाच मुळीं रिलीफ कोर्टाला जेथें अधिकार नाहीं तेथें दिवाणी कोर्टातील कारवाई थांबविण्याचा प्रश्नच उद्भवत नाहीं. असें म्हणून हायकोर्टानें रिव्हिजन मंजूर केलें.

लहान गहाणाचे दाव्यांत जर कच्ची डिक्री झाली असेल तर त्या बाबतींत रिलीफ कोर्टास कांहींच करतां येत नाहीं. ऋणकोचीं इस्टेट अर्थातच फायनल डिक्री झाल्याबरोबर सावकारास मिळावी असा याचा अर्थ झाला. रिलीफ कोर्टानें अशा डिक्रीच्या किस्ती केल्या तरी वरील निर्णयाचे आधारावर दिवाणी कोर्टानीं तिकडे दुर्लक्ष करून पक्की डिक्री (फायनल डिक्री) करून टाकली. अशा निकालावरून ज्यांनीं ज्यांनीं अपील केलें त्यांचेवरील संकट सुदैवानें टळण्याचा आतां योग प्राप्त झाला. हायकोर्टाचे फुलबेंचनें (तीन जज्ज) ता. १०-४-४४ रोजीं मागील दोन जज्जांनीं दिलेला निकाल चुकीचा आहे असा निर्णय दिला. या निर्णयामुळें असंख्य लोकांचें कल्याण होणार आहे, परंतु ज्या ज्या कर्जदारांनीं अपील न करतां फायनल डिक्री होऊं दिली, त्यांना मात्र या संधीचा फायदा मुळींच मिळणार नाहीं. त्यांना फायदा मिळावा याकरितां आतां वेगळा कायदाच करणें भाग पडेल.

मालेगांव कॅंप को. स्टोअर लि.

वरील संस्थेस जिल्हा कलेक्टरांनीं ता. १८ मार्च रोजीं भेट दिली. १ एप्रिलपासून रेशनिंगचें दुकान चालविण्यास स्टोअरला मिळालें आहे.

स्फुट विचार

शास्त्रीय संशोधन आणि प्रो. हिल

ब्रिटिश कॉमन्स सभेचे समासद् आणि इंग्लंडमधील रॉयल सोसायटीचे चिटनवीस प्रो. हिल, नुकतेच हिंदुस्थानांत प्रवास आणि शास्त्रीय संशोधनाच्या व्यवस्थेची चौकशी करून स्वदेशी परत गेले आहेत. आधुनिक भौतिक शास्त्रांच्या शिक्षणाची ह्या देशांत किती सोय आहे आणि तिचा किती विस्तार केला पाहिजे ह्याची पहाणी त्यांनी केली असून तिच्यावर आधारलेल्या आपल्या सूचना ते हिंदुस्थान सरकारास लवकरच सादर करणार आहेत. हिंदुस्थानांत असतांना त्यांनी ह्या देशाच्या अर्थविषयक व शास्त्रीय प्रगतीसंबंधानें स्वतःचे विचार व्यक्त केलेच होते आणि शास्त्रीय संशोधन व प्रयोग ह्यांची विस्तृत तरतूद करण्याची आवश्यकता त्यांनीं प्रतिपादली होती. हेच विचार त्यांनीं लंडनमध्यें रेडिओवर केलेल्या भाषणांत ब्रिटिश जनतेपुढें मांडले आहेत. हिंदुस्थान देश दरिद्री आहे ह्याविषयीं त्यांस शंका नाहीं. तथापि, येथील नैसर्गिक साधनसामुग्रीचा आधुनिक शास्त्रांच्या व यंत्रांच्या सहायानें उपयोग केला गेल्यास हें दारिद्र्य दूर करतां येण्यासारखें आहे असा त्यांस विश्वास वाटत आहे. हिंदुस्थानची वाढती लोकसंख्या, तिचें आरोग्य, अन्न व शेतीचा धंदा ह्यांचेसंबंधांतील प्रश्न सोडवण्यासाठी वहातुकीचीं विस्तृत साधनें, पाणीपुरवठा, सुधारलेलीं खतें, नवीन कारखानें, यंत्रें, विजेच्या प्रेरक शक्तीचा उपयोग, इत्यादि साधनांचें फार मोठें महत्व आहे असें प्रो. हिल म्हणतात. शास्त्रीय संशोधनाच्या व प्रयोगाच्या संस्था वाढवल्या पाहिजेत आणि त्यांत शास्त्रीय तज्ञ शिकवून तयार केले पाहिजेत असें ते म्हणतात. त्याचप्रमाणें आर्थिक संवर्धनाची योजना ह्या देशांत आखली जाऊन तिची शास्त्रीय पद्धतीनें अंमलबजावणी होण्याची आवश्यकताहि त्यांनीं प्रतिपादली आहे. हिंदुस्थानांतील लोकमतानें ह्या गोष्टींचा पुरस्कार आज कित्येक वर्षे चालवला आहे. प्रो. हिल ह्यांच्या सूचनांचा तरी योग्य तो परिणाम व्हावा अशीच येथें सर्वांची इच्छा आहे.

आर्थिक संवर्धनाच्या योजनेचें रहस्य

बंगालमधील दुष्काळाच्या आपत्तीचा दाखला देऊन प्रो. हिल ह्यांनीं वर निर्दिष्ट केलेल्या आपल्या भाषणांत हिंदुस्थानांत जनतेच्या रहाणीचें मान कोणत्या खालच्या थरास जाऊन पोहोंचलें आहे आणि त्याच्या संरक्षणाचीं साधनें किती कमकुवत आहेत ह्याचें चित्र रेखाटलें. दूर दृष्टीनें बनवलेली आर्थिक संवर्धनाची योजना, ती यशस्वी होण्यासाठी शास्त्रीय उपायांचा उपयोग, दीर्घ, प्रामाणिक परिश्रम व सार्वत्रिक सहकार्य ह्यांचा आश्रय घेतला गेला नाहीं तर ह्या देशाचा तरणोपाय नाहीं आणि बंगाली दुष्काळासारख्या आपत्तींची पुनरावृत्ति होण्याची निश्चित भीति आहे असें त्यांनीं म्हटलें आहे. बंगालमधला दुष्काळ हा राजकीय मतभेद व भांडणें ह्यांचे योगानें बळावला अशा मताचा सूर त्यांच्या भाषणांतून निघतो. आर्थिक उन्नतीच्या प्रयत्नांस मनोभावें करून स्वतःस वाहून घेण्याऐवजीं लोक राजकीय चळवळीकडे अधिक लक्ष पुरवतात असें प्रो. हिल ह्यांस आढळून आलें असावें असें दिसतें आणि ही परिस्थिति ह्या देशाच्या दारिद्र्यनिवारणाच्या मार्गातली मोठी धोंड आहे असें त्यांचें मत झालें असावें असें वाटतें. आर्थिक प्रगतीचा प्रश्न वादविवादातीत असला पाहिजे ह्यांत संशय नाहीं आणि राजकीय स्वरूपाच्या मतभेदांचा अडथळा तो सोडवण्याच्या आड येतां कामा नये ही गोष्ट सर्व राजकीय पक्षांच्या मनावर बिंबली गेली पाहिजे. तथापि शास्त्रीय सुधारणा व यांत्रिक प्रगति ह्यांचा उपयोग देशाच्या आर्थिक उन्नतीस होण्यास जनतेच्या प्रतिनिधींच्या हातांत राजकीय सत्ता असणें अगत्याचें आहे हें विसरून चालावयाचें नाहीं. आर्थिक संवर्धनाचें कार्य हिंदी लोकांनीं हातीं घ्यावें आणि त्यास ब्रिटिश राष्ट्रानें सहाय करावें अशी इच्छा प्रो. हिल ह्यांनीं व्यक्त केली आहे. प्रमुख हिंदी मंत्र्यांनीं अभिवृद्धीची योजना प्रसिद्ध केलीच आहे. राष्ट्रीय मध्यवर्ती सरकारनें ती हातीं घ्यावी असें त्यांनीं सुचवलें आहे त्याचें रहस्य स्पष्ट आहे.

साम्राज्य मुख्य प्रधानांची परिषद्

ब्रिटिश साम्राज्यांतील राष्ट्रांच्या मुख्य प्रधानांची परिषद् लंडनमध्यें चालू झाली आहे. जर्मनी व जपान ह्यांच्या आक्रमक शक्तीचा नाश करून जगांत स्वातंत्र्य, समता व शांतता ह्यांची स्थापना व्हावी हें उद्दिष्ट स्वतःपुढें ठेवून मित्रराष्ट्रें स्वार्थत्यागपूर्वक लढा आज लढत आहेत. ह्या घोर संग्रामांत अमेरिका आणि रशिया ह्यांच्या बरोबरीनें व त्यांच्या इतक्याच अहेनें ब्रिटिश साम्राज्यांतर्गत राष्ट्रें युद्धाचा पिच्छा पुरवीत आहेत. युरोपांत व एशिया खंडांत चाललेल्या मोहिमांत त्यांच्या लढाऊ धोरणाचे व परस्पर सहायाचे अनेक अवघड प्रश्न उपस्थित झाले आहेत आणि होणार आहेत. त्यांची चर्चा करून एकसूत्री कार्यक्रम बनवणें आणि त्याची परिणामकारक अंमलबजावणी होण्याची व्यवस्था करणें हा साम्राज्य परिषदेचा पहिला हेतु आहे. युद्धोत्तर पुनर्घटनेचा आराखडा तयार करणें आणि त्या संबंधांत सर्वसंमत अशी योजना आखणें हा तिचा दुसरा उद्देश आहे. युद्ध समाप्तीनंतर जगांतील राष्ट्रांचे परस्पर संबंध कसे रहातील आणि त्यांमध्यें ब्रिटिश साम्राज्यांतर्गत राष्ट्रांचें स्थान कसें राहील ह्याविषयीं बरीच चर्चा झाली आहे. कांहीं झालें तरी ब्रिटिश साम्राज्याची घडण कायम राहील आणि त्यांतील देशांचे परस्पर संबंध आपुलकीचे व सहकार्याचे रहातील असा विश्वास मि. चर्चिल ह्यांनीं अनेक वेळां स्पष्टपणानें व्यक्त केला आहे. साम्राज्य परिषदेंत हिंदुस्थानच्या प्रतिनिधींनीं मांडलें जाईल आणि आवश्यक दिसेल त्या प्रसंगी चर्चेत भाग घेण्याची मुभा त्यांस मिळणार आहे. तथापि, कॅनडा, दक्षिण आफ्रिका व ऑस्ट्रेलिया ह्यांच्या मुख्य प्रधानांच्या बरोबरीचें स्थान परिषदेंत त्यांस नाहीं हें उघड आहे. शत्रुपराभवासाठी हिंदुस्थान पराकाष्टा करीत आहे व करील असें आश्वासन त्यांनीं दिलें असून युद्धोत्तर काळांत ह्या देशास साम्राज्यांत मानाची स्वतंत्र जागा मिळेल अशी आशा व्यक्त केली आहे.

सरकारी रोख्यांसंबंधीच्या कायद्यांत सुधारणा

सरकारी रोखे इतके दिवस मुख्यतः ब्रॉमिसरी नोटांचे स्वरूपांतच असत. स्टॉक सर्टिफिकेटें (ज्यांत मालकी हक्क नमूद केलेले असतात परंतु मालकीची वर्गावर्गी पब्लिक डेट ऑफिसमध्यें नोंदावी लागते) हीं आतांच विशेष प्रचारांत आलीं आहेत.

निगोशिएबल इन्स्ट्रुमेंटस बाबत कायदा वेळोवेळ सुधारण्यांत आला, त्या प्रसंगी सरकारी प्रॉमिसरी नोटांबाबत अडचणी दूर करण्दाचाच फक्त विचार झाला; इतर सरकारी रोख्यांकडे दुर्लक्ष येईल नाहीं. १९२० च्या इंडियन सिक्युरिटीज ॲक्टमध्यें सरकारी प्रॉमिसरी नोटा व इतर सरकारी रोखे ह्यांतील फरकाचा नीट विचार झाला नाहीं. उदाहरणार्थ, १३ व्या कलमांत बांधे मिटविण्याची व्यवस्था सांगितली आहे, ती फक्त सरकारी प्रॉमिसरी नोटांपुरतीच आहे. अशाच प्रकारचे कित्येक दोष त्या कायद्यांत राहून गेलेले आहेत. ह्या कायद्याची जागा घेणारें एक बिल मध्यवर्ती असेंब्लींत सरकारनें मांडलेलें आहे परंतु हें बिल फक्त मध्यवर्ती सरकारच्या रोख्यांसच लागू पडणारें आहे; १९२० चा कायदा प्रांतिक सरकारच्या रोख्यांसहि लागू होता. ह्या बिलाचें कायद्यांत रूपांतर झालें, म्हणजे प्रांतिक सरकारांच्या रोख्यांस १९२० चा कायदा लागू व मध्यवर्ती सरकारच्या रोख्यांस नवा कायदा लागू, असा प्रकार होणार आहे. सर्व प्रांतिक सरकारांनीं नव्या बिलाप्रमाणेंच स्वतः बिलें पास केलीं, तर ही अवस्था येणार नाहीं.

श्री. प्राणलाल ह्यांच्या सूचना

इंडियन मर्चंटस चेंबरच्या कमिटीची एक औपचारिक सभा नुकतीच भरली होती, तिला रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर, सर चिंतामणराव देशमुख हे उपस्थित होते. त्या प्रसंगीं चेंबरचे अध्यक्ष, श्री. प्राणलाल देवकरण नानजी, ह्यांनीं सरकारी रोख्यासंबंधींच्या नियोजित कायद्याचा उल्लेख केला. रोख्यावरील व्याज व रोख्याचें मुद्दल देणें असेल, त्या तारखेपासून सहा वर्षांत त्याची मागणी केली नाहीं, तर तें देण्याची जबाबदारी सरकारवर नाहीं, असें एक कलम नियोजित कायद्यांत आहे, तिला प्राणलाल ह्यांनीं विरोध केला. जुनी प्रॉमिसरी नोट रिन्यू करून घेतली म्हणजे नवी नोट धारण करणारास जुन्या नोटेवरील शेऱ्यांबद्दल चौकशी करण्याचें कारण नाहीं; सरकारनें प्रॉ. नोट रिन्यू करून दिल्यानें जुन्या प्रॉ. नोटेंतील शेऱ्यांमधील दोष नाहींसे होतात, अशी कित्येक वर्षांची जुनी समजूत आहे, ती प्रिव्ही कौन्सिलच्या एका निकालानें निकालांत काढली. जुन्या सरकारी प्रॉ. नोटेवरील शेऱ्यांमधील कांहीं चुकीमुळें प्रॉ. नोट रिन्यू करून देण्यांत सरकारास कांहीं नुकसान आलें तर जुन्या प्रॉ. नोटेवरील शेवटच्या सहीदाराकडून तें भरून घेण्याचा अधिकार सरकारास आहे, असा त्या निवाड्याचा अर्थ आहे ह्या निवाड्यामुळें थोडी अनिश्चितता निर्माण झाली आहे ती दूर करावी; निदान रिन्यू केलेल्या प्रॉ. नोटांचे बाबत पूर्ण कायदेशीर जबाबदारी सरकार घेण्यास तयार नसेल, तर सरकारनें कांहीं काळाची मुदत ठरवून, त्या मुदतीनंतर कोणत्याहि शेऱ्याच्या संबंधांत तक्रार चालणार नाहीं, असें जाहीर करावें, अशी श्री. प्राणलाल ह्यांची सूचना आहे. सरकारी रोख्यांमध्यें ट्रस्टी, गार्डियन, धर्मादाय संस्था, सार्वजनिक संस्था, इत्यादींस मोठ्या प्रमाणावर पैसे गुंतवावे लागतात, त्यांचा वरील सूचनांस निश्चित पाठिंबा मिळेल.

शेअर बाजार

(श्री. ब. वि. लोणकर, एम्. ए., बी. कॉम)

मागील आठवड्यांत भावांत कांहींच फेरफार नसून बाजार सुस्त आहे. कोहीमा संकटांत असल्यानें टाटा डिफर्ड २१४५ वरून २०९० पर्यंत व ऑर्डिनरी ४१४ वरून ४०४ पर्यंत नरमले आहेत. इकडे महात्मा गांधींची सुटका झाल्यानें जरी बाजारानें निश्वास टाकला असला तरी त्यांच्या प्रकृतीची छाया राहणार असल्यानें बाजारांत कामकाज विशेष होईल असें वाटत नाहीं.

साडेतीन टक्का कागद ९८।३ पर्यंत पुन्हा खालीं आला असून कायम गुंतविणारास पुन्हा घेण्यास एक संधि आली आहे व जर तो आणखी खाली गेला तर पैसेवाल्यांनीं बेधडक खरेदी करावीं. सरकारनें कमीत कमी किंमत ९४ ठरविली असल्यानें त्यांत धोक्याची मर्यादा किती आहे हें अज्ञ माणसास सुद्धां समजेल.

नेहमीच नागपूर कोहिनूर घेऊन कंटाळलेल्या मंडळींना ब्रिटिश सिलॉन कॉर्पोरेशन आकर्षक वाटेल यांत संशय नाहीं. ही कंपनी सिलोनमध्यें असून तिचे खोबऱ्याच्या तेलाचे, साबणाचे व काथ्याचे कारखाने आणि खुद्द खोबऱ्याचा फार मोठा व्यापार आहे व सर्व माल ब्रिटिश सरकारकडून मार्गालप्रमाणें ठराविक किंमतीस घेतला जात आहे. दोन वर्षें कंपनीनें ३२ टक्के करमाफ व्याज दिलें आहे. मूळ शेअर रु. ७॥ चा असून आज बाजारभाव १९, १९॥ पर्यंत आठ टक्के सव्याज आहे. कंपनीचें भांडवल ३० लाखांवर असून गंगाजळी ९ लाखांवर आहे. चालू भावांत घेणाराला १०-११ टक्के व्याज सुटेल.

ज्यांना आपले पैसे बिनव्याजी ठेवण्याची ऐपत असेल त्यांना युनायटेड कमर्शियल बँकेचे शेअर्स विशेष सांगण्यासारखे आहेत. ही बँक मागच्या वर्षी बिर्ला शेटजी, डहाणूकर, टापुरिया, गोएन्का, इस्पहानी इत्यादी श्रेष्ठींनीं काढलेली असून सुरवातीसच तिचे एक कोट भरपाई भांडवल जमलें. तिचा नुकताच प्रथम अहवाल आला असून नफा चार लाख व ठेवी बारा कोटी आहेत असें दिसून येतें. प्रथम वर्षांत ही आश्चर्यकारक प्रगति आहे. मात्र व्याज वाटण्यांत आलेले नसून प्राथमिक खर्च ताळेबंदांतून पुसून टाकण्याकडे नफ्याचा विनियोग होणार आहे. ही बँक पुढील दहावीस वर्षांत अत्यंत प्रबळ झाल्यासेरीज राहणार नाहीं असें वाटतें. आज ५० रु. भरलेल्या शेअरची किंमत ७८-७९ आहे.

बंगालमध्यें शेतीच्या उत्पन्नावर कर

वार्षिक ३५०० रुपयांवरील शेतीच्या उत्पन्नावर कर बसविणारें बिल बंगाल असेंब्लीनें मंजूर केलें आहे.

दक्षिण आफ्रिकेंत वर्णभेद

साधारणतः युरोपियनांच्या डब्यांत प्रवास करण्यास व जेवणाच्या डब्यांत जेवण्यास हिंदी लोकांना परवानगी नाहीं, असें द. आफ्रिकेच्या असेंब्लींत दहातुकमंड्यांनीं सांगितलें. कांहीं हिंदी लष्करी अधिकाऱ्यांचे संबंधांत नुकताच अपवाद केला होता

पोस्ट व तार खात्याचें वाढतें काम

हिंदी पोस्ट व तार खात्याचा १९४२-४३ चा ताजा अहवाल प्रसिद्ध झाला आहे, त्यावरून खात्याच्या कामांत झालेली प्रचंड वाढ लक्षांत येते. मनिऑर्डरींची संख्या ३० लाखांनीं वाढून ती ५ कोटि, १० लक्ष झाली. तारांची संख्या १५ लाखांनीं वाढली, ती २ कोटि, ४० लक्ष भरली. ट्रंक टेलिफोन कॉल्सची संख्या ३ कोटि, २० लाखांची ३ कोटि, ७० लक्षावर गेली. मुंबई, कलकत्ता, मद्रास, कराची व अहमदाबाद येथील टेलिफोन कंपन्या आतां सरकारनें विकत घेतल्या असल्याकारणानें हिंदुस्थानांतील सर्व टेलिफोन सरकारी व्यवस्थेखाली आहेत. प्रयोगास्तव चालू केलेल्या पोस्ट ऑफिसांपैकीं १९१ (शहरांत २७ व खेडेगांवांत १६४) कायम करण्यांत आलीं, ४९ (शहरांत १२ व खेडेगांवांत ३७) बंद केलीं गेलीं व ६६१ (शहरांत १३४ व खेड्यांत ५२१) पोस्ट ऑफिसांचा प्रयोग चालू ठेवण्यांत आला.

खात्याचें दंगलींत नुकसान

१९४२ मधील दंगलींत ६० पोस्ट व तार ऑफिसें पूर्णपणें नाश पावलीं व २७० कचेऱ्यांचें मनस्वी नुकसान झालें. १२ हजार वेळां तारा तोडण्यांत आल्या. या सर्व प्रकारांमुळें खात्याचें ३½ लक्ष रुपयांचें नुकसान झालें.

बिनपत्त्याचीं पत्रें

डेडलेटर ऑफिसांत ८५ लक्ष पत्रांची चौकशी करण्यांत आली. लोक पोस्टांत पत्रें टाकतात, त्यांपैकीं प्रत्येक १०,००० पत्रांतील ५ पत्रांवर पत्ता लिहिलेला नसतो. दररोज सरासरीनें बिनपत्त्याचीं २२४ पत्रें ठिकठिकाणच्या पोस्टाच्या पेट्यांत सांपडतात.

फेडरल कोर्टाच्या कामकाजावर सर जॉन बोमंट ह्यांचा अभिप्राय

संयुक्त राज्यघटनेंत मध्यवर्ती सरकार, प्रांतिक सरकारें व देशी संस्थानें ह्यांचेमधील संबंध फेडरल घटनेंत समाविष्ट केलेले असतात व त्याविषयीं बाधा उपस्थित झाल्यास निर्णय देण्यासाठी म्हणजे घटनेचें रक्षण करण्यासाठीं फेडरल कोर्टाची आवश्यकता असते. १९३५ च्या हिंदी घटना कायद्यानें अशा प्रकारच्या फेडरल कोर्टाच्या स्थापनेची तरतूद केली व त्याप्रमाणें तें १९३७ मध्यें अस्तित्वांत आलें व त्यास अखिल भारतीय अपील कोर्टाचाहि दर्जा देण्यांत आला. तथापि, हिंदी फेडरल राज्यघटना तयार झाली, तरी फेडरेशन अस्तित्वांत आलें नाहीं. फेडरल कोर्ट मात्र स्थापन होऊन त्याच्या कामास प्रारंभ झाला. मुंबई हायकोर्टाचे माजी सर न्यायाधीश सर जॉन बोमंट ह्यांनीं आपल्या लंडनमधील भाषणांत ह्या प्रश्नाचा उल्लेख केला. फेडरल कोर्टावर दरसाल होणारा सुमारें ४ लक्ष रुपयांचा खर्च ही केवळ एक चैनीची बाब आहे, असें ते म्हणाले. १९३७ सालापासूनचें त्या कोर्टाचें काम पाहिलें, तर त्याच्या न्यायाधीशांना वर्षातून सरासरीनें तीन-चार आठवडे सुद्धां काम पडत नाहीं. फेडरल कोर्टाकडे येणारीं अपिलें प्रिव्ही कौन्सिलकडे येणेंच युक्त होईल, असेंहि त्यांनीं सांगितलें. अपिलासाठी स्वतंत्र अखिल भारतीय अपील कोर्ट पुढेमागें स्थापन करण्यांत येईलच, असें ते म्हणाले व सध्याच्या फेडरल कोर्टाच्या न्यायाधीशांची फुरसत कमी करण्यासाठी त्या कोर्टाकडील काम वाढविण्याची आवश्यकता त्यांनीं प्रतिपादन केली.

महाराष्ट्रांत लेखी गॅरंटी देणारे
पहिले व फक्त १ च
गोल्ड मेडॅलिस्ट् व मराठी वळणाचे स्पेशॅलिस्ट्
पेन्टर बेडेकर, ए. जी.,
बुधवार चौक, पुणें २ (सिटी)
बाहेरगांवचीं कामें रेल्वे, मोटार अगर पोस्टानें पाठवूं.

प्रगतिपथावरील नवा
मै ला चा — द ग ड
सन १९४३ अखेर
नव्या कामांत ११० टक्के वाढ
चालू कामांत १०० टक्के वाढ
आयुर्विमानिधींत ८० टक्के वाढ
— आपला विमा किंवा एजन्सी आजच घ्या —
दि औंध म्यूच्युअल लाइफ ॲश्युरन्स सोसायटी लि., पुणें.
आर. जी. साठे, सुपरिंटेंडेंट — व्ही. जी. जोशी, मॅनेजिंग डायरेक्टर

रक्तवर्धक प्रमाणेंच लोकप्रिय
दोन उपयुक्त औषधें.
ओजस पौष्टिक पेयान्न
आबाल वृद्ध स्त्रीपुरुषांस उपयुक्त
मुलांचे करितां **ॲंटी ग्राइप मिक्श्चर**
दांत सुलभतेनें येण्यावर व मुलांचे अपचनाचे विकारावर
केंद्रें:-मुंबई, पुणें, नागपूर, अमरावती, सांगली, कोल्हापूर, हुबळी.
पुणें मुख्य दुकान:—गणपती चौक, लक्ष्मीरोड पुणें.
आ यु र्वे द र स शा ळा
पुणें लि० पुणें ४.

पुना गेस्ट हाऊस

१००, लक्ष्मी रोड, पुणें २.

Telephone 779

GUEST HOUSE

TELEGRAM Guest House Poona 2.

स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

गिरगांव मुंबई नं. ४

महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

★ नगर वाँवे ट्रेडिंग कंपनी ★

चिनाब, लाइम ज्यूस कॉर्डीअल, ऑरेंज व लेमन स्क्वॉश, टोमॅटो सॉस मँगो जॅम, मध, कोको, बेकिंग पावडर, सॅनिटरी टॉवेलस्, टुथ पेस्ट, टुथ ब्रश, वगैरे मालाचे स्टॉकिस्ट.

शाखाः— माणिक चौक, अहमदनगर

हेड ऑफिसः— पूना गेस्ट हाऊस, पुणें २

न्यू इंडिया इंडस्ट्रीज लि.

(Approved Re-traders and Approved Contractors)

२६ लॅमिंग्टन नॉर्थ, मुंबई ११.

अध्यक्षः—श्री. ग. स. मराठे, ॲक्चुअरी.

महाराष्ट्रांतील रबराचा प्रमुख कारखाना

★ गिरणीचे रोलर्स ★ रबरी हातमोजे ★ छापखान्यांचे रोलर्स
★ रीमोल्ड टायर्स ★ रबरी वॉशर्स ★ सॉलिड व्हील्स

व इतर रबरी माल तयार होतो.

पु. ग. मराठे
मॅनेजिंग डायरेक्टर.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२७।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3474

जाहिरातींचे दर,
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाविलास' पुणें ४.

अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
(टपाल खर्चासह)
किरकोळ अंकास
दोन आणे.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति। —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष १० पुणें, बुधवार, तारीख १७ मे, १९४४ अंक २०

★ नगर बॉंबे ट्रेडिंग कंपनी ★

फिनाइल, लाइम ज्यूस कॉर्डीअल, ऑरेंज व लेमन स्क्वॉश, टोमॅटो सॉस
झिंगो जॅम, मध, कोको, बेकिंग पावडर, सॅनिटरी टॅबिलस्,
टुथ पेस्ट, टुथ ब्रश, वगैरे मालाचे
स्टॉकिस्ट.

शाखा:— ★ हेड ऑफिसः—
माणिक चौक, अहमदनगर पूना गेस्ट हाऊस, पुणें २

दि बँक ऑफ इंडिया लि.

[स्थापना : १९०६]

अधिकृत भांडवल ... ... रु. २,००,००,०००
वसूल झालेलें भांडवल ... ... रु. १,००,००,०००
गिअर्ड फंड ... ... रु. १,२३,००,०००

मुख्य कचेरी: ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

मुंबईमधील शाखा : बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

इतर शाखा : अहमदाबाद (भद्र, मुख्य ऑफिस), अहमदाबाद (एलिस ब्रिज शाखा), अहमदाबाद (स्टेशन शाखा), अमृतसर, अंधेरी (मुंबई शेजारी), बांद्रे (मुंबई शेजारी), कलकत्ता (क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्क्वेअर), जमशेदपूर कराची, नागपूर (किंग्जवे), नागपूर (इतवारी बझार), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत, भुज (कच्छ).

लंडन एजन्ट्स : वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

डायरेक्टर्स : सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस. आय. (अध्यक्ष), श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के. नाईट; मि. ए. गेडिस; सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, जी. बी. ई., के. सी. आय. ई., मि. दिनशा के. दाजी; श्री. रामनिवास रामनारायण.

करंट डिपॉझिट अकाउंट्स :

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दराने व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षां कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

बिल्स व सेटलमेंट्समार्फत बँक एक्सचेंज व ट्रस्टी म्हणून काम करते, सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अजमावून मागवावेत.

एजंट—एच्. ए. करीममाई

पुण्यांतील
आदर्श निवासस्थान व भोजनालय
छाया लॉजिंग व बोर्डिंग हाउस
बुधवार चौक, पुणें २.

दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.

हेड ऑफिस : पुणें शहर.
स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.
मुंबई शाखा : दलाल स्ट्रीट, फोर्ट.
जळगांव शाखा : नवी पेठ, मेन रोड.
नागपूर शाखा : गोखले बिल्डिंग, सिताबर्डी.

भांडवल

अधिकृत व विकीस काढलेलें	खपलेलें	वसूल झालेलें
रु. १०,००,०००	रु. १०,००,०००	रु. ५,००,०००

एकूण सेव्हतें भांडवल रु. ७४,००,०००

बँकेच्या शेअरवर डिसेंबर १९४३ अखेर ४½% करमाफ डिविडंड दिलें गेलें. बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदी-विक्री कमीशनेंकरून दिली जाते.

बँकेनें रु. ५ प्रीमिअमनें काढलेले सर्व शेअर्स विकले गेले. विशेष माहितीसाठी भेटा अगर लिहा.

सी. व्ही. जोग,
B. Com., C. A. I. B., C. A. L I. B.
मॅनेजर

विविध माहिती

युरोपची लूट

फ्रान्स, बेल्जम, हॉलंड, डेन्मार्क, नॉर्वे, झेकोस्लोव्हाकिया, सर्बिया इत्यादि देशांची लूट करून जर्मनीनें त्यांचें सुमारें ८० अब्ज रुपयांचें नुकसान केलें आहे, अशी माहिती मि. डिंगल फूट ह्यांनी ब्रिटिश कॉमन्स सभेत सांगितली.

सारख्या कामास सारखें वेतन

एकच काम करणाऱ्या स्त्रियांस व पुरुषांस सारखेंच वेतन मिळावें किंवा काय, ह्या प्रश्नाचा विचार करण्यासाठी ब्रिटिश सरकारनें एक बादशाही कमिशन नेमलें आहे.

हिंदी शास्त्रज्ञांची इंग्लंडला भेट रद्द

कांहीं प्रमुख हिंदी शास्त्रज्ञांस भेट ब्रिटनमध्यें जाण्याचें निमंत्रण करण्यांत आलें होतें, परंतु वहातुकीच्या अडचणींस्तव त्यांचें जाणें तूर्त स्थगित करण्यांत आलें आहे.

सक्कर धरणाच्या कर्जाची फेड

सिंध सरकारास मध्यवर्ती सरकारकडून कांहीं रक्कम दरसाल मिळत असते, त्याची व सिंध सरकारचें सक्करच्या धरणाबाबत कर्ज ह्यांची बजावट करून, ५ कोटि ७० लक्ष रुपये एका रकमेनें सिंधनें मध्यवर्ती सरकारास दिलेतर ते मध्यवर्ती सरकार स्वीकारण्यास तयार आहे.

दहा दिवस पोस्ट पार्सलें बंद

ता. १५ मे पासून पुढें दहा दिवस हिंदुस्थानांत कोठेंहि पाठविण्याचें पार्सल मुंबई, पुणें, अहमदाबाद, सुरत, बडोदें व नवसारी ह्यांतील कोणत्याहि पोस्टांत स्वीकारलें जाणार नाहीं. सरकारी, लष्करांतील लोकांस धाडलेलीं व औषधाचीं पार्सलें ह्यांस वरील तहकुबी लागू नाहीं.

धोकादायक इमारती पाडण्याचें काम

मुंबई शहरांतील स्फोटामुळें अर्धवट नाश पावलेल्या धोक्याच्या इमारती पाडून टाकण्याचें काम चालू आहे. सुमारें एक हजार लोक ह्या कामांत गुंतले आहेत.

अमेरिकेस लागणाऱ्या पेट्रोलची तरतूद

युद्धसमाप्तीनंतर अमेरिकेस पेट्रोलचा मुबलक पुरवठा व्हावा, ह्या दृष्टीनें अमेरिकेंत पेट्रोलचें उत्पादन वाढविण्याचा कसून प्रयत्न करणें, पेट्रोलचा वापर अधिक कार्यक्षम रीतीनें करणें, परदेशांतील पेट्रोल मिळविण्याबद्दल निर्धास्त रहातां येईल असें आश्वासन मिळविणें व जगभर महत्त्वाच्या केंद्रांतून तातडीच्या वेळीं उपयोगी पडतील असे साठे तयार ठेवणें, अशी उपाययोजना अमेरिकेचें पेट्रोल ॲडमिनिस्ट्रेटर ह्यांनी सुचविली आहे.

मिसेस विन्गेट ह्यांस पुत्र

ब्रह्मदेशांत जपान्यांचे पिछाडीस विमानमार्गें उतरणाऱ्या तुकडीचा पाडसी नायक, मेजर जनरल विन्गेट, हे मार्च १९४४ मध्यें विमानाच्या अपघातांत ब्रह्मदेशांत मरण पावले. त्यांची पत्नी बाळंत होऊन तिला नुकतीच पुत्रप्राप्ति झाली आहे.

मुंबई-अहमदाबाद रस्ता

मुंबई व अहमदाबाद ह्यांस जोडणाऱ्या रस्त्यापैकीं मुंबई ते अंकलेश्वर ह्या रस्त्यावर वहातुक सुरू आहे. हाच रस्ता पुढें रजपुतान्यांतून जाऊन दिल्ली गांठणार आहे.

लष्करी वाहनांची विल्हेवाट

हजारों लष्करी वाहनें लष्करी कामास निरुपयोगी होतील, त्यांची विल्हेवाट लावण्याच्या संबंधांत हिंदुस्थान सरकारचे सप्लाय मेंबर, सर ए. रामस्वामी मुदलियार, हे हितसंबंधी लोकांचा सल्ला घेत आहेत. लवकरच २० हजार वाहनें उपलब्ध होतील व कालांतरानें लक्षावधि वहानें निकालांत काढावीं लागतील. हीं वाहनें लागलीच वहातुकीस उपयोगी पडूं शकतील, अशी खात्री नाहीं. त्याचप्रमाणें, ह्या वाहनांना पेट्रोल, घांवा, वगैरेचा पुरवठा करण्याचाहि प्रश्न उपस्थित होईल.

चेक्सची देवघेव

५ मे, १९४४ अखेर संपलेल्या आठवड्यांत मुंबई बँकर्स क्लिअरिंग हाऊसमध्यें ४२ कोटि, ५८ लक्ष रुपये किंमतीच्या १,४०,२६३ चेक्सची देवघेव झाली.

एका वर्षांत १,२७,००० विमानांचें उत्पादन

गेल्या वर्षी अमेरिका व ब्रिटिश साम्राज्य ह्यांत मिळून १,२७,००० विमानांचें उत्पादन झालें.

बोरगांव अपघातांतील आरोपींची शिक्षा रद्द

अकोल्याजवळ बोरगांव येथें ३ जून, १९४३ रोजीं मुंबई मेलला अपघात होऊन त्यांत १०० उतारू मरण पावले व २०० उतारू जखमी झाले. अकोल्याचा अ. स्टेशन मास्तर, गाडीचा ड्रायव्हर व गार्ड ह्यांवर खटला करण्यांत येऊन त्यांस शिक्षा झाली. त्यावर त्यांनीं नागपूर हायकोर्टाकडे अपील केलें. गव्हर्मेंट ऑफ इंडिया कायद्याच्या २७० व्या कलमाप्रमाणें आरोपी हे सरकारी नोकर असल्याकारणानें, त्यांवर खटला भरण्यापूर्वी गव्हर्नर जनरलची परवानगी अगाऊ घ्यावयास हवी होती, ती घेतली नाहीं, ह्या मुद्यावर हायकोर्टानें आरोपींची शिक्षा रद्द केली.

तुंगभद्रा नदीच्या पाण्याची वाटणी

तुंगभद्रा नदीवर धरण बांधण्याची योजना मद्रास सरकारनें १९३० सालीं तयार केली. ह्या धरणाच्या पाण्याच्या वाटणीसंबंधीं मद्रास व म्हैसूर सरकारांत वांधा उपस्थित झाला व १४ वर्षांनीं तो आतां मिटला आहे. पाण्याच्या वाटणीसंबंधीं दोन्ही सरकारांच्या प्रतिनिधींचें एकमत झालें आहे. नियोजित धरणास २० कोटि रुपये खर्च येईल. धरणांतील पाण्याच्या साठ्याची बरोबरी जगांतील कोणत्याहि धरणाच्या पाण्याचा साठा करूं शकणार नाहीं. तुंगा आणि भद्रा हे दोन लहान प्रवाह मिळून तुंगभद्रा नदी झाली आहे व ती कृष्णा नदीस मिळते. तुंगभद्रा ही म्हैसूर व मुंबई प्रांताची सरहद्द असून पुढें मुंबई व मद्रासची हद्द आहे.

कपाशीच्या उत्पादनांत वाढ

हिंदी कपाशीच्या १९४३-४४ मधील उत्पादनांत ८% वाढ होऊन तें ५०,७८,००० गांठी होईल, असा अंदाज आहे.

अनुक्रमणिका

	पृष्ठ		पृष्ठ
१ विविध माहिती	... १५४	महात्मा गांधींची मुक्तता—ब्रि. औद्योगिक धोरणाचें अनुकरण—सुवर्ण परिमाणाची इतिश्री-ब्रिटिश आणि अमेरिकन चलन—चीनमधील चलनाची दुर्दशा	
२ बिर्ला शेटजींची औद्योगिक धोरणावर टीका	... १५५		
३ आयुर्विमा कंपन्या व... व्याजाचे दर	... १५६	७ शेडयूल्ड बँकांच्या शाखांत वाढ	... १५९
४ हिंदी आर्थिक परिस्थिति	१५६	८ जननसंख्या कशी वाढेल !	१५९
५ इंग्लंडमध्येंहि दिव्यांची चोरी	... १५६		
६ स्फुट विचार	... १५७		

अर्थ

बुधवार, ता. १७ मे, १९४४

बिर्ला शेटजींची सरकारी औद्योगिक धोरणावर टीका

मूलग्राही स्वरूपाचे आणि मोठ्या प्रमाणावर चालणारे कारखाने व धंदे हिंदुस्थानांत स्थापन झाल्यावांचून ह्या देशाची आर्थिक उन्नति शक्य नाहीं ह्याविषयीं आतां दुमत नाहीं. असे नवे धंदे निघण्यास युद्ध परिस्थिति अनेकवेळां कारणीभूत होत असते असा अनुभव आहे. जरूरीच्या वस्तू नेहमीप्रमाणें परदेशांतून येणें बंद होणें आणि युद्धोपयोगी सामुग्री तयार करण्याची निकड भासणें हीं कारणें अशा प्रकारच्या औद्योगिक प्रगतीस परिपोषक होत असतात. पूर्व एशियांत जपानच्या विरुद्ध होणाऱ्या संग्रामांत हिंदुस्थान हें अत्यंत सोयीचें असें लढाऊ साधनांच्या पुरवठ्याचे केंद्र बनवलें जाणें स्वाभाविक होतें. इंग्लंड व अमेरिका ह्या देशांतून इकडे येणाऱ्या मालाच्या मार्गांत वहातुकीच्या अडचणी शत्रूनें निर्माण केल्या होत्या, त्यामुळेंहि औद्योगिक उत्पादनाचे दृष्टीनें विशेष महत्त्व प्राप्त झालें, तथापि मोठ्या कारखान्यांच्या दृष्टीनें हा देश अत्यंत मागसलेला आहे. रसायनें, इंजिनें, यंत्रें, मोटारी, जहाजें, विमानें असल्या जातींचा लढाऊ उपयोगाचा माल येथें बनवला जाण्यासारखी परिस्थिति नव्हती. ब्रिटिश आणि अमेरिकन सरकारांनीं ह्या गोष्टींचा विचार करून हिंदुस्थानास मोठ्या प्रमाणावर उत्पादनक्षम करण्याविषयींच्या योजनांची तज्ञांकडून छाननी करवली. रोजर मिशन आणि ग्रँडी मिशन हीं तज्ञांची मंडळी हिंदुस्थानांत येऊन चौकशी करून स्वदेशी परत गेली. त्यांनीं स्वतःचा अभिप्राय आपापल्या सरकारांस निवेदन केला. हिंदुस्थानचें प्रचंड प्रमाणावर आतां औद्योगीकरण होणार अशी आशा येथें वाटूं लागली, पण ती लवकरच मावळली. तज्ञांनीं शिफारसी काय केल्या आणि त्यांवर ब्रिटिश व अमेरिकन सरकारांनीं कोणतें मत बनवलें हें त्यांचे रिपोर्ट प्रसिद्ध न झाल्यानें समजण्यास मार्ग नाहीं. परंतु ज्या अर्थी त्यांच्या खटाटोपाचे प्रत्यक्ष व्यावहारिक परिणाम कांहींच दृष्टिगोचर झाले नाहींत, त्या अर्थी हिंदुस्थानांत मोठाले युद्धोपयोगी धंदे व कारखाने स्थापन करणें श्रेयस्कर व शक्य नाहीं असा अखेरचा निर्णय झाला असला पाहिजे हें उघड होतें. दारूगोळ्यासारखी कांहीं युद्धसामुग्री बनवण्याचे यशस्वी प्रयत्न येथें झाले असून जहाजें व विमानें बांधण्याचाहि उपक्रम करण्यांत आलेला आहे. तथापि, हिंदुस्थानच्या प्रचंड प्रमाणावरील औद्योगीकरणाची मूळची कल्पना सोडून देण्यांत आली आहे यांत संशय नाहीं.

ऑस्ट्रेलिया, कॅनडा, दक्षिण आफ्रिका इत्यादि देशांत तेथील सरकारांच्या प्रोत्साहनानें व सहाय्यानें युद्धपरिस्थितींत लढाऊ सामानाच्या उत्पादनासाठी कारखान्यांचा विस्तार मोठ्या प्रमाणावर झालेला आहे. तसा प्रयत्न हिंदुस्थानांत न केला गेल्यामुळें येथील सरकारानें देशाच्या औद्योगीकरणाची सुवर्णसंधि गमावली अशी टीका हिंदी धंदेवाल्यांनीं केली असून, ती चालू ठेवली आहे. नवीन औद्योगिक मंडळ्यांनीं भांडवल जमा करण्याचे बाबतींत हिंदुस्थान सरकारनें निर्बंध घातले आहेत त्यांचेविषयीं असमाधान व्यक्त केलें जात आहे. समाजांत खेळणाऱ्या पैशाचा ओघ आपल्या तिजोरीकडे आकर्षण्याचें आणि त्या उपायानें महागाईस आळा घालण्याचें सरकारचें धोरण प्रसिद्ध आहे. त्यास अनुसरून ज्याचा उपयोग तात्काळ औद्योगिक उत्पादनाकडे होऊं शकत नाहीं अशा भांडवलास त्यानें मर्यादा घातल्या आहेत, पण युद्धसमाप्तीपर्यंत त्याची गुंतवण सरकारी रोख्यांत केली जाण्याच्या अटीवर कंपन्यांनीं तें उभारण्यास सरकारनें मुभा ठेवली आहे. युद्धोपयोगी धंद्यांसाठी आणि मामुली उपयोगांत निकडीच्या कामासाठी भांडवल उभारण्यास व वाढविण्यास परवानगी देण्यांत येतें. पूर्वीपेक्षा हें नवीन सरकारी धोरण अधिक उदार वृत्तीचें व शहाणपणाचें आहे असे उद्गार शेट बालचंद हिराचंद ह्यांनीं काढले आहेत, त्यांच्याशीं आपण सहमत नाहीं, असें शेट घनश्याम बिर्ला ह्यांनीं एका पत्रकांत म्हटलें आहे. युद्धोत्तर औद्योगिक पुनर्घटनेच्या योजनेचा पत्ता नाहीं आणि सरकारी रोख्यांत आज गुंतवलेला पैसा नवीन उद्योगधंद्यांत भांडवल म्हणून घातला जाण्याची भाषा बोलली जात आहे. अशा स्थितींत नवीन काढावयाच्या कंपनीनें काय करावें ? असा प्रश्न त्यांनीं विचारला आहे. नवीन कारखाना कोठें काढावा, तो केव्हां उभारावा, तो चालेल कीं बंद करावा लागेल, ह्याची भांडवलवाल्यांस कांहींच कल्पना नसल्यानें हिंदुस्थानच्या औद्योगीकरणाचें भवितव्य अत्यंत अनिश्चित आहे. विशिष्ट हेतू मनांत धरून धाडशी व कल्पक धंदेवाल्यांनीं नवीन कारखान्यांसाठी भांडवल गोळा केलें तर त्या पैशाचें पुढें काय होणार हें समजणें शक्य नसल्यामुळें लोकांनीं कशाच्या आधारावर औद्योगिक योजनांस हात घालावा ? अशी बिर्ला शेटजींची पृच्छा आहे. परदेशीय भांडवलवाल्यांच्या मार्गांत मात्र ह्या तऱ्हेच्या अडचणी नाहींत आणि अमेरिकन व ब्रिटिश कारखानदारांस स्वतःच्या देशांत भांडवल उभारून हिंदुस्थानांत धंदे काढतां येतील किंवा वाढवतां येतील. असें झालें म्हणजे हिंदी धंदेवाल्यांस स्वतःच्या भांडवलाचा व कर्तबगारीचा उपयोग करण्यास वाव राहिला नाहीं असें आढळून येईल. ह्या रीतीनें परकी भांडवलवाल्यांच्या धंद्याची पोळी पिकेल आणि स्वदेशी धंदेवाल्यांची कुचंबणा होईल अशी भीति बिर्ला शेटजींनीं व्यक्त केली आहे. ही भीति दूर होण्याप्रत दोन गोष्टींची आवश्यकता आहे. युद्धोत्तर आर्थिक पुनर्घटनेची बहुमतसंमत अशी योजना लवकर तयार केली जाणें आणि राष्ट्रीय वृत्तीच्या मंत्रिमंडळाच्या हातीं तिची अंमलबजावणी दिली जाणें हीं त्या होत. युद्धोत्तर आंतरराष्ट्रीय आर्थिक घटनेंत हिंदुस्थानास योग्य स्थान प्राप्त झालें पाहिजे आणि त्या विषयींची योजना हिंदी राष्ट्रानें स्वतःच्या गरजांस अनुसरून आखून ती फलद्रूप होण्याची तयारी ठेवली पाहिजे. प्रत्येक राष्ट्र स्वतःच्या हितास जपत आहे आणि पुढें जपेल. ह्या नियमास हिंदुस्थान अपवाद होऊन कसें चालेल ! शेट बिर्ला ह्यांच्या पत्रकाचें हेंच सार आहे.

आयुर्विमा कंपन्या व उतरते व्याजाचे दर

आयुर्विमा कंपन्यांचा कारभार किफायतशीरपणें चालणें ही गोष्ट त्यांचे संबंधांतील व्याजाचे दर, हप्त्यांचे दर, मृत्यूचें प्रमाण, खर्चाचें प्रमाण इत्यादिविषयक अंदाज बरोबर ठरण्यावर अवलंबून राहतें. सध्या हिंदुस्थानांतील प्रत्येक विमा कंपन्या व्याजाचे दर कमाईचे उतरले असल्याकारणानें तोटयांत येण्याचा संभव निर्माण झाला आहे. मृत्यूंचें प्रमाण काय येईल याचा हिशेब करतां येतो व खर्चावरहि नियंत्रण चालणें शक्य असतें. परंतु, व्याजाच्या दराविषयीं दीर्घकालीन अंदाज करणें सोपें नसतें व ह्यासंबंधांतील अपेक्षा चुकल्या, म्हणजे कठीण प्रसंग निर्माण होतो. हिंदी विमाकंपन्यांना १९१३ साली ६·२६% व्याज मिळालें, तेथून व्याजाचा दर एकसारखा खाली चालला आहे. १९४१ साली तो ४·१७% वर आला व त्याची खाली जाण्याची प्रवृत्ति अद्याप कायम आहे. विमाकंपन्यांचें मूल्यमापन आजवर ५% किंवा ४½% दरानें केलें तें ठीक झालें. परंतु आतां तें ३½% दरानें केलें तर कांहींच्या हिशेबांत तूट दिसणें क्रमप्राप्तच आहे आणि बोनसचे दर उतरणें किंवा बोनस अशक्यप्राय होणें स्वाभाविक आहे. पूर्वी भारी दरानें गुंतविलेल्या रकमा सुटया होत गेल्या म्हणजे त्या आतां कमी व्याजानें गुंतवाव्या लागतात व सहाजीकच त्यांत व्याजाचें नुकसान होतें. वाढत्या कराच्या बोजाचा परिणामहि विमाकंपन्यांस सोसावा लागत आहे व सरकारी रोख्यांतील सक्तीच्या गुंतवणुकीमुळें कंपन्यांना मोठाल्या रकमा कमी व्याजानेंच ठेवणें आवश्यक झालें आहे. विमाकंपन्यांना पडणाऱ्या प्रत्यक्ष दरापेक्षां सुमारें २½% कमी दरानें मूल्यमापन करण्याची ग्रेटब्रिटनमधील कंपन्यांची सावधगिरीची पद्धति आहे, परंतु तशी कूस येथील कंपन्यांच्या मूल्यमापनाचे संबंधांत राखण्यांत आलेली नसल्याकारणानें, ज्या परिस्थितींत ब्रिटिश कंपन्या बोनसचा दर कमी करतील किंवा बोनस देणार नाहींत, त्याच परिस्थितींत हिंदी कंपन्या तूट दाखवूं लागतील. ३½% च्या दरानें सध्यां मूल्यमापन करून व ह्यापुढेंहि सावधगिरीच्या दरानें मूल्यमापन करून हिंदी कंपन्यांना आपली मजबुती वाढविण्यास प्रारंभ करण्यास सध्याचा समय सोईचा आहे. मात्र, असें करण्यास त्या समर्थ व्हाव्या, ह्या दृष्टीनें सरकारी विमाखात्यानें हिंदी कंपन्यांकडे सहानुभूतिपूर्वक पाहिलें पाहिजे आणि सर्वांगीण पद्धतशीर प्रगति दाखविणाऱ्या कंपन्यांस सवड दिली पाहिजे.

धान्य पेरण्याची तुटीच्या क्षेत्रांत सक्ती

धान्याची स्थानिक तूट भरून यावी व धान्याची लागवड वाढावी, ह्या उद्देशानें मुंबई प्रांतांतील कांहीं जिल्ह्यांच्या कांहीं तालुक्यांत शेतकऱ्यांनीं आपल्या शेतांच्या किमान दोन तृतीयांश क्षेत्रांत धान्याचीच लागवड केली पाहिजे व आपल्या शेताच्या एक षष्ठांशापेक्षा जास्त जागेंत कपास, तंबाखू व अंबाडी पेरतां कामा नये, असा हुकूम काढण्याचा मुंबई सरकारचा विचार आहे. हा हुकूम महाराष्ट्रांतील एकाच जिल्ह्यास—पूर्व खानदेश—लागू पडेल व त्यांतील अमळनेर, चाळिसगांव, एरंडोल, जळगांव, जामनेर, पारोळा, यावळ, भुसावळ, एदलाबाद, रावेर, भडगांव, चोपडें व पाचोरा हे तालुके त्या हुकुमासाली येतील.

गेल्या वर्षांतील हिंदी आर्थिक परिस्थिति

एक्सचेंज बँकांचा व्यवहार किफायतशीर होणें हें त्या ज्या देशांत व्यवहार करतात, त्या देशांच्या आर्थिक समृद्धीवर अवलंबून आहे. हिंदुस्थानांतील लोकांची क्रयशक्ति सुधारावी व ह्या देशाचा परराष्ट्रीय व्यापार वाढावा, अशी एक्सचेंज बँकांची सहाजीकच इच्छा असते. चार्टर्ड बँक ऑफ इंडिया, ऑस्ट्रेलिया अँड चायना ह्या बँकेचे अध्यक्ष मि. ग्रन्थॅम, ह्यांनीं गेल्या वर्षीच्या आपल्या बँकेच्या व्यवहाराचा आढावा घेतला, त्यांतील हिंदुस्थानासंबंधींचा भाग खाली उद्धृत केला आहे :—

"गेलें वर्ष हिंदी आर्थिक प्रगतीस पोषक असें होतें. युद्धप्रयत्नाच्या शिकस्तीमुळें औद्योगिक प्रगतीस चालना मिळाली. ग्रेटब्रिटन व इतर देश ह्यांतून होणारी आयात कमी झाली व हिंदी कच्चा माल व तयार माल ह्यांस परदेशी भरपूर व तातडीची मागणी आली. सहाजिकच, हिंदुस्थानाची बरीच भरभराट झाली. परंतु त्याबरोबरच चलनवृद्धि व भयंकर महागाई ह्यांचीहि आपत्ति आल्यामुळें भरभराटीमध्यें सर्वांस सारखा वाटा मिळाला नाहीं आणि कांहींची दुर्दशा टळूं शकली नाहीं. कांहीं लोकांच्या हातामधील क्रयशक्ति वाढली, तर बाजारांत मालाचा तुटवडा पडल्यामुळें त्याचा दुष्परिणामहि वाढला. मोठी कर्जउभारणी किंवा विशेष कर ह्यांचे अभावीं, शेतीचें उत्पादन जरी पुष्कळ वाढलें असतें तरी त्यानें परिस्थिति निवळली असती. असमाधानकारक स्थानिक पिकें व वहातुकीच्या अडचणी ह्यांमुळें कांहीं भागांत दुष्काळ पडला. गव्हाच्या आयातीमुळें अन्नपरिस्थिति आतां बरीच सुधारली आहे व चलनवृद्धीच्या प्रवृत्तीस आळा घालण्याचें सोनेविक्रीसारखे प्रयत्न चालूं आहेत. तथापि धान्याचीं पिकें वाढविण्याची उपाययोजना तात्काळ हातीं घेतली जाणें अगत्याचें आहे. कारण, ह्यापुढें पूर्वीपेक्षां जास्त प्रमाणांत हिंदुस्थानास अन्नाचे बाबतींत स्वतःवरच विसंबून राहणें भाग पडणार आहे."

इंग्लंडमध्येंहि दिवे चोरीस जातात.

आगगाड्या, सार्वजनिक संडास, इत्यादि ठिकाणच्या दिव्यांची चोरी होत असल्यामुळें नुकसान फार मोठें होतें व लोकांचीहि अतिशय गैरसोय होते. अशा तऱ्हेचें वर्तन हिंदुस्थानांतच घडतें व इंग्लंडसारख्या पुढारलेल्या देशांतील लोकांची नीतिमत्ता वरच्या प्रतीची असते, असें सर्वसाधारण अनुमान काढणें चुकीचें असतें. विशिष्ट परिस्थितीस अनुसरूनच सर्व गोष्टी घडत असतात. लंडन, मिडलंड अँड स्कॉटिश रेल्वे कंपनीचे अध्यक्ष, ने. ना. लॉर्ड रॉयडेन, ह्यांनीं आपल्या रेल्वेवरील चोऱ्यांचा उल्लेख कंपनीच्या वार्षिक सभेंत केला. शक्य तेवढी खबरदारी घेतली, तरी चोऱ्यांची संख्या वाढत आहे, अशी त्यांनीं तक्रार केली. काळा बाजार व त्यास माल पुरविणारे दलाल ह्यांच्या व्यवहाराचा हा परिणाम आहे. सहज उचलून घेतां येतील अशा वस्तू आगगाड्यांतून पुरविणें अशक्य झालें आहे, असें ते म्हणाले. विजेच्या दिव्यांची चोरी तर विशेष निषेधार्ह आहे, कारण हे दिवे कमी व्होल्टेजचे असल्यानें त्यांचा दुसरा उपयोग होऊं शकत नाहीं, असें त्यांनीं सांगितलें. बाकांच्या गाद्या फाडण्यांत व खिडक्या फोडण्यांत दिसून येणाऱ्या प्रवृत्तीस काय म्हणावें, हेंच लॉर्ड साहेबांना सुचत नाहीं. अशा रीतीनें होणारें नुकसान बरेंच भरतें, परंतु तें थांबविण्याचा उपाय दिसत नाहीं असें त्यांनीं उद्गार काढले. सार्वजनिक नीतिमत्ता व नागरिकत्व ह्यांचे संबंधांत आदर्श मानल्या जाणाऱ्या ग्रेट ब्रिटनमधील प्रकारांचें वरील वर्णन उद्बोधक आहे. युद्धपरिस्थितीमुळें जनतेच्या मनाची होणारी चमत्कारिक परिस्थिति, हींच त्याच्या बुडाशी आहे.

स्फुट विचार

महात्मा गांधींची मुक्तता

हिंदुस्थानच्या पूर्व सीमेच्या आंतील प्रदेशांत ठाण मांडून बसण्याची शिकस्त जपान करीत असतां आणि पूर्व एशियांतील त्या शत्रूनें व्यापलेल्या विस्तीर्ण भूविभागांतून त्यांचें उच्चाटण करणें अगत्याचें असतां ह्या देशामधून सैनिक व युद्धसामुग्री ह्यांच्या पुरवठ्याचा ओघ अविरत वाहत ठेवणें कर्तव्यप्राप्त आहे ही गोष्ट स्पष्ट आहे. लढाऊ साधनांचा पुरवठा हिंदी उद्योगधंदे, व्यापार व एकूण जार्थिक परिस्थिति ह्यांच्या कार्यक्षमतेवर अवलंबून आहे ह्या विषयींहि मतभेद असण्याचें कारण नाहीं. तसेंच जनतेमध्यें उत्साहपूर्ण सहकार्याचें वातावरण पसरणें युद्ध प्रयत्नास परिपोषक आहे आणि त्यासाठी लोकांच्या जीवनास लागणाऱ्या आवश्यक वस्तूंचा समाधानकारक व संघटित पुरवठा केला जाण्याचें महत्व सर्वांस पटलें आहे. युद्धोत्तर आर्थिक पुनर्घटनेच्या योजनांची चर्चा देशांत चालली आहे आणि ह्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांची व युद्धप्रयत्नाच्या तशाच महत्त्वाच्या बाबी वर निर्दिष्ट केल्या आहेत त्यांची नीट बिल्हेवाट लागण्यास मध्यवर्ती व प्रांतिक सरकारांत लोकमतानुवर्ती राज्यव्यवस्था स्थापन झाली पाहिजे असा प्रचार देशाचे पुढारी करीत आहेत. महात्मा गांधींच्या प्रकृतीचें मान मर्यादेपलीकडे बिघडल्यानें केवळ भूतदयेनें प्रेरित होऊन आपण त्यांस बिनशर्त मुक्त केलें असल्याचें सरकारनें प्रसिद्ध केलें आहे. ह्या मुत्सद्दीगिरीच्या व मनोदार्याच्या धोरणाबद्दल अखिल हिंदुस्थान व्हाइसरॉय, लॉर्ड वेव्हल, ह्यांस धन्यवाद देत आहे आणि महात्माजींस पूर्ण आराम वाटो अशी इच्छा व्यक्त करीत आहे. महात्माजींच्या मुक्ततेच्या मुळाशीं भूतदयेच्या व्यतिरिक्त दुसरा कोणताहि हेतु नसला तरी देशांत ऐक्य, लोकशासित राज्यकारभार व अधिक जोराचा व संघटित युद्धप्रयत्न ह्यांस तिच्या योगानें स्फुरण प्राप्त होईल अशी अनेकांची इच्छा व अपेक्षा आहे. युद्धांतून नीट पार पडून हिंदुस्थाननें आपली राजकीय व आर्थिक घडी नीट बसवावी अशी सरकार आणि जनता ह्यांनीं प्रकट केलेली मनीषा आहे. सध्या अनेक हिंदी प्रांतांत जनतेस उत्तरदायी असलेली राज्य व्यवस्था अस्तित्वांत नाहीं आणि लोकशाहीस आवश्यक असलेली व युद्धांतील विजयास उपकारक ठरणारी तात्पुरतीहि एकी पक्षोपपक्षांत नाहीं. जपानचा पाडाव होण्यास ह्या दोन्हींची जरूरी आहे आणि हिंदुस्थानचे आर्थिक प्रश्न सोडवण्यास त्यांचें सहाय होणार आहे. महात्मा गांधींची प्रकृति लवकर सुधारून त्यांची मुक्तता हा विधायक, संघटित व शांततामय कार्याच्या नवीन मनूचा प्रारंभ ठरो असें आम्ही इच्छितों. सरकार आणि जनतेचे पुढारी ह्यांच्या सहकार्यानेंच हें ध्येय गाठतां येणार असल्यानें प्रस्तुत संधीचा योग्य उपयोग त्यांचे हातून होईल अशी आम्हांस आशा आहे.

ब्रिटिश औद्योगिक धोरणाचें अनुकरण करा

हिंदी उद्योगधंद्यांच्या युद्धोत्तर अभिवृद्धीच्या संबंधांत निश्चित असें राष्ट्रीय व सरकारी धोरण निश्चितपणानें आखलें जाण्याचें अगत्य आम्हीं आजच्या अग्रलेखांत विर्ला इटर्वीनीं प्रसिद्ध केलेल्या एतद्विषयक पत्रकास अनुलक्षून केलें आहे. प्रस्तुत बाबतींत ब्रिटिश मंत्रिमंडळाच्या धोरणाचे अनुकरण हा देशांत केलें जावें इष्ट आहे. टाइम्स ऑफ इंडिया ह्या मुंबईच्या इंग्रेज दैनिकांत एका लेखकानें ब्रिटिश फडनवीसांनीं आपल्या अंदाजपत्रकावरील भाषणांत नमूद केलेल्या चतुःसूत्रीकडे लक्ष वेधून हिंदुस्थान सरकारनें त्यांच्या पावलावर पाऊल टाकून स्वदेशी धंद्यांच्या उन्नतीस साह्य यावें असें सुचवलें आहे. युद्धोत्तरकालीन आर्थिक प्रगतीचीं ब्रिटिश फडनवीसांचीं सूत्रें पुढें नमूद केल्याप्रमाणें आहेत. अन्न आणि इतर जीवनास लागणाऱ्या आवश्यक वस्तूंच्या किंमती उत्पादकांस सरकारी मदत करून मर्यादेंत राखणें हें ह्यांतलें पहिलें सूत्र आहे. जहाजांच्या धंद्यास नवीन यंत्रें बसवण्यासाठीं कर-माफीच्या वगैरे मार्गानीं उत्तेजन देणें हें ब्रिटिश धोरणाचें दुसरें अंग आहे. तिसरें सूत्र असें आहे कीं शेतीच्या धंद्याची स्थिति बिघडूं नये म्हणून लांब मुदतीचीं कर्जे व अल्प व्याजाचे दर अशा सवलती देऊन शेतकऱ्यांस त्यांच्या आर्थिक सुस्थितीविषयीं आश्वासन देण्यांत येत आहे. चौथ्या सूत्रानें नवीन धंद्यांस मदत देण्यास सरकार स्वतःस बांधून घेत आहे. हें चतुर्विध ब्रिटिश औद्योगिक पुनर्घटनेचें धोरण स्पष्ट आणि समाधानकारक आहे. हिंदुस्थान सरकारनें असें धोरण स्वीकारण्यास आणि तें प्रसिद्ध रीतीनें व्यक्त करण्यास का कचरावें ! युद्धसमाप्तीनंतर आंतरराष्ट्रीय आर्थिक संबंध व परिस्थिति ह्यांचे बाबतींत घटना कशी होईल हें सांगणें आज जरी शक्य नसलें तरी देशाची शेती, उद्योगधंदे व व्यापार ह्यांच्या गरजांची सर्वांस माहिती आहे आणि तीस अनुसरून युद्धोत्तर आर्थिक धोरण निश्चित करण्यास अडचण वाटण्याचें कारण नाहीं. तपशिलांविषयीं मतभेद होईल, पण उद्दिष्टाविषयीं वाद नाहीं. शेतकरीवर्गाच्या स्थितींत सुधारणा आणि नवीन धंद्यांची स्थापना ह्या गोष्टी निकडीच्या आहेत. त्यांचेवांचून युद्धोत्तर पुनर्घटनेची भाषा बोलणें व्यर्थ आहे. ब्रिटिश मंत्रिमंडळाचा ह्या बाबतींत हिंदुस्थान सरकारनें कित्ता गिरवला पाहिजे.

सुवर्ण परिमाणाची इतिश्री

स्वतःच्या राष्ट्रीय चलनास सोन्याचें अधिष्ठान देण्यांत इंग्लंडनें अग्रतेचा मान मिळविला होता आणि पौंड स्टर्लिंग म्हणजे सोनें हें कोटक मोठ्या अभिमानानें त्या देशांत एकाकाळीं मांडण्यांत येत असे. गेल्या महायुद्धानंतर सोन्याचें ब्रिटिश चलन व्यवस्थेंतलें हें स्थान डळमळलें तरी अनुकूल परिस्थिति निर्माण होतांच तें पुन्हां बहाल करण्यांत आलें. चालू युद्धांत ब्रिटिश चलनाचें सोन्याच्या मापानें केलेलें मोल स्थिर राखणें कठिण झालें आणि चलनाच्या आधारस्थानावरून आजनी एकदा त्याचें उच्चाटन करावें लागलें; ही स्थिति आज कायम आहे परंतु युद्धोत्तर काळांत ब्रिटिश चलन सोन्याच्या किंमतीवर पुन्हां एकदार आधारणार कीं नाहीं हा प्रश्न आंतरराष्ट्रीय चलनव्यवस्थेची चर्चा चालू असतांना उपस्थित केला जाणें स्वाभाविक आहे. मागचा कटु अनुभव लक्षांत घेऊन त्या प्रश्नास आपण नकारार्थी उत्तर देण्याचें निश्चितपणें ठरवलें असल्याचें ब्रिटिश फडनवीसांनीं कॉमन्स समेत स्वतःच्या सरकाराच्या तर्फेनें सांगितलें ही अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे. ब्रिटिश पौंडाचा सोन्याशीं मुळींच संबंध रहाणार नाहीं असा ह्याचा अर्थ नव्हे. आंतरराष्ट्रीय विनिमयाच्या देण्याघेण्याची बिल्हेवाट लावण्यास देशांच्या चलनांचे परस्पर

संबंध निश्चित होणें आवश्यक असतें. सोन्यास जगांत सर्वत्र मागणी असून त्या धातूचे ठिकाणीं अनेक गुण आहेत, त्यामुळें तें सर्वांस ग्राह्य असतें. प्रत्येक देश आपलें चलन सोन्याच्या विशिष्ट वजनाच्या किंमतीइतकें आहे असें ठरवतो. सोन्याचें नाणें प्रत्यक्ष व्यवहारांत वापरतां येण्यासारखी स्थिति नसल्यानें त्याची जागा इतर धातूंचीं नाणीं व कागदी नोटा घ्यांस दिली जाते आणि ह्या चलनांचा निश्चित सोन्यामध्यें विनिमय होण्याची तजवीज केली जाते. ह्या रीतीनें पदार्थांच्या मोलाचें सोनें हें मापनसाधन होतें आणि त्या योगानें निरनिराळ्या देशांच्या चलनांचा विनिमय ठराविक दरानें करणें सोपें होतें. आंतरराष्ट्रीय देवघेवींचें माध्यम सोनें कां व कसें होतें हें ह्यावरून स्पष्ट होईल आणि इंग्लंडला आपल्या पौंडाचा सोन्याचा आधार सर्वस्वी टाकून देतां येणार नाहीं ह्याचें कारण उघड होईल. तथापि सोन्याच्या किंमतीशीं पौंडाची किंमत जोडणें वेगळें आणि पौंडाच्या मोबदल्यांत सोनें देण्याची जबाबदारी कायदेशीर रीतीनें राष्ट्रीय सरकारानें पत्करणें वेगळें. ही जबाबदारी पार पाडली जाण्यास मोठा सुवर्ण संचय हवा आणि त्याचा आकार आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या परिस्थितीवर अवलंबून रहाणार. हा संचय अपुरा झाल्यास हुंडणावळीच्या दरांत अनिष्ट बदल होऊन राष्ट्राच्या उद्योगधंद्यांस तो प्रतिकूल होण्याचा संभव असतो. ह्याकरितां इंग्लंडमध्यें पूर्ण स्वरूपांतलें सुवर्ण परिमाण पुन्हां प्रस्थापित करावयाचें नाहीं असें ब्रिटिश सरकारानें ठरविलें आहे.

ब्रिटिश आणि अमेरिकन चलन

जगांत सर्वांत प्रचंड असा सुवर्ण संचय आज अमेरिकेजवळ आहे, ह्या कारणानें आंतरराष्ट्रीय चलनव्यवस्थेंत सोन्यास महत्त्वाचें स्थान देण्याकडे त्या देशाचा कल असणें स्वाभाविक आहे. युद्धामुळें इंग्लंडचा सुवर्णनिधि संपला आहे आणि त्यास परराष्ट्रीय येण्याच्या ऐवजी देणेंच मोठें झालें आहे. उदाहरणार्थ, हिंदुस्थान वगैरे देशांच्या मोठ्या शिलका पौंडाच्या स्वरूपांत लंडनमध्यें पडून आहेत. युद्धसमाप्तीनंतर ह्या रकमांचें रूपांतर त्या त्या देशांच्या चलनांत व्हावें लागेल तेव्हां पौंडाच्या आंतरराष्ट्रीय किंमतीवर ताण पडेल आणि ती स्थिर ठेवणें कठिण होईल. अमेरिकन डॉलरचें तसें नाहीं. सोन्याच्या प्रचंड निधीचा त्यास भरभक्कम आधार आहे आणि ह्या चलनाच्या मोबदल्यांत इतर देशांचीं चलनें आणि प्रत्यक्ष सोनें देण्याची अडचण अमेरिकेस यत्किंचितहि भासणार नाहीं. आंतरराष्ट्रीय चलनयोजनेची चर्चा अमेरिकेंत चालली आहे तीमध्यें इंग्लंडनें भाग तर घेतला पाहिजे, कारण ब्रिटिश व्यापार आणि ब्रिटिश साम्राज्यांतील देवघेवी सुरळीतपणानें चालतील अशी व्यवस्था करण्याची जबाबदारी त्या राष्ट्रास वाटत आहे. स्वतःच्या साम्राज्याच्या आर्थिक हितास कोणत्याहि रीतीनें बाधक होणार नाहीं, अशींच चलनव्यवस्था आपण पत्करूं अशी घोषणा कॉमन्स सभेंत ब्रिटिश फडनाविसांनीं केली आहे तिचें रहस्य स्पष्ट आहे. कॉमन्स सभेंत झालेल्या वादविवादांत भाग घेणाऱ्या सभासदांनीं ह्याच मुद्यांवर जोर दिला आहे. आंतरराष्ट्रीय व्यापार, राष्ट्रीय धंदे आणि आंतरराष्ट्रीय हुंडणावळ ह्यांचा अत्यंत निकट असा संबंध आहे आणि इंग्लंडचें आर्थिक व राजकीय भवितव्य त्यावर अवलंबून आहे. इंग्लंडचें चलनविषयक धोरण सावधगिरीचें पण निःस्वार्थी आहे, ह्याचा उलगडा वरील स्पष्टीकरणावरून होईल. अमेरिकन राष्ट्रानें प्रचंड सुवर्णसंचय केला आहे, त्यासाठी त्या राष्ट्रास पुष्कळ स्वार्थत्याग करावा लागला आहे; म्हणून त्या सोन्याची माती होईल अशा आंतरराष्ट्रीय चलनव्यवस्थेचा पुरस्कार इंग्लंडनें करणें श्रेयस्कर नाहीं असें कॉमन्स सभेंत एका सभासदानें बजावलें तें लक्षांत घेण्यासारखें आहे. हिंदी राष्ट्र व हिंदी सरकार ह्यांनीं प्रस्तुत चलनचर्चेंत मन घालून ह्या देशाच्या आर्थिक हितसंबंधांचें रक्षण केलें पाहिजे. हिंदी हुंडणावळीच्या प्रश्नावर मागें रुपें माजलीं आहेत ही गोष्ट येथें घान्यांत बाळगली जाणें आवश्यक आहे. रुपया हा पौंडाचा दास न होतां त्यास मानाचें बरोबरीचें योग्य स्थान प्राप्त करून घेण्यास सरकारनें व लोकांनीं झटलें पाहिजे. ह्या कामीं दक्षता बाळगावी तेवढी थोडीच होणार आहे.

चीनमधील चलनाची दुर्दशा

चीनमध्यें रहाणीच्या खर्चाचें मान १९३९ च्या पहिल्या सहामाहींत १०० होतें असें मानलें तर त्याचा इंडेक्स नंबर ऑगस्ट १९४२ मध्यें २,२४९ झाला व ऑगस्ट १९४३ मध्यें तो ६,०७४ झाला! "नोटांचा छापखाना चालू ठेवून" असें म्हणण्यापेक्षां परदेशांत नोटा छापून त्यांचीं खोकीं विमानांतून आणवूनच चिनी सरकार अप्रत्यक्ष करवाढ करीत आहे! चलनाचा विस्तार एकाद्या महिन्यांत १०% पेक्षां ज्यास्त झाला नाहीं, म्हणजे परिस्थिति आटोक्यांत आहे, असें समजावें लागतें. चीनच्या परराष्ट्रीय हुंडणावळीचा दर १९४२ पासून कायमच आहे, त्यामुळें चीनमधील ज्या लोकांचा खर्च परदेशांतून येणाऱ्या पैशावर अवलंबून असतो, अशांचे हाल आहेत. एका पौंडास पूर्वी इतकेच चिनी डॉलर मिळणार परंतु चिनी डॉलरची स्थानिक किंमत मात्र पार घसरली आहे. ग्रेट ब्रिटनमधून चीनमधील परराष्ट्रीय वकील, लष्करी लोक, मिशनरी संस्था, वर्तमानपत्रांचे बातमीदार इत्यादींसाठी पाठविण्याच्या रकमांवर हुंडणावळीच्या दरांत ५०% सवलत देण्याचें ब्रिटिश सरकारनें गेल्या वर्षी ठरविलें व त्या सवलतींत आणखी वाढ नुकतीच करण्यांत आली आहे. अर्थात्, पूर्वी असलेला चिनी डॉलर व ब्रिटिश पेन्स ह्यांमधील हुंडणावळीचा दर दोन्ही चलनांच्या तुलनात्मक किंमतीच्या प्रमाणांत रहाणें अशक्यच झालें आहे. कारण, वाढत्या महागाईबरोबर चिनी डॉलरची स्थानिक किंमत एकसारखी घसरत चालली आहे. चीनमधील परराष्ट्रीय लोकांच्या सोईसाठी अमेरिकन सरकारच्या चलनी नोटांचा उपयोग करण्यांत येतो, त्यामुळें चिनी चलनास मात्र मदत झालेली नाहीं, कारण अमेरिकन नोटांस मजबूत आधार आहे व त्यांची चिनी काळ्या बाजारांत भरमसाट किंमतीस खरेदी-विक्री होत आहे. अनियंत्रित चलनविस्तारास चीन लवकर आळा घालूं शकण्यावरच तेथील परिस्थितीची दुर्दशा थांबणें अवलंबून आहे.

युद्धकार्यांत पुरुषांपेक्षां अधिक स्त्रिया

ग्रेट ब्रिटनमध्यें युद्धकार्यांत एक कोटि पुरुषांचीं आणि एक कोटि दहा लक्ष स्त्रियांचीं नांवें पटावर दाखल झालीं आहेत. युद्धप्रयत्नांत स्त्रियांचें एवढें संख्याधिक्य दुसऱ्या कोणत्याहि देशांत आढळत नाहीं.

शेड्यूल्ड बँकांची शाखा वाढ

हिंदी शेड्यूल्ड बँकांच्या शाखांत १९४३ सालाच्या पहिल्या नऊ महिन्यांच्या २७३ दिवसांत २७२ शाखांची भर पडल्याचें ५ एप्रिलच्या "अर्थी"त सांगितलेंच आहे. १९४३ च्या शेवटच्या तिमाहीचे आकडे आतां हातीं आले आहेत, त्यावरून ऑक्टोबर ते डिसेंबरच्या ९२ दिवसांत शेड्यूल्ड बँकांच्या शाखांत १६० शाखांची आणखी भर पडल्याचें आढळून येतें. म्हणजे १९४३ सालीं शाखांची संख्या १,४५३ वरून १,८८५ वर गेली. रिझर्व्ह बँकेच्या शेड्यूलमध्यें नवीन बँका दाखल होत आहेत, त्यांचा समावेश शाखांच्या संख्येंत होऊं लागतो. १९४३ च्या शेवटच्या तिमाहींत ओरिएंट बँक ऑफ कॉमर्स, बँक ऑफ म्हैसूर व डिस्कौंट बँक ऑफ इंडिया ह्या शेड्यूल्ड बँका झाल्या आणि त्यांनीं शाखांच्या यादींत ३५ ची भर घातली.

थॉमस कुक ॲण्ड सन (बँकर्स) लि. चा व्यवहार बंद

चालू वर्षाच्या पहिल्या तिमाहींत आंध्र बँक लि., मसुलिपटम व बँक ऑफ कॉमर्स लि., कलकत्ता, ह्यांना शेड्यूल्ड बँकेचा दर्जा प्राप्त झाला. थॉमस कुक अँड सन (बँकर्स) लि. चा व्यवहार ग्रिंडले अँड कं. लि. कडे वर्ग झाल्यानें तीं बँक शेड्यूलमधून गळाली. म्हणजे शेड्यूल्ड बँकांची संख्या ७७ वरून ७८ वर गेली.

भारत इंडस्ट्रिअल बँकेस मान्यता

पैशाच्या वर्गावर्गीसाठीं सवलत मिळण्यास मंजुरी दिलेल्या बिगर शेड्यूल्ड बँकांच्या यादींत भारत इंडस्ट्रिअल बँक लि. व पंजाब अँड काश्मीर बँक लि. ह्यांस प्रवेश मिळाला. अशा मंजूर बिगर शेड्यूल्ड बँकांची संख्या ६७ झाली आहे.

जननसंख्या कशी वाढेल ?

यशस्वी ब्रिटिश लोकांच्या कुटुंबांतील घटकांची संख्या कशी कमी अधिक असते, ह्याची शास्त्रीय पद्धतीनें नुकतीच पहाणी करण्यांत आली. (१) कारखानदारांना मुलें जास्त होतात, तर कलावंत व नट ह्यांस फारच थोडीं होतात. नटांचे विवाह लवकर झाले तरी त्यांचा पगार व त्यांच्या नोकरीची अशाश्वती ह्यांचा अपत्यांच्या संख्येवर प्रतिकूल परिणाम होतो. जे लोक कामासाठी परदेशीं जातात, त्यांना मुलें कमी होतात. (२) तथापि, ग्रेट ब्रिटनमधील सनदी नोकर व हिंदुस्थानांत आलेला ब्रिटिश सनदी नोकर ह्यांच्या मुलांची सरासरी संख्या सारखीच भरते, कारण २८ व्या वर्षी हिंदुस्थानांतील सिव्हिल सर्व्हिटाला त्याच्या ग्रेट ब्रिटनमधील भावंडांचे मानानें दुप्पट पगार मिळतो. परदेशांतील रहाणीची गैरसोय जादा पगारानें भरून निघते ! लष्करी व नाविक अधिकाऱ्यांना सहाजिकच कमी मुलें होतात. (३) उशीरा विवाह करणारांस मुलेंहि कमी असतात, परंतु तिसाव्या वर्षापर्यंत अखंड परिश्रम करून स्वास्थ्य मिळवून नंतर विवाहबद्ध होणारांस मुलांचा तुटवडा पडत नाहीं. (४) लॉर्डांच्या सभेंतील सभासदांस प्रत्येकीं २·४१ मुलें असतात. पार्लमेंटांतील हुजूर पक्षाच्या सभासदांस प्रत्येकीं सरासरीनें १·९८ मुलें असतात. मजूर पक्षाच्या प्रत्येक सभासदाच्या मुलांची सरासरी १·४४ आहे.

लग्नाचे वेळीं वराचें सरासरी वय ३३ असतें, तें २५ पर्यंत खालीं आणल्यास अपत्यांची संख्या वाढण्यास मदत होईल, कारण तरुण लोक आयुष्यांतील अडचणींस टक्कर देण्यास तयार असतात व त्यामुळें तरुणपणीं संततिनियमन करण्याची फारशी प्रवृत्ति नसते असा तपासणीचा निष्कर्ष आहे.

महाराष्ट्रांत लेखी गॅरंटी देणारे
पहिले व फक्त १ च
गोल्ड मेडॅलिस्ट् व मराठी वळणाचे स्पेशॉलिस्ट्
पेन्टर बेडेकर, ए. जी.,
बुधवार चौक, पुणें २ (सिटी)
बाहेरगांवचीं कामें रेल्वे, मोटार अगर पोस्टानें पाठवूं.

प्रगतिपथावरील नवा
मै ला चा — द ग ड
सन १९४३ अखेर
नव्या कामांत ११० टक्के वाढ
चालू कामांत १०० टक्के वाढ
आयुर्विमाविधींत ८० टक्के वाढ
— आपला विमा किंवा एजन्सी आजच घ्या —
दि औंध म्यूच्युअल लाइफ
ॲश्युरन्स सोसायटी लि., पुणें.
आर. जी. साठे सुपरिंटेंडेंट
व्ही. जी. जोशी मॅनेजिंग डायरेक्टर

रक्तवर्धक प्रमाणेंच लोकप्रिय
दोन उपयुक्त औषधें.
ओजस पौष्टिक पेयान्न
आबाल वृद्ध स्त्रीपुरुषांस उपयुक्त
मुलांचे करितां
अँटी ग्राइप मिक्श्चर
दांत सुलभतेनें येण्यावर व मुलांचे अपचनाचे विकारावर
केंद्रें:-मुंबई, पुणें, नागपूर, उमरावती, सांगली, कोल्हापूर, हुबळी.
पुणें मुख्य दुकान:—गणपती चौक, लक्ष्मीरोड पुणें.
आ यु र्वे द र स शा ळा
पुणें लि० पुणें ४.

पुना गेस्ट हाऊस

१००, लक्ष्मी रोड, पुणें २.

Telephone 779

GUEST HOUSE

TELEGRAM Guest House Poona 2.

स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

गिरगांव मुंबई नं. ४

महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

सध्यांच्या टंचाईच्या काळांत जीवनद्रव्यें कमी पडतात.
जीवनद्रव्यांनीं (Vitamins) युक्त असे
(सप्लाय खात्यानें मान्यता दिलेले)

टोमॅटो केचप (गोड) व

टोमॅटो सॉस [तिखट व आंबट]

आजच मागवा व जीवनद्रव्यांची वाटणारी उणीव भरून काढा.

रुरल प्रॉडक्ट्स कंपनी लि. पुणें

बिझिनेस ऑफिस: ९१३ अ सदाशिव, पुणें २.

'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

दत्त कंपनी

७३५ शुक्रवार पेठ, पुणें २. दाणेआळी पोलिसचौकीजवळ
सर्व तऱ्हेचे काटे, वजनें व मापें, बेलेन्स
रिपेअर करून मिळतील.

न्यू इंडिया इंडस्ट्रीज लि.

(Approved Re-traders and Approved Contractors)

२६ लॅमिंग्टन नॉर्थ, मुंबई ११.

अध्यक्ष:—श्री. ग. स. मराठे, ॲक्चुअरी.

महाराष्ट्रांतील रबराचा प्रमुख कारखाना

★ गिरणीचे रोलर्स ★ रबरी हातमोजे ★ छापखान्यांचे रोलर्स
★ रीमोल्ड टायर्स ★ रबरी वॉशर्स ★ सॉलिड व्हील्स

व इतर रबरी माल तयार होतो.

पु. ग. मराठे
मॅनेजिंग डायरेक्टर.

हें पत्र पुणें, पेठ शनवार नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व
रा. शंकर वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' शनवार, नं. ९२७।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
(टपाल हंशील माफ)
किरकोळ अंकास
दोन आणे.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष १० पुणें, बुधवार, तारीख २४ मे, १९४४ अंक २१

★ नगर बाँबे ट्रेडिंग कंपनी ★

चिनाब, लाइम ज्यूस कॉर्डीअल, ऑरेंज व लेमन स्क्वॉश, टोमॅटो सॉस
मँगो जॅम, मध, कोको, बेकिंग पावडर, सॅनिटरी टॉवेल्स,
टुथ पेस्ट, टुथ ब्रश, वगैरे मालाचे
स्टॉकिस्ट.

शाखा:— ★ हेड ऑफिस:—
माणिक चौक, अहमदनगर पूना गेस्ट हाऊस, पुणें २

दि बँक ऑफ इंडिया लि.

[स्थापना : १९०६]

अधिकृत भांडवल	रु.	२,००,००,०००
वसूल झालेलें भांडवल	रु.	१,००,००,०००
रिझर्व्ह फंड	रु.	१,२३,००,०००

मुख्य कचेरी: ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

मुंबईमधील शाखा : बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

इतर शाखा : अहमदाबाद (भद्र, मुख्य ऑफिस), अहमदाबाद (एलिस ब्रिज शाखा), अहमदाबाद (स्टेशन शाखा), अमृतसर, अंधेरी (मुंबई शेजारीं), वांद्रे (मुंबई शेजारीं), कलकत्ता (क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्क्वेअर), जमशेदपूर कराची, नागपूर (किंग्जवे), नागपूर (इतवारी बझार), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत, भुज (कच्छ).

लंडन एजन्ट्स : वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

डायरेक्टर्स : सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय.(अध्यक्ष), श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के. नाईट; मि. ए. गेडिस; सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, जी. बी. ई., के. सी. आय. ई., मि. दिनशा के. दाजी; श्री. रामनिवास रामनारायण.

करंट डिपॉझिट अकाउंट्स :

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर १/४% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षां कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्समध्यें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते, सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

एजंट—एच्. ए. करीमभाई

पुण्यांतील
आदर्श निवासस्थान व भोजनालय
छाया लॉजिंग व बोर्डिंग हाउस
बुधवार चौक, पुणें २.

दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.

हेड ऑफिस : पुणें शहर.
स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.
मुंबअी शाखा : दलाल स्ट्रीट, फोर्ट.
जळगांव शाखा : नवी पेठ, मेन रोड.
नागपूर शाखा : गोखले बिल्डिंग, सिताबर्डी.

भांडवल

अधिकृत व विक्रीस काढलेलें	खपलेलें	वसूल झालेलें
रु. १०,००,०००	रु. १०,००,०००	रु. ५,००,०००

एकूण खेळतें भांडवल रु. ७४,००,०००

बँकेच्या शेअरवर डिसेंबर १९४३ अखेर ४½% करमाफ डिव्हिडंड दिलें गेलें. बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदी-विक्री कसोशीनें करून दिली जाते.

बँकेनें रु. ५ प्रीमिअमनें काढलेले सर्व शेअर्स विकले गेले. विशेष माहितीसाठी भेटा अगर लिहा.

सी. व्ही. जोग,
B. Com., C. A. I. B., C. A. I. I. B.
मॅनेजर

विविध माहिती

अन्नमहामाई निदर्शक आकडे

२६ ऑगस्ट, १९३९	=	१००
१-४-१९४४	=	२३१·८
६-५-१९४४	=	२३१·४

चीनमध्यें सोन्याचा भाव तोळ्यास १३०० रुपये

चीनमधील चलनाची किंमत पार नाहींशी झाली आहे. मजुराच्या खाण्यापिण्याचा व रहाण्याचा मासिक खर्च ६५० रुपये येतो. १३०० रुपयांस एक तोळा या दरानें चिनी सरकार सर्रास सोनें विकीत आहे. एक पौंडास ८० चिनी डॉलर, अशी खरी हुंडणावळ आहे, परंतु काळ्या बाजारांत एक पौंडास ७२० चिनी डॉलर द्यावे लागतात.

दोन महिन्यांत लाचलुचपतीचे ११ प्रकार

रेलवेवरील लाचलुचपतीचे संबंधांत खटले भरले त्यांपैकीं ११ प्रकरणांत मार्च व एप्रिलमध्यें आरोपींस शिक्षा मिळाल्या, असें सरकारनें प्रसिद्ध केलें आहे.

व्हाइसरॉयसाठी रेशनकार्ड

दिल्लीमध्यें रेशनिंगला प्रारंभ होणार असल्याकारणानें, व्हाइसरॉय, लेडी वेव्हेल व त्यांची कन्या ह्या तिघांच्या नांवाचीं रेशन कार्डें देण्यांत आलीं आहेत.

" नांगर व पंप आम्ही घेऊं "

एक एकरांत हातानें चालविता येण्याजोगे नांगर ग्रेट ब्रिटननें युद्धानंतर हिंदुस्थानांत पाठवले, तर त्यांचा लाखांवारी खप होईल, असें सर फिरोजखान नून ह्यांनीं शेतीविषयक यंत्रें करणाऱ्या ब्रिटिश कारखानदारांच्या प्रतिनिधींस सांगितलें. त्याचप्रमाणें, १५ फुटांतील पाणी खेचणारे लहान पंपहि हिंदुस्थानांत पुष्कळ खपूं शकतील, अशीहि त्यांनीं माहिती दिली.

बृहन्महाराष्ट्र कॉमर्स कॉलेजला किर्लोस्कर बंधु लि. ची देणगी

वरील कंपनीस ३१ जुलै, १९४३ अखेर संपलेल्या वर्षी सुमारें ६½ लक्ष रुपये नफा झाला. त्यापैकीं ३ लक्ष रिझर्व्ह फंडांत टाकण्यांत येतील. बृहन्महाराष्ट्र कॉमर्स कॉलेजला १० हजारांची देणगी देण्याचें डायरेक्टरांनीं ठरविलें आहे.

दिल्ली शहरांत रेशनिंग

दिल्ली शहरांत २९ मे पासून गहू, तांदूळ व साखर ह्यांच्या रेशनिंगला प्रारंभ होणार आहे.

पायतणांवर नियंत्रण

कातड्याच्या कमाल किंमती सरकारनें निश्चित करून टाकल्या, तरी पायतणांचे उत्पादक भारी किंमतीनें कातडें खरेदी करतात व कातड्याच्या किंमतीचें नियंत्रण प्रभावी होत नाहीं. पायतणांच्या किंमती नियंत्रित करण्याचें सरकारनें आतां ठरविलें आहे.

" खंड-उसनवार " कायदा

खंड-उसनवार कायद्याचें आयुष्य आणखी एका वर्षानें वाढविण्यांत आलें आहे. विधिमंडळाच्या पूर्वसंमतीशिवाय अध्यक्षांनीं युद्धोत्तर लष्करी अथवा आर्थिक भानगडी उत्पन्न करणारें कृत्य करण्याकडे ह्या कायद्यानें दिलेल्या अधिकाराचा उपयोग करूं नये अशी प्रस्तुत कायद्यांत तरतूद केलेली आहे.

शेअर-बाजार

(श्री. व. वि. लोणकर, एम्. ए., बी. कॉम).

१९ मे च्या क्रॉनिकलच्या अंकांत (सर) होमी मेहतांचें एक खळबळ उडविणारें पत्र प्रसिद्ध झालें आहे. त्यांत त्यांनीं कापडाचे भाव खालीं जात असून, गिरण्यांना अनेक कारणांनी १९४४ सालीं १९४३ च्या पन्नास टक्के कमी नफे होतील असें भविष्य वर्तविलें आहे. त्याबरोबरच सध्यां गिरण्यांच्या शेअर्सचे भाव वर आहेत त्यांतून गुंतविणारांनीं विकून मोकळें व्हावें व लफंग्यांच्या नादाला लागू नये असा गंभीर इशारा दिला आहे.

वास्तविक गिरण्यांचे भाव सध्यां बरेच मंदींत आहेत. बरेच दिवसांत सुधारणा न दिसल्यानें लोक साशंक असतांना सर होमी मेहतासारख्यांच्या पत्रानें घबराट उत्पन्न होण्याची शक्यता आहे. मागील वर्षी गिरण्यांचे भाव भराऱ्या मारत असतांना व ज्या कापसाचा भाव वर आहे म्हणून नफे कमी होणार त्या कापसाचा भाव शिखरांवर असतांना सर साहेबांना अशी चेतवणी देण्याची बुद्धि कां झाली नाहीं हें समजत नाहीं. सरकारच्या कराच्या कडक आकारणीमुळें व कापडाचे आणि सुताचे भाव नियंत्रित असतां नफे कमी होणार हें बाजाराला आजच मुद्दाम सांगण्याचें कारण नाहीं. मागील वर्षीच याबद्दलचे वटहुकूम निघालेले आहेत व या वर्षीही अंदाजपत्रकांत आलेल्या करभरणीच्या पद्धतीमुळें कमी होणारे नफे सर्वांनाच समजत होते व त्या बेतानें गिरण्यांच्या शेअर्सचे भाव खालीं येऊन मंद पडले होते. मागील वर्षी १५ मे ला जरीलाचा भाव (मे) ६३२ रु. होता व या वर्षी ४१९ रु. इतका पडला आहे याच प्रमाणांत बाकीच्या कपाशीचे भाव पडलेले आहेत व याखाली भाव जाऊं देऊं नये म्हणून सरकार मधें केव्हां पडणार याची रुई बाजार वाट पहात आहे. इतके भाव खाली असतांना गिरण्यांचे या कारणानें नफे वाढावयास हवेत कां पडावयास पाहिजेत हें सर साहेबानींच सांगावें. विशिष्ट मर्यादेखालीं रुईचे भाव आपण पडूं देणार नाहीं असें सरकारनें जाहीर केलेलें आहे व ती मर्यादा पोहोंचली आहे.

इकडे पुष्कळ गिरण्यांनीं सरकारकडे सक्तीनें ठेवी ठेवल्या जात आहेत म्हणून वेगळा घसारा टाकला नाहीं व व्याजें पूर्वीच्या सहामाही इतकींच वाटलीं व कांहींनीं तर वाढवलीं सुद्धां. लवकरच सिंप्लेक्सचें व्याज येणार असून तें मागील वर्षाइतकेंच कायम येणार अशी बातमी आहे. तेव्हां जसजशीं नवीं व्याजें जाहीर होतील व तीं वेडींवांकडीं कमी नाहींत हें एकदां गुंतविणारांच्या नजरेस आलें म्हणजे सध्या घबराट माजविणारांचीं तोंडें बंद पडतील. सर्व गिरण्यांच्या ताळेबंदी परिस्थितींत दोन वर्षांत जमीनअस्मानाचा फरक पडला असून सक्तीच्या परत केल्या जाणाऱ्या ठेवींमुळें एकंदर गिरण्यांच्या धंद्याला विशेष मजबुती आलेली आहे. तसेंच मद्रास कलकत्ता हे बाजार टिकून असून हळूं हळूं वर जात आहेत. तेव्हां सर होमींचें हें पत्र म्हणजे एकादी जाणून बुजून सोडलेली 'पुडी' तर नव्हेना असा दाट संशय येतो. नाहींतर भागीदारांना तुमच्या शेअर्सचे भाव टिकून राहतील, तुमच्या संस्थांना मजबुती आलेली आहे व पैशाचा प्रचंड दाब आहे इत्यादि आश्वासनें देणारे मेयर ससून, इंडिया युनायटेड अपोलो इत्यादींचे अध्यक्ष व शेअर बाजाराचे निःपक्षपाती अध्यक्ष श्री. श्रॉफ हे वेडे तरी समजले पाहिजेत.

अनुक्रमणिका

	पृष्ठ		पृष्ठ
१ विविध माहिती ...	१६२	६ इंग्रजांचें अमेरत्व ...	१६६
२ "एकॉनॉमिस्ट"चें तर्कट	१६३	७ जर्मनी व जर्मनव्याप्त युरोप ...	१६६
३ प्रॉमिसरी नोटीचा स्टँप	१६४	८ उपायांत दिलाई नको...	१६६
४ स्फुट विचार ... चुकीची कबुली—उद्योग-धंद्यांच्या वृत्तपत्रीय जाहिराती—जंगलें, लांकूड आणि शेणखत	१६५	९ स्टर्लिंग बॅलन्सेस आणि आर्थिक पुनर्घटना ...	१६७
		१० "अधिक धान्य आयात करा" ...	१६७
५ ट्रस्टची ठेव रक्कम व बँक	१६६	११ गव्हाचा तुटवडा ...	१६७

अर्थ

बुधवार, ता. २४ मे, १९४४

"एकॉनॉमिस्ट" चें तर्कट

बिर्ला-टाटा पंचदशवार्षिक योजनेनें ब्रिटिश पत्रें गोंधळून गेल्यासारखीं दिसतात. हिंदुस्थानच्या दारिद्र्यावर ह्या योजनेसारखा तोडगा उपयोगांत आल्यावांचून कार्यभाग व्हावयाचा नाहीं हें त्यांस दिसतें. त्याचप्रमाणें युद्धोत्तर काळांत करावयाच्या पुनर्घटनेंत हिंदुस्थानांतील सरकारानें प्रचंड प्रमाणावर आर्थिक अभिवृद्धीचा प्रयत्न करणें ह्या मागसलेल्या देशांत अपरिहार्य आहे, असेंहि त्यांची मनोदेवता त्यांस सांगत असली पाहिजे. युद्धसमाप्तीनंतर हिंदुस्थानास स्वातंत्र्य देण्यास ग्रेट ब्रिटननें स्वतःस बांधून घेतलें आहे आणि स्वतंत्र हिंदुस्थानचें आर्थिक धोरण काय बनेल व त्याचे परिणाम ब्रिटिश व जागतिक आर्थिक घटनेवर कोणत्या प्रकाराचे होतील ह्याची त्यांस कल्पना येत नाहीं. ह्या देशांत आधुनिक धंद्यांची स्थापना झाल्यास त्यांची स्पर्धा ब्रिटिश कारखान्यांस भोंवल्यावांचून रहाणार नाहीं अशी भीतिहि त्यांस वाटते. ह्या भूमिकेवरून ते बिर्ला-टाटा योजनेकडे पहात असल्यानें त्यांची टीका मनोरंजक झाली आहे. इंग्लंडमध्यें "एकॉनॉमिस्ट" साप्ताहिकास आर्थिक प्रश्नांच्या चर्चेंत अत्यंत महत्त्वाचें स्थान दिलें जातें आणि त्या पत्राचे विचार शासनीय व अधिकारयुक्त असतात अशी सामान्य समजूत आहे. योजनात्मक आर्थिक धोरणाचा पुरस्कार हिंदी धंदेवाले जोरानें करीत असतां अशणे हें धोरण यशस्वी होण्यास राष्ट्रीय वृत्तीचें मध्यवर्ती सरकार स्थापन होणें अगत्याचें आहे असा आग्रह ते करीत असतां महात्मा गांधींची सुटका झाल्यानें "एकॉनॉमिस्ट" च्या विचारांत विलक्षण गोंधळ उडाला असल्याचें त्या पत्रांतील अलीकडच्या एका अग्रलेखावरून दिसतें.

केवळ प्रकृतीच्या कारणासाठीं महात्मा गांधींची मुक्तता करण्यांत आली असली तरी तिच्या मागें मोठें राजकारणहि आहे असें "एकॉनॉमिस्ट"ला वाटत आहे. कोट्यवधि हिंदी लोकांस महात्माजी वंद्य आहेत आणि ही त्यांची भावना पुढेंहि अबाधित राहील. तथापि, राष्ट्रीय जीवनाचें धुरीणत्व त्यांचे हातांतून हिरावून घेऊन स्वतः बळकावण्याचा डाव बिर्ला-टाटा कंपूनें टाकला आहे असें त्यांचें म्हणणें आहे. ह्या धंदेवाल्यांच्या योजनेंत असलेले दोष त्यानें दाखवले आहत. ती योजना जशीच्या तशी हिंदुस्थानांत कोणीच मान्य केलेली नाहीं, आणि तिच्यांतलीं वैगुण्यें हि टीकाकारांनीं दर्शविलीं आहेत. चर्चेसाठी तयार केलेला एक आराखडा आणि आर्थिक उन्नतीचें अंगुलि-दर्शन एवढेंच महत्त्व ह्या योजनेस अनेकांनीं दिलें आहे. परंतु "एकॉनॉमिस्ट"च्या लेखकाचा रोख मुख्यत्वेंकरून योजनेच्या अदृश्य राजकीय दृष्टिकोनाकडे आहे. बिर्ला-टाटा योजना अगडबंब तर आहेच; पण तिच्या मुळाशीं सामाजिक आर्थिक जीवनाचें कडक नियंत्रण आहे आणि त्यावरोबरच लोकांच्या पाठिंब्यावर आधारलेली शक्तिमान् राजसत्ता व वैयक्तिक स्वातंत्र्याचें समास ग्रहण ह्या गोष्टी गृहीत आहेत असें सार ह्या साप्ताहिकानें काढलें आहे. ह्याच्याहिपुढें जाऊन तें म्हणतें कीं, ह्याचाच अर्थ जर्मनी किंवा रशिया ह्या देशांतील झोटिंगशाहीची स्थापना असा आहे आणि ती होणें शक्य किंवा इष्ट आहे हा प्रश्न हिंदुस्थानापुढें आहे. लोकशाहीची चाड असलेल्या हिंदी पुढाऱ्यांची बिर्ला-टाटा योजनेमुळें झोपमोड होत आहे आणि उदारमतवादित्वाचा कंटाळा आलेल्या इतरांस ती पसंत पडली आहे असा शोध "एकॉनॉमिस्ट"नें लावला आहे. योजनाकर्त्यांच्या सद्हेतूविषयीं त्यास शंका नाहीं आणि युद्धपरिस्थिति त्यांस अनुकूल आहे हेंहि त्यानें दाखवलें आहे. तथापि हिंदी राजकारणाचें पुढारीपण स्वतःकडे घेऊन त्यास नवीन वळण लावण्याचा आणि जुन्या लोकशाहीच्या कल्पनांचे जागीं झोटिंगशाहीची प्रस्थापना करण्याचा त्यांचा बेत आपण उघडकीस आणल्याची भूमिका त्यानें घेतली आहे.

आर्थिक नियोजनाचा नवीन जमाना महात्मा गांधींच्या तत्त्वांशीं विसंगत आहे आणि त्यांच्या नैतिक व समाधानी वृत्तीच्या ध्येयाच्या विरुद्ध आहे; त्यांस अप्रिय असलेला जडवाद आणि ऐहिक सुखाविषयीं लालसा ह्यांचा त्यांत विजय होत आहे. हिंदुस्थानाची परिस्थिति व गरजा ह्यांस अनुसरून आर्थिक उन्नति होण्याऐवजीं राजसत्ताधिष्ठित भांडवलशाही बिर्ला-टाटा योजनेंतून बाहेर पडणार आहे असा "एकॉनॉमिस्ट" चा कयास आहे; आणि ह्या आपत्तीपासून हिंदी जनतेचें रक्षण कसें करावें ह्याची चिंता त्यास लागली आहे. लोकशाहीचे हिंदुस्थानांतील भोक्ते आपल्या भांडवलवाल्या बांधवांनीं योजलेली जनतेची पिळवणूक हाणून पाडण्यासाठी आणि त्यांनीं अमेरिकन भांडवलवाल्यांशीं सूत बांधून त्यांच्या सहायानें स्वतःचा डाव साधूं नये म्हणून इंग्लंडचें सहकार्य इच्छित आहेत. त्यांस स्वदेशांत किती वजन आहे ह्याची शंका ब्रिटिश व हिंदुस्थान सरकारांस वाटण्यासारखी आहे. तथापि, त्यांनीं ह्या पुढाऱ्यांशीं बोलणीं चालू करावीं अशी "एकॉनॉमिस्ट" ची सूचना आहे. तथापि हिंदी पुढाऱ्यांनीं प्रथम आपले अंतर्गत भेद मोडून टाकले पाहिजेत अशी अट घालण्यांत आली पाहिजे ही मेख त्या पत्रानें मारून ठाकलीच आहे. ह्याच अटीवर क्रिप्स योजनेची पुन्हां त्यांच्याशीं चर्चा चालू करावी असें त्याचें आग्रहाचें सांगणें आहे. आपली योजना लोकशाही पद्धतीस अनुसरून निवडलेल्या जबाबदार मंत्रिमंडळानें पार पाडावी अशी पंचदशवार्षिक योजनेच्या कर्त्यांची मागणी आहे ह्या गोष्टीचा त्यास विसर पडला आहे आणि महात्मा गांधींच्या तत्त्वज्ञानाविषयीं प्रेम त्यास उत्पन्न झालें आहे हें तर मनोरंजक आहे. अमेरिकन भांडवलवाल्यांची भीति त्याच्या लेखांतून स्पष्टपणानें डोकावत आहे आणि हिंदी जनते-

च्या हितापेक्षां ब्रिटिश धंदेवाल्यांच्या हिताची त्यास अधिक काळजी वाटत आहे असें कोणी म्हटल्यास तें सचित अन्यायकारक होणार नाहीं. "इकॉनॉमिस्ट"चा प्रस्तुत लेख हिंदुस्थानांतील परिस्थितीनें गोंधळलेल्या मनःस्थितीचा द्योतक आहे ह्यांत शंका नाहीं.

प्रॉमिसरी नोटीचा स्टँप

प्रॉमिसरी नोटीच्या स्टँपाबद्दल नेहमीं घोटाळा उत्पन्न होतो, तेव्हां त्यासंबंधांत लक्षांत ठेवण्यासारख्या गोष्टींची माहिती "न्यायबोध"वरून एके ठिकाणीं खाली दिली आहे.

व्यवहारांत ज्या प्रॉमिसरी नोटा होतात त्यांत साधारणतः 'मागाल त्यावेळीं पैसे देऊं' असा करार केलेला असतो. अशा प्रकारच्या नोटीस लागणारा स्टँप खालीलप्रमाणें:—

(अ) जेव्हां प्रॉमिसरी नोट २५० रुपये अगर त्यापेक्षां कमी किंमतीची असेल तेव्हां.....१ आण्याचा स्टँप.

(ब) जेव्हां प्रॉमिसरी नोट २५० रु. पेक्षां जास्त रकमेची पण १००० रु. अगर त्यापेक्षां कमी किंमतीची असेल तेव्हां.....२ आण्याचा स्टँप.

(क) जेव्हां प्रॉमिसरी नोट १००० रु. पेक्षां जास्त रकमेची असेल, तेव्हां...४ आण्याचा स्टँप. (स्टँप ॲक्ट आर्टिकल ४९).

(१) प्रॉमिसरी नोटीस जो स्टँप लावणेचा असतो तो रेव्हिन्यु तिकिटाच्या रूपांत आपणास विकत मिळतो. कागदावर प्रॉमिसरी नोट लिहून जरूर तितकीं तिकिटें त्यावर डकविणेचीं असतात.

(२) हा स्टँप लावण्याचे बाबतींत महत्त्वाचा नियम पुढें दिला आहे—

प्रॉमिसरी नोटीला नुसता स्टँप लावून कार्यभाग होत नाहीं, तर तो स्टँप रद्द करावा लागतो. प्रॉमिसरी नोट लिहून झाल्यावर ऋणकोनें सही केली, पण ही सही किंवा निशाणी आंगठा स्टँपावर केला नाहीं अगर अन्य तऱ्हेनें प्रॉमिसरी नोटीचा स्टँप रद्द केला नाहीं तर अशी प्रॉमिसरी नोट कायदेशीर होणार नाहीं.

(३) प्रॉमिसरी नोटीचा स्टँप रद्द करणें याचा अर्थ तो स्टँप पुन्हा उपयोगांत आणतां न येईल असें करणें हा होय. प्रॉमिसरी नोटेवर स्टँप चिकटवून त्यावर सही करणें, अगर आंगठेवाल्या ऋणकोचा दस्तूर बांधणें अगर तारीख घालून सहीचीं अक्षरें लिहिणें, अशा तऱ्हेनें स्टँप रद्द करतां येईल.

(४) प्रॉमिसरी नोटीस केवळ योग्य त्या किंमतीचा स्टँप लावल्यानें प्रॉमिसरी नोट कायदेशीर होते अगर पुराव्यांत ग्राह्य होते असें कोणी समजूं नये, तर स्टँप रद्द केल्याशिवाय त्या स्टँपचा उपयोग नाहीं हें लक्षांत ठेवावें. स्टँप रद्द करण्याचा उत्तम उपाय म्हणजे जितके स्टँप असतील त्या सर्वांवर मिळून ऋणकोची सही घेणें अगर आंगठा घेऊन दस्तूर घालणें.

(५) प्रॉमिसरी नोटीस योग्य स्टँप नसेल तर ती नोट पुराव्यांत ग्राह्य होत नाहीं. दस्तांत योग्य स्टँप नसेल तर दंड देऊन तो दस्त पुराव्यांत ग्राह्य करून घेतां येतो, पण प्रॉमिसरी नोटींच्या बाबतींत मात्र कायदा इतका कडक आहे कीं, अपुऱ्या स्टँपावर असलेली प्रॉमिसरी नोट वाटेल तितका दंड देऊनहीं पुराव्यांत ग्राह्य होत नाहीं.

महाराष्ट्रांत लेखी गॅरंटी देणारे
पहिले व फक्त १ च
गोल्ड मेडॅलिस्ट व मराठी वळणाचे स्पेशॅलिस्ट
पेन्टर वेडेकर, ए. जी.,
बुधवार चौक, पुणें २ (सिटी)
बाहेरगांवचीं कामें रेल्वे, मोटार अगर पोस्टानें पाठवूं.

प्रगतिपथावरील नवा
मै ला चा — द ग ड
सन १९४३ अखेर
नव्या कामांत ११० टक्के वाढ
चालू कामांत १०० टक्के वाढ
आयुर्विमानिधींत ८० टक्के वाढ
— आपला विमा किंवा एजन्सी आजच घ्या —
दि औंध म्यूच्युअल लाइफ
ॲश्युरन्स सोसायटी लि., पुणें.
आर. जी. साठे सुपरिंटेंडेंट
व्ही. जी. जोशी मॅनेजिंग डायरेक्टर

रक्तवर्धक प्रमाणेंच लोकप्रिय
दोन उपयुक्त औषधें.
ओजस् पौष्टिक पेयान्न
आबाल वृद्ध स्त्रीपुरुषांस उपयुक्त
मुलांचे करितां
अँटी ग्राइप मिक्श्चर
दांत सुलभतेनें येण्यावर व मुलांचे अपचनाचे विकारावर
केंद्रें:-मुंबई, पुणें, नागपूर, उमरावती, सांगली, कोल्हापूर, हुबळी.
पुणें मुख्य दुकान:—गणपती चौक, लक्ष्मीरोड पुणें.
आ यु र्वे द र स शा ळा
पुणें लि० पुणें ४.

स्फुट विचार

चुकीची कबुली

पंचदशवार्षिक आर्थिक उन्नतीच्या मुंबई योजनेवर भ्रममूलक टीका "एकॉनॉमिस्ट" ह्या प्रसिद्ध ब्रिटिश साप्ताहिकानें केली आहे, तिचा समाचार आम्हीं आजच्या अग्रलेखांत घेतला आहे. सदरहु योजना कित्येक बाबतींत सदोष असून प्रतिकूल टीकेस पात्र आहे. तथापि इंग्लंडमध्यें तिच्यावर घेतले गेलेले आक्षेप, दीर्घ विचाराअंतीं, समर्थनीय नाहींत असेंहि आढळून येईल ह्यांत शंका नाहीं. असें वाटण्याचें कारण "एकॉनॉमिस्ट"नें प्रथम केलेलीं विधानें मध्यंतरी प्रांजलपणानें परत घेतलीं आहेत हें होय. योजनेविषयींची अपुरी माहिती हातीं आल्याकारणानें तिच्याविरुद्ध एका वेळीं केलेलीं विधानें वस्तुस्थितीस धरून नाहींत, असें त्या पत्रानेंच म्हटलेलें आढळतें. योजनेंत शेतीचें उत्पादन वाढवणें, सामान्य जनतेची रहाणी सुधारणें, खेडेगावीं व लहान उद्योगधंद्यांची उन्नति करणें इत्यादि महत्त्वाच्या गोष्टींस योग्य स्थान देण्यांत आल्याचें त्याच्या लक्षांत आलें आहे. प्रेरक शक्ति, वहातुकीचीं साधनें, शेतीस लागणारीं खतें, लोकांच्या रोजच्या जरूरीच्या वस्तू, ह्यांच्या पुरवठ्यास इष्ट तें महत्त्व देण्यांत आलें आहे आणि राष्ट्रीय स्वयंपूर्णता व औद्योगिक संरक्षण हें योजनेचें प्रमुख अंग पूर्वी वाटलें होतें तसें नाहीं अशी "एकॉनॉमिस्ट"ची कबुली आहे. बाहेरचें भांडवल यंत्रसामुग्रीच्या खरेदीसाठी उपयोगांत आणण्याच्याहि विरुद्ध मुंबई-योजनाकर्ते नाहींत. तथापि, औद्योगिक अभिवृद्धींत सरकारचा हात किती राहील आणि खाजगी व्यक्तिगत मालकी किती असेल ह्याचा उलगडा करण्यांत आलेला नाहीं असें त्या पत्राचें म्हणणें आहे. योजनाकर्त्यांची हिंदी राष्ट्रीय दृष्टि आहे आणि जागतिक आर्थिक उन्नतीचा भाग म्हणून त्यांनीं रचना केलेली नाहीं हा तिचा दोष आहे असें म्हणतां येईल कीं काय हा प्रश्नच आहे. "एकॉनॉमिस्ट" ची दृष्टिहि आंतरराष्ट्रीय आहे तितकीच ती ब्रिटिश आहे हें नाकबूल करून चालावयाचें नाहीं. हिंदुस्थानचें दारिद्र्य नष्ट करण्यास औद्योगिक विकासाची आवश्यकता आहे आणि ही अभिवृद्धि योजनात्मक पद्धतीनें घडवून आणली पाहिजे हें दुहेरी तत्त्व मान्य झालें पाहिजे. तपशीलाचा — महत्त्वाच्या तपशीलाचा — विचार उरतो आणि त्यासंबंधांत मतभेद होणें स्वाभाविक आहे.

उद्योगधंद्यांच्या वृत्तपत्रीय जाहिराती

ह्या देशांत गिऱ्हाइकी असणाऱ्या कित्येक ब्रिटिश पेढ्यांच्या युद्धकालीन जाहिराती वाचून आश्चर्य वाटण्यासारखें आहे. ह्या जाहिराती गिऱ्हाइकांस मिठाईच्या मालाच्या नसून तूर्त माल मिळणें शक्य नाहीं असें सांगणाऱ्या असतात. आपलीं उत्पादक साधनें विशेष जरूरीच्या युद्धसामुग्री बनवण्यांत सर्वस्वी गुंतली असल्याकारणानें सामान्य गिऱ्हाइकांस त्यांचा आवडता व आपणाकडून नेहमी पुरवण्यांत येत असलेला माल सध्या विकत मिळणें शक्य नाहीं; परंतु युद्धपरिस्थिति बदलतांच पूर्वीप्रमाणें आपण स्वतःचा माल पुरवूं लागूं आणि तोंपावेतों गिऱ्हाइकांनीं दम धरावा असें ह्या जाहिराती सांगत असतात. आपल्या मालाचें नांव लोकांच्या दृष्टीसमोर रहावें आणि त्याचा खप युद्ध संपतांच पूर्ववत् चालू व्हावा हा ह्या जाहिरातींचा उद्देश असतो. बाजारांत पाठवावयास पुरेसा माल नाहीं, तेव्हां वर्तमानपत्रांतील जाहिरातींवर व्यर्थ खर्च कशाला करा? ह्या विचारानें कित्येक ब्रिटिश पेढ्यांनीं स्वतःचा वृत्तपत्रांतील जाहिरातींचा खर्च कमी केला आहे. दुसऱ्यांचा उत्पादन खर्च युद्धपरिस्थितींत वाढल्यामुळें त्यांनीं ह्या मार्गानें काटकसर केली आहे. हिंदुस्थानांत असलीच प्रवृत्ति दिसून येते. जाहिरात खर्च किती प्रमाणांत मर्यादित करावयाचा हें निरनिराळ्या धंद्यांत त्यांच्या विशिष्ट उत्पन्न-खर्चाच्या व प्रसिद्धीच्या दृष्टीनें निश्चित होणें सहाजिक आहे. उदाहरणार्थ, इंग्लंडमध्यें जाहिरात खर्चांत बेताची काटकसर करणारे धंदे साबण, दंतमंजनें, प्रसाधन सामुग्री, सिनेमा, नाटकें, औषधें व खाद्य व पेय पदार्थ ह्यांच्या संबंधांतले आहेत. बुटांच्या धंद्यानें आपला जाहिरात खर्च वाढवला आहे. पण घरगुती सामान, शिक्षण, सिगारेट्स, नियतकालिकें व वृत्तपत्रें, प्रवास, डोक्यास लावावयाचीं तेलें इत्यादि धंद्यांनीं आपला जाहिरातीवरील खर्च फार मोठ्या प्रमाणांत कमी केला आहे. जाहिरातींचा एकूण खर्च सुमारें छत्तीस कोटि रुपयांचा आठरा कोटि रुपयांवर आलेला आहे. म्हणजे तो जवळ जवळ निम्मा झाला आहे.

जंगलें, लाकूड आणि शेणखत

शेतांस शेणखताचा पुरवठा न झाल्याकारणानें जमिनीची उत्पादकशक्ति मर्यादित होते आणि शेतीचें उत्पन्न व्हावें तसें न होतां धान्याचें वगैरे उत्पन्न कमी येतें अशी तक्रार ह्या देशांत आज कित्येक वर्षे केली जात आहे. शेणाचा उपयोग खतासाठी करण्याऐवजी गोवऱ्या बनवण्याकडे होतो आणि पिकांस सकस खाद्य मिळत नाहीं. लाकडाच्या जळणाचा तुटवडा असल्यानें गोवऱ्यांस चांगली मागणी येते आणि त्या करून विकणारांस रोकड पैशाची प्राप्ती होते. एका बाजूनें हा होणारा फायदा शेतीच्या उत्पादनाचे दृष्टीनें नुकसानकारक ठरतो. जंगलांचे इन्स्पेक्टर जनरल, सर हर्बर्ट हॉवर्ड, ह्यांनीं असा हिशेब केला आहे कीं शेणाचा उपयोग जळण म्हणून न होतां तें खतासाठी वापरलें गेल्यास हिंदुस्थानांतील एकूण शेतीपैकी पंधरा टक्के जमिनीस चांगलें खत मिळूं शकेल आणि हिंदी शेतकऱ्यांचें उत्पन्न मोठ्या प्रमाणांत वाढेल. पण सरपणाच्या तुटवड्यामुळें शेणास किंमत येते आणि त्याच्या गोवऱ्या बनवल्या जातात, तो प्रश्न कसा सोडवावयाचा? लाकूड-फाट्याचा पुरवठा खेडेगावांत विपुल व स्वस्त होऊं शकेल तर हा प्रश्न सुटणें अवघड नाहीं. सर हर्बर्ट ह्यांनीं युद्धोत्तर आर्थिक अभिवृद्धीची आपली योजना तयार केली आहे तींमध्यें जंगलांचा विस्तार आणि लाकडाच्या पुरवठ्याची वाढ ह्यांचा अंतर्भाव प्रामुख्यानें करण्यांत आला आहे. प्रत्येक प्रांतांत बीस ते पंचवीस टक्के इतकी वाढ जंगलांच्या क्षेत्रांत व्हावी म्हणजे ब्रिटिश हिंदुस्थानांत एक लक्ष चौरस मैलांचें नवीन जंगल निर्माण होईल अशी त्यांची सूचना आहे. खेडेगांवांत घरें, शेतीचीं साधनें व जळण ह्यांस लागणारें लाकूड जंगलें पुरवूं शकलीं तर शेणखत शेतांस मिळेल आणि शेतीचें उत्पन्न वाढून जळणाची वृद्धात मिटेल असें त्यांचें म्हणणें आहे. हा प्रश्न राष्ट्रीय महत्त्वाचा आहे. हिंदी शेतीचें उत्पादन वाढवण्याचें अगत्य अलीकडे वेधीत सरकारांस पटलें आहे आणि युद्धोत्तर आर्थिक पुनर्घटनेंत ह्या प्रश्नास योग्य स्थान देण्यांत आलें आहे. जंगल खात्यांतील अधिकारी आणि नोकर शिकवून तयार करावे लागतील आणि त्यासाठी प्रांतिक सरकारांस जरूर त्या शिक्षणसंस्थांची व त्यांवरील खर्चाची सोय करावी लागेल. हा खर्च उत्पादक स्वरूपाचा होईल ठरेल ह्यांत शंका नाहीं. जंगल खात्याच्या व जंगलांच्या क्षेत्राचा विस्तार करण्याचा कार्यक्रम युद्धोत्तर काळावर ढकलण्याचें कारण नाहीं. तो उपक्रम त्वरित हातीं घेतला जाणें आवश्यक आहे.

ट्रस्टची रक्कम ठेव म्हणून स्वीकारणाऱ्या बँकेवरील जबाबदारी

मद्रास हायकोर्टाचा एक निवाडा.

नायर मॉडर्न बँक लि., पाटवट हा बँकेनें त्रावणकोर नॅशनल अँड क्विलॉन बँक लि. मध्यें ६,५०० रुपये मुदतबंद ठेव म्हणून ठेवले होते. नायर मॉडर्न बँकेनें आपल्या नोकरांकडून जामीनदारीसाठी घेतलेली ही रक्कम होती. अशी रक्कम शेड्यूल्ड बँकेत एका वेगळ्या खात्यांतच ठेवली पाहिजे, असें कंपनी कायद्याचें २८२ व हें कलम सांगतें व त्याप्रमाणें त्रावणकोर बँकेत "नोकरांची रोख जामीनदारी" नांवाचें वेगळें खातें नायर बँकेकडून उघडण्यांत आलें होतें. पुढें त्रावणकोर बँक बंद झाली व नायर मॉडर्न बँकेनें तिच्या लिक्विडेटरांवर दावा आणून रकमेची मागणी केली. नायर मॉडर्न बँक ही वरील ६,५०० रुपयांकरितां ट्रस्टी होती व त्रावणकोर बँकेनें हें माहीत असूनच ठेव स्वीकारली, त्या अर्थी त्रावणकोर बँक ही नायर मॉडर्न बँकेच्या नोकरांच्या पैशाचीहि ट्रस्टी झाली, असा वादीतर्फे युक्तिवाद करण्यांत आला. त्रावणकोर बँकेच्या लिक्विडेटरांनीं अर्थातच ही भूमिका मान्य केली नाहीं. वादीनें ठेवलेली रक्कम वादीच्या इतर ठेवींपासून अलग राहावी, एवढाच त्या रकमेच्या ठेवीस " नोकरांची रोख जामीनदारी " हें नांव देण्यांत उद्देश होता, असें प्रतिवादीतर्फे सांगण्यांत आलें.

"ठेवीदार हा ट्रस्टी आहे व ठेवलेली रक्कम हा ट्रस्टचा पैसा आहे, एवढ्यानें बँकर व ठेवीदार ह्यांचेमधील नेहमीचें देणेकरी व घेणेकरी हें नातें नाहींसें होत नाहीं; ठेव ही ट्रस्टच्या पैशाची आहे, असें ठेव स्वीकारणाऱ्या बँकेस माहिती करून दिलें तर ट्रस्टीनें ट्रस्टविरुद्ध वर्तन करण्याच्या प्रयत्नांत सामील होऊं नये एवढेंच बँकेवर बंधन आहे." असा ह्या संबंधांत मद्रास हायकोर्टाचा निवाडा झाला आहे. अर्थात्, वादीचा दावा यशस्वी झाला नाहीं.

जगांतील भाषांत इंग्रजीचें अग्रेसरत्व

जगांतील प्रमुख भाषा व त्या बोलणारांची संख्या ह्याविषयीं आकडे खालीं दिले आहेत :—

	कोटि		कोटि
इंग्रजी	२६	जपानी	७½
हिंदुस्थानी	१६	फ्रेंच	७
रशियन	१४½	बंगाली	६½
स्पॅनिश	११½	इटालियन	५½
जर्मन	९½	पोर्तुगीज	५

४० कोटि चिनी लोक मिळून चिनी भाषेचे ९ प्रमुख प्रकार बोलतात. लिपी मात्र सर्व चीनमध्यें एकच आहे.

इंग्रजी भाषेचें प्रभुत्व सर्वत्र आढळतें. ७० कोटि लोकांवरील सरकारांची भाषा इंग्रजीच आहे. जगांतील तीन चतुर्थांश पत्रें इंग्रजींत लिहिलेलीं असतात व निम्मी वृत्तपत्रें इंग्रजी भाषेंतीलच आहेत. रेडिओवरील कार्यक्रम जाहीर करणारांपैकीं शेंकडा ७५ इंग्रजींतूनच बोलतात. दोनशें वर्षांपूर्वी इंग्रजीचें एवढें प्रस्थ नव्हतें, परंतु व्यापार व वसाहती ह्यांच्या वाढीबरोबर इंग्रजी ही जगाची व्यापारी भाषा बनली. अमेरिकेनें इंग्रजी भाषाच पत्करली, व शास्त्रीय व इतर ज्ञानाच्या फैलावास इंग्रजी भाषेचा प्रसार उपयुक्त होणें क्रमप्राप्तच झालें. इंग्रजी भाषेंत आतां ७,००,००० शब्द आहेत.

गेल्या वर्षांतील जर्मनी व जर्मनव्याप्त युरोप

जर्मनव्याप्त युरोपचें क्षेत्र लहान झालें असून जर्मनीस सर्व बाजूंनीं स्वतःचा आणि आपल्या शहरांचा अविरत बॉंबहल्ल्यांपासून बचाव करावा लागत आहे. युद्धोपयोगी महत्त्वाचे कारखाने पश्चिम जर्मनींतून इतर ठिकाणीं हलवणें भाग पडलें. युरोपांतील शेतीचीं व औद्योगिक उत्पादनाचीं प्रमुख केंद्रें जर्मनीच्या वर्चस्वासालीं होतीं. जर्मन प्रजाजन व परदेशांतून आणलेले लोक ह्यांवर कामाचा भयंकर ताण पडला. तथापि कच्चा माल, दारूगोळा, शस्त्रास्त्रें, युद्धसाहित्य, इत्यादींचा निर्णायक ठरण्याजोगा तुटवडा दिसून आला नाहीं. हवाईहल्ल्यांचा आणि लोक व लष्कर ह्यांच्या प्रचंड हालचाली ह्यांमुळें उत्पादनास अडथळा आला.

परदेशांतून आणलेल्या कामगारांच्या संख्येंत १९४३ सालीं ४० लक्षांची भर पडली. युद्धकैदी व परदेशी कामगार मोजले तर आतां १ कोटि, २० लक्ष विदेशी कामगार जर्मन प्रभुत्वासालीं काम करीत आहेत. वृषअक्षर मनुष्यबळावर बराच ताण पडलेला दिसून आला. जर्मनींत व बाकीच्या बहुतेक देशांत रोटचांचें रेशन वाढवून तें, कांहीं ठिकाणें वगळलीं असतां, युद्धाच्या पहिल्या वर्षांच्या रेशनइतकें करण्यांत आलें. बटाटे व भाज्या ह्यांचें पीक मात्र कमी आलें. कोळसा, लोखंड व पोलाद ह्यांचें उत्पादन टिकून राहिलें. कार्यक्षमतेच्या स्पर्धा व कामांत सुधारणा आणि कच्च्या मालाची बचत ह्यासंबंधांत सूचना मागविणें विशेष जोमानें चालू होतें. १९४३ सालीं जर्मनीनें नवे कर बसविले नाहींत. जर्मन राष्ट्रीय कर्ज मात्र भरमसाट वाढलें. तटस्थ राष्ट्रांकडे निर्गत वाढविण्याची जर्मनीनें शिकस्त केली.

" प्लेग कमी झाला, म्हणून प्रतिबंधक उपायांत ढिलाई नको "

१९४१ सालाच्या मानानें १९४१ सालीं मुंबई प्रांतांतील मृत्युसंख्या २३,१८९ नें कमी भरली. जनन संख्याहि ३८,३८६ नें कमी भरली. जननाची नोंद व्यवस्थेशीर होत नसल्याकारणानें, वरील आकड्यांवरून विशेष निष्कर्ष काढणें योग्य होणार नाहीं. १९४२ सालीं एकूण ७,२४,७२६ जन्म नोंदले गेले. खेड्यांत व शहरांत जननाचें प्रमाण अनुक्रमें ३६·३७ व २७·३४ असें पडलें. प्लेगनें फक्त ६८० बळी घेतले; १९४१ सालीं ५,३११ लोकांस प्लेगनें मृत्यु आला होता. " १९३६ ते १९३८ ह्या मुदतींत प्लेगचें प्रमाण उतरतें होतें. १९३९ सालीं प्लेगचा फैलाव जास्त झाला व १९४० सालीं त्यानें शिखर गाठलें. १९४१ ह्या वर्षीं थोडी सुधारणा झाली. व १९४२ मध्यें तर प्लेग पुष्कळच आटोक्यांत होता. हें उतरतें प्रमाण येतीं कांहीं वर्षे कायम राहील अशी अपेक्षा आहे. परिस्थिति सुधारली, कीं स्थानिक स्वराज्य संस्था प्लेगप्रतिबंधक इलाजांत ढिलाई करतात व त्यामुळें पुनः प्लेगला जोर लागण्यास भूमिका तयार होते आणि एकदम प्लेग वाढलेला दिसतो. " असें सरकारी अहवालांत म्हटलें आहे.

रेल्वेची वाढती वहातुक

जी. आय. पी. रेल्वेनें १९४२-४३ मध्यें, १९३९-४० च्या मानानें ३३% जास्त मालाची व ३६% जास्त उतारूंची वहातूक केली.

स्टर्लिंग बॅलन्सेस आणि आर्थिक पुनर्घटना

(ले:—श्री. म. रं. जोग)

युद्धामुळें अनेक तऱ्हेचा पक्का माल इंग्लंडमधून हिंदुस्थानांत यावयाचा थांबला आहे त्यामुळें इंग्लंडला त्याबद्दल यावी लागणारी किंमत हिंदुस्थान सरकारला सध्यां यावी लागत नाहीं. इतकेंच नव्हे तर ब्रिटन व अमेरिका हिंदुस्थानांत अनेक तऱ्हेचा पक्का व कच्चा माल खरेदी करीत आहेत त्यामुळें हिंदुस्थानचा कर्ज-बाजारीपणा नष्ट झाला व इंग्लंडलाच आतां हिंदुस्थानचें देणें झालें आहे.

याचा अगदीं लगतचा परिणाम म्हणजे हिंदुस्थान सरकारला दरवर्षी व्याज म्हणून यावी लागणारी रक्कम आतां देण्याचें कारण नाहीं. पण या घटनेकडे दुसऱ्या दृष्टीनें अनेक लोक बघत आहेत. हिंदुस्थानांतील प्रमुख आठ औद्योगिक नेत्यांनीं तयार केलेल्या योजनेंत या स्टर्लिंग शिलकेचा विचार केला आहे. सध्यां ही शिल्लक जवळ जवळ साडेसातशें कोटी रुपये आहे व युद्ध संपेपर्यंत ही शिल्लक १ हजारपर्यंत जाईल. वर उल्लेखिलेल्या योजनेंत १० हजार कोटी रुपये खर्च केला जाईल. त्यापैकीं १/३ भाग ह्या शिल्लकेंतून मिळेल अशी अपेक्षा आज व्यक्त केली जाते.

पण मुख्य प्रश्न असा आहे कीं युद्धोत्तर कालांत ही शिल्लक आतां म्हटल्याप्रमाणें उपयोगांत आणणें शक्य होईल कां ? या दृष्टीनें पुढील बाबींचा विचार केला पाहिजे.

(१) जसजसें युद्ध हिंदुस्थानच्या जवळ जवळ येऊं लागलें आहे तों तों दोस्तांच्या हिंदुस्थानांतील सैन्यसंख्येंत वाढ होत आहे. जपान्यांना तोंड देण्यासाठीं फारच मोठी रक्कम खर्च होत आहे. हा खर्च कुणी सोसायचा ? यांतील कांहीं भाग तरी निदान हिंदुस्थानसरकारला यावा लागेल व तो या स्टर्लिंग शिल्लकेंतून दिला जाईल. यामुळें ही रक्कम कमी होईल.

(२) युद्धोत्तर कालांत पौंडाची किंमत कमी होणार हा जणूं काय नियमच ठरून गेला आहे. त्यामुळेंही हिंदुस्थानची स्टर्लिंग शिल्लक कांहीं कमी होईल. पण या बाबतींत ब्रिटनशीं हिंदुस्थान सरकारनें करार करणें योग्य होईल. असा करार अर्जेंटिनानें इंग्लंडशीं केला आहे व या घसाऱ्यामुळें होणारें नुकसान अर्जेंटिनाला सोसावें लागणार नाहीं.

(३) युद्धोत्तर कालांत इंग्लंडनें हिंदुस्थानमधील बाजारपेठ परत मिळवण्याचा चंग बांधला आहे. ब्रिटिश कारखानदारांना तशा तऱ्हेचें आश्वासन मिळालें आहे. त्या दृष्टीनें आतांपासून प्रयत्न सुरू झाले आहेत. आतांपासून उपभोग्य वस्तूंची आयात सुरू केली गेली आहे. याविरुद्ध असेंब्लींतसुद्धां ओरड झाली आहे.

(४) युद्धामुळें प्रत्येक देशांतील कारखाने युद्धोपयोगी माल तयार करीत आहेत. युद्ध संपल्याबरोबर यांचें उत्पादन थांबेल व उपभोग्य वस्तूंचा पुरवठा करण्याच्या दृष्टीनें प्रयत्न सुरूं होतील. पण या गोष्टीला कांहीं काळ लागेल व त्या काळांत उत्पादक वस्तूंसाठीं मागणी फार वाढेल त्यामुळें त्यांच्या किंमती भयंकर वाढतील. हिंदुस्थानच्या औद्योगिक पुनर्घटनेसाठीं लागणारी मशिनरी हिंदुस्थानला अत्यंत महाग पडेल.

(५) एक वेळ जास्त किंमत द्यावी लागली तरी चालेल, पण ती किंमत देऊनसुद्धां ह्या उत्पादक जिनसा मिळण्याची खात्री देतां येणार नाहीं. त्यासाठीं निरनिराळ्या राष्ट्रांत व्यापारी तह आतांपासून होऊं लागले आहेत. या दृष्टीनें हिंदुस्थान सरकारनें कोणतीच महत्त्वाची हालचाल केली नाहीं.

ह्या सर्व मुद्यांचा विचार केला तर सहज लक्षांत येईल कीं, सध्यां सांचलेल्या स्टर्लिंग शिलकेवर विसंबून चालणार नाहीं, या शिलकेचा चांगल्या तऱ्हेनें युद्धोत्तर काळांत उपयोग करून घ्यावयाचा असेल तर खालील तीन गोष्टी करणें अत्यंत जरूर आहे.

(१) कच्च्या आणि पक्क्या मालाचा ब्रिटनला व इतर दोस्त राष्ट्रांना पुरवठा करतांनाच पौंडाच्या घसाऱ्याचा या कर्जावर कांहीं परिणाम होणार नाहीं अशी हमी मागून घेणें.

(२) उपभोग्य वस्तूंची आयात थांबवणें व या आयातीमुळें ही शिल्लक कमी होणार नाहीं, अशी दक्षता घेणें.

(३) उत्पादक वस्तू उत्पादन करणाऱ्या इतर राष्ट्रांबरोबर व्यापारी तह करून युद्धोत्तर कालांत उत्पादक वस्तू आपल्याला मिळतील अशी व्यवस्था करणें.

या तीन गोष्टींचा यशस्वी अवलंब केला तरच या शिलकेचा कांहीं उपयोग होईल. एरवीं नाहीं.

" अधिक धान्य आयात करा "

धान्याविषयक धोरण सुचविणाऱ्या " फूड ग्रेन्स पॉलिसी कमिटी "नें, धान्याची आयात करून ५ लक्ष टन धान्याचा साठा तयार करावा व नेहमीची हिंदी मागणी पुरी पाडण्यासाठीं दरसाल १० लक्ष टन धान्याची आयात करण्यांत यावी, अशी शिफारस केली होती. जानेवारी १९४४ अखेरच्या १३ महिन्यांत हिंदुस्थान सरकारनें फक्त १,६४,००० टन धान्याचीच आयात केली. जीवनोपयोगी इतर वस्तूंच्या आयातीस आगबोटींत जागा देण्यांत येते, ती वास्तविक धान्यास अगोदर मिळाली पाहिजे, व कमिटीनें सांगितलेल्या आयातीचा आंकडा सरकारनें पुरा केला पाहिजे, असें फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स अॅन्ड इंडस्ट्रीच्या कमिटीनें हिंदुस्थान सरकारास लिहून कळविलें. सध्यां शक्य होईल तेवढी धान्याची आयात आम्हीं करीत आहों, असें त्यास सरकारनें उत्तर पाठविलें आहे.

गव्हाचा जागतिक तुटवडा ?

" उत्तर अमेरिका खंडांतील येत्या बारा महिन्यांतील शेतीचा संबंध जगांतील लोकांच्या जीवनावर कित्येक वर्षे परिणाम होणार आहे. अमेरिका देश गव्हाची निर्गत करीत असे; तोच आतां रोटीसाठीं नाहीं, परंतु इतर कारणांसाठीं मोठ्या प्रमाणावर त्याची आयात करूं लागला आहे. सध्यांच्या पद्धतीनें गव्हाचा उठाव तेथें चालू राहिला, तर अमेरिकेंतील साठा संपुष्टांत येऊन त्यास कनेडिअन गव्हावर अवलंबून रहावें लागेल. अर्जेंटिना व ऑस्ट्रेलिया ह्यांची निर्गत संबंध जगास पुरी पडणार नाहीं व उत्तर अमेरिका खंडांतील सध्यांची प्रवृत्ति थांबविण्याची व्यवस्था करणें हाच गव्हाचा तुटवडा पडूं न देण्याचा उपाय आहे. " मँचेस्टर गार्डिअन पत्रानें वरीलप्रमाणें भयसूचना दिली आहे.

हिंदुस्थान सरकारचें कस्टम्सचें उत्पन्न

	लक्ष रु.
एप्रिल १९४३	२९७
मार्च, १९४४	६६२
एप्रिल १९४४	४३९

पुना गेस्ट हाऊस

१००, लक्ष्मी रोड, पुणें २.

Telephone 779

GUEST HOUSE

TELEGRAM Guest House Poona 2.

स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

गिरगांव मुंबई नं. ४

महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

सध्यांच्या टंचाईच्या काळांत जीवनद्रव्यें कमी पडतात.
जीवनद्रव्यांनीं (Vitamins) युक्त असे
(सर्वत्र खात्यानें मान्यता दिलेले)

टोमॅटो केचप (गोड) व

टोमॅटो सॉस [तिखट व आंबट]

आजच मागवा व जीवनद्रव्यांची वाटणारी उणीव भरून काढा.

रुरल प्रॉडक्टस कंपनी लि. पुणें

बिझिनेस ऑफिस: ९१३ अ सदाशिव, पुणें २.

'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

दत्त कंपनी

७३५ शुक्रवार पेठ, पुणें २. दाणेआळी पोलिसचौटाजवळ
सर्व तऱ्हेचे काटे, वजनें व मापें, वेळेवर
रिपेअर करून मिळतील.

न्यू इंडिया इंडस्ट्रीज लि.

(Approved Re-traders and Approved Contractors)

२६ लॅमिंग्टन नॉर्थ, मुंबई ११.

अध्यक्ष:—श्री. ग. स. मराठे, ॲक्चुअरी.

महाराष्ट्रांतील रबराचा प्रमुख कारखाना

★ गिरणीचे रोलर्स ★ रबरी हातमोजे ★ छापखान्यांचे रोलर्स
★ रीमोल्ड टायर्स ★ रबरी वॉशर्स ★ सॉलिड व्हील्स

व इतर रबरी माल तयार होतो.

पु. ग. मराठे
मॅनेजिंग डायरेक्टर.

हें पत्र पुणें, पेठ शनवार पो. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' शनवार, पो. नं. ९२७।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
(टपाल खर्चासह माफ)
किरकोळ अंकास
दोन आणे.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति। —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष १० पुणें, बुधवार, तारीख ३१ मे, १९४४ अंक २२

★ नगर बाँबे ट्रेडिंग कंपनी ★
चिनाब, लाइमज्यूस कॉर्डीअल, ऑरेंज व लेमन स्क्वॉश, टोमॅटो सॉस,
मँगो जॅम, मध, कोको, बेकिंग पावडर, सॅनिटरी टॉवेल्स्
टुथ पेस्ट, टुथ ब्रश, वगैरे मालाचे
स्टॉकिस्ट.
शाखाः— हेड ऑफिसः—
माणिक चौक, अहमदनगर ★ पूना गेस्ट हाऊस, पुणें २

पुण्यांतील
आदर्श निवासस्थान व भोजनालय
छाया लॉजिंग व बोर्डिंग हाऊस
बुधवार चौक, पुणें २.

॥ दत्त कंपनी ॥
७१५ शुक्रवार पेठ, पुणें २. दाणेआळी पोलिसगेटाजवळ
सर्व तऱ्हेचे काटे, वजनें व मापें, बेळेवर
रिपेअर करून मिळतील.

पुना गेस्ट हाऊस
१००, लक्ष्मी रोड, पुणें २.
Telephone 779
GUEST HOUSE
TELEGRAM Guest House Poona 2.

स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.
गिरगांव मुंबई नं. ४
महिंद्रकर ब्रदर्स
तयार कपड्याचे व्यापारी
बुधवार चौक, पुणें

विविध माहिती

नाशीक शहरांत गुमास्ता कायदा

गुमास्ता कायद्याची नाशीक शहरांत अंमलबजावणी १ जूनपासून सुरू होईल, असें सरकारनें जाहीर केलें आहे. नाशीक म्युनिसिपॅलिटीच्या हद्दींत तो कायदा लागू करण्यांत येईल.

ट्रेझरी बिलांवर ६ आ. १० पै व्याज

हिंदुस्थान सरकारची ४ कोटि रुपयांची ट्रेझरी बिलें गेल्या आठवड्यांत टेंडरें मागवून विकण्यांत आलीं. त्यांवर व्याजाचा सरासरी दर द. सा. द. शे. ६ आणे १० पै इतका पडला.

म्हैसूर सरकारचें १९४४-४५ चें अंदाजपत्रक

उत्पन्न	...	८ कोटि रुपये
खर्च	...	७ कोटि, ९८ लक्ष रुपये
बाढावा	...	२ लक्ष रुपये

बंगलोर शहराच्या इंप्रूव्हमेंट ट्रस्टच्या योजनेकरितां बजेटांत मोठी तरतूद केलेली आहे.

सुपरव्हिजन बोर्डाची मुदतवाढ

सहकारी सोसायटयांच्या प्रांतिक सुपारव्हिजन बोर्डांत रजिस्ट्रार (अध्यक्ष), श्री. आर. जी. सरय्या व श्री. बी. व्ही. जाधव हे तिघेजण आहेत. बोर्डाची मुदत २५ नोव्हेंबरपर्यंत वाढविण्यांत आली आहे.

९०% शहरी जनता रेशनिंगखाली येणार

मुंबई प्रांतांत शहरांतून रेशनिंग सुरू करण्याची योजना पुरी झाली, म्हणजे शेकडा ९० शहरी लोक तिच्या अमलाखाली येऊन ५० लक्ष लोकांस वाटप पद्धतीनें धान्य मिळूं लागेल.

चीनला युद्धसामुग्रीचा पुरवठा

सध्याच्या कर्ज-उसनवार पद्धतीनें अमेरिका रशियाकडे पुष्कळ युद्धसाहित्य पाठवीत आहे. युरोपांतील युद्ध संपल्यावर, हें साहित्य रशियानें अमेरिकेस परत करावयाचें आहे. इतक्या दूर तें पाठविण्यापेक्षा चीनमधील संयुक्त राष्ट्रांच्या केंद्रांकडे तें धाडणें सोईचें होईल व असें करण्यांत रशिया-जपान तटस्थता कराराचा भंग होणार नाहीं, असें अमेरिकेंत मत व्यक्त करण्यांत आलें आहे.

अमेरिकन व ब्रिटिश नागरिकांचें अन्न

अमेरिकन नागरिकाचे मानानें ब्रिटिश नागरिकास सध्या फक्त ७६% दूध, ७६% मांस, ६८% कोंबड्या व मासे, आणि ५६% अंडीं एवढेंच अन्न मिळतें. ग्रेट ब्रिटनमध्यें मिळणारीं अंडीं वाळवलेल्या पुडीच्या स्वरूपांतच मुख्यतः असतात.

मुंबई प्रांतांतील औद्योगिक वांधे

मुंबई प्रांतांत फेब्रुवारी १९४४ मध्यें २५ औद्योगिक वांधे झाले, त्यांत ११,०५२ कामगारांचे कामाचे १९,३२७ दिवस बुडाले.

८ जून रोजीं सुटी नाहीं

बादशहांचा वाढदिवस कोणत्या दिवशीं साजरा करावयाचा हें दरवर्षी ठरविलें जातें. ८ जून रोजीं ह्या वाढदिवसानिमित्त सुटी जाहीर करण्यांत आली होती. परंतु ह्या वेळीं कोणतेहि समारंभ होऊं नयेत अशी इच्छा बादशहांनीं व्यक्त केली आहे. त्या दिवशीची सुट्टी रद्द करण्यांत आली आहे.

हिंदुस्थान अमेरिकेचें गिऱ्हाईक बनणार

"राजकीय घडामोडींमुळें हिंदी बाजारपेठेवरील ब्रिटिश पकड कमी झाली आहे व ब्रिटिश कारखानदार आणि अधिकारी ह्यांचे संबंधीं प्रतिकूल मत झाल्यामुळें जुने व्यापारी संबंध तुटावे जात आहेत. विगर-ब्रिटिश कंपन्यांचें प्रतिनिधित्व स्वीकारण्यास हिंदी व्यापारी तयार आहेत, इतकेंच नव्हे तर ते उत्सुक आहेत. ब्रिटिश व्यापारी व कारखानदार ह्यांचेकडून आजवर यंत्रसामुग्री व माल घेणाऱ्या हिंदी कारखानदारास बदल मिळाला तर हवा आहे. परराष्ट्रीय व्यापाराचे दृष्टीनें हिंदुस्थान आजवर महत्त्वाचा नसला, तर ह्यापुढें अमेरिकन मालाची मोठ्या प्रमाणावर तो खरेदी करील, असा रंग दिसतो.":-अमेरिकेंतील हिंदी व्यापारी प्रतिनिधि, मि. अहमद ह्यांचें न्यूयॉर्कमध्यें भाषण.

ऑस्ट्रेलियानें पाठविलेला गहू व कणीक

२२ मे, १९४४ अखेर संपलेल्या बारा महिन्यांत ऑस्ट्रेलियानें हिंदुस्थानकडे २,९५,००० टन गहू व ३६,००० टन कणीक ह्यांची निर्गत केली.

अन्नाची महागाई कमी होत चालली!

हिंदुस्थान सरकारचे अन्न महागाई निदर्शक ताजे आकडे अन्नाची महागाई कमी झाल्याचें दर्शवितात:—

२६ ऑगस्ट १९३९	१००
एप्रिल, १९४४ ची सरासरी	२३३·७
६ मे, १९४४	२३१·४
१३, १९४४	२२५·७

चणा, चहा व गूळ ह्यांची किंमत घटली त्यामुळें ६ ते १३ मे ह्या मुदतींत महागाई निदर्शक आकडा खाली गेला.

बँक ऑफ इंग्लंडचें २५० वें डिव्हिडंड

बँक ऑफ इंग्लंडनें २५ मार्च, १६९५ रोजीं आपलें पहिलें सहामाही डिव्हिडंड जाहीर केलें. २३ मार्च, १९४४ रोजीं बँकेनें आपलें ५०० वें सहामाही डिव्हिडंड जाहीर केलें! ह्या दोन्ही वेळचें डिव्हिडंड ६% च असलें तर त्याचा दर नफ्याप्रमाणें वेळोवेळ बदलत आलेला आहे. गेल्या महायुद्धापासून बँकेचा कारभार मुख्यतः सरकारी ट्रेझरीचें काम, कर्जाची व्यवस्था, नोटा काढणें, सरकारची व इतर बँकांची प्रमुख बँक म्हणून काम करणें, इत्यादि स्वरुपाचाच आहे व तेव्हांपासून डिव्हिडंडचा दर ६% (वजा कर) असाच राहिलेला आहे. हा दर कायम राहील, त्यांत बदल होणार नाहीं, हें सर्वजण गृहीत धरूनच चालतात, त्यामुळें बिनमुदती सरकारी रोख्यांचेंच बँकेच्या भागांस स्वरूप प्राप्त झालें आहे. बँकेच्या भागीदारांची संख्या १७ हजार आहे व त्यांपैकीं १० हजारांजवळील भाग एकूण ५०० पौंडांपेक्षां कमी रकमेचे आहेत. बँकेस लवकरच २५० वर्षे पुरीं होतील.

रिझर्व्ह बँकेच्या चलनी नोटा

(१२ मे, १९४४ चे आकडे)

रिझर्व्ह बँकेच्या एकूण ९१० कोटि रुपये किंमतीच्या चलनी नोटा प्रसारांत असून ११ कोटि रुपये किंमतीच्या चलनी नोटा बँकेच्या बँकिंग खात्यांत आहेत. त्यांस तारण ४४ कोटि ४१½ लक्ष रुपयांचें सोनें, ८०५ कोटि रुपयांचे स्टर्लिंग रोखे, ५८ कोटि, ३३ लक्ष रुपयांचे हिंदुस्थान सरकारचे रोखे व १३ कोटि, ९५ लक्ष रुपयांचीं नाणीं हीं आहेत.

अनुक्रमणिका

	पृष्ठ
१ विविध माहिती ...	१७०
२ सेंट्रल आणि अर्बन बँका	१७१
३ रासायनिक खतांचें उत्पादन ...	१७२
४ शेअर बाजार ...	१७२
५ सहकार व यात्रेकरूंची सोय	१७२
६ स्फुट विचार ...	१७३
कापडाच्या चोर बाजारावर	
मोहीम-सहकारी संघटनाचा	
उपयोग-आंतर राष्ट्रीय चलन	
व्यवस्था-पैशाची वर्गावर्गी	पृष्ठ
७ "बचत करा" मोहीम	१७४
८ तरुणांचे विवाह व अपत्यें	१७४
९ मंदीशी पाळण्याचा धंदा	१७४
१० सर ज. मदन यांची मेट	१७५
११ शेंगा विक्रीस मार्केट ॲक्ट ...	१७५
१२ इन्स्टिटयूटच्या चेअरमनची मेट	१७६
१३ लॉटरी कर्ज ...	१७६

अर्थ

बुधवार, ता. ३१ मे, १९४४

सेंट्रल आणि अर्बन बँका ह्यांचे परस्पर संबंध

सरकारचा महत्त्वाचा निर्णय

वैयक्तिक स्पर्धेच्या रगाड्यामध्यें आर्थिक बाबतींत दुर्बल असणाऱ्या लोकांचा टिकाव लागत नाहीं आणि ते बहुसंख्य व कष्टाळू असले तरी त्यांस असल्या झगड्यांत हार खावी लागते. सहकारी संघटन हा ह्या प्रकारच्या दुर्बलांच्या असाहयतेवर योजण्यांत येणारा यशस्वी तोडगा आहे. तथापि सहकारी संघटनांत श्रमविभागाच्या तत्त्वानुसार निरनिराळे घटक असतात आणि कांहीं बाबतींत त्यांचेमध्येंहि स्पर्धा उत्पन्न होते आणि त्यांचें घर्षण जाचक होऊं लागतें. ह्या परिस्थितीवरचा उत्कृष्ट उपाय सहकारी तडजोड हाच आहे हें उघड आहे. उत्पादन, विक्री, खरेदी, कर्जे देणें व कर्जे घेणें इत्यादि अनेकविध आर्थिक व्यवहार कारभाराच्या सोयीसाठी स्वतंत्र रीतीनें निरनिराळ्या सहकारी संस्थांस चालवावे लागतात आणि त्यांमध्यें हितसंबंध परस्परविरोधी आहेत असें दिसून येतें. उदाहरणार्थ, उत्पादनास वाहिलेल्या संस्थांस आपल्या मालाच्या अधिकांत अधिक किंमती मिळाव्या असें वाटतें तर तो माल खरेदी करणारांस त्याची स्वस्ताई इष्ट असते. त्याचप्रमाणें, कर्ज घेणारी सोसायटी आणि तें देणारी बँक यांचेमध्यें व्याजाचे दराचे बाबतींत विरोध आहे असें दिसतें. अशा परस्पर विरोधी भासणाऱ्या व्यवहारांत अखेर "जगा आणि जगवा" ह्या तत्त्वाचा आश्रय करावा लागतो आणि विरोधी अपेक्षांच्या तडजोडीनें मेळ घालावा लागतो. अल्प प्राप्तीच्या लोकांनीं स्वतःच्या सोयीसाठी सहकारी संस्था चालवलेल्या असल्याकारणानें सर्वांचेंच अधिकांत अधिक हित होईल अशा रीतीनें परस्परांच्या व्यवहारांचे संबंध निश्चित करावयाचे असतात. सहकारी संघटनांतल्या अंतिम सत्ताधाऱ्यांनीं ह्या तत्त्वाच्या तडजोडीस उत्तेजन आणि मान्यता दिली पाहिजे.

एकाच क्षेत्रांत काम करणाऱ्या दोन निरनिराळ्या सहकारी संस्थांमध्यें उत्पन्न होणाऱ्या विरोधाचें एक ठळक उदाहरण म्हणून जिल्हा सेंट्रल बँका आणि अर्बन बँका ह्यांच्यामधील मतभेदाकडे बोट दाखवतां येईल. सेंट्रल बँकेचें कार्यक्षेत्र सबंद जिल्हा हें असतें आणि तिला तालुक्याच्या व इतर लहानमोठ्या गावांत मांडवळ व ठेवी जमा करतां येतात. तिच्या मांडवळाचा व्याप मोठा असतो आणि शेकडो शेतीपेढ्यांस कर्जे देण्याचा व्यवहार करतां येऊन नफ्याचें साधन तिच्या हातीं असतें. तथापि, ह्या व्यवहारामुळें कर्जाच्या सुरक्षितपणाचे बाबतींत तिच्यावर जबाबदारीहि मोठी असते. पैशाच्या सौकर्यामुळें अर्बन बँका व इतर सहकारी संस्था ह्यांची ती मध्यवर्ती बँक बनते. शेतीचा धंदा अनिश्चित असतो म्हणून सेंट्रल बँकेचीं प्राथमिक सोसायट्यांकडून येणारीं कर्जे थकतात आणि बुडतात. एवढ्यासाठी तिचे व्यवहार मोठ्या प्रमाणावर चालणें आवश्यक होतें. व्यक्तींस कर्ज देणें ह्या वर्गातील बँकेच्या क्षेत्रांत येत नाहीं. तरीहि युद्धापूर्वीच्या मंदीच्या दिवसांत हे व्यवहार विशिष्ट मर्यादेंत करण्याची मुभा तिला देण्यांत आली आणि वाढलेल्या ठेवींचा किफायतशीर विनियोग करतां यावा म्हणून ही सवलत युद्धपरिस्थितींतहि चालू ठेवण्यांत आली आहे.

सेडेगावी म्हणजे शेतकरी लोकांचेसाठी कर्जाचे वगैरे व्यवहार सेंट्रल बँक सबंध जिल्हाभर करते. त्याच क्षेत्रांत शहरी विभागांत मध्यम स्थितींतली जनता, कारागीर व लहानसहान व्यापारी ह्यांचेकरितां अर्बन बँका काम करतात. ह्या दोन प्रकारच्या सहकारी संस्थांचे सभासद, त्यांच्या गरजा व त्यांचे व्यवहार स्वभावतःच भिन्न रीतींचे असतात. त्यांच्या पैशाचा उगम व उपयोग ठरलेल्या मर्यादेंत असतो. सेंट्रल व अर्बन बँका ह्यांचीं कार्यक्षेत्रें स्पष्टपणें विभागलेलीं असतात तरी त्यांच्या मर्यादा कांहीं बाबतींत परस्परांवर घासतात आणि त्यांच्या घर्षणानें विरोध उत्पन्न होतो. ठेवींवरील व्याजाचे दरांत सेंट्रल बँकेस अर्बन बँकांपेक्षां कमी व्याजानें ठेवी मिळतात आणि व्यक्तींस मालाचे तारणावर तिनें कर्जे दिलीं असतां अर्बन बँकांच्या रास्तीव कामांत तिनें हस्तक्षेप केल्यासारखें होतें. अर्बन बँक लहान प्रमाणावर चालते आणि तिला सेंट्रल बँकेची स्पर्धा सहन करण्याचें सामर्थ्य नसतें. व्यक्तींस मालाचे तारणावर कर्जे देणें, हुंड्या खरीदणें व विकणें इत्यादि बाबतींत शहरी क्षेत्रांत सेंट्रल बँकेनें पडूं नये असें त्यांचें म्हणणें पडतें. शहरीं बँका हें सहकारी संघटनेचें एक महत्त्वाचें अंग असल्यानें त्यांस अन्याय होईल किंवा त्यांच्या सभासदांच्या हितास बाध येईल असें कोणतेंहि धोरण सेंट्रल बँकेनें आंखिकारूं नये असें त्यांचें म्हणणें असतें. सेंट्रल बँक आणि अर्बन बँका ह्यांचीं कार्यक्षेत्रें आखून दिलीं गेल्यानंतर त्यांचेमध्यें स्पर्धा उत्पन्न होऊं नये म्हणून वादविषयक प्रश्नांवर तडजोड करण्याचा प्रघात आहे आणि आतांपर्यंत तोच मान्य करण्यांत आलेला आहे. भनसाळी-मेथा रिपोर्टांत ह्या धोरणाचा पुरस्कार केलेला आहे आणि प्रॉव्हिन्शियल बँक्स असोसिएशनच्या सभांत व परिषदांत त्यास पाठिंबा देण्यांत आला आहे. पांच वर्षांमागें भनसाळी-मेथा रिपोर्टांतील प्रस्तुतविषयक सूचनेस मुंबई सरकारनें स्पष्ट मान्यता दिली होती. ही सर्व पार्श्वभूमि लक्षांत घेतां बँक्स असोसिएशनशीं विचारविनिमय न करतां सरकारनें वरील तडजोडीचें धोरण सोडून दिलें असल्याचें प्रसिद्ध झालें आहे ह्याचें आश्चर्य वाटतें. कांहीं जिल्ह्यांत सेंट्रल बँक व अर्बन बँक्स ह्यांचेमध्यें त्यांचे व्यवहार-मर्यादांचे बाबतींत तीव्र मतभेद उत्पन्न झाले होते आणि त्यांचा विचार असोसिएशन करीत होती. दरम्यान सरकारचा निर्णय प्रसिद्ध झाल्यानें सेंट्रल बँकांच्या प्रतिनिधींची सभा मेल्या आठवड्यांत भरली होती तीमध्यें सरकारच्या प्रस्तुत

घोरणाविषयी आश्चर्य व नापसंती व्यक्त करण्यांत आली. सरकारचा निर्णय सेंट्रल बँकांस अनुकूल असून अर्बन बँकांशीं तडजोड करण्याच्या आवश्यकतेपासून त्यांस मुक्त करण्यांत आलें आहे. तथापि, असोसिएशनचें मत न घेतां एक-दोन ठिकाणच्या तंटयावरून सरकारनें आपलें सर्वमान्य घोरण सर्वच बदललें आहे हें कोणासहि पसंत नाहीं हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. ह्या सर्व प्रश्नाविषयी खुलासा करण्याची आणि त्याची चर्चा करण्याची विनंति रजिस्ट्रार झांस करण्याचें असोसिएशननें ठरविलें आहे. त्यांनीं प्रस्तुत बाबतींत निष्कारण भलती घाई केली आहे ह्यांत शंका नाहीं.

हिंदुस्थानांत रासायनिक खतांचें मोठ्या प्रमाणावर उत्पादन

(सर रामस्वामी मुदलियारकृत सरकारी योजनेचें स्पष्टीकरण.)

" हिंदुस्थानांत दरसाल ३,६०,००० टन अमोनियम सल्फेटचें उत्पादन करण्याची, ९ कोटि भांडवली खर्चाची योजना हिंदुस्थान सरकार आखीत आहे. त्यासंबंधांत सल्ला देण्यासाठी ब्रिटिश तज्ज्ञांना बोलावण्यांत येणार आहे, त्यांच्या भाड्याचा व रहाण्याचा खर्च हिंदुस्थान सरकार करणार आहे. ब्रिटिश तज्ज्ञ येथें आले, ह्यांचा ग्रेट ब्रिटनमध्येंच यंत्रसामुग्रीची खरेदी केली जाईल, असा अर्थ काढण्याचें कारण नाहीं. हिंदुस्थान सरकारचे हिंदी व युरोपियन तज्ज्ञ ब्रिटिश तज्ज्ञांच्या चौकशीचे कामांत भाग घेतील. कल्पनेप्रमाणें योजना पुरी झाली, तर १९४६ च्या मध्याचे सुमारास अमोनियम सल्फेट वगैरे खतें बाजारांत येऊं शकतील. हिंदुस्थानांत दरवर्षी २० लक्ष टन रासायनिक खतांचा खप होण्यास वाव आहे. धान्याचें उत्पादन तातडीनें वाढविणें आणि जमिनीच्या वाढत्या निकृष्टपणास आळा घालणें हें अगत्याचें झालें आहे. तेव्हां, खतांचें केवळ उत्पादन वाढवून भागणार नाहीं; त्यांचा सर्रास उपयोग केला जाईल अशी व्यवस्था व प्रचार ह्यांचीहि आवश्यकता आहे. सध्या फक्त चहा, कॉफी, साखर व रबर ह्यांच्या मळ्यांतच ह्या खतांचा मोठ्या प्रमाणावर उपयोग केला जात आहे. लहान शेतकऱ्यांच्याहि आवाक्यांत त्याचा वापर यावा, ह्याकरितां तकावी कर्जाच्या प्रकारानें त्यांस ही खतें देणें जरूर पडेल. प्रत्येक प्रांतासाठी एक स्वतंत्र खतांचा कारखाना काढावा, किंवा सबंद हिंदुस्थानासाठी एकच प्रचंड कारखाना स्थापून त्यांत प्रांतांस वाटा मिळावा, असें प्रांतिक सरकारांचें म्हणणें आहे. "

आरोग्य रक्षणावर म्युनिसिपालिट्यांचा खर्च

मुंबई शहरांतील कांहीं प्रमुख म्युनिसिपालिटयांचें दरमाणशीं उत्पन्न व त्यांचा दरमाणशीं सार्वजनिक आरोग्य रक्षणावरील खर्च ह्यांचे तुलनात्मक आंकडे खालीं दिले आहेत:—

	दर माणशीं उत्पन्न	आरोग्यावर दर माणशीं खर्च
मुंबई शहर	रु. २४-११-२	रु. ६-१२—०
अहमदाबाद	रु. ९—२-५	रु. ३-११-११
पुणें	रु. ९-१४-९	रु. ३—०—७
सुरत	रु. ७-१२-७	रु. २-१३—७
सोलापूर	रु. ६—७-६	रु. २-१५—४

शेअर बाजार

(लेखक:—श्री. व वि. लोणकर, एम्. ए., बी. कॉम्.)

गिरण्यांच्या शेअर्सची मंदी अजून चालूच आहे. या मंदींत एक गोष्ट विशेष दिसून आली ती ही कीं, एकदम सगळे शेअर्स न पडतां आज एक, उद्यां दुसरा अशा रीतीनें ते पाडण्यांत येत आहेत. परवा इंदूर माळवा दोन दिवसांत ११६० वरून ९४५ पर्यंत कोळशाच्या तुटवड्याच्या भुमकेवर पाडण्यांत आला. या शेअरमध्यें इंदूर-मुंबईचे प्रस्थात सटोडियांचे खेळ चालू असतात हें विश्रुत आहे. त्यावरून निष्कर्ष निघतो कीं बाजारांत मुकाट्यानें किल्ल्यांची फिरवाफिरव चालू आहे. नाहींतर एकीकडे एकाच बाजारांत टाटा डिफर्ड ऑर्डिनरी वर जात आहेत तर लागोपाठ गिरण्या खालीं येत आहेत असा देखावा दिसला नसता. बाजारांत तेजी किंवा मंदी ही सर्वसाधारण असतात असा नियम आहे. तसेंच चालू बाजारांत केव्हांहि अजून मोठ्या प्रमाणांत घबराट व पळापळ दिसून आलेली नाहींत. खरा गडगडाट येतो तेव्हां नासुष बाजाराच्या अंगावर वाटेल त्या किंमतींत शेअरचे गठ्ठेच्या गठ्ठे फेंकण्यांत येतात व रसातळाला भाव नेण्यांत येतात अशी परिस्थिति केव्हांच दिसून आलेली नाहीं. तेव्हां या मंद बाजारांत धंदेवाईकांचें मुकाट्यानें मालाचें शोषण चालूं आहे असा फार संशय येतो. निरनिराळे बागुलबुवे उभे करून बाजार चढूं न देतां अशा प्रकारें माल पुष्कळदां गोळा केला जात असतो व एकाया घबाड मुहूर्तावर स्प्रिंग सुटल्याप्रमाणें भाव वर चढविण्यांत येतात. सुमारें एक महिन्यांतच हें व्हावें असा अंदाज आहे.

ज्या गिरण्यांचा माल वाटपाकरितां सरकारनें ताब्यांत घेतला आहे त्यांच्या भागीदारांनीं गडबडण्याचें मुळींच कारण नाहीं. या प्रकरणावरून येवढेंच म्हणतां येईल कीं हिंदी धंयांत अप्रामाणिकपणा खुशाल धुडगूस घालत आहे व तो नवीन नाहीं. गिरण्यांचे चालक भागीदारांना उडवून लावतां येत नाहींत हींच खेदाची गोष्ट आहे.

सहकार व यात्रेकरूंची सोय

कळवण तालुक्यांत कळवणजवळ दहा मैलांवर सप्तशृंग नांवाचा गड आहे. त्या गडावरील सप्तशृंगी देवीची मोठी यात्रा दरसाल चैत्र शु॥ पौर्णिमेस भरत असते. त्या यात्रेंत दरसाल सुमारें ५०,००० यात्रेकरू येत असतात. सध्याच्या सरकारच्या धान्यनियंत्रणाच्या घोरणानुसार यंदाचे वर्षी यात्रेस येणाऱ्या भाविक यात्रेकरूंना, मे. मामलेदारसाहेब ता. कळवण यांच्या संमतीनें कळवण येथील सहकारी संस्था कळवण तालुका खरेदीविक्री संघ लि. कळवण या संस्थेनें धान्य वांटण्याची सोय केलेली होती. सदर सहकारी संस्थेनें यात्रेकरूंच्या मार्गावर देवळें, कळवण, नांदुरी व सप्तशृंग गड या चार ठिकाणीं धान्याचीं दुकानें उघडलीं होतीं. त्या दुकानांमध्यें बाजरीचें पीठ, गव्हाचें पीठ, हरबऱ्याचें पीठ, तांदूळ, नागली, खडीसाखर, साखऱ्या, रॉकेल व खोबऱ्याचें तेल या वस्तू विक्रीसाठी ठेवण्यांत आल्या होत्या. प्रत्येक यात्रेकरूची खाण्यापिण्याची व दिवाबत्तीची उत्तम प्रकारें सोय करण्यांत आली होती. दुकानांचें कामकाज व तसेंच एकंदर यात्रेकरूंची झालेली दिवाबत्तीची व खाण्यापिण्याची सुंदर व्यवस्था पाहून श्री. सोनटक्के, मे. डेप्युटी कलेक्टर, मालेगांव व श्री. अग्निहोत्री मे. मामलेदार कळवण व श्री. दंडवते मे. पोलीस सब्-इन्स्पेक्टर कळवण यांनीं समाधान व्यक्त केलें व सहकारी दुकानानें करून दाखविलेल्या कामगिरीबद्दल प्रशंसोद्गार काढले. यात्रेकरूंची उत्तम सोय झाल्यानें यात्रेकरूंनींहि सहकारी दुकानास शुभाशीर्वाद दिला. अशा तऱ्हेचे सर्व सहकारी संस्थांनीं आलेल्या सुवर्ण संधीचा फायदा घेऊन स्वार्थावरोबरच परमार्थ साधावा.

स्फुट विचार

कापडाच्या चोरबाजारावर मोहीम

कापडाचा पुरवठा वाढवून त्याच्या किंमती उतरवण्याचा प्रयत्न हिंदुस्थान सरकार करीत आहे, तो यशस्वी होण्यास कापडगिरण्या व व्यापारी ह्यांचें हार्दिक सहाय आवश्यक आहे हें उघड आहे. कापड उघड विक्रीस न काढतां तें दाबून ठेवावयाचें आणि भरमसाट किंमतीनें चोरबाजारांत विकावयाचें असा प्रघात कांहीं व्यापाऱ्यांनीं व गिरणीवाल्यांनीं पाडल्यामुळें त्यांचेविरुद्ध कडक उपायांची योजना सरकार अंमलांत आणीत आहे हें जनतेच्या दृष्टीनें अभिनंदनीय आहे. कापडाचे चोरटे साठे शोधून काढून ते बाजारांत आणण्याची आणि त्यांच्या मालकांस शिक्षा देण्याची खटपट आतांपर्यंत चाललीच होती. तथापि, कापडाची कृत्रिम महागाई अजूनहि लोकांस जाचक होत आहे आणि देशांत तयार होणारें सर्व कापड उघड्या बाजारांत येणें अगत्याचें आहे. ह्या कामीं सरकारशीं सहकार्य न करणाऱ्या धंदेवाल्यांच्या कारबाया बंद पाडण्याचा निर्धार सरकारनें केला आहे. कांहीं गिरण्या त्यानें आपल्या ताब्यांत घेऊन त्या चालविण्याची व्यवस्था केली आहे. विशिष्ट गिरण्यांचा माल ठरवलेल्या बाजारांत विकला जाण्याची तजवीजहि त्यानें केली आहे. गिरण्यांचा कारभार स्वतःचे नियंत्रणासाठी सरकारनें आणण्याचें धोरण विलक्षण कडकपणाचें असलें तरी असाध्य रोगावर जालीम उपाय योजणें आवश्यक असतें ह्या नियमास अनुसरूनच प्रस्तुत बाबतींत सरकार वागत आहे. कांहीं कारखानदारांच्या व व्यापाऱ्यांच्या भरमसाट नफेबाजीमुळें सामान्य लोकांचे किती हाल होतात ह्याची त्या धंदेवाल्यांस पर्वा नाहीं. अशा स्थितींत चोरबाजार बंद करण्याच्या कडक उपायांस सामान्य जनतेचा पाठिंबा मिळेल.

सहकारी संघटनाचा पूर्ण उपयोग करा

धान्याच्या उत्पादनाचे वाढीसाठी हिंदुस्थान सरकार आणि प्रांतिक सरकार आपापल्या परीनें शिकस्तीचे यत्न करीत आहेत. "अधिक धान्य पिकवा" ह्या घोषणेचा ह्या कामीं थोडाबहुत उपयोग झाला असला तरी बिगरधान्याच्या पिकांखालील क्षेत्रांत अपेक्षेप्रमाणें घट झालेली नाहीं असें सबंद देशाच्या परिस्थितीकडे पहातां दिसून येतें. शांततेच्या काळीं सामान्यतः धान्याचे संबंधांत हा देश स्वयंपूर्ण आहे असें मानण्यांत येतें; तथापि ह्याचा अर्थ धान्याची आयात किंवा निर्गत म्हणण्यासारखी होत नाहीं एवढाच ध्यावयाचा आहे. जनतेच्या समाधानकारक रहाणीस आवश्यक असलेलें सर्व धान्य ह्या देशांत तयार होतें असें त्यावरून समजणें चुकीचें आहे. युद्धोत्तर आर्थिक संवर्धनाच्या योजनांमध्यें शेतीच्या उत्पादनाचे विस्ताराचा अंतर्भाव करण्यांत येत आहे तो ह्याकरितांच आहे. देशी उद्योगधंद्यांसाठी कच्चा माल लागतो तो हिंदुस्थानांतील जमिनीनें ह्यापुढें पुरवावा लागेल आणि विशिष्ट जातींच्या शेतीच्या मालास परदेशांत मागणी असेल, तोहि येथें उत्पन्न करावा लागेल. हें सगळें उत्पादन जमीनदार व शेतकरी ह्यांच्या सोयीवर व इच्छेवर सोपवून काम भागणार नाहीं असें अलीकडच्या अनुभवावरून स्पष्ट झालें आहे आणि सरकारच्या विधमानें व सहायानेंच योजनात्मक धोरण अंगीकारावें लागणार आहे. ह्या धोरणाची अंमलबजावणी शक्य तितकी सहकारी संघटनाच्या पद्धतीनें झाल्यास शेतकऱ्यांस व सबंद राष्ट्रास तें सोयीचें व सुसाचें होईल आणि आर्थिक योजना फलद्रूप होण्यास सहाय मिळेल. युद्धपरिस्थितींत सहकारी संघटनाची उपयुक्तता निदर्शनास आली आहे आणि येत आहे. ह्या अनुभवाचा फायदा युद्धोत्तर आर्थिक संवर्धनांत करून घेणें आवश्यक आहे.

लॉर्डांच्या सभेंत आंतरराष्ट्रीय चलनव्यवस्था

आंतरराष्ट्रीय चलनव्यवस्थेविषयीं अमेरिकेंत वाटाघाटी व्हावयाच्या आहेत आणि त्यासंबंधांत सर्वमान्य अशी योजना आंखली जावयाची आहे. तिची सामान्य स्वरूपाची चर्चा नुकतीच ब्रिटिश हाऊस ऑफ लॉर्डसमध्यें झाली. ह्या योजनेच्या बनावटींत इंग्लंडचे वतीनें प्रामुख्यानें भाग घेणारे प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ, लॉर्ड केन्स ह्यांनीं सदरहु चर्चेंत स्पष्टीकरणार्थ आपलें धोरण विशद करून पुढें मांडलें. युद्धोत्तर काळांत पुनर्घटनेचे अवघड आर्थिक प्रश्न उत्पन्न होतील तेव्हां इंग्लंडच्या व्यापाराचें व उद्योगधंद्यांचें तारू सुरळीतपणानें वावरूं शकेल अशा बेतानेंच नियोजित आंतरराष्ट्रीय चलनव्यवस्था आखली जात असल्याचें आश्वासन त्यांनीं दिलें. लंडनमध्यें तीन चार हजार कोटि रुपयांच्या हिंदुस्थान व इतर बाहेरील देश ह्यांच्या मालकीच्या शिलका साचलेल्या त्या परत करण्याची अवघड जबाबदारी ब्रिटिश चलनव्यवस्थेवर पडेल, ती आम्ही आमच्या सोईस जमेल त्याप्रमाणें पार पाडूं असें त्यांनीं सांगितलें. पौंड स्टर्लिंगचा दुसऱ्या देशांच्या चलनांतला दर जरूरीप्रमाणें कमी ज्यास्त करण्याची आणि ब्रिटिश चलनाचे सध्याचे संबंध कायम राखण्याची सवड नियोजित आंतरराष्ट्रीय व्यवस्थेंत राहील असेंहि ते म्हणाले. हिंदुस्थानच्या लंडनमधील पैशाचा विनियोग मुख्यत्वेंकरून ब्रिटिश माल खरेदी करण्याकडे करावा लागेल असें हिंदुस्थान सरकारचे व्यापारमंत्री सर पी. रामस्वामी मुदलियार ह्यांनींहि नुकतेंच सांगितलें. यंत्रसामुग्रीबरोबर नेहमींच्या सामानाचे जिन्नसहि ह्या देशास इंग्लंडमधून आणावे लागतील. त्यांची स्पर्धा स्वदेशी मालाशीं होणार नाहीं अशी खबरदारी घेण्यांत यावी लागेल. लॉर्डांच्या सभेंतील चर्चेच्या दृष्टीनें हिंदी चलनपद्धतीचा विचार केला जाणें अगत्याचें आहे. प्रत्येक राष्ट्र स्वतःच्या हितसंबंधांस जपत आहे; हिंदुस्थाननें तेंच केलें पाहिजे.

पैशाच्या वर्मावर्मीबाबत बँकांना सवलती

पैशाच्या वर्मावर्मीबाबत रिझर्व्ह बँकेनें पसंत केलेल्या शिमर शेडयूल्ड बँकांना द्राचे संबंधांत कांहीं सवलती दिलेल्या आहेत. शेडयूल्ड बँकांना पैशाची वर्मावर्मी करणें फारच स्वस्त पडतें व सामान्य जनता आणि रिझर्व्ह बँकेनें मान्य केलेल्या शेडयूल्ड बँका ह्यांच्या मधलें स्थान बिगर शेडयूल्ड बँकांस देण्यांत आलें आहे. उदाहरणार्थ, शेडयूल्ड बँकांना १० हजार रुपये रिझर्व्ह बँकेच्या मध्यस्तीनें फुकट पाठवतां आले, तर मान्य बिगर शेडयूल्ड बँकांना $\frac{1}{32}$% द्रानें पैसे पाठवितात; इतर लोकांना $\frac{1}{16}$% द्रानें कमिशन भरावें लागतें. सवलत मिळविण्यास पात्र होण्याच्या शेडयूल्ड बँका ह्या कंपनी कायद्यासाठी नोंदलेल्या कंपन्या असल्या पाहिजेत, त्या ब्रिटिश हिंदुस्थानांत कंपनी कायद्यान्वयें बँकिंगचा धंदा करीत असल्या पाहिजेत व त्यांचें वसूल भांडवल व रिझर्व्ह किमान ५० हजार रुपये तरी असलें पाहिजे. रिझर्व्ह बँक प्रांतिक सरकारांच्या सल्यानें बिगर शेडयूल्ड बँकांचे अर्ज विचारांत घेऊन त्या बँकांस सवलती देण्याविषयीं निर्णय करिते.

विना सहकार नही उद्धार
" कर्ज फेडा व भविष्यकाळासाठी अधिक बचत करा " मोहीम

बचत करा निरंतर । माग्य येईल तदनंतर ॥

नाशिक जिल्ह्यांत अधिक बचत करा मोहीम ता. १५।५।४४ ते २०।५।४४ पर्यंत मोठ्या उत्साहानें व धडाडीनें पार पाडण्यांत आली. या मोहिमेकरितां एक स्पेशल गाडी (व्हॅन) काढण्यांत आली होती. सदर सेव्ह मोअर व्हॅननें नाशिक जिल्ह्यांतील खालीलप्रमाणें तालुक्याचे ठिकाणीं व इतर प्रमुख केंद्रांवर आपला कार्यक्रम मोठ्या जोमानें साजरा केला व सदर कार्यक्रमास लोकांकडून देखील ठिकठिकाणीं फारच मोठ्या प्रमाणावर हार्दिक पाठिंबा मिळाला. श्री. डब्ल्यू. डी. साठुंके असि. रजिस्ट्रार श्री. को. सो. घुळे विभाग, श्री. एम्. एन्. देसाई ऑडिटर व रीकन्स्ट्रक्शन ऑफिसर को. सो. नाशिक, मे. सिनीयर इन्स्पेक्टर श्री. श्री. एम्.डी. चावडा व मे. एज्युकेशनल सुपरवायझर श्री. डी. आर. वाणी ह्यांनीं वरील मोहिमेंत प्रामुख्यानें भाग घेऊन आठवड्याचें महत्त्व समजावून सांगितलें. आलेले संधीचा पुरेपूर फायदा घेऊन प्रथम कर्जमुक्त व्हा व हातांत खेळत असलेला पैसा महागलेल्या वस्तू खरेदी करण्यांत अनाठायीं खर्च न करतां भविष्यकाळासाठी तो जोडून ठेवा ही गोष्ट जमलेल्या लोकांना हृदयंगम रीतीनें त्यांनीं पटवून दिली. मे. असि. रजिस्ट्रार सो. को. सो. घुळे विभाग, घुळे, यांनीं सहकारी संस्थांमार्फत सध्याच्या युद्धजन्य परिस्थितींत शेतकऱ्यांना आपला जीवनकलह अत्यंत सुलभ रीतीनें कसा सोडवितां येईल हें सहकारांत असलेल्या तत्त्वांचें सुंदर रीतीनें सर्वांना समजेल अशा भाषेंत विवेचन करून समजावून दिलें. त्याचा जनसमूहावर योग्य तोच परिणाम होऊन लोकांनीं अहमहमिकेनें पुढें येऊन सहकारी संस्थांचे शेअर्स विकत घेण्याचीं आश्वासनें दिलीं. सदर ' सेव्ह मोअर वुईकचा ' कार्यक्रम योग्य अशा संधीलाच सुरू करण्यांत आल्यानें तो फारच परिणामकारक होऊन अगदीं यशस्वी रीतीनें पार पडला. सदर कार्यक्रमाबरोबरच ' अधिक धान्य पेरा ' व सहकारी संस्थांमार्फत वांटणीचें काम यशस्वी करून दाखवून आलेल्या संधीचा सहकारी संस्थांनीं फायदा घ्यावा याबद्दलहि यशस्वी प्रचार केला. ठिकठिकाणीं मे. मामलेदारसो. ह्यांनींही हजर राहून अधिक धान्य पेरा कायदा समजावून सांगितला व सदर व्हॅनचा कार्यक्रम पार पाडण्याचे कामीं सक्रिय मदत केली. निफाड येथें मे. प्रांत सो. बहादुर निफाड भाग व मे. प्रांत सो. बहादुर सिन्नर भाग ह्यांनीं मिटिंगला हजर राहून मे. प्रांतसो. निफाड भाग ह्यांनीं लवकरच अंमलांत येणारा अधिक धान्य पेरा कायदा व त्याबरोबरच रयतेवरील जबाबदारी अत्यंत उद्बोधक रीतीनें समजावून सांगितली.

निफाड, चांदोरी व सिन्नर या ठिकाणच्या मीटिंगांना मे. दि. ब. वंढेकर, डि. ए. ऑ. को. सो. नाशिक यांनीं हजर राहून अध्यक्ष या नात्यानें उपयुक्त असा मौल्यवान् उपदेश केला.

ता. १५।५।४४ दिंडोरी कळवण.
ता. १६।५।४४ देवळे (ता. कळवण) सटाणा.
ता. १७।५।४४ लखमापूर, दाभाडी, मालेगांव.
ता. १८।५।४४ नीमगांव, नांदगांव.
ता. १९।५।४४ येवला, निफाड.
ता. २०।५।४४ चांदोरी व सिन्नर.

इंग्लंडमधील तरुणांचे विवाह व अपत्यें

१९३९ ह्या वर्षानंतरचे रजिस्ट्रार जनरलचे आकडे उपलब्ध नाहींत, परंतु १९३९ च्या आकड्यांवरून असें दिसतें की त्या वर्षी इंग्लंड व वेल्समध्यें वीस वर्षांखालील वयाच्या २०,९८१ स्त्रियांना पहिलीं औरस अपत्यें झालीं, त्यांतील १५,४२७ अपत्यें विवाहास आठ महिने पुरे होण्यापूर्वीच झालीं. १४,७८७ अपत्यांचा जन्म विवाहानंतर सात महिन्यांचे आंतच झाला. ह्याचा अर्थ असा, कीं ह्या स्त्रियांपैकीं तीन चतुर्थांश स्त्रिया विवाहापूर्वीच गर्भवती होत्या. कांहीं बाबतींत अगोदर विवाह करण्याचें ठरविलें असणाऱ्या जोडप्यास अपत्यें झालीं असलीं, तरी बहुसंख्य प्रकरणांत गर्भ राहण्यापूर्वी विवाहाचा उद्देश नव्हता, असेंच मानण्यास पुष्कळ जागा आहे. बेकायदा गर्भपातांची संख्या इंग्लंड व वेल्समध्यें दरसाल १,००,००० भरते, ती पुनः वेगळीच! ह्यांतील बहुतेक गर्भपात अविवाहित तरुणींचेच असतात. संतति प्रतिबंधक साधनांचा उपयोग केला म्हणजे गर्भधारणेचा संभव कमी असतो, हें लक्षांत घेतलें म्हणजे इंग्लंडमध्यें तरुण व तरुणी ह्यांचेमधील गैरकायदा व्यवहारांचें प्रमाण किती मोठें असेल, ह्याची कल्पना येते. तेथें सध्या विवाहांचे वेळीं वधूचें वय सरासरीनें २५½ वर्षांचें असतें. साधारणतः १५ ते ४५ वर्षांपर्यंत स्त्रियांना मुलें होऊं शकतात, ह्या दृष्टीनें प्रत्येक स्त्रीच्या " उपयुक्त " आयुष्याचा एक तृतीयांश काळ वाया जातो, असा हिशेब आहे. २१ वर्षांखालील तरुण तरुणींस विवाह करण्यापूर्वी आपल्या आईबापांची संमती कायद्यानें मिळवावी लागते, त्याची अडचण दूर करण्यासाठी खोटीं वयें सांगण्याची प्रवृत्ति निर्माण होते.

मधमाशा पाळण्याचा धंदा

धारवाड येथें मधमाशांचें शास्त्रीय संगोपन करून मध गोळा करण्याचें शिक्षण देण्यासाठी एक वर्ग उघडण्यांत आला होता. एक महिन्याच्या शिक्षणक्रमास ८९ विद्यार्थी हजर होते. त्यांत प्राथमिक शाळा' शिक्षकांची संख्या बरीच असल्यानें या शिक्षणाचा प्रसार खेड्यापाड्यांपर्यंत होण्यास मदतच होणार आहे.

वर्गातील अभ्यासक्रमास प्रात्यक्षिकांची जोड देण्यांत आलेली होती. मधमाशांचें संगोपन कसें करावें, त्यांचीं पोळीं कशीं धरावींत याची सप्रयोग माहिती दिली गेली. हा वर्ग सुरू झाल्यानंतर धारवाड व त्याच्या आसपासच्या भागांत २८ पेट्या ठेवून मधमाशा पाळण्याचा उपक्रम लोकांनीं केलेला दिसून आला. या वर्गाचा सभारोप करतांना परीक्षा घेण्यांत आली त्यांत ५७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. त्यांना कलेक्टरांच्या हस्तें प्रमाणपत्रें देण्याचा समारंभ नुकताच पार पडला.

थोड्या दारूपासून ज्यास्त समाधान

महागाईच्या दिवसांत दारूचा तुटवडा पडतो, त्यावेळीं थोड्या दारूंत जास्तींत ज्यास्त तिचा अंमल चढविण्याची युक्ति म्हणजे रिकाम्या पोटी सर्व दारु एकदम पिणें, हा आहे असें शास्त्रज्ञ सांगतात. मनुष्याच्या शिरांत वहाणाऱ्या रक्तांत अल्कोहोलचें प्रमाण जितकें अधिक, त्या मानानें मेंदूवर परिणाम ज्यास्त होतो. म्हणून, शरीरांतून अल्कोहोल बाहेर पडण्याचा मार्ग बंद होऊन मेंदूकडे त्याचा जलद पुरवठा झाला, म्हणजे दारू पिण्याचा उद्देश अधिक सफल होतो.

सर जनार्दन मदन यांची पुणें सेंट्रल को ऑपरेटिव्ह बँक लि. ला भेट

प्रॉव्हिन्शिअल को. ऑपरेटिव्ह इन्स्टिटयूट, मुंबई, या संस्थेचे मान्यवर अध्यक्ष सर जनार्दन मदन यांनीं शनिवार तारीख २९-४-४४ रोजीं पुणें येथील स्थानिक व जिल्ह्यांतील सरकारी व बिनसरकारी कार्यकर्त्यांची पुणें सेंट्रल को ऑपरेटिव्ह बँकेंत भेट घेऊन त्यांच्याबरोबर कांहीं महत्वाच्या बाबींवर चर्चा केली. यावेळीं जिल्ह्यांतील एकंदर पन्नास कार्यकर्ते हजर होते.

प्रारंभीं बँकेचे चेअरमन रावसाहेब य. द. खोले, यांनीं पाहुण्यांचें हार्दिक स्वागत केलें, व बँकेनें गरजू शेतकऱ्यांना निरनिराळ्या शेतकी कार्यासाठीं दिलेल्या आर्थिक मदतीचा उल्लेख केला व शेतकी सहकारी सोसायट्यांचें बाबत बँकेनें अंगिकारलेल्या कार्याचा आढावा घेतला. हा आढावा घेतांना त्यांनीं प्रामुख्यानें पुढील कार्यक्रमांचा उल्लेख केला. (१) तालुकानिहाय सहकारी संस्थांच्या सभा. (२) शेतकीसाठी लागणाऱ्या उपकरणासाठीं यावयाचें कर्ज. (३) सोसायट्यांच्या सभासदांच्या कर्जमर्यादेंत वाढ (४) नवीन सोसायट्या काढणें व सभासदांची संख्या वाढविणें. (५) शेतकी सोसायट्यांच्या सभासदांची आर्थिक पहाणी करणें वगैरे.

धान्य वाटप प्रश्नासंबंधीं, माहिती सांगतांना बँकेचे चेअरमन रा. सा. खोले, यांनीं असें सांगितलें कीं, आपल्या बँकेनें ह्या व्यवहाराबद्दल प्रथमपासूनच काम करण्याची तयारी दाखविली व त्याप्रमाणें कामासही सुरवात केली. परंतु त्याबाबत निरनिराळ्या नियंत्रणामुळें हें काम समाधानकारक असें होऊं शकलें नाहीं. आज सरकारला सहकारी संस्थांचा उपयोग होईल असें वाटतें. परंतु त्याबाबत त्यांजकडून बँकेकडे कांहीं लिहून आलें नसून बँकेनें या कार्याकडे कांहीं विशिष्ट दृष्टिनें पाहून हें काम पत्करण्याचें कबूल केलें आहे. आजच्या धान्याबाबतच्या बिकट परिस्थितींत सहकारी संस्थांना आज गेल्या २५ वर्षांत जें कार्य केलें नाहीं तें कार्य करण्याची सुसंधि आली असल्यानें बँकेनें हें काम अवश्य घ्यावें या हेतूनें प्रेरित होऊन बँकेनें हें काम अंगावर घेतलें आहे. आज पुणें जिल्ह्यांत सुमारें ५१ संस्थांकडे हें काम येईल व त्यांना लागणारी सर्व मदत बँकेनें देण्याचें कबूल केलें आहे. पुणें शहरांत खुद्द ज्या कन्झुमर्स सोसायट्या आहेत त्यांना लागणारा धाऊक माल पुरविण्याचेंहि काम बँकेनें घ्यावें अशाबद्दल सूचना केली गेली परंतु त्याबाबत फारसा उपयोग झाला नाहीं. या धान्य वाटप प्रश्नाबाबत बोर्डाचे सर्व डायरेक्टर्स व बँकेचे अधिकारी त्याचप्रमाणें सहकारी चळवळींतील प्रमुख अशा कार्यकर्त्यांपैकीं प्रि. ध. रा. गाडगीळ, श्री. दा. वि. गोखले, प्रो. शं. रा. भागवत, श्री. एस. एल. आपटे वगैरे व्यक्तींच्या सहकार्याचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख करून त्यांनीं आपलें भाषण संपविलें.

नंतर सर जनार्दन यांनीं चर्चेस सुरुवात करून आपल्या भेटीचा उद्देश कार्यकर्त्यांना सांगितला व त्यांनीं खालील मुद्यांचे मार्मिक विवेचन केलें. १ सहकारी तत्त्वें व सहकारी संस्थांमधील प्रत्यक्ष कार्य यांचें ज्ञान जास्त प्रसृत करण्याकरितां मुंबईस एक सहकारी कॉलिज, प्रादेशिक मध्यवर्ती केंद्र ठिकाणीं सहकारी शाळा व तालुक्याच्या ठिकाणीं प्राथमिक शाळा काढण्याची योजना. अशा शिक्षण संस्थेची सध्या किती. जरूरी आहे हें सर जनार्दन यांनीं दाखवून दिलें. याच चर्चेत श्री. दा. वि. गोखले, श्री. एस. एल. आपटे, श्री. जी. आर. तुळशीबागवाले व प्रि. डी. जी. कर्वे यांनीं प्रश्नोपप्रश्न विचारून भाग घेतला. चर्चेत अशा शिक्षण संस्थेचा सार्वजनिक कार्यकर्त्यांस कितपत उपयोग होणार अशी भीति प्रदर्शित केली गेली, व हें शिक्षण सध्याचें व्यापारी कॉलेज देऊं शकेल तेव्हां त्याचे अभ्यासक्रमांत याचा समावेश करावा असें सुचविलें गेलें. तसेंच शिक्षण कार्यास आर्थिक मदत कोणाची होणार अशी विचारणा केली गेली. यावर सर जनार्दन यांनीं जरूर तीं उत्तरें दिलीं.

यानंतर झालेल्या धान्य वाटप प्रश्नावरील चर्चेत निरनिराळ्या कार्यकर्त्यांनीं आपल्या अडचणी सांगितल्या. प्रो. शं. रा. भागवत यांनीं अल्प वेतनी कामकरी लोकांच्या सहकारी सोसायट्यांस या बाबतींत सहन कराव्या लागणाऱ्या अडचणी निवदने केल्या. श्री. दा. वि. गोखले यांनीं धान्य वाटप केंद्रें हीं को-ऑपरेटिव्ह डिपार्टमेंटला जबाबदार रहावीत, परस्पर रेव्हिन्यू खात्यास जबाबदार असूं नयेत, असें स्पष्ट मत निर्भिडपणें प्रकट केलें.

नंतर सहकारी क्षेत्रांत नवें संशोधन करण्याची व मार्केटिंग सोसायट्या काढण्याचे आवश्यकतेबद्दल चर्चा झाली. चर्चेत श्री. तुळशीबागवाले, श्री. के. व्ही. जोशी व श्री. अप्पासाहेब भागवत यांनीं प्रामुख्यानें भाग घेऊन आपापले विचार प्रदर्शित केले.

सभेंत उपस्थित झालेल्या कार्यकर्त्यांनीं विचारलेल्या सर्व प्रश्नांना सर जनार्दन यांनीं योग्य तीं उत्तरें दिलीं.

श्री. तुळशीबागवाले यांनीं नंतर पाहुण्यांचे आभार मानले व अल्पोपाहार होऊन सभेचें विसर्जन झालें.

कऱ्हाड तालुक्यांतील भुईमुगाच्या शेंगा विक्रीस मार्केट ॲक्ट लागू

सातारा जिल्ह्यांतील कऱ्हाड तालुक्यांत भुईमुगाच्या शेंगाचें फार मोठें पीक आहे. या तालुक्यांतील कऱ्हाड व उंब्रज हीं शेंगा विक्रीचीं मुख्य बाजाराचीं गांवें आहेत. व्यापारी कसर, काटा सूट, धर्मादाय, माती व इतर मिश्रण इत्यादि बाबतींत व्यापारी लोकांकडून मालाच्या विक्रीच्या रकमेंतून रकमा कापून घेण्याची पद्धत असल्यामुळें शेतकऱ्यांना आपल्या मालाची योग्य किंमत मिळत नाहीं. अयोग्य रकमा कापल्या जाऊं नयेत व शेतकऱ्यांना आपल्या मालाची योग्य किंमत मिळावी या हेतूनें सरकारनें कऱ्हाड व उंब्रज येथील बाजार पेठांना मार्केट ॲक्ट (सन १९३९ चा) लागू केला आहे.

मार्केट कायदा व कानूप्रमाणें पहिली मार्केट कमिटी नेमली गेली असून जिल्हाधिपती मि. डी. जी. चेंबर्स आय. सी. एस. यांचे अध्यक्षतेखालीं ता. २९ एप्रिल रोजीं कमिटीची पहिली सभा भरून रावसाहेब कल्याणी यांची चेअरमन म्हणून निवडणूक झाली आहे. मार्केटचा कायदा लागू केल्यापासून शेतकऱ्यांचे व व्यापाऱ्यांचे काय काय फायदे होतील यासंबंधीं तसेंच सदर कायदा व कानूमधील महत्वाच्या कलमांची माहिती सदर सभेंत असिस्टंट रजिस्ट्रार श्री. पाटीलसाहेब व मार्केटिंग इन्स्पेक्टर श्री. सूर्यवंशी यांनीं सांगितली. शेवटीं मार्केट कमिटीच्या कामांत मार्ग लक्ष राहून चालू लढाईच्या व इतर अडचणीच्या काळांत नियंत्रित मार्केटचा व्यापाऱ्यांनीं व शेतकऱ्यांनीं पूर्ण फायदा घ्यावा असा कलेक्टर साहेबांनीं उपदेश केल्यानंतर सभेचें काम संपलें.

मुं. प्रां. स. इन्स्टिट्यूटच्या चेअरमनची पुणें, बेळगांव व धारवाड येथें भेट व चर्चा

मुंबई प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूटचे चेअरमन, सर जनार्दन मदन, ह्यांनी पुणें, बेळगांव व धारवाड ह्या केंद्रांस एप्रिलअखेर व मे चे प्रारंभी भेटी दिल्या. पुणें येथील भेटीचा वृत्तांत स्वतंत्रपणें दुसरीकडे दिला आहे. बेळगांव येथें जिल्हा सहकारी शिक्षण कमिटीच्या संबंधांत त्यांनी मार्गदर्शन करून ट्रेनिंग क्लासेस काढणें, एज्युकेशन सुपरवायझरनें व्याख्यानें लिहून काढून त्यांचा उपयोग करणें, कमिटीच्या सभासदांनीं आपल्या आवडीप्रमाणें कामें अंगावर घेणें, इत्यादि गोष्टी सुचविल्या. जिल्ह्यांतील सहकारी कार्यकर्त्यांबरोबर त्यांनी अनौपचारिक चर्चा केली. "सहकारी सोसायट्यांच्या सभासदांस आपलें धान्य सहकारी मार्केटिंग व सेल संस्थांमार्फत विकावयाचें असल्यास त्यास सरकारची हरकत नसावी, रेव्हेन्यू खात्यास ह्यासंबंधांत लिहिण्यांत यावें, सरकारनें ठरवून दिलेल्या किमान किंमतीचेहि खाली कपाशीचे भाव गेले आहेत; तेव्हां सरकारनें किमान किंमतीस कपास खरीदण्याबद्दल त्यांस इन्स्टिट्यूटनें लिहावें. सहकारी शिक्षणासाठी कर्नाटक विभागांत एक स्वतंत्र संस्था असावी. एक सहकारी कॉलेज स्थापण्यांत यावें. सहकारी संस्थांमार्फत धान्य वाटणीचें काम करण्याचें ठरलें, तर त्या कामांत पूर्ण सचोटी बाळगली पाहिजे. नाहींतर सहकारी चळवळीस काळिमा येईल." असा त्या चर्चेचा निष्कर्ष आहे. बेळगांव जिल्हा को. ई. असोसिएशनच्या अडचणीहि त्यांनीं समजून घेतल्या व सल्ला दिला.

सहकारी कार्यकर्त्यांची सभा १ मे रोजीं धारवाड येथें सदर्न मराठा अर्बन को. बँकेंत भरली होती, त्या वेळीं सर जनार्दन मदन ह्यांनीं आपल्या भाषणांत सहकारी शिक्षण, कंट्रोल केलेलीं धान्यें व इतर माल ह्यांची वांटणी, इत्यादि प्रश्नांवर आपले विचार व्यक्त करून जिल्ह्यांतील सहकारी प्रगतीचा त्यांनीं आढावा घेतला. कपाशीच्या पडलेल्या बाजारभावासंबंधीं सभेंत चर्चा झाली. सर जनार्दन ह्यांनीं जिल्हा एज्युकेशन कमिटीशीं चर्चा केली व कामाची आंखणीहि केली.

ऑनररी सेक्रेटरींची अहमदाबादला भेट

जुलैमध्यें इन्स्टिट्यूट अहमदाबाद येथें एक सहकारी वर्ग उघडणार आहे, त्यासंबंधीं चर्चा करण्यासाठी इन्स्टिट्यूटचे ऑनररी सेक्रेटरी, श्री. वेकुंठराय मेहता ह्यांनीं अहमदाबादला ता. ८ मे रोजीं भेट दिली व अहमदाबाद सें. को. बँकेच्या कचेरींत प्रमुख अशा २० कार्यकर्त्यांबरोबर चर्चा करून योजना आंखण्यांत आली. वर्गांत प्रवेश कोणास मिळावा, शाळा कोठें भरविण्यांत यावी, शिक्षकांची निवड कशी करावी, सल्लागार मंडळाची नेमणूक कशी करावी व त्यांत कोणास नेमावें, इत्यादि विषयांवर तपशीलवार बोलणी झालीं, असें समजतें.

पू. खानदेश जिल्ह्यांतील सेल सोसायट्यांची परिषद

श्री. भास्करराव जाधव ह्यांचे अध्यक्षतेखाली भरलेल्या खानदेश जिल्ह्यांतील सेल सोसायट्यांच्या परिषदेची माहिती पू. खा. डि. बोर्ड ऑफ सु. यूनियन्सकडून आमचेकडे प्रसिद्धीसाठी आली आहे; ती लवकरच प्रसिद्ध करण्यांत येईल. परिषदेंत बरेच उपयुक्त ठराव मंजूर झालेले असून अध्यक्षांचें भाषणहि मार्गदर्शक व उद्बोधक आहे.

लॉटरीच्या कर्जाची पहिली बक्षीसवाटणी १५ जुलै रोजीं होणार

फाजील चलनवृद्धीस आळा घालण्याचे हेतूनें हिंदुस्थान सरकारनें लॉटरीच्या कर्जाची योजना आखून बक्षिसाचे रोखे विक्रीस काढले. १५ जानेवारी १९४४ पासून त्यांची विक्री चालू आहे. त्यांच्या नंबरांच्या चिठ्या टाकून बक्षिसाचे रोखे निवडण्याचें काम १५ जुलै रोजीं बहुधा मुंबई येथें होईल. कर्जरोखे १०० रुपयांचे व १० रुपयांचे अशा स्वरूपांत विकण्यांत येतात व त्याच्या अनुक्रमें १ कोटि रुपयांचा व १० लक्ष रुपयांचा गट मानण्यांत येतो. प्रत्येक गटांतील रोख्यांच्या नंबरांच्या चिठ्या १५ जानेवारी व १५ जुलै रोजीं एकूण दर सहामाहीस १०० रुपयांच्या रोख्यांचे गटास १ लक्ष रुपयांचीं व १० रुपयांच्या रोख्यांचे गटास १० हजार रुपयांचीं बक्षिसें जाहीर केलीं जातील. गटांतील सर्व रोखे खपून त्याची खबर मुख्य कचेरीस मिळाली, तरच त्यांतील रोख्यांच्या नंबरांच्या चिठ्या टाकल्या जातील, ह्या अटीमुळें कित्येक लोक रोखे घेण्यास नाखुष असतात. हिंदुस्थान सरकारनें ही अडचण दूर करून ज्यांनीं १८ जून पूर्वी रोखे घेतले असतील, त्यांचे नंबर सबंद गटांतील रोखे खपले नसले तरी, बक्षिसाचे वाटणीस पात्र होतील, असें जाहीर केलें आहे व बक्षिसाच्या नंबरास जाहीर केलेलें पुरें बक्षीस देण्यांत येईल, असेंहि सरकारनें प्रसिद्ध केलें आहे. ह्याचा अर्थ, १८ जून रोजीं रोख्यांची विक्री बंद करण्यांत येऊन तिला पुनः १६ जुलै रोजीं प्रारंभ केला जाईल.

सुपरवायझर्सचा डिप्लोमा

इन्स्टिट्यूटच्या सेंट्रल एज्युकेशन बोर्डातर्फे घेण्यांत आलेल्या सुपरवायझर्स डिप्लोमा परीक्षेंत उत्तीर्ण झालेल्या कांहीं उमेदवारांनीं डिप्लोमा मिळविण्यासाठी पार पाडाव्या लागणाऱ्या कांहीं अटींची माफी मिळण्यासंबंधीं अर्ज केला. इन्स्टिट्यूटच्या एज्युकेशन कमिटीनें ह्या प्रश्नाचा विचार केला व ज्यांनीं किमान पांच वर्षें यूनिअनमध्यें समाधानकारक काम केलें असेल, अशा पास झालेल्या उमेदवारांना डिप्लोमा द्यावा, असें ठरविलें. ह्यासंबंधांत सुपरवायझरांनीं अर्ज करण्याची मुदत ३० जून, १९४४ ही आहे. (१) अर्जदाराचें पूर्ण नांव (२) कोणत्या वर्षी व महिन्यांत कोणत्या केंद्रास बसून परीक्षा पास झाली त्याचा तपशील (३) कोणत्या संस्थांत कामें केलीं त्याची माहिती व (४) यूनिअनच्या चेअरमनचा कामासंबंधीं शेरा, हीं सर्व अर्जांत नमूद केलीं पाहिजेत.

इन्स्टिट्यूटला देणग्या द्या.

इन्स्टिट्यूटचें फीचें उत्पन्न आतां बरेंच कमी झालें आहे व सभासद वाढविण्याचें क्षेत्रहि आकुंचित झालें आहे. ज्या सहकारी संस्थांना शक्य आहे अशांनीं इन्स्टिट्यूटसारख्या मध्यवर्ती संस्थेस सहाय करणें इष्ट आहे. सहकारी सोसायट्यांना आपल्या नफ्याचा कांहीं भाग मदतीदाखल काढतां येतो व त्याच्या ५ ते १०% रक्कम इन्स्टिट्यूटला देणगी देतां येते. ह्या देणगीस मंजुरी मिळूं शकते. देणगीच्या वार्षिक सदरांतून किंवा त्याच्या फंडांतून सहकारी संस्थांनीं इन्स्टिट्यूटला सढळ हातानें मदत करावी, अशी विनंति करणारें एक पत्र इन्स्टिट्यूटच्या चेअरमननीं सोसायट्या, सेंट्रल बँका, अर्बन बँका व कांहीं महत्त्वाच्या सेल सोसायट्या ह्यांचेकडे पाठविलें आहे.

हें पत्र पुणें, पेठ शनवार नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' शनवार, नं. ९२७।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
(टपाल खेरीज माफ)
किरकोळ अंकास
दोन आणे.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष १० पुणें, बुधवार, तारीख ७ जून, १९४४ अंक २३

★ नगर बॉंबे ट्रेडिंग कंपनी ★
चिनाब, लाइमज्यूस कॉर्डीअल, ऑरेंज व लेमन स्क्वॉश, टोमॅटो सॉस,
मँगो जॅम, मध, कोको, बेकिंग पावडर, सॅनिटरी टॉवेल्स
टुथ पेस्ट, टुथ ब्रश, वगैरे मालाचे
स्टॉकिस्ट.
शाखाः— हेड ऑफिसः—
माणिक चौक, अहमदनगर ★ पूना गेस्ट हाऊस, पुणें २

जिकडे तिकडे प्रशंसा
इमिटेशन दागिन्यांवर रासायनिक किया करून खऱ्या सोन्याचा पत्रा चढविला जातो त्यामुळें दागिना केव्हांही खराब होत नाही, ही पूर्ण खात्री झाली. सोन्याचा पत्रा चढविलेल्या चार बांगड्या किं. आठ रु. गरजेस्तव दागिना परत करणें झाल्यास वर चढविलेल्या सोन्याचे सर्वच्या सर्व पैसे परत देऊं.
भट कं. सांगली, S. M. C.
भट कंपनी शाखा—बुधवार पेठ, पुणें २.

पुण्यांतील
आदर्श निवासस्थान व भोजनालय
छाया लॉजिंग व बोर्डिंग हाऊस
बुधवार चौक, पुणें २.

पुना गेस्ट हाऊस
१००, लक्ष्मी रोड, पुणें २.
Telephone 779
GUEST HOUSE
TELEGRAM Guest House Poona 2.

स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.
गिरगांव मुंबई नं. ४
महिंद्रकर ब्रदर्स
तयार कपड्याचे व्यापारी
बुधवार चौक, पुणें

विविध माहिती

अशोको मिल्स लि.

वरील गिरणीनें १९४३ साली ५० लक्ष रुपये वसूल भांडवलावर ८०½ लक्ष रुपये नफा दाखविला. (त्यांतून कर व घसारा झांची तरतूद व्हावयाची आहे) भागीदारास १८½% डिव्हिडंड मिळालें.

बँकांत २८,००० स्त्री नोकर, परंतु एकहि मॅनेजर नाहीं

इंट ब्रिटनमधील बँकांतून २८,००० स्त्रिया नोकरी करीत आहेत, परंतु त्यांपैकीं एकीसहि अद्याप शाखेचे मॅनेजर नेमण्यांत आलेलें नाहीं. कांहींनीं इन्स्टिट्यूट ऑफ बँकर्सच्या परीक्षा दिलेल्या आहेत, तर कांहीं गेल्या महायुद्धापासून कामावर आहेत. बहुतेक स्त्री-नोकर विवाहाची वाट पहातच नोकरी करतात हें खरें असलें तरी कित्येक स्त्रिया बँकिंगचा व्यवसाय करण्यास तयार आहेत. परंतु, प्रमुख बँका आपलें धोरण बदलण्यास तयार नाहींत.

भारत बँक लि.

वरील बँकेच्या शाखांचे संख्येत ३१ मार्च अखेरच्या तिमाहींत ८१ शाखांची भर पडून त्यांची संख्या १८६ झाली. ठेवींची रक्कम ५½ कोटींवरून १४ कोटींवर गेली. वसु. प्रेफरन्स भागीदारांस ६% डिव्हिडंड मिळालें, परंतु ऑर्डिनरी भागीदारांस कांहीं डिव्हिडंड मिळालें नाहीं.

दि प्रीमिअर मोटर कं. लि.

वरील नांवाची ३½ कोटि रुपये अधिकृत भांडवलाची कंपनी उभारण्यास सरकारनें शेठ वालचंद हिराचंद यांस परवानगी दिली असून कंपनी लवकरच नोंदण्यांत येईल. मोटरगाड्यांचें उत्पादन हा तिच्या स्थापनेचा हेतु आहे. मॅनेजिंग एजन्सींत शेठ वालचंद, घरमसी स्टाव व तुळशीदास किलाचंद हे तिघे आहेत.

आणखी एक मोठी बँक

श्री. नारायणलाल बन्सिलाल यांच्या नेतृत्वाखाली बँक ऑफ जयपूर लि. नांवाची, ५ कोटि रुपये अधिकृत व १½ कोटि रुपये वसूल भांडवलाची बँक लवकरच स्थापन होणार आहे.

१९४२ मधील आयुर्विमा

१९४२ मधील आयुर्विम्याच्या व्यवसायाचा सरकारी अहवाल नुकताच प्रसिद्ध झाला आहे, त्यांतील महत्त्वाचे आकडे खाली दिले आहेत.

	नवीन कामाच्या पॉलिसींची संख्या	विम्यांची रक्कम
१९४१	२००,०००,	३९½ कोटि रु.
१९४२	१,७८,०००	४२¾ कोटि रु.

खर्चाचें प्रमाण २७·४% वरून २६·७% वर आलें व लाइफ फंडांत ७ कोटि, १५ लक्ष रुपयांची भर पडली.

हिंदुस्थान सरकारचें नवें कर्ज

हिंदुस्थान सरकारनें अल्पमुदतीचें ५० कोटि रुपयांचें कर्ज उभारण्याचें ठरविलें आहे. या कर्जावरील व्याजाचा दर २½% असून परतफेड १९४८-५२ मध्यें होईल.

Deccan Institute Of Commerce, Poona

(Recognised by Government).

Classes for the 1944–45 Session begin on Saturday the 1st July. Students admitted for G. D. C. & C., L. C. C., D. Com. (I. M. C.), R. A. (1st Part), G. D. C. & A., Shorthand and Typewriting. Morning and evening classes. Highly qualified and experienced staff. Prospectus free on application.

592/3 Budhwar Peth, Opp. New English School, Poona. } Secretary.

D. E. SOCIETY'S

Brihan Maharashtra College of Commerce, Poona 4.

The College reopens on the 20th June 1944. Admissions to the F. Y. Com., I. Com. and B. Com. classes will begin from 10th June. Applications for admission to the College and hostel should be made to the Principal in the prescribed form. The College Prospectus containing the application form will be sent on receipt of postage stamps worth two annas.

D. G. Karve,
Principal.

वाढत्या पुण्याचें वाढतें वैभव !

७० प्लॉट्सची

रामबाग कॉलनी समोर ××× हवेशीर

आयडियल कॉलनी

मोठ्या सरकारी रस्त्यावर ××× सोयिस्कर

प्रत्येक प्लॉटची किंमत रु. ८०० ते रु. १५००

प्रत्येक प्लॉटचें क्षेत्रफळ अकरा हजार स्के. फूट

म. य. दातार

खालील पत्त्यांवर चौकशी करावी म्हणजे प्लॉटस दाखविण्याची व्यवस्था करण्यांत येईल.

१ दया-निवास कॉमनवेल्थ कॉलनी, नारायण पेठ, पुणें २ भेटण्याची वेळ : सकाळीं ७ ते ८॥ व रात्रौ ८ ते ९

२ व्यवस्थापक, मॉडर्न कन्स्ट्रक्शन अँड डेव्हलपमेंट कंपनी, जीवनछाया, भेटण्याची वेळ—सकाळीं ९ ते ११

अनुक्रमणिका

	पृष्ठ		पृष्ठ
१ विविध माहिती ...	१७८	पूरवठा–इटलीमधील युद्ध आणि नवी आघाडी–ऐक्य विशेषांक	
२ जागतिक चलन परिषद्	१७९	७ आग व स्फोट यांतील नुकसानीची भरपाई ...	१८२
३ व्याजातून कराची कपात	१८०	८ शेतीचें उत्पादन वाढविण्यासाठी यंत्रसामुग्री ...	१८३
४ सर्व हिंदी रेडिओ केंद्र	१८०		
५ चेकच्या सुरक्षिततेंत वाढ	१८०		
६ स्फुट विचार	१८१		
हिंदुस्थान सरकारचें नियोजन खातें–स्वस्त कापडाचा			

अर्थ

बुधवार, ता. ७ जून, १९४४

जागतिक चलन व्यवस्था परिषद्

हिंदुस्थानास निमंत्रण

पुढील महिन्याचे प्रारंभीं अमेरिकेमध्यें जागतिक चलन परिषद् भरणार आहे. तिच्या चर्चेंत भाग घेण्यासाठीं हिंदुस्थान सरकारनें आपले प्रतिनिधी पाठवावे ह्या आशयाचें निमंत्रण त्यास प्रेसिडेंट रूझव्हेल्ट ह्यांनीं पाठविलें असून त्याचा स्वीकार करण्यांत आला आहे. सदरहु परिषदेंत मित्रराष्ट्रें आणि त्यांच्या पक्षाचे देश आपापले प्रतिनिधी पाठवणार आहेत. त्यांच्या बरोबरीनें हिंदुस्थानास चलन परिषदेंत स्थान देण्यांत आलें आहे. ह्यासंबंधांत हिंदुस्थान सरकारनें माहिती प्रसिद्ध केली आहे तिचा उल्लेख येथें करणें आवश्यक आहे. अमेरिकेंत भरणाऱ्या परिषदेंत कोणते प्रश्न चर्चेसाठीं येणार आहेत, ह्याचें विवेचन आम्हीं मागें केलेंच आहे. युद्धोत्तर काळांत राष्ट्याराष्ट्रांत होणाऱ्या देवघेवीचे, हुंडणावळीचे व भांडवलाच्या आयात-निर्गतीचे अवघड प्रश्न उद्भवतील त्यांची वेळींच समाधानकारक व्यवस्था लावून मागील महायुद्धानंतर अनुभवास आलेले घोटाळे वाचवावे ह्या हेतूनें इंग्लंड व अमेरिका ह्या देशांत तज्ज्ञांनीं योजना आखल्या असून त्यांवर दीर्घकालपर्यंत विचारविनिमयहि केला आहे. ह्या योजनांच्या महत्त्वाच्या तपशिलाबाबत अमेरिका आणि इंग्लंड ह्यांचेमध्यें मतभेद उद्भवले आहेत. तथापि आंतरराष्ट्रीय चलन व्यवस्थेच्या मुळाशीं असलेल्या तत्त्वांस दोन्हीं देशांत सामान्यतः मान्यता मिळाली आहे. रशियाचें मतहि अजमावण्यांत आलें आहे आणि तें अनुकूल असल्याचें दिसून आलें आहे.

युद्धोत्तर परिस्थितींतील आर्थिक पुनर्घटनेमध्यें आवश्यक होणारा आंतरराष्ट्रीय चलननिधी निर्माण करणें आणि त्याकरितां आवश्यक वाटल्यास शक्य तर एखादी आंतरराष्ट्रीय बँक स्थापन करणें हा अमेरिकेंत भरावयाच्या परिषदेचा मुख्य हेतु आहे, असें हिंदुस्थान सरकारच्या पत्रकांत म्हटलें आहे. ह्या बाबतींतली योजना आखतांना तिच्या संबंधांत आतांपर्यंत झालेली चर्चा व विचारविनिमय ह्यांचा आधार घेतला जाईल. परिषदेच्या कार्यक्रमांत भाग घेणाऱ्या राष्ट्रांच्या प्रतिनिधींस अंतिम व बंधनकारक मत देण्याचा अधिकार असणार नाहीं आणि तीमध्यें सामान्यतः मान्य झालेले निर्णय स्वीकारणें किंवा न स्वीकारणें प्रत्येक राष्ट्रीय सरकारच्या मर्जीची गोष्ट राहील, हें प्रेसिडेंट रूझवेल्ट ह्यांच्या निमंत्रणपत्रिकेंतच स्पष्ट करण्यांत आलें आहे. तेव्हां हिंदुस्थानचे प्रतिनिधी ह्या देशाच्या नांवानें परिषदेच्या निर्णयास अनुमति देऊन टाकून परत येतील अशी भीति वाटण्याचें मुळींच कारण नाहीं. परिषदेचे निर्णय हिंदुस्थानच्या मध्यवर्ती कायदेमंडळापुढें मांडण्यांत येतील आणि त्यांच्या अभिप्रायास अनुसरूनच येथील सरकारास स्वतःचें मत अखेर बनवावें लागेल. जगांतील सर्व देशांस मान्य होईल अशी आंतरराष्ट्रीय चलनव्यवस्थेची योजना अमेरिकेंत भरणाऱ्या परिषदेंत बनवली जाईल आणि जागतिक स्वास्थ्य व शांतता ह्यांस ती पोषक होईल अशी आशा आमच्या सरकारनें प्रगट केली आहे.

चलनपरिषदेसाठी हिंदुस्थानचे प्रतिनिधी म्हणून फडनवीस सर जरेमी राइस्मन, रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर सर चिंतामण देशमुख, सरकारचे आर्थिक सल्लागार, सर थिओडोर ग्रेगरी, सर पण्मुखम् चेट्टी व टाटा सन्सचे डायरेक्टर, मि. ए. डी. श्रॉफ ह्यांची निवड करण्यांत आली आहे, ती योग्य आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. युद्धोत्तर जागतिक चलनव्यवस्थेच्या संबंधानें इंग्लंड व अमेरिका ह्यांच्या वतीनें पुढें मांडण्यांत आलेल्या योजनांची चर्चा हिंदुस्थान सरकारच्या कार्यकारी मंडळाच्या उपसमितीनें व आर्थिक सल्लागार समितीनें अलीकडे केली असून, ह्या देशाचें धोरण प्रस्तुत बाबतींत काय असावें हें स्थूल रीतीनें ठरवलें आहे. त्यास धरूनच अमेरिकन परिषदेस जाणाऱ्या हिंदी प्रतिनिधींची भूमिका राहील आणि सर्वसाधारणपणानें व्यक्त झालेलें हिंदी लोकमतहि ते ध्यानांत ठेवतील अशी अपेक्षा आहे. हिंदुस्थानच्या हितसंबंधांचें योग्य रक्षण जिनें होईल आणि ह्या देशापुढें चलनविषयक प्रश्न युद्धसमाप्तीनंतर उभे रहातील ते समाधानकारक रीतीनें सोडवले जाण्यास सहाय्यक होईल अशी जागतिक चलनव्यवस्था मान्य करण्यास प्रत्यवाय नाहीं असा हिंदी लोकमताचा सामान्यतः सूर आहे. हिंदुस्थानचे हजार दीड हजार कोटि रुपये लंडनमध्यें युद्धसमाप्तीचे वेळीं पडून राहिले असतील ते इंग्लंडनें कसे ह्या देशास परत करावयाचे हा जिव्हाळ्याचा प्रश्न आहे. युद्धामुळें आंतरराष्ट्रीय देण्याघेण्याच्या बाकी निघतील त्यांची व्यवस्था करण्याची तरतूद चर्चेचा विषय होणाऱ्या जागतिक चलन गंगाजळीच्या योजनेंत अंतर्भूत नाहीं हें तिच्यामध्यें वैगुण्य आहे असें मानण्यांत येत आहे. अमेरिकन योजनेंत प्रारंभीं अशी तजवीज होती. पण तिच्या योगानें सबंद योजना डळमळित होईल असें वाटल्यावरून ती टाकून देण्यांत आली आहे. हिंदुस्थानच्या लंडनमधल्या शिलकी पैशाची दिल्हेवाट कशी करावयाची ह्या प्रश्नाचा निकाल यामुळें ब्रिटन व हा देश ह्यांस परस्पर करावा लागेल अशी कल्पना आहे. तथापि, हा प्रश्न चलन परिषदेंत उपस्थित करण्यास हिंदी प्रतिनिधींस मुभा आहे. हिंदी लोकांस स्वतःचें आर्थिक धोरण ठरवण्याचें स्वातंत्र्य नसल्यानें हिंदुस्थान व इंग्लंड ह्यांच्या हितसंबंधांत व मतांत विरोध उत्पन्न झाल्यास त्याचा अखेर निकाल कसा लागेल ह्याविषयीं चिंता वाटणें स्वाभाविक आहे. स्टर्लिंग चलनाशीं संबद्ध असलेल्या देशांचा स्वतंत्र गट रहावा असा ब्रिटिश तज्ज्ञांचा अभिप्राय आहे. तो जागतिक चलन

व्यवसायेच्या योजनेशी विसंगत होईल की काय अशी शंकाहि वाटत आहे. त्या योजनेप्रमाणें कारभार होईल त्यांत हिंदुस्थानास योग्य स्थान मिळावें अशी हिंदी लोकमताची मागणी आहे. सर ए. रामस्वामी मुदलियार ह्यांनीं एकदा बोलून दाखविल्याप्रमाणें होऊं घातलेल्या जागतिक चलन व्यवस्थेंत हुंडणावळीच्या दरांच्या मामुली व्यवहारांचीच तेवढी तजवीज करून भागणार नाहीं; हिंदुस्थानचा मागी व्यापार आणि औद्योगिक प्रगति ह्यांचे दृष्टीनें तिची घडण अनुकूल असली पाहिजे. चलन परिषदेंत हिंदी प्रतिनिधी हा देशाची बाजू जोरानें पुढें मांडतील अशी अपेक्षा करण्यास प्रत्यवाय नाहीं. हिंदी कायदे मंडळांत ह्या सबंद विषयांची चर्चा होईपर्यंत आपण कोणतीच योजना पत्करण्यास तयार नसल्याचें हिंदुस्थान सरकारनें स्पष्ट केलेंच आहे.

व्याजांतून इनकमटॅक्सची कपात

सरकारी रोख्यांवरील व्याज देतेवेळीं त्यांतून प्राप्तीवरील कर कापून घेण्यांत येतो, परंतु लहान प्राप्तीच्या लोकांची त्यामुळें गैरसोय होते. ज्यांची १९४३-४४ मधील एकूण प्राप्ति १,५०० रुपयांपेक्षा कमी भरली, अशांना कापून घेतलेली कराची सर्व रकम परत मिळाली पाहिजे. त्याचप्रमाणें, १,५०० रुपयांवरील प्राप्तीच्या मनुष्यासहि त्याच्या प्राप्तीवर बसणाऱ्या दरापेक्षा जितक्या ज्यास्त दरानें कर कापून घेतलेला असेल, त्या प्रमाणांत रकम परत मिळाली पाहिजे. प्राप्त असलेल्या दरापेक्षां ज्यास्त दरानें १९४४-४५ मध्यें कर कापला जाऊं नये, ह्याकरितां रिफंडचा अर्ज करणारानें इनकमटॅक्स अधिकाऱ्यास आपल्या सर्व रोख्यांचा तपशील पुरवून त्याजकडे करमाफीचा किंवा कमी दरानें कर आकारणीचा दाखला मिळण्याची विनंति करावी. कर्जरोख्यांवरील व्याज जेथून घेण्यांत येतें, तेथें हा दाखला सादर करावा, म्हणजे करास पात्र नसलेल्या रोखेवाल्यांच्या व्याजांतून कर निष्कारण कापला जाणार नाहीं.

नवें हिंदी रेडियो केंद्र

दिल्लीच्या जवळच एक नवें रेडिओ केंद्र उघडण्यांत आलें आहे. मुंबईमधील क्वीन्स रोडवरील स्टूडिओंतील कार्यक्रम ज्याप्रमाणें शहराबाहेर नेऊन तेथून ते प्रसृत केले जातात त्याप्रमाणें दिल्लीच्या ब्रॉडकास्टिंग हाउसमधील कार्यक्रम टेलिफोनच्या तारांतून नव्या केंद्रांत आणले जातात. तेथून ते ईशान्येकडे जपान, आग्नेयेकडे मलाया व इतर देश, वायव्येकडे युरोप आणि नैऋत्येकडे दक्षिण आफ्रिका, मादागास्कर इत्यादि देशांकडे पाठविण्यांत येतात. हें स्टेशन दिवसांतून बारा तास चालू राहणार आहे व त्यानें पाठविलेली शक्ति १०० किलोवॅट इतकी आहे. म्हणजे, दिवसास २० हजार युनिट वीज प्रसृत केली जाते व तिचे साहाय्यानें कार्यक्रम दूरपर्यंत पोंचतात. सर्चलाइटच्या झोताप्रमाणें ह्या शक्तीचा झोत आवश्यक त्या दिशेकडे वळवतां येतो. ह्या योगानें शक्तीची बरींच बचत होते. हा झोत इतका सामर्थ्यवान् आहे कीं तो पृथ्वी प्रदक्षणा करूं शकतो व त्या झोताचे मार्गावरील सर्व जगांतील देशांत केंद्रांतील कार्यक्रम पोचवितो. हें स्टेशन १ मे पासून चालू आहे.

चेकची सुरक्षितता वाढवितां येईल काय?

(ले०—श्री. पी. सी. बेंद्रे, बी. ए., एल्एल. बी.)

चेकची पद्धत ही व्यापारी युगांत सुरक्षित व फार सोयीची अशी पद्धत आहे. त्यायोगें आपणांस ज्या व्यक्तीस पैसे पाठवायाचे असतील त्यांस अतीशय कमी त्रासांत व कमी खर्चांत वाटेल तेवढी रक्कम देतां येते. चेकची उपयुक्तता बँक व खातेदार यांचे सहकार्यानें वाढण्याजोगी आहे व त्याच दृष्टीनें खालील मुद्दा सुचवीत आहें.

खातेदारानें गिऱ्हाइकास चेक दिल्यानंतर बँकेचे नियमानुसार सदर चेक बँकेकडे वटविण्याकरितां आला तर बँकेस खातेदाराच्या खात्यांतील रकमेंतून तो चेक वटवावा लागतो. परंतु चेक देणाऱ्या खातेदारानें चेक न वटविल्याबद्दल बँकेस कळविल्यानंतर बँकेला तो चेक न वटवितां परत करतां येतो. चेक न वटविण्याबद्दल कळविल्यानंतर मुद्दा बँकेच्या अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळें अगर दुर्लक्षामुळें सदर चेक वटविला जाण्याचा संभव असतो व तसें झाल्यास बँकेच्या चुकीबद्दल खातेदारांस विनाकारण नुकसान सोसावें लागेल. या बाबतींत बँकांचा असा नियम असतो कीं, अशा तऱ्हेची जबाबदारी बँकेवर नाहीं. हा नियम अन्यायाचा व सर्वसाधारण व्यवहारास सोडून आहे. आपल्या निष्काळजीपणामुळें दुसऱ्याचें नुकसान झाल्यास तें भरून देण्याची जबाबदारी निष्काळजीमाणसांवर असणें हें वाजवी आहे. या सर्वसाधारण नियमास बँकांचा अपवाद करण्यास पुरेसें कारण दिसत नाहीं. उलट बँकर म्हणून त्यांचेवर ज्यास्त जबाबदारी असावयास पाहिजे. परंतु प्रत्यक्ष वस्तुस्थिती मात्र या उलट दिसेल. कारण बँका संघटित व आर्थिक दृष्ट्या ज्यास्त सामर्थ्यवान असतात तर खातेदार हा असंघटित व आपले हक्कासंबंधीं उदासीन व निष्काळजी असतो. व्यवहारदृष्ट्या योग्य व न्याय्य जबाबदारी, आणि विशेषतः ती जबाबदारी बँकेच्याच निष्काळजीपणामुळें उत्पन्न झालेली असलेमुळें, बँकांना स्वीकारावयास लावून त्यामुळें खातेदाराचें नुकसान झालें असल्यास त्याची भरपाई करावयास भाग पाडण्यास लागणारें सामर्थ्य व संघटना खातेदारांत नाहीं. तें उत्पन्न करून ह्यांकांना ही जबाबदारी घेण्यास भाग पाडणें हें चेकची उपयुक्तता व सुरक्षितता वाढविणेचे दृष्टीनें अगत्याचें आहे. तरी खातेदारांनीं या बाबतींत लक्ष घालून योग्य ती सुधारणा घडवून आणणें व बँकांनीं ही न्याय्य जबाबदारी स्वीकारून आपली कार्यक्षमता वाढविणें जरूर आहे. सर्व बँकांमध्यें पूर्वीपासून असाच नियम आहे अशा प्रकारचे उत्तरानें बँकांना जबाबदारी टाळणेस मदत होईल परंतु त्यामुळें त्यांची कार्यक्षमता वाढणार नाहीं.

हिंदी रेल्वेजसाठी कनेडिअन इंजनें व तज्ञ

हिंदुस्थान सरकारनें ३ जुलै १९४३ रोजीं दिलेल्या ऑर्डरीस अनुसरून कॅनडामध्यें रेल्वे इंजिनें बनविण्यांत येत आहेत. १४५ इंजनें लवकरच हिंदुस्थानांत दाखल होतील. कनेडियन पॅसिफिक रेल्वे कंपनीचे तज्ञ इंजिनांच्या बनावटीवर देखरेख करीत आहेत व तीं हिंदुस्थानांत दाखल झाल्यावर तीं चालू करून देण्याची जबाबदारीहि त्या कंपनीवरच आहे त्याकरितां, कनेडिअन तज्ञ येथें येणार आहेत.

स्फुट विचार

हिंदुस्थान सरकारचें नियोजन खातें

आर्थिक नियोजनाच्या "मुंबई प्लॅन" ह्या नांवानें प्रसिद्ध असलेल्या मसुद्याच्या कर्त्यांपैकीं एक प्रमुख, सर अर्देशिर दलाल, ह्यांची हिंदुस्थान सरकारनें आपल्या एक्झिक्युटिव्ह कौन्सिलांत नियोजन व संघटना खातें स्थापून त्याचेवर नेमणूक केली आहे. त्यांनीं आपल्या एका मुलाखतींत ह्या नव्या खात्याच्या कार्यक्रमादिषयीं स्पष्टीकरण केलें. मुंबई प्लॅनचें उद्दिष्ट हिंदुस्थान सरकारनें मान्य कलें असल्याचें त्यांनीं सांगितलें. नियोजनाच्या मसुद्याच्या कर्त्यांपैकीच एकाचे ताब्यांत हें नवें खातें देऊन सरकारनें मुत्सद्देगिरी दाखविली आहे. युद्धसमाप्तीनंतर मोकळ्या होणाऱ्या २० लक्ष लोकांस काम पुरविणें व सध्याचा प्रचंड युद्धखर्च थांबल्यावर निर्माण होणाऱ्या मंदीस तोंड देणें हीं महत्त्वाचीं कामें पार पाडल्यानंतरच दीर्घकालीन नियोजनास प्रारंभ करतां येईल असें सर अर्देशिर ह्यांनीं सांगितलें. वाकबगार माणसें तयार करणें, शास्त्रीय संशोधनाचा विस्तार करणें इत्यादि प्राथमिक गोष्टी पुऱ्या होण्यांतच कित्येक वर्षे जातील. नियोजित कार्यक्रमांत भांडवल, व्यापार, कारखानदारी इत्यादींचें नियंत्रण अंतर्भूत असल्याकारणानें व जबर कर आणि लोकांच्या रुढींत बदल हीं क्रमप्राप्त असल्यानें, राष्ट्रीय सरकारच त्यासंबंधांत पुढाकार व जबाबदारी घेऊं शकेल, हें उघड आहे. परंतु, त्यासाठी थांबण्याचें कारण नाहीं व सध्याच्या सरकारनें प्राथमिक तयारी करण्यांत नुकसान नाहीं असें सर अर्देशिर ह्यांचें मत आहे. मध्यवर्ती सरकार, प्रांतिक सरकारें व बिनसरकारी लोक यांचें सहकार्य ह्यांची आवश्यकता त्यांनीं प्रतिपादन केली. आर्थिक नियोजनाची सर्वसाधारण कल्पना पुढें मांडणें व त्या कल्पनेस मूर्त स्वरूप देणें, ह्यांत किती फरक व अडचणी आहेत, हें वरील विवेचनावरून स्पष्ट होईल. वहातुक व शिक्षण ह्यासंबंधांतील युद्धोत्तर नियोजन सरकारचें तयार आहे; सार्वजनिक आरोग्य, शेती व उद्योगधंदे ह्यांची पहाणी चालू आहे. सर अर्देशिर दलाल ह्यांच्या खात्याकडून अति लवकर परिणामांची अपेक्षा करणें चुकीचें ठरेल.

स्वस्त कापडाचा पुरवठा

कापडाचें उत्पादन गिरण्यांमध्यें भरपूर होत असतां पुष्कळसा माल काळ्या बाजारांत जातो आणि योग्य किंमतीनें सामान्य गिऱ्हाइकांस मिळूं शकत नाहीं. ह्या परिस्थितीवर कडक उपायांची योजना करण्याचें सरकारनें ठरवून हें धोरण अंमलांत आणण्याची व्यवस्था चालू केल्यानें सध्याची कापडाची महागाई बरीच कमी होईल अशी अपेक्षा आहे. मुंबई प्रांतांतील दहा कापड गिरण्यांच्या मालाची विक्री सरकारच्या नियंत्रणाखाली आलेली आहे आणि कापडाचे मोठमोठे साठे त्यानें ताब्यांत घेतले आहेत. चोर बाजारावरची सरकारी मोहीम ज्या प्रमाणांत यशस्वी होत आहे त्या प्रमाणांत जनतेस विकत मिळावयाच्या कापडाचा पुरवठा वाढत आहे. सरकारच्या नियंत्रणाखाली येणारें कापड ठराविक व्यापाऱ्यांचे मार्फत निश्चित किंमतीनें विकलें जावयाचें आहे. सरकारी नियंत्रणाखालील कापडाचा एकूण पुरवठा चालू साली पंचवीस कोटि यार्ड इतका होईल असा अंदाज आहे. ह्या कापडाचें उत्पादन करणाऱ्या गिरण्या आणि त्याची घाउक विक्री करणारे व्यापारी ह्यांचें सरकारी नियंत्रणाखालील व्यवस्थेनें कोणतेंच नुकसान होणार नाहीं. कारण, त्यांस आपल्या मालाचा योग्य भाव दिला जाईल. परंतु कापड विकत घेणाऱ्या जनतेस मात्र स्वस्त किंमतीनें माल मिळून लोकांची सोय व फायदा होईल. अशा रीतीनें मुंबई प्रांतांतील कापड विकत घेणाऱ्या सामान्य जनतेचे सवा दोन कोटि रुपये वांचतील असा अजमास करण्यांत आला आहे. साठेबाजी, नफेबाजी व चोरबाजार ह्यांवरील सरकारी मोहीम फलद्रूप होऊं लागल्याचें हें लक्षण आहे.

इटलीमधील युद्ध आणि नवी आघाडी

गेल्या आठ पंधरा दिवसांत इटलीमधील युद्धास नवें आणि निर्णायक वळण लागलें आहे. रोमकडे जाणारे रस्ते अमेरिकन, फ्रेंच व ब्रिटिश फौजांस न जुमानतां अडवण्यांत जर्मनीस थोडें फार यश मिळाल्यासारखें दिसत होतें. परंतु आतां ही परिस्थिति निश्चयात्मक रीतीनें बदलली आहे आणि केसलरिंगला एकामागून एक ठाणें सोडून देऊन सबंद इटालियन आघाडीवर माघार घ्यावी लागली आहे. गेल्या आठवड्यांत मित्र राष्ट्रांच्या सैन्यांनीं झपाट्यानें प्रगति केली असून ती सारखी चालूच आहे. त्यांचा प्रतिकार करण्याची धडपड शत्रू करीत आहे, पण इटलीची राजधानी रोम शहर त्यांच्या दृष्टिपथांत आलें आणि आतां तर त्यांच्या हातीं पडलें आहे. रोमच्या बचावासाठी भयंकर नुकसान सोसूनहि जर्मनीनें शिकस्त केली, पण तें एतिहासिक शहर आतां बाचत नाहीं अशी त्याचीहि खात्री झाली असली पाहिजे. रोमच्या पाडावानें हिटलरच्या इभ्रतीस चांगलाच धक्का बसणार असून मित्रराष्ट्रांच्या युरोपांतील दुसऱ्या आघाडीचें काम सुकर होणार आहे. ही आघाडी केव्हां चालू होणार ह्याविषयीं मित्रदेशांत तीव्र उत्कंठा सर्वांस लागली आहे. ह्या प्रश्नाचें उत्तर बऱ्याच स्पष्टपणानें प्रेसिडेंट रूझवेल्ट ह्यांनीं दिलें आहे. जून-जुलै-ऑगस्ट ह्या तीन महिन्यांच्या पलीकडे दुसऱ्या आघाडीचा प्रारंभ जाणार नाहीं असें त्यांनीं अमंदिग्ध रीतीनें सांगितलें आहे. ही नवीन चढाई कोणत्या दिशेनें किंवा दिशांनीं होणार ह्याविषयीं अनेक तर्क करण्यांत येत आहेत. त्यांपैकी कोणता खरा ठरतो हें लवकरच दिसून येईल असें मानण्यास जागा उत्पन्न झाली आहे.

ऐक्य (शैक्षणिक विशेषांक)

ऐक्य साप्ताहिकानें प्रतिवर्षीप्रमाणें शाळा कॉलेजें उघडण्याच्या प्रारंभीं ता. २१-५-४४ चा आपला अंक शैक्षणिक विशेषांक प्रसिद्ध केला आहे. त्यांत सातारा जिल्ह्यांतील शिक्षण संस्थांची सविस्तर माहिती दिली असून स्वतंत्र असे शिक्षणविषयक लेखहि छापले आहेत. त्यांपैकी एका लेखांत श्री. ना. मा. जोशी, एम. ए., (हेडमास्तर, प्रतिनिधि विद्यालय, कुंडल) ह्यांनीं सातारा जिल्ह्यांतील सर्व अँग्लो विद्यालयांच्या ऐक्याची कल्पना पुढें मांडली आहे.

मुंबईमधील आग व स्फोट ह्यांतील नुकसानीची भरपाई

मुंबईच्या गोदींत ता. १४ एप्रिल, १९४४ रोजीं झालेल्या स्फोटामुळें व आगीमुळें झालेल्या नुकसानीच्या भरपाईची आपली योजना हिंदुस्थान सरकारनें प्रसिद्ध केली आहे. कोर्टांत दावे लागले जाऊन त्यामुळें गैरसोय होऊ नये व व्यवहारास खीळ बसूं नये, ह्या हेतूनें ही योजना आखण्यांत आलेली आहे. आग अथवा स्फोट ह्यांचा विमा उतरलेल्या मालमत्तेचा नाश झालेला असेल, अशांच्या विम्याचे पोटी लॉईडस व इतर विमा कंपन्यांनीं सरकारनें एकूण नुकसान भरपाई देऊं केली आहे त्यापैकीं १२½ रकम सोडण्याचें स्वखुषीनें मान्य केलें आहे. म्हणजे, विमा कंपन्या व विमेदार ह्यांचेमध्यें दावे होणार नाहींत. विमा उतरलेल्या मालमत्तेच्या एकूण नुकसान भरपाईच्या १२½ रक्कम आपण देऊन विमा कंपन्यांनीं तडजोड केली आहे, ती सर्वसाधारण हितास पोषकच आहे. काळ्या बाजारांतील मालाच्या नाशाची नुकसानभरपाई केली जाणार नाहीं. सोनें, चांदी, घड्याळें, जडजवाहिर, चलनी नोटा, नाणीं, रोखे, तिकिटें, मालकी निदर्शक दस्तऐवज, हिशेबाच्या वह्या, नकाशे, नमुने, इत्यादींच्या नाशाची भरपाई करण्याची जबाबदारी सरकारनें स्वीकारलेली नाहीं. आगीचा व स्फोटाचा विमा ज्यांचा उतरलेला आहे, अशांच्या नाशाची १००% भरपाई सरकार करील. ह्यापैकीं १२½% रकम विमा कंपन्या सरकारास स्वखुषीनें देणार आहेत. इतर प्रकारच्या विमा उतरलेल्या मालमत्तेच्या नाशांची नुकसान भरपाईहि निश्चित करण्यांत आली आहे, त्याचप्रमाणें ज्यांचा विमा उतरण्यांत आलेला नाहीं, अशा चीजवस्तूंच्या नाशांचीहि अंशतः भरपाई करण्यांत यावयाची आहे. मालाचा साठा, मोटारी, इत्यादींच्याहि नाशाच्या भरपाईची व्यवस्था केलेली आहे. त्याचप्रमाणें मरण पावलेल्या अथवा जायबंदी झालेल्या संबंधांत खालीलप्रमाणें रकमा दिल्या जातील:—

मदतीची रक्कम

मासिक पगार अथवा प्राप्ति	अ मृत्यू रु.	ब कायम जायबंदी रु.
२० रुपयांपर्यंत	९००	१,३००
२१ ते ३०	१,३००	१,९००
३१ ते ४०	१,८००	२,५००
४१ ते ५०	२,२००	३,२००
५१ ते ६०	२,४००	३,०००
६१ ते ७०	३,२००	४,४००
७१ ते ८०	३,६००	५,०००
८१ ते १००	४,५००	६,३००
१०१ ते २००	५,२००	७,४००
२०१ ते ५००	७,०००	८,५००
५०१ ते १०००	८,०००	१०,०००
१००० ते १५००	१०,०००	१२,५००
१५०१ ते २०००	१२,०००	१५,०५०
२००० वर	१४,०००	१७,०००

अंशतः जायबंदी झालेल्यांना खालीलप्रमाणें नुकसानभरपाई मिळेल:—

हानीचें स्वरूप	वरील 'ब' मधील रकमेच्या%
उजवा हात, कोपरापर्यंत	७०
डावा हात "	७०
उजवा हात, कोपऱ्यासाठीं	६०
पाय, गुडघ्यासाठीं	६०
डावा हात, कोपऱ्यासाठीं	५०
पाय, गुडघ्यासाठीं	५०
कायम पूर्ण बहिरेपण	५०
एक डोळा	३०
अंगठा	२५
एका पायाचीं सर्व बोटें	२०
आंगठ्याचें एक पेर	१०
तर्जनी	१०
पायाचा आंगठा	१०
इतर कोणतेंहि बोट	५

हैद्राबाद संस्थानांतील ब्रॉडकास्टिंग

हैद्राबाद संस्थानाच्या ब्रॉडकास्टिंग खात्यावर सालिना ३½ लक्ष रुपये खर्च करण्यांत येतो. हैद्राबाद येथील केंद्राचे कार्यक्रम ४११ मीटर्सवर चालू असतात व औरंगाबाद केंद्राचे कार्यक्रम ३१९ मीटर्सवर होतात. त्या दोन्ही केंद्रांची शक्ति अनुक्रमें ५ किलोवॅट व ½ किलोवॅट अशी आहे. रेडिओ मालकांकडून लायसेन्स फी घेतली जात नाहीं, परंतु त्यासंबंधांत कायदा जाहीर होण्याचें घाटत आहे. हैद्राबाद येथें एक शॉर्टवेव्ह स्टेशन उघडण्याचा बेत आहे परंतु त्यासाठी यंत्रसामुग्री मिळण्याची अडचण आहे.

The Willingdon College, Sangli

Reopens for the academic year on 20th June 1944. The registration of names will commence on 12th June. The college provides for instruction in the Arts and Science courses in the first two years, for B. A. Degree courses pass and Honours, and for Post-graduate instruction. About a hundred seats are available in the College Hostels. Healthy surroundings, inexpensiveness and efficiency are the special features of the college.

The tuition fees are Rs. 60/- per term, and the room rent per term is Rs. 12/- for a double room and Rs. 15/- for a single room. Further information can be had on application.

Separate accommodation for Lady Students is available in the Sakhubai Gokhale Hostel on the college premises.

Principal,
Willingdon College.

निकृष्ट शेतीचें उत्पादन वाढविण्यासाठी यंत्रसामुग्रीचा उपयोग

हिंदुस्थान सरकारच्या खास नेमणुकींतील डॉ. बर्न्स ह्यांनीं हिंदी शेतीच्या सुधारणेसंबंधीं एक टाचण तयार केलें आहे. त्यांच्या म्हणण्याप्रमाणें, सध्या हिंदी गव्हाचें वार्षिक उत्पादन १ कोटि, ३ लक्ष टन आहे, तें १½ कोटि टनांपर्यंत वाढवितां येणें अगदी शक्य आहे. त्याचप्रमाणें, तांदळाचें उत्पादन २ कोटि, ४० लक्ष टनांवरून ३ कोटि टनांवर नेतां येण्यासारखें आहे. चांगल्या बियांचा उपयोग केल्यामुळें ५%, खतांचा उपयोग वाढविल्यामुळें २०% व कीड आणि रोग ह्यांचा प्रतिबंध केल्यामुळें ५%, अशा रीतीनें गव्हाच्या उत्पादनाचे ३०% वाढीचा तपशील आहे. सध्याचें उत्पादन दीडपट सुद्धां करतां येण्याजोगें आहे, असा डॉ. बर्न्स ह्यांस विश्वास वाटत आहे. ज्वारी, तंबाखू, कपास, ताग, ऊंस, बटाटे, इत्यादींचें उत्पादनहि सुधारतां येईल. हिंदुस्थानांतील शेतीच्या जमीनीची अवस्था आतां अशा थराला पोचली आहे, कीं त्यांतील उत्पादनाचें प्रमाण ठरून गेलें आहे. खतांचा वाढता उपयोग करण्याच्या शक्यतेचा उल्लेख ह्यासंबंधांत त्यांनीं केला आहे.

हिंदी शेतीचें दर एकरीं उत्पादन गव्हाचे बाबतींत इजिप्तमधील उत्पादनाचे एक तृतीयांश व हॉलंडचे उत्पादनाचे एक पंचमांश, इतकेंच आहे. इटलीमध्यें प्रत्येक एकरांत हिंदुस्थानाचे मानानें चौपट तांदूळ होतो. उसाचे बाबतींत तुलना केली तर जावाची बरोबरी करण्यास हिंदी ऊंसाचें दर एकरीं उत्पादन तिप्पट झालें पाहिजे. कपाशीचे बाबतींत इजिप्तमधील कपाशीचें दर एकरीं उत्पादनाचें प्रमाण हिंदुस्थानाचे मानानें पांचपट आढळतें. हिंदी गव्हाचे दर एकरीं उत्पादन फ्रान्स, इंग्लंड व डेन्मार्क ह्यांतील उत्पादनाच्या बरोबरीचें झालें, तर तेवढ्यानेंच फक्त हिंदी संपत्तींत सालिना अनुक्रमें ६७ कोटि, १ अब्ज व १½ अब्ज रुपयांची भर पडेल, असा सर मॅकडगल ह्यांचा अभिप्राय आहे. (१) जमिनीचा निकृष्टपणा, (२) अपुरा अथवा अनिश्चित पाऊस, (३) कापणीची असमाधानकारक पद्धति, (४) शेतीस लागणाऱ्या जनावरांचा व साधनांचा अभाव, (५) जमिनीचे पडलेले लहान लहान तुकडे, (६) भांडवल मिळण्याची अडचण, (७) विक्रीची जुनीपुराणी व्यवस्था व (८) निरक्षर शेतकऱ्यांत उत्साह व धडाडी ह्यांचा अभाव हीं हिंदी जमिनींच्या अपुऱ्या उत्पादनाचीं प्रमुख आठ कारणें आहेत असें "हिंदी खेडेगांवांचा प्रश्न" ह्या आपल्या ताज्या ग्रंथांत सर मणिलाल नानावटी व प्रो. जे. जे. अंजारिया ह्यांनीं म्हटलें आहे.* "पिढ्यानपिढ्या चालू असलेल्या अधिकाऱ्यांच्या बेफिकिरीच्या धोरणाचे दुष्परिणाम चालू युद्धानें ग्रामुख्यानें नजरेस आणले आहेत. त्यामुळें इतर देशांतील गेल्या पन्नास वर्षांतील प्रचंड प्रगतीशीं हिंदुस्थानांतील प्रगतीची तुलना करण्यांचें तर राहोच, परंतु आपल्या देशांत जनतेस पोटभर अन्न देणेंहि आज मुष्कील झालें आहे. अपुऱ्या अन्नपुरवठ्यामुळें अर्धपोटीपणा होता, त्याचे भरींस आतां अन्नाच्या प्रत्यक्ष तुटवड्याचें पिशाच्च दिसूं लागलें आहे. निर्यातीची बंदी, तातडीनें ऑस्ट्रेलियांतून व कॅनडांतून आयात, "अधिक धान्य पिकवा" मोहीम, वी पुरवठ्यासाठी किरकोळ मदत इत्यादि उपाय आतां हातीं घेण्यांत आले आहेत, त्यांनीं प्रश्नाचें उग्र स्वरूप कमी झालें तरी तो कायमचा सुटणार नाहीं. सरकारचें धोरणच आमूलाग्र बदललें पाहिजे व सरकार, आणि शेतकऱ्यांच्या उद्धारांत मन घालणाऱ्या खासगी व इतर संस्था आणि सामान्य नागरिक ह्यांनीं कसून प्रयत्न केला पाहिजे." असा पुस्तककर्त्यांचा आग्रह आहे.

शेतीसाठी यंत्रसामुग्रीचा उपयोग प्रतिपादन करतांना, डॉ. बर्न्स म्हणतात कीं मनुष्यबळाची जागा यंत्रांनीं घेतली तर शेतीवर कमी लोकांना काम मिळेल, असेंच केवळ मानण्याचें कारण नाहीं. प्रत्येक कामागणिक कमी माणसें पुरतील, परंतु दर एकरीं पूर्वीइतकींचहि माणसें लागू शकतील. यंत्रसामुग्रीमुळें पुष्कळ नवे धंदे निर्माण होतात. यंत्रें करणें, तीं चालविणें, तीं दुरुस्त करणें, यंत्रांचे सुटे भाग, जळण, ओंगणें, हीं पुरविणें वगैरे धंदेहि निर्माण होतात. एका ठिकाणाहून दुसरीकडे यंत्रें हलविण्याचीं म्हटलीं, म्हणजे रस्तेसुधराई आली व त्यांतहि पुष्कळ माणसांस वाव मिळतो. सुशिक्षित लोकांसहि नवे उद्योगधंदे मिळण्यास वाव प्राप्त होतो. डॉ. बर्न्स ह्यांची ही विचारसरणी कांहीं नवीन नाहीं परंतु, जी गोष्ट इतर ठिकाणीं क्रमप्राप्त ठरते ती हिंदुस्थानांत ठरतेच असें होत नाहीं, ही अनुभवाची गोष्ट आहे. रेल्वेजची वहातुक हिंदुस्थानांत सुरू होऊन इतका काळ लोटला तरी इंजनांचें उत्पादन अद्याप होऊं लागलेलें नाहीं. मोटार बसेसची वहातुक वाढली, तरी त्यांची आयातच करावी लागते व टायर्स, ट्यूब्ज, सुटे भाग, पेट्रोल ह्या सर्वांसाठी हिंदुस्थानास परदेशांवर अवलंबून रहावें लागतें. हिंदुस्थानांतील ही परिस्थिति डॉ. बर्न्स ह्यांच्या युक्तिवादाशीं जुळती नाहीं. अर्थात ही भूतकाळची गोष्ट आहे; युद्धोत्तर चढामोढी कदाचित् वेगळ्या स्वरूपांत आपणांस दिसतील. "शेतीचें मोठ्या प्रमाणावर यंत्रीकरण करणें हिंदुस्थानांत कांहीं काळ तरी फारसें फलदायी होणार नाहीं. तथापि आपल्या लहानशा तुकड्यांत उपयोगांत आणतां येतील अशा स्थानिक परिस्थितीस अनुसरून वेगवेगळ्या यंत्रसामुग्रींत सुधारणा घडवून आणण्यास मात्र भरपूर वाव आहे. स्वस्त, हलकीं व सोपीं अवजारें शेतकऱ्यांस हवीं आहेत व तीं उपलब्ध करणाऱ्या योजनांस पाठिंबा दिला पाहिजे" असें सर मणिलाल नानावटी व प्रो. अंजारिया म्हणतात.

* The Indian Rural Problem पृ. सं. ४२२. कि. ८ रु.

मुंबई सरकारच्या नोकरांचे प्रवासाच्या भत्त्यांत वाढ

मुंबई सरकारनें आपल्या नोकरांच्या प्रवासाच्या भत्त्यांत, सध्याची महर्गता लक्षांत घेऊन, वाढ केली आहे. दरमहा ८० रुपये किंवा त्यापेक्षा कमी कायम भत्ता मिळविणाऱ्यांस सध्याच्या दीडपट भत्ता मिळेल. ८० रुपयांवरील भत्तेवाल्यांच्या भत्त्यांत ३३⅓% वाढ होईल, परंतु प्रत्येकास किमान १२० रुपये प्रवासभत्ता मिळेलच. रस्त्यावरील प्रवासाचे दर मैली दर व रोजी भत्ता ह्यांतहि वाढ केली आहे.

क्रमिक पुस्तकांच्या किंमतींत वाढ

शाळांच्या क्रमिक पुस्तकांच्या किंमतींत ७०% ते १००% वाढ करण्यास प्रकाशकांना मुंबई सरकारनें परवानगी दिली.

देवकरण मानजी इनव्हेस्टमेंट कं. लि.

वरील कंपनी १५ फेब्रुवारी, १९४३ रोजी नोंदण्यांत आली व तिनें ३० मार्च, १९४३ रोजी व्यवहारास प्रारंभ केला. देनासन्स लि. हे कंपनीचे मॅनेजिंग एजंटस आहेत. कंपनीला पहिल्या वर्षअखेर तिच्या २५ लक्ष रुपये वसूल मांडवअवर ४% करमाफ डिव्हिडंड सुटलें. मॅनेजिंग एजंटांस १४,५४६ रुपये कमिशन मिळालें. मांडवल उभारणीच्या निर्बंधांमुळें कंपनी अंडरराय्टिंगचें काम अपेक्षेइतकें करूं शकली नाहीं.

ऑस्ट्रेलियाची लोकसंख्या वाढविण्याचा प्रयत्न

युद्ध संपल्यावर वहातुकीची सोय होतांच, ऑस्ट्रेलिया, ग्रेट ब्रिटन व युरोप खंडांतून राहिवासी आणण्यास प्रारंभ करणार आहे. रशियातून परतलेले सैनिक व लहान मुलें खास प्राधान्य मिळेल. हजारों लोकांना काम मिळूं शकेल, असा ऑस्ट्रेलियाच्या पंतप्रधानास विश्वास वाटत आहे.

पावसाळ्यासाठी कोळशाचा साठा

पावसाळ्यांत लागणाऱ्या कोळशाची तरतूद करतां यावी, म्हणून मुंबई शहर व उपनगर ह्यांतील दुकानदारास एकावेळीं नागरिकांना १२ आउवडयांचा कोळसा देण्याची परवानगी सरकारनें दिली आहे. १५ जून नंतर ही सवलत रहाणार नाहीं.

नॅशनल वॉर फ्रंटचा नॅशनल वेल्फेअर फ्रंट

युद्धाचे संबंधांत लोकांचा उत्साह कायम राखून मामुली व्यवहारांतील अडचणींचा प्रतिकार करण्यासाठीं नॅशनल वॉर फ्रंटची स्थापना मे १९४२ मध्यें करण्यांत आली. मि. पी. जे. ग्रिफिथ्स हे त्याचें मार्गदर्शन करीत होते ते नुकतेच निवृत्त झाले आहेत. जातीय सलोख्याचा भक्कम पाया स्थापन करण्यानें हें उद्दिष्ट अधिक चांगलें यशस्वी होऊन त्याचे सुपरिणामहि दीर्घकाळ टिकतील ह्या अपेक्षेनें नॅशनल वॉर फ्रंटचे नॅशनल वेल्फेअर फ्रंट असें नामांतर करण्यांत येऊन त्याचें घोरणहि बदलण्यांत येणार आहे.

प्रगतीचें श्रेय आपणांकडे

सह्याद्रि विमा कंपनीनें १९४३ सालीं खालीलप्रमाणें काम केलें आहें.

आलेलें काम	रु. ११, ४४, ४७१	१९४२	५ लक्ष ३ हजारानें
मंजूर काम	रु. १८, १५, ७१४	पेक्षां	१ लक्ष ९० हजारानें
पूर्ण विमा काम	रु. १६, १९, ७७५	वाढ	४ लक्ष ७ हजारानें

या सर्व प्रगतीचें श्रेय कंपनीचे विमेदार, प्रतिनिधी, प्रचाराधिकारी, भागीदार व हितचिंतक यांनाच आहे व त्याब्यावद्दल आम्हीं त्यांचे आभारी आहोंत. विमा–योजना त्याचप्रमाणें एजन्सी याच कंपनीची अत्यंत आकर्षक.

नासिक — मॅनेजिंग डायरेक्टर

न्यू इंडिया इंडस्ट्रीज लि.

(Approved Re-traders and Approved Contractors)

२६ लॅमिंग्टन नॉर्थ, मुंबई ११.

अध्यक्षः—श्री. ग. स. मराठे, ॲक्चुअरी.

महाराष्ट्रांतील रबराचा प्रमुख कारखाना

★ गिरणीचें रोलर्स ★ रबरी हातमोजे ★ छापखान्यांचे रोलर्स
★ रीमोल्ड टायर्स ★ रबरी वॉशर्स ★ सॉलिड व्हील्स

व इतर रबरी माल तयार होतो.

पु. ग. मराठे
मॅनेजिंग डायरेक्टर.

हें पत्र पुणें, पेठ शनवार नं. ९५१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' शनवार, घ. नं. १२७११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर,
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

अर्थ

वर्गणीचे दर,
वार्षिक वर्गणी
रु. ४
(टपाल खेरीज माफ)
किरकोळ अंकास
दोन आणे.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष १० पुणें, बुधवार, तारीख १४ जून, १९४४ अंक २४

दि ब्रिटिश इंडिया जनरल इन्शुअरन्स कं. लि.

(स्थापना : १९१९)

आम्हीं आयुर्विम्याखेरीज करून आग, मरीन, अपघात, इत्यादींचे सर्व प्रकारचे विमे स्वीकारतों.

—: चेअरमन व मॅनेजिंग डायरेक्टर :—

सर होमी मेहता, के. बी. ई., जे. पी.

पुणें शाखा :
मोति माणिक मॅन्शन,
लक्ष्मी रोड.

हेड ऑफिस :
मेहता हाऊस,
अपोलो स्ट्रीट, मुंबई.

पुना गेस्ट हाऊस

१००, लक्ष्मी रोड, पुणें २.

Telephone 779

GUEST HOUSE

TELEGRAM Guest House Poona 2.

स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

गिरगांव मुंबई नं. ४

महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

विविध माहिती

सरकारी नोकरांच्या, सेफ डिपॉझिट व्हॉल्टमधील नोटा

सरकारी नोकरांच्या भ्रष्टाचारपद्धतीच्या प्रकारांस आळा घालण्यासाठी आणखी अधिकार स्वतःकडे घेण्याचा हिंदुस्थान सरकारचा विचार आहे. गैरमार्गानें मिळविलेला पैसा सरकारी नोकर हजार रुपयांच्या दर्शनी किंमतीच्या चलनी नोटांच्या स्वरूपांत सेफ डिपॉझिट व्हॉल्टमध्यें ठेवतात, अशी कल्पना आहे. सरकारी नोकरांचे व्हॉल्ट उघडून पहाण्याचा सरकारनें प्रारंभ करावा, असें सुचविण्यांत येत आहे.

भिकाऱ्यांसाठी स्वावलंबी वसाहती

हिंदुस्थानांतील भिकाऱ्यांच्या पोषणाचा प्रश्न सोडविण्याची योजना श्री. मुणीलाल मेहरा यांनीं आंखली आहे. या योजनेस १ कोट रुपये खर्च येईल.

"नियोजन" खात्याच्या कामास प्रारंभ

सर आर्देशिर दलाल यांच्या नेतृत्वाखालीं नव्या 'नियोजन खात्या'च्या वरिष्ठ जागांसाठी बाहेरून नोकर आणविण्यांत यावयाचे आहेत, परंतु त्यांच्या हाताखाली मात्र हिंदीच नोकर देण्यांत येतील.

पी. डब्ल्यू. डी. खातें

मुंबई प्रांताच्या पब्लिक वर्क्स खात्यावर १९४२-४३ मध्यें १,७३,७७,७१२ रुपये खर्च झाला. प्रांतांतील सडीच्या व कच्च्या रस्त्यांची लांबी अनुक्रमें १०,६०२ मैल व १०,०४० मैल आहे, त्यांपैकीं अनुक्रमें ६,३३८ मैल व ३१० मैल रस्त्यांची व्यवस्था पी. डब्ल्यू. डी. कडे आहे. त्यांवर खात्यानें ९७ लक्ष, ७४ हजार रुपये खर्च केला, त्यापैकीं ४३ लक्ष, ७० हजार रुपये नेहमीच्या उत्पन्नांतून मिळाले; ४९ लक्ष, १० हजार रुपये पेट्रोल करांतून आले; ३ लक्ष, ९० हजार रुपये प्रांतिक रोड फंडांतून मिळाले व १ लक्ष, ३ हजार रुपये स्पेशल डेव्हलपमेंट फंडांतून आले. दापोडीच्या वर्कशॉपमध्यें ३ लक्ष, ५० हजारांचें काम पुरें होऊन त्यांत ५९ हजार रुपये नफा राहिला. १९४२-४३ मध्यें विजेच्या पुरवठ्याचा एकहि नवीन परवाना देण्यांत आला नाहीं. सध्यां ६५ शहरांतून विजेचा पुरवठा चालू आहे. विजेवरील कराचें उत्पन्न ३२ लक्ष, ३५ हजार रुपये भरलें. पी. डब्ल्यू. डी. च्या व्यवस्थेखालील रस्त्यांच्या दुतर्फा ७,२३,४०१ झाडें होतीं. म्हणजे, एका वर्षांत त्यांची संख्या ४ हजारांनीं घटली.

औषधांचा अवास्तव साठा करूं नका

कित्येक लोक औषधें, लहान मुलांस लागणारीं अन्नें व पेयें इत्यादींचा मामुली गरजेपेक्षा मोठा साठा करून ठेवतात, त्यामुळें इतरांची गैरसोय होते. असा साठा करणें गुन्हा असून तो उघडकीस आल्यास त्यावर सटला भरला जाईल व गुन्हा सिद्ध झाल्यास जबर शिक्षेस तो पात्र होईल, असें मुंबई सरकारनें प्रसिद्ध केलें आहे.

मुंबई प्रांतांत आणखी १ लक्ष टन धान्य पिकणार

"बॉंबे प्रोथ ऑफ फूड क्रॉप्स ॲक्ट"ची अंमलबजावणी मुंबई प्रांताच्या कांहीं विभागांत होत असल्याकारणानें कपास व तंबासू ह्या खालील सुमारें ६ लक्ष एकर जमिनींत धान्यांची पेरणी होईल व प्रांतांतील धान्याच्या उत्पादनांत त्यामुळें १ लक्ष टनाची भर पडेल, असा अंदाज आहे. सरकार ठराविक किंमतीस धान्य विकत घेण्याची हमी देणार आहे.

'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.

हेड ऑफिस : पुणें शहर.
स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.
मुंबई शाखा : हलाल स्ट्रीट, फोर्ट.
जळगांव शाखा : नवी पेठ, मेन रोड.
नागपूर शाखा : गोखले बिल्डिंग, सिताबर्डी.

भांडवल

अधिकृत व विकीस काढलेलें	खपलेलें	वसूल झालेलें
रु. १०,००,०००	रु. १०,००,०००	रु. ५,००,०००

एकूण खेळतें भांडवल रु. ७४,००,०००

बँकेच्या शेअरवर डिसेंबर १९४३ अखेर ४½% करमाफ डिव्हिडंड दिलें गेलें. बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदी-विक्री कमीशनेंकरून दिली जाते.

बँकेनें रु. ५ प्रीमिअमनें काढलेले सर्व शेअर्स विकले गेले. विशेष माहितीसाठी भेटा अगर लिहा.

सी. व्ही जोग,
B. Com., C. A. I. B., C. A. L. L. B.
मॅनेजर

दि बँक ऑफ इंडिया लि.

[स्थापना : १९०६]

अधिकृत भांडवल	...	...	...	रु. ३,००,००,०००
वसूल झालेलें भांडवल	...	...	...	रु. १,००,००,०००
रिझर्व्ह फंड	...	...	...	रु. १,२३,००,०००

मुख्य कचेरी : ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

मुंबईमधील शाखा : बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

इतर शाखा : अहमदाबाद (मद्र, मुख्य ऑफिस), अहमदाबाद (एलिस ब्रिज शाखा), अहमदाबाद (स्टेशन शाखा), अमृतसर, अंधेरी (मुंबई शेजारी), बांद्रे (मुंबई शेजारी), कलकत्ता (क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्क्वेअर), जमशेदपूर, कराची, नागपूर (किंग्जवे), नागपूर (इतवारी बझार), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत, भुज (कच्छ).

लंडन एजन्ट्स : वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

डायरेक्टर्स : सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय.(अध्यक्ष), श्री. अंबालाल साराभाई, सर जोसेफ के. नाईट, मि. ए. गेडिस, सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, जी. बी. ई., के. सी. आय. ई., मि. दिनशा के. दाजी, श्री. रामनिवास रामनारायण.

करंट डिपॉझिट अकाउंट्स :

दररोजच्या रु. १०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षां कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतींच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्समाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते, सर्व तऱ्हेचें ट्रस्टींचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

एजंट :—एच्. पी. करीमभाई

अनुक्रमणिका

	पृष्ठ		पृष्ठ
१ विविध माहिती ...	१८६	यांत परीक्षांतला गोंधळ— मि. मॅटिम्यू नॉर्मन	
२ लंडनमधील हिंदुस्थानचा शिलकी पैसा ...	१८७	६ संगमनेर मर्चंट्स असोसिएशन ...	१९०
३ चेकची सुरक्षितता वाढविता येईल काय! ...	१८८	७ शेअर बाजार ...	१९०
४ सर रामन ह्यांचा नवा शोध	१८८	८ हिंदुस्थानच्या सांचलेल्या शिलका ...	१९१
५ स्फुट विचार ... मित्रराष्ट्रांची पश्चिम युरोपांत स्वारी—विश्वविद्यालय	१८९	९ महाराष्ट्राच्या अन्नपुरवठ्याचा प्रश्न ...	१९१

अर्थ

बुधवार, ता. १४ जून, १९४४

लंडनमधील हिंदुस्थानच्या शिलकी पैशाचें काय करणार?

ब्रिटिश वृत्तपत्रांची पोटदुखी

इंग्लंड व अमेरिका ह्यांचे वतीनें हिंदुस्थानमध्यें येथील चलनांत खर्च होतो, त्याचे पैसे ह्या देशास लंडनमध्यें मिळतात आणि त्याच्या शिलका लंडनमध्यें साचून रहातात. हे पैसे हिंदुस्थानास परत कसे मिळावयाचे आणि ते येथें परत कसे आणावयाचे हा मोठा अवघड प्रश्न होऊन बसला आहे. जपानशीं चाललेल्या युद्धामुळें मित्रराष्ट्रांचा हिंदुस्थानांतील खर्च वाढणार असून तो भागला जाण्यासाठी येथील सरकारास चलनी नोटांचा प्रसार करावा लागतो. ह्या नोटांस लंडनमध्यें जमा होणाऱ्या शिलकांचा पौंड-स्टर्लिंगचा आधार असतो. तथापि, हिंदुस्थानांत पसरणाऱ्या चलनाचा परिणाम महागाईस अनुकूल असा होतो. हिंदी राष्ट्राचा पैसा लंडनमध्यें सुरक्षित आहे, परंतु त्याच्या योगानें वाढणारी महागाई लोकांस जाचक होते. "लंकेंत सोन्याच्या विटा" अशाचपैकी हा प्रकार झालेला आहे आणि त्यामधून कसा मार्ग काढावा ह्याचें कोडें पडलें आहे. हिंदी पुढाऱ्यांचें असें म्हणणें आहे कीं, हिंदी शिलकींचा उपयोग उद्योगधंद्यांस लागणारी यंत्रसामुग्री आयात करण्याकडे केला जावा आणि ही आयात कशी व्हावी ह्या विषयींचा कार्यक्रमहि निश्चितपणानें आखला जावा. अमेरिकेंत भरणाऱ्या जागतिक चलन परिषदेंत आंतरराष्ट्रीय देवघेवीच्या वजावाटीचा प्रश्न चर्चेला जाणार असल्यानें हिंदुस्थानच्या शिलकींचा विषय तीमध्यें उपस्थित केला जाईल. परिषदेचा निर्णय स्वतःच्या इच्छेप्रमाणें होणार नाहीं अशी भीति ब्रिटिश धंदेवाले आणि त्यांचीं मुखपत्रें ह्यांस वाटत आहे. ह्या भीतीचें कारण दुहेरी आहे. एकतर अमेरिकन व ब्रिटिश कारखानदार व व्यापारी ह्यांचेमध्यें हिंदुस्थानाशीं व्हावयाच्या व्यापाराचे संबंधांत स्पर्धा असून त्यांची परस्परांच्या घोरणाबाबत एकमेकांविरुद्ध टीकाहि झाली आहे. इंग्लंड व हिंदुस्थान ह्यांच्या चलनाचा पौंड-स्टर्लिंग हा एकच आधार असल्यानें आपआपसांतील हुंड्यावळीचा प्रश्न त्यांनीं परस्पर सोडवावा आणि त्यांच्या भानगडींत अमेरिकेनें पडण्याचें प्रयोजन नाहीं अशी ब्रिटिश धंदेवाल्यांची विचारसरणी आहे.

दुसरी आणि जबरदस्त अडचण इंग्लंडला वाटत आहे ती अशी आहे. हिंदुस्थानच्या मालकीचे हजार-पंधराशें कोटि रुपये ह्या देशास पाठवण्याचा बोजा इंग्लंडवर येऊन पडणार आहे. ही प्रचंड रक्कम लंडनमध्यें पौंडांत आहे आणि ह्या पौंड-स्टर्लिंगचें रूपांतर हिंदी चलनांत म्हणजे रुपयांत व्हावें लागेल. हिंदुस्थानावरील हुंड्यांच्या खरेदीच्या मार्गानें ही तबदिली करावी लागेल आणि अशा हुंड्या ब्रिटिश मालाच्या निर्गतीवरच निघणार. ह्या हुंड्यांचा पुरवठा मर्यादित असणें अपरिहार्य आहे आणि त्यांस मागणी मात्र मोठी रहाणार. त्याचाच अर्थ पौंड-स्टर्लिंगचें आंतरराष्ट्रीय मोल टिकवण्यांत अडचण उत्पन्न होणार असा आहे. मागें हिंदुस्थान सरकारास "होमचार्जेस" साठीं प्रतिवर्षी मोठ्या रकमा पाठवावयाच्या असत तेव्हां रुपयाचें पौंडांतील मोल म्हणजे हुंडणावळीचा कायदेशीर दर स्थिर राखण्याची पंचाईत होई आणि त्याप्रीत्यर्थ हिंदी चलनपद्धतींत बदल करण्याची आवश्यकता भासे व विविध उपायांची योजना करावी लागे ह्या गोष्टींचें स्मरण केलें असतां आज इंग्लंडला पडलेल्या पेचाची कल्पना येईल. त्यावेळीं इंग्लंड धनको राष्ट्र आणि हिंदुस्थान ऋणको राष्ट्र अशी परिस्थिति होती. आज हें चक्र फिरलें आहे. हिंदुस्थाननें इंग्लंडमधलें आपलें सर्व कर्ज फेडून टाकलें आहे, एवढेंच नव्हे तर हा देश सध्यां धनको बनला असून शेकडो कोटि रुपये त्यास इंग्लंडकडून यावयाचे आहेत. जागतिक चलन परिषदेंत हिंदी प्रतिनिधी लंडनमधील स्वतःच्या देशाच्या शिलकेचा विनियोग अमेरिका वगैरे देशांत यंत्रसामुग्रीसारख्या माल सोयीप्रमाणें खरीदण्याकडे होण्यास मुभा असावी असें प्रतिपादणार आहेत. ह्या बातमीनें ब्रिटिश व्यापारी वृत्तपत्रें बेचैन झालीं आहेत. हिंदुस्थानच्या व्यापारांत इंग्लंडची मक्तेदारी अबाधित रहावी, हा देशाच्या चलनाचा आधार सध्याप्रमाणें पौंड-स्टर्लिंग युद्धोत्तर काळांतहि असावा, ब्रिटिश साम्राज्यांतर्गत देशांच्या व्यापारांत अमेरिकेनें स्वतःचें घोडें दामटूं नये, हिंदुस्थाननें लंडनमधील आपल्या शिलकांतून ब्रिटिश मालच खरेदी करावा व त्यांची अमेरिकेने डॉलर्समध्यें तबदिली करण्याच्या फंदांत पडूं नये अशा आशयाचे उद्गार ब्रिटिश वृत्तपत्रें काढीत आहेत, ह्यावरून त्यांचें मनःस्वास्थ्य कसें बिघडलें आहे ह्याची कल्पना येते. जागतिक चलन परिषदेंत हिंदुस्थानच्या प्रतिनिधींनीं इतर ब्रिटिश साम्राज्यांतर्गत देशांच्या सुरांतच स्वतःचा सूर मिळवावा आणि स्वतंत्र विचार प्रकट करूं नयेत, नाहींतर अमेरिकन धंदेवाले असल्या मतभेदाचा फायदा घेऊन स्वतःच्या चलनाच्या व व्यापाराच्या संरक्षणासाठी व चलतीसाठी त्याचा फायदा घेतील व ब्रिटिश व्यापार मागें पडेल ह्या भीतीनें त्यांस पछाडलें आहे. सर षण्मुखम् चेट्टी व श्री. ए. डी. श्रॉफ ह्या हिंदुस्थानच्या प्रतिनिधींनीं ह्या कोल्हेकुईस स्पष्ट उत्तर दिलें आहे आणि हिंदुस्थानच्या हिताच्या दृष्टीनें आपणांस योग्य दिसेल त्या धोरणाचा पुरस्कार परिषदेंत आपण करणार आणि तसें करण्याचें स्वातंत्र्य हिंदुस्थान सरकारनें आपणांस दिलें आहे असें जाहीर केलें आहे.

चेकची सुरक्षितता वाढवितां येईल काय ?

आपलें ता. ७ जून १९४४ चे अंकांत श्री. पी. सी. बेंद्रे यांनीं "चेकची सुरक्षितता वाढवितां येईल काय ?" या मथळ्यासाठीं उपस्थित केलेला मुद्दा व्यावहारिक दृष्टया अपायकारक होण्याचा संभव अधिक दिसतो, व त्यामुळें चेकची सुरक्षितता वाढली तरी त्यावरोबर त्याचा दुरुपयोग करण्याची कला सुद्धां वाढीस लागण्याचा संभव अधिक ! कुठलाही एकादा खातेदार एकाद्या पार्टीस (खोटा) चेक देईल व बँकेस तो न वटविण्याविषयीं हुकूम करील. बँकेला खातेदाराविषयीं कोणत्याच प्रकारची शंका घेतां यावयाची नाहीं व चेक परत करावा लागेल व अशा तऱ्हेनें एकाद्या खातेदाराचा व्यवहार शंकास्पद असूनही बँकेस कांहींही करतां न येऊन उलट अशा व्यवहार करणाऱ्या माणसास बँकेकडून उत्तेजन दिल्यासारखें होईल. सहाजिकच याचा परिणाम बँकेच्या पतीवरही होईल; करितां याबाबत असलेला सध्यांचा नियमच जास्त योग्य आहे.

चेकची उपयुक्तता व सुरक्षितता ज्यांना पटली आहे त्यांचेसंबंधीं प्रश्नच नाहीं. पण ज्यांना ती कळलेली नाहीं त्यांच्याकरितां तरी हा नियम बदलणें कांहीं मार्ग नव्हे. कळावें.

आपला
वा. वि. सुंबरे
(मराठा मार्केंटस पीपल्स को. बँक, लि. मुंबई)

सर सी. व्ही. रामन् यांचा नवा शोध

हिरा हा पदार्थ ज्याप्रमाणें आर्थिकदृष्टया त्याचप्रमाणें शास्त्रीय दृष्टयाही अत्यंत मोलाचा आहे. रासायनिकदृष्टया हिरा म्हणजे स्फटिक (crystalline) रूपांत असलेला शुद्ध कार्बन्. हिरा जाळल्यास कॅर्बानिक ॲसिड वायू होतो. हिऱ्यामधील कर्बाचे परमाणूंचा एकमेकांशीं रासायनिक संयोग झालेला असतो. आजपर्यंत हिरा म्हणजे एकच अगदचंद्र अणू असावा अशी कल्पना होती. परंतु सर रामन् यांच्या प्रयोगांमुळें असें उघडकीस आलें आहे, कीं ही समजूत चुकीची आहे.

सर रामन् यांचा नवा सिद्धांत असें दर्शवितो कीं, हिऱ्याचे चार प्रकार असूं शकतात व हिऱ्याच्या प्रत्येक स्फटिकांत दोन अगर अधिक प्रकारच्या हिऱ्यांचें कमीअधिक एकजीव असें मिश्रण असतें. हा सिद्धांत कर्ब परमाणूच्या भौमितिक दृष्टया केलेल्या अभ्यासावर आधारलेला आहे.

असे चार प्रकारचे हिऱ्याचे कण सरोखरीच असतात ह्या विधानास प्रत्यक्ष प्रयोगावरून पुष्टि मिळते, कारण या चार प्रकारच्या हिऱ्यांतील फरक निरनिराळ्या प्रकाशांत दिसून येतो. अल्ट्रा व्हायोलेट उजेडांत ठेवलेल्या हिऱ्यांतून बाहेर पडणाऱ्या प्रकाशाचा रंग चारहि प्रकारांत वेगळा असतो व क्ष किरणांच्या परावर्तनांत सुद्धां फरक कळून येतो.

सर रामन यांच्या सिद्धांताची व प्रयोगांची माहिती व प्रयोगार्थ घेतलेलीं हिऱ्यांचीं छायाचित्रें नुकतीच इंडियन ॲकॅडेमी ऑफ सायन्सनें प्रसिद्ध केलेल्या एका ग्रंथांत दिलीं आहेत.

Deccan Institute Of Commerce, Poona

(Recognised by Government).

Classes for the 1944–45 Session begin on Saturday the 1st July. Students admitted for G. D. C. & C., L. C. C., D. Com. (I. M. C.), B. A. (1st Part), G. D. C. & A., Shorthand and Typewriting. Morning and evening classes. Highly qualified and experienced staff. Prospectus free on application.

592/3 Budhwar Peth, Opp. New English School, Poona. } **Secretary.**

D. E. SOCIETY'S

Brihan Maharashtra College of Commerce, Poona 4.

The College reopens on the 20th June 1944. Admissions to the F. Y. Com., I. Com. and B. Com. classes will begin from 10th June. Applications for admission to the College and hostel should be made to the Principal in the prescribed form. The College Prospectus containing the application form will be sent on receipt of postage stamps worth two annas.

D. G. Karve,
Principal.

वाढत्या पुण्याचें वाढतें वैभव !
७० प्लॉट्सची
रामबाग कॉलनी समोर ××× हवेशीर
आयडियल कॉलनी
मोठ्या सरकारी रस्त्यावर ××× सोयिस्कर
प्रत्येक प्लॉटची किंमत रु. ८०० ते रु. १५००
प्रत्येक प्लॉटचें क्षेत्रफळ अकरा हजार स्के. फूट
म. य. दातार
खालील पत्त्यांवर चौकशी करावी म्हणजे प्लॉटस दाखविण्याची व्यवस्था करण्यांत येईल.
१ दया-निवास कॉमनवेल्थ कॉलनी, नारायण पेठ, पुणें २ भेटण्याची वेळ : सकाळीं ७ ते ८॥ व रात्रौ ८ ते ९
२ व्यवस्थापक, मॉडर्न कन्स्ट्रक्शन अँड डेव्हलपमेंट कंपनी, जीवनछाया, भेटण्याची वेळ—सकाळीं ९ ते ११

स्फुट विचार

मित्रराष्ट्रांची पश्चिम युरोपांत स्वारी

उत्तर आफ्रिकेतून जर्मन व इटालियन सैन्यांची हकालपट्टी झाल्यावर मित्रराष्ट्रांनीं प्रत्यक्ष इटलीवर स्वारी केली. तथापि, जर्मनीचा कोंडमारा होण्यास पश्चिम युरोपांत मोठ्या प्रमाणावर नवी आघाडी चालू करण्याची कल्पना बराच काळ शिजत राहिली. इटलींत जर्मन फौजा त्या देशाच्या रक्षणाकरितां अडकून पडल्यामुळें रशियावरील युद्धाचा भार थोडा हलका झाला. तरी पश्चिमेकडून शत्रूस जोराचा शह देण्याचें महत्त्व मित्रराष्ट्रांस पटलेंच होतें. पूर्व आणि पश्चिम ह्या बाजूंच्या युरोपांतील दोन आघाड्यांवर जर्मनीस कात्रींत धरण्यानें शत्रूची अवस्था कठीण झाली असती. तथापि, पश्चिम आघाडीची तयारी प्रचंड प्रमाणांत करणें अगत्याचें होतें. ह्या तयारीस पुष्कळ काळ लागला आणि ही आघाडी केव्हां चालू होते ह्याकडे सर्व जगाचें लक्ष लागून राहिलें होतें. अखेर एक आठवड्यामागें मित्रराष्ट्रांचीं सैन्यें फ्रान्सच्या पश्चिम किनाऱ्यावर नॉर्मंडी भागांत उतरलीं आणि जर्मनीच्या प्रतिकारास न जुमानतां त्यांनीं प्रगति हळु हळु चालू ठेवली. मोठीं जहाजें व विमानें ह्यांनीं समुद्र किनाऱ्यावरील जर्मन तटबंदी व तोफा ह्यांचेवर मारा केला आणि ब्रिटिश व अमेरिकन सैनिक व रणगाडे आंत घुसले. सैनिक व दारुगोळा नेण्यासाठीं हजारों जहाजांचा व नावांचा उपयोग करण्यांत आला आणि छत्रधारी सैनिकहि आघाडीवर उतरविण्यांत आले. पश्चिम आघाडीस प्रारंभ कोठें व केव्हां होणार ह्याची शत्रूस कल्पना नसल्यानें त्याचा प्रतिकार प्रथम क्षुल्लक स्वरूपाचा होता. पुढें त्यानें आपलें सैन्य रणांगणावर आणलें तरी त्यास मित्रराष्ट्रांच्या सैन्याची प्रगति बंद पाडतां आली नाहीं. युद्धसामुग्रीच्या बाबतींत जर्मनांस मित्रराष्ट्रांची बरोबरी करतां येणें शक्य नाहीं आणि शत्रूस हळु हळु पण सारखी माघार घ्यावी लागणार हें निश्चित आहे. फ्रान्स व इटली ह्या देशांत आणि रशियन आघाडीवर जर्मनीचें बळ तीन दूर दूरच्या रणांगणांवर वाटले गेल्यानें हिटलरची तारांबळ उडालीच पाहिजे. ह्याशिवाय, त्यानें व्यापलेल्या देशांतील जनतेचा पाठिंबा मित्र राष्ट्रांस मिळून नाझी जुलमाविरुद्ध संघी मिळतांच ती उठल्यावांचून रहावयाची नाहीं. ह्याप्रमाणें जर्मनी तीन बाजूंनीं घेरला गेला आहे आणि त्यानें कांहीं वेळ धडपड केली तरी त्याच्या पाडावाच्या युद्धास आतां प्रारंभ झालेला आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. परंतु जर्मन सैन्याचा सहजासहजीं पराभव होऊन युरोपांतील युद्ध थोडक्या अवधींत संपुष्टांत येईल अशी भ्रामक कल्पना मित्रराष्ट्रांच्या सेनानायकांत किंवा पुढाऱ्यांत नाहीं. आपलें सर्वांगीण लढाऊ बळ कितीहि असलें तरी त्याच्या जिवावरच आतां बेतलें असल्याकारणानें हिटलर प्रतिकाराची पराकाष्ठा करील आणि स्वतःस मोठ्या अवघड प्रसंगांतून जावें लागेल ह्याची त्यास जाणीव आहे. ह्या सावधगिरीच्या भावनेनें पण अंतिम विजयाच्या पूर्ण विश्वासानें मित्र राष्ट्रें लढत असून त्यांस चोहोंकडून यश चिंतिलें जात आहे.

विश्वविद्यालयीन परीक्षांतला गोंधळ

मुंबई विश्वविद्यालयाच्या सेनेटच्या नुकत्याच भरलेल्या सभेंत परीक्षांचे निकाल प्रकट रीतीनें लागण्यापूर्वीच बाहेर फुटतात आणि ह्या बाबतींत अनेक गैरवाजवी प्रकार होतात ह्या गोष्टीस परिस्फुटता मिळाली. विद्येच्या माहेरघरांत असले अनिष्ट प्रकार घडावे ह्याविषयीं कोणासहि उद्वेग वाटल्यावांचून रहाणार नाहीं. तरुण पिढीचें व सबंध राष्ट्राचें शील घडवण्याची ज्यांचेवर जबाबदारी आहे अशा विद्वान लोकांचा प्रत्यक्ष संबंध वरील तऱ्हेच्या वर्तणुकीशीं असावा हें विद्यादानाच्या पावित्र्याविषयीं आणि अपेक्षित इष्ट परिणामांविषयीं निराशा उत्पन्न करणारें आहे. विश्वविद्यालयाच्या उपकुल गुरूंनीं, उघडकीस आलेल्या प्रकारांमुळें आपणांस खाली मान घालावी लागत असल्याचे उद्गार काढले आणि सेनेटच्या इतर सभासदांनीं स्वतःच्या अनुभवाच्या गोष्टी निवेदन केल्या. बाहेर आलेल्या लज्जास्पद घटनांवर निरनिराळे उपाय सुचवण्यांत आले आहेत आणि कांहींतरी परिणामकारक तोडगा अंमलांत आलाच पाहिजे ह्या संबंधानें एकमत दिसून आलें आहे. परीक्षांचे प्रश्न किंवा निकाल फोडणारांचीं दुष्कृत्यें उघडकीस आल्यास त्यांचें पारिपत्य सिंडिकेटकडून आजहि होत असल्याचें सांगण्यांत आलें आहे. पण तेवढ्यानें काम होईल असें आतां वाटत नाहीं हें स्पष्ट झालें आहे. परीक्षकांच्या नेमणुकीच्या पद्धतींत बदल करण्याचा परिणाम विशेष होईल असें कांहींस वाटत आहे. हा सुशिक्षित वर्गाच्या दानतीचाच प्रश्न झाला आहे आणि विश्वविद्यालयासारख्या पवित्र व पूज्य संस्थेनें तो कसेंहि करून सोडवलाच पाहिजे. त्याची चर्चा सेनेटच्या सभेंत प्रांजलपणानें व प्रकट रीतीनें झाली हें चांगलें लक्षण आहे असेंच समजलें पाहिजे.

मि. मॉंटेग्यू नॉर्मन ह्यांची सेवानिवृत्ति

बँक ऑफ इंग्लंडच्या गव्हर्नरपदावर मि. मॉंटेग्यू नॉर्मन हे गेलीं २४ वर्षें होते. त्या जागेसाठी पुनः ते उभे न राहिल्यामुळें त्यांच्या गव्हर्नरशिपचीं २५ वर्षें पुरीं होत नाहींत व बँकेच्या लवकरच येणाऱ्या २५० व्या वाढदिवशीं व बँक चार्टर कायद्याच्या १०० व्या वाढदिवशीं ते बँकेचे गव्हर्नर राहणार नाहींत. ते गव्हर्नर म्हणून पुनः निवडून आले असते, ह्यांत संशयच नाहीं. असें असूनहि, डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार त्यांनीं आपली जागा सोडण्यांत दाखविलेली मनोभूमिका फारच थोड्या लोकांची असूं शकते. बँकेच्या इतिहासांतील संस्मरणीय प्रसंगीं ते अधिकारपदावर नाहींत, ह्यामुळें त्यांची स्वतःची मुळींच निराशा होत नसली तर त्यांच्या सहकाऱ्यांस मात्र बरें वाटणार नाहीं. केवळ एकच वर्ष आपण अध्यक्ष असतांना संस्थेचा रौप्य अथवा सुवर्ण महोत्सव त्याच्या तारखेची ओढाताण करून घडवून आणणारे पुष्कळ दृष्टीस पडतात. त्याचप्रमाणें आपल्या कारकीर्दीत इमारतीचें उद्घाटन व्हावें, पुलाचें नामकरण व्हावें, पायाचा दगड बसविण्यांत यावा, मानपत्र समारंभ व्हावा, असें संस्थांच्या चालकांस वाटतें. बँक ऑफ इंग्लंडसारख्या संस्थेचे २४ वर्षें गव्हर्नर असलेले मि. मॉंटेग्यू नॉर्मन हे आपल्या स्वतःच्या कारकीर्दीच्या ज्युबिलीसाठी, संस्थेच्या २५० व्या वाढदिवसासाठी व बँक चार्टर ॲक्टाच्या १०० व्या वाढदिवसासाठी, हे सर्व समारंभ एकदमच येत असतांहि, आपल्या स्थानास चिकटून बसण्यास तयार नाहींत, ही गोष्ट उद्बोधक आहे.

संगमनेर मर्चंटस असोसिएशन

(लि. आ. म.)

ही संस्था ता. ११-५-४४ रोजी स्थापन झाली. सुरुवातीस या संस्थेचे ३४ सभासद होते. ती संख्या आज १५२ वर गेली आहे. या संस्थेनें चालू वर्षात २०६१ रुपये वर्गणी रुपानें गोळा केले. या संस्थेचे कामाकरतां १ कारकून व १ नोकर असे ठेवले असून त्यांचे पगाराकरता ३७५ रुपये खर्च झाला. तसेंच कायमच्या उपयोगी पडणाऱ्या जिनसा, उदाहरणार्थ, जाजमे, गाद्या, तक्के वगैरे सामान १७५ रुपयाचे खरेदी केले.

कापडाचे व्यापाऱ्यांना व सुताचे व्यापाऱ्यांना लायसेन्स मिळवून देण्याचें काम असोसिएशनचे जबाबदार अधिकाऱ्यांनीं वेळेवर केल्यामुळें बहुतेक सर्व व्यापाऱ्यांना लायसेन्सें मिळालीं. अशा व्यापाऱ्यांकडून त्रैमासिक कापडाच्या साठ्याची व मासिक सुताच्या साठ्यांचीं पत्रकें योग्य अधिकाऱ्यांकडे पाठविलीं जात आहेत.

व्यापार वाढीचे दृष्टीनें असोसिएशननें स्टँडर्ड क्लॉथ विक्रीचे काम हातीं घेऊन त्याकरतां भांडवल उभारून कापडाच्या व्यापाऱ्यांचें एक सिंडिकेट निर्माण केलें आहे. अशा सिंडिकेटमध्यें ५५ सभासद असून त्यांनीं ६,१०० रुपये जमविले आहेत. ही स्टँडर्ड क्लॉथची विक्री फायदेशीर व समाधानकारक चाललेली आहे.

या असोसिएशनतर्फे नेमलेल्या धान्य कमिटीनें एकंदर १०८ पोतीं धान्य (बाजरी) सुमारें ३०० गरीब कुटुंबांस ४ महिने वांटलें. हेंच काम जरूर वाटल्यास पुन्हा सुरू करण्याचा असोसिएशनचा विचार आहे.

या असोसिएशनचे कामास महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, मुंबई व मे. टेक्स्टाइल कमिशनरसाहेब, मुंबई यांचेकडून वेळोवेळीं माहिती व हुकूम मिळाल्यामुळें फार मदत झाली आणि त्याबद्दल असोसिएशन त्यांची फार ऋणी आहे.

या असोसिएशनमध्यें सुमारें ७० धान्याचे व्यापारी आहेत. त्यांनीं एक मोंढा (डबरा) स्थापन केला आहे. त्यांत धान्य (हरभरा शेंगा) खरेदी-विक्रीचें काम त्यांनीं उत्साहानें चालविलें आहे. हें काम असोसिएशननें मोंढ्याचे नियम केले आहेत, त्याप्रमाणें चाललें आहे. ही संस्था व्यापाऱ्यांच्या एकीची व प्रेमाची साक्ष देत आहे.

कापड व सूत व्यापारी तसेंच धान्याचे व्यापारी यांनीं कांहीं अडचणी असोसिएशनचे नजरेस आणल्यास त्याचा खुलासा संबंध असलेल्या अधिकाऱ्यांकडून आणून त्यांना पुरविण्यांत येतो.

वार्षिक सभेचें काम निर्विघ्नपणें पार पडलें. त्यांत झालेले ठराव सर्वानुमतें पास झाले. असोसिएशनचे सभासदांनीं सर्वानुमतें प्रेसिडेंट म्हणून संगमनेर येथील सुप्रसिद्ध, उत्साही व महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स मुंबईचे मेंबर श्री. पन्नालाल शिवनाथ लाहोटी यांना निवडलें आहे. तसेंच व्हाइस प्रेसिडेंटचे जागेकरतां येथील कळकळीनें व निरपेक्ष बुद्धीनें काम करणारे कापडाचे व सुताचे व्यापारी श्री. रामनाथ गोविंदराम सोमाणी यांना निवडलें आहे.

असोसिएशनचें काम समाधानकारक चालावें म्हणून ही असोसिएशन महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स यांची सभासद झाली आहे व इंडियन मर्चंट्स चेंबर मुंबई यांचे सभासद होण्याचें तिनें ठरविलें आहे.

येथे एकच गोष्ट नमूद करावीशी वाटते ती ही कीं, या असोसिएशनचे मेंबर होण्याकरतां आसपास स्थापन झालेल्या दुसऱ्या असोसिएशननें विनंती केली आहे व ती विनंति या असोसिएशननें मान्य केली असेंवइल ठराव केला आहे.

असोसिएशनच्या अधिकारीवर्गाची इच्छा अशी आहे कीं, नगर जिल्हा चेंबर ऑफ कॉमर्स स्थापन करून व्यापाऱ्यांचे अडीअडचणी निवारण्याचें काम सोईवार करावें व त्याप्रमाणें प्रयत्न सुरू आहेत. पण जिल्ह्याचे ठिकाणीं राहाणारे व्यापाऱ्यांनीं मनावर घेतल्यास कार्य लवकर सुरू होईल.

शेअर बाजार

(लेखक:—श्री. व. वि. लोणकर, एम. ए., बी. कॉम. २४ डे. जि. पुणें ४)

युरोपवर पश्चिमेकडून हल्ला चढविला गेला तर त्याचा बाजारावर विशेष परिणाम होईल ही अपेक्षा फोल ठरलेली आहे. टाटा डिफर्ड व ऑर्डिनरी हे २२२५ व ४१५ पर्यंत फक्त टिकून राहिलेत. गिरण्यांचे भाव सारखे पडून राहिलेत तिथेंच आहेत.

दुसऱ्या आघाडीचा हिंदुस्थानवर काय परिणाम व्हावा ? हिंदुस्थानचा फ्रान्सशीं बऱ्यापैकीं व्यापार चालू होता तो आज चार वर्षे थंड आहे. तो कांहीं एकदम सुरू होत नाहीं. किंवा फ्रान्सच्या रणभूमीवर लढणाऱ्या सैन्यालाही रसद पुरविण्याचें काम येथून व्हावयाचें नाहीं. तेव्हां युद्धांतील प्रमुख घटना म्हणून जरी दुसऱ्या आघाडीला महत्त्व असलें तरी त्याचा बाजारावर तादृश परिणाम होण्याचें कारण नाहीं. मात्र जर दोस्तांनीं एकादी अचानक माघार खाल्ली तर त्याचा विपरीत परिणाम नक्की दिसेल.

सध्या बाजारांत डिफर्ड २५०० होईल अशी भाषा सुरू आहे. ही भाषा आपल्याला नवीन नाहीं. व्यापाऱ्याच्या कांहींही बातम्या असल्या तरी टाटा मंडळी 'बासनां' तून कांहीं काढतील असें वाटण्याचें कारण नाहीं. डिफर्डचे ऑर्डिनरी होणार असले व नवीन भांडवल निघणार असलें तरी सर्व गोष्टींचा विचार करतां २२००-२२५० भावाच्या वर डिफर्ड घेण्याच्या मोहांत सापडण्याचें टाळलें पाहिजे. तो आणखी वर जाणार असला तरी खुशाल जाऊं द्यावा. आपली व त्या शेअरची ओळख फार जुनी आहे. घ्यावयाचाच झाला तर ऑर्डिनरी बरा वाटतो.

वाया जाणाऱ्या तिकिटांचा उपयोग

प्रत्येक आठवड्यास १० टन वजनाचीं ६०० पोतीं भरलेलीं बसचीं व ट्रॅमचीं तिकिटें लंडनमध्यें जमा करून त्याचा रांधा बनविण्यासाठीं घाडण्यांत येतात. त्याचप्रमाणें ९० लक्ष रेल्वे तिकिटेंहि गोळा केलीं जातात.

पुण्याभोंवतालचा मलेरिया हटविण्यासाठीं ५० हजार रुपयांची योजना

पुण्याच्या भोंवतालच्या विभागाची पब्लिक हेल्थ खात्यानें नुकतीच पहाणी केली, तिच्यांत आढळून आलें कीं, येरवडा भागांत हिवतापाचा उपद्रव सर्वांत अधिक आहे. शंकरशेट रस्ता, पर्वतीची टेकडी व मुठा नदीच्या काठाजवळील भाग यांतहि हिवतापाचा प्रसार जास्त आहे. हा हिवताप हटविण्यासाठी वार्षिक ५० हजार रुपये खर्चाची एक योजना डायरेक्टर ऑफ पब्लिक हेल्थ यांनीं आंखली आहे.

हिंदुस्थानच्या ग्रेट ब्रिटनमधील सांचलेल्या शिलका

प्रमुख पुढाऱ्यांचें मत

हिंदुस्थानच्या ग्रेट ब्रिटनमधील सांठलेल्या येण्याबद्दल चालू असलेल्या, ग्रेट ब्रिटनमधील चर्चेस उद्देशून **सर पुरुषोत्तमदास ठाकूरदास** म्हणाले, " आर्थिक कत्तलीपासून बचाव व्हावा, ह्यासाठी हिंदुस्थानास आर्थिक आत्महत्त्या करण्याचा आग्रह करण्यांत येत आहे. हिंद–ब्रिटन आर्थिक कराराची दुरुस्ती करण्यास हिंदुस्थानास प्रवृत्त करण्याचा हा प्रयत्न आहे. ग्रेट ब्रिटनशीं येण्या-देण्याबद्दलचीं बोलणीं करावयाचीं तीं लोकमतानुवर्ती हिंदी सरकारच्या प्रतिनिधींनींच समान पातळीवर केलीं नाहींत, तर बोलण्यांचा निष्कर्ष हा हिंदुस्थानावर राजकीय वर्चस्वाच्या आधारानें लादलेला निकाल आहे, असेंच हिंदी जनता समजेल. " " युद्धखर्चाची हिंदुस्थान व ग्रेट ब्रिटन ह्यामध्यें वांटणी केली जाते, त्या करारांत बदल करण्यास हिंदुस्थान सरकारनें तयार होऊं नये. हिंदुस्थानाचें इंग्लंडमध्यें येणें साठलें आहे, त्याचा विनियोग व परतफेड ह्याविषयीं ब्रिटिश सरकारशीं बोलणीं सुरू करावी व त्यासंबंधांत प्रातिनिधिक बिनसरकारी हिंदी लोकमताचा सल्ला घेण्यांत यावा " असें **श्री जी. एल. मेहता** हे म्हणाले. **सर षण्णमुखम् चेट्टी** म्हणाले, "ब्रिटिश वृत्तपत्रांचा सूर हा कांहीं नीट नाहीं. हिंदुस्थानाचें देणें आम्हीं लागत नाहीं, अशी धमकी त्यांत असल्याचें दिसतें व हिंदुस्थान आणि इंग्लंड ह्यांमधील युद्धखर्चाची वाटणी हिंदुस्थानासच विशेष फायद्याची आहे अशी त्यांत सूचना आहे." श्री. जी. डी. बिर्ला म्हणाले, "हिंद-ब्रिटन आर्थिक कराराची फेरतपासणी व्हावी, असें लॉर्ड केन्स सुचवितात. ग्रेटब्रिटन हिंदुस्थानाचें देणें देणार नाहीं, असें म्हणण्यासारखेंच हें आहे. युद्धापूर्वी हिंदुस्थान देश इंग्लंडचा देणेकरी लागत होता, तें मुख्यतः ब्रह्मी, अफगाण व ॲबिसिनियन युद्धाचा बोजा हिंदुस्थानावर लादलेला होता म्हणूनच. त्यापासून हिंदुस्तानास कांहींच फायदा झाला नाहीं, परंतु आतां इंग्लंडनें कर्ज फेडण्याची वेळ आली असतांना, लॉर्ड केन्ससारखा जबाबदार मनुष्य कर्ज बुडविण्याच्या कल्पनेस चालना देत आहे."

महाराष्ट्राच्या अन्नपुरवठ्याचा प्रश्न*

महाराष्ट्र संवर्धन ग्रन्थमालेंतील पहिलें पुस्तक म्हणून, श्री. एन. जी. आपटे (पाणी-पुरवठा सल्लागार) ह्यांचें वरील इंग्रजी पुस्तक श्री. य. रा. दाते ह्यांनीं प्रसिद्ध केलें आहे. श्री. आपटे ह्यांचे वरील विषयावरील लेख व भाषणें हीं प्रस्तुत पुस्तकांत एकत्रित केलेलीं आहेत. अशाच प्रकारचीं आणखी पुस्तकें प्रसिद्ध करून, महाराष्ट्राच्या शेती-विषयक व इतर संपत्तीच्या प्रश्नांवर प्रकाश पाडण्याचा ग्रन्थमालेचा उद्देश आहे. (१) हिंदुस्थानांतील मराठी भाषा बोलणाऱ्या जिल्ह्यांच्या सलग विभागांतील अन्नपुरवठ्याची परिस्थिति हा निबंध, (२) महाराष्ट्र अन्नोत्पादन व पुरवठा परिषदेंतील श्री. आपटे ह्यांचें प्रास्ताविक भाषण, (३) त्यांत निर्माण झालेल्या मुद्यांवर श्री. आपटे व डॉ. ॲकरॉइड ह्यांचेमधील पत्रव्यवहार, (४) हिंदी पिकांच्या उत्पादनाच्या नियोजनासंबंधींचा फेडरेशनच्या वार्षिक सभेंतील ठराव मांडतांना श्री. आपटे ह्यांनीं केलेलें भाषण व (५ आणि ६) केसर-ए-हिंदमधील दोन लेख हीं प्रस्तुत पुस्तकांत उद्धृत केलेलीं आहेत.

* Food Problem of Maharashtra पृ. सं. ७१, किंमत १ रु. महाराष्ट्र सं. ग्रंथमाला, १५२ सदाशिव, पुणें २.

The Willingdon College, Sangli

Reopens for the academic year on 20th June 1944. The registration of names will commence on 12th June. The college provides for instruction in the Arts and Science courses in the first two years, for B. A. Degree courses pass and Honours, and for Post-graduate instruction. About a hundred seats are available in the College Hostels. Healthy surroundings, inexpensiveness and efficiency are the special features of the college.

The tuition fees are Rs. 60/- per term, and the room rent per term is Rs. 12/- for a double room and Rs. 15/- for a single room. Further information can be had on application.

Separate accommodation for Lady Students is available in the Sakhubai Gokhale Hostel on the college premises.

Principal,
Willingdon College.

सध्यांच्या टंचाईच्या काळांत जीवनद्रव्यें कमी पडतात.
जीवनद्रव्यांनीं (Vitamins) युक्त असे
(सप्राय खात्यानें मान्यता दिलेले)
टोमॅटो केचप (गोड) व
टोमॅटो सॉस [तिखट व आंबट]
आजच मागवा व जीवनद्रव्यांची वाटणारी
उणीव भरून काढा.
रुरल प्रॉडक्टस कंपनी लि. पुणें
बिझिनेस ऑफिस : ९२३ अ सदाशिव, पुणें २.

प्रगतिपथावरील नवा
मै ला चा — द ग ड
सन १९४३ अखेर
नव्या कामांत ११० टक्के वाढ
चालू कामांत १०० टक्के वाढ
आयुर्विमानिधींत ८० टक्के वाढ
— आपला विमा किंवा एजन्सी आजच घ्या —
दि औंध म्यूच्युअल लाइफ
ॲश्युरन्स सोसायटी लि., पुणें.
आर. जी. साठे सुपरिंटेंडेंट
व्ही. जी. जोशी मॅनेजिंग डायरेक्टर

☆ नगर वाँचे ट्रेडिंग कंपनी ☆

चिनाब, टाइमज्यूस कॉर्डीअल, ऑरेंज व लेमन स्क्वॉश, टोमॅटो सॉस,
मँगो जॅम, मध, कोको, बेकिंग पावडर, सॅनिटरी टॉवेल्स,
टुथ पेस्ट, टुथ ब्रश, वगैरे मालाचे
स्टॉकिस्ट.

शाखा:— हेड ऑफिस:—
माणिक चौक, अहमदनगर ★ पूना गेस्ट हाऊस, पुणें २

जिकडे तिकडे प्रशंसा

इलेक्ट्रिक दागिन्यांवर रासायनिक क्रिया करून सुन्या सोन्याचा पत्रा चढविला जातो त्यामुळें दागिना केव्हांही खराब होत नाही, ही पूर्ण खात्री झाली. सोन्याचा पत्रा चढविलेल्या चार बांगड्या कि. आठ रु. गारनेलचे दागिना परत करणें झाल्यास पत्र चढविलेल्या सोन्याचे सर्वच्या सर्व पैसे परत देऊं.

भट कं. सांगली, S. M. C.
भट कंपनी शाखा—बुधवार पेठ, पुणें २.

पुण्यांतील
आदर्श निवासस्थान व भोजनालय
छाया लॉजिंग व बोर्डिंग हाऊस
बुधवार चौक, पुणें २.

प्रगतीचें श्रेय आपणांकडे

सह्याद्रि विमा कंपनीनें १९४३ सालीं खालीलप्रमाणें काम केलें आहे.

आलेलें काम	रु. २१, ४४, ४३१०	१९४२	५ लक्ष ३ हजारानें
मंजूर काम	रु. १८, ३५, ७१४	पेक्षां	१ लक्ष ९० हजारानें
पूर्ण विमा काम	रु. १६, १९, ७७५	वाढ	४ लक्ष ७ हजारानें

या सर्व प्रगतीचें श्रेय कंपनीचे विमेदार, प्रतिनिधी, प्रचाराधिकारी, मार्गदार व हितचिंतक यांनाच आहे व त्याध्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोंत. विमा—योजना त्याचप्रमाणें एजन्सी याच कंपनीची अत्यंत आकर्षक.

नासिक मॅनेजिंग डायरेक्टर

न्यू इंडिया इंडस्ट्रीज लि.

(Approved Re-traders and Approved Contractors)
२६ लॅमिंग्टन नॉर्थ, मुंबई ११.
अध्यक्ष:—श्री. ग. स. मराठे, ॲक्चुअरी.

महाराष्ट्रांतील रबराचा प्रमुख कारखाना

★ गिरणीचे रोलर्स ★ रबरी हातमोजे ★ छापखान्यांचे रोलर्स
★ रीमोल्ड टायर्स ★ रबरी वॉशर्स ★ सॉलिड व्हील्स

व इतर रबरी माल तयार होतो.

पु. ग. मराठे
मॅनेजिंग डायरेक्टर.

हें पत्र पुणें, पेठ शनवार नं. ११५१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरी बर्वे, यांनी छापिलें व रा. वासुदेव वामन काळे, बी. ए., यांनी 'दुर्गाविलास,' शनवार, नं. १२७११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.

खालील पत्त्यावर चौकशी करावी.

व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
(टपाल खेरीज माफ)
किरकोळ अंकास
दोन आणे.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष १० पुणें, बुधवार, तारीख २१ जून, १९४४ अंक २५

एकहि लक्षाधीश नाहीं.

वेस्टर्न इंडिया विमा कंपनीच्या

रजतमहोत्सव प्रसंगीं सर विश्वेश्वर अय्यांनीं असे प्रशंसोद्गार काढले कीं या कंपनीनें एकहि लक्षाधीश निर्माण केला नाहीं. याचा अर्थ असा कीं या कंपनीचा कारभार कांहीं थोड्या लोकांच्या फायद्यासाठी नसून तो सामान्य जनतेचें हित डोळ्यापुढें ठेवून स्वार्थनिरपेक्ष कर्तव्यबुद्धीनें चालला आहे.

कंपनीचे अध्यक्ष श्री. अण्णासाहेब चिरमुले

यांनीं कंपनीच्या स्थापनेपासून सुरू केलेली निरपेक्ष सेवेची ही परंपरा पहिल्यापासून आजपर्यंत अखंडपणें चालूं असून पुढेंही ती अशीच चालूं राहील असा विश्वास आहे.

पुणें शाखा:—
१७९ बुधवार, लक्ष्मीरोड, पुणें २

मॅनेजर
वेस्टर्न इंडिया
विमा कंपनी, लि., सातारा.

पुना गेस्ट हाऊस

१००, लक्ष्मी रोड, पुणें २.

Telephone 779

TELEGRAM
Guest House
Poona 2.

WANTED

Agents to represent Sun Life Assurance Co. Of Canada in Ahmednagar. Jalgaon, Kolhapur, Nasik & Sholapur. Excellent opportunities for capable and successful men. Full training will be given.

Apply to:—

Mr. P. V. Lad,
Unit Organizer.
Sun Life Of Canada, Laxmi Rd., POONA 2.

GOKHALE INSTITUTE OF POLITICS AND ECONOMICS.

SERVANTS OF INDIA SOCIETY'S HOME, POONA 4.

ADMISSIONS TO STUDENTS:—reading for the M. A. Examination by papers or by thesis in Economics. One scholarship of Rs. 25 p. m. to be awarded to research student.

D. R. GADGIL,
Director.

विविध माहिती

गिरण्यांत कपाशीचा उठाव कमी झाला

हिंदी गिरण्यांत एप्रिल १९४४ मध्यें एकूण ३,१०,८१४ गाठी हिंदी कपाशीचा उठाव झाला. १९४३ च्या एप्रिलमधील उठावाचे मानानें हा उठाव ६६,००० गांठींनी कमी आहे.

मुंबई कार्पोरेशनची मुदतवाढ

मुंबई कार्पोरेशनची मुदत १ एप्रिल, १९४२ रोजीं संपत होती, ती पुढें १ एप्रिल १९४५ पर्यंत वाढविण्यांत आली. आतां ती त्याच्याहि पुढें २ वर्षे, म्हणजे १ एप्रिल, १९४७ पर्यंत वाढविण्यांत आली आहे.

मुंबईंत तलम कापडाचा तुटवडा

कापडाचा मुबलक पुरवठा असतांहि, तें कापड मुंबईमधील लोकांच्या आवडीस उतरणारें नसल्याकारणानें, मुंबई शहरांत चोतरें, साडचा वगैरेचा तुटवडा भासूं लागला आहे.

२ लक्ष टन धान्याच्या साठ्याची सोय

सरकारी धान्याच्या साठ्याची व्यवस्था प्रमुख केंद्रांतून करण्यांत येत आहे. कराची येथील गोदामांतील जागा दुपटीनें वाढविण्यांत आली आहे. पंजाब, मध्यप्रांत, ओरिसा, आसाम व इस्टर्न स्टेटस एजन्सी ह्यांत बांधण्यांत यावयाच्या गोदामांत २ लक्ष टन धान्य मावूं शकेल. ह्या गोदामांच्या बांधणीचा खर्च मध्यवर्ती व प्रांतिक सरकारें निम्मेनिम्म वांटून घेतील. पंजाबमध्यें आसणी ६० हजार टन धान्यास पुरेल एवढी जागा माडचानें घेण्यांत आली आहे.

बिनतारी संदेशानें चालणारीं विमानें

ग्रेट ब्रिटनचे गृहमंत्री मि. मॉरिसन् यांनीं कॉमन्स सभेमध्यें युद्धामधील एका नवीन घटनेसंबंधीं नुकतेंच निवेदन केलें. जर्मन विमानदल बिनतारी संदेशानें चालणारीं विमानें वापरूं लागलें आहे असें त्यांनीं सांगितलें. यासंबंधीं कांहीं माहिती पुढें देत आहोंत.

बिनतारी संदेशानें वाहनें काबूंत धरण्याचे प्रयत्न १९३० सालापासून करण्यांत येत आहेत, व युद्धापूर्वीच या शास्त्रांत बरीच प्रगति झाली होती. अशा वाहनांचा प्रयोगार्थ वा नेमबाजी करण्यासाठी उपयोग केला जाई. पाण्यावर चालणाऱ्या बोटी, आकाशांत उडणारीं विमानें व जमिनींवर चालणारे रणगाडे या तीनहि तऱ्हांच्या वाहनांवर वरील प्रकारच्या यंत्रांची योजना यशस्वी झाली होती. विशेषतः नेमबाजी शिकविण्यासाठी या वाहनांचा मोठ्या प्रमाणांवर सर्व राष्ट्रांकडून उपयोग केला जाई व यांचें कारणहि उघड आहे; कारण अशा वाहनांवर मनुष्य राहण्याची जरूरी नाहीं व अशा वाहनांस चुकून गोळी लागल्यास मनुष्यास धास्ती नाहीं.

अशा वाहनांत (१) रेडियो व (२) रेडियोनें येणाऱ्या संदेशाप्रमाणें वाहनास काबूंत धरणारीं यंत्रें, हीं बसविलेलीं असतात. यांस फारच थोडी जागा लागते. त्यामुळें इतर सर्व जागा यंत्रें अथवा दारूगोळा भरण्यासाठी उपयोगी पडते. अशीं वाहनें दूर अंतरावरून बिनतारी संदेशानें नियंत्रिलीं जातात.

सूक्ष्मभेद करावयाचा म्हटला तर असें म्हणतां येईल कीं, जर्मनीनें नुकत्याच वापरलेल्या आकाशयानांस हल्लीं समजल्या जाणाऱ्या अर्थानें "विमानें" म्हणतांच येणार नाहीं, तीं खरोखर "उडते बाँब" होत. कारण तीं परत यावीं या बुद्धीनें केलेलींच नाहींत. आपल्या विशिष्ट लक्ष्यावर आलीं म्हणजे तीं बंद पडतात, खालीं आदळतात व तेथें त्यांची स्फोट होतो. त्यांची प्रेरक शक्ती काय आहे याचा अजून पत्ता लागलेला नाहीं. कारण तीं खालीं आल्याबरोबर छिन्नविच्छिन्न होतात. या विमानांत (१) नेहमीसारखें पेट्रोलवर चालणारें इंजिन, (२) बॅटरीवर चालणारी विजेची मोटर, (३) ज्वालाग्राही रासायनिक द्रव्यें (रॉकेट) किंवा (४) तीव्र दाबानें भरलेली हवा यांपैकीं कोणतें तरी एक प्रेरक साधन असावें असा तर्क आहे. दोन महिन्यांपूर्वी इटालियन आघाडीवर जर्मनीनें बिनतारी संदेशानें चालणारे लहान रणगाडे वापरल्याचें वाचकांस माहीत असेलच.

ह्या विमानांत अर्थातच कांहीं दोष आहेत. प्रथमतः त्यांना जरुर तेथेंच हल्ला करतां येईल अशी खात्री बाळगतां येणें कठीण आहे. कारण संदेश पाठवणारास हल्ल्याची जागा दिसत नाहीं. परंतु संदेश पाठवणारासहि एका विमानांत बसविणें शक्य आहे. दुसरें असें, कीं शत्रूस तीच युक्ती साधून तें वाहन आपल्या काबूंत आणितां येईल, व फेकलेलें अस्त्र उलटवितां येईल!

ह्या विमानांचे फायदेहि कांहीं आहेत. त्यांत मनुष्याची जरूरी नसल्यानें हवाईदलांतील मनुष्यबळाची बचत होते, एवढेंच नव्हें तर विमान पुष्कळच हलकें व स्वस्त करतां येतें. हीं विमानें करण्यास हलक्या प्रतीची कारागिरी व कमी दर्जाचें सामान वापरतां येतें, कारण हीं विमानें एकंदर एकदांच वापरावयाचीं असतात, व शिवाय जरी कांहीं बिघडलें तरी मनुष्यहानि होत नाहीं; एक विमान वायां जातें एवढेंच. अशा नाविन्यपूर्ण अस्त्रानें शत्रूजनतेंत गोंधळ माजेल अशी कदाचित् जर्मनीची कल्पना असावी, परंतु ती फोल ठरली आहे.

कोठल्याहि युक्तिवर प्रतियुक्ति असतेच व ब्रिटननें या बाबतींत बरीच आघाडी मारली आहे असा मि. मॉरिसन यांनीं निर्वाळा दिला आहे. मित्रराष्ट्रें याही नव्या अस्त्रास यशस्वीपणें तोंड देतील असें समजण्यास हरकत नाहीं.

अनुक्रमणिका

	पृष्ठ
१ विविध माहिती ...	१९४
२ रेडिओनें चालणारें विमान	१९४
३ हिंदी स्टर्लिंग शिलकांचा वाद	१९५
४ बँकांच्या कायद्यांत दुरुस्ती	१९६
५ स्फुट विचार	१९७
हिंदी बँकांचें मंडळ बनविण्याची योजना—अमेरिकन चांदी हिंदुस्थानांत आली—हिंदी चित्रपटांचा धंदा—म्हैसूर सिल्क फिलेचर्स लि.—मराठा चेंबरची वार्षिक सभा—सर सी. पी. रॉय ह्यांचें निधन	
६ श्री. चिरमुले यांचा सन्मान.	१९९

अर्थ

बुधवार, ता. २१ जून, १९४४

हिंदी स्टर्लिंग शिलकांचा वाद

ब्रिटिश धंदेवाल्यांचा कांगावा

अमेरिकेंत भरणारी जागतिक चलन विषयक परिषद जवळ येत चालली आणि हिंदुस्थानचे प्रतिनिधी तिच्या चर्चेंत भाग घेण्यासाठी निघण्याच्या तयारीस लागले अशावेळीं ह्या देशाचा पैसा लंडनमध्यें स्टर्लिंग चलनाच्या स्वरूपांत साचला आहे तो इकडे परत आणण्याच्या मार्गासंबंधाच्या वादाची वावटळ उठली आहे. ह्या वावटळीचे वारे इंग्लंडमध्यें जोरानें वहात असून कॉमन्स सभेंतहि गडगडाट झाला आहे. ब्रिटिश व्यापारविषयक पत्रांनीं प्रस्तुत प्रश्नावर झोड उठवली आहे आणि त्याचा निकाल इंग्लंडच्या दृष्टीनें कसा झाला पाहिजे ह्याविषयीं सूचना केल्या आहेत. हिंदुस्थानांतहि त्यासंबंधांत पुढारी धंदेवाल्यांनीं स्वतःच्या मतांचें प्रदर्शन करून ब्रिटिश पत्रें व प्रत्यात चलन तज्ञ लॉर्ड केन्स ह्यांच्या सूचनांवर टीकेचा भडिमार केला आहे. हाउस ऑफ कॉमन्समध्यें ह्या वादाचा प्रतिध्वनी उठून त्या बाबतींत ब्रिटिश फडनवीस, सर जॉन अँडरसन, ह्यांस सभासदांनीं प्रश्नहि विचारले. त्यांस उत्तर देतांना फडनवीसांनीं अशी माहिती दिली कीं १९३९ सालाच्या मार्च अखेरीस हिंदुस्थानचें स्टर्लिंगमध्यें फेडलें जावयाचें सरकारी कर्ज सुमारें ३५ कोटि पौंड होतें तें १९४४ च्या मे महिन्याच्या शेवटीं सुमारें अडीच कोटि पौंडांवर आलें. म्हणजे तें जवळ जवळ सबंद फिटलें गेलें. सर जॉन आणखी असें म्हणाले कीं हिंदुस्थानांतील चलनी नोटांस तारण म्हणून जे रोखे आहेत त्यांपैकीं स्टर्लिंगच्या स्वरूपांत रिझर्व्ह बँकेनें मार्च, १९३९ अखेर इंग्लंडमध्यें सुमारें ५½ कोटि पौंड धारण केले होते; मे १९४४ अखेर ही रकम ७४½ कोटि पौंडांवर गेली. हिंदुस्थान सरकारनें ब्रिटिश सरकारकरितां ह्या देशांत केलेल्या खर्चाची भरपाई इंग्लंडमध्यें रिझर्व्ह बँकेस करण्यांत आल्यानें स्टर्लिंग शिलकेची रकम ह्या रीतीनें फुगली असल्याचें त्यांनीं सांगितलें. कांहीं ब्रिटिश पत्रांनीं ह्या हिंदी शिलकांची विल्हेवाट कशी व्हावी ह्या विषयीं सूचना केल्या आहेत, त्या हिंदुस्थानच्या आर्थिक हितास अनुकूल नसल्याचें दिसतें, तरी असल्या योजनांचा स्वीकार ब्रिटिश सरकार करणार नाहीं अशा आशयाचें आश्वासन सर जॉन देतील काय ? असा मार्मिक प्रश्न एका कामकरी प्रतिनिधी सभासदानें विचारला असतां प्रश्नोत्तराच्या स्वरूपांत प्रस्तुत प्रकारच्या विषयाची चर्चा करतां येणें शक्य नाहीं असा खुलासा त्यास मिळाला.

जागतिक चलन परिषदेंत हिंदी प्रतिनिधी वरील प्रश्न उपस्थित करून तीमध्यें मान्य व्हावयाच्या आंतरराष्ट्रीय योजनेंत हिंदुस्थानच्या स्टर्लिंग शिलका ह्या देशास सुरळीतपणानें परत मिळूं शकतील अशा रीतीच्या व्यवस्थेचा अंतर्भाव केला जावा असा आग्रह धरतील ह्या बातमीनें ब्रिटिश धंदेवाले आणि त्यांचीं मुखपत्रें गडबडून गेलीं आहेत. हें वरील प्रश्नोत्तरांवरून स्पष्ट होतें. हिंदी प्रतिनिधींनीं चलन परिषदेंत हिंदी शिलकांचा प्रश्न उपस्थित केला तरी त्याची चर्चा व निकाल होण्यास तिची मान्यता मिळेल असा रंग दिसत नाहीं. इंग्लंड व अमेरिका ह्यांनीं असले प्रश्न त्यांच्यांशीं प्रत्यक्ष संबंध असलेल्या देशांनीं परस्पर विचार-विनिमय करून सोडवावे आणि त्यांचा जागतिक चलन व्यवस्थेंत अंतर्भाव होण्याचें प्रयोजन नाहीं, असें आपसांत ठरवलें असावें असें वाटण्यास जागा आहे. हिंदी प्रतिनिधी सर चिंतामणराव देशमुख व सर शण्मुखम चेट्टी, ह्यांच्या अलीकडील भाषणांवरून आणि हिंदी प्रतिनिधींच्या शिष्टमंडळानें परिषद संपल्यावर इंग्लंडला जाऊन ब्रिटिश सरकाराशी ह्या देशाच्या वतीनें बोलणीं करावीं अशी सूचना पुढें आली आहे तीवरून निघणारें अनुमान स्पष्ट आहे. परिषद आणि तिची योजना ह्यांच्या कक्षेतून आणि स्थापन व्हावयाच्या आंतरराष्ट्रीय बँकेच्या व्यवहारांच्या कक्षेतून हिंदी स्टर्लिंग शिलकांचा प्रश्न निसटला म्हणजे त्याचा निकाल प्रामुख्यानें इंग्लंडच्या मर्जीवर आणि सोयीवर अवलंबून रहाणार हें उघड आहे. इंग्लंडची सोय हिंदुस्थाननें पाहूं नये आणि आमचा पैसा आम्हीं सांगूं त्या मालाच्या स्वरूपांत किंवा सोन्याच्या व अमरिकन डॉलर्सच्या व इतर रूपांत आम्हांस ताबडतोब द्या असा हिंदी लोकांनीं आग्रह धरूं नये ही गोष्ट कोणासहि पटण्यासारखी आहे. पण हिंदुस्थानच्या युद्धोत्तर काळांतल्या औद्योगिक अभिवृद्धीच्या योजना व्यवस्थित रीतीनें पार पडण्यास सहायक होईल अशा मार्गानें हिंदी शिलकांचा विनियोग केला जाण्याचें अगत्य मान्य झालेंच पाहिजे. नाहींतर हिंदुस्थानचा स्वार्थत्याग फुकट जाणार आहे. हिंदुस्थाननें कोणती योजना स्वीकारावी ह्याविषयींचें ब्रिटिश धंदेवाल्यांचें म्हणणें तरी काय आहे ? त्यांची बाजू " फिनॅन्शल न्यूज " ह्या पत्रानें स्पष्ट पुढें मांडली आहे. त्यांचें म्हणणें असें आहे कीं हिंदुस्थानची स्टर्लिंगमधली बाकी व्यापारी देवघेवींत निघालेली नसल्यानें तिची फेड नेहमीच्या देण्याघेण्याच्या व्यापारी व्यवहार पद्धतीनें केली जाऊं नये. असें न केल्यास इंग्लंडला २०० कोटि पौंडांचें आंतरराष्ट्रीय कर्ज काढून स्टर्लिंगमधल्या लंडन येथील बाक्या चुकत्या कराव्या लागतील आणि असें करणें त्या देशाच्या शक्तीच्या बाहेरचें आहे. मागील महायुद्धानंतर मि. बॉल्डविन ह्यांनीं अमेरिकेच्या कर्जाविषयीं ह्या प्रकारची व्यवस्था केली होती, ती अयशस्वी ठरून सोंडून द्यावी लागली ह्या गोष्टीकडे लक्ष वेधून तीपासून आतां इंग्लंडनें बोध घेतला पाहिजे असें " फिनॅन्शल न्यूज " नें सुचवलें आहे. तटस्थ राष्ट्रांच्या स्टर्लिंग बाक्या सोन्याच्या किंवा हुंडयांच्या स्वरूपांत परत न देतां मालाच्या स्वरूपांत सवडीप्रमाणें देऊन टाकणें योग्य आहे आणि ह्या पेशास व्यापारी व्यवहारांतल्या बाकीचें स्थान

देण्यास हरकत नाही. अमेरिकेसहि ह्या पद्धतीचा अवलंब करण्याची सवड थोडी लागेल हें उघड आहे. परंतु ब्रिटिश साम्राज्यांतील देशांच्या स्टर्लिंग बाक्यांस हा नियम लागू करून चालावयाचें नाही ह्या विचारसरणीवर "फिनॅन्शल न्यूज" नें विशेष जोर दिला आहे. हें पत्र म्हणतें, "प्रस्तुत युद्धांत ह्या देशांनीं आपलें सर्व बळ एकवटलें असल्यानें त्यांनीं परस्परांच्या देण्याघेण्याच्या बाबतींत कायदेशीर काटेकोरपणानें वागतां कामा नये. ह्या बाबतींत कॅनडानें उत्तम उदाहरण घालून दिलें आहे. इंग्लंडला पुरवलेल्या युद्धसामुग्रीचे पैसे त्यानें सोडून दिले असून हिंदुस्थानाप्रमाणें लंडनमध्यें शिलका जमवलेल्या नाहींत. हिंदुस्थान सरकारनें स्वतः पुरवलेल्या मालाचे पैसे इंग्लंडकडून चोपून घेतले आहेत आणि ते सबंद ह्या देशांत परत यावेत अशी खटपट चालवली आहे. वास्तविकरीत्या हिंदुस्थान सरकारनें करांच्या व अंतर्गत कर्जांच्या मार्गानें पैसा उभारून लंडनमध्यें स्टर्लिंग बाक्या न साचूं देण्याची खबरदारी घेणें आवश्यक होतें. हें तर त्याच्या हातून झालेंच नाहीं, पण उलट हिंदी धंदेवाले सबंद स्टर्लिंग शिलका परत मिळण्याविषयीं ओरड करीत आहेत. ह्या पैशांतून हिंदुस्थाननें ब्रिटिश माल खरेदी करून बाक्या हळुहळु फेडून घ्याव्या ही इंग्लंडच्या नुकसानीची पण हिंदी राष्ट्राच्या फायद्याची सूचनाहि त्यांस रुचत नाही."

हिंदुस्थानचा पैसा परत देण्याचें इंग्लंडनें नाकारावें आणि ह्या देशानें त्याची अपेक्षा करूं नये असें सुचवणें अयोग्य असून आपण तशी सूचना करीत नाहीं, असें म्हणून "फिनॅन्शल न्यूज" नें एक तडजोडीची योजना पुढें मांडली आहे. स्वतःच्या शिलकेपैकी कांहीं पैशाच्या मोबदल्यांत ह्या देशानें ब्रिटिश माल घ्यावा आणि बाकीची रकम नव्या-आधीच्या प्रसंगीं उपयोगांत आणण्यासाठी बिनव्याजी लंडनमध्यें पडून राहूं द्यावी अशी ही सूचना आहे. इंग्लंडनें हिंदुस्थानचें कर्ज देण्याचें नाकारावें असा ह्या योजनेचा उद्देश नसला तरी तिला सन्मान्य तडजोड म्हणणें हा शब्दांचा दुरुपयोग आहे. स्टर्लिंग बाक्या निघण्यांत हिंदी जनतेस मोठा स्वार्थत्याग करावा लागला आहे हें सर्वमान्य आहे. ब्रिटिश पंत्रांनीं तें नाकारण्यांत अर्थ नाहीं. युद्धोत्तर आर्थिक अभिवृद्धीच्या मार्गानें महागाईच्या ह्या आपत्तीचें परिमार्जन होण्याची संधि हिंदी जनतेस मिळावी आणि त्याकरितां स्टर्लिंग शिलकेचा विनियोग करतां यावा अशी अपेक्षा बाळगण्यांत काय वावगें आहे? इंग्लंडची परतफेडीविषयींची सोय अवश्य पहा, पण तोंडानें नाहीं म्हणावयाच्या ऐवजी हातांनीं नाहीं म्हणण्याची योजना पुढें करून तिला तडजोडीचें नांव देऊं नका असें हिंदी टीकाकार ब्रिटिश धंदेवाल्यांस व त्यांच्या मुखपत्रांस सांगत आहेत. ह्या हिंदी लोकमताचा योग्य परामर्श ब्रिटिश सरकारानें घेतला पाहिजे. हिंदुस्थान सरकार ह्या देशाची सरळ बाजू उचलून धरील अशी हिंदी जनतेस आशा वाटत आहे.

बँकांच्या कायद्यांत दुरुस्ती

इंडियन कंपनीज (अमेंडिंग) ॲक्ट, १९४४ ह्याला गव्हर्नर जनरलची मान्यता ता. ७ मार्च १९४४ रोजीं मिळाली. हा कायदा १ जुलै १९४४ पासून अंमलांत येईल, असें हिंदुस्थान सरकारच्या गॅझेटांत जाहीर करण्यांत आलें आहे. ह्या दुरुस्त कायद्याची पार्श्वभूमि खालीलप्रमाणें आहे. युद्धास प्रारंभ झाल्यानंतर हिंदी बँकिंगचा धंदा घेत असलेलें वळण ध्यानांत घेऊन, सदरहु धंदा योग्य रीतीनें नियंत्रित करण्यासंबंधींचे आपले विचार रिझर्व्ह बँकेच्या सेंट्रल बोर्डानें डिसेंबर १९४२ मध्यें हिंदुस्थान सरकारास कळविले. युद्धकाळांत बँकिंगचा विस्तृत कायदा करण्याचें काम हातीं घेणें सरकारास शक्य वाटलें नाहीं, तेव्हां रिझर्व्ह बँकेनें अत्यंत महत्त्वाच्या अशा सुधारणा सरकारास सुचविल्या, त्यांचे आधारावर सरकारनें कंपनी-कायद्यांत दुरुस्ती करणारें बिल मध्यवर्ती विधिमंडळांत मांडलें. बँकांची व्यवस्था मॅनेजिंग एजंटांकडे असूं नये, हें तत्त्व कंपनी-कायद्याच्या २७७ व्या कलमांत अंतर्भूत आहे, परंतु मॅनेजिंग एजन्सीच्याच धर्तीवर मॅनेजिंग डायरेक्टरांचे करार होण्याची प्रवृत्ति बऱ्याच चालली व कायद्याचा उद्देश विफल होऊं लागला. मूळ कायद्याच्या धोरणाशीं विसंगत असलेले करार अशक्यप्राय करणारी दुरुस्ती आतां कंपनी-कायद्यांत करण्यांत आली आहे. बँकेच्या व्यवस्थापकाचें वेतन कोणत्याहि प्रकारें तिच्या नफ्यावर अवलंबून रहातां कामा नये, व्यवस्थापकाचा बँकेशीं करार एका वेळीं ५ वर्षांपेक्षां ज्यास्त मुदतीचा असतां कामा नये, वगैरे नियम आतां कायद्यांत समाविष्ट करण्यांत आले आहेत. व्यवस्थापकाच्या कराराची मुदत प्रत्येक वेळेस ५ वर्षांपेक्षां ज्यास्त नाहीं, अशा प्रकारें कितीहि वेळां वाढविण्यास कायद्यानें प्रतिबंध केलेला नाहीं.

कंपनी-कायद्यांत दुसरी महत्त्वाची दुरुस्ती बँकांच्या भाग भांडवलासंबंधांत आहे. अधिकृत, विकलें गेलेलें व वसूल भांडवल ह्यांत १०० : ५० : २५ अशा प्रकारची प्रमाणबद्धता पाहिजे, म्हणजे विकलें गेलेलें भांडवल अधिकृत भांडवलाच्या किमान ५०% व वसूल भांडवलाच्या किमान ५०% पाहिजे, असा नियम करण्यांत आला आहे. वसूल भांडवल थोडें असतांना अधिकृत भांडवलाच्या रुबाबदार आंकड्यांची भरमसाट जाहिरात करून लोकांची दिशाभूल करणें बँकांना ह्यापुढें शक्य होणार नाहीं. बँकेच्या भागांची ऑर्डिनरी, प्रेफरन्स व डिफर्ड भागांत वांटणी करून व त्यांची दर्शनी किंमत उत्पादकांच्या सोईप्रमाणें ठेवून बँकेचीं सूत्रें कांहीं मूठभर लोक आपल्या हातीं ठेवण्याचा प्रयत्न करतात, ही गोष्ट बँकिंगच्या धंद्याचे उत्कर्षाचे दृष्टीनें अनिष्ट आहे. लहान रकमांचे डिफर्ड भाग काढून, एकाद्या वर्षी मोठा नफा दाखवून डिफर्ड भागवाल्यांची चंगळ करणें ह्यापुढें शक्य होणार नाहीं; कारण बँकांचे सर्व भाग फक्त ऑर्डिनरीच असले पाहिजेत, असें दुरुस्त कायदा सांगतो, दुरुस्त कायदा अंमलांत येण्यापूर्वी प्रेफरन्स भाग विकले गेलेले असल्यास, त्या भागवाल्यांचे हितसंबंध मात्र कायम रहाणार आहेत. भागीदारांनीं भरलेल्या भांडवलाचे प्रमाणांतच त्यांस मताधिकार मिळाला पाहिजे, अशीहि दुरुस्ती करण्यांत आली आहे. लहान रकमांचे कांहीं भाग काढणें, कांहीं भागांवरील भांडवलाची वसुली फारच थोडी करणें, इत्यादि मार्गांनीं थोड्या रकमेच्या आधारावर पुष्कळ मतें ताब्यांत ठेवणारांच्या कारवायांस त्यामुळें पायबंद बसणार आहे. भागीदारानें भरलेल्या रकमेच्या प्रमाणांत त्यास मतांचा अधिकार मिळाला पाहिजे, ह्याचा अर्थ भागीदारांच्या कमाल मताधिकारावरील नियंत्रण बेकायदा आहे, असा होईल किंवा काय हा प्रश्न उपस्थित होण्याचा संभव आहे. कित्येक बँकांच्या नियमांत भागीदारांनीं कितीहि भाग घेतले असले तरी त्यांस दहा, पंचवीस, पन्नास, शंभर वगैरेपेक्षां अधिक मतें असूं नयेत अशी व्यवस्था असते. त्याचा उद्देश कांहीं थोड्या भागीदारांकडे मताधिक्य जाऊं नये असा असतो. भागीदारांस त्यांच्या रकमेच्या प्रमाणांत मताधिकार मिळालाच पाहिजे; कमी रकम भरणारास ज्यास्त अधिकार मिळतां कामा नये; ह्याबरोबरच मोठी रकम भरणारांसहि त्यांच्या रकमेच्या प्रमाणांत अधिकार मिळाला पाहिजे, त्यांच्या अधिकाराचें नियंत्रण होतां कामा नये, असा दुरुस्त-कायद्याचा मथितार्थ आहे असें दिसतें.

१५ जानेवारी १९३७ नंतर स्थापन झालेल्या बँकांवरच भागांची वाटणी, वसुली व मताधिकार ह्यासंबंधांतील वरील दुरुस्तीची अंमलबजावणी होणार आहे व त्यांना आपल्या नियमांत योग्य तो बदल करण्यास दोन-वर्षांचा अवधि देण्यांत आलेला आहे.

स्फुट विचार

हिंदी बँकांचें मंडळ बनविण्याची योजना

हिंदुस्थानांतील बँकांनीं स्वतःच्या हितरक्षणासाठी आणि आपल्या व्यवहारासंबंधानें उद्भवणाऱ्या प्रश्नांचा निकाल परस्पर-विचारानें करावा म्हणून त्यांचें एक मंडळ स्थापलें जावें ही कल्पना मुंबईमध्यें बराच काळ सूचनेचा व चर्चेचा विषय होऊन बसली होती. असेर इंडिअन मर्चंटस चेंबरचे अध्यक्ष, शेठ प्राणलाल देवकरण नानजी, ह्यांच्या नेतृत्वानें गेल्या आठवड्यांत प्रमुख बँकांच्या प्रतिनिधींची प्रास्ताविक सभा भरून तीमध्यें अशा मंडळाच्या स्थापनेची योजना तयार करण्यासाठी एक समिति नेमण्यांत आली. मुंबईमधील प्रमुख शेड्यूल्ड बँकांच्या प्रतिनिधींचा ह्या समितींत अंतर्भाव करण्यांत आला आहे. हिंदी बँकांच्या मंडळाची मूलभूत कल्पना सामान्यतः मान्य झाल्यास तिच्या घटनेचा मसुदा समितीनें तयार करावयाचा असून तो गेल्या आठवड्यांत भरलेल्या सभेच्या दुसऱ्या बैठकींत पुढें मांडण्यांत येईल. परस्थ एक्सचेंज बँकांची स्वतःची स्वतंत्र घटना आहे आणि ह्या संस्था सर्व बाबतींत सहविचारानें व एकमतानें वागत असतात. हिंदी लोकांनीं चालविलेल्या बँकांच्या हिताचे अनेक प्रश्न आहेत आणि वारंवार उत्पन्न होतात. परदेशांतील बँकिंगमध्यें व आंतरराष्ट्रीय देवघेवींत ह्या बँकांचा हिस्सा फारच अल्प आहे. ह्या क्षेत्रांत प्रगति करण्यासाठी त्यांस संघटित प्रयत्न करतां येण्यासारखे आहेत. तसेंच, बँकिंगच्या धंद्याचे संबंधांत नवीन कायदा होणें अपरिहार्य आहे आणि त्याचें स्वरूप कसें असावें हें ठरवण्यांत ह्या बँकांनीं योग्य भाग घेणें आवश्यक आहे. आपला धंदा प्रगतिपर व सुरळीत रीतीनें चालण्याकरितां कोणत्या मार्गाचा व पद्धतींचा अवलंब करावा हेंहि सर्वांच्या हिताच्या दृष्टीनें त्यांस निश्चित करतां येण्याजोगें आहे. सर्व प्रमुख बँकांनीं होऊं घातलेल्या मंडळास मनःपूर्वक पाठिंबा दिला तरच त्याचा खरा उपयोग होणार आहे. तसेंच, मध्यम व लहान आकाराच्या बँकांच्या अडचणी आणि त्यांच्या हिताचे प्रश्न ह्यांचा विचार मंडळ करील किंवा कसें ह्याची सदरहु संस्थांस शंका येणें स्वाभाविक आहे. मोठ्या बँकांचें ह्या मंडळाच्या निर्णयांत प्राबल्य होणें स्वाभाविक आहे. होऊं घातलेल्या मंडळाची घटना तयार होत असतां ह्या गोष्टींचा काळजीपूर्वक विचार केला जाणें अगत्याचें आहे. मंडळ मोठ्या बँकांचें होणार का सर्व लहान-मोठ्या बँकांचें बनवलें जाणार, त्याच्या कार्यकारी मंडळाची रचना कशी रहाणार आणि लहान-मोठ्या बँकिंगच्या संस्थांच्या उपयोगाची कोणती कामगिरी तें करणार आहे, ह्याचा खुलासा होणें आवश्यक आहे.

अमेरिकन चांदी हिंदुस्थानांत आली

चांदीचे भाव ह्या देशांत किती चढले आहेत आणि मध्यंतरीं ते किती भडकले होते हें आतां सर्वश्रुत आहे. ह्या देशांत सामान्य लोकांची प्रवृत्ति चांदी खरेदी करून तिचे दागिने बनवण्याकडे असते. बायकामुलांस चांदीच्या दागिन्यांनीं सजवून स्वतःची बचत अशा रीतीनें गुंतवून ठेवण्याचा हिंदी जनतेचा प्रघात आहे. युद्धपरिस्थितींत लोकांनीं आपला शिलकी पैसा सरकारी रोख्यांत गुंतवणें त्यांच्या व देशाच्या हिताचें आहे असा प्रचार होत आहे तरी वरील प्रवृत्तीस विशेष आळा बसलेला नाहीं. चांदीच्या महागाईस चलन-विस्ताराबरोबर ह्या धातूचा मर्यादित पुरवठा हेंहि कारण आहे. सोन्याची किंमतहि चांदीप्रमाणेंच चढलेली आहे आणि तिला आळा घालण्यासाठी रिझर्व्ह बँक दर आठवड्यास दक्षिण आफ्रिका व अमेरिका ह्यांचे वतीनें सोनें विकीत आहे. ह्या राष्ट्रांचें हिंदुस्थानचें देणें फेडण्याच्या ह्या विक्रीचा उपयोग होत असून जनतेच्या हातांतील चलन आकर्षून महागाईस आळा घालण्यासहि त्याची मदत होत आहे. सोन्याप्रमाणें चांदीहि आयात करतां येऊन ती येथें विकली गेल्यास ह्या धातूचा पुरवठा वाढून त्याची किंमत मर्यादित होऊं शकेल हें उघड आहे. ह्या मार्गाचा अवलंब हिंदुस्थान सरकारनें आतां केला आहे. चांदीचा मोठा साठा अमेरिकेंत आहे आणि त्यांतूनच ह्या देशांत आयात होणें शक्य होतें. मागील महायुद्धांत चांदीचा तुटवडा पडून नवीन रुपये पाडणें आणि त्यांचा पुरवठा लोकांस करणें कठिण झालें होतें तेव्हां ह्या कठिण परिस्थितीस तोंड देण्यासाठी सरकारनें अमेरिकेकडून चांदी घेतली होती आणि हिंदी चलनव्यवस्थेचा बचाव केला होता. प्रस्तुत प्रसंगींहि अमेरिकन चांदी आणण्यांत येत आहे. हिंदुस्थान सरकारच्या चलनपुरवठ्यास सहाय देऊन ह्या देशाचें युद्धकार्य सुकर व्हावें म्हणून अमेरिका येथील सरकारास दहा कोटि औंस इतकी चांदी उसनी देत आहे असें मि. मॉर्गेन थौ, अमेरिकन तिजोरीचे चिटणवीस, ह्यांनीं प्रसिद्ध केलें आहे. युद्धसमाप्तीनंतर ही चांदी हिंदुस्थान सरकार परत करील. अमेरिकन चांदी हिंदुस्थानांत उतरूं लागली आहे. ह्या आयातीचा परिणाम मुंबईच्या बाजारांत चांदीची किंमत तात्काळ उतरण्यांत झाला आहे.

हिंदी चित्रपटांचा धंदा

हिंदुस्थानांत सध्या देशी चित्रपटांची चलती आहे हें नवीन झपाटचानें निघणारे चित्रपट आणि त्यांवर लोकांच्या पडणाऱ्या उड्या ह्यांवरून सामान्य माणसाच्याहि लक्षांत येण्यासारखें आहे. ह्या धंद्यांत गुंतलेलें भांडवल, त्यांत विविध काम करणाऱ्या लोकांची मोठी संख्या इत्यादि गोष्टींवरून चित्रपटांच्या धंद्यास स्वदेशी उद्योगामध्यें महत्त्वाचें स्थान प्राप्त झालें आहे. समाजहिताच्या आणि कला व तंत्र ह्यांचे दृष्टीनें ह्या धंद्यांत सुधारणेस भरपूर जागा आहे हें त्याच्या निस्सीम पुरस्कर्त्यांसहि मान्य करावें लागेल. युद्धोत्तरकालीन औद्योगिक प्रगतीमध्यें चित्रपटांच्या निर्मितीस किती व कोणता वाव असावा ह्या विषयींचे विचार सदरहु धंद्याशीं निकट संबंध असलेल्या लोकांच्या ढोक्यांत येणें स्वाभाविक आणि आवश्यक आहे. सुधारणेचें कार्य सहविचारानें व संघटित रीतीनें झाल्यास तें इष्टच आहे. ह्या संबंधांत मुंबईच्या रोटरी क्लबांत श्री. के. एम. मोदी ह्यांनीं सांगितलेली माहिती उपयुक्त आहे. हिंदुस्थानच्या भावी आर्थिक प्रगतीशीं हिंदी चित्रपट व्यवसायाचें भवितव्य निगडित आहे हें त्यांचें म्हणणें अर्थपूर्ण आहे. आज लोकांच्या हातांत पैसा वाटेल तसा खेळत आहे ह्यामुळें चित्रपट पहाण्यास प्रेक्षकांची अनावर गर्दी होत आहे. उद्यां ह्या पेशास ओहोटी लागल्यास सिनेमाच्या धंदेवाल्यास मंदीची झळ लागण्याचा संभव आहे. जनतेची प्राप्ती व चित्रपटांची कमाई

झांचा निकट संबंध आहे आणि लौकिक अभिरुचीपेक्षां अधिक जवळचा आहे हें विसरून चालणार नाहीं. युद्धाच्या पूर्वीच्या काळांत हिंदी चित्रपटांचें वार्षिक उत्पन्न ३६२ लक्ष रुपये होतें, तें १९४२-४३ मध्यें ८३ टक्के वाढ होऊन ५८६ लाखांपर्यंत चढलें. १९४३-४४ सालचा आकडा इतकाच राहील, पण १९४४-४५ मध्यें तो ५११ लक्ष रुपयांवर खालीं येईल असा श्री. मोदी झांचा अंदाज आहे. युद्ध चालू असेपर्यंत उत्पन्नाचा हा आकडा कायम राहील असा त्यांचा अंदाज आहे. कच्ची फिल्म आणि इतर सामुग्री झांच्या पुरवठ्यावर चित्रपटांची सांपत्तिक स्थिति बऱ्याच अंशांनीं अवलंबून रहाणें स्वाभाविक आहे. तथापि, ह्या धंद्यांतल्या सुधारणा व त्याची प्रगति झांचे बाबतींत कोणते विचार व प्रयत्न चालू आहेत ह्या विषयींची माहिती श्री. मोदी झांनीं आपल्या भाषणांत सांगितलेली दिसत नाहीं. तांत्रिक व कलात्मक प्रगतीचे मार्ग शोधून काढून त्यांचा अवलंब सिनेमा व्यवसायिकांनीं करून स्वतःच्या धंद्याची उन्नति घडवून आणली पाहिजे.

म्हैसूर सिल्क फिलेचर्स लि.

वरील कंपनीस डिसेंबर १९४३ अखेरच्या वर्षी घसारा, वॉर रिस्क विमा, मॅनेजिंग एजंटांचें कमिशन, इत्यादि भागवून १,७०,५०२ रुपये निव्वळ नफा झाला. भागीदारांस १२½% करमाफ डिव्हिडंड मिळणार आहे, त्यासाठी १ लक्ष रुपये लागतील. कंपनीचें खपलेलें व वसूल भांडवल ८ लक्ष रुपये आहे व तिचा रिझर्व्ह फंड २½ लक्ष रुपये झाला आहे. संयुक्त राष्ट्रांकरितां पॅराशूटचें कापड तयार करण्याच्या योजनेंत कंपनीस अग्रस्थान आहे व कंपनीच्या कार्याचा झपाट्यानें विस्तार होत आहे. कंपनीच्या वाट्यास वरील योजनेंत ६०० बेसिन्स आलेलीं आहेत. कंपनीचे ठिकठिकाणीं कारखाने चालू आहेत. सिल्क कंट्रोल-ऑर्डरप्रमाणें, म्हैसूर संस्थानांत उत्पादन होणारें सर्व रेशीम नियंत्रित किंमतीस सरकारास विकावें लागतें व म्हैसूर सरकार तें रेशीम संयुक्त राष्ट्राचा प्रतिनिधी ह्या नात्याच्या हिंदुस्थान सरकारास विकतें. खासगी विक्री आजिबाद बंद आहे, परंतु त्यास उपाय नाहीं. कंपनीची मॅनेजिंग एजन्सी मेसर्स नाईक आणि कंपनीकडे आहे, तिचे प्रमुख भागीदार श्री. नारायणराव नाईक हे आहेत. श्रीराम सिल्क मिल्स लि.चेहि ते मॅनेजिंग एजंट आहेत. म्हैसूर सिल्क फिलेचर्सचे पुष्कळ भाग महाराष्ट्रीयांनीं घेतलेले आहेत व प्रो. वा. गो. काळे हे कंपनीचे एक डायरेक्टर आहेत.

मराठा चेंबरची वार्षिक सभा

मराठा चेंबर ऑफ कॉमर्स ॲन्ड इंडस्ट्रीजची १० वी वार्षिक साधारण सभा ता. १८ जून रोजीं भरली होती, तीमध्यें शके १८६५ च्या अहवालास मंजुरी व नवीन वर्षासाठीं पदाधिकारी, कार्यकारी मंडळ, हिशेब तपासनीस, सभागार मंडळ झांच्या निवडणुकी वगैरे कामें झालीं. चेंबरचे अध्यक्ष, श्री. न. ग. पवार हे उपस्थित नसल्याकारणानें एक उपाध्यक्ष, श्री. ग. रा. साठे, बिस्किट कारखानदार हे अध्यक्षस्थानीं होते. सभेमध्यें चेंबरच्या वाढत्या उपयुक्ततेबद्दल समाधान व्यक्त करण्यांत आलें. चेंबरची प्रगति चांगल्या तऱ्हेनें होत असून त्यास आश्रयहि समाधानकारक मिळत आहे. अध्यक्षांनीं आपल्या समारोपाच्या भाषणांत चालू आर्थिक व औद्योगिक प्रश्नांचा उत्कृष्ट रीतीनें आढावा घेतला. पुढील वर्षाकरितां श्री. श्रीपादराव ओगले झांचा अध्यक्ष म्हणून निवड झाली. कार्यवाह श्री. आ. रा. भट व श्री. गो. द. आपट झांची पुनः निवड झाली व त्यांच्या उत्साही कार्याबद्दल सभेंत आभार मानण्यांत आले.

सर पी. सी. रॉय झांचें निधन

सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ, डॉ. प्रफुल्लचंद्र रॉय हे आपल्या वयाच्या ८३ व्या वर्षी कलकत्ता येथें मरण पावले. एडिंबरो येथें त्यांनीं सहा वर्षें अभ्यास करून डी. एस. सी. ची पदवी मिळविली व हिंदुस्थानास परत येऊन कलकत्ता येथील प्रेसिडेन्सी कॉलेजांत प्रोफेसर म्हणून ते दाखल झाले. हिंदुस्थानांतील रासायनिक व औषधी धंद्यांच्या स्थापनेंत त्यांनीं पुढाकार घेतला. बेंगाल केमिकल ॲन्ड फार्मेस्युटिकल वर्क्सची स्थापना व विस्तार हें त्यांच्याच परिश्रमाचें फळ आहे. साबण, कातडीं, इत्यादींच्याहि कारखान्यांस त्यांनीं चालना दिली. बंगालमधील १२ कंपन्यांचे ते डायरेक्टर होते. तांत्रिक शास्त्रीय संशोधन व त्याचा औद्योगिक राष्ट्रीय उपयोग झांची जोड डॉ. रॉय झांनीं घालून देऊन हिंदी औद्योगिक प्रगतीस त्यांनीं जोराची चालना दिली. त्यांचीं मतें राष्ट्रीय व प्रगमनशील होतीं व त्यांनीं आपल्या प्राप्तीचा विनियोग शास्त्रीय संशोधनाच्या पुरस्काराकडेच केला. "हिंदू रसायनशास्त्राचा इतिहास" हा त्यांचा ग्रन्थ त्यांच्या कीर्तिप्रमाणेंच मौल्यवान् आहे. डॉ. रॉय हे अविवाहित होते. त्यांच्या मृत्युमुळें, रासायनिक आणि औद्योगिक प्रगतीच्या स्फूर्तीचा झरा नाहींसा झाला आहे. परंतु त्यांनीं दाखवून दिलेल्या मार्गानें प्रगति होत आहे हें पाहून त्यांस समाधान वाटलें असलें पाहिजे.

प्रगतीचें श्रेय आपणांकडे

सह्याद्रि विमा कंपनीनें १९४३ सालीं खालीलप्रमाणें काम केलें आहे.

आलेलें काम	रु. २१, ४४, ४७१	१९४२ पेक्षां	५ लक्ष ३ हजारानें
मंजूर काम	रु. १८, ३५, ७१४		१ लक्ष ९० हजारानें
पूर्ण विमा काम	रु. १६, १९, ७७५	वाढ	४ लक्ष ७ हजारानें

या सर्व प्रगतीचें श्रेय कंपनीचे विमेदार, प्रतिनिधी, प्रचाराधिकारी, भागीदार व हितचिंतक यांनाच आहे व त्याच्याबद्दल आम्हीं त्यांचे आभारी आहोंत. विमा—योजना त्याचप्रमाणें एजन्सी याच कंपनीची अत्यंत आकर्षक.

नाशिक मॅनेजिंग डायरेक्टर

महाराष्ट्राचे विमामहर्षि श्री. अण्णासाहेब चिरमुले ह्यांचा सन्मान

सातारा येथील समारंभ

सातारा येथील सुप्रसिद्ध वेस्टर्न इंडिया विमा कंपनीचे अध्यक्ष आणि आरंभापासूनचे संगोपनकर्ते, महाराष्ट्राचे विमामहर्षि श्रीमान् वासुदेव गणेश तथा अण्णासाहेब चिरमुले यांच्या वयाला ८० वर्षे पूर्ण होऊन ८१ वे वर्ष लागले यानिमित्त सातारा येथें त्यांच्या सत्काराचा समारंभ विमा कंपनीच्या मागील विस्तृत जागेंत घातलेल्या शोभिवंत मंडपांत मोठ्या थाटानें रविवार दिनांक ४ जून १९४४ या दिवशीं सायंकाळीं साजरा करण्यांत आला. त्या प्रसंगीं अण्णासाहेबांच्या बाँझ पुतळ्याचें उद्घाटन आणि त्यांच्या चरित्राचें प्रसिद्धीकरणहि करण्यांत आलें. सत्कारसमारंभासाठी बाहेरून पुष्कळच पाहुणे आले होते.

श्री. चिरमुले ह्यांच्या गुणगौरवपर पद्यगायन, श्री. भाऊसाहेब सोमण ह्यांचें प्रास्ताविक भाषण, अध्यक्षांच्या सूचनेस श्री. रामभाऊ कुबेर ह्यांचें अनुमोदन, यज्ञचिंतनपर संदेशांचें वाचन, श्री. चिरमुले ह्यांस सुमनहारांचें अर्पण, मानपत्राचें श्री. ल. मो. आपटे (कंपनीच्या कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष) कृत वाचन, अहेर समर्पण, श्री. चिरमुले ह्यांस श्री. खाडिलकरकृत चरित्रग्रंथाचें समर्पण, प्रा. नारळकरांचें 'चिरमुले इन्शुअरन्स इन्स्टिट्यूट'ची माहिती देणारें भाषण, शिल्पकार ताळीमकृत श्री. चिरमुले ह्यांच्या बाँझच्या अर्धपुतळ्याचें अनावरण, इत्यादि कार्यक्रम झाले.

प्रसंगोचित भाषणें

यानंतर निरनिराळ्या मंडळींचीं प्रसंगास उचित अशीं भाषणें झालीं. प्रथमतः मुंबई प्रांताचे एक माजी पंतप्रधान सर धनजीशहा कूपर म्हणाले कीं, "आपल्या कुटुंबांतील माणसांचा वाढदिवस साजरा करतांना जो आनंद, जें प्रेम वाटतें तसा अनुभव आतां येत आहे. हिंदुस्थानांत मी ठिकठिकाणीं हिंडलों, तेथील लोकांत साताऱ्याची प्रसिद्धि दोन गोष्टींनीं असल्याचें मला आढळून आलें. एक ती मराठेशाहीची जुनी राजधानी म्हणून आणि सांप्रत वेस्टर्न इंडिया विमा कंपनी तेथील म्हणून. वेस्टर्न इंडियाला या स्थितीला अण्णासाहेबांनीं आणलें. त्यांच्याच कर्तबगारीचें आणि श्रमाचें हें फळ आपण चाखीत आहों. १९१३ मध्यें ही कंपनी स्थापन झाली तेव्हां ओरिएंटल, एंपायर, हिंदुस्थान अशासारख्या कंपन्या इतक्या भरभराटलेल्या होत्या कीं, नवी कंपनी काढून त्यांच्याबरोबर टक्कर देऊन कंपनी सध्यांच्या स्थितीला आणणें अत्यंत श्रमाचें काम होतें. रात्रंदिवस तो विषय दृष्टीपुढें ठेवून हें काम त्यांस करावें लागलें. आपल्या चारित्र्याच्या बळावर अण्णासाहेबांनीं हें घडवून आणलें. ऐशीच्या वयाला असलेली त्यांची उत्कृष्ट प्रकृति, त्यांचे सद्गुण, त्यांची कार्यपद्धति या सर्व गोष्टी डोळ्यापुढें ठेवून आपण आणखी अनेक अण्णासाहेब निर्माण केले पाहिजेत."

यानंतर प्रि. महाजनी, मुंबईचे प्रसिद्ध शेअर ब्रोकर श्री. वर्दे, ओरिएंटल विमा कंपनीचे ॲक्चुअरी श्री. एस. एन. वैद्य, एफ. आय. ए., गजानन मिल्सचे मालक विष्णुपंत वेलणकर, वेस्टर्न इंडियाचे एक कर्तबगार एजंट एम. आर कुलकर्णी, कंपनीचे एक डायरेक्टर डॉ. आबासाहेब नातू, इत्यादिकांचीं अण्णासाहेबांच्या गुणवर्धनपर भाषणें झालीं.

अध्यक्ष, श्री. मावळंकर, ह्यांचें भाषण

यानंतर समारंभाचे अध्यक्ष दादासाहेब मावळंकर यांचें भाषण झालें. ते म्हणाले "अलीकडे आपल्यांत ६१ वा वाढदिवस साजरा करण्याची प्रथा पडली आहे. त्या दृष्टीनें काम करण्यास मला पांच सहा वर्षांचाच अवधी राहिला आहे असें वाटत होतें, परंतु अण्णासाहेबांकडे पाहिलें म्हणजे अजून पुष्कळ वर्षे आयुष्यापुढें आहेत असें वाटूं लागतें. त्यांनीं वयाच्या ४९ व्या वर्षी विमा कंपनी काढून ८१ व्या वर्षापर्यंत तिला उच्चावस्था प्राप्त करून दिली, ही त्यांची स्फूर्ति मी माझ्याजवळ ठेवीन. जगांत लोक पुष्कळ श्रीमंत आहेत. त्यांचें अभिनंदन आपण करीत नाहीं. ज्यांच्या कर्तृत्वाचा विनियोग दुसऱ्याकरितां होतो तेच पुरुष वंदनीय होत. अण्णासाहेबांनीं सर्व उद्योग निरपेक्षतेच्या भूमिकेवर उभे राहून विश्वस्त या नात्यानें केला. "या विमा कंपनींत कोणीही लक्षाधीश झाला नाहीं," हे उद्गार सर विश्वेश्वर अय्यांनीं काढलेच आहेत. सर्व समाजाच्या उन्नतीसाठी औद्योगिकरणाचा आदर्श त्यांनीं आपल्यापुढें ठेवला. हिंदुस्थानास आणि महाराष्ट्रास त्यांनीं नवा मार्ग दाखवून दिला. विमा कंपन्यांतून सांठणारा पैसा आपल्या राष्ट्रीय उद्धाराकडे कसा कारणी येईल याचा विचार झाला पाहिजे. युद्धोत्तर कालांत आपले धंदे जगावे अशी इच्छा असेल तर देशांत निर्माण झालेलीच प्रत्येक वस्तु वापरण्याचा निश्चय झाला पाहिजे. या निर्मितीस विमा कंपन्यांजवळ साचणारा निधि उपयोगी पडणें अवश्य आहे. तसेंच राष्ट्रीय आयुर्वृद्धीचें कार्यही विमा कंपन्यांना करतां येईल. अमेरिकेंत असे प्रयत्न चालल्याचें मी ऐकलें आहे. दीर्घायु विमेदारांपासूनच विमा कंपन्यांना भांडवलाचा अधिक लाभ होतो. म्हणून लोकांची आरोग्यकारक राहणी व्हावी म्हणून त्यांना तशीं घरें बांधून देणें, त्यांच्या आहारविहाराला आरोग्यवर्धक वळण लावणें या गोष्टी करण्यासारख्या आहेत. असो. महाराष्ट्रांत राजकारणी धैर्य आहे तसें औद्योगिक प्रांतांतहि आलें पाहिजे. अण्णासाहेबांनीं याचें उत्तम उदाहरण घालून दिलें आहे."

श्री. चिरमुले यांचें उत्तराद्दासल भाषण

यानंतर उत्तराद्दासल श्री. अण्णासाहेब यांचें भाषण झालें. ते म्हणाले "या प्रसंगीं आपण इतक्या समुदायानें येथें जमलां आहां यावरून 'सातारा स्वदेशी', 'वेस्टर्न इंडिया' आणि 'युनायटेड वेस्टर्न बँक' या तिन्ही संस्थांनीं चालविलेली जनसेवा आपणांस पटली आहे असें मी समजतों. आपण करीत असलेला गौरव व्यक्तिशः माझा दिसत असला तरी तो या संस्थांचाच असून मी प्रतीक मात्र आहे. ज्यांच्या सहकार्यामुळें या संस्था नांवारूपास आल्या त्या सर्वांना याचें श्रेय आहे. आतां आपणांस अशी विनंति करावयाची आहे कीं, आयुर्विमा कंपन्या आतां पुष्कळ निघाल्या आहेत. त्यांनीं आतां परस्पर स्पर्धा टाकून परस्पर विचारविनिमय करून आपली संघटना करावी आणि एकमेकांस साहाय्य करावें. संघटनेमुळें सर्वांगीण सुधारणा होऊन दुसऱ्या अनेक आवश्यक आणि उपयुक्त संस्था निर्माण होतील. उदाहरणार्थ, 'रिइन्शुअरन्स' कंपनी. तसेंच देशांतील उद्योगधंद्यांसही साहाय्य करणाऱ्या एखाद्या संस्थेची गरज आहे. असो. आपण मला ज्ञानेश्वरी हा ग्रंथ आहेर म्हणून दिला आहे त्याचा सादर स्वीकार करतों."

श्री. अण्णासाहेबांच्या अशा भाषणानंतर डॉ. मो. ना आमले यांनीं आलेल्या तारा, समारंभास साहाय्य करणाऱ्या तारा, तसेंच चरित्रग्रंथ फार उत्तम लिहिल्याबद्दल श्री. खाडिलकरांचे आभार मानले. त्यानंतर सौ. इंदिराबाई खाडिलकर यांनीं देशभक्तिपर गीत म्हटल्यानंतर समारंभ समाप्त झाला.

जिकडे तिकडे प्रशंसा

इमिटेशन दागिन्यांवर रासायनिक क्रिया करून खऱ्या सोन्याचा पत्रा चढविला जातो त्यामुळें दागिना केव्हांही खराब होत नाही, ही पूर्ण खात्री झाली. सोन्याचा पत्रा चढविलेल्या चार बांगड्या कि. आठ ह. गारेस्तव दागिना परत करणें झाल्यास वर चढविलेल्या सोन्याचे सर्वच्या सर्व पैसे परत देऊं.

मट कं. सांगली, S. M. C.
मट कंपनी शाखा—बुधवार पेठ, पुणें २.

पुण्यांतील
आदर्श निवासस्थान व भोजनालय
छाया लॉजिंग व बोर्डिंग हाऊस
बुधवार चौक, पुणें २.

★ नगर वाँवे ट्रेडिंग कंपनी ★

चिनाब, लाइमज्यूस कॉर्डीअल, ऑरेंज व लेमन स्क्वॉश, टोमॅटो सॉस,
मँगो जॅम, मध, कोको, बेकिंग पावडर, सॅनिटरी टॉवेल्स,
टुथ पेस्ट, टुथ ब्रश, वगैरे मालाचे
स्टॉकिस्ट.

शाखा:— माणिक चौक, अहमदनगर
हेड ऑफिस:— पूना गेस्ट हाऊस, पुणें २

स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

गिरगांव मुंबई नं. ४

महिद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

न्यू इंडिया इंडस्ट्रीज लि.

(Approved Re-traders and Approved Contractors)
२६ लॅमिंग्टन नॉर्थ, मुंबई ११.
अध्यक्ष:—श्री. ग. स. मराठे, ॲक्चुअरी.

महाराष्ट्रांतील रबराचा प्रमुख कारखाना

★ गिरणीचे रोलर्स ★ रबरी हातमोजे ★ छापखान्यांचे रोलर्स
★ रीमोल्ड टायर्स ★ रबरी वॉशर्स ★ सॉलिड व्हील्स

व इतर रबरी माल तयार होतो.

पु. ग. मराठे
मॅनेजिंग डायरेक्टर.

हें पत्र पुणें, पेठ शनवार नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' शनवार, नं. ११७।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.

खालील पत्त्यावर चौकशी करावी.

व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

अर्थ

वर्गणीचे दर.

वार्षिक वर्गणी
रु. ४
(टपाल खर्चासह)
किरकोळ अंकास
दोन आणे.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष १० पुणें, बुधवार, तारीख २८ जून, १९४४ अंक २६

धी
बॉम्बे को-ऑपरेटिव
इन्शुअरन्स सोसायटी लि.

नवीन काम (१९४३)	रु.	३९,२७,६१९
एकंदर चालू विमे	रु.	१,६१,९०,५४१
जीवन विमा निधि	रु.	२२,१५,९७४
कुल उत्पन्न	रु.	१०,३३,०००

अध्यक्ष : शेठ माधवलाल मकनजी भट्ट, जे. पी.
मॅनेजर : श्री. जी. एच. ठाकोर, एम्. ए. (कँटब.)

महाराष्ट्र-कर्नाटकचे चीफ ऑर्गनाइझर्स :
श्री. कुळकर्णी आणि कं.
मुख्य कचेरी :
को-ऑपरेटिव इन्शुअरन्स बिल्डिंग,
सर फिरोजशाह मेहता रोड, कोट, मुंबई.

हिंदुस्थानची आघाडीवरील सहकारी संस्था

दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.
पुणें शहर
भांडवल :
(ता. ३१-५-४४ रोजीं)

अधिकृत व खपलेलें	:	रु. १०,००,०००
वसूल झालेलें	:	रु. ५,००,०००
रिझर्व्ह व इतर फंड	:	रु. १,०८,०००
एकूण खेळतें भांडवल	:	रु. ७५,००,००० चे वर

—: डायरेक्टर्स :—
श्री. धों. कृ. साठे, चेअरमन,
श्री. वा. पु. वर्दे, प्रो. वा. गो. काळे, श्री. न. ग. पवार,
श्री. श्री. गो. मराठे, श्री. त्रिं. वि. रानडे, श्री. र. खिं. सोहनी,
श्री. फ. दो. पदमजी, श्री. मा. रा. जोशी,
श्री. म. वि. गोखले, श्री. वि. ह. देशमुख
: शाखा :
पुणें ४, दलाल स्ट्रीट, मुंबई, जळगांव, नागपूर.
बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.
सी. ठही. जोग
मॅनेजर

पुना गेस्ट हाऊस
१००, लक्ष्मी रोड, पुणें २.

Telephone 779

TELEGRAM
Guest House
Poona 2.

विजापूर जिल्हा दुष्काळ सहाय्यक समिती, पुणें.

विजापूर जिल्ह्यांत दुष्काळ कामीं पुण्यांत स्थापन झालेल्या समितीनें एकूण ६१,००० रुपयांवर मदत केली. येकी ठोकळ २८,००० रु. चें कापड आणि ३२,००० रुपयांवर अन्नसत्र खर्च झाला. तीन तालुक्यांत समितीनें ४ अन्नछत्रें चालविलीं होतीं. खुद्द विजापूर शहर, तिकोटा आणि कोथ्याळ या तीन गांवीं समितीतर्फे अल्पदार कुटुंबांना 'डोल' देण्यांत येई. दुष्काळअखेर अन्नछत्रांत १,७९,४४५ व डोल ७९,१९७ मिळून एकूण ४॥ लाख जेवणें देण्यांत आलीं. अशातऱ्हेची माहिती विजापूर जिल्हा दुष्काळ सहाय्यक समितीच्या अखेरच्या सर्वसाधारण सभेंत सांगण्यांत आली. ही सभा गुरुवार ता. २२ जून १९४४ रोजीं 'श्रीमुकुन्द भवन' रविवार पेठ येथें समितीचे अध्यक्ष राजा मुकुंदलाल बन्सिलाल यांच्या अध्यक्षतेखालीं भरली होती.

समितीच्या कामाचा अहवाल वाचन झाल्यानंतर जमाखर्चांत शिलकी उरलेली रक्कम रु. ५,००० पुणें येथील डॉ. रामकृष्ण हरि भडकमकर यांच्या अध्यक्षतेखालीं पुणें अन्न समितीनें सुरू केलेल्या लहान मुलांसाठीं दूधकेंद्रास मदत म्हणून देण्याचा ठराव पास झाला व समितीचें कार्य संपल्यामुळें ती समाप्त केल्याचा ठराव पास होऊन सभा आटोपली. समितीचा छापील सविस्तर अहवाल देणगीदार, वृत्तपत्रें, व इतर सहाय्यकांकडे लौकरच पाठविण्यांत येईल.

प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूटच्या शाळा व परीक्षा

मुंबई प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूटनें पुणें, धारवाड व अहमदाबाद येथें प्रत्येकी एक प्रमाणें तीन सहकारी शाळा स्थापन केल्या आहेत. कोऑपरेटिव्ह सर्टिफिकेट परीक्षा (ज्यूनियर) व कोऑपरेटिव्ह डिप्लोमा परीक्षा (सीनियर) अशा दोन परीक्षांसाठी विद्यार्थी शाळेंत शिकवून तयार केले जातील. शिक्षणाचें माध्यम तीन शाळांत अनुक्रमें मराठी, कानडी व गुजराती असें राहील. ज्यूनिअर कोर्सची फी २० रुपये व सीनियर कोर्सची फी ३० रुपये आहे. अर्जाबरोबर ५ रुपये डिपॉझिट म्हणून पाठवलें पाहिजेत, ते पुढें फीमध्यें वजते करून घेतले जातील. बाकीची रक्कम शाळा सुरू झाल्यापासून एका महिन्यांत भरली पाहिजे. डिपॉझिटची रक्कम कोणत्याही कारणास्तव परत मिळणार नाहीं. मॅट्रनेक्युलर फायनल किंवा इंग्रजी तिसरी इयत्ता पास झालेल्यास सर्टिफिकेट परीक्षेच्या कोर्सला प्रवेश मिळूं शकेल. मॅट्रिक अथवा एस. एल. सी. परीक्षा पास झालेल्यांस डिप्लोमा कोर्सला प्रवेश मिळेल. दोनहि कोर्स शाळेच्या एका टर्ममध्यें पुरे केले जातील. पहिली टर्म जुलैचा तिसरा सोमवार ते ऑक्टोबरचा शेवटचा शनिवार अशी राहील. नोव्हेंबरचा शेवटचा सोमवार ते मार्चचा तिसरा शनिवार अशी दुसरी टर्म राहील. पाठांच्या एकूण दिवसांपैकी तीन चतुर्थांश तरी दिवस विद्यार्थी हजर पाहिजे. दरवर्षी ऑक्टोबरमध्यें व मार्चमध्यें, अशी दोनदां परीक्षा घेतली जाईल. रहाण्याची व जेवणाची व्यवस्था विद्यार्थ्यांनीं आपली स्वतःची केली पाहिजे. अभ्यासक्रमाची माहिती मागाहून प्रसिद्ध होईल.

विविध माहिती

सोन्याच्या निर्यातीसंबंधीं खटला

३ फेब्रुवारी, १९४४ रोजीं मुंबईच्या कस्टम्स प्रिव्हेंटिव्ह अधिकाऱ्यांनीं एका आगबोटीची तपासणी केली, तेव्हां त्या बोटीवर फिटरचें काम करणाऱ्या यानचिन झा नांवाच्या चिनी माणसाजवळ ३,८०० रुपये किंमतीचे ७६ सॉव्हरिन आढळले. त्याला अटक करण्यांत येऊन त्याचेवर डिफेन्स ऑफ इंडिया (९० ब) नियमाखालीं रिझर्व्ह बँकेच्या परवान्याविना सोनें निर्गत करण्याचा गुन्हा केल्याबद्दल खटला भरण्यांत आला. ह्या नियमानें मध्यवर्ती सरकारनें सी कस्टम्स ॲक्टाचीं बंधनें सोन्याच्या आयाती-निर्गतीवर लादलीं. हीं बंधनें अत्यंत व्यापक स्वरूपाचीं असल्यानें हीं कायदेशीरपणें घालतां येत नाहींत, ह्या मुद्यावर मुंबईच्या प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेटनें यानचिनला निर्दोषी ठरविलें. रिझर्व्ह बँकेकडून आवश्यक तो परवाना आरोपीनें आणलेला नव्हता, ही गोष्ट फिर्यादी पक्षानें सिद्ध करणें जरूर असतांना, फिर्यादी तसें करूं शकला नाही, ह्यामुळें खटल्यांत त्यास यश येणें शक्य नाहीं, असेंहि मॅजिस्ट्रेट म्हणाले.

बॉल बेअरिंगची निर्गत

स्वीडन जर्मनीकडील आपली बॉल बेअरिंगची निर्गत ५० टक्के कमी करणार आहे व त्याप्रमाणें अमेरिकेशीं करार झाला आहे, असें वृत्त प्रसिद्ध झालें आहे.

कामगारांना नुकसानभरपाई

मजुरांना झालेल्या मृत्युबद्दल व दुखापतीबद्दल वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ॲक्टाप्रमाणें नुकसानभरपाई देण्यांत येतें. १९४२ सालीं एकूण ४२,६०३ प्रकरणांत १८,१९,५०५ रुपये नुकसान भरपाईदाखल देण्यांत आलें, असें ताज्या अहवालावरून दिसून येतें. एकूण अपघातांपैकीं ९२३ प्राणघातक ठरले, अपघातांमुळें २,१८७ मजूर कायमचे जायबंदी झाले व ३९,४९३ कांहीं काळापुरते घरीं बसले.

JUST PUBLISHED

INDIAN RURAL PROBLEM

BY

Sir Manilal Nanavati and Prof. J. J. Anjaria.

(Issued by the Indian Society of Agricultural Economics, Bombay).

Price Rs. 8

(Postage extra).

Sole Selling Agents:—

THE CO-OPERATORS' BOOK DEPOT.

9, BAKEHOUSE LANE,
FORT, BOMBAY.

अनुक्रमणिका

	पृष्ठ
१ विविध माहिती ...	२०२
२ शेतीच्या अभिवृद्धींत सहकारार्चे स्थान ...	२०३
३ गेल्या वर्षीचा पावसाळा	२०४
४ सेक्रेटरींचा शिक्षणवर्ग	२०४
५ बेळगांव जिल्ह्यांत रेशमाचा धंदा	२०४
६ स्फुट विचार .. ... धान्याचीं पिकें–कपास व तंबाखू यांचेऐवजीं इतर पिकें—दुष्काळाच्या कारणांची चौकशी–जर्मनीचा कोंडमारा.	२०५
७ मुंबई प्रांतांतील सहकारी चळवळ	२०६
८ कागदावर नियंत्रण ...	२०७
९ सहकारी सेल सो. ची परिषद	२०८

अर्थ

बुधवार, ता. २८ जून, १९४४

शेतीच्या अभिवृद्धींत सहकाराचें स्थान

हिंदुस्थानांतील बहुसंख्य लोकांची आर्थिक स्थिति सुधारावयाची म्हणजे शेतकरी वर्गाच्या रहाणींत प्रथम सुधारणा झाली पाहिजे ही गोष्ट आतां सर्वमान्य झाली आहे. शेतीच्या धंद्यांत गुंतलेले लोक ह्या देशांत बहुसंख्य आहेत, एवढेंच नव्हे तर हा धंदा हिंदी राष्ट्राच्या जीवनाचा आत्मा आहे. हिंदी जनतेच्या अन्नाचा उगम धान्यांच्या पिकांमध्यें आहे आणि त्यांचा पुरवठा वाढवण्यास शेतीचा धंदा अधिक उत्पादक व किफायतशीर होणें आवश्यक आहे. स्वदेशी उद्योगधंदे, कारखाने व व्यापार ह्यांची अभिवृद्धी बहुसंख्य शेतकरीवर्गाच्या प्राप्तीवर व माल विकत घेण्याच्या सामर्थ्यावर अवलंबून रहाणार आहे. त्याचप्रमाणें कारखान्यांस लागणारा पुष्कळसा कच्चा माल शेतीपासूनच मिळतो आणि त्याचाहि पुरवठा पुरेसा होणें आर्थिक प्रगतीच्या दृष्टीनें अगत्याचें आहे. ह्या कारणांमुळें युद्धोत्तर आर्थिक पुनर्घटनेच्या सर्व योजनांमध्यें शेतीच्या सुधारणेस आणि शेतकरीवर्गाच्या सुस्थितीस अग्रस्थान दिलेलें आढळून येईल. हिंदुस्थान सरकारच्या विद्यमानें आर्थिक अभिवृद्धीच्या ज्या योजना तयार होत आहेत, त्यांमध्यें हिंदी शेतीच्या प्रगतीच्या योजनेचा अंतर्भाव झाला आहे. ह्या योजनेच्या सामान्य स्वरूपाची स्थूलमानाची कल्पना सर फिरोज खारेघाट, मध्यवर्ती सरकारच्या शिक्षण खात्याचे जादा चिटनवीस, ह्यांनीं वृत्तपत्रांच्या प्रतिनिधींस नुकतीच दिली. इंपीरिअल कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चरल रिसर्चनें नेमलेल्या एका उपसमितीनें प्रस्तुत शेती योजना तयार केली असून तिचे सर फिरोज अध्यक्ष होते, हें येथें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे.

आर्थिक अभिवृद्धीच्या इतर आणि मोठ्या योजना युद्धोत्तर काळांत अमलांत येण्यासाठी आहेत. हिंदुस्थान सरकारची शेती योजना तात्काळ चालू व्हावयाची आहे. येत्या दहा वर्षांत हिंदी शेतीचें उत्पादन पन्नास टक्क्यांनीं आणि पुढील पांच वर्षांत झेंभर टक्क्यांनीं वाढवावयाचें हा तिचा उद्देश आहे. तिचा भांडवली खर्च एक हजार कोटि रुपये आणि वार्षिक चालू खर्च बीस कोटि रुपये होईल अशी तरतूद आहे. शक्य तितकी जमीन पिकांखाली येईल तेव्हां दर एकरी प्रतिवर्षी नऊ आणे ह्याप्रमाणें सुधारणेचा खर्च येईल असा हा अंदाज आहे. टाटा-बिर्ला योजनेंत पंधरा वर्षांत १२४५ कोटि रुपयांच्या खर्चाची व्यवस्था असून तिच्या योगानें शेतीचें उत्पादन १३० टक्क्यांनीं वाढावयाचें आहे हें तुलनात्मक दृष्टीनें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. योजनेंतील खर्चाचे आंकडे युद्धापूर्वीच्या बाजारभावांवर आधारलेले आहेत; त्यांचे चालू किंमतींत परिवर्तन केलें असतां तिचा एकूण खर्च दोन हजार कोटि रुपयांवर जाईल.

प्रत्येक हिंदी मनुष्यास पुरेसें व चांगलें अन्न खाण्यास मिळावें आणि जनतेची रहाणी सुधारावी हा आपल्या योजनेचा मुख्य उद्देश असल्याचें सर फिरोज ह्यांनीं सांगितलें. अर्थातच ती तपशीलवार तयार केलेली नाहीं; प्रांतिक सरकारांनीं आक्रमावयाच्या मार्गाचें तिच्यामध्यें दिग्दर्शन आहे असें ते म्हणाले. हिंदुस्थान सरकार योजनेच्या अंमलबजावणींत द्रव्य सहाय देणार असून वार्षिक वीस कोटि रुपयांपैकीं त्याचा हिस्सा अडीच कोटि रुपये असेल. "अधिक धान्य पिकवण्याच्या" मोहिमेसाठीं मध्यवर्ती सरकार ग्रँटस देत आहे. त्यांचा उपयोग प्रांतिक सरकारांनीं तुटीच्या भागांस धान्याचा पुरवठा होण्याच्या दृष्टीनें करावयाचा आहे. शेतीच्या धंद्याचें तंत्र शिकलेलीं माणसें तयार करण्याचें काम प्रथम हातीं घेण्यांत येणार आहे. पाण्याचा पुरवठा, खतें, बियाणें, जमीनीचे बांध, जनावरांची निगा इत्यादि बाबींची सुधारणा, इत्यादि बाबी हातीं घेण्यांत येतील. त्यांचे संबंधांत कोणत्या गोष्टी केल्या जातील ह्याची त्रोटक माहिती सर फिरोज ह्यांनीं आपल्या भुलाखतींत दिली आहे.

"शेतीच्या मालाची विक्री सहकारी पद्धतीनें होईल अशी तजवीज प्रत्येक खेड्यामध्यें करण्यांत यावी" अशी एक सूचना त्यांच्या योजनेंत आहे. ह्यावरून मुंबई प्रांतांत सहकारी तत्वावर शेतमालाच्या विक्रीची व्यवस्था मोठ्या प्रमाणावर करण्याचें काम हातीं घेण्याचें महत्व किती आहे हें ध्यानांत येईल. प्रत्येक खेड्यांत एक माहितगार मार्गदर्शक नेमण्यांत यावा अशीहि सूचना योजनेमध्यें आहे. ह्याचा उपयोग सहकारी संस्थांचा कारभार नीट रीतीनें चालवण्यास खेडेगावी लोकांस सहाय मिळण्याकडे होईल. हिंदुस्थान सरकारच्या योजनेची यशस्विता प्रांतिक सरकारांच्या कार्यक्षमतेवर आणि उत्साहावर अवलंबून रहाणार आहे हें उघड आहे. तरी मुंबई सरकारनें प्रांतिक सहकारी संघटनाच्या आवश्यक असलेल्या विस्ताराची रूपरेखा तात्काळ आखून मध्यवर्ती सरकाराच्या योजनेस अनुसरून त्वरित कार्यास लागलें पाहिजे. सहकारी अभिवृद्धीची योजना आखण्यासाठी मुंबई सरकारानें एक समिती नेमली होती, तिची योजना तयार झालेली आहे असें समजतें. हिंदुस्थान सरकारच्या शेतीच्या प्रगतीविषयींच्या व्यावहारिक कल्पनांचें स्वरूप पहातां आमच्या सरकारानें सहकारी पुनर्घटनेची आपली योजना व्यापक व मूलग्राही करण्याचें महत्व किती आहे हें दिसून येईल.

शेतीच्या तंत्राची सुधारणा हा त्या धंद्याच्या अभिवृद्धीचा पाया आहे. तथापि, ह्या सुधारणेस संघटन आणि पैसा ह्यांची मदत आवश्यक आहे आणि हें सहाय देण्याचें सामर्थ्य सहकारी तत्वांत आणि कार्यपद्धतींत आहे. शेती खातें, सहकारी खातें, सहकारी संस्था व कार्यकर्ते आणि महसूल खातें ह्यांच्या सह-

विचाराने शेतीच्या अभिवृद्धीच्या योजना आखणें व पार पाडणें अगत्याचें आहे. आपल्या परीने स्वतःच्या सहकारी संघटनेच्या विस्ताराच्या योजना तयार करण्याची सहकारी खात्याची व कार्यकर्त्यांची जबाबदारी ह्यामुळें कमी होत नसून वाढत आहे. शेतीच्या संवर्धनाचा आराखडा तयार आहे. सहकाराच्या विस्ताराच्या गरजा त्यामध्यें योग्य रीतीनें आतां बसवल्या पाहिजेत. ह्या बाबतींत अल्पसंतुष्टपणा व दिरंगाई कामाचीं नाहींत. आपल्या कल्पना व व्यावहारिक सूचना सहकारी संस्था व कार्यकर्ते ह्यांनीं सहकारी खात्यापुढें मांडून त्याच्या मार्फत त्यांचा योग्य परामर्श प्रांतिक सरकाराकडून घेतला जाईल ह्याविषयीं प्रयत्न केला पाहिजे.

गेल्या वर्षीचा पावसाळा

पुणें येथील सिमला ऑफिसांतील असिस्टंट मीटिऑरॉलॅजिस्ट, श्री. पी. एस हरिहरन, ह्यांनीं १९४३ च्या मानसून पावसाचा आढावा काढून तो "इंडियन फार्मिंग"मध्यें प्रसिद्ध केला आहे. त्यांच्या म्हणण्याप्रमाणें १९४३ चा पावसाळा हा समाधानकारक मानला पाहिजे. जुलैच्या तिसऱ्या आठवड्यांत बंगालच्या बरद्वान जिल्ह्यांत आलेले पूर, जुलैच्या शेवटच्या आठवड्यामधील अजमीर-मारवाडमधील महापूर व बनारसजवळील सप्टेंबरमधील अतिवृष्टी हीं गेल्या वर्षीच्या पावसाळ्याचीं वैशिष्ट्यें समजतां येतील. छोटा नागपूर व ओरिसा येथें नेहमीपेक्षा अनुक्रमें २३% व २१% पाऊस जास्त पडला, तर सिंध व मद्रास येथें तो ५३% व ३६% कमी पडला.

पश्चिम किनाऱ्यावर मानसून पाऊस २९ मे रोजीं अवतीर्ण झाला. बंगालच्या उपसागरांत तो ११ मे रोजीं आला. सबंद हिंदुस्थानांतील पाऊस हिशेबांत घेतला, तर मे १९४३ मध्यें तो नेहमीच्या मानानें ५% कमी पडला, जूनमध्यें ११% जास्त पडला, ऑगस्टमध्यें १८% कमी पडला व सप्टेंबरमध्यें १६% अधिक झाला. ओरिसा, छोटा नागपूर व राजपुताना येथें पाऊस जास्त पडला; वायव्येकडील इतर ठिकाणीं, मलबार वगळून बाकीच्या मद्रास प्रांतांत आणि बिहार व वऱ्हाड येथें पावसाचें प्रमाण कमी होतें. इतर ठिकाणीं, पाऊस नेहमीच्या प्रमाणांतच साधारणतः पडला.

शेतकी पतपेढ्यांचे सेक्रेटरींना शिक्षण देणारा वर्ग

मुंबई प्रांतिक सहकारी इन्स्टिटयूटतर्फे पूर्वखानदेश जिल्हा सहकारी देखरेख बोर्डाच्या शिक्षणकमिटीनें "शेतकी पतपेढ्यांचे सेक्रेटरींना शिक्षण देणारा वर्ग" जळगांव येथें ता. १५-५-४४ ते ता. ३-६-४४ पावेतों पूर्वखानदेश सेन्ट्रल को. बँकेच्या हॉलमध्यें भरविला होता. सदर वर्गांत १९ उमेदवारांनीं शिक्षण घेतलें. ज्या त्या विषयांत तज्ज्ञ अशा पगारी व बिनपगारी सहकारी अंमलदारांनीं वर्गांतील उमेदवारांना शिक्षण दिलें. डेप्युटी रजिस्ट्रारसाहेब पुणें यांनीं ता. ३१-५-४४ रोजीं वर्गास भेट दिली. उमेदवारांची ता. २-६-४४ व ता. ३-६-४४ ला परीक्षा घेण्यांत आली. शिक्षण वर्गाचा समारोप ता. ३-६-४४ रोजीं सायंकाळीं असि. रजिस्ट्रारसाहेब जळगांव व चेअरमन पूर्व खानदेश डिस्ट्रिक्ट बोर्ड ऑफ सुपरवायझिंग युनिअन्स लि. जळगांव यांचे हस्तें करण्यांत आला. त्यांनीं आपल्या समारोपादाखल केलेल्या भाषणांत उद्बोधक उपदेश केला. एकंदरींत रूरल सेक्रेटरींना शिक्षण देण्याचा तीन आठवड्यांचा कार्यक्रम यशस्वी रितीनें पार पडला.

बेळगांव व धारवाड जिल्ह्यांत रेशमाचा धंदा

मुंबई सरकारचें आश्वासन व सवलती

म्हैसूर संस्थानांत रेशमाच्या किड्यांपासून रेशीम तयार करण्याचा धंदा चांगल्या रीतीनें स्थापन झालेला आहे. तेथें सुमारें ७० हजार एकर जमिनींत तुतीचीं झाडें लावण्यांत आलेलीं असून त्यांची लागवड मर्यादित करण्याची पाळी तेथें आली आहे. रेशमी किड्यांचें उत्पादन करणें, त्यांच्या कोशिटचांपासून निघणारें रेशीम चातीवर चढविणें व रेशमाच्या धाग्यापासून कापड तयार करणें, असे ह्या धंद्याचे विभाग आहेत. कच्चें रेशीम हातांनीं काढण्यापेक्षा त्यासाठीं यंत्रसामुग्रीचा उपयोग करणें किफायतशीर असणें स्वाभाविक आहे. कोशिटचांचें रेशीम चातीवर चढविण्याचा धंदा करण्यासाठी श्री. नारायणराव नाईक ह्यांनीं म्हैसूर संस्थानांत तेथील सरकारच्या सहाय्यानें "म्हैसूर सिल्क फिलेचर्स लि" ही कंपनी उभारली, ती यशस्वी झाली आहे. श्री. नाईक ह्यांच्याच मॅनेजिंग एजन्सीखाली "श्रीराम सिल्क मिल्स लि." ही कंपनीहि बंगलोर येथें किफायतशीर रीतीनें चालू आहे.

मुंबई प्रांतांत रेशमी किडे पाळण्याचा उपक्रम दुय्यम धंदा म्हणून सुरू करण्याची शक्यता कितपत आहे, हें अजमावण्याकरितां मुंबई सरकारनें बेळगांव येथें एक प्रायोगिक केंद्र १९४० साली स्थापन केलें. त्याचा अनुभव उत्तेजनकारक आला. श्रीराम सिल्क मिल्स लि. चे मॅनेजिंग एजंटस, मेसर्स एन. जी. नाईक आणि कं. लि. ह्यांनीं मुंबई सरकारास एक योजना सादर केली, तिचे प्रमाणें शेतीविषयक भाग सरकारच्या औद्योगिक खात्यानें संभाळण्याचा असून व्यापारी भागाची जबाबदारी श्रीराम सिल्क मिल्स लि.वर आहे. श्रीराम सिल्क मिल्स लि.तर्फे एक नवी लिमिटेड कंपनी स्थापन करण्यांत येईल, तिच्या स्थापनेस व वाढीस मुंबई सरकार मदत करणार आहे. डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रीजची नव्या कंपनीच्या बोर्डावर डायरेक्टर म्हणून नेमणूक केली जाईल. ठराविक दरानें कोशिटचा विकत घेण्याचें कंपनीवर बंधन आहे. तुतीचीं झाडें लावून रेशमाचे किडे बाळगणाऱ्या प्रत्येक शेतकरी कुटुंबास १५० रुपये व्याज माफ तकावी कर्ज देण्याचें सरकारनें ठरविलें आहे. दोन वर्षांत किमान तीन एकर तुतीच्या लागवडीखाली आणल्यास एक तृतीयांश कर्ज माफ होईल. १ हजार कुटुंबांस अशा रीतीनें तकारी कर्ज देण्यांत येईल. सारामाफीचेंहि आकर्षण शेतकऱ्यांसाठी योजलेलें आहे.

मुंबई प्रांतांतील नव्या सिल्क फिलेचर्स कंपनीला सरकारनें सढळ हातानें सवलती दिलेल्या आहेत. कंपनीचे उत्पादक तज्ज्ञ व ह्या धंद्यांतील यशस्वी कारखानदार आहेत. तेव्हां नव्या कंपनीच्या यशाबद्दल शंका बाळगण्याचें कारण नाहीं.

श्री. आपटे ह्यांस आर्टिकल्ड क्लार्कस घेण्यास परवानगी

हिंदुस्थान सरकारनें श्री. गो. द. आपटे बी. ए., जी. डी. ए. ह्यांचें, आर्टिकल्ड क्लार्कसना प्रात्यक्षिक शिक्षण देण्याची परवानगी असलेल्या रजिस्टर्ड अकौंटंटसच्या सरकारी यादींत १५ मे, १९४४ रोजीं नांव दाखल केलें आहे, असें समजतें. अशा तऱ्हेची मान्यता मिळालेले ऑडिटर मुंबईबाहेर महाराष्ट्रांत एकदोनच आहेत.

स्फुट विचार

काढव्याखालील जमिनींत धान्यांचीं पिकें

मुंबई प्रांताच्या धान्याचें उत्पादन वाढवण्याचा सरकार शिकस्तीचा प्रयत्न करीत आहे. जमिनीचें जेवढें मोठें क्षेत्र धान्यांच्या पिकांखाली आणतां येईल तेवढें आणावयाचें आणि ह्या पिकांची पैदास शक्य तितकी वाढवावयाची ह्या त्या प्रयत्नाच्या दोन दिशा आहेत. विशिष्ट जिल्ह्यांत कपास व तंबाखू ह्यांची लागवड मर्यादित क्षेत्रांत केली जाऊन ठराविक जमिनीच्या भागांत धान्यांचीं पिकें लावलींच पाहिजेत अशी सक्ती करणारा कायदा मुंबई सरकारनें अमलांत आणला आहे हें वाचकांस माहीत आहेच. धान्यांच्या पिकांचें क्षेत्र विस्तृत करण्यासंबंधांत झालेल्या प्रचाराचा थोडा बहुत उपयोग झाला असला तरी त्याचा परिणाम अपेक्षित प्रमाणांत घडून आला नाहीं असा अनुभव आल्यानें वरील प्रकारचा सक्तीचा कायदा करणें सरकारास प्राप्त झालें. हें धोरण आणखी पुढें ढकलण्याचें त्यानें आतां ठरवलें आहे. कालवे आणि तलाव ह्यांच्या पाण्यानें भिजणाऱ्या जमिनींत त्यांच्या मालकांनीं धान्यांचीं पिकें केलींच पाहिजेत, अशी सक्ती त्यांचेवर आतां व्हावयाची आहे. वेळेवर भरपूर पाणी जमिनींत मिळालें असतां तिच्यामध्यें दुप्पट पीक येतें. पण खरीपाच्या हंगामांत अनेक शेतकरी पावसावर विसंबून रहातात आणि त्यामुळें उत्पादन व्हावें तितकें होत नाहीं. सरकारनें कालव्यांवर कोटयावधि रुपये खर्चले आहेत आणि ह्या खर्चाचा उपयोग धान्य निर्मितीच्या वाढीस व्हावा अशी त्याची इच्छा आहे. निरनिराळ्या कालव्याखालील जमिनींचे गट करण्यांत येतील आणि त्यांमधील शेतकऱ्यांस पिकांस केव्हां पाणी द्यावें हें ठरवण्यांत येईल. त्याप्रमाणें जमिनींच्या मालकांनीं आणि त्यांच्या शेत कसणाऱ्या कुळांनीं पाणी घेतलें पाहिजे. मामुली परिस्थितींत अशा सक्तीविरुद्ध टीका समर्थनीय असली तरी युद्धकालाच्या सामाजिक अन्नाच्या निकडीच्या गरजा लक्षांत घेतां प्रस्तुत सक्तीचें सरकारी धोरण क्रमप्राप्त झालें आहे हें विसरून चालावयाचें नाहीं. सदरहु सक्तीची अंमलबजावणी नीट केली जात आहे कीं नाहीं हें बारकाईनें पहाण्याची दक्षता मात्र सरकारनें बाळगली पाहिजे.

कपास व तंबाखू ह्यांचेऐवजी धान्यांचीं पिकें

कपास व तंबाखू ह्यांच्यासारख्या धान्येतर पिकांच्या लागवडीचें क्षेत्र मर्यादित करणारा कायदा ह्या प्रांतांत अमलांत आला आहे. निषिद्ध पिकांच्या जागीं धान्यांचीं पिकें शेतकऱ्यांनीं ह्या कायद्याअन्वयें करावयाचीं आहेत. निरनिराळ्या जिल्ह्यांतल्या जमिनी, पाऊसपाण्याची स्थिति व लागवडीचे प्रघात ह्यांमध्यें फरक असून नेहमीपेक्षा निराळीं पिकें काढण्याचे कामीं शेतकऱ्यांस मार्गदर्शनाची आवश्यकता भासणें स्वाभाविक आहे. कोणत्या जिल्ह्यांत कपास-तंबाखूच्या ऐवजीं कोणतीं पिकें करणें श्रेयस्कर आहे, ह्याची माहिती शेतीसाह्यानें जमीनदारांस दिली असतां तें कोणतें होईल अशी सूचना प्रांतिक अन्नसल्लागार समितीनें सरकारास केली होती. तिला अनुसरून प्रस्तुत बाबतींतली तपशीलवार माहिती प्रसिद्ध करण्यांत आली आहे. तपशीलवार सल्ला कपास व तंबाखू पिकवणाऱ्या इतर जिल्ह्यांचे संबंधांत देण्यांत आला आहे. कायद्याप्रमाणें विवक्षित क्षेत्रांत धान्य पिकवलेंच पाहिजे असें असल्यानें कोणत्या जमिनींत कोणतें खरीपाचें व रबीचें पिक करणें श्रेयस्कर होईल ह्याचें ज्ञान शेतकऱ्यांस आवश्यक आहे आणि सरकारमार्फत प्रसिद्ध झालेल्या ह्या बाबतींतल्या सूचना त्यांस उपयुक्त होतील ह्यांत शंका नाहीं.

दुष्काळाच्या कारणांची चौकशी

मेल्या साली बंगालमध्यें दुष्काळाची मोठी आपत्ती तेथील लोकांवर कोसळली आणि तिच्या बरोबर व मागाहून साथींनीं त्यांस सतावलें. ह्या घटनेची, जबाबदारी कोणावर येते आणि तिला निष्काळजीपणा व अव्यवस्था हीं किती कारणीभूत झालीं ह्याविषयीं कित्येक महिने चर्चा चालू होती. बंगालच्या मंत्रिमंडळाच्या ह्या बाबतींतल्या गोंधळावर कडक टीका करण्यांत आली होती आणि तीमध्यें हिंदुस्थान सरकारासहि ओढण्यांत येत होतें. अशा स्थितींत सदरहु प्रश्नाची निःपक्षपातीपणाची कसून चौकशी केली जावी अशी मागणी करण्यांत आली, आणि मध्यवर्ती असेंब्लीनें तिला जोराचा पाठिंबा दिला. ह्या लोकमतास अनुसरून हिंदुस्थान सरकारनें एक चौकशीचें कमिशन नेमलें असल्याचें ठरवलें आहे. बंगालमध्यें अचानुटवडा व साथी ह्यांचे योगानें मनुष्यहानी झाली तिचीं कारणें शोधून काढून असला प्रसंग उद्भवूं नये ह्यासाठी उपाययोजना सुचवावी अशा आशयाचा आदेश कमिशनला देण्यांत आला आहे. दुष्काळाच्या परिस्थितींत खायपदार्थांचा पुरवठा आणि वांटणी ह्यांचे संबंधांत उपाय योजण्यांत येतात, त्यांची पद्धती सदोष आहे कीं काय आणि ती तशी असल्यास दिसून येणारे तिच्यामधील दोष कसे दूर करतां येतील ह्याबाबतींत कमिशननें सूचना करावयाच्या आहेत. दुष्काळाबरोबर येणाऱ्या साथी व रोग ह्यांच्या निवारणार्थ औषधपाण्याची व वैद्यकीय सहायाची काय तरतूद करावी हाहि सदरहु कमिशननें करावयाच्या शिफारशींचा विषय आहे. सरकारनें कमिशनच्या चौकशीचें क्षेत्र ह्याहिपेक्षां अधिक विस्तृत केलें आहे त्याकडे लक्ष वेधणें आवश्यक आहे. दुष्काळांत अन्नपुरवठा व रोगनिवारण ह्यांची व्यवस्था कशी असावी ह्याच मुख्य बाबी चौकशीसाठी कमिशनकडे सोपवल्या असत्या तर काम भागलें असतें असें सामान्यतः वाटण्यासारखें आहे. पण जे दोन विषय एवढ्या स्वतंत्र कमिशनकडे सोपवण्याजोगे होते तेहि प्रस्तुत चौकशीच्या क्षेत्रांत दाखल करण्यांत आले आहेत. ते म्हणजे जनतेच्या मामुली अन्नांत सुधारणा करण्याची आणि धान्याच्या उत्पादनांत वाढ व त्यांच्या सकसपणांत वृद्धि होण्याची शक्यता ह्या त्या बाबी होत. हे विषय अत्यंत जिव्हाळ्याचे आहेत ह्यांत शंका नाहीं, पण त्यांची भूमिका दुष्काळी परिस्थितीवरील उपायांपेक्षां सर्वस्वी भिन्न आहे. ह्या रीतीनें दुष्काळ चौकशीच्या क्षेत्राच्या विस्तार करण्यांत आला असतां त्यास अनुसरून कमिशनची घटना आणि त्याच्या कार्याची पद्धति ह्यांची व्यवस्था होणें अगत्याचें आहे हें उघड आहे.

जर्मनीचा कोंडमारा

मित्रराष्ट्रांचा जर्मनींत तीन चार दिशांनीं घेरण्याचा डेव वशस्वितेच्या मार्गास आतां लागला आहे असें युरोपियन रणक्षेत्रांवरील हालचालींवरून म्हणावयास हरकत नाहीं. फ्रान्स

देशांत नॉर्मंडीमध्यें ब्रिटिश व अमेरिकन फौजा उतरून त्यांनीं शेरबुर्ग द्वीपकल्प बहुतेक व्यापलें आहे. ह्याच सुमारास रशियानें पूर्व आघाडीवर, क्रिमिअंमध्यें उत्तरेकडे विजयी टप्पा चालू असतांनाच जर्मनीवर नवे हल्ले चढवण्यास प्रारंभ केला आहे. इटलींत मित्रराष्ट्रांची प्रगति सारखी चालली आहेच. ह्या रितीनें तीन आघाड्यांवर जर्मनीस एकाच वेळीं टक्कर द्यावी लागत आहे आणि त्यांचें सामर्थ्य विभागून गेलें आहे. प्रत्येक आघाडीवर आणि विशेषतः शेरबुर्ग द्वीपकल्पांत शत्रु त्यावर आलेल्या संकटास तोंड देण्याची शिकस्त करीत आहे पण त्यास समुद्रापर्यंत सारखें हटावेंच लागलें आहे. ब्रिटिश व अमेरिकन विमानांच्या जर्मनी व शत्रुव्याप्त प्रदेश ह्यांवर होणाऱ्या हल्ल्यांत खंड पडलेला नाहीं. ह्या परिस्थितींतच स्वदेशाभिमानी फ्रेंचांची मित्रराष्ट्रांस चांगली मदत होत आहे. अशा रीतीनें शत्रू चोहोंकडून घेरला गेला असतां त्यानें इंग्लंडवर हवेंतून उडणारे बॉंब पाठवण्याचा क्रम आरंभला आहे. हें शत्रूचें नवें हत्यार विध्वंसक आहे ह्यांत संशय नाहीं पण त्याचे योगानें फ्रान्समध्यें चाललेल्या ब्रिटिश व अमेरिकन चढाईंत व्यत्यय येईल अशी जर्मन सेनापतीची कल्पना असल्यास तिचा फोलपणा लवकरच प्रत्ययास येईल. ब्रिटिश जनतेनें भयंकर जर्मन बॉंबहल्ल्यांस मार्गे तोंड दिलें आहे आणि सारथीविहीन विमानांचाहि समाचार घेतला जाईल. फ्रान्समधील अमेरिकन व ब्रिटिश चढाईचा लोंढा कांहीं झालें तरी शत्रूस मार्गे लोटतां येणार नाहीं हें निश्चित आहे. तीन-चार रणांगणांवर जर्मन फौजांची पीछेहाट चालली आहे ती प्रत्यक्ष दिसत असल्यानें जर्मन जनतेचा धीर सुटत आहे तो असल्या युक्त्यांनीं कसा सांवरला जाणार!

मुंबई प्रांतांतील सहकारी चळवळ

अहवालाचे वर्षीं सोसायट्यांच्या संख्येंत १९१ ची भर पडून ती ५,६०३ झाली. नव्या सोसायट्यांपैकी थ्रिफ्ट, क्रेडिट व मल्टिपर्पज सोसायट्या ८७ होत्या. नव्या २४ पर्चेस व सेल सोसायट्याहि स्थापन झाल्या. युद्धजन्य परिस्थितीमुळें कंझूमर्स सोसायट्यांचे स्थापनेस चालना मिळून ६९ कंझूमर्स सोसायट्या नोंदण्यांत आल्या.

शेतकी पतपेढ्यांची संख्या वर्षअखेर ३,८९७ भरली. त्यांच्या स्वतःच्या भांडवलांत, म्हणजे वसूल भाग भांडवल, समासदांच्या ठेवी, रिझर्व्ह व इतर फंड ह्या सर्वांत मिळून ५½ लक्ष रुपयांची वाढ झाली. कर्जे देणाऱ्या संस्थांकडील पतपेढ्यांची बाकी १४¾ लक्ष रुपयांनीं कमी झाली व त्यांच्या सेळत्या भांडवलांत ९ लक्ष १४ हजार रुपयांची घट झाली. वसुलीची रकम त्यापूर्वीच्या वर्षीच्या वसुलीपेक्षा १८ लक्ष ४२ हजार रुपयांनीं अधिक भरली. मिश्र सोसायट्यांच्या कारभारांत बरीच प्रगति झाली आहे. ह्या सोसायट्यांच्या कार्यक्षेत्राचे भागास ॲग्रिकल्चरल डेटर्स रिलीफ ॲक्ट लागूं करण्यांत आला असल्याकारणानें तेथें कर्जमागणी वाढत्या प्रमाणावर येत आहे व सोसायट्यांच्या समासदांची संख्या, स्वतःचें भांडवल, ह्या सर्वांचे आंकडे वाढत आहेत. एकूण ७९ मल्टिपर्पज सोसायट्यांनीं आपल्या समासदांस ७½ लक्ष रुपयांचा माल पुरविला व त्यांच्या १३½ लक्ष रुपये किंमतीच्या मालाची विक्री केली आणि २६,४४७ रुपये कमिशन मिळवलें.

सुपरव्हिजनची नवी पद्धत अहवालाचे वर्षी अमलांत आली परंतु ह्या योजनेची आर्थिक परिस्थिति विशेष समाधानकारक नाहीं. सुपरवायझिंग युनियन्सचें उत्पन्न सोसायट्यांचें सेळतें भांडवल व त्यांचेकडील बँकांचीं कर्जे ह्यांवर अवलंबून असतें, परंतु ह्या दोन्ही बाबतींत चांगल्या वसुलीमुळें घट दिसून येते. ह्या उलट, महागाई भत्ता, प्राव्हिडंट फंड, इत्यादि कारणांमुळें सुपरव्हायझिंग युनियन बोर्डाचे खर्च मात्र वाढले आहेत.

प्रांतिक सहकारी लँड मॉर्गेज बँकेचें वसूल भांडवल ४ लक्ष ९२ हजारांचें ४ लक्ष ९९ हजार रुपये झालें. बँकेनें २९८ अर्जदारांना ३ लक्ष ९७ हजारांचीं कर्जे दिलीं, तीं बहुतेक जुन्या कर्जफेडीसाठींच होतीं. प्राथमिक जमीन गहाणाच्या बँकांची संख्या १७ ही कायम राहिली. त्यांच्या वसूल भांडवलांत ८,९१२ रुपयांची वाढ होऊन तें ३ लक्ष ६२ हजार रुपये झालें. मुद्दलाची व व्याजाची वसुली अनुक्रमें ३ लक्ष, ८३ हजार रुपये व २ लक्ष १२ हजार रुपये अशी झाली. येणें कर्जाचा आकडा ७ हजार रुपयांनीं कमी होऊन तो ३३ लक्ष, २४ हजारांवर आला.

मुंबई प्रांतिक सहकारी बँकेकडील ठेवींत पुष्कळच वाढ झाली. येथें कर्जांत वाढ झाली तरी जुन्या कर्जांची वसुली चांगली झाली. पिकांच्या विकीस लागणाऱ्या कर्जाच्या व्यवस्थेसाठीं मध्यवर्ती बँकांस रिझर्व्ह बँकेकडून सवलत मिळवून देण्याचें महत्त्वाचें कार्य प्रां. स. बँकेनें केलें. जिल्हा सेंट्रल बँकांची संख्या ११ कायम होती व त्या सर्वांनीं नफा दाखविला. त्या सर्वांच्या ४ कोटि २३ लक्ष रुपयांच्या एकूण सेळत्या भांडवलापैकीं ९१ लक्ष, ११ हजार रुपये सोसायट्यांकडे कर्जाऊ होते; गेल्या वर्षाअखेर हा आंकडा ८६ लक्ष, ४२ हजार रुपये होता. अनधिकृत थकबाकीचें कर्जाशीं प्रमाण ३०·३% वरून २·५% वर आलें. बिगर शेतकी क्रेडिट सोसायट्यांची संख्या ७५३ वरून ७७१ वर गेली व त्यांचें सेळतें भांडवल ६ कोटि, ९० लक्ष रुपयांचें ८ कोटि, ३५ लक्ष रुपये झालें. २० हजारांपेक्षां जास्त भाग भांडवल असणाऱ्या अर्बन बँकांची संख्या ६४ ची ७१ झाली. एकट्या अर्बन क्रेडिट सोसायट्यांचेंच सेळतें भांडवल ४ कोटि ४४ लक्ष रुपये आहे. अर्बन बँकांचें कार्य लहान व्यापारी व कामकरी ह्यांस उपयुक्त ठरलें आहे. अहवालाचे वर्षी अर्बन बँका व सोसायट्या ह्यांनीं नियंत्रित केलेला व न केलेला माल सभासदांस पुरविण्याचें काम केलें. प्रांतिक सहकारी इन्शुअरन्स सोसायटीनें अहवालाचे वर्षी २३ लाखांचे विमे उतरले. तिचा विमास्वातीं फंड १६ लक्ष, २८ हजारांवर गेला. कंझूमर्स सोसायट्यांची संख्या ३८ ची १०६ झाली व त्यांनीं ४५ लक्ष, ३५ हजार रुपये किंमतीच्या मालाची विक्री केली.

अहवालाचे वर्षी ४ हौसिंग सोसायट्या नोंदण्यांत आल्या व २ गुंडाळण्यांत येऊन हौसिंग सोसायट्यांची संख्या १०७ झाली. बांगड्या करणें, मधमाशा पाळणें, पायतणें करणें, इत्यादींच्या सोसायट्यांची प्रगति बरी झाली. विणकर सोसायट्या ह्याच उत्पादक सोसायट्यांत महत्त्वाच्या आहेत, परंतु त्यांची आर्थिक परिस्थिति अद्याप ताळ्यावर आलेली नाहीं.

एकंदरीनें पहातां, अहवालाच्या वर्षांतील सहकारी चळवळीची प्रगति समाधानकारक समजली पाहिजे. वाढलेल्या बाजारभावामुळें शेतीच्या उत्पन्नांत भर पडली त्या कारणानें व इतरहि कांहीं उपाययोजनांमुळें पतपेढ्यांची वसुली सुधारली. शेतीच्या मालाची सहकारी पद्धतीनें विक्री व्हावी ह्याचा प्रयत्न चालू आहे व लवकरच उत्पादनासाठी भांडवल पुरवठा व विक्री ह्यांची चांगली सांगड घातली जाईल, अशीं चिन्हें दिसत आहेत.

मुद्रण-प्रकाशन धंद्यावर आघात

(लेखक–श्री. वि. अ. पटवर्धन, पुणें).

हिंदुस्तान सरकारनें पेपर कंट्रोल (एकॉनॉमी) ऑर्डर ता. १२ जून रोजीं प्रसिद्ध करून त्याची अंमलबजावणी तात्काळ सुरूं होणार असल्याचें प्रसिद्ध केल्यानें मुद्रक, पुस्तकांचे प्रकाशक, नियतकालिकांचे प्रकाशक यांच्यामध्यें भयंकर खळबळ उडून गेली असून हे धंदे सफा बुडणार अशी भीति सर्वत्रांस वाटावयास लागली आहे. कागदाचा वापर काटकसरीनें व्हावा हा या हुकूमाचा उद्देश असून त्याच्या परिपूर्तिसाठीं मुद्रकांनीं सन १९४३ मध्यें जेवढें काम केलें असेल, त्याच्या शें. ३० टके फक्त छपाईचें काम केलें पाहिजे असा निर्बंध घालण्यांत आला असून शालेय पुस्तकांच्या प्रकाशकांनीं सन १९३९ च्या (तेव्हां ज्यांचा धंदा नसेल, त्यांनीं सन १९४३ च्या) निम्यानेंच छपाई फक्त केली पाहिजे असा दंडक घालण्यांत आला आहे. सरकारमान्य अगर विद्यापीठ मान्य अशी ज्यांची शालेय अगर कॉलेजांतील क्रमिक पुस्तकें नसतील, त्या प्रकाशकांनीं १९४३ च्या शें. ३० टके छपाई केली पाहिजे असें या हुकूमांत म्हटलें आहे. या कडक हुकूमाचे दुष्परिणाम काय होतील याची थोडीशी जरी कल्पना हिंदुस्थान सरकारास असती, तर असला व्यवहारशून्य आणि विद्यार्थ्यांच्या शिक्षणक्रमांत धोंड आणणारा हुकूम सरकारनें काढला नसता. या हुकूमाची काटेकोर अंमलबजावणी जर झाली, तर शेंकडा ३०।४० टके विद्यार्थ्यांना पुस्तकाशिवाय आपला अभ्यास करावा लागेल; आणि असा अभ्यास होणें किती अवघड आहे हें सहजीं लक्षांत येणार आहे. शिक्षणाच्या वाढत्या प्रसारास पायबंद घालण्याचें श्रेय या हुकूमास मिळणार असून कागदाच्या काटकसरीच्या नांवाखालीं राष्ट्रीय नुकसान किती होईल याचा विचार हा हुकूम काढण्याचे वेळीं सरकारास सुचूं नये हें आश्चर्य होय. शैक्षणिक पुस्तकाव्यतिरिक्त इतर प्रकाशन गेल्या वर्षीच्या शें. ३० टके इतकेंच केलें पाहिजे असें बंधन आहे. या निर्बंधामुळें सर्वसामान्य जनतेच्या बौद्धिक जीवनांत फार मोठें खिंडार पडणार आहे. आणि मुद्रणालयांनीं व प्रकाशकांनीं एकूण वर्षांत जो कागद या हुकूमाखालीं वापरावयाचा असेल, त्याचा एक बारांश हिस्सा फक्त प्रतिमासीं वापरला पाहिजे, जास्त वापरून चालणार नाहीं. एकाद्या मुद्रणालयानें अगर प्रकाशकानें गतवर्षी जर ६० टन कागद खर्च केला असेल, तर त्यांस या हुकूमानें यापुढें वर्षांस १८ टन कागद वापरावयास मिळणार असून त्यानें दरमहा फक्त दीड टनच कागद छापून स्वस्थ बसलें पाहिजे. प्रकाशकांस मात्र अशी सवलत ठेवण्यांत आली आहे कीं, दोनचार महिन्यांचा अगर जास्त मुदतीचा कागद ठरलेल्या मुदतीच्या आंत कागद नियंत्रक अधिकाऱ्याची परवानगी घेऊन वापरतां येईल. पण मुद्रकांस मात्र तशी परवानगी मागण्याची सवलत ठेवलेली नाहीं. प्रकाशक व मुद्रक यांचे धंदे परस्परावलंबी असल्यानें एकाचा प्रकाशकास परवानगी देऊन व्यवहारांत ती निरुपयोगीच ठरूं शकेल. मुद्रकाला जर ठराविक प्रमाणाच्या बाहेर छापण्याची परवानगी नसेल, तर तो प्रकाशकाचें पुस्तक तरी कसें छापून देऊं शकेल ! अशाच तऱ्हेचें बंधन स्टेशनरी मालाच्या कारखानदारांवर घालण्यांत आलेलें आहे. मुद्रण, प्रकाशन व स्टेशनरी मालाचा कारखाना हे हंगामी स्वरूपाचे आहेत. त्यांना थोडेंबहुत कांहीं महिन्यांत जास्त कामाचा उठाव करावा लागत असतो. शिक्षणसंस्थांचे नवीन वर्ष सुरूं होण्याचे पूर्वी दोनतीन महिने मुद्रक, प्रकाशक, स्टेशनर्स यांना शिक्षणसंस्थांना लागणाऱ्या कामाव्यतिरिक्त इतर काम करण्यास फुरसत असूं शकत नाहीं. ही वस्तुस्थिति दृष्टीआड करून सरकारनें प्रतिमासीं एकवारांश कागद वापर करण्याची अट घालण्यांत आपल्या परिस्थितीच्या अज्ञानाचें कॅलिब्रेशन प्रदर्शन केलें आहे. प्रकाशकांनीं ज्या कांहीं योजना केल्या असतील, अगर मुद्रकांनीं जीं कामें अंगावर घेतलीं असतील, तीं पुरी करण्यास लागणारा योग्य अवसर त्यांना सरकारनें द्यावयास पाहिजे होता. या हुकूमाचा प्रकाशनकाळ व त्याच्या अंमलबजावणीचा काळ यांमध्यें दोन तीन महिन्यांचे तरी अंतर असावयास पाहिजे होतें. मुद्रक व प्रकाशक यांच्यावर यांनीं आपल्या गिऱ्हाईकांना दिलेलीं वचनें पुरीं करण्याचें एक नैतिक बंधन असतें. पण सरकारच्या लक्ष्यांत ही साधी गोष्ट सुद्धां आली नाहीं, इतकी घिसाडघाई सरकारला झाली होती.

वृत्तपत्रीय (न्यूज प्रिंट) कागदाव्यतिरिक्त इतर कागदावर जीं मासिकें, नियतकालिकें छापलीं जातात, त्यांचीं पानें शें. ३० टके ठेवावीत असें सरकारनें या हुकूमाच्या एका कलमांत म्हटलें आहे. ज्या मासिकाचीं पानें पूर्वी ५० असतील तीं यापुढें फक्त १५ पानांत संपविलीं पाहिजेत. एवढ्याशा तुटपुंज्या जागेंत जाहिराती व मजकुराचीं पानें किती यावयाचीं हा अवघड प्रश्न नियतकालिकांच्या पुढें राहील. मासिकाची वर्गणी आणि अंकांत असणारीं वाचनीय पानें यांचें प्रमाण व्यस्त पडल्यानें सरकारी हुकूमाचा परिणाम हीं मासिकें अवळजवळ नामशेष होण्यांत होणार आहे. वाङ्मयदृष्ट्या ही फार मोठी हानि हें तर खरेंच, पण त्याशिवाय मोठें नुकसान म्हणजे सर्वसामान्य जनतेचें वाचनाचें प्रमुख साधन नष्ट होणार हें होय.

या पेपर कंट्रोल (एकॉनॉमी) ऑर्डरीनें कागदाची बचत होईल हें खरें; पण त्याची किंमत जनतेला किती मोठ्या प्रमाणांत यावी लागणार आहे ! नियतकालिकें, शालेय व इतर प्रकाशन, आणि मुद्रणालयांचा धंदा रसातळास नेऊन कागदाची बचत सरकार करणार आहे.

रस्त्यांच्या कार्यक्रमासाठी यंत्रसामुग्रीची आयात

हिंदुस्थानांत रस्ते करण्याच्या ४½ अब्ज रुपयांच्या कार्यक्रमास लागणाऱ्या यंत्रसामुग्रीचा विचार करून, वेळेवर ती हातीं यावी म्हणून विलायतेंत ऑर्डरी देण्याकरितां एक कमिटी नेमण्यांत येणार आहे.

मद्रास प्रांतांतील रस्त्यांची योजना

रस्त्यांच्या अखिल भारतीय योजनेच्या प्रांतिक भागासंबंधीं तपशीलवार इतर प्रांतिक सरकारांप्रमाणें मद्रास सरकारहि मध्यवर्ती सरकाराकडे लवकरच पाठवील. या योजनेनुसार मुंबई प्रांतांत १८ हजार मैल लांबीच्या रस्त्यांची भर पडेल, एकूण ३५ कोटि रुपयांच्या खर्चापैकी २५ कोटींचा विनियोग विद्यमान रस्त्यांच्या सुधाराईकडे व प्रत्येकीं ५ कोटि नव्या रस्त्यांकडे व पुलांकडे खर्ची पडतील आणि सर्वंद योजना १० ते १५ वर्षांत पुरी होईल असा आजचा अंदाज आहे.

सहकारी सेल सोसायट्यांची परिषद

पूर्व खानदेश डिस्ट्रिक्ट बोर्ड ऑफ सुपरवायसिंग युनियन्सच्या एज्युकेशन कमिटीच्या विद्यमानें पूर्व खानदेश जिल्ह्यांतील सहकारी सेल सोसायट्यांची परिषद तारीख २३-४-४४ रोजी वडगांव बुद्रुक पेठा वडगांव जिल्हा पूर्व खानदेश येथें भरविण्यांत आली. परिषदेचें कामकाज दुपारीं ३ वाजतां सुरूं होऊन तें आटोपावयास संध्याकाळचे ७ वाजले होते.

परिषदेस सेल सोसायट्यांतर्फे १५ प्रतिनिधी, बहुतेक सर्व सेल सोसायट्यांचे सेक्रेटरी व प्रमुख पुढारी हजर होते.

पूर्व खानदेश जिल्ह्याचे असि. रजिस्ट्रार श्री. एस. व्ही. मीर यांनीं परिषदेस आलेले शुभ संदेश वाचून दाखविले. त्यानंतर स्वागताध्यक्ष श्री. अजबसिंग लालसिंग पाटील यांचें भाषण झालें. श्री. नथूसिंग हरसिंग पाटील यांनीं अनुमोदन दिलें.

मे. कलेक्टरसाहेबांनीं भाषण करून या जिल्ह्यांत सहकारी चळवळीचें काम चांगलें चाललें आहे असा उल्लेख करून या चांगल्या चळवळीचा प्रसार करा व चळवळीमध्यें चांगलीं माणसें निवडून घ्या असा कळकळीचा उपदेश केला. त्यांच्या भाषणानंतर श्री. मीर यांनीं जिल्ह्यांतील सेल सोसायट्यांचें कार्य, त्यांची उपयुक्तता व महत्त्व याबद्दल माहितीपूर्ण असें प्रास्ताविक भाषण केलें.

अध्यक्ष श्री. भास्करराव जाधव यांचें भाषण

यानंतर अध्यक्ष श्री. भास्करराव जाधव यांनीं आपल्या भाषणांत बहुजन समाजाचें कल्याण करणारी अशी ही सहकारी चळवळ असल्यामुळें त्यांत सर्वांनीं भाग घ्यावा असें सुचविलें. या चळवळींत भांडवलाला महत्त्व नसून व्यक्तीला महत्त्व आहे म्हणून श्रमजीवि शेतकरी व मजूर यांनाही यांत इतरांप्रमाणेंच सारखा वाव आहे. विशेषेंकरून सुरत पद्धतीच्या सेल सोसायट्या या खऱ्या सहकारी तत्त्वावर चालणाऱ्या संस्था आहेत. त्यांत सर्व शेतकऱ्यांनीं सामील होण्यांत त्यांचा फार फायदा आहे. शेतकऱ्यांच्या अडाणीपणाचा फायदा घेऊन त्यांच्या मालाची विक्री करतांना लूट करून आपलें जीवन चालविणाऱ्या वर्गाकडून सेल सोसायट्या व सहकारी चळवळ या विषयींचे गैरसमज पसरविले जातात त्यामुळें स्वतःची दिशाभूल करून घेऊन या चळवळीपासून दूर राहूं नये अशी त्यांनीं सर्व शेतकरी समाजास कळकळीची विनंती केली.

नुसत्या मागण्या करून कांहीं मिळत नसतें व तें योग्यही नसतें. लोकांनीं आपणांस मान द्यावा असें ज्यास वाटत असेल त्यांनीं त्या मानासाठी आपली लायकी सिद्ध केली पाहिजे. शेतकऱ्यांनीं स्वावलंबन, स्वाभिमान बाळगून आपली प्रगति करण्यास झटलें पाहिजे. आपण स्वतः कांहीं तरी कार्य केल्याशिवाय प्रत्यक्ष परमेश्वर देखील मदत करीत नाहीं. म्हणून प्रत्येकानें झटून प्रयत्न केले पाहिजेत व निश्चित जबाबदाऱ्या अंगीकारून आपली सुधारणा घडवून आणण्याचे शक्य ते प्रयत्न आपणच केले पाहिजेत. असा त्यांनीं समारोप केला.

शेवटीं श्री. गुणवंतराव देशमुख श्री. मीरसाहेब आणि स्वागताध्यक्ष यांनीं समयोचित भाषणें करून अध्यक्षांचे व परिषदेस आलेल्या सर्व मंडळींचें आभार मानल्यावर परिषदेचें काम बरखास्त झालें.

परिषदेंतील ठराव

(१) ना. पंतलु यांच्या निधनाबद्दल खेदप्रदर्शन (२) रेल्वेकडून सवलती मिळण्याची विनंति (३) सरकारनें या जिल्ह्यांतील सुरत पद्धतीच्या कॉटन सेल सोसायट्यांची कपास खरेदी करावी. कपाशीचे किमान व कमाल भाव अनुक्रमें ४०० चे ५०० रु. व ५५० चे ६५० रु. करावे. (४) सुरत पद्धतीच्या कॉटन सेल सोसायट्यांच्या योजनेची मुदत ५ वर्षेपर्यंत वाढवावी. त्यांना जीन व प्रेस चालविण्याचे बाबतींत सरकारनें सढळ हातानें मदत करावी. (५) बॉबे को. मार्केटिंग सेल सोसायटीनें सेल सोसायट्यांना लागणाऱ्या शेतीच्या व घरगुती जिनसांची खरेदी करून द्यावी; बाजारभावाचे रिपोर्टस सोसायट्यांना पाठवावे व सेल सोसायट्यांच्या कार्याचे माहितीचा प्रचार करावा. सर्व सहकारी पतपेढ्या व त्यांची युनियन यांच्या मालाची विक्री व खरेदी सेल सोसायट्यामार्फतच केली जावी, या धोरणाची अंमलबजावणी व्हावी. (६) ठिकठिकाणीं केंद्रें काढून कंट्रोल केलेल्या वस्तू पुरवण्यासाठी सेल सोसायट्यांचा व पतपेढ्यांचा उपयोग करून घेण्यांत यावा. (७) पू. खा. मध्यवर्ती बँकेनें व्याजाचा दर कमी करून सढळ पैसे द्यावेत (८) नियंत्रित मार्केटस जिल्ह्याच्या महत्त्वाच्या ठिकाणीं उघडण्यांत यावींत (९) इं. सें. कॉ. कमिटीवर सुरत पद्धतीच्या कॉटन सेल सोसायट्यांचे निदान दोन प्रतिनिधी असावेत, (१०) शेंगांची पैदास वाढविण्यासाठी सरकारनें ग्राउंडनट सबसिडी फंडांतून सढळ मदत करावी. (११) सेल सोसायट्यांचे गोदाउन्स, जिनिंग, प्रेसिंग व ऑइल मिल्स यासाठी सरकारी जागा मोकळी असल्यास मोफत मिळावी व तिला इतरहि सवलती मिळाव्या. (१२) सरकारी योजनेंतील रेडिओ सेट्स आपल्या जिल्ह्यांतील सेल सोसायट्यांचे केंद्रांस द्यावेत. (१३) कॉटन सेल सोसायट्यांचे बाबतीमधील तारांचा ½ खर्च परत रिफंड मिळावा.

नगर बॉबे ट्रेडिंग कंपनी

चिनाब, लाइमज्यूस कॉर्डीअल, ऑरेंज व लेमन स्क्वॉश, टोमॅटो सॉस,
मँगो जॅम, मध, कोको, बेकिंग पावडर, सॅनिटरी टॉवेल्स,
टुथ पेस्ट, टुथ ब्रश, वगैरे मालाचे
रिटेल डिलर.

शाखा:— माणिक चौक, अहमदनगर

हेड ऑफिस:— पूना गेस्ट हाऊस, पुणें २

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' भांबुर्डा, घ. नं. १२७।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
(टपाल हंशील माफ)
किरकोळ अंकास
दोन आणे.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति। —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ☆ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष १० पुणें, बुधवार, तारीख ५ जुलै, १९४४ अंक २७

वघूं नका अंत भगवंता !

जेव्हां सत्याचा लोप झाला !
'न्याया'स धाब्यावर बसविलें, 'माणुसकी'ची भरचौकांत होळी पेटली,
खुनी पेशवा गादीवर बसूं लागला, तेव्हां रामशास्त्र्यांच्या
पत्नीनें केलेला हा "धांवा" स्वर्गाची कवाडे फोडून
"देवा"च्या कानांवर गेला ! खुनास वाचा फुटली ! !

शुक्रवारपासून सुरू झाला) प्रभात (किबे लक्ष्मी थिएटर पुणें (शुक्रवारपासून सुरू झाला

प्रभातचा प्रचंड प्रेक्षणीय ऐतिहासिक बोलपट

रामशास्त्री

निर्माते:—दामले-फत्तेलाल | दिग्दर्शक:—गजानन जहागीरदार

—: भूमिका :—

गजानन जहागीरदार, मीनाक्षी, ललिता पवार, गणपतराव,
मा. विठ्ठल, सुधा आपटे, अनंत मराठे, हंसा,
भागवत, मांजरेकर, मा. छोटु

दररोज तीन खेळ
पैकीं पहिला खेळ दु. ३। वा.
हिंदी बोलपट
व
नंतरचे दोन्ही खेळ
सायंकाळीं ६॥ व रात्रौ १०
वाजताचे
मराठी बोलपट

पुना गेस्ट हाऊस

१००, लक्ष्मी रोड, पुणें २.

Telephone 779

GUEST HOUSE

TELEGRAM Guest House Poona 2.

विविध माहिती

म्हैसूर संस्थानांतील रेल्वेजचें उत्पन्न

म्हैसूर संस्थानांतील सरकारी रेल्वेजमध्यें ६ कोटि, ९७ लक्ष रुपये भांडवल गुंतलेलें आहे. रेल्वेजकडून म्हैसूर सरकारास ४६½ लक्ष रुपये निव्वळ उत्पन्न मिळालें, म्हणजे गुंतलेल्या भांडवलावर ६·९३% व्याज सुटलें.

म्हशींच्या कत्तलीवर निर्बंध

मुंबई प्रांतांतील कत्तलखान्यांत दर आठवड्यास किती म्हशी मारल्या जाव्यात, याची कमाल संख्या सरकारनें ठरविली आहे. थाणें १९०, कुर्ला १६६, अहमदाबाद १५५, माळेगांव ९०, अशा म्हशी तेथील कत्तलखान्यांत मारण्यास परवानगी आहे.

लष्करी गाड्यांमुळें होणारे अपघात

मुंबई शहरांतील ट्रॅम्स व बसेस झांकर दररोज सरासरी तीन लष्करी गाड्या आदळून अपघात करतात, असा गेल्या तीन महिन्यांचा अनुभव आहे. ट्रॅम्सच्या मागून येऊन पुढें जाण्याचा प्रयत्न करणें, रस्त्याच्याकडे उभी असलेली वहानें व ट्रामगाड्या यांचेमध्यें आपली गाडी घालणें, चुकीनें दुसऱ्याच गिअरमध्यें गाडी टाकून ट्रॅम किंवा बसवर आदळणें, इत्यादि अपघाताची ठराविक कारणें आहेत. एक दुमजली बस नुकतीच अपघातांत सापडली, ती दुरुस्त होण्यास दोन महिने लागतील. त्या बसमधून दररोज एक हजार उतारूंचा प्रवास होत असे, म्हणजे वहातुकीच्या इतर साधनांवर इतका ताण सतत दोन महिने पडणार, असा अर्थ झाला.

प्रीमिअर मोटर्स लि.

मोटारींच्या उत्पादनासाठीं वरील नांवाची १० कोटि रुपये अधिकृत भांडवलाची लिमिटेड कंपनी उभारण्यांत येत आहे, तिच्या डायरेक्टर बोर्डाचे शेठ वालचंद हिराचंद हे अध्यक्ष रहातील. श्री. तुळशीदास किलाचंद, श्री. घरमसी एम. खटाव, श्री. प्राणलाल देवकरण नानजी, सर घनजीशहा कूपर व श्री. लालचंद हिराचंद ही मंडळी बोर्डात आहेत. तूर्त २½ कोटि रुपयांचे भाग विकीस निघतील, ते सर्व देवकरण नानजी इन्व्हेस्टमेंट कं. लि. नें अंडरराइट केले आहेत.

दुभत्या जनावरांची शिरगणती

जनावरांस लागणारी वैरण, भुसा, सरकी, इत्यादींच्या रेशनिंगसाठीं मुंबई शहर आणि उपनगर यांतील दुभत्या जनावरांची शिरगणती करण्याचें काम २१ जून रोजीं सुरू झालें.

ओरिएंटल विमा कं. लि.

ओरिएंटल विमा कंपनीनें १९४३ सालीं १५ कोटि रुपयांचें काम पुरें केलें. १९४२ चे मानानें हा आकडा ५½ कोटींनीं मोठा आहे. प्रत्येक पॉलिसीची सरासरी रक्कम २,५९१ रुपयांची २,५८७ रुपये झाली. मृत्यूमुळें ७७ लक्ष रुपयांचे क्लेम आले. कंपनीच्या पैशावर ३·६८% (मुळांत प्राप्तीवरील कर कापून) व्याज सुटलें. नवीन गुंतवणुकीवर एवढें व्याज सुटणार नसल्याकारणानें कंपनीनें १ जुलैपासून आपल्या हप्त्यांचे दरांत थोडा बदल केला आहे. डिव्हिडंडचा दर (६२½%) कायम आहे.

'बँक ऑफ बरोडा'ची नवी शाखा

जळगांव येथें बँक ऑफ बरोडानें आपली एक शाखा उघडली आहे.

हिंदी घटना कायद्यांत दुरुस्त्या

१९३५ च्या हिंदी घटना कायद्यांत कांहीं किरकोळ दुरुस्त्या करणारें एक बिल पॉर्लमेंटच्या सभेंत मांडण्यांत आलें आहे. हायकोर्टाच्या तज्ज्ञांची सेवानिवृत्ति व एका हायकोर्टांतून दुसऱ्या हायकोर्टांत बदली या संबंधांतील कायद्यांत सुधारणा करण्यांत याव्यांची आहे. भारतमंत्र्याच्या सल्लागारांची संख्या आहे ती कमी करण्यांत याव्यांची आहे. व्हाइसरॉय व सर सेनापति हे सभ्यांच्या कायद्याप्रमाणें पांच वर्षांतून एकदा इंग्लंडला रजेवर जाऊं शकतात, ते यापुढें अधिक वेळा जाऊं शकतील.

जर्मनीच्या पूर्ण पाडावास अवधि आहे.

जर्मनी अति प्रबळ असून त्याचा पूर्ण पाडाव घडवून आणण्यास बराच काळ लागेल, असें आपलें वैयक्तिक मत असल्याचें कॅप्टन बाल्फर, अंडर सेक्रेटरी फॉर एअर, यांनीं कॉमन्स सभेंत नुकतेंच सांगितलें.

मुंबई प्रांताचे बाहेर कागद पाठविण्यास बंदी

हिंदुस्थान सरकारनें देशांतील प्रत्येक भागासाठीं कागदाचा वाटा ठरवून दिला असला तरी मुंबई प्रांतांतून बऱ्याच मोठ्या प्रमाणावर बाहेर कागद निर्गत होतो असें आढळून आल्यावरून, अशा निर्गतीस बंदी करणारा हुकूम मुंबई सरकारनें काढला आहे.

श्री. कस्तुरबा स्मारक फंड

श्री. कस्तुरबा स्मारक फंडासाठी २ ऑक्टोबरपर्यंत ७५ लक्ष रुपये जमविण्याचें योजिलेलें आहे, त्यांपैकीं आतांपर्यंत २० लक्ष रुपये जमा झाले आहेत.

आनंद येथें नवें शेतकी कॉलेज

आनंद (गुजरात) येथें एक शेतकी कॉलेज स्थापन करण्याकरितां शेठ मफतलाल गगलभाई यांनीं श्री. के. एम. मुनशी यांस ५ लक्ष रुपये देऊ केले आहेत. मुंबई सरकारचें त्यास सहाय्य लागेलच व त्यासंबंधांत प्रयत्न चालू आहेत.

रशियामधील रक्तदानाची व्यवस्था

रशियामध्यें सैनिकांसाठी रक्तदान करणारांत ९५% स्त्रियाच असतात. या रक्ताच्या कुपीवर तें देणारींचें नांव लिहिलेलें असतें त्यामुळें ज्या सैनिकास तें रक्त दिलें जातें, त्यास आपणांस पुनर्जन्म कोणी दिला, हें कळतें. अर्थातच, त्या दोघांमध्यें प्रेमसंबंध निर्माण होतो व त्यास सगळीकडे प्रसिद्धी दिली जाते व अशा रीतीनें रक्तदानाचा प्रचार करण्यांत येतो. रक्तांतरानें बरा झालेला सैनिक पुनः जखमी झाला, तर तो पूर्वीच्याच मुलीचें रक्त मागतो. रशियामध्यें रक्तदानाची व्यवस्था फारच उत्तम प्रकारची आहे. प्रत्येक केंद्रांत दररोज ८०० लोकांचें रक्त जमा करण्यांत येतें. रक्तदानाच्या मुख्य सात्यांचीं ७९ केंद्रें व १,५०० उपकेंद्रें आहेत.

डिफेन्स कर्जरोखे घेऊन युद्ध प्रयत्नास मदत

"हुंडयांच्या व्यवहारास उत्तेजन देणारी डिस्कौंट बँक ऑफ इंडिया ही पहिलीच सिंधी बँक आहे. हैदराबाद शाखेकडील १३ लाखांच्या ठेवींपैकीं १० लक्ष रुपये तिनें डिफेन्स बाँड्समध्यें गुंतविले आहेत व चालू वर्षांतील नव्या सिंधी शाखांमार्फत आणखी ५० लक्ष रुपये असेच गुंतविण्याची बँकेची अपेक्षा आहे. अशा रीतीनें बँक युद्धप्रयत्नास मदत करीत आहे."—डिस्कौंट बँक ऑफ इंडियाच्या हैदराबाद शाखेच्या उद्घाटनप्रसंगीं बँकेच्या मॅनेजिंग डायरेक्टरांनीं वरील प्रकारचे उद्गार काढले.

अनुक्रमणिका

	पृष्ठ		पृष्ठ
१ विविध माहिती ...	२१०	गिरण्यांच्या उत्पादनाचा यंत्रांवर परिणाम.	
२ हिंदी विमा व्यवसाय...	२११	५ वेस्टर्न इंडिया विमा कं.	२१४
३ शेअर बाजार ...	२१२	६ सह्याद्रि विमा कं. ...	२१४
४ स्फुट विचार	२१३	७ ट्रस्ट ऑफ इंडिया विमा कंपनी	२१४
अखिल भारतीय कृषिमंडळ–दुष्काळाची पुनरावृत्ति अशक्य करा–शेती सुधारणा–लॉर्ड वेव्हल यांची सूचना–		८ रेल्वेजवरील लाचलुचपतीच्या प्रकारांस फाटा	२१५

अर्थ

बुधवार, ता. ५ जुलै, १९४४

हिंदी विमा व्यवसाय

हिंदुस्थान सरकारचें १९४३ चें विमा वार्षिक नुकतेंच प्रसिद्ध झालें आहे, त्यांत हिंदुस्थानांतील १९४२ सालांतील विमा व्यवसायाची माहिती देण्यांत आली आहे. बहुतेक सर्व आयुर्विमा कंपन्यांना सध्या वाढतें काम मिळत आहे, त्याचें प्रतिबिंब ह्या वार्षिकांत दिलेल्या आंकड्यांतहि आढळतें, १९४१ सालीं १४ कोटि, ५३ लक्ष रुपये हप्ते देणारे २९१३ कोटि रुपयांचे १५,९२,००० विमे चालू होते; १९४२ अखेर चालू विम्यांची संख्या १६,६१,००० वर गेली व त्यांची एकूण किंमत ३२३ कोटि रुपये भरली. त्यांच्या वार्षिक हप्त्यांची बेरीज १६ कोटि, ६ लक्ष रुपये होती. १९४१ चे मानानें १९४२ सालीं नव्या कामांत ३ कोटींची वाढ होऊन तें ४२ कोटि, ८३ लक्ष रुपये झालें. त्यापैकीं हिंदी आयुर्विमा कंपन्यांच्या वांटणीस ३७ कोटि, ८९ लक्ष रुपयांचें काम आलें; १९४१ सालीं त्यांचा वाटा ३६ कोटि ६८ लक्ष रुपये इतका होता. म्हणजे, झालेल्या वाढींत विदेशी कंपन्यांनाच अप्रमाणबद्ध हिस्सा मिळालेला आहे.

१९४२ अखेर विमा खातीं फंड ७ कोटि, १५ लक्ष रुपयांनीं वाढून तो ७५ कोटि, ९४ लक्ष रुपये झाला. मुळांत वजा केलेला प्राप्तीवरील कर सोडला तर ह्या फंडावर सरासरीनें ३·९४% व्याज सुटलें. १९४१ सालीं ४·७५% व्याज सुटलें होतें. १९४३ सालासंबंधीं कित्येक प्रमुख कंपन्यांचे ताजे अहवाल पहातां व्याजाचा हा दर आणखी खालीं जात चालला असल्याचें स्पष्ट दिसतें. तथापि, व्यवस्थेचा खर्च उतरत चाललेला आढळतो. १९४१ चे मानानें १९४२ सालीं तो ०·७% नें उतरून २६·७% झाला. १९४२ सालांतील नव्या कामाची वाटणी खालीलप्रमाणें होती :—

		एकूण काम (रु.)	वार्षिक हप्ते (रु.)
हिंदी कंपन्या	१९४१—	३४ कोटि १४ लक्ष	१ कोटि ७७ लक्ष
	१९४२—	३६ कोटि ४७ लक्ष	१ कोटि ९१ लक्ष
विदेशी कंपन्या	१९४१—	५ कोटि ३७ लक्ष	३२ लक्ष
	१९४२—	६ कोटि ३६ लक्ष	३१ लक्ष
एकूण	१९४१—	३९ कोटि ५१ लक्ष	२ कोटि १० लक्ष
	१९४२—	४२ कोटि ८३ लक्ष	२ कोटि २२ लक्ष

विमा वार्षिकांत नव्या आयुर्विमा कंपन्या स्थापन करणारांस पुनः एकवार धोक्याचा इषारा देण्यांत आला आहे. अमेरिकेंत दर माणशीं विम्याची रकम एवढी प्रचंड आहे, इंग्लंडमध्यें ती इतकी मोठी आहे, परंतु हिंदुस्थानांत ती अत्यल्प आहे म्हणून ह्या देशांत नव्या विमा कंपन्यांच्या स्थापनेस पुष्कळ वाव आहे अशा अर्थाचें समर्थन कंपन्यांचे उत्पादक करीत असतात; परंतु दर माणशी उत्पन्नाचे तुलनात्मक आकडे मात्र ते लक्षांत घेत नाहींत. लोकांच्या आर्थिक परिस्थितींत बरीच सुधारणा झाल्याविना हिंदुस्थानांतील विम्याचें काम फारशी वाढ दाखवूं शकणार नाहीं, हें सर्वांनीं लक्षांत ठेवावें, असें सरकारी अॅक्चुअरी म्हणतात. युद्धसमाप्तिनंतर हिंदुस्थानांत औद्योगिक प्रगतीस जोराची चालना मिळून लोकांची ऐपत वाढेल, ह्या युक्तिवादास त्यांचें उत्तर असें आहे कीं, औद्योगिक प्रगति व लोकांच्या मिळकतींत वाढ हीं दोन्हीं बरोबरीनें जात नाहींत. त्यामध्यें बऱ्याच वर्षांची तफावत पडते असा अर्थशास्त्राचा सिद्धांत आहे. म्हणजे आज उद्योगधंदे ऊर्जितावस्थेस आले तरी, त्यांचें लोकांच्या आर्थिक परिस्थितींत प्रतिबिंब दिसूं लागण्यास कित्येक वर्षें लोटावीं लागतात. "युद्धानंतर अपेक्षित भरभराट अनुभवास आली नाहीं, तर विमा कंपन्यांना आपल्या अस्तित्वासाठी परस्पर स्पर्धा करावी लागेल व ज्या कंपन्या आज कशाबशा तोटा टाळूं शकत आहेत त्या बंदच पडण्याचा प्रसंग येईल" असें सरकारी अॅक्युअरीचें स्पष्ट म्हणणें आहे.

हिंदी आयुर्विम्याच्या व्यवसायाविषयीं सरकारी अॅक्युअरीनें काढलेले हे उद्गार विमा कंपन्यांच्या चालकांनीं लक्षांत ठेवले पाहिजेत. उतरलेला व्याजाचा दर आणि सरकारी रोख्यांतील सक्तीच्या गुंतवणुकीचें भारी प्रमाण ह्यांचे कचाट्यांत लहान व मध्यम आकाराच्या कंपन्या सापडल्या. त्यांतून तगून बाहेर पडणाऱ्या कंपन्यांस सरकारी अॅक्युअरीच्या इशाऱ्याची भीति बाळगण्याचें कारण नाहीं. तथापि, कांहीं कंपन्यांची दुःस्थिति इतर कंपन्यांवरहि दुष्परिणाम करते व व्यवसायाचा दर्जा खालीं आणते, ह्या दृष्टीनें प्रत्येक कंपनीसच सावधगिरीनें वागणें आवश्यक आहे. कांहीं कंपन्यांचे चालक नवीन भांडवल उभारून आपली चंगळ दीर्घ काळ टिकविण्याचा प्रयत्न करतात. नवीन भांडवलाची उभारणी केवळ चालकांच्या हिताची असून सामान्य जनतेचें त्यांत नुकसान आहे असें सरकारी अॅक्चुअरीचें मत झालें तर तो नव्या भांडवल उभारणीस पाठिंबा देणार नाहीं, असें त्यानें स्पष्ट म्हटलें आहे.

गिरण्यांच्या सुटीचे दिवस

विजेच्या पुरवठ्यावर पडणारा ताण नियंत्रित करण्याच्या उद्देशानें मुंबई शहर व उपनगर ह्यांतील सर्व गिरण्या एकाच दिवशीं बंद ठेवण्यांत येऊं नयेत; त्यांच्या सुट्टीचे दिवस वेगवेगळे असावेत, असें मुंबई सरकारनें योजिलें होतें. हा उपक्रम यशस्वी ठरला व सरकारनें १९४४ अखेर ती योजना चालू ठेवण्याचें आतां ठरविलें आहे.

शेअर बाजार

(श्री. व. वि. लोणकर, एम. ए., बी. कॉम.)

मागील दोन तीन दिवसांच्या हाउचाली पाहतां बाजार साळच्या भावांत स्थिरावत चालला आहे असें दिसून येईल. आठवड्यांत डांग १८५० वरून शुक्रवारीं १८८८-१२, कोहिनूर स्टील स्टी ५९२ वरून ६०६, सिंप्लेक्स २४० वरून २४९, स्वान ३१० वरून ३१४, स्वदेशी ५२२ वरून ५३८ मॉडेल २६३ वरून २७५ व विशेष नजरेंत भरेल अशा रीतीनें मोरारजी ६०५ वरून ६८५ असे गिरण्यांचे भाव आहेत. ब्रह्मदेशांतील प्रगतिमुळें बर्मा ४१० वरून ४१५, बर्मा कॉर्पोरेशन ४-८, बी. बी. पेट्रोल ३-६-६ असे मजबूत असून इतर विभागांतील टाटा केमिकल २६-९ वरून २९-८, टाटा ऑर्डिनरी ४१५-८ व डिफर्ड २२५२-८ व इंडियन आयर्न १८-९ असे स्थिर आहेत. टाट्यांचें ब्याज अजून गुप्तदस्तांतच असून बाजारांत 'जेटला माणस तेटली वाती' असा प्रकार आहे. जाणते लोक असें धरून चालत आहेत कीं मजूरवर्ग संतुष्ट राखण्याकरतां त्यांना प्रमाणापेक्षां जास्त बक्षिशी वाटण्यांत येऊन त्याचा परिणाम ब्याज कमी करण्यांत, मागील वर्षापेक्षा नफा वाढलेला असला तरी, अथवा जेमतेम आसपास कायम राखण्यांत होईल. या दृष्टीनें टाटा महाग वाटतात. कारण विचारी पैसे राखणारे डिफर्ड ऐनजिनशी २००० च्या आसपास पढाव असें पाहात असतात व सध्याच्या भावांत तेवढा पढणार नाहीं. बिर्ला मोटर व बाबुचंद शेटजींच्या प्रीमिअर मोटर कं. ना मरामर अर्ज जात असून आतांच त्यांचे वायदे सुरू झाले असून दोन्हींवर अनुक्रमे १ रु. व ४ रु. नजराणा सुरू झाला आहे. पहिल्याचे कमींत कमी शंभर अर्जासोबत प्र. रु. २।८ व दुसऱ्याचे प्र. पाचावरोबर प्र. रु. १० देणेचे आहे. पुण्यांत अर्ज नमुने मिळण्याची सोय आहे असें कळतें.

अद्दीकडे स्थानिक कंपन्यांच्या शेअरकडे मंडळींचें लक्ष जात असून त्यांच्या भावांबद्दल पुष्कळदां विचारणा होते. महाराष्ट्राच्या स्वतःच्या शेअरबाजाराच्या अभावीं निश्चित भाव मिळणें कठीण आहे व किरकोळ गांवांत सौदे होतात व कानी येतात त्यावरूनच अनुमान बांधावें लागतें. किर्लोस्कर ५५, ओगले ६३, असून महाराष्ट्र बँक ३० पर्यंत मागितले जात आहेत. कॉमनवेल्थ विमा ५० पर्यंत खपूं शकत असून, सेंट्रल को. बँक ५०-५२ पर्यंत घेतले जातात. स्थानिक बस कंपनीचे शेअर फक्त कंपनी काढणारांच्याच हातांत आहेत व ते कदापि बाहेर येतील असें वाटत नाहीं.

पंजाब सरकारची प्रचंड धरणाची योजना

जम्मू संस्थानाचे हद्दींत चिनाब नदीवर एक प्रचंड धरण बांधण्याची पंजाब सरकारची योजना आहे. ह्या धरणामुळें साठगारें पाणी ४० मैल आंतपर्यंत जाईल, धरणाच्या पाण्यावर निर्माण होणाऱ्या विजेचा उपयोग आजूबाजूच्या धातूंच्या खाणींच्या उत्पादनाकडे किफायतशीर होऊं शकेल.

आणखी एक टप्पा

१९४३ मधील नवीन काम एक कोटिहून अधिक

खर्चाचें प्रमाण तरीहि नेहमींप्रमाणेंच कमी

रद्द होणाऱ्या विम्याचें प्रमाणहि सर्व देशांत कमी

मोठाच गहिरा पुरावा—

(अ) एजंटांच्या बहारीच्या कामगिरीबद्दल व

(ब) विमेदारांच्या कंपनीवरील आदरणीय विश्वासाबद्दल

वेस्टर्न इंडिया विमा कंपनी, लि.

मुख्य कचेरी सातारा

पुणें शाखा : कर्वे बिल्डिंग लक्ष्मीरोड.

स्फुट विचार

अखिल भारतीय कृषिमंडळ

शेतीशीं संबंध असलेल्या कित्येक हिंदी धंद्यांचें नियमन करून त्यांत सुधारणा घडवून आणण्याच्या उद्देशानें निरनिराळीं प्रातिनिधिक मध्यवर्ती मंडळें स्थापण्यांत आलीं आहेत. कपास, ताग, चहा यांचे संबंधांत मंडळें आहेत, तसेंच एक मंडळ ऊस, गूळ व साखर यांचे बाबतींत स्थापन केलें जात आहे. उत्पादन, विक्री व किंमती यांचें नियमन करण्याच्या हेतूनें धंद्यांच्या प्रगतीविषयींचें धोरण ठरवणें हें या मंडळांचें मुख्य कार्य असतें. सबंद शेतीच्या धंद्यांत सुधारणा विविध रीतींनीं व्हाव्या यासाठी इंपीरिअल कौंसिल ऑफ ॲग्रिकल्चरल रिसर्च ही हिंदुस्थान सरकारच्या आश्रयानें काम करणारी मोठी मध्यवर्ती संस्था आहेच. तथापि, हिंदी पिकांचें उत्पादन वाढवण्याकरितां योजना आखल्या जात आहेत, त्यांच्यामध्यें निरनिराळ्या प्रांतांच्या संबंधांत एकसूत्री व मेळाचें धोरण अमलांत येणें अगत्याचें असल्यानें अखिल भारतीय शेतीमंडळ स्थापण्याचें निश्चित झालें आहे असें समजतें. सबंद हिंदुस्थानांत मिळून कोणतीं पिकें करणें इष्ट आहे आणि प्रांताप्रांतांतून तीं कोणत्या प्रमाणांत केलीं जावीं याचा अंदाज बांधून प्रत्येक प्रांत, जिल्हा, तालुका व खेडेगाव यांचेमध्यें त्यांची वाटणी व्हावी अशी कल्पना आहे. या कामासाठी प्रत्येक प्रांतांत एक समिति असावी आणि प्रत्येक जिल्ह्यासाठीहि उपसमिति स्थापन व्हावी अशीहि सूचना करण्यांत आली आहे. स्वदेशी धंदे आणि निर्गत व्यापार यांच्या गरजाहि उत्पादनाच्या योजना तयार करतांना हिशेबांत घेण्यांत येणार आहेत. हें सर्व कार्य बरेंच गुंतागुंतीचें आणि अवघड आहे यांत शंका नाहीं. कारण, पिकांचें उत्पादन वाढवतांना त्यांच्या किंमती शेतकऱ्यांस फायदेशीर होतील याविषयीं खबरदारी घेतली जाणें अगत्याचें आहे, एवढेंच नव्हे तर शेतीच्या विस्तारास लागणाऱ्या भांडवलाचा पुरवठा होण्याची तरतूद करावी लागेल. या प्रश्नाच्या महत्त्वाच्या दृष्टीनें शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा आणि त्यांस व्हावयाच्या अल्प व दीर्घ मुदतीच्या भांडवलाचा पुरवठा या बाबींचा विचार करण्यासाठी एक उपसमिति नेमण्यांत आली आहे आणि तिनें आपल्या शिफारसी तीन महिन्यांचे आंत कराव्यायाच्या आहेत. भिन्न भिन्न प्रांतिक परिस्थिति आणि विषयांचा विस्तार हीं लक्षांत घेतां ही उपसमिति काय सूचना करते तें पहावें.

दुष्काळाची पुनरावृत्ति अशक्य करा

बंगाल आणि हिंदुस्थानचे कांहीं इतर भाग यांचेमध्यें पडलेल्या दुष्काळानें आणि त्यानें घेतलेल्या लक्षावधी बळींनीं लोकांच्या मनास एवढा मोठा धक्का दिला आहे कीं असल्या आपत्तीची पुनरावृत्ति होऊं नये याविषयीं खबरदारी घेण्याची अगत्याची सूचना ब्रिटिश व हिंदुस्थान सरकारास करण्याची आवश्यकता देशांतील पुढाऱ्यांस भासली आहे. उद्योगधंदे व दुसरीं कार्यक्षेत्रें यांत वावरणाऱ्या सत्तावीस हिंदी पुढाऱ्यांनीं एक पत्रक प्रसिद्ध केलें आहे आणि त्यांत हिंदुस्थानास योग्य धान्यपुरवठा केला जाण्याचें अगत्य प्रतिपादलें आहे. अन्नपुरवठ्याविषयीं धोरण ठरवण्यासाठी नेमलेल्या वेगरी कमिटीच्या शिफारसींस अनुसरून सरकारनें धान्य आयात करून त्याची वाटणी जरूरीप्रमाणें करावी आणि अन्नाचा तुटवडा पडणार नाहीं अशी खबरदारी घ्यावी या आशयाची मुख्य सूचना त्या पत्रकांत आहे. येथील धान्यपुरवठ्याची परिस्थिति समाधानकारक आहे असें म्हणतां येणार नाहीं आणि पाउसपाणी अनिश्चित असून त्यांत थोडी कमतरता पडल्यास दुष्काळ आपलें ढोकें वर उचलील, यासाठी ब्रिटिश सरकारनें या देशांत धान्य बाहेरून आणण्याची व्यवस्था करावी असें पत्रकांत सुचवलें आहे. धान्याची आयात झाल्यावांचून हिंदुस्थानांतील उत्पादन लोकांच्या गरजांस पुरें होणार नाहीं ही गोष्ट स्पष्ट असतां त्यासंबंधांत अजून प्रयत्न झाले नाहींत याकडे ब्रिटिश पार्लमेंट व जनता आणि अमेरिका यांचें लक्ष हिंदी पुढाऱ्यांनीं वेधलें आहे आणि ब्रिटिश सरकारवर त्यांनीं आपलें नैतिक वजन पाडावें असें त्यांनीं म्हटलें आहे. युद्धपरिस्थितिजन्य वहातुकीच्या अडचणी असल्या तरी युद्धप्रयत्नांत हिंदुस्थानचें स्थान अत्यंत महत्त्वाचें आहे हें ध्यानांत बागवून ब्रिटिश मंत्रिमंडळानें या देशाच्या अन्नपुरवठ्याचा प्रश्न सोडवण्याची शिकस्त केली पाहिजे असें हिंदी पुढाऱ्यांचें सांगणें आहे आणि त्याचा ब्रिटिश सरकारावर योग्य तो परिणाम वेळींच होईल अशी आशा आहे.

शेती सुधारणा—लॉर्ड वेव्हल यांची सूचना

युद्धोत्तर काळांतील हिंदी शेतीच्या पुनर्घटनेविषयींच्या योजनेची चर्चा या संबंधांतील धोरण निश्चित करण्यासाठी नेमण्यांत आलेल्या समितीच्या सभेंत दिल्ली येथें नुकतीच झाली आणि तीमध्यें मूलभूत स्वरूपाचे कित्येक ठराव मान्य करण्यांत आले. या बाबतींत मध्यवर्ती कार्यकारी मंडळाचे सभासद सर जोगेंद्रसिंग यांनीं विस्तृत भाषण करून शेतीच्या सुधारणेचे उद्देश व कार्यक्रम यांचें वर्णन केलें. त्यांचे विचार आणि समितीचे ठराव यांचा मथितार्थ आतां सामान्यतः लोकांच्या परिचयाचा झाला आहे आणि त्यांमध्यें कांहीं नवीन व मुद्यांचें होतें असें दिसत नाहीं. हिंदी जनतेस भरपूर सकस अन्न खावयास मिळावें, तिची रहाणी उच्च दर्जाची व्हावी, शेतकरीवर्गाची प्राप्ती वाढावी, जमीन अधिक उत्पादक बनावी आणि तिच्यांत धान्यें व आवश्यक असा कच्चा माल मोठ्या प्रमाणांत तयार व्हावा, जनावरांची पैदास व निगा चांगली रहावी इत्यादि उद्देश सर्वमान्य आहेत. ते साध्य होण्यास मध्यवर्ती आणि प्रांतिक सरकार कोणते प्रयत्न करणार आणि ते केव्हां चालू होणार हें जाणण्याची उत्कंठा लोकांस लागली आहे. या दृष्टीनें व्हाइसरॉय, लॉर्ड वेव्हल, यांनीं उपरिनिर्दिष्ट सभेस पाठवलेल्या संदेशांतील एक सूचना विशेष व्यावहारिक व महत्त्वाची आहे. युद्धोत्तर पुनर्घटनेची योजना ठीक आहे, पण तिच्या कार्यक्रमापैकी कांहीं भाग युद्धकाळांत हातीं घेतला जाण्याचें अगत्य त्यांनीं प्रतिपादलें. सध्या खाद्य पदार्थांचें उत्पादन वाढवण्याचें अगत्य तीव्रतेनें भासत आहे. अशा वेळीं मोठ्या योजना, तज्ज्ञ व शिकलेल्या लोकांचा पुरवठा अशा साधनांच्या तयारीची वाट न पहातां झटपट व उपलब्ध असलेल्या सामुग्रीचा अधिकांत अधिक उपयोग करून घेणें सयुक्तिक आहे. शेतकरू व उत्साही तरुण शेतकऱ्यांस कामचलाऊ शिक्षण देऊन त्यांच्याकडून धान्य-पुरवठा वाढवण्याचे कार्यी साह्य घेण्याची सूचना लॉर्ड वेव्हल यांनीं केली आहे. तिची अंमलबजावणी प्रांतिक सरकारकडून कशी होते हें पहावें आहे. अन्न

पुरवठ्याचा प्रश्न इतका निष्ठाऊयाचा आहे की तो सोडविण्यासाठी शीघ्र फलदायी उपायांचा अवलंब केला जाणें आवश्यक आहे. अशा तऱ्हेच्या योजना मुंबई सरकार हातीं घेत आहे आणि म्हाइसरॉयांनीं सुचवल्याप्रमाणें काय करतां येईल याचा विचार त्याचेकडून होईल अशी अपेक्षा आहे.

कापूस कापडाच्या गिरण्यांचें उत्पादन व त्याचा यंत्रांवरील परिणाम

हिंदुस्थानांतील कपास कापडाच्या व सुताच्या गिरण्यांची संख्या ४०१ आहे व त्यांत १ कोटि चात्या व २ लक्ष माग आहेत. प्रथम सुताच्या गिरण्याच ज्यास्त होत्या, परंतु बाहेरील बाजारपेठांतील खप कमी झाल्याकारणानें मागांची संख्या वाढूं लागली. १८८९ मध्यें गिरण्यांतील चात्या व माग ह्याचें प्रमाण १९:१ असें होतें. तें आतां ५०:१ असें झालें आहे. १९१९-२० मध्यें हिंदी गिरण्यांत ४० नंबरांच्या वरच्या सुताचें उत्पादन फक्त ४० लक्ष पौंड झालें; १९४० मध्यें तें ८ कोटि, ९० लक्ष पौंडांवर गेलें, कारण तत्सम कापडाचा खप वाढला व परदेशी कापडाशीं टक्कर देणें हिंदी गिरण्यांस क्रमप्राप्तच झालें. चालू युद्धविषयक मागणीमुळें सर्व गिरण्या पुनः कमी नंबराच्या सुताचें कापड काढूं लागल्या आहेत. १९३७ सालीं प्रत्येक चौरस वार कापडाचें सरासरी वजन ३·३ औंस होतें, तें आतां ४·०१ औंस भरूं लागलें आहे. गिरण्यांतील सुताचें उत्पादनहि, त्याच्या वजनाचा विचार करतां, ४०% वाढलें आहे. ह्या सर्व गोष्टींमुळें गिरण्यांतील यंत्रसामुग्रीवर कमालीचा ताण पडत आहे व शक्य तेवढ्या लवकर नवीं यंत्रें बसविणें आवश्यक होणार आहे. गेल्या महायुद्धापासून गिरण्यांची एकसारखी वाढ होत राहिली आहे परंतु त्या युद्धानंतर नवी यंत्रसामुग्री बनविली गेली नाहीं, कारण त्या युद्धाचा गिरण्यांवर आतां इतका ताण पडला नाहीं व यंत्रेंहि २० वर्षांचींच जुनीं असल्याकारणानें तीं बऱ्या स्थितींत होतीं. गिरण्यांतील सध्याच्या यंत्रसामुग्रीपैकी बहुतेक यंत्रें ४० वर्षें काम देत आलीं आहेत व त्यांवर पडलेल्या कामाच्या ताणामुळें तीं युद्धानंतर किफायतशीर चालवितां येणार नाहींत. हिंदुस्थानांत यंत्रसामुग्री तयार होण्यास लागणारा सर्व कच्चा माल उपलब्ध असूनहि त्याचें उत्पादन अद्याप कोणीहि हातीं घेतलेलें नाहीं. ऑल इंडिया टेक्स्टाइल परिषदेच्या मुंबई येथील अधिवेशनांत वरील माहिती एका वक्त्यानें दिली.

वेस्टर्न इंडिया विमा कंपनीनें एक कोटीची मर्यादा ओलांडली

वेस्टर्न इंडिया विमा कंपनीच्या १९४३ च्या अहवालांतील सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे तिनें १९४३ सालीं १ कोटि, १४½ लक्ष रुपयांचें काम पुरें केलें, ही होय. भरभक्कम आयुर्विमा निधि, पेशाची किफायतशीर गुंतवणूक, खर्चाचें अल्प प्रमाण, उत्कृष्ट बोनस, रद्द होणाऱ्या कामाचें लहान प्रमाण, मोठाले गुप्त रिझर्व्ह ठेवण्याचें सावधगिरीचें धोरण, काटकसरीच्या कामाची परंपरा, इत्यादि सर्व बाबतींत वेस्टर्न इंडिया कंपनी अग्रेसर असतांनाहि त्या मानानें नव्या कामाचा आकडा कांहीं मर्यादेपलीकडे गेला नव्हता. काम मिळविण्याची चोख पद्धति हेंच त्याचें कारण होतें. ही चोख पद्धति कायम राखूनच एक कोटि रुपयांची मर्यादा आतां कंपनीनें ओलांडून ह्याहि बाबतींत आपलें उच्च स्थान सिद्ध केलें आहे. कित्येक विमा कंपन्यांच्या ताज्या मूल्यमापनांत तोटाच दिसून आला, परंतु वेस्टर्न इंडियाच्या १९४२ अखेरच्या मूल्यमापनांत व्याजाचा दर ४% ऐवजी ३½% धरूनहि पुरेसा वाढावा उरला व विमेदारांना १० रु. व ८ रु. बोनस मिळालें, ह्यावरून कंपनीची सुस्थिति दिसून येते. कंपनीकडे नव्या कामाचा ओघ १९४३ च्या पेक्षाहि अधिक वेगानें येत असून १९४४ च्या पहिल्या सहामाहींत १९४३ च्या पहिल्या सहामाहीच्या मानानें ९५% अधिक काम कंपनीस मिळालें आहे.

सह्याद्रि विमा कंपनी लि.

वरील कंपनीनें १९४३ सालीं १६½ लक्ष रुपयांचें काम पुरें केलें. १९४२ सालीं १२ लक्ष रुपयांचें काम पुरें झालें होतें. विमा खातीं फंडांत एका वर्षांत १½ लक्ष रुपयांची भर पडून तो २,४३,४२७ रुपये झाला आहे. सरासरी आयुर्विमानिधीवर व्याजाचा दर द. द. शे. ४·८ पडला. व खर्चाचें प्रमाण ११% नें कमी होऊन तें २८·५% वर आलें. आरंभापासून प्रचारकार्य, प्राथमिक खर्च, इत्यादींवर झालेल्या खर्चाची बाकी सुमारें १७½ हजार रुपये १९४३ सालीं पूर्णपणें खर्ची घालण्यांत आली. कंपनीनें अहवालाचे वर्षी बडोदें संस्थानांत कामास प्रारंभ केला. ह्या सर्व गोष्टींवरून कंपनीची प्रगति योग्य मार्गानें व चांगल्या तऱ्हेनें होत आहे, हें दिसून येतें. कंपनीच्या ताळेबंदांत देण्याचे बाजूस ९८,१९४ रु. भांडवल, २,४३,४२७ रु. विमाखाती फंड, १,१९,४११ कर्ज व ठेवी आणि जिंदगीचे बाजूस ९३,०१० रुपये मालमत्तेच्या तारणावर कर्जे, ७२,७६७ रुपये सोड किंमतीचे आंत विमापत्रकांवर कर्जे, २,७९,६१४ सरकारी रोखे, अशा प्रमुख बाबी आहेत. ३ जून रोजीं कंपनीची वार्षिक सभा झाली.

ट्रस्ट ऑफ इंडिया विमा कं. लि.

वरील कंपनीची नववी साधारण सभा ता. २५ रोजीं कंपनीचे अध्यक्ष, श्री. सरदार जगन्नाथ महाराज, ह्यांचे अनुपस्थितींत बॅरिस्टर एन. एम. पटवर्धन ह्यांचे अध्यक्षत्वाखाली भरली होती. कंपनीच्या अध्यक्षांचे छापील भाषणांत तिच्या प्रगतीचा आढावा घेण्यांत आला; तीवरून नवें काम, हप्त्यांचें उत्पन्न, विमा खातीं फंड, खर्चाचें प्रमाण, ह्या सर्व बाबतींत कंपनीची प्रगति होत असल्याचें दिसून येतें. रिन्युअल खर्चाचें प्रमाण १५% खालीं आणून तेथें तें स्थिरावण्याचा चालकांनीं निर्धार केला आहे. बजेटाबाहेर होणाऱ्या खर्चामुळें खर्चाचें प्रमाण १८% पेक्षा अधिक झालें, तर हा जादा खर्च डायरेक्टर व मॅनेजर आपल्या वेतनांतून भरून देणार आहेत. हप्त्यांचे दर वाढविणें इतर आयुर्विमा कंपन्याप्रमाणें ट्रस्ट ऑफ इंडियासहि, उतरत्या व्याजाच्या दरास तोंड देण्यासाठी अपरिहार्य झालें आहे. कंपनीनें आपल्या भागांचे सर्व कॉलचे पैसे मागवले आहेत व नवीन भागांची विक्री करतां यावी यासाठी भांडवलवाढीची परवानगी कंपनीनें सरकारकडे मागितली आहे. आयुर्विम्यास आगीच्या विम्याच्या व्यवहाराची जोड देण्याचा चालकांचा विचार दिसतो. कंपनीचे डायरेक्टर-मॅनेजर श्री. देशमुख ह्यांच्या प्रयत्नांमुळें कंपनीचा दर्जा वाढत आहे व तिचा आर्थिक पाया अधिकाधिक मजबूत होत आहे.

रेल्वेजवरील लाचलुचपतीच्या प्रकारांस आळा.

रेल्वेजची दक्षता : जनतेच्या सहकार्याची आवश्यकता

वरील विषयावर जी. आय. पी. व बी. बी. अँड सी. आय. रेल्वेजच्या अधिकाऱ्यांनीं खुलाशाचें एक पत्रक काढलें आहे, त्यांत "युद्ध परिस्थितीमध्यें इतर ठिकाणांप्रमाणें रेल्वेजवरहि लाचलुचपतीच्या वाढीची प्रवृत्ति निर्माण होणें अपरिहार्य आहे" अशी प्रारंभींच कबुली दिलेली आहे. पत्रक पुढें म्हणतें, "खोटेपणा आतां अर्थातच ज्यास्त फायदेशीर झाला आहे. नफेबाज व काळ्या बाजारांतील व्यापारी हे मोठमोठाली लालुच दाखवूं शकतात; शीततेच्या काळांत हें व्यवहार्य होत नाहीं. वांधिणींचा तुटवडा व उतारूंना अपुरी जागा, त्याचप्रमाणें अंमलांत असलेलीं वेगवेगळीं बंधनें हीं बेमुर्वत लोकांस लाचलुचपतीची संधी निर्माण करून देतात. हे प्रकार उघडकीस येण्याची भीति कमी झाली आहे, कारण देखरेखीचें मामुली काम करणारे लोक युद्ध-कार्यांत गुंतले आहेत किंवा आपल्या देशासाठीं लष्करांत दाखल झाले आहेत. कोर्टांत आणें किंवा चौकशींत वेळ घालवणें सच्चा माणसांस परवडत नाहीं आणि विश्वासार्ह पुराव्याखेरीज कायदा गुन्हेगारांस शासन करूं शकत नाहीं. ह्या परिस्थितीवर उपाय योजण्याचा रेल्वेजनीं शक्य तो प्रयत्न केला आहे व त्या पुढेंहि करतील.

१९४३ अखेर १५० प्रकरणांची चौकशी करण्यांत आली, त्यांपैकीं ८२प्रकरणें कोर्टांत नेण्यांत आलीं. ४५ प्रकरणांत शिक्षा झाल्या व १४ आरोपी दोषमुक्त ठरले. ३३ प्रकरणांत कोर्टाकडे जाणें युक्त नव्हतें, परंतु त्यांची खात्यामार्फतच चौकशी करून १४ नोकरांना नोकरींतून खालीं करण्यांत आलें. लाचलुचपतीच्या प्रकारांची चौकशी करण्याकरितां एका वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्याचे हाताखालीं अनुभवी रेल्वे नोकरांचा स्टाफ देण्यांत आला आहे व खटले चालविण्यासाठी दोन खास कोर्टें स्थापन करण्यांत आलीं आहेत. गैरमाहितीमुळें जनतेचें नुकसान होऊं नये, एवढ्या-साठी वांधिणींची वांटणी, माल पाठविण्याची व्यवस्था, उतारूंची जागा रिझर्व्ह करण्याची पद्धत, इत्यादि विषयीं माहिती वर्तमानपत्रें व जाहीर नोटिसा ह्यांचे द्वारां प्रसृत केली जाते. अर्थात, जनतेकडून हार्दिक सहकार्य मिळाल्याविना हे प्रयत्न फलदायी होणार नाहींत. अब्रूदार व्यापारी व कारखानदार हे जरी लाचलुचपतीच्या प्रकारांपासून अलिप्त राहिले, तरी युद्धपरिस्थितींत त्यांना तात्पुरते व कच्चे नोकर व दलाल नेमावे लागतात आणि ते ह्या प्रकारांचा अवलंब करण्यास तयार होतात. रेल्वे रिसीट, पार्सलाचें बिल, तिकीट, ह्यांवर लिहिलेल्या रकमपेक्षा जास्त रकम कोणीहि देऊं नये; बेकायदा बक्षीस देणारा व घेणारा हे दोघेहि दोषी असतात. लाचलुचपतीचे प्रकार रेल्वे अधिकाऱ्यांच्या नजरेस आणल्यानें व्यापाऱ्यांच्या स्वतःच्या हिताचें संरक्षण होतेंच; ह्याखेरीज युद्धप्रयत्नांसहि त्याची मदत होते."

दुसऱ्या आघाडीवरील सैनिक—हार्वि.

युरोपांत दुसरी आघाडी दोस्तांनीं ता. ६ जून रोजीं उघडली, तेव्हांपासून २० जून अखेर दोस्तांचे तेथे ४० हजार सैनिक कामास आले. त्यांतील अमेरिकनांची संख्या २४ हजार आहे. ह्याच मुद्दतीमध्यें जर्मनींचे ७० हजार सैनिकांचे हानी झाली.

दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

पुणें शहर

भांडवल :

(ता. ३१-५-४४ रोजीं)

अधिकृत व खपलेलें : रु. १०,००,०००
वसूल झालेलें : रु. ५,००,०००
रिझर्व्ह व इतर फंड : रु. १,०८,०००
एकूण खेळतें भांडवल : रु. ७५,००,००० चे वर

—: डायरेक्टर्स :—

श्री. धों. कृ. साठे, चेअरमन,
श्री. वा. पु. वर्दे, श्री. वा. गो. काळे, श्री. न. ग. पवार,
श्री. श्री. गो. मराठे, श्री. त्रिं. वि. रानडे, श्री. र. चिं. सोहनी,
श्री. फ. दो. पदमजी, श्री. मा. रा. जोशी,
श्री. म. वि. गोखले, श्री. वि. ह. देशमुख

: शाखा :

पुणें ४, दलाल स्ट्रीट, मुंबई, जळगांव, नागपूर.
बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

सी. व्ही. जोग
मॅनेजर

दि बँक ऑफ इंडिया लि.

[स्थापना : १९०६]

अधिकृत भांडवल ... ... रु. २,००,००,०००
वसूल झालेलें भांडवल ... ... रु. १,००,००,०००
रिझर्व्ह फंड ... ... रु. १,२१,००,०००

मुख्य कचेरी: ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

मुंबईमधील शाखा : बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

इतर शाखा : अहमदाबाद (भद्र, मुख्य ऑफिस), अहमदाबाद (एलिस ब्रिज शाखा), अहमदाबाद (स्टेशन शाखा), अमृतसर, अंधेरी (मुंबई शेजारीं), बांद्रे (मुंबई शेजारीं), कलकत्ता (क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्क्वेअर), जमशेदपूर, कराची, नागपूर (किंग्जवे), नागपूर (इतवारी बझार), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत, भुज (कच्छ).

लंडन एजन्ट्स : वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

डायरेक्टर्स : सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. (अध्यक्ष), श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के. नाईट; मि. ए. गेडिस; सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, जी. बी. ई., के. सी. आय. ई., मि. दिनशा के. दाजी; श्री. रामनिवास रामनारायण.

करंट डिपॉझिट अकाउंट्स :

दररोजच्या रु. १०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षां कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग्ज बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

ट्रस्ट व सेटलमेंट्समध्यें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते, सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

एजंट:—एच. व्ही. करीअप्पा

जिकडे तिकडे प्रशंसा

इमिटेशन दागिन्यांवर रासायनिक क्रिया करून खऱ्या सोन्याचा पत्रा चढविला जातो त्यामुळें दागिना केव्हांही खराब होत नाहीं, ही पूर्ण खात्री झाली. सोन्याचा पत्रा चढविलेल्या चार बांगड्या किं. आठ रु. गरजेस्तव दागिना परत करणें झाल्यास वर चढविलेल्या सोन्याचे सर्वच्या सर्व पैसे परत देऊं.

भट कं. सांगली, S. M. C.

भट कंपनी शाखा—बुधवार पेठ, पुणें २.

पुण्यांतील

आदर्श निवासस्थान व भोजनालय

छाया लॉजिंग व बोर्डिंग हाऊस

बुधवार चौक, पुणें २.

☆ नगर वाँवे ट्रेडिंग कंपनी ☆

चिनाब, लाइमज्यूस कॉर्डीअल, ऑरेंज व लेमन स्क्वॉश, टोमॅटो सॉस, मँगो जॅम, मध; कोको, बेकिंग पावडर, सॅनिटरी टॉवेलस टुथ पेस्ट, टुथ ब्रश, वगैरे मालाचे स्टॉकिस्ट.

शाखाः— माणिक चौक, अहमदनगर

हेड ऑफिसः— पूना गेस्ट हाऊस, पुणें २

स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

गिरगांव मुंबई नं. ४

महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

न्यू इंडिया इंडस्ट्रीज लि.

(Approved Re-traders and Approved Contractors)

२६ लॅमिंग्टन नॉर्थ, मुंबई ११.

अध्यक्षः—श्री. ग. स. मराठे, ॲक्चुअरी.

महाराष्ट्रांतील रबराचा प्रमुख कारखाना

★ गिरणीचे रोलर्स ★ रबरी हातमोजे ★ छापखान्यांचे रोलर्स

★ रीमोल्ड टायर्स ★ रबरी वॉशर्स ★ सॉलिड व्हील्स

व इतर रबरी माल तयार होतो.

पु. ग. मराठे

मॅनेजिंग डायरेक्टर.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२७।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
(टपाल खर्चासह माफ)
किरकोळ अंकास
दोन आणे.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष १० पुणें, बुधवार, तारीख १२ जुलै, १९४४ अंक २८

★ लटकती तलवार ! ★

गर्दन छाटली जाण्याचा संभव !

खुनी पेशव्यांना देहांत शासनाची शिक्षा फर्माविणाऱ्या रामशास्त्र्यांना पक्कें माहीत होतें कीं, आपल्या मानेवर राघोबाच्या क्रोधाची तलवार लटकत आहे. ती केव्हां आपली गर्दन छाटेल त्याचा नेम नाहीं ! पण

न्यायाकरितां—सत्याकरितां ते जिवावर उदार झालें !

शनिवार ता. ८ पासून २ रा आठवडा ! | प्रभात (किबे लक्ष्मी थिएटर) पुणें

प्रभातचा प्रचंड प्रेक्षणीय ऐतिहासिक बोलपट

—रामशास्त्री—

निर्माते:—दामले–फत्तेलाल | दिग्दर्शक:—गजानन जहागीरदार

—: भूमिका :—

गजानन जहागीरदार, मीनाक्षी, ललिता पवार, गणपतराव, मा. विठ्ठल, सुधा आपटे, अनंत मराठे, हंसा, भागवत, मांजरेकर, मा. छोटू

आ. १०, रु. १, रु. १।, रु. १॥। ह्या दरांचीं तिकिटें दररोज सकाळीं १० ते १२ रिझर्व्ह केलीं जातील.

आजपासून रोज तीनही खेळ
दु. ३।, सायं. ६॥, रा. १०
मराठी बोलपट
'रामशास्त्री'

सूचना:—प्रेक्षकांच्या खास सोयीकरतां केवळ त्यांच्याच खास आग्रहावरून— दररोज सायंकाळीं ४ ते ५ दुसऱ्या दिवसांच्या सर्व खेळांचीं वरच्या दरांचीं तिकिटें रिझर्व्ह केलीं जातात.

पुना गे[illegible] हाऊस

१००, लक्ष्मी रोड, पुणें २.

Telephone 779

TELEGRAM Guest House Poona 2.

विविध माहिती

काश्मीरचे महाराज

काश्मीरचे महाराज युद्ध मंडळाच्या बैठकीकरतां इंग्लंडला गेले होते हें प्रसिद्धच आहे. राजाच्या राज्याभिषेकाचे प्रसंगी ते पूर्वी गेले. तेव्हां त्यांनीं आपल्या बरोबर हिंदुस्थानांतून सहा मोटारी नेल्या होत्या. मोटारींवर "काश्मीर" म्हणून पाटी झळकत होती. महाराजांचें वार्षिक उत्पन्न सुमारें ४ कोटि रुपयांचें आहे. त्यांचे जवाहिर जगप्रसिद्ध आहे.पांचव्या जॉर्जच्या दरबारास ते हजर होते, तेव्हां त्यांच्या कपड्यावर चमकणाऱ्या हिऱ्यांची किंमत साडे चार कोटि रुपये होती. ज्युबिलीसाठी ते लंडनला गेले, त्या वेळीं त्यांनीं पोलोचीं ४२ घोडीं बरोबर घेतलीं. वरील माहिती ब्रिटिश वृत्तपत्रांत, महाराजांच्या इंग्लंडच्या प्रशंसाचे अनुषंगानें प्रसिद्ध झाली आहे.

५५ वर्षांवरील अविवाहित व विधवा स्त्रिया

पंचावन वर्षांवरील अविवाहित स्त्रियांची संख्या ग्रेट ब्रिटनमध्यें ७,६०,००० भरते. पंचावन वर्षांवरील विधवांची संख्या तेथें १६,८०,००० आहे.

एव्हरेस्ट शिखरापेक्षां स्पर्धा !

चिनी तुर्कस्थानांतील एक पर्वत एव्हरेस्ट शिखरापेक्षा उंच आहे, असें एका अमेरिकन वैमानिकास आढळून आलें असल्याचें प्रसिद्ध झालें आहे. आजवर कित्येक शिखरांनीं एव्हरेस्टचें स्थान पटकाविण्याचा प्रयत्न केला, परंतु ते सर्व अयशस्वी झाले आहेत.

हीं मुलें अधिक हुशार निपजतात

ज्यांच्या गर्भाची उन्हाळ्यात धारणा होते अशा मुलांपेक्षा ज्यांच्या गर्भाची धारणा हिवाळ्यांत होते, अशीं मुलें अधिक हुशार निपजतात, असें इंग्लंडमधील बाथ शहरांतील ३३६१ मुलांच्या संबंधीं चौकशींत आढळून आलें आहे. त्यांस भाऊ व बहिणी हींहि कमी असतात.

स्वतःचें मार्गदर्शन स्वतःच करणारी मोटारगाडी

अमेरिकेंत निघालेल्या मोटारी सामान्य उपयोगांत येऊं शकल्या, तर मोटार ड्रायव्हरांचें प्रयोजनच उरणार नाहीं. रस्त्याच्या मध्यभागी एक पांढरी पट्टी ओढलेली असते, तिचेवर फोटो इलेक्ट्रिक सेल्स नजर ठेवतील व आपोआप मोटारीचें मार्गदर्शन करतील. मागील बाजूस आरामशीर बसून मालक एका बटनाच्या सहायानें मोटार चालवूं शकेल.

चिनी सरकारचें नवें कर्ज

किंमतींचें नियंत्रण करणें, सरकारी खर्च मागविणें व जादा चलन खेचून घेणें, यासाठीं चिनी सरकारनें ५ अब्ज डॉलर्सचें कर्ज उभारण्याचें ठरविलें आहे. त्याची ३० वर्षांनीं परतफेड होईल. कर्जावरील व्याजाचा दर ६% आहे.

अन्नविषयक बाजारभावांत वाढ

ऑगस्ट, १९३९ = १००

१० जून, १९४४ असेरचा आठवडा २२८-४

१७ जून, १९४४ „ „ २३८-८

एका आठवड्यांत झालेल्या वरील वाढीचें कारण चहाच्या बाजारभावांत झालेली वाढ हें आहे.

WANTED

Agents to represent Sun Life Assurance Co. Of Canada in Ahmednagar, Jalgaon, Kolhapur,. Nasik & Sholapur. Excellent opportunities for capable and successful men. Full training will be given.

Apply to:—

Mr. P. V. Lad,
Unit Organizer.
Sun Life Of Canada, Laxmi Rd., POONA 2.

सध्यांच्या टंचाईच्या काळांत जीवनद्रव्यें कमी पडतात.
जीवनद्रव्यांनीं (Vitamins) युक्त असे
(सप्लाय खात्यानें मान्यता दिलेले)
टोमॅटो केचप (गोड) व
टोमॅटो सॉस [तिखट व आंबट]
आजच मागवा व जीवनद्रव्यांची वाटणारी
उणीव भरून काढा.
रुरल प्रॉडक्टस कंपनी लि. पुणें
बिझिनेस ऑफिस: ९१३ अ सदाशिव, पुणें २.

प्रगतिपथावरील नवा
मै ला चा — द ग ड
सन १९४३ अखेर

नव्या कामांत	११० टक्के वाढ
चालू कामांत	१०० टक्के वाढ
आयुर्विमानिधींत	८० टक्के वाढ

— आपला विमा किंवा एजन्सी आजच घ्या —
दि औंध म्यूच्युअल लाइफ ॲश्युरन्स सोसायटी लि., पुणें.
आर. जी. साठे, सुपरिंटेंडेंट — व्ही. जी. जोशी, मॅनेजिंग डायरेक्टर

'अर्थ' ग्रन्थमाला.
१. बँका आणि त्यांचे व्यवहार
२. हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३. व्यापारी उलाढाली
४. सहकार

अनुक्रमणिका

	पृष्ठ
१ विविध माहिती	२१८
२ चलन परिषदेनें हिंदी सूचना फेटाळल्या	२१९
३ कागद नियंत्रण हुकुमामुळें अडचणी	२२०
४ स्फुट विचार	२२१
हिंदी कपाशीचें युद्धोत्तर भवितव्य—प्रो. हिल यांचा सल्ला.	२२१
५ नवभारत कंपनी गुंडाळण्यांत येणार	२२१
६ विमा कंपन्यांवरील इन्कमटॅक्स	२२३
७ सहकारी विमा सोसायटी-पुढील प्रश्न	२२३

अर्थ

बुधवार, ता. १२ जुलै, १९४४

चलन परिषदेनें हिंदी सूचना फेटाळल्या

हिंदुस्थानची गंगाजळी लंडन येथें स्टर्लिंग चलनांत जमत आहे ती या देशाच्या उपयोगी पडेल अशी व्यवस्था करण्याविषयींची चर्चा अलिकडे जोरांत चालली होती आणि तिचे पडसाद ब्रिटिश कॉमन्स सभेंतहि ऐकावयास आले होते. युद्धाप्रीत्यर्थ मित्र राष्ट्रांचा खर्च हिंदुस्थानांत चालला आहे, त्यासाठी लागलेलें चलन येथील सरकारनें पुरवलें असून त्याच्या आधाराचें स्टर्लिंग इंग्लंडमध्यें जमा झालें आहे, ह्या व्यवहारांत हिंदी जनतेस महागाईच्या कारणानें किती तरी तोशीस लागली आहे हें सर्वमान्य आहे. तिचा मोबदला म्हणून नाहीं तरी निदान युद्धोत्तर काळांतील आर्थिक संवर्धनासाठी हिंदुस्थानास त्याच्या सोयीप्रमाणें आपल्या निढळाच्या घामानें तयार झालेल्या स्टर्लिंग शिलकांचा विनियोग करण्याची योग्य संधी दिली जावी ह्या मागणीविरुद्ध ब्रिटिश धंदेवाले आणि वृत्तपत्रें ह्यांनीं कशा प्रकारचें काहूर उठवलें होतें ह्याची कल्पना आम्हीं वेळोवेळ वाचकांस करून दिली आहे. हजार पंधराशे कोटि रुपये किंमतीच्या स्टर्लिंगचें रूपांतर इतर चलनांमध्यें होण्याची मागणी हिंदुस्थाननें केल्यास ब्रिटिश चलन पद्धति आणि हुंडणावळ ह्यांचा ढोलारा कोलमडल्यावाचून राहणार नाहीं ह्या भीतिनें हिंदी लोकमताविरुद्ध इंग्लंडमध्यें वृत्तपत्रांनीं प्रचार चालविला होता आणि त्याचा परिणाम चलन परिषदेच्या कार्यक्रमावर झाला. हिंदुस्थानची मागणी अमान्य करण्याचें ब्रिटिश व अमेरिकन सरकारांनीं ठरवलें होतें आणि ती परिषदेपुढें येऊंच नये आणि आल्यास ती फेटाळून लावावी असा त्यांचा निश्चय झाला होता. तरीहि आपलें म्हणणें परिषदेपुढें मांडून शक्यतर तिचा निर्णय ह्या देशांस अनुकूल होईल असा प्रयत्न करण्याचा हिंदी प्रतिनिधींचा बेत होता. त्याप्रमाणें त्यांनीं जागतिक चलनबँक स्थापन व्हावयाची आहे तिच्या कक्षेंत हिंदी स्टर्लिंग शिलकांच्या विनियोगाचा व्यवहार अंतर्भूत केला जावा असें सुचवलें, पण परिषदेनें बहुमतानें ती सूचना अमान्य केली.

स्थापन व्हावयाच्या जागतिक बँकेच्या पैशांत निरनिराळ्या देशांच्या चलनांचा अंतर्भाव व्हावयाचा असून सभासद राष्ट्रांच्या जरूरीप्रमाणें त्यांस इतर राष्ट्रांवरील हुंड्या मिळावयाच्या आहेत आणि अशा रीतीनें आंतरराष्ट्रीय हुंडणावळीच्या दरांत स्थिरता राखण्याची तजवीज केली जाणार आहे. हिंदुस्थानास स्वतःच्या स्टर्लिंगच्या मोबदल्यांत डॉलर्स हुंड्या हव्या असतील तर त्या मिळण्याची सोय करण्याचें सामर्थ्य जागतिक बँकेंत रहाणार नाहीं ह्या सबबीवर हिंदी सूचना नाकारण्यांत आली आहे आणि युद्धाबाबतच्या आंतरराष्ट्रीय देण्याघेण्याची व्यवस्था करण्याची जबाबदारी त्या बँकेवर टाकण्यांत येऊं नये असें चलन परिषदेनें ठरवलें आहे. ह्याचा अर्थ असा आहे कीं हिंदुस्थानास स्वतःच्या इच्छेप्रमाणें वाटेल त्या देशांतून माल आणून लंडनमधील आपल्या शिलकांचा उपयोग करतां येणार नाहीं आणि ह्या बाबतींत इंग्लंडच्या आर्थिक सोयीवर अवलंबून रहावें लागेल. हिंदुस्थानांत युद्धसमाप्तीनंतर व्हावयाच्या औद्योगिक अभिवृद्धीच्या योजना आखल्या जात आहेत त्या फलद्रूप होण्याच्या मार्गांत चलन परिषदेचा निर्णय येणार आहे असें त्या परिषदेंतले एक हिंदी प्रतिनिधि, श्री. श्रॉफ, ह्यांनीं बोलून दाखवलें आहे. जागतिक बँकेनें स्टर्लिंगच्या मोबदल्यांत निरनिराळ्या देशांचीं चलनें यावयाचीं नाहींत तर असल्या संस्थेचा उपयोग काय? असा त्यांचा प्रश्न आहे. परिषदेचा निश्चय असेर कायम झाला तर हिंदुस्थान व इतर कांहीं देश ह्यांस जागतिक बँकेसंबंधानें कांहींच जिव्हाळा वाटणें शक्य होणार नाहीं आणि तिची उपयुक्तताहि त्या मानानें कमी होईल असेंहि त्यांनीं बजावलें आहे.

दुसरे हिंदी प्रतिनिधी, सर षण्मुखम चेट्टी, ह्यांनीं जागतिक बँकेच्या योजनेस एक उपसूचना सुचवली होती तीहि चलनपरिषदेनें फेटाळून लावली. बँकेचे मुख्य उद्देश आंतरराष्ट्रीय व्यापार सुरळीत रीतीनें चालण्यास सवलती व मदत देणें आणि निरनिराळ्या देशांत बेकारी नष्ट होण्याविषयीं तजवीज करणें असे नमूद केलेले आहेत. संपन्न राष्ट्रांमध्यें परस्पर व्यापार चालल्यानें हिंदुस्थान व चीन ह्यांच्यासारख्या मागासलेल्या देशांच्या औद्योगिक उन्नतीस कशी मदत होणार? म्हणून सर षण्मुखम चेट्टी ह्यांनीं ह्या देशांचा उल्लेख करून त्यांस आवश्यक असलेल्या सहायाचा अंतर्भाव जागतिक बँकेच्या योजनेंत केला जावा असें सुचवलें होतें आणि तें अमान्य झाल्यामुळें आपली निराशा झाली आहे असें त्यांनीं बोलून दाखवलें आहे. स्वतंत्र हिंदी प्रतिनिधींनीं ह्या देशांतलें लोकमत चलन परिषदेपुढें जोरानें आणि निर्भीडपणानें मांडल्याबद्दल त्यांचें अभिनंदन करणें आवश्यक आहे. पण पुढें काय? असा प्रश्न येथें उद्भवतो. हिंदुस्थान सरकारनें येथील लोकांस पसंत नसलेली आणि ह्या देशाच्या आर्थिक हितसंबंधास पोषक नसलेली जागतिक बँकेची योजना अमान्य केली पाहिजे. चलन परिषदेचे ठराव आपणास बंधनकारक नाहींत आणि हिंदी विधिमंडळाच्या संमतीवांचून आपण कोणतेंहि धोरण निश्चित करणार नाहीं असें आश्वासन सरकारन दिलें आहे. अशा स्थितींत सरकारावर हिंदी लोकमताची छाप पाडली जाणें अगत्याचें आहे. सरकारनें निवडलेल्या चलन परिषदेंतील हिंदी प्रतिनिधींनीं लोकांच्या वतीनें आपला अभिप्राय स्पष्टपणानें व्यक्त केला आहे. हिंदी स्टर्लिंग शिलकांचा विनियोग इंग्लंड व हिंदुस्थान ह्यांच्या दरम्यान विचारविनिमय होऊन दोघांच्या संमतीनें केला जाण्याचा मार्ग आतां उरला आहे. हिंदुस्थानांतील सरकार जनतेस

जबाबदार नसल्यानें त्यावर लोकमताचें प्रभावी बजन कसें पडणार आणि साम्राज्य सरकारापुढें त्याचें कितपत चालणार ह्याविषयीं शंका वाटणें स्वाभाविक आहे. पंचदशवार्षिक आर्थिक अभिवृद्धीच्या योजनेच्या कर्त्यांनीं ती फडशा होण्यास राष्ट्रीय सरकार ह्या देशांत स्थापन होण्याचें अगत्य प्रतिपादिलें आहे त्याचें रहस्य येथें पटल्याशिवाय रहात नाहीं.

कागद नियंत्रण हुकुमामुळें निर्माण झालेल्या अडचणी

मराठा चेंबरची हिंदुस्थान सरकारला तार

मराठा चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज, पुणें या संस्थेनें कागद नियंत्रण हुकुमाबाबत खालील आशयाची तार हिंदुस्थान सरकाराला केली आहे:-

सरकारला लागणाऱ्या कागदांत काटकसर करतां येण्यासारखी असून निरनिराळ्या नियंत्रण हुकुमान्वयें जे विविध प्रकारचे तक्के सरकारकडे पाठवावे लागतात त्यांतील कांहीं सरकारनें न मागितले तरी चालण्यासारखें असून कांहींतील थोडाबहुत तपशील कमी करतां येण्याची शक्यता आहे. हिंदुस्थान सरकारचें माहिती खातें जीं पत्रकें प्रसृत करतें त्यांतील कांहीं प्रसृत न केलीं तरी चालण्यासारखें आहे. अशा रीतीनें काटकसर करून देशी गिरण्यांच्या उत्पादनापैकीं पन्नास टक्के कागद नागरिक जनांच्या गरजेसाठी द्यावा व त्याच्या जोडीला अमेरिका, इंग्लंडमधून कागदाची आयात करावी.

कागद नियंत्रण हुकूमामुळें छापखाने, प्रकाशक व स्टेशनरी कारखानदार यांचा धंदा बसणार असून शिक्षणकार्य व देशांतील इतर व्यवसाय यांची कुचंबणा होणार आहे. सबब नियंत्रण हुकूमांत पुढील दुरुस्त्या कराव्या.

कागदाच्या ब्याल्यॅतून स्ट्रॉबोर्ड वगळावा.

देशी कागदावर छापल्या जाणाऱ्या वृत्तपत्रांचे आकार व पृष्ठसंख्या याबाबत वृत्तपत्रीय कागदावर छापल्या जाणाऱ्या वृत्तपत्रांवर जे निर्बंध लागू आहेत ते निर्बंध लागू करावे.

डायरेक्टऱ्या, मार्गदर्शिका वगैरेसंबंधीं केलेल्या नियमांतून पंचांगें, संस्थांचे अहवाल वगळण्यांत यावेत.

छापखाने, प्रकाशक व स्टेशनरी कारखानदार यांनीं १९४३ मध्यें जितका कागद वापरला असेल तितका कागद वापरण्याची त्यांस मुभा असावी व त्यांचीं जीं कामें अर्धवट पुरीं झालीं असतील तीं दि. ३१-ऑगस्टपर्यंत पुरीं करण्यास परवानगी देण्यांत यावी.

हिस्सेरशीनें कागद वापरण्याबाबत निर्बंध दूर करण्यांत यावा.

दोन पौंडाहून अधिक वजनाचा माल मोटारनें अगर रेल्वेनें पाठवावयाचा असल्यास त्यासाठी वेष्टणाचा कागद वापरण्याची मुभा असावी.

अज्ञाविषयक शैक्षणिक प्रकाशनास मदत

अज्ञाविषयक शैक्षणिक साहित्य प्रसिद्ध करण्यासाठी सर दोराबजी टाटा ट्रस्टनें मुंबईच्या पीपल्स प्रॉव्हिन्शिअल फूड कौन्सिलला वार्षिक दोन हजार रुपयांची ग्रँट दोन वर्षांसाठी मंजूर केली आहे.

तीस वर्षांचे अखेरीस-

१३४३ मधील नवें काम-
एक कोटी चौदा लक्ष रुपयांहून जास्त

एकूण चालू काम-६७०८१४४९ रु.

एकूण मालमत्ता-
दोन कोटी दहा लक्ष रुपयांहून जास्त

एकूण भरपाई केलेले क्लेम-
साठ लक्ष रुपयांहून जास्त

खर्चाचें प्रमाण-शेंकडा २२·७ फक्त

रद्द विम्यांचें प्रमाण-
सर्व देशांत कमींत कमी

महाराष्ट्राच्या आद्य आणि श्रेष्ठ विमा कंपनीचें
अभिनंदनीय यश.

वेस्टर्न इंडिया विमा
कंपनी लि. सातारा

शाखा : पुणें
कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

मुख्य कचेरी :
सातारा शहर.

स्फुट विचार

हिंदी कपाशीचें युद्धोत्तर भवितव्य

युद्धसमाप्तीनंतरच्या काळांत ग्रेट ब्रिटन, अमेरिका व रशिया ह्या राष्ट्रांच्या स्वहित-मूलक धोरणास अनुसरून जागतिक व्यापार व उद्योगधंदे ह्यांचें नियमन होणार आहे. हीं राष्ट्रें सुसंघटित, पुढारलेलीं आणि प्रबळ आहेत. ज्याप्रमाणें आज तीं युद्धांत अग्रेसर आहेत, त्याचप्रमाणें युद्ध जिंकल्यावर जागतिक पुनर्घटनेंत तीं प्रभावी रहाणार हें स्पष्ट आहे. युद्धजन्य हानी भरून काढून स्वतःचा आर्थिक संसार पुन्हां नीट थाटण्याच्या योजना हीं राष्ट्रें आखींत आहेत आणि त्यांमध्यें आपलें स्थान काय राहील हें हिंदुस्थानासारख्या देशानें पाहून स्वहिताचें संरक्षण करण्याची खबरदारी घेणें अगत्याचें आहे. हिंदी धंदेवाले ह्या प्रश्नांत लक्ष घालीत आहेत ही समाधानाची गोष्ट आहे. तथापि हिंदी जनतेनें ह्याहिपेक्षा अधिक जागरूकपणानें वागणें आवश्यक आहे. सध्या हिंदी राजकारणाची कोंडी झाल्यानें हें लोकमत बनवण्याचें व व्यक्त करण्याचें कार्य व्हावें तसें परिणामकारक रीतीनें होत नाहीं, हें दुर्दैव होय. ह्या परिस्थितीचें द्योतक म्हणून हिंदी कपाशीच्या युद्धोत्तर भवितव्याचें उदाहरण देतां येईल. हिंदी शेतीविषयींच्या धोरणाचा विचार करण्यासाठी सिमला येथें अलीकडे त्यासंबंधांत नेमलेल्या समितीची सभा झाली. तीमध्यें सर चुनीलाल भाईचंद मेथा ह्यांनीं असें सांगितलें कीं अमेरिकेनें कापसाच्या व्यापाराचें नियमन करण्याच्या हेतूनें एक योजना आखली असून तीमध्यें प्रत्येक देशानें किती कपास पिकवावी व निर्गत करावी ह्याचा निर्णय नमूद झाला असून कापसाच्या कमाल व किमान किंमती ठरवण्याबाबत तरतूद आहे. हिंदुस्थानचें कपाशीचें मामुली उत्पन्न व निर्गत ह्यांस अनुसरून त्या योजनेंत ह्या देशास योग्य स्थान देण्यांत आलें पाहिजे ह्या आशयाचा ठराव सर चुनीलाल ह्यांनीं पुढें मांडला आणि तें धोरण समितीनें मान्य केलें असें समजतें. ही एक कपाशीची बाब झाली. अशा इतर किती तरी महत्त्वाच्या बाबी आहेत, आणि त्यांचा विचार वेळींच आणि व्यवस्थित रीतीनें केला जाणें अगत्याचें आहे. नाहींतर जागतिक योजना अंमलांत येऊन बैल गेला आणि झोपा केला असें हिंदुस्थानचें होण्याची भीति आहे. आमच्या सरकारनें नेट धरून स्वहितसंबंधाचा पाठपुरावा केला पाहिजे.

प्रो. हिल ह्यांचा सल्ला

ह्या देशांत भौतिक शास्त्रांचे बाबतींतले व औद्योगिक संशोधन आणि प्रयोगशाळा ह्यांचे संबंधांत काय सोयी आवश्यक आहेत ह्याविषयीं सूचना करण्यासाठी प्रो. हिल हिंदुस्थानांत चौकशी करून गेले आणि त्यांच्या शिफारसी लौकरच प्रसिद्ध होतील. ईस्ट इंडिया असोसिएशन ह्या नांवाच्या इंग्लंडमधील प्रसिद्ध संस्थेच्या विद्यमानें त्यांनीं नुकतेंच एक व्याख्यान दिलें, त्याचा गोषवारा इकडे आला आहे. ह्या देशांत शास्त्रीय प्रगति होण्याची आवश्यकता त्यांनीं प्रतिपादली आणि ती न झाल्यास एका पिढीच्या आंत हिंदुस्थानाचा प्रचंड लोकसंख्या व उपासमार ह्यांचे योगानें नाश होण्याची भीति असल्याचें त्यांनीं सांगितलें. इंग्लंडच्या मानानें सातपट डॉक्टर्स, बीसपट दाया आणि सत्तरपट आरोग्य सहायकांची आवश्यकता ह्या देशांत आहे असें ते म्हणाले. सध्याप्रमाणें हिंदी लोकसंख्या वाढत गेल्यास एका पिढीचे आंत येथें सत्तर कोटी लोक होतील आणि त्यांच्या चरितार्थास सध्याच्या मानानें तिप्पट अन्नाचा पुरवठा कराचा लागेल. ह्याकरितां नियोजनात्मक पद्धतीनें आर्थिक प्रगति घडवून आणणें आवश्यक असून तत्प्रीत्यर्थ हिंदी लोकांनीं मतभेद आणि राजकीय वाद बाजूस सारून झटावें असें सुचविलें. शिक्षणाचा प्रसार, सार्वजनिक व वैयक्तिक आरोग्याची सुधारणा, शास्त्रीय व औद्योगिक संशोधनाची वाढ ह्यांच्या अगत्याविषयीं हिंदुस्थानांत मतैक्य आहे आणि ह्या सर्व बाबतींत प्रगति घडवून आणणें हाच येथील राजकीय सुधारणेचा व प्रचाराचा उद्देश आहे, ही गोष्ट प्रो. हिल यांच्या लक्षांत आलेली दिसत नाहीं. हिंदुस्थान सरकारनें आर्थिक नियोजनाचा प्रश्न हातीं घेण्यापूर्वीच हिंदी लोकमतानें त्या बाबतींत नेटानें मागणी केली होती, एवढेंच नव्हें तर योजना आखण्याचें कामहि येथें चालूं झालें होतें ह्याची माहिती त्यांस नसेल असें वाटत नाहीं. जग झपाट्यानें आधुनिक पद्धतीनें पुढें चाललें असतां हिंदुस्थानास स्वस्थ राहून चालणार नाहीं ह्याची पूर्ण जाणीव हिंदी लोकांस आहे आणि ह्या दिशेनें त्यांचे प्रयत्नहि चालू आहेत. ब्रिटिश व हिंदुस्थान सरकार ह्यांनीं ह्या कार्मी उत्तेजन व सहाय्य द्यावें अशी तर त्यांची स्पष्ट मागणी आहे. पंचदशवार्षिक आर्थिक अभिवर्धनाची योजना हिंदी पुढाऱ्यांनींच तयार केली आहे आणि ती फलद्रूप होण्यासाठीं आवश्यक असलेलीं साधनें व सत्ता येथील सरकारनें बापरलीं पाहिजेत असें त्यांचें म्हणणें आहे. प्रो. हिल ह्यांचें उद्दिष्ट पूर्णपणें मान्य असलेल्यांसच त्यांचा उपदेश वस्तुतः होत आहे. राजकीय मतभेद बाजूस सारून हिंदी जनतेनें आर्थिक उन्नतीच्या मार्गे लागावें हा त्यांचा सल्ला योग्य आहे, पण राजकीय सत्ता आणि आर्थिक प्रगति ह्यांचा ह्या देशांत निकट संबंध आहे ही गोष्ट त्यांनीं दृष्टीआड करून चालणार नाहीं.

नवभारत विमा कं. गुंडाळण्यांत येणार

नवभारत विमा कंपनी गुंडाळण्यांत यावी, असा सुपरिंटेंडेंट ऑफ इन्शुअरन्स (वादी) वि. नवभारत विमा कं. लि. (प्रतिवादी) ह्या दाव्याचा मुंबई हायकोर्टानें निवाडा केला आहे. वरील विमा कंपनी १९३२ सालीं स्थापन झाली. १९४३ सालीं सुपरिंटेंडेंट ऑफ इन्शुअरन्सनें तिचें मूल्यमापन करवलें, ३१ जुलै १९४२ रोजीं कंपनीच्या हिशेबांत १,७५,२३० रुपयांची तूट होती, ती तूट सव्याज वाढत जाईल, कंपनीला आपली परिस्थिति सुधारतां येणें शक्य नाहीं, तेव्हां कंपनी चालू ठेवणें विमेदारांच्या हितास बाधक आहे, असें वादीचें म्हणणें होतें. कंपनीची परिस्थिति सुधारत आहे व वादीचें म्हणणें चुकीच्या तत्त्वावर आधारलेलें आहे, असें प्रतिवादी कंपनीतर्फे सांगण्यांत आलें होतें, परंतु हायकोर्टानें वरीलप्रमाणें निवाडा केला. सरकारी रोख्यांत विमाकंपन्यांनीं सरकारनें गुंतविण्याच्या रकमेसंबंधांत मुंबई हायकोर्टात हिंदुस्थान सरकारविरुद्ध हिंदी विमाकंपन्यातर्फे एक चाचणीचा दावा लावण्यांत आला होता, तो नवभारतनें प्रतिनिधिक स्वरूपांत लावला होता हें वाचकांस स्मरत असेलच.

लॉर्ड केंटो झांस हिंदुस्थानचा अनुभव आहे

बँक ऑफ इंग्लंडचे नवे गव्हर्नर, लॉर्ड केंटो, यांचें वय ९५ वर्षांचें आहे. गेल्या महायुद्धानंतर सुप्रसिद्ध व्यापारी पेढी अँड्रयू यूल आणि कंपनी (कलकत्ता) चे प्रमुख म्हणून त्यांनीं हिंदुस्थानांत काम केलेलें आहे.

बंगाल दुष्काळ निवारण समिति

बंगाल दुष्काळ निवारण समितीनें आपला ३१ मे अखेरचा अहवाल प्रसिद्ध केला आहे. समितीनें जुलै १९४३ मध्यें कामास प्रारंभ केला. तिनें २७½ लक्ष रोख व १० लक्ष रुपयांची ऐनजिनसी मदत मिळविली. त्यांपैकीं २२ लक्ष रुपये खर्च झाले आहेत. शेतकऱ्यांना बीं पुरवणें, कामगारांना धंद्याचीं साधनें उपलब्ध करून देणें, बुजत चाललेलीं तळीं उकरून काढणें, बांध घालणें, सूत कातण्याचीं व विणण्याचीं केंद्रें स्थापणें, इत्यादींवर ९४ हजार रुपये खर्च झाले.

आरोप ठेवले

मुंबईमधील चर्चगेट स्टेशन जवळील एका इमारतीचें बांधकाम चालू असतांच २८ जून १९४२ रोजीं ती पडून त्यांत ५० लोक मरण पावले व कित्येक जखमी झाले. ह्या संबंधांत इंजिनिअर मि. नुराणी, कंत्राटदार मि. इंजिनिअर, सुपरव्हायझर मि. मार्ला व कॉंक्रीट सप्लायर मि. आगा ह्यांचेवर आरोप ठेवण्यांत आले असून प्रत्येकाची चौकशी स्वतंत्रपणें होणार आहे.

क्लब ऑफ महाराष्ट्र लि.

वरील कंपनीची स्थापना कांहीं महिन्यांपूर्वी झाली, तिच्या सभासदांच्या नोंदणीस आतां प्रारंभ होत आहे. मुंबई प्रांतांत क्रिकेट, टेनिस, फुटबॉल, बॅडमिंटन, गोल्फ, आट्यापाट्या, हुतुतु वगैरे खेळांचा प्रसार करणें, हा ह्या क्लबाचा मुख्य उद्देश आहे. क्रिकेटसाठीं स्टेडियम बांधणें ही त्याच्या कार्यक्रमांची एक प्रमुख बाब आहे. क्लबाची घटना मर्यादित जबाबदारीच्या लिमिटेड कंपनीच्या स्वरूपाची आहे. कंपनी गुंडाळण्यांत आली, तर त्यावेळच्या प्रत्येक सभासदानें १० रुपयांपर्यंत रकम कंपनीस द्यावी लागेल. कंपनी गुंडाळल्यावर देणें देऊन राहिलेली रकम पेट्रन, लाइफ मेंबर व फौंडर मेंबर ह्यांचेमध्यें सारख्या प्रमाणांत वाटली जाईल. सभासदांचे नऊ प्रकार आहेत व त्यांच्या वर्गणीप्रमाणें त्यांस हक्क व सवलती दिलेल्या आहेत. एक्झिक्युटिव्ह कमिटीच्या नेतृत्वाखाली वर्किंग कमिटीनें व्यवस्था पहावयाची आहे. क्लबाची एवढ्या मोठ्या प्रमाणावर लिमिटेड कंपनीच्या स्वरूपांत उभारणी महाराष्ट्रांत अपूर्व आहे, ह्यांत शंका नाहीं. महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनचे श्री. भावे व श्री. तालीम हे सेक्रेटरी म्हणून काम करीत आहेत.

पुणें येथील सहकारी शाळा

मुंबई प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूटतर्फे पुणें, धारवाड व अहमदाबाद येथें तीन सहकारी शाळा स्थापन झाल्या आहेत, त्यांपैकी पुणें येथील शाळेचें उद्घाटन ता. १७ जुलै रोजीं प्रो. वामनराव काळे यांचे हस्तें होणार आहे. श्री. श्री. रा. पाळंदे, एम. ए. एलएल. बी. हे शाळेचे ऑनररी प्रिन्सिपॉल म्हणून काम पहाणार आहेत. शिक्षणाचें माध्यम मराठी आहे. अभ्यासक्रमाची माहिती व इतर तपशील पुणें सें. को. बँकेच्या कचेरींत मिळूं शकेल. शाळेंत दाखल होण्यासाठीं अर्ज येऊं लागले आहेत, असें समजतें.

दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

पुणें शहर

मांडवल :

(ता. ३१-५-४४ रोजीं)

अधिकृत व खपलेलें : रु. १०,००,०००
वसूल झालेलें : रु. ५,००,०००
रिझर्व्ह व इतर फंड : रु. १,०८,०००
एकूण खेळतें मांडवल : रु. ७५,००,००० चे वर

—: डायरेक्टर्स :—

श्री. धों. कृ. साठे, चेअरमन,
श्री. वा. पु. वर्दे, प्रो. वा. गो. काळे, श्री. न. ग. पवार,
श्री. श्री. गो. मराठे, श्री. त्रिं. वि. रानडे, श्री. र. चिं. सोहनी,
श्री. फ. दो. पदमजी, श्री. मा. रा. जोशी,
श्री. म. वि. गोखले, श्री. वि. ह. देशमूख

: शाखा :

पुणें ४, दलाल स्ट्रीट, मुंबई, जळगांव, नागपूर.
बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

सी. व्ही. जोग
मॅनेजर

दि बँक ऑफ इंडिया लि.

[स्थापना : १९०६]

अधिकृत मांडवल	...	...	... रु.	३,००,००,०००
वसूल झालेलें मांडवल	...	...	... रु.	१,००,००,०००
रिझर्व्ह फंड	...	...	... रु.	१,२३,००,०००

मुख्य कचेरी: ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

मुंबईमधील शाखा : बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

इतर शाखा : अहमदाबाद (मद्र, मुख्य ऑफिस), अहमदाबाद (एलिस ब्रिज शाखा), अहमदाबाद (स्टेशन शाखा), अमृतसर, अंधेरी (मुंबई शेजारीं), बांद्रे (मुंबई शेजारीं), कलकत्ता (क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्क्वेअर), जमशेदपूर, कराची, नागपूर (किंग्जवे), नागपूर (इतवारी बझार), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत, भुज (कच्छ).

लंडन एजन्ट्स : वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

डायरेक्टर्स : सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. (अध्यक्ष), श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के. नाईट; मि. ए. गेडिस; सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, जी. बी. ई., के. सी. आय. ई., मि. दिनशा के. दाजी; श्री. रामनिवास रामनारायण.

करंट डिपॉझिट अकाउंट्स :

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षां कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्समाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते, सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

एजंट:—एच्. ए. करीमभाई

आयुर्विमा कंपन्यांवरील इनकमटॅक्स

वेस्टर्न इंडिया विमाकंपनीचे अध्यक्ष, श्री. ल. मो. आपटे, बी. ए., एलएल. बी., यांचें कंपनीच्या वार्षिक सभेंतील भाषण.

सध्या इनकमटॅक्सच्या दरांत भरमसाट वाढ झाली आहे. सदर वाढलेल्या दराचा परिणाम इन्शुअरन्स कंपन्यांवर फारच झाला असता ही गोष्ट लक्षांत घेऊन सरकारनें विमा कंपन्यांना इनकमटॅक्स व सुपर टॅक्सची एकूण कमाल मर्यादा एक रुपयाला ६३ पै प्रमाणें यंदांच ठरवून दिली आहे. या दरानेंही इनकमटॅक्स भरणें इन्शुअरन्स कंपन्यांना जड जात असून सदर कमाल मर्यादा ४५ पै पर्यंत ठरविण्यांत यावी याकरितां शक्य ती खटपट असोसिएशनमार्फत चालू आहे. सध्याच्या परिस्थितींत येणाऱ्या मोठ्या विम्याच्या केसेसमध्यें सर्वच्या सर्व हप्त्याच्या रकमेवर विमेदारांना इनकमटॅक्सची माफी न मिळतां ती ठराविक मर्यादेपर्यंत म्हणजे विम्याच्या रकमेच्या दहा टक्के होणाऱ्या हप्त्याच्या रकमेपर्यंत मिळणार आहे. सध्यांच्या विशिष्ट परिस्थितींत व्यापारधंद्यांतील पैशाचा सर्व ओघ विम्याच्या पॉलिसी घेण्याकडेच सध्यां होत आहे असें दिसून येतें. परिस्थिति सुधारतांच ही विमाप्रवृत्ति टिकून राहील हें संभवनीय नाहीं. तरी पण या नवीन बदलामुळें खरोखरीचे विम्याचें संरक्षण मिळविण्याच्या प्रयत्नास कांहीं बाध येण्यासारखा नाहीं.

आयुर्विमा कंपनीचें उत्पन्न कर आकारणीकरितां दोन पद्धतींनीं प्रथम काढण्यांत येतें. पहिली पद्धत म्हणजे मूल्यमापनाप्रमाणें येणारें सरासरी वार्षिक उत्पन्न व दुसरी पद्धत म्हणजे हप्त्याव्यतिरिक्त एकूण उत्पन्न वजा खर्च या पद्धतीनें येणारें उत्पन्न. दुसऱ्या पद्धतींत खर्चाची कमाल मर्यादा ठरविण्यांत आली आहे. सदर मर्यादा नुकतीच वाढविण्यांत आली असून पहिल्या वर्षाच्या हप्त्यांपैकीं शेंकडा ८५ टक्के खर्चाऐवजीं आतां ९० टक्के खर्चास व रिन्युअल हप्त्यापैकीं साडेआठ ऐवजीं शेंकडा बारा टक्के खर्चास कर आकारणीकरितां परवानगी देण्यांत आली आहे. या सवलतीमुळें कर आकारणी पूर्वीपेक्षां कमी होईल असें वाटतें. तथापि इनकमटॅक्सचा वर उल्लेख केलेला दर जो सध्यी जबर आहे तो कमी होणें अगदीं जरूर आहे. तसा तो व्हावा एतदर्थ लाइफ आफिसेस असोसिएशनमार्फत प्रयत्न चालू आहेत. ते फलद्रूप झाल्यास सध्यां मिळत असलेल्या इन्व्हेस्टमेंटवरील व्याजांत थोडीफार सुधारणा होण्याची शक्यता आहे. परंतु सदर सुधारणा भरलेला इनकमटॅक्स परत मिळते वेळींच दिसेल. त्यापूर्वी दिसणार नाहीं.

सहकारी विमा सोसायटी पुढील प्रश्न

मुंबई सहकारी विमा सोसायटीचे अध्यक्ष, श्री. माधवलाल भट्ट, जे. पी. यांचें वार्षिक सभेंतील भाषण.

व्याजाचा दर शक्य तेवढा कमी राखण्याचें सध्याच्या हिंदुस्थान सरकारचें धोरण आहे. विमा कायद्याच्या २७ व्या कलमांत दुरुस्ती होण्याच्या आवश्यकतेसंबंधीं आयुर्विमा कंपन्यांची असोसिएशन कसून प्रयत्न करीत आहे, परंतु ती फलदायी झालेली नाहीं. विम्याच्या सहकारी सोसायटीस वरील २७ व्या कलमाचें बंधन आहेच, याशिवाय १९२५ व्या बॉबे को. सोसायटीज ॲक्टाचें ३७ वें कलमहि तिला पाळावें लागतें. सहकारी कायद्याच्या ३७ व्या कलमाचा कडकपणा मुंबई सहकारी विमा कंपनीचे बाबतींत मुंबई सरकारनें कमी केला असला, तरी तेवढ्यानें भागत नाहीं.

हिंदी विमा कंपन्यांच्या प्रयत्नांस अखेर यश येऊन हिंदुस्थान सरकारनें विमा कंपन्यांवरील इनकमटॅक्सचा कमाल दर रुपयांत ६३¾ पै असा निश्चित केला. म्हणजे, तो ७४ पै वरून ६३¾ पैवर खाली आला. कंपनी कायदा व विमा कायदा यांचे खालीं नोंदण्यांत आलेल्या कंपन्यांना अशा रीतीनें थोडीशी सवलत मिळाली. बॉबे को. इन्शुअरन्स सोसायटी ही सहकारी सोसायटी असल्यानें तिला प्रथमपासूनच कांहीं विशेष सवलत आहे, ती म्हणजे व्यक्तींवर बसविण्यांत आलेला कमाल इनकमटॅक्सचा दरच तिला लागू आहे. त्यामुळें, तिचेवरील इनकमटॅक्सचा दर मात्र ५० पैवरून ५४ पैवर गेला आहे ! इतर व्यापारी संस्थांच्या पेक्षा सहकारी सोसायट्यांना, त्यांचें विशिष्ट ध्येय लक्षांत घेऊन, अधिक सवलत असावी, असें मूळ धोरण आहे. या दृष्टीनें सहकारी सोसायट्यांवरील इनकमटॅक्सचा दर ४५ पैवर आणणें श्रेयस्कर ठरेल.

१९२५ च्या सहकारी कायद्याच्या ३३ (आय) व्या कलमान्वयें, सहकारी सोसायटचा धारण करीत असलेल्या सरकारी रोख्यांवर इनकम टॅक्स माफ करण्याचा मध्यवर्ती सरकारास अधिकार आहे. हें कलम कायद्यांत घातलेलें आहे, यावरून अशी माफी देण्याचा प्रसंग उपस्थित होईल, अशी स्पष्ट कल्पना त्यावेळीं होती, हें उघड आहे. बॉबे को. इं. सोसायटीस तिचा व्यवहार, विमा कायद्याचें २७ वें कलम व सहकारी कायद्याचें ३७ वें कलम यांचे दृष्टीनें आपल्या जिंदगीच्या ७०% रकम सरकारी रोख्यांतच गुंतवावी लागते. कोणत्याहि सहकारी सोसायटीस इनकमटॅक्समध्यें कांहीं माफी मिळाल्याचें आढळून येत नाहीं, परंतु ती मिळण्याची योग्य परिस्थिति आपल्या सोसायटीच्या संबंधांत आहे.

प्रगतीचें श्रेय आपणांकडे

सह्याद्रि विमा कंपनीनें १९४३ सालीं खालीलप्रमाणें काम केलें आहे.

आलेलें काम	रु. २१, ४४, ४७१	१९४२	५ लक्ष ३ हजारांवें
मंजूर काम	रु. १८, ३५, ७१४	पेक्षां	१ लक्ष ९० हजारांवें
पूर्ण विमा काम	रु. १६, १९, ७७५	वाढ	४ लक्ष ७ हजारांवें

या सर्व प्रगतीचें श्रेय कंपनीचे विमेदार, प्रतिनिधी, प्रचाराधिकारी, भागीदार व हितचिंतक यांनाच आहे व त्याबद्दल आम्हीं त्यांचे आभारी आहोंत. विमा-योजना त्याचप्रमाणें एजन्सी याच कंपनीची अत्यंत आकर्षक.

नाशिक — मॅनेजिंग डायरेक्टर

झिकडे तिकडे प्रशंसा

इमिटेशन दागिन्यांवर रासायनिक क्रिया करून खऱ्या सोन्याचा पत्रा चढविला जातो त्यामुळें दागिना केव्हांही खराब होत नाहीं, ही पूर्ण खात्री झाली. सोन्याचा पत्रा चढविलेल्या चार बांगड्या कि. आठ रु. गॅरेन्टेड दागिना परत करणें झाल्यास पत्रा चढविलेल्या सोन्याचे सर्वच्या सर्व पैसे परत देऊं.

मट कं. सांगली, S. M. C.
मट कंपनी शाखा—बुधवार पेठ, पुणें २.

पुण्यांतील
आदर्श निवासस्थान व भोजनालय
छाया लॉजिंग व बोर्डिंग हाऊस
बुधवार चौक, पुणें २.

☆ नगर वाँचे ट्रेडिंग कंपनी ☆

चिनाब, लाइमज्यूस कॉर्डीअल, ऑरेंज व लेमन स्क्वॉश, टोमॅटो सॉस,
मँगो जॅम, मध, कोको, बेकिंग पावडर, सॅनिटरी टॉवेल्स,
टुथ पेस्ट, टुथ ब्रश, वगैरे मालाचे
स्टॉकिस्ट.

शाखाः— माणिक चौक, अहमदनगर
हेड ऑफिसः— पूना गेस्ट हाऊस, पुणें २

स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

गिरगांव मुंबई नं. ४

महिद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

न्यू इंडिया इंडस्ट्रीज लि.

(Approved Re-traders and Approved Contractors)
२६ लॅमिंग्टन नॉर्थ, मुंबई ११.
अध्यक्षः—श्री. ग. स. मराठे, ॲक्चुअरी.

महाराष्ट्रांतील रबराचा प्रमुख कारखाना

★ गिरणीचे रोलर्स ★ रबरी हातमोजे ★ छापखान्यांचे रोलर्स
★ रीमोल्ड टायर्स ★ रबरी वॉशर्स ★ सॉलिड व्हील्स

व इतर रबरी माल तयार होतो.

पु. ग. मराठे
मॅनेजिंग डायरेक्टर.

हें पत्र पुणें, पेठ सांवुर्डा प. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत ए. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व ए. श्रीपाद रामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' सांवुर्डा, प. नं. ९२७।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चोकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाविलास' पुणें ४.

अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
(टपाल खर्चाचे माफ)
किरकोळ अंकास
दोन आणे.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष १० पुणें, बुधवार, तारीख १९ जुलै, १९४४ अंक २९

Telephone 779

TELEGRAM
Guest House
Poona 2.

जाहीर प्रकटन.

कळविण्यास आनंद वाटतो कीं, दि. २५ मे १९४४ रोजीं बंद करण्यांत आलेलें आमचें जेवणाचें खातें दि. २५ जुलै १९४४ पासून नेहमींप्रमाणें नवीन व्यवस्थेखालीं सुरू करण्यांत येणार आहे. तरी आमच्या पूर्वीच्या आश्रयदात्यांस अशी विनंति आहे कीं, त्यांनीं आपापल्या शिधापत्रिका पूर्वीप्रमाणेंच पुना गेस्ट हाऊसच्या नांवावर बदलून घेण्यासाठीं आमचेकडे दि. २० जुलैचे आंत आणून द्याव्यात. मध्यंतरीच्या काळांत आमच्या आश्रयदात्यांची जी गैरसोय झाली त्याबद्दल आम्ही अत्यंत दिलगीर आहोंत.

पूना गेस्ट हाऊस.
गणपति चौक, लक्ष्मी रोड, पुणें २.

न्यू इंडिया इंडस्ट्रीज लि.

(Approved Re-traders and Approved Contractors)
२६ लॅमिंग्टन नॉर्थ, मुंबई ११.
अध्यक्षः—श्री. ग. स. मराठे, ॲक्चुअरी.

महाराष्ट्रांतील रबराचा प्रमुख कारखाना

★ गिरणीचे रोलर्स ★ रबरी हातमोजे ★ छापखान्यांचे रोलर्स
★ रीमोल्ड [illegible] ★ रबरी वॉशर्स ★ सॉलिड व्हील्स

व इतर रबरी माल तयार होतो.

पु. ग. मराठे
मॅनेजिंग डायरेक्टर.

WANTED

Agents to represent Sun Life Assurance Co. Of Canada in Ahmednagar, Jalgaon, Kolhapur, Nasik & Sholapur. Excellent opportunities for capable and successful men. Full training will be given.

Apply to:—

Mr. P. V. Lad,
Unit Organizer.
Sun Life Of Canada, Laxmi Rd., POONA 2.

JUST PUBLISHED

INDIAN RURAL PROBLEM

BY

Sir Manilal Nanavati and Prof. J. J. Anjaria.

(Issued by the Indian Society of Agricultural Economics, Bombay).

Price Rs. 8
(Postage extra).
Sole Selling Agents:—
THE CO-OPERATORS' BOOK DEPOT.
9, BAKEHOUSE LANE,
FORT, BOMBAY.

विविध माहिती

पंजाबमध्ये गव्हाच्या उत्पादनांत घट

पंजाबमध्ये गव्हाच्या लागवडीत ५% घट असून उत्पादनांत १४% घट अपेक्षित आहे.

महाराष्ट्र चेंबरचा कायमनिधि

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, मुंबईनें कायमनिधि जमविण्यास प्रारंभ केला आहे, त्याचा उद्देश चेंबरसाठी स्वतःची इमारत उभारून स्थैर्य आणणें व चेंबरची उपयुक्तता वाढविणें, असा आहे. ६ जुलै अखेर ह्या निधीस ७७½ हजार रुपयांच्या देणग्या मिळाल्या आहेत.

बँक ऑफ नागपूर लि., वर्धा

वरील बँकेचें नांव आतां शेडयूल्ड बँकांच्या यादींत दाखल करण्यांत आलें आहे.

रहाणीचा वाढता खर्च

हिंदुस्थानांतील शहरांतून रहाणीच्या खर्चाचें मान वाढलें आहे, तें गरीब वर्गाच्या दुःस्थितीचें लक्षण नसून शहरी लोकांच्या चलनीचें तें लक्षण आहे, असें सरकारी कॉमर्स खात्याच्या अधिकाऱ्यानें नुकतेंच सांगितलें.

मध्यवर्ती सरकारचीं कर्जे

एप्रिल ते जुलै, १९४४ या मुदतींत हिंदुस्थान सरकारच्या कर्जात लोकांनीं ३७ कोटि रुपये गुंतविले. त्यापैकी १५½ कोटि रुपये ३% व्हिक्टरी लोन (१९५७) च्या वाटणीस आले व २१½ कोटि रुपये इतर कर्जाचे वाट्यास आले.

नियंत्रित दरानें छत्र्यांची विक्री

कांहीं निवडक दुकानांत १½ लक्ष छत्र्या नियंत्रित किंमतीस विक्रीस ठेवण्याचें बंगाल सरकारनें ठरविलें आहे.

रिझर्व्ह बँकेच्या रिपोर्टाच्या प्रति

रिझर्व्ह बँकेच्या मध्यवर्ती मंडळाच्या अहवालाची प्रत प्रत्येक भागदारास देणें चालू वर्षी कागद नियंत्रणामुळें शक्य होणार नाहीं. थोड्याशाच प्रती छापण्यांत येतील व प्रतीची मागणी करणारासच प्रती संपेपर्यंत त्या देण्यांत येतील. दिशेबाचे तक्के मात्र सर्वांस मिळतील.

पुणें येथील सहकारी शाळेचें उद्घाटन

मुंबई प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूटतर्फे पुणें येथें स्थापन झालेल्या सहकारी शाळेचें उद्घाटन सोमवार ता. १७ जुलै रोजीं पुणें सें. को. बँकेच्या दिवाणखान्यांत प्रो. वा. गो. काळे ह्यांचे हस्तें झालें. प्रारंभीं शाळेचे ऑनररी प्रिन्सिपाल, श्री. श्री. रा. पाळंदे, ह्यांनीं शाळेसंबंधीं माहिती सांगितल्यावर समयोचित भाषण करून प्रो. काळे ह्यांनीं उद्घाटन जाहीर केलें. रावसाहेब वाय. डी. खोले ह्यांनीं आभार मानल्यावर समारंभ संपला.

अमेरिकेची सैनिक हानी—ताजे आंकडे

युद्धास प्रारंभ झाल्यापासून आतांपर्यंत अमेरिकेचे २,३५,४११ सैनिक कामास आले आहेत. त्यांत ५३,६०२ मृत, ९१,५७३ जखमी, ४७,५७५ बेपत्ता व ४२,६५८ युद्धकैदी ह्यांचा समावेश होतो.

कलकत्ता शहरांतील ट्रामवे

कलकत्ता ट्रामवे कं. लि. विकत घेतल्यानंतर शहरांत ट्रामवे चालविण्यासाठी कलकत्ता कॉर्पोरेशननें सरकारची परवानगी मागितली आहे. ट्रामवे ह्या रेल्वेच्या व्याख्येंत येतात, ह्यासाठी रेल्वे बोर्डाच्या परवानगीची आवश्यकता आहे.

अमेरिकन सैनिकांसाठी खास इस्पितळ

पश्चिम आघाडीवर जखमी झालेल्या अमेरिकन सैनिकांसाठी एक स्वतंत्र, संपूर्ण अमेरिकन इस्पितळ इंग्लंडमध्यें २५ लक्ष रुपये खर्चून उघडण्यांत आलें आहे. जखमी सैनिकांना रणक्षेत्रावरून विमानांतून ह्या इस्पितळांत परस्पर पोंचविण्यांत येतें.

ब्रिटिश मोटारींची निर्गत व डाव्या हाताची वहातुक

रस्त्यानें नेहमीं डाव्या बाजूनें वहानें हाकण्याची पद्धत ग्रेट ब्रिटन, चीन, जपान, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, दक्षिण आफ्रिका, मलाया, डच ईस्ट इंडीज, वगैरे देशांत आहेत. अमेरिका, कानडा व युरोपांतील बहुतेक देश ह्यांत रस्त्याच्या उजव्या बाजूनें वहानें चालविलीं जातात. जगांतील सर्व देशांमध्यें ह्यासंबंधांत एकवाक्यता झाली तर मोटारींच्या उत्पादनास व निर्गत व्यापारास तें सोईचें होणार आहे. ह्या दृष्टीनें, ग्रेट ब्रिटन त्याच्या सोईच्या दृष्टीनें डाव्या हाताच्या वहातुकीचें समर्थन करील, कारण तो जेथें मोटारी निर्गत करूं शकेल तेथें डाव्या हातानेंच वहातुक चालू आहे. युरोप कांहीं वर्षे तरी ब्रिटिश मोटारी घेऊं शकणार नाहीं. हिंदुस्थान व चीन येथील खपावरच त्याचा डोळा आहे.

अनुक्रमणिका

	पृष्ठ
१ विविध माहिती ...	२२६
२ अन्न-वस्त्राचा पुरवठा...	२२७
३ १९४३ चें विमा वार्षिक	२२८
४ स्फुट विचार	२२९
संरक्षक व संवर्धक अन्नांचें महत्त्व—हिंदी अन्नाची सत्वहीनता—स्टर्लिंग शिलकांचें सत्यस्वरूप—सोनारानें कान टोचले.	
५ आजचा जपान ...	२३१
६ बँक ऑफ इंडिया लि.	२३१
७ लिमिटेड कंपनीचा दिवाळखोर डायरेक्टर ...	२३१

अर्थ

बुधवार, ता. १९ जुलै, १९४४

अन्न-वस्त्राचा पुरवठा

मनुष्याच्या जीवनांत अन्न आणि वस्त्र ह्या दोन वस्तूंस विशेष महत्त्व नैसर्गिक रीतीनेंच आहे. युद्ध चालू असतांना ह्या वस्तूंचा पुरवठा, वाटणी व किंमती ह्यांचेसंबंधांत नेहमीचा सुरळीतपणा रहात नाहीं आणि मामुली देवघेवीच्या पद्धतीनें आवश्यक तो कार्यभाग समाधानकारकपणानें होत नाहीं. ह्या कारणानें सैन्याच्या अन्नवस्त्राविषयींच्या गरजा भागवून सामान्य जनतेचें रोजचें जीवन शक्य तितक्या व्यवस्थेनें चालेल अशा बेतानें सरकारास धान्य, कापड, इत्यादींचा देशांत नीट पुरवठा व वाटणी करण्याची जबाबदारी स्वतःच्या अंगावर घ्यावी लागते. गेल्या वर्षी बंगालमध्यें लोकांवर आलेल्या दुष्काळाच्या आपत्तीमुळें ह्या प्रश्नाची विस्तृत चर्चा झाली आहे आणि होत आहे. शहरवासी आणि खेडेगांवी जनतेस जरूरी इतकें अन्न मिळेल अशी तरतूद सरकारनें करावी आणि बंगालच्या दुष्काळाची पुनरावृत्ति त्या प्रांतांत व इतरत्र हिंदुस्थानांत होऊं नये ह्याविषयीं त्यानें खबरदारी घ्यावी अशी मागणी होत आहे त्याचें कारण उघड आहे. धान्याचें उत्पादन हरतऱ्हेनें वाढवण्याची प्रांतिक सरकारांची खटपट चालली आहे ती यशस्वी होण्यास शेतकऱ्यांस जरूर असलेलीं बीं-बियाणें, खतें व बैल ह्यांचा पुरवठा वेळींच केला जाणें आवश्यक आहे. तसेंच, धान्य जमा करणें आणि त्याची प्रमाणबद्ध वांटणी करणें ह्यांचे बाबतींत आतांपर्यंत आलेल्या अनुभवापासून बोध घेतला जाऊन त्यासंबंधांत योग्य त्या सुधारणा व्हाव्या अशा सूचना करण्यांत आल्या आहेत त्यांकडे लक्ष पुरवलें गेलें पाहिजे. बंगालमधील दुष्काळाचीं कारणें शोधून काढून तीं नाहींशीं होण्यास कोणते उपाय योजणें आवश्यक आहे ह्या बाबतींत शिफारस करण्यासाठी एक कमिशन नेमण्यांत आलें आहे. ह्या चौकशीच्या क्षेत्रांत अन्नपुरवठ्याच्या व्यवस्थेचे सर्व प्रश्न अंतर्भूत व्हावे अशाबद्दल कॉमन्स सभेंत प्रश्नोत्तरें झालीं असून मि. एमरी ह्यांनीं आश्वासनात्मक विधानें केलीं आहेत.

धान्याचें उत्पादन वाढवण्याची ह्या देशांत शिकस्त झाली तरी बाहेरून धान्याचा पुरवठा ग्रेगरी समितीच्या सूचनेस अनुसरून न झाल्यास अन्नाची टंचाई भासण्याचा संभव आहे अशा आशयाचें एक पत्रक कित्येक वजनदार हिंदी पुढाऱ्यांनीं प्रसिद्ध केलें होतें, त्याचाहि प्रतिध्वनि कॉमन्स सभेंतील प्रश्नोत्तरांत उठला आहे. दहा लक्ष टन इतकें तरी धान्य ह्या देशांत आयात झालें पाहिजे. ह्यापैकीं येत्या ऑक्टोबर अखेर आठ लक्ष टन धान्य इकडे येईल असें उत्तर मि. एमरी ह्यांनीं दिलें आहे आणि ह्या प्रश्नाचा विचार पुन्हां ऑगस्ट व नोव्हेंबर ह्या महिन्यांत केला जाईल असें म्हटलें आहे. समुद्रावरील वहातुकीची अडचण त्यांनीं पुन्हां पुढें मांडली आहे आणि ब्रिटिश सरकार अवघड परिस्थितींतहि हिंदुस्थानास धान्य पुरवण्याचा प्रयत्न करीत असल्याचें आश्वासन दिलें आहे. हिंदी जनतेचीं मनें धान्यपुरवठ्याचे संबंधांत स्वस्थ रहातील असा प्रचार केला जावा असेंहि त्यांनीं सुचवलें आहे, तें ठीक आहे. परंतु हिंदुस्थानांत अन्नतुटवडा पडूं नये ह्यासाठी ग्रेगरी समितीनें केलेल्या शिफारसींची अंमलबजावणी होण्याचें महत्त्व हिंदी पुढाऱ्यांनीं प्रतिपादलें असून सरकारनें वेळींच सावध रहावें असें त्यास बजावलें आहे त्याचा समाधानकारक निकाल मि. एमरी ह्यांच्या उत्तरानें झालेला नाहीं. कॉमन्स सभेंतील प्रश्नांवरूनहि हीं गोष्ट उघड होत आहे. देशामध्यें धान्य-निर्मिति भरपूर होऊन अन्नटंचाई जनतेस भासूं नये, अशीच सर्वांची इच्छा आहे, तथापि, सावधगिरीचें धोरण फाजील आशावादापेक्षा केव्हांहि अधिक इष्ट आहे हें विसरतां कामा नये.

वस्त्रनियंत्रण मंडळाचे अध्यक्ष श्री. कृष्णराज ठाकरसी ह्यांनीं कापडाचें उत्पादन, पुरवठा व किंमती ह्यांचेविषयीं माहिती नुकतीच दिली ती बरीच आशादायक आहे असें म्हटलें पाहिजे. नियंत्रणापूर्वी कापडाचे भाव भरमसाट चढले होते, त्यांत आतां साठ टक्के घट झाली आहे हा त्यांचा पहिला मुद्दा होता. गिरणीवाल्यांनीं स्वतःच प्रयत्न करून क्रमाक्रमानें कापड स्वस्त केलें आणि सरकारच्या सक्तीनें हा परिणाम घडवून आणलेला नाहीं, ह्या गोष्टीवर त्यांनीं अभिमानपूर्वक जोर दिला. किंमतींत घट झाली तरी कापडाचें उत्पादन विशेष वाढलेलें नाहीं, ह्या कित्येक टीकाकारांकडून घेण्यांत येणाऱ्या आक्षेपास उत्तर म्हणून श्री. कृष्णराज ह्यांनीं कांहीं आंकडे पुढें मांडले आहेत. कोळशाचा तुटवडा आणि कुशल कारागिरांची वाण ह्यामुळें गिरण्यांच्या कांहीं केंद्रांत कापडाचें उत्पादन मर्यादित झालें आहे ही गोष्ट खरी असली तरी युद्धापूर्वी हिंदी गिरण्यांत ३५० कोटि वार कापड तयार होत होतें, तें गेल्या वर्षी ४८० कोटि वारांपर्यंत वाढलें. हातमागांचें उत्पादन २०० कोटि वार ह्यांत मिळवलें तर एकूण पुरवठा ६८० कोटि वार होतो. ह्यापैकीं निर्गत व लष्करी मागणी ह्यांकरितां लागणारे १२० कोटि वार वजा केले असतां ५६० कोटि बाकी राहतात. हें लक्षांत घेतलें असतां कापडाच्या उत्पादनाचे संबंधांत घेण्यांत येणारा आक्षेप फोल असल्याचें दिसून येईल असें कृष्णराज ह्यांनीं म्हटलें आहे. चोरबाजाराचें नियंत्रण कडक आणि यशस्वी रीतीनें अंमलांत आणल्याबद्दल त्यांनीं मुंबई सरकार आणि प्रांतिक नियंत्रण अधिकारी ह्यांचें अभिनंदन केलें पण त्याचबरोबर कित्येक प्रांत आणि संस्थानें ह्यांमध्यें सद्ररहु बाबतींत ढिलाई असल्यामुळें कापड भरमसाट भावानें खरेदी होऊन विकण्यांत येतें ह्याविषयीं खेद व्यक्त केला. बाहेरचे व्यापारी वाटेल त्या किंमती देऊन कापड विकत घेऊन भरमसाट नफा मिळवीत आहेत ह्या कारणानें मुंबईसारख्या ठिकाणींहि चोर बाजारास उत्तेजन मिळतें असें

श्री. कृष्णराज झांची तक्रार आहे. जेथें नियंत्रण कमी अधिक प्रमाणांत यशस्वी रीतीनें चालू आहे अशा क्षेत्रांस स्वस्त कापड मिळत नाहीं आणि तें नियंत्रणाचा अभाव असलेल्या बाजारांत जातें असें त्यांचें म्हणणें आहे. कापडाची वाटणी देशभर आतां पूर्वीपेक्षा अधिक समाधानकारक असल्याविषयीं माहिती त्यांनी दिली. नियंत्रण अधिक कडक करून जनतेची कापडाची गरज योग्य तऱ्हेनें भागवण्यांत यादी अशी त्यांनीं सूचना केली असून ह्या कामीं गिरण्यांचे मालक हार्दिक सहाय देतील असें अभिवचन दिलें आहे. उंची जातींच्या कापडास असलेली मागणी आज पुरवतां येत नसली तरी सामान्य जनतेस लागणाऱ्या मालाचें उत्पादन पुरेसें आहे आणि तें स्वस्त झालें आहे व होत आहे हा श्री. कृष्णराज झांच्या निवेदनाचा सारांश आहे.

१९४३ चें हिंदी विमा वार्षिक

१९४३ चें हिंदी विमा वार्षिक नुकतेंच प्रसिद्ध झालें आहे, त्याच्या फक्त ४,००० च प्रती छापण्यांत आल्या आहेत. प्रतींचा तुटवडा पडला, तर ज्याचेजवळ प्रत असेल त्यानें दुसऱ्याची सोय पहावी, अशी सूचना विमा वार्षिकांत देण्यांत आली आहे.

* * *

विमा कायद्यान्वयें नोंदलेल्या ३१४ कंपन्यांपैकी २२० कंपन्या हिंदुस्थानांत स्थापन झालेल्या आहेत. ह्या २२० कंपन्यांपैकी ८४ कंपन्यांच्या मुख्य कचेऱ्या मुंबई प्रांतांत, ५१ बंगालमध्यें, ३५ मद्रास प्रांतांत, १७ पंजाबांत व १३ दिल्लीमध्यें आहेत. एकूण ९२ विदेशी कंपन्यांपैकी ८२ कंपन्या ग्रेट ब्रिटन किंवा ब्रिटिश वसाहती ह्यांतील आहेत.

* * *

हिंदी कंपन्यांपैकी १५५ कंपन्या फक्त आयुर्विम्याचें काम करतात. ३१ कंपन्या फक्त इतर विमे स्वीकारतात. ३४ कंपन्या आयुष्याचे व इतर विमे घेतात. ९२ विदेशी कंपन्यांपैकी फक्त ५ कंपन्या केवळ आयुर्विम्याचें काम करतात व ७६ कंपन्या फक्त इतर प्रकारचेच विमे स्वीकारतात.

* * *

१९४१ च्या वार्षिकापेक्षां हें वार्षिक चार महिने लवकर चालू वर्षी प्रसिद्ध झालें आहे. ३१ डिसेंबर, १९४३ रोजीं हातीं आलेल्या माहितीवरून १९४२ चें वार्षिक तयार करण्यांत आलें. पूर्वीप्रमाणें एप्रिल, मे पर्यंत वाट पाहिली नाहीं. विमा कंपन्यांनीं वर्ष संपल्यानंतरच्या जून अखेर तक्के व माहिती पाठविली तर विमा वार्षिक अधिक लवकर प्रसिद्ध होऊं शकेल. १९४२ संबंधीं माहिती वेळेवर पाठविली नाहीं म्हणून १९४३ सालीं विमा कायद्याच्या १०२ कलमानुसार २३ कंपन्यांना नोटिसा पाठवाव्या लागल्या.

* * *

हिंदी विमा कंपन्यांनीं आपल्या ९६½ कोटि रुपये जिंदगी-पैकी ५४ कोटि, १४ लक्ष रुपये सरकारी रोख्यांत गुंतविलेले आहेत. कंपन्यांनीं दिलेल्या सोड किंमतीच्या आंतील कर्जाची रकम ८ कोटि, ५९ लक्ष रुपये भरली. त्यांनीं ७ कोटि, ९३ लक्ष रुपयांचे हिंदी कंपन्यांचे माग घेतलेले आहेत. म्युनिसिपल, पोर्ट ट्रस्ट, म्यूव्हमेंट ट्रस्ट, इत्यादींच्या रोख्यांत त्यांचे ६ कोटि, ७४ लक्ष रुपये आहेत आणि जमीन व माडमत्ता ह्यांत त्यांनीं ५ कोटि, ७७ लक्ष रुपये घातले आहेत.

* * *

हिंदी आयुर्विमा कंपन्यांच्या विमाफंडांवर पडणारा व्याजाचा दर व व्यवस्थेच्या एकूण खर्चाचें हप्त्यांच्या उत्पन्नाशीं पडणारें प्रमाण हीं उतरत चालली आहेत, हें खालील तक्का दर्शवितो. उतरतें खर्चाचें प्रमाण ही अर्थातच समाधानाची बाब आहे.

वर्ष	१९३८	१९३९	१९४०	१९४१	१९४२
द. सा. द. शे. व्याज	५.१५	४.६८	४.३७	४.१७	३.९४
खर्चाचें प्रमाण	३१.७	३३.२	२८.९	२७.४	२७.७

* * *

नवीन आयुर्विमा कंपन्या काढणारांना व आयुर्विमा कंपनीच्या कामास आगीचा व इतर विमे ह्यांची जोड देऊं पहाणारांना सुपरिंटेंडेंट ऑफ इन्शुअरन्सनें सावधगिरीची सूचना दिली आहे. १९३३ सालीं हिंदुस्थानांत ३३ कोटि रुपयांचे नवे विमे कंपन्यांनीं स्वीकारले; १९४२ सालीं हा आकडा ४३ कोटि रुपये झाला. १९४३ सालीं ह्यापेक्षा पुष्कळ जास्त काम झालें असलें तरी नव्या कंपन्यांच्या स्थापनेचे प्रमाणांत विम्याचें काम वाढत चाललेलें नाहीं.

* * *

विमे रद्द होण्याचें भारी प्रमाण, हें भरमसाट रिन्युअल खर्चाच्या भारी प्रमाणाचें मुख्य कारण असतें. पांच जुन्या कंपन्या व पांच नव्या कंपन्या ह्यांनीं १९३८ सालीं स्वीकारलेल्या विम्यापैकी किती टक्के विमे १९४० अखेर २½ वर्षांत लॅप्स झाले, हें पाहिलें, तर पहिल्या गटांतील कंपन्यांचें २९.१६% काम रद्द झालें व दुसऱ्या गटांतील कंपन्यांचें ५३.९३% काम रद्द झालें, असें आढळून आलें. एका पुऱ्या वर्षाचा हप्ता कंपनीकडे दाखल होण्यापूर्वीच पॉलिसी लॅप्स झाली आणि कित्येक कंपन्यांचा पॉलिसीवरील खर्चच पहिल्या वर्षाच्या हप्त्यापेक्षा जास्त असतो हें लक्षांत घेतलें, तर कंपन्या किफायतशीर कशा चालणार ?

* * *

मलाया, ब्रह्मदेश, वगैरे शत्रुव्याप्त देशांत अडकलेल्या विमेदारांस, युद्धकैद्यांस व निर्वासितांस कित्येक कंपन्यांनीं सवलती दिल्या आहेत व विशेषतः एका कंपनीनें तर फारच सढळ हातानें त्यांस सवलती दिलेल्या आहेत, त्यांचा उल्लेख विमावार्षिकांत करण्यांत आलेला आहे.

* * *

हिंदुस्थानांत ॲक्चुअरीचें काम करणारे एकूण १४ फेलोज व २९ असोसिएटस आहेत. फेलोजमध्यें श्री. जी. एस. दिवाण व श्री. एस. एन. वैद्य हीं महाराष्ट्रीय नांवें आढळतात. त्यांपैकी श्री. दिवाण हे मुंबईस सरकारी सिडनहॅम व्यापारी कॉलेजांत प्रोफेसर असून ॲक्चुअसीचेंहि काम करतात व श्री. वैद्य हे ओरिएंटल कंपनींत आहेत. (असोसिएटसच्या व्यवसायावर सरकारनें आतां बंधनें घातली असून त्यांना पूर्वीप्रमाणें मोकळेपणानें धंदा करतां येणें अशक्य झालें आहे.)

* * *

स्फुट विचार

संरक्षक व संवर्धक अन्नाचें महत्त्व

हिंदुस्थानांत अन्नपुरवठ्याच्या प्रश्नाचा विचार करतांना अधिकारी वर्ग व कांहीं पुढारीहि मुख्यतः धान्याकडेच लक्ष देतात. दूध व त्याचे पदार्थ, भाजीपाला, फळें, अंडीं, मासे, मांस इत्यादि संरक्षक व संवर्धक अन्नाकडे दुर्लक्ष केलें जातें. वास्तविक पहातां मनुष्यामध्यें रोगप्रतिबंधक शक्ति आणण्यास व त्यांची ताकद राखण्यास त्यांचाच उपयोग जास्त होतो. त्याचप्रमाणें शरीराच्या वाढीसहि त्यांची आवश्यकता असते. अशा खाद्य पदार्थांचें एकूण अन्नांतील महत्त्व निदर्शनास आणण्यासाठी मुंबईच्या पपिल्स प्रॉव्हिन्शिअल फूड कौन्सिलनें एक चोपडें तयार केलें आहे, तें पद्म पब्लिकेशन्स लि. मुंबई, ह्यांनीं प्रसिद्ध केलें आहे. (" Protective Foods ". पृ. सं. १८ किं. ८ आणे.) ग्रेटब्रिटनमध्यें युद्धास प्रारंभ झाल्यापासूनच अन्नपुरवठा नियंत्रित केला आहे, व धान्य ठराविक किंमतीस विकण्यांत येतें, परंतु त्यांचें रेशनिंग नाहीं. संरक्षक व संवर्धक अन्नांचें मात्र तेथें रेशनिंग आहे. हिंदुस्थानांतील मजूरवर्ग आज बव्हंशीं धान्यावरच जगतो, म्हणून हिंदी लोकांना धान्याचें रेशनिंग झालें म्हणजे पुरे, अशी समजूत होण्याचा संभव आहे मुंबई प्रांतांतील कामगारांच्या मानानें पंजाबी कामगारांस पुष्कळच सकस अन्न खावयास मिळतें व त्यांची वाढ आणि त्यांचा उत्साहहि इंग्रजांच्या तोडीचा असतो. आपल्या इकडे धान्यापलीकडे अन्नाचा विचारच होऊं शकत नाहीं, ही परिस्थिति पालटली पाहिजे व त्यासंबंधांत प्रचार झाला पाहिजे. शेतकरी, कामगार व मध्यमवर्गीय लोक ह्यांना केप्रळ धान्यावरच निर्वाह करावा लागतो, ह्याचें कारण त्यांचें दारिद्र्य व संवर्धक अन्नांची महागाई, हें होय. गेलीं पन्नास वर्षे त्यांच्या अन्नाच्या कसदारपणांत हळु हळु बिघाड होत आहे व चालू युद्धामुळें ही परिस्थिति तीव्रतेनें डोळ्यांत भरूं लागली आहे आणि लोकांचा दमदारपणा कमी होत असलेला उघड दिसूं लागला आहे. औद्योगिक क्रांतीच्या प्रारंभींचे काळांत इंग्लंडमध्येंहि शेतकरी व कामगार ह्यांवर असाच परिणाम झाला, परंतु तेथील त्या वेळच्या सरकारनें योग्य उपाययोजना करून बदललेल्या परिस्थित्यनुसार व्यवस्था करवली.

हिंदी अन्नाची सत्वहीनता

संरक्षक व संवर्धक अन्नाचें महत्त्व वर्णून " प्रोटेक्टिव्ह फूड " ह्या चोपड्यांत भाजीपाला, फळें, अंडीं, मासे, इत्यादींविषयीं विचार केलेला आहे. हिंदी कामगारांस लागणाऱ्या कॅलरी उष्णतेपैकी ९०% त्यांस धान्य व साखर ह्यांपासून मिळतात आणि ५% तेलांपासून व ५% संरक्षक अन्नापासून मिळतात. ब्रिटिश कामगारांचे तत्सम आकडे अनुक्रमें ६०%, १८% व २२% असे आहेत. ह्यावरून हिंदी जनतेच्या अन्नाची सत्वहीनता लक्षांत येईल. शाकाहारी माणसानें दररोज निदान १२ औंस दूध व १ औंस लोणी अथवा तूप घेतलें पाहिजे. शक्य झालें तर शेतकऱ्यांनीं व कामगारांनीं अर्ध्या शेरापेक्षा जास्त धान्य दररोज खाऊं नये; बाकीचा आहार संरक्षक अन्नाचा असावा. संयुक्त राष्ट्रांची हॉटस्प्रिंग्ज येथें मे-जून १९४३ मध्यें परिषद् झाली, तिनें संरक्षक अन्नांच्या उत्पादनासंबंधीं ठराव केला त्यावर हिंदुस्थान सरकारच्या प्रतिनिधींनीं सही केली आहे. ह्या ठरावांची अंमल बजावणी सुरू होणें उचित नव्हे काय ? वरील-प्रमाणें विवेचन केल्यानंतर, चोपड्यांत अशा अन्नांचें उत्पादन व त्याची वाटणी ह्यांविषयीं विधायक सूचना करण्यांत आल्या आहेत. लोकांना स्वतः यासंबंधांत बरेंच कार्य करतां येईल व त्यांनीं सरकारच्या " अधिक धान्य पिकवा " मोहिमेनुसार मिळणाऱ्या सवलती व आर्थिक मदत ह्यांचा फायदा घेणें जरूर आहे. एका दृष्टीनें सध्याची युद्ध परिस्थिति ह्या योजनांच्या पुरस्कारास विशेष सोईची आहे, कारण ज्या गोष्टी युद्धकालांत सत्वर होऊं शकतात, त्याच घडवून आणण्यास शांततेच्या वेळीं फार वेळ लागतो. सहकारी संघटना ह्याबाबत विशेष सोईची व प्रभावी ठरण्याजोगी आहे. प्रत्यक्ष कार्याची आखणी व उभारणी करणें अवघड असलें तरी प्रश्नाचें महत्त्व लक्षांत घेऊन सरकारनें त्यांत विशेष जिव्हाळ्यानें लक्ष घाललें पाहिजे व लोकांनींहि आपण होऊन संघटित प्रयत्न केले पाहिजेत.

स्टर्लिंग शिलकांचें सत्यस्वरूप

युद्धापूर्वी लंडन हें आंतरराष्ट्रीय देवघेवींच्या व्यवहाराचें फार मोठें केंद्र होतें आणि राष्ट्रांच्या देण्याघेण्याची वजावाट त्याच्या मार्फत होत असे. पौंड स्टर्लिंगला जगाच्या बाजारांत प्रचंड महत्त्व होतें आणि लंडनवरील हुंडीस जबर मागणी असे. बहुतेक राष्ट्रें लंडनच्या मार्गानें आपलीं परदेशीय देणीं देऊन टाकण्यास सोईचें पडावें म्हणून स्वतःचा कांहीं पैसा त्या ठिकाणीं नेहमीं शिल्लक ठेवीत असत. प्रस्तुत युद्धाच्या परिस्थितींत इंग्लंडला बाहेरून यावयाच्या येण्यापेक्षां इतर देशांचें देणेंच अधिक झाल्यानें ह्या देशांच्या शिलका लंडनमध्यें तुंबल्या आहेत. इंग्लंडला दुसऱ्या देशांस माल किंवा भांडवल पुरवणें युद्ध कार्यामुळें अशक्य झालें आहे आणि त्यास परदेशांचा माल घेतल्यानें इतरांचें देणेंच झालें आहे. ह्या देण्यांतला कांहीं भाग इंग्लंडनें आपली परदेशांतली भांडवलाची गुंतवण कमी करून म्हणजे तेथील रोखे विकून फेडला आहे, पण बरेंचसें देणें दुसऱ्या देशांच्या लंडनमधील बादयांच्या स्वरूपांत वाढलें आहे. निरनिराळ्या देशांच्या स्टर्लिंगमधील शिलकांचे आकडे खाली दिले आहेत ते बोधप्रद होतील:—

कोणाची शिल्लक बाकी	वर्ष व महिना	दशलक्ष पौंड स्टर्लिंग
हिंदुस्थान	एप्रिल, १९४४	७२१
आयर्लंड	डिसेंबर, १९४३	१३३
कॅनडा	.....	१५७
मलाया	जुलै, १९४१	५८
ऑस्ट्रेलिया	जानेवारी, १९४४	७४
न्यूझीलंड	नोव्हेंबर, १९४३	३१
आर्जेंटिना	डिसेंबर, १९४३	४२
इजिप्त	डिसेंबर, १९४३	९५
बलाइती	मार्च, १९४३	४५
दक्षिण आफ्रिका	एप्रिल, १९४४	१४
	एकूण	१,३७५

इंग्लंडनें गेल्या चार वर्षांत दुसऱ्या देशांचें कर्ज फेडण्यासाठी स्वतःच्या मालकीचे परदेशांतील रोखे, सोनें, मालमत्ता इत्यादि विकून टाकली व नवें कर्ज केलें, त्या सर्वांची एकूण बेरीज २,८४३ दश दक्ष पौंड भरते. यावरून इंग्लंडच्या प्रचंड युद्धखर्चाची कल्पना येते. तसेंच, वर दिलेल्या आकड्यांवरून हिंदुस्थाननें इतर देशांच्या मानानें स्वतः झीज सोसून युद्धखर्चास किती मोठ्या प्रमाणांत सहाय दिलें आहे हें स्पष्ट दिसून येतें. लंडनमधील स्टर्लिंग शिलका म्हणजे हिंदुस्थाननें युद्ध व्यवहारांत मिळवलेला नफा नव्हे. स्वतःच्या पोटास चिमटा लावून ह्या देशानें इंग्लंडला युद्धखर्चासाठी शेकडो कोटि रुपये गरजेच्या प्रसंगी पुरवले त्याचा हा परिणाम आहे हें जितकें स्पष्टपणानें सर्वांच्या लक्षांत येईल तितकें तें अगत्याचें आहे.

सोनारानें कान टोचले

जागतिक चलन परिषदेमध्यें हिंदुस्थानच्या प्रतिनिधींनी केलेल्या सर्व सूचना फेटाळल्या गेल्यामुळें त्यांची निराशा होऊन आपण तिच्या चर्चेतून अंग काढून घ्यावें असें त्यांस वाटलें असल्यास त्यांत नवल नाहीं. जागतिक चलननिधी निर्माण व्हावयाचा आहे, त्यांतला मोठा हिस्सा हिंदुस्थानास उचलावा लागेल पण ह्या निधीच्या व्यवस्थेवर देखरेख करण्यासाठी कार्यकारी मंडळ नेमण्यांत येईल त्यांत मात्र ह्या देशास कायमच्या हक्काचें स्थान मिळणार नाहीं असें ठरल्यानें हिंदी प्रतिनिधींची निराशा बळावणें स्वाभाविक आहे. "शेळी जाते जिवानिशी आणि खाणार म्हणतो वातड़शी" ह्या न्यायानें लॉर्ड केन्स ह्यांनी हिंदुस्थान युद्ध परिस्थितीमुळें गबर झाला असल्याचे उद्गार काढले, त्यांचा निषेध सर जेरेमी रायस्मन ह्यांस करावा लागून ह्या देशानें युद्धप्रयत्नांत केलेल्या स्वार्थत्यागाविषयीं खुलासा करणें आवश्यक झालें. ह्यावरून हिंदुस्थानच्या जिव्हाळ्याच्या आर्थिक हितसंबंधांची वासलात जागतिक चलन परिषदेंत कशी लागली ह्याची कल्पना येण्यासारखी आहे. हिंदुस्थानचें स्टर्लिंग लंडनमध्यें एवढ्या मोठ्या प्रमाणांत साठलें आहे कीं ह्याची फेड ह्या देशाच्या मागणीस अनुसरून नव्हे तर इंग्लंडच्या सवडीस धरूनच करणें व्यवहार्य आहे असा युक्तिवाद केला जात आहे आणि जागतिक चलननिधींतून वरील फेड होण्याइतकें त्यांत सामर्थ्य नसल्यानेंहि हिंदी प्रतिनिधींची सूचना मान्य होणें शक्य नाहीं असेंहि सांगण्यांत आलें आहे. आमचें स्टर्लिंगमधलें सर्व देणें तात्काळ परत करा किंवा त्याचें रूपांतर डॉलर्समध्यें करा आणि हा सर्व व्यवहार जागतिक गंगाजळींमधून पुरा करा अशी आत्यंतिक स्वरूपाची मागणी हिंदुस्थाननें केलेली नाहीं. युद्धोत्तर आर्थिक पुनर्घटनेस सहायक होईल अशा पद्धतीनें हिंदुस्थानास आपल्या स्टर्लिंग शिलकांचा पैसा परत मिळावा आणि ही सर्व शिल्लक स्टर्लिंगमध्यें गुंतलेली न रहातां डॉलर्समध्यें तिचा बराचसा भाग असावा म्हणजे अमेरिका वगैरे देशांकडून आपणांस माल सोइस्कर रीतीनें आणतां येईल ह्या हिंदी सूचनेंत वावगें काय आहे ? तिला सर जेरेमी रायस्मन ह्यांनीं पाठिंबा दिला आहे हें येथें लक्षांत ठेवलें पाहिजे. इंग्लंडला त्याच्या जबर युद्धखर्चामुळें इतर देशांचें देणें झालें आहे हें जितकें खरें आहे, तितकेंच खरें हें आहे कीं हिंदुस्थाननें महर्गतेच्या व अन्न टंचाईच्या आपत्ती सोसल्यानें ह्या देशांतील लोकांचे पैसे लंडनमध्यें स्टर्लिंग चलनांत गुंतून पडले आहेत. युद्ध संपल्यावर हिंदी लोकांस त्यांच्या स्वतःच्या गरजेप्रमाणें त्या शिलका परत मिळाव्या असें म्हणणें न्यायाचें व सरळ नीतीचें नाहीं काय ? हिंदुस्थान सरकारच्या फडनवीसांनींच स्वतः ह्या देशाची बाजू नीट व स्पष्ट पद्धतीनें मांडली आहे हें चांगलें झालें.

दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

पुणें शहर

मांडवल :

(ता. ३१-५-४४ रोजीं)

अधिकृत व खपलेलें : रु. १०,००,०००
वसूल झालेलें : रु. ५,००,०००
रिझर्व्ह व इतर फंड : रु. १,०८,०००
एकूण खेळतें मांडवल : रु. ७५,००,००० चे वर

—: डायरेक्टर्स :—

श्री. धों. कृ. साठे, चेअरमन,
श्री. वा. पु. वर्दे, प्रो. वा. गो. काळे, श्री. न. ग. पवार,
श्री. श्री. गो. मराठे, श्री. त्रिं. वि. रानडे, श्री. र. चिं. सोहनी,
श्री. फ. दो. पदमजी, श्री. मा. रा. जोशी,
श्री. म. वि. गोखले, श्री. वि. ह. देशमूख

: शाखा :

पुणें ४, दलाल स्ट्रीट, मुंबई, जळगांव, नागपूर.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

सी. व्ही. जोग
मॅनेजर

दि बँक ऑफ इंडिया लि.

[स्थापना : १९०६]

आधिकृत मांडवल ... ... रु. २,००,००,०००
वसूल झालेलें मांडवल ... ... रु. १,००,००,०००
रिझर्व्ह फंड ... ... रु. १,२३,००,०००

मुख्य कचेरी : ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

मुंबईमधील शाखा : युलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

इतर शाखा : अहमदाबाद (मद्र. मुख्य ऑफिस), अहमदाबाद (एलिस ब्रिज शाखा), अहमदाबाद (स्टेशन शाखा), अमृतसर, अंधेरी (मुंबई शेजारीं), बांद्रे (मुंबई शेजारीं), कलकत्ता (क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्क्वेअर), जमशेदपूर, कराची, मद्रास, नागपूर (किंग्जवे), नागपूर (इतवारी बझार), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत, भुज (कच्छ).

लंडन एजन्ट्स : वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

डायरेक्टर्स : सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस. आय.(अध्यक्ष); श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के. नाईट; मि. ए. गेडिस, सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, जी. बी. ई., के. सी. आय. ई., मि. दिनशा के. दाजी; श्री. रामनिवास रामनारायण.

करंट डिपॉझिट अकाउंट्स :

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर १½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही असेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षां कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

बिल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते, सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

एजंट :—एच्. ए. करीमभाई

आजचा जपान

काळाबाजार–रेशनिंग–युद्धप्रचार–अमेरिकेशी शत्रुत्व–नाइलाजाचें युद्ध.

जपानमध्येंहि काळाबाजार आहे. " आमच्या नोकरांना काळ्या बाजाराची माहिती नसती, तर आम्हांला मेजवान्यांसाठी जादा अन्न मिळूं शकलें नसतें" असें कित्येक प्रमुख जपानी लोक म्हणाले. परदेशी व्हिस्कीला कित्येक वर्षें बंदी असली, तरी हॉटेलांत एखादा जपानी खिशांतून "जॉनी वॉकरची" अथवा "ब्लॅक ॲण्ड व्हाइट"ची बाटली काढतांना दिसतो. खाण्याचा जवळजवळ प्रत्येक पदार्थ रेशन केलेला आहे. लोकांच्या आवडी किंवा इच्छा ह्यांवर रेशनचें प्रमाण अवलंबून ठेवलेलें नसून तें शरीराच्या गरजांवर आधारलेलें आहे. औषधें दुर्मिळ आहेत व अर्भकें, बाळंतीण स्त्रिया व आजारी लोक ह्यांनाच दूध मिळतें; आघाडीवरील सैनिकांनाच अंडीं व कोंबड्या मिळतात. दर माणशीं दरमहा पावशेर साखर दिली जाते. कोणासच अगदीं पोटभर खाद्य मिळत नाहीं.अन्न कमी पडून ॲनिमिया होऊं नये,एवढ्या बेतानें रेशन ठरवून बाकी सर्व अन्न युद्ध दीर्घकाळ टिकेल ह्याबेतानें साठवून ठेवण्याचें जपानी वैद्यकीय पुढाऱ्यांचें धोरण असण्याचा संभव आहे.साबण,आगपेटच्या कोळसा, ह्यांचा तुटवडा भासतो. कपड्यांचें रेशनिंग अगदीं कडक आहे. खासगी वापरासाठी पेट्रोल मिळत नाहीं. ट्रामगाड्या व आगगाड्या अगदीं भरून जातात. लोखंड वगैरे धातूंचीं फाटकें, घंटा, स्टोव्ह, इत्यादि सर्व अदृश्य झालीं आहेत. बादशहावर व राष्ट्राच्या अंगीकृत कार्यावर निष्ठा हीं सामान्य माणसाचे अंगीं पूर्णपणें बाणलेलीं आहेत. करमणुकीस बंदी आहे. प्रत्येक जपानी मनुष्य जणूं काय त्याचे एकट्यावरच युद्ध जिंकण्याची सबंद जबाबदारी आहे, अशा भावनेनें वागत असल्याचें दिसतें. पूर्वीची जपानी प्रचारांतील ऐट आतां नाहींशी होऊन, आपले शत्रू जवळ येत चालले आहेत, सध्याचा क्षण जपानी साम्राज्याच्या दीर्घ इतिहासांतील अत्यंत गंभीर असा आहे, वगैरे सांगून प्रचारानें वेगळें स्वरूप धारण केलें आहे.

युद्धास प्रारंभ करण्याची जबाबदारी सर्वस्वी दोस्त राष्ट्रांवर आहे, असें जपानी लोकांना सांगण्यांत येतें. अमेरिका व जपान ह्यांचेमध्यें ऐतिहासिक मित्रत्व जपान्यांना कोठेंच आढळत नाहीं, परंतु अमेरिकेविरुद्ध त्यांचीं गाऱ्हाणीं मात्र अनेक आहेत. अमेरिकेंत जपान्यांना प्रवेश देतांना भेदाभेदाची वागणूक, १९२१-२२ मधील वॉशिंग्टन परिषदेंतील खटका, मँच्युरियासंबंधांत विरोध, आर्थिक युद्ध व लष्करी गळचेपी, ह्या जपान्यांच्या अमेरिकेविरुद्ध कांहीं प्रमुख तक्रारी आहेत. १९४१ मधील वाटाघाटींत अमेरिकेचें धोरण सच्चेपणाचें नव्हतें, जर्मनीविरुद्ध लढण्यास ग्रेटब्रिटनला मदत करण्यासाठी वेळ काढण्याकरितां जपानशीं दिरंगाईचें धोरण त्यानें अंगिकारलें, जपानचा उपमर्द केला, वगैरे गोष्टींचा प्रचार करून पर्ल बंदरावर हल्ला करण्यास्वेरीज जपानला गत्यंतरच नव्हतें, असें जपान्यांना भासविण्यांत येतें. पर्ल बंदराचा हल्ला हा युद्धाचा प्रारंभ नसून आर्थिक युद्धाचें तें लष्करी युद्धांत रूपांतर आहे, आणि जपानचा झेवटीं पुरा पराभव झाला तरी ७ डिसेंबर १९४१ रोजीं जपाननें अंगीकारलेलें धोरण हेंच बरोबर होतें, जपानला दुसरें गत्यंतरच नव्हतें, अशीच तेथील सामान्य जनतेची भावना होईल. जपानी सरकारच्या प्रचाराचें स्वरूप अशा प्रकारचें आहे. राजकीय दृष्ट्या पाहिलें, तर मुख्य प्रधान टोजो व त्याचे साथीदार ह्यांचे हातीं सर्व सत्ता केंद्रीभूत झालेली आहे. मंत्रिमंडळांत, मंत्रिमंडळाबाहेर, जपान देशांत, कोरियांत, चीनमध्यें, इतर पादाक्रांत देशांत, सगळीकडे लष्करी शक्तीच्या उपासकांचें प्राधान्य आहे. बादशहाचे नांवानें हुकूम सोडणाऱ्या कोणाचेंहि डोळे मिटून ऐकण्याची जपान्यांची प्रवृत्ति आहे. होणाऱ्या पराभवाची पुढाऱ्यांस जाणीव असली, तरी सामान्य जनतेंत अंतिम विजयाबद्दल विश्वास निर्माण करण्यांत येतो. शरण येण्यापेक्षां मरण पत्करण्याचा त्यांचा कल आहे.

बँक ऑफ इंडिया लि.

	रु.	आ.	पै
१९४३ च्या पहिल्या सहामाहीचा नफा	३५,८३,१८९	९	१
ह्यांतून इन्कम टॅक्स, सुपर टॅक्स व एक्सेस प्रॉफिट टॅक्स वजा	१६,५०,०००	०	०
उरलेला निवळ नफा	१९,३८,१८९	९	१
मागील हिशेबांतील शिलकी नफा	९,८५,८२७	४	५
एकूण	२९,१९,०१६	१३	६

बँकेचें भरणा झालेलें भांडवल १ कोटि रुपये आहे. त्यावर द. सा. द. शे. ११% (प्रत्येक भागास २ रु. १२ आ.) करमाफ इंटेरिम डिव्हिडंड देण्याचें बँकेच्या डायरेक्टर बोर्डानें ठरविलें आहे. त्यास ५,५०,००० रुपये लागतील. उरलेली २३,८९,०१६ रु, १३ आ. ६ पै ही रकम पुढील हिशेबांत ओढण्यांत येईल.

लिमिटेड कंपनीचा दिवाळखोर डायरेक्टर

केशवजी मुळजी जेठा ह्यांस त्यांच्या स्वतःच्याच अर्जावरून ता. २९ एप्रिल, १९४३ रोजीं दिवाळखोर ठाविण्यांत आलें होतें व त्यांस रीतसर डिसचार्ज मिळण्यापूर्वीच त्यांनीं न्यू कमर्शिअल बँक ऑफ इंडिया लि. चे डायरेक्टर म्हणून कांहीं व्यवहार केले. कोर्टानें दिवाळखोर ठरविलेल्या इसमास कंपनी कायद्याप्रमाणें लिमिटेड कंपनीचा डायरेक्टर रहातां येत नाहीं, म्हणून केशवजींना मुंबईच्या चीफ प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेटनें १ दिवसाच्या साध्या कैदेची व २५० रुपये दंडाची शिक्षा दिली होती, ती मुंबई हायकोर्टास अपुरी वाटून त्यानें शिक्षा वाढवून ३ महिन्यांचा कारागृहवास सांगितला. मॅजिस्ट्रेटनें गुन्ह्याच्या स्वरूपाचा गंभीरपणा लक्षांत घेतला नाहीं, ह्या मुद्यावर सरकारनें त्याच्या निकालावर अपील केलें होतें, त्याचा परिणाम वरीलप्रमाणें झाला.

कापडाचे निर्मतीवर ३% जकात

हिंदुस्थानांतून निर्गत होणारें कापड व सूत ह्यांवर ३% कस्टम्स ड्यूटी बसविण्यांत आली आहे, तिच्या उत्पन्नांतून " कॉटन टेक्स्टाइल फंड " निर्माण करण्यांत यावयाचा आहे. हिंदी कापड व सूत ह्यांचा परदेशी खप वाढविणें, ह्या धंद्यासंबंधी शास्त्रीय शिक्षण व संशोधन ह्यांची व्यवस्था करणें, वगैरे दृष्टीनें फंडाचा विनियोग करण्यासाठी सरकार एक समिती नेमणार आहे.

चांगल्या कापडाचा पुरवठा

चांगल्या दर्जाच्या तलम कापडाचा तुटवडा अंशतः दूर करण्यासाठी मुंबई शहर व उपनगरें ह्यांत असलें कांहीं प्रकारचें कापड उपलब्ध करून देण्यांत येत आहे.

जिकडे तिकडे प्रशंसा

इमिटेशन दागिन्यांवर रासायनिक क्रिया करून खऱ्या सोन्याचा पत्रा चढविला जातो त्यामुळें दागिना केव्हांही खराब होत नाही, ही पूर्ण खात्री झाली. सोन्याचा पत्रा चढविलेल्या चार बांगड्या कि. आठ रु. गाजेस्तव दागिना परत करणें झाल्यास वर चढविलेल्या सोन्याचे सर्वच्या सर्व पैसे परत देऊं.

मट कं. सांगली, S. M. C.

मट कंपनी शाखा—बुधवार पेठ, पुणें २.

पुण्यांतील

आदर्श निवासस्थान व भोजनालय

छाया लॉजिंग व बोर्डिंग हाऊस

बुधवार चौक, पुणें २.

सध्यांच्या टंचाईच्या काळांत जीवनद्रव्यें कमी पडतात.

जीवनद्रव्यांनीं (Vitamins) युक्त असे

(सप्लाय खात्यानें मान्यता दिलेले)

टोमॅटो केचप (गोड) व

टोमॅटो सॉस [तिखट व आंबट]

आजच मागवा व जीवनद्रव्यांची वाटणारी उणीव भरून काढा.

रुरल प्रॉडक्टस कंपनी लि. पुणें

बिझिनेस ऑफिस: ९१३ अ सदाशिव, पुणें २.

प्रगतिपथावरील नवा

मैलाचा — दगड

सन १९४३ अखेर

नव्या कामांत	११० टक्के वाढ
चालू कामांत	१०० टक्के वाढ
आयुर्विमानिधींत	८० टक्के वाढ

— आपला विमा किंवा एजन्सी आजच घ्या —

दि औंध म्यूच्युअल लाइफ ॲश्युरन्स सोसायटी लि., पुणें.

आर. जी. साठे, सुपरिंटेंडेंट — व्ही. जी. जोशी, मॅनेजिंग डायरेक्टर.

दि ब्रिटिश इंडिया जनरल इन्शुअरन्स कं. लि.

(स्थापना : १९१९)

आम्ही आयुर्विम्याखेरीज करून आग, मरीन, अपघात, इत्यादींचे सर्व प्रकारचे विमे स्वीकारतों.

—: चेअरमन व मॅनेजिंग डायरेक्टर :—

सर होमी मेहता, के. बी. ई., जे. पी.

पुणें शाखा : मोति माणिक मॅन्शन, लक्ष्मी रोड.

हेड ऑफिस : मेहता हाऊस, अपोलो स्ट्रीट, मुंबई.

स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

गिरगांव मुंबई नं. ४

महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

हें पत्र पुणें, पेठ सांवुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' सांवुर्डा, घ. नं. १२७।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
(टपाल इंशील माफ)
किरकोळ अंकास
दोन आणे.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष १० पुणें, बुधवार, तारीख २६ जुलै, १९४४ अंक ३०

Telephone 779

TELEGRAM
Guest House
Poona 2.

जाहीर प्रकटन.

कळविण्यास आनंद वाटतो कीं, दि. २५ मे १९४४ रोजीं बंद करण्यांत आलेलें आमचें जेवणाचें खातें दि. २५ जुलै १९४४ पासून नेहमींप्रमाणें नवीन व्यवस्थेखालीं सुरू करण्यांत आलें आहे. तरी आमच्या पूर्वीच्या आश्रयदात्यांस अशी विनंति आहे कीं, त्यांनीं आपापल्या शिधापत्रिका पूर्वीप्रमाणेंच पूना गेस्ट हाऊसच्या नांवावर, बदलून घेण्यासाठीं आमचेकडे आणून द्याव्यात. मध्यंतरीच्या काळांत आमच्या आश्रयदात्यांची जी गैरसोय झाली त्याबद्दल आम्ही अत्यंत दिलगीर आहोंत.

पूना गेस्ट हाऊस.
गणपति चौक, लक्ष्मी रोड, पुणें २.

जिकडे तिकडे प्रशंसा
इमिटेशन दागिन्यांवर रासायनिक क्रिया करून खऱ्या सोन्याचा पत्रा चढविला जातो त्यामुळें दागिना केव्हांही खराब होत नाहीं, ही पूर्ण खात्री झाली. सोन्याचा पत्रा चढविलेल्या चार बांगड्या किं. आठ रु. गरजेस्तव दागिना परत करणें झाल्यास वर चढविलेल्या सोन्याचे सर्वच्या सर्व पैसे परत देऊं.
भट कं. सांगली, S. M. C.
भट कंपनी शाखा—बुधवार पेठ, पुणें २.

पुण्यांतील
आदर्श निवासस्थान व भोजनालय
छाया लॉजिंग व बोर्डिंग हाऊस
बुधवार चौक, पुणें २.

स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.
गिरगांव मुंबई नं. ४
महिंद्रकर ब्रदर्स
तयार कपड्याचे व्यापारी
बुधवार चौक, पुणें

विविध माहिती

रजिस्ट्रारांची परिषद

सहकारी सोसायटयांच्या प्रांतिक रजिस्ट्रारांची १४ वी परिषद मुंबई येथें ३१ जुलै, १ ऑगस्ट व २ ऑगस्ट ह्या दिवशीं भरणार आहे.

सर रघुनाथराव परांजपे ह्यांस मराठा चेंबरमध्यें अल्पोपहार

शनिवार ता. २२ जुलै १९४४ रोजीं सर रघुनाथराव परांजपे, हिंदुस्थानाचे ऑस्ट्रेलियांतील पहिले हायकमिशनर, ह्यांनीं मराठा चेंबरच्या कार्यकारी मंडळास भेट दिली. त्यावेळीं अल्पोपहाराची थाटाची व्यवस्था करण्यांत आली होती. चेंबरचे अध्यक्ष श्री. श्री. प्र. ओगले, प्रो. काळे व श्री. कामत ह्यांची समयोचित भाषणें झालीं.

राष्ट्रीय युद्धआघाडीचें नेतृत्व गव्हर्नरांकडे

आपल्या प्रांतांतील राष्ट्रीय युद्ध आघाडीचें नेतृत्व ओरिसा प्रांताच्या गव्हर्नरांनींच स्वतःकडे घेतलें आहे.

पुण्याहून मुंबईस भाज्या जाणार

मुंबई येथें भाज्यांचा तुटवडा पडला असून त्या अतिशय महाग झाल्या आहेत. पुण्यांत व इतर ठिकाणीं त्या खरेदी करून मुंबईकडे पाठविण्याची व्यवस्था करण्यांत येत आहे.

मध्यवर्ती सरकारचा उत्पन्न-खर्च

हिंदुस्थान सरकारनें एप्रिल, १९४४ मध्यें आपल्या उत्पन्नापेक्षा १७½ कोटि रुपये जास्त खर्च केला. १९४३ च्या एप्रिलमध्यें तत्सम आकडा ११½ कोटि रुपये होता. कर्जाच्या रकमेंत ५½ कोटि रुपयांची वाढ झालेली आहे.

टोळधाड

जूनच्या पहिल्या पंधरवड्यांत राजपुताना, भवालपूर, खैरपूर, पतियाळा व पंजाबचे कांहीं जिल्हे ह्यांत टोळधाड आली होती. जून अखेर त्यांतील कांहीं टोळयांनीं मध्य हिंदुस्थानांतील संस्थानांत प्रवेश केला. सिंध व उत्तर बलुचिस्तान येथेंहि कांहीं टोळया आढळून आल्या.

पंजाबमधील उद्योगधंदे

पंजाबच्या औद्योगिक परिस्थितीचा व नव्या औद्योगिक उपक्रमांचा विचार करण्यासाठीं पंजाबमधील पुढारी कारखानदारांच्या समितीची एक बैठक सिमला येथें नुकतीच झाली. पंजाबचे अर्थमंत्री, सर मनोहरलाल, हे अध्यक्षस्थानीं होते.

दि सांगली बँक लि.

वरील बँकेचें वसूल भांडवल २ लक्ष रु., रिझर्व्ह व इतर फंड १ लक्ष, ८१ हजार रु.व ठेवी ४८½ लक्ष रुपयांच्या आहेत. बँकेनें १६½ लक्ष रुपये सरकारी व इतर रोख्यांत गुंतवून २६ लक्ष रुपयांचीं कर्जे दिलीं आहेत. ३१-१२-४३ अखेरच्या वर्षी बँकेस ३६½ हजार रुपये नफा झाला. त्यांतून १८½ हजार रुपये वेगवेगळ्या फंडांत टाकण्यांत आले व भागीदारांस ७% डिव्हिडंड व २% बोनस मिळालें. बँकेची मजबुती निर्विवाद आहेच व ती आणखी वाढविण्याचें डायरेक्टरांचें धोरण स्तुत्य आहे.

जर्मनीमधील ब्रिटिश युद्धकैद्यास पदवी

कॉव्हेन्ट्रीच्या लेफ्टेनंट जे. मर्सर ह्या जर्मनीमधील ब्रिटिश युद्धकैद्यानें "पोलादी सांगाड्याची घरें" ह्या विषयावर निबंध लिहून ब्रिस्टल विश्वविद्यालयाची एम. एससी.ची पदवी मिळविली आहे.

स्था. स्व. संस्थांच्या नोकरांस महागाईभत्ता

मध्यप्रांत व वऱ्हाड येथील स्थानिक स्वराज्य संस्थांना आपल्या नोकरांस महागाईभत्ता देतां यावा, ह्यासाठी तेथील सरकार दरमहा दरमाणशी तीन रुपये देणार आहे. ज्या स्वराज्य संस्था दरमहा किमान ६ रुपये माणशी महागाई भत्ता आपल्या शिक्षकांस देतील त्यांसच ही सरकारी ग्रँट मिळेल. सरकारला ह्याचा वार्षिक खर्च ५½ लक्ष रुपये येईल. स्थानिक स्वराज्य संस्थांनीं कर वाढवून आपल्या उत्पन्नांत भर घालावी व इतर नोकरांसहि योग्य महागाईभत्ता द्यावा अशी सरकारची सूचना आहे.

भडोचमधील शेतकऱ्यांस सवलत

भडोच आणि पंचमहाल जिल्ह्यांच्या भडोच भागांत इतर ठिकाणापेक्षां कपाशीच्या लागवडीचें प्रमाण गेलीं कांहीं वर्षे अधिक आहे, ह्यासाठी तेथें कपाशीची लागवड सक्तीनें एकूण शेतीच्या एक षष्ठमांशा इतकी आणणें कठीण आहे. ह्याकरितां, ती एक चतुर्थांशा इतकी आणण्यास मुंबई सरकारनें परवानगी दिली आहे. अर्थात् तेथील प्रत्येक शेतकऱ्यानें इतर ठिकाणांप्रमाणें दोन तृतीयांश जागेंत धान्यच पेरलें पाहिजे व कोणीहि गतवर्षापेक्षां ज्यास्त प्रमाणांत कपास पेरतां कामा नये. वहातुकीच्या अडचणींत मात्र सुधारणा होईल अशी शेतकऱ्यांनीं अपेक्षा करूं नये व कपाशीस अमूक किंमत मिळेलच, असेंहि मानूं नये, असा इशारा मुंबई सरकारनें दिला आहे.

अमेरिकेची सैन्यभरती

अमेरिकेनें आतांपर्यंत गेल्या ३० महिन्यांत सुमारें १ कोटि लोकांची सैन्यांत भरती केली आहे. म्हणजे, दरमहाची सरासरी ३ लाखांवर जाते.

उत्तर बिहारमध्यें कॉलऱ्याची साथ

उत्तर बिहारमधील चार जिल्ह्यांत गेल्या तीन महिन्यांत कॉलऱ्यानें ३४ हजार लोक मरण पावले.

पोस्टांतील विलंब दूर करण्याचा यत्न

पोस्ट व तारखात्याच्या कामांतील विलंब कसा टाळतां येईल ह्याचा विचार करण्याकरितां सर्व प्रांतांच्या पोस्ट मास्तर जनरल ह्यांची एक परिषद लवकरच दिल्ली येथें भरविण्यांत येईल, असें समजतें.

भांडवल उभारणीच्या नियंत्रणाचा हेतु

"नवीन कंपन्यांच्या भांडवल उभारणीवर विनंत्रण घालण्याचा हेतु युद्धफंढाची भरती करण्याचा नाहीं. युद्धफंढांत नवीन भांडवल तूर्त गुंतविण्यांत यावें, ही अट घालण्यांत लोकांजवळ सध्या असलेला विपुल पैशाचा ओघ अयोग्य उपक्रमांकडे जाऊं न देणें व भागीदारांचें हित पहाणें, हाच सरकारचा उद्देश आहे. युद्धानंतर कांहीं धंदे निघण्यासारखे नसले, तर भागीदारांचे पैसे त्यामुळें परत होऊं शकतील.":- सप्लाय खात्याचे प्रमुख, सर रामस्वामी मुदालियार, ह्यांचें भाषण.

झेकोस्लोव्हाकियांतील चलनवाढ व त्याच्या जर्मनींतील शिलकी

झेकोस्लोव्हाकियाच्या नॅशनल बँकेचें जर्मन राइश बँकेकडे ३२ अब्ज क्राऊन म्हणजे २३ कोटि पौंड इतकें येणें फेब्रुवारी, १९४४ अखेर साचलें आहे, परंतु तें परत मिळण्याची आशा नाहीं. चलनविषयक मागणी पुरविणें नेहमीच्या झेक छपाई कचेरीस अशक्य झालें असल्यामुळें, खासगी छापखान्यांकडे नोटा छापण्याचें काम देणें जर्मनीस आवश्यक झालें आहे.

अनुक्रमणिका

	पृष्ठ
१ विविध माहिती ...	२३४
२ रूरल डेव्हलपमेंट खात्याची कामगिरी ...	२३५
३ सहकारी स्टोर्स व युद्धोत्तर मंदी ...	२३६
४ प्रांतिक सहकारी त्रैमासिक	२३६
५ स्फुट विचार	२३७
कपाशीच्या कमाल व किमान किंमती— नियंत्रित किंमतींचा विचार–अन्नपुरवठ्याची दिल्लींत चर्चा	
६ माडेकरी व घरमालक...	२३८
७ कराराची पूर्तता व अडवान्सची रकम ...	२३८
८ हिंदी शेतीस कृत्रिम खतांचा पुरवठा ...	२३९
९ पुणें येथें सहकारी शिक्षणाचा वर्ग ...	२४०

अर्थ

बुधवार, ता. २६ जुलै, १९४४

रूरल डेव्हलपमेंट खात्याची कामगिरी

"अधिक धान्य पिकवा" मोहिमेचा परिणाम

मुंबई प्रांताच्या रूरल डेव्हलपमेंट खात्याच्या ३१ मार्च १९४३ अखेर संपलेल्या वर्षाचा संक्षिप्त अहवाल प्रसिद्ध झाला आहे, त्यावरून ह्या खात्याच्या उपयुक्त कार्याची कल्पना येईल. चांगल्या सहकारी पतपेढ्यांचें कार्यक्षेत्र वाढविण्याचा खात्यानें प्रयत्न केला. तालुका डेव्हलपमेंट असोसिएशन्सची संख्या १०७ची ११२ झाली व त्यांनीं शेती सुधराईचे संबंधांतील आपलें काम चालू ठेवलें. "अधिक धान्य पिकवा" मोहिमेस ह्या संस्थांनीं चांगल्या तऱ्हेनें हातभार लावला. बेटर फार्मिंग सोसायट्यांची संख्या ३८ ची ४६ झाली. तालुका डेव्हलपमेंट असोसिएशन्सच्या धर्तीवरच परंतु जास्त मर्यादित विभागांत त्यांचें काम चालू असतें. बांध व ताली घालणें आणि जनावरांची सुधारणा करणें हीं त्यांची प्रमुख कामें होत. बेटर फार्मिंग सोसायट्यांचे हातून सध्या होते त्यापेक्षा पुष्कळच अधिक भरीव कामगिरी होण्यास वाव आहे.

सहकारी सेल सोसायट्यांची संख्या २५ नें वाढून ती १२४ झाली. मुंबई सहकारी मार्केटिंग सोसायटीनें बऱ्याच रकमेचा व्यवहार केला. गुजरात व कर्नाटक येथील कपास विक्रीच्या सहकारी सोसायटयांनीं कपाशीच्या विक्रीचे संबंधांत उपयुक्त कार्य केलें. जरीला कपाशीच्या बियांचा प्रसार करण्याचेंहि त्यांनीं काम केलें. अहमदाबादच्या बटाटे पेरणाऱ्यांच्या असोसिएशननें सिमल्याहून चांगल्या बटाट्याचें बेणें आणवून शेतकऱ्यांत त्याचा प्रसार केला. मुंबई प्रांतांतील कित्येक जिल्ह्यांमधील सहकारी संस्थांनीं बाजारभाव मर्यादेंत राखण्याचें व लोकांना अन्न व इतर जिन्नस उपलब्ध करून देण्याचें महत्त्वाचें काम केलें. बेळगांव व भडोच जिल्ह्यांत सहकारी संस्थांनीं स्वस्त धान्याचीं दुकानें यशस्वी रीतीनें चालविलीं. धान्याच्या डेपोंचे बाबतींत ठाणें जिल्ह्यानें आघाडी मारली. त्या एकाच जिल्ह्यांत असे ७७ डेपो सुरू करण्यांत आले. सबंद प्रांतांतील एकूण ६३३ डेपोंमधून अहवालाचे वर्षीं २ लक्ष रुपयांपेक्षा जास्त किंमतीचें धान्य वाटण्यांत आलें.

बांध व ताली ह्यांचें शेती सुधाराईतील महत्त्व धान्यांत पेऊन त्याकडे आतां विशेष लक्ष पुरविण्यांत येत आहे. महाराष्ट्रांतील बहुतेक सर्व जिल्हे व कर्नाटकांतील विजापूर जिल्हा ह्यांत बांध घालण्याचें काम बरेंच पुरें झालें. सर्व प्रांतांत मिळून ३१ हजार एकर जमीनींचें रक्षण करणारे १५ लक्ष फूट लांबीचे बांध घालण्यांत आले. पूर्व खानदेशांत ७,२४,४९७ फूट, अहमदनगर जिल्ह्यांत ६,८०,९९० फूट, भडोच व पंचमहालमध्यें ४,२४,००० फूट, पश्चिम खानदेशांत ४,१०,४०५ फूट, सोलापूर जिल्ह्यांत १,९२,१०० फूट, बेळगांव जिल्ह्यांत ८४,५८६ फूट, विजापूरमध्यें ६२,६०० फूट, अहमदाबादमध्यें ३०,००० फूट, पुणें जिल्ह्यांत २०,००० फूट व ठाणें जिल्ह्यांत ९,१५० फूट अशी बांधांची लांबी पुरी झाली. पिकें लावण्याच्या पद्धतींमधील सुधारणेचा प्रचार बहुतेक सर्व जिल्ह्यांत चालू होता. सुधारलेल्या अवजारांच्या वापराचाहि प्रचार करण्यांत आला. सुधारलेल्या बियांच्या प्रसारास "अधिक धान्य पिकवा" मोहिमेमुळें विशेष महत्त्व प्राप्त झालें आहे. शेतकी खात्याच्या डायरेक्टरांनीं बियांच्या पुरवठ्याची एक योजना आखली. १९४१-१९४२ चे मानानें १९४२-४३ मध्यें बियांच्या पुरवठ्याचे बाबत ज्यास्त यशस्वी कामगिरी झाली, असें म्हणतां येईल. कीड प्रतिबंधक इलाज, रानटी जनावरांपासून पिकांचें संरक्षण, नवीन झाडांची लागवड, पशुसुधारणा, गवत व कडबा ह्याबाबत सुधारलेल्या पद्धतींचा प्रचार, इत्यादि संबंधांतहि रूरल डेव्हलपमेंट खात्यानें प्रयत्न केले. हिंदुस्थान सरकारच्या सप्लाय खात्यानें केलेल्या मागणीमुळें हातमागांच्या धंद्यांस चांगलेंच उत्तेजन मिळालें. डि. इंडस्ट्रिअल असोसिएशन्सना नवीन माग बसविण्यासाठी सरकारनें कर्जे दिलीं. अहमदनगर, खानदेश व सोलापूर ह्या जिल्ह्यांत विशेषत: उत्पादन पुष्कळच वाढलें. खेडेगावांचे रस्ते सुधारण्यासाठी ठिकठिकाणीं सप्ताह पाळण्यांत आले व कांहीं जिल्ह्यांसाठी खास कार्यक्रम आखले गेले.

पिकांच्या पाणी-पुरवठ्याच्या प्रश्नानें "अधिक धान्य पिकवा" मोहिमेच्या कारणानें विशेष महत्त्व धारण केलें. धान्याचे पिकाखाली ज्यास्त जमीन यावी ह्यासाठी सरकारनें कांहीं सवलती जाहीर केल्या, त्यांचा योग्य तो परिणाम झाला. साहजिकच कालव्यांच्या पाण्यास मागणी वाढली. कांहीं जिल्हा रूरल डेव्हलपमेंट बोर्डानीं खेडेगावांच्या पाणी-पुरवठ्याच्या योजना हातीं घेतल्या. सार्वजनिक आरोग्य व स्वच्छता ह्यासंबंधांत रूरल डेव्हलपमेंट खात्याच्या नोकरांनीं शक्य तें प्रचाराचें कार्य केलें व ज्या खेडेगांवांत वैद्यकीय मदतीची उणीव आहे अशा कांहीं ठिकाणीं ठराविक निवडक औषधांच्या पेटचा पुरवल्या. प्राथमिक शिक्षणाचा प्रसार वाढविणें हें रूरल डेव्हलपमेंट खात्याचें एक प्रमुख कार्यच समजलें पाहिजे व त्या दृष्टीनें खटपट करण्यांत आली. नवीन शाळा उघडण्यांत आल्या, प्रौढांसाठी शिक्षणाचे वर्ग चालविण्यांत आले व शाळांच्या इमारतींच्या संरचेंत भर घालण्यांत आली. प्रचार व खेडेगावांची सुधारणा ह्यांसाठी मदतनीस शिकवून तयार करण्याचें काम राजापूर, बोर्डी, भडोच, धुळें, मांजरी व देविछोहुर येथें चालू होतें. वरील सर्व वृत्तांतावरून शेतीसुधारणा व खेडेगांवांची पुनर्घटना ह्या संबंधांतील कार्यक्षेत्र किती विस्तृत आहे ह्याची कल्पना येईल. हें कार्य यशस्वी होण्यास दीर्घ प्रयत्न व सर्वांचें सहकार्य ह्यांची आवश्यकता आहे.

सहकारी स्टोर्स व युद्धोत्तर मंदी

मद्रास प्रांतिक कंझ्यूमर्स सहकारी स्टोर्स परिषदेचें दुसरें वार्षिक अधिवेशन सर एन. गोपालस्वामी अयंगार ह्यांच्या अध्यक्षतेखाली नुकतेंच पार पडलें. मि. ऑस्टिन ह्यांनीं परिषदेचें उद्घाटन करतांना मद्रास प्रांतांतील स्टोर्सच्या प्रगतीचा आढावा घेतला. ते म्हणाले: "१९०५ साली त्रिचिनापल्ली व कोइमतूर येथें सहकारी स्टोर्स स्थापन झाले, त्यानंतर त्यांची संख्या ठराकर वाढली नाहीं. गेल्या महायुद्धापूर्वी त्यांची संख्या ११ होती. त्या महायुद्धानें नव्या स्टोर्सच्या स्थापनेस चालना दिली व १९२१ साली त्यांची संख्या १०३ भरली. पुढें बाजारभाव उतरल्यामुळें नफ्याचें प्रमाण घटलें आणि गैरशिस्त कारभार, व्यवस्थेचा भरमसाट खर्च, इत्यादींमुळें कित्येक स्टोर्स बंद पडले. चालू युद्धानें स्टोर्स सोसायट्यांना पुनः चांगले दिवस आणले आणि त्यांची संख्या आतां १,२०० वर गेली आहे. सभासदांची संख्या ४ लक्षांपेक्षा जास्त आहे. ह्या सोसायट्यांनीं जनतेचा विश्वास संपादन केला आहे; शांतता पुनः प्रस्थापित झाल्यावरहि तो टिकविण्याची जबाबदारी सोसायट्यांवर आहे." संक्रमणकाळांत सोसायट्यांनीं कोणती सबरदारी घ्यावी, ह्याचेंहि दिग्दर्शन मि. ऑस्टिन ह्यांनीं केलें.

अध्यक्ष, सर एन. गोपालस्वामी, हे आपल्या भाषणांत म्हणाले: "सहकारी खात्याचे कांहीं अधिकारी व कांहीं बिनसरकारी कार्यकर्ते हे युद्धसमाप्तीनंतर निम्मे स्टोर्स बंद पडतील असें गृहीत धरूनच चालतात, असें दिसतें. आपण बदलत्या परिस्थितींस अनुसरून वागलों नाहीं, तर असें खरोखरच घडून येईल व त्यासंबंधांत दक्षता बाळगणें हें आपलें कर्तव्य आहे. चालू परिस्थिति व पुढें येणारी परिस्थिति ह्यांचें परिशीलन करून सहकारी चळवळीस मार्गदर्शन करण्यासाठीं लायक व तज्ञ लोकांची, प्रांतिक सहकारी यूनियनची स्थायी समिति तात्काळ नेमण्यांत यावी. सरकारी नोकर, मध्यमवर्गीय कुटुंबें किंवा मोठीं वैयक्तिक गिऱ्हाइकें ह्यांचे गट जेथें असतील तेथेंच फक्त सहकारी स्टोर्स यशस्वी होऊं शकतील, हें टाउनसेंड कमिटीचें म्हणणें खरें असेल, तर नव्या कंझ्यूमर्स सोसायटचा स्थापन करण्यांत लोकांनीं व सरकारनें वेळ व शक्ति खर्च करण्यांत अर्थ काय आहे? शहरांपेक्षा खेडोपाडी कंझ्यूमर्स सोसायटयांचा प्रसार मोठ्या प्रमाणावर होण्यावरच त्या चळवळीचें खरें यश अवलंबून आहे. खेड्यांतील सोसायट्यांच्या व्यवस्थेसाठी लायक चालक मिळण्याची अडचण खरी असली, तरी ती दूर केली पाहिजे. सामान्य खेड्यांत प्रत्येक स्वतंत्र कामासाठीं वेगळी संस्था काढण्यापेक्षा, मल्टिपर्पज सोसायटयांच्या वाटीकडेच लक्ष पुरवणें उचित होईल व ह्या दृष्टीनें खेडेगावी स्टोर्स सोसायटयांचें कार्यक्षेत्र हळुहळु वाढवलें पाहिजें."

सहकारी पतपेढ्यांचे रजिस्ट्रार, श्री. सत्यनाथन, हे म्हणाले: "सहकारी खातें आतां नव्या सोसायटयांच्या स्थापनेस उत्तेजन देत नाहीं; जुन्या सोसायटयांस मजबुती आणण्याकडेच त्यांचें विशेष लक्ष आहे. रेव्हेन्यू खात्यामार्फत नियंत्रित किंमतीस मिळणारा माल विकण्याचा स्टोर्सचा सध्याचा व्यवहार युद्धसमाप्तीनंतर टिकणार नाहीं; त्यांना स्वतःच्या पायावर उभें राहून हुशार व्यापाऱ्यांशीं स्पर्धा करावी लागेल. ह्या स्पर्धेस यश मिळविण्याची तयारी आतांपासूनच केली पाहिजे. भागभांडवल वाढवून रिझर्व्हहि वाढविले पाहिजेत. आपलीं गिऱ्हाइकें व्यवस्थेशीर कारभारानें आकर्षून घेऊन बांधून घेतलीं पाहिजेत. सहकारी स्टोर्सनीं आपल्या योजना आखून व बाजारावर लक्ष ठेवून आपली कार्यक्षमता वाढविली पाहिजे."

प्रांतिक सहकारी त्रैमासिक

"बॉबे को-ऑपरेटिव्ह क्वार्टर्लीचा" ताजा अंक नुकताच प्रसिद्ध झाला असून त्यांत अनेक विचारपरिप्लुत लेख आहेत. युद्धोत्तर आर्थिक संवर्धनाच्या योजना हिंदुस्थानांत सरकारी व बिनसरकारी रीतींनें आखल्या जात आहेत, त्यांमध्ये सहकाराच्या पुनर्घटनेस योग्य स्थान कसें दिलें गेलें पाहिजे ह्या विषयावर प्रो. काळे ह्यांचा लेख आहे. प्राथमिक सहकारी पेढ्यांचें जाळें सर्व प्रांतभर पसरून त्यामध्यें मांडवलाचा पुरवठा व मालाची खरेदी-विक्री इत्यादि व्यवहारांची व्यवस्था मोठ्या प्रमाणावर करण्याच्या उद्देशानें पहाणी प्रथम व्हावी असें त्यांत सुचवण्यांत आलें आहे. ह्या संस्थांच्या कारभारांत सल्ला देऊन त्यांचें सतत मार्गदर्शन करण्यासाठीं ग्रामसहायक शिकवून तयार करण्याची आवश्यकताहि त्यांत प्रतिपादली आहे. इन्स्टिट्यूटसारख्या संस्थांस बलवान करणें, सहकारी शिक्षणाची त्या संस्थेमार्फत तजवीज करणें आणि सहकारी संवर्धनासाठीं सरकारी तिजोरींतून सध्याच्या अनेकपटींनीं खर्च करणें आणि एकंदरीत कार्याच्या महत्त्वास अनुसरून विस्तृत योजना सढळ हातांनीं आखणें, इत्यादि मुद्दे ह्या लेखांत आले आहेत. त्याच्या पुढील लेखांत श्री. भास्करराव जाधव ह्यांनी कोल्हापुरांत "भिशी" "फंड" इत्यादि स्वरूपांतील सहकारी तत्त्वावर शेतकऱ्यांनीं स्वयंस्फूर्तिनें, स्वतंत्रपणानें व सरकारी नियंत्रणावांचून चालविलेल्या जुन्या पद्धतीच्या संस्थांची मनोरंजक माहिती दिली आहे. लोकांच्या मनांत परस्पर सहाय्याच्या तत्त्वाचें बीज रुजलें असतां त्याचा वृक्ष बाहेरील मदतीवांचून कसा फलदायक होतो हें तीवरून दिसून येतें. दिवाणबहादुर गांधी ह्यांनीं सहकारी संस्था रजिस्टर होण्याच्या कामीं होणाऱ्या दिरंगाईचा उल्लेख करून जनतेच्या स्वयंस्फूर्तीवर व स्वावलंबनावर अधिक विश्वास ठेवला जाण्याची आवश्यकता एका लेखांत प्रतिपादली आहे. पूर्व खानदेश जिल्ह्यांतील कपास विक्रीच्या सहकारी सोसायटयांच्या कार्याची माहिती श्री. एन. व्ही. नायक ह्यांनी दिली आहे ती बोधप्रद आहे. सहकारी त्रैमासिकांत वरील लेखांशिवाय उपयुक्त पुस्तकांचें परीक्षण आहे. श्री. वैकुंठराय मेथा ह्यांनीं "पीपल्स प्लॅन ऑफ एकॉनॉमिक डेव्हलपमेंट ऑफ इंडिया" ह्या इंडिअन फेडरेशन ऑफ लेबरनें तयार केलेल्या हिंदुस्थानच्या आर्थिक संवर्धनाच्या योजनेचें मार्मिक परीक्षण केलें आहे. ह्यापुढें संपादकीय स्फुट विवेचनें आलीं असून इन्स्टिट्यूटच्या कार्याची माहिती देण्यांत आली आहे. मुंबई शहराच्या सहकारी परिषदेचा वृत्तांत ह्या सदरासाठीं आला आहे आणि पुढें रजिस्ट्रारनीं काढलेली सर्क्युलर्स दिलीं आहेत. सहकारी बँकांच्या असोसिएसनच्या एका महत्त्वाच्या सभेंतील चर्चेचा सारांश अखेर पुरवणी म्हणून प्रसिद्ध करण्यांत आला आहे. एकंदरीनें प्रस्तुत अंक माहितीनें भरला आहे आणि तो वाचनीय व विचारप्रवर्तक झाला आहे.

सहकारी प्रांतिक बँका व असोसिएशन्स ह्यांच्या प्रतिनिधींची सभा

वरील दोन अखिल भारतीय सहकारी मध्यवर्ती मंडळांची सभा मुंबई येथें तारीख २९ व ३० जुलै रोजीं सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरिअल बिल्डिंगमध्यें भरणार आहे. हिंदी सहकारी चळवळीच्या हिताचे महत्त्वाचे प्रश्न ह्या सभेंत चर्चिले जावयाचे आहेत.

स्फुट विचार

कपाशीच्या कमाल व किमान किंमती

हिंदी कापसाची निर्गत युद्धपरिस्थितीमुळें अत्यंत मर्यादित झाली आहे आणि देशांत कापडाच्या उत्पादनाच्या मानानें कपाशीच्या लागवडीचें क्षेत्र कमी करणें प्राप्त झालें आहे. विशेषतः आखूड धाग्याच्या कापसास देशांत व देशाबाहेर मागणी नसल्यानें त्याचें पीक करण्यापासून शेतकऱ्यांना परावृत्त करण्याची आवश्यकता सर्वत्र मान्य झाली आहे. ह्याच बरोबर कापसाच्या व्यवहारांतील सट्टेबाजीस आणि किंमतीमधील चढउतारास आळा बसावा म्हणून त्याच्या कमाल व किमान किंमती ठरवण्याचा उपक्रम सरकारनें गेल्या वर्षी केला. शेतकरी वर्गाच्या जीवनाचा व धंद्याचा खर्च सर्वसाधारण महागाईमुळें वाढला आहे आणि त्याचें नुकसान होणार नाहीं ह्या बेतानें कापसाच्या किंमती स्थिर ठेवण्याचें धोरण अंगिकारण्यांत आलें. ह्या भावनियंत्रणाच्या प्रश्नाशी धान्याच्या उत्पादनास उत्तेजन देण्याचा प्रश्न निगडित झाला आहे ह्या गोष्टीकडे लक्ष देणें आवश्यक आहे. आखूड धाग्याची कपास, तंबाखू वगैरे पिकांचें क्षेत्र कमी होऊन धान्यांच्या लागवडीचें क्षेत्र विस्तृत व्हावें ह्याविषयींचे प्रयत्न मुंबई सरकार करीत आहे. आज अन्नटंचाईपासून जनतेचें रक्षण करण्याचें अगत्य केवढें मोठें आहे हें सांगावयास नको. कित्येक प्रांत आणि संस्थानें ह्यांमध्यें कपाशीच्या पिकाचें नियंत्रण आणि धान्यांच्या पैदाशीस उत्तेजन ह्यांचे बाबतींत मुंबईप्रमाणें सक्तीच्या धोरणाचा अवलंब करण्यांत आलेला नाहीं आणि त्यामुळें कपाशीचें पीक करण्याच्या शेतकऱ्यांच्या प्रवृत्तीस हवा असा आळा बसलेला नाहीं. धान्यांच्या पैदाशीपेक्षा कपाशीची पैदास अधिक फायदेशीर दिसल्यास कपाशीच्या लागवडीकडे शेतकरी वर्ग आकर्षला जाणें स्वाभाविक आहे. ही गोष्ट हिशेबांत धरून सरकारनें येत्या हंगामांतील कपाशीच्या किमान किंमती पन्नास रुपयांनीं कमी केल्या आहेत, पण त्याबरोबरच किमान व कमाल किंमतीमधलें अंतर वाढवण्यांत आलें आहे.

कपाशीच्या नियंत्रित किंमतीचा विचार

शेतीच्या उत्पादनाचा खर्च वाढला आहे आणि शेतकऱ्यांचें जीवन महागाईचें झालें आहे, ह्या दृष्टीनें त्यांस आपल्या मालाच्या किंमती योग्य प्रमाणांत मिळाल्या पाहिजेत. पण पुरेशा धान्य पुरवठ्याच्या व्यवस्थेंत सर्वच शेतकऱ्यांचें व सबंद राष्ट्राचें हित गुंतलेलें असल्यानें प्रस्तुत गुंतागुंतीचा प्रश्न सोडवतांना निरनिराळ्या महत्त्वाच्या बाबींचा मेळ घातला जाणें आवश्यक ठरतें. देशाच्या गरजेच्या मानानें फाजील असलेल्या कपाशीच्या उत्पादनास आळा घालण्याचें आणि धान्य निर्मितीस उत्तेजन देण्याचें अगत्य एकदां मान्य झालें म्हणजे कापसाच्या किंमतीचें प्रमाण काय असावें हें ठरवण्याचें तत्त्व उघड होतें. १९४४-४५ सालाच्या हंगामासाठी हिंदुस्थान सरकारानें कापसाचे भाव कमी करून ठरवले आहेत, ह्यासंबंधांत सर चुनीलाल भाईचंद मेथा ह्यांनीं टीकात्मक विचार प्रकट केले आहेत. त्यांचें म्हणणें असें आहे कीं चालू सालासाठीं ठरवलेले कापसाचे भाव शेतकऱ्यांच्या व व्यापाऱ्यांच्या दृष्टीनें कमी होते जाणि त्यांच्या विरुद्ध तक्रारहि करण्यांत आली होती. येत्या हंगामासाठीं जाहीर केलेलें भाव त्याहिपेक्षा हलके असल्यानें ते अनिष्ट व असमाधानकारक आहेत. मध्यम आणि लांब धाग्याचा कापूस पिकवणारे शेतकरी व त्याचा धंदा करणारे व्यापारी ह्यांचेंहि नवीन जाहीर झालेल्या किंमतीमुळें नुकसान होणार आहे असें मत सर चुनीलाल ह्यांनीं व्यक्त केलें आहे. शेतीचा खर्च वाढला आहे व शेतकऱ्याची रहाणी महागाईची झाली आहे, पण कापूस सस्तावून शेतकऱ्याची प्राप्ती घटली आहे ह्यामुळें १९४४-४५ च्या हंगामांतील कपाशीचे दर कमी करण्यास वाव नाहीं असें त्यांचें प्रतिपादन आहे. परंतु धान्यांच्या पिकांचें आणि त्यांच्या किंमतींचें काय ? धान्य महागलें तर कपास पिकवणारांस आणि सबंध जनतेस तें चालेल काय ? कपास करणाऱ्यांच्या बाजूचा विचार करतांना सर्व शेतकऱ्यांच्या हितसंबंधांचें रक्षण करण्याकडे लक्ष पुरवलें गेलें पाहिजे. कापसाचे किमान भाव ठरवण्यांत आले आहेत त्यास चिकटून प्रत्यक्ष किंमती रहातील असें मानण्याचें कारण नाहीं, ह्या आशयाचें स्पष्टीकरण सरकारच्या वतीनें पुढें मांडण्यांत आलें आहे; आणि बाजारभाव त्या मर्यादेवर राहिलेच तर कापसाचा पुरवठा व त्यास असलेली मागणी ह्यांच्या दृष्टीनें ते भाव योग्य आहेत ही गोष्ट व्यवहारानेंच सिद्ध होईल हा युक्तिवादहि विचारप्रवर्तक आहे.

अन्नपुरवठ्याची दिल्लींत चर्चा

बाहेरून धान्य पुरेशा प्रमाणांत आणल्याशिवाय हिंदुस्थानांत अन्न पुरवठा पाहिजे त्या मानानें होणार नाहीं ही गोष्ट मि. एमरी ह्यांचे मनावर ठसवण्याचा प्रयत्न सारखा चालू आहे. कॉमन्स सभेंत त्या संबंधांत पुन्हां गेल्या आठवड्यांत प्रश्न विचारण्यांत आले आणि युद्धपरिस्थितींतील जहाज वहातुकीच्या अडचणी लक्षांत घेतां हिंदुस्थानास शक्य तेवढें व शक्य त्या मार्गानीं धान्य पाठवण्याची खटपट केली जात आहे असें स्टेट सेक्रेटरींनीं उत्तर दिलें. हिंदुस्थान सरकारचे अन्न मंत्री, सर ज्वालाप्रसाद श्रीवास्तव, ह्यांनीं मध्यवर्ती अन्न सल्लागार समितीच्या सभेंत दिल्ली येथें गेल्या आठवड्यांत भाषण करतांना ग्रेगरी कमिटीच्या शिफारशींस अनुसरून धान्याची आयात ह्या देशांत होण्याचा आग्रह आपण सोडणार नाहीं असें सांगितलें. अन्न पुरवठ्याबाबत सरकारनें काय योजना अंमलांत आणली आहे हें सांगतांना अन्नमंत्री म्हणाले कीं धान्याच्या निर्गतीची बंदी करण्यांत आली आहे आणि शिधापद्धतीचा विस्तार झपाट्यानें केला जात आहे. एकूण साडेतीन कोटि वस्ती असलेल्या दोनशे सहवीस शहरांत ही पद्धति आतां अंमलांत आहे. गहूं, बाजरी व ज्वारी ह्या धान्यांच्या कायदेशीर किमती ठरवण्यांत आल्या आहेत आणि त्या शेतकऱ्यांस हटकून मिळण्याची तरतूद झाली आहे. तांदुळाच्या बाबतींत नियंत्रण आहे पण वरील धान्यांप्रमाणें अखिल भारतीय पायावर त्याच्या किंमती निश्चित झालेल्या नाहींत. धान्यांचें उत्पादन वाढविण्याची आवश्यकता निर्विवाद आहे. पण तें जमविणें व वाटणें ह्यांचे संबंधांतली व्यवस्था पायाशुद्ध व समाधानकारक होणें अगत्याचें असल्याचें अन्नमंत्र्यांनीं सांगितलें आणि त्या बाबतींत सल्लागार समितीचें सहकार्य मागितलें. धान्याची साठवण व तिची देखरेख, धान्य चांगल्या स्थितींत राहाण्याची व पुरवलें जाण्याची व्यवस्था, अन्नाचा पुरवठा गरीब-श्रीमंतांस आणि शहरी व खेडगावी जनतेस सारखा होण्याविषयींची खबरदारी आणि दुधा सारखे संरक्षक अन्नाचे जिन्नस योग्य प्रमाणांत लोकांस मिळवण्याची तरतूद ह्या बाबींचा विचार करून त्यांचे विषयीं सूचना करण्याची विनंति सर ज्वालाप्रसाद ह्यांनीं सल्लागार समितीस केली. मध्यवर्ती सरकार आणि प्रांतिक व संस्थानी सरकारें ह्यांच्या सहकार्यानें व एकविचारानें अन्न पुरवठ्याचा प्रश्न सध्यापेक्षां अधिक समाधानकारक रीतीनें सोडवला जाईल अशी आशा आहे.

भाडेकरी व घरमालक

(संपादक: श्री. वि. गाडगीळ, एम्. ए., एलएल. बी.;
प्रकाशक : दी डेक्कन पब्लिशर्स लि. पुणे २, किंमत १॥ रुपया)

भाडेकरी व घरमालक हें पुस्तक पुणें घरभाडेकरू संघाचे अध्यक्ष श्री. श्री. वि. गाडगीळ, एम्. ए. एलएल. बी., वकील, यांनीं संपादन करून घरमालक व भाडेकरू यांची मोठी सोय केली आहे. घरमालक व भाडेकरू या दोघांमध्येंहि कायद्याच्या वास्तविक ज्ञानासंबंधीं गैरसमज प्रचलित असल्याचें आढळून आल्यावरून हें पुस्तक प्रसिद्ध करण्यांत आलें आहे व पुस्तकांतील एकंदर मजकुरावरून हा हेतू सिद्धीस गेल्याचें आढळून येईल. सदर पुस्तकांत मराठीमध्यें या विषयावरील सर्व कायद्यांचें सुबोध सटीक विवेचन करण्यांत आलें असून त्यांत कायद्याच्या भाषेंतील क्लिष्टता क्वचितच आढळून येते.

भाडेंनियंत्रण हुकूम व जागा सवलतीचा कायदा यासंबंधींचें विवेचन विशेष विस्तारपूर्वक करण्यांत आलें आहे व मिळकतीच्या कायद्यांतील तत्त्वास धरून पहिल्या सात आठ प्रकरणांत घरमालक व भाडेकरू यांचें संबंध कसे असावयास पाहिजेत व त्या दोघांचे हक्क व जबाबदाऱ्या कशा असावयास पाहिजेत हें दाखविलें आहे.

हल्लीं घरमालक व भाडेकरू यांचेमधील तंटे बरेच होऊं लागल्यामुळें अशा पुस्तकाची गरज फार भासत होती ती या पुस्तकानें भरून निघाली आहे ही मोठ्या आनंदाची गोष्ट आहे.

पुस्तकाच्या शेवटीं हल्लींच्या जागा सवलतीचा नवीन कायदा, मिळकतीच्या कायद्यांतील मालक भाडेकरू प्रकरण, भाडें नियंत्रण हुकूम व मुंबईचा भाडें नियंत्रण कायदा, अशा चार कायद्यांचीं परिशिष्टें इंग्रजींत दिल्यामुळें पुस्तकाच्या उपयुक्ततेंत भर पडलेली आहे. हें एक पुस्तक जवळ असलें म्हणजे घर मालक व भाडेकरी यांच्या संबंधांत निराळें पुस्तक जवळ बाळगण्याची जरूर भासणार नाहीं.

नाशिक जिल्ह्यांतील तालुका डेव्हलपमेंट असोसिएशन्सची परिषद

नाशिक जिल्ह्यांतील सर्व तालुका डेव्हलपमेंट असोसिएशन्सची परिषद १२ जून, १९४४ रोजीं नाशिक येथें भरली होती. प्रत्येक ता. डे. असोसिएशनचे पांच प्रतिनिधी बोलविण्यांत आले होते. सर्व असोसिएशन्सनीं परिषदेच्या कामांत लक्ष घातलें. शेतकऱ्यांच्या अडचणीचा विचार करणें, डिस्ट्रिक्ट डेव्हलपमेंट असोसिएशनच्या कामाची पुनर्घटना करणें व सर्व तालुका असोसिएशन्सच्या कामांत एकसूत्रीपणा आणणें, हा परिषदेचा हेतु होता. अध्यक्षस्थान कॅप्टन एस. जी. खोत, (इं. मे. आर्मी कोअर, एज्युकेशनल ऑफिसर, टी. डी, सेंटर्स, देवळाली) हे होते. नाशिक जिल्हा डे. असोसिएशनचे उपाध्यक्ष दि. ब. वंडेकर, ह्यांनीं परिषद् यशस्वी करण्याचे कामीं विशेष मेहनत घेतली व त्यांस एज्युकेशनल सुपरव्हायझर श्री. वाणी व नाशिक ता. डे. असोसिएशनचे सेक्रेटरी श्री. शिंदे व श्री. राजेंद्र ह्यांनीं मदत केली.

करारांची पूर्तता अशक्य झाल्यास ॲडव्हान्सची रक्कम परत

वादी कंपनीचें (मनसेह फिल्म कंपनी) नांव जपानी असलें तरी तिचे मालक थिरूवनगाडा मुदलियार व त्याचा अज्ञान मुलगा सौंदराजन हे दोन भागीदार हिंदुस्थानांतील रहिवाशी होते. त्यांनीं आपली पेढी सिंगापूर येथें स्थापन केली होती. वादी नं. १ ऑक्टोबर १९४१ मध्यें मद्रासला आला व त्यानें प्रतिवादी कंपनीशीं (जेमिनी पिक्चर सर्किट) असा करार केला कीं, प्रतिवादी कंपनी त्यावेळीं तयार करीत असलेली 'भक्त नारद' ही फिल्म फेडरेटेड मलाया स्टेट पीनांग व सिंगापूर येथें दाखविण्याकरितां ३ वर्षे भाड्यानें द्यावी. भाड्याची रक्कम रु. ९०००- ठरली व त्यापैकीं निमी रक्कम रु. ४५०० वादीनें ताबडतोब ॲडव्हान्स म्हणून प्रतिवादीस दिले. सिनेमाची फिल्म मार्च १९४२ मध्यें प्रतिवादीनें वादीस द्यावी असें ठरलें. करारापासून दोनच महिन्यांत जपाननें युद्ध पुकारलें व सिंगापूर जपानच्या ताब्यांत गेलें. वादी हिंदुस्थानांतच अडकून पडले. ज्या देशांत सिनेमा दाखवावयाचा ठरला होता तो शत्रूच्या ताब्यांत गेल्यामुळें वादी-प्रतिवादीमध्यें झालेला करार पुरा होणें कराराच्या कायद्याच्या कलम ५६ प्रमाणें अशक्य झालें. म्हणून वादींनीं प्रतिवादीला दिलेला ॲडव्हान्स व्याजासह परत मागण्याचा मद्रास हायकोर्टांत दावा केला. प्रतिवादीची तक्रार अशी होती कीं, " आपण ठरलेल्या करारप्रमाणें 'भक्त नारद' ही फिल्म देण्यास तयार आहों " तेव्हां युद्धामुळें वादीला सिंगापूर वगैरे ठिकाणीं पिक्चर दाखवितां येत नसल्यास त्याबद्दल प्रतिवादी जबाबदार नाहींत. परंतु वादी कलम ५६ व ६५ चा आधार घेतो. कलम ५६ प्रमाणें पार्टीच्या अपराधाशिवाय कोणत्याहि योग्य कारणामुळें एखादा करार पुरा करणें अशक्य झाल्यास तो करार रद्द (void) होतो व कलम ६५ प्रमाणें अशा रद्द ठरलेल्या करारांच्यामुळें जर एखाद्या पार्टीला कांहीं ॲडव्हान्स मिळाला असेल तर तो त्यानें परत केला पाहिजे. युद्ध उत्पन्न झालें व केव्हां थांबेल हें आज ठरवितां येत नाहीं. त्यामुळें वादीला सिंगापूर वगैरे ठिकाणीं पिक्चर दाखविणें अशक्य झालें यांत वादीचा कांहींच दोष नाहीं म्हणून वादीतर्फे डिक्री झाली.

सारांश—एखादा करार झाल्यावर करार करणाऱ्या इसमाचा कोणताही अपराध नसतां दुसऱ्याच कांहीं करणामुळें तो करार पुरा करणें अशक्य झालें तर तो करार रद्द ठरतो. युद्ध हें अशाचपैकीं एक कारण आहे. एकदां करार रद्द झाल्यावर त्या कराराच्या वेळीं एका इसमानें दुसऱ्याला इसार वगैरे दिला असेल तर त्यानें तो परत केला पाहिजे. —न्यायबोध.

वाटपाचें काम करणाऱ्या सहकारी सोसायट्यांच्या विक्रेत्यांकरितां व सेक्रेटरींकरितां ट्रेनिंग क्लास.

वरील वर्गाचें उद्घाटन नाशिक जिल्ह्यांतील सहकारी सोसायट्यांचे ऑनररी ऑर्गनायझर, दि. ब. वंडेकर, ह्यांनीं नाशिक येथें ता. ५ जुलै रोजीं केलें. अध्यक्षस्थानीं मालेगावचे प्रांत ऑफिसर श्री. सोनटक्के हे होते. वर्ग १० दिवस चालू होता व त्याचा फायदा २३ उमेदवारांनीं घेतला.

हिंदी शेतीस कृत्रिम खतांचा पुरवठा.

हिंदुस्थानांतील शेती अत्यंत मागासलेली आहे. हिंदुस्थानांत दर एकरीं जितकें उत्पादन होतें तितकें थोडें उत्पादन जगांत इतरत्र कोठेंच होत नसेल. या स्थितीस अनेक कारणें आहेत, पण त्यांपैकीं खतांचें दुर्भिक्ष्य हें सर्वांत परिणामकारक आहे. ऊंस सोडून बाकी कोठल्याच पिकास पुरेसें खत दिलें जात नाहीं. हिंदुस्थानच्या सर्व जनतेस जर हिंदुस्थानांत पिकणारेंच धान्य पुरवावयाचें असेल तर पिकांस हल्लींपेक्षां बऱ्याच मोठ्या प्रमाणावर खतांचा पुरवठा करावयास पाहिजे हें उघड आहे. केवळ शेणखतानें ही गरज भागेल हें शक्य नाहीं, तर मोठ्या प्रमाणावर कृत्रिम खतें वापरलीं पाहिजेत व शिवाय स्वावलंबनाच्या दृष्टीनें तीं येथेंच केलीं पाहिजेत. नुसतें कृत्रिम खतांचें उत्पादन करूनही भागणार नाहीं, तर त्यांचा उपयोग कसा करावा याबद्दल शेतकऱ्यांस शास्त्रीय रीत्या शिक्षण देण्याची व्यवस्था केली पाहिजे. हें काम सरकारनें वा खतें तयार करणाऱ्या कंपन्यांनीं केलें पाहिजे. या प्रश्नांस तोंड फोडण्यासाठींच खत पुरवठ्याच्या प्रश्नांचा सखोल विचार करण्यासाठीं सरकारनें नुकतीच एक समिति नेमली आहे.

वनस्पतींस जीं अनेक द्रव्यें लागतात त्यांपैकीं कार्बन, हैड्रोजन, ऑक्सिजन, नैट्रोजन, फॉस्फरस व पोटॅशियम हीं सोडून इतर द्रव्यें सर्व जमिनींत असतात. वरीलपैकीं पहिलीं तीन द्रव्यें हवा व पाणी यांपासून झाडांस मिळतात, उरलेल्या तिघांचा पुरवठा खतांतून होतो. प्राणिजन्य खतांत (मासळी, व खाटिक खान्यांत वायां जाणारे भाग इ.) तीनही द्रव्यें जरूर त्या प्रमाणांत असतात. कृत्रिम खतांत मात्र साधारणतः एक वा क्वचित दोन द्रव्यें असतात, त्यामुळें जमिनीची परीक्षा करून योग्य त्या प्रमाणांत तीं मिसळावीं लागतात.

पोटॅशियम बहुधा पोटॅशियम क्लोराईड व सल्फेट या स्वरूपांत वापरतात. पोटॅशियम् बहुतेक सर्व खडकांत असतो त्यामुळें नदीच्या गाळांतही असतो. मात्र शुद्ध पोटॅशचे क्षार हिंदुस्थानांत अजून मोठ्या प्रमाणावर होत नाहींत. पोटॅशचा साबणाच्या व काचेच्या कारखानदारींतही फार मोठ्या प्रमाणावर उपयोग होतो. पोटॅश खाणींत सांपडतो. त्याचा जगांतील सर्वांत मोठा पुरवठा जर्मनींतील स्टासफुर्टच्या खाणींतून होत असे. हिंदुस्थानांतही पोटॅशच्या खाणी आहेत.

फॉस्फरस मुख्यतः सुपरफॉस्फेटच्या वा डबल फॉस्फेटच्या रूपानें वापरतात. सुपरफॉस्फेट व डबल फॉस्फेट हीं कॅलशियम फॉस्फेट व अनुक्रमें सल्फ्यूरिक व फॉस्फॉरिक ॲसिड यांच्या रासायनिक क्रियेनें होतात. सल्फ्यूरिक ॲसिड हिंदुस्थानांत अजून दुर्मिळ आहे, व पुढेही विशेष कमी दुर्मिळ होईल असें वाटत नाहीं, कारण सल्फर (गंधक) हें द्रव्य येथें अजून मोठ्या प्रमाणावर होत नाहीं. कॅलशियम फॉस्फेट " फॉस्फेटिक रॉक " या रूपांत मिळतें. त्याचे उत्तर आफ्रिकेंत व मध्यपूर्वेंत मोठे डोंगर आहेत. फॉस्फरस हाडांतही बराच असतो व बोनमील म्हणजे हाडांची पूडच होय. वर उल्लेखिलेले डोंगर लाखों वर्षांपूर्वी दिवंगत झालेल्या प्राण्यांचे अवशेषच आहेत. हिंदुस्थानांत सिंगभूम जिल्हा (बिहार) व त्रिचनापल्ली जिल्हा येथें अशुद्ध स्वरूपात फॉस्फेट सांपडतें. परंतु त्यापासून फॉस्फेट करण्याचे प्रयत्न अजून किफायतशीर होत नाहींत. फॉस्फरसचा दुसऱ्या एका स्वरूपांतही शेतीस उपयोग होतो, त्यापासून उंदीर व घुशी मारण्यास विषारी मोळ्या करतात.

वरील द्रव्यापेक्षां बऱ्याच मोठ्या प्रमाणावर नैट्रोजनचीं खतें लागतात. सुदैवानें ईश्वरानें सर्व राष्ट्रांस नायट्रोजनचा भरपूर पुरवठा केला आहे, कारण हवा ८०% नैट्रोजनच असते. मात्र हवेंत सांपडतो त्या स्थितींत त्याचा वनस्पतींस उपयोग करतां येत नाहीं. तसा उपयोग होण्यास नैट्रोजनचा इतर कोणत्यातरी द्रव्याशीं रासायनिक संयोग झालेला असावा लागतो.

वनस्पतींस नायट्रोजन नायट्रेटच्या रूपांत लागतो म्हणून नायट्रेट खत वापरणें उत्तम, परंतु इतर स्वरूपात असलेल्या नैट्रोजनचें जमिनींतील कृमि नायट्रेटमध्यें रूपांतर करतात त्यामुळें नायट्रेटच पाहिजे असें नाहीं, तर इतर रूपांतही नैट्रोजन चालतो. नायट्रोजन बाजारांत मुख्यतः (१) चिली नायट्रेट (सॉल्टपिटर) (२) बेंगाल नायट्रेट (सोरा) (यांत पोटॅश सुद्धा असतो) (३) अमोनियम सल्फेट (४) अमोनियम नायट्रेट (५) अमोफॉस (यांत फॉस्फरस सुद्धां असतो) (६) यूरिया (७) सायनामाइड या स्वरूपांत मिळतो. पहिली दोन खतें अनुक्रमें चिली व बंगाल येथें जमिनीवर सांपडतात. सायनामाइड हें कार्बाइडपासून करतात व कार्बाइड करण्यास भरपूर वीज लागते त्यामुळें तें हिंदुस्थानांत सध्या तयार करणें अवघड आहे. उरलेलीं खतें म्हणजे अमोनियम क्षार व यूरिया यांकडे अधिक लक्ष देणें जरूर आहे. हीं सर्व अमोनियापासून होतात. अमोनियाचा पुरवठा दोन प्रकारें होतो.

(१) दगडी कोळशाचा गॅस करतांना निघणारें डांबर व (२) कृत्रिम अमोनिया. पहिल्या प्रकारें अमोनिया मिळणें हिंदी शहरांत बऱ्याच मोठ्या प्रमाणांवर गॅसचा उपयोग झाला तरच शक्य आहे. राहतां राहिला कृत्रिम अमोनिया. बरेच श्रम व संशोधन केल्यास येथें अमोनिया करणें अशक्य नाहीं. आज जगांत मनुष्यहानी करण्यासाठीं वर्षाकाठीं लाखों टन नायट्रिक ॲसिडच्या क्षारांचा उपयोग केला जात आहे. हे सर्व नायट्रिक ॲसिड कृत्रिम अमोनियापासूनच तयार केलेलें असतें, याचा विचार केल्यास लक्षांत येईल कीं कोणत्याही एका राष्ट्रास अमोनियाची मक्तेदारी दिलेली नाहीं व हिंदुस्थानांतही अमोनिया तयार करणें किफायतशीर होणें शक्य आहे. कृत्रिम अमोनिया करण्यास नैट्रोजन व हैड्रोजन लागतात. यांचें जरूर तें मिश्रण हवा, पाणी व कोळसा यांपासून तयार होतें व जोडीस कार्बानिक ॲसिड वायूही होतो. हें मिश्रण तीव्र दाबासाठीं (चौरस इंचास २००० पौंडांच्या वर) असतांना कांहीं विशिष्ट द्रव्यांवरून नेलें असतां रासायनिक मिलन होऊन अमोनिया तयार होतो. ही कृति इ. स. १९१५ मध्यें जर्मनींत डॉ. हाबर यानें शोधून काढली. अमोनियापासून इतर अनेक द्रव्येंही करितां येतात व हिंदी स्वावलंबनाच्या दृष्टीनें मांडवलदारांनीं या धंद्यांत लक्ष घालणें अगत्याचें आहे.

लष्करी वाहनांचे अपघात

लष्करी वहानांच्या अपघातासंबंधी लोकमताची तीव्रता किती आहे, हें वेस्टर्न इंडिया ऑटोमोबाइल असोसिएशनच्या अध्यक्षांनीं आपल्या भाषणांत नुकतेंच सांगितलें. या वहानांच्या ड्रायव्हरांना सर्व लोकांना लागू असणारे वहातुकीचे नियम लागू करावे किंवा निदान त्या ड्रायव्हरांच्या मुलांची चौकशी लष्करी व बिन लष्करी अशा मिश्र कोर्टामार्फत व्हावी असें त्यांनीं सुचविलें.

पुणें येथें सहकारी शिक्षणाचा वर्ग

प्रो. काळे ह्यांच्या हस्तें उद्घाटन

प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूटच्या विद्यमानें महाराष्ट्रासाठी पुणें येथें शिक्षणाचा वर्ग चालू करण्यांत आला आहे. त्याचें उद्घाटन सेंट्रल सहकारी बँकेच्या दिवाणखान्यांत प्रो. काळे ह्यांच्या हस्तें झालें. वर्गाचे ऑनररी प्रिन्सिपॉल श्री. एस. आर. पाळंदे, एम. ए., एलएल. बी. ह्यांनी प्रथम वर्गाचा उद्देश, अभ्यासक्रम, त्याची व्यवस्था, इत्यादि विषयीं थोडक्यांत माहिती दिली. औपचारिकरीतिनें वर्गाचें उद्घाटन करण्यापूर्वी त्यांतील शिक्षणाचें महत्त्व प्रो. काळे ह्यांनीं विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबवलें. त्यांच्या भाषणाचा मथितार्थ असा:—कोठलाहि धंदा अगर व्यवहार अनुभवानें शिकतां येत असला तरी त्याच्या मुळाशीं असलेलीं तत्त्वें समजलीं असतां कार्यक्षमता वाढण्यास सहाय होतें. ह्याकरितांच सरकारी व इतर नोकरांचें भक्कम पायावर शिक्षण झालेलें असावें अशी अपेक्षा अलीकडे सर्वत्र असते. अभ्यासक्रम विस्तृत आणि जड आहे असें कित्येकांस वाटण्याचा संभव आहे, पण सहकारी कार्याशीं ज्यांचा संबंध येतो अशा सर्व विषयांचें मूलग्राही ज्ञान तें अंगावर घेणाऱ्यांस मिळणें अगत्याचें आहे. तत्त्व आणि व्यवहार ह्यांची सांगड विशेष फलप्रद होते. युद्धोत्तर काळांत घडवून आणावयाच्या आर्थिक अभिवृद्धींत शेती व सहकार ह्यांच्या सुधारणेस महत्त्वाचें स्थान देण्यांत येणार आहे. सहकारी संस्थांची संख्या किती तरी पटींनीं वाढवावी लागेल आणि त्यांच्या कार्याच्या व्यापांत वाढ करावी लागेल. सहकारी चळवळीपुरती संवर्धनाची योजना कार्यकर्त्यांनीं व सरकारनें तयार केली पाहिजे. खेडेगावांच्या सुधारणेचा प्रश्न हिंदुस्थान सरकारनें व प्रांतिक सरकारनें हातीं घेतला आहे. त्यांच्या योजनेंत सहकारी संघटनास योग्य स्थान मिळेल अशा तऱ्हेचा प्रयत्न सहकारी पुढाऱ्यांनीं करणें आवश्यक आहे. सहकारी संघटनाची सर्वांगीण व सोपपत्तिक माहिती असलेल्या लोकांचा मोठा पुरवठा व्हावा लागेल आणि आपल्यासारखे किती तरी वर्ग चालवून शिकलेले लोक तयार करावे लागतील. इन्स्टिट्यूटच्या शिक्षणव्यवस्थेचा पूर्ण फायदा होतकरू कार्यकर्त्यांनीं घेतला पाहिजे. सहकारी कार्यांत स्वार्थ व लोकसेवा साधण्याची संधि सर्वांस मिळत असते हें ध्यानांत बाळगणें आवश्यक आहे. प्रस्तुत वर्गांत तात्त्विक व व्यवहारी शिक्षण देण्यांत येईल, त्याचें चीज विद्यार्थी करतील अशी आशा आहे. रा. सा. खोले ह्यांनीं प्रो. काळे आणि निमंत्रित पाहुणे यांचे आभार मानल्यावर समारंभ संपला.

निरा व कल्याण येथें अमोनियम सल्फेटचे कारखाने निघणार!

रासायनिक खतांचे, विशेषतः अमोनियम सल्फेटचे कारखाने हिंदुस्थानांत मोठ्या प्रमाणावर काढण्याकरितां सल्ला देण्यासाठी हिंदुस्थानांत दाखल झालेलें ब्रिटिश तज्ज्ञांचें मंडळ पुणें येथें ता. २८ जुलै रोजीं येईल. महाराष्ट्रांतील साखर कारखान्यांच्या उंसास जवळ पडणारें निरा व आजूबाजूच्या भाताच्या पिकांस सोईस्कर कल्याण अशीं दोन केंद्रें कारखान्यांच्या स्थापनेस सोईचीं होतील असें बोललें जात आहे. रासायनिक खतांच्या उत्पादनास स्वस्त आणि मुबलक वीज अथवा कोळसा ह्यांची आवश्यकता असते. मुंबई प्रांतांतील नियोजित कारखान्यांस विजेच्या पुरवठ्याची अडचण भासणार नाहीं.

बॉन्डेड लॅबोरेटरीसाठी

ठेवी घेणें आहेत

मागोरा केमिकल कं. लि., तिच्या अनेक शोधामुळें व मालामुळें जनतेच्या परिचयाची झालेलीच आहे. आता डॉक्टर लोकांना लागणारी टिंक्चर्स, एक्स्ट्राक्टस, सायरप्स, टॅबलेट्स इ. इंग्रजी औषधें तयार करण्यासाठीं बॉंडेड लॅबोरेटरीची परवानगी सरकारकडून कंपनीला मिळाली असून त्या बाबतींत जरूर ती सर्व तयारीहि पूर्ण झाली आहे. ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यांत वरीलपैकीं बरीचशीं औषधें बाजारांत येतील. मुंबईखेरीज अखिल महाराष्ट्रांत इतरत्र कोठेहि अशा तऱ्हेची लॅबोरेटरी नाहीं. ही लॅबोरेटरी सुरू करण्याचा पहिला मान 'मागोरा केमिकल कं. लि.' नें अवघ्या १ वर्षांतच मिळविलेला आहे, हें नमूद करण्यास अभिमान वाटतो. वरील सर्व औषधें नेहमींच मोठ्या प्रमाणावर लागत असतात. युद्धापूर्वी त्यांतील बरीचशीं परदेशाहून येत असत. आतां तीं येत नसल्यामुळें देशी उद्योगधंद्यांना या धंद्यांत भरपूर वाव आहे.

मागोरा कंपनीनें मध्यंतरी कांहीं दिवस ठेवी घेण्याचें बंद केलें होतें. परंतु वरील सर्व गोष्टींसाठी आतां रु. २० हजारपर्यंत ठेवी स्वीकारण्याचें ठरविलें आहे. कंपनीचे चालू भागीदार व ठेवीदार यांना प्रथम संधी दिली जाईल. रु. ५०० पेक्षा कमी रकमेची ठेव स्वीकारली जाणार नाहीं.

मुदत व दर

१	वर्ष	द. सा. द. शें.	४	टक्के
२	वर्षें	" " " "	४½	"
३	वर्षें	" " " "	५	टक्के

जास्त माहितीसाठीं लिहा अगर भेटा.—

आर. वाय. रानडे ॲण्ड को,
मॅनेजिंग एजंटस,
मागोरा केमिकल कं. लि., हिराबाग, पुणें २.

तुमच्या आवडींत व ऐपतींत प्रसिद्धीचें प्रभावी साधन

कॅलेंडर्स

(१९४५)

नवीन आकर्षक चित्रांचा आल्बम तयार होत आहे.—प्रमुख ठिकाणीं एजंटस नेमणें आहेत.

दि आर्ट कॅलेंडर्स लि.

१५ बुधवार पेठ, पुणें २

'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

हें पत्र पुणें, पेठ शनवार नं. ५१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. अरविंद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' शनवार, घ. नं. ९२४।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.

खालील पत्त्यावर चोकशी करावी.

व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

अर्थ

वर्गणीचे दर.

वार्षिक वर्गणी
रु. ४
(टपाल हंशील माफ)
किरकोळ अंकास
दोन आणे.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष १० पुणें, बुधवार, तारीख २ ऑगस्ट, १९४४ अंक ३१

दि ब्रिटिश इंडिया जनरल इन्शुअरन्स कं. लि.

(स्थापना : १९१९)

आम्ही आयुर्विम्याखेरीज करून आग, मरीन, अपघात, इत्यादींचे सर्व प्रकारचे विमे स्वीकारतों.

—: चेअरमन व मॅनेजिंग डायरेक्टर :—
सर होमी मेहता, के. बी. ई., जे. पी.

पुणें शाखा :
मोति माणिक मॅन्शन,
लक्ष्मी रोड.

हेड ऑफिस :
मेहता हाऊस,
अपोलो स्ट्रीट, मुंबई.

न्यू इंडिया इंडस्ट्रीज लि.

(Approved Re-traders and Approved Contractors)
२६ लॅमिंग्टन नॉर्थ, मुंबई ११.
अध्यक्ष:—श्री. ग. स. मराठे, ॲक्चुअरी.

महाराष्ट्रांतील रबराचा प्रमुख कारखाना

★ गिरणीचे रोलर्स ★ रबरी हातमोजे ★ छापखान्यांचे रोलर्स
★ रीमोल्ड टायर्स ★ रबरी वॉशर्स ★ सॉलिड व्हील्स

व इतर रबरी माल तयार होतो.

पु. ग. मराठे
मॅनेजिंग डायरेक्टर.

गिरगांव
मुंबई नं. ४

महिंद्रकर ब्रदर्स
तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक,
पुणें

डोक्यांतील उवा १ तासांत
मारण्याचा आश्चर्यकारक शोध
लायसॉफ
बाटली किंमत १ रु. ट. खं. निराळा
दोन वेळा उपयोग
दि मागोरा केमिकल कं. लि.
— हिराबाग, पुणें २ —

विविध माहिती

नव्या इंजनांची व यंत्रसामुग्रीची खरेदी

हिंदी रेल्वेजसाठी १९४५-४६ सालाकरितां ६० कोटि रुपयांचीं इंजनें व २ कोटि रुपयांची यंत्रसामुग्री ह्यांस रेल्वेजच्या स्टॉन्डिंग फिनॅन्स कमिटीनें मान्यता दिली आहे. स्थानिक खरेदी अशक्य झाली तर ग्रेट ब्रिटनमध्यें ऑर्डरी देण्यांत येतील. आयातीचे बाबतींत सर्व देशांत ग्रेट ब्रिटनला प्राधान्य द्देण्यांत येईल.

चालत्या आगगाड्यांत कोर्ट चालणार

बिगर तिकिट प्रवास करणाऱ्या व इतर रेल्वेबाबत गुन्हे करणारांची तात्काळ चौकशी करतां यावी, ह्यासाठी संयुक्त प्रांतांत चालत्या गाड्यांतून कोर्ट काम करणार आहेत.

रेल्वे इंजनांस लागणारा कोळसा

युद्धास प्रारंभ झाल्यापासून उतारूंच्या वहातुकींत २९% व मालाच्या वहातुकींत २७% वाढ झाली असली, तरी १९४२-४३ मध्यें हिंदी रेल्वेजना फक्त १३% ज्यास्त कोळसा लागला. रेल्वेस लागणाऱ्या कोळशापैकी ९०% कोळसा इंजनांत जाळण्यांत येतो, ह्या दृष्टीनें इंजनांचा कोळसा खाण्यावर विशेष नजर ठेवून जादा कोळसा खाणाऱ्या इंजनांबाबत त्याच्या कारणांची काळजीपूर्वक चौकशी करण्यांत येते. इंजनें नादुरुस्त स्थितींत असलीं, म्हणजे त्यांचें कोळसा खाण्याचें प्रमाण वाढतें.

आगगाडीच्या डब्यांतील गर्दीमुळें झालेला भयंकर घोटाळा

आगगाडीच्या डब्यांतील गर्दीमुळें उपस्थित झालेल्या एका प्रसंगाचें वर्णन मुंबईच्या एका साप्ताहिकांत आलें आहे, तें गमतीदार आहे. लग्नाचीं दोन वऱ्हाडीं एकाच डब्यांत शिरलीं. तो डबा अर्थातच खच्चून भरलेला होता. दोन्हीं वऱ्हाडीं एकाच स्टेशनावर उतरून सामान पाहूं लागलीं. एका वऱ्हाडांत ३० ढाग व एक बुरखा घातलेली वधू होती व दुसऱ्या वऱ्हाडांत २९ ढाग व एक बुरखाधारी वधू होती. आपलें सामान घेऊन दोन्हीं वऱ्हाडीं आपापल्या मार्गास लागलीं. वाटेंत त्यांपैकीं एकांतील वराला त्याच्या पत्नीचें दर्शन झालें, तेव्हां बुरख्यांतील स्त्री ही त्याची पत्नी नसल्याचें त्यास आढळून आलें. त्यांची खरी पत्नी दुसऱ्या वऱ्हाडांत चुकून सामील होऊन भलत्याच पुरुषाची पत्नी बनली होती ! घांवत जाऊन त्यानें आपली खरी पत्नी मिळवली !

सरकार बंगाल-नागपूर रेल्वे विकत घेणार

बंगाल नागपूर रेल्वे कंपनीच्या खरेदीचें काम हिंदुस्थान सरकार ३० सप्टेंबर, १९४४ अखेर पुरें करील. त्या कंपनीस एकूण ४ कोटि, ८० लक्ष रुपये यावे लागतील. भाग भांडवलाच्या प्रत्येक १०० पौंडांवर २० पौंड वाढावा देण्याचें ठरलें आहे. बंगाल नागपूर रेल्वे कंपनीची स्थापना १८८७ सालीं झाली.

अन्नपुरवठ्यास ब्रिटिश सरकारची मदत

ब्रिटिश सरकार ग्रेट ब्रिटनमधील अन्नपुरवठ्यासाठी किती प्रचंड खर्च करतें, हें खालील आकडे दर्शवितील.

कोटि पौंड	
६	ब्रेड, आटा, ओटमील
२·३	मांस
२·८	बटाटे
१·१	अंडीं
१	साखर
१	दूध

रावळगांव शुगर फार्म लि.

वरील कंपनीस ३१ मार्च १९४४ अखेरच्या वर्षीं ३,४९,५९३ रुपये निवळ नफा झाला ऑर्डिनरी भागीदारास १४% करमाफ डिव्हिडंड मिळणार आहे.

अमेरिकन सैनिक व अँग्लो इंडियन स्त्रिया

हिंदुस्थानांतील अमेरिकन सैनिकांस येथें विवाह करावयाचा असल्यास अगोदर त्याची परवानगी मागितली पाहिजे. परवानगीचे अर्ज सहानुभूतीपूर्वक विचारांत घेतले जाणार नाहींत, हें अमेरिकेच्या लष्करी खात्यानें स्पष्टपणें जाहीर केलें आहे. अमेरिकन लष्करांतील स्त्रिया व पुरुष ह्यांसहि अमेरिका देशाच्याबाहेर विवाह करण्यास सक्त मनाई आहे. अमेरिकन सैनिकांवरील ह्या निर्बंधाचा परिणाम अँग्लो-इंडियन स्त्रियांवर होणार आहे. जरूर वाटली तर विवाहाची परवानगी मिळेल ह्या अपेक्षेनें कित्येक अँग्लो-इंडियन स्त्रियांनीं अमेरिकन सैनिकांशीं मैत्री केली आहे. तेव्हां ह्यापुढें अमेरिकन सैनिकांस अँग्लो-इंडियन स्त्रियांबरोबर संबंध ठेवण्याची बंदी करण्यांत यावी, असें अँग्लो-इंडियन असोसिएशनचे अध्यक्ष, मि. अँथनी, ह्यांनीं सुचविलें आहे.

लहान मुलांसाठी स्वस्त दुधाचा प्रचार

मुंबई शहरांतील दोन वर्षांखालील मुलांस स्वस्त दरानें दूध पुरविण्याच्या सरकारी योजनेचें अपेक्षित स्वागत झालें नाहीं, ह्या योजनेचा फायदा समजावून सांगण्यासाठी शहरभर प्रचार करण्याचें सरकारनें ठरविलें आहे.

मुंबई-न्यूयॉर्क बिनतारी वहातुक

सध्या हिंदुस्थानांतून अमेरिकेशीं बिनतारी संदेश पाठवावयाचे असले, तर ते लंडनद्वारा पाठवावे लागत असत. मुंबई ते थेट न्यूयॉर्क दळणवळणास १५ ऑगस्ट रोजीं सर गुरुनाथ बेनूर हे वॉशिंग्टन येथून प्रारंभ करतील. इंडियन रेडिओ अँड केबल कम्युनिकेशन्स कं. लि. ही कंपनी दोन अमेरिकन कंपन्यांचे सहकार्यानें ही नवी वहातुक योजना चालू ठेवणार आहे.

अनुक्रमणिका

	पृष्ठ		पृष्ठ
१ विविध माहिती	... २४२	तपासणी—त्यांच्या ठेवी व कर्जे—सहकारविषयक प्रश्नांची चर्चा	
२ जागतिक बाजार पेठांबाबत चुरस	... २४३	६ शेअर बाजार	... २४६
३ हिंदी शेती सुधारणा व ब्रिटिश व्यापार	... २४४	७ ब्रिटिश विमा व्यवसायाची राष्ट्रीय कामगिरी	... २४७
४ पूना मर्चंटस को. बँक लि.	२४४	८ जर्मनीमधील चित्रपटांचा धंदा	... २४७
५ स्फुट विचार	... २४५		
शिखरं बँकेच्या मार्गांची वाटणी—शेडयूल्ड बँकांची			

अर्थ

बुधवार, ता. २ ऑगस्ट, १९४४

जागतिक बाजारपेठांबाबत चुरस

अमेरिकेंत नुकत्याच भरलेल्या चलन परिषदेचा मुख्य हेतु युद्धोत्तर काळांत जागतिक व्यापाराच्या मार्गांत अडचणी येऊं नयेत आणि त्यांत उद्भवणाऱ्या देवघेवींचा व्यवहार सुरक्षित चालवतां यावा हा आहे. सोनें आणि आंतरराष्ट्रीय हुंड्या ह्यांचा संग्रह जागतिक गंगाजळी निर्माण व्हावयाची आहे तीमध्यें केला जाईल आणि त्यामधून देशांच्या परस्पर व्यापारासाठी लागणाऱ्या विनिमय साधनांचा पुरवठा करण्यांत येईल. त्याचप्रमाणें जागतिक बँक स्थापन व्हावयाची आहे तिच्याकडून गरजू देशांस आर्थिक पुनर्घटनेसाठी कर्जे मिळतील. युद्ध संपल्यानंतर जगाची आर्थिक घडी पुन्हां नीट बसण्यास ह्या योजना आवश्यक व साहाय्यक आहेत, ह्यांत संशय नाहीं आणि त्यांस प्रमुख राष्ट्रांचा पाठिंबा असल्यानें त्या यशस्वी होण्यास अडचण पडूं नये. तथापि युद्धानंतर देशांच्या राहणीचा गाडा पूर्ववत् चालण्यास आंतरराष्ट्रीय व्यापाराचा ओघ अनिर्बंध रीतीनें वहाल्यावांचून उद्योगधंद्यांस पुरेशी गिऱ्हाइकी मिळणार नाहीं व लोकांस आवश्यक तें काम व उत्पन्न पुरवलें जाणें अवघड आहे. आज लढाऊ उपयोगाचा माल काढण्यांत कारखाने, भांडलवाले व कामकरी गुंतले आहेत. युद्धानंतर ह्यांस सध्यासारखें काम मिळावयाचें नाहीं आणि बेकारी मोठ्या प्रमाणावर पसरेल. देशांतील भांडवल, यंत्रसामुग्री व मनुष्यबळ ह्यांचा अधिकांत अधिक उपयोग होण्यासारखी परिस्थिति निर्माण झाली पाहिजे आणि ती उत्पन्न होण्यास आंतरराष्ट्रीय विनिमय सुलेपणानें होणें आवश्यक आहे. इंग्लंडसारख्या देशांत कच्चा माल आणि अन्नसामुग्री बाहेरच्या देशांतून आयात करावी लागते आणि तिचा मोबदला पक्क्या मालाच्या निर्यातीच्या स्वरूपांत दिला जातो. म्हणजे इंग्लंडची अंतर्गत आर्थिक सुस्थिति पुष्कळशी निर्गत व्यापारावर अवलंबून आहे आणि त्याची भरभराट होईल त्या मानानें ब्रिटिश उद्योगधंदे चालतील आणि लोकांस काम व मजुरी देऊन त्यांचें जीवन सुखाचें करतील. ह्यामुळें निर्गत व्यापाराच्या संवर्धनास इंग्लंडमध्यें व अमेरिकेंत विशेष महत्त्व दिलें जात असल्यास त्यांत आश्चर्य नाहीं.

ब्रिटिश व अमेरिका ह्या राष्ट्रांतील धंदेवाले जागतिक व्यापाराच्या विस्ताराच्या योजना आखींत आहेत, आणि त्या निर्बंध रीतीनें अंमलांत येण्याच्या मार्गांत संरक्षक जकाती, राष्ट्रीय सरकारांचीं नियंत्रणें व हुंडणावळीच्या अडचणी ह्यांचे कांटे पसरवण्यांत येऊं नयेत असा त्यांचा आग्रह आहे. प्रस्तुत युद्धापूर्वी जर्मनीसारख्या देशांनीं स्वयंपूर्ततेचें धोरण अंगिकारलें होतें आणि त्याचे योगानें जागतिक व्यापार आणि देवघेव हीं मर्यादित झालीं होतीं. युद्धानंतरच्या काळांत कांहीं राष्ट्रीय सरकारांनीं असला क्रम चालू केल्यास जगाची आर्थिक घटना स्थिर पायावर प्रस्थापित होणें कठिण होईल असें त्यांचें म्हणणें आहे. इंग्लंडमध्यें व्यापारी, कारखानदार व इतर पुढारी ह्यांनीं अलीकडे उद्गार काढले आहेत, त्यांत ह्या बाबतींतली भीति स्पष्टपणानें व्यक्त करण्यांत आली आहे. हिंदुस्थान सरकारचे माजी फडनवीस सर जॉर्ज शूस्टर ह्यांनीं लंडन टाइम्सला एक पत्र पाठवून त्यांत प्रस्तुत विषयावर कांहीं विचार प्रदर्शित केले आहेत. त्यांचा आशय असा आहे कीं, इंग्लंडनें बाहेरच्या देशांत भांडवल गुंतवलें होतें, त्यांचें वार्षिक उत्पन्न त्यांचेकडून प्रतिवर्षी कच्चा माल व अन्नसामुग्री ह्यांचे स्वरूपांत युद्धापूर्वी मिळत असे. आतां तें भांडवल परतफेडीमुळें संपलें आहे आणि त्यामुळें पूर्वीसारखी आवश्यक मालाची आयात होण्यास इंग्लंडचा निर्गत व्यापार पन्नास टक्क्यांनीं वाढला पाहिजे. ब्रिटिश माल अधिक प्रमाणांत परदेशांत खपेल तरच त्याच्या किंमतींत इंग्लंडला कच्चा माल व अन्न ह्यांची खरेदी बाहेरच्या देशांत करतां येईल. पण इतर देश स्वतःचे कारखाने वाढविण्याची खटपट करतील आणि त्यांतील बाजारपेठांत परदेशी मालाच्या खपास जरूर तो वाव मिळणार नाहीं. ह्या स्थितींत ब्रिटिश कारखानदारी व व्यापार ह्यांची घडी विचारपूर्वक आणि सर्वांच्या सहकार्यानें बसवण्यांत यावी असें सर जॉर्ज ह्यांचें म्हणणें आहे.

ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, कानडा, दक्षिण आफ्रिका, हिंदुस्थान इत्यादि देशांत युद्धपरिस्थितींतल्या निकडीच्या मागणीमुळें कित्येक धंदे विस्तार पावले आहेत आणि कांहीं नवीन स्थापन झाले आहेत. ह्या धंद्यांचा माल युद्धापूर्वी सदरहु देशांत इंग्लंडमधून जात असे आणि सध्या त्यांमधील बाजारांत ब्रिटिश माल दिसून येत नाहीं. असल्या बाजारपेठांत हा माल पुन्हां खपूं लागून इंग्लंडचा व्यापार व उद्योगधंदे ह्यांची घडी पूर्ववत् कशी बसणार असा येथें प्रश्न आहे. ब्रिटिश माल सुबक व स्वस्त असल्यानें तो बाहेरच्या देशांनीं स्वीकारावा आणि तो बनवणाऱ्या स्वतःच्या कारखान्यांचा व्याप हळुहळु मर्यादित करावा अशी इंग्लंडमधलि धंदेवाल्यांची सूचना आहे. ह्यांत इंग्लंडचें आणि इतर देशांचें हित आहे असें त्यांचें म्हणणें आहे. स्वस्त माल जेथें मिळेल तेथें घ्यावा आणि महाग असेल तेथें तो विकावा ह्या तत्त्वावर आधारलेल्या अनियंत्रित व्यापारी व्यवहारांत जगाचें कल्याण आहे असा ब्रिटिश धंदेवाल्यांचा युक्तिवाद आहे.

परंतु इंग्लंडप्रमाणें इतर देशांसहि युद्धोत्तर काळांत स्वतःची आर्थिक अभिवृद्धी घडवून आणावयाची असल्यानें त्यांस वरील विचारसरणी पटेल असें नाहीं. अमेरिकेचेंच उदाहरण घ्या. युद्धकाळांत अमेरिकन धंद्यांचा एवढा विस्तार झाला आहे कीं त्याची स्पर्धा जगाच्या बाजारांत ब्रिटिश मालास याचक झाल्यावांचून राहणार नाहीं असें ब्रिटिश धंदेवाल्यांस वाटत आहे. समुद्रावरील

जहाजांची आणि आकाशांतील व्यापारी विमानांची वहातूक अमेरिकेच्या वर्चस्वासाठी जाईल आणि इंग्लंड त्या धंद्यांत मागें पडेल अशी त्यांस भीति आहे. युद्धापूर्वी इंग्लंडला व्यापारी विमा आणि जागतिक बँकिंगचे व्यवहार ह्यांचें कोटयवधि रुपयांचें वार्षिक उत्पन्न मिळत असे. सातासमुद्रावरील वाहतुकीच्या धंद्यांत त्यांचें प्राबल्य होतें. ही स्थिति पुन्हां अस्तित्वांत येईल का ? हा येथें प्रश्न आहे. इतर देश व इंग्लंड ह्यांच्या आर्थिक हितसंबंधांचा मेळ कसा घालतां येईल ह्याचा विचार ब्रिटिश धंदेवाल्यांनीं केला पाहिजे. हिंदुस्थानच्या आर्थिक अभिवृद्धीच्या योजनेंत कित्येक नवीन धंद्यांची स्थापना अंतर्भूत आहे. ब्रिटिश यंत्रसामुग्री जरूरीप्रमाणें आयात होण्याची तरतूद तीमध्यें आहे. परंतु स्वतःच्या गरजेप्रमाणें माल तयार करण्याचें आणि सोयीप्रमाणें वाटेल त्या देशांतून तो आयात करण्याचें स्वातंत्र्यहि त्या योजनेंत मूलभूत आहे. हिंदी स्टर्लिंग शिलकांच्या विनियोगाच्या प्रश्नास ह्याच दृष्टीनें विशेष महत्त्व आहे हें येथें लक्षांत ठेविलें पाहिजे. राष्ट्रीय मध्यवर्ती हिंदी मंत्रिमंडळाच्या स्थापनेचें अगत्यहि वरील विवेचनानें स्पष्ट होण्यासारखें आहे.

हिंदी शेतीसुधारणा व ब्रिटिश व्यापार

ग्रेट ब्रिटनचा हिंदुस्थानाशीं व्यापार व त्याचें भवितव्य ह्या विषयावर सर आल्फ्रेड वॉटसन ह्यांनीं रॉयल एंपायर सोसायटींत भाषण केलें, तें हिंदुस्थानांतील जनतेस उद्बोधक होण्याजोगें आहे. "आपल्याला किफायतशीर व मोठी बाजारपेठ पाहिजे असेल, तर जेथें लोकवस्ती मोठी आहे, व ज्या लोकवस्तीचें रहाणीचें मान वाढण्यास पुष्कळ वाव असला तरी स्थानिक उत्पादन पुरें पडत नाहीं, अशीं ठिकाणेंच आपण शोधळीं पाहिजेत" असें त्यांनीं श्रोत्यांना सांगितलें. हिंदुस्थान व चीन हे देश ह्या दृष्टीनें एकदम नजरेसमोर येतात, परंतु जेथें लोकांना अर्धपोटीं रहावें लागतें, तेथें मालाचा उठाव होण्यास वाव कसा मिळणार ? हिंदुस्थानांतील उद्योगधंदे वाढले असले व युद्धपरिस्थितीमुळें त्यांस जोराची चालना मिळाली असली, तरी बहुसंख्य हिंदी जनतेचें जीवन शेतीवरच अवलंबून आहे व त्या जनतेचें रहाणीचें मान वाढल्याविना माल विकत घेण्याची शक्ति त्यांचेमध्यें निर्माण होणार नाहीं हें उघड आहे "हिंदुस्थानांतीलच नव्हे तर सबंद जगांतील शेतकऱ्यांस त्यांच्या मालाचे चांगले पैसे मिळावे, हें जगाच्या हिताच्या दृष्टीनेंहि आवश्यक आहे" असें सांगून "हिंदुस्थानांतील ४० कोटि लोकांची आर्थिक स्थिति सुधारणें ही गोष्ट केवळ भूतदयेच्या दृष्टीनेंच नव्हे तर व्यापारी दृष्टीनेंहि हिताची आहे" असें ते स्पष्ट म्हणाले. शेतीच्या मालाची किंमत वाढली म्हणजे कारखान्यांतील कामगारांचीहि मजुरी वाढेल. त्यांची क्रयशक्ति सुधारली म्हणजे बाजारपेठेवरहि त्याचा चांगला परिणाम होईल. पूर्वेकडील देशांतील कामगारांच्या अल्प वेतनामुळें पाश्चिमात्य देशांतील मजुरांचें वेतन कमी होईल, किंवा त्यांचेवर बेकारीची पाळी येईल ही भीतिहि हिंदी कामगारांचें वेतन वाढल्यामुळें, कमी होण्यास मदत होईल, हा सर वॉटसन ह्यांचा खुलासा मार्मिक आहे. "हिंदी बाजारपेठेंत अमेरिकेस स्थान दिलें जाणार नाहीं, अशी त्या देशानें भीति बाळगण्याचें कारण नाहीं; हिंदुस्थानावर आमची पक्की सत्ता होती त्यावेळींहि आम्ही अमेरिकेस मज्जाव केला नव्हता; हिंदुस्थानची आम्हीं लूट चालविली आहे, ह्या म्हणण्यास चालू शतकांत तरी आधार सांपडणार नाहीं; हिंदुस्थानाच्या उद्धाराकरितां ब्रिटिश औद्योगिक हितसंबंधांनीं एवढा स्वार्थत्याग केला आहे, कीं त्यास वसाहतींच्या इतिहासांत दाखला मिळणें शक्य नाहीं." वगैरे गोष्टीहि त्यांनीं आपल्या भाषणांत समजावून सांगितल्या. युद्धानंतरच्या काळांत मालाची हिंदी मागणी केवढी मोठी येऊं शकेल, ह्यास मर्यादाच नाहीं; सेंद्रोपाडीं शिवण्याच्या मशीनिनें प्रवेश केला आहे ह्यावरून कोणत्या प्रकारचे प्रयत्न झाले पाहिजेत, ह्याची कल्पना करावी, असेंहि सर वॉटसन ह्यांनीं सांगितलें. युद्धापूर्वी हिंदुस्थानानें मोटारींची आयात केली तेवढी आयात शंभर वर्षांपूर्वी सर्व मालाची मिळूनहि होत नव्हती, हें दृश्य काय सांगतें ? हिंदी लोकांना ज्या पद्धतीनें सिगारेट ओढण्यास प्रवृत्त करण्यांत आलें, ती पद्धतच आणखी व्यापार कसा वाढविला पाहिजे, हें दाखवून देत आहे, असेंहि त्यांनीं सुचविलें. युद्धोत्तर काळांत ब्रिटिशांना हिंदुस्थानांत विशेष प्राधान्य मिळेल, असें गृहीत न धरतां हिंदी लोकांशीं सहानुभूतीनें वागूनच व त्यांच्या चालीरीतींस मान देऊनच आपले व्यवहार चालविले पाहिजेत, ही सर वॉटसन ह्यांची अखेरची सूचना आहे. हिंदुस्थान, चीन, वगैरे देशांतील शेतीविषयक प्रगतीकडे ब्रिटिश व्यापारी कोणत्या दृष्टीनें पहात आहेत व त्यांचे हितसंबंध तिच्याशीं कसे निगडित आहेत, हें वरील विवेचनावरून ध्यानांत येईल. खेडेगांवांतील लोकांजवळ पैसा निर्माण व्हावा, शेतीच्या मालाची किंमत वाढावी, मजुरीचे दर वाढावे, खेडोंपाडीं मालाचा प्रसार करावा, इत्यादि मार्गांनीं ब्रिटिश व्यापाराची वृद्धि व्हावी, अशी ही कल्पना आहे. शेतीसुधारणेमध्यें हिंदी जनतेचें हित निर्विवाद आहे, परंतु त्या सुधारलेल्या परिस्थितीमुळें निर्माण होणारी व्यापारी व औद्योगिक संधि हिंदी हितसंबंधांसच मिळावी व परदेशी व्यापाराची पकड पुरी बसण्यापूर्वी हिंदी कारखाने व व्यापार ह्यांची वाढ व्हावी, अशी योजना हिंदुस्थानांत झाली पाहिजे. हिंदी आर्थिक सुधारणेचे प्रश्न कसे गुंतागुंतीचे असतात व ते सोडवितांना कशा प्रकारची दक्षता बाळगणें आवश्यक होतें, हें समजण्यास सर आल्फ्रेड वॉटसन ह्यांचें भाषण मार्गदर्शक होईल.

पूना मर्चंट्स को. बँक लि., पुणें

(वार्षिक सभा : ६-८-४४)

कागदावरील सरकारी नियंत्रणामुळें ३० जून १९४४ अखेरचा वार्षिक वृत्तांत ब्रोटक स्वरूपांत देण्याची बँकेस पाळी आली. वृत्तांताचे वर्षी बँकेच्या ठेवींत ४० हजार रुपयांची वाढ झाली. कर्जास मागणी कमी येऊन एकूण गुंतलेलें कर्ज २२ हजार रुपयांनीं घटलें. ८७ लवाद दाव्यांत गुंतलेली रक्कम ६२,६६७ रुपये आहे. बँकेच्या एकूण ७½ लक्ष रुपये खेळत्या भांडवलापैकी ४ लक्ष ४१ हजार रुपये सरकारी कर्जरोख्यांत असून बँकेनें २ लक्ष, ३६ हजार रुपयांचीं कर्जे दिलेलीं आहेत. बँकेचे ३१ डिसेंबर १९४३ अखेरचे आयव्यय तपासून तिला "अ" वर्ग मिळालेला आहे. अहवालाचे वर्षापासून गुढी पाडव्याचे दिवशीं पानसुपारी समारंभ करण्यास बँकेनें प्रारंभ केला तो उपक्रम सभासदांतील सहकार्य वाढविण्यास उपयुक्त होईल. वृत्तांताचे वर्षी बँकेस ७,६२१ रुपये नफा झाला त्यांतून भागीदारांस ४% डिव्हिडंड मिळणार आहे. अहवालाचे वर्षी श्री. वा. न. जोशी हे चेअरमन होते. श्री. भ. ग. साबणे, बी. कॉम. ह्यांची एजंट म्हणून नेमणूक करण्यांत आली आहे.

स्फुट विचार

रिझर्व्ह बँकेच्या भागांची वाटणी

रिझर्व्ह बँकेचें भांडवल प्रारंभीं सबंद हिंदुस्थानांत प्रमाणशीर वाटण्यांत आलें होतें, तरी पुढें बँकेचे भाग मुंबई विभागाकडे जमूं लागले व प्रत्येक भागीदाराजवळील भागांची सरासरी संख्या हळु-हळु वाढत जाऊं लागली. म्हणजे, थोड्या लोकांचे हातीं भाग एकत्रित होऊं लागले. २६ मार्च, १९४० नंतर कोणालाहि २०० पेक्षा अधिक भाग घेतां येऊं नयेत, अशी बँकेच्या कायद्यांत दुरुस्ती करण्यांत आली. बँकेच्या स्थापनेचे वेळीं एकूण भागीदारांची संख्या ९२,०४७ होती ती ३० जून १९४३ अखेर ४९,४०२ झाली व ३० जून १९४४ अखेर ती ४८,२९२ वर आली. भागांची प्रांतवार वाटणी पहातां, मुंबई खेरीज बाकी सर्व विभागांतील भागांची संख्या कमी झाली असून मुंबईकडे भाग वळत आहेत. १९३१ सालीं एकूण ५ लक्ष भागांपैकी १,४०,००० भाग मुंबई विभागाच्या वाटचास आले होते. ३०-६-४४ अखेर मुंबई विभागांत २,३१,१३३ भाग नोंदलेले आहेत. म्हणजे ३०-६-४३ ते ३०-६-४४ ह्या बारा महिन्यांत मुंबई विभागांतील भागांची संख्या ६,१११ नें वाढली आहे. ह्या मुदतींत कलकत्ता विभागांतील भागांची संख्या कायम राहिली, परंतु दिल्ली, मद्रास व रंगून ह्या विभागांतील भाग मुंबईकडे वर्ग झाले.

शेडयूल्ड बँकांची तपासणी

जून १९४४ अखेर संपलेल्या वर्षीं शेडयूल्ड बँकांची संख्या ६४ वरून ७६ वर गेली. १३ बँकांस नव्यानें शेडयूल्ड बँकांचा दर्जा प्राप्त झाला व एका शेडयूल्ड बँकेचा व्यवहार दुसऱ्या शेडयूल्ड बँकेकडे वर्ग झाला. दोन शेडयूल्ड बँका रिझर्व्ह बँकेच्या शेडयूल मधून काढून टाकण्याच्या लायकीच्या आहेत, अशी शंका आल्यावरून रिझर्व्ह बँकेनें त्यांची तपासणी केली. त्यांपैकी एका बँकेचें खरें वसूल भांडवल व रिझर्व्ह ४२ (६) कलमांत सांगितलेल्या रकमेपेक्षा किंचित् अधिक आढळलें व ती बँक शेडयूलमध्यें राहूं यावी, अशी रिझर्व्ह बँकेनें सरकारला शिफारस केली. दुसरी बँक शेडयूलमध्यें रहाण्यास लायक नाहीं असें आढळून आलें व तिला आपली परिस्थिति सुधारण्यासाठी सहा महिन्यांचा अवधि देण्यांत आला. ह्या बँकेची पुनः तपासणी अर्थात् होईलच. आणखी दोन शेडयूल्ड बँकांना तपासणीसाठी तयार रहाण्याची सूचना देण्यांत आली आहे. ह्यावरून, एकादी बँक आज केवळ शेडयूल्ड बँक आह किंवा नाहीं एवढ्यावरूनच तिच्यासंबंधीं काहीं अनुमान काढणें कसें योग्य नाहीं, हें दिसून येईल.

शेडयूल्ड बँकांच्या ठेवी व त्यांनीं दिलेलीं कर्जे

१९४३-४४ मध्यें शेडयूल्ड बँकांच्या कचेऱ्यांची संख्या १,६०७ ची २,१४१ झाली. म्हणजे ३० जून, १९४४ अखेरच्या बारा महिन्यांत ह्या बँकांच्या कचेऱ्यांत ५३४ ची भर पडली. त्यापूर्वीच्या वर्षीं २०२ नव्या शाखा स्थापन झाल्या होत्या. १३ बँका रिझर्व्ह बँकेच्या शेडयूलमध्यें नव्यानें दाखल झाल्या, त्यांच्या १५५ कचेऱ्या वगळल्या, तरी पूर्वीच्या शेडयूल्ड बँकांच्या कचेऱ्यांत ३७९ कचेऱ्यांची भर पडली असल्याचें दिसून येतें. ज्या ठिकाणीं शेडयूल्ड बँक अथवा ५० हजार रुपयांवर वसूल भांडवल व रिझर्व्ह असलेली एकहि बँक नाहीं, अशा ८८ केंद्रांत नव्यानेंच ह्या कचेऱ्या आल्या. सर्व शेडयूल्ड बँकांकडे मिळून ३० जून १९४४ अखेर ७४७½ कोटि रुपयांच्या ठेवी होत्या, म्हणजे बारा महिन्यांत ठेवींमध्यें सुमारें २०० कोटि रुपयांची वाढ झाली. त्याचा परिणाम शेडयूल्ड बँकांचे पैसे रिझर्व्ह बँकेकडे वाढत्या प्रमाणांत रहाण्यांत झाला. कायद्यानें जेवढी रकम त्यांनीं रिझर्व्ह बँकेकडे ठेवणें आवश्यक आहे, त्यापेक्षा ३६½ कोटि ज्यास्त रुपये त्यांनीं गेल्या वर्षी ठेवले होते; ३० जून, १९४४ अखेर हीच रकम ४५¾ कोटि रुपये झाली. शेडयूल्ड बँकांनीं दिलेल्या कर्जाचा आकडा ३०-६-४३ अखेर १४१¾ कोटि रुपये होता, तो ३०-६-४४ अखेर २११½ कोटि रुपये झाला. शेडयूल्ड बँकांप्रमाणें बिगर शेडयूल्ड बँकांच्या ठेवींतहि वाढ झालेली आढळते. १९४२ अखेर त्यांचेकडे २४ कोटि, ६४ लक्ष रुपयांच्या ठेवी होत्या; १९४३ अखेर त्यांची रकम ३४ कोटि, ७९ लक्ष रुपये झाली.

सहकारविषयक प्रश्नांची चर्चा

सहकारी प्रांतिक बँका आणि इन्स्टिट्यूट्स ह्यांच्या स्थायी समित्यांची सभा गेल्या शनिवारीं आणि रविवारीं मुंबई येथें भरली होती आणि तीमध्यें हिंदी सहकारी चळवळीसंबंधांत उत्पन्न झालेल्या महत्त्वाच्या प्रश्नांची चर्चा झाली. ह्या सभेमागून मुंबईत सहकारी रजिस्ट्रार्सची परिषद् भरली होती आणि तिच्या पुढें-हि चर्चेसाठी ह्याच प्रकारचे अनेक विषय होते. सदरहु परिषद् रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या वियभानें भरवण्यांत आली असून तीमध्यें सहकारी रजिस्ट्रार्स आणि प्रमुख सहकारी कार्यकर्ते उपस्थित होते, ह्या कारणानें तिच्या निर्णयास विशेष महत्त्व प्राप्त होणें स्वाभाविकच आहे. युद्धपरिस्थितीचे सहकारी संघटनावर झालेले परिणाम आणि युद्धोत्तर काळांत त्याचें व्हावयाचें संवर्धन ह्या दोन मुख्य बाबींशीं संलग्न असलेल्या प्रश्नांची चर्चा ह्या परिषदेंत झाली. तिचे निर्णय दूरगामी महत्त्वाचे झाल्यावांचून रहाणार नाहींत.

Telephone 779

TELEGRAM Guest House Poona 2.

पुना गेस्ट हाऊस

१००, लक्ष्मी रोड, पुणें २.

शेअर बाजार

(श्री. व. वि. लोणकर, एम्. ए., बी. कॉम्)

कलकत्त्याला चालू असलेली सट्टेबाजी वजा करता बहुतेक बाजारांतील शेअर्स उर्वा चर्चिल म्हणतो त्याप्रमाणें आपल्या अपेक्षापेक्षां लढाई लवकर थांबली तर बेतानें असावें या हिशेबानें सगळीकडेच शांत आहेत. युद्धोत्तर येणाऱ्या परदेशी मालाच्या चढाओढीच्या सांवल्या आतांच दिसूं लागल्या आहेत व या युद्धाच्या पावसाळ्यांत उगवलेल्या कांहीं कावळ्याच्या छत्र्या नढीच सुकून जाणार असें धरून चालायला हरकत नाहीं. टाटा स्टीलच्या पोटांत ब्याज आहे व तें पुढें कायम राहणारें असल्यानें टाटा डिफर्ड शुक्रवारीं २२३० व ऑर्डिनरी ४२३ च्या आसपास चांगले टिकलेले आहेत. गिरण्या मात्र अधर दिशेकडे तोंड करून आहेत. डाईंग १८६२, कोहिनूर ६२३, नागपूर, ४१८, गोकाक ३१९, व इंदूर ८०२ असे भाव नरम आहेत. इंदूरमध्यें एकादी उफाळी येण्याचा दाट संभव आहे असें वाटतें. तद्वतच मोरारजी (६४७) मध्येंही चलबिचल दिसावी.

ज्यांना लढाईच्या बंद होण्यामुळें येणाऱ्या उलटापालटींत फारसें अडकूं नये असें हवें आहे त्यांनीं असोसिएटेड सिमेंट (२३१; व्या. रु. ७ वार्षिक), बेळापूर सासर (२४६; व्या रु. ९), न्यू इंडिया विमा (८०; व्या. रु. २), टाटा ऑर्डिनरी (४२३; व्या. रु. २३), मदुरा मिल्स (६९; व्या. रु. ३-८), स्टील कॉर्पोरेशन प्रेफरन्स (१३६; व्या. ५ रु.) व सेंट्रल बँक (रु. ८०; व्या. ३ रु.) यांत रकमा गुंतविल्या तर अपेक्षा फारशी चुकणार नाहीं.

बि. हिंदुस्थानाबाहेरील भागीदारांस नोटीस

ब्रिटिश हिंदुस्थानांत रजिस्टर झालेल्या कंपन्यांना आपल्या ब्रिटिश हिंदुस्थानाबाहेरील भागीदारांवर नोटीस बजावण्याचें काम पुष्कळ प्रसंगीं अवघड व गैरसोईचें असतें. डिफेन्स ऑफ इंडिया नियम नं. ८१ एच ह्यानें त्यासंबंधांतील कंपनी कायद्यांत सुधारणा घडवून आणली आहे. ज्यांनीं आपले पत्ते दिलेले नाहींत अशा, ब्रि. हिंदुस्थानाबाहेरील भागीदारांसाठी वर्तमानपत्रांतून नोटीस प्रसिद्ध केली जाते, तिचे ऐवजीं कंपनीच्या नोंदलेल्या कचेरींत नोटीस प्रामुख्यानें दिसेल अशी लावली, तरी ह्यापुढें हरकत नाहीं असा नव्या नियमाचा आशय आहे. ज्या दिवशीं नोटीस लावली जाईल, त्याच दिवशीं ती दिली गेली, असें समजण्यांत येणार आहे.

वालचंदनगर इंडस्ट्रीज लि.

३१ मार्च १९४४ अखेरच्या वर्षीं वरील कंपनीस २२½ लक्ष रुपये निवळ नफा झाला प्रेफरन्स भागीदारांस १२% (वजा कर) व ऑर्डिनरी भागीदारांस ३६% (वजा कर) डिव्हिडंड मिळणार आहे. कंपनीचें भांडवल १३½ लक्ष रुपये असून रिझर्व्ह व इतर फंड ५०½ लक्ष रुपयांचे आहेत. ३० लक्ष रुपयांचीं डिबेंचर्स आहेत. प्रीमिअर कन्स्ट्रक्शन कं. लि. कडे मॅनेजिंग एजन्सी आहे.

दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

पुणें शहर

मांडवल :

(ता. ३१-५-४४ रोजीं)

अधिकृत व खपलेलें : रु. १०,००,०००
वसूल झालेलें : रु. ५,००,०००
रिझर्व्ह व इतर फंड : रु. १,०८,०००
एकूण खेळतें मांडवल : रु. ७५,००,००० चे वर

—: डायरेक्टर्स :—

श्री. धों. कृ. साठे, चेअरमन,
श्री. वा. पु. वर्दे, श्री. वा. गो. काळे, श्री. न. ग. पवार,
श्री. श्री. गो. मराठे, श्री. त्रिं. वि. रानडे, श्री. र. चिं. सोहनी,
श्री. फ. दो. पद्मजी, श्री. मा. रा. जोशी,
श्री. म. वि. गोखले, श्री. वि. ह. देशमुख

: शाखा :

पुणें ४, दलाल स्ट्रीट, मुंबई, जळगांव, नागपूर.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

सी. व्ही. जोग
मॅनेजर

दि बँक ऑफ इंडिया लि.

[स्थापना : १९०६]

अधिकृत मांडवल ... ... रु. २,००,००,०००
वसूल झालेलें मांडवल ... ... रु. १,००,००,०००
रिझर्व्ह फंड ... ... रु. १,२३,००,०००

मुख्य कचेरी: ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

मुंबईमधील शाखा : बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

इतर शाखा : अहमदाबाद (भद्र, मुख्य ऑफिस), अहमदाबाद (एलिस ब्रिज शाखा), अहमदाबाद (स्टेशन शाखा), अमृतसर, अंधेरी (मुंबई शेजारी), बांद्रे (मुंबई शेजारी), कलकत्ता (क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्क्वेअर), जमशेदपूर, कराची, मद्रास, नागपूर (किंग्जवे), नागपूर (इतवारी बझार), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत, भुज (कच्छ).

लंडन एजन्ट्स : वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

डायरेक्टर्स : सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय.(अध्यक्ष), श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के. नाईट; मि. ए. गेडिस; सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, जी. बी. ई., के. सी. आय. ई.; मि. दिनशा के. दाजी; श्री. रामनिवास रामनारायण.

करंट डिपॉझिट अकाउंट्स :

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर १% दरानें ब्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील ब्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर ब्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षां कमी झाल्यास ब्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य ब्याजानें स्वीकारल्या जातात. ब्याजाचे दर पत्रद्वारें.

बिल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते, सर्व तऱ्हेचें ट्रस्टींचें काम केलें जातें. नियम अजमावून मागवावेत.

एजंट:—एच्. ए. करीमभाई

ब्रिटिश विमाव्यवसायाची राष्ट्रीय कामगिरी

"तहाच्या अटी ठरवितांना विमाव्यवसायास विसरूं नका"

(लॉइडसचे माजी चेअरमन, मि. डिक्सवी ह्यांचें भाषण)

ग्रेटब्रिटनच्या अप्रत्यक्ष निर्गतींत विमा, बँकिंग व आगबोट वहातुक ह्यांच्या व्यवसायाचा मुख्यतः समावेश होतो. ब्रिटिश निर्गतीची किंमत १९३८ सालीं ५३½ कोटि पौंड भरली, परंतु त्यांत विम्याचे हप्ते व आगबोटींच्या वहातुकीचा खर्च हीं धरलेलीं नाहींत. ह्या मालापैकी बहुतेक मालाची वहातुक ब्रिटिश आगबोटींतूनच झाली व जवळ जवळ सर्वच मालाचा विमा ब्रिटिश कंपन्यांनींच उतरला. वहातुकीचा खर्च व विम्याचे हप्ते ह्यांची भरपाई परदेशांतील गिऱ्हाइकांनीं केली, हें उघड आहे. त्यांनीं दिलेल्या हप्त्यांतून क्लेम्स वजा करून राहिलेली रकम ही अप्रत्यक्ष ब्रिटिश निर्गतच समजली पाहिजे. तिला अप्रत्यक्ष म्हणण्याचें कारण, सरकारी आकड्यांत तिचें निदर्शन होत नाहीं, परंतु देण्याघेण्याच्या व्यवहारांत त्या रकमेनें ग्रेट ब्रिटनचें येणें वाढतें. ग्रेट ब्रिटननें १९३८ सालीं ९२ कोटि पौंड रकमेच्या मालाची आयात केली. त्या रकमेंत वाहतुकीचा खर्च व विमा ह्यांचा समावेश झाला असला तरी, वरील मुद्दे त्यासहि लागू पडतात व परराष्ट्रीय देण्याघेण्यांत ग्रेट ब्रिटनला त्या प्रमाणांत अनुकूल येणें निघतें. जगांतील बहुसंख्य व्यवहारांचा विमा ग्रेट ब्रिटनमधील विमा संस्थांतच उतरला जातो. म्हणजे, जागतिक व्यापारावर ग्रेटब्रिटननें एकाप्रकारची पट्टीच बसविली आहे, असें म्हणाना. सर्व देशांनीं संरक्षक धोरणाचा अवलंब केला, तरी त्यांच्या आगबोटींचा विमा ब्रिटिश कंपन्यांकडेच यावयाचा अशी परिस्थिति आहे. आग, वादळ, धरणीकंप, घरफोडी, थर्डपार्टी रिस्क, वगैरे इतर विमे ग्रेटब्रिटनकडे पैसे खेचून आणीत असतातच. एकट्या विमा व्यवसायाकडून ब्रिटिश परराष्ट्रीय येण्याघेण्याच्या हिशेबांतील तफावतींत दरसाल किमान २ कोटि पौंडांची भर घातली जाते. कोट्यवधि रुपयांच्या हप्त्यांचें येणें व क्लेम्सचें व इतर देणें ह्यांमुळें ब्रिटिश बँकांना काम मिळतें हा आणखी एक अप्रत्यक्ष फायदा निर्माण होतो. ब्रिटिशांची पत वाढविण्यास ह्या सर्व गोष्टींचा उपयोग होतो व त्याची किंमत पैशानें मोजतां येणार नाहीं. विमा व्यवसायाच्या कामगिरीची निर्गत होऊन परराष्ट्रांत ग्रेटब्रिटनचें येणें निर्माण होतें, परंतु ह्या व्यवहारासाठी विमा कंपन्यांना कच्चा मालाची आयात करावी लागत नाहीं व उत्पादनाच्या खर्चांत वाढ झाल्यामुळें त्यांचा धंदा बसण्याची भीति नाहीं. ब्रिटिश कंपन्यांना परदेशांत जाचक वाटणाऱ्या गोष्टी दूर करण्याचा ब्रिटिश सरकारनें प्रयत्न करावा. तहाच्या अटी ठरवितांना विमा व्यवसायास विसरतां कामा नये. शत्रूच्या देशांतच केवळ नव्हे, तर जे देश ग्रेट ब्रिटन शत्रूच्या तावडीतून मुक्त करील, त्या देशांतहि ब्रिटिश विमा व्यवसायांस मोकळें क्षेत्र मिळालें पाहिजे, अशी व्यवस्था करणें आवश्यक आहे.

उद्घाटन

मागोरा केमिकल कंपनी लि. च्या "बॉंडेड लॅबोरटरीचें" उद्घाटन रविवार तारीख ३० रोजीं सायंकाळीं ६ वाजतां रा. सा. एम. एस. नवलकर यांचे हस्तें झालें.

जर्मनीमधील चित्रपटांचा धंदा

चालू महायुद्धापूर्वी युरोपांत दाखविण्यांत येत असलेल्या चित्रपटांपैकी सुमारे निम्मे चित्रपट अमेरिकन असत. प्रत्यक्ष जर्मनींत १९३८ सालीं दाखविलेल्या एकूण ५ हजार फुटांवरील दीर्घ चित्रपटांपैकी २१·७% अमेरिकन होते. १९३८ ते १९४३ ह्या मुदतीमध्यें युरोपांतील चित्रपटांचें उत्पादन ३४% घटलें आहे. जर्मनीचें चित्रपटांचें उत्पादन प्रारंभीं थोडें घटलें, तरी पुढें तें सालिना १०० ते ११० फिल्म्स इतकें कायम राहिलें आहे. १९३८ सालीं युरोपांत जेवढे चित्रपट तयार झाले, त्यांपैकी १६·५% चित्रपट जर्मनींत तयार झाले. १९४३ मधील उत्पादनांत जर्मनीचा वाटा २६% होता. जर्मनीचें खालोखाल इटलीचा अनुक्रम येतो व नंतर फ्रान्सचा अनुक्रम लागतो.

जर्मनीमधील चित्रपट-निर्मितीचा व्यवसाय सरकारी नियंत्रणाखालीच आहे; सिनेमागृहें मात्र खासगी मालकीचीं आहेत. चित्रपटांचे हक्क विकत घेऊन ते सिनेमागृहांस विकणारी मात्र एकच कंपनी आहे. एका मालकाचे हातीं चारापेक्षा अधिक सिनेमागृहें येऊं देत नाहींत. सिनेमागृहांत जमणाऱ्या गल्ल्यांपैकी ३३% ते ३८% रकम डिस्ट्रिब्यूटर्सना द्यावी लागते. त्यांत नुकतीच ३% ची वाढ करण्यांत आली आहे. तिचा विनियोग एक फंड निर्माण करण्याकडे केलेला आहे. बॉम्बवर्षावांत नाश पावणारीं सिनेमागृहें पुनः बांधून काढण्याकडे त्या फंडाचा विनियोग व्हावयाचा आहे.

जर्मन सिनेमागृहांतील कार्यक्रमांत सुमारें ६५०० फुटांची मुख्य फिल्म, २,००० फुटांचे न्यूज रील, व १,००० फुटांची शैक्षणिक फिल्म ह्यांचा समावेश होतो. युद्धापूर्वी प्रत्येक चित्रपटाच्या ७० ते ८० प्रती काढीत असत, आतां २५० ते ३०० प्रती काढतात. न्यूज रीलच्या प्रतींची संख्याहि ८०० वरून १,२५० वर गेली आहे. ह्यासेरीज, इतर देशांत पाठविण्यासाठी ३५ भाषांत आणखी प्रती तयार केल्या जातात. जर्मनव्याप्त युरोपांत १९३८ ते १९४२ ह्या मुदतींत सिनेमाच्या तिकिटांचा खप खालीलप्रमाणें झाला:—

	तिकिटांची संख्या		तिकिटांची संख्या
१९३९	६२ कोटि	१९४१	८३ कोटि
१९४०	८३ कोटि	१९४२	११० कोटि

सबंद युरोपांत २७,००० सिनेमागृहें असून त्यांत १ कोटि, १० लक्ष लोकांची बसण्याची सोय आहे. दक्षिण युरोपापेक्षा उत्तर युरोपांत सिनेमागृहांची दाटी ज्यास्त आहे. सबंद युरोपांतील फिल्म्सचें उत्पादन व वाटणी ह्यांची सूत्रबद्ध व्यवस्था इंटर नॅशनल फिल्म चेंबर करतें, त्यांत १७ देशांतील चित्रपट धंद्याचा समावेश होतो. अर्थात्, त्या सर्वांमध्यें जर्मनींचेंच वर्चस्व आहे. जर्मनीमध्यें फिल्म्सच्या धंद्याकरितां "फिल्म क्रेडिट बँक" नांवाची एक स्वतंत्र बँक आहे.

युद्धोत्तर वैमानिक वाहतुकीच्या योजना तयार

पॅन-अमेरिकन एअरवेज ह्या कंपनीनें आपल्या युद्धोत्तर वैमानिक वहातुकीचें वेळापत्रक प्रसिद्ध केलें आहे, त्याप्रमाणें न्यूयॉर्क-पॅरिस रिटर्न तिकिटास ३८ पौंड पडतील. उतारूस पॅरिसमध्यें २ दिवस राहातां येईल. न्यूयॉर्क-बर्लिन प्रवासास ३० पौंड व न्यूयॉर्क-टोकियो प्रवासास ५२ पौंड पडतील.

जिकडे तिकडे प्रशंसा

इमिटेशन दागिन्यांवर रासायनिक क्रिया करून खऱ्या सोन्याचा पत्रा चढविला जातो त्यामुळें दागिना केव्हांही खराब होत नाहीं, ही पूर्ण खात्री झाली. सोन्याचा पत्रा चढविलेल्या चार बांगड्या कि. आठ रु. गॅरंटीवर दागिना परत करणें झाल्यास वर चढविलेल्या सोन्याचे सर्वच्या सर्व पैसे परत देऊं.

भट कं. सांगली, S. M. C.
भट कंपनी शाखा—बुधवार पेठ, पुणें २.

सध्यांच्या टंचाईच्या काळांत जीवनद्रव्यें कमी पडतात.
जीवनद्रव्यांनीं (Vitamins) युक्त असे
(सप्रमाण खात्यानें मान्यता दिलेले)
टोमॅटो केचप (गोड) व
टोमॅटो सॉस [तिखट व आंबट]
आजच मागवा व जीवनद्रव्यांची वाटणारी उणीव भरून काढा.
रुरल प्रॉडक्टस कंपनी लि. पुणें
बिझिनेस ऑफिस: ९१३ अ सदाशिव, पुणें २.

तुमच्या आवडींत व ऐपतींत प्रसिद्धीचें प्रभावी साधन
कॅलेंडर्स
(१९४५)
नवीन आकर्षक चित्रांचा आल्बम तयार होत आहे.—
प्रमुख ठिकाणीं एजंटस नेमणें आहेत.
दि आर्ट कॅलेंडर्स लि.
१५ बुधवार पेठ, पुणें २

पुण्यांतील
आदर्श निवासस्थान व भोजनालय
छाया लॉजिंग व बोर्डिंग हाऊस
बुधवार चौक, पुणें २.

प्रगतिपथावरील नवा
मैलाचा — दगड
सन १९४३ अखेर

नव्या कामांत	११० टक्के वाढ
चालू कामांत	१०० टक्के वाढ
आयुर्विमानिधींत	८० टक्के वाढ

— आपला विमा किंवा एजन्सी आजच घ्या —
दि औंध म्यूच्युअल लाइफ ॲश्युरन्स सोसायटी लि., पुणें.
आर. जी. साठे, सुपरिंटेंडेंट — व्ही. जी. जोशी, मॅनेजिंग डायरेक्टर

JUST PUBLISHED
INDIAN RURAL PROBLEM
BY
Sir Manilal Nanavati and Prof. J. J. Anjaria.
(Issued by the Indian Society of Agricultural Economics, Bombay).
Price Rs. 8
(Postage extra).
Sole Selling Agents :—
THE CO-OPERATORS' BOOK DEPOT.
9, BAKEHOUSE LANE, FORT, BOMBAY.

प्रगतीचें श्रेय आपणांकडे
सह्याद्रि विमा कंपनीनें १९४३ सालीं खालीलप्रमाणें काम केलें आहे.

आलेलें काम	रु. २१, ४४, ४७१	१९४२	५ लक्ष ३ हजारानें
मंजूर काम	रु. १८, ३५, ७१४	पेक्षां	१ लक्ष ९० हजारानें
पूर्ण विमा काम	रु. १६, १९, ७७५	वाढ	४ लक्ष ७ हजारानें

या सर्व प्रगतीचें श्रेय कंपनीचे विमेदार, प्रतिनिधी, प्रचाराधिकारी, भागीदार व हितचिंतक यांनाच आहे व त्याच्याबद्दल आम्हीं त्यांचे आभारी आहोंत. विमा—योजना त्याचप्रमाणें एजन्सी याच कंपनीची अत्यंत आकर्षक.
नासिक — मॅनेजिंग डायरेक्टर

हें पत्र पुणें, पेठ शनवार नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' शनवार, नं. १२४।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
सालील पत्र्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
(टपाल खेरीज माफ)
किरकोळ अंकास
दोन आणे.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष १० पुणें, बुधवार, तारीख ९ ऑगस्ट, १९४४ अंक ३२

भगवान भक्तीचा भुकेला !—
येऊन जा बिगिबिगी
—हें चिमुकल्या मुलीचें गोड गीत ऐकून प्रत्यक्ष—
भगवान भूतलीं धांवत आले !
डेक्कन —व— अपॉलो
ह्या दोन थिएटर्समध्यें
व्ही. शांताराम आणि राजकमल यांची दुसरी कलाकृति
शुक्रवार ता. ११ ऑगस्टपासून
भक्तीचा मळा (माली)
सुरू होणार !
प्रोड्यूसरः—व्ही. शांताराम, दिग्दर्शकः—केशवराव दाते,
पटकथा, पद्य व संवादः—स. अ. शुक्ल
डेक्कन : दररोज ४, ७ व १० वा. तिन्ही खेळ मराठी
अपोलो : फक्त एकच आठवडा ३॥, ६॥ हिंदी व १० वा. मराठी

गिरगांव मुंबई नं. ४
महिंद्रकर बदर्स
तयार कपड्याचे व्यापारी
बुधवार चौक, पुणें

दि डिस्काउंट बँक
ऑफ इंडिया लिमिटेड

शिवाजीनगर उपशाखेच्या कामाच्या वेळांत बदल

कित्येक ठेवीदारांच्या आग्रहाच्या विनंतीवरून पुणें येथील जंगली महाराज रोडवरील शिवाजीनगर उपशाखा बँकेच्या कामाच्या वेळा ता. १० ऑगस्ट १९४४ पासून पुढील-प्रमाणें राहतील—

सोमवार ते शुक्रवार सकाळीं ८-३० ते १०-३० आणि
सायंकाळीं ६ ते ८
शनिवारीं फक्त सकाळीं ८-३० ते १०-३०
रविवारीं सकाळीं १० ते दुपारीं १२
(बँक हॉलिडेला मात्र या बँकेचें काम बंद राहील.)

या बँकेच्या पुण्यांतील दोन्हीहि शाखांत पगार व पेन्शन बिलांची वसुली केली जाते.

—मॅनेजर

"मागोरा"चा अभिनव व आश्चर्यकारक शोध

ढेकणांच्या उदवत्त्या
(ABC)
BUG COILS (ABC)

प्रत्येक उदवत्ती रात्रभर जळते व तोंपर्यंत ढेकूण आपलें ठिकाण सोडून बाहेर येत नाहींत. विशिष्ट घुरामुळें हा चमत्कार होतो. बॉक्समध्यें १२ तांबड्या उदवत्त्या तांबड्या पॅकिंगमध्यें बॉक्स किं. रु. १८, ट. स. निराळा.

दि मागोरा केमिकल कं. लि.,
हिरावाग, पुणें २

विविध माहिती

मुलकी व्यवस्थेसाठी लष्करी अधिकारी

हिंदी मुलकी कारभारासाठी लायक अधिकाऱ्यांची तूट पडत आहे ती भरून काढण्यासाठी लष्करी अधिकारी तिकडे वर्ग करण्याची हिंदुस्थान सरकारची योजना जाहीर झाली आहे. सिव्हिल सर्व्हिसची परीक्षा तहकूब केली नसती, तर जे उमेदवार त्या परीक्षेसाठी पुढें आले असते, अशाच प्रकारच्या लष्करी अधिकाऱ्यांतून हिंदुस्थान सरकार ह्या नव्या अधिकाऱ्यांची निवड करणार आहे, असें प्रसिद्ध झालें आहे.

फोर्ड मोटार कं. लि.

इंग्लंडमधील फोर्ड मोटर कंपनी लि.च्या नोकरवर्गापैकी ३,५४१ नोकर लष्करांत दाखल झाले आहेत. त्यांपैकी ९३ लोक युद्धांत मरण पावले.

हिंदुस्थानांतील रेडिओची वाढती लोकप्रियता

हिंदुस्थानांतील रेडिओ लायसेन्सची संख्या १ एप्रिल १९३९ रोजीं ७२,२८२ होती. १ एप्रिल १९४४ रोजीं ती १,८०,६६० झाली. वास्तविक ह्यापेक्षा ती पुष्कळच वाढली असती, परंतु रेडिओ सेटस बाजारांत मिळण्यांची अडचण पडत असल्यामुळें कित्येकांना रेडिओ घेण्याची आपली इच्छा अमृत ठेवावी लागत आहे. रेडिओचे कार्यक्रम देणाऱ्या नियतकालिकांचा खप पांच वर्षांचे अवधींत ३२,१५० वरून ६३,३५० वर गेला. म्हणजे, रेडिओ ऐकणारांत ज्या प्रमाणांत वाढ झाली, त्या प्रमाणांत ह्या नियतकालिकांचा खप वाढला नाहीं. मार्च १९४४ अखेर हिंदुस्थान सरकारचा रेडिओ खात्यावर ७७ लक्ष रुपये मांडवली खर्च झाला आहे व ऑल इंडिया रेडिओचा वार्षिक खर्च सुमारें ५० लक्ष रुपये आहे.

८ भाषांतून २७ वेळां दररोज बातमी

युद्धास प्रारंभ होण्यापूर्वी ऑल इंडिया रेडिओवरून इंग्रजींतून चार वेळां, हिंदुस्थानींत तीन वेळां व बंगालींतून एकदा बातम्या सांगितल्या जात असत. आतां एकूण २७ वेळां आठ भाषांतून बातम्या सांगण्यांत येतात व त्यास सहा तास लागतात. बातम्यांच्या ह्या २७ वेळांची वर्गवारी खालीलप्रमाणें आहे:—

भाषा	वेळा	भाषा	वेळा
इंग्रजी	५	तेलगू	३
हिंदुस्थानी	४	मराठी	३
बंगाली	३	गुजराती	३
तामीळ	३	पुष्तु	३

निजाम सरकार कोळशाच्या खाणी विकत घेणार

सिंगाराणी हें कोळशाच्या खाणींचें क्षेत्र निजाम हद्दींत वरंगळ जिल्ह्यांत आहे. जिऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडियाचे डॉ. किंग ह्यांनीं १८७१ सालीं तेथील कोळशाचे थर शोधून काढले, त्यांतून आतांपर्यंत २ कोटि, ६० लक्ष टन कोळशाचें उत्पादन झालेलें आहे. निजाम सरकार ह्या कोळशाच्या खाणी सिंगाराणी कॉलिअरीज कंपनीकडून खरेदी करणार आहे.

रेशीम

युद्धापूर्वी हिंदुस्थानांत दरसाल ४० लक्ष पौंड कच्चें सूत खपत असे, त्यापैकी २५ लक्ष पौंड सुताची आयात होई. त्याचप्रमाणें दरसाल २½ कोटि वार रेशमी कापड परदेशांतून येत असे. ही सर्व आयात आतां बंद पडली आहे. त्यामुळें मागणी व पुरवठा ह्यांमध्यें भयंकर तफावत पडली आहे आणि युद्धजन्य लष्करी मागणीमुळें बिनलष्करी गरज भागणें अशक्य झालें आहे.

तुतीची लागवड

म्हैसूरमध्यें १९३९ सालीं तुतीखालीं ३० हजार एकर जमीन होती; आतां ७० हजार एकरांत तुतीची लागवड झालेली आहे.

मुंबई सरकारचा औद्योगिक खात्यावरील खर्च

मुंबई सरकारनें १९४२ सालीं आपल्या औद्योगिक खात्यावर १२,०७,००० रुपये खर्च केला. खात्यास ६,४१,४५२ रुपये उत्पन्न झालें.

शेतीच्या अवजारांसाठी पोलाद

शेतीच्या अवजारांसाठी खेडेगांवांतील लोहारांना लागणारें पोलाद त्यांस उपलब्ध करून देण्याची व्यवस्था करण्याचा हिंदुस्थान सरकारचा विचार आहे.

अनुक्रमणिका

	पृष्ठ		पृष्ठ
१ विविध माहिती ...	२५०	हिंदी अभिवृद्धीस अमेरिकेचें सहाय्य--मुंबई सरकारचें नवें कर्ज--मुंबई सरकारची समाधानकारक स्थिति	
२ रिझर्व्ह बँकेच्या कामाचा वृत्तांत ...	२५१	६ मागोरा कंपनीचा उपक्रम	२५५
३ विधवा स्त्रीस दत्तकाचा अधिकार ...	२५२	७ चेकच्या आकारावर नियंत्रण ...	२५५
४ डायरेक्टरांसाठी प्रॉक्सी	२५२	८ बँकेमधील व्यवहारांची माहिती ...	२५५
५ स्फुट विचार ...	२५४		
ब्रिटिश पार्लमेंटांत हिंदुस्थान- "न्यू स्टेटस्मन"चे उद्गार-			

अर्थ

बुधवार, ता. ९ ऑगस्ट, १९४४

रिझर्व्ह बँकेच्या कारभाराचा वृत्तांत

गेल्या जून अखेर पुऱ्या झालेल्या बारमाहींत रिझर्व्ह बँकेचा कारभार कसा झाला आणि तिच्या सांपत्तिक परिस्थितींत कोणते बदल झाले ह्याविषयींची माहिती त्या बँकेच्या मध्यवर्ती बोर्ड ऑफ डायरेक्टर्सनीं भागीदारांस आपल्या वार्षिक वृत्तांतांत दिली आहे. हिंदुस्थानाची राष्ट्रीय बँक ह्या नात्यानें रिझर्व्ह बँकेस चलनाचा प्रसार व आकुंचन, व्याजाच्या दरांचें व सरकारी रोख्यांच्या किंमतींचें नियमन, हुंडणावळीची व्यवस्था, सरकारच्या पैशाचा व कर्जाचा कारभार इत्यादि गोष्टी कराव्या लागतात आणि म्हणून तिचा वृत्तांत हा एक देशांतील सांपत्तिक घडामोडींचा त्रोटक आढावाच बनतो. बँकेच्या ताज्या वृत्तांतांत नमूद केलेल्या ठळक बाबींचा उल्लेख येथें करण्यांत येत आहे. युद्धपरिस्थिति आणि देशाचा युद्धप्रयत्न ह्यांचे योगानें उपस्थित होणाऱ्या आर्थिक घटनांशीं त्यांचा निकट संबंध असणें अपेक्षित आहे. उद्योगधंदे वं व्यापार ह्यांची स्थिति वृत्तांताच्या वर्षी अनुकूल होती, हें कंपन्यांच्या भागांच्या किंमती चढीच्या राहिल्या ह्यावरून दिसून येतें, बँकांच्या चेक्सची वजावाट, रेलवेजचें उत्पन्न आणि त्यांनीं केलेली वाहिणींची ने-आण व मजूरीचे दर हींहि त्यांचीं गमकें आहेत. चेक्सची संख्या १,१४२ कोटींनीं वाढून ४,०५४ कोटि झाली व रेलवेजचें उत्पन्न १६·७ टक्क्यांनीं वाढून १७१ कोटि रुपये झालें. हिंदुस्थान सरकारनें स्वतःचा आणि मित्रराष्ट्रांच्या वतीनें खर्चलेला पैसा सारखा वाढत आला आहे. १९४३-४४ सालीं ही एकूण रकम ६९३ कोटि रुपये इतकी भरली. युद्धाचे प्रारंभापासूनचा ह्या खर्चाचा आकडा १,७६५ कोटि इतका झाला आहे. ह्याचा परिणाम तिहेरी झाला. एक तर युद्धसामुग्रीच्या पुरवठ्यास अग्रस्थान दिलें गेल्यानें सामान्य जनतेस आवश्यक असलेल्या वस्तूंचा तुटवडा पडला आणि त्यांच्या महागाईस आळा घालण्याचे उपाय योजावे लागले. दुसरें असें कीं, वाढत्या खर्चास लागणारा पैसा सरकारास कर्जाच्या मार्गानें उभा करावा लागला आणि ज्या मानानें तो उपलब्ध होऊं शकला नाहीं त्या मानानें रिझर्व्ह बँकेस चलनाचा विस्तार करणें प्राप्त झालें. तिसरा परिणाम असा झाला कीं ह्या नवीन चलनाची गंगाजळी ब्रिटिश सरकारकडून त्याचेसाठी ह्या देशांत खर्चलेल्या रुपयांच्या मोबदल्यांत मिळालेल्या स्टर्लिंगच्या स्वरूपांत लंडनमध्यें साठूं लागली आणि ती इकडे परत आणण्याचा प्रश्न अवघड होऊन बसला.

मालाची टंचाई, महर्गता, बंगालमधील दुष्काळ इत्यादि गोष्टींचा उल्लेख करून रिझर्व्ह बँकेच्या डायरेक्टरांनीं आपल्या वृत्तांतांत ह्या आपत्तीवर सरकारनें योजलेल्या विविध उपायांची माहिती दिली आहे. १९४३ च्या जून महिन्याचे अखेरीस हिंदुस्थानांतील बाजारभावांनीं उच्चांक गाठला होता. किंमतींचें हें सर्वसाधारण मान हळू हळू उतरून पुढें स्थिरावलें. बाजारभावांचें नियंत्रण आणि मालाच्या वांटणीची व्यवस्था हीं सदरहू परिणाम घडवून आणण्यास विशेष कारणीभूत झालीं. १९१४ सालांतील कलकत्त्यामधील किंमती १०० होत्या असें समजल्यास हा आकडा सप्टेंबर १९४३ मध्यें ३४९ वर जाऊन मे १९४४ मध्यें २९० पर्यंत खाली आला. धान्य व कपास ह्यांच्या किंमतींत ठळक दिसेल असा उतार झाला. वृत्तांताच्या वर्षांत परराष्ट्रीय व्यापारांत सुधारणा झाली आणि हिंदुस्थानच्या दुसऱ्या देशांकडून मिळावयाच्या व्यापारी येण्यांत वाढ झाली. कच्च्या मालाच्या निर्गतींत मोठी वाढ झाली, तिच्या मानानें पक्का माल अल्प प्रमाणांत देशाबाहेर गेला. परराष्ट्रीय हुंडणावळीचा दर बहुतेक स्थिर राहिला. रिझर्व्ह बँकेनें वृत्तांताच्या बारमाहींत दहा कोटि पौंड किंमतीच्या हुंड्या विकत घेतल्या. ब्रिटिश सरकारकडून हिंदुस्थानास ह्या देशानें केलेल्या युद्धखर्चाचा पैसा सेक्रेटरी ऑफ स्टेट फॉर इंडियामार्फत परत मिळाला त्याची निवळ रकम सोळा कोटि पौंड भरली. त्याच्या पूर्वीच्या वर्षांतला तत्सम आकडा तेहतीस कोटि पौंड होता. सोनें-चांदीच्या बाजारांत स्थिरता राहावी ह्या हेतूनें वायदाचा व्यवहार नियंत्रित करण्यांत आला. रिझर्व्ह बँकेच्या सोनेविक्रीच्या धोरणामुळें त्या धातूची किंमत बरीच मर्यादित राहिली. चांदीची किंमत मध्यंतरीं चढली असली तरी अमेरिकन चांदीची आयात होणार ह्या बातमीचा परिणाम तीमध्यें उतार घडवून आणण्यांत झाला. १९४३-४४ सालीं सरकारी कर्जरोख्यांचा रोख एकंदरीनें वर जाण्याकडे होता. जपानच्या कारवायांमुळें मध्यंतरी कांहीं वेळां त्यांच्या किंमती उतरल्या असल्या तरी ही स्थिति अल्प-कालिकच दिसून आली. शतमानाचे तुलनात्मक आकडे असें दर्शवतात कीं (१९२७-२८ = १००) रोख्यांची सरासरी किंमत जून १९४३ मध्यें ११६·१ होती ती फेब्रुआरी, १९४४ मध्यें ११८·२ झाली आणि मार्च-एप्रिलमध्यें ११७ च्या घरांत जाऊन मेमध्यें हुमारें ११८ पर्यंत चढली. औद्योगिक मंडळयांच्या भागांच्या बाजारभावांची स्थितिहि अशाच प्रकारची होती. मे, १९४४ मध्यें पुऱ्या होणाऱ्या अकरा महिन्यांची ह्या भागांच्या किंमतींची सरासरी (१९२७-२८ = १००) १८६·६ होती. पूर्व वर्षाच्या ह्या मुदतीमधला सरासरीचा तत्सम आकडा १४९·३ होता. बदल्याचे व वायद्याचे करार सरकारी हुकुमानें बंद करण्यांत आले ह्याचा परिणाम भागांच्या किंमतीवर प्रतिकूल झाला, पण तो अल्पकालिक होता. रिझर्व्ह बँकेच्या चलनी नोटांच्या खात्याचे व्यवहारांत पूर्व साठ्याच्या मानानें थोडी कमी अशी वाढ झाली. जनतेनें चलनाचा उपयोग व आपला खर्च मर्यादित करावा ह्यासाठी सर-

कारनें चालवलेल्या प्रयत्नांचा हा परिणाम आहे. व्यवहारांत खेळणाऱ्या नोटांची रक्कम १९४२-४३ मध्यें २८५ कोटींनीं वाढली होती, ती वृत्तांताच्या वर्षी १९९ कोटींनीं अधिक म्हणजे ९११ कोटि रुपये झाली. ग्राहकांच्या हातांतील पैसा बाजारांतून न फिरतां त्याची बचत होऊन ती सरकार व बँक यांचेकडे परत जाण्याचें महत्त्व त्यांच्याच हिताच्या दृष्टीनें किती मोठें आहे याची आठवण वृत्तांताचे शेवटी करून देण्यांत आली आहे.

विधवा स्त्रीस दत्तकाचा अधिकार

प्रिव्ही कौन्सिलचा निवाडा

राजपुतान्यांतील रघुवणी जातीचा अतलसिंग १९१८ मध्यें मरण पावला. त्याच्या विधवा पत्नीनें १९३५ साली एका मुलास दत्तक घेतलें. "माझ्या पतीनें माझ्या इच्छेप्रमाणें कोणासहि दत्तक घेण्याचा अधिकार मला दिला आहे" असें तिनें दत्त-विधानाच्या कागदपत्रांत नमूद केलें. १९३७ साली ती मरण पावल्यावर, अतलसिंगाच्या दोन बहिणींनीं मालमत्ता ताब्यांत घेण्याचा प्रयत्न केला, त्याचें पर्यवसान दंगल व दत्तक मुलाच्या मूळ बापाचा खून होंत झालें. अखेर, मालमत्ता रिसीव्हरच्या स्वाधीन करण्यांत आली, ती मिळविण्यासाठी दोघां बहिणींनीं काम चालविलें. डिस्ट्रिक्ट जज्ज व नागपूर हायकोर्ट या दोघांनींहि विधवा पत्नीस दत्तकाचा अधिकार पतीनें दिलेला नव्हता, असा निर्णय केला; परंतु रघुवणी जातींत विधवा स्त्रीस दत्तकाचा अधिकार आहे असें नागपूर हायकोर्टानें ठरविलें. प्रिव्ही कौन्सिल-कडे हें प्रकरण गेलें, तेथें हायकोर्टाचा निवाडा कायम करण्यांत आला.

डायरेक्टरांसाठी प्रॉक्झी गोळा करणारा कंपनीचा नोकर

श्री. चंद्रशेखर द्विवेदी हे एशिअन ॲशुअरन्स कं. लि. चे मुंबईमधील ॲक्टिंग एजन्सी मॅनेजरचें काम करीत होते, त्यांस जुलै १९४१ मध्यें कंपनीनें कामावरून काढलें. ही गोष्ट कंपनीनें अयोग्य केली, असा श्री. द्विवेदी ह्यांचा मुंबई हायकोर्टांत दावा होता. १९४१ च्या वार्षिक साधारण सभेसाठी डायरेक्टरांकरितां प्रॉक्झी गोळा करण्याकरितां वास्तविक परगांवीं जात असतांहि कंपनीच्या कामासाठी आपण जात आहों, असा श्री. द्विवेदी ह्यांचा बहाणा होता, हें श्री. द्विवेदी ह्यांच्या बडतर्फीचें कारण होतें व तें सयुक्तिक आहे, असा कंपनीतर्फे युक्तिवाद करण्यांत आला. न्यायमूर्ति कोयाजी ह्यांनीं श्री. द्विवेदी ह्यांच्या बाजूनें निवाडा केला व त्यांस तीन महिन्यांचा पगार, प्रॉव्हिडंट फंडास कंपनीची कॉंट्रिब्यूशन आणि कोर्टखर्च हीं देवविलीं. न्यायमूर्ति आपल्या निवाड्यांत म्हणाले—"प्रतिवादी कंपनीच्या नोकरांची स्थिति बिकट होती. डायरेक्टरांकरितां प्रॉक्झी गोळा करा नाहींतर त्रास सोसावा लागेल, अशी त्यांस ताकीद होती, असें कंपनीचे डाय-रेक्टर व मॅनेजर मि. हेरेडिया ह्यांनीं सांगितलें. अशी वस्तुस्थिति असतांना, नोकराच्या कृत्यास गैरवर्तन म्हणणें कंपनीस शोभत नाहीं."

दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

पुणें शहर

मांडवल :

(ता. ३१-५-४४ रोजीं)

अधिकृत व खपलेलें : रु. १०,००,०००
वसूल झालेलें : रु. ५,००,०००
रिझर्व्ह व इतर फंड : रु. १,०८,०००
एकूण खेळतें मांडवल : रु. ७५,००,००० चे वर

—: डायरेक्टर्स :—

श्री. धों. कृ. साठे, चेअरमन,
श्री. वा. पु. वर्दे, प्रो. वा. गो. काळे, श्री. न. ग. पवार,
श्री. श्री. गो. मराठे, श्री. त्रिं. वि. रानडे, श्री. र. चिं. सोहनी,
श्री. फ. दो. पदमजी, श्री. मा. रा. जोशी,
श्री. म. वि. गोखले, श्री. वि. ह. देशमुख

: शाखा :

पुणें ४, दलाल स्ट्रीट, मुंबई, जळगांव, नागपूर.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

सी. व्ही. जोग
मॅनेजर

दि बँक ऑफ इंडिया लि.

[स्थापना : १९०६]

अधिकृत मांडवल ... ... रु. २,००,००,०००
वसूल झालेलें मांडवल ... ... रु. १,००,००,०००
रिझर्व्ह फंड ... ... रु. १,२३,००,०००

मुख्य कचेरी: ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

मुंबईमधील शाखा : बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

इतर शाखा : अहमदाबाद (मद्र, मुख्य ऑफिस), अहमदाबाद (एलिस ब्रिज शाखा), अहमदाबाद (स्टेशन शाखा), अमृतसर, अंधेरी (मुंबई शेजारीं), बांद्रे (मुंबई शेजारीं), कलकत्ता (क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्क्वेअर), जमशेदपूर कराची, मद्रास, नागपूर (किंग्जवे), नागपूर (इतवारी बझार), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत, भुज (कच्छ).

लंडन एजन्ट्स : वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

डायरेक्टर्स : सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस. आय. (अध्यक्ष), व्ही. अंबालाल साराभाई, सर जोसेफ के. नाईट, मि. ए. गेडिस; सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, जी. बी. ई., के. सी. आय. ई.; मि. दिनशा के. दाजी; श्री. रामनिवास रामनारायण.

करंट डिपॉझिट अकाउंट्स :

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रकम ५ रु. पेक्षां कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते, सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अलग कळून मागवावेत.

एजंट:—एच्. ए. करीमभाई

स्फुट विचार

ब्रिटिश पार्लमेंटांत हिंदुस्थान

ग्रेट ब्रिटनच्या पार्लमेंटमध्यें दोन्ही सभांत हिंदुस्थानांतील राजकीय व आर्थिक परिस्थितीची चर्चा नुकतीच झाली. ह्या देशाच्या परिस्थितींत सुधारणा होण्याच्या दृष्टीनें तिचा उपयोग अत्यंत मर्यादित आहे असें म्हटलें पाहिजे. हिंदुस्थानांतील राजकीय वांधा मिटण्यास ती सहाय्यकारक होणार नाहीं,तरी कॉमन्स समेच्या कांहीं सभासदांनीं व्यक्त केलेल्या विचारांचा ओघ त्या बाबतींत अनुकूल होता. युद्धप्रयत्न यशस्वी होण्यास राजकीय प्रश्न सोडवला गेला पाहिजे ह्या मुद्यास फारच थोड्या लोकांनीं महत्त्व दिलें. देशांतील पक्षोपपक्षांतील मतभेद इतके तीव्र आहेत कीं ते दूर होणें जवळजवळ अशक्य आहे आणि ह्यासाठीं युद्धसमाप्तीपर्यंत त्यांच्या भानगडींत न पडणें बरें असाच सूर बहुतेक वक्त्यांच्या भाषणांत ऐकूं आला. आर्थिक प्रगति आणि अभिवृद्धि ह्यांचें ध्येय डोळ्यांपुढें ठेवून हिंदुस्थान सरकार योजना आखीत आहे ह्यासंबंधांत मि. एमरी ह्यांनीं समाधान व्यक्त केलें आहे आणि युद्ध चालू आहे तोंपर्यंत इतर वादग्रस्त प्रश्नांच्या भानगडींत पडण्याचें कारण नाहीं असा निष्कर्ष काढला आहे. तथापि, सध्या चाललेल्या घडामोडींचा आणि विचारविनिमयांचा परिणाम राजकीय परिस्थितीवरहि अनुकूल होण्याचा रंग दिसत आहे. हिंदुस्थानच्या हिताचे आर्थिक प्रश्न समाधानकारक रीतीनें सोडवले जाण्यास युद्ध चालू असतांनाहि व युद्धोत्तर काळांत राष्ट्रीय जबाबदारीचें सरकार प्रस्थापित होणें अगत्याचें आहे. प्रो. हिल ह्या देशांत नुकताच दौरा करून गेले आणि औद्योगिक व भौतिकशास्त्रविषयक संशोधनाची व्यवस्था ह्या देशांत काय आहे आणि तिच्यामध्यें कोणत्या रीतीनें विस्तार व सुधारणा केल्या पाहिजेत ह्याविषयीं हिंदुस्थान सरकारास ते सूचना करणार आहेत. त्यांस हिंदुस्थानांतील राजकीय व आर्थिक परिस्थितीची चांगली कल्पना आली आहे. त्यांनीं कॉमन्स सभेंतील चर्चेंत भाग घेतला आणि ब्रिटिश सरकारास असा सल्ला दिला कीं त्यानें हिंदी राजकीय प्रश्न सोडवण्यांत चालढकल करूं नये. ह्या कामीं दिरंगाई झाल्यास तिचे परिणाम दुर्घट होतील असाहि इशारा त्यांनीं दिला. हिंदी राजकीय प्रगतीस विरोध करणारा एक प्रबळ पक्ष इंग्लंडमध्यें आहे, पण युद्धपरिस्थिति आणि युद्धोत्तर काळांतील अभिवृद्धीच्या योजना ह्यांच्या दृष्टीनें त्याचें प्राबल्य मर्यादित होईल अशी अपेक्षा आहे. हिंदुस्थानांतील जातीय व इतर मतभेदांचा राष्ट्रीय ध्येयाच्या भावनेनें निरास होईल त्या मानानें हा अनुकूल परिस्थिति घडून येईल हें स्पष्ट आहे. आर्थिक प्रगति व राजकीय प्रगति ह्यांची ताटातूट करतां येत नाहीं. ह्या गोष्टी परस्परावलंबी आहेत ह्याची जाणीव ब्रिटिश पार्लमेंट व सरकार ह्यांस होणें अगत्याचें आहे.

"न्यू स्टेटस्मन" चे उद्गार

कॉमन्स सभेंत मि. एमरी ह्यांनीं हिंदुस्थानांत करावयाच्या आर्थिक संवर्धनाच्या योजनांस प्राधान्य देऊन राजकीय सत्ता हिंदी लोकांच्या स्वाधीन करण्याचा प्रश्न डावलला ह्याविषयीं येथील औद्योगिक पुढाऱ्यांनीं असमाधान व्यक्त केलें आहे आणि राष्ट्रीय सरकारच्या स्थापनेविषयींचा आपला आग्रह अचल असल्याचें त्यांनीं बोलून दाखविलें आहे. मि. एमरी ह्यांच्या भाषणाचा अर्थ हिंदुस्थानांत लावण्यांत आला आहे, त्याचाच सूर इंग्लंडमध्यें कांहीं वृत्तपत्रांनीं काढला आहे हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. "न्यू स्टेटस्मन अँड नेशन" हें स्वतंत्र मतवादी पत्र म्हणतें कीं हिंदी आर्थिक उन्नतीविषयीं आजपर्यंत बेफिकीर राहून आतांच एकदम मि. एमरी ह्यांस त्याबाबतींत उत्साहाचें भरतें आलें आहे, तें ठीक आहे; पण हिंदुस्थानच्या दारिद्र्याचा प्रश्न हिंदी लोकांनीं ह्याच देशांत सोडवला पाहिजे, तो ब्रिटिश सत्तेस सुटावयाचा नाहीं. मोठ्या प्रमाणावर शेतीचें व कारखान्यांचें उत्पादन वाढावयाचें तर ज्या नवीन व अपरिचित घटना हातीं घ्याव्या लागतील त्यांस सामान्य हिंदी जनतेचा पाठिंबा लागेल आणि तो राष्ट्रीय सरकारच मिळवूं शकेल अशी त्या पत्राची विचारसरणी आहे ती हिंदुस्थानांतील लोकमतास धरूनच आहे. लोकांच्या विश्वासावर व आदरावर आधारलेलें राष्ट्रीय सरकारच ह्या देशाची आर्थिक पुनर्घटना करूं शकेल, बाहेरून आलेल्या अधिकाऱ्यांच्या हातून तें काम होणें नाहीं असें "न्यू स्टेटस्मन अँड नेशननें" स्पष्ट बजावलें आहे.

हिंदी अभिवृद्धीस अमेरिकेचें सहाय्य

युद्धोत्तर काळांत आपल्या व्यापाराची घडी पुन्हां नीट बसावी आणि स्वतःच्या आर्थिक जीवनाचें मान पूर्वीप्रमाणें उच्च दर्जाचें करावें अशी इच्छा इंग्लंड व अमेरिका ह्यांसाररूपा औद्योगिक बाबतींत पुढारलेल्या, संपन्न व श्रीमान् राष्ट्रांस असावी हें स्वाभाविक आहे. त्याप्रमाणें जगाच्या बाजारपेठांत आपला माल व भांडवल कोठें खपवतां येईल ह्याचा विचार त्या देशांत चालला आहे. हिंदुस्थानच्या आर्थिक अभिवृद्धीची योजना फलद्रूप होण्यास इंग्लंड व अमेरिका ह्या देशांतून यंत्रसामुग्री आणावी लागेल. कांहीं जातींचा माल अमेरिकेकडून विकत घेणें मोहस्कर व फायदेशीर होण्याचा संभव आहे. हिंदी बाजारपेठांत युद्धकाळांतील विशिष्ट गरजेस अनुसरून कांहीं ब्रिटिश माल येथील तुटवडा कमी करण्यासाठी येत आहे. तो आणि इतर माल ह्यापुढेंहि येथें कसा खपवतां येईल ह्याची सूक्ष्म चर्चा इंग्लंडमध्यें चालली आहे. त्या देशाच्या येथील ट्रेड कमिशनरास ह्या विचारविनिमयाकरितां मुद्दाम लंडनला बोलावून नेण्यांत आलें आहे. हिंदुस्थानच्या स्टर्लिंग बाक्या लंडनमध्यें साचल्या आहेत, त्यांचा विनियोग ह्या देशानें ब्रिटिश माल खरीदण्यांत करावा अशी इंग्लंडमधील धंदेवाल्यांची स्वाभाविक इच्छा आहे. स्टर्लिंग शिलका ब्रिटिश मालाच्या स्वरूपांत हिंदुस्थानांत परत आणाव्या लागतील. परंतु त्यांपैकी कांहीं रकमांचे डॉलर्स करून मिळाल्यास ह्या देशास अमेरिकेकडून माल घेतां येईल आणि इंग्लंड व अमेरिका ह्यांच्या स्पर्धेंत हिंदुस्थानचा फायदा होईल. आंतरराष्ट्रीय चलनानेंघेमार्फत ही व्यवस्था व्हावी अशी जागतिक परिषदेंत हिंदी प्रतिनिधींनीं पुढें मांडलेली सूचना अमान्य झाली. तथापि, त्यांचें हें उद्दिष्ट अमेरिकन भांडवलवाल्यांच्या सहायानें साध्य करून घेतां येईल असें मि. ए. डी. श्रॉफ ह्यांचें म्हणणें आहे. नॅशनल सिटी बँक, मॉर्गन इत्यादि प्रमुख अमेरिकन भांडवलदारांशीं त्यांचें बोलणें चालू आहे. हिंदुस्थानच्या आर्थिक अभिवृद्धीच्या पंचवार्षिक वा सुद्धतीच्या योजनेनें अमेरिकन धंदेवाल्यांचें लक्ष आकर्षिलें असून ते अगदी तो पैसा ह्या देशास कर्जाऊ देण्यास तयार आहेत. आपला माल मोठ्या प्रमा-

णांत खपण्यासाठी दुकानदार किंवा उत्पादक गिऱ्हाइकांस तो उधार देतातच की नाहीं ? अमेरिकेनें यंत्रसामुग्री सारखा माल ह्या तऱ्हेनें हिंदुस्थानास पुरवल्यास तो व्यवहार सर्व बाजूंनी सोइस्कर होईल. स्टर्लिंग रक्कमांचें डॉलर करण्याचें त्या योगानें कारण उरणार नाहीं आणि अमेरिकेसारख्या प्रगतिपर राष्ट्राचें हिंदी आर्थिक अभिवृद्धींत सहकार्य मिळेल. ब्रिटिश व हिंदी घंदेवाल्यांनीं एकत्र येऊन खरेदी विक्रीच्या योजना आखाव्या अशी सूचना इंग्लंडमध्यें करण्यांत येत आहे तिचें रहस्य वरील विवेचनावरून स्पष्ट होईल.

मुंबई सरकारचें नवें कर्ज

तीन टक्के व्याजाचें व चोवीस वर्षांच्या मुदतीचें तीन कोटि, चव्वेचाळीस लक्ष रुपयांचें कर्ज काढण्याचें मुंबई सरकारनें ठरवलें आहे. ह्या कर्जाच्या पैशाचा विनियोग हिंदुस्थान सरकाराकडून एप्रिल, १९३७च्या पूर्वी प्रांतिक सरकारनें भांडवलाच्या पुरवठ्याकरितां काढलेल्या कर्जाची अंशतः फेड करण्याकडे व्हावयाचा आहे. रोख्यांच्या दर्शनी किंमती इतकी त्यांच्या विक्रीची किंमत राहील आणि ते १५ ऑगस्ट रोजींच कायते लोकांस मिळूं शकतील. सरकारास हवी आहे ती म्हणजे ३४४ लक्ष रुपयांची रकम अर्जदारांकडून मिळते आहे असें दिसतांच रोख्यांची विक्री बंद केली जाईल आणि कांहीं झालें तरी १५ ऑगस्ट रोजीं धंद्यांचे व्यवहार बंद होण्याच्या वेळेपुढें ती चालणार नाहीं. ठराविक रकमेपेक्षा रोख्यांविषयींचे अर्ज अधिक आले तर त्यांची प्रमाणबद्ध वाटणी मागणीदारांमध्यें केली जाईल आणि बाकीची रकम परत करण्यांत येईल. ह्या रकमेवर व्याज अर्थातच दिलें जाणार नाहीं. ह्या कर्जावरील व्याज दर सहामाही, १५ फेब्रुआरी व १५ ऑगस्ट रोजीं दिलें जाईल. तें प्राप्तीवरील करास पात्र राहील, पण ज्यांस तो कर द्यावा लागत नाहीं किंवा हलक्या दरानें तो द्यावा लागतो, अशा रोखे धारण करणारांस जरूर ते दाखले प्राप्तीवरील कराच्या जिल्हाधिकाऱ्यांकडून मिळतील. मुंबई सरकारची आर्थिक पत उच्च दर्जाची आहे. गेल्या चार वर्षांत त्याच्या उत्पन्नांत उत्कृष्ट वाढावा झाला आहे आणि त्यांतून दोन मोठ्या गंगाजळ्या अभिवृद्धीसाठी निर्माण करण्यांत आल्या आहेत. सध्याचें नवें कर्ज मध्यवर्ती सरकारचें आधिक व्याजाचें जुनें कर्ज अंशतः फेडण्यासाठी काढण्यांत येत आहे हें लक्षांत ठेवलें पाहिजे. कर्जास भरपूर मागणी येईल ह्यांत संशय नाहीं.

मुंबई सरकारची समाधानकारक सांपत्तिक स्थिति

आपला भांडवली स्वरूपाचा सर्व मागविण्यासाठी मुंबई सरकारनें १९३६-३७ सालापासून आजपावेतों कर्ज काढलेलें नाहीं आणि असला सर्व त्यानें आपल्या मामुली शिलकींमधून केला आहे. "बॉबे डेव्हलपमेंट लोन" १९२० मध्यें काढण्यांत आलें होतें, त्याची फेड १९३५ मध्यें झाली आणि १९४२-४३ व १९४३-४४ मध्यें प्रत्येकीं साडेतीन कोटींचीं कर्जे काढलीं गेलीं तीं १९३७ च्या पूर्वीचीं मध्यवर्ती सरकाराचीं कर्जे फेडण्यासाठी काढण्यांत आलीं. ह्या दोन्हीं कर्जाच्या फेडीसाठी सिंकिंग व घसारा फंडाची तरतूद करण्यांत आली आहे. हिंदुस्थान सरकारचें एकूण १४ कोटी, १६ लक्ष रुपयांचें कर्ज फेडावयाचें आहे आणि तें १९३७-३८ पासून ४५ वर्षांच्या मुदतींत सारख्या सहामाही हप्त्यांनीं परत करावयाचें आहे. त्यावरील व्याजाचा दर ४½ टक्के आहे आणि वार्षिक व्याजाची रकम ७८½ लक्ष रुपये होते. वरील १४ कोटी, १६ लक्षांपैकी ३ कोटि, ७८ लक्ष मुंबई कॉर्पोरेशन करितां काढलेलें कर्ज असल्यानें मुंबई सरकारची निवळ जबाबदारी १० कोटी, ३८ लक्ष रुपये इतकीच उरते आणि त्या कर्जावर ६० लक्ष रु. व्याजासाठी यावे लागतात. स्टेट प्रॉव्हिडंड फंडाचें देणें ४ कोटि, ७८ लक्ष आहे. स्थानिक संस्थांकडून सरकारास येणें कर्ज १ कोटि २२ लक्ष आहे. ह्या सर्व रकमांची बेरीज-वजाबाकी केली असतां मुंबई सरकारास निवळ कर्ज २१ कोटि रुपये आहे असा हिशेब होतो. ह्या देण्याच्या मानानें सरकारची, जमिनी, इमारती, कालवे, रस्ते इत्यादि स्वरूपांतली जिंदगी किती तरी मोठी आहे. गेल्या चार वर्षांत सरकारच्या हिशेबांत सारखा वाढावा रहात आला आहे. त्यांतून गंगाजळ्या निर्माण केल्या जात आहेत. त्या सोडूनहि सरकारपाशी ७ कोटि, ९० लक्षांची मोकळी शिल्लक आहे आणि तिचा उपयोग मालाच्या खरेदीस लागणाऱ्या पैशाच्या पुरवठ्याकडे केला जात आहे.

मित्रराष्ट्रांची उत्साहवर्धक युद्धप्रगति

हिटलरचे विरुद्ध झालेल्या लष्करी अधिकाऱ्यांच्या कटाचा उगम, हेतु व स्वरूप हीं कांहीं असोत, जर्मनींत बेदिली माजली आहे आणि नात्सी पक्षास प्रतिकूल अशी परिस्थिति निर्माण झाली आहे ह्यांत शंका नाहीं. असा असंतोष उत्पन्न न होईल तर तें आश्चर्यच समजावें लागेल. जर्मनींत व त्याच्या भोवतीं तीन रणांगणांवर अशा घटना होत आहेत कीं, हिटलरच्या आंधळ्या अनुयायांचाहि धीर खचल्यावांचून रहाणार नाहीं. रशियन फौजा झपाट्यानें व घडाक्यानें पुढें चालल्या असून पूर्व प्रशियाच्या नजीक येऊन ठेपल्या आहेत. इटलींत जर्मन सैन्याची सारखी पीछेहाट होत आहे. पश्चिमेच्या बाजूस नॉर्मंडी प्रांताशिवाय ब्रिटनींमध्येंहि मित्रराष्ट्रांच्या फौजा शिरल्या आहेत. ह्या रीतीनें जर्मनीच्या मानेभोवतीं फास घट्ट बसूं लागला आहे. तुर्कस्थाननें जर्मनीशीं असलेले संबंध तोडून टाकले आहेत, हा मित्रराष्ट्रांचा विजय व जर्मनींचा पराभवच आहे. जर्मनींच्या चढाईचे दिवस मागेंच संपले. पण आतां बचावाच्या युद्धांत त्यास सारखी हार खावी लागत आहे. फ्रान्समध्यें जर्मन सैन्यें निकरानें लढत असलीं तरी त्यांस माघार घ्यावी लागत आहे आणि रशियन आघाडीवर तर त्यांस पळतां भुई थोडी झाली आहे. शत्रूचें लढाऊ बळ खच्ची होत आहे, आणि मि. चर्चिल ह्यांनीं कॉमन्स सभेंत सांगितल्याप्रमाणें युरोपांतील युद्ध पूर्वकल्पनेपेक्षा लवकर संपण्याचीं चिन्हें दिसत आहेत. आसाम सरहद्दीवर आणि उत्तर ब्रह्मदेशांत जपाननें अलीकडे चांगलाच मार खाल्ला आहे आणि पॅसिफिक महासागरांत अमेरिकेची चढाई यशस्वी रीतीनें चालली आहे. ही युद्धाची एकूण परिस्थिति अत्यंत उत्तेजनकारक आहे.

ट्रेझरी बिलांवर ७ आ. ९ पै व्याजाचा दर

रिझर्व्ह बँकेनें गेल्या आठवड्यांत हिंदुस्थान सरकारचीं ४ कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकलीं, त्यांवर व्याजाचा सरासरी दर द. सा. द. शे. ७ आ. ९ पै इतका पडला. एप्रिल, मे व जून महिन्यांत विकलेल्या ट्रेझरी बिलांवर व्याजाचा सरासरी दर द. सा. द. शे. अनुक्रमें १२ आ. ७ पै, ८ आ. ८ पै व ७ आ. ३ पै असा पडला होता.

मागोरा कंपनीचा अभिनंदनीय उपक्रम

के. न्या. मू. मा. गो. रानडे यांचें स्मरणार्थ स्थापन झालेल्या मागोरा कंपनीनें नवीनच बांधलेल्या बॉंडेड लॅबोरेटरीचा उद्घाटन समारंभ सुपरिंटेंडेंट ऑफ एक्साइज रा. सा. एम. एस. नवलकर, एम. ए. यांचें हस्तें कंपनीचे जागेंत रविवार ता. ३० जुले १९४४ रोजीं मोठ्या थाटानें करण्मांत आला. सदर प्रसंगीं कंपनीचे चेअरमन, श्री. बाबूकाका रानडे, डॉ. एन. एल. रानडे, डॉ. के. सी. घारपुरे, प्रो. डी. बी. लिमये, मॅनेजिंग एजन्ट, रा. रा. य. रानडे, रा. सा. नवलकर व रा. हरिभाऊ जोशी इत्यादींचीं भाषणें झालीं. रा. रा. य. रानडे यांनीं आपलें भाषणांत रा. सा. नवलकर यांनीं केलेल्या बहुमोल साहाय्याबद्दल त्यांचे आभार मानून रा. सा. नवलकर हेच गृहस्थ अनावरण समारंभास योग्य असल्याचें सांगितलें. रा. सा. नवलकर यांनीं आपलें भाषणांत बॉंडेड लॅबोरेटरी म्हणजे काय हें विशद करून सांगून अशा तऱ्हेचा धंदा पुण्यासारख्या तज्ज्ञ व विद्वान लोकांनीं भरलेल्या शहरांत अजून कोणीहि सुरू केलेला नाहीं व हा उपक्रम मागोरा कंपनीनें केल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केलें. त्याचप्रमाणें हल्लींच्या डॉक्टर लोकांमध्यें, इंग्रजी पद्धतीनें हिंदुस्थानांत तयार केलेल्या औषधाबद्दल जो गैरविश्वास असतो, त्याबद्दल नापसंती व्यक्त करून जनतेनें दिवसेंदिवस देशी मालाला जास्त उत्तेजन द्यावें असें आग्रहानें प्रतिपादन केलें.

सरतेशेवटीं कंपनीचे डायरेक्टर मास्तर कृष्णराव फुलंब्रीकर यांचे गायनाचा कार्यक्रम होऊन हा समारंभ समाप्त झाला.

इतकी खटपट करून रा. रा. य. रानडे यांनीं हा मोठा धंदा पुण्यासच प्रथम सुरू केला याबद्दल त्यांचें व कंपनीचें अभिनंदन करावें तेवढें थोडेंच आहे.

चेकच्या आकारावर नियंत्रण व बँकांची अडचण

कागदाच्या खपाचें नियंत्रण करणाऱ्या आर्डिनन्समधील एक कलम बँकांच्या चेक्सना लागू पडतें. ९ इंच लांब व २½ इंच रुंद ह्या आकारापेक्षा मोठ्या आकाराचा चेक छापणें किंवा खातेदारांना पुरविणें ही गोष्ट बँकांना करतां येणार नाहीं. तथापि, अगोदरच छापलेले कित्येक कोरे चेक बँकांजवळ असणारच. असे चेक ३० नोव्हेंबर, १९४४ पूर्वी बँकांनीं खातेदारांना देऊन टाकले पाहिजेत व १२ जून १९४४ रोजींचा कोऱ्या चेक्सचा साठा १ ऑगस्ट १९४४ रोजीं सरकारास कळविला पाहिजे असेंहि ऑर्डिनन्स सांगतो. कित्येक लिमिटेड कंपन्यांच्या चेक्सवर दोन किंवा तीन सह्या असतात, त्यांस वरील ऑर्डिनन्स थोडासा गैरसोईचा वाटेल, कारण चेकवर ह्या सह्या बारीक टाकानें व काळजीपूर्वक करणें आतां आवश्यक होईल. सही करणारांचे अधिकार व हुद्दे दर्शविणारे रबर स्टँपहि बदलून लहान करावे लागतील. ह्याहिपेक्षा खरी अडचण, बँकांनीं ३० नोव्हेंबर, १९४४ पूर्वी आपल्या चेक्सचा साठा संपविण्याच्या अटीसंबंधांतील आहे. पुष्कळ बँकांजवळ दोन-तीन वर्षे पुरतील इतके चेक छापून तयार असतात, ते कापून लहान करणें किंवा ऑर्डिनन्स रद्द होईपर्यंत ते तसेच ठेवून नवे लहान चेक छापणें किंवा ते रद्दी समजून रांध्यासाठी कागदाच्या गिरणकिडे पाठविणें, ह्यापैकी कोणतीहि गोष्ट ऑर्डिनन्समधील अट पुरी करणारी असली तरी व्यावहारिक ठरणार नाहीं. सरकारनें ह्या अडचणींचा विचार करणें श्रेयस्कर ठरेल.

बँकेमधील व्यवहारांच्या जमाखर्चाविषयीं थोडीशी माहिती

(१)

बँकेमधील व्यवहार जितक्या दक्षतेनें करावे लागतात तितक्याच तत्परतेनें त्या व्यवहारांची नोंद बँकेच्या जमाखर्चाच्या निरनिराळ्या पुस्तकांतून व्हावी लागते. बँकेचे जमाखर्च व्यवस्थित, काळजीपूर्वक व तत्परतेनें लिहिल्यास बँकेशीं व्यवहार करणाऱ्या लोकांचा बँकेविषयींचा विश्वास तर वाढतोच पण त्याबरोबरच बँकेच्या व्यवस्थापकांना बँकेंत झालेल्या व्यवहारांचा लेखी व बिनचूक पुरावा मिळतो. त्यांना बँकेंत चाललेले व्यवहार फायदेशीर रीतीनें चालले अगर एखाद्या बाबतींत प्रमाणापेक्षा अधिक खर्च होत आहे, याची कल्पना पाहिजे त्या वेळीं मिळतें.

दोन व्यक्तींमध्यें अगर व्यक्तींच्या दोन गटांमध्यें पैशाच्या अगर इतर कोणत्याही स्वरूपांत होणाऱ्या देवघेवींच्या व्यवहारांची नोंद वरील सोयीच्या दृष्टीनें जमाखर्चांत करावयाची असते. आपणाकडे जमाखर्च लिहिण्याची पद्धत फार पूर्वीपासून आहे व आपली जमाखर्च लिहिण्याची देशी पद्धतीच व्यापाऱ्यांमध्यें फार मोठ्या प्रमाणांत प्रचलित आहे. परंतु बँकांची सध्याची कल्पना जशी आपणाकडे परदेशांतून आली त्याबरोबरच त्यांची जमाखर्च लिहिण्याची पद्धतही आपल्या बँकांनीं उचलली व तिचा प्रसार आपणाकडे झाला.

देशी पद्धतींत जमाखर्चांत 'रोखीचे व्यवहार' व 'हुंडेरजी' व्यवहार असे दोन प्रकार झालेल्या व्यवहारांत पाडलेले प्रामुख्यानें दिसतात; परंतु 'घेणें' व 'देणें' ही प्रत्येक व्यवहाराची दोन अंगें आहेत व घेणें व देणें या दोनहि व्यवहारांची नोंद करण्याच्या दृष्टीनें जमाखर्च लिहिण्याची जी पद्धत तिला (Double Entry) अगर हुंडेरजी जमाखर्चाची पद्धत असें म्हणतात. सर्व बँकांतून बहुधा हीच पद्धत अस्तित्वांत आहे.

आपण ज्यावेळीं लोकांचे देणें असतो त्यावेळीं तितकी रक्कम आपल्या वहींत आपण त्यांचे नांवे जमा करतो व लोकांकडील येणे पैसे आपल्या वहींत त्यांचें खातीं नांवें लिहिलेले असतात. जमेचे व्यवहार जमाखर्चाच्या वहींत डाव्या बाजूस लिहितात व नांवेचे व्यवहार उजव्या बाजूस लिहितात.

प्रत्येक व्यवहार होतेवेळीं त्यांची थोडक्यांत माहिती देऊन त्याप्रमाणें जमेची व खर्चाची वेगवेगळीं व्हावचर्स तयार केली जातात. झालेल्या व्यवहाराचा तात्कालिक लेखी पुरावा या दृष्टीनें वांचें महत्त्व फार आहे. या व्हावचरांच्या आधारावरून रोजच्या झालेल्या व्यवहाराची नोंद करून त्या दिवसाची शिल्लक ज्या पुस्तकांत काढलेली असते त्यास Day book अगर रोजकीर्द असें म्हणतात. वेगवेगळ्या दृष्टीनें होणाऱ्या व्यवहाराच्या निरनिराळ्या प्रकारच्या खारजेपणावरून खातेवार व्हावचर्स लावून घेऊन त्याप्रमाणें ही रोजकीर्द लिहिली जाते त्यामुळें विशिष्ट खातीं रोज किती उलाढाल झाली हेंही कळतें.

निरनिराळ्या खात्यांत रोजच्या रोज किती रक्कम जमा झाली अगर गेली हें रोजकीर्दीवरून कळेल परंतु एका विशिष्ट खात्यांत आजपर्यंत किती रक्कम आली, किती गेली व आज त्या खात्याची परिस्थिति काय आहे हें समजण्याच्या दृष्टीनें झालेल्या व्यवहारांची खातेवार नोंद ज्या पुस्तकांत केली जाते तीस खतावणी अगर 'लेजर' असें म्हणतात.

ह. वा. लक्ष्मणपुरे

जिकडे तिकडे प्रशंसा

इमिटेशन दागिन्यांवर रासायनिक क्रिया करून खऱ्या सोन्याचा पत्रा चढविला जातो त्यामुळें दागिना केव्हांही खराब होत नाही, ही पूर्ण खात्री झाली. सोन्याचा पत्रा चढविलेल्या चार बांगड्या कि. आठ रु. गॅरंटीवर दागिना परत करणें झाल्यास वर चढविलेल्या सोन्याचे सर्वच्या सर्व पैसे परत देऊं.

भट कं. सांगली, S. M. C.
भट कंपनी शाखा–बुधवार पेठ, पुणें २.

सध्यांच्या टंचाईच्या काळांत जीवनद्रव्यें कमी पडतात.
जीवनद्रव्यांनीं (Vitamins) युक्त असे
(सदुपाय खात्यानें मान्यता दिलेले)

टोमॅटो केचप (गोड) व टोमॅटो सॉस [तिखट व आंबट]

आजच मागवा व जीवनद्रव्यांची वाटणारी उणीव भरून काढा.

रुरल प्रॉडक्टस कंपनी लि. पुणें

बिझिनेस ऑफिस: ९११ अ सदाशिव, पुणें २.

तुमच्या आवडींत व ऐपतींत प्रसिद्धीचें प्रभावी साधन

कॅलेंडर्स

(१९४५)

नवीन आकर्षक चित्रांचा आल्बम तयार होत आहे.— प्रमुख ठिकाणीं एजंटस नेमणें आहेत.

दि आर्ट कॅलेंडर्स लि.

१५ बुधवार पेठ, पुणें २

पुण्यांतील

आदर्श निवासस्थान व भोजनालय

छाया लॉजिंग व बोर्डिंग हाऊस

बुधवार चौक, पुणें २.

प्रगतिपथावरील नवा

मै ला चा — द ग ड

सन १९४३ अखेर

नव्या कामांत	११० टक्के वाढ
चालू कामांत	१०० टक्के वाढ
आयुर्विमानिधींत	८० टक्के वाढ

— आपला विमा किंवा एजन्सी आजच घ्या —

दि औंध म्यूच्युअल लाइफ ॲश्युरन्स सोसायटी लि., पुणें.

आर. जी. साठे, सुपरिंटेंडेंट — व्ही. जी. जोशी, मॅनेजिंग डायरेक्टर

JUST PUBLISHED

INDIAN RURAL PROBLEM

BY

Sir Manilal Nanavati and Prof. J. J. Anjaria.

(Issued by the Indian Society of Agricultural Economics, Bombay).

Price Rs. 8
(Postage extra).

Sole Selling Agents :—

THE CO-OPERATORS' BOOK DEPOT.

9, BAKEHOUSE LANE, FORT, BOMBAY.

Telephone 779

TELEGRAM Guest House Poona 2.

पुना गेस्ट हाऊस

१००, लक्ष्मी रोड, पुणें २.

हें पत्र पुणें, पेठ शनवार चे. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' शनवार, चे. नं. १२७।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
(टपाल खेरीज माफ)
किरकोळ अंकास
दोन आणे.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष १० पुणें, बुधवार, तारीख १६ ऑगस्ट, १९४४ अंक ३३

भजनावर

भक्तगण भाळले

व्ही. शांताराम आणि राजकमल यांची दुसरी कलाकृति

डेक्कन —व— अपॉलो

ह्या दोन थिएटरांत

शुक्रवार ता. ११ ऑगस्टपासून सुरू झाला !

प्रोड्यूसरः—
व्ही. शांताराम,
दिग्दर्शकः—
केशवराव दाते,

भक्तीचा मळा (माली)

भूमिकाः— ● मास्तर कृष्णराव ● बेबी नलिनी ● अमीर कर्नाटकी ● अमीना ● सामंत ● राजा पंडित

अपोलो : दररोज दुपारीं ३॥, व सायं. ६॥ चे पहिले दोन खेळ हिंदी व रात्रौ १० चा तिसरा खेळ मराठी

डेक्कन : दररोज ४, ७ व १० वा तिन्ही खेळ मराठी

सकाळीं १० ते १२ डेक्कन व अपॉलोमध्यें वरच्या वर्गांचीं तिकिटें अगाऊ रिझर्व्ह केलीं जातील.—कॉम्प्लिमेंटरी व फ्री पास अनिवार्य बंद.

गिरगांव मुंबई नं. ४

महिंद्रकर बदर्स
तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

विविध माहिती

ग्रेट ब्रिटनमधील लोकांचा खर्च

ग्रेट ब्रिटनमधील मनुष्य त्यास मिळणाऱ्या प्रत्येक १०० रुपयांच्या उत्पन्नापैकी २५ रुपये अन्नावर व २१ रुपये दारू व तंबाखू ह्यांवर खर्च करतो. १९३८ साली हेच आकडे अनुक्रमें ३० रुपये व ११ रुपये होते. अर्थात्, त्यावेळीं उत्पन्न आतांपेक्षा २०% कमी होतें. दारू व तंबाखू ह्यांवरील खर्च वाढला असला, तरी त्याचा बराच मोठा भाग सरकारास कराचे रूपानें मिळतो.

विजेच्या रोषणाईवर निर्बंध

विजेच्या दिव्यांचा तुटवडा व आवश्यक कामास वीज पुरी पडावी ह्यासाठी विजेची बचत करण्याचें महत्त्व, हीं लक्षांत घेऊन ह्यापुढें तात्पुरत्या रोषणाईस विजेचा पुरवठा मंजूर करण्यांत येणार नाही, असें मुंबई सरकारनें प्रसिद्ध केलें आहे. युद्धकार्यास अथवा तितक्याच महत्त्वाच्या दुसऱ्या कार्यास रोषणाई आवश्यक असेल, तरच तिला मंजुरी देण्यांत येईल.

ब्रिटिश भांडवल कोणत्या देशांस मिळेल ?

"युद्धानंतर आपलें भांडवल जगभर पेरणें आपणांस शक्य होणार नाहीं; १९ व्या शतकांत तें जमलें. सर्व दृष्टींनीं चौकशी करून व भांडवलावर नियंत्रण ठेवूनच आपणास तें पाठवितां येईल. आयात कोणत्या मालाची करावयाची, कोणत्या देशांस प्राधान्य द्यावयाचें, परदेशांतील आपल्या भांडवलाच्या गुंतवणुकीचें काम करावयाचें, हें सर्व ब्रिटिश पार्लमेंटालाच ठरवावें लागेल." —मि. एच. जे. वेडरबर्न ह्यांचे उद्गार.

मुंबई प्रांतांत ६४ गावांमध्यें रेशनिंग

मुंबई प्रांतांत आतां ६४ गावांत रेशनिंग चालू आहे. १ ऑगस्ट रोजीं अहमदनगर, सातारा, महाबळेश्वर, पांचगणी, वाई, कराड व दोहद येथें रेशनिंगला प्रारंभ झाला. ह्या सात गावांचा समावेश वरील ६४ गावांत होतो.

बडोदें संस्थानांतील गिरण्या

बडोदें संस्थानांत कापसाच्या सुताच्या व कापडाच्या गिरण्यां ह्यांची प्रगति अति झपाट्यानें झाली आहे, हे खालील आकडे दर्शवितील:—

	१९३२-३३	१९४२-४३
गिरण्यांची संख्या	१४	१८
गुंतलेलें भांडवल (रु.)	१ कोटि, ९५ लक्ष	४ कोटि, ६ लक्ष
भागांची संख्या	४,२८३	६,९३२
सुताचें उत्पादन	(पौंड) २३१ लक्ष	४३१ लक्ष

लँकेशायर व यॉर्कशायर येथील गिरण्यांवर एक कोटि लोकांचा उदरनिर्वाह

ग्रेटब्रिटनमधील उद्योगधंद्यांत कापडाच्या गिरण्यांचें महत्त्व विशेष आहे. युद्धापूर्वी ग्रेट ब्रिटनमधून दरसाल १० कोटि रुपये किंमतीचे शर्ट व सूट निर्गत होत असत. १९३८ साली एकट्या सुताच्या निर्गतीची किंमत ५ कोटि पौंड भरली ! लँकेशायर व यॉर्कशायर येथील गिरण्यांवर १ कोटि स्त्रीपुरुषांचा उदरनिर्वाह अवलंबून आहे. त्यांच्या उत्पादनाची किंमत ४४½ कोटि पौंड भरते व हें उत्पादन बहुतेक सर्व परदेशीं जातें. त्याच्या मोबदला खाद्यपदार्थ बाहेरून येतात.

रिझर्व्ह बँकेचा नफा व त्याची वाटणी

हिंदी रिझर्व्ह बँकेस ३० जून, १९४४ अखेर संपलेल्या वर्षी १०,२६,५७,८१० रुपये निव्वळ नफा झाला. बँकेजवळील रोख्यांत बरीच मोठी भर पडल्याकारणानें त्यांच्या व्याजाच्या उत्पन्नामुळें बँकेच्या निव्वळ नफ्यांत २ कोटि, ५७ लक्ष रुपयांची भर पडलेली आहे. रिझर्व्ह बँकेच्या ४७ व्या कलमास अनुसरून ३½% डिव्हिडंड देण्यासाठी १७½ लक्ष रुपये लागतात. १९४३ च्या रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया ऑर्डिनन्सनें बँकेच्या नफा वाटणीचा कमाल दर ४% ठरवून टाकला आहे. त्यामुळें फक्त ¼% च ज्यास्त डिव्हिडंड बँक देऊं शकते, त्यास २½ लक्ष रुपये लागतील. उरलेली १०,०६,५७,८१० रुपयांची रक्कम मध्यवर्ती सरकारास मिळेल.

मुंबई प्रांतांतील कारखान्यांत वाढ

मुंबई प्रांतांत १९४२ सालीं ३,७१९ कारखाने चालू होते. ही संख्या १९४१ मधील कारखान्यांच्या संख्येपेक्षा ९८ नें ज्यास्त आहे. कित्येक कारखान्यांनीं वाढ केली व त्यामुळें त्यांचें उत्पादन वाढलें. दोन व तीन पाळ्या चालू ठेवणारे कारखाने पुष्कळ होते. नवीन लिमिटेड कंपन्या काढण्यास आर्थिक व औद्योगिक परिस्थिति सोईची होती. १९३८-३९ ते १९४२-४३ ह्या पांच वर्षांत दरवर्षी नोंदण्यांत येणाऱ्या कंपन्यांची संख्या १३८ वरून ३४० वर गेली व अधिकृत भांडवलाचा आकडा १८ कोटि रुपयांवर गेला. ह्याच पांच वर्षांत कारखान्यांची संख्या १,२२४ नें वाढून ती ३७१९ झालेली आहे व त्यांतील कामगारांची सरासरी संख्या ४,७९,१०३ ची ६,५१,३२४ झाली आहे.

ब्रह्मी आघाडीवरील हानी

ब्रह्मी आघाडीवर दोस्तांचे ५,९१८ सैनिक मरण पावले, १९,९१६ जखमी झाले व २,५९४ बेपत्ता आहेत. ब्रिटिश, हिंदी व पश्चिम आफ्रिकेतील सैनिकांचा ह्यांत मुख्यतः भरणा आहे.

हिंद-ब्रिटन देवघेवींचा हिशेब

"हिंदुस्थानास देणें लागत असलेली रकम वाढत जाऊं दिल्यानें निर्माण होणारा कर्जाचा बोजा आपल्या कित्येक पिढ्या उतरवूं शकणार नाहींत. ह्या परिस्थितींतून मार्ग काढण्याचा विचार केला पाहिजे. मालाचे स्वरूपांतच हिंदुस्थान कर्जाची वसुली करूं शकेल. शेंकडो कोटि पौंडांचा माल त्यासाठीं ग्रेट ब्रिटनला करावा लागेल व त्याकरितां कित्येक वर्षें सक्त मेहनत करावी लागेल. आज निघत आहेत तसेच हिशेब चालू ठेवले, तर हा व्यवहार हिंदुस्थानास पोषक परंतु ग्रेटब्रिटनला चांगलाच मारक होईल."— हिंदुस्थानाचें ग्रेट ब्रिटनमध्यें येणें फुगत चाललें आहे, त्यासंबंधीं चिंता व्यक्त करतांना सर आल्फेड वॉटसन ह्यांनीं वरील प्रकारचे उद्गार काढले आहेत.

नवे रेल्वे रस्ते

युद्धसमाप्तीनंतर ५ हजार मैल लांबीचे रेल्वेरस्ते तयार करण्यांत यावयाचे आहेत, त्यांपैकी २½ हजार मैलांचे रेल्वे रस्ते पहिल्या सात वर्षांत पुरे व्हावयाचे आहेत, अशी हिंदुस्थान सरकारची योजना आहे. कांहीं वर्षे तरी ह्या रेल्वे रस्त्यांपासून सरकारास दरसाल किमान १२ कोटि रुपये तूट येईल, अशी अपेक्षा आहे. पुढें फायदा दिसूं लागेल. प्रांतिक सरकारें, संस्थानें व रेल्वेज ह्यांच्या सल्ल्यानें कोणतीं कामें आधीं हातीं घ्यावयाचीं, हें ठरविण्यांत येईल.

अनुक्रमणिका

	पृष्ठ
१ विविध माहिती	२५८
२ अण्णासाहेब चिरमुले: चरित्र व कार्य	२५९
३ नैट्रोजन रसायनांचें उत्पादन	२६०
४ स्फुट विचार	२६१
रॉकेलचें आर्थिक वैशिष्ट्य– तेलाच्या पुरवठ्याचें पुनर्घ- टनेंत स्थान—रिझर्व्ह बँकेचें डिव्हिडंड—हिंदी धंद्यांचें भवितव्य—युद्धोत्तर औद्यो- गिक योजना	
५ प्रेसिडेन्सी इं. बँकेची प्रगति	२६३
६ टाटा केमिकल्स लि.	२६३

अर्थ

बुधवार, ता. १६ ऑगस्ट, १९४४

विमामहर्षि अण्णासाहेब चिरमुले : चरित्र व कार्य*

श्री. वा. ग. उर्फ अण्णासाहेब चिरमुले ह्यांना ८१ वें वर्ष लागण्याच्या प्रसंगीं (४ जून, १९४४) त्यांच्या संबंधीं शुभेच्छापूर्वक कृतज्ञता व्यक्त करण्याकरितां म्हणून सातारा शहरामधील त्यांच्या चहात्या व ऋणानुबंधी गृहस्थांतर्फे एक सत्कार-समिति स्थापन करण्यांत आली. सत्काराच्या प्रासंगिक व शाश्वत अशा दोन भागांपैकी शाश्वत सत्कारांत श्री. चिरमुले ह्यांच्या चरित्राचा समावेश होतो. हें चरित्र लिहिण्याचें काम श्री. वा. ह. खाडिलकर ह्यांजकडे सोपविण्यांत आलें. श्री. खाडिलकर हे "वेस्टर्न इंडिया" च्या वरिष्ठ नोकरवर्गांत काम करीत आलेले असल्याकारणानें त्यांना श्री. चिरमुले ह्यांच्या व्यक्तित्वाचा व कार्यपद्धतीचा चांगला परिचय आहे. चरित्रलेखनाचें काम त्यांनीं थोड्या अवधींत उत्कृष्ट रीतीनें पार पाडलें आहे.

परिस्थितीशीं झगडून बी. ए., एलएल. बी. झाल्यावर श्री. चिरमुले ह्यांनीं शिक्षकाची नोकरी सोडली व मुधोळ येथें न्यायाधीश म्हणून ते दाखल झाले. परंतु त्यांच्या निःस्पृही स्वभावामुळें त्यांनीं लवकरच राजीनामा दिला व १८९४ सालीं साताऱ्यास येऊन वकिलीस प्रारंभ केला. देशाभिमान, स्वदेशीबद्दल आस्था, लोकसेवेची मनापासून आवड, इत्यादि गुणांमुळें श्री. चिरमुले हे साताऱ्यांतील तद्विषयक उपक्रमांत पुढाकार घेऊं लागले. त्यांनीं प्रथम कापड दुकान काढलें. त्यांत पुढें साखर शिरली. ह्या दोन धंद्यांस लागणाऱ्या भांडवलासाठी ठेवी घेण्यासहि प्रारंभ झाला. साळोसाल ठेवी वाढूं लागल्या. सातारा स्वदेशी कमर्शिअल कंपनीची स्थापना साताऱ्यांत होऊन तिच्या कार्याचा विस्तार साखर, कापड व नंतर बँकिंग ह्यांत झाला. सहकारी चळवळींतहि श्री. चिरमुले ह्यांनीं लक्ष घातलें. के. ल. कृ. उर्फ काकासाहेब जोशी ह्यांनीं साताऱ्यास वेस्टर्न इंडिया विमा कंपनीचा कल्पवृक्ष लावण्यांत पुढाकार घेतला व ह्या कंपनीच्या संवर्धनाचें काम श्री. चिरमुले ह्यांनीं स्वीकारलें. कंपनी स्थापन करण्याचा उद्देश देशी विमा-कंपनी काढून विमा हप्त्यांच्या रूपानें परदेशांत जाणारा पैशाचा ओघ थांबविणें, हा होता; व्यक्तिगत स्वार्थाची त्यांत कल्पनाहि नव्हती. ह्याच उदात्त तत्त्वास अनुसरूनच वेस्टर्न इंडियाचा कारभार आजहि चालू आहे. वेस्टर्न इंडियाच्या स्थापनेचे अगोदर कांहीं कंपन्यांत मॅनेजिंग एजन्सीची पद्धति अमलांत होती, ती पुढें अनेक विमा संस्थांत अवलंबिण्यांत आली. त्याचे दुष्परिणाम इतके भडक झाले, कीं कायद्यानें ती बंद करणें अस्सेर भाग पडलें. विमा कंपनी ही वस्तुतः विमेदारांचीच आहे ही भावना "वेस्टर्न इंडिया"-च्या स्थापनेपासून तिचे चालकांची असल्याकारणानें तिच्या घटनेंत त्या भावनेस अनुसरूनच नियम करण्यांत आलेले आहेत. मूळ संस्थापकांनीं स्वार्थत्यागाचे पायावरच कंपनीची उभारणी करून तिची वाढ केली. काटकसर हें तर कंपनीचें आरंभापासूनचें वैशिष्ट्य आहे. कंपनी सुरू होते न होते तोंच बँका बुडण्याची साथ सुरू झाली व देशी कंपन्यांवरचा लोकांचा विश्वास नाहींसा होऊन एजंटांना काम मिळविणें कठीण जाऊं लागलें. अशा बिकट परिस्थितींतहि कंपनीचें पहिलें मूल्यमापन १९१७ अस्सेर झालें. त्यांत ११½ हजार रुपये बाढावा दिसून आला. १९२० च्या मूल्यमापनांत विमेदारांस बोनस व भागीदारांना नफा देतां येण्याजोगी परिस्थिति दृष्टोत्पत्तीस आली आणि "वेस्टर्न इंडिया"ची कीर्ति महाराष्ट्रभर पसरली. कोठल्याहि कंपनीची प्रगति अव्याहत होत नाहीं; तींत कित्येक नाजुक व पेचाचे प्रश्न उपस्थित होतात व ते सोडवितांना व्यक्तीपेक्षां संस्थेकडे लक्ष देणाऱ्या चालकांचे पदरीं वाईटपणा येण्याचा नेहमींच संभव असतो. कंपनी उभारण्यांत स्वार्थत्याग करणाऱ्यांच्याहि कांहीं अपेक्षा असतात, त्या पुऱ्या पडल्या नाहींत, म्हणजे सहाजिकच कंपनीच्या प्रमुख लोकांत मतभेद निर्माण होऊन मनें कलुषित होतात. अशा प्रसंगीं जबाबदार व्यक्तींना अतिशय समयसूचकता आणि शांत वृत्ति धारण करावी लागते. "वेस्टर्न इंडिया"-वरहि इतर अनेक महाराष्ट्रीय कंपन्यांप्रमाणें, असें प्रसंग आले. तथापि, त्यांतून वेस्टर्न इंडिया कंपनी निभावून गेली. श्री चिरमुले ह्यांचें धोरण सावधगिरीचें व काटकसरीचें असलें आणि वेस्टर्न इंडिया कंपनी अत्यंत मजबूत झाली असली, तरी तिला मिळणारें काम मात्र इतर देशी कंपन्यांच्या मानानें फार कमी होतें. "वेस्टर्न इंडिया"चा व्यवहार पुष्कळ वाढून ती अग्रेसर हिंदी विमा कंपनी व्हावी, असें मत १९२८ च्या सुमारास उघड प्रतिपादलें जाऊ लागलें. तथापि, श्री. चिरमुले व "वेस्टर्न इंडिया" ह्यांचा एवढा एकजीव झालेला होता, कीं १९२८ च्या वार्षिक निवडणुकींत श्री. चिरमुले ह्यांच्या पाठीराख्यांस निर्विवाद बहुमत मिळालें. कंपनीची प्रगति जरा धडाडीनें झाली पाहिजे, ही सत्य गोष्ट होती व तिला अनुसरून तिचा विस्तारहि नंतर आखण्यांत आला. "वेस्टर्न इंडिया"नें आतां १ कोटि रुपयांची वार्षिक कामाची मर्यादा ओलांडली आहे, हें सुप्रसिद्धच आहे. १९३६ सालीं "वेस्टर्न इंडियानें" युनायटेड वेस्टर्न बँक लि. ही संस्था स्थापली, तिचीहि प्रगति चांगल्या तऱ्हेनें होत आहे.

श्री. चिरमुले ह्यांच्या कार्याचें महत्त्व "वेस्टर्न इंडिया" च्या यशापुरतेंच मर्यादित नाहीं. त्यांच्या स्वतःच्या व "वेस्टर्न इंडिया" च्या उदाहरणानें कित्येक व्यक्तींस स्फूर्ति मिळालेली आहे व कित्येक व्यापारी आणि औद्योगिक संस्थांस चालना मिळालेली आहे. श्री. चिरमुले ह्यांनीं आपल्या वयाच्या ४९ व्या वर्षी विमा कंपनी काढली; आज त्यांचें वय ८१ वर्षांचें आहे, ही गोष्टहि

* ले. वामन हरि खाडिलकर, बी. ए., बी कॉम., प्र. चिरमुले सत्कार समिति, सातारा. पृ. सं. २५८, किं. ५ रु.

टोकांना मार्गदर्शक होणारी आहे. चारित्र्य आणि कर्तृत्व ह्यांचेवर आधारलेले त्यांचे प्रयत्न यशस्वी झाले व त्यांस जनतेचाहि सक्रिय पाठिंबा मिळाला, ह्यावरून चांगल्या पायावरील व विश्वासार्ह मार्गदर्शनाखालील उपक्रमांचें चीज महाराष्ट्रांत झाल्याविना रहात नाहीं, हें स्पष्ट होतें. "वेस्टर्न इंडियानें एकहि लक्षाधीश निर्माण केला नाहीं" हें तिचें वैशिष्ट्य श्री. चिरमुले ह्यांच्या विशिष्ट ध्येयाचेंच फळ आहे. चिरमुले सत्कार समितीनें प्रकाशित केलेलें हें चरित्र केवळ एका व्यक्तीच्या गुणांचें यथार्थ वर्णन असून तो गेल्या चाळीस वर्षांतील महाराष्ट्राच्या एका व्यावसायिक प्रगतीचा साक्षात् इतिहासहि आहे. श्री. खाडिलकर ह्यांनी पुस्तकाच्या लेखनाचें कार्य पुस्तकाचे विषय श्री. चिरमुले ह्यांच्या कार्यांत तादात्म्य पावून केलें असल्यामुळें तें उत्कृष्ट वठलें आहे

हिंदुस्थानांत नैट्रोजन रसायनांचें उत्पादन

सर पद्मजी जिनवाला ह्यांच्या सूचना

टॅरिफ बोर्डाचे एक माजी अध्यक्ष, सर. पद्मजी जिनवाला, ह्यांनी "नैट्रोजन इंडस्ट्री" या नांवाची एक पुस्तिका प्रसिद्ध केली आहे. सर जिनवाला हे स्वतः मोठे अनुभविक मांडवलदार व कारखानदार आहेत व वरील पत्रकामागें विषयाचा सखोल तांत्रिक व आर्थिक अभ्यास आणि राष्ट्रीय वृत्ति दिसून येते. पुस्तिकेच्या प्रस्तावनेंत उल्लेखिल्याप्रमाणें नैट्रोजन-रसायनांच्या हिंदी उत्पादनाच्या प्रश्नास त्यांनींच स्वतः टॅरिफ बोर्डाचे अध्यक्ष या नात्यानें तोंड फोडिलें होतें. ह्या विषयांत लक्ष्य घालण्याचें कारण असें कीं, हिंदी शेतीस ऊर्जितावस्थेस आणण्यास नैट्रोजन-खतांची मोठी जरूरी आहे. (ता. १६ जुलै, "अर्थ") शिवाय युद्धास लागणाऱ्या सर्व स्फोटक द्रव्यांत मुख्यतः नैट्रोजनचींच रसायनें असतात.

सर जिनवाला ह्यांच्या पुस्तिकेचा माथितार्थ खाली देत आहोंतः—

(१) नैट्रोजन रसायनांस आजची व भावी मागणी:—नैट्रोजनचें मुख्य रसायन अमोनिया होय. त्याचा पुढील धंद्यांत उपयोग होतो. (अ) खतें (ब) बर्फाचे कारखाने (क) क्लोरिन् बरोबर पाण्यांत टाकण्यास (ड) पेट्रोलियमच्या धंद्यांत व रेशिम व सूत यांना रंग देतांना (ई) रबर (फ) वेल्डिंग व तदनुषंगिक धंदे. याशिवाय नायट्रिक ॲसिड व त्यापासून अगणित रसायनें, रंग, स्फोटक द्रव्यें, कृत्रिम रेशिम इ. इ.

यांपैकी फक्त खतांचा विचार केल्यास, हिंदुस्थानांत युद्धापूर्वी वर्षास १५,००० टनें नैट्रोजन खपत असे. सर जिनवाला यांच्या म्हणण्याप्रमाणें ही मागणी भावी मागणीच्या १% देखील नाहीं.

दुसऱ्या विभागांत अमोनिया तयार करण्याच्या कृति देण्यांत आल्या असून त्यांत सर्व शक्य कृतींचा ऊहापोह केला आहे. मुख्यतः (अ) हैड्रोइलेक्ट्रिक वीज (ब) कोळशापासून वीज (क) बॉटर गॅस या कृतींचा विचार केला आहे. शिवाय लोखंडाच्या भट्टींतील गॅसचा उपयोग करतां येईल काय असा प्रश्न उपस्थित केला आहे. एकंदरींत सर साहेबांचें मत झेवट उल्लेखिलेल्या दोन कृतींकडे झुकतें.

पुस्तिकेच्या तिसऱ्या विभागांत अमोनियापासून होणाऱ्या कांहीं मुख्य रसायनांचा विचार केला आहे.

त्यानंतर सर जिनवाला ह्यांनी निरनिराळ्या कृतींस लागणाऱ्या मांडवलाच्या व विक्रण्याच्या किंमतींचे अंदाज दिले आहेत. नंतर ह्या धंद्यांत प्रथमतः किती यंत्रसामुग्री घालणें इष्ट आहे याबद्दल मतें प्रदर्शित केलीं आहेत. शिवाय हिंदुस्थानांत गंधक नसला तरी सल्फ्युरिक ॲसिडची अडचण जिप्समच्या साह्यानें कशी दूर होईल हें दर्शविलें आहे. सर साहेबांच्या मतें वर्षास २०,००० टन नैट्रोजनाच्या उत्पादनास लागणारी यंत्रसामुग्री पैदा करावी.

नंतर त्यांनीं कारखाना कोठें उभारावा व मांडवल किती लागेल याचा विचार केला आहे. (अ) हैड्रो-इलेक्ट्रिक रुपये ४,९३,००,००० (ब) कोळशापासून वीज रु. २,४६,००,००० (क) बॉटर गॅस वा कोक ओव्हन गॅस रु. १,९५,००,००० याप्रमाणें खर्च येईल असा त्यांचा अंदाज आहे.

पुस्तिकेच्या पुढील विभागांत नैट्रोजन कारखाना एखाद्या लोखंडाच्या भट्टी शेजारीं काढल्यास कसें होईल याचा विचार केला आहे. सर जिनवाला यांच्या मतें अशा ठिकाणींच कारखाना काढणें फार चांगलें होईल.

बाहेरच्या जगांतील आर्थिक व इतर घडामोडींपासून या धंद्यांचें संरक्षण करणें कसें जरूर आहे व तें कसें करितां येईल याबद्दलचे त्यांचे अनुभवाचे बोल पुस्तिकेच्या शेवटीं दिले आहेत. सर जिनवाला यांच्या मतें साम्राज्य सरकारच्या मनांत हा धंदा इंपिरिअल केमिकल इंडस्ट्रिजच्या हातीं द्यावयाचा आहे. या कंपनीनें जगभर केलेल्या कारवाया, कंपनी व ब्रिटिश सरकार यांचे संबंध, कंपनीनें साम्राज्यांतील स्फोटक रसायनांचा धंदा आपल्या हातांत कसा आणला व आतां हिंदुस्थानांतहि कंपनी आपले पाय रोवण्याची कशी तयारी करीत आहे यांचें वर्णन फार सूक्ष्म दृष्टीनें केलें आहे. साम्राज्य सरकारचा हा डाव फसवणें हें कसें अगत्याचें आहे हें त्यांनीं दाखविलें आहे. इं. के. इंडस्ट्रीजकडून हिंदुस्थानास शक्य ती मदत मिळावी व दोघांचाहि फायदा व्हावा परंतु हा धंदा त्या कंपनीनें गिळंकृत करूं नये यासाठी काय करितां येईल याबद्दल त्यांनीं महत्त्वाच्या सूचना केल्या आहेत. त्याचप्रमाणें हिंदुस्थान सरकार, लष्करी खातें व प्रांतिक सरकारें ह्यांनीं काय केलें पाहिजे हेंही दर्शविलें आहे.

सर जिनवाला ह्यांच्या लिखाणाचा विस्तृत परिचय येथें देणें शक्य नाहीं; तो पुढें देण्यांत येईल.

श्री. चिं. काळे.

शेड्यूल्ड बँकांच्या कचेऱ्या

रिझर्व्ह बँकेच्या शेड्यूलमध्यें एप्रिल ते जून १९४४ ह्या तिमाहींत हुगळी बँक लि., कलकत्ता ही नव्यानें दाखल झाली. शेड्यूल्ड बँकांची संख्या एका वर्षापूर्वी ६७ होती; आतां ती ७९ झाली आहे. एका वर्षाचे मुदतींत शेड्यूल्ड बँकांच्या कचेऱ्यांची संख्या १६०७ चीं २०४१ झाली. इंपीरिअल बँकेनें ६ नवीन शाखा काढल्या, पांच प्रमुख बँकांनीं ८१ शाखा वाढविल्या, एक्सचेंज बँकांच्या पांच कचेऱ्या बंद झाल्या व इतर शेड्यूल्ड बँकांच्या कचेऱ्यांत ३५२ कचेऱ्यांची भर पडली.

बिगर तिकीट प्रवासास आळा

बी. बी. अँड सी. आय. रेल्वेवरील बिन तिकिटवाल्या प्रवाशांवरील खटले चालविण्यासाठी सुरत व अहमदाबाद येथें स्टेशनांचे हद्दींतच ऑनररी मॅजिस्ट्रेटांचीं कोर्टें भरविण्यांत येणार आहेत.

स्फुट विचार

राकेलचें आर्थिक वैशिष्ट्य

दिव्यांत जाळण्यासाठी राकेल तेल ही वस्तू हिंदुस्थानांत किती महत्त्वाची झाली आहे ह्याची कल्पना त्याचा तुटवडा व वाटणी ह्यांचेविषयीं युद्धकाळांत उपस्थित झालेल्या अडचणींवरून सहज येते. उजेडाशिवाय यंत्रांची प्रेरक शक्ति निर्माण करण्याकडेहि राकेलचा उपयोग होत असल्यानें आधुनिक पद्धतीच्या जीवनांत त्याचेवांचून उत्पादन, वहातूक वगैरे आर्थिक क्रिया समाधानकारक रीतीनें घडणें कठिण झालें आहे. सध्याच्या युद्धांत तर विमानें, रणगाडे, चिलखती गाड्या, जहाजें, पाणबुड्या ह्यांचा संचार व कार्य हीं सर्वस्वीं पेट्रोलवर म्हणजें भूमिगत तेलावर अवलंबून आहेत. युद्धोत्तर काळांत संपत्तीचें उत्पादन, वहातूक व विनिमय ह्यांचेसाठी ह्या निसर्गदत्त शक्तिसाधनाचा मोठा पुरवठा लागणार आहे. वहातुकीच्या प्रचंड विमानांतून माणसांची व मालाची ने-आण जगभर व्हावयाची आहे आणि तेलाच्या शक्तीनें यंत्रें चालून त्यांचें उत्पादन वाढणार आहे. अलीकडे दगडी कोळशापासून कृत्रिम रीतीनें तेल बनवण्यांत येतें, पण त्यास निसर्गजन्य तेलाची बरोबरी अर्थातच करतां येत नाहीं, आणि शिवाय, कोळसा हा एक निसर्गाचाच ठेवा आहे. ज्याप्रमाणें युद्धांत त्याचप्रमाणें शांततेच्या परिस्थितींत राकेल तेलाच्या पुरवठ्याचा प्रश्न आधुनिक मानवी राहाणीच्या दृष्टीनें जिव्हाळ्याचा आहे आणि ह्या जिनसाचा साठा वाटेल तेथें हुकमी रीतीनें सापडत नसल्यानें त्यास अपूर्व स्थान प्राप्त झालें आहे. कित्येक प्रदेशांत पिण्याचें व शेतीच्या उपयोगाचें पाणीहि जमिनींत सापडण्याची मारामार असते, आणि राकेलची वाटणी तर निसर्गानें अत्यंत असमान रीतीनें करून ठेवली आहे. जगांतील विशिष्ट भागांतच जमीनींत तेलाच्या विहिरी खणतां येणें शक्य आहे; इतरत्र त्यांचा पूर्ण अभाव आहे. सध्या हिंदुस्थानांत रॉकेलच्या पुरवठ्याची अडचण भासत आहे, ती ह्या चमत्कारिक नैसर्गिक वाटणीमुळेंच होय. ह्या देशांत कोळसा आहे, पण राकेल नाहीं; तें बाहेरून यावें लागतें. धान्य व कापड ह्यांच्या वाटणीपेक्षा राकेलच्या वाटणीचा प्रश्न जरा निराळ्या स्वरूपाचा का आहे हें यावरून दिसेल. राकेलच्या बाबतींत हिंदुस्थान परावलंबी आहे.

तेलाच्या पुरवठ्याचें जागतिक पुनर्घटनेंत स्थान

युद्धोत्तर काळांत धान्य, यंत्रें, चलन इत्यादि आर्थिक साधनसामुग्रीचा पुरवठा जगामध्यें समाधानकारक रीतीनें व्हावा ह्या विषयीं योजना आखल्या जात असतांना राकेलच्या जागतिक वाटणीचा प्रश्न हातीं घेऊन तो सोडवण्याचा प्रश्न इंग्लंड व अमेरिका ह्या राष्ट्रांनीं पुढाकार घेऊन सोडवण्याचा उपक्रम कराव हें सहाजिक आहे. राकेल तेलाचा युद्धाशीं व संरक्षणाशीं निकट संबंध येत असल्यानें त्या देशांतील राष्ट्रीय सरकारांनीं त्याच्या पुरवठ्यावर जरूर तें स्वतःचें वर्चस्व स्थापण्याची खबरदारी अगोदरच घेतली आहे. युद्धानंतर जगांतील राष्ट्रांस राकेल लागेल त्याच्या वाटणीच्या संबंधांत स्पर्धा उत्पन्न होईल आणि तीमध्यें राजकीय व आर्थिक प्रश्नांची गुंतागुंत होईल. हा घोटाळा वाचवण्याच्या हेतूनें इंग्लंड व अमेरिका ह्यांनीं सौदी अरेबिया, इराक व इराण ह्या देशांत राकेलचे साठे व खाणी आहेत, त्यांच्या उपयोगाची व्यवस्था लावण्याची एक योजना आपापसांत मान्य केली आहे. ह्या क्षेत्रांत ब्रिटिश व अमेरिकन कंपन्यांनीं स्थानिक सरकारांकडून राकेलचा धंदा करण्याचे परवाने मिळवले आहेत. सध्या इराणमधील तेल एका नळांतून भूमध्य समुद्रावर हैफा ह्या बंदरापर्यंत नेलें जातें आणि तेथून त्याची जगांत वाटणी होते. अमेरिकेच्या मालकीच्या असा एक नळ सौदी अरेबियांतून भूमध्य समुद्रापर्यंत टाकण्यांत यावा अशा योजनेची चर्चा आज कित्येक महिने चालली होती. अमेरिका खंडांत वेनिझुएला, कोलंबिया, मेक्सिको वगैरे देशांत राकेल तेलाच्या उत्पादनाचें एक मोठें क्षेत्र आहे आणि मित्रराष्ट्रांस युद्धांत लागणारें बरेंचसें तेल त्यामधून पुरवलें जात आहे. दुसरें मोठें क्षेत्र कॅस्पियनपासून तांबड्या समुद्रापर्यंत पसरलें आहे. त्यांत तेलाचा प्रचंड संचय आहे, पण त्यांतला थोडाच भाग बाहेर आला आहे. ह्या क्षेत्रांत ब्रिटिश कंपन्या व सरकार ह्यांचें प्राबल्य आहे. अमेरिकन कंपन्यांस त्यांत योग्य हिस्सा मिळवण्याची इच्छा होऊन त्यांनीं आपल्या सरकारास सौदी अरेबियांतील तेलाचा नळ भूमध्य समुद्राच्या किनाऱ्यावर नेऊन सोडण्याच्या योजनेंत भाग घेण्यास उद्युक्त केलें आहे. इंग्लंड व अमेरिका ह्यांच्या दरम्यान आतां जो करार होत आहे त्यांत ह्या दोन राष्ट्रांच्या हितसंबंधांच्या रक्षणाची तरतूद आहे आणि त्याचबरोबर इतर देशांस राकेल योग्य भावानें आणि सरळ रीतीनें मिळण्याची व्यवस्था केली जाणार आहे. तेलाच्या पुरवठ्यावरील वर्चस्व हें राजकीय व आर्थिक प्राबल्याचें एक अंग आहे आणि जागतिक पुनर्घटनेंत त्याचें मोठें महत्त्व आहे.

रिझर्व्ह बँकेचा उत्पन्न-खर्च व भागीदारांचें डिव्हिडंड

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाला जून, १९४४ अखेर संपलेल्या वर्षी १२,००,४२,७९७ रुपये ठोक उत्पन्न झालें. गेल्या वर्षांतील उत्पन्न-खर्चाचे तुलनात्मक आकडे खाली दिले आहेत:—

	३० जून १९४२ अखेर	३० जून १९४३ अखेर	३० जून १९४४ अखेर
ठोक	रु.	रु.	रु.
उत्पन्न	४,५६,४४,५११	९,१९,१९,३७५	१२,००,४२,७९७
खर्च	१,१४,९०,८३०	१,४९,३८,६३५	१,७३,८४,९८७
नि. नफा	३,४१,५३,६८१	७,६९,८०,७४०	१०,२६,५७,८१०

बँकेचें उत्पन्न व नफा वाढण्याचें प्रमुख कारण तिचेजवळील व्याज देणाऱ्या कर्जरोख्यांत झालेली वाढ, हें होय. रिझर्व्ह बँकेचा नफा वाढला, तरी भागीदारांच्या वाट्यास त्याचा फारच लहान अंश येतो. १९४१-४२ अखेरपर्यंत भागीदारांस २½% डिव्हिडंड मिळत आलें आहे व त्यासाठी दरसाल १७½ लक्ष रुपये लागत. चलनविस्तारामुळें बँकेचा नफा कल्पनातीत वाढला, तेव्हां हिंदुस्थान सरकारनें नफावाटणीवर बंधन घालून ४% ची कमाल मर्यादा ठरवून दिली. तिला अनुसरून १९४२-४३ चें ४%, व १९४३-४४ चें ४% डिव्हिडंड भागीदारांस मिळालें आहे. ह्या जादा ½% डिव्हिडंडसाठी २½ लक्ष रुपये पुरतात. म्हणजे, १९४३-४४ च्या १०½ कोटि रुपयांच्या निव्वळ नफ्यापैकी २० लक्ष रुपये भागीदारांस मिळाले. एकूण नफ्याच्या २% इतकी

रकमहि त्यांच्या वाट्यास आली नाही. मध्यवर्ती सरकारास १० कोटि, ६१ लक्ष रुपये मिळाले. त्या पूर्वीच्या वर्षी सरकारास ७ कोटि, ५० लक्ष रुपये मिळाले होते व त्याच्याहि पूर्वीच्या साली सरकारचे वाट्यास ३ कोटि, २४ लक्ष रुपये आले होते.

हिंदी धंद्यांचें भवितव्य

युद्धसामुग्री राहेरून येणें कठीण झाल्याकारणानें हिंदुस्थानांत शक्य तेवढ्या प्रमाणांत तिचें उत्पादन करणें प्राप्त झालें आणि ह्या योगानें कित्येक जुन्या कारखान्यांचा विस्तार झाला व कांहीं नव्यानेंच अस्तित्वांत आले. ह्या औद्योगिक प्रगतीवरून इंग्लंड व अमेरिका ह्या देशांत तेथील धंदेवाल्यांनीं असें अनुमान काढलें आहेसें दिसतें कीं युद्धसमाप्तीनंतर मामुली जातींचा परदेशी माल हिंदी बाजारपेठांत खपण्यास वाव रहाणार नाहीं आणि त्यांस नवीन प्रकारांचे जिन्नस बनवावे लागतील व नवीन विक्रीचीं क्षेत्रें शोधणें भाग पडेल. पण ह्या समजुतींत अतिशयोक्तीचा भाग पुष्कळ आहे. स्वदेशी धंद्यांची अशी कांहीं प्रचंड प्रगति ह्या देशांत झालेली नाहीं कीं त्यांच्या स्पर्धेस अमेरिकन व ब्रिटिश धंदेवाल्यांनीं भ्यावें. उलट, हिंदी धंद्यांच्या भवितव्यासंबंधानें येथील कारखानदार साशंक आहेत. ह्या विषयींच्या खऱ्या स्थितीची कल्पना सर होमी मोदी ह्यांनीं एका मुलाखतींत नुकतीच करून दिली तिचेकडे लक्ष वेधणें आवश्यक आहे. युद्धपरिस्थितीमुळें विस्तारलेले किंवा उदयास आलेले हिंदी धंदे शांततेच्या काळांत कितपत तग धरतील ह्याची शंका त्यांनीं व्यक्त केली आणि नवीन व मूलग्राही धंद्यांच्या उत्कर्षास लागणारी यंत्रसामुग्री मिळण्याची अडचण पडेल अशी भीति प्रदर्शित केली. कांहीं वर्षांनीं हिंदी धंदे मोठ्या प्रमाणांत विस्तार पावतील आणि मग पाश्चात्य कारखानदारांस नवीं औद्योगिक क्षेत्रें पहावीं लागतील असेंहि ते म्हणाले. ह्याच आशयाचा अभिप्राय सर जॉन मथाय ह्यांनीं व्यक्त केला आहे.

युद्धोत्तर औद्योगिक घटनेच्या योजना

युद्धसमाप्तीनंतर हिंदुस्थानांतल्या जुन्या व नव्या उद्योगधंद्यांस परराष्ट्रीय मालाची स्पर्धा सोसावी लागेल आणि तीमध्यें त्यांचा टिकाव कसा लागेल ह्याची चिंता येथील धंदेवाल्यांस लागणें स्वाभाविक आहे. मध्यवर्ती सरकारचे व्यापार मंत्री, सर अझीझुल हक, ह्यांस कलकत्त्याच्या हिंदी व्यापार मंडळाच्या सभेंत ह्यासंबंधांत प्रश्न विचारला असतां त्यांनीं आश्वासनात्मक उत्तर दिलें. स्वदेशी धंद्यांच्या वाढीचें व स्वास्थ्याचें महत्त्व सरकारास अवगत असून परदेशी मालाच्या आयातीचे परवाने केवळ सहा महिन्यांच्या मुदतीपुरते देण्यांत येतात आणि दर वेळस आयात व्यापाराचा देशी मालावर होणारा परिणाम लक्षांत घेतला जाऊन त्यांची व्यवस्था होत असते असें त्यांनीं सांगितलें. नेहमींच्या लोकोपयोगी जिनसांचा देशांतील पुरवठा, त्यास असलेली मागणी, स्वदेशी माल उपलब्ध होण्याची शक्यता, जहाजांच्या वहातुकीची सोय इत्यादि बाबी हिशेबांत घेऊन सरकार बाहेरून जिन्नस आणण्यास परवाने देतें आणि ह्यामुळें हिंदी उद्योगधंद्यांच्या हितसंबंधांची अनास्था होण्याची भीति नाहीं असें स्पष्टीकरण त्यांनीं केलें. हिंदी कारखानदार आणि धंदेवाले ह्यांच्या युद्धोत्तर गरजांविषयींची माहिती सरकारनें मागितली आहे, पण ती न पुरवण्यांत आल्याची तक्रार सर अझीझुल हक ह्यांनीं केली. सरकारनें एक खास योजना-अधिकारी नेमला असून धंदेवाल्यांकडून माहिती गोळा करण्याचें काम त्याचेकडे सोंपवण्यांत आलें असल्याचें त्यांनीं सांगितलें. हिंदी धंदेवाल्यांच्या युद्धोत्तर योजना व गरजा आणि सरकारचे नियोजक अधिकारी व समित्या ह्यांचा मेळ बसणें अगत्याचें आहे. असें न झाल्यास राष्ट्रीय योजनात्मक घोरण निष्फळ ठरेल.

(Consent of Central Government has been obtained to this issue under Defence of India rule 94 A. It must be distinctly understood that in giving this consent, the Government of India do not take any responsibility for financial soundness of any scheme or the correctness of any of the statements made or opinions expressed with regard to them.)

प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक लि.

प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग, पुणें.

मुंबई शाखा : इस्माईल बिल्डिंग, फोर्ट मुंबई.

अधिकृत व विकीस काढलेलें भांडवल	रु. १०,००,०००
विकी झालेलें भांडवल	रु. ४,७८,४००
जमा झालेलें भांडवल	रु. १,६४,४३५
एकूण खेळतें भांडवल	रु. ३०,००,००० वर

शेअर-विक्री चालू आहे

★ बँकेनें गतवर्षी कर माफ ४ टक्के डिव्हिडंड वांटलें आहे.

★ प्रत्येक शेअर रु. १०० चा असून त्यांपैकीं बँक तूर्त फक्त रु. ५० च मागाविणार आहे व शुरलेली रक्कम बँकिंग कंपन्यांच्या सर्वसाधारण शिरस्त्याप्रमाणें 'रिझर्व्ह लायेबिलिटी' म्हणून राखून ठेवणार आहे.

अर्जाबरोबर प्रत्येक शेअरमागें रु. १५ व अर्जमंजुरीनंतर रु. ३५ भरावयाचे आहेत.

शेअर घेऊं इच्छिणारांनीं शेअरअर्जाबरोबर दर शेअरमागें रु. ५० अेकदम पाठविणें सोयीचें आहे.

संचालक-मंडळ

श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष | श्री. दा. ग. बापट, उपाध्यक्ष
„ ग. उ. चितळे | „ श्री. म. जोशी
„ एल. आर. घडफळे | „ स. के. भावे
„ डब्ल्यू. पी. वैद्य | „ चिं. त्रिं. चितळे
„ एस. जी. केणी, व्यापारी, मुंबई (खातेदारांतर्फे डायरेक्टर)

शेअर अर्जाचा नमुना मागवा.

गो. धों. जोगळेकर, बी. कॉम. अेलअेल. बी., मॅनेजर.
चिं. त्रिं. चितळे, मॅनेजिंग डायरेक्टर.

दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँकेची अभिनंदनीय कामगिरी

दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँकेची स्थापना नोव्हेंबर १९३६ साली झाली. बँकेचा हेतु निरनिराळ्या उद्योगधंद्यांना, व्यापारी मंडळींना मदत करण्याचा असून बँकेनें आजवर पुष्कळ संस्था व व्यापारी मंडळी यांना वेळोवेळीं भांडवल देऊन सहाय्य केलें आहे. बँकेची प्रगति थोड्या अवधींत चांगली होत असून बँकेनें १९४१ साली स्वतःची इमारत खरेदी करून बँकेला चांगलेंच स्थैर्य प्राप्त करून दिलें आहे. विशेष महत्त्वाची गोष्ट म्हणजे बँकेनें कॉमनवेल्थ विमा कंपनीस १९४३ त भक्कम मदत करून ती संस्था महाराष्ट्रीयांच्या ताब्यांत राखण्याचें श्रेय घेतलें. तसेंच कॅनरा पल्प ॲन्ड पेपर मिल्स, पैसाफंड वगैरे पुष्कळ संस्थांना मदत करून हे कारखाने भरभराटीला आणण्याचें श्रेय घेतलें आहे. बँकेच्या चालकांचा वर उल्लेख केल्याप्रमाणें स्तुत्य हेतु व उपक्रम चालू आहे. गेले वर्षी बँकेचें विकलेलें भांडवल ३,०३, ३०० रु. असून जमा भांडवल १,०१, २९५ रु. होतें तें यंदाचे सालीं अनुक्रमें विकलेलें भांडवल ५ ऑगस्ट १९४४ पर्यंत ४,७८,४०० रु. व जमा भांडवल १,६४,४३५ रु. झालेलें आहे. गेले सालीं एकूण खेळतें भांडवल १९,९१,७००रु. होतें तें आज रु. ३०,००,००० रु. झालेलें आहे. शिवाय बँकेनें गेले सालीं कर माफ डिव्हिडंड शें. ४ टके वाटलेलें आहे.' अशा तऱ्हेनें बँकेची उत्तरोत्तर भरभराट होत आहे. नुकतीच एप्रिल १९४४ त बँकेनें इस्माइल बिल्डिंग फोर्ट मुंबई येथें एक शाखा काढली असून तेथील कामहि समाधानकारक आहे. बँकेनें तेथें ॲडव्हायसरी कमिटी नेमली असून

१ श्री. जी. ए. कुलकर्णी, २ श्री. व्ही. जी. गांगल
३ श्री. बी. एच. गुंडेरिया ४ श्री. एम. एम. गद्रे
५ श्री. एल. एम. जोशी आणि

ब्रँच एजंट श्री. जोग गो. ह. अशी मंडळी असून तेथील कारभार त्यांचे सल्ल्यानें चालत आहे. बँकेचे चेअरमन श्री. ग. रा. साठे, प्रोप्रायटर साठे बिस्किटस, हे असून व्हा. चेअरमन श्री. दा. ग. बापट हे आहेत. मॅनेजिंग डायरेक्टर श्री. चिं. त्रिं. चितळे हे असून हे एक तडफदार, उद्योगधंद्याची आवड असणारे, अत्यंत मनमिळाऊ असे गृहस्थ लाभले आहेत. त्यांनीं बोर्डाचे मदतीनें या बँकेस जी ऊर्जितावस्था प्राप्त करून दिली आहे त्यावरून महाराष्ट्रीयांनाही व्यापारांत किती मानाचें स्थान प्राप्त करून घेतां येईल हें सिद्ध झालें आहे.

शिवाय श्री. एस. एम. जोशी, श्री. स. के. भावे, श्री. ग. उ. चितळे, श्री. घडफळे, श्री. व्ही. बी. वैद्य, वगैरे मंडळी असून श्री. एस. जी. केणी मुंबई, हे डिपॉझिटर्सतर्फे डायरेक्टर आहेत. शिवाय रा. जी. डी. जोगळेकर यांची मॅनेजर म्हणून नेमणूक झाली आहे. बँकेला हिंदुस्थान सरकारच्या भांडवल नियंत्रण खात्याकडून रु. १०,००,००० अधिकृत भांडवल विकण्याची परवानगी मिळाली आहे. बँकेच्या शेअर भांडवलांत व खेळत्या भांडवलांत सारखी वाढ होत आहे.

मध्यवर्ती सरकारच्या भांडवल नियंत्रण अधिकाऱ्याकडून भाग विकण्यास अनुज्ञा मिळाल्यानें भागविक्री झपाट्यानें सुरू झाली असून त्याचा सर्वांनीं अवश्य फायदा घ्यावा असें आम्ही सुचवितों.

टाटा केमिकल्स लि.

मिठापूरचें रूपांतर

मिठापूर येथील टाटा केमिकल्स लि. ची मूळ योजना टाटांच्या सांगण्यावरून श्री. कपिलराम हरदेवराम वकील यांनीं आखली. मि. जे. ए. रीव्हेल यांच्या अध्यक्षत्वाखालील एका ब्रिटिश तज्ञांच्या मंडळानें या योजनेची तपशीलवार छाननी करून आपला अहवाल १९३७ मध्यें सादर केला व त्यास अनुसरून टाटांनीं रासायनिक धंद्याची ही मुहूर्तमेढ रोवली. कारखान्याच्या स्थापनेस मिठापूर (बडोदें संस्थानांतील ओखामंडळ जिल्ह्यांतील काठेवाडच्या टोकाचें ठिकाण) हें केंद्र मुकर करण्यांत आलें. टाटांनीं ओखा सॉल्ट वर्क्स मिळवून फेब्रुवारी १९३९ मध्यें मेसर्स टाटा केमिकल्स लि. ही कंपनी नोंदविली. जूनमध्यें जर्मनी, फ्रान्स, ब्रेटन्‌ब्रिटन, स्वीडन, स्वित्सरलंड आणि अमेरिका या देशांतून यंत्रसामुग्री मागविली. परंतु युद्ध उपस्थित झाल्याकारणानें वेळापत्रक चुकलें. श्री. कपिलराम वकील हे विमानमार्गें अमेरिकेस स्वतः गेले. वहातुकीमधील बुडण्याच्या धोक्यामुळें कित्येक माल हिंदुस्थानांत दाखल होण्यापूर्वी दोनदां, तीनदां ऑर्डर करावा लागला. मिठापूरच्या वाळवंटाचें आतां मोठ्या औद्योगिक शहरांत रूपांतर झालें आहे. मूलग्राही रसायनांचें उत्पादन मूळ योजनेप्रमाणें मोठ्या प्रमाणावर होऊं लागल्यावर कारखान्याची वाढ करण्याची योजना आजच तयार आहे. रंग, खतें, औषधें, कांच, इत्यादींच्या उत्पादनास आवश्यक अशीं रसायनें निर्माण करणारी टाटा केमिकल्स कंपनी आपल्या क्षेत्रांत टाटा आयर्न ॲंड स्टील कंपनीची बरोबरी लवकरच करूं लागेल.

युद्ध संपलें तरी रेशनिंग ताबडतोब संपणार नाहीं.

युद्धसमाप्तिनंतरहि एक दोन वर्षे रेशनिंग चालू रहाण्याचा संभव आहे, असें मत प्रांतिक रेशनिंग अधिकारी, श्री. समर्थ, यांनीं नुकतेंच व्यक्त केलें.

पाहिजेत

अकौन्टन्ट व सुपरवायझर असे दोन इसम नेमणेचे आहेत.

अकौन्टन्ट:—जी. डी. सी. अगर को-ऑपरेटिव्ह सेक्रेटरीची परीक्षा पास असून सेल परचेस युनियनमध्यें काम करीत असलेला अनुभवी अथवा व्यापारी हिशेबाची पूर्ण माहिती असून इंग्रजी जाणणारा अशांनीं सोसायटीचे पत्त्यावर अर्ज पगाराचे अटीसह ता. ३१।८।४४ चे आंत पाठवावेत.

सुपरवायझर:—सोसायटीचीं दुकानें तपासणी करण्यास इंटर-आर्ट्स, को-ऑपरेटिव्ह डिप्लोमा होल्डर अगर सुपरवायझिंग युनियनमध्यें काम करीत असणारा सुपरवायझर किंवा सिनिअर ग्रूप सेक्रेटरी अशांनीं सोसायटीचे पत्त्यावर अर्ज पगाराचे अटीसह ता. ३१।८।४४ चे आंत पाठवावेत.

R. T. ZUNJARRAO,
चेअरमन,
धी मुरबाड तालुका सहकारी खरेदी-विक्री युनियन लि.
मुरबाड, जि. ठाणें.

जिकडे तिकडे प्रशंसा

इमिटेशन दागिन्यांवर रासायनिक क्रिया करून सन्या सोन्याचा पत्रा चढविला जातो त्यामुळें दागिना केव्हांही खराब होत नाहीं, ही पूर्ण खात्री झाली. सोन्याचा पत्रा चढविलेल्या चार बांगड्या कि. आठ ह. गरजेलव दागिना परत करणें झाल्यास वर चढविलेल्या सोन्याचे सर्वच्या सर्व पैसे परत देऊं.

मट कं. सांगली, S. M. C.

मट कंपनी शाखा—बुधवार पेठ, पुणें २.

सर्व्यांच्या टंचाईच्या काळांत जीवनद्रव्यें कमी पडतात.

जीवनद्रव्यांनीं (Vitamins) युक्त असे

(सप्लाय खात्यानें मान्यता दिलेले)

टोमॅटो केचप (गोड) व

टोमॅटो सॉस [तिखट व आंबट]

आजच मागवा व जीवनद्रव्यांची वाटणारी उणीव भरून काढा.

रुरल प्रॉडक्टस कंपनी लि. पुणें

बिझिनेस ऑफिस: ९१३ अ सदाशिव, पुणें २.

तुमच्या आवडींत व ऐपतींत प्रसिद्धीचें प्रभावी साधन

कॅलेंडर्स

(१९४५)

नवीन आकर्षक चित्रांचा आल्बम तयार होत आहे.—

प्रमुख ठिकाणीं एजंटस नेमणें आहेत.

दि आर्ट कॅलेंडर्स लि.

१५ बुधवार पेठ, पुणें २

पुण्यांतील

आदर्श निवासस्थान व भोजनालय

छाया लॉजिंग व बोर्डिंग हाऊस

बुधवार चौक, पुणें २.

प्रगतिपथावरील नवा

मै ला चा — द ग ड

सन १९४३ अखेर

नव्या कामांत	११० टक्के वाढ
चालू कामांत	१०० टक्के वाढ
आयुर्विमानिधींत	८० टक्के वाढ

— आपला विमा किंवा एजन्सी आजच घ्या —

दि औंध म्यूच्युअल लाइफ ॲश्युरन्स सोसायटी लि., पुणें.

आर. जी. साठे, सुपरिंटेंडेंट

व्ही. जी. जोशी, मॅनेजिंग डायरेक्टर

JUST PUBLISHED

INDIAN RURAL PROBLEM

BY

Sir Manilal Nanavati and Prof. J. J. Anjaria.

(Issued by the Indian Society of Agricultural Economics, Bombay).

Price Rs. 8

(Postage extra).

Sole Selling Agents :—

THE CO-OPERATORS' BOOK DEPOT.

9, BAKEHOUSE LANE,
FORT, BOMBAY.

Telephone 779

TELEGRAM Guest House Poona 2.

पुना गेस्ट हाऊस

१००, लक्ष्मी रोड, पुणें २.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' भांबुर्डा, घ. नं. १२७११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
(टपाल खेरीज माफ)
किरकोळ अंकास
दोन आणे.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष १० पुणें, बुधवार, तारीख २३ ऑगस्ट, १९४४ अंक ३४

कांहो धुंडितां देऊळी ?
देव हृदयाच्या राउळी !

* * * *

पांडुरंग पंढरपुरांत नसून तो भक्ताच्या हृदयांत असतो हेंच सांवतानें सांगितलें !

व्ही. शांताराम आणि राजकमल यांची दुसरी कलाकृति

प्रोडयूसरः—
व्ही. शांताराम.
दिग्दर्शकः—
केशवराव दाते.

भक्तीचा मळा (माली)

भूमिकाः— ● मास्तर कृष्णराव ● बेबी नलिनी ● अमीर कर्नाटकी ● अर्मीना ● सामंत ● राजा पंडित

—: ३ रा आठवडा ! :—

डेक्कन—रोज ४, ७, १० तिन्ही खेळ मराठी

अपॉलोमध्यें दररोज फक्त १ च खेळ रात्रौ ११ वा. मराठी बोलपट भक्तीचा मळा

सकाळीं १० ते १२ डेक्कनमध्यें वरच्या दर्जाचीं तिकिटें अगाऊ रिझर्व्ह केलीं जातील. —कॉम्प्लिमेंटरी व फ्री पास अनिवार्य बंद.—

गिरगांव मुंबई नं. ४

महिंद्रकर ब्रदर्स
तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

संकलनात्मक अभिनव मासिक

महाद्वार

ऑगस्ट अंकांत

श्री. शं. ता. किर्लोस्कर यांचा परिचय, अमेरिकन माणसाच्या चष्म्यांतून, बगदाद शहरांत इ. सुंदर लेख, गोष्टी, कविता व बहारीचें संकलित साहित्य !

वार्षिक वर्गणी रु. ६ पाठवून आजच वर्गणीदार व्हा !

किरकोळ अंक दहा आणे

—: महाद्वार कार्यालय, कोल्हापूर :—

जाहिरात

दि कराड अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., कराड

भागीदारांस नोटीस

बँकेच्या भागीदारांची सत्ताविसावी वार्षिक सधारण सभा रविवार तारीख १०-९-१९४४ रोजी सकाळीं ९ वाजतां बँकेच्या इमारतींत भरणार आहे. त्यावेळीं, बँकेचा सन १९४३।४४ सालचा अहवाल व ताळेबंद मंजूर करणें, नियमाप्रमाणें डायरेक्टर्सची निवडणूक, अध्यक्ष व व्हाइस चेअरमन यांची निवडणूक, पोट-नियम दुरुस्ती वगैरे कामें केलीं जातील.

डायरेक्टर्सच्या निवडणुकीबाबत मत-नोंदणीची वेळ सकाळीं ९-३० ते १-३० अशी आहे.

तरी सदर वेळीं सभासदांनीं येण्याचें करावें अशी विनंति आहे.

म. वि. खंडकर,
मॅनेजिंग डायरेक्टर

कराड, ता. १९।८।४४.

विविध माहिती

ब्रिटिश मोटारींच्या निर्गतीची पूर्व तयारी

ब्रिटिश मोटारीच्या धंद्याच्या प्रातिनिधिक संस्थेनें केपटौन, मुंबई, ओटावा, वेलिंग्टन व सिडने येथें आपल्या कचेऱ्या उघडल्या आहेत. इजित, पॅलेस्टाइन, सिरिया, इराक, इराण, इत्यादि देशांसाठी कैरो येथें एक कचेरी लवकरच स्थापन केली जाईल. युद्धसमाप्तीनंतर ह्या देशांत बऱ्याच मोठ्या घडामोडी होणार आहेत, अशी अपेक्षा आहे. युद्ध संपतांच ब्रिटिश निर्गतीस तात्काळ प्रारंभ व्हावा, अशी तयारी चालू आहे.

शेती आधी, कीं कारखाने आधी !

नॅशनल बँक ऑफ इंडिया लि. ची वार्षिक सभा लंडन येथें नुकतीच भरली होती, त्यावेळीं बँकेचे अध्यक्ष, मि. लँगफर्ड जेम्स ह म्हणाले,— "हिंदी औद्योगिक प्रगतीस विस्तृत नियोजनानें आणली गति याची काय, हा मतभेदाचा प्रश्न आहे. तथापि इतर सर्व नियोजनापेक्षा शेतीच्या विस्ताराचें अगत्य जास्त आहे व धान्य परिस्थिति कायमची सुधारेल अशी व्यवस्था अगोदर झाली पाहिजे, हें उघड आहे. नवीन धंदे व कारखाने काढणें श्रेयस्कर असलें तरी त्यांत काम करण्यासाठी सशक्त व सकस मजुरांचा पुरेसा पुरवठा नसेल, तर उपयोग काय ?"

हुंड्याच्या लालसेनें लक्षाधीशाच्या पुत्राचें दुष्कृत्य

पाल आणि दयावती झांचा मेल्या १ ऑक्टोबरमध्यें विवाह झाला. पाल आणि त्याच्या कुटुंबांतील लोक हे पत्नीच्या हुंड्यावर संतुष्ट नव्हते. दयावतीच्या आईबापांनीं पालला रेडिओसेट घेण्यासाठी ९०० रुपये द्यावेत, अशी त्यांची मागणी होती. हुंड्यांत रेडिओसेट मिळाला नाहीं, म्हणून पालची त्याचे मित्र कुचेष्टा करीत असत. "माझे आईबाप श्रीमान् नसले, तरी पुढच्या सणाचे वेळीं ते कांहींतरी बक्षीस देतील," असें दयावती म्हणे. पाल एवढ्यानें संतुष्ट झाला नाहीं व " मी तुझ्यापेक्षा चांगल्या दिसणाऱ्या आधुनिक तरुणीशीं विवाह करीन " असें म्हणून तो दयावतीस त्रास देऊं लागला. १२ नोव्हेंबर रोजीं सकाळीं त्यांना विमानाची घरघर ऐकूं आली व विमान बघण्यासाठी पालनें दयावतीस घराच्या छपरावर नेलें. विमान बघण्यासाठी ती डोळे ताणून बघत असतां पालनें तिला ढकललें तशी ती खाली पडली व तिला जबर दुखापत झाली. तिला इस्पितळांत पोचविण्यांत आलें. पोलिसांना ही हकीकत कळली परंतु मध्यंतरी पाल बेपत्ता झाला. कांहीं दिवसांना तो पोलिसास आपण होऊन स्वाधीन झाला व त्यास ७ वर्षे सक्तमजुरी व १० हजार रुपये दंड अशी दयावतीच्या खुनाचे प्रयत्नाबद्दल लुधियाना कोर्टांत शिक्षा झाली. लाहोर हायकोर्टानें सर्व गोष्टी विचारांत घेऊन ती शिक्षा ३ वर्षे कारागृहवास व २ हजार रुपये दंड अशी उतरविण्यांत आली. हा दंड वसूल झाल्यास निम्मी रक्कम दयावतीस द्यावी, असें हायकोर्टानें सांगितलें. आरोपी बिपिनचंद्र पाल हा एका लक्षाधीशाचा मुलगा आहे. सध्या मध्यम वर्गीय लोकांतील तरुण लोक भरमसाट हुंडा मागतात व तो मिळाला नाहीं म्हणजे त्यांची सारखी तकार चालू असते, ही गोष्ट नजरेआड करतां येत नाहीं, असें न्यायमूर्तीनें उद्गार काढले.

कामगारांचा काळा बाजार थांबविणार

कांहीं लोक आपल्या नोकरांना खासगी कामांसाठी जास्त पगार देऊं करतात, त्यामुळें पब्लिक वर्क्स खातें, लष्करी खातें, रेल्वेज, पोर्ट ट्रस्ट, इत्यादींच्या कामांत आडथळा येतो, असें सिंधमध्यें आढळून आलें आहे. त्याकरितां सिंध प्रांताच्या लेबर सप्लाय कमिटीनें कामगारांच्या वेतनाचे कमाल दर ठरवून टाकले आहेत.

दुधाचें उत्पादन वाढविण्याची आवश्यकता

हिंदुस्थानांत दरसाल ८० कोटि मण दूध निघतें. अमेरिकेखेरीज दुसऱ्या कोणत्याहि देशांत इतकें दूध निघत नाहीं. असें असूनहि, अमेरिकेंत प्रत्येक माणसाचे वांट्यास दररोज ३५ औंस दूध येतें; हिंदुस्थानांत तें ७ औंसच फक्त येतें. हिंदुस्थानांतील दुधाचें उत्पादन लक्षांत घेतां, दर जनावर सालिना ६२५ पौंड दूध देतें, असा हिशोब होतो. कॅनडा, अमेरिका, इंग्लंड, इत्यादि ठिकाणीं हें प्रमाण ३,५०० ते ४००० पौंड आहे. डेन्मार्कमध्यें प्रत्येक गाय सरासरीनें ८,००० पौंड दूध देतें. हिंदुस्थानांतील गाईम्हशींची संख्या तिप्पट केली, तर येथील जनतेस कमींत कमी आवश्यक दूध पुरूं शकेल. परंतु सध्यांच्या जनावरांसच पुरेसा चारा मिळूं शकत नाहीं, तर तिप्पट जनावरांना पोटभर खावयास कोठून मिळणार ? जनावरास लागणारें अन्न ज्यास्त पैदास केलें पाहिजे व आहेत तितक्याच जनावरांपासून अधिक दूध मिळण्याची शक्यता निर्माण केली पाहिजे; नुसतीं दुभतीं जनावरें वाढवून भागणार नाहीं.

अनुक्रमणिका

	पृष्ठ
१ विविध माहिती	... २६६
२ खेडेगांवी जीवन सुधारण्याची योजना	... २६७
३ मोर स्टेट बँक लि.	... २६८
४ स्फुट विचार	... २६९
विश्वविद्यालयांचें ध्येय—शिक्षण आणि व्यावहारिक जीवन—हिंदी रेल्वेजचें वाढतें उत्पन्न—सर्व आघाड्यांवर शत्रूची पीछेहाट—धंदेवाले, शास्त्रीय संशोधन व मुं. विश्वविद्यालय—बँक ऑफ सिटिझन्स लि.	
५ इंपीरिअल केमिकल इंडस्ट्रीज	... २७१

अर्थ

बुधवार, ता. २३ ऑगस्ट, १९४४

खेडेगावी जीवन सुधारण्याची मुंबई सरकारची युद्धोत्तर योजना

मुंबई प्रांताच्या लोकांची आर्थिक स्थिति सुधारावी व त्याबरोबरच युद्धांत भाग घेऊन परत येणाऱ्या सैनिकांची पोटापाण्याची शाश्वत सोय व्हावी, ह्या दृष्टीनें मुंबई सरकारनें युद्धोत्तर योजनेचा एक पंधरा वर्षांचा कार्यक्रम आखला आहे. औद्योगिक प्रगतीचा प्रश्न मध्यवर्ती सरकारच्या नियोजनावरच मुख्यतः अवलंबून असल्यानें, मुंबई सरकारनें आपल्या योजनेंत बिगर-औद्योगिक खेडेगावी सुधारणेकडेच मुख्यतः लक्ष पुरविलेलें आहे. खेडेगावी जीवनामध्यें सर्वांगीण सुधारणा घडवून आणणें हें तिचें उद्दिष्ट आहे व तें नीट साध्य व्हावें, ह्याकरितां पंधरा वर्षांच्या योजनेचे प्रत्येकी पांच वर्षांचें असे तीन भाग करण्यांत आलेले आहेत. सबंद प्रांतामध्यें एकदम सुधारणांस प्रारंभ करणें अव्यवहार्य असल्याकारणानें, कार्यक्रमाची आखणी करतांना योजनांचें चार गट पाडण्यांत आलेले आहेत. (१) कांहीं योजना तातडीनें अंमलांत आणाव्या लागतील, (२) कांहीं योजनांमध्यें सर्व जिल्ह्यांचा समावेश करून विशेष प्रगतीचें बीज आतांच पेरावें लागेल, (३) कांहीं योजना विशिष्ट परिस्थितीसाठींच असल्यानें त्या विशिष्ट विभागांतच चालू करणें सोईचें होईल व (४) कांहीं ठिकाणीं सर्वांगीण प्रगतीसाठी खास प्रयत्न केले जातील. सर्वांगीण प्रगतीचें काम ज्या क्षेत्रांत हातीं घेण्यांत येईल, तेथील परिस्थिति इतकी सुधारली पाहिजे, कीं आजूबाजूच्या ठिकाणच्या लोकांना हेवा वाटून प्रगतीसाठी प्रयत्न करण्याचा विचार त्यांचे मनांत येऊं लागला पाहिजे, असा हेतु आहे. पहिल्या पांच वर्षांत खालील नऊ जिल्ह्यांतील क्षेत्रांत अशी परिस्थिति निर्माण करण्याचा सरकारचा मानस आहे:—

जिल्हा	तालुके व पेटे
सातारा	सर्व ता.
पुणें	इंदापूर ता., दौंड व शिरूर पे.
सोलापूर	करमाळें, सांगोला, माळशिरस व पंढरपूर ता.
अहमदनगर	नेवासें, कोपरगांव, राहुरी, अहमदनगर, पारनेर व श्रीगोंदे ता. व कर्जत पेटा
कुलाबा	महाड, माणगांव व रोहें ता.
रत्नागिरी	चेंबुर्ला पटासेरीज बाकी सर्व जिल्हा
बेळगांव	सर्व ता.
विजापूर	सर्व ता.
सुरत	सर्व ता.

हे जिल्हे व तालुके निवडतांना (१) सर्व प्रांतभर प्रयोग व्हावा, (२) दुष्काळी, निकृष्ट जमिनीच्या व मागसलेल्या विभागांकडे विशेष लक्ष दिलें जावें आणि (३) रिक्रूट भरतीच्या क्षेत्रांपैकीं कोठलेंहि क्षेत्र वगळलें जाऊं नये, कारण सैनिकासाठी केलेल्या प्रगतीच्या प्रयत्नांचा फायदा त्यांच्या कुटुंबास मिळतो व अशा कुटुंबांची प्रगति झाली म्हणजे सबंध खेडें सुधारतें, अशा तीन मुद्यांवर भर देण्यांत आलेला आहे. ज्या जिल्ह्यांत दरहजारी किमान पांच तरी रिक्रूट भरती झालेली आहे, असे जिल्हे म्हणजे सातारा, पुणें, सोलापूर, अहमदनगर, कुलाबा, रत्नागिरी व बेळगांव हे होत. अहमदनगर, सोलापूर, विजापूर, पुणें, सातारा व धारवाड जिल्ह्यांचा पूर्व भाग हे दुष्काळी मुलूख आहेत. तेव्हां त्या विभागांपैकीं अहमदनगर, सोलापूर, पुणें व सातारा ह्यांस दुष्काळ व रिक्रूट भरतीची संख्या हीं दोन्हीं कारणें लागू पडतात. बाकीच्या विभागांची निवड हीं त्यांच्या दुष्काळी परिस्थितीमुळेंच झालेली आहे.

वर सांगितलेल्या नऊ जिल्ह्यांतील मुलुखांत तात्काळ करावयाच्या प्रगतीसाठी तज्ज्ञ कामगारांचा फार मोठा पुरवठा तयार करावा लागेल. एकट्या शेतकी खात्याच्या कामासाठीच किमान ३,००० वरिष्ट नोकरांची जरूरी भासेल. त्यांची पूर्वतयारी आजपासूनच करावयास हवी, कारण शिकून तयार झालेलीं माणसें एकदम मिळूं शकत नाहींत. पुणें येथील शेतकी कॉलेजांत दरसाल १०० ऐवजी १५० नवे विद्यार्थी घेणें, मांजरी ट्रेनिंग सेंटरमधील डिप्लोमाचे विद्यार्थी वाढविणें, विजापूर व सोलापूर येथें शिक्षण केंद्रें स्थापणें, सहकारी व वैद्यकीय शिक्षणाचीं केंद्रें वाढविणें, इंजिनिअरिंग व विव्ह. ज्यु. टे. इन्स्टिट्यूटमध्यें आणखी विद्यार्थ्यांची सोय करणें, प्राथमिक शिक्षकांच्या शिक्षणाची व्यवस्था वाढविणें, पशुवैद्यकांच्या शिक्षणासाठी आणखी सवलती देणें, इत्यादि मार्गांनीं आघाडीवरचे नेते तयार करून आर्थिक उद्धाराची पूर्वतयारी आजपासूनच करावयाची आहे.

आर्थिक उद्धाराच्या योजना हातीं घेण्यासाठी लागणारा नोकरवर्ग शिकून तयार करण्याचें काम पुरें झाल्यावर, पुढील सुधारणेस उपयोगी पडतील अशा मूलभूत योजना हातीं घेणें ही पुढची पायरी आहे. शेतीविषयक उपक्रमांस, अर्थातच, त्यांत प्राधान्य दिलेलें आहे. सबंद प्रांत जाण्यायेण्यास खुला करण्यासाठी वाहतुकीचे मार्ग तयार करण्याचें महत्त्व ह्यासंबंधांत विशेषत्वानें सांगितलेलें आहे. पहिल्या पांच वर्षांत रस्ते बांधणीवर १४½ कोटि रुपये खर्च करण्याचें मुंबई सरकारनें योजिलें असून यापुढील दहा वर्षांत त्यांवर २९½ कोटि रुपये खर्च व्हावयाचे आहेत. कांहीं रस्त्यांची रुंदी वाढविण्याची योजनाहि त्यांत अंतर्भूत आहे. सध्याच्या व नियोजित रस्त्यांच्या लांबींतील फरकावरून ह्यासंबंधांतील घडाडीची कल्पना येईल:—

	सध्याचे रस्ते (मैल)	नवे रस्ते (मैल)
राष्ट्रीय महत्त्वाचे	२,७००	.....
प्रांतिक	२,५००	३,१००
जिल्ह्यांतील महत्त्वाचे	३,०००	३,०००
जिल्ह्यांतील (दुय्यम)	२,२५०	७,७५०
खेडेगावी	(माहिती नाहीं)	१४,४०० (नवे-जुने मिळून)

शेतीविषयक कार्यक्रमांत संशोधनास मानाचें स्थान आहे. गहूं, बाजरी, तांदूळ, ज्वारी, इत्यादींमध्यें सुधारणा घडवून आणण्याचें दृष्टीनें संशोधन चालविण्याकरितां १९ संशोधन केंद्रें स्थापण्यांत येणार आहेत. पिकांवरील रोगांच्या प्रतिबंधाचाहि विचार केला जाईल. संशोधनाचा फायदा खेड्यापाड्यांपर्यंत पोचावा, ह्यासाठी प्रचारहि हातीं घ्यावा लागेल.

ॲग्रिकल्चरल डेटर्स रिलीफ ॲक्ट सध्या १६ तालुक्यांस व पेट्यांस लागू आहे तो पुढें सर्व प्रांतास लागू करण्यांत येईल व ४२ नवीं बोर्डे लवकरच स्थापन केलीं जातील. वर निर्दिष्ट केलेल्या नऊ निवडक जिल्ह्यांतच तीं प्रथम स्थापलीं जातील. ह्या ठिकाणीं सहकारी संघटनेचा प्रसार होणें क्रमप्राप्तच ठरतें. शेतकऱ्यांस पिकांसाठी लागणारें भांडवल शक्य तों सहकारी पतपेढ्यांनींच पुरवावें, हें तत्त्व सरकारनें मान्य केलें आहे. सहाजिकच, सोसायट्यांची संख्या व त्यांचे समासद हीं वाढलीं पाहिजेत व देखरेखीची व्यवस्थाहि बळकट केली पाहिजे. पिकें काढणें व त्यांची विक्री करणें ह्यांची सांखळी जोडणें आवश्यक आहे. त्या करितां सहकारी विक्रीच्या संस्थांचें प्रांतभर जाळें निर्माण करण्याचा सरकारचा विचार आहे. शेतकऱ्यांच्या जनावरांचें आरोग्य राखण्यासाठी व्हेटरनरी खात्यांतील नोकरवर्ग वाढविण्यांत येणार आहे. जनतेचें आरोग्य सुधारण्यासाठी जादा डॉक्टरांची आवश्यकता आहे. त्यासाठी पुणें व अहमदाबाद येथील बी. जे. मेडिकल स्कूल्सचें कॉलेजांत रूपांतर करण्यांत येईल. खेडेगावांत काम करणाऱ्या आणखी १०० डॉक्टरांना सरकार मदत देईल. जिल्हानिहाय व तालुकानिहाय इस्पितळें काढून मुंबई-पुण्याच्या इस्पितळांतील गर्दी कमी करण्यांत येईल. मोटार वहातुकीचें महत्त्व ज्यास्तच वाढणार, ह्या दृष्टीनें मोठ्या बस कंपन्यांच्या स्थापनेस व व्यवहारांस उत्तेजन दिलें जाईल. सर्वत्र प्रांतभर स्वस्त व सुबलक विजेचा पुरवठा करण्याची योजनाहि सरकापुढें आहे. खतांचा पुरवठा, फळें व भाज्या ह्यांच्या लागवडीस उत्तेजन, चांगल्या जनावरांच्या अवलादींची वाढ, नवीन उपक्रमांची सहकारी संघटनेमार्फत व्यवस्था, जंगलवाढ, सार्वजनिक आरोग्यसुधारणा, कारखान्यांतील कामगारांच्या सुखसोईकडे लक्ष, शेतीच्या व पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, ग्रामसुधारणा केंद्रें, पाण्यानें जमीन धुवून जाऊं नये ह्यासाठी व्यवस्था, जमिनींचे तुकडे पडूं न देण्यासाठी सोसायटयांची स्थापना, नर्सेसच्या संख्येंत वाढ, नव्या योजनेसाठी लागणाऱ्या इमारतींची ७ कोटि रुपये खर्चून व्यवस्था, इत्यादि अनेक खर्चाच्या बाबी सरकारच्या योजनेंत आहेत.

वरील सर्व कार्यक्रम चालू करण्यासाठीं सरकारास हजारो लोक नेमावे लागतील. युद्धसमाप्तीनंतर परतणाऱ्या सैनिकांना अर्थातच त्यांत प्राधान्य मिळेल व ते आणि इतर पुनः नेहमींच्या जीवनांत समरस होऊं शकतील. ह्या सर्व योजना अमलांत आणून यशस्वी करण्यासाठी अतिशय मोठ्या खर्चाची जबाबदारी मुंबई सरकारावर येणार आहे. १९४४-४५ अखेर त्याच्या युद्धोत्तर पुनर्रचना फंडांत ७ कोटि रुपये साठतील, तेवढ्यानें भागणार नाहीं. नवीन कर बसवावे लागतील व कर्जेंहि काढणें जरूर पडेल. पहिल्या पांच वर्षांतील कार्यक्रमासाठी ५० कोटींच्या खर्चाची तरतूद करावी लागेल. त्यापैकी उपलब्ध होईल तेवढ्या रकमेंत व मिळूं शकतील तेवढ्या माणसांचे सहायानें कार्यक्रमास प्रारंभ होईल. मुंबई सरकारनें आखलेल्या ह्या योजनेचें वस्तुस्थितींत रूपांतर कितपत होतें, हें पुढें दिसेलच. "पुढें परिस्थिति बदलली, सरकारांत बदल झाला, तरी आजच्या सरकारनें युद्धोत्तर धोरण आतांच आखून ठेवलें नाहीं तर निष्कारण वेळ वाया घालविल्यासारखें होईल व संधि दवडली जाईल" असें सरकारनें आपल्या योजनेच्या प्रारंभींच म्हणून ठेवलेलें आहे. चांगल्या योजनांचें सातत्य कायम टिकण्यावरच त्यांचें यश अवलंबून असतें. दारूबंदीच्या, काँग्रेस सरकारच्या धोरणाचा पुरस्कार प्रस्तुत सरकारच्या योजनेंत केलेला असता, तर ह्या नव्या योजनेस व्यापक मान्यता मिळण्यास आणखी सहाय झालें असतें.

भोर स्टेट बँक लि., भोर

बँका व पेढ्या जे व्यवहार करतात त्या तऱ्हेचे सर्व प्रकारचे नवे-जुने बँकिंगचे व्यवहार अद्यावत् पद्धतीनें करून, विशेषतः भोर संस्थान व लगतचा प्रदेश यांतील जनतेला पैशाचे व्यवहार काटकसरीनें व उपयुक्त रीतीनें करण्याची सवय लावून व्यापार व उद्योगधंद्यांची वाढ होण्यास भांडवल पुरविणें आणि नवीन व्यवसाय व व्यावसायिक निर्माण करण्यास प्रत्यक्ष सहाय्य करणें हें ह्या बँकेचें उद्दिष्ट आहे. बँकेच्या संचालक मंडळाचे एकंदर नऊ सभासद राहतील. त्यांपैकीं पांच श्रीमंत राजेसाहेब भोर हे संस्थानचे वतीनें म्हणून नेमतील व बाकीचे चार समासद भागीदारांच्या तर्फे निवडण्यांत येतील. भागीदारांच्या तर्फे नेमावयाचे पहिले सभासद नेमण्याचा अधिकार कंपनीच्या आर्टिकल्सचें कलम नंबर १०४ प्रमाणें, श्रीमंत राजेसाहेबांना देण्यांत आलेला आहे. त्याचप्रमाणें संचालक मंडळाचे अध्यक्ष नेमण्याचा अधिकार ऑर्टिकल्सचें कलम नंबर १०३ क प्रमाणें श्रीमंत राजेसाहेब यांचेकडेच राखून ठेवण्यांत आलेला आहे. तूर्त विक्रीस काढलेल्या भांडवलापैकी एक लक्ष पंचवीस हजार रुपयांचे शेअर्स भोर दरबार स्वतः घेणार असून एकूण खपलेल्या भरपाई भांडवलावर पहिली पांच वर्षेपर्यंत दरबारकडून दरसाल दर शेंकडा तीन टक्के प्रमाणें व्याजाची हमी देण्यांत आली आहे. दरबार स्वतःची कमींत कमी दहा हजार रुपये तरी बँकेच्या चालू खात्यांत ठेव ठेवणार असून बँकेची पत केव्हांहि कायम टिकविण्याच्या दृष्टीनें बँकेस जरूर लागेल तेव्हां वर नमूद केलेल्या हुजूर हुकुमाप्रमाणें दरबारकडून रकमेचें सहाय्य होणार आहे. तसेंच सोय होईल त्याप्रमाणें दरबारकडून बँकेस, दरबारचे तिजोरीचे एजंट म्हणून हक्क देण्याचा विचार जरूर तर पुढें करणेंत येणार आहे. बँकेचे दोन हजार शेअर्स (भाग) खपल्यावरच बँकेच्या व्यवहारास सुरुवात होईल. भागीदारांतर्फेच्या संचालकांनीं कंपनीचे किमान २॥ हजार रुपयांचे भाग घेतले पाहिजेत.

अधिकृत भांडवल ५ लक्ष रुपये असून तें प्रत्येकीं ५० रु. प्रमाणें १० हजार भागांत विभागलेलें आहेत. २॥ लक्ष रुपयांचें भांडवल तूर्त विक्रीकरितां काढलें आहे. भोर संस्थानचे ऑर्डिटर दिवाण रावसाहेब रानडे हे बँकेचे अध्यक्ष असून श्री. वा. पुं. वर्दे (आर. आर. नाबर आणि कं.) हे उपाध्यक्ष आहेत. संचालक मंडळांत श्री. ल. र. साने, श्री. ग. मे. साठे, श्री. ल. रा. मोडक, श्री. शं. ना. करपे, श्री. म. व्यं. शिंगरे, श्री. वि. वि. वावहेकर, व श्री. व. वि. लोणकर (शेअर व स्टॉक ब्रोकर्स) ही मंडळी आहेत. महाराष्ट्र बँकेच्या ढेकन जिमखाना शाखेचे पूनींचे एजंट श्री. एस. व्ही. काळे ह्यांची मॅनेजर म्हणून नेमणूक झाली आहे. बँकेच्या कामास ता. १९ रोजीं प्रारंभ झाला.

स्फुट विचार

विश्वविद्यालयांचें ध्येय

मुंबई विश्वविद्यालयाच्या पदवीदान समारंभाचे प्रसंगी गेल्या आठवड्यांत उपकुलगुरु, श्री. वाडिया, ह्यांनीं विश्वविद्यालयीन शिक्षणासंबंधानें भाषण केलें तें बरेंच विचारप्रवर्तक होतें. असल्या भाषणांत नवीन कल्पना किंवा योजना फारशा आढळत नाहींत असा सामान्य अनुभव आहे. परंतु सध्याचा काळ पुनर्घटनेच्या विचारांचा आहे आणि त्यांच्या कक्षेंतून उच्च शिक्षण निसटूं शकत नाहीं. ह्या दृष्टीनें पहातां श्री. वाडिया ह्यांचे कांहीं उद्गार मननीय होते असें म्हटलें पाहिजे. त्यांनीं विश्वविद्यालयीन शिक्षणाची एखादी नवी योजना पुढें मांडली अशांतला प्रकार नसला तरी कित्येक गोष्टी त्यांनीं सुस्पष्ट केल्या ह्यांत शंका नाहीं. शिक्षणाचे उद्देश आणि पद्धति ह्यांचे विषयीं पुनर्घटनात्मक चर्चा चालली आहे तिचा उल्लेख करून श्री. वाडिया म्हणाले कीं, सत्याचा शोध हा जो विश्वविद्यालयीन शिक्षणाचा मुख्य हेतु आहे तो सारखा डोळ्यांपुढें ठेवून कार्य करीत रहाण्याची प्रथा मुंबई विश्वविद्यालय चालू ठेवील. मानवी ज्ञानाच्या मर्यादा विस्तृत व्हाव्या ह्या उद्देशानें विद्यार्थ्यांनीं प्रयोग, विचार व कल्पकता ह्यांच्या सहाय्यानें झटलें पाहिजे असें त्यांनीं सांगितलें. वैद्य, वकील व एंजिनिअर तयार करण्याच्या सवलती विश्वविद्यालय देतें, पण हे व अमले दुसरे व्यवसाय शिकवणें हें त्याचें खरें कार्य नव्हे; निरनिराळ्या धंद्यांची पार्श्वभूमि, त्यांच्या मुळाशीं असलेली संस्कृति आणि त्यांचें मानवी जीवितांतलें उपयुक्त स्थान ह्यांची कल्पना देणें ही त्याची कामगिरी होय. भौतिक व सामाजिक शास्त्रांच्या अभ्यासास मुंबई विश्वविद्यालयांत अधिकाधिक उत्तेजन देण्यांत येत आहे, तें ह्यासाठींच होय, असें स्पष्टीकरण त्यांनीं केलें. समता, स्वातंत्र्य, सहिष्णुता, नागरिकत्व, परोपकार, एकराष्ट्रीयत्व इत्यादि तत्त्वांविषयीं तरुण पिढींत आस्था निर्माण करणें हें ध्येय प्रत्येक विश्वविद्यालयानें जगाच्या पुनर्घटनेंत साध्य होईल असा प्रयत्न चालू ठेवला पाहिजे असा आपला अभिप्राय त्यांनीं पुढें मांडला. हे त्यांचे विचार सर्वसंमत होतील असेच आहेत.

शिक्षण आणि व्यावहारिक जीवन

उच्च ध्येयांचें व सात्विक भावनांचें विद्यार्थ्यांच्या मनांत बीजारोपण करणें हें विश्वविद्यालयांनि शिक्षणाचें मुख्य कार्य आहे. तथापि, समाजाची आर्थिक घटना अशी असावी कीं सुशिक्षित लोकांस आपल्या ध्येयांस, नागरिक ह्या नात्यानें योग्य व्यावहारिक स्वरूप देण्यास संधि मिळाली पाहिजे. म्हणजेच, देशांत उद्योगधंदे व व्यापार ह्यांचा प्रगतिपर विकास होऊन नागरिकांस आपलें जीवन सुखानें कंठता आलें पाहिजे. ध्येयवादी आणि सुशील अशा तरुण पिढींत स्वतःच्या चरितार्थाचीं साधनें उपलब्ध करून घेण्याची पात्रता अत्यंत अगत्याचें आहे. श्री. वाडिया ह्यांनीं आपल्या भाषणांत असें प्रतिपादिलें कीं विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास व्हावा आणि त्याचबरोबर आपल्या राष्ट्रीय कर्तव्याची जाणीव त्यांचेमध्यें जागृत व्हावी हा दुहेरी हेतु विश्वविद्यालयांसारख्या शिक्षणास वाहिलेल्या संस्थांनीं स्वतःच्या मनांत बाळगावा. हें सूत्र जगभर मान्यता पावलें आहे आणि तें हिंदुस्थानास इतर देशांप्रमाणें लागू आहे. युद्धजन्य परिस्थितींत आणि युद्धोत्तर व्हावयाच्या जागतिक पुनर्घटनेंत ह्या तत्त्वाची अंमलबजावणी कशी करावयाची हा व्यावहारिक प्रश्न येथें उद्भवतो आणि त्याचा विचार श्री. वाडिया ह्यांच्या भाषणांत ओघानें येणें प्राप्तच होतें. विश्वविद्यालयीन शिक्षण घेणारांची संख्या झपाट्यानें वाढत आहे आणि त्यांची पुरेशी सोय आजहि होऊं शकत नाहीं हा मुंबईचा अनुभव ताजा असल्यानें हिंदी शिक्षण व्यवस्थेंत योग्य सुधारणा व प्रगति केली जाण्याच्या प्रश्नाचा त्यांनीं उल्लेख केला. युद्धसमाप्तीनंतर जीवनकलह भयंकर होईल आणि त्यास तोंड देण्याची शक्ति हिंदी तरुणांत उत्पन्न करण्याची जबाबदारी सर्व विचारी लोकांस भेडसावीत आहे. विश्वविद्यालयांमधून हजारों पदवीधर बाहेर पडत आहेत आणि त्यांची मामुली पांढरपेशा व्यवसायांत सेचासेच चालली आहे. ह्या सुशिक्षितांच्या वाढत्या संख्येच्या पोटापाण्याची तजवीज युद्धसमाप्तीनंतर कशी होणार ही काळजी उत्पन्न करणारी गोष्ट आहे. हा शिक्षणविषयक प्रश्न विश्वविद्यालयांच्या कक्षेबाहेरचा आहे आणि सरकारनें यांत्रिक व धंद्यांच्या शिक्षणाची तजवीज करून तो सोडवला पाहिजे असें श्री. वाडिया ह्यांनीं सुचवलें आहे उद्योगधंदे व व्यापार ह्यांची अभिवृद्धि आणि व्यावहारिक व यांत्रिक शिक्षण ह्यांचा निकट संबंध आहे आणि युद्धोत्तर पुनर्घटनेच्या योजनेंत शिक्षणाच्या प्रश्नास योग्य स्थान दिलें जाण्याचें महत्त्व त्यांच्या भाषणावरून सिद्ध होत आहे. मि. सार्जंट ह्यांच्या सुप्रसिद्ध शिक्षणविषयक रिपोर्टांत यांत्रिक शिक्षणाच्या हायस्कुलांची तरतूद आहे. तिच्याविषयीं त्यांनीं पसंति दर्शविली. देशाच्या आर्थिक अभिवृद्धीबरोबर धंदेशिक्षणानें वाकबगार झालेल्या तरुणांस वाढती मागणी येईल. ह्याकरितां औद्योगिक प्रगति आणि धंदेशिक्षणाची तरतूद ह्यांची सांगड घालण्यांत आली पाहिजे.

हिंदी रेलवेजच्या उत्पन्नाची चढती कमान

युद्धपरिस्थितिजन्य वाढती वहातूक आणि तिचे चढीचे दर ह्यांचेयोगानें हिंदी रेलवेजच्या उत्पन्नाचे आकडे फुगत चालले आहेत. ह्या वाढत्या उत्पन्नांतून मध्यवर्ती सरकारास अधिक मोठा हिस्सा मिळत आहे आणि जनतेकडून यावयाच्या कराच्या उत्पन्नाची तो त्या प्रमाणांत जागा घेत आहे. हिंदुस्थान सरकारच्या हिशेबाची छाननी करण्यासाठी मध्यवर्ती कायदेमंडळानें नियुक्तलेली उपसमिति आहे. तिच्या १९४२-४३ सालांतल्या उत्पन्न खर्चाच्या छाननींत असें दिसून आलें आहे कीं त्या वर्षांत रेलवेजच्या उत्पन्नानें उच्चांक गाठला. उत्पन्न १५५ कोटि रुपये आणि खर्च वजा जाऊन राहिलेला ४५ कोटींचा वाढावा हे आकडे हिंदी रेलवेजच्या इतिहासांत अपूर्व असेच होते. पण १९४३-४४ सालांत ह्या आकड्यांनीं आणखी उंच उडी मारली असून हें रेकार्ड मोडलें आहे. उत्पन्न व वाढावा ह्यांचे हा वर्षांतले आकडे अनुक्रमें करून १८४ व ५० कोटि असे आहेत. हिंदुस्थान सरकारच्या तिजोरींत रेलवेजच्या वाढाव्यांतील हिश्शानें ह्या दोन वर्षांत २० आणि ३७ कोटि रुपयांची भर घातली. वाढलेल्या उत्पन्नाचा विनियोग रेलवेजनीं हिंदुस्थान सरकारच्या मार्गील देण्याची संपूर्ण फेड करण्याकडे केला आहे. त्यांची स्थिति असमाधानकारक व तुटीची होती, तेव्हां युद्धाच्या काळांत रेलवेजना

मध्यवर्ति तिजोरीस यावयाचा वार्षिक हिस्सा आणि घडाऱ्याच्या गंगाजळींत टाकावयाच्या रकमा यांची व्यवस्था करता आली नाहीं. ह्या बाबतींतले थकलेलें देणें आतां पूर्णपणें रेल्वेजनीं देऊन टाकलें आहे, एवढेंच नव्हे तर त्यांनीं आपल्या गंगाजळींत नऊ कोटि रुपये टाकले आहेत. येथें दोन गोष्टी लक्षांत ठेवणें आवश्यक आहे. रेल्वेजची भरभराट हा युद्धजन्य परिस्थितीचा व देशाच्या युद्धप्रयत्नाचा परिणाम असून हिंदी जनतेचा स्वार्थत्याग बऱ्याच अंशीं त्याच्या मुळाशीं आहे. दुसरें असें कीं, युद्धपरिस्थितींत रेल्वेजची होणारी झीज भरून काढण्यास पुढें कोटयवधि रुपयांचा मांडवली खर्च आवश्यक होईल.

सर्व आघाड्यांवर शत्रूची पीछेहाट

युरोपचा आपला किल्ला अभेद्य असल्याच्या घमेंडींत त्यावर हल्ला चढवण्याचें आव्हान जर्मनी मित्रराष्ट्रांस चढेलपणानें देत असे. आपण पादाक्रांत केलेल्या पश्चिम युरोपचा किनारा एवढा बंदिस्त आहे कीं त्यावर पाऊल ठेवण्याची इंग्लंड व अमेरिका ह्यांच्या फौजांची छाती होणार नाहीं अशा वल्गना शत्रू करीत असे आणि त्यांच्या पुष्ट्यर्थ डीएपच्या अनुभवाकडे बोट दाखवीत असे. जर्मनीच्या ह्या बढायांचा फोलपणा उघड होण्या. सारख्या घटना आतां युरोपिअन समरांगणावर घडून आल्या आहेत. नॉर्मंडी व ब्रिटनी ह्या फ्रेंच प्रांतांतून ब्रिटिश व अमेरिकन सैन्यें शत्रूचा तीव्र प्रतिकार मोडून काढून पुढें जात आहेत आणि त्यांच्या तोफांचा गडगडाट प्रत्यक्ष पॅरिसमध्यें ऐकूं येऊं लागला असल्याची बातमी प्रसिद्ध झाली आहे. ही दुसरी युरोपिअन आघाडी यशस्वी रीतीनें लढवली जात असतांच तिसरी आघाडी फ्रान्सच्या दक्षिण किनाऱ्यावर नुकतीच चालू करण्यांत आली आहे आणि तिचा प्रतिकार करण्याचें सामर्थ्य जर्मन लष्करांत उरलें नसल्याचें प्रत्ययास आलें आहे. दक्षिणेस इटलींत मित्र राष्ट्रांच्या फौजा हळूहळू पुढें सरकतच आहेत आणि पूर्वेच्या आघाडीवर जर्मनीस सारखी माघार घेणें भाग पडत आहे. राशियन सैन्य आतां प्रशियाच्या सरहद्दीपर्यंत येऊन थडकलें आहे आणि प्रत्यक्ष जर्मन भूमीस त्यानें धोका उत्पन्न केला आहे. ह्या रीतीनें जर्मनीस आपल्या संपुष्टांत येणाऱ्या लढाऊ सामर्थ्याची चार निरनिराळ्या आघाड्यांवर वाटणी करावी लागली आहे आणि ह्या प्रत्येक क्षेत्रांत नुकसान सोसून पाऊल मागें घेणें प्राप्त झालें आहे. जर्मनीनें पादाक्रांत केलेल्या सर्व देशांत स्थानिक बंडाळ्या माजल्या आहेत आणि त्यांचें मित्र राष्ट्रांस चांगलें सहाय्य मिळत आहे. हिटलरच्या गळ्याभोवतालची तात अधिक अधिक घट्ट आवळली जात आहे. हें ताज्या युद्धवार्तांवरून स्पष्ट होत आहे. जपानची पॅसिफिक महासागरांत व ब्रह्मदेशांत अशीच अवस्था हळूहळू होऊं लागली आहे. हिंदुस्थानच्या सरहद्दीवरून जपानी सैन्याची हकालपट्टी झाली आहे आणि ब्रह्मदेशांतहि शत्रूस पराभवाचे धक्के बसत आहेत. जपानभोवतालच्या वेटांत अमेरिका क्रमाक्रमानें आपलीं ठाणीं बसवीत आहे आणि शत्रूच्या वर्चस्वाभोंवतीं फास आवळीत आहे. युद्धाच्या आघाड्यांकडे दृष्टि फेकली असतां प्रत्येक लढाऊ क्षेत्रांत मित्रराष्ट्रांच्या सरशीस निश्चितपणा व उठावदारपणा अधिकाधिक प्राप्त होत असल्याचें स्पष्ट दिसून येतें.

धंदेवाले, शास्त्रीय संशोधन व मुंबई विश्वविद्यालय

आधुनिक पद्धतीच्या धंद्यांत यांत्रिक व शास्त्रीय स्वरूपाच्या सुधारणा सारख्या कराव्या लागतात. नवीन तऱ्हेचीं व अधिक कार्यक्षम यंत्रें कारखान्यांत बसवणें, कच्च्या मालाच्या व इतर साधनांच्या वापरांत बचत करणें, उत्पादन अधिक परिणामकारक बनवणें आणि उत्पादन खर्च कमी करून पक्क्या मालांत सुबकपणा वाढवणें ह्या गोष्टींकडे कारखानदारांनीं लक्ष न पुरवल्यास त्यांस बाहेरील स्पर्धेशीं टक्कर देतां येत नाहीं. प्रगतिपर धंदेवाल्यांचें धोरण आपल्या कारखान्यांत सुधारणा घडवून आणण्याचें असतें आणि त्यासाठी शास्त्रीय संशोधनाची आवश्यकता असते. कित्येक मोठे कारखानदार स्वतःच्या खर्चानें आपल्या कारखान्यांत शास्त्रज्ञ नेमून त्यांचेकडून सुधारणेविषयींच्या सूचना घेतात आणि त्यांचा उपयोग करतात. हें शक्य नसल्यास कारखानदार सहकार्यानें आपल्या मंडळांच्या मार्फत संशोधनकार्य करवतात आणि त्याचा फायदा सर्वांस मिळतो. ह्या कामीं धंदेवाले आणि विश्वविद्यालयें व प्रयोगशाळा ह्यांचें सहकार्य विशेष इष्ट ठरतें. ह्या शिक्षण संस्थांत निरनिराळ्या भौतिक शास्त्रांत संशोधन चाललेलें असतें आणि धंदेवाल्यांच्या अडचणी व त्यांचे प्रश्न त्यांतील तज्ज्ञांस हाताळणें सोयीचें असतें. ह्या दृष्टीनें पहातां मुंबईच्या गिरणीवाल्यांनीं प्रांतिक विश्वविद्यालयाच्या औद्योगिक शाखेस चार लक्ष रुपयांची देणगी शास्त्रीय संशोधन व शिक्षण ह्यांच्या उत्तेजनार्थ दिली आहे तिचें अभिनंदन करणें आवश्यक आहे. सेनेटच्या गेल्या सभेमध्यें ह्या देणगीचा स्वीकार करण्यांत आला. त्याच सभेंत कै. वा. नारायणराव देसाई टोपीवाला ह्यांच्या नांवानें देण्यांत आलेली सवा लक्ष रुपयांची देणगीहि स्वीकारली गेली. औषधीय धंद्यांतलें शास्त्रीय संशोधन हा या देणगीचा उद्देश आहे. हिंदी धंद्यांची प्रगति आणि विश्वविद्यालयीन शास्त्रीय संशोधन ह्यांच्या निकट परस्पर संबंधाची जाणीव ह्या देणग्यांत प्रतिबिंबित होत आहे ती त्या देणारांस भूषणावह आहे आणि आमच्या उच्च शिक्षणाच्या प्रगतीचें समाधानकारक चिन्ह आहे. मुंबई विश्वविद्यालयास एक लक्ष रुपयांची तिसरी देणगी हिंदी शेतीच्या आर्थिक संशोधनासाठी मिळाली आहे, तिचाहि स्वीकार सेनेटनें गेल्या सभेंत केला. ह्या विषयाच्या अभ्यासाचें महत्त्व किती आहे हें सांगण्याची आवश्यकता नाहीं. शेतीच्या पद्धतींतील सुधारणांचे बाबतींत संशोधन इंपीरिअल कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चरल रिसर्चच्या विद्यमानें चाललें आहे. तथापि शेतीच्या धंद्याची आर्थिक बाजूहि बळकट केली जाणें अगत्याचें असून त्याबाबतच्या संशोधनास उत्तेजन देण्यांत आलें पाहिजे. वरील नवीन देणगीचा उपक्रम ह्या दृष्टीनें स्वागतार्ह आहे आणि ह्या कार्यासाठी अधिक देणग्यांची आवश्यकता आहे.

दि बँक ऑफ सिटिझन्स लि.

वरील बँकेचा ३० जून, १९४४ चा सातवा वार्षिक अहवाल प्रसिद्ध झाला आहे त्यावरून बँकेच्या उत्कृष्ट प्रगतीची कल्पना येते. एका वर्षांत बँकेचें खेळतें भांडवल १४ लक्ष, १६ हजार रुपयांवरून २६ लक्ष, ३७ हजार रुपयांवर गेलें. बँकेचा नफाहि १९ हजारांच्या तुप्पट झाला आहे.अहवालाचे वर्षी बँकेनें घारवाड व नांदगड येथें शाखा व बेळगांव कँप व ठळकवाडी येथें स्थानिक कचेऱ्या उघडल्या. बँकेच्या ताळेबंदावरून, तिनें ६॥ लक्ष रुपये रोख व बँकांत, ५ लक्ष रुपये सरकारी रोख्यांत ठेवून १४ लक्ष रुपये कर्जात गुंतविलेले आहेत. बँकेकडे ठेवी २४½ लक्ष रुपयांच्या आहेत. बँकेनें २३ जुलै १९४४ च्या आपल्या ठरावानुसार आपलें भांडवल १० लाखांपर्यंत वाढविण्याचें ठरविलें आहे व तूर्त ३ लाखांचे भाग विक्रीस काढले आहेत. प्रत्येक जुने भागीदारास प्रत्येक भागास एक नवा भाग मागण्याचा अधिकार आहे. बँकेनें गेल्या वर्षीच्या नफ्यावर ६% कर माफ डिव्हिडंड देण्याचें योजिलें आहे. आपलें स्वतःचें भांडवल वाढवून तें एकूण खेळत्या भांडवलाशीं प्रमाणबद्ध करण्याचें चालकांचें धोरण योग्य आहे व बँकेचे भाग खपून जातील अशी अपेक्षा आहे.

इंपीरिअल केमिकल इंडस्ट्रीजचें अंतरंग

हिंदुस्थान सरकारचें धोरण

१४ मे, १९४४ रोजी हिंदुस्थान सरकारच्या पुरवठा सात्याच्या सभासदानें हिंदुस्थानांत दरसाल ३,६०,००० टन सल्फेट ऑफ अमोनिया उत्पादन करण्याची सरकारी योजना जाहीर केली. हें उत्पादन सरकारी नियंत्रणाखालीं रहाणार आहे. योजना पार पाडण्यासाठी इंपीरिअल केमिकल इंडस्ट्रीज लि. च्या तज्ज्ञांचें सहाय घेण्यांत येत आहे. हा निर्णय जाहीर करण्यापूर्वी सरकारनें हिंदी लोकांचा सल्ला घेतलेला नाहीं व युद्धजन्य तातडीची सबब असली, तरी ह्या अपूर्व घटनेचा अर्थ विशेषत्वानें लोकांच्या नजरेस येणें आवश्यक आहे. इंपीरिअल केमिकल इंडस्ट्रीज लि. चा आंतल्या दारानें होत असलेला हा प्रवेश हिंदी औद्योगिक प्रगतीस पोषक कितपत होईल, ब्रिटिश हितसंबंधांची मुहूर्तमेढ कशी रोवली जात आहे, वगैरे मुद्दे येथें उपस्थित होतात. ह्या दृष्टीनें इं. के. इं. लि. चा इतिहास व तिचें अंतरंग वाचकांस उद्बोधक वाटेल. सर प. जिनवाला ह्यांच्या ताज्या पुस्तिकेवर खालील माहिती आधारलेली आहे.

गेल्या महायुद्धाचे पूर्वी व तें युद्ध चालू असतांहि अमोनिया व चिलियन नेट्रेट ह्यांचा उपपदार्थ म्हणूनच नेट्रोजनचें उत्पादन होत असें; जर्मनींत मात्र कृत्रिम पद्धति योजण्यांत आलेली होती. गेल्या महायुद्धाच्या पहिल्या दोन्ही वर्षांत सल्फेट ऑफ अमोनियाची (ज्यांत दारूगोळ्याच्या बनावटीसाठी लागणाऱ्या स्फोटक द्रव्यांच्या उत्पादनास आवश्यक असलेलीं नैट्रोजन व सल्फ्यूरिक ॲसिड हीं असतात) ग्रेट ब्रिटनमधून मोठ्या प्रमाणावर निर्मात झाली. पुढें चिलीमधून नेट्रेट व इटलींतून व अमेरिकेंतून गंधकाची आयात कमी होऊन दारूगोळ्याच्या उत्पादनास अडचण भासूं लागली. कृत्रिम रीतीनें अमोनिया तयार करण्याचा एक कारखाना बिर्लिंघॅम येथें उभारण्याचें ब्रिटिश सरकारनें मे, १९१८ मध्यें (युद्धसमाप्तीच्या आधीं सहा महिने) ठरविलें, त्याच्या खर्चासाठी पार्लमेंटनें ५० लक्ष पौंड मंजूर केले. परंतु, लवकरच तह होऊन योजना स्थगित झाली. ब्रूमर मॉंड आणि कं. च्या एका दुय्यम कंपनीनें बिर्लिंघॅम येथील सर्व प्रकरण १० लक्ष पौंडांस विकत घेतलें. सिंथेटिक अमोनिया ॲंड नेट्रेट्स लि. ची नंतर स्थापना झाली, तिचें भांडवल १० लक्ष पौंड ठरविण्यांत आलें. ह्या कंपनीवर नेहमी ब्रिटिश ताबा पाहिजे, डायरेक्टर हे जन्मानें ब्रिटिश पाहिजेत व पहिले डायरेक्टर सरकारनें मान्य केलेले असले पाहिजेत, असें त्यावेळीं सरकारशीं झालेल्या करारांत नमूद होतें. १९२१ सालीं कंपनी दररोज २ टन अमोनिया तयार करूं लागली. १९२५ मध्यें त्याची उत्पादनशक्ति २० हजार टन झाली व १९३५ मध्यें ती २,६०,००० टनांवर गेली. १९२६ च्या सुमारास इंपीरिअल केमिकल इंडस्ट्रीज लि. ची स्थापना होऊन तिनें सिंथेटिक अमोनिया ॲंड नायट्रेट्स लि. ला आत्मसात् केलें. १९३६ मध्यें तिचें भांडवल ७ कोटि, ८० लक्ष पौंड होतें!

ब्रिटिश सरकार आणि इंपीरिअल केमिकल इंडस्ट्रीज लि. ह्यांचा अति निकट संबंध आहे. बिर्लिंघॅम येथील कारखाना वाढविण्यासाठी सरकारनें १९२५ सालीं सिं. अ. ॲंड ना. लि. ला २० लक्ष पौंड देण्याची हमी घेतली. १९२७ सालीं इंपीरिअल केमिकल इंडस्ट्रीज लि. ला कोळशापासून पेट्रोल काढण्यासाठी सरकारी मदत मिळाली. १९३५ सालानंतर ह्या पेट्रोलचें उत्पादन पुष्कळच वाढलें आहे व त्यास सरकारचें सहाय झालें असेलच. पूर्वीच्या नोबल इंडस्ट्रीज लि. ला इं. के. इं. लि. नें आत्मसात केलें असल्यानें, लष्करी व औद्योगिक उपयोगाच्या स्फोटक द्रव्यांच्या उत्पादनाची त्या कंपनीला मोनॉपली मिळाल्यासारखीच आहे. त्या कारणानें कंपनीच्या उत्पादनाच्या उठावाचा व किंमतींचा प्रश्नच येत नाहीं व ग्रेट ब्रिटनमधील ही सवलत त्या कंपनीस सबंद ब्रिटिश साम्राज्यभर एकमेवाद्वितीय अधिकाराची भूमिका प्राप्त करून देते.

हिंदुस्थानांत स्फोटक द्रव्यें तयार करण्याचें काम एकट्या सरकारनें आपल्या स्वतःकडे ठेवलें आहे. तत्त्व ह्या दृष्टीनें हें ठीक आहे, पण प्रत्यक्ष व्यवहार तसा घडत नाहीं. स्फोटक द्रव्यांच्या उत्पादनास लागणारीं कित्येक द्रव्यें ग्रेट ब्रिटनमधून आणावीं लागतात व त्यासाठी इं. के. लि. वर सरकार अवलंबून रहातें. सरकारी कारखान्यांतील सर्व महत्त्वाचीं सर्वीं ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या हातांत व सक्त देखरेखीखालीं असतात, त्या कारणानें तेथें काम करणाऱ्या अल्पक हिंदी रसायन शास्त्रज्ञांना मुद्दां स्फोटक द्रव्यांच्या उत्पादनाची पुरी क्रिया समजूं शकत नाहीं. सरकारनें सर्व स्फोटक द्रव्यांचे कारखाने आज आपणा स्वतःकडे ठेवले असले, तरी कांहीं आवश्यक पदार्थांचे कारखाने काढण्याची कंपनीची तयारी होती. हे कारखाने निघाले, तर काटकसरीच्या सबबीवर दारूगोळा तयार करण्याचें काम सरकार कंपनीकडे पुढेमागें सोपविणें आशक्य नाहीं. इं. के. इं. लि. चें स्वरूप कदाचित् " स्वदेशी " करण्यांत येईल. कांहीं हिंदी डायरेक्टरहि तिचें बोर्ड भूषवतील, परंतु खरी सत्ता ब्रिटिशेतर हातीं जाऊं देण्यांत येणार नाहीं. अशा रीतीनें, लष्करी स्फोटक पदार्थांचें उत्पादन, हिंदुस्थानास घोडेंफार राजकीय स्वातंत्र्य मिळालें तरी, आपल्या हातांत येणार नाहीं, असा सर पद्मजी ह्यांचा विश्वास आहे.

इं. के. इं. लि. ला ब्रिटिश सरकारनें अत्यंत सढळ हातानें संरक्षण दिलेलें आहे. ब्रिटिश साम्राज्यांतील अमोनिया व इतर स्फोटक पदार्थांच्या कंपन्यांत तिला निर्णायक हात आहे. युद्धापूर्वी, आंतरराष्ट्रीय नैट्रोजन कार्टेल स्थापण्यांत कंपनीनें पुढाकार घेतला व निर्मात व्यापाराचा तिनें भला मोठा हिस्सा उचलला. सल्फेट ऑफ अमोनियाच्या ब्रिटिश निर्मातीच्या २०% हिस्सा हिंदुस्थानांत येतो, ह्यावरून हिंदी नैट्रोजन धंद्यांत इं. के. इं. चा हितसंबंध कसा आहे हें दिसून येतें. कित्येक उपपदार्थ व दुय्यम पदार्थ ह्यांच्या उत्पादनांत व व्यापारांत कंपनीचा हात आहे. तिच्या कारखान्यांस दरसाल १५ लक्ष टन कोळसा लागतो! ह्या कोळशापासून मुख्यतः हेड्रोजन वगैरे काढण्यांत येतो व त्यामुळें जळणांत बचत होते. पंजाबमध्यें कंपनीनें हायड्रोजन पसरण्यास प्रारंभ केला आहे, हें प्रसिद्धच आहे.

सल्फेट ऑफ अमोनियाच्या विक्रीसाठी कंपनीनें ब्रिटिश सल्फेट ऑफ अमोनिया फेडरेशन स्थापन केली आहे. ह्या फेडरेशननें सल्फेटचे जागतिक भाव ठरवून टाकले आहेत. प्रत्येक देशांतील स्थानिक स्पर्धा लक्षांत घेऊनच ते निश्चित केलेले आहेत. त्या कारणानें, हिंदुस्थानांतील विक्रीची किंमत स्वस्त असली तरी हिंदी उत्पादकास त्यापासून फायदा नाहीं; त्यास जागतिक सरासरी किंमतच मिळणार!

जिकडे तिकडे प्रशंसा

इमिटेशन दागिन्यांवर रासायनिक क्रिया करून खऱ्या सोन्याचा पत्रा चढविला जातो त्यामुळें दागिना केव्हांही खराब होत नाहीं, ही पूर्ण खात्री झाली. सोन्याचा पत्रा चढविलेल्या चार बांगड्या किं. आठ रु. गरजेस्तव दागिना परत करणें झाल्यास वर चढविलेल्या सोन्याचे सर्वच्या सर्व पैसे परत देऊं.

भट कं. सांगली, S. M. C.

भट कंपनी शाखा—बुधवार पेठ, पुणें २.

सध्यांच्या टंचाईच्या काळांत जीवनद्रव्यें कमी पडतात.

जीवनद्रव्यांनीं (Vitamins) युक्त असे

(सप्लाय खात्यानें मान्यता दिलेले)

टोमॅटो केचप (गोड) व

टोमॅटो सॉस [तिखट व आंबट]

आजच मागवा व जीवनद्रव्यांची वाटणारी उणीव भरून काढा.

रुरल प्रॉडक्टस कंपनी लि. पुणें

बिझिनेस ऑफिस: ९१३ अ सदाशिव, पुणें २.

पुण्यांतील

आदर्श निवासस्थान व भोजनालय

छाया लॉजिंग व बोर्डिंग हाऊस

बुधवार चौक, पुणें २.

प्रगतिपथावरील नवा

मैलाचा — दगड

सन १९४३ अखेर

नव्या कामांत	११० टक्के वाढ
चालू कामांत	१०० टक्के वाढ
आयुर्विमानिधींत	८० टक्के वाढ

— आपला विमा किंवा एजन्सी आजच घ्या.—

दि औंध म्यूच्युअल लाइफ ॲश्युरन्स सोसायटी लि., पुणें.

आर. जी. साठे, सुपरिंटेंडेंट — व्ही. जी. जोशी, मॅनेजिंग डायरेक्टर

न्यू इंडिया इंडस्ट्रीज लि.

(Approved Re-traders and Approved Contractors)

२६ लॅमिंग्टन नॉर्थ, मुंबई ११.

अध्यक्ष:—श्री. ग. स. मराठे, ॲक्चुअरी.

महाराष्ट्रांतील रबराचा प्रमुख कारखाना

★ गिरणीचे रोलर्स ★ रबरी हातमोजे ★ छापखान्यांचे रोलर्स

★ रीमोल्ड टायर्स ★ रबरी वॉशर्स ★ सॉलिड व्हील्स

व इतर रबरी माल तयार होतो.

पु. ग. मराठे

मॅनेजिंग डायरेक्टर.

Telephone 779

GUEST HOUSE

TELEGRAM Guest House Poona 2.

पुना गेस्ट हाऊस

१००, लक्ष्मी रोड, पुणें २.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. शांताराम वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२७।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
मासिक पत्र्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
(टपाल खेरीज माफ)
किरकोळ अंकास
दोन आणे.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष १० पुणें, बुधवार, तारीख ३० ऑगस्ट, १९४२ अंक ३५

धी
बॉम्बे को-ऑपरेटिव
इन्शुअरन्स सोसायटी लि.

नवीन काम (१९४३)	रु.	३९,२७,६१९
एकंदर चालू विमे	रु.	१,६१,९०,५४१
जीवन विमा निधि	रु.	२२,१५,९७४
कुल उत्पन्न	रु.	१०,३३,०००

अध्यक्ष : शेठ माधवलाल मकनजी भट्ट, जे. पी.
मॅनेजर : श्री. जी. एच. ठाकोर, एम. ए. (कँटब.)

महाराष्ट्र-कर्नाटकचे चीफ ऑर्गनाइझर्स :
श्री. कुळकर्णी आणि कं.
मुख्य कचेरी :
को-ऑपरेटिव इन्शुअरन्स बिल्डिंग,
सर फिरोजशाह मेहता रोड, कोट, मुंबई.

हिंदुस्थानची आघाडीवरील सहकारी संस्था

दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.
पुणें शहर
भांडवल :
(ता. ३१-५-४४ रोजीं)

अधिकृत व खपलेलें	:	रु. १०,००,०००
वसूल झालेलें	:	रु. ५,००,०००
रिझर्व्ह व इतर फंड	:	रु. १,०८,०००
एकूण खेळतें भांडवल	:	रु. ७५,००,००० चे वर

—: डायरेक्टर्स :—
श्री. भों. कृ. साठे, चेअरमन,
श्री. वा. पु. वर्दे, प्रो. वा. गो. काळे, श्री. न. ग. पवार,
श्री. श्री. गो. मराठे, श्री. बिं. वि. रानडे, श्री. र. चिं. सोहनी,
श्री. फ. दो. पदमजी, श्री. मा. रा. जोशी,
श्री. म. वि. गोखले, श्री. वि. ह. देशमुख
: शाखा :
पुणें ४, दलाल स्ट्रीट, मुंबई, जळगांव, नागपूर.
बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.
सी. व्ही. जोग
मॅनेजर

Telephone 779

TELEGRAM Guest House Poona 2.

पुना गेस्ट हाऊस
१००, लक्ष्मी रोड, पुणें २.

गिरगांव मुंबई नं. ४

महिंद्रकर ब्रदर्स
तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

बार्शी सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक, लि.

नोटीस

या बँकेच्या सर्व मेंबरांस कळविण्यांत येतें कीं बँकेची सर्वसाधारण सभा बुधवार ता. २० सप्टेंबर १९४४ इ. चे दिवशीं दुपारीं ३ वाजतां साने मेमोरियल हॉलमध्यें बँकेच्या नोटीस बोर्डावर प्रसिद्ध केलेल्या विषयांचा विचार करण्याकरतां भरणार आहे, तरी त्यावेळीं सर्व मेंबरांनीं हजर रहावें अशी विनंति आहे.

बोर्डाचे हुकुमावरून.

बार्शी, ता. ५-८-४४. र. प. पटवर्धन
मॅनेजर.

गांवोगांवीं विक्रेते पाहिजेत.

A 9

क्विनीनचे ऐवजीं मलेरियाकरतां खात्रीचा
अनुभविक उपाय म्हणून
'एनाईन' वापरतात.

अलपाईन प्रॉडक्टस् (इंडिया) पुणें २

विविध माहिती

परीक्षा म्हणजे सोडतच होय !

"विश्वविद्यालयांची हल्लींची परीक्षा घेण्याची पद्धति विद्यार्थ्यांस अति जाचक आहे. एकच उत्तरपत्रिका दोन परीक्षकांनीं तपासली किंवा एकाच परीक्षकानें दोनदां तपासली, तर तिला वेगवेगळे गुण पडतात ! एकाच विषयांत विद्यार्थी नापास झाला तरी त्याला वर्षभर सर्व विषयांचा अभ्यास पुनः करावा लागतो. परीक्षेची पद्धत म्हणजे एक प्रकारची सोडतच आहे."—अलिगढ विश्वविद्यालयाचे उपकुलगुरु सर झियाउद्दिन अहमद ह्यांचें सुरत कॉलेजांतील भाषण.

इंपीरिअल बँकेचा सहामाही अहवाल

" इंपीरिअल बँकेला ३० जून अखेर संपलेल्या वर्षी ४६ लक्ष रुपये निवळ फायदा झाला. डिव्हिडंडचा दर (१२% कर माफ) कायम आहे. बँकेच्या पैशास चांगली मागणी होती, परंतु पैशाचा पुरवठाहि भरपूर होता. हिंदुस्थान सरकारच्या ट्रेझरी बिलावर व्याजाचा सरासरी दर द. सा. द. शे. १० आणे पडला; १९४३ च्या पहिल्या सहामाहींत तो १ रु. १ आ. २ पै इतका पडला होता."

पुण्यांतील रेशनिंग

पुण्यांत रेशनिंगला प्रारंभ झाला, त्यास ५ जुलै रोजीं एक वर्ष पूर्ण झालें. कामाच्या सोयीसाठी रेशनिंगच्या हद्दीचे सहा भाग करण्यांत आले आहेत. रेशनिंगपूर्वी, रेशन केलेला माल विकणारे १०० घाऊक व्यापारी होते. त्यांनीं आतां डेपोमार्फत व्यवहार करण्यासाठी असोसिएशन्स स्थापन केल्या आहेत. किरकोळ व्यापारी ह्या डेपोंतून माल घेतात. रेशनिंगला प्रारंभ झाला, तेव्हां रेशन केलेला माल विकण्याचे परवाने ८१८ किरकोळ व्यापाऱ्यांना दिले होते. आतां फक्त ५८८ किरकोळ लायसन्सदार उरले आहेत. रेशनिंगच्या नियमांचा भंग केल्याबद्दल १३ लायसेन्स रद्द करण्यांत आले व २३ लायसेन्सदारांवर खटले भरण्यांत आले.

अहमदाबादमधील गिरण्यांची चलती

सबंद हिंदुस्थानांत गेल्या वर्षी जेवढें कापड तयार झालें, त्याच्या २५% कापड एकट्या अहमदाबादमधील गिरण्यांनीं उत्पादन केलें. कापड व सूत ह्यांच्या विक्रीचा आकडा १९४२ चे मानानें दीडपट झाला. उत्पादनाचा खर्च व कपास आणि सूत ह्यांची किंमत १००% वाढली तरी ठोक नफा २२५% वाढला. कारखान्यांच्या यंत्रांवर जास्त ताण पडला तरी १९४३ सालीं घसाऱ्यासाठी काढलेल्या रकमेंत वाढ झालेली दिसत नाहीं. अहमदाबादच्या इतिहासांत १९४३ हें वर्ष फारच भरभराटीचें गेलें.

१६ हजार " स्मिथ "

अमेरिकन आरमारदलांत एकट्या " स्मिथ " या नांवाचे १६००० खलाशी आहेत. तेव्हां त्यांचा पत्ता लिहितांना त्यांचें सबंध नांव लिहिण्याविषयीं सूचना देण्यांत आलेली आहे. दर आठवड्यास ३० लक्ष पत्रें योग्य ठिकाणीं न पोचण्याचें कारण वरील सूचनेचे अनुषंगानें लक्षांत येईल.

" विवाहावरील निर्बंध दूर करा "

" बँक ऑफिसर्स गिल्ड " ह्या ग्रेट ब्रिटनमधील बँकांतील अधिकाऱ्यांच्या संस्थेनें बँकांतील स्त्री-नोकरांनीं विवाहबद्ध होतां कामा नये, असा नियम आहे तो रद्द करावा असा ठराव पास केला आहे. स्त्रिया व पुरुष ह्यांस सारख्या कामासाठी सारखा पगार व सारख्या सवलती मिळाल्या पाहिजेत, असाहि ठराव मंजूर झाला.

चेक्सची देवघेव

मुंबई बँकर्स क्लिअरिंग हाऊसमध्यें ११ ऑगस्ट अखेर संपलेल्या आठवड्यांत ४०३ कोटि रुपयांच्या १,५८,६९२ चेक्सची देवघेव झाली.

हिंदुस्थानांत गव्हाची आयात

१५ ऑगस्ट रोजीं संपलेल्या आठवड्यांत परदेशांतून १५,००० टन गव्हाची हिंदुस्थानांत आयात झाली, अशी बातमी आहे.

सशांची आयात

लष्करांतील सैनिकांच्या खाद्यासाठी ऑस्ट्रेलियांतून व इतर देशांतून १० हजार ससे आणविण्यांत येणार आहेत व सर्व हिंदुस्थानभर सशांच्या पैदाशीचीं व संगोपनाचीं केंद्रें स्थापन करण्यांत यावयाचीं आहेत.

अनुक्रमणिका

	पृष्ठ
१ विविध माहिती ...	२७४
२ सहकारी रजिस्ट्रार्सची परिषद् ...	२७५
३ आर्थिक अभिवृद्धीच्या योजना ...	२७६
४ औद्योगिक सहकारी संघटन मंडळ ...	२७६
५ बार्शी सें. को. बँक ...	२७६
६ स्फुट विचार ...	२७७
इंस्टिट्यूट व बँका ह्यांची परिषद्—स्थानिक स्वराज्य संस्थांचा कारभार—शत्रु-व्याप्त प्रदेशांतील जिंदगी व ताळेबंद—पत्रकारांची आर्थिक स्थिति	
७ महाराष्ट्र को. स्कूल ...	२७८
८ जमाखर्चाची पद्धत ...	२७८
९ वडापुरी संबंधीं रिपोर्ट	२७९

अर्थ

बुधवार, ता. ३० ऑगस्ट, १९४४

सहकारी रजिस्ट्रार्सची परिषद्

रिझर्व्ह बँकेच्या कारभारांत एक शेतीविषयक विभाग आहे. त्याचा सहकारी बँकांच्या पैशाच्या व्यवहाराशीं प्रत्यक्ष संबंध येतो. प्रांतिक सहकारी बँकांस रिझर्व्ह बँकेच्या कायद्यांत शेड्यूल्ड बँकेचें स्थान देण्यांत आलें आहे आणि त्यांच्या मार्फत सहकारी शेती संस्थांस विशिष्ट अटींवर जरूर पडेल तसा पैशाच्या पुरवठ्याच्या सवलती दिल्या जाण्याची तरतूद केलेली आहे. ह्या बाबतींतल्या कित्येक अडचणी सहकारी बँकांनीं रिझर्व्ह बँकेपुढें मांडल्या असून त्या दूर केल्या जाण्याविषयीं चर्चा व विचार-विनिमय हीं झालीं आहेत. हे परस्पर संबंध लक्षांत घेतां प्रांतिक व संस्थानी रजिस्ट्रार्सची वेळोवेळ भरणारी परिषद् यंदां रिझर्व्ह बँकेच्या विद्यमानें भरवली गेली ही गोष्ट महत्त्वाची झाली. ह्या परिषदेचें अध्यक्षपद नेहमींच्या रिवाजाप्रमाणें मध्यवर्ती सरकारचे मंत्रि, सर जोगेंद्रसिंग, ह्यांनीं विभूषित केलें आणि तीमध्यें रजिस्ट्रार्सच्या बरोबर बिनसरकारी सहकारी कार्यकर्त्यांनीं भाग घेतला. ह्या परिषदेच्या अगोदर मुंबई येथेंच प्रांतिक बँका व प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूट्स ह्यांच्या स्थायी समित्यांची सभा भरली होती आणि तींत कांहीं प्रांतिक रजिस्ट्रार्स उपस्थित होते. ह्या सभेस सामान्य परिषदेचें स्वरूप येतें आणि तीमध्यें सहकारी चळवळीच्या हिताविषयींच्या प्रश्नांची चर्चा होऊन त्यांवर ठराव मान्य करण्यांत येतात. युद्धजन्य परिस्थितीचे सहकारी चळवळीवर घडून आलेले परिणाम आणि युद्धोत्तर काळांतील पुनर्घटनेंत तिला द्यावयाचें स्थान ह्या विषयांची चर्चा दोन्ही परिषदांमध्यें प्रामुख्यानें केली जाणें स्वाभाविक होतें. रजिस्ट्रार्सच्या परिषदेंत मान्य झालेल्या ठरावांचा परिणाम रिझर्व्ह बँक व प्रांतिक आणि हिंदुस्थान सरकार ह्यांच्या धोरणावर होण्याची अधिक शक्यता असल्यानें त्यांस विशेष महत्त्व आहे. ह्याकरितां आम्ही येथें त्यांपैकीं प्रमुख ठरावांचें दिग्दर्शन करीत आहों.

सहकारी संवर्धनाची योजना तयार करण्यासाठी परिषदेनें एक समिती नेमली आहे. अशा योजना स्थानिक व प्रांतिक परिस्थितीस अनुसरून आखाव्या लागतील आणि हें काम प्रांतांनीं स्वतःसाठी निरनिराळें केलें पाहिजे हें उघड आहे. तथापि, ह्या योजनांची सर्वसामान्य रूपरेखा वरील समितीस तयार करतां येईल. ह्याहिपेक्षा महत्त्वाची गोष्ट आहे ती सबंद हिंदुस्थानाकरितां आर्थिक अभिवृद्धीची योजना तयार होईल तीमध्यें सहकारी संघटनास उचित स्थान दिलें जाण्याच्या आवश्यकतेसंबंधाची आहे. रजिस्ट्रारांच्या परिषदेनें ह्या सूचनेस पाठिंबा दिला आहे एवढेंच नव्हे तर मध्यवर्ती, प्रांतिक व संस्थानी सरकारें आपापल्या पुरत्या आर्थिक अभिवृद्धीसाठी योजना तयार करण्यासाठी समित्या नेमतील त्यांमध्यें सहकारी संघटनांतील कार्यकर्त्यांचे प्रतिनिधी घेतले जावे असें आपलें मत तिनें व्यक्त केलें आहे. सहकारी प्रांतिक बँका व इंस्टिट्यूटस ह्यांच्या परिषदेनेंहि अशाच अर्थाचा ठराव मंजूर केला होता आणि त्यास रजिस्ट्रार्सच्या परिषदेनें पाठिंबा दिला आहे हें समाधानकारक आहे. एखादी प्रगतीची योजना यशस्वी होण्यास विवक्षित गटांतील सर्व लोकांचें सहकार्य अपरिहार्य असेल तेथें तें सक्तीचें केलें जावें ह्या परिषदेच्या शिफारसीचा उद्देश थोड्या लोकांनीं अभिवृद्धीच्या मार्गांत अडथळे आणूं नयेत हा आहे. अन्नसामुग्रीचें उत्पादन वाढवण्याच्या कामीं सरकारनें सहकारी संस्थांचा पूर्ण उपयोग करून घ्यावा आणि त्या संबंधांत जरूर असलेलें सर्व सहाय त्यांस द्यावें असें परिषदेनें म्हटलें आहे. हें सहाय भांडवल, बीं-बियाणें, इत्यादि निरनिराळ्या स्वरूपांत दिलें जावें अशी आणि रिझर्व्ह बँकेच्या कायद्याच्या १७ व्या कलमाअन्वयें सहकारी बँकांस विशिष्ट तारणावर थोड्या मुदतीपुरता पैसा मिळेल अशी व्यवस्था होण्याबाबतहि शिफारस परिषदेनें केली आहे. मालाच्या विक्रीची व्यवस्था सहकारी पद्धतीनें होण्यासाठी संस्था विस्तृत प्रमाणांत चालवल्या जाण्याची आणि त्यांचा कारभार यशस्वी रीतीनें केला जाण्याकरितां सरकारनें मदत व सवलती देण्याची आवश्यकता परिषदेनें आवश्यक असे ठराव मंजूर करून प्रतिपादली आहे. अशाच प्रकारचे ठराव सहकारी स्टोअर्सच्या बाबतींतहि तिनें केले आहेत. युद्धपरिस्थितींत निघालेलीं दुकानें युद्धाचे अखेर बऱ्याचशा प्रमाणांत चालणें कठिण होईल आणि त्यांपैकी कित्येक बंद पडतील अशी भीति वाटत आहे. ह्यासंबंधांत सरकारचें धोरण ह्या संस्थांस उत्तेजन देऊन त्या भक्कम पायावर उभ्या रहातील अशा तऱ्हेचें असावें ह्या आशयाची शिफारस परिषदेनें केली आहे.

एका नवीन आणि महत्त्वाच्या विषयाबाबत परिषदेनें सूचना केल्या आहेत तो सहकारी घटनेच्या औद्योगिक सोसायट्यांसंबंधांतला आहे. लहान गावांत व खेडेगावीं विभागांत मालाचें उत्पादन सहकारी पद्धतीनें व्हावयाचें म्हणजे भांडवल, साधी यंत्रसामुग्री, तज्ञांचा सल्ला, विक्रीची व्यवस्था इत्यादि गोष्टींची तयारी हवी आणि ती सरकारच्या मदतीवांचून होणें शक्य नाहीं. हें सहाय मध्यवर्ती आणि प्रांतिक सरकारांकडून कसें मिळावें ह्याची तपशीलवार तजवीज परिषदेनें सुचवली आहे. सहकारी शिक्षणाच्या महत्त्वाचे दृष्टीनें कोणत्या योजना सरकारनें अंमलांत आणल्या पाहिजेत ह्याचें दिग्दर्शन तिनें केलें आहे. त्याचप्रमाणें सहकाराबाबत संशोधन केलें जाण्याची व्यवस्थाहि तिनें सुचवली आहे. सहकारी संस्थांची स्थिति आणि प्रगति ह्यांचेविषयींची आकडेवार माहिती प्रसिद्ध होत असते तिच्या पद्धतींत जरूर असलेल्या सुधारणा सुचवण्यासाठी परिषदेनें एक उपसमिती नेमली आहे. तिच्या शिफारसींचा त्रोटक गोषवारा येथवर दिला आहे त्यावरून त्यांचें महत्त्व ध्यानांत येण्यासारखें आहे. रिझर्व्ह बँकेच्या विद्यमानें आणि मध्यवर्ती सरकारच्या मंत्र्यांचे अध्यक्षतेखालीं भरलेल्या रजिस्ट्रार्सच्या परिषदेच्या ह्या सूचना असल्यानें त्यांचा परामर्श योग्य रीतीनें घेतला जाईल अशी अपेक्षा आहे.

आर्थिक अभिवृद्धीच्या योजना

हिंदुस्थानच्या आर्थिक अभिवृद्धीच्या योजनांत सहकारी औद्योगिक संस्थांस महत्त्वाचें स्थान देण्यांत यावें ह्या अर्थाच्या सूचना करण्यांत येत आहेत. मुंबईस मरलेल्या दोन सहकारी परिषदांचा उद्देश ह्या अंकांत करण्यांत आला आहे, त्यांच्या चर्चेत सहकारी तत्त्वावर चालणाऱ्या औद्योगिक मंडळ्यांच्या स्थापनेस महत्त्व देण्यांत आलें आहे. सध्यां जनतेपुढें युद्धोत्तर काळांत करावयाच्या हिंदुस्थानच्या औद्योगिक संघटनाच्या योजना आहेत, त्यांत सरकारच्या सहाय्यानें भांडवलदारीच्या पद्धतीनें किंवा रशियांत चालू असलेल्या समाजसत्तामूलक व्यवस्थेनें उदयास आणावयाच्या आर्थिक संस्थांविषयींच्या सूचना अंतर्भूत आहेत. हिंदुस्थान सरकारहि अभिवृद्धीच्या योजना आखीत आहे. धंद्यांचें स्वरूप व संख्या, त्यांस लागणाऱ्या भांडवलाचें परिमाण व तें मिळवण्याचे मार्ग, जनतेच्या रहाणींत सुधारणा व तिच्या प्राप्तींत वाढ ह्यांच्या दृष्टीनें करावयाच्या संपत्तीच्या उत्पादनांत विस्तार इत्यादि बाबींची चर्चा ह्या योजनांत अर्थातच केलेली आढळते. तथापि, धंदे व व्यापार, ह्यांचा विस्तार हजारो कोटि रुपये खर्चून हिंदी राष्ट्र करणार त्यावर सत्ता कोणाची राहील, त्याचें धोरण कोण ठरवील, कारखान्यांची मालकी भांवलदारांच्या हातीं वैयक्तिक व सामुदायिक रीत्या राहील किंवा राजसत्ता ह्या सर्व आर्थिक घडामोडींचें पूर्णत्वानें अथवा अंशतः नियंत्रण करील ह्या मुद्यांचें स्पष्टीकरण अजून झालेलें नाहीं. युद्धोत्तर आर्थिक विकासाच्या योजना इंग्लंड व अमेरिका ह्या देशांतहि आखल्या जात आहेत आणि हिंदुस्थानची औद्योगिक घटना त्या देशांत रूढ झालेल्या पद्धतीनेंच येथें चालू झाली असल्यानें त्यांचें अनुकरण ह्या देशांतहि व्हावें अशी अपेक्षा आहेसें दिसतें. प्रचंड प्रमाणावर आर्थिक पुनर्रचना हिंदुस्थानांत कर्तव्य असतां ती रशियांत यशस्वी झालेल्या पद्धतीनें केली असतां अधिक इष्ट नाहीं काय ? असा प्रश्न येथें विचारला जात आहे.

औद्योगिक सहकारी संघटन मंडळ

एका टोकास वैयक्तिक स्वार्थ, स्वातंत्र्य व स्पर्धा आणि त्यांचेमधून उत्पन्न होणारी आर्थिक सुधारणा आणि दुसऱ्या टोकास श्रमजीवी बहुजन समाजाच्या आर्थिक संघटनेनें राष्ट्रीय राजकीय सत्तेनें घडवून आणलेली व चालवलेली औद्योगिक व्यवस्था अशा ह्या मूलग्राही भेदाच्या योजना आहेत. एकीचा पाया वैयक्तिक मालकीचीं संपत्त्युत्पादनाचीं साधनें तर दुसरीमध्यें ह्या साधनांचें मध्यवर्ती राजकीय सत्तेच्या हातीं केंद्रीकरण व वैयक्तिक आर्थिक स्वातंत्र्याचा अभाव पण सर्व व्यवसायी लोकांस समतेवर आधारलेल्या प्राप्तीची तरतूद. ह्या दोन टोकांच्यामध्यें वैयक्तिक आर्थिक स्वातंत्र्य आणि लहानमोठ्या उत्पादकांचें स्वावलंबन व सहकार ह्यांच्या पायावर सामाजिक घटना उभी करणें शक्य व इष्ट असें कित्येक विचारवंत मानतात. त्यांच्या मतें हिंदुस्थानांतील युद्धोत्तर आर्थिक संवर्धन ह्या तत्वावर आणि पद्धतीनें केलें पाहिजे. ह्या उद्देशानें त्यांनीं संघटनाचा व प्रचाराचा उपक्रम "हिंदी औद्योगिक सहकारी संघटना मंडळ" (Indian Industrial Co-operatives Association P. B. 115 Bombay) स्थापन केलें असून त्याच्या घटनेस प्रसिद्धी दिली आहे. ह्या घटनेची चर्चा व्हावी आणि लोकांनीं आपले अभिप्राय व सूचना आपणाकडे पाठवाव्या अशी उत्पादकांची इच्छा आहे. सरकारी नोकरशाही, भांडवलवाले, दलाल इत्यादि लोकांच्या वर्चस्वापासून कामकऱ्यांचें रक्षण करून त्यांस स्वतःच्या पायावर उभें रहाण्यास व परस्पर सहाय्यानें आपले धंदे चालवण्यास समर्थ करणें हा वरील उपक्रमाचा हेतु आहे. चीन देशांत अलीकडे लहान व मध्यम आकाराचे धंदे सहकारी पद्धतीनें यशस्वी रीतीनें चालवले जात आहेत आणि त्यांच्या धर्तीवर हिंदुस्थानांत आर्थिक संवर्धन झाल्यास भांडवलशाही आणि आत्यंतिक स्वरूपाची समाजसत्ता पद्धति ह्यांचे दोष टाळून सर्वांस मान्य असलेलें आर्थिक व सामाजिक उन्नतीचें उद्दिष्ट साध्य करतां येईल. हिंदी औद्योगिक सहकारी संघटन मंडळास आम्हीं यश चिंतितों.

वाशीं सें. को. बँक लि.

(वार्षिक सभा : २०-९-१९४४)

वरील बँकेच्या पटावर एकूण ९२७ सभासद असून त्यांपैकी ५२ सोसायट्या व व्यक्तिशः सभासद ८७५ आहेत. ह्याशिवाय ३१ नाममात्र सभासद नोंदलेले आहेत. बँकेचें शेअर भांडवल ७२,१५० रुपये असून रिझर्व्ह आणि इतर फंडांत ८३,४४९ रुपये आहेत. अहवालाचे वर्षी ठेवींत १½ लक्ष रुपयांची वाढ होऊन त्यांचा आकडा ७,६९,०१० रुपये झाला. ह्या उलट कर्ज व्यवहारांत ३८,९९८ रुपयांची घट होऊन वर्षअखेर ४,०३,९७९ रुपयांचें कर्ज येणें आहे. बँकांतील ठेवींमधील व रोख्यांतील गुंतवणूक १,८७,५५७ रुपयांनीं वाढून ती साल अखेर ५,२७,२५० रुपये झाली आहे. बँकांतील शिल्लक व इन्व्हेस्टमेंटस ह्यांचें एकूण ठेवींशीं प्रमाण ६८% पडतें, व एकूण कर्जव्यवहाराचें एकूण ठेवींच्या रकमेशीं प्रमाण ५२% आहे, ह्या गोष्टींवरून बँकेच्या व्यवहाराच्या सुरक्षितपणाची व किफायतशीरपणाची कल्पना येईल. थकबाकीचा आकडा अहवालाचे वर्षांत थोडा उतरून तो ४३,१०१ रुपयांवर आला. बँकेच्या वैराग शाखेचें काम समाधानकारक चाललें आहे. वैरागच्या शेजारच्या पांच खेड्यांतील रहिवाशांना धान्य पुरविण्याचें काम सरकारनें शाखेकडे १५-६-४४ पासून दिलें आहे. वर्षअखेर बँकेस ६,६४४ रु. निवळ नफा झाला. भागीदारांस ६½% डिव्हिडंड मिळणार आहे. बँक "अ" वर्गात आहे. श्री. म. रा. साने, वकील, हे बँकेचे चेअरमन असून श्री. र. . पटवर्धन, सी. ए., आय. आय. बी. हे मॅनेजर आहेत.

विटा मर्चंटस को. बँक लि., विटें

वरील बँकेचें भाग भांडवल २२,२९० रुपये आहे. रिझर्व्ह व इतर फंडांत २,८३९ रुपये आहेत. एकूण ठेवी १,१६,२१८ रुपयांच्या आहेत. एकूण १ लक्ष, ४६½ हजार रुपये खेळत्या भांडवलापैकी ६२,८८६ रुपयांचीं कर्जे दिलेलीं आहेत. "गेल्या सालची थकबाकी पूर्णपणें वसूल झाली असून अहवालाचे साल अखेरीस थकबाकी कांहीं नाहीं. विशेषतः माल तारणाचे धंद्यापासून अहवालाचे सालीं बँकेस बराच फायदा झाला आहे." बँकेस निवळ नफा ३,८०१ रुपये झाला. भागीदारांस ७½% डिव्हिडंड मिळालें. श्री. फुलचंद रुपचंद शहा, व्यापारी, हे बँकेचे चेअरमन असून श्री. वा. गो. बर्वे, बी. ए., एलएल. बी. हे मॅनेजर आहेत.

स्फुट विचार

इंस्टिट्यूटस व बँका ह्यांची परिषद

आजच्या अग्रलेखांत रजिस्ट्रार्सच्या परिषदेपूर्वी मुंबई येथें भरलेल्या अखिल भारतीय सहकारी प्रांतिक बँकांच्या आणि इंस्टिट्यूटसच्या असोसिएशन्सच्या सभेचा उल्लेख करण्यांत आला आहे आणि ह्या सभेस परिषदेचें स्वरूप येत असतें असें म्हटलें आहे. मुंबईच्या प्रांतिक इंस्टिट्यूटचे अध्यक्ष, सर जनार्दन मदन, ह्यांनीं सदरहु सभेचें उद्घाटन केलें आणि अध्यक्षीय भाषण दि. वा. काजी ह्यांनीं केलें. इंस्टिट्यूटस आणि बँका ह्यांच्या स्थापनेचें बीजारोपण मुंबईमध्यें आपण स्वत: प्रांतिक रजिस्ट्रार असतांना झालें ह्याविषयीं सर जनार्दन ह्यांनीं अभिमानपूर्वक उल्लेख केला. धान्यादि अन्नसामुग्रीच्या वाटणीचें काम सहकारी संस्थांच्या हातून उत्तम रीतीनें होण्यासारखें असल्यानें मुंबईच्या इंस्टिट्यूटनें त्यासंबंधांत प्रचार चालू केला आणि त्यासंबंधांत समाधानकारक प्रगति घडून आल्याचें त्यांनीं सांगितलें. ह्या प्रांतांत सहकारी दुकानांच्या चळवळीचा म्हणण्यासारखा प्रचार झालेला नव्हता. परंतु युद्धपरिस्थितीमुळें ह्या संघटनास चालना मिळाली आणि कित्येक शहरांत आतां स्टोअर्स निघाले आहेत, त्यांची माहिती त्यांनीं दिली. सहकारी पुनर्घटनेची योजना आखण्याबाबत मुंबईच्या इंस्टिट्यूटनें पुढाकार घेतला आणि प्रांतिक सरकारच्या संमतीनें एक योजनासमिती नेमली. तिच्या सूचना सरकारास सादर करण्यांत आल्या आहेत असें सर जनार्दन म्हणाले. शेतमालास बऱ्या किंमती येत आहेत, त्यांचे मधून बचत करण्याकडे शेतकऱ्यांचें मन वळवलें जाण्याची आवश्यकता त्यांनीं प्रतिपादिली. आर्थिक पुनर्घटना आणि सहकारी संस्थांचा विस्तार व सुधारणा ह्यांचेसाठी माहितगार व शिकलेले मार्गदर्शक व नोकर लागतील, त्यांच्या शिक्षणाची व्यवस्था सहकारी इंस्टिट्यूटसनीं केली पाहिजे आणि त्यासाठी मुंबई प्रांतिक इंस्टिट्यूटनें आपल्या पूर्वीच्या शाळा पुन्हां चालू केल्या असल्याचें त्यांनीं सांगितलें. इंस्टिट्यूटच्या कार्यक्षेत्रास अलीकडे मर्यादा घालण्यांत आली आहे तरी शिक्षणाच्या बरोबर बिनअधिकारी सहकारी कार्यकर्त्यांचें विविध प्रश्नांविषयींचें मत तयार करून तें व्यक्त करण्याचें कार्य त्या संस्थेनें आस्थेनें केलें पाहिजे असें सुचवून सर जनार्दन ह्यांनीं आपलें भाषण पुरें केलें.

स्थानिक स्वराज्य संस्थांचा कारभार

म्युनिसिपालिट्या व लोकलबोर्डे ह्यांची आर्थिक परिस्थिति १९४२ सालीं असमाधानकारकच राहिली. युद्धामुळें किंमतींत झालेली वाढ व नोकरवर्गास द्यावा लागणारा महागाईभत्ता ह्यांची त्यांत भर पडली. त्या कारणानें कित्येक स्थानिक स्वराज्य संस्थांना आपलीं कामें नीट पार पाडतां आलीं नाहींत. विशिष्ट कार्यासाठी राखून ठेवलेला पैसा नित्य कामासाठी वापरणें व देणीं देण्याचें पुढें ढकलणें हाहि त्याचा परिणाम घडून आला. प्राथमिक शिक्षणावरील सर्च कमी करावा लागल्यामुळें कांहीं स्कूल बोर्डांच्या परिस्थितीस झळ लागली. वसुली अधिकाऱ्यांत कामाच्या तत्परतेचा व देखरेखीचा अभाव आणि वसुलीसाठी कडक इलाज करण्याची म्युनिसिपालिट्यांची नाखुषी ह्या कारणांमुळें वसुलीची बाकी फारच राहिली. इंदापूर येथें ७८.९%, होनावर येथें ५७% व यावल येथें ६५% बाकी राहिली. स्थानिक स्वराज्य संस्थांचा गैरशिस्त कारभार ही अत्र सार्वत्रिक कुचेष्टेचा विषय झालेला आहे व त्यासंबंधांत सुधारणा होण्याचीं चिन्हें दिसत नाहींत, हें दुर्दैव आहे.

शत्रुव्याप्त प्रदेशांतील जिंदगी व कंपन्यांचे ताळेबंद

रिझर्व्ह बँकेस गेल्या वर्षी १०½ कोटि रुपयांचेवर नफा झाला असला तरी तिच्या ताळेबंदांत जिंदगीचे बाजूस दाखविलेली ६,१३,७६३ रुपयांची मालमत्ता सध्या शत्रुपक्षाच्या हातांतील प्रदेशामधील डेड स्टॉकच्या स्वरूपांतील आहे. हिंदी मध्यवर्ती बँकेनें इतक्या विश्वासानें ही मालमत्ता जिंदगीचे बाजूस दाखवूनच नफ्याचा आकडा काढणें ही गोष्ट सूचक आहे. शत्रूनें व्याप्त केलेले प्रदेश ब्रिटिश सरकारचे ताब्यांत पुन: येतील व आपली जिंदगी खरी ठरेल, ही निश्चित अपेक्षा तिचे मुळाशीं आहे. ग्रेट ब्रिटनमधील एक्सचेंज बँका, पूर्व आशियांत व्यवहार करणाऱ्या रबराच्या व इतर कंपन्या, इत्यादि मंडळयांनीं हेंच धोरण अंगीकारलेलें आहे व त्यांच्या ताळेबंदांतहि, त्यांची जिंदगी परमुलुखांत आज अडकली असली तरी ती खरें येणें ह्याच स्वरूपांत ताळेबंदांत दाखविलेली असते. सामान्य व्यवहारांत निघणारें संशयित व बुडीत येणें व युद्धासारख्या तात्कालिक कारणामुळें येणें अधिकारक्षेत्राबाहेर जाणें, ह्यांत फरक आहे. रिझर्व्ह बँकेच्या एकूण व्यवहाराच्या मानानें तिच्या जिंदगीमधील ६ लक्ष, १३½ हजारांचा आकडा अत्यंत गौण महत्त्वाचा आहे. कांहीं ब्रिटिश बँकांची बहुतेक सर्वच जिंदगी शत्रुप्रदेशांत अडकली असली, तरी त्या कंपन्यांच्या ताळेबंदांस त्यानें बाध आलेला नाहीं.

पत्रकारांची आर्थिक स्थिति सुधारण्यासाठी सूचना

मराठी पत्रकार परिषदेच्या स्थायी समितीनें परिषदेच्या कोल्हापूर येथील अधिवेशनांत मंजूर झालेल्या ठरावांस अनुसरून मराठी पत्रकारांची आर्थिक स्थिति सुधारण्याच्या उद्देशानें किमान पगार (मुंबई येथें १२५ रु., पुणें व नागपूर येथें १०० रु. व इतर ठिकाणीं ७५ रु.), हक्काची रजा, प्रॉव्हिडंट फंड, ग्रॅच्युइटी, महागाई भत्ता व बोनस, पगारवाढ, नियमित पगार, पेन्शन, वगैरे संबंधांत कांहीं शिफारसी केल्या आहेत. पत्रकारांची व वार्ताहरांची परिस्थिति ज्यांस माहीत आहे, अशांना ह्या मागण्या रास्तच वाटतील. किरकोळ नियतकालिकें सोडलीं, तरी बाकीच्या नीट चाललेल्या नियतकालिकांच्या चालकांनीं ह्या बाबतींत लक्ष घालणें आवश्यक आहे. निदान सुस्थितींतील नियतकालिकांनीं पुढाकार घ्यावा व इतरांस मार्गदर्शक व्हावें, हें उचित आहे. वर्तमानपत्रें कोठल्याहि अन्यायास वाचा फोडण्याचें श्रेय नेहमीं घेतात, त्यांनीं स्वत:च्या नोकरवर्गाच्या रास्त गाऱ्हाण्यांचें बाबतं जास्त च सहानुभूतिपर धोरण ठेवणें इष्ट आहे.

युद्धोत्तर पुनर्घटना सहकारी तत्त्वावर : श्री. वैकुंठराय मेहता ह्यांचें भाषण

"हिंदी युद्धोत्तर पुनर्घटना सहकारी तत्त्वावर का आंखण्यांत यावी ?" ह्या विषयावर श्री. वैकुंठराय मेहता ह्यांचें बृहन्महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्स, पुणें येथें मंगळवार, ता. २९ रोजीं व्याख्यान झालें. "कोणतीहि सुधारणा घडवून आणतांना, तिच्यापासून होणाऱ्या फायद्याचा हिस्सा सर्वांस योग्य रीतीनें मिळेल किंवा नाहीं, हें पहाणें अगत्याचें असतें. मांडवलशाहीमधील कांहीं चांगल्या गोष्टी कायम ठेवून परंतु त्यामधील दोष काढून नफ्याची वाटणी योग्य रीतीनें करण्याचें कार्य सहकारी संघटनच करूं शकेल व त्यामुळें उत्पादन वाढविण्यांत सर्वांचें हित राहील." असें ते म्हणाले.

महाराष्ट्र को-ऑपरेटिव्ह स्कूल, पुणें
(लि. आ. म.)

जुलै ता. १७ पासून या वर्गाचें काम व्यवस्थित सुरू झालें असून शाळेचे वर्ग पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेच्या हॉलमध्यें रोज सकाळीं ८ ते १० व सायंकाळीं ६ ते ८ पर्यंत नियमितपणें भरतात. शाळेच्या सीनिअर कोर्ससाठी दहा व ज्यूनिअर कोर्ससाठीं सहा असे एकूण सोळा विद्यार्थी नियमितपणें हजर असतात. शिक्षणाचें माध्यम मराठी असून श्री. भिडे व देशपांडे या तज्ज्ञ व कुशल अध्यापकांवर विद्यार्थी वर्ग खूष आहे.

विद्यार्थ्यांसाठी शाळेचें एक वाचनालय असून त्यांत अभ्यासक्रमास पोषक अशीं पुस्तकें ठेवलीं आहेत. सर्व विद्यार्थी त्यांचा उपयोग भरपूर करून घेत असल्याचें दिसतें.

विद्यार्थ्यांनीं स्थापन केलेल्या ' रिक्रिएशन क्लब ' तर्फे सुटीचे दिवशीं निरनिराळ्या ठिकाणीं सहलीचे कार्यक्रम आखण्यांत येतात.

मुंबई प्रांतांतील कारखाने व कामगार

मुंबई प्रांतांतील सर्व कारखान्यांत मिळून १९२२ सालीं १५,७६६ मुळें कामावर होतीं, त्यांपैकी कापडाच्या गिरण्यांत १३,९२७ होतीं. १९४३ सालीं त्यांचा आकडा अनुक्रमें ४९२ व ६७ असा झाला. कामगारांची एकूण संख्या १९२१ सालीं ६,५१,३२४ होती ती १९४१ सालीं ७,११५२५ झाली. कापडाच्या गिरण्यांतील कामगारांना १९३८ चे मानानें १९४३ सालीं १००% जास्त वेतन मिळालें. १९३८ सालीं १६०२ कारखान्यांतील ४,५८,९८४ कामगारांना १४ कोटि, ९८ लक्ष रुपये मजुरी मिळाली; १९४३ सालीं २,१७३ कारखान्यांतील ६,५५,७३७ कामगारांना ४६ कोटि ५८ लक्ष रुपये मजुरी मिळाली. म्हणजे १,९६,७५३ अधिक कामगार काम करीत होते व ३१ कोटि ६० लक्ष जास्त रुपये व्यवहारांत आले. अपघातांची संख्या १६,१९० ची १९,५२० झाली.

युरोपांतील युद्ध संपतांच विमानमार्गें इंग्लंडशीं दळणवळण सुरू

युरोपांतील युद्ध लवकर संपणार, अशीं चिन्हें दिसत आहेत. त्याचें प्रत्यंतर वर्तमानपत्रांतील जाहिरातींत आढळूं लागलें आहे. युरोपांत शांतता प्रस्थापित झाल्यावर ज्यांना इंग्लंडला विमानमार्गे जाण्याची इच्छा असेल, त्यांनीं टाटा एअर लाइन्सकडे आपलीं नांवें नोंदवावीं, अशी जाहिरात प्रसिद्ध झाली आहे. मुंबई ते कराची भाडें १८० रुपये (जातांयेतां ३२४ रुपये) व कराची ते इंग्लंड भाडें १५१ पौंड (जातांयेतां ३०२ पौंड) असें ठेवण्यांत आलें आहे.

प्रांतिक कर्जे-अंदरायटर्सकडे मागणी

मुंबई, मद्रास, मध्यप्रांत, संयुक्त प्रांत, सिंध व पंजाब ह्या सहा प्रांतांच्या कर्जाची विक्री मंगळवारीं दिवसभर चालू होती. जनतेकडून आलेली मागणी पुरी पडल्यावर अंदरायटर्सना कांहीं रकमेचीं कर्जे स्वतः घ्यावीं लागलीं व अशा रीतीनें कर्जाची भरपाई झाली.

औद्योगिक संशोधनाची इन्स्टिट्यूट

हैद्राबाद येथें औद्योगिक संशोधनाची इन्स्टिट्यूट स्थापन करण्याकरितां निजाम सरकारनें १५ लक्ष रुपये मंजूर केले आहेत. शिक्षणासाठी ब्रिटिश हिंदुस्थानांत व हिंदुस्थानाबाहेर विद्यार्थी पाठविण्याचा निजाम सरकारचा विचार आहे.

जमाखर्चाची सिंगल एन्ट्री व डबल एन्ट्री पद्धती

जमा व खर्च या दोन्ही दृष्टींनीं प्रत्येक व्यवहाराची नोंद जमाखर्चांत करण्याच्या पद्धतीस ' डबल एन्ट्री ' सिस्टीम असें म्हणतात. या पद्धतीनें जमाखर्च लिहिण्यास व्यक्तीच्या व धंद्याच्या दृष्टीनें आवश्यक अशी नोंद एके ठिकाणीं सांपडते. तसेंच त्यामुळें कोणत्याहि वेळीं धंद्यांत नफा अगर तोटा किती झाला हें बिनचूक काढतां येतें व अशा रीतीनें काढलेला ताळेबंद हा धंद्याची बिनचूक आर्थिक परिस्थिति दर्शवितो.

प्रत्येक वेळीं होणारा व्यवहार रोखीनेंच होतो असें नाहीं. कित्येक वेळां माल उधार आणला जातो अगर मालांतच नुसती अदलाबदल होते. रोखी देवजी चेकनेंच व्यवहार होतात व अशा तऱ्हेनें दिले घेतलेले चेकहि नेहमीं वटतातच असें नाहीं. सध्यांच्या या प्रचंड व्यापारी उलाढालींत परस्पर 'पत' व 'विश्वास' यांच्या सहाय्यानें लोकांमधील व्यवहारांचें स्वरूप एकसारखें बदलत आहे व या सर्व व्यवहारांच्या नोंदी सुसंगतवार जमाखर्चांत मांडणें अत्यंत आवश्यक असतें.

व्यवहाराच्या सारखेपणावरून आपण खातीं पाडतों. या खात्यांचे सारखेपणावरून त्यांचे तीन प्रकार पडतात. व्यक्तींचा संबंध येणारीं तीं व्यक्तिविषयक, धंद्यांत गुंतविलेल्या जिंदगी-संबंधींचीं तीं Real अगर Property विषयक खातीं व धंद्यांतील उत्पन्नाचीं व खर्चाचीं जीं खातीं तीं नाममात्र अगर नॉमिनल खातीं. यांना नफातोटाविषयक खातीं असेंहि म्हणतां येईल. ताळेबंदाचे वेळीं नफातोटा काढल्यानंतर हीं नफातोटाविषक खातीं दरसाल बंद करून पुन्हां उघडलीं जातात.

सिंगल एन्ट्री पद्धतींत ज्या खतावण्या लिहिल्या जातात त्यामध्यें फक्त व्यक्तिविषयक खातींच उघडलीं जातात व प्रत्येक व्यक्तिविषयक येण्यादेण्याचाच तपशील या खतावण्यांतून असतो. समजा अनें रकडून ५० रुपयांचा माल उधार आणला तर डबल एन्ट्री पद्धतीप्रमाणें अ आपल्या वहींत बचे खातीं ५० रुपये जमा करील व माल खातीं ५० रुपये नांवें टाकील व अशा तऱ्हेनें या व्यवहाराची नोंद स्पष्टपणें सांपडेल पण सिंगल एन्ट्री पद्धतीनें ठेवलेल्या खतावणींतून बचे खातीं ५० रुपये जमा केलेले आढळतील व मालाचे खातें खतावणींतच नसल्यानें त्याचा उल्लेख खतावणींत सांपडणार नाहीं. डबल एन्ट्री पद्धतीप्रमाणें सिंगल एन्ट्री पद्धतींत माल-खरेदी-विक्री, पगारं, भाडें इ. खात्यांचा खतावणीशीं संबंधच नसल्यानें फार गैरसोयी होतात. नफातोट्याच्या खात्यांची खतावणी नसल्यामुळें वाटेल त्या वेळीं नफातोटा किती झाला हें नक्की काढतां येत नाहीं. उत्पन्नाच्या व खर्चाच्या खात्यांची निरनिराळी काय परिस्थिति होती हेंही कळत नाहीं. तसेंच फायदा व तोटा कोणत्या बाबींपासून झाला हें समजत नाहीं. अमुक एका विशिष्ट जिंदगीवर किती खर्च झाला, तीवर घसारा किती काढला, कोणत्या बाबींकरितां किती रक्कम राखून ठेविली होती हेंही समजत नाहीं. चालू सालच्या भांडवलांत वाढ झाल्यास तितका नफा व तूट आल्यास तितका तोटा असेंच ढोबळपणें सांगतां येतें. सदोष पद्धतीमुळें अफरातफरीस जागा राहते व त्यामुळें सिंगल एन्ट्री पद्धतीनें काढलेला ताळेबंद धंद्याची बिनचूक आर्थिक परिस्थिति दाखवील असेंही खात्रीनें सांगतां येणार नाहीं.

एच. व्ही. सहस्रबुद्धे.

सांप्रतच्या धान्याच्या किंमत वाढीमुळें शेतकऱ्यांकडून येणाऱ्या कर्जाच्या परतफेडीवर व त्यांच्या सर्व-साधारण आर्थिक परिस्थितीवर झालेल्या परिणामासंबंधीं चर्चात्मक रिपोर्ट

[रावसाहेब य. द. खोले, चेअरमन, पुणें सेंट्रल को-आपरेटिव्ह बँक लि. व श्री. बा. वि. कुंभारे यांनीं जातीनें सर्व माहिती संकलित करून हा अहवाल तयार केलेला आहे. याबाबतींत प्रि. ध. रा. गाडगीळ यांजकडून मिळालेल्या अमूल्य मार्गदर्शकत्वाबद्दल लेखकद्वय त्यांचे अत्यंत ऋणी आहेत. शिवाय सदर माहिती मिळवणेसाठी श्री. एजंट, इंदापूर शाखा, पुणें सेंट्रल कॉ-आपरेटिव्ह बँक लि. व सेक्रेटरी वडापुरी को. के. सोसायटी यांनीं केलेल्या सहाय्याबद्दल त्यांचे आभार मानणें जरूर आहे.]

धान्याच्या किंमत वाढीनें खरोखरीच आपल्या शेतकरी बांधवांना हात दिला आहे किंवा कसें व तसें असल्यास ही सुस्थिति किती प्रमाणांत त्यांना लाभलेली आहे याची सांगोपांग पहाणी व छाननी करणें निःसंशय फलप्रद होईल. शेतकरी बांधवांना मिळालेल्या जादा मिळकतीचा विनियोग त्यांनीं सोसायटीच्या कर्जफेडीकडे किती प्रमाणांत केला आहे व तसेच खाजगी कर्जाची फेड, टिकाऊ स्वरूपाची जमीन सुधारणा व शेतीच्या आयुधांची नवी खरेदी यापायीं किती प्रमाणांत पैसा गुंतविणे त्यांना शक्य झालें आहे हें पाहून त्यांची सध्यांची परिस्थिति संपन्नावस्था अगर विपन्नावस्था दर्शविते हें ठरवणें आपणांस शक्य आहे. तरी या दृष्टीनें इंदापूर तालुक्यांतील वडापुरी सोसायटीची हल्लीचीं परिस्थिती कशी आहे, हें त्या सोसायटीच्या कांहीं सभासदांच्या सद्यःस्थितीची वैयक्तिक छाननी करून स्थूल मानानें अजमावण्याचा प्रयत्न येथें केलेला आहे.

वडापुरी

वडापुरी हें इंदापूर तालुक्यांतील साधारण १५०० वस्तीचें लहानसें खेडें आहे. गांवची जमीन एकूण ७२०० एकर भरते व त्यापैकी एक तृतीयांश बागाईत स्वरूपाची आहे. येथून नजिकच निरेचा लेफ्ट बँक कॅनॉल वहातो व त्यानें गांवची एक तृतीयांश जमीन आठमाही ब्लॉक पद्धतीनें भिजते. ह्या गांवच्या मुख्य जिराईत पिकांत ज्वारी, गहूं, बाजरी, करडी व सर्व प्रकारच्या डाळी यांचा समावेश होतो.उरलेल्या बागाईत जमिनींत मुसुंबीं, लिंबें वगैरे फळफळावळ केली जाते.

वहातुकीचें साधन म्हणून भाड्याच्या बैलगाडीचा सरसहा उपयोग केला जातो. हा येथील लोकांचा दुय्यम प्रकारचा पण महत्त्वाचा धंदा समजला जातो.

गांवची एकूण वार्षिक सरकार पट्टी रु. ३३०० आहे.

येथें को. के. सोसायटी तारीख ९।३।१९२६ ला स्थापन झाली. तिचा रजिस्टर नं. ५३३० आहे. सध्या सभासदांची संख्या १०३ म्हणजे येथील शेतकरी समाजाच्या साधारण एक तृतीयांश आहे असें समजण्यास हरकत नाहीं. सोसायटीला १९४३ सालीं क वर्ग मिळाला होता.

सदर विवेचनासाठी १६ सभासदांच्या वैयक्तिक परिस्थितीची सर्व माहिती गोळा केलेली आहे. हा आकडा म्हणजे एकूण शेतकरी समाजाच्या ५ टक्के होय अगर सोसायटीच्या सभासदांच्या संख्येच्या जवळ जवळ १५ टक्के होय. ह्या १६ सभासदांची वर्मवारी त्यांना धान्याच्या किंमतवाढीमुळें प्राप्त झालेल्या निरनिराळ्या सुस्थितींवरून खाली केलेली आहे.

ताळेबंदाच्या आकड्यांवरून जीं अनुमानें काढतां येणें शक्य आहे तीं खालीलप्रमाणें आहेत.

१. मेंबरांच्या ठेवी: ठेवीचा आंकडा ३९-४० सालीं रु. १७३२ होता तो ४३-४४ सालीं १३६१ झाला. ठेवी कमी झाल्या याचा अर्थ असा नव्हे, कीं, सभासदांची सांपत्तिक परिस्थिति निकृष्ट झाली. उलट सभासदांनीं बराच पैसा कर्ज परतफेडीकडे, जमीन खरेदीकडे, व मंगल कार्याकडे गुंतवूनही त्यांना इतक्या ठेवी ठेवता आल्या हें त्यांच्या सुस्थितीचें लक्षण निश्चित होय.

२. रिझर्व फंड: ३९–४० सालीं सदर फंड रु. ५३१२ होता व ४३-४४ सालीं हा रु. ६३०५ झाला. रु. १००० जास्त रकम सभासद गंगाजळींत टाकूं शकले हें त्यांच्या सुधारणेचें द्योतक आहे. ही त्यांच्या जिंदगींत झालेली कायम वाढ आहे हेंही यावरून स्पष्ट होतें.

३. बँकेकडून सोसायटीस कर्ज: ३९-४० सालीं हें कर्ज रु. १२४७२ इतकें होतें. तें ४३-४४ सालीं पूर्ण फेडलें गेलें आहे. सध्याची आर्थिक सुस्थिति या आकड्यानें निर्विवादपणें सिद्ध होते.

४. मेंबर्स येणें: हा आंकडा ३९-४० सालीं रु. ३०८३५ वरून ४३-४४ सालीं रु. १०,६४४ झाला.

५. बँकेकडून मागितलेलें कर्ज: हा आंकडा ३९-४० सालीं रु. २३३१ होता व ४३-४४ सालीं रु. ६६५ इतका खालीं आला. सभासदांना सध्यां कर्जाची आवश्यकता किती अल्प प्रमाणांत आहे याबद्दल हे आंकडे खात्री पटवतात.

६. बँकेस परत केलेलें कर्ज: ३९-४० सालीं परत केलेल्या कर्जाचा आंकडा रु. ३८५३ होता. तो ४३-४४ सालीं रु. ८४४८ पर्यंत चढला आहे. हें सभासदांच्या कर्जफेडीच्या वाढत्या कार्यक्षमतेचें निदर्शक होय असें समजण्यास प्रत्यवाय नाहीं असें वाटतें.

७. नफातोटा खातें: ३९।४० सालीं व ४२ साल अखेर सदर सोसायटी तोट्यांत चालली होती. पुढील दोन वर्षांत प्रगति करून सोसायटीनें प्रतिवर्षांत रु. १००० नफा दाखवला व सध्याची सुस्थिती हक्कानें प्राप्त करून घेतली आहे.

वडापुरीसंबंधीची वरील माहिती असें सिद्ध करतें कीं, धान्याच्या किंमत वाढीमुळें सदर गांवच्या शेतकऱ्यांचा चांगलाच फायदा होऊन त्यांची स्थिति या काळांत दृश्य स्वरूपांत सुधारली आहे. मागच्या वर्षी सदर सोसायटीस तपासणींत ड वर्ग मिळाला होता व असिस्टन्ट रजिस्ट्रार साहेब यांनीं त्यांत अशी सूचना केली होती कीं सभासदांच्या कर्जाची बाकी पुढील वर्षी म्हणजे यावर्षी धान्याच्या किंमत वाढीमुळें त्यांना मिळालेल्या जादा मिळकतींतून वसूल करून घ्यावी. सदर सूचनेचें प्रत्यक्षांत रूपांतर होऊन आतां सोसायटीकडे कर्जाची बाकी कांहींही नाहीं व याच कारणाच्या आधारावर सोसायटीस येत्या तपासणींत बरचा वर्ग मिळेल अशी आशा बाळगण्यास कांहींच हरकत नाहीं.

वडापुरी सोसायटीच्या सभासदांच्या अंदाजी उत्पन्नाचे आंकडे वाढ दाखविण्याऐवजी घटलेले असल्याचे आपल्या दृष्टोत्पत्तीस येतें. बरबर पहाता सोसायटीच्या सभासदांची सांपत्तिक परिस्थिति सुधारत आहे या विधानाशीं हे आंकडे

विसंगत दिसतात हें खरें आहे. परंतु हे आकडे त्याच्या वार्षिक धान्य उत्पन्नाचे शास्त्रशुद्ध मार्गानें केलेलें आर्थिक मूल्यमापन नसून सोसायटीच्या सभासदांनी बँकेकडे कर्ज मागणीचा अर्ज करतेवेळी स्वतःच्या उत्पन्नाची अनभिज्ञपणें अंदाजी कल्पना करून सांगितलेले असतात एवढें येथें नमुद केलें म्हणजे ही विसंगती दूर होईल. कित्येक वेळ सभासदांमध्यें असणारा साक्षरतेचा अभाव हेंही कारण त्यांनी दिलेल्या परस्पर विरोधी आकड्यांच्या बुडाशीं असणें शक्य असतें. त्यापेक्षां काहीं जरी साक्षर असले तरी सर्वांनाच चोख व पद्धतशीरपणें पैशाच्या व्यवहाराची नोंद ठेवता येत नाहीं, हें सर्वश्रुत आहे. तेव्हां त्यांनी अंदाजलेल्या आंकड्याकडे विशेष काटेकोर दृष्टीनें न पाहतां योग्य तोच अर्थ त्यांतून काढणें श्रेयस्कर होईल.

सभासदांना मिळालेल्या जादा प्राप्तीचा अनुत्पादक कार्यापायी विनियोग करण्याकडे त्यांची साहजिक वृत्ति असल्याचें आपणांस स्पष्ट दिसतें. एक तर हें मानवी स्वभावाच्या सर्वसाधारण वैगुण्याचें आविष्करण होय असें म्हणावें लागतें व त्याहूनही अधिक खरें कारण म्हणजे शेतकीच्या उत्पादन वाढीच्या नव्या क्षेत्राबद्दल सर्वसाधारण सभासदांचें अज्ञान असतें हें होय व पैसा हातीं असूनही व जमीनीचें उत्पादन वाढविण्याची प्रबळ इच्छा मनांत वसत असूनही पैशाचा उपयोग सत्कार्यीं करणें त्यांना दुरापास्त होते. ही सभ्यांची परिस्थिति असमाधानकारक आहे हें तर खरेंच; परंतु ती बदलण्यासाठी शेतकरी सभासदांना उत्पादन-वाढीचे नवे मार्ग कोणते याचें ज्ञान देणें जरूर आहे, व तें कोण-कोणत्या उपायानें द्यावयाचें याचा सूक्ष्म विचार तज्ज्ञाकडून होणें इष्ट व फलदायी होईल.

वढापुरी सोसायटीच्या सभासदांसंबंधी गोळा केलेल्या माहितीची व्याप्ति अल्प असल्यामुळें त्यावरून काढता येणारीं अनुमानें सर्व-साधारण स्वरूपाचीं असणार नाहींत हें उघड आहे. यास्तव वढा-पुरीसंबंधीचे आकडे तेथील सभासदांच्या आर्थिक परिस्थितीचे सर्व बाजूंनीं दिग्दर्शन करणारे आहेत असें म्हणणें धाडसाचें होईल. व तसें म्हणण्याचा येथें मानसही नाहीं. तसें करावयाचें झाल्यास याहीपेक्षा विशाल व्याप्तीची व खोलवर अशी आर्थिक चौकशी आपणांस करावी लागेल. प्रस्तुत पहाणींत सभासदांची कर्ज परतफेडीची कार्यक्षमता सभ्यांच्या किंमतवाढीमुळें वाढली आहे किंवा कसें एवढेंच पहाण्याचें योजिलें होतें व त्यामुळें वढा-पुरीची माहिती केवळ त्या दृष्टीनेंच गोळा केलेली आहे इकडे वाचकांचें लक्ष वेधणें जरूर आहे.

वढापुरीच्या सभासदांची सुधारणा जरी उल्लेखनीय असली तरी त्या माहितीच्या आधारावर अवास्तव आशावादीपणा बाळ-गणें युक्त होणार नाहीं. वढापुरी सोसायटी ही पुणें जिल्ह्यांतील सभ्यांच्या आर्थिक परिस्थितीचें प्रातिनिधिक स्वरुप दाखवते असें म्हणणें सत्यास धरून निश्चित होणार नाहीं. वढापुरी सोसायटी ही पुणें जिल्ह्यांतील एक हद्दीच्या युद्धजन्य कारणानें सुधार-लेल्या सांपत्तिक परिस्थितीचें उत्तम प्रतीचें विशिष्ट उदाहरण होय व तिच्याबद्दल अल्प माहितीचा योग्य तोच अर्थ सारासार विचार-बुद्धीनें लावणें जरूर आहे; एवढी सूचना येथें देणें खास अस्थानीं होणार नाहीं.

'करा प्रपंच नेटका'

कर्तव्याचा कोयता !



मोक्षाच्या मार्गावरील
मुमुक्षूंपुढें मोठा प्रश्न उभा
असतो तो हा कीं
मोक्ष कशानें
मिळेल ?
वरील प्रश्नांतच सांवतांचें
उत्तर सांठविलें आहे !

डेक्कन—५ वा आठवडा—अपॉलो

व्ही. शांताराम आणि राजकमल यांची दुसरी कलाकृति

कथाः स. अ. शुक्ल

भक्तीचा मळा

दिग्दर्शक : केशवराव दाते [माली] प्रोड्युसर : व्ही. शांताराम

भूमिकाः—मा. कृष्णराव, बेबी नलिनी, अमीर कर्नाटकी.

डेक्कनमध्यें दररोज फक्त २ खेळ सायं. ७ व रात्रौ १० वा.

दर शनि. रवि. व सोमवारीं जादा खेळ दुपारीं ४ वाजतां

सर्व खेळ मराठी. बोलपट-भक्तीचा मळा.

अपॉलो— दररोज फक्त १ खेळ रात्रौ ११ वाजतां मराठी बोलपट.

रिझर्वेशन दररोज सकाळीं १० ते १२ फो व कौंप्लिमेंटरी पासेस अजिबात बंद.

डेक्कनमध्यें रविवार ता. ३ सप्टेंबर रोजीं सकाळीं १०-३० वाजतां,
(वार्नर ब्रदर्स) स्पेशल मॉर्निंगशो
BETTY DAVIS IN "NOW VOYAGER"

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा ए. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनी छापिलें व
ग. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनी 'दुर्गाविलास,' भांबुर्डा, ए. नं. ९२४।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
(टपाल खेरीज पाठ)
किरकोळ अंकास
दोन आणे.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष १० पुणें, बुधवार, तारीख ६ सप्टेंबर, १९४४ अंक ३६

दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

पुणें शहर

भांडवल :

(ता. ३१-५-४४ रोजीं)

अधिकृत व खपलेलें : रु. १०,००,०००
वसूल झालेलें : रु. ५,००,०००
रिझर्व्ह व इतर फंड : रु. १,०८,०००
एकूण खेळतें भांडवल : रु. ७५,००,००० चे वर

—: डायरेक्टर्स :—

श्री. धों. कृ. साठे, चेअरमन,

श्री. वा. पु. वर्दे, प्रो. वा. गो. काळे, श्री. न. ग. पवार,
श्री. श्री. गो. मराठे, श्री. त्रिं. वि. रानडे, श्री. र. चिं. सोहनी,
श्री. फ. दो. पदमजी, श्री. मा. रा. जोशी,
श्री. म. वि. गोखले, श्री. वि. ह. देशमूख

: शाखा :

पुणें ४, दलाल स्ट्रीट, मुंबई, जळगांव, नागपूर.
बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

सी. व्ही. जोग
मॅनेजर

दि बँक ऑफ इंडिया लि.

[स्थापना : १९०६]

अधिकृत भांडवल ... ... रु. २,००,००,०००
वसूल झालेलें भांडवल ... ... रु. १,००,००,०००
रिझर्व्ह फंड ... ... रु. १,२३,००,०००

मुख्य कचेरी: ओरिएण्टल बिल्डिंग्ज मुंबई.

मुंबईमधील शाखा : मुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

इतर शाखा : अहमदाबाद (मद्र. मुख्य ऑफिस), अहमदाबाद (एलिस ब्रिज शाखा), अहमदाबाद (स्टेशन शाखा), अमृतसर, अंधेरी (मुंबई शेजारीं), बांद्रे (मुंबई शेजारीं), कलकत्ता (क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्क्वेअर), जमशेदपूर, कराची, मद्रास, नागपूर (किंग्जवे), नागपूर (इतवारी बझार), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत, भुज (कच्छ).

लंडन एजन्ट्स : वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

डायरेक्टर्स : सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस. आय.(अध्यक्ष); श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के. नाईट; मि. ए. गेडिस; सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, जी. बी. ई., के. सी. आय. ई.; मि. दिनशा के. दाजी; श्री. रामनिवास रामनारायण.

करंट डिपॉझिट अकाउंट्स :

दररोजच्या रु. १०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षां कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

बिल्स व सेटलमेंट्सबद्दलचें बँक एक्सिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते, सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अलग कळून मागवावेत.

एजंट:—एच्. ए. करीमभाई

Telephone 779

GUEST HOUSE

TELEGRAM Guest House Poona 2.

पुना गेस्ट हाऊस

१००, लक्ष्मी रोड, पुणें २.

गिरगांव मुंबई नं. ४

महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

विविध माहिती

हिंदी साखरेचें उत्पादन

साखरेच्या १९४२-४३ च्या हंगामांत १२½ लक्ष टन साखरेचें उत्पादन झालें, असा अंदाज आहे. हिंदुस्थानांतील साखरेच्या उत्पादनाचा हा उच्चांक आहे. चालू वर्षी उत्पादन १२ लक्ष, १० हजार टन होईल, अशी अपेक्षा आहे. जावा, फिलिपाइन्स व रशिया येथील साखरेचें उत्पादन जागतिक बाजार-पेठांत आणखी कांहीं वर्षे येणें अशक्य असल्याकारणानें, हिंदी साखर कारखान्यांची तेजी इतक्यांत संपणार नाहीं, असें श्री. एम्. पी. गांधी ह्यांचें मत आहे.

काश्मीरमध्यें रेशमाचा धंदा

काश्मीर संस्थानांत तुतीची लागवड करून रेशमाचा धंदा मोठ्या प्रमाणावर सुरू करण्याचा प्रयत्न चालू आहे. रेशमी धागे तयार करणारा कारखाना काढण्यासंबंधीं वाटाघाटी चालू आहेत.

बँकांतील सरकारी नोकरांच्या रकमा

लाचलुचपतीचा ज्या सरकारी नोकरांवर आरोप आहे अशाच्या बँकांतील व इतर संस्थांतील रकमा त्यांस मिळूं नयेत अशी व्यवस्था करण्यांत येणार आहे, असें समजतें. खटला संपल्यावर आरोपीस शिक्षा झाली तर ह्या रकमा जप्त करण्यांत येतील.

दक्षिण आफ्रिकेची कोळशाची निर्यात

दक्षिण आफ्रिका दरमहा ४ लक्ष टन कोळसा संयुक्त राष्ट्रांकडे निर्यात करीत आहे.

"कोल प्रॉडक्शन फंड"

ब्रिटिश हिंदुस्थानांत तयार होणाऱ्या किंवा बाहेरून अथवा संस्थानी हद्दींतून ब्रिटिश हद्दींत येणाऱ्या कोळशावर पट्टी बसविण्यांत आली आहे, तिचा विनियोग कोळशाचें उत्पादनं, विक्री व वाटप ह्यांत सुधारणा करण्याकडे होईल.

निजाम सरकारची २ अब्ज रुपयांची योजना

उद्योगधंदे, शिक्षण व आरोग्य ह्यांत वाढ करण्यासाठी निजाम सरकारनें २ अब्ज रुपये खर्चाचा १४ वर्षांचा एक कार्यक्रम आखला आहे.

शेती सुधारण्यासाठी ३५ हजार नोकर हवेत

सर पी. एस्. स्वारेघाट, हिंदुस्थान सरकारच्या शेती खात्याचे ॲडि. सेक्रेटरी, ह्यांनीं तयार केलेल्या शेती विस्ताराच्या योजनेसाठी तज्ज्ञ व इतर लोक मिळून ३५ हजार नोकर नेमावे लागतील. मध्यवर्ती व प्रांतिक सरकारांच्या शेतकी खात्यांत सध्या एकूण ४ हजारच नोकर आहेत. ही प्रचंड तूट भरून काढण्याची कोशीस करण्यांत येईल.

पेटंटसाठी फक्त शेड्यूल्ड बँकांचे चेक

कंट्रोलर ऑफ पेटंटस ॲंड डिझाइन्स, कलकत्ता, ह्यांकडे पाठविण्याची फी इतके दिवस कलकत्ता शहराबाहेरील बिगर शेड्यूल्ड बँकांवरील चेकमार्फत धाडली तरी चालत असे. ह्यापुढें फक्त शेड्यूल्ड बँकांवरीलच चेक स्वीकारण्यांत येतील.

बंगाल–नागपूर रेल्वे सरकार घेणार

बंगाल–नागपूर रेल्वेचा हिंदुस्थान सरकारबरोबरचा करार सप्टेंबर, १९४४ अखेर संपत आहे. तो वाढविण्यांत येणार नाहीं. म्हणजे हिंदुस्थानांतील सर्व मोठ्या खासगी कंपन्यांच्या रेल्वेज आतां सरकारी मालकीच्या होतील.

युद्धकालीन हिंदी बँकिंग

"हिंदुस्थानांत चालू युद्ध सुरू झाल्यापासून बँकिंगची पुष्कळच वाढ झालेली आहे. परंतु बँकांस कर्जे घेणारे फारसे भेटत नाहींत. त्यामुळें सरकारी रोख्यांतील पैशाच्या गुंतवणुकीवरच त्यांचा नफा अवलंबून आहे. ज्या प्रमाणांत सरकारी रोख्यांचा त्यांस आश्रय करावा लागतो, त्या प्रमाणांत त्या बँका राहिल्या नसून त्या इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट बनल्या आहेत. चालू युद्धास प्रारंभ होण्यापूर्वी बँकांजवळील चालू ठेवी व कायम ठेवी ह्या सारख्याच प्रमाणांत होत्या; आतां बँकांच्या ठेवींपैकी तीनचतुर्थांश ठेवी चालू खात्यावरच्या आहेत. लोकांना आपले पैसे सहज काढतां येतील असे ठेववायास पाहिजे आहेत. हिंदी बँकांना फारसा नफा झालेला नाहीं. कांहीं बँकांच्या नोकरवर्गास पगार चांगला मिळत असला, तरी साधारणपणें हा नोकरवर्ग पिळलाच जास्त गेला आहे.":—प्रो. मुरंजन ह्यांचें भाषण.

THE BANK OF MAHARASHTRA, Ltd. POONA.

NOTICE.

Notice is hereby given that an Extra Ordinary General Meeting of the shareholders of the Bank will be held at the Registered Office of the Bank, Kakakuwa Mansion, Laxmi Road, Poona City, on Sunday the 8th October 1944 at 4 P. M. to consider and if thought fit to pass the following resolutions amending the Memorandum and Articles of Association of the Bank, which will be moved as special resolutions.

Resolution No. 1 :—"Resolved that the Authorised Capital of the Bank be raised from Rs. 10,00,000/- divided in to 20,000 shares of Rs. 50/- each to Rs. 50,00,000/- divided into 1,00,000 shares of Rs. 50/- each and that clause No. 5 of the Memorandum and Article No. 4 of the Articles of Association of the Bank be amended accordingly."

Resolution No. 2 :—"Resolved that in Article 80 the figure '250' be substituted in place of '100'."

Resolution No. 3 :—"Resolved that the following Article be substituted in place of the existing Article 94."

"94. That the qualification of a Director shall be his holding at least 250 shares in the Company of the nominal value of Rs. 12,500/- in his own right and not jointly with any other person or persons."

By Order of the Board,

Poona City,
28th August 1944. } C. V. Joag,
Manager.

N. B.—The Transfer Books of the Bank will be closed from the 4th day of October to the 14th day of October 1944, both days inclusive.

अनुक्रमणिका

	पृष्ठ
१ विविध माहिती ...	२८२
२ चलन परिषदेच्या निर्णयाचे परिणाम ...	२८३
३ शेअर बाजार... ...	२८४
४ स्फुट विचार	२८५
हिंदुस्थानास योग्य स्थान नाही !–शेती सुधारणा की औद्योगिक सुधारणा–स्वतःचें शेपूट पकडण्याचा कुत्र्याचा प्रयत्न–इंग्लंडची मदत घ्या–महाराष्ट्र बँकेच्या भांडवलांत वाढ.	
५ इंपीरिअल केमिकल इंडस्ट्रीजचा विस्तार ...	२८७

अर्थ

बुधवार, ता. ६ सप्टेंबर, १९४४

चलन-परिषदेच्या निर्णयाचे दूरगामी परिणाम

आंतर-राष्ट्रीय हुंडणावळीची व्यवस्था आणि जागतिक चलन पद्धति ह्यांची घडी युद्धोत्तर परिस्थितीच्या समाधानकारक आर्थिक घटनेच्या दृष्टीनें नीट बसवावी ह्या हेतूनें इंग्लंड व अमेरिका ह्या राष्ट्रांच्या प्रेरणेनें अमेरिकेंत एक परिषद बोलावण्यांत आली होती आणि तिच्या चर्चेंत हिंदुस्थान सरकारच्या प्रतिनिधींनीं भाग घेतला ह्याची माहिती आम्हीं दिलीच आहे. हिंदी प्रतिनिधींनीं ह्या देशाच्या हिताच्या दृष्टीनें, विशेषतः त्याच्या लंडनमध्यें साठलेल्या स्टर्लिंग बाकयांच्या योग्य विनियोगाबाबत केलेल्या सूचना चलन-परिषदेनें कशा फेटाळून लावल्या हेंहि आम्हीं सांगितलें आहे. वस्तुस्थिति अशी आहे कीं हिंदी प्रतिनिधींस जागतिक चलन परिषदेंतून हात हालवीत परत यावें लागलें आहे, कारण त्यांच्या कोणत्याच सूचना ग्राह्य समजल्या गेल्या नाहींत आणि मोठ्या बहुमतानें त्या अमान्य ठरवल्या गेल्या. श्री. ऑफ आणि सर वण्मुखम् चेट्टी हिंदुस्थानांत परत आले असून त्यांनीं चलन-परिषदेच्या कार्याचा वृत्तांत आपल्या देशबांधवांस मोकळ्या मनानें निवेदन केला आहे. जाहीर दिलेल्या मुलाखतींत आणि केलेल्या निवेदनांत त्यांनीं स्वतःची निराशा बेशीवर टांगली आहे आणि ह्या परिस्थितींतहि हिंदुस्थान सरकार व हिंदी जनता ह्यांनीं काय करणें अगत्याचें आहे ह्याची रूपरेखा आखली आहे. स्टर्लिंगमधील शिलकेपैकीं कांहीं भागाचे डॉलर्स मिळवण्याची सवड, जागतिक गंगाजळीचा उपयोग हिंदी उद्योगधंद्यांस भांडवल पुरवण्याकडे केला जाण्याची तजवीज, गंगाजळीच्या कारभारासाठी नेमल्या जावयाच्या मंडळांत ह्या देशाच्या प्रतिनिधींचा समावेश होण्याची आवश्यकता, इत्यादि बाबतींत हिंदी प्रतिनिधींनीं परिषदेपुढें मांडलेले मुद्दे व्यर्थ गेले. असें आहे तरी प्रस्तुत परिस्थिति आणिक बिघडूं नये म्हणून हिंदुस्थान सरकार व हिंदी मंडेवाले ह्यांनीं कोणती सावधगिरी बाळगली पाहिजे ह्याविषयीं श्री. ऑफ आणि सर वण्मुखम् ह्यांनीं महत्त्वाच्या सूचना केल्या आहेत.

आंतरराष्ट्रीय चलन गंगाजळीच्या योजनेंत असें एक कलम आहे कीं तीमध्यें भाग घेणाऱ्या सभासदांनीं युद्धसमाप्तीनंतरच्या चारपांच वर्षांत त्यांचेवर येणाऱ्या जबाबदाऱ्या ह्या संक्रिकाळांत पार न पाडल्या तरी चालेल. ह्या जबाबदारींपैकी एक बाब राष्ट्रीय चलनाच्या मोबदल्यांत इतर राष्ट्रांच्या चलनांतील हुंड्या देण्या-संबंधांतली आहे. ह्या कलमास अनुसरून चालू व्यवहारांत उत्पन्न होणाऱ्या देण्याच्या फेडीसाठी इतर राष्ट्रांवर हुंड्या देण्याचें राष्ट्रांस नाकारतां येईल. उदाहरणार्थ, हिंदुस्थानचें इंग्लंडला होणारें देणें स्टर्लिंगमध्यें जमा होईल त्याचे डॉलर्स ह्या देशाच्या सोईप्रमाणें व मागणीप्रमाणें देण्यास इंग्लंडवर बंधन रहाणार नाहीं. हा प्रश्न चलन-परिषदेंत श्री. ऑफ व सर वण्मुखम् ह्यांनीं ब्रिटिश प्रतिनिधींपुढें मांडला असतां त्यांनीं युद्धसमाप्तीनंतर तीन ते पांच वर्षेपर्यंत इंग्लंड हिंदुस्थानच्या देण्यापैकी स्टर्लिंगबद्दल इतर देशांवर हुंड्या देणार नाहीं असें रोखठोक उत्तर दिलें. हिंदुस्थानच्या शिलका लंडनमध्यें साचल्या आहेत आणि साचत आहेत, त्यांची योग्य विल्हेवाट ह्या देशाच्या सोयीप्रमाणें लावली जाण्याबाबत मागणी जोरानें होत आहे त्याचवेळीं युद्धसमाप्तीनंतरहि त्या शिलकांत कित्येक वर्षे भर पडत रहाणार आणि सध्याची अडचण अधिक कठिण होणार हें उघड आहे. ह्या स्थितीवर उचित उपाय योजण्याचें अगत्य हिंदी प्रतिनिधींनीं प्रतिपादलें आहे. हिंदुस्थान सरकारनें ब्रिटिश सरकाराशीं बोलणें करून सदरहु प्रश्नाचा तातडीनें समाधानकारक निकाल लावून घ्यावा असें त्यांचें कळकळीचें सांगणें आहे.

त्यांची दुसरी सूचना ब्रिटिश साम्राज्याची म्हणून एक डॉलरची गंगाजळी निर्माण केलेली आहे आणि तीमध्यें हिंदुस्थान धरून साम्राज्यांतर्गत देशांचें देणें झालेले डॉलर्स अंतर्भूत करण्यांत आलेले आहेत, तिचेविषयीं आहे. उदाहरणार्थ, हिंदुस्थानास अमेरिकेकडून येणारा पैसा डॉलर्सच्या स्वरूपांत मिळाला पाहिजे, पण अशा सर्व डॉलर्सचा एकूण फंड केवढा आहे आणि हिंदुस्थानचा भाग किती आहे ह्याची माहिती प्रसिद्ध झालेली नाहीं. ब्रिटिश सरकार स्वतःच्या धोरणास अनुसरून ह्या फंडांतल्या डॉलर्सचा उपयोग करतें आणि त्या प्रमाणांत हिंदुस्थानसारख्या देशांच्या डॉलर्सची रकम किती शिल्लक आहे हें समजत नाहीं. ह्याविषयींची माहिती आपण ती मुद्दाम मागितली असतांहि पुरवण्यांत आली नाहीं आणि हें युद्ध गुप्तिच असल्याचें कारण पुढें करण्यांत आलें असें श्री. ऑफ व सर वण्मुखम् ह्यांचें म्हणणें आहे. युद्धसमाप्तीबरोबर डॉलर संग्रह बंद करावा आणि प्रत्येक साम्राज्यांतर्गत देशास त्याच्या येण्याच्या प्रमाणांत त्यांतली शिल्लक वाटून देण्यांत यावी अशी सूचना त्यांनीं केली आहे. हिंदी फडनविसांनीं युद्धोत्तर औद्योगिक संवर्धनासाठी डॉलर्सचा संचय करण्यांत येत असल्याचें सांगितलें आहे खरें, पण ह्या संग्रहांत किती रकमा टाकल्या आहेत आणि हिंदुस्थानच्या अमेरिकेकडून येणें झालेल्या पैशाशीं त्यांचें काय प्रमाण आहे हें सरकारनें जनतेस सांगितलें पाहिजे अशी त्यांची मागणी आहे. आपल्या देशाची बाजू निस्पृहपणानें हिंदी प्रतिनिधींनीं चलन-परिषदेंत आणि येथें मांडल्याबद्दल त्यांचें अभिनंदन केलें पाहिजे. तेथें उपस्थित असलेल्या इतर राष्ट्रांच्या प्रतिनिधि मंडळांचें प्रमुखत्व तहेशीर नागरिकांकडे होतें. हिंदुस्थान ह्या नियमास अपवाद होता ह्या घटनेकडे त्यांनीं लक्ष वेधलें आहे ही मोठ्ट चिंतनीय आहे.

शेअर बाजार

(श्री. व. त्रि. लोणकर, एम. ए., बी. कॉम.,
२४ डे. जि. पुणें, ४)

दोस्त सैन्यांचे सर्व आघाडीवरील आगे कूच, रुमेनिया, बल्गेरिया यांच्या तहाच्या बातम्या, डाईगचे सहामाही रु. २५ च ब्याज व टेक्सटाईल बोर्डानें कमी केलेले कापडाचे व सुताचे भाव या मंदीवाल्यांना मिळालेल्या अनुकूल घटनांनीं सर्व बाजार खाली चालले आहेत. डाईंग १७७२।८, नागपूर, ३८७, गोकाक २९१, कोहिनूर ५७८, स्वदेशी ४९९, डिफर्ड २०८२।८ ऑर्डिनरी ३९० असे प्रमुख भाव शुक्रवारीं संध्याकाळीं बंद राहिले. नेहमीप्रमाणें भाव आणखी खाली किती जातील, अथवा कुठें थांबतील, व वर केव्हां येतील असे अधीर प्रश्न प्रत्येकजण विचारत आहे. याला निश्चित उत्तर फक्त ब्रह्मदेवच देऊं जाणे; पण सामान्य अनुभवी दलाल असें सांगूं शकेल कीं आजपर्यंतचा अनुभव असा आहे कीं एकदा बाजार खालीं जाऊं लागला कीं आणखी त्याखालची पातळी लोकांना दिसते. यांच्या उलट वर जाऊं लागला की वरची मर्यादा दिसते. अपोलोसारखा शेअर मागील वर्षी ८ रु. २ आ. पर्यंत गेला होता तो परवां ३ रु. ११ आ. इतका खालीं उतरला आहे. आतां तो याच्या खाली जाणें म्हणजे ज्या गिरणींत मागील वर्षी ८० लाख नफा निघाला व चालू सालीहि ५० लाख निघणें शक्य आहे, जिनें ६ आणे ब्याज दिलें व यंदा किमान ४ आणे देणें शक्य आहे, ज्या गिरणीचे चालकत्वाचे हक्क ४० लक्ष रुपयापर्यंत घेतले गेल्याचें समजतें ती गिरणी एकदम शून्यवत् अशी लोकांना भासूं लागली असा अर्थ होतो. यामध्यें सारासार विचारच शिल्लक रहात नाहीं असें म्हणावें लागतें. तेव्हां ज्यांना तह झाल्यामुळें हिंदी उद्योगधंदे मटकन् बसणार अशी भीति वाटत असेल त्यांनीं आपले शेअर्स खुशाल विकून टाकावेत. बाकीच्या मंडळींनीं दुहेरी मार खाण्याचे टाळून आपल्या शेअर्सना जळवांच्यावर चिकटून बसावें. दुहेरी मार बसतो तो असा कीं, आतां खूप पडले व आणखी नुकसान टाळावें म्हणून विकावयाचे व वरती आणखी दुप्पट मंदी करावयाची. येवढ्यांत बाजार वर जात आहेत म्हणून पुन्हा वरच्या भावांत मंदी कापावयाची व दुप्पट तेजी करावयाची. त्याला कुठें शेवटच नाहीं अशी स्थिति होते. यापुढील पंधरा दिवसांत जरी तह प्रत्यक्ष झाला तरी बाजार खालीं जाण्याचें थांबून वर यावयास लागतील व नच झाला आणि लढाई लांबणार असें दिसूं लागलें तर ते दुप्पट जोरानें वरती जातील. नुकसानींत विकणाऱ्यांनीं पुढें पैसे कोठे ठेवावयाचे हाही एक विचार करावा. जे चिकटून बसणार आहेत त्यांच्यामागें देशांतील एकूण वाढलेल्या चलनाचा फारच मोठा पाठिंबा आहे. कापड, सूत व लोखंड, पोलाद यांना आलेली भरभराट एकदम नाहींशी होणारी नाही ही लक्षांत घेण्यासारखी गोष्टही त्यांच्या बाजूनें आहे.

* * * *

टाटा आयर्न अँड स्टील कंपनी डिबेंचर्स काढणार आहे. अशी एक बातमी आहे, परंतु ती अधिकृत नाहीं. हीं डिबेंचर्स निघाल्यास तीं अल्प व्याजाचीं असणार व डिफर्डवाल्यांचा फायदा वाढणार हें स्पष्टच आहे.

चिनी लोकांस अंगवळणी पडलेल्या आपत्ती

"चीनमध्यें सध्या विशेष घडामोडी चालू नाहींत असें सांगण्यांत येतें, तेव्हां मला मी चीनमध्यें असतांना एके दिवशीं झालेल्या गोष्टींची आठवण होते. सुमारें ४०० मैल चालून एक चिनी फौजेचा भाग आला होता. त्यांतील बहुतेक सैनिक तरुण शेतकरी होते व त्यांचा गणवेष अगदीं फाटून गेलेला आणि त्यांच्या बंदुका नामधारीच होत्या. हे सैनिक विश्रांति घेत असतां त्यांवर जपान्यांनीं अचानक हल्ला केला. तेव्हां १½ मैल लांबीचा रस्ता चिन्यांचे रक्तानें माखून गेला असल्याचें व खालच्या नदींत शेकडो मृत चिनी सैनिक पडले असल्याचें दृश्य मला दिसलें. मीं चिनी व जपानी वृत्तपत्रें चाळून पाहिलीं, त्यांत ह्या झटापटीचा उल्लेखहि आढळला नाहीं! असे प्रसंग नेहमीच घडतात, त्यांत नवीन कांहींच नव्हतें. चीन अथांग तगून आहे, त्याचें हीं असामान्य गोष्ट हेंच मर्म आहे. चीन कोलमडून पडण्याची भाषा चुकीची आहे.":-एका ब्रिटिश लेखकाच्या, स्वतःच्या अनुभवावर आधारलेली ही हकीकत चीनमधील परिस्थितीवर चांगला प्रकाश पाडील.

रावेर पीपल्स को. बँक लि.

वरील बँकेचें वसूल भांडवल २१,२२५ रुपयांचें असून ५,३४८ रुपयांचे रिझर्व्ह व इतर फंड आहेत. ठेवी १,२६,४८७ रुपयांच्या आहेत. ५९,८२१ रुपयांचीं कर्जे दिलेलीं आहेत. "स्थावर व अंगावरील कर्जाचा व्यवहार पाहिजे तितका समाधानकारक नाहीं. मुदतमागणीकडेच सभासदांची प्रवृत्ति आहे. हें ठीक नाहीं." वर्ष अखेर बँकेस १,७३७ रु. निवळ नफा झाला. भागीदारांस ५% डिव्हिडंड मिळेल. चालू साली रावेर म्युनिसिपॅलिटीनेंहि मु. ठेव बँकेंत ठेवली आहे. राजे जे. आर. देशमुख, बी. एससी. ॲग्रि. हे बँकेचे अध्यक्ष व श्री. श्री. ना. उपळीकर हे सेक्रेटरी आहेत.

नवव्या वर्षांत पदार्पण

पूना गेस्ट हाऊसनें अनंत चतुर्दशीचे दिवशीं नववे वर्षांत पदार्पण केलें. के. सरपोतदार यांचे मागें त्यांची धर्मपत्नि व चिरंजीव यांनीं चिकाटीनें मजल गांठून गेस्ट हाऊस महाराष्ट्रीयांचे आवडीचें केलें आहे. वरील दिवशीं श्रीसत्यनारायणाची पूजा करून शहरांतील प्रतिष्ठित नागरिकांस व आश्रयदात्यांस तीर्थप्रसाद दिला. उत्तम आदरातिथ्य व स्वच्छता इकडे स्वतः श्री. बंडोपंत हे जातीनें व्यवस्था पहात असतात. आम्हीं त्यांचे पुढ्यांत त्यांना सुयश इच्छितों.

पार्सलांत कोणती वस्तु घातली?

पोस्टानें पाठविण्याच्या सर्व पार्सलांवर, तें पाठविणारानें आंत काय वस्तु आहे, हें स्पष्ट सांगणारा मजकूर पार्सलावर लिहिला पाहिजे, असा नियम झाला आहे.

एका वर्षांत ८ हजार खास लष्करी आगगाड्या

३१ मार्च, १९४४ अखेर संपलेल्या वर्षी हिंदी रेल्वेजनीं ८,००० लष्करी खास आगगाड्या सोडल्या व त्यांनीं ५४,००,००० मैलांचा प्रवास केला.

व्यापार मंत्र्यांकडे शिष्टमंडळ

पेपर कंट्रोलर (एकॉनॉमी) ऑर्डरमुळें विमा कंपन्यांची कागदाबाबत कशी कुचंबणा होत आहे, हें हिंदुस्थान सरकारच्या व्यापार मंत्र्यांचे कानावर घालण्यासाठी आयुर्विमा कंपन्यांच्या संस्थेचें एक शिष्टमंडळ जाणार आहे.

स्फुट विचार

हिंदुस्थानास योग्य स्थान कां नाहीं ?

जागतिक चलन–परिषदेंत हिंदुस्थानच्या सूचना कशा फेटाळल्या गेल्या ह्याचा वृत्तांत हिंदी प्रतिनिधींनींच दिला आहे त्याचें दिग्दर्शन आजच्या अग्रलेखांत आम्हीं केलें आहे. त्यांनीं दिलेली सर्वच माहिती अत्यंत बोधप्रद असल्यानें तीमधील कांहीं बाबींचा उल्लेख येथें करण्यांत येत आहे. जागतिक चलन व्यवस्थेच्या म्हणजे आंतरराष्ट्रीय हुंडणावळीच्या आधाराची गंगाजळी निर्माण केली जाईल तिची एकूण रक्कम ८८० कोटि डॉलर्स राहील. तिच्यामध्यें सभासद राष्ट्रांनीं आपापल्या हिश्श्याची भरती करावयाची आहे. ही वाटणी निरनिराळ्या देशांच्या व्यापारी महत्त्वाच्या प्रमाणांत व्हावयास पाहिजे. पण ती ह्या सरळ तत्त्वावर करण्यांत आलेली नाहीं. अमेरिकेच्या हिश्शास २७५ कोटि, इंग्लंडच्या १३० कोटि, सोव्हिअट रशियाच्या १२० कोटि, चीनच्या ५५ कोटि, व हिंदुस्थानच्या ४५ कोटि ह्या रीतीनें वाटणी झाली आहे. हिंदुस्थानचें स्थान तीन सहावें आहे आणि त्यांच्या हिश्श्याच्या प्रमाणांत पहिल्या पांच राष्ट्रांस गंगाजळीची व्यवस्था पाहणाऱ्या कारभारी मंडळांत कायमची जागा मिळावी असें ठरवण्यांत आल्यानें हिंदुस्थान त्यांतून गळला आहे. चीनचा नंबर ह्या देशाच्या वर कसा लागतो हें समजणें कठीण आहे. केवळ आर्थिक कसोटी ह्या बाबतींत लावली जाणें योग्य होतें आणि तसें झालें असतें तर हिंदुस्थानास कारभारी मंडळांत जागा सहज मिळाली असती. पण ह्या प्रश्नाचा निकाल केवळ राजकीय दृष्टीनें केला गेल्यामुळें हिंदुस्थानास अन्याय झाला आहे असें श्री. श्रॉफ व सर षण्मुखम् चेट्टी ह्यांचें म्हणणें आहे.

शेती सुधारणा आधीं, कीं औद्योगिक सुधारणा आधीं ?

प्रोफेसर ए. व्ही. हिल, ह्यांनीं हिंदी लोकांच्या उद्धारासंबंधीं व्यक्त केलेल्या विचारांत शेती सुधारणेस विशेष महत्त्व दिलेलें आहे, हें प्रसिद्धच आहे. औद्योगीकरणाचीच हिंदुस्थानास मुख्यतः गरज आहे, ही समजूत चुकीची असून लोकसंख्येची वाढ, आरोग्य, शेती, अन्नपुरवठा हे प्रश्न अधिक महत्त्वाचे आहेत, असें त्यांचें सांगणें आहे. हिंदुस्थानांतील अन्नपुरवठ्याबाबत परिस्थिति, बंगालमधील दुष्काळ, इत्यादि गोष्टींमुळें शेतीच्या उत्पादनाची वाढ करण्याची आवश्यकता स्पष्ट झाली आहे, परंतु औद्योगीकरणास कमी महत्त्व दिलें जाणें ह्याचा अर्थ आजपर्यंतच्या हिंदी पुढाऱ्यांच्या मागणीस बाजूला सारणें असा होऊं नये, अशी दक्षता बाळगली गेली पाहिजे. शेतीप्रधान हिंदुस्थानास अद्याप शेतीचे बाबतच पुष्कळ व तात्काळ सुधारणा केली पाहिजे; उद्योगधंदे पुढें काढले तरी चालतील, हें खरें भासलें तरी पटत नाहीं, अशी आपली विचित्र स्थिति झाली आहे. " कारखाने शहरांतून एकत्रित झालेले चटकन नजरेस भरतात आणि कारखानदार श्रीमंत व वजनदार असतात " एवढ्यासाठी खेडेगावी लोकांकडे दुर्लक्ष करूं नका, असा प्रो. हिल ह्यांचा आग्रह आहे.

स्वतःचें शेपूट पकडण्याचा कुत्र्याचा प्रयत्न

प्रो. हिल ह्यांची विचारसरणी खालील प्रमाणें आहे:–"हिंदी लोकसंख्येंत दरसाल ६० लक्षांची भर पडत आहे. कारखान्यांत इतक्या लोकांना काम मिळणें अशक्य असल्यानें, शेतीवर अवलंबून असणाऱ्यांची संख्या वाढतच जाणार. शेती व अन्नाचें उत्पादन हा हिंदी प्रश्नाचा गाभा आहे; कारखान्यांची वाढ हा नव्हे. हिंदी लोकांपैकीं फक्त १२% व स्त्रियांपैकीं फक्त ५% लोकांचें लिहितां वाचतां येण्याइतकेंच शिक्षण झालेलें आहे, ही केवढी अडचणीची गोष्ट आहे ! हिंदी लोकसंख्या एकसारखी वाढत असल्याकारणानें, अन्नपुरवठ्याचा प्रश्न हा हिंदुस्थानास कायमचा जडलेला रोगच होय," असें प्रो. हिल म्हणतात. "सध्याच्या अन्नपुरवठ्यांत ५०% वाढ झाली, म्हणजे लोकांना साधारण बरें आरोग्य राखतां येईल. अन्नपुरवठा वाढला कीं आरोग्य सुधारेल आणि त्याचा परिणाम आपली लोकसंख्येंत भर पडण्यांत होईल ! पुनः कालांतरानें उपासमार, मृत्यू आणि जनन ह्यांच्या चढाओढीस स्थिरता प्राप्त होईल, असें हें चक्र चालू राहून कुत्र्यानें स्वतःची शेपटी पकडण्याच्या प्रयत्नासारखाच आरोग्य व सुदृढता ह्यांचा प्रयत्न ठरणार हें स्पष्ट आहे." प्रो. हिल ह्यांच्या मतें, हिंदी प्रश्नाचें स्वरूप असें आहे आणि संततिनियमन हाच त्यावर तोडगा आहे असें ते म्हणतात. इंग्रज स्त्रियांपेक्षां हिंदी स्त्रिया दुप्पट अर्भकांना जन्म देतात. त्यांपैकीं निम्म्यांस २२ व्या वर्षाचे अगोदरच मृत्यु येतो, हें खरें असलें तरी त्यांना लोकसंख्येंत भर टाकण्यास सातआठ वर्षे मिळतातच. मनुष्याची आर्थिक स्थिति सुधारली म्हणजे जननसंख्या कमी होत जाते असा सर्वत्र अनुभव आहे. परंतु हिंदुस्थानांत अनुभव उलट येतो, असें सांगताना प्रो. हिल ह्यांनीं कांहीं आकडे दिले आहेत, ते उद्बोधक आहेत. पंजाब हा हिंदुस्थानांतील सर्वांत श्रीमंत प्रांत आहे; तेथें जननाचें दर हजारीं प्रमाण ४१ आहे; सबंद हिंदुस्थानचें सरासरी प्रमाण ३४ आहे व बंगालमधील सरासरी प्रमाण ३० आहे. तेव्हां हिंदी लोकांचें नीट पोषण होऊन त्यांचें आरोग्य सुधारलें तर हिंदी लोकसंख्येच्या पोटापाण्याचा प्रश्न अधिकच बिकट होणार, असें आम्हीं समजावयाचें काय ?

इंग्लंडची मदत घ्याः राजकीय गोष्टी घुसडूं नका

औद्योगीकरणामुळें जननसंख्या उतरली, तरी जोंपर्यंत हिंदुस्थान हा देश शेतीप्रधान रहाणार तोंपर्यंत ही बाब फार परिणामकारक ठरणार नाहीं. " शिक्षण, विशेषतः स्त्रियांचें शिक्षण ह्या कामीं उपयोगी ठरेल " असें प्रो. हिल म्हणतात. त्याला किती वर्षे लागतील ? शास्त्रशुद्ध शेती, सरकारी नियंत्रण व सामाजिक रूढी ह्यांत आमूलाग्र बदल झाल्याशिवाय हिंदी शेतकऱ्यांस उर्जितावस्था येणार नाहीं, असें सांगून प्रो. हिल म्हणतात, " आनंद, भरभराट, जगांतील राष्ट्रांत मानाचें स्थान, इत्यादि हिंदुस्थानाचे वाट्यास येऊं शकतील, परंतु त्यासाठी कडक उपाययोजना, सक्त मेहनत, शास्त्रीय पद्धति इत्यादींचा अवलंब केला पाहिजे; देशांतील सर्व लोकांत सहकारी वृत्ति हवी व सुधारणांचा अंगीकार करण्याची लोकांची तयारी पाहिजे. इंग्लंड मदत करण्यास तयार आहे; आकलन व परिशीलन ही त्याची पहिली पायरी आहे; राजकीय द्वेष व मांडणें टाळणें ही दुसरी पायरी आहे आणि इंग्लंडनें वाढत्या अनुभ-

बाचा व सहायाचा फायदा हिंदुस्थानास देणें ही तिसरी व अखेरची पायरी आहे." प्रो. हिल ह्यांच्या म्हणण्याचा मथितार्थ असा: हिंदी लोकांनी आपल्या जगण्याचा व पोटापाण्याचा प्रश्न सोडविणें हें त्यांचें आय कर्तव्य आहे. हें कार्य दुर्घट आहे व त्याकरितां इंग्लंडची मदत आवश्यक आहे. इंग्लंड ती देईल, परंतु हिंदी लोकांनी राजकीय बाबी घुसडून देऊन इंग्लंडचा सहकार्याचा हात दूर करूं नये. म्हणजे सुरक्षा शक्य होईल. औद्योगिक प्रगति मागाहून करतां येईल. हें सर्व घडून येण्यास फार दीर्घ काळ लागेल. प्रो. हिल ह्यांनीं स्पष्टपणें मांडलेले हे विचार निःसंशय विचारास चालना देणारे आहेत.

महाराष्ट्र बँकेच्या भांडवलांत वाढ

बँक ऑफ महाराष्ट्र लि. ची १९३५ साली स्थापना झाली, त्यावेळीं तिचें अधिकृत भांडवल १० लक्ष रुपये व विक्रीस काढलेलें भांडवल ५ लक्ष रुपये होतें. हे सर्व भाग खपून गेल्यानंतर १९४२ च्या अखेर शिल्लक राहिलेले ५ लक्ष रुपयांचे भाग प्रत्येक ५० रुपयांच्या भागावर ५ रुपये वाढाव्यानें विक्रीस काढण्यांत आले, तेहि सर्व खपून बँकेचें वसूल भांडवल ५ लक्ष रुपये झालें व रिझर्व्ह आणि इतर फंड १ लक्ष, ८ हजार रुपयांवर गेले. अशा रीतीनें शेड्यूल्ड बँकांच्या यादींत दाखल होण्यास महाराष्ट्र बँक पात्र झाली. बँकेचें अधिकृत भांडवल आतां ५० लक्ष करण्यांत येत आहे व त्यांतून विक्रीस आणखी भांडवल काढलें जाईल. अशा रीतीनें, महाराष्ट्र बँक आपल्या स्वतःच्या भांडवलाचा पाया अत्यंत मजबुत करीत असून, आगामी बँकिंगचा कायदा व युद्धोत्तर परिस्थिति ह्यांस यशस्वी तोंड देऊन झपाट्यानें प्रगति करण्याची तिची तयारी आहे. भागीदारांस मिळणारा ४½% कर-माफ डिव्हिडंडचा दर सुरक्षित भांडवल गुंतविणारांस आकर्षक असाच आहे. वाढत्या भांडवलाबरोबर भागीदारांची कमाल मतसंख्याहि सध्याच्या १०० ची २५० करण्यांत यावी आणि डायरेक्टर होण्यास सध्या ५ हजार रुपयांचे १०० भाग पुरतात ते १२½ हजार रुपयांचे २५० लागावेत, अशीहि बोर्डाची सूचना आहे. बँक स्थापन होतेवेळीं कमाल मतसंख्या २५ होती व डायरेक्टरास सध्याप्रमाणेंच १०० भाग घ्यावे लागत होते. बँकेच्या मेमोरँडम व आर्टिकल्समध्यें त्याप्रमाणें दुरुस्त्या करण्यासाठी बँकेची विशेष साधारण सभा ता. ८ ऑक्टोबर रोजी बोलावण्यांत आली आहे. बँकेच्या मुंबई, डेक्कन जिमखाना, जळगांव, नागपूर, गिरगांव (मुंबई) व खडकी येथें शाखा आहेत.

पुणें सेन्ट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेचे भागीदार यांस

नोटीस

आपल्या बँकेची वार्षिक साधारण सभा रविवार तारीख २४ सप्टेंबर १९४४ रोजीं सायंकाळीं ५-३० वाजतां पुणें येथें नूतन मराठी विद्यालयाचे असेंब्ली हॉलमध्यें भरून तींत वार्षिक अहवाल, ताळेबंद, नफा वांटणी, पोटनियम दुरुस्ती, डायरेक्टरांचे बोर्ड व हिशेब तपासनीसांच्या निवडणुकी वगैरे वार्षिक साधारण सभेचीं नेहमींचीं कामें करण्यांत येतील. डायरेक्टर व हिशेब तपासनीस यांची निवडणूक सदर इमारतींत होणार असून मतें देण्याची वेळ सदर दिवशीं सकाळीं ९ ते १२-३० अशी ठेवली आहे. तरी सभासदांनीं जरूर यावें अशी विनंति आहे. कळावें,
तारीख १ सप्टेंबर, १९४४.

बोर्डाचे हुकुमावरून,
द. वि. चितळे,
मॅनेजिंग डायरेक्टर.

भक्ताच्या अंगास घाम सुटतांच
भगवंताची मूर्ती पाझरूं लागली !

व्ही. शांताराम आणि राजकमल यांची दुसरी कलाकृति

प्रोड्यूसरः— व्ही. शांताराम.
दिग्दर्शकः— केशवराव दाते.

भक्तीचा मळा (माली)

भूमिकाः— ● मास्तर कृष्णराव ● बेबी नलिनी ● अमीर कर्नाटकी ● अमीना ● सामंत ● राजा पंडित

—: ७ वा आठवडा ! :—

डेक्कन— दररोज २ खेळ ७ व १० वा.
दर शनि. रवि. सोम. जादा खेळ दुपारीं ४ वाजतां
सर्व खेळ मराठी "भक्तीचा मळा"

अपॉलो— रोज रात्रौ ११ वाजतां फक्त मराठी
"भक्तीचा मळा"

रिझर्व्हेशन फक्त दर शनि. व रविवारीं —x— फ्री कॉंप्लिमेंटरी व कन्सेशन पासेस अजिबात बंद !

इंपीरिअल केमिकल इंडस्ट्रीजचा विस्तार

२६ उपकंपन्या—१०॥ कोटि पौंड ठोक उत्पन्न—संशोधनासाठी १९०० शास्त्रज्ञ व सालिना २२ लक्ष पौंड खर्च

इंपीरिअल केमिकल इंडस्ट्रीजच्या अंतरंगाविषयीं व तिच्या कार्यविस्ताराविषयीं माहिती "अर्था" मध्यें नुकतीच देण्यांत आली आहे. ह्या कंपनीचे हातपाय हिंदुस्थानांत पसरण्याचीं चिन्हें दिसत आहेत. कंपनीनें आपलें बस्तान येथें बसविलें, तर हिंदी हितसंबंधांस त्यामुळें केवळ्या जबरदस्त प्रतिस्पर्ध्यांस तोंड द्यावें लागेल, ह्याची कल्पना इं. के. इंडस्ट्रीजच्या ताज्या अहवालांतील आकड्यांवरून येईल. कंपनीची सातवी वार्षिक सभा लंडनमध्यें नुकतीच भरली होती. १९४३ चे ताजे आंकडे त्यावेळीं उपलब्ध नव्हते, म्हणून १९४२ चेच आंकडे भागीदारांस सांगण्यांत आले. कंपनीच्या उपकंपन्यांची संख्या ९६ आहे, त्या सर्वांना व मुख्य कंपनीला मिळून १०½ कोटि पौंड उत्पन्न झालें. कच्चा माल, कारखाने चालविणें, वहातूक खर्च, व्यवस्थेचा खर्च, इत्यादींवर ५½ कोटि पौंड खर्च झाले व ३५ लक्ष पौंड घसाऱ्यासाठी बाजूस काढण्यांत आले. ४½ कोटि पौंड नफा उरला. त्यांत कंपनीची मालमत्ता, गुंतवणूक व इतर बाबींवरील १५ लक्ष पौंडांचें उत्पन्न मिळविलें म्हणजे उत्पादन व विक्री ह्यांवरील खर्च भागून ४ कोटि, ७० लक्ष पौंड रकम उरते. मजुरी, पगार, पेन्शनें, कर, इत्यादि भागवून ४० लक्ष पौंड निवळ नफा उरला, त्यांतील ३० लक्ष पौंड भागीदारांस वाटण्यांत आले.

संशोधनावरील खर्च

संशोधन व वाढ ह्याकडे चांगलें लक्ष पुरविण्यावरच इं. के. इंडस्ट्रीज लि. सारख्या कंपनीची भरभराट अवलंबून आहे. १९४३ सालीं कंपनीनें ह्या बाबींवर २२ लक्ष पौंड खर्च केला! ९०० शास्त्रज्ञ कंपनीच्या प्रयोगशाळांतून काम करीत आहेत व त्यांचे हाताखालीं वाकबगार असे १,००० सहायक आहेत.

कंपनीवरील कडक टीका

"कंपनीवर होणाऱ्या कडक टीकेचें मूळ अज्ञान हें असून त्या टीकेची पार्श्वभूमि राजकीय आहे. "मोनॉपॉली" हा शब्द कंपनीचे व्यवहाराबाबत वापरण्यांत येतो. ह्या टीकेस माझें उत्तर असें, कीं कंपनीच्या भागीदारांची संख्या १,८०,००० आहे व कंपनीच्या नोकरींत १,००,००० नोकर आहेत. औद्योगिक प्रगति, विस्तार, नोकरवर्गाच्या परिस्थितींत सुधारणा, आमच्या गिऱ्हाइकांचा वाढता संतोष व भागीदारांस योग्य डिव्हिडंड ह्याकडेच कंपनीचे मुख्य लक्ष आहे; नफेबाजीकडे नाहीं." कंपनीच्या अध्यक्षांचें लोकांच्या टीकेस वरील प्रकारचें उत्तर आहे. उत्पादन मर्यादित करून किंमती भारी ठेवण्याबद्दलहि कंपनीस दोष देण्यांत येतो, परंतु तोहि निराधार आहे, असेंहि अध्यक्षांनीं सांगितलें.

भारत संरक्षण कायद्याखाली बद्ध केलेल्या नोकरांना भरपगारी रजा

डिफेन्स ऑफ इंडिया रुल्सखाली बद्ध केलेल्या, कलकत्ता कॉर्पोरेशनच्या सर्व नोकरांना ते मुक्त होईपर्यंत सर्व मुदतीची संबद्ध पगाराची खास रजा देण्यांत यावी, असा ठराव कलकत्ता कॉर्पोरेशननें केला आहे.

डोक्यांतील उवा १ तासांत मारण्याचा आश्चर्यकारक शोध

लायसॉफ

बाटली किंमत १ रु. ट. स. निराळा

दोन वेळा उपयोग

दि मालोरा केमिकल कं. लि.

— हिराबाग, पुणें २ —

महाराष्ट्रांत लेखी गॅरंटी देणारे पहिले व फक्त १ च

गोल्ड मेडॅलिस्ट् व मराठी वळणाचे स्पेशॉलिस्ट्

पेन्टर बेडेकर, ए. जी.,

बुधवार चौक, पुणें २ (सिटी)

बाहेरगांवचीं कामें रेल्वे, मोटार अगर पोस्टानें पाठवूं.

पुण्यांतील

आदर्श निवासस्थान व भोजनालय

छाया लॉजिंग व बोर्डिंग हाऊस

बुधवार चौक, पुणें २.

गांवोगांवीं विक्रेते पाहिजेत.

A 9

क्विनीनचे ऐवजीं मलेरियाकरतां खात्रीचा अनुभविक उपाय म्हणून 'एनाईन' वापरतात.

अलपाईन प्रॉडक्टस् (इंडिया) पुणें २

सध्यांच्या टंचाईच्या काळांत जीवनद्रव्ये कमी पडतात.
जीवनद्रव्यांनीं (Vitamins) युक्त असे
(सदुपयोगी खात्यानें मान्यता दिलेले)
टोमॅटो केचप (गोड) व
टोमॅटो सॉस [तिखट व आंबट]
आजच मागवा व जीवनद्रव्यांची वाटणारी
उणीव भरून काढा.
रुरल प्रॉडक्टस कंपनी लि. पुणें
बिझिनेस ऑफिस: ९११ अ सदाशिव, पुणें २.

प्रगतिपथावरील नवा
मे ला चा — द ग ड
सन १९४३ अखेर
नव्या कामांत ११० टक्के वाढ
चालू कामांत १०० टक्के वाढ
आयुर्विमानिधींत ८० टक्के वाढ
— आपला विमा किंवा एजन्सी आजच घ्या —
दि औंध म्यूच्युअल लाइफ
ॲश्युरन्स सोसायटी लि., पुणें.
आर. जी. साठे सुपरिंटेंडेंट
व्ही. जी. जोशी मॅनेजिंग डायरेक्टर

दि ब्रिटिश इंडिया जनरल इन्शुअरन्स कं. लि.
(स्थापना : १९१९)
आम्ही आयुर्विम्याखेरीज करून आग, मरीन, अपघात, इत्यादींचे
सर्व प्रकारचे विमे स्वीकारतों.
—: चेअरमन व मॅनेजिंग डायरेक्टर :—
सर होमी मेहता, के. बी. ई., जे. पी.
पुणें शाखा :
मोति माणिक मॅन्शन,
लक्ष्मी रोड.
हेड ऑफिस :
मेहता हाऊस,
अपोलो स्ट्रीट, मुंबई.

न्यू इंडिया इंडस्ट्रीज लि.
(Approved Re-traders and Approved Contractors)
२६ लॅमिंग्टन नॉर्थ, मुंबई ११.
अध्यक्ष:—श्री. ग. स. मराठे, ॲक्चुअरी.
महाराष्ट्रांतील रबराचा प्रमुख कारखाना
★ गिरणीचे रोलर्स ★ रबरी हातमोजे ★ छापखान्यांचे रोलर्स
★ रीमोल्ड टायर्स ★ रबरी वॉशर्स ★ सॉलिड व्हील्स
व इतर रबरी माल तयार होतो.
पु. ग. मराठे
मॅनेजिंग डायरेक्टर.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व
ग. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' भांबुर्डा, घ. नं. ९२७।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक. अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
(टपाल हंशील माफ)
किरकोळ अकास
दोन आणे.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष १० पुणें, बुधवार, तारीख १३ सप्टेंबर, १९४४ अंक ३७

दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

पुणें शहर

भांडवल :

(ता. ३१-५-४४ रोजीं)

अधिकृत व खपलेलें	:	रु. १०,००,०००
वसूल झालेलें	:	रु. ५,००,०००
रिझर्व्ह व इतर फंड	:	रु. १,०८,०००
एकूण खेळतें भांडवल	:	रु. ७५,००,००० चे वर

—: डायरेक्टर्स :—

श्री. धों. कृ. साठे, चेअरमन,
श्री. वा. पु. वर्दे, प्रो. वा. गो. काळे, श्री. न. ग. पवार,
श्री. श्री. गो. मराठे, श्री. त्रिं. वि. रानडे, श्री. र. चिं. सोहनी,
श्री. फ. दो. पदमजी, श्री. मा. रा. जोशी,
श्री. म. वि. गोखले, श्री. वि. ह. देशमुख

: शाखा :

पुणें ४, खडकी, दलाल स्ट्रीट, (मुंबई),
गिरवांग (मुंबई), जळगांव, नागपूर.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

सी. व्ही. जोग
मॅनेजर

दि बँक ऑफ इंडिया लि.

[स्थापना : १९०६]

अधिकृत भांडवल	रु.	२,००,००,०००
वसूल झालेलें भांडवल	रु.	१,००,००,०००
रिझर्व्ह फंड	रु.	१,२३,००,०००

मुख्य कचेरी: ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

मुंबईमधील शाखा : बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

इतर शाखा : अहमदाबाद (भद्र, मुख्य ऑफिस), अहमदाबाद (एलिस ब्रिज शाखा), अहमदाबाद (स्टेशन शाखा), अमृतसर, अंधेरी (मुंबई शेजारीं), बांद्रे (मुंबई शेजारीं), कलकत्ता (क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्क्वेअर), जमशेदपूर कराची, मद्रास, नागपूर (किंग्जवे), नागपूर (इतवारी बझार), पुणें पुणें शहर, राजकोट, सुरत, भुज (कच्छ).

लंडन एजन्ट्स : वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

डायरेक्टर्स : सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय.(अध्यक्ष); श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के. नाईट; मि. ए. गेडिस; सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, जी. बी. ई., के. सी. आय. ई.; मि. दिनशा के. दाजी; श्री. रामनिवास रामनारायण.

करंट डिपॉझिट अकाउंट्स :

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ¼% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षां कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते, सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

एजंट:—एच्. ए. करीमभाई

Telephone 779

GUEST HOUSE

TELEGRAM Guest House Poona 2.

पुना गेस्ट हाऊस

१००, लक्ष्मी रोड, पुणें २.

गिरगांव मुंबई नं. ४

महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

विविध माहिती

हिंदी गिरण्यांसाठी ब्रिटिश यंत्रसामुग्री

युद्धसमाप्तीनंतर ५ ते १० वर्षांचे अवधींत हिंदी कपास गिरण्यांना जुने माग व जुन्या चात्या ह्यांचे जागीं नवे माग व चात्या ह्यामतील, त्यांची मागणी १ कोटि चात्या व २ लक्ष माग एवढी प्रचंड होईल. इतरहि बरीच यंत्रसामुग्री त्यांस लागेल. लँकेशायर, हिंदुस्थान, डच इंडीज व चीन ह्यांस लागणारी ही यंत्रसामुग्री योग्य मुदतींत तयार करून पुरविणें इंग्लंडला कठीण जाईल. तेव्हां, सर्वांनीं खरेदी बाबत घोरण आखण्याची संयुक्त योजना आखणें आवश्यक आहे व त्या बाबत ब्रिटिश बोर्ड ऑफ ट्रेडनें पुढाकार घ्यावा, असें "मँचेस्टर गार्डियन" पत्राला एका लेखकानें सुचविलें आहे.

रेशनच्या मालाबाबत सरकार व कॉर्पोरेशन ह्यांत वांधा !

कलकत्ता शहरांतील रेशनचें धान्य खराब असल्याबद्दल तक्रारी आल्यामुळें कलकत्ता कॉर्पोरेशननें रेशनच्या दुकानांतील मालाचे नमुने तपासून खराब माल विकणाऱ्यांवर खटले भरण्याबद्दल आपल्या इन्स्पेक्टरांस सूचना दिल्या आहेत. कलकत्ता कॉर्पोरेशनच्या आरोग्य खात्याच्या कोणत्याहि अधिकाऱ्यांस रेशनच्या दुकानदारांनीं रेशनच्या मालाचे नमुने देतां कामा नयेत असा हुकूम प्रांतिक सरकारच्या रेशनिंग खात्यानें काढला आहे. ह्या संबंधांत प्रांतिक सरकारचें रेशनिंग खातें व कलकत्ता कॉर्पोरेशन ह्यांच्यामध्ये चांगलाच वांधा येण्याचा संभव आहे, असें कलकत्त्याच्या नगराध्यक्षांनीं नगरपालिकेच्या सभेंत नुकतेंच सांगितलें.

जुन्या गिऱ्हाइकांचा संतोष अमोदर

एकादें गिऱ्हाइक दुकानदाराचें जुनें व खरें गिऱ्हाइक नसेल, तर त्यास बीर विकण्याचें नाकारण्याचा अधिकार बीरच्या दुकानदारांस देण्यांत आला आहे. जुन्या गिऱ्हाइकांची मागणी व्यवस्थेशीर भागविल्यानंतरच इतरांस बीर मिळूं शकेल. जुन्या बाटल्या परत न देणाऱ्या गिऱ्हाइकांस बीर नाकारण्याचा अधिकारहि त्यांस आतां मिळाला आहे.

हाडाच्या सांगाड्यांची निर्यात शक्य आहे

कांहीं वर्षांपूर्वी, हिंदुस्थानांतील वैद्यकीय शाळा व कॉलेजें ह्यांसाठी मनुष्याच्या हाडांचे सांगाडे इंग्लंडमधून आणावे लागत, त्यांस प्रत्येकीं ४०० ते ५०० रुपये पडत. आतां हिंदुस्थानाची गरज भागवून, सांगाड्यांची निर्गतहि करणें शक्य झालें आहे. सरकारनें आवश्यक तीं रसायनें मात्र पुरवून सहाय्य केलें पाहिजे.

मुंबई सरकारचें कर्ज

१५ ऑगस्ट रोजीं विक्रीस काढलेलें ३% व्याजाचें मुंबई सरकारचें कर्ज संध्याकाळपर्यंत पूर्णपणें खपलें न गेल्या कारणानें मुंबई सरकारास ३४४ लक्ष रुपयांचें कर्ज हवें होतें, त्याच्या ८०% रकम जमा झाली व कर्जाची भरपाई करण्यासाठी २०% रकमेचे कर्जरोखे अंडररायटर्सना द्यावे लागले अशी बातमी प्रसिद्ध झाली होती, ती चुकीची असून ७% पेक्षाहि कमी रकमेचे कर्जरोखे अंडररायटर्सना स्वतः द्यावे लागले, असें आतां अधिकृत रीत्या जाहीर झालें आहे.

अमेरिकेंत ठेवलेले युद्धकैदी

१,९२,८४६ जर्मन, ५०,२७२ इटालियन व ७३० जपानी असे एकूण २,४३,८४८ युद्धकैदी अमेरिकेमध्यें आहेत.

मुंबई प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड

जाहीर करण्यांत येतें कीं, ह्या बँकेची ३३ वी सर्वसाधारण सभा शनिवार दि. २३ सप्टेंबर १९४४ रोजीं दुपारीं २-३० वाजतां (न. स्टँ. टा.) तिच्या रजिस्टर्ड ऑफिसांत, (सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरिअल बिल्डिंग, ९, बेक हाऊस लेन, कोट, मुंबई) खालील कामाकरितां भरविण्यांत येणार आहे.

(१) ३० जून १९४४ रोजीं संपणाऱ्या वर्षाचे तपासलेले हिशेब व डिरेक्टरांचा रिपोर्ट स्वीकारणें.
(२) नफ्याची वांटणी व डिव्हिडंड ठरविणें.
(३) डिरेक्टरांची निवडणूक करणें.
(४) ऑडिटर्स नेमून त्यांचें वेतन ठरविणें.

बोर्डाच्या हुकुमावरून,
वैकुंठ ल. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.

मुंबई, ता. २६-८-४४.

भागांच्या तबदिलीचें काम (ट्रान्सफर बुकें) २५ सप्टेंबर ते ७ आक्टोबर १९४४ पर्यंत (दोन्ही दिवस धरून) बंद राहील.

मुंबई प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

—:खास साधारण सभा:—

जाहीर करण्यांत येतें कीं, धी मुंबई प्रॉ. को. बँक लि. ची विशेष सर्वसाधारण सभा शनिवार ता. २३ सप्टेंबर १९४४ रोजीं दुपारीं ३ वाजतां (न. स्टँ. टाईम) किंवा बँकेची त्याच दिवशीं भरणारी ३३ वी सर्वसाधारण सभा संपल्यावरोबर तावडतोब बँकेच्या रजिस्टर्ड ऑफिसांत सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरियल बिल्डिंग, ९ बेकहाऊस लेन, कोट, मुंबई, येथें खालील ठरावाचा विचार करण्यास व योग्य वाटल्यास तो मंजूर करण्यास भरणार आहे:—

१. "धी मुंबई प्रॉव्हिन्शिअल को० बँक लिमिटेडचे रु. ५० दर्शनी किंमतीचे भागामध्यें विभागलेलें १५ लाख रुपयांचे भागांचें भांडवल रु. ५० दर्शनी किंमतीचे २०,००० अधिक भाग काढून रु. ५० दर्शनी किंमतीच्या ५०,००० भागांमध्यें विभागून २५ लाख रुपयांपर्यंत वाढवावें. व अशा तऱ्हेनें वाढविलेले भाग सहकारी संस्थांस अगर व्यक्तींस बँकेच्या बोर्डास योग्य वाटतील त्या अटींवर व शर्तींवर दर्शनी किंमतीस अगर अधिक किंमतीस विकतां येतील."

२. वरील ठरावास अनुसरून पोटनियम ३ मध्यें खालील दुरुस्ती करण्यांत यावी:

"पोटनियम ३ ओळ १ मध्यें संख्या "१५" व "३०,०००" चे ऐवजीं अनुक्रमें "२५" व व "५०,०००" असें घालावें.

बोर्डाच्या हुकुमावरून
वैकुंठ ल. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.

मुंबई, ता. २६ ऑगस्ट १९४४

अनुक्रमणिका

	पृष्ठ		पृष्ठ
१ विविध माहिती ...	२९०	पडलेल्या बँकांची वर्गवारी– बँकांतील ठेवींमध्ये वाढ– हिंदी अन्न परिस्थितीचा आढावा.	
२ रशियांतील सरकारचें संतति संवर्धनास उत्तेजन ...	२९१	५ हिंदी गिरण्यासाठीं ब्रिटिश यंत्रसामुग्री	२९४
३ पुणें सें. को. बँक ...	२९२	६ मुंबई प्रांताच्या शेतकी साल्याचा अहवाल ...	२९५
४ स्फुट विचार ... ... युरोपांतील युद्धाचा शेवट जवळ आला–गेल्या दोन वर्षांतील हिंदी बँकिंग–बंद	२९३		

अर्थ

बुधवार, ता. १३ सप्टेंबर, १९४४

रशियांत सरकारचें संतति संवर्धनास उत्तेजन

आक्रमिक युद्धाचें साधन म्हणून जर्मन व इटालियन राज्यकर्त्यांनीं आपल्या देशांत प्रजोत्पत्तीस उत्तेजन देण्याचें धोरण स्वीकारलें होतें. मनुष्यबळाच्या जोरावर साम्राज्यबळ वाढवण्याचा ह्यांत हेतु होता. पश्चिम युरोपांतील देशांत, विशेषें करून फ्रान्समध्यें लोकसंख्या वाढण्याचे ऐवजीं घट होती आणि ही परिस्थिति चालू राहिल्यास इंग्लंडमध्येंहि हळुहळु तोच प्रकार घडून येण्याची भीति संततीच्या विषयाचे अभ्यासु व्यक्त करीत आले आहेत. रशियामध्यें मात्र संततीचें मान झपाट्यानें वाढत होतें. पूर्वेकडील लोकसंख्येच्या बळानें पश्चिम युरोपांतील संस्कृती व स्वातंत्र्य दडपून टाकण्याचीं दुष्ट स्वप्नें कांहीं लोकांस भेडसावीत होतीं. चालू युद्धांत प्रचंड प्राणहानि झाली आहे, तिचा परिणाम रशियाच्या लोकसंख्येवर काय होईल हें निश्चितपणानें सांगतां येत नाहीं. तथापि, लोकसंख्येंत होणाऱ्या घटीमुळें रशियन राष्ट्र कमजोर झाल्याबांचून रहाणार नाहीं असें वाटून त्याचे राज्यकर्ते ह्या भावी आपत्तीवर उपाय आतांपासूनच योजूं लागले आहेत. पाश्चात्त्य देशांतील आधुनिक सुधारणेच्या कल्पना आणि संतती-नियमनाच्या तोडग्यांचा उपयोग ह्यांचे योगानें कुटुंबांतील मुलांची संख्या मर्यादित होत आली आहे. कुटुंब व्यवस्था व विवाहसंस्थेचीं बंधनें तिकडे शिथिल झालीं आहेत आणि वैयक्तिक वर्तनाचें स्वातंत्र्य आणि समाज रक्षणाचें कर्तव्य ह्यांचेमध्यें विरोध उत्पन्न झाला आहे.

रशियांत झालेल्या क्रांतीच्या आनुषंगिक तत्वांप्रमाणें पाहिलें असतां कुटुंब व्यवस्था आणि वैवाहिक निर्बंध ह्यांस विशेष महत्व नाहीं आणि घटस्फोटाच्या मार्गांतील अडचणी दूर करण्याकडे रशियन पुढाऱ्यांची व कायद्याची प्रवृत्ति होती. नैसर्गिक मार्गानें होणारा संतति विस्तार रशियन लोकसंख्येची वाढ अप्रतिबद्ध राखण्यास समर्थ असल्याचा अनुभव असतांनाहि सध्याच्या युद्धापूर्वीच अनेकपुती मातांस उत्तेजनार्थ द्रव्य सहाय देण्याचें धोरण रशियानें अंगिकारलें होतें. समाजास घटक पुरवणाऱ्या स्त्रियांस सातव्या अपत्यापासून पुढें होणाऱ्या संततीबद्दल वेतन देणारा कायदा १९३६ मध्यें जारी करण्यांत आला होता. बहुपुती स्त्रियांस मिळणारा हा सरकारी तनखा संततिवृद्धीस पुरेसा उत्तेजनकारक नाहीं ह्या समजुतीनें रशियन सरकारनें अलीकडे नवीन हुकूम काढून प्रजावृद्धी बाबतची योजना सुधारली आहे आणि ती अधिक आकर्षक केली आहे. ह्या नवीन नियमाप्रमाणें तिसऱ्या संतानापासून स्त्रियांस तनखा चालू होऊन प्रत्येक मुलामणिक त्यापुढें त्याची रक्कम वाढत जाववाची आहे. आयांस सरकारी द्रव्य मिळावयाचें तें दोन प्रकारचें आहे. मूल होतांच एक ठराविक रक्कम त्यांस दिली जाईल आणि पुढें पांच वर्षांच्या मुदतींत दरमहा त्यांस वेतन मिळेल. १९३६ सालचा नियम आणि अलिकडचा नवीन हुकूम ह्यांस अनुसरून मुलांच्या वाढत्या संख्येबरोबर आयांस मिळावयाच्या वेतनाच्या रकमांमध्यें कशी वाढ व्हावयाची तरतूद आहे हें खालील आकड्यांवरून समजेल:—

बहुसंख्य मुलांच्या आयांस
(आकडे रूबल्सचे (रशियन चलन) आहेत)

	१९३६	१९४४
तिसरें मूल	द्रव्यसहाय नाहीं	४००
चवथें मूल	,,	६,१००
पांचवें मूल	,,	८,९००
सहावें मूल	,,	१०,४००
सातवें मूल	१०,०००	१४,५००
आठवें मूल	१०,०००	१४,५००
नववें मूल	१०,०००	१८,५००
दहावें मूल	१०,०००	१८,५००
अकरावें मूल	१२,०००	२३,०००

अनेक अपत्यांच्या मातांस ह्या क्रमाणें मोठमोठ्या रकमा दरमहा दिल्या जाणार आहेत, एवढेंच नाहीं तर इतर स्वरूपांतहि त्यांस आणखी उत्तेजन देण्याची व्यवस्था करण्यांत आली आहे. लहान मुलांच्या शिक्षणाची फी कमी केलेली आहे आणि गर्भवती व बाळंत स्त्रियांस गिरण्यांतील वगैरे व्यवसायांत माफी व सवलती मिळत आहेत, त्या वाढवलेल्या आहेत. ह्याशिवाय, "मातृपदाचें वैभव," "मातृत्व पदक" व "शूर मातांचें मंडळ" ह्या नांवाचीं बहुमान दर्शक पदकेंहि बहाल केलीं जाववाचीं आहेत. हीं पदकें धारण करणाऱ्या स्त्रियांस चांगलें अन्न व वस्त्रें मिळण्याची सवलत आहे आणि त्यांस रांगेंत उभें राहिल्याबांचून रेशन मिळूं शकतें ही केवढी तरी मोठी सोय आहे.

क्लिअरिंग हाऊसचे आकडे

हिंदुस्थानांत कलकत्ता, मुंबई, मद्रास, कराची, रंगून, कानपूर, लाहोर व दिल्ली येथें बँकर्स क्लिअरिंग हाऊसेस मुख्यतः आहेत त्यांत व इतर ठिकाणच्या क्लिअरिंग हाऊसेसमध्यें मिळून किती रकमेच्या चेक्सची देवघेव झाली, हें खालील तक्ता दर्शवितो:—

वर्ष	चेकची रक्कम (लक्ष रुपये)
१९४०	२२,५२,०३
१९४१	२६,८२,७८
१९४२	२७,१३,५६
१९४३	४२,२८,९२

सर सी. डी. देशमुख परतणार?

रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर, सर सी. डी. देशमुख, हे लंडनहून लवकरच परततील, असें दिसतें. त्यांनीं आणखी कांहीं काळ तेथें राहण्यांत हशील नाहीं, असें प्रसिद्ध झालें आहे.

पुणे सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड.

१९४३-४४ सालचे उपक्रम.

(अहवालाचे साली बँकेस निव्वळ नफा रु. ४२,३१२-१-१ झाला आहे त्यांतून भागीदारांस ५% डिव्हिडंड मिळणार आहे.)

(१) अहवालाचे साली ता. २५-३-४४ रोजी बँकेने सर परशुरामभाऊ कॉलेजचे आवारांत एक शाखा उघडली. आतां बँकेच्या एकूण नऊ शाखा व उपशाखा अशा आहेत.

(२) चालू वर्षात बँकेच्या विशेष प्रयत्नामुळें १९ नवीन सोसायट्या स्थापन होऊं शकल्या.

(३) नियमित हप्ते देणाऱ्या सोसायट्यांना त्यांनी मुदतींत केलेल्या परतफेडीच्या रकमांवर शेंकडा ८ आणे दरानें कसर आजवर देण्यांत येत असे ती यंदा १ रुपया दरानें देण्यांत आली आहे. याशिवाय सांपत्तिक स्थिति खालावलेल्या सोसायट्यांना यापेक्षां अधिक प्रमाणांत कसर देण्याचें बोर्डानें योजलें आहे.

(४) वेगवेगळ्या शाखा-कचेऱ्यांचे कार्य-क्षेत्रांतील सोसायट्यांचे समासदांच्या अडीअडचणी समजावून घेण्यासाठी व त्यावर काय इलाज योजतां येतील याचा विचारविनिमय करण्यासाठी अहवालाचे सालांत शाखा कचेऱ्यांचे ठिकाणी सोसायट्यांचे प्रतिनिधींची सभा भरविण्याचा उपक्रम पुन्हा सुरू करण्यांत आला आहे. अशा सभा पुष्कळच उपयुक्त होत आहेत.

(५) युद्धजन्यपरिस्थितीमुळें खेडेगांवांतील गरजू जनतेला दररोजचें लागणारें धान्य विकत मिळण्यास फार त्रास पडूं लागल्यानें, सरकारी धान्य-वाटप करण्याचें काम सरकारनें पसंत केलेल्या वैयक्तिक दुकानदारांऐवजीं स्थानिक सहकारी सोसायट्यांना यावें अशी खटपट करण्यांत आली व तिला यश मिळून हें सरकारी धान्य-वाटप करण्याचें काम सरकारनें आपल्या जिल्ह्यांतील ४० सहकारी सोसायट्या व आपल्या बँकेच्या ४ शाखा यांचेकडे सोंपविलें आहे. हें काम करणाऱ्या सहकारी सोसायट्यांस सरकारी धान्य खरेदी करण्यासाठी बँकेनें भांडवल पुरविण्याचें ठरविलें असून यंदाचे सालीं अशा सोसायट्यांस रु. ३३,००० पर्यंत क्रेडिट मंजूर केलें आहे व सोसायट्या जरूरीप्रमाणें त्याचा उपयोग करून घेत आहेत. खासगी दुकानदारां ऐवजीं सहकारी सोसायट्यांमार्फत धान्य-वाटपाचें काम जास्त व्यवस्थितपणें व पद्धतशीर चालून जनतेमध्यें विश्वास उत्पन्न होतो याची जाणीव उशीरा का होईना पण सरकारला झाली हें सुचिन्ह आहे. स्थानिक रेव्हेन्यू सात्याची, हट्टी लाभली आहे त्याहून थोडी अधिक, सक्रिय सहानुभूति लाभण्यास अडचणींत सांपडलेल्या गरीब जनतेला बँकेस पुष्कळ सहाय्य देतां येईल. या धान्य-वाटपाचे व्यवहारांत नफा मिळविण्याचें धोरण बिलकूल नाहीं हें येथें नमूद करणें अवश्य आहे. स्टँडर्ड क्लॉथची विक्री करण्याची सरकारी परवानगी फक्त इंदापूर शाखेस मिळाल्यानें त्या शाखेनें सुद इंदापूर येथें व तालुक्यांतील कांहीं सोसायट्यांचेमार्फत कापड-विक्रीचें काम समाधानकारक रीतीनें केलें. अशी विक्री अहवालाचे सालीं सुमारें रु. ३७,००० पर्यंत झाली आहे.

(६) जिल्ह्यांतील विवक्षित गांवीं घरांचे तारणावर व सोन्याचांदीचे तारणावर गरजू सभासदांना कर्जे देण्याची योजना बँक करीत आहे. याशिवाय विमा-पॉलिसीचे व मुदतीच्या हुंडीचिठ्ठीचे तारणावरही भांडवल पुरविण्याची व्यवस्था बँक करणार आहे.

(७) यंदाचे सालीं बोर्डानें सर्व माजी चेअरमन, व्हाइस-चेअरमन व कांहीं डायरेक्टर्स यांना विचारविनिमयासाठी ता. ३०-१-४४ रोजी बँकेत येण्याबद्दल खास विनंति केली होती. या सभेंत पुष्कळ उपयुक्त चर्चा झाली. जनतेच्या वाढत्या विश्वासानें जमणाऱ्या भांडवलाचा विनियोग समासदांचे दृष्टीनें अधिक उपयुक्त कसा करितां येईल व सोसायट्यांचे शेतकरी सभासदांना नांगर, सर्ते, बेणें वगैरेचा पुरवठा मालाच्या रूपानें करून देणें कसें शक्य होईल याबद्दल विचारविनिमय झाला. या दृष्टीनें प्रारंभ करण्यांत आला आहे.

(८) अहवालाचे सालांत बँकेनें इंदापूर तालुक्यांतील एक व पुरंदर तालुक्यांतील एक अशा दोन गांवांची आर्थिक पहाणी केली आहे. शेतीच्या मालास, जमिनीस व इतर उत्पन्नास आलेले चढीचे भाव शेतकऱ्यांस मिळत गेल्यानें त्यांच्या स्थितींत व कर्जबाजारीपणांत कांहीं फरक पडला आहे, किंवा कसें व त्या जादा उत्पन्नाचा त्यांनीं कसा विनियोग केला आहे हें पडताळून पाहणें हा या आर्थिक चौकशीचा मुख्य उद्देश होता.

(९) बँकेस जोडलेल्या सोसायट्यांचे कारभारांत मनःपूर्वक लक्ष घालून तिची सुधारणा व आर्थिक संवीरता वाढविण्यांत ज्यांनीं प्रत्यक्ष खटपट केली अशा सोसायट्यांचे पंच-कमिटीपैकीं एकास किंवा सेक्रेटरीस त्यानें केलेल्या कार्याचा गौरव म्हणून अल्प स्वरूपाचीं पारितोषिकें तालुकानिहाय देण्याचें धोरण बोर्डानें सुरदातीच्या दिवसांत जाहीर केलेलें होतें. त्याला अनुसरून यंदाच्या साधारण सभेंत अशीं पारितोषिकें देण्यांत येतील. या उपक्रमामुळें पंच-कमिटीचें व सेक्रेटरीचें आपापल्या सोसायट्या संवीर करण्याकडे अधिक लक्ष लागेल असा बोर्डास भरवसा आहे.

दि कॉमनवेल्थ विमा कंपनी लि.

एका भागीदारानें पुरस्कारलेली, महाराष्ट्रांतील एजंटासाठीं

वार्षिसाची चढाओढ

चढाओढींत भाग घेऊं इच्छिणारांनीं ताबडतोब एजन्सीसाठीं अर्ज करावेत.

● महाराष्ट्रांत सर्वत्र एजंटस नेमणे आहेत. ● माहिती पत्रकांसाठीं भेटा अगर लिहा.

श्री. म. जोशी
मॅनेजिंग डायरेक्टर
दि कॉमनवेल्थ ॲशुअरन्स विमा कंपनी लि., पुणे शहर

स्फुट विचार

युरोपांतील युद्धाचा शेवट जवळ आला

पश्चिम युरोपांतील आघाडीवर फ्रान्सच्या किनाऱ्याजवळ मित्र राष्ट्रांच्या सैन्यांस शक्य तितका काळ ढांबून ठेवावयाचें व उडत्या बॉंबसच्या आणि टॉर्पेडोंच्या सहाय्यानें त्यांचा रसद तोडून त्यांची प्रगति कुंठित करावयाची हा जर्मनीचा बेत सपशेल फसला आहे. जर्मनीच्या कळसूत्री बॉंबच्या नव्या हत्यारानें लंडन शहर व दक्षिण इंग्लंड शांत बरीच नासधूस केली, परंतु हें अस्त्र पश्चिम आघाडीवरील युद्धांत निर्णायक होईल आणि त्याच्या साथीस दुसरीहि नवीं हत्यारें उपयोगांत आणलीं जाऊन मित्र राष्ट्रांची नामुश्की केली जाईल ही शत्रूची अपेक्षा व बढाई निष्फळ ठरली आहे. फ्रान्स व बेल्जम ह्या देशांच्या पश्चिम किनाऱ्यावर उभारलेली आपली प्रचंड तटबंदी अभेद्य राहील ही त्याची कल्पनाही फुकट गेली आहे. "युरोपांत पाय तर टाका म्हणजे दारावतो गम्मत" ह्या अर्थाचे जर्मन प्रचारकांचे दर्पोक्तीचे उद्गार हास्यास्पद झाले आहेत आणि मित्र राष्ट्रांच्या सैन्यास आंत येऊं देण्यांत आमचा कुशल लष्करी डाव आहे ह्या आशयाचीं त्यांचीं सूचक विधानें त्यांच्या गळ्यांत आलीं आहेत. मित्र राष्ट्रांच्या फौजा फ्रान्समध्यें पश्चिम व दक्षिण ह्या दोन्हीं बाजूंनीं शत्रूची लंडमेतोड करीत जर्मन सरहद्दीकडे चालल्या असतां शत्रूस पळतां भुई थोडी झाली आहे. बेल्जममधून शत्रूची हकालपट्टी होऊन मित्र राष्ट्रांचीं सैन्यें हॉलंडमध्यें शिरलीं आहेत. पूर्वेच्या आघाडीवर रुमानिचा मेळा व बल्गेरियाही हातचा गेला आणि फिन्लंडनें रशियाशीं सूत्र बांधलें. ह्याप्रमाणें जर्मनीचे साथीदार एकामागून एक त्यास सोडून शत्रूचा कोंडमारा त्याच्या स्वतःच्या देशांत होत आहे. त्यानें पादाक्रांत केलेले प्रदेश स्वतंत्र झाले आहेत आणि होत आहेत. त्यामुळें इटलींतहि जर्मन सैन्याची पीछेहाट चालूच आहे. ह्यामुळें त्याचा लढाऊ व अन्नविषयक सामुग्रीचा पुरवठा संपुष्टांत आला आहे. फ्रान्सचीं कांहीं बंदरें थोडें दिवस त्यानें लढवींत ठेवलीं तरी अखेरीस तीं पडणार आणि जर्मनीची नाकेबंदी होणार हें आतां निश्चित आहे. चोहों बाजूंनीं घेरलेल्या हिंस्र श्वापदासारखी जर्मनीची स्थिति झाली आहे आणि त्या प्राण्याप्रमाणें स्वतःच्या सरहद्दीवर व स्वतःच्या देशांत निकरानें लढण्याचा तो प्रयत्न करील तरी त्याचा शेवटचा क्षण जवळ आला आहे ह्यांत संशय नाहीं. स्वतःच्या भौवतालच्या अंकित देशांवर जर्मनी आजवर चरला, पण आतां त्याची ही चंदी बंद पडली आहे. आणि त्याच्या नखांची तीक्ष्णताहि बोथट झाली आहे. जर्मनीचें नामांकित विमानदळ हतप्रभ झालें आहे आणि इस्पाताचें उत्पादन घटल्यामुळें त्याचें लढाऊ बळ खचीं झालें आहे. अशा स्थितींत शत्रूनें कांहीं दिवस उसनें अवसान आणलें आणि विसाटपणानें युद्ध चालू ठेवलें तरी निश्चित व पुरुषा पराभवाचीं दुष्ट स्वप्नें हिटलरला भेडसावींत असलीं पाहिजेत.

गेल्या दोन वर्षांतील हिंदी बँकिंग

हिंदुस्थान व ब्रह्मदेश ह्यांतील बँकांसंबंधी १९४२ व १९४३ सालाबाबत आकडे रिझर्व्ह बँकेनें नुकतेच प्रसिद्ध केले आहेत, १९३९ व १९४० सालाबाबत आकडे जुले १९४१ मध्यें प्रसिद्ध करण्यांत आले होते. १९४१ सालाबाबत आकडे जुले १९४२ मध्यें प्रसिद्ध झाले परंतु कागदाच्या टंचाईमुळें १९४३ मध्यें हें प्रसिद्धीकरण तहकूब ठेवण्यांत आलें होतें. परंतु बँकांकडून व हितसंबंधी लोकांकडून प्रकाशनाबाबत विशेष मागणी आल्याकारणानें १९४२ व १९४३ सालाबाबत आकडे आतां प्रसिद्ध करण्यांत आले आहेत. बँकांकडील ठेवींत चलन विस्तारामुळें प्रचंड वाढ, अनेक नव्या बँकांची स्थापना, बँकांच्या शाखांत वाढ व बँकांच्या वसूल भांडवलांत, रोख्यांतील गुंतवणुकींत आणि येणें कर्जांत वाढ, हीं गेल्या दोन वर्षांतील हिंदी बँकिंगचीं वैशिष्ट्यें सांगतां येतील. १६ बँकांस शेडयूल्ड बँकेचा दर्जा नव्यानें प्राप्त झाला व १ बँक शेडयूलमधून गळाली. अशा रीतीनें १९४३ अखेर शेडयूल्ड बँकांची संख्या वाढून ७४ झाली. गेल्या दोन वर्षांत ५० नव्या बँका स्थापन झाल्या, ह्यांपैकीं १० बँका शेडयूल्ड बँकांचे वर्गांत गेल्या. बँकांजवळील रोख रकमांचें एकूण ठेवींशीं प्रमाण पाहिलें, तर तें १९३८ मध्यें १२·९% १९४१ मध्यें १६·९% व १९४३ मध्यें २४·९% होतें, असें आढळतें. सरकारी व इतर रोख्यांतील गुंतवणुकींचें एकूण ठेवींशीं प्रमाण अनुक्रमें ४६·१% चे ४९·९ व ५३·०% झालें. कित्येक बँकांनी वाढलेल्या किंमतीचा फायदा घेऊन आपली स्थावर मालमत्ता विकून टाकली. एकूण ठेवींशी मालमत्तेचें प्रमाण १९४१ सालीं ३·२% होतें तें १९४३ मध्यें १·३% झालें. फक्त शेडयूल्ड बँकांच्याच शाखा पाहिल्या, तर १९४२ मध्यें ह्यांची संख्या १,४५० होती ती १९४३ मध्यें १,८८२ झाली. हिंदी बँकिंगमध्यें सध्यां दिसून येणारी प्रवृत्ति लक्षांत घेऊन रिझर्व्ह बँकेनें हिंदुस्थान सरकारास कायद्यांत कांहीं सुधारणा सुचविल्या आहेत व आपल्या १९३९ मधील कांहीं मूळ सूचनांत बदलहि केला आहे. बँकांसाठी एका स्वतंत्र कायद्याचा मसुदा तयार करून तो हिंदुस्थानास सादर करण्यांत आला आहे. मध्यवर्ती असेंब्लींत त्यासंबंधांत सरकारी बिल लवकरच येईल, अशी अपेक्षा आहे.

बंद पडलेल्या बँकांची वर्गवारी

१९४२ मध्यें हिंदुस्थानांत एकूण ४८ बँका बुडाल्या अथवा मुंडाळण्यांत आल्या, त्यांचें अधिकृत भांडवळ १ कोटि, ८२ लक्ष रुपये व वसूल भांडवळ ११ लक्ष, ९६ हजार रुपये होतें. ह्या ४८ बँकांपैकीं ११ बंगालमधील, ७ कोचीनमधील, ११ मद्रासमधील, ६ म्हैसूरमधील व ८ त्रावणकोरमधील होत्या. मुंबई प्रांतांतील सिनेफिनेन्स अँड बँकिंग कॉर्पोरेशन (अधिकृत भांडवळ १ कोटि रुपये, खपलेलें भांडवळ ७,७०० रुपये) व सिराटी (अधिकृत व खपलेलें भांडवळ प्रत्येकी १०० लक्ष रु.) ह्या दोन संस्था बंद पडल्याचा रिझर्व्ह बँकेनें प्रसिद्ध केलेल्या वार्षिकांत उल्लेख आहे. १९४३ सालीं ५० बँका बंद पडल्या, त्यांचें अधिकृत व वसूल भांडवळ अनुक्रमें २ कोटि, ७३ लक्ष व ६ लक्ष, २८ हजार रुपये होतें. ह्या ५० बँकांपैकीं २४ बँका एकट्या बंगालच्या वाटणीस आल्या. अर्थात, त्या सर्वांचें मिळून वसूल भांडवळ १ लक्ष, १४ हजार रुपयेच फक्त होतें. मुंबईमध्यें १५-४-१९४३ रोजीं नोंदण्यांत आलेल्या २ कोटि रुपये भांडवळाच्या न्यू कमर्शिअल बँकेनें कार्यास प्रारंभच केला नाहीं. १९४० सालीं १०२ बँका व १९४१ सालीं ७५ बँका बंद पडल्या होत्या, त्या दृष्टीनें मेलीं दोन वर्षें बँकांना चांगलीं गेलीं, असेंच वरील आकडे दर्शवितात.

बँकांतील ठेवींमध्यें वाढ

हिंदुस्थानांतील वेगवेगळ्या प्रकारच्या बँकांकडील ठेवींचे आकडे साठीं दिले आहेत, त्यावरून एक्सचेंज बँकांचें महत्त्व अद्याप किती आहे, हें समजून येईल. त्याचप्रमाणें देशभर पसरलेल्या सहकारी बँकांच्या वाढीस अद्याप किती वाव आहे, हेंहि लक्षांत येईल.

	(आकडे लक्ष रुपयांचे)			
	१९३८	१९४१	१९४२	१९४३
	(युद्धपूर्व वर्ष)			
इंपीरिअल बँक	८१,५१	१०८,९२	१६३,४६	२१४,५३
एक्सचेंज बँका	६७,२०	१०६,७३	११६,८५	१४०,१९
इतर शेडयूल्ड बँका	९१,८७	१२९,०४	१८९,३४	३१९,६५
१ लाखावरील भांडवटाच्या व रिझर्व्हच्या				
बिगर शेडयूल्ड बँका	१४,९४	२०,०५	२९,०१	४०,२३
सहकारी बँका	३५,५३	३८,१८	४४,०५	४७,९५
पोस्ट ऑफिस सेव्हिंग्ज ठेवी, कॅश सर्टिफिकिटें				
डि. से. सर्टिफिकिटें	१४०,२८	१०२,२६	९०,२६	१०८,०१
एकूण	४२१,०३	५०५,१८	६३२,९७	८७०,५६

युद्धापूर्वीच्या मानानें १९४३ सालीं इंपीरिअल बँकेतील ठेवी १६३·२% वाढल्या व एक्सचेंज बँकांचे ठेवींत १०८·६% ची भर पडली. इतर शेडयूल्ड बँकांस सर्वांत अधिक प्रमाणांत (२४७·९%) ठेवी मिळाल्या. बिगर शेडयूल्ड बँकांचे व सहकारी बँकांचे ठेवींत अनुक्रमें १६९·३% व ३६·१% वाढ झाली. पोस्ट ऑफिसांतील ठेवी, कॅश सर्टिफिकिटें, वगैरेंतील गुंतवणूक १९४२ सालीं ९०½ कोटि रुपयांवर आली ती १९४३ मध्यें १०८ कोटि रुपये झाली तरी सुद्धां १९३८ चे मानानें हा आकडा २३% नें कमीच भरला.

हिंदी अन्न परिस्थितीचा आढावा

हिंदुस्थान सरकारचे अन्नमंत्रि, सर ज्वाला प्रसाद, ह्यांनीं मुंबईच्या इंडियन मर्चंट्स चेंबरमध्यें हिंदी अन्न परिस्थिति नुकतीच निवेदन केली. हिंदुस्थानांतील अन्नपुरवठ्याची परिस्थिति आतां अगदींच कांहीं असमाधानकारक नाहीं असें ते म्हणाले. १९४१-४२ पूर्वी पांच वर्षांत मुंबई प्रांतानें जेवढ्या धान्याची दरसाल सरासरीनें आयात केली, त्यापेक्षां अधिक धान्याची १९४३-४४ मध्यें मुंबईची वाटणी आहे, असें त्यांनीं सांगितलें. गेल्या वर्षांत परिस्थिति बरीच सुधारली आहे, तथापि कांहीं विभागांत अद्याप धान्याचा तुटवडा आहे, आणि तो दूर करण्याकरितां प्रांतिक सरकारांस हिंदुस्थान सरकार मदत करीत आहे, असा त्यांनीं खुलासा केला. बंगालमधील परिस्थिति गेल्या दोन महिन्यांत बरीच सुधारली असल्याचें ते म्हणाले. अंतर्गत पुरवठ्याची इकडून-तिकडे वहातुक करूनच केवळ भागणार नाहीं, आयातीचा प्रश्न हाच खरा महत्त्वाचा प्रश्न आहे, हें त्यांनीं मान्य केलें. ग्रेगरी समितीच्या शिफारसी पाळण्याविषयीं अन्नमंत्रि ब्रिटिश सरकारामागें तगादा लावीत आहेत. युद्ध लवकर संपून आगबोटी उपलब्ध होतील व धान्याची व्यवस्थेशीर आयात लागलीच होऊं लागेल, अशी आशा अन्नमंत्र्यांनीं व्यक्त केली.

"मागोरा"चा अभिनव व आश्चर्यकारक शोध
ढेकणांच्या उदवत्त्या
(ABC)
BUG COILS (ABC)
प्रत्येक उदवत्ती रात्रभर जळते व तोंपर्यंत ढेकूण आपलें ठिकाण सोडून बाहेर येत नाहींत. विशिष्ट घुरामुळें हा चमत्कार होतो. बॉक्समध्यें १२ तांबड्या उदवत्त्या तांबड्या पॅकिंगमध्यें बॉक्स किं. रु. १८८, ट. स. निराळा.
दि मागोरा केमिकल कं. लि.,
हिराबाग, पुणें २

महाराष्ट्रांत लेखी गॅरंटी देणारे
पहिले व फक्त १ च
गोल्ड मेडॅलिस्ट व मराठी वळणाचे स्पेशॅलिस्ट्
पेन्टर बेडेकर, ए. जी.,
बुधवार चौक, पुणें २ (सिटी)
बाहेरगांवचीं कामें रेल्वे, मोटार अगर पोस्टानें पाठवूं.

पुण्यांतील
आदर्श निवासस्थान व भोजनालय
छाया लॉजिंग व बोर्डिंग हाऊस
बुधवार चौक, पुणें २.

गांवोगांवीं विक्रेते पाहिजेत.
A 9
क्विनीनचे ऐवजीं मलेरियाकरतां खात्रीचा अनुभविक उपाय म्हणून 'एनाईन' वापरतात.
अलपाईन प्रॉडक्टस् (इंडिया) पुणें २

मुंबई प्रांताचा शेतकी खात्याचा १९४२ चा अहवाल

या वर्षांत पुणें येथील ॲग्रिकल्चरल कॉलेजच्या कार्याची माहिती देण्यांत आली आहे. हें कॉलेज स्थापन होऊन आज ३४ वर्षे झालीं असून या कॉलेजांत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या अहवालाचे सालीं २०८ होती. यांपैकीं ७२ विद्यार्थी शेवटच्या बी. एससी. (ॲग्रि.) या परीक्षेस बसले होते व त्यांपैकीं ५२ विद्यार्थी यशस्वी झाले. १४ पदवीधर विद्यार्थी शेतकीसंबंधीं अर्थशास्त्र, वनस्पतिशास्त्र व वनस्पतिनिदानशास्त्र यासंबंधींचें शिक्षण घेत होते. पिकांची पैदास, गुराढोरांची जोपासना व डेअरी, शेतकीसंबंधीं रसायनशास्त्र वगैरेसंबंधींचे खास अभ्यासक्रमासाठीं ११ विद्यार्थी होते. खास फॉरेस्ट रेंजर्सच्या कोर्ससाठीं या कोर्सचें सध्या चौथें वर्ष चालू आहे—१० विद्यार्थी होते. रिपोर्टाच्या वर्षांत कॉलेजमध्यें सामाजिक व व्यायामविषयक चळवळी नेहमीप्रमाणें चालू होत्या.

पश्चिम खानदेश जिल्ह्यांत धुळें येथें एक व धारवाड जिल्ह्यांतील देवीहोसूर येथें दुसरें अशीं दोन डिस्ट्रिक्ट ॲग्रिकल्चरल स्कूल्स मुंबई प्रांतांत आहेत. धुळें येथील शाळेंत ४० विद्यार्थी शिक्षण घेत होते व देवीहोसूर येथें शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या २९ होती. या संस्थांचें कार्य विशेषेंकरून व्यावहारिक असून त्या ज्या प्रदेशांत स्थापण्यांत आल्या त्या प्रदेशांत त्यांचें कार्य विशेष पसंत पडलें आहे.

रूरल ॲसिस्टंटांना शेती, सहकार्य व ग्रामोद्योग यासंबंधींचें शिक्षण देण्यासाठीं मांजरी, धुळें, देवीहोसूर भडोच व वार्डी या पांच ठिकाणीं केंद्रें स्थापन करण्यांत आलीं आहेत. रिपोर्टाच्या वर्षी १२८ रूरल ॲसिस्टंटस या केंद्रांतून शिक्षण घेऊन बाहेर पडले, व त्यांपैकीं बहुतेकांस सध्यां ग्रामसुधारणेच्या कार्याशीं संबंध असलेल्या अनेक सरकारी खात्यांत काम मिळालें आहे. रत्नागिरी जिल्ह्यांतील राजापूर या ठिकाणीं कोकणांतील विद्यार्थ्यांसाठीं एक नवीन शिक्षण-केंद्र उघडण्यांत आलें आहे.

बागाईत कामासंबंधीं व कोंबड्यांची जोपासना करण्यासंबंधींच्या खास अभ्यासक्रमाचा वर्ग पुणें येथें चालविण्यांत आले असून त्यांत अनुक्रमें ४० व ५६ विद्यार्थी होते.

गेले तीन दिवस शेंकडो लोक
तिकिटांचे अभावीं परत गेले !

९ वा आठवडा !

व्ही. शांताराम आणि राजकमल यांची दुसरी कलाकृति

कथा:- स. ज. शुक्ल

-भक्तीचा मळा-

दिग्दर्शक : केशवराव दाते . [माली] संभाषण : व्ही. शांताराम

भूमिका:—
मा. कृष्णराव, बेबी नलिनी, अमीर कर्नाटकी

—डेक्कन—

दररोज ७ व १० वाजतां

दर शनि. रवि. सोम. जादा खेळ दुपारीं ४ वाजतां
सर्व खेळ मराठी " भक्तीचा मळा "
रिझर्व्हेशन शनि. व रवि. सकाळीं १० ते १२
फी व कॉम्प्लिमेंटरी पासेस अजिबात बंद !

This is not a prospectus but merely an advertisement.

Consent of the Central Government has been obtained to this issue under Defence of India Rule 94-A. It must be distinctly understood that in giving this consent the Government of India do not take any responsibility for the financial soundness of any schemes or for the correctness of any of the statements made or opinions expressed with regard to them.

दि भारत इंडस्ट्रिअल बँक, लि.

हेड ऑफिस:—पुणें शहर

शाखा:—

(१) पुणें कॅन्टोन्मेंट (२) बारामती (३) लोणावळा
पे ऑफिस—खोपोली (जि. कुलाबा)

एकूण खेळतें भांडवल २४ लाखांचे वर

—संचालक मंडळ—

व्ही. के. व्ही. केळकर, अध्यक्ष	व्ही. व्ही. वर्तक, उपाध्यक्ष
,, डी. डी. देशपांडे	व्ही. बी. पी. केळकर
शेट गोवर्धनदास विठ्ठलदास	शेट बाबीलाल साबळचंद
आमदार वी. वी. साळवेकर	व्ही. वी. वी. भाजेकर
सौ. इन्दुमतीबाई कडके	,, एम. एन. परांजपे
व्ही. के. वी. साळवेकर	,, के. पी. जोशी

■ बँकेच्या दर्शनी किंमत रु. ५,१८,०५० चे ऑर्डिनरी शेअर्सचीं विक्री करावयास परवानगी मिळाली आहे.

■ प्रत्येक ऑर्डिनरी शेअर रु. ५० चा असून त्यापैकीं तूर्त रु. २५ भरावयाचे आहेत. बाकीची रक्कम रिझर्व्ह लाएबिलिटी म्हणून शेअर होल्डरकडेच राहणार आहे.

■ अर्जावरोबर प्रत्येक शेअर मागें रु. १५ व अर्ज मंजुरीनंतर रु. १० याप्रमाणें पैसे भरावयाचे आहेत.

■ बँकेनें यापूर्वी ४ टक्केप्रमाणें ऑर्डिनरी शेअर्सवर डिव्हिडंड वांटले आहे.

■ शेअर्स घेऊं इच्छिणाऱ्यांनीं शेअर अर्जाचा नमुना मागवावा.

■ इतर माहिती बँकेचे हेड ऑफिस अगर बँकेच्या शाखेमध्यें समक्ष मिळेल.

(लवकरच बँकेची एक शाखा कोल्हापूर रोड येथें चालू होणार आहे)

रा. वा. साळवेकर, B. A. LL. B. } मॅनेजिंग
नी. ना. क्षीरसागर } डायरेक्टर्स

सध्यांच्या टंचाईच्या काळांत जीवनद्रव्यें कमी पडतात.
जीवनद्रव्यांनीं (Vitamins) युक्त असे
(सदुपयोगी खात्यानें मान्यता दिलेले)
टोमॅटो केचप (गोड) व
टोमॅटो सॉस [तिखट व आंबट]
आजच मागवा व जीवनद्रव्यांची वाटणारी
उणीव भरून काढा.
रुरल प्रॉडक्टस कंपनी लि. पुणें
बिझिनेस ऑफिस: ९१३ अ सदाशिव, पुणें २.

प्रगतिपथावरील नवा
मै ला चा — द ग ड
सन १९४३ अखेर
नव्या कामांत ११० टक्के वाढ
चालू कामांत १०० टक्के वाढ
आयुर्विमानिधींत ८० टक्के वाढ
— आपला विमा किंवा एजन्सी आजच घ्या —
दि औंध म्यूच्युअल लाइफ
ॲश्युरन्स सोसायटी लि., पुणें.
आर. जी. साठे, सुपरिंटेंडेंट
व्ही. जी. जोशी, मॅनेजिंग डायरेक्टर

दि ब्रिटिश इंडिया जनरल इन्शुअरन्स कं. लि.
(स्थापना : १९१९)
आम्ही आयुर्विम्याखेरीज करून आग, मरीन, अपघात, इत्यादींचे
सर्व प्रकारचे विमे स्वीकारतों.
—: चेअरमन व मॅनेजिंग डायरेक्टर :—
सर होमी मेहता, के. बी. ई., जे. पी.
पुणें शाखा :
मोति माणिक मॅन्शन,
लक्ष्मी रोड.
हेड ऑफिस :
मेहता हाऊस,
अपोलो स्ट्रीट, मुंबई.

न्यू इंडिया इंडस्ट्रीज लि.
(Approved Re-traders and Approved Contractors)
२६ लॅमिंग्टन नॉर्थ, मुंबई ११.
अध्यक्ष:—श्री. ग. स. मराठे, ॲक्चुअरी.
महाराष्ट्रांतील रबराचा प्रमुख कारखाना
★ गिरणीचे रोलर्स ★ रबरी हातमोजे ★ छापखान्यांचे रोलर्स
★ रीमोल्ड टायर्स ★ रबरी वॉशर्स ★ सॉलिड व्हील्स
व इतर रबरी माल तयार होतो.
पु. ग. मराठे
मॅनेजिंग डायरेक्टर.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा ए. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. कांता वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, ए. नं. १२७।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
(टपाल हेशील माफ)
किरकोळ अंकास
दोन आणे.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष १० पुणें, बुधवार, तारीख २० सप्टेंबर, १९४४ अंक ३८

—राष्ट्रीय काटकसर—

युद्धकार्याची गरज लक्षांत घेऊन डबे वा कागद यांची बचत करणें भाग आहे. ही पॅकिंग-बाबतची अडचण लक्षांत घेऊन—

-गोल्डन कोको-

सुटा मिळण्याची सोय सर्व प्रमुख व्यापाऱ्यांकडे करण्यांत येत आहे. सुटा कोको घेण्यानें पैशाचीही बचत होते. मात्र आपणांस गोल्डन कोकोच मिळत आहे अशी खात्री करून घ्या. नांव लक्षांत ठेवा.

साठे बंधू, "गोल्डन कोको"

—सर्वत्र मिळतो—

साठे कोको व चॉकोलेट कारखाना, पुणें २.

देना बँक

देवकरण नानजी बँकिंग कं. लिमिटेड.

ची

६ वर्षे आणि ३ वर्षांची

अनुक्रमें ३॥ टक्के आणि २॥ टक्के व्याज देणारी

कॅश सर्टिफिकिटें

रु. १० पासून रु. ५,००० पर्यंतच्या विभागांत मिळूं शकतात.

स्थानिक तीनहि शाखांची सेव्हिंग्ज बँक डिपार्टमेंटस प्रत्येक रविवारीं सकाळीं उघडीं राहतील.

व्ही. पी. बेडेकर
आणि सन्स लि.
मुंबई.
मसाल्याचे व्यापारी
पुणें एजंटः—
द. ना. हेजीब

* *
पूना
गेस्ट
हाऊस
टेलिफोन नं. ७७९
* *

संस्थापक :
कै. नानासाहेब सरपोतदार

गिरगांव
मुंबई नं. ४

महिंद्रकर ब्रदर्स
तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक,
पुणें

प्रभु तो मिळेल कोठें !

गजरेच्या ह्या एका गोड प्रश्नाचें उत्तर ऐकण्या-
ण्याकरितां रसिकांची गर्दी उसळत आहे !

१० वा आठवडा !

व्ही. शांताराम आणि राजकमल यांची दुसरी कलाकृति

कथा— स. अ. शुक्ल

-भक्तीचा मळा-

दिग्दर्शक : केशवराव दाते [माली] प्रोड्युसर : व्ही. शांताराम

भूमिका—

मा. कृष्णराव, बेबी नलिनी, अमीर कर्नाटकी

—डेक्कन—

दररोज ७ व १० वाजतां

दर शनि. रवि. सोम. व बुध. जादा खेळ दुपारीं ४ वाजतां

सर्व खेळ मराठी " भक्तीचा मळा "

रिझर्व्हेशन शनि. व रवि. सकाळीं १० ते १२

फ्री व कॉंप्लिमेंटरी पासेस अजिबात बंद !

विविध माहिती

नॅ. सेव्हिंग्ज सर्टिफिकिटांचे नियम ज्यास्त सोइस्कर होणार

सध्यांच्या नियमांप्रमाणें अज्ञान मुलांना नॅशनल सेव्हिंग्ज सर्टिफिकिटें विकत घेतां येत नाहींत. हा नियम बदलून, त्यांना स्वतंत्रपणें तीं घेतां यावींत अशी सुधारणा करण्यांत यावयाची आहे. अज्ञान मुलांच्या वतीनें घेतलेल्या सर्टिफिकेटांचे पैसे परत मिळण्यासंबंधींचे नियमहि जास्त सोइस्कर करण्यांत येणार आहेत.

चेक्सची देवघेव

मुंबई बँकर्स क्लिअरिंग हाउसमार्फत ८ सप्टेंबर रोजीं संपलेल्या आठवड्यांत ३६ कोटि, ८२ लक्ष रुपये किंमतीच्या १,४१,३२६ चेक्सची देवघेव झाली.

मक्याची आयात

५ सप्टेंबर अखेर संपलेल्या आठवड्यांत हिंदुस्थानांत ३५,००० टन गहूं आयात झाला.

अयशस्वी उपचाराचा परिणाम

एका डॉक्टराचे उपचार चालू असतां आपल्या मालकास मृत्यू आला त्यामुळें दुःख अनिवार होऊन मुंबई येथील अबदुल कादर नांवाच्या इसमानें डॉक्टराचे अंगावर दगड फेकून त्यास जखमी केलें. त्यास अटक केली असून तो आतां जामिनावर सुटला आहे.

हिंदुस्थानांचा रशियास मदत

हिंदुस्थानांतून रशियाकडे इराणमार्गे दर महिन्यास ५ हजार टन ह्याप्रमाणें ६ महिने युद्धविषयक साहित्य जात आहे.

सोन्याच्या तुलनात्मक किंमती

मुंबईमधील प्रत्येक तोळ्याची किंमत

वर्ष	सर्वांत जास्त रु. आ. पै	सर्वांत कमी रु. आ. पै	सरासरी रु. आ. पै
१९३८-३९	३७-१०-६	३४-१२-३	३५-१०-३
१९३९-४०	४३-८-०	३६-९-०	३९-१३-११
१९४०-४१	४८-८-०	४०-२-६	४२-६-०
१९४१-४२	५७-१२-०	४१-९-६	४४-७-११
१९४२-४३	७२-०-०	४४-१२-०	५७-१०-१०
१९४३-४४	९६-४-०*	६५-४-०	७६-११-६

* ता. २६-४-१९४३ रोजीं

अमेरिकेंतील सोन्याची किंमत १९३८-३९ पासून आतांपर्यंत एका औंसांस ३५ डॉलर अशी कायम आहे व गेलीं चार वर्षे ग्रेट ब्रिटनमध्यें ती एका औंसास ८ पौंड, ८ शिलिंग अशी कायम आहे. लंडन व न्यूयॉर्क येथील किंमती नियंत्रित आहेत.

चांदीच्या तुलनात्मक किंमती

मुंबईमधील १०० तोळ्यांची किंमत

वर्ष	सर्वांत जास्त रु. आ. पै	सर्वांत कमी रु. आ. पै	सरासरी रु. आ. पै
१९३८-३९	५३-१-६	४८-२-०	५१-११-३
१९३९-४०	६६-३-०	४४-७-६	५५-४-९
१९४०-४१	६४-१३-०	६२-११-०	६२-८-०
१९४१-४२	९७-६-०	६१-१२-६	६६-११-४
१९४२-४३	११६-८-०	७५-४-०	९४-२-६
१९४३-४४	१४१-८-०	१०१-८-०	१२०-७-११

लंडनच्या बाजारांत १९४३-४४ मध्यें चांदीची किंमत एका औंसांस २३½ पेन्स अशी स्थिर राहिली व न्यूयॉर्क येथें ती १ औंसास ४४½ सेंट अशी कायम होती.

अन्न खात्यांतील वरिष्ठ जागीं युरोपियनांची नेमणूक

हिंदुस्थान सरकारच्या अन्न खात्यांतील वरिष्ठ जागांवर हिंदी लोकांच्याच नेमणूका करण्यांत याव्या, असें श्री. प्राणलाल देवकरण नानजी ह्यांनीं सरकारचे अन्नमंत्रि, सर ज्वालाप्रसाद श्रीवास्तव ह्यांस एका मेजवानीचे प्रसंगीं भाषण करतांना नुकतेंच सांगितलें. " गेल्या बारा महिन्यांत कित्येक हिंदी गृहस्थांस अशा जागीं नेमण्यांत आलें आहे. अन्न खात्यांत कामासाठी आपल्या चांगल्या नोकरांस मोकळे करण्याचे संबंधांत व्यापारी समाज सहकार्य करीत नाहीं, अशी माझी तक्रार आहे. युरोपियन नेमले आहेत, त्या जागा मुख्यतः कमी मुदतीच्या करारानेंच भरलेल्या आहेत. " असें ह्या तक्रारीस सर ज्वालाप्रसाद ह्यांनीं उत्तर दिलें.

एप्रिल-जून १९४४ मधील उत्पन्न-खर्च

हिंदुस्थान सरकारनें एप्रिल-जून १९४४ ह्या तिमाहींत आपल्या उत्पन्नापेक्षां ४५ कोटि रुपये अधिक खर्च केला. १९४३ च्या तत्सम तिमाहींत तत्सम आकडा ३३½ कोटि रुपये होता. १९४४ च्या पहिल्या तिमाहींत उत्पन्न १२ कोटि रुपये जास्त झालें तरी लष्करी खर्चांत २४½ कोटि रुपयांची वाढ झाली. तीन महिन्यांत लष्करी खर्च ७२½ कोटि रुपये झाला. हिंदुस्थान सरकारच्या कर्जांत ६९½ कोटि रुपयांची भर पडली.

पुणें सें. को. बँक लि.

वरील बँकेची वार्षिक सभा ता. २४ सप्टेंबर रोजीं भरणार आहे. निवडणुकीची जागा नुतन मराठी विद्यालय हायस्कूल ही असून, निवडणुकीची वेळ सकाळीं ९ ते १२-३० अशी आहे.

अनुक्रमणिका

	पृष्ठ		पृष्ठ
१ विविध माहिती	... २९८	साठा—बँकांनी दाववायची कर्जे—यु. कि. क. कॉर्पोरेशन—विमा कायद्यांत दुरुस्ती.	
२ हिंदुस्थानचें आर्थिक भवितव्य	... ... २९९		
३ कुटुंब व्यवस्थेबाबत शिफारशींचें धोरण	... ... ३००	५ आगबोट वहातुक—अमेरिकेचें वर्चस्व !	... ३०३
४ स्फुट विचार	... ... ३०१	६ वहातुकीच्या साधनांचा विस्तार	... ... ३०३
बँकांच्या मांडवलाचें आकडे-मोडेची चणचण व नाण्यांचा			

अर्थ

बुधवार, ता. २० सप्टेंबर, १९४४

हिंदुस्थानचें आर्थिक भवितव्य

हिंदुस्थान सरकारचे व्यापार-उद्योगमंत्री, सर महमद अझीझुल हक, ह्यांनीं मुंबईच्या इंडिअन मर्चंट्स चेंबरला मेन्या आठवड्यांत भेट दिली त्यावेळीं हिंदी व्यापारी वर्गाच्या म्हणजे ह्या देशांतील राष्ट्रीय वृत्तीच्या लोकमताचे वतीनें युद्धोत्तर काळांतील औद्योगिक व आर्थिक प्रगतीच्या दृष्टीनें कित्येक महत्त्वाचे प्रश्न त्यांचेपुढें मांडण्यांत आले. चेंबरचे अध्यक्ष, श्री. प्राणलाल देवकरण नानजी, ह्यांनीं आपल्या भाषणांत हिंदुस्थान सरकारचें युद्धोत्तर औद्योगिक धोरण कसें असावयास पाहिजे,ह्याचें दिग्दर्शन केलें आणि त्यासंबंधांतली परिस्थिति कशी असमाधानकारक आहे हें सोदाहरण दाखवून दिलें. युद्ध समाप्ति जवळ येत चालली आहे तेव्हां शांततेच्या काळांतली उद्योग—व्यापार विषयक व्यवस्था नीट लावण्याचे प्रयत्न एव्हांपासून दूरदृष्टीनें चालू करण्याचें महत्त्व प्रतिपादून त्यांनीं प्रथम युद्धकाळांतील परिस्थिति आणि तिच्यासंबंधांतील सरकारी धोरण ह्यांचें विवेचन केलें. उद्योगधंद्यांस लागणारी यंत्रसामुग्री व उपकरणें ह्यांची मर्यादित आयात, कच्च्या—पक्क्या मालाची निर्गत, कोळशाचा तुटवडा, इत्यादि घटनांचा परिणाम देशी कारखान्यांवर प्रतिकूल झाला. कॅनडा, ऑस्ट्रेलिया वगैरे ब्रिटिश साम्राज्यांतर्गत देशांत युद्धपरिस्थिति तेथील धंद्यांच्या विस्तारास सहाय्यकारक झाली. लढाऊ सामुग्री तयार करण्यासाठी तेथील धंदे मोठ्या प्रमाणावर वाढवण्यांत आले. ह्याच्या उलट, हिंदुस्थानांत मोठारी, जहाजें, विमानें ह्यांच्या बांधणीचे धंदे प्रस्थापित करण्याच्या योजना पुढें मांडण्यांत आल्या असतां सरकारनें त्यांस सहाय देण्याचें नाकारलें. कांहीं लहान सहान धंदे युद्धप्रयत्नास सहाय म्हणून निघाले आहेत आणि कांहीं जुन्या कारखान्यांचा थोडासा विस्तार झाला आहे. तथापि औद्योगिक उन्नति किंवा अभिवृद्धी असें जिचें वर्णन करतां येईल अशी प्रगति हिंदुस्थानांत घडून आलेली नाहीं असें श्री. प्राणलाल ह्यांनी सांगितलें.

युद्धकाळांत देशांतील उद्योगधंद्यांचें राउळ झपाट्यानें पुढें पडतें ह्या अनुभवास हिंदुस्थान अपवाद ठरला आहे. आतां ह्या पुढें युद्धोत्तर पुनर्घटनेंत सरकार ह्या संबंधांत काय करणार असा हिंदी व्यापारी मंडळाचा त्यास सरळ प्रश्न आहे. देशी धंद्यांस लागणारी यंत्रसामुग्री व मांडवळ योग्य वेळीं उपलब्ध होण्याची काय तरतूद सरकार करीत आहे असें श्री. प्राणलाल ह्यांनीं विचारलें. ह्या देशांत कृत्रिम रसायें तयार करण्याचा धंदा इंपीरियल केमिकल कंपनीच्या हातीं देण्याच्या सरकारी धोरणावर त्यांनीं कडक टीका केली. हिंदुस्थानांतले धंदे हिंदी लोकांच्या हुकमतीखालीं असले पाहिजेत ह्या पूर्वी मान्य झालेल्या तत्त्वास ह्या योगानें हरताळ फासला जात आहे असें ते म्हणाले आणि ह्या देशाच्या हितास बाधक होणारें ह्या प्रकारचें धोरण टाकून देण्यांत येईल असें आश्वासन सरकारकडून त्यांनीं मागितलें. ब्रिटिश साम्राज्यांतील देशांच्या व्यापारास सवलती देणारी जकातींची योजना हिंदी लोकमतास अमान्य असल्यानें ती ह्या देशावर लादली जाणार नाहीं ह्याविषयीं सरकारीहि त्यांनीं घ्यावी असें त्यांनीं सुचविलें. जहाजें बांधणें आणि त्यांतून वहातुक करणें ह्या संबंधांतल्या धंद्यांत हिंदुस्थान अत्यंत मागसलेला आहे आणि त्याची प्रगति होण्यास लागणाऱ्या सवलती मिळत नसल्याची हिंदी धंदेवाल्यांची तक्रार जुनी आहे. युद्धोत्तर काळांतहि ही अवस्था अशीच असमाधानकारक रहाणार, कां सरकार ती सुधारून हिंदी आरमाराच्या व हिंदी जहाजांच्या धंद्यांस उत्तेजन देणार असा सरळ प्रश्न श्री. प्राणलाल ह्यांनीं सर महंमद ह्यांस विचारला. आंतरराष्ट्रीय परिषदांमध्यें हिंदुस्थानचे प्रतिनिधी हिंदी असले पाहिजेत तसा आग्रह त्यांनीं धरला. हिंदुस्थान सरकार ब्रिटिश सरकाराच्या अनुमतीवांचून स्वतंत्र रीतीनें कोणताच अभिप्राय व्यक्त करूं शकत नाहीं किंवा स्वतःच्या मताप्रमाणें योग्य वाटणारें धोरण अंमलांत आणण्याची त्यास सत्ता नाहीं. ब्रिटिश डोमिनियन्सचीं सरकारें स्वतंत्र आणि आपल्या लोकांस जबाबदार असल्यानें त्यांचे प्रतिनिधी जागतिक परिषदांमध्यें अधिकारयुक्त वाणीनें बोलूं शकतात. हिंदुस्थानची गोष्ट ह्यापेक्षां निराळी आहे. म्हणून हिंदी लोकमताचा अनुवाद करणारे प्रतिनिधी अशा परिषदांस पाठवण्यांत आले पाहिजेत असें श्री. प्राणलाल ह्यांनीं सुचवलें. हिंदी मध्यवर्ती सरकार राष्ट्रीय स्वरूपाचें आणि लोकांस जबाबदार असें असणें अगत्याचें आहे आणि असली घटना अस्तित्वांत आल्याबरोबर ह्या देशाची आर्थिक अभिवृद्धी झपाट्यानें व समाधानकारक रीतीनें होणें शक्य नाहीं असें मत युद्धोत्तर पुनर्रचनाविषयक योजनांचे बाबतींत व्यक्त करण्यांत येत आहे, त्यांचा आशय इंडिअन मर्चंट्स चेंबरनें सर महमद अझीझुल हक ह्यांचेपुढें मांडलेल्या विचारांवरून स्पष्ट होत आहे. हिंदुस्थानाच्या हिताविषयीं जिव्हाळा वाटणारें, आणि स्वतःस संमत असलेलें धोरण अंमलांत आणण्याची सत्ता हातीं असलेलें सरकारच विधायक आर्थिक व औद्योगिक कृती करूं शकेल हें उघड आहे. प्रस्तुत प्रश्नाचे संबंधांत हिंदी लोकांच्या शंका, अपेक्षा व अडचणी कोणत्या आहेत हें श्री. प्राणलाल ह्यांनीं स्पष्ट शब्दांत सांगितलें आहे. सध्यः परिस्थिति आणि पुढील घटनांचें वळण ह्यांचें त्यांनीं केलेलें वर्णन बोधप्रद आहे. पण असल्या मतप्रकाशनाचा परिणाम ब्रिटिश सरकाराच्या व पर्यायानें हिंदुस्थान सरकारच्या धोरणावर होईल तर त्याचा खरा उपयोग आहे. तथापि, हिंदी लोकमत निर्भीडपणानें पुढें मांडण्याचें आवश्यक कर्तव्य त्यांनीं बजावलें आहे.

कुटुंब व्यवस्थेबाबत रशियाचें नवें धोरण

समाजाचें रक्षण व स्थैर्य साधतां यावें म्हणून त्यास संतती पुरवणें हें प्रत्येक स्त्रीपुरुषाचें कर्तव्य आहे ही कल्पना कित्येक पाश्चात्य देशांत रूढ झाली आहे; तिलाच अनुसरून रशियन राज्यकर्त्यांनीं अनेक अपत्यांच्या मातांस उत्तेजन, पारितोषिकें व द्रव्यसहाय देण्याचा उपक्रम मध्यंतरीं केला आहे. त्याची माहिती आम्हीं आमच्या मागील अंकांत दिली आहे. युद्धांत तरुण पिढीची मोठ्या प्रमाणांत हानि झाली असल्यानें पुढील शांततेच्या काळांत मनुष्यबळाची आवश्यकता तीव्रतेनें रशियास भासेल ती भरून काढण्याची ही तयारी आहे. पण ह्या प्रयत्नाच्या मार्गांत रशियन राज्यकर्त्यांनीं मोठी मजल मारली आहे. उदाहरणार्थ, अविवाहित मातांच्या संततीविषयींची व्यवस्था त्यांनीं केली आहे, ती लक्षांत ठेवण्यासारखी आहे. अशा स्त्रियांस स्वतःचीं मुलें संभाळावयाचीं असतील तर रशियन सरकार त्यांस खास द्रव्यसहाय देईल. त्यांस अशी इच्छा नसेल तर त्यांच्या मुलांची काळजी सरकार स्वतः अर्भकगृहांत त्यांस ठेवून घेऊन घेईल. पण अविवाहित मातांस आपल्या अपत्यांच्या पितृत्वाविषयीं फिर्याद करून पोटगी मागण्याचा हक्क रहाणार नाहीं. म्हणजे विवाह मर्यादेच्या बाहेर जन्मास आलेल्या मुलांच्या जबाबदारींतून स्त्रिया व पुरुष ह्या दोहोंचीहि सुटका करण्यांत आली आहे.

बहुसंख्य अपत्यांच्या कुटुंबांस उत्तेजन देऊन रशियन राज्यकर्ते थांबलेले नाहींत. मर्यादित आकाराच्या कुटुंबांवर आपली वक्रदृष्टी असल्याचें त्यांनीं स्पष्ट केलें आहे. अशा प्रकारचीं थोडीं मुलें असलेलीं कुटुंबें आणि अविवाहित स्त्रिया व पुरुष ह्यांचेवर खास कर बसवण्यांत येत आहेत. ज्या मानानें कुटुंबांत मुलें कमी त्या मानानें कर वाढता असेल. दोन मुलांच्या आईबापांस कर भराश लागेल, पण त्यांस तिसरें अपत्य होतांच बक्षिस मिळेल. सरकारी खर्चानें बालगृहें चालवण्यांत येतील आणि मुलांच्या उपयोगाच्या कपड्यांचें वगैरे उत्पादन वाढवलें जाईल. स्त्रियांस घटस्फोटाच्या सवलती नसणें ही मोठी अडचण आहे असें रशियांत समजलें जात असे. समाजसत्तावाद्यांनीं आणि लोकशाहीच्या पुरस्कर्त्यांनीं स्त्रियांस विवाहबंधनांतून मोकळें होण्याचें स्वातंत्र्य न देणें म्हणजे स्वतःच्या तत्वांस हरताळ फासणें होय असें लेनिननें बोलून दाखवलें होतें. रशियन पुढाऱ्यांनीं ह्या तत्वाचा आतां त्याग केला असून कुटुंब व्यवस्था स्थिर व भक्कम करण्याचें धोरण त्यांनीं स्वीकारलें आहे. घटस्फोटास उत्तेजन किंवा सवलती देण्याचें सोडून ते त्याच्या मार्गांत अडचणी उत्पन्न करीत आहेत. ज्या विवाहांची नोंद केलेली नसेल ते कायदेशीर गणले जाणार नाहींत. घटस्फोटांच्या खटल्यांस प्रसिद्धी दिली जाईल. उच्च दर्जाचे न्यायाधीशच काय ते घटस्फोटाची परवानगी देऊं शकतील. घटस्फोटाची फी एवढी जबर ठेवण्यांत आली आहे कीं सामान्य कामकऱ्यांस ती देतां येऊं नये. ऐपतदार लोकांसच विकत घेतां येईल अशा प्रकारची ती चैनीची गोष्ट करून टाकण्यांत आली आहे. रशियन राज्यकर्त्यांनीं विवाहसंस्था, कुटुंबव्यवस्था व संततीविस्तार ह्यांचे बाबतींत आपलें जुनें धोरण टाकून दिलें आहे, त्याचा परिणाम कामकरी स्त्रियांवर कोणत्या प्रमाणांत होतो हें सांगतां येत नाहीं. परंतु स्त्रियांविषयींचा त्यांचा दृष्टिकोन साफ बदलला आहे हें लक्षांत घेण्यासारखें आहे.

डोक्यांतील उवा १ तासांत
मारण्याचा आश्चर्यकारक शोध
लायसॉफ
बाटली किंमत १ रु. ट. ख. निराळा
दोन वेळा उपयोग
दि मागोरा केमिकल कं. लि.
— हिराबाग, पुणें २ —

महाराष्ट्रांत लेखी गॅरंटी देणारे
पहिले व फक्त १ च
गोल्ड् मेडॅलिस्ट् व मराठी वळणाचे स्पेशॅलिस्ट्
पेन्टर बेडेकर, ए. जी.,
बुधवार चौक, पुणें २ (सिटी)
बाहेरगांवचीं कामें रेल्वे, मोटार अगर पोस्टानें पाठवूं.

पुण्यांतील
आदर्श निवासस्थान व भोजनालय
छाया लॉजिंग व बोर्डिंग हाऊस
बुधवार चौक, पुणें २.

गांवोगांवीं विक्रेते पाहिजेत.
A 9
क्विनीनचे ऐवजीं मलेरियाकरतां खात्रीचा
अनुभविक उपाय म्हणून
'एनाईन' वापरतात.
अलपाईन प्रॉडक्टस् (इंडिया) पुणें २

स्फुट विचार

बँकांच्या अधिकृत व वसूल भांडवलाचे आकडे

बँकांच्या व्यवहारास प्रारंभ होण्यापूर्वी त्यांचें वसूल भांडवल किमान ५० हजार रुपये असलें पाहिजे, असा हिंदी कंपनी कायदा आहे. कोणासहि उठून बँकिंग कंपनी सहज काढतां येऊं नये, ह्यासाठी अशी तरतूद १९३६ मध्यें कंपनी कायद्यांत दुरुस्ती करून करण्यांत आली. व्यवहारास प्रारंभ करण्यापूर्वी बँकजवळ पुरेसें खेळतें भांडवल असावें, हा त्याचा उद्देश आहे आणि आतां तर अधिकृत भांडवल, खपलेलें भांडवल आणि वसूल भांडवल ह्यांचें प्रमाण कायद्यानें ठरवून दिलेलें आहे. ह्या सुधारणांचे पूर्वी बँकांचा व्यवहार कसा चालू शकत असे, हें गेल्या दोन वर्षांत बंद पडलेल्या कांहीं बँकांचे आकडयांवरून लक्षांत येईल. कोचीनमधील ७ बँका १९४२ सालीं बंद पडल्या, ह्या सर्वांचें मिळून वसूल भांडवल ३९,०६६ रुपये होतें ! दिल्ली येथील इंद्रप्रस्थ इंडस्ट्रिअल बँकेचें अधिकृत भांडवल १ लक्ष रुपये, तर वसूल भांडवल ४,०१० रुपये होतें. मद्रासमधील मर्चंट्स सेंट्रल बँकेनें ५ लक्ष रुपये अधिकृत भांडवल ठेवून फक्त १९,४३५ रुपये वसूल भांडवलावर व्यवहार केला. म्हैसूर इंडस्ट्रिअल अँड कमर्शिअल कॉर्पोरेशनचें अधिकृत भांडवल १० लक्ष रुपये व वसूल भांडवल ३४, ८५७ रुपये होतें. १९४३ सालीं बंद पडलेल्या, बंगालमधील भारत नॅशनल बँकेचें अधिकृत भांडवल १ कोटि रुपये होतें आणि तिचें वसूल भांडवल फक्त ९५१ रुपये होतें ! अपुरें वसूल भांडवल आणि अधिकृत भांडवलाचे पोकळ दर्शनी आकडे ह्यांचा दुष्परिणाम टाळण्यासाठी बँकिंगचा कायदा सुधारण्यांत आला आहे आणि त्यांत आणखी दुरुस्त्या करण्यांत येणार अहित.

मोडेची चणचण व नाण्यांचा साठा

दुय्यम नाण्यांस हिंदुस्थानांत पुष्कळच मागणी वाढली व ती पुरी करणें सरकारास कांहीं काळ कठीण गेलें. ही परिस्थिति हें हिंदुस्थानाचें वैशिष्ट्य मानण्याचें कारण नाहीं; इतर देशांतहि दुय्यम नाण्यांस मागणी पुष्कळच वाढलेली आढळते. उदाहरणार्थ, दक्षिण आफ्रिकेंत १९३९-४० सालीं ७० हजार पौंड किंमतीचीं नाणीं व्यवहारांत प्रसृत झालीं, १९४२-४३ मध्यें हा आकडा १३ लक्ष, २० हजार पौंडांवर गेला. प्रत्यक्ष ग्रेट ब्रिटनमध्यें १९४१ सालीं दुय्यम नाण्यांचें उत्पादन २२½ कोटि नाणीं इतकें झालें होतें, तो आकडा १९४२ मध्यें ३५½ कोटींवर गेला. रुपयाचीं पुरेशीं नाणीं साठविण्यासाठी उपलब्ध न झाल्यामुळें व चलनी नोटेची लोकांना आवड नसल्याकारणानें हिंदुस्थानांत साठा करण्याकरितां दुय्यम नाण्यांस मागणी विशेष आली. गेल्या महायुद्धाच्या सबंद मुदतींत जेवढीं दुय्यम नाणीं खपलीं, त्यांच्या अडीचपट दुय्यम नाणीं १९४३-४४ ह्या एकटया वर्षांत खपलीं ! १९४२-४३ चे मानानें १९४३-४४ मध्यें ५८·७% अधिक नाणीं प्रसृत झालीं. मुंबई व कलकत्ता ह्या विभागांत एकूण नाण्यांपैकीं ६६·४% नाणी खपलीं ! कलकत्ता व मुंबई येथील टांकसाळींचे मदतीस लाहोर येथील नवी टांकसाळ ऑक्टोबर १९४२ मध्यें आली. १९४२-४३ मध्यें २७ कोटि पैसे व अधेल्या पाडण्यांत आल्या होत्या; १९४३-४४ मध्यें त्यांची संख्या ६८ कोटींवर गेली ! नाण्यांचा पुरवठा वाढून, मोडीची चणचण कमी होतांच जनतेचा विश्वास वसूल व दुय्यम नाणीं व्यवहारांत मोकळेपणीं खेळूं लागलीं. लोकांजवळील क्रयशक्ति वाढल्यामुळें कारणानें दुय्यम नाण्यांस मागणी अधिक येणें क्रमप्राप्त आहे.

बँकांनीं द्यावयाचीं कर्जे

इंडियन इंस्टिट्यूट ऑफ बँकर्सच्या पुणें येथील उपशाखेच्या विद्यमानें बृहन्महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्समधील बँकिंगविषयाचे अध्यापक, डॉ. कृष्णन् ह्यांचें प्रो. काळे ह्यांचे अध्यक्षतेखालीं गेल्या रविवारीं माहितीनें भरलेलें असें व्याख्यान झालें. बँकांचीं कर्जे आणि ठेवी ह्यांचें परस्पर प्रमाण इंग्लंड व हिंदुस्थान ह्या देशांत परिस्थितीच्या भिन्नत्वामुळें एकच असूं शकत नाहीं असें सांगून व्याख्यात्यांनीं बँकेस मिळावयाच्या व्याजाचे दृष्टीनें ओव्हरड्राफ्ट व लोन ह्या प्रकारांच्या कर्जाचें स्वरूप कसें असतें ह्याची फोड प्रथम केली. नंतर कर्ज मागणारी गिऱ्हाइकें कोणत्या वर्गाचीं असतात आणि अज्ञान, विवाहित स्त्रिया, वेडे, इत्यादि लोकांशीं व्यवहार करतांना बँकरनें कोणत्या बाबींकडे दक्षतेनें पाहिलें पाहिजे ह्याची तपशीलवार माहिती सांगितली. कर्जाच्या तारणांच्या निरनिराळ्या जातींची छाननी व्याख्यात्यांनीं नंतर केली. कर्जास द्यावयाचे-जामीन, कर्जरोखे व कंपन्यांचे भाग वगैरे ह्यांचे संबंधांत कोणत्या अडचणी कर्ज वसुलीमध्यें उपस्थित होतात ह्याविषयीं विस्तृत विवेचन करून शेतमालाच्या तारणावरील कर्जाकडे व्याख्याते वळले. हिंदुस्थानांत ह्या शेवटच्या कर्जाचें किती महत्त्व आहे हें सांगून इंग्लंडमधील ह्या बाबतींतला प्रघात येथें लागू होत नाहीं असें त्यांनीं प्रतिपादिलें. अत्यंत अल्प मुदतीच्या कर्जावर ब्रिटिश बँकांचा भर असतो आणि त्या शेतमालावर प्रत्यक्ष कर्जे देत नाहींत. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया हा ब्रिटिश प्रघात हिंदुस्थानांत चालू करूं पहात आहे. पण येथील विशिष्ट परिस्थितींत हें कां शक्य व इष्ट नाहीं हें दाखवून त्या बँकेनें शेतमालाच्या कर्जासाठीहि रीडिस्कौंटच्या सवलती दिल्या पाहिजेत असें व्याख्याते म्हणाले. प्रो. काळे ह्यांनीं समारोपाचें भाषण करतांना ह्या शेवटच्या मुद्याचे संबंधांत सहकारी बँकांनीं रिझर्व्ह बँकेकडे केलेल्या तक्रारीची माहिती दिली. बँकरला नुसतें व्यवहाराचेंच नव्हे तर मनुष्य स्वभावाचें आणि कायद्याचें ज्ञान असणें किती आवश्यक असतें आणि त्याचें काम किती जबाबदारीचें असतें ह्याची नीट कल्पना त्यांनीं करून दिली आणि व्याख्यात्यांनीं आपल्या विषयाचें विवेचन अत्यंत व्यावहारिक व सूक्ष्म दृष्टीनें केल्याबद्दल त्यांचें अभिनंदन करून आभार मानले.

यु. कि. कमर्शिअल कॉर्पोरेशनसंबंधीं तक्रारी व त्यांस सरकारचें उत्तर

युनायटेड किंग्डम कमर्शिअल कॉर्पोरेशनचा हिंदुस्थानांतील व्यवहार पुढेमागें विशिष्ट परिस्थिति निवळतांच आवरण्यांत आला, त्याबद्दल हिंदुस्थान सरकारनें पराकाष्ठा केली, अशी माहितीची सूचना मुंबईमध्यें हिंदुस्थान सरकारचे व्यापारमंत्री सर अर्देशिर दलाल, ह्यांनीं लोकविलेल्या प्रतिनिधिक व्यापाऱ्यांच्या

बैठकींत व्यक्त करण्यांत आली. बिन-सरकारी मत लक्षांत घेतलें तर त्याचा यु. कें. क. कॉर्पोरेशनच्या हालचालींस तीव्र विरोध आहे आणि शक्य तितक्या टवकर नेहमीच्या पद्धतीनें व्यापार सुरू व्हावा असें त्यांस सांगण्यांत आलें. ह्या विदेशी कंपनीमार्फत हिंदुस्थानांतून निर्यात करण्यांत आलेल्या मालापैकी ९०% माल रशियाकडे गेला; ह्या कंपनीमार्फत ग्रेट ब्रिटनकडे किंवा अमेरिकेकडे माल पाठविण्यांत आला नाहीं; तुर्कस्थानकडे फारच थोडा माल गेला, वगैरे माहिती बैठकींत सांगण्यांत आली. इराणकडे कंपनीनें साखर निर्यात केल्याबद्दल वरीच तक्रार झाली, परंतु ती साखर फक्त १,५०० टनच होती. संयुक्त राष्ट्रांनीं इराण व्याप्त केल्यावर त्या देशाची निकडीची नड भागविण्यासाठी ब्रिटिश सरकारच्या सूचनेस अनुसरून हिंदी सप्लाय खात्यानें ही साखर खरेदी केली होती, असाहि खुलासा करण्यांत आला. युनायटेड किंग्डम कमर्शिअल कॉर्पोरेशनचें स्वरूप कोणत्या प्रकारचें आहे, त्याच्या व्यवहारांची पार्श्वभूमि कोणती आहे, वगैरेसंबंधी माहिती "अर्था"-मध्यें पूर्वी आलेलीच आहे. ह्या कंपनीची पकड हिंदुस्थानावर बसूं नये अशी हिंदी व्यापारी वर्गाची मागणी आहे.

विमा कायद्यांत दुरुस्ती

विमा सल्लागार समितीची सभा मुंबई येथें हिंदुस्थान सरकारचे व्यापारमंत्री, सर अझीझुल हक ह्यांचे अध्यक्षतेखालीं नुकतीच भरली होती. विमा कंपन्यांनीं आपले लाइफ इन्शुअरन्स फंड इतर जिंदगीपासून अलग ठेवावे, आयुर्विमा कंपन्यांस इतर प्रकारच्या विम्याचा धंदा सुरू करण्यास परवानगी देण्यापूर्वी, त्यांनीं विमा पॉलिसींच्या देण्यास पुरेल एवढा लाइफ फंड निर्माण केला आहे किंवा नाहीं हें पहावें, चीफ एजंटांचें कमिशन नियंत्रित करावें, विमा एजंटांस विमा कंपन्यांचे डायरेक्टर होतां येऊं नये, विमा कंपन्यांना आपल्या कोणत्याहि अधिकाऱ्यास हप्त्यांच्या उत्पन्नाचे अगर नफ्याचे प्रमाणावर अवलंबून राहील अशा प्रकारें वेतन देतां येऊं नये, वगैरे दुरुस्त्या विमा कायद्यांत सुचविण्यांत आल्या आहेत, त्यांवर सभेंत चर्चा झाली. विमा कायद्याचें ८५ (१) ह्या कलमांतील "सरकारी रोखे" ह्या शब्दांचे ऐवजी " सरकारमान्य रोखे " असे शब्द घालावे, अशी दुरुस्ती सरकार करणार आहे, त्यामुळें प्रॉव्हिडंट-सोसायट्यांना सक्तीनें गुंतवाव्या लागणाऱ्या रकमांचे बाबत सवलत मिळणार आहे. एकाद्या विमा पॉलिसीची रक्कम कंपनीनें दिली पाहिजे, असें कायद्याप्रमाणें ठरल्यानंतर दोन महिन्यांत कंपनीनें ती दिली नाहीं, तर तिचें नांव रजिस्टरमधून काढून टाकण्यांत यावें, ही सरकारची सूचना विमा कंपन्यांच्या चालकांना इष्ट वाटली नाहीं. वास्तविक, ह्या सूचनेस विरोध दर्शविण्याचें प्रयोजन नाहीं.

मुंबई प्रांताचा युद्धप्रयत्न

मुंबई प्रांतांतील सुमारें १ लक्ष लोक सैन्यांत दाखल झाले आहेत. मराठा पलटणींनीं जगांतील सर्व रणक्षेत्रांत कीर्ति मिळविली आहे. ह्या प्रांतांतील लोकांनीं वेगवेगळ्या डिफेन्स कर्जे, बिनव्याजी रोखे, नॅशनल सेव्हिंग्ज सर्टिफिकिटें, इत्यादींत मिळून १३२½ कोटि रुपये गुंतविले आहेत. युद्धफंडास देणग्याहि मोठ्या प्रमाणांत मिळालेल्या आहेत. पुणें येथील युद्धविषयक प्रदर्शनाचें उद्घाटन करतांना प्रांतिक गव्हर्नरांनीं वरील माहिती सांगितली.

THE MUDHOL STATE CENTRAL CO-OPERATIVE BANK LIMITED MUDHOL

NOTICE

Notice is hereby given that the Second Ordinary General Meeting of the Bank will be held at the Old Palace, Mudhol, on Saturday the 30th September 1944 at 10 A. M. (N. S. T.) to transact the following business :—

(1) To adopt the report of the Directors and the audited statements of accounts of the Bank for the year ending 30th June 1944.

(2) To declare a dividend.

(3) To declare the nomination of the Board of directors.

(4) To consider the audit memorandum.

(5) To transact any other business that may be brought up with the permission of the Chairman.

Mudhol, 16th Sept. 1944.

By order of Board,
R. N. Tambe,
Managing Director.

THE BANK OF AUNDH LIMITED, AUNDH.

(Incorporated in Aundh State, liability of members limited).

NOTICE.

Notice is hereby given that an Extra-Ordinary General Meeting of the share-holders of the Bank of Aundh, Limited, will be held in the hall of Shri Yamai Temple at Aundh, on Sunday the 8th October, 1944 at 4-30 p. m. (S. T.) to consider and pass the amendments to the Bank's Articles of Association as specified in the notice sent to the shareholders.

Notice is also hereby given that a second Extra-Ordinary General Meeting of the shareholders of The Bank of Aundh Ltd., will be held in the hall of Shri Yamai Temple at Aundh on Monday the 23rd October, 1944 at 4-30 p. m. (S. T.) to confirm the amendments passed by the first General Meeting.

By order of the Board,
B. R. Vartak,
General Manager.

Aundh,
12th September, 1944.

आगबोट वहातुकीचा धंदा—अमेरिकेचें वर्चस्व ?

इंग्लंड हें बेट असून त्याचा परराष्ट्रांशीं व्यापार समुद्रमार्गे आगबोटींतूनच होणें क्रमप्राप्त आहे. ब्रिटिश लोकांस लागणाऱ्या अन्नापैकी निम्में अन्न व तेथील कारखान्यांचा बराच मोठा कच्चा माल ह्यांची बाहेरून आयात व्हावी लागते. जळणाचीं तेलेंहि आयात करावीं लागतात. तयार माल व कोळसा ह्यांची मोठ्या प्रमाणावर निर्गत होते. इंग्लंडमध्यें शेतींत वाढ व सुधारणा झाली तर अन्न पुरवण्याबाबत इंग्लंडचें परावलंबन थोडें कमी होईल आणि विमानमार्गे कांहीं मालाची वहातुक सुरू झाली, तरी आगबोटींच्या वहातुकीचें महत्त्व कायम राहणार, हें उघड आहे. ब्रिटिश आगबोटी केवळ आपल्या देशाच्या आयात-निर्गतीचीच वहातुक करीत होत्या, असें नसून, जगांतील सर्व समुद्रावर त्यांचें वर्चस्व होतें. हिंदुस्थानच्या किनाऱ्यावरील वहातुकींतहि त्यांचे हितसंबंध आहेत. कोळसा, सूत, कापड, लोखंड, पोलाद; इत्यादींची निर्गत करून इंग्लंडला इतर देशांकडून पैसे मिळतात, त्याचप्रमाणें वहातुकीच्या दरांचे मार्फत इंग्लंडचें इतर राष्ट्रांकडे येणें निर्माण होतें, म्हणजे प्रत्यक्ष माल न पाठवितां एक प्रकारची अदृश्य निर्गत केल्याचाच परिणाम होतो व ह्या अदृश्य निर्गतीमुळें इंग्लंडसारख्या छोट्या देशाच्या ४½ कोटि लोकांचें राहणीचें उच्च मान टिकूं शकते व त्यांची सत्ता जगभर चालते. परदेशांतील पेशाच्या गुंतवणुकीवरील व्याज व डिव्हिडंड, विमा कंपन्यांचें व दलालांचें उत्पन्न, इत्यादि व्यवहार त्याच प्रकारचे आहेत, परंतु आगबोटींच्या धंद्याचें "अदृश्य निर्गती"च्या व्यवहारांतील स्थान पहिल्या प्रतीचें आहे. चलतीच्या काळांत, एकूण "अदृश्य" निर्गतीपैकी ९१% निर्गत एकट्या आगबोटींच्या वहातुकीमुळें निर्माण झाली, १९३५ सालीं हें प्रमाण २५% वर आलें.

युद्धास प्रारंभ झाल्यापासून ब्रिटिश लोकांची इतर देशांतील बरीच मालमत्ता शत्रूच्या हातांत गेली आहे, तर पुष्कळ गुंतवणूक विकून टाकावी लागली आहे. जगभर चालू असलेल्या विम्याचे व बँकिंगचे धंदास सध्याजोकच आळा बसला आहे. आपलें देणें, आपली आयात कमी होऊं न देतां भागविण्याचें असेल तर ग्रेट ब्रिटननें १९३८ मधील निर्मातीपेक्षा आपली वार्षिक निर्गत ३५ कोटि पौंडांनीं तरी वाढविली पाहिजे, असें मि. हरकुर्ट जॉन्सन ह्यांनीं पार्लमेंटांत नुकतेंच सांगितलें. ब्रिटिश आगबोटींच्या वहातुकीस पूर्ववत प्रारंभ झाला नाहीं तर ही तूट भरून काढणें फारच कठीण होणार आहे. युद्धोत्तर स्पर्धा बाजूस ठेवली, तरी मामुली वहातुकीस लागणाऱ्या आगबोटी ग्रेट ब्रिटनजवळ पुरेशा शिल्लक उरतील काय, असा प्रश्न तेथें उपस्थित झाला आहे. युद्धाच्या पांच वर्षांचे अवधींत ग्रेटब्रिटनच्या शेकडो आगबोटी व त्यांवरील हजारो खलाशी समुद्राच्या तळास गेले आहेत; अमेरिकेचें स्थान मात्र वर चाललें आहे! ग्रेटब्रिटनच्या आगबोटींचा नाश होऊन त्या देशाचें दळणवळण तुटण्याचा प्रसंग उपस्थित झाला, त्यावेळीं अमेरिकेनें अल्पावधींत आगबोटी बांधून पुरवल्या, त्यामुळें ग्रेटब्रिटनचा बचाव होऊं शकला हें खरें आहे. परंतु त्याचा परिणाम असा झाला आहे कीं, युद्धानंतर जगांतील दोन तृतीयांश आगबोटी अमेरिकेच्या मालकीच्या असलेल्या आढळतील व तो देश आगबोट वहातुकीच्या धंद्यांत प्रधान स्थान पटकावील. उतारूंची वहातुक करणाऱ्या जेवढ्या आगबोटी बुडाल्या, त्या नव्यानें बांधण्यांत आलेल्याच नाहींत, त्या कारणानें ग्रेट ब्रिटनच्या प्रतिष्ठेस मोठाच धक्का बसणार आहे. जगांतील प्रमुख बंदरांत ह्यापुढें अमेरिकेच्या आगबोटी वावरणार! ग्रेट ब्रिटनचा आगबोट वहातुकीचा पिढीजात धंदा इतरांचे हातीं जाऊं नये, ह्यासाठी ब्रिटिश सरकार हरएक प्रकारें प्रयत्न करील, हें उघड आहे.

वहातुकीच्या साधनांचा विस्तार

"शंभर वर्षांपूर्वी गंगा नदींतून पुष्कळच वहातुक होत असे. अलाहाबाद व कानपूरपर्यंत मोठाल्या बोटी येत असत, परंतु रेल्वेजनीं ही वहातुक बंद पाडली आहे. देशाच्या आकाराच्या मानानें आपल्या रेल्वेज अत्यंत अपुऱ्या आहेत व बरीच वहातुक नद्यांचे द्वारा होणें शक्य आहे. युद्ध समाप्तीनंतर विमानांची वहातुक खूप वाढणार, हें दिसतच आहे. आतांपर्यंत, रेल्वेजची, नद्यांतून व वैमानिक वहातुक हे विषय स्वतंत्रपणें विचारांत घेतले जात. रेल्वेज ही मध्यवर्ती सरकारकडील बाब असून रस्ते प्रांतिक सरकारांच्या कक्षेंत येतात. ह्यामुळें रेल्वेज विरुद्ध रस्ते हा लढा बरेच दिवस माजला. नफातोटा पहातांना संबंध देशाच्या सामुदायिक हिताकडे दुर्लक्ष झालें."—सं. प्रांताच्या गव्हर्नरांचें इंडियन मेडस कॉन्सिलच्या कौन्सिलच्या अधिवेशनांत भाषण.

ट्रेझरी बिलांवर ७ आणे १० पै व्याजाचा दर

रिझर्व्ह बँकेनें गेल्या आठवड्यांत ६ कोटि रुपयांचीं हिंदुस्थान सरकारचीं ट्रेझरी बिलें विकलीं, त्यांवर व्याजाचा सरासरी दर द. सा. द. शे. ७ आ. १० पै इतका पडला.

दि कॉमनवेल्थ विमा कंपनी लि.

एका भागीदारानें पुरस्कारलेली, महाराष्ट्रांतील एजंटासाठीं

बक्षिसाची चढाओढ

चढाओढींत भाग घेऊं इच्छिणारांनीं तावडतोब एजन्सीसाठीं अर्ज करावेत.

● महाराष्ट्रांत सर्वत्र एजंटस नेमणे आहेत. ● माहिती पत्रकांसाठीं भेटा अगर लिहा.

श्री. म. जोशी
मॅनेजिंग डायरेक्टर
दि कॉमनवेल्थ जेनुअरन्स विमा कंपनी लि., पुणें शहर

सध्याच्या टंचाईच्या काळांत जीवनद्रव्ये कमी पडतात.
जीवनद्रव्यांनीं (Vitamins) युक्त असे
(सदाय खात्यानें मान्यता दिलेले)
टोमॅटो केचप (गोड) व
टोमॅटो सॉस [तिखट व आंबट]
आजच मागवा व जीवनद्रव्यांची वाटणारी
उणीव भरुन काढा.
रुरल प्रॉडक्टस कंपनी लि. पुणें
बिझिनेस ऑफिस : ९१३ अ सदाशिव, पुणें २.

प्रगतिपथावरील नवा
मै ला चा — द ग ड
सन १९४३ अखेर
नव्या कामांत ११० टक्के वाढ
चालू कामांत १०० टक्के वाढ
आयुर्विमानिधींत ८७ टक्के वाढ
— आपला विमा किंवा एजन्सी आजच घ्या —
दि औंध म्यूच्युअल लाइफ
ॲश्युरन्स सोसायटी लि., पुणें.
आर. जी. साठे, सुपरिंटेंडेंट
व्ही. जी. जोशी, मॅनेजिंग डायरेक्टर

दि ब्रिटिश इंडिया जनरल इन्शुअरन्स कं. लि.
(स्थापना : १९१९)
आम्ही आयुर्विम्याखेरीज करून आग, मरीन, अपघात, इत्यादींचे
सर्व प्रकारचे विमे स्वीकारतों.
—: चेअरमन व मॅनेजिंग डायरेक्टर :—
सर होमी मेहता, के. बी. ई., जे. पी.
पुणें शाखा : मोति माणिक मॅन्शन, लक्ष्मी रोड.
हेड ऑफिस : मेहता हाऊस, अपोलो स्ट्रीट, मुंबई.

न्यू इंडिया इंडस्ट्रीज लि.
(Approved Re-traders and Approved Contractors)
२६ लॅमिंग्टन नॉर्थ, मुंबई ११.
अध्यक्ष:—श्री. ग. स. मराठे, ॲक्चुअरी.
महाराष्ट्रांतील रबराचा प्रमुख कारखाना
★ गिरणीचे रोलर्स ★ रबरी हातमोजे ★ छापखान्यांचे रोलर्स
★ रीमोल्ड टायर्स ★ रबरी वॉशर्स ★ सॉलिड व्हील्स
व इतर रबरी माल तयार होतो.
पु. ग. मराठे
मॅनेजिंग डायरेक्टर.

हें पत्र पुणें, पेठ सांवुर्डा ब. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' सांवुर्डा, ब. नं. १२७।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
(टपाल हंशील माफ)
किरकोळ अंकास
दोन आणे.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष १० पुणें, बुधवार, तारीख २७ सप्टेंबर, १९४४ अंक ३९

—राष्ट्रीय काटकसर—

युद्धकार्याची गरज लक्षांत घेऊन डबे वा कागद यांची बचत करणें भाग आहे. ही पॅकिंग-बाबतची अडचण लक्षांत घेऊन—

—गोल्डन कोको—

सुटा मिळण्याची सोय सर्व प्रमुख व्यापाऱ्यांकडे करण्यांत येत आहे. सुटा कोको घेण्यानें पैशाचीही बचत होते. मात्र आपणांस गोल्डन कोकोच मिळत आहे अशी खात्री करून घ्या. नांव लक्षांत ठेवा.

साठे बंधू, "गोल्डन कोको"

—सर्वत्र मिळतो—

साठे कोको व चॉकोलेट कारखाना, पुणें २.

देना बँक

देवकरण नानजी बँकींग कं. लिमिटेड.

अधिकृत भांडवल	...	रु. १,००,००,०००
विक्रीस काढलेलें भांडवल	...	रु. ५०,००,०००
वसूल भांडवल	...	रु. ३५,००,०००
रिझर्व्ह फंड	...	रु. ११,००,०००
३१-८-४४ रोजीं एकंदर ठेवी	...	रु. ६,६७,६९,९०५
„ खेळतें भांडवल	...	रु. ७,३१,६३,८३२
„ खात्यांची संख्या	...	२८,१५६
„ शाखांची संख्या	...	२८

देना बँक लवकरच बऱ्हाणपूर येथें एक शाखा उघडणार आहे.

व्ही. पी. बेडेकर
आणि सन्स लि.
मुंबई.
मसाल्याचे व्यापारी
पुणें एजंट:—
द. ना. हेजीब

भूगर्भांतील पाण्यासंबंधीं
तज्ज्ञ—सल्ला

विहीर अगर बोअर करण्याचे आधीं त्या ठिकाणीं पाण्याचा झरा लागेल अगर नाहीं हें अजमावणें काळ्या दगडाचे भागांत अत्यंत आवश्यक आहे. जागा पाहून अशा प्रकारचा खात्रीलायक सल्ला देण्यांत येईल.

७५४ शुक्रवार पुणें नं. २ } न. गं. आपटे, बी. एजी. जलशास्त्रपारंगत

गिरगांव मुंबई नं. ४

महिंद्रकर ब्रदर्स
तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक. पुणें

'पूना प्रॉपर्टीज्'

पुणें येथें बंगले, फ्लॅट्स्, जमिनी वगैरे मिळकतींच्या खरेदी-विक्रीचे व्यवहार दलालाच्या सुमुहूर्तावर सुरू होणार.

"दया-निवास" कॉमनवेल्थ कॉलनी, पुणें २.

म. य. दातार, प्रोप्रायटर, "पूना प्रॉपर्टीज्"

विविध माहिती

श्री. दत्तोपंत फाटक ह्यांचा नवा उपक्रम

पुणें येथील पायोनियर डाइंग हॉऊसची माहिती सर्वांना आहेच. त्यांनीं आतांपर्यंत कपडा रंगवून देणेबद्दल लोकांची खात्री करून दिलेली आहेच. आतां त्यांनीं स्टीम लॉंड्री सुरू केली असून, ती यशस्वी झाली आहे. स्टीम लॉंड्रीनें कपडे फाटतात अशी लोकांची समजूत झालेली आहे, ती समजूत पायोनियर डाइंग हाऊसचे मालक श्री. फाटक यांनीं चुकीची ठरविली आहे. हा प्रयोग बऱ्याच लोकांनीं केला होता; परंतु त्यांत म्हणावें तसें त्यांना यश न आल्यानें श्री.फाटक ह्यांच्या उपक्रमाचें महत्त्व विशेष आहे. त्यांच्या लॉंड्रींत सुताचे, रेशमी व लोकरीचे कपडे निरनिराळे धुवून निघतात. त्यांनीं प्रयोगाकरितां एकच मशिन आणलें असून तें सध्यां चालू आहे. लोकांकडून धुण्यासाठी कपडे येत असून त्यांची खात्री होऊं लागली आहे.

देना बँकेच्या नव्या भागांचें स्वागत

देवकरण नानजी बँकिंग कं. लि.चें अधिकृत भांडवल ५० लक्ष रुपये होतें व विक्रीस काढलेल्या, खपलेल्या आणि वसूल भांडवलाचा आकडा २० लक्ष रुपये होता. कंपनीनें उरलेलें ३० लक्ष रुपयांचें भांडवल नुकतेंच विक्रीस काढलें. प्रत्येक ५० रुपयांच्या ऑर्डिनरी भागास १५ रुपये वाढावा घेण्यांत आला. विक्रीस उपलब्ध असलेल्या भागांपेक्षां अधिक भागांस मागणी आलेली आहे, असें समजतें. बँकेचें अधिकृत भांडवल १ कोटि रुपये करण्यांत आलेलें आहे.

मुंबई प्रांतिक सहकारी लँड मॉर्गेज बँक लि.

जमीन व धान्य ह्यांच्या किंमती वाढत्या असल्याकारणानें, दीर्घ मुदतीच्या जुन्या कर्जफेडीसाठी लागणाऱ्या कर्जास आतां मागणी कमी आहे व मुदतीचे आधींच कर्जफेड होऊं लागली आहे. १९४३-४४ मध्यें प्रांतिक बँकेनें २ लक्ष, २७ हजार रुपये कर्जाऊ दिले. प्राथमिक बँकांनीं पुढील हप्त्यांचे पोटी ४ लक्ष, ६ हजार रुपये आगाऊच परत केले. एका वर्षांत, मध्यवर्ती बँकेचें प्राथमिक बँकांकडून येणें २½ लाखांनीं कमी झालें. ह्या सर्वांचा बँकेच्या नफ्यावर परिणाम होऊन, नफ्याचा आंकडा १५,१२१ रुपयांवर आला व डिव्हिडंडचा दर चार वर्षे २½% होता तो २$\frac{3}{16}$% वर आणावा लागला. भाग भांडवल वाढत गेलें आहे व व्यवहाराचा आकडा उतरत चालला आहे.

डिफेन्स से. सर्टिफिकेटांचे अधिकृत विक्रेते

सरकारी डिफेन्स सेव्हिंग्ज सर्टिफिकेटांचे पुणें शहरांतील अधिकृत विक्रेते म्हणून श्री. व. वि. लोणकर, एम्. ए., बी. कॉम. शेअर व स्टॉक ब्रोकर ह्यांची नेमणूक झाली आहे.

कॅप आणि कं. लि.

वरील कंपनीस ३१ मार्च, १९४४ अखेर संपलेल्या वर्षी १,५०,६६३ रुपये फायदा झाला. भागीदारांस १५% डिव्हिडंड मिळणार आहे.

शेअर बाजार

(श्री. व. वि. लोणकर, एम्. ए., बी. कॉम्, २४ डे. जि. पुणें ४)

लढाई संपणार या भावनेनें सर्व बाजार फारच खाली आलेले आहेत, आणि जरी आजच्या भावावर कमी येणारीं त्यांनेंसुद्धां समाधानकारक म्हटलीं पाहिजेत अशी परिस्थिती आहे, तरीसुद्धां गुंतविणारे अजून बेतानेंच पाऊल टाकीत आहेत. लढाई आज-उद्यांत संपत नाहीं हें वाढणाऱ्या जर्मन प्रतिकारावरून दिसत आहे. युरोपमधील युद्ध संपलें तरी जपानशीं चालू असलेलें युद्ध निश्चितपणें बरेच दिवस चालणार आहे असें दिसतें. तें चालूं आहे तोंपर्यंत हिंदुस्थानांत दोस्तांचा युद्धखर्च वाढतच रहाणार. त्यामुळें सर्व बाजारांच्या पाठीमागें विस्तार पावणाऱ्या चलनाचा एकसारखा पाठिंबा रहाणार आहे. जपानी कापड अथवा सूत यांची स्पर्धा हिंदी धंद्यांशीं यापुढें कदापि होणें शक्य नाहीं असें मानण्यास आज हरकत नाहीं. कापडाचा धंदा हा आतां भक्कम पायावर उभा राहिलेला असून असून तो हिंदुस्थानांतील सर्वांत मोठा, सुव्यवस्थित व सर्वांत जास्त पैसा कमावणारा आहे. युद्धमूलक सरकारी मागणी जरी कमी झाली तरी युद्धोत्तर हिंदी जनतेची मागणी जोरांत येणार असून, हिंदी कापडाचा निर्गत व्यापार हाही फोफावणार आहे. सरतेशेवटीं तूर्त जास्त व्याज देणारीं गुंतवणुकींस साधनें नसल्यानें पैसेवाल्या मंडळीस शेअरबाजाराकडेच धांव घेणें भाग आहे. सोन्याचांदीचे बाजारांतून मोकळा होणारा पैसा हा सुद्धां शेअर बाजाराकडेच वळला पाहिजे. तेव्हां चालू असलेली मंदी ही बरीचशी कृत्रिम असून ती फार दिवस टिकणार नाहीं असें अनुमान काढण्यास कुठलाही धोका नाहीं. आकारानें लहान असे इंडिया युनायटेड डिफर्ड व आर्डिनरी, आपोलो, न्यु व्हिक्टोरिआ प्रेफरन्स आणि बी. आय. सी. हे व संख्येनें कमी असलेले सिम्लेक्स, पोद्दार, मोरारजी, माधवजी, श्रीनिवास, न्युसिटी यांच्यामध्यें लोक आणखी मंदीची वाट पहात आहेत, तों नकळत तेजी होऊन जाईल असा इषारा यावासा वाटतो.

पुणें सें. को. बँक, लि.

वरील बँकेची वार्षिक सभा ता. २४ सप्टेंबर रोजीं भरली होती. वार्षिक निवडणुकींत खालील उमेदवार व्यक्तिशः भागीदारांतर्फे निवडून आले:—

	मतें
डायरेक्टर्स	
१ रा. सा. य. द. खोले	६८२
२ श्री. श्री. रा. पाळंदे	६२७
३ श्री. य. घों. ओगले	६२६
४ श्री. ग. र. तुळशीबागवाले	६१३
५ श्री. दा. ग. बापट	५६८
६ श्री. वा. के. जोशी	५४४
७ श्री. वि. ज. करंदीकर	५४३
ऑडिटर्स	
१ श्री. गो. द. आपटे	६७३
२ श्री. एम्. जी. ओक	४३४

श्री. पाटसकर हे अर्बन सोसायट्यांतर्फे डायरेक्टर निवडून आले. रा. सा. खोले ह्यांची नव्या वर्षाकरितां चेअरमन म्हणून पुनः निवड झाली आणि रा. सा. मगर हे व्हाइस-चेअरमन झाले.

अनुक्रमणिका

	पृष्ठ		पृष्ठ
१ विविध माहिती ...	३०६	उपयुक्त कामगिरी–चटाट्यांच्या ताडयांची योजना–कोयनेलचें ढांवरापासून उत्पादन.	
२ शेअर बाजार ...	३०६	८ पौंडांतील कर्जांची उतरती कमान	३१०
३ पुणें सें. को. बँक ...	३०६	९ युद्धखर्चांची तुलना ...	३१०
४ ब्रिटिश सहकारी संघटनेची शतसंवत्सरी... ...	३०७	१० मुधोळ स्टेट सें. को. बँक	३११
५ हिंदी शेतीची चर्चा	३०८	११ कराड अर्बन को. बँक	३११
६ ढिकींनंतर शेतकरी	३०८	१२ मुंबई प्रां. सहकारी बँक	३११
७ स्फुट विचार ...	३०९	१३ विहिरींचा पाणीपुरवठा	३११
रु. डे. बोर्डाची सभा–श्री. सरस्वती ह्यांचें भाषण–बँकेची			

अर्थ

बुधवार, ता. २७ सप्टेंबर, १९४४

ब्रिटिश सहकारी संघटनेची शतसंवत्सरी

"रॉकडेल पायोनिअर्स"

ग्रेट ब्रिटनमध्यें सहकारी पद्धतीच्या माल-विक्रीच्या संघटनास चालू वर्षी शंभर वर्षे पुरीं झालीं असल्यानें तो प्रसंग साजरा केला जात आहे आणि हिंदुस्थानांतहि ब्रिटिश सहकारी कार्यावियर्षीचा आदर व्यक्त करण्यासाठी सभा भरवण्याच्या आहेत. ग्रेट ब्रिटनमधील सहकार मुख्यत्वें करून लोकांच्या नित्याच्या गरजा भागवण्यासाठी चांगला माल तयार करून व जमवून तो योग्य भावानें विकण्याच्या व्यवहारास वाहिलेला आहे आणि त्या हेतूनें देशभर लहान-मोठीं दुकानें चालवण्यांत येत आहेत. ह्या संस्थांच्या सभासदांमध्यें कामकरी लोकांचा भरणा आहे. ह्या कार्याचा व्याप आणि त्याची व्यवस्था ह्यांची माहिती हिंदुस्थानांतील सहकारी कार्यकर्त्यांस असणें अगत्याचें आहे. आर्थिक दृष्ट्या निर्बल असलेल्या ब्रिटिश जनतेनें सहकारी तत्त्वाचा आश्रय करून संघशक्तीच्या सामर्थ्यानें अत्यंत अल्प प्रमाणांतील आपल्या भांडवलाच्या पायावर सध्याचा टोलेजंग धंदा उभारला आहे. ह्या तेजस्वी इतिहासापासून हिंदुस्थानांतील लोकांस स्फूर्ति मिळण्यासारखी आहे. १८४४ सालापूर्वी ग्रेट ब्रिटनमध्यें रॉबर्ट ओवेन ह्यांच्या नेतृत्वाखाली कांहीं सहकारी मंडळ्या स्थापन झाल्या होत्या, तरी ब्रिटिश सहकारी चळवळीचा खरा पाया त्या वर्षी रॉकडेल येथें २८ कामगारांनीं प्रत्येकीं एक पौंड वर्गणी देऊन एक दुकान घातलें हाच समजला जातो, हें योग्य आहे आणि त्याच उपक्रमाची शतसंवत्सरी यंदा साजरी केली जात आहे. ह्या उत्पादकांचा मुख्य उद्देश बचत करून परस्पर सहायानें स्वतःच्या नित्याच्या गरजा भागवणें हा होता, तरी त्यांच्या कार्यक्रमांत घरें बांधणें, शेतीच्या व इतर मालाचें उत्पादन करणें आदि क्रमाक्रमानें सबंध आर्थिक क्षेत्र व्यापून शिक्षण व राजकारण ह्यांतहि आपल्या तत्त्वांचा शिरकाव करणें ह्या बाबींचा अंतर्भाव प्रारंभींच केलेला होता. त्यांचीं तत्त्वें आणि व्यवहाराचे नियम आतां सर्वमान्य झाले आहेत.

रॉकडेल पायोनिअर्सच्या स्टोअरची प्रगति मंद गतीनें झाली आणि तिसऱ्या वर्षाचे अखेरीस ह्या सोसायटींत केवळ ११० सभासद होते. पण गेल्या शंभर वर्षांत तिनें रोवलेल्या रोपट्याचा प्रचंड वृक्ष बनला असून त्याच्या शाखा जगभर पसरल्या आहेत आणि त्यापासून सर्वत्र राष्ट्रीय वृक्ष निर्माण झाले आहेत. ग्रेट ब्रिटनमध्यें किरकोळ माल विक्रीच्या १,१४८ सोसायट्यांचे ९० लक्ष सभासद आहेत आणि १९४२ सालीं त्यांनीं सुमारें ४२५ कोटि रुपये किंमतीच्या मालाची विक्री केली. त्यांच्या नोकर लोकांची संख्या तीन लक्ष आहे. इंग्लंडमध्यें मध्यवर्ती संस्था "कोऑपरेटिव्ह होलसेल सोसायटी" ही आहे आणि स्कॉटलंडमध्यें ह्याच नमुन्याची दुसरी संस्था आहे. त्यांच्या भांडवलाच्या व विक्रीच्या किंमतीचा आकडा अढीचशें कोटि रुपयांच्या घरांत आहे. ह्या दोन सोसायट्या नुसती विक्रीच करीत नाहींत तर उत्पादन, वहातूक, बँकिंग व विमा इत्यादि व्यवसायहि त्यांच्या क्षेत्रांत येतात. त्या दोन्ही मिळून एकत्र चहा, कॉफी व कोको ह्यांच्या उत्पादनाचा व पुरवठ्याचा धंदा करतात. किरकोळ विक्री करणाऱ्या सोसायट्या दूध, ब्रेड वगैरेच्या पुरवठ्याचा विशिष्ट व्यवसाय संयुक्त संघटनेनें करतात. ब्रिटिश सहकारी संस्थांचें एक संघटित स्वतंत्र राज्यच जणूं काय बनलें आहे. त्यांचें एकीकरण को-ऑपरेटिव्ह यूनिअन ह्या मध्यवर्ती संस्थेंत झालेलें आहे आणि हें एक प्रकारचें कार्यकारी मंडळ असून त्याचें काम सर्व प्रकारची माहिती गोळा करून पुरवणें, सल्ला देणें व शिक्षणाची व्यवस्था करणें हें आहे. सर्व संस्थांच्या प्रतिनिधींची वार्षिक परिषद भरते आणि तीमध्यें निश्चित झालेल्या धोरणाची अंमलबजावणी नॅशनल को-ऑपरेटिव्ह अॅथॉरिटी ह्या संस्थेकडे सोंपवलेली आहे.

वरील त्रोटक वर्णनावरून ब्रिटिश सहकारी चळवळ किती संघटित, विस्तृत, बलवान व कार्यक्षम आहे ह्याची कल्पना येईल. युद्धपरिस्थितींत ब्रिटिश सहकारी संस्थांचें उत्पादन निरनिराळ्या अपरिहार्य सरकारी नियंत्रणामुळें मर्यादित झालें असलें तरी मालाच्या वाटणीचे बाबतींत त्यांच्या कार्याचा विस्तारच झालेला आहे. इंग्लंडमध्यें रेशनिंग व्यवस्थित पद्धतीनें चालू आहे आणि ब्रिटिश लोकसंख्येच्या एकचतुर्थांश लोक शिधापद्धतीच्या क्षेत्रांतील माल सहकारी स्टोअर्समधून विकत घेत आहेत. सहकारी दुकानें अगोदरच चांगल्या रीतीनें चालत असल्यानें त्यांस हा युद्धकालीन व्यवहार सहज हातीं घेतां आला आहे. ब्रिटिश सहकारी संस्थांनीं युद्धोत्तर काळांतील आपल्या प्रगतीचा प्रश्न अर्थातच हातीं घेतला आहे आणि त्याचा विचार करण्यासाठी नेमलेल्या समितीनें कित्येक सूचनाहि केल्या आहेत. ह्या समितीच्या सभासदांमध्यें महत्त्वाचे मतभेद आहेत. तथापि, प्रगति व अधिक बळकटी ह्यांच्या आवश्यकतेबाबत त्यांचें पूर्ण ऐकमत्य आहे. ब्रिटिश सहकाऱ्यांची वार्षिक परिषद यंदा बेल्फेस भरूं शकली नाहीं व ती पुढें ढकलावी लागली. ह्यामुळें युद्धोत्तर संवर्धनाविषयींचे निर्णय अजून करतां आलेले नाहींत. "रॉकडेल पायोनिअर्स" च्या उपक्रमाचे शतसंवत्सरीचे निमित्तानें हिंदी सहकारी कार्यकर्त्यांनीं ब्रिटिश सहकारी चळवळीचीं ध्येयें, तिची लोकशाहीची घटना, तिचें उत्साही कर्तृत्व, इत्यादि संबंधांत योग्य तो बोध घेणें उचित नाहीं काय?

लंडन रेडिओवर हिंदी शेतीची चर्चा

बी. बी. सी. (ब्रिटिश ब्रॉडकास्टिंग कॉर्पोरेशन) च्या लंडन रेडिओवर हिंदुस्थानच्या आर्थिक प्रगतीविषयींच्या प्रश्नांची चर्चा तज्ज्ञांकडून करवण्याचा उपक्रम कांहीं महिन्यांमागें करण्यांत आला होता. ती चर्चा नुकतीच पुन्हां चालू झाली आहे आणि गेल्या आठवड्यांत प्रसिद्ध लेखक मि. जे. बी. प्रीस्टले ह्यांचे अध्यक्षतेखालीं हिंदुस्थानांतील अन्न-पुरवठ्याच्या प्रश्नाचा विचार तीमध्यें झाला. सर जॉन रसेल आणि सर माउकम हालिंग अशा माहितगारांनीं ह्या विचारविनिमयांत भाग घेतल्यानें तो बोधप्रद झाला आणि तो हिंदी नभोवाणीवरून प्रसृत करण्यांत आला ही सोय झाली आहे. युद्धोत्तर काळांत जगांतील सर्व देशांत लोकांच्या रहाणीचा दर्जा वाढवण्याचे प्रयत्न जागतिक भूमिकेवर व्हावयाचे आहेत आणि त्यांमध्यें धान्य वगैरे आहारविषयक जिनसांचा पुरवठा वृद्धिंगत करण्याच्या धोरणास विशेष महत्त्व दिलें जाणार आहे. ह्या दृष्टीनें हिंदुस्थानची स्थिति काय आहे, आणि ती सुधारण्यासाठी काय केलें पाहिजे असा मुद्दा वरील चर्चेत प्रथम उपस्थित करण्यांत आला. ह्यासंबंधांत अशी माहिती देण्यांत आली कीं अलीकडे लोकसंख्येच्या वाढीच्या प्रमाणांत हिंदुस्थानांत जमिनीची लागवड कमी झालेली दिसत नाहीं. हिंदी शेतीच्या उत्पादकतेच्या दृष्टीनें पहातां जमीनदारीची पद्धति चांगली कीं स्वतंत्र शेतकऱ्यांची पद्धति चांगली हा प्रश्न उपस्थित झाला असतां असें सांगण्यांत आलें कीं जमीनदारापाशीं पैसा असल्यानें त्याच शेतीच्या धंद्यांत भांडवल घालतां येतें तसें करणें लहान शेतकऱ्यांस परवडत नाहीं. पण जेथें जमीनदार स्वतःची जबाबदारी न ओळखतां कुळांकडून येणाऱ्या खंडावर संतुष्ट असतात आणि जमिनीची व पिकांची सुधारणा करीत नाहींत तेथें शेत करणाऱ्यांच्या माळकीची पद्धति चांगली असा निर्णय देण्यांत आला. बल्गेरियांत व डेन्मार्कमध्यें करण्यांत आलेल्या शेती सुधारणांचा येथें दाखला देण्यांत आला. परंतु शेतीचा धंदा यशस्वी होण्यास गहूं, जोंधळा वगैरे सारखीं नुसतीं धान्यांचीं पिकें करून भागत नाहीं आणि जनावरांची पैदास व दूधदुभतें ह्यांच्या व्यवहाराची म्हणजे संमिश्र शेतीची आवश्यकता असते असें प्रतिपादण्यांत आलें.

रशियांत मोठ्या प्रमाणावर यंत्रसहाय्यानें संयुक्त पद्धतीची (कलेक्टिव्हायझेशन) शेती केली जात आहे, त्याचें अनुकरण हिंदुस्थानांत होणें कितीपत व्यवहार्य आहे हा प्रश्न उपस्थित झाला असतां त्यास नकारात्मक उत्तर मिळालें. रशिया हा अफाट देश आहे आणि नांगरासाली न आलेली अशी जमीन-तेथें मुबलक आहे. त्यामुळें शेतकऱ्यांच्या मोठमोठ्या वसाहती करून यांत्रिक पद्धतीनें पिकें काढणें तेथें शक्य आहे. पण हिंदुस्थानांत त्या पद्धतीस फारसा वाव नसून वैयक्तिक रीतीनें स्वतंत्रपणानें धंदा करण्याची शेतकऱ्यांची परंपरा पहातां रशियाचें अनुकरण ह्या दृशांत व्यवहार्य नाहीं असा अभिप्राय सर माउकम ह्यांनीं दिला. रशियांतहि संयुक्त शेतीच्या मोठ्या प्रमाणावरील शेतीमुळें दर एकरी उत्पन्न वाढलें आहे असें दिसत नाहीं आणि काम नसलेले शेतकरी कारखान्यांत जाऊं शकतात असें सर जॉन रसेल म्हणाले. हिंदुस्थानांत कारखानदारीचा प्रसार होईल तर कित्येक खेडेगांवीं लोकांस शहरी धंद्यांत काम मिळूं शकेल आणि शेतीमधील गर्दी कमी होईल. पाण्याचा पुरवठा केला गेल्यास शेतीस लायक अशी जमीन आज पडून आहे ती लागवडींत आणतां येऊन धान्याचा पैदास वाढूं शकेल असें मत व्यक्त करण्यांत आलें.

हिंदुस्थानांत जमिनीचे लहान तुकडे पडले असल्यामुळें शेती उत्पादक होऊं शकत नाहीं. ह्यावरचा उपाय म्हणून शेतांच्या तुकड्यांचें एकीकरण करण्याचा प्रश्न चर्चेस निघाला तेव्हां सर माउकम हालिंग ह्यांनीं पंजाब व मध्यप्रांत ह्यांमध्यें ह्या उपायाची अंमलबजावणी मोठ्या प्रमाणांत झाली आहे हें सांगितलें. शेतांच्या एकीकरणाच्या योगानें शेतीचें उत्पादन तीस टक्क्यांनीं वाढल्याचा अनुभव सांगण्यांत आला. सहकारी पद्धतीनें जमिनीच्या तुकड्यांचें एकीकरण फार मोठ्या क्षेत्रांत पंजाब प्रांतांत घडवून आणलें गेलें आहे आणि त्या पद्धतीचा अवलंब इतरत्र केला गेल्यास अन्नपुरवठ्याच्या वाढीचा प्रश्न सुटण्यास पुष्कळ सहाय होईल असें मत व्यक्त करण्यांत आलें. हिंदुस्थानांतील विशिष्ट परिस्थिति, येथील शेतीची परंपरा, मोठी वाढती लोकसंख्या, इत्यादि गोष्टी लक्षांत घेतां शेतकऱ्यांस दुय्यम धंदे करतां येण्याची व्यवस्था झाल्यास त्यांची प्राप्ती वाढून रहाणींहि सुधारेल असा विचारहि चर्चेत पुढें आला आणि फ्रान्समध्यें रिकाम्या वेळांत शेतकऱ्यांच्या कुटुंबांत विजेनें चालणाऱ्या लहान यंत्रांच्या सहायानें धंदे चालवले जात असल्याचा दाखला देण्यांत आला. परंतु अन्नपुरवठ्याच्या प्रश्नाशीं ह्या गोष्टीचा प्रत्यक्ष संबंध नसल्याकारणानें सदरहु विषयाची पुढें चर्चा झाली नाहीं.

डिक्रीनंतर जजमेंट डेटर शेतकरी झाल्यास शेत कलेक्टरचे ताब्यांत देतां येतें काय?

शामरावनें ता. १५।१०।३७ रोजीं पांडुरंगवर मनी-डिक्री मिळविली. त्यावेळीं पांडुरंग शेतकरी नव्हता. १९४० मध्यें डिक्रीच्या अंमलबजावणीसाठी शामरावनें अर्ज दिला. १९४० मध्यें पांडुरंग शेतकरी झाला होता. डे. ॲ. रि. ॲक्टच्या क. २२ (२) च्या दुसऱ्या पॅरेग्राफमध्यें असें म्हटलें आहे कीं, शेतकऱ्यावर डिक्री झाली असेल तर त्याचें शेत कलेक्टरच्या ताब्यांत देऊन त्या शेताच्या उत्पन्नांतून डिक्रीची फेड होऊं शकते. शामरावनें हीच मागणी मागितली होती. पांडुरंगचें म्हणणें असें होतें कीं, जो इसम डिक्रीचे वेळीं शेतकरी असेल त्याचेच बाबतींत वरील प्रकारें डिक्रीची फेड होऊं शकते. डिक्रीनंतर ज. डे. शेतकरी झाला असेल तर डिक्रीचे फेडीसाठी त्याचें शेत कलेक्टरचे स्वाधीन करतां येत नाहीं. खालच्या कोर्टानीं पांडुरंग विरुद्ध निकाल दिल्यामुळें त्यानें हें मुंबई हायकोर्टांत अपील केलें होतें.

शेतकऱ्यावर डिक्री झाली असेल तर त्या डिक्रीचे फेडीसाठी त्याचें शेत अधिकांत अधिक ७ वर्षेपर्यंत कलेक्टरचे ताब्यांत देतां येतें व उत्पन्नांतून डिक्रीची फेड होऊं शकते, अशी तरतूद डे. ॲ. रि. ॲक्टच्या क. २२ (२) च्या दुसऱ्या पॅरेग्राफमध्यें करण्यांत आली आहे. ती तरतूद लागू पडण्यासाठी डिक्रीचे वेळीं ज. डे. शेतकरी असला पाहिजे. डिक्रीनंतर ज. डे. शेतकरी झाला असेल तर ती तरतूद लागू पडणार नाहीं. मुंबई हायकोर्टाचा वरील प्रकरणांतील निवाडा हें सांगतो. —न्यायबोध

स्फुट विचार

रूरल डेव्हेलपमेंट बोर्डाची सभा

प्रांतिक रूरल डेव्हलपमेंट बोर्डाची सहामाही सभा नुकतीच भरली होती, तीमध्यें युद्धोत्तर पुनर्घटनेची मुंबई सरकारची योजना आणि धान्याचें अधिक उत्पादन व त्याची वाटणी ह्या प्रश्नांचा प्रामुख्यानें अपेक्षेप्रमाणें विचार झाला. सभेचें उद्घाटन गव्हर्नर-साहेबांनीं केलें आणि तीमध्यें चर्चिल्या जाणाऱ्या महत्त्वाच्या विषयांचा उल्लेख केला. युद्धांतून परत येणाऱ्या सैनिकांच्याच फायद्यासाठी आर्थिक पुनर्घटनेची योजना सरकारनें आखली आहे ह्या टीकेस उत्तर देतांना त्यांनीं सांगितलें कीं रणांगणांवर पराक्रम गाजवून देशाचें स्वार्थत्यागपूर्वक रक्षण करणाऱ्या शिपायांची व्यवस्था करणें हें तर समाजाचें कर्तव्यच आहे; तथापि, सरकारी योजनांचा फायदा प्रांताच्या सर्व भागांस व लोकांस मिळावा अशी त्यांची रचना आहे. मुंबई प्रांतास हिंदुस्थान सरकारकडून धान्य पुरवठ्याचें सहाय होणार आहे, तथापि, ह्या प्रांताच्या लोकांनीं धान्याच्या उत्पादनाची आणि समान वाटणीची शिकस्त केली पाहिजे असें त्यांनीं बजावलें. धान्य पिकवण्याचे बाबतींत सक्तीचा कायदा प्रांतिक सरकारनें केला आहे त्यास बोर्डानें मान्यता दिली. आर्थिक अभिवृद्धीचें योजनात्मक धोरण प्रांतांत अंगिकारण्यांत आलें आहे, आणि तें यशस्वी होण्यास त्यास लागणाऱ्या पैशाची तरतूदहि योजनात्मक पद्धतीची असणें आवश्यक झालें, आहे ही कल्पना गव्हर्नरांनीं बोर्डापुढें मांडली. सध्या सरकार उत्पन्न-खर्चाची तोंडमिळवणी करीत असून वाढावा गंगाजळींत टाकीत आहे. परंतु आर्थिक योजनेचा चालू खर्च प्रांताच्या अंगावर पडेल, तो भागवण्याकरितां मामुली उत्पन्नांत त्या वाढत्या खर्चाच्या मानानें वाढ करावी लागेल असें त्यांनीं सुचवलें. बिजापूर जिल्ह्यांत जमिनींस बांध व ताली घालण्याचें काम प्रचंड प्रमाणावर चाललें आहे. त्याच्या क्षेत्राची व उत्पादकतेची माहिती बोर्डास देण्यांत आली. धान्यांच्या पैदाशींत गेल्या दोन वर्षांत विस्तार झाला आहे. त्याचे ठोकळ आकडे बोर्डापुढें मांडण्यांत आले ते बोधप्रद आहेत. कपाशीच्या पिकाचें क्षेत्रफळ ४० लक्ष एकरांवरून २८ लक्ष एकरांवर आणि तंबाखूचें २ लक्ष, १० हजार एकरांवरून १ लक्ष, २० हजार एकरांवर आलें आहे आणि ह्या मोकळ्या झालेल्या जमिनींत धान्यांचीं पिकें काढण्यास सवड झाली आहे. धान्यांच्या पिकांचें क्षेत्रफळ १९७ लक्ष एकरांचें २१२ लक्ष एकर झालें आहे. ह्या कारणानें धान्यांची पैदास ३२ लक्षांची ३८ लक्ष टन झाली आहे.

प्रां. सहकारी बँकेचे अध्यक्ष, श्री. सरय्या, ह्यांचें भाषण

मुंबई प्रांतिक सहकारी बँकेचे अध्यक्ष, श्री. आर. जी. सरय्या, ह्यांनीं बँकेच्या वार्षिक सभेचे प्रसंगीं केलेलें भाषण नेहमींप्रमाणेंच उद्बोधक व माहितीपूर्ण असें होतें. युद्धकाळ संपून शांततेचा काळ येतांना उपस्थित होणाऱ्या प्रश्नांचा त्यांनीं उल्लेख करून, चलनविषयक सरकारी धोरण हें लोकांच्या आर्थिक परिस्थितीस पोषक होईल अशा रीतीनें आखले पाहिजे, असें त्यांनीं सांगितलें. मध्यवर्ती व प्रांतिक सरकारच्या योजना दीर्घकालीन असणार व त्या अमलांत येण्यास वेळ लागणार; परंतु, शेतकऱ्यांच्या अडचणी मात्र निकडीच्या राहणार, हें त्यांनीं उदाहरणें देऊन स्पष्ट केलें. हिंदी शेतकऱ्यांच्या शेतीच्या उत्पादनाच्या किमान किंमतीची हमी सरकारनें घेणें आवश्यक आहे, असें त्यांनीं सुचविलें. त्यासंबंधीच मंदीच्या काळांत शेतकऱ्यांचा निभाव लागणार नाहीं, हें उघड आहे. १९४२–४३ च्या मानानें १९४३–४४ मध्यें किंमती कमी राहिल्या; कपाशीची किंमत तर फारच खालीं गेली आणि विशेषतः खानदेशांतील शेतकऱ्यांस त्याचा दुष्परिणाम भोगावा लागला. तुलनात्मक किंमतींचा तक्ता खालीं दिला आहे:—

	ऑगस्ट १९३९	जून १९४३	जून १९४४
	रु.	रु.	रु.
भुईमूग (पक्का)	९½	३५	२८
कपास (गाठ)	७०	१६०	८०
मूळ (पक्का)	२२	४८	४५
भात (मण)	२½	७	७

बँकेची उपयुक्त कामगिरी

बँकेच्या ठेवींत व कर्जांत वाढ कशी झाली आणि किफायतशीर भावांमुळें बँकेच्या वसुलीवर व थकबाकीवर कसा परिणाम झाला हें सांगून श्री. सरय्या ह्यांनीं बँकेच्या व्यापक कामगिरीचाहि थोडासा तपशील दिला. सहकारी सोसायटयांमार्फत धान्य वांटपाचें काम होणें सोईचें आहे, ही गोष्ट सरकारास पटली असून बँकेनें अशा ९६ संस्थांना सबंद वर्षांत मिळून ३४ लक्ष रुपये बळोबेळ दिले. वर्षअखेर त्यांचेकडून येणें ४½ लक्ष रुपये होतें. पश्चिम खानदेश व नाशिक ह्या जिल्ह्यांत बँकेनें ६,५१० पोतीं जरिला कपाशीचें बीं शेतकऱ्यांस वाटण्याची व्यवस्था केली. भुईमुगाच्या पेंढीच्या खताच्या प्रसाराचें कामहि बँकेनें केलें. विशेषतः पुणें, नगर व खानदेश जिल्ह्यांत हें खत वाटण्यांत आलें. अशा तऱ्हेचें कार्य बँकेच्या मामुली व्यवहारांत येत नसलें, तर त्याची उपयुक्तता निर्विवाद आहे. बँकेच्या शाखांचा विस्तार ह्या कामीं बँकेस विशेष उपयुक्त आहे. बॉंबे ॲग्रिकल्चरल डेटर्स रिलीफ ॲक्टाचे परिणाम सहकारी बँकांवर काय होतील, हें आज सांगतां येण्याजोगें नसलें तरी, ह्या कायद्याच्या अंमलबजावणीमुळें सहकारी बँकांस येणारी तूट सरकारनें भरून देणें आवश्यक आहे; त्याचप्रमाणें, पिक-कर्जाची व्यवस्था पहाण्यासाठी सहकारी संस्थांना सरकारी आर्थिक व इतर मदत लागेल हें श्री. सरय्या ह्यांनीं स्पष्ट केलें. व्यवहारांत चोखपणा राखूनहि सहकारी बँकेस शेतकऱ्यांसाठी काय करतां येणें शक्य असतें, ह्याचें प्रत्यंतर श्री. सरय्या ह्यांचें भाषण व बँकेचा ताळेबंद आणि अहवाल ह्यांत सांपडतें.

बटाटे टिकविण्यासाठी पद्धतशीर खाड्यांची योजना

बटाट्यांचा पद्धतशीर सांठा करण्याचें शास्त्र पुणें जिल्ह्यांतील खेड तालुका व शिरूर पेटा ह्यांतील शेतकऱ्यांना चांगलें अवगत झालेलें आहे. चांगला बटाटा अर्थात जास्त काळ टिकूं शकतो, ह्या दृष्टीनें बटाट्यांच्या पिकाकडे काळजीपूर्वक लक्ष द्यावें लागतें. शेताजवळील झाडांसालील थंड जागा निवडून त्यांत ४ ते ५ फूट रुंद व जरूर तेवढे लांब वाफे करण्यांत येतात. प्रत्येक वाफ्याभोंवतीं ६ ते ८ इंच खोल व १ ते १½ फूट रुंद पाट काढण्यांत येतो व ह्यांतील मातीनें वाफ्याभोंवतीं बांध घालण्यांत येतो. वाफा पाण्यानें भरून आणि दोन तीन दिवस वाळवून झाल्यावर त्यांत

शेतांतून काढलेले बटाटे भरण्यांत येतात. साधारण ४ फूट उंच रास होते, तीवर लिंबाचा पाला घालतात. राशीवर ओलें गवत घालतात त्यामुळें बटाट्यांत कीड प्रवेश करूं शकत नाहीं व बटाटे थंड रहातात. कधीं कधीं राशीवर थोडीशी साखर टाकतात, ती खाण्यासाठीं येणाऱ्या मुंग्या बटाट्यांस उपद्रव देऊं पहाणारी कीड खाऊन बटाट्यांचें संरक्षण करतात. वाफ्यांभोंवताळ्याच्या पाटांत पाणी घालून व गवतावर मधून मधून पाणी शिंपडून राशीमधील उष्णतामान कमी राखण्यांत येतें. हें सर्व नीट साधलें तर आंतील उष्णतामान, बाहेरील उष्णतामान १०५° असलें तरी, ८५° वर जात नाहीं. पाटांतील पाणी वाफ्यांत येऊं न देण्याची खबरदारी मात्र घ्यावी लागते. विक्रीला नेण्याचे वेळीं बटाटे बाहेर काढण्यांत येतात. लष्करी खात्यासाठी बटाटे सांठविण्याकरितां वरील पद्धतीचा मोठ्या प्रमाणावर उपयोग करण्यांत आला. पुणें येथील शेतकी कॉलेज व सदकी येथील फळांच्या प्रयोगाचें केंद्र येथील दुतर्फा झाडांच्या रांगेखालील छायेंत गेले दोन मोसम हा उपक्रम करण्यांत आला व तो यशस्वी झाला, असें प्रसिद्ध झालें आहे. १९४३ साली २५ फूट लांब व ६ फूट रुंद असे एकूण २०० वाफे तयार करून त्यांत २५ हजार पोतीं म्हणजे ५० हजार मण बटाटे रचण्यांत आले. एकूण लष्करासाठी खरेदी केलेल्या बटाट्यांपैकी फक्त ५·५% बटाटे नासले असें आढळलें. बटाट्यांना पेट्रोलची धुरी देऊन किडीचा नाश करण्यासाठी रोज १ हजार पोतीं बटाटे स्वच्छ करतां येतील, अशी चार कॉंक्रीटच्या होदांची व्यवस्था शेतकी कॉलेजांत करण्यांत आली आहे. १ पोतें बटाटे स्वच्छ करण्याचा खर्च ४ आणे येतो.

कोयनेलचें डांबरापासून उत्पादन

जगांत दरसाल ८० कोटि लोकांना मलेरियाचा उपद्रव होतो, परंतु ईस्ट इंडीजमध्यें तयार होणारें कोयनेल मामुली काळांतहि ५ कोटि लोकांना सुद्धां पुरें पडत नाहीं. आतां जपानचे ताब्यांत तीं बेटें गेल्यामुळें इतर देशांचे वाटचास कोयनेल येण्याचा प्रश्नच उपस्थित होत नाहीं आणि प्रत्यक्ष ईस्ट इंडीजमध्येंहि आणखी दहा-बारा वर्षे कोयनेल निघूं शकणार नाहीं. सिंकोना झाडापासून आतांपर्यंत कोयनेल काढण्यांत येत असे. त्याचप्रमाणें, ॲटब्रिन व प्लॅस्मोचिन हे कृत्रिम पदार्थ कोयनेल इतके गुणकारक ठरलेले नाहींत. रॉबर्ट बर्नस वुडवर्ड आणि विल्यम डोअरिंग ह्या हारवर्ड विश्वविद्यालयांतील दोघां शास्त्रज्ञांनीं कृत्रिम कोयनेलाचें संशोधन पुरें करून त्याचें मोठ्या प्रमाणावर उत्पादन होण्याची शक्यता निर्माण केली आहे. कोयनेल हा पदार्थ कार्बन, हैड्रोजन, ऑक्सिजन व नैट्रोजन ह्यांच्या रेणूंचा बनलेला असतो. ह्या चार मूळ द्रव्यांच्या त्याच प्रमाणांतील हराविक रेणूंचे हजारों पदार्थ बनतात, परंतु ते रेणू एकमेकांशीं कोणत्या प्रकारें बद्ध झालेले असतात, त्यावर सर्व कांहीं अवलंबून असतें. रेणूंचे मॉलिक्यूल बनतात व त्यांच्याशीं इतर मॉलिक्यूल बद्ध होऊन मोठे मॉलिक्यूल तयार होतात. कोणत्या प्रमाणांत, कोणत्या प्रकारें हें घडून येतें व कशामुळें पदार्थांचे गुणधर्म बदलतात, ह्या सर्वांचा अभ्यास करून योग्य त्या प्रकारची रचना घडवून आणणें, हें शास्त्रज्ञांचें काम आहे. वुडवर्ड-डोअरिंग ह्या जोडीनें, कोळशाच्या डांबरापासून कोयनेलच्या मूळ द्रव्यांच्या रचनेप्रमाणें रचना असणारे पदार्थ म्हणजेच कृत्रिम कोयनेल तयार केलें आहे. कोयनेलचे अनेक भाऊबंदहि आतां तयार होऊं शकतील व कदाचित् त्यांपैकी एकादा कोयनेलपेक्षांहि अधिक प्रभावी मलेरियाचा शत्रू असूं शकेल!

पौंडांतील कर्जाची उतरती रक्कम

हिंदुस्थान सरकारचें रुपयांतील कर्ज वाढत चाललें असून ग्रेट ब्रिटनमध्यें उभारलेलें पौंडांतील कर्ज कमी होत चाललें आहे, इतकेंच नव्हे तर हिंदुस्थानचें येणें त्या देशांत साठत चाललें आहे. पौंडांतील व रुपयांतील कर्जाचे आकडे खालीं दिले आहेत:—

मार्च अखेर	रुपयांतील कर्ज (कोटि रु.)	पौंडांतील कर्ज (कोटि रु.)
१९१४	१८०	२९६
१९१९	३५९	३०४
१९२४	४८३	३९८
१९२९	५११	४७३
१९३४	६९३	५१२
१९३९	७०८	४६९
१९४०	७२८	४४२
१९४१	८६१	३४५
१९४२	९४१	२१०
१९४३ (अंदाज)	१,२०८	५७
१९४४ („)	१,३३५	३८

चालू युद्धखर्चाची मागील महायुद्धांतील खर्चाशीं तुलना

गेल्या महायुद्धाचे मानानें चालू महायुद्ध किती खर्चाचें आहे, हें खालील तुलनात्मक आकडे स्पष्ट सांगतील. आंकडे कोटि पौंडांचे आहेत.

	(अ) गेलें महायुद्ध १९१४-१८ असेरचा खर्च	(ब) चालू महायुद्ध १९४३-४४	(ब)चे(अ)शीं प्रमाण
अमेरिका	७४३	४,८२८	६·५
ग्रेट ब्रिटन	९००	१,८२३	२·०
कॅनडा	५२	२८४	५·४
ऑस्ट्रेलिया	३३	१३४	४·११
दक्षिण आफ्रिका	३	३३	११·५
हिंदुस्थान	२१	५९	२·८

वरील आकड्यांवरून, अमेरिकेचा चालू युद्धांतील खर्च फारच मोठ्या प्रमाणावर आहे आणि ब्रिटिश साम्राज्यांतील वसाहती व हिंदुस्थान ह्यांच्या खर्चाचा वाटाहि वाढत्या प्रमाणांत आहे, हें दिसून येतें.

खानापूर तालुका को-ऑ. सुपरवायझिंग युनियन, लि. ऑफिस, वांगी

वरील युनियनची वार्षिक साधारण सभा शुक्रवार ता. २९।९।४४ रोजीं दुपारीं ३ वाजतां वांगी येथें युनियनचे ऑफिसांत भरणार आहे. तरी सदर सभेस सोसायटयांनीं पंच कमिटीपैकी एका प्रतिनिधीस अधिकार देऊन पाठवावें. सभेंत वार्षिक साधारण सभेचीं मामुली कामें होऊन नियम दुरुस्तीचा विचार होईल. साधारण सभेंत ठराव मांडावयाचे असल्यास ते २७।९।४४ चे आंत ऑफिसकडे पाठवावे.

मुधोळ स्टेट सें. को. बँक लि., मुधोळ.

(वार्षिक सभा : ३०-९-४४)

वरील बँकेनें अल्पावधींत चांगली प्रगति केली आहे. ३० जून १९४४ अखेरच्या दुसऱ्या वर्षी बँकेच्या सभासदांत १०७ सभासदांची भर पडली असून त्यांची संख्या २६७ झाली आहे. त्यांपैकीं १३ सहकारी सोसायट्या आहेत. वसूल भांडवलहि २२,६७५ रुपयांचें ३७,७०० रुपये झालें आहे. ठेवींचा आंकडा १ लक्ष, १७ हजारांवरून ३ लाखांवर गेला आहे आणि एकूण खेळतें भांडवल १ लक्ष ४९ हजारांचें ३ लक्ष ४८ हजार रुपये झालें आहे. अहवालाचे वर्षी बँकेनें एकूण ४ लक्ष, २४ हजारांचीं कर्जे दिलीं. वर्षअखेर व्यक्तिशः सभासदांकडे १ लक्ष ६७½ हजार रुपये व सोसायट्यांकडे ३½ हजार रुपये कर्ज येणें आहे. एकूण खेळत्या भांडवलापैकीं १ लक्ष ३१ हजार रुपये रोख व इतर बँकांत असून २४ हजारांचे सरकारी रोखे आहेत. दिलेलीं कर्जे मुख्यतः सोनें-चांदी, माल, इत्यादींच्या तारणावरीलच आहेत. बँकेची महालिंगपूर शाखा चांगली चालली असून तेथील कॅश क्रेडिटचा व डिस्कौंटचा व्यवहार समाधानकारक आहे. वर्षअखेर बँकेस निवळ नफा १,९६२ रुपये झाला. भागीदारांस ३% डिव्हिडंडसाठीं १,००० रुपये लागतील व ४९० रुपये रिझर्व्ह फंडाकडे जातील. श्री. ए. व्ही. देसाई, बी. ए., एलएल. बी., हे बँकेचे चेअरमन असून श्री. आर. एन. तांबे हे मॅनेजिंग डायरेक्टर आहेत. बँकेस मुधोळ दरबारचा चांगला पाठिंबा आहे.

कराड अर्बन को. बँक लि.

वरील बँकेची शेअर भांडवल, रिझर्व्ह व इतर फंड, ठेवी, कर्जे, खेळतें भांडवल, इत्यादि सर्व बाबतींत प्रगति होत आहे. बँकेचा रौप्य महोत्सव ५-९-४३ रोजीं साजरा झाला, त्यावेळीं श्री. वि. ना. फणसळकर, वकील, यांनीं लिहिलेल्या बँकेच्या रौप्यमहोत्सव ग्रन्थाचें प्रकाशन झालें. अहवालाचे वर्षी थकबाकीचें प्रमाण जाणसी उतरून तें १·४% वर आलें. बँकेस नफा २१,३३२ रुपये झाला. भागीदारांस ७½% डिव्हिडंड मिळालें. कराड सहकारी खरेदी-विक्री सोसायटीचें काम बँकेच्या देखरेखीखाली चालू आहे. अहवालाचे वर्षी सोसायटीमार्फत ६ लक्ष रुपयांचा माल विकला जाऊन सोसायटीस कमिशनचे ७,०६६ रुपये मिळाले. सोसायटीच्या नफ्यापैकीं ४१९ रुपये बँकेच्या वाट्यास कराराप्रमाणें आले. अर्बन बँकेच्या कार्यक्षेत्रांत असणाऱ्या इतर सहकारी संस्थांना सभासद करून घेण्याची परवानगी मिळावी, अशी बँकेनें सहकारी खात्यास विनंति केली आहे. बँकेचा यशस्वी कारभार लक्षांत घेऊन तिच्या कार्यविस्तारास सहाय करण्याचें धोरण खात्यानें स्वीकारावें. श्री. ल. म. देशपांडे हे बँकेचे चेअरमन असून श्री. म. वि. लेंडकर हे मॅनेजर व मॅनेजिंग डायरेक्टर आहेत.

श्रीमनेश मोफत वाचनालय व ग्रंथालय पुणें

ह्या संस्थेच्या २५ व्या वार्षिक समारंभानिमित्त ता. २७ बुधवार सकाळीं १० वा. नगराध्यक्ष श्री. व्ही. बी. देशमुख यांचे हस्ते सरस्वतीपूजन, नंतर तीर्थप्रसाद व पानसुपारी, रात्रौ नकलांचा कार्यक्रम होणार आहे.

मुंबई प्रां. सहकारी बँक लि.

नवीन भाग विक्रीस काढणार

वरील बँकेकडील ठेवींत एका वर्षांत सुमारें पाऊण कोटि रुपयांची भर पडली. ३०-६-४४ अखेर बँकेकडे नोकरवर्गाचा फंड धरून ४ कोटि, १६ लक्ष रुपयांच्या ठेवी आहेत. बँकेचें स्वतःचें भांडवल व कर्जाऊ रकमा यांचें प्रमाण नियमाबाहेर गेलें आहे, परंतु ३१ मार्च १९४६ पर्यंत त्यास सरकारी संमति मिळाली आहे. बँकेचें भाग भांडवल १५ लाखांचें २५ लाख करण्यासाठी बाय लॉमध्यें आवश्यक ती सुधारणा भागीदारांपुढें मांडून ती मंजूर करण्यांत आलेली आहे. हे भाग डायरेक्टरांस वाटेल त्या योग्य वेळीं व अटींवर विक्रीस काढण्यांत येतील. बँकेच्या ५० रुपयांच्या भागांची बाजारांत किंमत ९१ रुपये आहे, तेव्हां कांहीं वाढाव्यानेंच हे भाग विक्रीस निघतील, हे उघड आहे. बँकेचें शेतकी पतपेढ्यांकडील येणें कमी झालें असलें, तरी तिला इतर ठिकाणीं किफायतशीरपणें पैसा गुंतवितां आला. बँकेनें आपले कर्जाच्या व्याजाचे दर १% नें उतरविले. वर्षअखेर तिला २ लक्ष ४५ हजार रुपये नफा झाला. भागीदारांना ४% डिव्हिडंड व १% बोनस मिळणार आहे.

विहिरींचा पाणीपुरवठा वाढविण्यासाठी बोअरिंगची सरकारी योजना

मुंबई सरकारचे ॲग्रिकल्चरल इंजिनिअर यांचे देखरेखीखाली आज अस्तित्वांत असलेल्या विहिरींत "बोअर" पद्धतीनें पहारा मारून भोकें पाडून पाणीपुरवठा वाढविण्याची योजना तयार करण्यांत आली आहे. सध्यां हातानें चालविण्याच्या बोअरिंग माशिनच्या सहाय्यानेंच हीं भोकें पाडण्यांत येतील. नडियाद, पालघर, पंढरपूर व करजगी या चार केंद्रांत ही एक एक यंत्रसामुग्री ठेवण्यांत येणार आहे. या यंत्राचे सहाय्यानें तीन इंच परिघाचें झंभर फूट खोलीपर्यंत भोंक पाडतां येईल. अशा प्रकारें विहिरीचा पाणीपुरवठा वाढल्यास त्यामुळें अधिक धान्य पिकें काढण्यास मदतच होणार आहे.

ज्या कोणास या यंत्राचे सहाय्यानें विहिरींत भोंकें पाडून पाणीपुरवठा वाढवावयाचा असेल त्यानें "ॲग्रिकल्चरल इंजिनिअर टु गव्हर्मेंट, बी. पी. पुणें" या पत्त्यावर अर्ज करावेत. सरकारी अधिकारी ज्या क्षेत्रांत बोअर घ्यावयाचें त्याची तपासणी करून नंतर खालील अटींवर बोअरिंगचें काम करतीलः—बोअरच्या पहिल्या पन्नास फुटांस दर फुटी १ रुपया, पुढें झंभरांपर्यंत १। रुपया असा खर्च येईल. तसेंच केसिंग पाईपचे खर्चापैकीं शेंकडा ६६ टक्के खर्च सरकार सोसणार व बाकीचा खर्च मालकानें सोसावयाचा आहे. यंत्रसामुग्री केंद्रस्थांवाहून विहिरीचे ठिकाणापर्यंत नेण्याचा खर्च मालकानें करावयाचा. यंत्र चालू असतां मजूर व इतर किरकोळ सामान मालकानें द्यावयाचें आहे.

जलसंशोधन यंत्राचा उपयोग करून मग बोअर घ्यावयाचें असेल तर तशी सोय करण्यांत आली आहे.

(शेतकी आणि शेतकरी)

'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

JUST PUBLISHED

INDIAN RURAL PROBLEM

BY

Sir Manilal Nanavati and Prof. J. J. Anjaria.

(Issued by the Indian Society of Agricultural Economics, Bombay).

Price Rs. 8
(Postage extra).

Sole Selling Agents:—

THE CO-OPERATORS' BOOK DEPOT.

9, BAKEHOUSE LANE,
FORT, BOMBAY.

जिकडे तिकडे प्रशंसा

इमिटेशन दागिन्यांवर रासायनिक क्रिया करून खऱ्या सोन्याचा पत्रा चढविला जातो त्यामुळें दागिना केव्हांही खराब होत नाहीं, ही पूर्ण खात्री झाली. सोन्याचा पत्रा चढविलेल्या चार बांगड्या किं. आठ रु. गरजेस्तव दागिना परत करणें झाल्यास वर चढविलेल्या सोन्याचे सर्वच्या सर्व पैसे परत देऊं.

भट कं. सांगली, S. M. C.
भट कंपनी शाखा—बुधवार पेठ, पुणें २.

पूना गेस्ट हाऊस

टेलिफोन नं. ७७९

संस्थापक :
कै. नानासाहेब सरपोतदार

"मागोरा"चा अभिनव व आश्चर्यकारक शोध

ढेकणांच्या उदवत्त्या

(ABC)

BUG COILS (ABC)

प्रत्येक उदवत्ती रात्रभर जळते व तोंपर्यंत ढेकूण आपलें ठिकाण सोडून बाहेर येत नाहींत. विशिष्ट धुरामुळें हा चमत्कार होतो. बॉक्समध्यें १२ तांबड्या उदवत्त्या तांबड्या पॅकिंगमध्यें बॉक्स किं. रु. १८, ट. स. निराळा.

दि मागोरा केमिकल कं. लि.,
हिरावाग, पुणें २

महाराष्ट्रांत लेखी गॅरंटी देणारे
पहिले व फक्त १ च
गोल्ड् मेडॅलिस्ट् व मराठी वळणाचे स्पेशॅलिस्ट्

पेन्टर बेडेकर, ए. जी.,
बुधवार चौक, पुणें २ (सिटी)
बाहेरगांवचीं कामें रेल्वे, मोटार, अगर पोस्टानें पाठवूं.

पुण्यांतील
आदर्श निवासस्थान व भोजनालय
छाया लॉजिंग व बोर्डिंग हाऊस
बुधवार चौक, पुणें २.

गांवोगांवीं विक्रेते पाहिजेत.

A 9

क्विनीनचे ऐवजीं मलेरियाकरतां खात्रीचा अनुभविक उपाय म्हणून 'एनाईन' वापरतात.

अलपाईन प्रॉडक्टस् (इंडिया) पुणें २

हें पत्र पुणें, पेठ सांगली क. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व ए. शंकर वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' सांगली, क. नं. १२७।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणे ४.

अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
(टपाल खेरीज माफ)
किरकोळ अंकास
दोन आणे.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष १० पुणें, बुधवार, तारीख ४ आक्टोबर, १९४४ अंक ४०

दि बँक ऑफ इंडिया लि.

[स्थापना : १९०६]

अधिकृत भांडवल	...	...	...	रु. २,००,००,०००
वसूल झालेलें भांडवल	...	...	...	रु. १,००,००,०००
रिझर्व्ह फंड	...	...	...	रु. १,२३,००,०००

मुख्य कचेरी: ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

मुंबईमधील शाखा : बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

इतर शाखा : अहमदाबाद (भद्र, मुख्य ऑफिस), अहमदाबाद (एलिस ब्रिज शाखा), अहमदाबाद (स्टेशन शाखा), अमृतसर, अंधेरी (मुंबई शेजारीं), बांद्रे (मुंबई शेजारीं), कलकत्ता (क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्क्वेअर), जमशेदपूर कराची, मद्रास, नागपूर (किंग्जवे), नागपूर (इतवारी बझार), पुणें पुणें शहर, राजकोट, सुरत, भुज (कच्छ).

लंडन एजन्ट्स : वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

डायरेक्टर्स : सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस. आय. (अध्यक्ष), श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के. नाईट; मि. ए. गेडिस; सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, जी. बी. ई., के. सी. आय. ई.; मि. दिनशा के. दाजी; श्री. रामनिवास रामनारायण.

करंट डिपॉझिट अकाउंट्स :

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दराने व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षां कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

बिल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते, सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

एजंटः—एच्. ए. करीमभाई

'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

देना बँक

देवकरण नानजी बँकिंग कं. लिमिटेड

वीं
६ वर्षे आणि ३ वर्षांचे
अनुक्रमें ३॥ टक्के आणि २॥ टक्के व्याज देणारीं
कॅश सर्टिफिकिटें

रु. १० पासून रु. ५,००० पर्यंतच्या विभागांत मिळूं शकतात.

स्थानिक तीनहि शाखांचीं सेव्हिंग्ज बँक डिपार्टमेंटस् प्रत्येक रविवारीं सकाळीं उघडीं राहतील.

डोक्यांतील उवा १ तासांत मारण्याचा आश्चर्यकारक शोध

लायसॉफ

बाटली किंमत १ रु. ट. ख. निराळा
दोन वेळा उपयोग
दि मालोरा केमिकल कं. लि.
— हिराबाग, पुणें २ —

गिरगांव मुंबई नं. ४

महिंद्रकर ब्रदर्स
तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

"अर्था"चा पुढील अंक

ता. ११ ऑक्टोबर रोजीं "अर्था"चा अंक निघणार नाहीं. त्या पुढील अंक ता. १८ ऑक्टोबर रोजीं "दिवाळी अंक" म्हणून प्रसिद्ध होईल.

विविध माहिती

गोल्ड कोस्टकडे ब्रिटिशांचें अधिक लक्ष जाणार

आफ्रिकेंतील आपल्या गोल्ड कोस्ट वसाहतीकडे ग्रेटब्रिटन आतां विशेष लक्ष पुरवूं लागला आहे. गोल्ड कोस्ट ही ब्रिटिश वसाहत स्थापनाच्या आसांतांत आफ्रिकेच्या पश्चिम किनाऱ्यावर आहे व तिचें क्षेत्रफळ अंदाजें ग्रेटब्रिटन एवढेंच आहे. बॉक्साइट (ॲल्युमिनियमचा कच्चा पदार्थ) चा साठा तेथें जेवढा आहे, (२०,००,००,००० टन) तितका जगांत अन्यत्र नाहीं. तेथील मॅंगेनीजची चालू असलेली खाण सर्व जगांतील खाणींत मोठी आहे. गोल्ड कोस्टमध्यें सोनेंहि सांपडतें. कांहीं महिन्यांपूर्वी तेथील संस्थानिकांना लष्करांत दाखल झालेल्या स्थानिक उमेदवारांना कसें शिक्षण दिलें जातें, हें दाखविण्यांत आलें. ब्रिटिश मंत्री, शास्त्रज्ञ, इत्यादींची गोल्ड कोस्टकडे आतां रीघ लागून राहिली आहे.

जप्त केलेल्या कापडाच्या विक्रीची व्यवस्था

दुकानांत व गिरण्यांत जप्त केलेलें व सरकारी नियंत्रणाखालील गिरण्यांत तयार होणारें कापड मुंबई शहरांतील सरकारमान्य अशा २८३ दुकानांत विकीस ठेवण्यांत आलें आहे. गिरणीच्या किंमतींत १०% वाढ करून कापड विकलें जातें. या दुकानांकडे गेल्या तीन महिन्यांत ७८½ लक्ष रुपयांचें कापड विक्रीसाठीं देण्यांत आलें. दिवाळीसाठीं आणखी कापड देण्यांत येईल.

भारत इ. बँकेची बेलापूर शाखा

भारत इंडस्ट्रियल बँक लि., पुणें, च्या बेलापूर रोड शाखेस प्रारंभ बुधवार, ता. २७ रोजीं दसऱ्याचे मुमुर्हूतावर झाला आहे.

शेतकरी कर्ज निवारण कायदा

मुंबई प्रांताचा शेतकरी कर्ज निवारणाचा कायदा सध्यां १६ तालुक्यांस लागू करण्यांत आलेला आहे तो ७६ तालुक्यांस लागू करण्यांत यावयाचा आहे. कायद्यांत कांहीं दुरुस्त्या केल्या जातील.

कॅनडांतून पंजिनें आलीं

कॅनडामधून मागविलेल्या १४५ रेल्वे एंजिनांपैकी ५२ एंजिनें हिंदुस्थानांत दाखल झालीं आहेत व त्यांतील कांहीं कामासहि लागलीं आहेत.

पराक्रमी सैनिकांना बक्षिसें

चालू युद्धांत विशेष पराक्रम दाखविणाऱ्या सैनिकांना मुंबई सरकार जमिनींचें उत्पन्न व २ ते १० हजार रुपयांचीं रोख बक्षिसें देणार आहे. बक्षिसांची रक्कम रोखीनें न देतां, जमीन खरेदी, मुलांचें शिक्षण, इत्यादींसाठी रकमेंतून पैसे मिळूं शकतील व रकमेवरचें व्याज मिळेल.

२० लक्ष महारोगी

ब्रिटिश साम्राज्यांत एकूण २० लक्ष महारोगी आहेत. हा कलंक धुवून काढण्याचे चालू असलेले प्रयत्न यांची तपशीलवार माहिती ब्रिटिश एंपायर लेप्रसी रिलिफ असोसिएशनच्या वार्षिक सभेंत नुकतीच देण्यांत आली.

निदर्शक भेट

ॲबिसिनियाचा बादशहा व महाराणी यांनी ब्रिटिश राजे राणी यांस नुकतीच निदर्शक भेट पाठवून, एथिओपियाच्या इटालीच्या ममरमिठींतून सोडविल्याबद्दल ब्रिटिश जनतेचे उपकार स्मरले आहेत.

पाव १४ दिवस ताजा

पाव १४ दिवस ताजा राखण्याची युक्ति नॉर्मंडींत सैन्य उतरवितांना उपयोगांत आणली होती.

युद्धांतील ब्रिटिश कामगिरीच्या फिल्म्स

चालू युद्धांतील ब्रिटिश कामगिरीची यथार्थ माहिती देणारे चित्रपट ब्रिटिश सरकारनें तयार केले असून युरोपांतील देश जर्मनीच्या तावडींतून मोकळे होतील, त्या अनुक्रमानें त्या देशांकडे हे चित्रपट धाडले जातील.

म्हैसूरमध्यें इलेक्ट्रिक मोटारींचें उत्पादन

म्हैसूर सरकारच्या कारखान्यांत पांच अश्वशक्तीच्या विजेच्या मोटारी तयार होऊं लागल्या आहेत व त्यांची चाचणी चालू आहे.

नारळ व खोबरेल ह्यांचें उत्पादन वाढविण्याची आवश्यकता

हिंदुस्थानांत सुमारें १५ लक्ष एकरांत नारळीचीं झाडें असून दरसाल त्यांपासून ३०० कोटि नारळ निघतात. गेल्या महायुद्धापूर्वी हिंदुस्थानांतून खोबरें व खोबरेल ह्यांची निर्गत होत असे, आतां निर्गत जवळ जवळ थांबली असून आयात हळुहळु वाढूं लागली आहे. १९४०–४१ व १९४१–४२ मध्यें दरसाल सरासरीनें हिंदुस्थानांत १ लक्ष टन खोबरें व ५४ हजार टन खोबरेल आयात झालें. नारळांचें उत्पादन वाढविण्यासाठी एक दश वार्षिक योजना आखावी, असें हिंदुस्थान सरकारच्या मध्यवर्ती ॲग्रिकल्चरल मार्केटिंग खात्याच्या रिपोर्टांत म्हटलें आहे.

मुंबई प्रांतांतील उसाची लागवड

चालू वर्षी (१ ऑगस्ट अखेरचा अंदाज) मुंबई प्रांतांत एकूण १,५३,००० एकर जमिनींत ऊंस लावण्यांत आलेला आहे. त्यांपैकीं ४९,००० एकर ऊंस संस्थानी हद्दींत आहे.

हिंदी लोकांचा युद्धखर्चासाठी त्याग

हिंदुस्थान व ग्रेटब्रिटन ह्यांचेमधील युद्धखर्चाच्या वाटणीसंबंधींची व्यवस्था हिंदुस्थानास फार अनुकूल आहे, अशी ब्रिटिश विचारसरणी आहे, तिला उत्तर देतांना "प्लॅनिंग" (पोलिटिकल अँड एकनॉमिक प्लॅनिंग गटाचे तर्फे प्रसिद्ध होणारें मासिक) नें काढलेले उद्गार उद्बोधक आहेत. ते मासिक म्हणतें, "हिंदुस्थानाच्या आर्थिक परिस्थितीचे मानानें खर्चाचा बोजा फाजील आहे. हिंदुस्थानानें इंग्लंडला दिलेलें कर्ज हें कांहीं सुधीचें कर्ज नाहीं. युद्धखर्च भयंकर वाढला, त्या मानानें नित्योपयोगी मालाचें उत्पादन वाढलेलें नाहीं व काटकसरहि अंमलांत आलेली नाहीं. मालाचा तुटवडा व फाजील चलन ह्यांचे दुष्परिणाम दिसून येत आहेत. हिंदुस्थानाच्या राष्ट्रीय उत्पन्नाचा पांचवा हिस्सा लष्करी खर्चाकडे जात आहे. अर्थात्, इंग्लंडमध्यें त्यांचें येणें निर्माण होत आहे. ग्रेट ब्रिटनमधील लोकांच्या उत्पन्नाचा पांच अष्टमांश हिस्सा युद्धकार्याकडे खर्च होत असतो, तरीसुद्धां हिंदी जनतेचा खरा त्याग हा जास्त मोठ्या प्रमाणावरचा आहे. हिंदुस्थानांतील लोकांची संमती घेतली न जातां तो युद्धांत पडला आहे, म्हणून त्याच्या संरक्षणाची जबाबदारी इंग्लंडवरच पडते, हा महा स्वतंत्रच आहे."

अनुक्रमणिका

	पृष्ठ
१ विविध माहिती ...	३१४
२ युद्धोत्तर काळांत सोन्याचें स्थान	३१५
३ म. गांधींचा वाढदिवस	३१६
४ मुंबई प्रांताचें शेतकी खातें	३१६
५ आर. ए. परीक्षेचा निकाल	३१६
६ स्फुट विचार	३१७
मि. चर्चिल ह्यांचें सिंहावलोकन—रबराच्या धंद्यास हिंदुस्थानांत वाव—उसाचें व साखरेचे उत्पादन वाढविण्याची आवश्यकता.	
७ सहकारी बँकांचे अहवाल	३१८
८ चितळेवाडी येथील धान्य व चारा दिन... ...	३१९
९ महाड को. अर्बन बँक	३२०

अर्थ

बुधवार, ता. ४ ऑक्टोबर, १९४४

युद्धोत्तर काळांत सोन्याचें स्थान

लॉर्ड केन्स ह्यांचें आश्वासन

एक वेळ मुंबईच्या बाजारांत सोन्याचा भाव विलक्षण भडकला होता आणि अलीकडे तो पुष्कळ उतरला आहे. ह्यापुढें आणि विशेषतः युद्धसमाप्तीनंतर सोन्याची किंमत किती राहील ह्याविषयीं कुतूहल उत्पन्न झालें असल्यास त्यांत नवल नाहीं. अमेरिकेंत भरलेल्या जागतिक चलन परिषदेंत आंतरराष्ट्रीय हुंडणावळ आणि राष्ट्रीय चलनें ह्यांत स्थिरता उत्पन्न करण्याच्या हेतूनें एक जागतिक गंगाजळी निर्माण करण्याचें ठरलें. ह्या गंगाजळींतील सोनें आणि आंतरराष्ट्रीय हुंड्या ह्यांच्या साहाय्यानें राष्ट्रीय चलनांच्या मोलाचे परस्पर संबंध स्थिर राखण्यांत यावयाचे आहेत. निरनिराळ्या राष्ट्रांच्या चलनांच्या किंमती प्रमाणबद्ध रहाव्या एवढ्यासाठी त्यांच्या साखळीचा दुवा सोनें हा निश्चित केलेला आहे. प्रत्येक राष्ट्राच्या चलनास ठराविक सुवर्ण परिमाण आधारभूत राहील आणि ह्या परिमाणास अनुसरून आंतरराष्ट्रीय देणीघेणीं भागवलीं जातील. व्यापारी व्यवहारांच्या गरजेप्रमाणें राष्ट्रीय सरकारनें कागदी चलन कमी-अधिक पुरवलें असतां त्याची किंमत स्थिर राहील आणि सोन्याचा त्यास आधार देण्याची आवश्यकता उरणार नाहीं असें कित्येक लोक प्रतिपादीत असून चलनें आणि सोनें ह्यांचा संबंध तोडून टाकावा असें ते सुचवीत आले आहेत. सोन्याच्या कमी-अधिक पुरवठ्यावरच चलनाचें मोल आणि आंतरराष्ट्रीय व्यवहार अवलंबून ठेवणें हें आधुनिक प्रगतीच्या काळांत भूषणावह नाहीं असें त्यांचें म्हणणें आहे आणि सोन्याबरोबर आर्थिक देवघेवींचें अवलंबन त्यांस नाहींसे करावयाचें आहे. कांहीं वर्षांमागें इंग्लंडमधील सोन्याचें नाणें व्यवहारांत सर्रास खेळत असे आणि कोणासहि कागदी चलनाच्या मोबदल्यांत नाणें सहज मिळत असे. देवघेवींचें काम कागदी नोटांनीं भागत असतां सोन्याच्या नाण्याचा उपयोग करणें उपलब्धतेचें आणि निष्कारण अडचणी उत्पन्न करणारें आहे असें प्रत्यक्ष अनुभवास आल्यावरून मध्यवर्ती बँकेवरील नोटांच्या मोबदल्यांत मागणाराला सोन्याचें नाणें देण्याची जबाबदारी दूर करण्यांत आली. व्यापाराच्या ओघांत एखाद्या देशास दुसऱ्याचें विशेष देणें झालें आणि त्या योगानें हुंडणावळीचा दर मर्यादेबाहेर जाऊं लागला तर तो स्थिर राखण्यासाठी आवश्यक असलेलें सोनें पुरवण्याचा परिपाठ बँक ऑफ इंग्लंडनें चालू केला. हिंदुस्थानांत हीच चलन-हुंडणावळ पद्धति अंगिकारण्यांत आली आहे. परदेशांचें देणें त्यांवर काढलेल्या हुंड्या पुरवण्यानेंहि भागवतां येतें आणि ह्या व्यवस्थेंत सोन्याचा प्रत्यक्ष उपयोग करावाहि लागत नाहीं. राष्ट्रांच्या चलन व्यवस्थेंत आणि आंतरराष्ट्रीय हुंडणावळीच्या पद्धतींत सोन्यास युद्धापूर्वीहि महत्त्वाचें स्थान ह्याप्रमाणें राहिलें नव्हतें. अशा स्थितींत युद्धोत्तर काळांत पुन्हां सोन्यास चलनाचा आधार ह्या नात्यानें मानाचें स्थान देण्यांत येणार आहे कीं काय असा प्रश्न सहाजिक रीतीनें विचारण्यांत येत आहे. ह्या त्याच्या भावी स्थानावर सोन्याची किंमत अवलंबून रहाणार असल्यानें बाजारामध्यें प्रस्तुत विषयास महत्त्व प्राप्त झालें आहे.

सोन्याचा उपयोग दागदागिन्यांसाठी केला जातो तसाच तो नाणीं व चलनी नोटांचा आधार ह्यांकरितांहि करण्यांत येतो. चलनाच्या मोबदल्याचें सौकर्य व हुंडणावळीची स्थिरता ह्यांच्या सिध्यर्थ कोट्यवधि रुपयांचें सोनें राष्ट्रीय मध्यवर्ती बँकांस व सरकारांस संग्रहीं गंगाजळ्यांत ठेवावें लागतें. ह्या कार्यासाठी सोन्याचा उपयोग होणार नसेल तर त्या धातूचा पुरवठा इतर कामांकरितां वाढेल आणि त्याची किंमत उतरेल. तेव्हां युद्धोत्तर काळांत आंतरराष्ट्रीय चलन व्यवस्था ज्या रीतीनें घडवण्यांत येईल तीवर सोन्याच्या भावी किंमती अवलंबून रहातील हें उघड आहे. ह्या दृष्टीनें अमेरिकेंत भरलेल्या जागतिक चलन परिषदेनें मान्य केलेल्या व्यवस्थेकडे पाहिलें पाहिजे. ह्या परिषदेचे वृत्तांत इंग्लंडला वातमीदारांनीं पाठविले त्यांवरून त्या देशांत असा समज उत्पन्न झाला कीं जुन्या वळणाची सोन्यावर आधारलेली चलन पद्धति स्थापन केली जावी असें ब्रिटिश प्रतिनिधी लॉर्ड केन्स ह्यांनीं प्रतिपादलें. नोटांच्या मोबदल्यांत सोन्याचें नाणें किंवा त्याच्या चिपा देण्याच्या मध्यवर्ती बँकेच्या जबाबदारीवर आधारलेल्या चलन पद्धतीचा कटु अनुभव ब्रिटिश जनतेस आलेला असल्यानें लॉर्ड केन्सनीं तिचा पुरस्कार केलेला पाहून इंग्लंडमध्यें व्यवहारी लोकांस व तज्ज्ञांस आश्चर्याचा धक्का बसला. आपल्या परिषदेंतील भाषणाचा विपर्यास झालेला पाहून लॉर्ड केन्सना वस्तुस्थिति स्पष्ट होण्यासाठी खुलासा करावा लागला. त्यांत त्यांनीं असें म्हटलें आहे कीं चलनाच्या व व्यापारी व्यवहाराच्या राज्यांत सोन्यास अमर्याद सत्ताधारी बनवावें असें आपण कधींच प्रतिपादलें नाहीं. सोन्याचें संपूर्ण उच्चाटन करावें असेंहि त्यांनीं सुचवलें नाहीं. सोन्याची किंमत व चलनांचें मोल ह्यांत प्रमाणबद्धतेचा दुवा असावा असें मत त्यांनीं व्यक्त केलें. नियोजित जागतिक चलन-गंगाजळीच्या सहायानें हा दुवा कार्यक्षम करतां येईल आणि आंतरराष्ट्रीय हुंडणावळीच्या दरांत ढवळाढवळ न राखतां येईल, असा त्यांचा युक्तिवाद आहे. थोडक्यांत पूर्वीप्रमाणें अनियंत्रित स्वामी न बनवतां त्यास व्यवहाराच्या सेवकाची भूमिका वाजवावी असा आपला उद्देश असल्याचें लॉर्ड केन्स ह्यांनीं स्पष्ट केलें आहे. आपल्या स्वतःच्या मताचे पुरस्कर्ते त्यांनीं शेवटचा मुद्दा पुढें मांडला आहे तो येथें ध्यानांत ठेवण्यासारखा आहे. ते म्हणतात कीं, अमेरिकेंत हजारो कोटि रुपये किंमतीचें

सोनें साठलें आहे आणि ब्रिटिश साम्राज्यांतील देशांत व रशियांत सोन्याच्या खाणी आहेत. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय चलन व्यवस्थेंत सोन्यास स्थान असूं नये असें म्हणणें बेदखळपणाचें होईल, कारण अमेरिकेंतील सोन्याचा प्रचंड साठा निर्माण्यवत् करणें आणि ब्रिटिश व रशियन सोन्याच्या खाणी बंद पाडणें असाच त्याचा अर्थ होईल. मित्रराष्ट्रांच्या ह्या सुवर्णविषयक हितसंबंधांचें संरक्षण करण्याचा हेतु मात्र जागतिक चलन व्यवस्थेच्या मुळाशीं असल्यानें युद्धोत्तर कालांतील त्या धातूची किंमत ह्या हितसंबंधास अनुसरून निश्चित केली जाईल असें सरळ अनुमान लॉर्ड केन्स ह्यांच्या विचारसरणीवरून निघतें. सध्याच्या त्याच्या जागतिक किंमतीच्या मानानें सोन्याचा भाव विशेष खालीं जाऊं दिला जाणार नाहीं असा स्पष्ट ध्वनी त्यांच्या विधानांतून निघतो. विविध जागतिक चलनें सोन्याच्या तारेनें एकत्र गुंफल्यानें त्यांच्या परस्पर प्रमाणांत स्थैर्य साधणें आणि मित्रराष्ट्रांच्या सोन्यांतील संपत्तीचें रक्षण करणें ह्या त्यांच्या दुहेरी उद्दिष्टांमुळें सोन्याचा भाव उचलून धरला जाईल.

महात्मा गांधींचा पंचाहत्तरावा वाढदिवस

महात्मा गांधींस त्यांच्या पंचाहत्तराव्या वाढदिवसाच्या निमित्तानें त्यांच्या देशबांधवांकडूनच नव्हे तर परदेशांतूनहि दीर्घायुष्य चिंतणारे अभिनंदनपर संदेश आले आहेत. ह्यावरून त्यांच्या अपूर्व ध्येयपूर्ण व्यक्तिमत्वाबद्दल जगामध्यें किती आदर पसरला आहे ह्याची कल्पना येते. हिंदुस्थानांत महात्मा गांधींच्या कांहीं राजकीय, अध्यात्मिक व आर्थिक विचारांचे बाबतींत तीव्र मतभेद असले तरी त्यांनीं अन्याय, विषमता, दारिद्र्य व अज्ञान ह्यांचे विरुद्ध अविश्रांत चालवलेली दुर्दम्य मोहीम परिणामकारक झाली आहे ह्यांत संशय नाहीं. हिंदुस्थानास राजकीय व आर्थिक स्वातंत्र्य मिळावें, देशांतील निरनिराळ्या जातींत व वर्गांत सख्य नांदावें, अस्पृश्य वर्गाची सामाजिक व आर्थिक उन्नति व्हावी, खेडेगांवी लोकांची स्थिति सुधारावी, श्रमजीवी शेतकरी व कामकरी ह्यांची रहाणी चांगली व्हावी, हिंसा व युद्धें ह्यांचें जगांतून उच्चाटन व्हावें व सर्वत्र समता, स्वातंत्र्य व न्याय ह्यांचें साम्राज्य पसरावें ह्या अनेकविध पैलूंचें ध्येय पुढें ठेवून तें साध्य होण्यासाठी बंदिवास सोसूनहि रात्रंदिवस निर्भयपणानें व निरपेक्ष प्रयत्न करण्यांत महात्मा गांधींनीं स्वतःचें सबंध जीवन वेंचलें आहे. त्यांस आम्ही दीर्घायुष्य व आरोग्य चिंतितों आणि त्यांच्या ध्येयस्फुरित, अहिंसात्मक व शांततामय प्रयत्नानें हिंदुस्थानाची सर्वांगीण उन्नति होवो अशी आशा प्रकट करतों. कस्तुरबा निधी महात्माजींचे वाढदिवसाचे निमित्तानें त्यांचे स्वाधीन करण्यांत आला आहे. संकल्पापेक्षांहि अधिक मोठा असा हा निधी अल्पावधींत जमला आहे ह्यावरून त्या साध्वीच्या त्यागमय चरित्राविषयींचा लोकांचा पूज्यभाव व्यक्त होत आहे. ह्या निधीच्या उद्देशाकडे पहातां त्यांत महात्मा गांधींच्या व्यापक व उच्च ध्येयाचें स्पष्ट प्रतिबिंब दिसून येतें ह्यांत संशय नाहीं.

ग्रेट ब्रिटनचा युद्धखर्च

गेल्या सबंद महायुद्धाचा खर्च ग्रेट ब्रिटनला ८०० कोटि पौंड आला. चालू महायुद्धाचा आतांपर्यंतचा खर्च १९०० कोटि पौंडांवर गेला आहे. चालू युद्धाचे प्रारंभी जेवढें ग्रेट ब्रिटनचें एकूण राष्ट्रीय कर्ज होतें, त्याच्या १½ पट रकम कर्जाऊ काढावी लागली. वरील माहिती मि. हर्बर्ट मॉरिसन ह्यांनीं आपल्या भाषणांत सांगितली.

मुंबई प्रांताचें शेतकी खातें

कारभार व सांपत्तिक स्थिति.

१९४२ मध्यें, शेतकी खात्याच्या व्यवस्थेंत ज्या मुख्य सुधारणा घडून आल्या आहेत त्या येणेप्रमाणें: (अ) जमिनीस बांध बांधणें व कोरडवाहू शेतीची पहाणी व सुधारणा करण्यासंबंधीं एकत्र असलेल्या योजनेअन्वयें बांध बांधण्यासंबंधींच्या स्वतंत्र विभागाची स्थापना, (ब) कोंकण विभागाची डिव्हिजनल सुपरिंटेंडेंट ऑफ ॲग्रिकल्चर याच्या हाताखालीं स्वतंत्र शेतकी विभाग म्हणून पुनर्रचना करण्यांत आली. त्याशिवाय, जिन्नांत कपाशी, धान्यें व तंबाखु यांच्या रोपट्यांची लागवड करण्यासंबंधींच्या बहुतेक कामावर टेक्निकल निर्बंध व देखरेख चालविण्यासाठीं कॉप बोर्डॅनिस्ट टू गव्हर्न्मेंट या हुद्याचें डेप्युटी डायरेक्टर ऑफ ॲग्रिकल्चर, कॉप रीसर्च या हुद्यांत रूपांतर करण्यांत आलें आहे.

शेतकी खात्यातर्फे चालविण्यांत येणारे शास्त्रीय शोध लावण्याचें काम झपाट्यानें वाढत आहे व इंपीरिअल कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चरल रीसर्च इंडियन कॉटन कमिटी व सर सासून डेव्हिड ट्रस्ट फंड यांसारख्या संस्थांच्या उदार मदतीनें व सहकार्यानें तें बरेंच सोपें झालें आहे. त्यांच्या स्थापनेपासून या संस्थांनीं प्रांतांतील शेतीसंबंधीं शोध व सुधारणा करण्याच्या कार्यासाठीं अनुक्रमें सुमारें रु. १६ लाख, रु. २१ लाख व रु. ५ लाखपर्यंत रकमांची मदत दिलेली आहे.

रिपोर्टाच्या वर्षी शेतकी खात्याचा खर्च १७,५३,१७५ रुपये झाला तर तोच मागील सालीं रु. ९,५४,९२९ इतका झाला होता. खात्याचें उत्पन्न २,१२,९६८ रुपये होतें तर तेंच मागील सालीं रु. २,००,४४२ इतकें होतें. सन १९४२ सालच्या खरीफ हंगामासाठीं "अधिक धान्य पिकवा" ह्या चळवळीच्या संबंधांत बियाणें खरेदी करण्यासाठी व तें वांटून देण्यासाठी आर्थिक मदत करण्याकरितां डायरेक्टर ऑफ ॲग्रिकल्चर यांच्या ताब्यांत रु. १,७०,००० जादा पर्सनल लेजर अकाउंट देण्यांत आला होता.

आर. ए. परीक्षेचे निकाल

हिंदुस्थान सरकारच्या ऑडिटर्स सर्टिफिकेट रूलअन्वयें दरसाल आर. ए. (रजिस्टर्ड अकौंटंट) च्या परीक्षा घेतल्या जातात. या परीक्षा पहिली व शेवटली अशा दोन असून त्या मुंबई, कलकत्ता, मद्रास, दिल्ली व लाहोर या ठिकाणीं एप्रिल महिन्यांत घेतल्या जातात. यंदा झालेल्या परीक्षांचा निकाल नुकताच प्रसिद्ध झाला आहे. पहिल्या परीक्षेला एकूण सुमारें ४६० उमेदवार बसले होते त्यांपैकीं ९७ उत्तीर्ण झाले. यशस्वी उमेदवारांत खालील महाराष्ट्रीय उमेदवारांचीं नांवें आढळतात:—

बोरकर एम. डी., देशपांडे सी. व्ही., दवणे जे., गोरे व्ही. एच., कुलकर्णी जी. व्ही., ओक एस. पी., पेंडे डी. के., पालकर जी. एच., पठ्ठेकर एस. आर., सरनाईक पी. पी., सोहनी एस. के., ताम्हणे के. व्ही.

पहिली परीक्षा झाल्यानंतर यशस्वी उमेदवारांना सरकारमान्य (approved) अकौंटंटकडे विवक्षित मुदतीपर्यंत आर्टिकल्स भरून कामाचा प्रत्यक्ष अनुभव घ्यावा लागतो. नंतर शेवटची परीक्षा होते; तींत उत्तीर्ण होणाऱ्यांस रजिस्टर्ड अकौंटंट म्हणून नोंदण्यांत येतें.

स्फुट विचार

मि. चर्चिल ह्यांनीं केलेलें सिंहावलोकन

युद्धाचें लोण प्रत्यक्ष आपल्याच देशांत येऊन पोहोंचलें असतां, जर्मन सैन्यें स्वतःचे प्राण पणास लावून लढल्यावांचून रहाणार नाहींत हें अपेक्षित होतें. अटलांटिक महासागराचा किनारा व फ्रान्स देश बराच काळ आपण लढत ठेवूं शकूं अशी त्यांची पहिली कल्पना होती, पण त्यांस दक्षिणच्या बाजूनेंहि शह बसल्यामुळें जर्मन सेनानींस स्वदेशाच्या दिशेनें मागें हटावें लागलें. संबंध फ्रान्स त्यांच्या हातचा जाऊन बेल्जममधून त्यांस पाय मागें घेणें प्राप्त झालें, एवढेंच नव्हे तर सिगफ्रीडच्या तटबंदीच्या आश्रयानें मित्रराष्ट्रांच्या जर्मनीवरील हल्ल्याचा प्रतिकार करण्याची पाळी आली. ह्या तटबंदीच्या उत्तरेकडील टोकाच्या बाजूनें हॉलंडमधून ब्रिटिश फौजा जर्मनींत घुसूं लागल्या तेव्हां तेथें जर्मन सैन्यानें त्यांस निकराचा विरोध केला. पश्चिम आघाडीवरील लढाया हें जर्मनीवरचें प्राणसंकट आहे आणि तें दूर ढकलण्याचा शत्रूनें कितीहि प्रयत्न केला तरी तें आतां कांहीं टळत नाहीं. ह्या परिस्थितीच्या दृष्टीनें मि. चर्चिल ह्यांनीं कॉमन्स सभेंत सिंहावलोकनात्मक भाषण करतांना युरोपांतलें युद्ध चालू वर्षाचे अखेर संपावें असें आहे तरी तें पुढील सालच्या प्रारंभाच्या महिन्यांतहि रेंगाळत रहाण्याचा संभव आहे असें सावधगिरीच्या वृत्तीनें सांगितलें, तें योग्यच आहे. जर्मनीचा सर्व बाजूंनीं असा कोंडमारा होत आहे कीं त्यास फार वेळ तग धरून रहाणें शक्य नाहीं हें स्पष्ट आहे. मि. रूझव्हेल्ट ह्यांच्याशीं नुकत्याच झालेल्या चर्चेत मि. चर्चिल ह्यांनीं ज्या अनेक महत्त्वाच्या बाबींविषयीं वाटाघाटी केल्या त्यांमध्यें जपानविरुद्ध व्हावयाच्या चढाईची सिद्धता, जर्मनीचा पराभव होतांच त्या देशांत करावयाची व्यवस्था, पोलंड व पूर्व युरोपांतील बाल्कन्समधल्या सारखे देश ह्यांचें भवितव्य, इत्यादि प्रश्न प्रमुख असले पाहिजेत. जपानच्या पाडावाच्या युद्धांत इंग्लंड अमेरिकेच्या बरोबरीनें आपली सर्व शक्ति खर्ची घालीन असें आश्वासन मि. चर्चिल ह्यांनीं दिलें आहे. ह्या बाबतींत आणि युरोपच्या पुनर्रचनेच्या संबंधांत इंग्लंड, अमेरिका व रशिया ह्यांचें पूर्ण सहकार्य व ऐकमत्य होणें अगत्याचें आहे आणि त्याकरितां मि. चर्चिल, मि. रूझव्हेल्ट व मि. स्टालिन ह्यांनीं एकत्र येऊन चर्चा करणें आवश्यक आहे. अशा वाटाघाटी लवकरच होतील असें मि. चर्चिल ह्यांनीं म्हटलें आहे. युद्धकाळाइतकाच युद्धानंतरचा काळ अडचणींचा आहे. त्यांत मतभेदांस पुष्कळ जागा आहे. तथापि ह्या प्रकारच्या अडचणी दूर सारून पुढील धोरणाचा निर्णय, ब्रिटिश, अमेरिकन व रशियन मुत्सद्यांनीं करावयास पाहिजे. ह्या संबंधांत त्यांचेवर प्रचंड जबाबदारी येऊन पडली आहे आणि तिची जाणीव त्यांस आहे ह्यांत शंका नाहीं.

रबराच्या धंद्यास हिंदुस्थानांत जाव

बनारस विश्वविद्यालयांतील डॉ. एन. एन. गोडबोले ह्यांनीं गेल्या आठवड्यांत गुंबई विश्वविद्यालयाच्या केमिकल टेक्नॉलाजी खात्यामध्यें "हिंदुस्थानांतील रबराचा धंदा" ह्या विषयावर भाषण केलें. आपल्या भाषणांत त्यांनीं रबराच्या धंद्याचें सिंहावलोकन केलें. १९४० सालीं रबराचें जागतिक उत्पादन १३ लक्ष ९० हजार टन झालें. १९४३ सालीं हिंदुस्थानांत २० हजार टन रबर निघालें. १७७० मध्यें रबराची किंमत प्रत्येक पौंडास ५ पौंड होती १९०८ सालीं ती २ पौंड ८ शिलिंगावर आली. १९३२ मध्यें रबर ३½ आणे पौंड मिळूं लागलें. आतांचा नियंत्रित भाव १¼ रु. पौंड आहे. १९४३–४४ मध्यें अमेरिकेनें ५० हजार टन, रशियानें ९० हजार टन, कॅनडानें ४० हजार टन व जर्मनीनें ७० हजार टन कृत्रिम रबर तयार केलें. १९४५ सालीं १० लक्ष टन कृत्रिम रबर निर्माण करण्याचा अमेरिकेचा बेत आहे. युद्धसमाप्तीनंतर, रबराचे मळेवाले आपले मळे बंद करून भांडवल बुडविण्यास तयार होणार नाहींत व कांहीं बाबतींत कृत्रिम रबर स्वाभाविक रबरापेक्षा सरस असल्यानें त्या रबराचेंहि उत्पादन चालू राहील, असें त्यांनीं सांगितलें. हिंदुस्थानांत रबराचा धंदा सुरू करणें शक्य आहे व त्यासाठीं हिंदी विश्वविद्यालयांनीं त्यासंबंधांत शिक्षणक्रम योजावा, अशी त्यांनीं सूचना केली.

दर एकरी उसाचें व साखरेचें उत्पादन वाढविण्याची आवश्यकता

मि. लालचंद हिराचंद ह्यांनीं आपल्या एका ताज्या भाषणांत हिंदी साखरेच्या धंद्याविषयीं व्यक्त केलेले विचार महत्वाचे आहेत. साखरेच्या उत्पादन खर्चापैकीं निम्मा खर्च उसाच्या किंमतीचा असतो, हें लक्षांत घेतां उसाचें उत्पादन अधिक कार्यक्षम करण्याचें महत्त्व तात्काळ लक्षांत येतें, हें सांगून आज हिंदी कारखान्यांना उत्पादन खर्च कमी करण्याचें महत्त्व पटत नसलें, तरी जावामध्यें साखरेचें उत्पादन पुनः सुरू झालें, कीं त्याची झळ हिंदी गिरण्यांस लागल्याविना रहाणार नाहीं व साखरेची निर्गत चालू ठेवणें कठीण जाईल, असा त्यांनी इशारा दिला. हिंदुस्थानांतील दर एकरी उसाचें सरासरी उत्पादन कमी होत चाललें आहे, ही गोष्ट खालील आकडे दर्शवितात—

वर्ष	दर एकरीं उसाचें उत्पादन (मण)
१९३५–३६	४०५
१९३७–३८	३८४
१९३९–४०	३४५
१९३५–३६ ते १९३९–४० (सरासरी)	३६७

जावा व हवाई येथें उसाचें उत्पादन हिंदी उत्पादनाच्या दुपटीपेक्षां जास्त आहे आणि तेथील उंसांत साखरेचा अंशहि अधिक आढळतो, असें श्री. लालचंद ह्यांनीं सांगितलें. सेंट्रल शुगरकेन कमिटीचें काम लवकरच सुरू होऊन ती ह्या प्रश्नाकडे लक्ष पुरवील व हिंदी ऊंस अधिक फलदायी करण्यास सहाय करील अशी अपेक्षा आहे.

इनकमटॅक्स अधिकाऱ्यांची भरती

इनकमटॅक्स अधिकाऱ्यांचें कार्य व त्यांची लायकी ह्यांत सुधारणा घडवून आणण्यासाठीं हिंदुस्थान सरकार भरतीच्या पद्धतींत सुधारणा करणार आहे. परीक्षेंत वर येणाऱ्या उमेदवारांस वरिष्ठ नोकऱ्या देण्यांत यावयाच्या आहेत.

लक्ष्मी को. बँक लि., सोलापूर

अहवालाचे मुदतीत शेअर भांडवल १,६७० रुपयांनी वाढून तें २४,१५० रुपये झालें. सभासदांची संख्या ६९९ झाली आहे. ठेवींचा आकडा १ लक्ष, २८ हजार रु. असून येणें कर्ज ७१½ हजार रुपये आहे. थकबाकीचें प्रमाण ११·५% आहे, म्हणजे तें साली जात चाललेलें आहे. निवळ नफा १,७७१ रुपये झाला व २½% दरानें डिव्हिडंड वाटण्याचें ठरलें. बँक अहवालाचे वर्षी प्रथमच 'अ' वर्गात आली. त्यापूर्वी तीन वर्षे ती 'ब' वर्गात होती.

अमळनेर को. अर्बन बँक लि.,

ह्या बँकेचें वसूल भांडवल ५४,८५० रुपये असून रिझर्व्ह फंड ७७ हजारांचा आहे आणि इतर फंडांत ७३½ हजार रुपये आहेत. एकूण ठेवी ४ लक्ष, ८१ हजार रुपयांच्या आहेत. येणें कर्ज २ लक्ष, २२½ हजार रुपये आहे. गत वर्षापेक्षा ही रकम २१ हजारांनीं जास्त आहे. थकबाकीचे रकमेंत ३,७७७ रुपयांची घट दिसत आहे. वर्षअखेर निवळ नफा १५,८७४ रुपये झाला. भागीदारांस ७½ डिव्हिडंड मिळालें.

सोलापूर डि. सें. कों. बँक लि.

(वार्षिक सभा : ८–१०–१९४४)

वरील बँकेचा रौप्यमहोत्सव ता. १८–९–१९४३ रोजीं साजरा करण्यांत आला. ३०–६–४४ अखेर बँकेचें भाग भांडवल १,२१,००० रुपयांचें असून तिचेकडे ठेवी २७½ लक्ष रुपयांच्या आहेत. पतपेढ्यांकडील कर्जामध्यें, घरांचे तारणावरील कर्जामध्यें व मालतारणावरील कर्जामध्यें अहवालाचे साली घट दिसून येत आहे. मोहोळ येथें सेल शॉप स्थापन करण्यांत आलें आहे, त्याला धान्य वाटपाचें काम देण्यांत आलें आहे. पंढरपूर येथें रेशन शॉप व करमाळा येथें फेअर प्राइस शॉप सुरू केलीं आहेत. बँकेस २२,३०२ रुपये नफा झाला. डिव्हिडंड ५% मिळेल.

भीमहावीर को. बँक लि., कोल्हापूर

साल अखेर सभासदांची संख्या ६१५ होऊन शेअर भांडवलाची रकम ४५,९४० रुपये झाली. बँकेकडील ठेवींच्या रकमेंत थोडी घट झाली. बँकेकडील ठेव रकमेशीं रोख व बँकांत शिल्लक असलेल्या रकमेचें प्रमाण व सोनें-चांदी तारणावरील कर्ज यांमध्यें अधिक रकम गुंतवून तरत्या भांडवलाची व्यवस्था ठेवून त्यावर शक्य तों अधिक व्याज मिळविणेविषयीं दक्षता घेतलेली दिसून येईल. बँकेस ९,७६९ रुपये नफा झाला. डिव्हिडंडचा ७½% दर पांच वर्षे कायम आहे.

दि को. पीपल्स बँक लि. लिंब

ह्या बँकेच्या सभासदांत ७ सभासदांची भर पडून त्यांची संख्या ६३ झाली व भाग भांडवल ४,०२५ रुपये झालें. बँकेचा व्यवहार वाढला आहे, ठेवींत वाढ झाली आहे व हुंडी खातें किफायतशीर होत आहे. बँकेनें सुमारें ४० खंडी पेंढ आणवून ती लोकांना सवलतीचे दरानें दिली. सासऱ्या मिळवून तो स्थानिक लोकांस दिला. सभासदांकडून अडव्हान्स घेऊन बराच माल खरेदी करून आणवून दिला. अहवालाचे वर्षी बँकेस ७२३ रुपये नफा झाला. लिंबसारख्या अडवळणी व व्यापारांत मागासलेल्या गांवीं बँक उत्कृष्ट कामगिरी चिकाटीनें करीत आहे व तिची साळेसाल प्रगति होत आहे.

* *
पूना गेस्ट हाऊस

टेलिफोन नं. ७७९

संस्थापक :
कै. नानासाहेब सरपोतदार
* *

पुण्यांतील
आदर्श निवासस्थान व भोजनालय
छाया लॉजिंग व बोर्डिंग हाऊस
बुधवार चौक, पुणें २.

गांवोगांवीं विक्रेते पाहिजेत.

A 9

क्विनीनचे ऐवजीं मलेरियाकरतां खात्रीचा
अनुभविक उपाय म्हणून
'एनाईन' वापरतात.

अलपाईन प्रॉडक्टस् (इंडिया) पुणें २

जिकडे तिकडे प्रशंसा

इमिटेशन दागिन्यांवर रासायनिक क्रिया करून खऱ्या सोन्याचा पत्रा चढविला जातो त्यामुळें दागिना केव्हांही खराब होत नाहीं, ही पूर्ण खात्री झाली. सोन्याचा पत्रा चढविलेल्या चार बांगड्या कि. आठ रु. गरजेस्तव दागिना परत करणें झाल्यास वर चढविलेल्या सोन्याचे सर्वच्या सर्व पैसे परत देऊं.

मट कं. सांगली, S. M. C.
मट कंपनी शाखा–बुधवार पेठ, पुणें २.

चितळेवाडी येथील धान्य व चारादिन

सोलापूर जिल्ह्याचे कलेक्टर मे. कोरीन व मुंबई इलाख्यांतील प्रख्यात सरकारी व बिनसरकारी शेती-तज्ज्ञांची चितळेवाडीस भेट

जादा धान्य व चारा-उत्पादनाच्या विस्तृत, शास्त्रोक्त व मार्गदर्शक उपक्रमाबद्दल सर्वांकडून चितळे बंधूंचें अभिनंदन

ॲग्रिकल्चरल प्रॉडक्टस लि. (गूढ कंपनी) या कंपनीच्या चितळेवाडी येथील इस्टेटवर ता. २८ ऑगस्ट रोजीं " धान्य व चारादिन " (Food-fodder day) साजरा करण्यांत आला. या प्रसंगीं सोलापूर जिल्ह्याचे कलेक्टर मे. जे. एम. कोरीन हे सन्माननीय पाहुणे होते. मुंबई सरकारचे डेप्युटी डायरेक्टर ऑफ ॲग्रिकल्चर (हेडक्वार्टर्स) रावबहादूर साळीमठ हे सदर समारंभासाठीं खास हजर राहिले होते. त्याचप्रमाणें मुंबई सरकारचे रिटायर्ड सॉईल फिजिसिस्ट श्री. एन्.व्ही. कानिटकर, मुंबई सरकारचे रिटायर्ट केमिस्ट, रावबहादूर काकासाहेब सहस्रबुद्धे, श्रीयुत के. व्ही. जोशी, रिटायर्ड डेप्युटी डायरेक्टर ऑफ ॲग्रिकल्चर ही शेतकी विषयांतील बडी बडी तज्ज्ञ मंडळी हजर होती. रावबहादूर गणेश विनायक पटवर्धन, रिटायर्ड स्मॉलकॉज जज्ज, पुणें, श्रीयुत जी. एल. ढेकणे, रिटायर्ड सबजज्ज, पुणें, श्रीयुत आठवले एस. डी. ओ. माळशिरस, फोंडशिरसचे बागाईतदार श्रीयुत दाते व सोलापूर जिल्ह्यांतील इतर बागाईतदार व शेतकरी लोक वगैरे बरीच मंडळी हजर होती. कंपनीचे चेअरमन डॉ. दादासाहेब भडकमकर व डेक्कन पेपर मिलचे मॅनेजिंग एजंटसपैकीं श्रीयुत एस. के. भावे व श्रीयुत भाऊसाहेब मोडक ही मंडळीहि समारंभासाठीं खास हजर होती.

कंपनीचे मॅनेजिंग एजंट श्रीयुत तात्यासाहेब चितळे यांनीं डेप्युटी डायरेक्टर ऑफ ॲग्रिकल्चर रावबहादूर साळीमठ यांच्या समेवत मे. कलेक्टरसाहेबांचे कंपनीचे इस्टेटवर स्वागत करून त्यांना कंपनीनें केलेली ज्वारी, साळ वगैरेचीं हिरवींगार व भरघोस पिकें व जमीन सुधारणा व बांध-बरंबे दाखवीत दाखवीत सभास्थानीं आणिले. कंपनीचे चेअरमन डॉक्टर दादासाहेब भडकमकर व मॅनेजिंग एजंट श्री. दादासाहेब चितळे यांनीं सर्व सन्माननीय पाहुण्यांसमवेत मे. कलेक्टरसाहेबांचे स्वागत केल्यानंतर सभेस सुरुवात झाली. कंपनीनें केलेल्या पिकांचे कांहीं नमुने सभास्थानीं ठेवण्यांत आले होते. चितळे-बंधूंनीं धान्य-उत्पादनाचे बाबतींतहि अल्पावधींत किती बहुमोल यश मिळविलें यांचें हें सर्व नमुने जणू प्रात्यक्षिकच होतें.

कंपनीचे चेअरमन डॉ. दादासाहेब भडकमकर यांनीं मे. कलेक्टरसाहेब यांचे आभार मानून कंपनीनें हातीं घेतलेल्या एक हजार एकरावरचे विस्तृत व जास्तींत जास्त धान्य उत्पादन करण्याच्या श्रीयुत चितळे बंधूंच्या योजनेचे आजचे अवर्षणाचे दिवसांत केवढें महत्त्व आहे व ही योजना किती उपयुक्त व अभिनंदनीय आहे हें विशद करून सांगितलें. ते पुढें म्हणाले, "कंपनीनें गेल्या २-३ वर्षांचे अवधींत उसापासून गूळ तयार करून तो धंदा ज्याप्रमाणें यशस्वी करून दाखविला त्याचप्रमाणें पेंढ वगैरे खतें घालून, जादा व पद्धतशीर मशागत करून शास्त्रोक्त रीतीनें धान्य-उत्पादन केल्यास धान्याची शेतीसुद्धां किफायतशीरपणें व दोन पैसे मागें टाकून करितां येण्यासारखी आहे हें चितळे-बंधू लवकरच सप्रयोग सिद्ध करून दाखवितील. धान्य पिकविण्याची जरूरी लढाईपुरतीच नसून ती कायमचीच आहे व त्या दृष्टीनें आपल्याला शेती नेहमींच किफायतशीरपणें करितां येईल यांचेंच उदाहरण चितळे बंधू आपणा शेतकरी वर्गास घालून देत आहेत. या योजनेंत सरकारी साहाय्यानें त्यांना पूर्ण यश येवो."

त्यानंतर मे. कलेक्टरसाहेब यांनीं मराठींत भाषण करून कंपनीचीं धान्याचीं उभीं भरगच्च पिकें पाहून त्यांना फारच समाधान वाटल्याचें त्यांनीं सांगितलें. ते पुढें म्हणाले, "दाण्याचे इतकें चांगलें पीक मीं बघितलें नव्हतें. सरकारला व आपल्याला धान्याचीं व्यवस्था केली पाहिजे. सर्व शेतकरी जोंपर्यंत भरपूर धान्य पिकविणार नाहींत तोंपर्यंत धान्याचा भरपूर पुरवठा होणार नाहीं. सर्व शेतकरी चितळे यांचेंप्रमाणेंच धान्य पिकवितील तर धान्याचा सांठा वाढून सरकारची धान्याची काळजी दूर होईल. चितळे यांचें धान्याचें पीक सर्व शेतकरी वर्गानें जरूर पाहण्यासारखें आहे. चितळे यांनीं इतकें चांगलें धान्याचें पीक केलेलें पाहून फारच समाधान वाटलें. याबद्दल मी त्यांचें पुनः पुनः अभिनंदन करितों."

कंपनीचे मॅनेजिंग एजंट श्रीयुत तात्यासाहेब चितळे यांनीं 'धान्य व चारा दिना' चें औचित्य व महत्त्व समजावून सांगितलें. तें पुढें म्हणाले, " धान्याची टंचाई लक्षांत घेऊन उसावरील लक्ष कमी करून आम्हीं यंदा मुद्दाम धान्याचें उत्पादन मोठ्या प्रमाणावर हातीं घेतलें आहे. तें करीत असतांना आम्हाला असा अनुभव आला कीं, अन्नधान्याचें उत्पादन किफायतशीरपणें करावयाचें असेल तर जमिनीची मशागत चांगली झाली पाहिजे. पूर्वापार पद्धतीनें धान्य पिकविण्यांत अर्थ नाहीं. कंपनीनें यंदा धान्याच्या उत्पादनासाठी १०००-१२०० च्या वर एकर जमिनीची उत्तम प्रकारें मशागत केली असून त्यासाठी आम्हीं पुष्कळ पैसा खर्च केला आहे. जमिनींत उताराला आडवे ३३ फुटांवर मोठाले बांध व ११ फुटांवर लहान बांध घातले आहेत. आमचीं बहुतेक सर्व पिकें पाटाचे पाण्यावरच केलीं जातात. रात्रींहि पिकांना अंधेरांत पाटाचें पाणी द्यावें लागतें. अशावेळीं दिलेलें पाटाचें पाणी सर्व जमिनीस सारखें पोहोंचावें या दृष्टीनें बांध व त्यांची रचना करणें जरूर असते व तशीच बांधबरंड्यांची रचना आम्हीं केली आहे. या कामीं आम्हांस एकरीं बराच खर्च आला आहे. हा सर्व खर्च एकाच वर्षाच्या पिकांतून भरून निघावयाचा नाहीं, पण ३-४ वर्षांच्या पिकांत हा खर्च खात्रीनें भरून निघूं शकेल. जमीन हेंच शेतीच्या उत्पादनाचें प्रमुख साधन असल्यामुळें जमीन सुधारण्याकरितां (Land Development) जो खर्च करावा लागेल तो करणें आवश्यक आहे व हा खर्च भांडवल-खर्च म्हणून समजला पाहिजे. आम्हीं या दृष्टीनें हजारबाराशें एकरांच्या वर धान्याच्या पिकांचा प्रयोग करीत आहोंत. २-३ वर्षांत हा प्रयोग यशस्वी करून दाखवून धान्याची शेती किफायतशीर होऊं शकते हें सिद्ध करून दाखवूं अशी आम्हांस पूर्ण उमेद आहे."

रावबहादूर साठीमठ, डेप्युटी डायरेक्टर ऑफ ॲग्रिकल्चर हेडक्वार्टर्स, पुणें, हे आपल्या भाषणांत म्हणाले, "कंपनीचीं पिकें पाहून फारच समाधान वाटतें. इकडच्या भागांत सरसकट बाजरी चांगली होत नाहीं म्हणून त्याच्याऐवजीं सरीप ज्वारीच चांगली होते म्हणून बाजरी न करतां सरीप ज्वारीच करावी अशी माझी सूचना आहे. पाटांचे पाण्यावर मातारें पीकहि चांगलें येतें. पाटाच्या व विहिरीच्या पाण्यावर हुंडी पेरतात पण त्यापासून फक्त चारा निघतो, धान्य निघत नाहीं म्हणून त्याचेऐवजीं सरीप ज्वारी केल्यास चाराहि मिळेल व धान्यही निघेल. ज्वारीचें धान्य एकरी १२००० पौंड असावें व एकरी चारा ३५ हजार पौंड निघाला म्हणजे पीक फार चांगलें. उसाइतकेंच लक्ष ज्वारी व ताळ यांना दिलें पाहिजे. अशा तऱ्हेनें लक्ष घालून चितळे बंधूंनीं शेतकऱ्यांना मार्गदर्शक अशी शेती करून दाखविली याबद्दल मी त्यांचें अभिनंदन करतों."

यानंतर पुण्याचे रावबहादूर काकासाहेब सहस्रबुद्धे म्हणाले, "चितळे बंधूंनीं या भागांत शेतीची सुधारणा करून चांगला मार्ग दाखविला आहे. जमीन निकस असून सुद्धां शेती कशी फायदेशीर करितां येते हें येथें बघतां येईल. मे. कलेक्टरसाहेब म्हणतात त्याप्रमाणें चितळे बंधूंनीं सरकार व लोक यांची धान्याची या भागांतील बरीचशी काळजी पुढारीपणा घेऊन दूर केली आहे. त्यांनीं सर्वच प्रकारची शेती व बागाइत केली आहे व ते सर्वच उत्तम प्रकारचे आहे. त्यांनीं शेतकऱ्यांना दिलेल्या मार्गदर्शनाबद्दल मी त्यांचे आभार मानतों व अभिनंदन करतों.

श्री. के. व्ही. जोशी, रिटायर्ड डेप्युटी डायरेक्टर ऑफ ॲग्रिकल्चर, हे आपल्या भाषणांत म्हणाले, "शेतकरी बंधूनो, मी शेतकी खात्यांत ३० वर्षे काम करून रिटायर्ड झालों आहे व शेतींत बराचसा अनुभव घेतला आहे. सरकारच्या डेमॉन्स्ट्रेशन फार्ममध्यें चांगलें पीक करून दाखविलें जातें पण त्याविषयीं लोकांचा प्रवाद असा असतो कीं, सरकारजवळ भरपूर पैसा आहे म्हणून ते वाटेल तसा खर्च करून चांगलीं पिकें करून दाखवितां येतात. सरकारी डेमॉन्स्ट्रेशन फार्मचें सोडून दिलें तरी ह्या कंपनीनें उत्कृष्ट पिकें करून दाखविलीं आहेत. यांचे तर पैसे वर आलेले नाहींत. कंपनी धंद्याकरितांच काढलेली आहे. तेव्हां ते फायद्याकरितांच शेती करतात म्हणून त्यांची शेती पाहून तरी असा आक्षेप कोणी घेऊं शकणार नाहीं. शेतकऱ्यांच्या फायद्याची सुधारणा त्यांना येथें बघावयास मिळेल. चितळे बंधूंचा उपक्रम सर्वांना मार्गदर्शक व्हावा. त्यांच्या उपक्रमाबद्दल मी त्यांचें मनःपूर्वक अभिनंदन करितों."

श्री. एन. व्ही. कानिटकर, रिटायर्ड सॉईल फिजिसिस्ट आपल्या भाषणांत म्हणाले, "ह्या अन्नटंचाईच्या काळांत चितळे बंधु यांनीं मोठ्या प्रमाणावर उत्तम शेती करून फार मोठें कार्य केलें आहे व त्याबद्दल त्यांचें अभिनंदन करणें जरूर आहे. मी दहा वर्षे सोलापूर येथें कोरडवाहू शेतीवर प्रयोग केले. पाटाच्या पाण्याशिवाय पावसावर शेती कशी यशस्वी करावी याबद्दल कांहीं प्रयोग होऊन मुंबई इलाख्यांत दुर्जल शेती यशस्वी करण्यासाठी प्रयत्न झाले आहेत. तसे प्रयोग चितळे बंधूंनीं येथेंहि करून दाखवावेत व मुद्दाम दरसाल निदान दहा बारा एकर जमीन कोरडवाहू शेतीसाठी राखून ठेवून त्यांतहि यशस्वी पीक करून दाखवावें अशी माझी त्यांना नम्र सूचना आहे. यायोगें कोरडवाहू जमिनीच्या शेतकऱ्यालाहि चांगलें मार्गदर्शन होईल."

त्यानंतर या भागांतील बागायतदार श्री. आण्णासाहेब हाते यांनीं आपले कांहीं अनुभव सांगून भाषण केलें. ते म्हणाले, "धान्य आपल्याकडे विशेषतः या भागांत फार कमी पिकतें म्हणून आपल्याला व सरकारलाहि काळजी उत्पन्न झाली आहे. पण चितळेबंधूंच्या उपक्रमानें आम्हां बागायतदारांना आतां आत्मविश्वास वाटू लागला आहे. या भागांत मुद्दाम खाण्यापुरतें धान्य खात्रीनें किफायतशीरपणें उत्पन्न करतां येईल. चितळेबंधूंच्या उदाहरणावरून व त्यांची धान्याची शेतें बघूनहि आम्हीं बागायतदार व शेतकरी लोक अद्याप किफायतशीर धान्य-शेतींतील मर्म समजून घेऊं शकलों नाहीत तर दुर्दैव! या कंपनीच्या शेतांत धान्याचें जितकें पीक आलें आहे तितकें पीक मी २०-३० वर्षांत कोठें पाहिलें नव्हतें. चितळेबंधूंच्या पावलावर पाऊल ठेवून जर आम्हीं धान्य पिकवूं लागलों तर आमच्या प्रांतांतील धान्याची टंचाई आपोआप कमी होईल. जास्त धान्य आपण पिकवूं लागलों म्हणजे सरकारालाहि आपल्याला जास्त धान्य वाटून देतां येईल व सरकारची व आपली काळजी मिटेल."

समारोपादाखल भाषण करतांना कंपनीचे मॅनेजिंग एजंट श्रीयुत दादासाहेब चितळे म्हणाले कीं, आजच्या समारंभाचें सन्माननीय पाहुणे मे. कलेक्टर साहेब व त्याचप्रमाणें इतर सर्व उपस्थित झालेली बडी मंडळी या सर्वांनीं जातीनें हजर राहून आजचा समारंभ साजरा करण्यास आम्हांस हातभार लावला याबद्दल या सर्वांचें मी कंपनीच्या वतीनें कृतज्ञतापूर्वक आभार मानतों. श्रीयुत कानिटकरसाहेब यांनीं सुचविल्याप्रमाणें कोरडवाहू शेतीचा प्रयोग आम्हीं पुढील साली जरूर हातीं घेऊं. धान्याचें उत्पादन इतर देशांत आपल्यापेक्षां एकरी दुप्पट व तिप्पट जास्त निघूं शकतें. अशाच तऱ्हेचें उत्पादन आपण करूं शकल्यास आपल्याकडीलहि शेती खात्रीनें किफायतशीर होईल व धान्याचा प्रश्न सुटेल.

सभा बरखास्त होण्याच्या सुमारास मे. कलेक्टरसाहेब सभास्थानीं उठून श्रोतृवर्गास पुन्हां म्हणाले, "चितळे यांनीं केलेलीं पिकें तुम्हीं प्रत्यक्ष पहा व त्याचप्रमाणें तुम्हीं धान्य करा." इतकें झाल्यावर सभेचें काम संपलें.

महाड को. अर्बन बँक लि.

बँकेचें अधिकृत भांडवल (२५००० रु.) पुरें झाल्यामुळें मागील साली तें ३०,००० रु. करण्यांत आलें, परंतु नवीन सर्व शेअर्स खपून मागणी पुरी करितां आली नाहीं. आणखी १० हजारांनीं भांडवल वाढविण्यांत येणार आहे. ठेवींत भर पडली असून व्यवहारहि थोडा वाढला आहे. महाड येथें दुसरी एक बँक उघडण्यांत आली आहे. बँकेच्या ४ लक्ष ५४ हजार रुपयांच्या खेळत्या भांडवलापैकी १ लक्ष ६० हजार रु. रोख व बँकांत शिल्लक आहेत आणि २ लक्ष ७९ हजारांचे सरकारी रोखे आहेत. कर्जे ८,३५० रुपयांचीं असून कॅश क्रेडिट खातीं ३,८४० रुपये आहेत. अहवालाचे वर्षी बँकेस ५,९०८ रुपये नफा झाला व ६% दरानें डिव्हिडंड वाटण्यांत आलें.

हें पत्र पुणें, पेठ सांगवी क. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व
रा. श्रीपाद रामन काले, बी. ए., यांनीं 'दर्शनविलास,' सांगवी, क. नं. ९२७।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

दिवाळीचा मोठा अंक

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.

खालील पत्त्यावर चौकशी करावी.

व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

अर्थ

वर्गणीचे दर.

वार्षिक वर्गणी
रु. ४
(टपाल हंशील माफ)
किरकोळ अंकास
दोन आणे.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष १० पुणें, बुधवार, तारीख १८ आक्टोबर, १९४४ अंक ४१

देना बँक
देवकरण नानजी बँकींग कं. लिमिटेड

चीं
६ वर्षें आणि ३ वर्षांचीं
अनुक्रमें ३॥ टक्के आणि २॥। टक्के व्याज देणारीं
कॅश सर्टिफिकिटें
रु. १० पासून रु. ५,००० पर्यंतच्या विभागांत
मिळूं शकतात.

स्थानिक तीनहि शाखांचीं सेव्हिंग्ज बँक डिपार्टमेंटस्
प्रत्येक रविवारीं सकाळीं उघडीं राहतील.

देना विमा कंपनी

मध्यें
तुमचा विमा उतरवा
जिंदगी ★ आग ★ मोटर

सुरेश के. देसाई, मॅनेजर.
हिंमतलाल गांधी, मॅ. डायरेक्टर.

देवकरण नानजी बिल्डिंग्ज, एल्फिन्स्टन सर्कल,
कोट, मुंबई.

न्यू इंडिया इंडस्ट्रीज, लि.
२६ लॅमिंग्टन रोड (नॉर्थ), मुंबई ११

: अध्यक्ष :
श्री. गणेश सदाशिव मराठे, ॲक्चुअरी
: मॅनेजिंग एजंटस् :
मराठे आणि कंपनी
विविध रबरी माल करणारा अशा प्रकारचा
पहिलाच महाराष्ट्रीय कारखाना
★ सरकारी मान्यता ★
ऑर्डिनरी शेअर्सवर भरपूर डिव्हिडंड : ठेवी स्वीकारल्या जातात.

तार : 'NUTRED'
टेलि : ४०६८९

पु. ग. मराठे,
मॅनेजिंग डायरेक्टर.

दि सोलापूर डिस्ट्रिक्ट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि., सोलापूर.

स्थापना १९१८

हेड ऑफिसः—सोलापूर.

शाखाः—कुर्डुवाडी, पंढरपूर, करमाळा.

चेअरमन, बोर्ड ऑफ डायरेक्टर्सः—श्री. एम. व्ही. लेले, बी. ए., एलएल. बी., वकील, सोलापूर.

भांडवल

अधिकृत भांडवल	रु.	१,५०,०००/-
वसूल झालेलें भांडवल	रु.	१,३१,०००/-
रिझर्व्ह व इतर फंडस्	रु.	१,१६,०००/-
एकूण खेळतें भांडवल	रु.	३०,००,०००/-
सन १९४३-४४ चा नफा	रु.	२१,३०२/-
मंजूर झालेलें डिव्हिडंड		५ टक्के

हेड ऑफिसांत व शाखा ऑफिसांत सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार करण्यांत येतात. टेर्मीचे दरांबद्दल व नियमांबद्दल सम्यक् ऑफिसांत चौकशी करावी अथवा अर्ज करून नियम मागवावेत.

सी. एस. परांजपे,
मॅनेजर.

नूतन वर्षाचें अभीष्टचिंतन

आमचे विमेदार, प्रतिनिधी व हितचिंतक यांस यंदाची दिवाळी व नूतन वर्ष सुखाचें व भरभराटीचें होवो!

दि औंध म्युच्युअल लाइफ ॲशुअरन्स सोसायटी लि.

रामनिवास, लक्ष्मी रोड, पुणें २.

महाराष्ट्राची पहिली म्युच्युअल विमा कंपनी.

वैशिष्ट्यः—एजंटांस कायम व वंशपरंपरा कमिशन दिलें जातें.

सर्वत्र उत्साही एजंटस नेमणें आहेत.

आर. जी. साठे, सुपरिन्टेंडेंट.
व्ही. जी. जोशी, मॅनेजिंग डायरेक्टर.

मुंबईचे चीफ एजंटसः—मे. के. डब्ल्यू. फडके आणि कं. गिरगांव बँक रोड.

Under The Patronage of the Government of His Highness The Rajasaheb of Sangli

दि सांगली बँक लि०

(स्थापना १९१६)

बोर्ड ऑफ डिरेक्टर्सः—(१) राव. ह. व. कुलकर्णी
(२) शेठ ने. आ. पाटील
(३) „ ज. वि. करमरकर
(४) „ ता. श्री. आरवाडे

वसूल झालेलें भांडवल	...	रु. २,००,०००
रिझर्वस्	...	रु. २,००,०००
खेळतें भांडवल	...	रु. ५७,००,०००

हेड ऑफिसः—सांगली (S. M. C.)

शाखाः—१ शहापूर २ शिरहट्टी ३ तेरदळ ४ खवटी ५ कवठे ६ मंगळवेढें ७ तुपारी (ताकारी M. S. M. Rly.) ८ उगार (M. S. M. Rly.) ९ विलिंग्डन कॉलेज (जि. सातारा)

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

P. S. MOKASHI,
मॅनेजर.

श्री

दी बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट, लि०, पुणें.

संचालक मंडळ

१ डॉ. व्ही. डी. फाटक, एल. आर. सी. पी., एम. आर. सी. एस., एल. एम. (रोटंडा), पुणें. (चेअरमन)

२ दिवाण बहादुर एन. सी. लिमये, बी. ए., एलएल. बी., ॲडव्होकेट आणि सरकारी वकील, सोलापूर.

३ श्रीमंत सरदार जगन्नाथमहाराज पंडित, फर्स्ट क्लास सरदार, इनामदार व कौन्सिल ऑफ स्टेटचे सभासद, भाऊमहाराज निकेतन, पुणें.

४ डॉ. रघुनाथ गणेश ठकार, एल. एम. ॲन्ड एस., (माजी स्टेट सर्जन, सांगली), पुणें.

५ श्री. आण्णाजी पांडुरंग कोंडे देशमुख, जमीनदार व व्यापारी, अध्यक्ष, मोर संस्थान देशमुख संघ, पुणें.

६ श्री. महादेव रामचंद्र तांबे, बी. ए., एल. सी. इ., रिटायर्ड चीफ अकौंटंट, बॉम्बे कॉर्पोरेशन, मुंबई.

७ श्री. आर. बी. भट, पुणें.

८ रा. ब. बी. एल. मोडक, एम. सी. इं., एम. इन्स्ट. सी. ई., आब. एस. इं. (नि.), पुणें.

९ श्री. गजानन विश्वनाथ साळवेकर, बी. ए., मुंबई.

१० डॉ. रा. ह. मढकमकर, एम. ए., एम. डी., पुणें.

११ श्री. चंद्रशेखर गोविंद आगाशे, बी. ए., एलएल. बी., (एक्स ऑफिशिओ), पुणें.

—: गेल्या वर्षांतील निवळ नफ्याची सर्वांनुमतें वांटणी :—

ऑर्डिनरी भागीदारांस १०% डिव्हिडंड	...	रु.	५५,५००
रिझर्व्ह फंड ...	...	रु.	१,२५,०००
डिव्हिडंड इक्वलायझेशन फंड ...	...	रु.	७५,०००
कामगारांच्या सुखसोयीसाठी तरतूद ...	...	रु.	५०,०००
डे. ए. सोसायटीच्या नव्या व्यापारी कॉलेजासाठी देणगी (आतां 'दि बृहन्महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्स')	...	रु.	२,००,०००

—कंपनीच्या भागीदारांस व ठेवीदारांस—

नवें वर्ष सुखाचें जावो

मेसर्स सी. जी. आगाशे अँड को.
मॅनेजिंग एजंटस

सतत एकोणतीस वर्षे खास लोकाश्रयाखालीं चाललेली व विश्वासास पात्र झालेली आणि कोल्हापूर इलाख्यांतील आद्य सहकारी संस्था

दि कोल्हापूर अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, कोल्हापूर

स्थापना १९१३ इसवी

		रु.
अधिकृत भांडवल	... ...	७५,०००
जमा झालेलें भांडवल	... ...	४८,६४०
रिझर्व्ह फंड	... ...	६२,४०८
इतर फंडस	... ...	६६,२७९
सरकारी रोख्यांत वगैरे	... ...	६९,३७६

बँकिंगसंबंधीं सर्व प्रकारचीं कामें केलीं जातात. बँकेचीं तिमाही सांपत्तिक पत्रकें कायद्यानुसार सरकारी गॅझेटमध्यें प्रसिद्ध केलीं जातात. ठेवीच्या व्याजाचे दरासंबंधीं व विशेष माहितीसाठी भेटा अगर लिहा.

के. जी. राणे, ऑफि. मॅनेजर. येशवंत रामजी भोयटे, प्रेसिडेंट. दि कोल्हापूर अर्बन को. बँक लि.

रूरल प्रॉडक्टस कंपनी, लिमिटेड

९५२ सदाशिव, पुणें २.

दिवाळीनिमित्त शुभचिंतन

आमच्या ग्राहकांस, ठेवीदारांस व भागीदारांस दिवाळीचे आनंदाचे वेळीं, कंपनीचा माल टोमॅटो केचप (सॉस) हिंदुस्थान सरकारचे फूड डिपार्टमेंटनें पास केला असल्याचें व स्थानिक खरेदी खात्यामार्फत माल खरेदी केला जात असल्याचें आनंददायक वृत्त कळवीत आहों. भागीदारांस, ठेवीदारांस व गिऱ्हाइकांस दिवाळी आनंददायक जावो अशी प्रार्थना करीत आहों.

मॅनेजिंग डायरेक्टर.

तुमच्या सहकार्यानेंच अल्पावधींत उच्चांक पटकावणारें.

कॅमल बोधचिन्ह

सर्वांच्या स्मृतींत असूं द्या.

कॅमल म्हणजेच—

शाई, गम, पेस्ट, चॉक, सीलिंग वॅक्स, ब्रिलियंटाईन.....

त्याचप्रमाणें :

कॅम्लीन्स् टूथ पावडर

कॅमल इंकचे कारखानदार :

दांडेकर कंपनी.....मुंबई नं. २८.

अनुक्रमणिका

		पृष्ठ
१	इंग्लंडचें आंतरराष्ट्रीय देणें-घेणें	३२५
२	स्फुट विचार	३२६
	सर चिंतामणराव देशमुख ह्यांचा सल्ला—हिंदी व्यापारी मंडळाच्या मागण्या—कृत्रिम व नैसर्गिक रबर.	
३	पुणें शहराची ऐतिहासिक कालांतील वाढ (ले. नी. वि. सोवनी, गोखले अर्थशास्त्र संशोधन मंदिर, पुणें)	३२७
४	ग्रंथालयांची युद्धोत्तर पुनर्घटना (ले. र. श. पारखी, असि. लायब्रेरिअन, जे. वाडिया लायब्ररी) ...	३२९
५	न्यू सिटिझन बँक ऑफ इंडिया	३२९
६	रशिया व अमेरिका ह्यांचे संबंध	३३१
७	सहकारी कंझूमर्स स्टोर्स (ले. एस. टी. पपु, चेअरमन, डे. जिमखाना को. कं. सोसायटी) ...	३३२
८	रिझर्व्ह बँकेकडील सरकारी ठेवी	३३३
९	आपल्या पुढील कांहीं प्रश्न (ले. 'संजय') ...	३३५
१०	विमा कायद्यांत नवीन सुधारणा (ले. वि. गो. जोशी, मॅ. डायरेक्टर, औंध म्यु. विमा कं.) ...	३३६
११	कच्च्या मालाचा पुरवठा करणारे देश ...	३३८
१२	सांडू ब्रदर्सचा कारखाना	३३८
१३	भारत इं. बँक	३३९
१४	मॅनेजिंग एजंटांचा नफा	३३९
१५	इन्कम टॅक्सबाबत निवाडे	३४१
१६	रशियांत काडीमोड महाग व अवघड ...	३४३
१७	इंग्लंडमध्यें वर्णद्वेषाचें प्रदर्शन	३४३

मॅनेजिंग एजंटाच्या प्राप्तीचा सार्वजनिक संस्थांकडे ओघ

बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि. चे श्री. आगाशे ह्यांच्या कांहीं ठळक देणग्या

(खालील माहिती श्रमपूर्वक मिळवून दिल्याबद्दल आम्ही श्री. न. गं. आपटे ह्यांचे आभारी आहों.)

	रुपये
बृहन्महाराष्ट्र मंडळ, दिल्ली	२०,०००
वैदिक संशोधन मंडळ, पुणें	१०,०००
मराठी ग्रंथसंग्रहालय, पुणें	५,०००
डे. ए. सोसायटीचें गर्लस हायस्कूल	५,०००
हुबळी को. हॉस्पिटल	३,०००
वेदशास्त्रोत्तेजक सभा	३,०००
शब्दकोष मंडळ	२,५००
तळेगांव हॉस्पिटल	१,०००
वैदिक पाठशाळा	१,०००
ब्राह्मण सभा, मुंबई	१,०००
अनाथ महिलाश्रम, पुणें	१,०००
पाली क्रीडामंडळ, पाली	१,०००
जांभ समर्थ मंदिर	१,०००
महाराष्ट्रीय मंडळ, पुणें	१,०००
मराठा चेंबर	१,०००
मिलिटरायझेशन बोर्ड	१,०००
ना. दा. ठाकरसी कन्याशाळा	१,०००

वर्ष १० वें | अर्थ | अंक ४१ वा
बुधवार, ता. १८ आक्टोबर १९४४

★ इंग्लंडचें आंतरराष्ट्रीय देणें–घेणें व हिंदुस्थानच्या स्टर्लिंग शिलका ★

अमेरिकेंत ब्रेटनवुड्स येथें भरलेल्या जागतिक चलन-परिषदेच्या समाप्तीपासून तीमध्यें मान्य झालेल्या ठरावांची चर्चा इंग्लंड, अमेरिका व हिंदुस्थान ह्या देशांत चालली आहे. हिंदुस्थानच्या प्रतिनिधींनी त्या परिषदेंत केलेल्या सर्व सूचना फेटाळल्या गेल्या हें प्रसिद्ध आहे. परिषदेचे निर्णय तिच्या सभासदांवर बंधनकारक होणारे नव्हते आणि तिला उपस्थित असलेल्या प्रतिनिधींनीं आपापल्या सरकारापुढें ते मांडावयाचे होते. इंग्लंड, अमेरिका व रशिया ह्यांच्या सरकारांच्या मतास अनुसरूनच चलन परिषदेचे ठराव झाले असल्यामुळें त्यांचा स्वीकार त्या देशांकडून होण्यास विशेष अडचण भासणार नाहीं. तथापि तेथेंहि ब्रेटनवुड्स परिषदेच्या ठरावांवर टीका होत असून त्यांस थोडाबहुत विरोधहि होत आहे. ब्रिटिश व अमेरिकन कायदेमंडळांपुढें हा विषय त्यांच्या मंत्रिमंडळांस मांडावा लागेल आणि त्यांची संमति मिळवावी लागेल. परिषदेस हिंदुस्थानच्या वतीनें उपस्थित झालेले प्रतिनिधी स्वतःचें प्रतिवृत्त व सूचना मध्यवर्ती सरकारास सादर करतील आणि असेंब्लीचा अभिप्राय त्यास घ्यावा लागेल. जागतिक चलन निधि आणि आंतरराष्ट्रीय बँक ह्या नियोजित व्यवस्थांचा ह्या देशास कांहींच उपयोग त्याच्या इच्छेप्रमाणें होणारा नसल्याकारणानें हिंदुस्थानानें त्या योजनांत सामील होण्याचें प्रयोजन नाहीं असें मत येथें व्यक्त करण्यांत येत आहे. ह्याच्या उलट, असल्या महत्त्वाच्या जागतिक व्यवस्थेपासून हिंदुस्थाननें दूर रहाण्यांत स्वारस्य नाहीं असेंहि प्रतिपादलें जात आहे.

"इंग्लंडचें अग्रेसरत्व कायम राहील"

ब्रिटिश फडनवीस, सर जॉन अँडरसन आणि बँक ऑफ इंग्लंडचे गव्हर्नर, लॉर्ड कॅहो, ह्यांस चलन परिषदेच्या योजना आणि इंग्लंडचा युद्धोत्तर व्यापार व व्यवहार ह्यांचे संबंधांत मत प्रदर्शित करणें आवश्यक झालें आहे. ह्यावरून प्रस्तुत विषयास ब्रेटनिटनच्या दृष्टीनें किती महत्त्व आहे हें दिसून येतें. आपल्या लंडनमधील स्टर्लिंग शिलकांचा वसा हिंदी लोकांस अत्यंत जिव्हाळ्याचा वाटतो, त्याचप्रमाणें ह्या शिलका हिंदुस्थानास परत कशा याबयाच्या ह्या बाबतच्या आपल्या निर्णयाचें समर्थन करण्याचें ब्रिटिश अधिकाऱ्यांस व धंदेवाल्यांस अगत्य भासतें. ह्या हिंदी आणि ब्रिटिश दृष्टिकोनांत तीव्र भिन्नता आहे आणि व्यावहारिक ब्रिटिश बाजूच्या पुरस्कर्त्यांस स्वतःचे मुद्दे युद्धोत्तर काळांतील जागतिक पुनर्रचनेच्या व इंग्लंडच्या स्वास्थ्याचे दृष्टीनें पुढें मांडावे लागत आहेत. मॅन्शन हाऊसमध्यें भाषण करतांना लॉर्ड कॅहो ह्यांनीं युद्धसमाप्तीनंतर इंग्लंडकडे पूर्वीचें औद्योगिक, व्यापारी व सांपत्तिक अग्रेसरत्व राहील काय ह्या कांहीं शंकितांनीं उपस्थित केलेल्या प्रश्नास ठासून होकाराची उत्तर दिलें. पिच्यानुपिच्या चाळत असलेल्या व्यापारी सचोटीच्या परंपरेच्या व अनुभवाच्या योगानें इंग्लंडचें जागतिक पुढारीपणाचें स्थान अढळ राहील असें त्यांनीं सांगितलें. युद्धाप्रीत्यर्थ इंग्लंडनें स्वतःचें संपत्तिसर्वस्व वेचलें आहे आणि ह्यामुळें त्या देशास बाहेरच्या जमाचें मोठें कर्ज देणें झालें आहे. त्याचा अर्थ इतकाच आहे कीं ह्यापुढें इंग्लंडला आपला निर्यात व्यापार इतका वाढवावा लागेल कीं, त्यांत इतर देशांचें झालेलें युद्धकालांतलें देणें देऊन टाकण्यास पुरेशी कूस रहावी. इंग्लंडच्या हिंदुस्थानसारख्या धनकोनीं ब्रिटिश माल मोठ्या प्रमाणांत खरेदी करून त्या देशास कर्जफेड करण्यास सहाय्य केलें पाहिजे आणि असा सहकार होईल तर कांहीं वर्षांच्या अवधींत क्रमाक्रमानें व सोयीसोयीनें हिंदुस्थानास आपल्या स्टर्लिंग शिलकांचा पैसा परत मिळूं शकेल असें लॉर्ड कॅहो ह्यांनीं स्पष्टपणानें सांगितलें.

हिंदुस्थानची न्याय्य मागणी

सर जॉन अँडरसन ह्यांच्या भाषणांत वरील सारख्याच आत्मविश्वासाचा सूर होता आणि बाहेरच्या देण्याच्या फेडीविषयींच्या मार्गाचा सरळ अनुवाद होता. धनको देशांनीं दम धरला पाहिजे आणि युद्धाचे कामीं इंग्लंडनें केलेली स्वार्थत्यागपूर्ण कामगिरी हिशेबांत घेणें आवश्यक आहे असें त्यांनीं सांगितलें. युद्धपरिस्थितींत झालेलें देणें व्यापारी देण्यासारखें मानलें जातां कामा नये आणि त्याच्या फेडीचे बाबतींत परस्परविश्वास आणि सहकार्य हीं आवश्यक आहेत असें ते म्हणाले. येथें हिंदुस्थाननें केलेला स्वार्थत्याग आणि त्याच्या तीव्र आर्थिक गरजा यांचा त्यांनीं विचार व उल्लेख केला असता तर बरें झालें असतें. हिंदुस्थानची सर्वच शिल्लक एकदम फेडून टाका अशी ह्या देशाच्या लोकांची मागणी नाहीं. ब्रिटिश जनतेच्या राहणीचा दर्जा युद्धापूर्वीच्या काळाइतका राहून तिनें माठ मोठ्या प्रमाणावर धनवून तो परदेशांस विकावा आणि त्या मार्गानें इंग्लंडचें बाहेरचें देणें फेडण्यास मदत करावी असें सर जॉन व लॉर्ड कॅहो म्हणतात. हाच न्याय त्यांनीं हिंदुस्थानास लावावयास नको काय? हिंदुस्थानांतलें संपत्तीचें उत्पादन वाढावें आणि येथील लोकांची राहणी सुधारावी ह्यासाठी लागणारी यंत्रसामुग्री व इतर माल ह्यांचा पुरवठा ह्या देशास त्याच्या परदेशांकडून परत यावयाच्या पैशांतून व्हावयास इंग्लंडनें सहाय्य देणें आवश्यक नाहीं काय? हिंदी लोकांची ही मागणी योग्य व न्याय्य नाहीं काय! हिंदुस्थानचें दारिद्र्य जगजाहीर असून आर्थिक पुनर्रचनेचें ह्या देशाचें अगत्य सर्वमान्य आहे. ह्या वस्तुस्थितीवर तातडीचा उपाय म्हणून स्टर्लिंग शिलकांच्या फेडीची विशिष्ट व मर्यादित स्वरूपाची मागणी केली जात आहे. तिचा विपर्यास न होतां ती पुरी होण्याचा मार्ग इंग्लंडनें शोधून काढणें आवश्यक आणि उचित आहे.

आमच्या सर्व हितचिंतकांस नवें वर्ष सुखाचें जावो.

स्फुट विचार

सर चिंतामणराव देशमुख ह्यांचा सल्ला

बँक ऑफ इंग्लंडचे गव्हर्नर लॉर्ड केंट्टो, ह्यांच्या युद्धोत्तर ब्रिटिश निर्गत व्यापाराविषयींच्या आत्मविश्वासमूलक अभिप्रायाचा उल्लेख आजच्या अग्रलेखांत आम्ही केला आहे. हिंदुस्थानच्या स्टर्लिंग शिलकांची फेड इंग्लंड स्वतःच्या सोयीप्रमाणें व सवडीस अनुसरून करूं शकेल आणि ती लवकर किंवा हिंदी धंदेवाल्यांच्या मागणीप्रमाणें होण्याची कोणीहि अपेक्षा करूं नये असें त्यांनीं बजावलें. हा प्रश्न बेटनवुड्स येथील जागतिक चलन परिषदेंत हिंदुस्थानच्या वतीनें उपस्थित केला गेला तेव्हां त्याचा निकाल इंग्लंड व हा देश ह्यांनीं परस्पर विचारानें सोडवावा आणि त्यासंबंधांत नियोजित जागतिक चलननिधीच्या मार्फत कोणतीहि तजवीज करतां येणें शक्य नाहीं असें सरळ सांगण्यांत आलें. हिंदी रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर, सर चिंतामण देशमुख, ह्यांनीं मुंबईस रोटरी क्लबांत भाषण करतांना ह्या विषयाचा हिंदुस्थानास प्रतिकूल असा निकाल कां लागला ह्याचीं कारणें सांगून आपल्या देशबांधवांस असा सल्ला दिला कीं त्यांनीं चलन परिषदेनें मान्य केलेल्या योजना फेटाळण्याची घाई करूं नये. अमेरिका व इंग्लंड ह्या देशांत त्यांचेवर वादविवाद चालू आहे, त्याचें काय होतें तें प्रथम पहावें आणि मध्यंतरीं ब्रिटिश माल जेव्हां येऊं शकेल तेव्हां तो स्वीकारण्याची आपण तयारी ठेवावी असें त्यांनीं सुचवलें. म्हणजे पर्यायानें त्यांनीं ब्रिटिश फंडनवीस आणि लॉर्ड केंट्टो ह्यांच्या विचारसरणीस दुजोरा दिला असें झालें. हिंदुस्थानचा पैसा लंडनमध्यें स्टर्लिंगच्या स्वरूपांत अडकून पडला आहे आणि तो इंग्लंडच्या सवडीप्रमाणेंच वसूल केल्यावांचून गत्यंतर नाहीं अशी असाहयतेची स्थिति असल्याचें त्यांनीं ध्वनित केलें. आपल्या शिलकांचे पैसे आपणांस परत मिळणार ह्यांत शंका नाहीं, पण त्या बाबतींत आपण दमादमानें घेतलें पाहिजे असा त्यांच्या सांगण्याचा आशय होता. पण ह्या प्रकारच्या अनिश्चितपणाच्या स्थितींत हिंदी धंदेवाल्यांनीं व व्यापाऱ्यांनीं आपणांस कोणता माल हवा आणि तो कोणत्या हुंडणावळीच्या दरानें घेणें परवडेल हें कसें ठरवावयाचें व त्याविषयींची तयारी कशी ठेवावयाची ह्याचा खुलासा सर चिंतामण ह्यांनीं केला नाहीं. ह्या कारणानें व्यावहारिक दृष्टीनें पाहातां त्यांचा सल्ला फारसा उपयोगी पडण्यासारखा नाहीं.

हिंदी व्यापारी मंडळाच्या मागण्या

रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरांचे वरील सल्ल्यानें हिंदी व्यापारी वर्गाचें समाधान होणें शक्य नाहीं. दि फेडरेशन ऑफ इंडिअन चेंबर्स ऑफ कॉमर्सच्या कार्यकारी मंडळानें हिंदुस्थान सरकारास प्रस्तुत बाबीचे संबंधांत पाठवलेल्या पत्रावरून हें उघड होतें. स्टर्लिंग शिलकांच्या प्रश्नाची चर्चा हिंदी सरकारनें ब्रिटिश सरकारशीं त्वरित करावी अशी फेडरेशनची मागणी आहे. लंडनमधील स्टर्लिंगच्या मोबदल्यांत डॉलर हुंड्या बँक ऑफ इंग्लंडकडून मिळावयाच्या नाहींत आणि हिंदी शिलका लंडनमध्यें व्यर्थ पडून रहातील अशी भीति आपणांस वाटत असल्याचें ह्या हिंदी व्यापारी मंडळानें सरकारला कळवलें आहे. हिंदुस्थानच्या आर्थिक हितसंबंधाचें योग्य रक्षण होईल अशा रीतीनें स्टर्लिंगच्या प्रश्नाचा निकाल इंग्लंडनें लावला नाहीं, तर ह्या देशानें चलन परिषदेच्या जागतिक गंगाजळी आणि बँक ह्याविषयींच्या मोठ्या योजनांत सामील होणें ह्या देशास कठिण होईल असें त्यानें बजावलें आहे. फेडरेशननें सरकारास दुसरें एक पत्र लिहून त्यांत असें सुचवलें आहे कीं त्यानें चलन परिषदेचें इतिवृत्त आणि तिच्या हिंदी प्रतिनिधींचा अभिप्राय हीं प्रसिद्ध करावीं आणि व्यापारी वर्गास त्यावरील स्वतःचें मत प्रकट करण्याची संधी देऊन नंतर हें सर्व प्रकरण मध्यवर्ती असेंब्लीपुढें मांडावें. अमेरिकेकडे डॉलर्समध्यें हिंदुस्थानचें येणें झालें आहे त्याची रकम किती आहे आणि ती एका स्वतंत्र साम्राज्य गंगाजळींत सामील करण्यांत आली असल्यास ह्या डॉलर्सपैकी ह्या देशाच्या खात्यास किती वाटा आला आहे किंवा येईल ह्याची माहिती सरकारनें पुरवावी अशीहि मंडळाची मागणी आहे. साम्राज्य गंगाजळींतल्या डॉलर्समधला हिंदुस्थानचा हिस्सा सप्रमाण बाहेर काढण्यांत येऊन ह्यापुढें डॉलर्समधलें ह्या देशाचें येणें निघेल तें निराळें बाजूस काढून ठेवलें जावें असेंहि त्यानें म्हटलें आहे. लंडनमधील हिंदी मालकीच्या स्टर्लिंगचे डॉलर्स करून मिळूं शकत नाहींत तर निदान अमेरिकेकडून यावयाचे डॉलर्स तरी ह्या देशास वापरतां येतील ह्या बेतानें एका स्वतंत्र खात्यांत ठेवले जावे ही सूचना ब्रिटिश सरकाराकडून मान्य करून घेतली जाणें अगत्याचें आहे. हिंदी शिलकांची व्यवस्था केवळ आपल्या स्वतःच्या सवडीप्रमाणें आपण करूं आणि हिंदुस्थानच्या गरजा व अडचणी ह्यांचा विचार होणार नाहीं असें इंग्लंडनें म्हणून चालणार नाहीं.

कृत्रिम व नैसर्गिक रबर: युद्धोत्तर परिस्थिति

कृत्रिम रबराचें उत्पादन कितीहि वाढलें तरी नैसर्गिक रबराशीं तें स्पर्धा करूं शकणार नाहीं, अशी कित्येकांची अपेक्षा आहे. परंतु, कृत्रिम रबराचें उत्पादन युद्धानंतर कमालीचें वाढेल व त्याची किंमतहि स्वाभीं येईल हें उघड आहे. एकटी अमेरिका दरसाल १०,७५,००० टन कृत्रिम रबर तयार करूं शकेल. कृत्रिम रबराच्या घावांचे उत्पादनासाठी लागणाऱ्या यंत्रसामुग्रींत अमेरिकेनें ७½ कोटि पौंड गुंतविलेले आहेत. चालू युद्धापूर्वी कृत्रिम रबराचा उत्पादन खर्च दर पौंडी ७० सेंट होता, आतां तो ४० ते ५० सेंटवर आला आहे. युद्धानंतर, उत्पादनखर्च १२ ते १५ सेंट इतकाच येईल. गुडयिअर कंपनीचे सुमात्रा, फिलिपाइन्स व कोस्टारिका येथें स्वतःचे रबराचे मळे आहेत. फायरस्टोन कंपनीचे मळे लैबेरियांत आहेत. मळ्यांतील रबराच्या उत्पादनाचा खर्च ह्यापुढें ज्यास्त येईल व कृत्रिम रबराच्या उत्पादन खर्चाशीं तो बरोबरी करील, असें ह्या कंपन्यांचे चालक म्हणतात. लष्करी मागणी संपल्यावर अमेरिकेची मामुली मागणी पुरी करण्यास दरसाल ११,१०,००० टन रबर लागेल व बाकीच्या सर्व जगास ५,००,००० टन रबर पुरेल. म्हणजे, वार्षिक जागतिक मागणीचा हिशेब सुमारें १६,००,००० टन झाला. अमेरिका दरसाल १०,७५,००० टन कृत्रिम रबर पुरवूं शकेल. मळ्यांतील रबर मुबलक प्रमाणांत मिळूं लागेपर्यंत रबराची मागणी पुरी पडणें अवघड जाईल व रबराचे धंद्यांत अमेरिका अग्रेसर राहील, हें उघड आहे.

पुणें शहराची ऐतिहासिक कालांतील वाढ

[१९३७–३८ सालीं गोखले अर्थशास्त्र संशोधन मंदिरानें पुणें शहराची आर्थिक व सामाजिक पाहणी केली होती. तिचा अहवाल आतां तयार झाला असून तो Poona: A Socio-Economic Survey या नांवानें लवकरच प्रसिद्धही होईल. या अहवालांतील पहिल्या प्रकरणांत पुणें शहराचा उपलब्ध इतिहास व शहराची क्रमशः झालेली वाढ यावद्दल विवेचन केलेलें आहे. त्या प्रकरणांतील एका भागाचा त्रुटित गोषवारा या लेखाचे द्वारें प्रथमतःच प्रकाशित होत आहे.]

पुणें शहर कां व कसें अस्तित्वांत आलें व त्याचा क्रमशः विकास कसा झाला हें ठरविण्याच्या मार्गांत पुष्कळच अडचणी उद्भवतात. अशा प्रकारच्या संपूर्ण विवेचनासाठी लागणारा पूर्वीच्या अवशेषासारखा प्रत्यक्ष पुरावा व शहरासंबंधीं कागदोपत्रीं असणारा लेखी पुरावा भरपूर प्रमाणांत उपलब्ध नाहीं. ४–५ वेळां पुणें शहराची नासधूस व जाळपोळ ऐतिहासिक काळांत झाली असल्यानें पूर्वीचे अवशेष हल्ली कितपत शिल्लक असतील यासंबंधीं शंकाच आहे. कागदोपत्रीं असणारा पुरावा ठिकठिकाणीं विखुरलेला, विसंगत व पुष्कळ वेळां अविश्वासार्ह असा आढळून येतो. पुराव्याचे हे सर्व दोष लक्ष्यांत बाळगूनच या कार्यास आम्हीं हात घातला व उपलब्ध असलेला पुष्कळसा पुरावा एकत्र करून व त्याची बारकाईनें छाननी करून त्याआधारें पुणें शहराच्या विकासाचा आराखडा आम्हीं तयार केला आहे. हाच सर्वस्वीं बरोबर आहे असा आमचा आग्रह नाहीं. माहितीच्या वगैरे चुका त्यांत असण्याचा संभव आहे. फक्त त्या राहूं नयेत यासाठी आम्हीं आमच्याकडून शक्य तेवढे प्रयत्न केले आहेत, येवढेंच येथें आम्हांस नमूद करणें आवश्यक वाटतें.

शहराचें मूळ केंद्र

पुणें शहराच्या परंपरागत इतिहासाप्रमाणें कसबें पुणें म्हणजे 'पुणेंवाढी,' 'कासारी' व 'कुंभारी' हीं तीन लहान गांवें मिळून झालेली वाढी होती. या कसब्याच्या पूर्वेस 'मुंजेरी' व 'माळी' अशीं दोन गांवें होतीं. तीं गांव वाढूं लागल्यावर त्यांतच सामावलीं गेलीं "(पुणें कुंभारी कासारी तीन गांव मोडून येक गांव केला. " पुरंदरे दप्तर भाग ३, पृ. १२९). परंतु पुणें शहराच्या विकासाचा हा इतिहास प्रमाण मानतां येत नाहीं. हा इतिहास मान्य केल्यास साधारणपणें १ चौरस मैलाच्या क्षेत्रांत ५ गांवें अगर वाड्या पूर्वी वसलेल्या होत्या असें मानणें प्राप्त होतें. महाराष्ट्रांतील वाड्या व गांवें यांच्या वसाहतींचा इतिहास व क्रम लक्ष्यांत आणिल्यास ही गोष्ट जवळजवळ अशक्य अगर असंभवनीय कोटींतील ठरते. शिवाय वर जी गांवांची म्हणून नांवें दिलीं आहेत तीं गावांपेक्षा जमिनींच्या प्रकारांचीं नांवें असण्याचाच अधिक संभव दिसतो. माळी व मुंजेरी हे शब्द मराठी कागदपत्रांतून पुण्यासेरीज इतर शेकडों गांवासंबंधी वारंवार आलेले आहेत. कासारी म्हणजे प्रत न लावलेली जमीन असा अर्थ अगदी सरळ आहे. कुंभार वस्तीची अगर त्यांना सोईस्कर अशी जमीन ती कुंभारी असें ओघानेंच येतें व तें जास्त सयुक्तिकहि वाटतें. (पहा: शिवचरित्र साहित्य, खंड ७, प्रस्तावना पृ. ११.)

उपलब्ध पुराव्याची छाननी करतां असें दिसतें कीं सध्याच्या कसबा पेठेच्या दक्षिण भागांत नदीपासून थोड्या अंतरावर असलेल्या उंचवट्यावर पुणें हें एक लहानसें गांव वसलेलें होतें. हा भाग म्हणजेच पुणें शहराचें मूळ केंद्र होय. गणपति व केदारेश्वर यांचीं देवळें याच भागांत आहेत. त्याचप्रमाणें पुण्याचे जुने बत्तीस नदार आठघरे ब्राह्मण यांचींही घरें तेथेंच आहेत. प्रसिद्ध कसबा गणपतीचें देवालय शहरांत सर्वांत जुनें असून पूर्वीच्या पद्धतीप्रमाणें तें बहुधा शहराच्या प्रवेशमार्गाजवळ असावें. (डेक्कन कॉलेज रिसर्च इन्स्टिट्यूटचे डॉ. सांकलीया यांनीं पूर्वीच्या शहररचनेसंबंधीं पाहणी करण्यांस आम्हांस मदत केली व माहितीही पुरविली याबद्दल गोखले अर्थशास्त्र संशोधन मंदिराचे चालक त्यांचे ऋणी आहेत.) केदारेश्वर हा देवही पुष्कळ जुना असावा असें कागदपत्रावरून दिसतें. (पहा: शिवचरित्र साहित्य खंड, पृ. ६४–६८) पुणें शहराच्या वेशीपैकीं एकीस केदार वेस म्हणत, यावरून केदारेश्वराचें महत्त्व दिसून येईल. शहराच्या संरक्षक देवतांपैकीं केदारेश्वर असावा असें दिसतें.

पुण्याचें स्थानमहात्म्य

या पुढचा प्रश्न म्हणजे पुणें गांव वसण्याचीं कारणें कोणतीं ? दक्षिणेंतील पूर्वीच्या कोणत्याहि महत्त्वाच्या व्यापारी मार्गावर हें गांव पडत नाहीं. पुण्याच्या लगतच्या पश्चिम बाजूस कोंकणांत उतरण्यास सोइस्कर असा घाटही आढळत नाहीं. पूर्वेस सर्व देश मैदानवजाच आहे व त्यांतून जाणारे अगर निघणारे ऐतिहासिक काळांतील मोठे मोठे मार्ग पुण्यापासून बऱ्याच अंतरावर होते हें स्पष्ट दिसतें. पुण्याजवळ मुठा नदीला असलेला महत्त्वाचा उतार (सध्याच्या दगडी पुलाजवळचा) व तेथून लगतच्या पश्चिमेकडील मावळ भागांत जाण्याच्या रस्त्यावरील नाकें हेंच खरोखरी पुण्याचें स्थानमहात्म्य. वर उल्लेखिलेल्या दोन गोष्टींमुळें पुण्यास लष्करी महत्त्व प्राप्त झालेलें दिसून येतें व त्यास ऐतिहासिक कागदपत्रांचाही आधार मिळतो. १३ व्या शतकांत बऱ्या आरबानें पुण्याभोंवतीं कोट बांधला. पुणें हें लष्करी ठाणें झालें. कोटांत फक्त सैन्यासच राहण्यास परवानगी होती. उदीम व्यापारी हे कोटाबाहेर राहात असत. (पहा : " कोट पांढरीचा नवीन बांधला कोटाचे भोंवतीं वस्ती दर्गे व मोहतर्फा देशमूख व देशपांडे व स्थायी उपरी अदमी ऋग्वेदी ब्राह्मणाची घरे धर्माधिकारी यांची होतीं. गोलक सेटे व महाजन व्यवहारे यांची घरें होतीं. " पुरंदरे दप्तर, भाग ३, पृ. १२८) मध्ययुगीन युरोपमधील शहरांच्या विकासक्रमाशीं याचें थोडेबहुत साधर्म्य येथें पुष्कळ वाचकांस जाणवेल. पुणें शहराच्या विकासाचा पहिला टप्पा येथें संपतो.

१६३७ मध्यें उजाड आणि वैराण झालेलें पुणें जेव्हां शहाजीच्या ताब्यांत आलें तेथपासून दुसरा टप्पा सुरू होतो. त्यावेळीं पुणें शहराच्या ४ पेठा होत्या. नागझरी व मुठा यांच्या कोनांत असलेली कसबा पेठ; मूर्तझा निजामशहानें वसविलेली नदीकांठची मुर्तझाबाद अथवा शनिवार पेठ (सन १६१० मध्यें या पेठेचा उल्लेख सांपडतो. पहा : शिवचरित्र साहित्य, पृ. ११३;) मलिक अंबरानें वसविलेली मलकापूर अथवा रविवार पेठ (पहा: पेशवे दप्तर, खंड २१, पृ. ४८७६) आणि नागझरीच्या कांठीं असलेली शहापूर उर्फ सोमवार पेठ. (१६१० मध्यें या पेठेचा उल्लेख

सांपडतो. पहा : शिवचरित्र साहित्य, खं. ९२, पृ. ११३. त्यावरून ही पेठ शहाजीनें वसविली अशी घडफळे यादींतील माहिती चुकीची ठरते.) १६६३ मध्यें जेव्हां शास्ताखानानें पुणें घेऊन तेथें वस्ती केली तेव्हां त्यानें सोमवार पेठेच्या पश्चिमेस नागझरीच्या पूर्वतीरावर आस्तापुरा उर्फ मंगळवार पेठ वसविली. या काळापूर्वी सुद्धां तेथें अस्तित्व वस्ती असावी असें दिसतें. शास्ताखानानें आपलें नांव त्या वस्तीस देऊन त्याची पेठ केली असावी एवढेंच. शिवाजीच्या वेळीं या पांच पेठांतच पुणें शहर सामावलें जात असें. यानंतर १७०३ मध्यें पुण्यास औरंगजेबाचा तळ पडला होता. त्यावेळीं त्यानें कौल देऊन नवीन पेठ वसविली. ती म्हणजे मोहियाबाद अथवा बुधवार. (पहा : पेशवे दप्तर, खंड ३१, पृ. ४९२९).

राजधानींत रूपांतर

पुणें शहराच्या वाढीचा तिसरा टप्पा त्याचें राजधानींत रूपांतर झाल्यावर अथवा तें होण्याच्या मार्गावर असतांना म्हणजे पहिल्या बाजीरावाच्या कारकीर्दींत होतो. १७२१ मध्यें बाजीरावानें बापूजी श्रीपत चित्राव यास पुण्याचा सुभेदार नेमलें व पुणें शहराची वाढ करण्याचें काम त्याच्यावर सोपविलें. १७३० मध्यें शनिवार वाडा बांधण्यांत आला. १७२८ मध्यें नदी कांठचें किल्ले हिसार हें ठाणें मोडून तेथें मुत्सद्दी लोकांस घरें बांधण्यास जागा दिली गेली. १७३४ मध्यें बाजीरावानें बुधवारच्या दक्षिणेस विसापूर उर्फ शुक्रवार ही पेठ वसवली. (पेशवे दप्तर, खंड ३०, पृ. ४८०३) बाळाजी बाजीरावानें ४ नवीन पेठा वसविल्या. १७५० मध्यें शुक्रवारच्या पूर्वेस व रविवारचे दक्षिणेस वेताळ पेठ वसविण्यासाठी कौल देण्यांत आला. (वाड रोजनिशी, खंड ३, पृ. २१४) १७५५ त गणेश (पेशवे दप्तर, जमाव रुमाल १७२, अप्रसिद्ध) व निहाल या दोन पेठा वसविण्यात आल्या. नारायण पेठ याच सुमारास वसविण्यांत आली. (पेशवे दप्तर, जमाव रुमाल १७४, अप्रसिद्ध) ही पेठ शनिवार पेठेचाच एक भाग अलग काढून केलेली असावी असें वाटतें.

बाळाजी बाजीरावाच्या कारकीर्दींत पर्वतीचें देवालय, पर्वतीचें तळें, कात्रजचा नळ, अंबिल ओढ्याचें परावर्तन, लकडीपूल वगैरे पुष्कळच शहराला उठाव देणारीं कामें झालीं. त्याच्या मनांतून शहराभोवतीं नवीन कोट बांधावा असें होतें व त्याप्रमाणें काम चालीसहि लागलें होतें. त्याचे अवशेष अजूनहि पहावयास मिळतात. परंतु कांहीं कारणानें हें काम अपुरेंच सोडण्यांत आलें. यापूर्वीही शहरास कोट असावा असें वाटतें. १६३० मध्यें मुरार जगदेवानें जुना कोट पाडून टाकला होता. त्यानंतर केव्हांतरी हा कोट अस्तित्वांत आला असावा, असें दिसतें (पहा : " पुण्याच्या कोटाच्या व शाहार दरवाजियाच्या किल्या रा. हरिपंत यांजवळ आहेत " असें बापूजी श्रीपत १७२९ मध्यें बाजीरावास लिहितो. पेशवे दप्तर, खंड ३०, पृ. ४४९६–९७.) परंतु तत्संबंधीं अधिक माहिती मिळत नाहीं. बाळाजीचे कारकीर्दींत (१७४६ मध्यें) मंगळवार पेठेबाबत पुढील उल्लेख आढळतो. " थल आस्तापूर पेठ होती ते खराब पडली ते जमीन माली याचे दुमाले करून " इ. (पेशवे दप्तर, जमाव रुमाल नं. १७८, अप्रसिद्ध) परंतु १७६५–६६ मध्यें ही पेठ पुन्हां अस्तित्वांत असावी असें पेशवे रोजनिशींतील उल्लेखांवरून वाटतें. (वाड रोजनिशी, खंड ७, पृ. ३६९). थोरल्या माधवरावाच्या कारकीर्दींत भवानी व सदाशिव या दोन पेठा वसविल्या गेल्या. सदाशिव पेठ १७६९ मध्यें वसविली गेली (पेशवे दप्तर, जमाव रुमाल नं. १७४, अप्रसिद्ध) व भवानी पेठेला १७३७ मध्यें कौल दिल्याचा उल्लेख आहे (वाड रोजनिशी, खंड ७, पृ. ३७९) पेशवे दप्तरांतील १७६८ च्या कागदांतून मुझफरगंज पेठ असाही उल्लेख आढळतो. परंतु त्यासंबंधीं जास्त माहिती मिळत नाहीं.

वैभवाचा कळस

सवाई माधवरावाच्या राज्यारोहणापासून पुण्याच्या वाढीचा चवथा टप्पा सुरू होतो. या काळांत पुण्याच्या वैभवाचा कळस झाला. सवाई माधवरावाच्या कारकीर्दींत रास्ता, नाना व घोरपडे या तीन नवीन पेठा वसविल्या गेल्या. १७९१ मध्यें घोरपडे पेठ वसविल्याचा उल्लेख सांपडतो. (पेशवे दप्तर, खंड ३१, पृ. ४९९५) रास्ता उर्फ शिवपुरी पेठ १७८३ मध्यें वसविण्यांत आली. (पेशवे दप्तर, जमाव रुमाल नं. १७६, अप्रसिद्ध). १७८९ मध्यें नाना उर्फ हनुमंत पेठेस कौल देण्यांस आला. (वाड रोजनिशी, खंड ७, पृ. ३५७.) सवाई माधवरावानें १७८५ मध्यें नवपुरा नांवाच्या नवीन पेठेस कौल दिला असें त्याच्या रोजनिशींत नमूद आहे. (वाड रोजनिशी, खंड ८, पृ. ३५४) ही पेठ भवानी पेठेच्या पूर्वभागीं होती असें कौलनाम्यांतील उल्लेखावरून दिसतें. परंतु पुढें या पेठेचा कांहींच ठावठिकाणा कागदपत्रांतून सांपडत नाहीं.

१७८२ मध्यें पुणें शहरांतील सांडपाण्याच्या निचऱ्यासाठी जमिनीखालून पक्क्या मोऱ्या (ड्रेनेज) बांधण्यांत आल्या. १७७८ त रास्ते यांनीं कोंढव्याहून नळ बांधून शहरांत पाणी आणलें. १७९० मध्यें नाना फडणीस यांनीं व नंतर रुपराम चौधरी यांनीं सदरहूप्रमाणेंच नळ बांधून पाणी शहरांत आणण्याची व्यवस्था केली. रावबाजीच्या कारकीर्दींत नवीन पेठांची वसाहत झालेली दिसत नाहीं. १८०४ मध्यें नरसीपुरा नामक पेठेस कौल दिल्याचा उल्लेख त्याच्या रोजनिशींत आहे (वाड रोजनिशी, खंड ४, पृ. २८०) व पुढें १८१० मध्येंही या पेठेचा उल्लेख आढळतो (कित्ता. पृ. २९७.) परंतु पुढच्या काळांत त्यासंबंधीं कांहीं माहिती मिळत नाहीं. सदाशिव पेठेतील नरसोबाच्या देवळाच्या आसपास ही पेठ असावी व पुढें ती सदाशिव पेठेंतच सामील केली गेली असावी असें वाटतें. रावबाजीनें पुणें शहरांत पांच सहा सरकारी वाडे बांधले. पुणें शहर सुधारण्याचें व त्यास शोभा आणण्याचें त्याच्या मनांत फार होतें असें इंग्रजांचा पुण्याचा वकील क्लोज यानें नमूद करून ठेविलें आहे. तो लिहितो,

" His Highness continued to be very talkative and spoke to me of his plans for the improvement of Poona by planting trees, erecting Choultries, building garden houses, etc. His Highness expressed a great desire to build a house in the English style. " (Poona Residency Correspondence, Vol. VII, Letter No. 1784, Dated 27-6-1805).

यानंतर पुणें शहरास लष्कर हा भाग १८१८ मध्यें नवीन जोडण्यांत आला. १८०३ मध्यें वेलस्लीनें जेव्हां पुणें घेतलें तेव्हां त्यानें ब्रिटिश लष्करासाठी सोईची म्हणून गारपीराजवळची जागा निवडली व खडकीच्या लढाईपर्यंत ब्रिटिश फौजा तेथेंच रहात असत. यानंतर १९ व्या शतकाच्या अखेरपर्यंत पुणें शहराची महत्त्वाची अशी वाढ झालेली आढळत नाहीं. त्यानंतरचा इतिहास बहुतेकांच्या परिचयाचा आहेच.

हिंदुस्थानांतील ग्रंथालयांची युद्धोत्तर पुनर्घटना

आतांपर्यंत आपल्या देशांत ग्रंथालयांची अत्यंत आबाळ झालेली असल्यामुळें ग्रंथालयांच्या पुनर्घटनेच्या ऐवजी त्यांची पाश्चिमात्य देशांच्या तोडीची संघटना करण्याचें कार्य आपण प्रथम हातीं घेतलें पाहिजे. अखिल जगांत सध्या ज्या विलक्षण व कल्पनातीत उलाढाली चालू आहेत त्यांना सतत चालना देण्याचें काम छापखान्यांतून हरघडी बाहेर पडत असलेलें वाङ्मय करीत आहे. सर्व जगांत प्रथम श्रेणींत असलेल्या मॉस्को येथील सोव्हिएट यूनियनच्या ग्रंथालयांतील ग्रंथांची संख्या सध्या शहाण्णव लक्ष (९६,००,०००) आहे हें विधान आमच्या देशांतील वाचकांना निखालस खोटें आहे असें वाटण्याजोगी आमच्या देशांतील ग्रंथालयांची अगदी शोचनीय स्थिति आहे. युनायटेड स्टेट्सच्या कॉंग्रेस लायब्ररींत प्रतिवर्षी दोन लाखांवर ग्रंथांची भर पडते हें विधान सुद्धां असेंच आम्हांस आश्चर्यचकित करणारें आहे. आमच्या देशांतील सर्वांत मोठें ग्रंथालय म्हणजे कलकत्त्याची इंपीरियल लायब्ररी. त्या ग्रंथालयाची एकंदर ग्रंथसंख्या सध्या जवळ जवळ चार लाखांपर्यंत (४,००,०००) पोहोंचली आहे. लाख-दोन लाख ग्रंथ असलेलीं ग्रंथालयें आपल्या देशांत अगदी बोटावर मोजण्याजोगीं आहेत व तीं सुद्धा जेमतेम कशींतरी चालू आहेत. ह्या बाबतींत एकंदर समाज व सरकार हीं अगदीं झोपीं गेलेलीं आहेत, असें म्हटल्याशिवाय राहवत नाहीं. एखादा ॲन्ड्रयू कार्नेजी आमच्या देशांत केव्हां जन्माला येईल कोण जाणें! पण सर्व पुनर्घटनेचा पाया जें "ज्ञान व शीलसंवर्धन" तें नीट होत नसेल तर इतर सर्व पुनर्घटना फोल आहे. सार्जंट कमिटीच्या अहवालाप्रमाणें शिक्षणाची पुनर्घटना परिणामकारक करण्यास व बीव्हरीज योजनेप्रमाणें समाजाला चिर-स्वास्थ्य मिळवून देण्यास ग्रंथालयांचा प्रश्न प्रथम हातीं घेतला पाहिजे. ह्या महत्वाच्या प्रश्नाचा उहापोह मद्रास विश्वविद्यालयाचे विख्यात ग्रंथपाल रावसाहेब रंगनाथन, एम्. ए., एल. टी., एफ. एल. ए. ह्यांनीं आपल्या ताज्या ३६ पानी पुस्तिकेंत* उत्तम प्रकारें केलेला आहे. त्यांच्या कल्पनेप्रमाणें, ग्रंथालयांच्या प्रसाराकरितां प्रतिवर्षी एकंदर १४ कोटि रुपये खर्च करावे लागतील. हा आकडा ठरवितांना त्यांनीं १० वर्षांवरील हिंदुस्थानांतील लोकसंख्या अदमासें २८ कोटि धरली आहे व प्रत्येक माणसाकरितां प्रतिवर्षी आठ आणे प्रमाणें ग्रंथालयांप्रीत्यर्थ खर्च धरला आहे. त्यांच्या मतें हिंदुस्थानांत जेव्हां एकंदर ग्रंथसंख्या २८ कोटि होईल, म्हणजे प्रत्येक १० वर्षांवरील मनुष्यागणिक एक पुस्तक या प्रमाणांत ग्रंथसंख्या असेल, तेव्हांच ग्रंथालयांचा प्रसार चांगला झाला असें म्हणतां येईल. त्यांनीं ग्रंथांच्या संख्येचे व ग्रंथलयांकरितां होणाऱ्या खर्चाचे तुलनात्मक आकडे पुढीलप्रमाणें दिलेले आहेत. ते वाचकांना उद्बोधक व मनोरंजक वाटतील अशी आशा आहे.

ह्या थोड्याशा माहितीमुळें ह्या महत्त्वाच्या विषयाकडे सुज्ञ वाचकांचें लक्ष वेधलें जाईल व त्याबद्दल विचारविनिमयाला चालना मिळेल अशी खात्री वाटते.

*"Post-War Reconstruction of Libraries in India" (Published by the Punjab Library Association, Forman Christian College, Lahore, Price Re. 1.)

ग्रंथालयांतील पुस्तकें व त्यांवरील खर्च

प्रत्येक मनुष्यागणिक ग्रंथालयांवरील वार्षिक खर्च

इंग्लंड	१ रुपया
अमेरिका	२ रुपये
बडोदें	१ आणा
हिंदुस्थान	१ पै चा कितवा हिस्सा असावा बरें?

ग्रंथांची संख्या

इंग्लंड	२,८०,००,०००
अमेरिका	६,८०,००,०००
बडोदें	१९,००,०००
मद्रास	१०,००,०००
हिंदुस्थान	?

दरमाणशी ग्रंथांची संख्या

नॉर्वे	३
स्वीडन	१½
इंग्लंड	½
अमेरिका	½
बडोदें	१½
हिंदुस्थान	$\frac{1}{10}$ पेक्षा कमी

दि न्यू सिटिझन बँक ऑफ इंडिया लि.

वरील बँकेची, महाराष्ट्रीय डायरेक्टरांचे नेतृत्वाखालीं श्री. डी. डी. देशपांडे ह्यांनीं १९३७ सालीं स्थापना केली, तेव्हां तिचा विस्तार एवढ्या अल्पावधींत, इतका मोठा होईल, अशी कल्पना नव्हती. सहा वर्षांत तिचें खेळतें भांडवल १½ कोटि रुपयांवर गेलें आहे व रोख वसूल भांडवल आणि रिझर्व्हज ह्यांचा आकडा ८ लक्ष, १० हजार रुपयांहून अधिक झाला आहे. बँकेच्या खातेदारांची संख्या १०,००० झाली आहे आणि ३० शाखांचे मार्फत बँक महाराष्ट्रभर व्यवहार करीत आहे. अकोला, चांदा, बेलापूर रोड, कोपरगांव, इत्यादि ठिकाणीं तिच्या शाखा लवकरच निघणार आहेत. गेल्या वर्षी बँकेस १ लक्ष, २२½ हजार रुपये निवळ नफा झाला. प्रेफरन्स भागीदारांना प्रारंभापासून आजतागायत ५% डिव्हिडंड मिळालें आहे. ऑर्डिनरी व डिफर्ड भागीदारांसहि त्यांच्या भागांवर १९४३-४४ सालाकरितां अनुक्रमें ५% व ६% डिव्हिडंड देण्यांत आलें आहे व त्या आधीच्या सर्व वर्षांचें डिव्हिडंडहि त्यांच्या वांटणींस आलें आहे. बँकेस ९,०३,१७५ रुपयांचे भाग विकण्यास परवानगी मिळाली आहे. बँक प्रत्येक भागाच्या २५ रुपयांपैकीं १२½ रुपये वसूल करणार आहे व ३ रुपये वाढावा घेणार आहे. ह्या वाढाव्यांतून दलाली व कमिशन भागवून उरलेली रक्कम रिझर्व्हजमध्यें टाकली जाईल. बँकेच्या प्रगतीचा वेग लक्षांत घेतां, तिची आगामी पुष्कळच वाढ लवकर होण्याचा रंग दिसतो व त्याचें श्रेय मॅनेजिंग डायरेक्टर श्री. देशपांडे ह्यांची कळकळ, चिकाटी व दीर्घ प्रयत्न ह्यांसच दिलें पाहिजे. पुणें शाखेचे मॅनेजर श्री-डी. एन. गांडेकर, बी. ए. एलएल. बी., हे असून त्यांनीं ही शाखा थोड्या अवधींत लोकप्रिय केली आहे.

दि वॅंक ऑफ सिटिझन्स लि० वेळगांव.

दक्षिण महाराष्ट्र व उत्तर कर्नाटकांतील प्रमुख वॅंक.

सर्व तऱ्हेचा बॅंकिंग व्यवहार केला जातो.

मुख्य कचेरी:-१५१४ मारुतीगल्ली, बेळगांव.

शाखा:—

१ चव्हाण बिल्डिंग, सराफकट्टा, गणपतगल्ली बेळगांव.
२ खानापूर ३ नंदगड ४ अळणांवर
५ धारवाड ६ निपाणी ७ चिक्कोडी
८ कॅंप-बेळगांव ९ टळकवाडी.

ऑफिस टाईम:—सकाळी ९॥ ते १२, दुपारी ३॥ ते ६

समक्ष भेटा अगर लिहा.

जी. डी. सराफ,
मॅनेजिंग डायरेक्टर.

दि वॅंक ऑफ औंध लिमिटेड, औंध.

(औंध संस्थानांत स्थापन झालेली व सभासदांची जबाबदारी नियमित असलेली)

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. श्रीपाद प्रभाकर ओगले (चेअरमन)
श्री. ना. रामप्पा बालप्पा बिद्री.
श्री. दि. ब. मोतीलाल बालमुकुंद मुथा
श्री. शंतनुराव लक्ष्मणराव किर्लोस्कर
श्री. देवी माधवदास रामदास

भांडवल

अधिकृत भांडवल .... रु. ५,००,०००
विक्रीस काढलेलें भांडवल रु. २,५०,०००
भरलेलें भांडवल ... .. रु. १,३७,९६०

● सेव्हिंग्ज, चालू व मुदत ठेवी योग्य व्याजानें स्वीकारण्यांत येतात.
● ३ वर्षे मुदतीचीं कॅश सर्टीफिकिटें रु. १०, ५०, १००, १००० या रकमेचीं विकलीं जातात.
◆ सर्व प्रकारचे बॅंकिंगचे व्यवहार केले जातात.

बा. रा. वर्तक,
जनरल मॅनेजर.

दी भारत इंडस्ट्रिअल वॅंक, लि०

हेड ऑफिस:—पुणें शहर
शाखा:—(१) पुणें कॅन्टोनमेंट (२) बारामती (३) लोणावळा (४) वेलापूर.
पे-ऑफिस:-खोपोली (जि, कुलाबा)
चेअरमन:—श्री. के. वि. केळकर, M. A., LL. B.

एकूण खेळतें भांडवल : रु. २५ लाखांचे वर

—व्याजाचे दर:—

करंट अर्धा टक्का, सेव्हिंग्ज २ टक्के, सेव्हिंग्ज (स्त्री खातेदार) २½ टक्के, कायम ठेवी २½ ते ४½ टक्केपर्यंत (मुदत ६ महिने ते ५ वर्षे)

★ सेव्हिंग्ज खात्यांतील रकमा चेकनें काढतां येतात.
★ शॉर्ट टर्म डिपॉझिट्स स्वीकारलीं जातात.
★ बॅंकेचे मुख्य कचेरींत स्त्री खातेदारांकरितां स्वतंत्र स्त्री विभागाची व्यवस्था.
★ सर्व प्रकारचे बॅंकिंगचे व्यवहार केले जातात.

जास्त माहितीसाठी मुख्य कचेरी अगर शाखा यांजकडे चौकशी करा.

आर. बी. साळवेकर, B. A., LL. B., एन. एन. क्षीरसागर. } मॅनेजिंग डायरेक्टर्स.

एक हजार रुपये

★ दरवर्षी दिवाळी पाडव्याला रुपये एकशे चाळीस प्रमाणें फक्त पांच वर्षे हप्ते देऊन, म्हणजे एकंदर रुपये सातशें फक्त भरून, एक हजार रुपये रकमेचा विमा (नफ्यासह) घेता येईल.

विमा हप्त्यादाखल भरलेल्या रकमेवर इनकम टॅक्स माफ होतो. तपशील मागवा.

आमचे विमेदारांना व भागीदारांना नवें वर्ष सुखाचें व समृद्धीचें जावो.

दि ट्रस्ट ऑफ इंडिया अश्युअरन्स कं. लि., पुणें.

अध्यक्ष:—श्रीमंत जगन्नाथ महाराज पंडीत
मॅनेजर:—व्ही. एच. देशमुख, बी. ए.
शाखा:-मुंबई, नागपूर, सोलापूर, बेळगांव इ.

रशिया व अमेरिका ह्यांचे संबंध आजवर कसे होते; पुढें कसे रहातील ?

रशिया व अमेरिका ह्यांचे अमदी पूर्वीचे संबंध फारसे सलोख्याचे नव्हते. एंप्रेस कॅथराइननें आपणांस अमेरिकेचा वकील म्हणून मान्यता द्यावी, ह्यासाठी फ्रान्सिस डानानें सेंट पीटर्सबर्ग-मध्यें १७८१ ते ८३ हीं दोन वर्षे काढलीं, त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. पंचवीस वर्षांनंतर प्रेसिडेंट जेफरसननें झार पहिला अॅलेक्झँडर याजकडून अमेरिकेच्या वकिलातीस मान्यता मिळवली, परंतु अमेरिकन सेनेट वकील नेमण्यास तयार झालें नाहीं ! युरोपांतील भानगडींत अमेरिकेनें शिरूं नये, हें तत्त्व त्याच्या बुडाशीं होतें. रशिया व अमेरिका ह्यांचे हितसंबंध परस्पर विरोधी नव्हते, इतकेंच नव्हें त्यांचा एकमेकाशीं कांहीं संबंधच नव्हता, हें त्यावरून स्पष्ट होतें. क्रायमिन युद्धाचे वेळीं, रशिया हा ग्रेटब्रिटनचा शत्रू होता ह्यासाठीच केवळ अमेरिकेचें लोकमत रशियास अनुकूल होतें, व अमेरिकेंतून ब्रिटिश वकीलास बाहेर घालवून तें लोकमत अमेरिकन सरकारनें व्यक्त केलें. अमेरिकन सिव्हिल वॉरचे वेळीं रशियानें उत्तर अमेरिकेचे बाजूनें आपला कल दाखविला, कारण इंग्लंड दक्षिणकडील लोकांना अनुकूल असल्याचा ग्रह सर्वत्र झालेला होता. ग्रेट ब्रिटन रशियावर स्वारी करून रशियन आगबोटींची नाकेबंदी करणार ह्या अपेक्षेनें रशियानें १८६३ सालीं आपल्या आगबोटी न्यूयॉर्क व सॅनफ्रॅन्सिस्को ह्या बंदरांकडे आश्रयार्थ पाठविल्या, त्यावेळीं अमेरिकन लोकांना रशियाबद्दल जास्तच स्नेह वाटूं लागला. वास्तविक ग्रेट ब्रिटन अटलांटिक महासागराच्या क्षेत्रांत मातब्बर होऊं नये, ह्यासाठीच केवळ रशिया व अमेरिका हे सन्निध येऊं लागले होते. परंतु १९ व्या शतकाचे अखेरीस चीनमधील धोरणाबाबत त्या दोन देशांत मतभेद निर्माण झाले. अमेरिकेला चीनमध्यें खुला व्यापार हवा होता, तर रशियाला मंचुरियामध्यें एकट्यासाठीं सवलती पाहिजे होत्या. रशिया व जपान ह्यांचेमध्यें युद्ध सुरू झालें, तेव्हां अमेरिकेस जपानची सरशी हवी होती तर जपानच्या पाठीमागील अमेरिका हाच रशियाचा खरा शत्रू असल्याचें रशियन वृत्तपत्रें सांगत होतीं ! १९१७ सालीं रशिया व अमेरिका हीं पुनः एकमेकांचे मित्र बनलीं, व झारशाईचा नाश झाल्यावर रशिया हा देश मान्यवर राष्ट्रांच्या बैठकींत बसण्यास लायक बनला, असें प्रेसिडेंट रूझवेल्टनें जाहीर केलें. हा सलोखा फार काळ टिकला नाहीं, कारण बोल्शेविक बागुलबोवानें अमेरिकन लोकमत पुनरपि रशिया-विरोधी केलें.

अमेरिकेला बोल्शेविक राजवटीबद्दल सहानुभूति कधीच वाटली नाहीं व केवळ आर्थिक स्वार्थासाठीं, मंदीच्या काळांत व्यापार वाढविला पाहिजे ह्याकरितां, अमेरिकेनें सोव्हिअट राजवटीस पुढें मान्यता दिली. जर्मनीच्या वाढत्या बळाचा परिणाम वास्तविक पहातां अमेरिका व रशिया ह्यांची गट्टी वाढण्यांत व्हावयास हवा होता, परंतु युरोपियन लोकवस्तीनें देशांतर करण्यांतच तिचें हित आहे, असें अमेरिकेनें धोरण स्वीकारलें. १९३९ चा रशिया व जर्मनी ह्यांचेमधील करार व फिनलंडशीं रशियाचें युद्ध ह्यामुळें कम्युनिस्टांविरुद्ध अमेरिकेंत वातावरण निर्माण झालें. अमेरिकेचें मागील महायुद्धासंबंधांतील देणें फिनलंडसेरीज बाकी सर्व राष्ट्रांनीं बुडविलें होतें, ह्याची आठवण अमेरिकन लोकांस सहाजीकच झाली. जर्मनीनें रशियावर स्वारी केली, तेव्हां, " रशियापेक्षा जर्मनीचाच जय झालेला बरा; कम्युनिझमपेक्षा फॉसिझम बरा " असेंच अमेरिकेंतील साधारण लोकमत होतें. परंतु, त्यानंतर सहाच महिन्यांनीं रशिया व अमेरिका हीं दोस्तराष्ट्रें बनलीं.

अटलांटिक महासागराच्या बाजूस दुसऱ्या कोणत्याहि राष्ट्राची मातब्बरी होऊं नये, एवढ्यासाठी रशियास जवळ करणें, हें अमेरिकेचें धोरण होतें. १९ व्या शतकांत इंग्लंडविरुद्ध तो प्रयोग झाला; आतां जर्मनीविरुद्ध तो प्रयोग मोठ्या प्रमाणावर चालू आहे. प्रत्यक्ष रशियाच फार प्रबळ होऊन त्याची अमेरिकेशीं जाचक स्पर्धा होऊं लागली, तर रशियाविरुद्ध एक संघ निर्माण करण्यास अमेरिका मागेपुढें पहाणार नाहीं. रशियाला युरोपचे बाहेर कांहीं महत्त्वाकांक्षा नसल्यास इंग्लंड, फ्रान्स वगैरे देशांच्या रशियाविरुद्ध तक्रारीस अमेरिका जुमानणार नाहीं, हें तितकेंच खरें आहे. पॅसिफिक महासागरांतच अमेरिका व रशिया ह्यांचा खरा शेजार आहे व चालू युद्धाच्या अखेरच्या काळांत पॅसिफिक-मधील हालचालींवरच अमेरिकेचें जास्त लक्ष लागून रहाणार हें उघड आहे. जपानचा कायमचा पराभव व्हावा, ह्याबद्दल अमेरिका कसून प्रयत्न करील आणि जपानला पूर्व आशियांत कोणी तरी प्रतिस्पर्धी रहावा अशीहि खटपट करील. रशिया पॅसिफिक महासागरांतील युद्धांत उतरला नाहीं व त्याचे चीनशी संबंध सध्यासारखेच ओढे ताणलेले राहिले तर रशिया-अमेरिका सलोखा सध्यासारखा रहाणार नाहीं. वरीलप्रमाणें मतें अमेरिकेंतील एका ब्रिटिश वार्ताहारानें प्रसिद्ध केलीं आहेत. चीन फारच लंगडा झाला व रशिया आशियांत फार प्रबळ झाला, तर अमेरिकेपुढें पेंच निर्माण होईल. थिओडर रुझवेल्टनें १९०२ सालीं रशियाविरुद्ध जपानची बाजू उचलली व १९०५ सालीं रशियाला जपानविरुद्ध उचलून धरलें तशीच परिस्थिति निर्माण व्हावयाची! अमेरिकेची आजची इच्छा चीनची शक्ति वाढवून त्यास जपानचा प्रतिस्पर्धी म्हणून तयार करण्याची आहे, परंतु चीन ढेपाळला तर वर सांगितल्याप्रमाणें परिस्थिति होणें अशक्य नाहीं. रशिया व अमेरिका ह्यांचा मध्यस्थ म्हणून इंग्लंडची भूमिका राहील, अशी कित्येकांची अपेक्षा आहे, परंतु ती फोल आहे, असें ब्रिटिश वार्ताहारांचें मत आहे.

माधवाश्रम

हा आश्रम ट्रामच्या रस्त्यावर असून रेल्वे स्टेशन व चौपाटी फक्त पांच मिनिटांचे रस्त्यावर आहे.

कुटुंबासह राहण्याची इच्छेनुरूप स्वतंत्र व्यवस्था.

माधवाश्रम बिल्डिंग ★ गिरगांव, मुंबई.

सहकारी कंझूमर्स स्टोर्स

सध्याच्या युद्धजन्य अन्नपरिस्थितीनें सहकारी कंझूमर्स स्टोर्स चळवळीस जोराची चालना दिलेली आहे. रोजच्या गरजा भागविण्यासाठी जिनसा मिळविणें हें गरीब व श्रीमंत ह्या दोघांसहि सारखेंच त्रासदायक झालें असल्यामुळें संघटनेची आवश्यकता निर्माण झाली आहे. युरोपांतील स्टोर्सच्या संघटनेचे मानानें हिंदुस्थानांतील संघटना, प्रत्येक प्रांतांत आतां अनेक स्टोर्स कुत्र्याच्या छत्र्यांप्रमाणें उदयास आले असले तरी, अत्यंत प्राथमिक अवस्थेंत आहे. ह्या स्टोर्सची व्यवस्था कार्यक्षम झाली नाहीं तर ते अल्पजीवी ठरून बंद पडण्याची वेळ आल्यास आश्चर्य नाहीं.

सहकारी कंझूमर्स स्टोर्सचा कारभार अगदी लोकशाही तत्त्वावर चालतो:—(१) प्रत्येक सभासदागणिक एक मत, (२) सभासदांप्रमाणें बिगर सभासदांसहि बाजारभावानें मालविक्री, (३) भागीदारांस डिव्हिडंड व (४) खरेदीदारांस त्यांच्या खरेदीच्या प्रमाणांत बोनस. नफेबाजी करणें हा कंझूमर्स सोसायट्यांचा उद्देश नाहीं. घाऊक व्यापारी व किरकोळ दुकानदार ह्यांच्या नफेबाजीपासून स्वतःचें त्या संरक्षण करतात. व्यापाऱ्यांचे खिशांत साधारणतः जाणारा नफा त्या खरेदीदारांस मिळवून देण्याचा प्रयत्न करतात. स्वतःची घटना व नियम ह्यांचे विशिष्ट चौकटींतच त्यांना व्यवहार करतां येतो आणि अंतर्गत व बाहेरील अनेक निर्बंध व तपासण्या ह्यांची मर्यादा त्यांस संभाळावी लागते. ह्याउलट, व्यापारी लोकांचें ध्येय फक्त एकच असतें, तें म्हणजे नफा मिळविणें. त्यांना घटना माहीत नाहीं व त्यांच्या फायद्याचे प्रमाणास मर्यादाहि पण नसते.

कंझूमर्स सोसायटी खरोखरच यशस्वी करावयाची म्हटली, तर तिची व्यवस्था अगदी सोपी नसते. सोसायटीचें व्यापक उच्च तत्त्व ज्यांस पटलें आहे व जे आपला वेळ व शक्ति तिचेसाठी खर्चण्यास तयार आहेत, अशा उत्साही लोकांनीं पुढाकार घेतला पाहिजे. त्यांना व्यापारी भानगडी करण्यांत निष्णात असलेल्या धंदेवाइकांशीं टक्कर द्यावयाची असते. तथापि स्वच्छ माल, बिनचुक वजन आणि सतत करडी देखरेख ह्या गुणांवर सहकारी स्टोर्स निश्चित यशस्वी होतील.

उधारीचा व्यवहार सहकारी कंझूमर्स स्टोर्सच्या ध्येयांशीं अगदीं विसंगत आहे. सभासदांमध्यें कोणताही भेदाभेद मानावयाचा नाहीं, हें एकदां ठरलें म्हणजे उधारीचा प्रश्नच शिल्लक राहत नाहीं. त्यामुळें महिन्याच्या खरेदीपुरतें भांडवल असलें म्हणजे पुरतें.

सोसायटीशीं एकनिष्ठ रहा

सहकारी स्टोर्सची संघटना यशस्वी होणें प्रत्येक सभासदानें आपल्या सोसायटीवरील निष्ठा कायम राखण्यावर अवलंबून असतें. बाजारभावापेक्षाहि एखादे वेळीं सोसायटीचा माल महाग वाटला तरी विचार न करतां सोसायटीस दोष देऊं नये. उधारी, मालाची घरीं पोंच व दिखाऊ स्वस्त भाव इत्यादि व्यापाऱ्यांच्या आकर्षणांस सभासदांनीं भुलून जाऊं नये. भुइमूग, तेल, मीठ, पोहे, घने इत्यादि जिन्नस बहुतेक दुकानदार मापी हिशेबानें देतात व त्यामुळें ते त्यास स्वस्त देणें परवडतें. सोसायट्यांत ते वजनावर विकले जातात त्या कारणानें त्यांची किंमत सकृत्दर्शनी जास्त वाटते. ज्या सभासदांस ह्या फरकाचें कारण समजून घेण्याचाहि धीर नाहीं, ते ह्या दिखाऊ दुकानदारांकडे धाव घेतात. आमचे "बाबूराव बोबडे" शहराच्या दुसऱ्या टोकाशीं असलेल्या दुकानाच्या पाटीवर स्वस्त किंमती वाचून, आपल्या मोटारींत पेट्रोल भरून तिकडे जातात, माल खरेदी करतात आणि सोसायटीच्या सेक्रेटरीकडे येऊन मोठ्या ऐटींत आपल्या हुशारीचें प्रदर्शन करतात. परंतु, सोसायटीच्या तराजूंत त्याचें वजन करतां, सोसायटीच्या दुकानांत त्यांस मिळाला असता त्यापेक्षां पुष्कळच कमी माल त्यांचे पदरांत पडला आहे, असें त्यांस आढळतें. आपण आपला वेळ, शक्ति व पेट्रोल हीं निष्कारण खर्च केलीं, असें त्यांस अखेर समजून येतें व खरेदीवर वर्षअखेर मिळणाऱ्या बोनसलाहि ते मुकतात. असे "बाबूराव बोबडे" पुष्कळ आढळतात!

सोसायटीचें ध्येय व उद्दिष्ट हीं स्वतः समजून न घेतां तिचे-

Telephone : 31084 two lines
SARDA
THE PREMIER &
For High Class Hindus, Chiefs and Sardars
CENTRA
Near CRAWFO

व्ही. पी. वेडेकर

आणि सन्स लिमिटेड मुंबई.
मसाल्याचे व्यापारी
पुणें एजंट:— द. ना. हेजीब

राजदरबारी—कस्तुरी अंबर नं. १०१०, १

Telegram : "Sardargriha."

GRIHA
DEST HOTEL
fitted with latest equipments, Bath, Lift etc.
ITUATED
ARKET. BOMBAY 2.

वर निष्कारण टीका करून बभ्रा करण्याची सभासदांनीं घाई करूं नये. एकादी तक्रार करणें असल्यास, त्यांनीं व्यवस्थापक मंडळाकडे ती लेखी करावी. सभासदास कांहीं बाबी अगदी क्षुल्लक वाटत असल्या तरी त्या संबंधांतहि त्यांनीं व्यवस्थापक मंडळाशीं सहकार्य करावें. सभासदांस ठरवून दिलेल्या दिवशींच (१) त्यानें स्टोअरमध्यें जाणें, (२) बरोबर रेशन कार्ड नेणें, (३) जवळ मोठ बाळगणें व (४) खरेदी केलेल्या जिनसासाठी पिशव्या नेणें, ह्या गोष्टी व्यवस्थेशीर व्यवहाराच्या दृष्टीनें फार सोईच्या होतात. सभासदानें बिल करण्याची स्वतःच तयारी दाखविणें, स्वतःच्या जिनसांचें वजन स्वतः करणें व रेशन कार्डांत नोंद करणें, ह्या गोष्टींमुळें सहकारी स्टोअरचें सहकारी स्वरूप ज्यास्तच उठावदार होईल.

त्रिप्लिकेन सहकारी सोसायटी (मद्रास) ही हिंदुस्थानांतील नमुनेदार कंझ्युमर्स सोसायटी गणली जाते. कांहीं उत्साही शिक्षकांनीं तिची १९३० सालीं स्थापना केली. सोसायटीच्या आतां ३४ शाखा असून त्यांत सर्व तऱ्हेचा माल ठेवण्यांत येतो. माल सांठविण्यासाठी दोन मोठीं, कोठारें बांधण्यांत आलीं आहेत. मालाच्या वहातुकीसाठी कित्येक लॉऱ्या दिवसभर ये-जा करीत असतात. सोसायटीमार्फत एक ग्रन्थालयहि चालविण्यांत येतें. तसेंच, कापड विक्रीचीहि शाखा सोसायटीस जोडलेली आहे. सोसायटीच्या मासिक व्यवहाराची रकम कित्येक लक्ष रुपयांचेवर आहे.

मालांतील भेसळ थांबवून आरोग्य सुधारणारी, बरोबर वजन देऊन योग्य किंमत घेणारी व आपल्या उदाहरणानें समाजास वळण लावणारी निदान एक तरी कंझ्युमर्स सोसायटी हिंदुस्थानांतील प्रत्येक गांवांत स्थापन होऊन यशस्वी व्हावी, अशी अपेक्षा व्यक्त करणें फाजील आशा दाखविण्यासारखें होणार नाहींना !

रिझर्व्ह बँकेकडील सरकारी बिनव्याजी ठेवी

मध्यवर्ती व प्रांतिक सरकारांचे त्यांच्या रिझर्व्ह बँकेच्या खात्यांत किती पैसे असतात ह्याची कल्पना खालील आंकडचांवरून येईल. १९४२-४३ अखेर मध्यवर्ती सरकारचे रिझर्व्ह बँकेंत १७ कोटि, ४१ लक्ष रुपये होते. १९४३-४४ अखेर त्याचा आंकडा ८३ कोटि, ४९ लक्ष रुपयांवर गेला ! १९४२-४३ मध्यें दर महिन्याच्या अखेर मध्यवर्ती सरकारचे रिझर्व्ह बँकेंत सरासरीनें १२ कोटि, १० लक्ष रुपये होते, १९४३-४४ मधील तत्सम सरासरी ३० कोटि, २५ लक्ष रुपये होती.

१९४३-४४ महिना अखेर	मध्यवर्ती सरकार (कोटि रु.)	प्रांतिक सरकार (कोटि रु.)
एप्रिल	१२.६७	१५.२५
मे	९.६८	८.२८
जून	८.३९	१०.०३
जुलै	१८.९९	९.१४
ऑगस्ट	२१.२५	७.७७
सप्टेंबर	२१.५२	१२.४४
ऑक्टोबर	२६.७४	१२.६२
नोव्हेंबर	५६.८०	९.४८
डिसेंबर	१२.५९	९.९०
जानेवारी	३९.७५	१८.१३
फेब्रुवारी	५१.१४	१६.५६
मार्च	८३.४९	२४.७२
सरासरी	३०.२५	१२.८६

सरकारचीं बँकिंगविषयक सर्व कामें रिझर्व्ह बँकेनें केलीं पाहिजेत, असें तिचेवर बंधन आहे. भारतमंत्री, मध्यवर्ती सरकार, प्रांतिक सरकारें व त्यासंबंधांत मान्यता दिलेलीं संस्थानें, त्यांचे पैसे स्वीकारून, त्या पैशाच्या मर्यादेंत ते त्यांस मागणीप्रमाणें देणें, हें बँकेचें कर्तव्यच आहे. त्यांच्या सूचनेप्रमाणें पैशाची वर्मावर्गी करणें व त्यांच्या कर्जाची व्यवस्था पहाणें, हीं कामेंहि रिझर्व्ह बँकेचीं आहेत. मध्यवर्ती व प्रांतिक सरकारांचा हा व्यवहार कोणत्या अटींवर करावयाचा, ह्याबाबत बँकेनें त्यांच्याशीं करार केलेले आहेत. मामुली बँकिंगच्या व्यवहारासाठी बँकेस स्वतंत्र मोबदला मिळत नाहीं, परंतु सरकारी पेशास बँक व्याज बिलकुल देत नाहीं. खात्यावरील बाकी ठराविक रकमेच्या खाली गेली, तर उलट सरकारकडून बँकेस कमिशन मिळतें.

भागानगर
(स्थापना १८७२)
७६१ रविवार पेठ, पुणे २
१००६ व १००४ ··· भावांकरितां लिहा ···

मुजुमदार टॉय वर्क्स
माना हालणारीं देशी लांकडी चित्रें येऊन पहा.
२५५।४ शेळके वाडा, सदाशिव पेठ, पुणें शहर.

दि कराड अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि०, कराड.

स्थापना १९१७) तारीख ३०-६-४४. असेट (ऑडिट वर्ग 'अ'

१ वसूल भांडवल रु. ८८,०००
२ रिझर्व व इतर फंडस् रु. ६५,०००
३ ठेवी ... रु. १,७३,०००
१ इमारतीत व बँकांतील शिल्लक रु. १,४८,०००
२ सरकारी कर्जरोखे, शेअर्स वगैरे रु. ३,७१,०००
३ कर्जे रु. ६,२४,०००

डिव्हिडंडचा दर ७½ %

खेळतें भांडवल रु. ११,१४,०००/- थकबाकींचे प्रमाण शे. १४

ठेवी स्वीकारणें, कर्जे देणें, हुंड्यांची खरेदीविक्री, चेक्स, ड्राफ्ट व रेमे रिसीटस् वसूली, वगैरे सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

म. वि. खंडकर,
मॅनेजिंग डायरेक्टर.

धी बुधगांव बँक लिमिटेड, बुधगांव.

स्थापना १९३१

शाखा:—माधवनगर, गुडगेरी व खंडाळी.

ठेवीवरील व्याजाचे चालू दर

मुदत ठेव					
५ वर्षे	द. द. शेकडा	४	टक्के
३ „	„ „	३।८	„
२ „	„ „	३।४	„
१ „	„ „	३	„
सेव्हिंग ठेव	„ „	२	„
करंट	„ „	१	„

विशेष माहिती समक्ष अगर पत्रद्वारें दिली जाईल.
बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात.

हुकुमावरून,
R. M. Gokave,
ॲ. मॅनेजर.

फलटण दरबारकडून पुरस्कृत असलेली

श्रीलक्ष्मी सें. को. बँक, लि. फलटण.

(स्थापना १-२-१९२६)

भागांचें वसूल भांडवल ... ... रु. ६०,००० वर
राखीव व इतर निधि ... ... रु. १,०३,००० वर
ठेवी ... ... रु. ११,३०,००० वर
खेळतें भांडवल ... ... रु. १३,९९,००० वर

- चालू, सेव्हिंग्ज व मुदत ठेवी स्वीकारण्यांत येतात.
- बँकेस जोडून घेतलेल्या सहकारी पेढ्यांना व बँकेच्या भागीदारांना सर्व प्रकारच्या तारणांवर कर्ज आणि योग्य तारणांवर ओव्हरड्राफ्ट मिळण्याची सोय करण्यांत आली आहे.
- चेक हुंड्यांची खरेदी-विक्री, सर्व प्रकारच्या बिलांची वसुली वगैरे सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार या बँकेत होतात.
- वेस्टर्न इंडिया, नेपच्यून, एशियन व कॉमनवेल्थ या विमा कंपन्यांच्या हप्त्यांच्या रकमा स्वीकारण्यांत येतात.
- ही बँक फलटण दरबार, दि फलटण शुगर वर्क्स लि., व सर्व स्थानिक सार्वजनिक संस्था यांची बँकर्स आहे.

अधिक माहिती समक्ष अगर पत्रद्वारें.

श्री. ह. तळवलकर,
व्यवस्थापक,
श्रीलक्ष्मी सें.को. बँक लि.,
फलटण.

वि. शं. झिरपे,
बी. ए., एलएल. बी., वकील,
संचालक मंडळाध्यक्ष,
श्रीलक्ष्मी सें.को.बँक,लि.,फलटण

आघाडीचे मार्गावर

३१-१२-४३ रोजींचे आंकडे

पुन्या केलेल्या नव्या कामाचा आंकडा

२ कोटी, १५ लक्ष रु.

पेक्षां ज्यास्त

(१९४२ चे कामापेक्षां ६१ % वाढ)

हप्त्यांचें उत्पन्न ५९ लक्ष रु. पेक्षां अधिक
एकूण मालमत्ता ३ कोटी, २० लक्ष रु. पेक्षां अधिक
एकूण दिलेले क्लेम २ कोटी, ८६ लक्ष रु. पेक्षां अधिक

विमा उतरण्यासाठी किंवा एजन्सीसाठी

भा र त

इन्शुअरन्स कंपनी लि० लाहोर

ह्या कंपनीचीच निवड करा.

स्थापना १८९६

कै. नानासाहेब सरपोतदार यांनीं स्थापिलेलें

पूना गेस्ट हाऊस

लक्ष्मी रोड, पुणें २. टेलिफोन नं. ७७९

आपल्या पुढील कांहीं प्रश्न

श्री. संपादक महाशय 'अर्थ' यांसीं सा. न. वि. वि. हिंदुस्थानाच्या आर्थिक अभिवृद्धीच्या कोडो रुपयांच्या योजना मांडण्यांत येत आहेत. प्रचंड मांडवलाच्या मोठमोठ्या कंपन्या स्थापन होत आहेत. तरी आपल्या गरीब महाराष्ट्राच्या युद्धोत्तर प्रश्नांचा विचार आपण सर्वांनीं करावयाला नको कां ?

विमा कंपन्यां, बँका आणि औद्योगिक कारखाने या सर्वांना साधारणपणें युद्धाचीं वर्षें बरीं गेलीं. गेल्या तीन-चार वर्षांत प्रतिवर्षी अधिकाधिक घंदा मिळून उच्चांक गांठला जात आहे. ज्या प्रमाणांत काम वाढलें त्या मानानें खर्चाचीं तोंडें जवळ जवळ तींच राहिल्यानें "खर्चाचें प्रमाण" ठीक राहिलेलें दिसतें. विमा कंपन्यांवर रक्कम गुंतविण्याबाबत कायद्याचें नियंत्रण असल्यानें त्यांचा त्याबाबतचा प्रश्न एकप्रकारें सुटल्यासारखा आहे. बँकांच्या हातांशीं भरपूर पैसा असल्यानें त्यांची सुस्थिति आहे. बहुतेक बँकांनीं नवीन शेअर भांडवल विकावयास काढलें आहे. युद्धोत्तर पैशाची चणचण होईल. त्या काळांत मजबुती राहण्याच्या दृष्टीनें चालवलेले हे प्रयत्न योग्य आहेत. भरपूर शेअर-भांडवलाच्या आधारावरील बँका कोणत्याहि वाईट परिस्थितीशींहि यशस्वी रीतीनें टक्कर देऊं शकतील .

कारखान्यांचे प्रश्न विविध व अधिक गुंतागुंतीचे आहेत. युद्धामुळें वाढलेलें काम युद्ध-समाप्तीनंतर कमी होईल. परदेशी व परप्रांतीय स्पर्धा तीव्रतेनें जाणवूं लागेल. स्पर्धा दुहेरी असते.मालाच्या गुणांत नि किंमतींत. त्याकरितां अद्यावत् नवीन यंत्रसामुग्री मिळविण्याची कोशीस करावी लागेल. पुनर्घटनेच्या घाईत तयार केलेलीं यंत्रें पहिल्या प्रतीचीं असतीलच असा हवाला देतां येत नाहीं. तथापि यंत्रांशिवाय चालणार नाहीं ही गोष्टहि तितकीच खरी आहे. इंग्लंड-अमेरिकेंत ५-२५ टक्क्यांहून अधिक किंमती वाढलेल्या नाहींत. उलट आपल्याकडील किंमतींतील वाढ शेकडचांनीं झाली आहे. देशी व परदेशी तयार मालाच्या किंमतींतील तफावत या विशिष्ट घटनेमुळें अधिकच वाढण्याचा संभव दिसतो.

कच्च्या मालाच्या किंमती कमी होतील; पण मजुरी व इतर खर्च तांबेडतोब उतरण्याची शक्यता नाहीं. काटकसरीची कात्री मॅनेजिंग एजंटांच्या मुशाहिऱ्यास नि शेअरवरील डिव्हिडंडास लावावी लागेल. मला या ठिकाणीं नमूद करून ठेवणें इष्ट वाटतें कीं महाराष्ट्रीय मॅनेजिंग एजंटस, ठेवीदार व शेअर होल्डर्स यांना कांहींहि न देतां कारखान्यांना आपले संसार एक दिवसहि चालवितां येणार नाहींत. त्यांचा योगक्षेमच कंपन्यांतून मिळणाऱ्या मुशाहिऱ्यांतून, व्याजातून नि डिव्हिडंडमधून चालतो, हेंच त्यांचें कारण. तथापि त्यांतल्या त्यांत भागीदार व ठेवीदार यांच्या पैशाचे आधारावरच मुख्यतः कंपन्या व भांडवल उभारणाऱ्या महाराष्ट्रीय मॅनेजिंग एजंटासच ज्यास्त स्वार्थत्याग दाखवावा लागेल. एकमेकांना विश्वासांत घेऊन कार्य केल्यास आपला संसार नेटका तर होईलच; पण सुखाचा, भरभराटीचाहि होईल यांत मला संदेह वाटत नाहीं.

— संजय

डोंगरे यांचें बालामृत
दिल्यानें
मुलांचें शरीरसंवर्धन
होऊन त्यांचे स्नायू
जोमदार होतात.
मालक—के. टी. डोंगरे आणि कं.,
मुंबई ४.

"विजय टेक्स्टाइल्स लिमिटेड"
एरंडवणें, पुणें ४.
सर्व तऱ्हेचें कापड आमचे कारखान्यांत विणलें जातें. युद्धपरिस्थिति थोडी निवळतांच आम्हीं वैयक्तिक ग्राहकांच्या सेवेस पुनः हजर होऊं.

आमचे ग्राहकांस व हितचिंतकांस नवें वर्ष सुखदायी होवो.

विमा-कायद्यांत नवीन सुधारणा

मध्यवर्ती सरकारच्या व्यापारी शाखेचे प्रमुख अधिकारी, सर महमंद अझीझुल हक हांनीं नुकतीच मुंबईस भेट दिली व त्यांच्या अध्यक्षतेखालीं विम्याबाबतच्या सल्लागार समितीची बैठक झाली, त्याबेळेस विमेदारांच्या हितवर्धनाच्या दृष्टीनें विमा कायद्यांत आणखी सुधारणा करण्यासंबंधीं विचारविनिमय झाला. त्या बाबतींत गोषवारा देऊन त्यावर चर्चा करण्याचा या वेळांत प्रयत्न केला जात आहे.

(१) निवळ आयुर्विम्याचें काम करणाऱ्या कित्येक कंपन्यांकडून सर्वसाधारण विम्याचें काम करण्याचे दृष्टीनें सरकारकडे परवानगी मागण्यांत येते अशा कंपन्यांचा आयुर्विमानिधी विमा कायद्याच्या नियमापेक्षां कमी आहे आणि सर्वसाधारण विम्याचें कार्य करण्याची परवानगी हवी असेल अशा विमा कंपन्यांनीं आपला आयुर्विमानिधि नियमाचे कक्षेंत प्रथम आणलाच पाहिजे अशी सूचना समितीस करण्यांत आली.

(२) चर्चेतील अत्यन्त वादग्रस्त असा मुद्दा म्हणजे विमा कायदा कलम ४० पोटविभाग २ यांत एजन्ट नेमणारे मध्यस्त पेशल एजन्ट व चीफ एजन्ट यांस यावयाच्या कमिशनवर नियंत्रण घालण्याबाबत होता. पण या मुद्द्यावर आज ४ वर्षे वादविवाद होऊन देखील त्यावर दुमतच आहे.

(३) प्रॉव्हिडंट विमा कंपन्यांना पैसा गुंतविण्याबाबत जादा सवलती देणें आणि विमा कायदा कलम ८७ खालीं समाधानकारक माहिती न आल्यास किंवा चौकशी अंतीं कंपनीची परिस्थिति असमाधानकारक असल्यास आणि ती नादार वाटल्यास बंद करण्याचा अधिकार विमा अधिकाऱ्यास देण्याबद्दल विचारविनिमय झाला.

(४) विमा कंपन्यांची सांपत्तिक परिस्थिति अजमावतांना न जमा झालेलें भांडवल हिशेबांतून वगळावें असाहि विचार झाला.

(५) विमा एजन्टास एकाहून विमा कंपनीचे डायरेक्टर होण्याविरुद्ध किंवा डायरेक्टरचे जागीं चालूं राहण्याचे विरुद्ध निर्बंध घालणेबाबत चर्चा झाली.

(६) विमा अगर प्रॉव्हिडंट कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर किंवा मॅनेजर यांस आपल्या जागेवर आपल्या भागून कोणी बसावें याबाबत हक्क न देणें आणि अशा मॅनेजरास अगर मॅनेजिंग डायरेक्टरास जो तनखा यावयाचा तो विम्याचे कामावर कमिशनचे रूपांत देणें किंवा नफ्याचा भाग म्हणून देण्याबाबत निर्बंध घालणें याबाबत चर्चा झाली.

यावरील विवेचन खालील स्वरूपांत मांडता येईल.

(१) पुष्कळ विमा कंपन्यांच्या चालकांची कल्पना अशी आहे कीं आपली आयुर्विमा खात्यांतील केवढीहि तूट आपण सर्वसाधारण विम्याचें काम करून भरून काढूं शकूं, परंतु जी गोष्ट आयुर्विम्याबाबत तीच गोष्ट सर्वसाधारण विम्याचे बाबतही अनुभवास येते. कोणत्याही प्रकारचें विम्याचें काम मिळवितांना शास्त्रशुद्धतेस न अनुसरतां आणि केवळ चढाओढीच्या भरीस पडून नुकसानींत काम करण्याची संवय कित्येक कंपन्यांस असते आणि अशांस सर्वसाधारण विम्याचें काम करण्यास परवानगी देणें रास्त नाहीं हें कोणीही कबूल करील, कारण त्यामुळें

मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं असलेली

शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

बॉम्बे प्राव्हिन्शियल को-ऑपरेटिव बँक, लिमिटेड

(सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली)

स्थापना १९११

मुख्य कचेरी
सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरियल बिल्डिंग,
९, बेक हाऊस लेन, कोट मुंबई.

शाखा ४४

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात

आणि

इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

पूर्ण माहितीकरितां हेड ऑफिसकडे लिहा.

व्ही. एल. मेहता
मॅनेजिंग डायरेक्टर.

कंपनीच्या एका व्यवहारांतील तोट्यांत दुसऱ्या व्यवहारांतील तोट्याची भर पडून नुकसान द्विगुणितच होईल. अशांना पहिलें नुकसान भरून काढल्यासेरीज परवानगी न देणें रास्त ठरेल.

(२) या अत्यंत वादग्रस्त मुद्द्यावर जी अद्याप एकतानता होऊं शकत नाहीं त्याला मुख्य कारण देशी व विदेशी कंपन्यांच्या मध्यस्ती चीफ एजन्टाचे स्वार्थ. याबाबत सत्वर नियंत्रण येणें अत्यंत जरूरीचें आहे आणि हें नियंत्रण जर आलें नाहीं तर विमा कायदा सुधारणारे श्रेष्ठी विमेदारांच्या हिताचे दृष्टीनें कितीही जरी धडपडले तरी निष्फळ ठरून विमा कंपन्यांचे आयुर्विमा निधि तुटपुंजे राहून, विमापनांत ते अपुरे पडून, विमा कंपन्यांकडून विमेदारांचें नुकसान होण्याचा संभव आहे. तेव्हां हें नियंत्रण ताबडतोब बसवावें अशी आग्रहाची सूचना आहे.

(३) प्रॉव्हिडंट विमा कंपन्यांना सवलती देणें किंवा त्या टिकूं देणें हें विमेदारांच्या दृष्टीनें विघातकच होणार आहे. यापेक्षां सर्व प्रॉव्हिडेन्ट कंपन्यांचें काम भक्कम आयुर्विमा कंपन्यांचे कामांत मिळवून प्रॉव्हिडन्ट कंपन्या बंद केल्या व आयुर्विमा कंपन्यांवरील कामाचे निर्बंध काढून टाकले तर त्यानें विमेदारांचें कल्याण होईल. नाहींतर ह्या प्रॉव्हिडन्ट कंपन्या म्हणजे गरीब विमेदारांचा काळ आणि स्वार्थी चालकांची तरतूद म्हणून राहणार आहेत.

(४) सूचना रास्त आहे.

(५) विमा एजन्टास विमा कंपनीचे डायरेक्टर असूं देणें कोणत्याही प्रसंगीं वाजवी ठरणार नाहीं आणि हा निर्बंध सत्वर लादला जावा.

(६) विमा कंपनी ही जनहितकारक संस्था आहे. तिच्या मुख्य संचालकाची जागा म्हणजे पिढीजाद चालणारी जहागिरी, सरदारी किंवा गादी नव्हे. ती जागा अत्यन्त जबाबदार किंवा विमाशास्त्रपारंगत अशा व्यक्तीचे हातीं देणें अवश्य असल्यामुळें कोणत्याही चालकांनें आपल्या वशिल्याचा माणूस आपल्या जागीं गुळाचा गणपति म्हणून बसविण्याचा अधिकार देणें अयोग्य ठरेल म्हणून हा निर्बंध आवश्यक आहे.

आतां राहता राहिला प्रश्न चालकांच्या वेतनाचा. कोणत्याही संस्थेच्या बाल्यावस्थेंत चालकास निव्वळ पगारी ठेवण्यापेक्षां नुसत्या कमिशनवर किंवा पगारी व कमिशनवर ठेवणें संस्थेच्या दृष्टीनें हितकारक ठरेल. याचा परिणाम चालकाला संस्थेच्या हितार्थ अधिकाधिक धडपडण्यास उत्तेजन मिळण्याचे दृष्टीनें होईल, परंतु चालकांचा तनखा एका किमान मासिक मर्यादेपर्यंत पोहोंचल्यानंतर त्याला कंपनीच्या एकूण कामावर कमिशन मिळणें योग्य ठरणार नाहीं. त्यापुढें चालक निव्वळ पगारी राहून त्याच्या पगारांत होणारी वाढ कंपनीच्या एकूण चालू कामावर आणि किमान वार्षिक मिळणाऱ्या कामावर अवलंबून ठेवल्यास कंपनीचें हित, विमेदारांचें हित आणि चालकांचें हितही साधलें जाईल. तेव्हां असा सर्रास निर्बंध घालणें योग्य ठरणार नाहीं. तरी तो वरील सूचना लक्षांत घेऊन घालण्यांत यावा.

अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि. सांगली

(स्थापना : १९३५)

भांडवल

अधिकृत	रु.	१,००,०००
वसूल झालेलें	रु.	८३,३४०
रिझर्व्ह व इतर फंड ...	रु.	१५,९००
एकूण खेळतें भांडवल ...	रु.	८,२९,०००

डायरेक्टर्स

श्री. स. ग. फडके, चेअरमन

श्री. ग. कों. गोडबोले, श्री. ज. वि. करमरकर
„ ज. ग. गोडबोले, श्री. बा. गो. शिराळकर
„ बा. वि. वाटवे, „ म. इ. गोडबोले
डॉ. ल. बा. फडणीस, „ बा. इ. गोसावी

बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात.

आर. सी. खाडिलकर,
मॅनेजर.

सर्वांचे विश्वासांतील व एकमेव आदरणीय

दि कमर्शिअल बँक लिमिटेड,

कोल्हापूर शहर.

भांडवल

अधिकृत व खपलेलें	रुपये	१,००,०००
वसूल झालेलें	„	५०,०००
एकूण खेळतें भांडवल	„	१२,२५,०००

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँकिंगसंबंधी व्यवहाराची इतर माहिती ऑफिसमध्ये देऊं.

गणपतराव लक्ष्मणराव साळोखे,
मॅनेजिंग डायरेक्टर

—प्रत्येक कुटुंबांत—

आमचीं "होमिओ-स्पेसिफिक्स" संग्रहीं असलीं पाहिजेत, हें लोकांना पटलें आहे. तीं हमखास गुणकारी, घेण्यास सोयिस्कर व किंमतींत माफक असतात.

★ **फीव्हर एस** सर्व तऱ्हेच्या तापांवर अप्रतिम गुणकारी. किं. रु. २.

★ **होमिओलॅक्स**—बिनत्रासानें शौचशुद्धि करणारें. बा. किं. रु. १. पाकीट ८२.

★ **बालमित्र**—लहान मुलांना उद्भवणाऱ्या सर्व विकारांवर खात्रीचा उपाय. किं. रु. १. ट. खर्च निराळा. संपूर्ण माहितीकरितां लिहा.

—सुधा एजन्सी—

३८ खांडके बिल्डिंग, दादर. मुंबई १४.

पैसा व ज्ञान देणारीं पुस्तकें !

श्रीमंत कसें व्हावें ? संपत्तीचे सुंदर मार्ग दाखवून हजारों रु. मिळवून देतें. वाचून लक्षाधीश व्हाल ! किं. १॥ रु. काम आणि कामिनी. काम शास्त्रावरील अपूर्व ग्रंथ ! किं. १॥ रु. मृत्युलोकचा प्रवास ! मरणोत्तर आत्म्याच्या अद्भुत इतिहासाचें कथानक ! किं. १ रु. लिहा. विपट आणि मंडळी, कराड जि. सातारा.

कच्च्या मालाचा पुरवठा करणारे प्रमुख देश

(उत्पादनशक्तीच्या अनुक्रमानें, १९४१)

साखर (उंसाची)—हिंदुस्थान, क्युबा, अमेरिका, जावा, ब्राझील, फोर्मोसा, ऑस्ट्रेलिया.

साखर (बिटाची)—रशिया, जर्मनी, ऑस्ट्रिया, अमेरिका, इटली, फ्रान्स, ग्रेट ब्रिटन.

चहा—चीन, हिंदुस्थान, सिलोन, नेदरलंड, ई. इंडीज, जपान, रशिया.

कॉफी—ब्राझील, कोलंबिया, नेदरलंड, ई. इंडीज, साल्वेडॉर, व्हेनेझुएला, केनिया.

तंबाखू—चीन, अमेरिका, हिंदुस्थान, रशिया, ब्राझील, तुर्कस्थान, बल्गेरिया, ग्रीस.

बटाटे—जर्मनी, रशिया, पोलंड, फ्रान्स, अमेरिका, ग्रेट ब्रिटन, आयर्लंड, स्पेन, हंगेरी.

छपाईचा कागद—कॅनडा, अमेरिका, ग्रेट ब्रिटन, फिनलंड, जपान, जर्मनी, न्यू फौंडलंड.

हिरे—बेल्जिअन कॉंगो, गोल्ड कोस्ट, अँगोला, सिएरा लिओन, द. आफ्रिका, ब्राझील.

सोनें—द. आफ्रिका, अमेरिका, कॅनडा, रशिया, ऑस्ट्रेलिया, जपान, गोल्ड कोस्ट, मेक्सिको, द. व्होडेशिया.

चांदी—मेक्सिको, अमेरिका, कॅनडा, पेरू, ऑस्ट्रेलिया, जपान, बोलिव्हिया, हिंदुस्थान, ब्रह्मदेश.

तांबें—अमेरिका, उ. व्होडेशिया, बे. कॉंगो, चिली, कॅनडा, रशिया, जपान.

पेट्रोल—अमेरिका, रशिया, व्हेनेझुएला, इराण, इराक, नेदरलंड, ई. इंडीज, मॅक्सिको, रुमेनिया.

सांडू ब्रदर्सचा आर्यौषधि कारखाना

या कारखान्याची माहिती नाहीं असा मराठी जाणणारा इसम महाराष्ट्रांत क्वचितच असेल. त्याची स्थापना चेंबूर (मुंबईनजिक) सन १८९९ साली झाली. तदनंतर गेल्या ४४ वर्षांत हळूहळू त्याची सर्वांगीण वाढ झाली असून तिला प्रगमनशील स्वरूप होण्याचे दृष्टीनें कारखान्याचें १९४० मध्यें लिमिटेड कंपनींत रूपांतर झालें.

कारखान्यामध्यें तयार होणारीं औषधें आयुर्वेदीय शास्त्रपद्धतीनें होतात व तीं हिंदुस्थानांतील सर्व वर्गाच्या प्रकृतीला मानवतील असेंच घोरण कंपनीचें आहे. या कारखान्याचे ५०० पेक्षां जास्त विक्रेते असून अलिकडे माल मिळण्यास सुलभ व्हावें म्हणून कंपनीनें स्वतःचीं ठिकठिकाणीं केंद्रें व शाखा उघडल्या आहेत.

सांडू ब्रदर्सचीं ब्राह्मीतेल-बाळंतकाढा-हार्टीना-टोमॅटो कंपाउंड-प्रेगयुटेरो वगैरे सुप्रसिद्धच आहेत. अशींच औषधें प्रत्येक वर्षी निघत असतात. सध्यां तयार होत असलेल्या औषधांची संख्या ७०० हून जास्त वाढली आहे. चेंबूर येथें कारखान्याच्या सर्वांगीण सुधारणा व्हाव्यात असें चालकांचें घोरण असून त्याप्रमाणें सुधारणा होत आहेत.

मुंबईहून चेंबूर १२-१३ मैलांवर असून कुर्ला-सायन या स्टेशनवरून अनुक्रमें रेल्वे-बसनें जाण्याची उत्तम व्यवस्था आहे. आगाऊ पत्रव्यवहार केल्यावर सर्व व्यवस्था आस्थापूर्वक होत असते. टेलिफोनचीही व्यवस्था आहे. कारखाना दाखविण्यास चालक नेहमीं तत्पर असतात. लोकांनीं कारखान्यास अवश्य भेट द्यावी.

तेजस्वी आरोग्यानें
दीपावलि मंगलप्रद होवो.

आयुर्वेद रसशाळा पुणें लि० पुणें ४

कायामृत सिद्धकल्प

◆ हा, हजारों निराश झालेल्या रोग्यांना रोगमुक्त केल्यामुळें, त्यांच्या आदरास व प्रशंसेस पात्र झालेला.

◆ शरिराची भयंकर झीज भरून काढून सर्व प्रकारचे वात, अर्धांग, एकांग, दमा, श्वास व सोकला इत्यादि विकार नष्ट करणारा.

◆ मंदाग्नि, अपचन, शीतज्वर, अतिसार, पोटदुखी, संधिवात वगैरे अनेक रोगांवर हमखास गुण देणारा असून किंमतींत माफक आहे.

दहा तोळ्यांस ३ रुपये. ट. ख. निराळा.

पंडित आठल्ये वैद्य,
बालाजी ड्रॉट्स, सामगांव (बऱ्हाड), G. I. P. Ry.

महाराष्ट्रांत लेखी गॅरंटी देणारे
पहिले व फक्त १ च
गोल्ड मेडॅलिस्ट व मराठी वळणाचे स्पेशॅलिस्ट
पेन्टर वेडेकर, ए. जी.,
बुधवार चौक, पुणें २ (सिटी)
बाहेरगांवचीं कामें रेल्वे, मोटार अगर पोस्टानें पाठवूं.

पुण्यांतील
आदर्श निवासस्थान व भोजनालय
छाया लॉजिंग व बोर्डिंग हाऊस
बुधवार चौक, पुणें २.

जिकडे तिकडे प्रशंसा

इमिटेशन दागिन्यांवर रासायनिक क्रिया करून खऱ्या सोन्याचा पत्रा चढविला जातो त्यामुळें दागिना केव्हांही खराब होत नाहीं, ही पूर्ण खात्री झाली. सोन्याचा पत्रा चढविलेल्या चार बांगड्या कि. आठ रु. गरजेस्तव दागिना परत करणें झाल्यास वर चढविलेल्या सोन्याचे सर्वच्या सर्व पैसे परत देऊं.

मट कं. सांगली, S. M. C.
मट कंपनी शाखा—बुधवार पेठ, पुणें २.

दी भारत इंडस्ट्रिअल बँक लि.

सदरहु बँकेनें आपल्या कामास सुरवात केल्यास या महिना-अखेर ६ वर्षे पूर्ण होतील. या अवधींत बँकेनें गाजावाजा न करतां केलेलें कार्य व तिची झालेली प्रगति या गोष्टी अभिनंदनीय अशाच आहेत. बँकेचें आज मितीस खेळतें भांडवल २५ लाख रुपयांचेवर असून, शेअर्स रूपानें जमा झालेलें भांडवल रु. १,३०,००० चे वर आहे. त्याचप्रमाणें बँकेनें आपलें कार्यक्षेत्र पुणें शहरापुरतेंच मर्यादित असें न ठेवतां जरूर असेल अशा ठिकाणीं इतरत्र शाखा उघडण्याचें धोरण जाहीर केलें आहे. १९४४ सालाचे प्रारंभीं बँकेनें लोणावळा येथें एक शाखा उघडली व दुसरी नुकतीच म्हणजे विजयादशमीचे मुमुहूर्तावर बेलापूर रोड येथें नगर येथील श्रीमान् शेट मोतीलाल कुंदनमल फिरोदीया, बी. ए. यांचे हस्तें उघडण्यांत आली आहे.

वर दिग्दर्शित केल्याप्रमाणें व्यापारबंधाचें क्षेत्र ज्या ठिकाणीं मोठें आहे व ज्या ठिकाणीं बँकेची जरूरी आहे अशाच ठिकाणीं बँकेनें आपल्या शाखा उघडण्याचें धोरण ठेविलें आहे. अशा शाखा उघडत असतांना तेथीलच प्रतिष्ठित व सुप्रसिद्ध असे नागरिक अगर व्यापारी यांचें एक सल्लागार मंडळ स्थापन करण्यांत येऊन त्यांचे देखरेखीखालीं त्या त्या शाखेची व्यवस्था सोपविण्याचें बँकेचें धोरण आहे. याप्रमाणें बँकेच्या निरनिराळ्या शाखांचे सल्लागार मंडळांत रा. ब. शेंबेकर, रा. ब. जाचक, दि. ब. जगताप, सेटना वकील, रावसाहेब पन्हाळे, ॲडव्होकेट मादन, आमदार गिरमे, श्री. बोरावके वगैरे सुप्रसिद्ध अशा मंडळींचीं नांवें आढळतात. बँकेनें आपले नांवास साजेल असेंच धोरण उद्योगधंद्याचे व व्यापार वाढीचे बाबतींत स्वीकारलें आहे.

बँकेनें गेल्या माहिन्यांत गव्हर्नमेंट ऑफ इंडिआकडून दर्शनी किंमत रु. ५,९८,०५०च्या ऑर्डिनरी शेअर्सची विक्री करावयाची परवानगी मिळविली असून त्यांची विक्री झपाट्यानें चालू आहे. चेअरमन श्री. के. व्ही. केळकर वकील यांनीं १ लाख रुपयाच्या शेअर्सना एका महिन्यांतच मागणी आल्याचें जाहीर केलें आहे. बँकेस सुरवातीपासून प्रतिष्ठित व्यापारी मंडळी डायरेक्टर लाभली असून विशेष म्हणजे बोर्डावर एक सुविद्य महिला सौ. इंदुताई फडके, बी. ए., बी. टी. याआहेत. बँकेचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. आर. बी. साळवेकर, बी. ए., एल्एल. बी. व श्री. एन. एन. क्षीरसागर असे असून आज दिसत असलेला विस्तार हा त्यांच्या कर्तबगारीचें द्दश्य स्वरूप आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं.

रिपोर्ट मिळाला नाहीं, तरी डिव्हिडंडला विलंब नको

इंडियन आयर्न अँड स्टील कंपनीची मुख्य कचेरी इंग्लंडमध्यें आहे. कंपनीच्या डायरेक्टरांचा अहवाल व हिशेब इंग्लंड व हिंदुस्थान येथें एकदमच प्रसिद्ध केले जातात. परंतु टपाल वेळेवर येत-जात नसल्याकारणानें या प्रसिद्धीकरणास विलंब लागतो. त्यामुळें भागीदारांस डिव्हिडंड मिळण्यास वेळ लागूं नये, यासाठी डायरेक्टरांनीं ॲड-इंटेरिम डिव्हिडंड मंजूर केलें आहे. हेंच ३१ मार्च अखेरचें डिव्हिडंड समजलें जाईल.

मॅनेजिंग एजंटांचा नफा

औद्योगिक लिमिटेड कंपन्यांचा कारभार मॅनेजिंग एजंटांकडे असतो व हे मॅनेजिंग एजंट करारानुसारच परंतु भरमसाट पैसा मिळवितात, अशी त्यांच्याविरुद्ध साधारण ओरड असते. योग्य अलावन्स व नफ्याचा वाजवी वाटा, एवढ्यावर मॅनेजिंग एजंट संतुष्ट राहिले तर भागिदारांस तक्रार करण्याचें कांहींच प्रयोजन उरणार नाहीं. परंतु कांहीं मॅनेजिंग एजन्सीच्या करारांतील अटी मॅनेजिंग एजंटांना अवास्तव अनुकूल असतात. उदाहरणार्थ, कांहीं मॅनेजिंग एजंट दरमहा १,००० ते १,५०० रुपये घेऊन शिवाय घसारा, इनकम टॅक्स, सुपर टॅक्स, एक्सेस प्रॉफिट टॅक्स वगैरे न काढतां राहाणाऱ्या निवळ नफ्याचा १०% भाग घेतात. नफ्याच्या १०% किंवा वसूल भाडवलाच्या १½% रकमेइतकी रक्कम घेणारेहि कांहीं मॅनेजिंग एजंट क्वचित् आढळतात. स्टोर्स, कच्चा माल, कपास, सूत, इत्यादींच्या खरेदीविक्रीवर कमिशन घेणारेहि मॅनेजिंग एजंट आहेत. कसोशीनें खरेदी करण्याचा काटकसरीचा दुसरा मार्ग असणें शक्य नाहीं काय! कापडाच्या किंवा सुताच्या गाठीवर कांहीं मॅनेजिंग एजंट १० ते १२% कमिशन आकारतात. इतक्या चात्या किंवा अमुक माग वाढविले म्हणजे ऑफिस अलावन्समध्यें इतकी वाढ व्हावयाची असा कांहीं मॅनेजिंग एजंटांचा करार असतो. बँका व विमा कंपन्या यांचा कारभार पहाण्यास मॅनेजिंग एजंटाची नेमणूक करतां येत नाहीं, परंतु मॅनेजिंग डायरेक्टर किंवा मॅनेजर यांचें वेतन नफ्यावर किंवा मिळणाऱ्या हप्त्यांच्या उत्पन्नावर अवलंबून ठेवलेलें कित्येक कंपन्यांत आढळतें. ही पद्धत यापुढें चालू राहणार नाहीं, अशी दुरुस्ती कायद्यांत केली जावयाची आहे. कंपनी काढणाऱ्या मॅनेजिंग एजंटास त्याच्या पत्करलेल्या जोखिमेच्या मानानें व कर्तबगारीच्या प्रमाणांत नफ्यामध्यें भागीदारी मिळणें रास्त असलें, तरी बहुंशीं भागीदारांच्या व ठेवीदारांच्या पैशावर व सर्वांच्या सक्रिय सहानुभूतीवर कंपन्या यशस्वी करणाऱ्या महाराष्ट्रीय मॅनेजिंग एजंटांनीं जरा संयम दाखविणें उचित आहे. मध्यम वर्गातील लोकांच्या बचतीच्या पैशाच्या आसनावर श्रीमंत होऊन त्याचा ढोल मिरविणाऱ्या मॅनेजिंग एजंटांचें उदाहरण महाराष्ट्रीय आर्थिक व औद्योगिक प्रगतीचा जिव्हाळा वाटणाऱ्या स्वार्थत्यागी सामान्य नागरिकांचे डोळ्यांत सलण्याचा संभव असतो, हें लक्षांत ठेवणें पाहिजे. मॅनेजिंग एजन्सीच्या नफ्याचा विनियोग मॅनेजिंग एजंट कसा करतात इकडे लोकांचें लक्ष असतें, हें विसरून चालणार नाहीं.

रशियाशीं अमेरिकेचा व्यापार

अमेरिकेच्या प्रमुख व्यापारी चेंबरचे अध्यक्ष, मि. ॲनसन, यांनीं रशियास भेट देऊन तेथें अमेरिकन व्यापारास किती वाव आहे, याचें निरीक्षण केलें. रशिया पूर्वस्थितीस येण्यासाठी त्याला १० ते ३० वर्षे लांब मुदतीच्या कर्जाची आवश्यकता आहे असें त्यांनीं एका मुलाखतींत सांगितलें. सर्व खरेदी रशियन सरकारच करील, खासगी व्यापार होणार नाहीं; तथापि भांडवलशाही व कम्यूनिझम यांचा परस्पर व्यापार चालण्यास अडचण पडणार नाहीं, असें ते म्हणाले.

दि मिरज स्टेट बँक लि.

मिरज

(स्थापना : १९१९)

अधिकृत भांडवल ... ... रु. १,००,०००
विकीस काढलेलें व खपलेलें... रु. १,००,०००
प्रत्येक शेअरचे रु. १०० प्रमाणें
वसूल झालेलें ... रु. १०,०००
रिझर्व्ह व इतर फंड ... रु. १,००,०००चे वर
एकूण खेळतें भांडवल ... रु. ४९,००,०००चे वर

डायरेक्टर्स

१ रावसा. वि. पां. बेडेकर, बी. एस्सी., बी. ई. (चेअरमन)
१ डॉ. कृ. गो. गोसावी, एल्. सी. पी. एस्.
१ रावसा. वि. स. आपटे, बी. ए., एलएल्. बी.
४ श्री. केशवदास सीतारामदास शेटजी
५ श्री. रामचंद्र चिंतामण आपटे

शाखा

लक्ष्मेश्वर (जि. धारवाड), मोढानिंब व कुर्डूवाडी (जि. सोलापूर)

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. सरकारी रोखे, शेअर्स, सोनें, माल, स्थावर मिळकत वगैरेचे तारणावर कर्ज अगर कॅश क्रेडिट दिलें जातें. समक्ष चौकशी बँकेकडे करावी अगर लिहावे.

के. डी. शिराळकर
मॅनेजर.

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड.

(स्थापना १९१८)

अधिकृत व वसूल झालेलें भांडवल रु. २,००,०००
रिझर्व्ह व इतर फंड रु. १,३२,०००
ठेवी रु. ३८,००,०००
इन्व्हेस्टमेंट्स रु. ३४,००,०००
खेळतें भांडवल रु. ४२,००,०००

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

सब-ऑफिस
दादर.

हेड-ऑफिस
सारस्वत बँक बिल्डिंग.
मुंबई ४.

दि सांगली स्टेट सेंट्रल कोऑपरेटिव्ह बँक लि., सांगली

स्थापना : १९२७ रु.

अधिकृत भांडवल : : २,००,०००
भरलेलें भांडवल : : ६८,२२०
एकूण फंड्स : : ९३,००० वर
खेळतें भांडवल : : ७,००,००० वर

या बँकेत मुदतीच्या, सेव्हिंग व करंट ठेवी स्वीकारल्या जातात. सोन्याचे तारणावर सभासदांना कर्ज दिलें जातें. चेक-हुंड्यांची खरेदी-विक्री, रेल्वे रिसीटस यांची वसुली वगैरे सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

— अधिक माहितीकरितां समक्ष भेटा अगर लिहा —

ना. पां. ठाणेदार
मॅनेजर

गांवोगांवीं विक्रेते पाहिजेत.

A 9

क्विनीनचे ऐवजीं मलेरियाकरतां खात्रीचा अनुभविक उपाय म्हणून 'एनाईन' वापरतात.

अलपाईन प्रॉडक्टस् (इंडिया) पुणें २

गिरगांव मुंबई नं. ४

महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

इन्कम टॅक्सबाबत मुंबई हायकोर्टाचे दोन निवाडे

भागीदारांच्या भागीवरील इन्कम टॅक्स

शापुरजी पालनजी मिस्त्री हे मेसर्स शापुरजी पालनजी आणि कं. ह्या कंत्राटदार फर्मचे एक भागीदार होते. त्यांचा हिस्सा १० आणे ८ पै होता व त्यांचे बंधु फिरोजशा ह्यांचा हिस्सा ५ आणे ४ पै होता. १९३७ सालीं शापुरजींनीं आपल्या हिश्श्यापैकी ४ आणे आपला मुलगा कैखुश्रू ह्यास देऊन त्यास भागीदारींत घेतलें. त्यांचा स्वत:चा हिस्सा अर्थातच ६ आणे ८ पै उरला. त्यांची भागीदारी नोंदलेली होती व तिघेजण भागीदार असल्याचें सर्टिफिकेट देण्यांत आलेलें होतें. कैखुश्रू हा आपल्या वडिलांचा केवळ एक मामुली प्रतिनिधी होता. त्याच्या हिश्श्यावर खरी मालकी शापुरजीचीच होती, असें इन्कम टॅक्स अधिकाऱ्याचें मत पडलें व त्यानें शापुरजीवर व त्यांच्या मुलाच्या उत्पन्नावरहि कर बसाविला. मुलाचें उत्पन्न हें शापुरजींचें उत्पन्न ठराविण्यांत आलें. ह्यावर अखेर मुंबई हायकोर्टात अपील करण्यांत आलें. नोंदलेल्या भागीदारीच्या करारपत्राचे मागें जाऊन, एका भागीदाराचें उत्पन्न हें वास्तविक दुसऱ्या भागीदाराचेंच उत्पन्न आहे, असें ठरविण्याचा अधिकार इन्कम टॅक्स अधिकाऱ्याला आहे किंवा नाहीं, हा महत्त्वाचा प्रश्न येथें उपस्थित झाला.

"केवळ एखादी फर्म नोंदलेली आहे म्हणून तिच्या भागीदारांच्या वाटणीसंबंधीं खोलांत जाऊन चौकशी करण्याचा अधिकार इन्कम टॅक्स अधिकाऱ्यास उरत नाहीं, हें सयुक्तिक नाहीं. चौकशी करून भागीदारांच्या व्यक्तिगत खऱ्या उत्पन्नावर कर आकारण्याचा अधिकार इन्कम टॅक्स अधिकाऱ्यास आहे. शापुरजींच्या उत्पन्नांत कैखुश्रूचें उत्पन्न धरलें ही गोष्ट इन्कम टॅक्स अधिकाऱ्यानें योग्यच केली" असा हायकोर्टानें निवाडा केला.

ट्रस्ट मिळकतीचें उत्पन्न

रामजी केशवजीचा मुलगा, वसनजी, ह्यानें १९३६ सालीं मालमत्तेच्या वाटणीसाठी मुंबई हायकोर्टात रामजी केशवजी व कुटुंबाचे इतर घटक, ह्यांवर दावा लावला. त्यांत तडजोड होऊन जो हुकूमनामा झाला, त्या अन्वयें रामजीनें आपल्या पत्नीच्या हितासाठी एक ट्रस्ट डीड केलें. ट्रस्ट मिळकतीचें उत्पन्न हें रामजी केशवजीचेंच उत्पन्न आहे असें इन्कम टॅक्स अधिकाऱ्यानें ठरविलें. रामजीनें केलेल्या ट्रस्टमध्यें, उत्पन्नावर ट्रस्ट करणाराचा पुन: अधिकार असण्याची योजना असल्याकारणानें, ट्रस्ट डीडअन्वयें उत्पन्न पूर्णत: दुसऱ्याचे ताब्यांत जात नाहीं, ह्या मुद्यावर रामजीवर इन्कम टॅक्स बसविण्यांत आला. मुंबई हायकोर्टाकडे हें प्रकरण गेलें. कांहीं कारण घडलें तरच ट्रस्ट करणारास पुन: अधिकार प्राप्त होणार, एरव्ही नाहीं; ह्यामुळें ट्रस्टची मिळकत रामजीवर कर बसविण्याचे दृष्टीनें रामजीकडे वर्ग होत नाहीं, असें हायकोर्टाचें म्हणणें पडलें. रामजीनें आपल्या पत्नीच्या नांवें विश्वस्तपत्र केलें व ती जिवंत असेपर्यंत रामजीला कांहींच अधिकार प्राप्त होत नव्हता. तिच्या आयुष्याच्या मुदतींत त्याला ट्रस्टकडून उत्पन्न मिळण्याचा प्रश्नच उपस्थित होत नसल्याकारणानें पत्नीस मिळावयाचें उत्पन्न रामजीच्या प्राप्तींत दाखल करणें योग्य नाहीं, असा हायकोर्टानें निवाडा केला.

सांडू ब्रदर्स यांचीं औषधें वापरा

सांडू ब्रदर्स

म्हणजेच

ओरिजिनल

ब्राम्ही तेल

अनुभवसिद्ध गुणधर्म

★ केस गळत राहून डोके चमकी लागते.
★ मेंदूची दोके दुखण्याची सवय, डोक्याची आग, केसें पांढरे होण्याचे विकार वाहीतेलाचे सतत उपयोगानें नष्ट होतात.
★ वाढण्याची कायें करूनही वाढत नाहीं, कोणत्याही तापावरचे कडीचे ऐवजी या तेलाचा उपयोग केल्यानें तापाचे ट्रेलेच्या कमी कमी होण्यास मदत होते.
★ नियमित उपयोग करीत गेल्यास केसांची वाढ होऊन ते काळे घोर होतात व तेजस्वी राहतात.

महत्त्वाची सूचना

वाही तेलाची रूपना सुरुची "सांडू ब्रदर्स" याची नकल याची नकल फार होऊ लागली आहे. "सांडू वाही" तेलाचा दाम व रंग नेहमीचा असून त्यात रंग अगर कोणतीही इतर भेसळ केलेली नाहीं.

ओरिजिनल ब्राम्ही तेलाचे एकटेच कारखानदार

द.कृ. सांडू ब्रदर्स

चेंबूर लिमिटेड

मॅन्युफॅक्चरिंग केमिस्ट आणि ड्रगिस्ट

चेंबूर – मुंबई

१. पुणें चीफ एजंट– श्रीदत्त एजन्सी – रविवार पेठ, पुणें.
२. सातारा जिल्हा चीफ एजंट-जोशी आणि मंडळी तांदुळआळी, भवानी पेठ–सातारा.
३. सांगली स्टॉकिस्ट—कुलकर्णी बंधु.
४. हुबळी शाखा—कोप्पीकर रोड–हुबळी.
५. कोल्हापूर प्रमुख स्टॉकिस्ट– मे. भागवत आणि कंपनी, कांच लाईन केसरि मार्केट.

★ आमचे आश्रयदात्यांस चालू दिवाळी आनंदाची जावो ★
चालू परिस्थितींतही मुंबईत राहाण्यास सर्व बाजूंनीं सुखसोईचें असें एकच ठिकाण.
— वि. वा. गोखले यांचें —
न्यू श्रीकृष्ण बोर्डिंग हाऊस टे. नं. ६१२४६
कोहिनूर सिनेमासमोर, दादर (B. B. C. I. Ry.)

दिवाळींत
'वेस्टर्न इंडिया'
चें स्मरण ठेवा.

वेस्टर्न इंडियाची पॉलिसी हा संसारी जनांचा हितकर्ता मित्र आहे. या मित्रास दिवाळीच्या आनंदांत विसरूं नका. स्मरणपूर्वक त्याचें स्वागत या प्रसंगीं आपण केल्यास आपल्या यापुढील अनेक दिवाळ्या मोठ्या सुखासमाधानांत जातील. या संस्थेचें एजन्सी कामहि अत्यंत लाभदायक असल्यानें कंपनीचे अनेक एजंट आज सुखाचा संसार करीत आहेत.

विशेष माहितीसाठीं पत्रव्यवहार करा:—
मॅनेजर:—वेस्टर्न इंडिया आयुर्विमा कंपनी लि.
सातारा शहर.
—: पुणें शाखा :—
१७९ बुधवार, लक्ष्मी रस्ता, पुणें २.

"मागोरा" चा अभिनव व आश्चर्यकारक शोध
ढेकणांच्या उदवत्त्या
[A. B. C.]
BUG-COILS (A. B. C.)
प्रत्येक उदबत्ती रात्रभर जळते व तोंपर्यंत ढेकूण आपलें ठिकाण सोडून बाहेर येत नाहींत.
विशिष्ट धुरांमुळें हा चमत्कार होतो.
बॉक्समध्यें बारा तांबड्या उदवत्त्या
तांबड्या पॅकिंगमध्यें
बॉक्स किं. रु. १—८—०
—: लायसॉफ :—
डोक्यांतील उवा एक तासांत मारण्याचा शोध—दोन वेळ उपयोग
—बाटली किंमत १ रुपया. ट. ख. नि.—
दि मागोरा केमिकल कंपनी, लि.
हिराबाग, पुणें २

दि व्हल्कन इन्शुअरन्स कंपनी लि. मुंबई.
(स्थापना : १९१९)
आग, मोटार, अपघात, मरीन इत्यादींचे विमे स्वीकारले जातात.
—: चेअरमन :—
सर चिमणलाल सेटलवाड, के. सी. आय. ई.
: पुणें शाखा : : हेड ऑफिस :
१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड. : : ७३, चर्चगेट स्टेशनसमोर, फोर्ट, मुंबई

रशियांत काडीमोड महाग व अवघड करण्यांत आला

जननसंख्या वाढविण्याचे प्रयत्न

रशियांत जननसंख्या वाढविण्याचे प्रयत्न चालू आहेत. शहरी लोकांतील जननसंख्या वाढविण्याकडे विशेष लक्ष आहे. निपुत्रिक शहरी माणसास आपल्या उत्पन्नाच्या ६% इतकी रकम सरकारी कर म्हणून द्यावी लागते. १९३६ पर्यंत, रशियांत काडीमोड ही बाब अत्यंत स्वस्त व सोपी होती. ती आतां महाग व अवघड करून ठेवण्यांत आली आहे. दोन-चार रुबल्समध्यें पूर्वी काडीमोड मिळत असे; आतां प्राथमिक कोर्टाच्या कामासच ५० रुबल्स खर्च येतो. आघाडीवर गेलेल्या सैनिकाच्या पत्नीस ८ जुलै, १९४४ पूर्वी काडीमोड मिळावितां येत असे; आतां नव्या कायद्याप्रमाणें पती व पत्नी ह्या दोघांसहि कोर्टांत उपस्थित व्हावें लागतें. खालच्या कोर्टाचें काम दोन्ही पक्षांमध्यें तडजोड घडवून आणण्याचा प्रयत्न करणें, हें असतें. तें अयशस्वी झालें तर घटस्फोटास पुरेसें कारण घडलेलें आहे किंवा नाहीं, याची कोर्ट चौकशी करतें आणि निवाड्यासाठी प्रकरण वरच्या कोर्टाकडे पाठवितें. अशीं एकावर एक चार अपील कोर्टें आहेत, त्या सर्वांतून बाहेर पडण्यास ५०० ते २,००० रुबल्स खर्च येतो. वकिलाची फी वेगळीच. कोर्टांतील काम ऐकण्याची सर्वांस मुभा असते, त्या कारणानें कुप्रसिद्धीची भीति हीहि बाब कांहीं काडमोड-वाल्यांस थोडी जाचक वाटते. काडीमोड "योग्य" कारण घडलें तर मिळूं शकतो, परंतु ह्यासंबंधांतील नवा कायदा "योग्य" शब्दाचा अर्थ स्पष्ट करून सांगत नाहीं. युद्धोत्तर पुनर्घटनेची रशियाची ही पूर्व-तयारी आहे, असें सांगण्यांत येतें.

इंग्लंडमध्यें वर्णद्वेषाचें प्रदर्शन

लंडनच्या, बाँब-धोक्याचे क्षेत्रांतील उपनगरांत राहणाऱ्या एका धंदेवाइकानें आपल्या पत्नीस व तीन वर्षांच्या मुलास लंडनबाहेर खेडेगांवीं पाठविण्याची खटपट करून व्यवस्था केली व एका मध्यमवर्गीय इंग्रज स्त्रीच्या घरीं भाड्यानें जागा मिळविली. त्या स्त्रीनें ह्या कुटुंबाचें चांगलें स्वागत केलें. पुढें संभाषणांत तिला कळून आलें, कीं हें निर्वासित कुटुंब ज्यू रक्ताचें आहे व जर्मनींतून सुटका होऊन तें आलेलें आहे. ह्या गोष्टीची माहिती मिळतांच तिनें त्या कुटुंबास, डोळ्यास पाणी आणून सांगितलें कीं मी माझ्या घरीं तुम्हांस राहूं देऊं शकत नाहीं. उद्तव्या बाँबच्या धोक्याचे ठिकाणीं धाकट्या मुलास परत पुनः जावें लागलें तरी त्या आई-लेकानें तात्काळ घर खाली केलें पाहिजे असा त्याचा अर्थ होता. मुलाची आई ही सुसंस्कृत व हळव्या मनाची बाई असल्याकारणानें ह्या प्रकरणाचा तिच्या मनावर काय परिणाम झाला असेल ह्याची कल्पना केलेली बरी. घरमालकीण ही शेजाऱ्या-पाजाऱ्यांच्या दुराग्रहावरून त्या आई-लेकरास लंडनमध्यें पुनः पाठवीत होती; तिच्या स्वतःचा नाइलाज झाला, असा तिनें देखावा केला. ही गोष्ट तर जास्तच वाईट आहे. वरील माहिती देणारें एक पत्र "न्यू स्टेट्समन अँड नेशन" पत्र्यें प्रसिद्ध झालें आहे.

"Consent of the Central Government has been obtained to this issue under Defence of India Rule 94-A. It must be distinctly understood that in giving this consent the Government of India do not take any responsibility for the financial soundness of any schemes or for the correctness of any of the statements made or opinions expressed with regard to them."

दि बँक ऑफ महाराष्ट्र
लि. पुणें
विक्रीस काढलेलें नवीन
भाण्डवल
रु. १०,००,०००
(प्रत्येकीं रु. ५० च्या २०,००० भागांत विभागलेलें)

वरील भाग ता. ४ ऑक्टोबर १९४४ रोजीं बँकेच्या पटावर असलेल्या भागीदारांना त्यांच्या प्रत्येकीं जुन्या भागाला एक नवीन भाग रु. ५ वाढीनें देऊं केले आहेत. अर्ज पाठविण्याची शेवटची तारीख १५ डिसेंबर १९४४ ही आहे. पहिल्या भागीदारांनीं घेऊन शिल्लक राहिलेले भाग इतरांस तेवढ्याच वाढीनें (रु. ५) देण्यांत येतील.

: संचालक मंडळ :

श्री. धों. कृ. खाठे, अध्यक्ष.

श्री. वा. पुं. वर्दे
श्री. न. ब. पवार
श्री. चिं. वि. रानडे
श्री. मा. रा. जोशी
श्री. फ. सं. पस्तमजी
प्रो. वा. गो. काळे
श्री. र. चिं. सोहोनी
श्री. श्री. बा. मराठे
श्री. म. वि. मोकाशे
श्री. वि. ह. देशमुख

ती. व्ही. जोग
मॅनेजर.

महाराष्ट्राची पहिली व एकमेव शेड्यूल्ड बँक

दि न्यू सिटिझन बँक ऑफ इंडिया लिमिटेड

वाढता धंदा! वाढता नफा!! सर्व महाराष्ट्रभर ३० शाखा!!!

रोख वसूल झालेलें भांडवल	: रु.	७,६२,७००	३०-९-४४ पर्यंत
रोख वसूल भांडवल व रिझर्व्हस्	: रु.	८,१०,००० हून अधिक	,, ,,
एकूण चालू भांडवल	: रु.	१,३५,००,०००	,, ,, ,, ,,

बँकेनें सर्व अग्रहक्कांच्या (Cumulative Preference) शेअर्सवर प्रारंभापासून ३१-३-४४ पर्यंत ५% प्रमाणें नफा वाटला आहे. १९४३-४४ सालासाठी ऑर्डिनरी शेअर्सवर ५% प्रमाणें व डिफर्ड शेअर्सवर ६% प्रमाणें नफा वाटला आहे.

कायदेशीर जबाबदारी नसतांनाही ऑर्डिनरी व डिफर्ड शेअर्सवर पहिल्या म्हणजे १९३८-३९ सालाबद्दल ३% प्रमाणें नफा वाटला आहे, व आणखी पुढच्या ४ वर्षांसाठी ३% नफा वाटावा अशी बोर्डाची शिफारस आहे.

(Sanction of the Central Government has been obtained to this issue under D. I. R. 94A. It must be distinctly understood that in giving this consent the Government of India do not take any responsibility for the financial soundness of any schemes or for the correctness of any of the statements made or opinions expressed with regard to them.)

हिंदुस्थान सरकारनें बँकेचे दर्शनी किंमतीचे प्रत्येकी रु. २५ चे ३६,१२७ ऑर्डिनरी शेअर्स एकूण दर्शनी किंमत रु. ९,०३,१७५ चे विकण्याची परवानगी दिली आहे. त्यांपैकीं चार लाख रुपयांचे शेअर्सची विक्री झाली असून शेअर्सना वाढती मागणी आहे.

राहिलेले पांच लाखांचे शेअर्स अंडरराईट करण्यासंबंधीं बँकेकडे मागण्या आल्या आहेत. तरी ज्यांना शेअर्स घेणें असेल त्यांनीं त्वरा करावी.

प्रत्येक शेअर रु. ३ जादा (Premium) घेऊन विकण्यांत येत आहे. प्रत्येक शेअरमागें रु. २५ पैकीं रु. १२-८-० व रु. ३ जादा असे एकूण रु. १५-८-० भरावयाचे. राहिलेल्या रु. १२-८-० ची मागणी केली जावयाची नसून ती रकम Uncalled Reserve म्हणून रहावयाची आहे.

महाराष्ट्रांतील व्यापार व उद्योगधंदे वाढविण्याचे दृष्टीनें बँकांचें शेअर भांडवल मोठें असणें जरूर असते; म्हणून या बँकेचे शेअर्स घेऊन महाराष्ट्रीय व्यापाराच्या व उद्योगधंद्याच्या

वाढीला मदत करा.

शेअर्ससाठीं हेड ऑफिसकडे अगर खालीलपैकी कोणत्याही शाखेकडे मागणी करावी.
बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

: शाखा :

स्थानिक-मुंबई		बाहेरील			लौकरच शाखा उघडावयाचीं ठिकाणें
१ दादर	७ अमरावती	१३ धुळें	१९ मिरज	२५ नंदुरबार	१ अकोला (वऱ्हाड)
२ गिरगांव	८ अहमदनगर	१४ इचलकरंजी	२० महाड	२६ पुणें	२ चांदा (मराठी सी. पी.)
३ ग्रँट रोड	९ बेळगांव	१५ जळगांव	२१ मालेगांव	२७ सांगली	३ बेलापूर रोड) अहमदनगर
४ जव्हेरी बझार	१० बडनेरा	१६ कोल्हापूर	२२ नाशिक सिटी	२८ सोलापूर	४ कोपरगांव) जिल्हा
५ शीव	११ दिंडी	१७ कारंजा	२३ नाशिक रोड	२९ सिन्नर	
६ विलेपार्ले	१२ देवळाली	१८ लोणंद	२४ नागपूर	३० संगमनेर	

डी. डी. देशपांडे
मॅनेजिंग डायरेक्टर.

हें पत्र पुणें, पेठ सांगली पै. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. वामन काशे. बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' सांगली, पै. नं. १२७।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
सालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
(टपाल खेरीज माफ)
किरकोळ अंकास
दोन आणे.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष १० पुणें, बुधवार, तारीख २५ आक्टोबर, १९४४ अंक ४२

धी
बॉम्बे को-ऑपरेटिव
इन्शुअरन्स सोसायटी लि.

नवीन काम (१९४३)	रु.	३९,२७,६१९
एकंदर चालू विमे	रु.	१,६१,९०,५४१
जीवन विमा निधि	रु.	२२,१५,९७४
कुल उत्पन्न	रु.	१०,३३,०००

अध्यक्ष : शेठ माधवलाल मकनजी भट्ट, जे. पी.
मॅनेजर : श्री. जी. एच. ठाकोर, एम्. ए. (कँटब.)

महाराष्ट्र-कर्नाटकचे चीफ ऑर्गनाइझर्स :
श्री. कुळकर्णी आणि कं.
मुख्य कचेरी :
को-ऑपरेटिव इन्शुअरन्स बिल्डिंग,
सर फिरोजशाह मेहता रोड, कोट, मुंबई.

हिंदुस्थानची आघाडीवरील सहकारी संस्था

दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.
पुणें शहर
मांडवल :
(ता. ३१-५-४४ रोजीं)

अधिकृत व खपलेलें	:	रु. १०,००,०००
वसूल झालेलें	:	रु. ५,००,०००
रिझर्व्ह व इतर फंड	:	रु. १,०८,०००
एकूण खेळतें भांडवल	:	रु. ७५,००,००० चे वर

—: डायरेक्टर्स :—
श्री. धों. कृ. साठे, चेअरमन,
श्री. वा. पु. वर्दे, प्रो. वा. गो. काळे, श्री. न. ग. पवार,
श्री. श्री. गो. मराठे, श्री. त्रिं. वि. रानडे, श्री. र. चिं. सोहनी,
श्री. फ. हो. पदमजी, श्री. मा. रा. जोशी,
श्री. म. वि. गोखले, श्री. वि. ह. देशमुख
: शाखा :
पुणें ४, सदर्की, दलाल स्ट्रीट, (मुंबई), गिरगांव (मुंबई), जळगांव, नागपूर.
बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.
सी. व्ही. जोग
मॅनेजर

महाराष्ट्रांत लेखी गॅरंटी देणारे
पहिले व फक्त १ च
गोल्ड मेडॅलिस्ट् व मराठी वळणाचे स्पेशॅलिस्ट्
पेन्टर बेडेकर, ए. जी.,
बुधवार चौक, पुणें २ (सिटी)
बाहेरगांवचीं कामें रेल्वे, मोटार अगर पोस्टानें पाठवूं.

जिकडे तिकडे प्रशंसा
इमिटेशन दागिन्यांवर रासायनिक क्रिया करून खऱ्या सोन्याचा पत्रा चढविला जातो त्यामुळें दागिना केव्हांही खराब होत नाही, ही पूर्ण खात्री झाली. सोन्याचा पत्रा चढविलेल्या चार वांगड्या कि. आठ रु. गरजेसलच दागिना परत करणें झाल्यास वर चढविलेल्या सोन्याचे सर्वच्या सर्व पैसे परत देऊं.
मट कं. सांगली, S. M. C.
मट कंपनी शाखा—बुधवार पेठ, पुणें २.

गिरगांव
मुंबई नं. ४
महिंद्रकर ब्रदर्स
तयार कपड्याचे व्यापारी
बुधवार चौक,
पुणें

विविध माहिती

डालमिया सिमेंट लि.

वरील कंपनीस १९४३ असेरच्या वर्षी १४,३३,२३४ रुपये निव्वळ तोटा आला आहे! १९४३ साली कंपनीचा सर्व तयार माल सरकारच्या नियंत्रणासाठी होता. विक्रीची किंमत ठराविक होती परंतु उत्पादनखर्च मात्र वाढला, त्याचा हा परिणाम आहे. या सबबींतील तूट भरून मिळेल, असें समाधानकारक स्वरूपाचें आश्वासन दिलें, त्याप्रमाणें सरकारनें कंपनीला १४ लक्ष रुपये दिले. कंपनीनें लागलीच १९४४ सालासाठी ॲड इंटेरिम डिव्हिडंड जाहीर केलें. शेअरचा भाव १५ रु. ४ आ. चा १० रु. ८ आणे झाला.

साखरेचें उत्पादन अपेक्षेपेक्षां कमी

सप्टेंबर, १९४४ असेर १९४३-४४ च्या मोसमांत हिंदी साखर कारखान्यांत १२,२१,१९२ टन साखर तयार झाली. मोसम ऑक्टोबर असेर संपतो, तोंपर्यंत उत्पादनाचा आंकडा १२ लक्ष, २१½ हजार टनावर जाईल असें दिसत नाहीं. या मोसमांत साखरेचें उत्पादन उच्चांक गाठील अशी अपेक्षा होती. परंतु ती फोल ठरली आहे. १९३९-४० मधील उत्पादनाचा आंकडा १२,४१,७०० टन होता.

चांदी विकण्यास प्रारंभ

रिझर्व्ह बँकेनें १२५ रुपयांस १०० तोळे या दरानें चांदी विकण्यास गेल्या आठवड्यांत प्रारंभ केला आहे. याचा अर्थ, चांदीचा कमाल भाव आतां १२५ रुपये ठरला, असें समजावयाचें आहे.

के. अमृतलाल ओझा

कोटसा खाणींचे एक प्रमुख मालक श्री. अमृतलाल ओझा हे नुकतेच मरण पावले.

बियांसाठी हिंदुस्थान सरकार कर्ज व देणगी देणार

हिंदुस्थानानें भाजीपाल्याच्या बियांच्या आयातीवर अवलंबून राहूं नये, याकरितां देशांतच युरोपियन जातींच्या भाजीपाल्याचें बी तयार करण्यासाठी हिंदुस्थान सरकार प्रांतिक सरकारांना १ कोटि ५६ लक्ष रुपयांचें कर्ज व ५० लक्ष रुपये देणगी देणार आहे. ४,५१,००० पौंड बी तयार व्हावें, अशी अपेक्षा आहे.

दुकानाच्या पाटीची अक्षरें ६ इंचांपेक्षा मोठी नकोत

दुकानांच्या पाट्यांवरील ग्रेट ब्रिटनमध्यें निर्बंध आतां थोडे सैल करण्यांत आले आहेत. कमी उंचीवरून जाणाऱ्या विमानास दुकानाची पाटी वाचतां येता कामा नये एवढाच निर्बंध आतां शिल्लक आहे. या नियमाचा साधारण अर्थ असा, कीं पाटीचीं अक्षरें ६ इंचांपेक्षा मोठीं असूं नयेत.

हॉब्लन-नॉर्मन फंड

बँक ऑफ इंग्लंडच्या स्थापनेस २५० वर्षे पूर्ण झालीं, त्यानिमित्त बँकेच्या कोर्ट ऑफ डायरेक्टर्सनीं आर्थिक संशोधनासाठी एक लक्ष रुपयांचा ट्रस्ट निर्माण करण्याचें ठरविलें आहे. बँकेचे १६९४ मधील पहिले गव्हर्नर सर जॉन हॉब्लन व २४ वर्षे गव्हर्नर म्हणून काम करून नुकतेच सेवानिवृत्त झालेले मि. मॉंटेग्यू नॉर्मन या दोघांचे नांवानें स्मारक म्हणून त्या फंडास "हॉब्लन-नॉर्मन फंड" असें संबोधण्यांत येईल.

व्ही. पी. बेडेकर
आणि सन्स लि.
मुंबई.
मसाल्याचे व्यापारी
पुणें एजंट:—
द. ना. हेजीब

"मागोरा"चा अभिनव व आश्चर्यकारक शोध
ढेकणांच्या उदवत्त्या
(ABC)
BUG COILS (ABC)
प्रत्येक उदवत्ती रात्रभर जळते व तोंपर्यंत ढेकूण आपलें ठिकाण सोडून बाहेर येत नाहींत. विशिष्ट धुरामुळें हा चमत्कार होतो. बॉक्समध्यें १२ तांबड्या उदवत्त्या तांबड्या पॅकिंगमध्यें बॉक्स किं. रु. १८८, ट. स. निराळा.
दि मागोरा केमिकल कं. लि.,
हिरावाग, पुणें २

दि बँक ऑफ इंडिया लि.
[स्थापना: १९०६]
अधिकृत भांडवल ... ... रु. २,००,००,०००
वसूल झालेलें भांडवल ... ... रु. १,००,००,०००
रिझर्व्ह फंड ... ... रु. १,२३,००,०००
मुख्य कचेरी: ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.
मुंबईमधील शाखा: गुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.
इतर शाखा: अहमदाबाद (मद्र. मुख्य ऑफिस), अहमदाबाद (पोलिस ब्रिज शाखा), अहमदाबाद (स्टेशन शाखा), अमृतसर, अंधेरी (मुंबई शेजारीं), पांद्रे (मुंबई शेजारीं), कलकत्ता (क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्क्वेअर), जमशेदपूर कराची, मद्रास, नागपूर (किंग्जवे), नागपूर (इतवारी बझार), पुणें पुणें शहर, राजकोट, सुरत, भुज (कच्छ).
लंडन एजन्ट्स: वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.
डायरेक्टर्स: सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस. आय. (अध्यक्ष) श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के. नाईट; मि. ए. गेडिस; सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, जी. बी. ई., के. सी. आय. ई.; मि. दिनशा के. दाजी; श्री. रामनिवास रामनारायण.
करंट डिपॉझिट अकाउंट्स:
दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही असेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षां कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.
विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते, सर्व तऱ्हेचें ट्रस्टींचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.
एजंट:—एच्. ए. करीमभाई

अनुक्रमणिका

	पृष्ठ		पृष्ठ
१ विविध माहिती ...	३४६	- वद्–सहकारी नाट्यसंघ—"पीपल्स एंटरटेन्मेंट सोसायटी"—कै. गुरुनाथराव ओगले.	
२ बॉंबे को. बँक्स असोसिएशन	३४७	८ भिवंडी ता.को.खु.यूनियन	३५०
३ युद्धोत्तर काळांत मोटारींचें उत्पादन	३४७	९ दुधाचें रेशनिंग ...	३५०
४ अर्थन सहकारी बँकांपुढचे प्रश्न	३४८	१० पुर्णे जि. खरेदी-विक्री संघ	३५०
५ नगर सें. को. बँक ...	३४८	११ दंडिकर मशीन वर्क्स	३५०
६ संस्थानिकाच्या नातेवाइकावर कर	३४८	१२ रोख पैशाची सुरक्षितता	३५१
७ स्फुट विचार	३४९	१३ सहकारी खरेदी–विक्रीचें महत्त्व	३५१
मुंबई प्रांतिक सहकारी परिषद		१४ पुर्णे सहकार सप्ताह...	३५२

अर्थ

बुधवार, ता. २५ आक्टोबर, १९४४

बॉंबे को. बँक्स असोसिएशन

गेल्या वर्षांतील कामगिरी

बॉंबे को-ऑपरेटिव्ह बँक्स असोसिएशनचा ३० जून, १९४४ अखेरचा पांचवा वार्षिक अहवाल प्रसिद्ध झाला आहे, त्यावरून ह्या संस्थेच्या उपयुक्त कार्याची चांगली कल्पना येते. अहवालाचे वर्षी सहा बँका संस्थेच्या नव्यानें सभासद झाल्या, म्हणजे आतां १२ सेंट्रल बँका, १ बँकिंग यूनियन व ३६ अर्बन बँका असोसिएशनच्या पटावर आहेत. ॲग्रिकल्चरल डेटर्स रिलीफ ॲक्ट आतां प्रांतांतील बऱ्याच तालुक्यांत लागू होत असल्याकारणानें त्यांचा मध्यवर्ती बँकांच्या व्यवहारावर काय परिणाम होईल, ह्याची बारकाईनें पहाणी करणें आवश्यक झालें, आणि बदललेल्या परिस्थितींत मध्यवर्ती बँकांनीं शेतकऱ्यांस नवीं कर्जे कोणत्या अटींवर द्यावीं व बँकांना सरकारकडून कोणत्या सवलती मिळाव्या लागतील ह्याविषयीं असोसिएशननें चर्चा करून सरकार व सभासद बँका ह्या दोघांसहि मार्गदर्शन केलें. असोसिएशननें तिच्या घटनेंतील २ (५) ह्या नियमास अनुसरून अद्याप सभासद बँकांच्या तपासणीचें काम सुरू केलेलें नाहीं, ह्याकडे रजिस्ट्रारनें आपल्या १९४१-४२ च्या वार्षिक रिपोर्टांत लक्ष वेधलें होतें. असोसिएशननें कोणत्या बँकांची कोणत्या परिस्थितींत तपासणी करावयाची, हें कार्यकारी समितीनें आतां ठरविलें आहे. एकापेक्षां अधिक क्रेडिट सोसायट्यांचें सभासदत्व ज्यांनीं ४५वा नियम होण्याचे अगोदर मिळविलेलें आहे, अशांचें सभासदत्व ह्यापुढेंहि चालू रहाण्यास प्रत्यवाय नसावा; फक्त एक सोडून बाकीच्या सोसायट्यांत बिगर-कर्जदार सभासद म्हणून त्यांचें नांव नोंदलें जावें आणि कर्जाचे व्यास्थेंत मुदती ठेवी, सरकारी रोखे, जंगम माल, इत्यादींचें तारणावरील कर्जाचा समावेश होऊं नये अशा अर्थाचें सर्क्युलर रजिस्ट्रारनीं काढण्याचें योजिलें असल्यानें ४५ व्या नियमाचे अंमलबजावणीबाबत अडचणी उरणार नाहींत, अशी अपेक्षा आहे. अर्बन बँकांच्या व्यवहाराचे बाबीस बाध मिळावा ह्या दृष्टीनें असोसिएशननें रजिस्ट्रारशीं चर्चा केली, तीस अनुसरून सर्क्युलर निघालीं आहेत. अर्बन बँकांसाठी सुपरवाइझिंग यूनियन्स स्थापन करण्यांत याव्यीं, ही रजिस्ट्रारची सूचना बहुसंख्य सभासद बँकांस पसंत पडली नाहीं.

सहकारी बँकांनीं आपल्या ठेवीवरील व्याजाचे दर उतरविले तरी त्यांना ८ व्या नियमाचें बंधन संभाळणें कठीण झालें. ह्या नियमांत सुधारणा व्हावी ह्याबद्दल असोसिएशननें निकडीचे प्रयत्न केले. आतां सरकारनें नियमांतील अट सौम्य करून भाग भांडवल, रिझर्व्ह फंड व बिल्डिंग फंड ह्यांतून साठलेल्या तोटा उणें करून येणाऱ्या रकमेच्या बारा पटींचे आंत बँकांच्या ठेवींची रक्कम पाहिजे, असें ठरविलें आहे. मात्र, सरकारनें त्यांची गुंतवणूक, व्याजाचा दर, इत्यादि संबंधांत बंधनें घातलीं आहेत. शेतींच्या मालाचे किंमतीमधील वाढीचा सोसायट्यांच्या सभासदांचे कर्जाच्या व्यवहारावर काय परिणाम झाला आहे, ह्याविषयीं असोसिएशननें तपशीलवार माहिती मागविली, ती संकलित करून तिचा गोषवारा रिपोर्टांत देण्यांत आलेला आहे. बँकांकडून त्यांचेकडील ठेवी, तरते पैसे, तरत्या पैशाचें एकूण देण्यांशीं प्रमाण व कर्जे इत्यादि संबंधी तपशीलवार माहिती असोसिएशननें मागवून तक्ते तयार केले आहेत. त्यांपासून बोधप्रद निष्कर्ष निघेल अशी अपेक्षा आहे. युद्धजन्य आर्थिक परिस्थितीचा सोसायट्यांचे सभासदांवर काय परिणाम झाला ह्याची पहाणी करण्याचें, असोसिएशनच्या विनंतीवरून सहकारी इन्स्टिट्यूटनें मान्य केलें आहे. असोसिएशन त्यासाठी इन्स्टिट्यूटला ५०० रुपये ग्रँन्ट देणार आहे.

असोसिएशननें केलेल्या कामगिरीचा अगदीं ओझरता उल्लेख येथें करण्यांत आला आहे, परंतु त्यावरूनहि ही संस्था सहकारी बँकिंगची उपयुक्तता वाढविण्याचे दृष्टीनें कसें कार्य करीत आहे ह्याची कल्पना येईल. असोसिएशनचे ऑनररी सेक्रेटरी, प्रांतिक सहकारी बँकेचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. वैकुंठराय मेहता, ह्यांच्याकडेच ह्या कार्याचें श्रेय मुख्यत: जातें, हें उघड आहे. सहकारी खात्याच्या रजिस्ट्रारशी सलोख्याचे संबंध राखून, असोसिएशनची प्रतिष्ठा वाढवून, तिच्या मतास महत्त्व प्राप्त करून देण्याचें काम त्यांनीं गेल्या पांच वर्षांत यशस्वी रीतीनें केलें आहे. रजिस्ट्रारनींहि, महत्त्वाच्या मुद्यांवर असोसिएशनशी चर्चा करण्याची प्रथा ठेवली आहे, त्यामुळेंच असोसिएशनचें कार्य प्रभावी होत आहे.

युद्धोत्तर काळांत मोटारींचें उत्पादन

अमेरिकेंत मोटारींचें उत्पादन बंद असून मोटारींच्या कारखान्यांत युद्धसाहित्याची निर्मिति चालू आहे. तथापि, कारखान्यांतील कांहीं भाग मोटारींच्या युद्धोत्तर उत्पादनाची आखणी करण्यासाठी राखून ठेवण्यांत आलेला असतो व त्यांत तज्ज्ञ इंजिनिअर आपलें डोकें चालवीत असतात. १९३९ सालानंतर आतां यांत्रिक सुधारणा इतक्या झाल्या आहेत, कीं त्यांचा फायदा होऊन मोटारी बनवावयाच्या म्हटल्या म्हणजे रचना अगदीं नव्या पद्धतीनें करावी लागेल, आणि आखणी व प्रत्यक्ष उत्पादन ह्यांचेमध्यें बराच काळ लोटावा लागेल. म्हणून अमेरिकेंत युद्धसमाप्तीनंतर १९४२ च्या मॉडेलच्याच मोटारी प्रथम काढण्यांत येतील. त्या मोटारींचीं दारें व खिडक्या बटनें दाबून उघडतां लावतां येतात व गिअर बदलण्याच्या पद्धतींतहि सुधारणा केलेली आहे. कोणतीहि ब्रिटिश मोटार ह्या अमेरिकन मोटारींशी तात्काळ स्पर्धा करून टिकूं शकणार नाहीं. ब्रिटिश मोटार कारखानदारांस ह्या संबंधांत काळजी वाटत आहे.

अर्बन सहकारी बँकांपुढचे प्रश्न

प्रो. काळे ह्यांनी कोल्हापूर येथें केलेली चर्चा

कोल्हापूर नगरपालिकेस नव्वद वर्षे पुरीं झालीं आणि तिला बरो म्युनिसिपालिटीचा उच्च दर्जा प्राप्त झाला ह्या निमित्तानें आणि तिनें हातीं घेतलेल्या सुधारणांच्या योजनांचे प्रसंगानें सप्ताह साजरा करण्यांत आला. त्याबद्दलीं श्री. नाईक ह्यांनीं लिहिलेल्या नगरपालिकेच्या इतिहासाचें प्रकाशन प्रो. काळे यांच्या हस्तें समारंभपूर्वक गेल्या १२ तारखेस झालें. ह्या सप्ताहांत युद्धोत्तर जागतिक चलनव्यवस्था ह्या विषयावर प्रो. काळे ह्यांचें जाहीर व्याख्यान हि झालें. त्यांच्या कोल्हापुरांतील वास्तव्याचा फायदा घेऊन स्थानिक श्रीमहालक्ष्मी को-ऑपरेटिव्ह बँकेच्या चालकांनीं सहकारी बँकांच्या पुढें असलेल्या अडचणींच्या प्रश्नांची चर्चा घडवून आणली. त्याप्रसंगीं सुमारें शंभर कार्यकर्ते उपस्थित होते.

कोल्हापुरांतील बहुतेक सर्व सहकारी बँकांशीं संबंध असलेल्या मंडळीचा त्यांत भरणा होता. प्रो. काळे ह्यांनीं सहकारी बँकांची परिस्थिति कोणत्या प्रकारची आहे आणि युद्धोत्तर काळांत त्यांस कोणत्या अडचणींशी झगडावें लागेल ह्याविषयीं प्रथम विवेचन केलें. सहकारी बँकांचें उद्दिष्ट सामान्य स्थितींतील लोकांस बचतीची सवय लागून व्यापार-उद्योगधंद्यांसाठी व घरगुती कामासाठी भांडवल पुरवणें आणि त्यांस स्वार्थत्यागपूर्वक परस्पर सहायाची सवय लावणें हें आहे आणि त्या व इतर बँका ह्यांचेमध्यें महत्त्वाचा तात्विक भेद आहे, ही गोष्ट त्यांनीं स्पष्ट केली. व्यवहारदृष्टीनें दोन्ही वर्गांतील बँकांचा हिशेबीपणा चोख असला पाहिजे असें त्यांनीं बजावलें. पुढें चलन कमी होऊन बाजारभाव उतरतील आणि ठेवींस ओहोटी लागेल, त्या घटनेस तोंड देण्याची तयारी रिझर्व्ह व रोख्यांतील गुंतवण मजबूत राखून बँकांनीं एव्हांपासूनच ठेवावी असें त्यांनीं सुचविलें. व्यापार व उद्योगधंदे ह्यांस अल्प मुदतीचा भांडवल-पुरवठा-बँकांनीं कसा करावा आणि पैसा अडीअडचणींसाठी कसा तरता ठेवावा ह्याची माहिती त्यांनीं सांगितली. बँकांच्या कार्यकर्त्यांनीं वेळोवेळ एकत्र येऊन स्वतःच्या हितसंबंधी प्रश्नांची चर्चा करावी आणि जुटीनें वागावें असा सल्ला अखेर त्यांनीं दिला.

स्थानिक परिस्थितीस अनुलक्षून कोल्हापुरांतील सहकारी बँकांस भासत असलेल्या अडचणींविषयींचे अनेक प्रश्न पाहुण्यांस विचारण्यांत आले आणि त्यांनीं त्यांचीं सविस्तर उत्तरें दिलीं:—

"बँकांनीं वाटावयाच्या डिव्हिडंडवर रजिस्ट्रारकडून घालण्यांत येणारें नियंत्रण अनिष्ट नसून आवश्यक असतें. अर्बन बँकांनीं आपल्या शिलकी पैशाची ठेव सेंट्रल बँकेकडे ठेवून सहकारी पैसा सहकारी चळवळीमध्यें ठेवणें उचित आहे. बँकांनीं सरकारी रोख्यांत गुंतवलेला पैसा त्यांस अडचणींचे प्रसंगीं उपयोगी पडतो. अल्प मुदतीच्या कर्ज-रोख्यांच्या किंमती विशेष उतरण्याचा संभव नाहीं. ठेवींत झालेल्या वाढीचे दृष्टीनें बँकांच्या वसूल झालेल्या भांडवलांत वाढ केली जाणें आवश्यक आहे. बँकांनीं एकमेकांकडे ठेवी ठेवून सर्वांचें खेळतें भांडवल वाढल्याचा भास उत्पन्न करण्यांत हशील नाहीं. अर्बन बँकांस सेंट्रल बँकेच्या डायरेक्टरांचे बोर्डावर प्रतिनिधित्व मिळालें पाहिजे." ह्या उत्तरांवरून प्रो. काळे ह्यांस विचारलेले प्रश्न आणि त्यांविषयींचा त्यांनीं केलेला खुलासा ह्यांची कल्पना येण्यासारखी आहे.

वरील चर्चेनंतर श्री महालक्ष्मी को-ऑपरेटिव्ह बँकेच्या कचेरींत त्या संस्थेच्या चालकांनीं प्रो. काळे ह्यांस उपहार देऊन त्यांचा सन्मान केला. तेथेंहि बरेच निमंत्रित सहकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

नगर सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.

भिंगार येथील शाखेचें उद्घाटन

वरील बँकेची शाखा भिंगार येथें बाळिप्रतिपदेच्या मुहूर्तावर (ता. १८।१०।४४) रोजीं सकाळीं १०॥ वाजतां आमदार साखरसाहेब फिरोदिया यांचे हस्तें उघडण्यांत आली. उद्घाटन समारंभास सुमारें ५०० सद्गृहस्थ आले होते. ईशस्तवन व स्वागतपर पद्य झाल्यावर बँकेचे चेअरमन श्री. मोतीलाल फिरोदिया बी. ए. यांचें प्रास्ताविक भाषण झालें. त्यांत त्यांनीं १९१० सालीं बँकेची स्थापना झाल्यापासून कशी प्रगति होत गेली तें दर्शवून आतां बँकेची स्थिति कशी भक्कम आहे हें आंकड्यांनिशी सांगितलें. बँकेची संगमनेर येथें शाखा १९४३ सालीं उघडलेली असून, आतां ही दुसरी शाखा उघडत आहे. नगरच्या ऑफिसांत आतां स्त्री-विभाग निघणार आहे. बँकेची स्थापना शेतकऱ्यांशीं व्यवहार करण्यासाठी झाली पण मध्यंतरीं तो व्यवहार बॉम्बे प्रॉव्हिन्शिअल बँकेकडे गेला; तो परत बँकेनें आपणाकडे घेण्याचा विचार केला असून त्याबाबत पत्रव्यवहार चालू झाला आहे.नंतर त्यांनीं भिंगारचे जनतेचे सोयीसाठींच शाखा निघत आहे, तरी सर्वांनीं सहकार्य करावें असें सांगून अध्यक्षास शाखा उद्घाटन करणेस विनंती केली. अध्यक्षांनीं शाखेचें उद्घाटन झाल्याचें जाहीर करून थोडक्यांत भाषण केलें.बँकेनें शेतकऱ्यांशीं परत व्यवहार करण्याचें ठरवलें हें स्तुत्य आहे.परंतु परत मंदी येईल असें गृहीत धरून काळजीपूर्वक पाऊल टाकावें असा इशारा दिला.तसेंच बँकेचे नोकरवर्गानींहि सेवावृत्तीनें काम केलें पाहिजे असें सांगितलें. व शेवटीं उद्घाटन करण्याची संधि दिली याबद्दल आभार मानून आपलें भाषण संपविलें. चेअरमन यांनीं अध्यक्षांचे आभार मानून त्यांना पुष्पहार अर्पण केला. नंतर भिंगार येथील स्था. ब. नगरवाला, स्था. सा. दिनशा इराणी, रा. सा. हरि किसनजी, श्री. डेरे, मिश्रीलालजी व मुनशी अजगर अली यांचीं भाषणें झालीं. या सर्वांनीं आपल्या भाषणांत बँकेची शाखा भिंगार येथें निघत आहे व त्यामुळे भिंगारचे जनतेची फार गैरसोय दूर होत आहे याबद्दल आनंद व्यक्त केला व नफेबाजीपेक्षा जनतेच्या सोयीकडे ही बँक फार लक्ष देत असते असें प्रतिपादन केलें. नंतर मॅनेजर श्री. निखळ यांनीं सर्वांचे आभार मानल्यावर वंदेमातरम् व पानसुपारी झाल्यावर समारंभ समाप्त झाला.

संस्थानाकडून संस्थानिकाच्या नातेवाईकांस मिळणाऱ्या रकमेवर इनकम टॅक्स

मिरजेच्या राजेसाहेबांचे बंधु श्री. हरिहरराव गंगाधरराव पटवर्धन ह्यांस राजेसाहेबांकडून सालिना १२००० रुपये अलाउन्स मिळतो, त्यावर इनकम टॅक्स अधिकाऱ्यांनीं इनकम टॅक्स बसविला. अविभक्त हिंदु कुटुंबातील एका घटकास कुटुंबाकडून मिळालेल्या रकमेवर कायद्याच्या १४ (१) कलमाप्रमाणें कर बसविता येत नाहीं, असा मुद्दा श्री. हरिहरराव ह्यांनीं उपस्थित केला. मिरज संस्थान ही वंशपरंपरा येणारी अविभाज्य इस्टेट मानतां येत नाहीं व संस्थानचें उत्पन्न हें अविभक्त कुटुंबाचें उत्पन्न होत नाहीं, असें इनकम टॅक्स अधिकाऱ्यांचें म्हणणें होतें. मुंबई हायकोर्टाकडे हें प्रकरण गेलें, तेव्हां, "श्री. हरिहरराव ह्यांचा अलाउन्स संस्थानच्या उत्पन्नांतून त्यांस दिला जात होता, कोणाच्याहि अविभक्त कुटुंबाच्या उत्पन्नांतून दिला जात नव्हता" असा हायकोर्टानें निवाडा केला, व अलाउन्सवर प्रांतावरील कर बसविणें योग्य आहे असें ठरविलें.

स्फुट विचार

मुंबई प्रांतिक सहकारी परिषद

मुंबई प्रांतांत सहकारी परिषद् अलीकडे कित्येक वर्षे भरलेली नाहीं. ह्या अवधींत कित्येक महत्त्वाचे प्रश्न सहकारी संस्थांपुढें उभे राहिले आहेत आणि युद्धजन्य परिस्थितीमुळें ते सोडवले जाण्याचें अगत्य वाढलें आहे. ह्या दृष्टीनें पहातां प्रांतिक इन्स्टिट्यूटच्या विधमानें नोव्हेंबर महिन्याच्या ११ व १२ ह्या तारखांस मुंबई येथें सहकारी परिषद् भरण्याचें ठरलें आहे हें समाधानकारक आहे. परिषदेचें अध्यक्षस्थान सर टी. विजयराघवाचार्य मंडित करतील आणि मुंबईच्या गव्हर्नरांच्या हस्तें तिचें उद्घाटन होईल. परिषदेंत चर्चेसाठी येणाऱ्या विषयांची एक यादी सुचवण्यांत आली आहे. तीमध्यें शेतजमीनीच्या तुकड्यांचें एकत्रीकरण, सहकारी पद्धतीची शेती, जमीन गहाणाच्या बँकांचें भवितव्य, डिस्ट्रिक्ट युनियन बोर्डाची सांपत्तिक स्थिति आणि त्यांचा युनिअन्स, बँक्स, सरकार व इन्स्टिट्यूटशीं परस्पर संबंध, मर्यादित जबाबदारीच्या शेती पतपेढ्यांची संघटना, मध्यवर्ती दुकानदारीच्या सोसायट्या, दुधाळ जनावरें व दूधविक्री ह्यांसाठी संस्था, सहकारी बिम्याचा विस्तार, खेडेगावीं बंदे स्थापण्यासाठी मध्यवर्ती संस्था, सहकारी कायद्यांत फेरफार, ह्या बाबींचा अंतर्भाव झालेला आहे. त्यांमध्यें कित्येक दुसऱ्या महत्त्वाच्या विषयांची भर घालतां येईल आणि ती घातली जाणें आवश्यक आहे. मल्टिपर्पज सोसायटीज, शेतकरी ऋणमुक्ततेच्या कायद्याची अंमलबजावणी, सहकारी शिक्षणाची योग्य तरतूद ह्या विषयींची चर्चा झाली पाहिजे. तसेंच, युद्धोत्तर कालांतील सहकारी पुनर्घटनेचा प्रश्न जिव्हाळ्याचा आहे आणि त्यांत प्रत्यक्ष इन्स्टिट्यूटच्या भवितव्याचा अंतर्भाव होणें अगत्याचें आहे. इन्स्टिट्यूटची सध्याची घटना व तिचें कार्यक्षेत्र हीं समाधानकारक आहेत असें कोणीच म्हणणार नाहीं. तेव्हां त्याच्या पुनर्घटनेचा विचार होऊन तिच्या संबंधांत सुधारणेची योजना परिषदेनें सुचवणें युक्त आणि इष्ट आहे. ह्या व इतर येणाऱ्या सूचनांचा योग्य परामर्ष घेतला जाईल अशी आम्हांस आशा आहे.

सहकारी स्वरूपाचा ब्रिटिश नाट्यसंघ

मराठी रंगभूमीचा इतिहास, तिची सद्यःस्थिती आणि तिचें भवितव्य ह्यासंबंधांत अलीकडे वर्तमानपत्रांत, नियत कालिकांत, परिषदांत, सभांत व भाषण-व्याख्यानांत चर्चा चालली आहे. ह्या रंगभूमीशी चित्रपटांची स्पर्धा, तिच्या अवनतीचीं कारणें आणि नाटकें लोकप्रिय करण्यास उपाय ह्या प्रश्नांवर विचार प्रदर्शित केले जात आहेत. नाटक मंडळ्यांची घटना, त्यांची व्यवहारपद्धति, नट-नटींचा पेशा, प्रेक्षकांची आवड-नावड, इत्यादि बाबींचा सलहि त्यांत होत आहे. मराठी रंगभूमीचें लोकशिक्षणाचें व मनोरंजनाचें कार्य वाढत्या प्रमाणांत यशस्वी होण्याचें महत्व सर्वांस पटलें असून त्या मार्गानें आस्थावाइक व कलाप्रेमी लोक यत्नहि करीत आहेत. अशा वेळीं नाट्यकलेचें लोण सामान्य जनतेपर्यंत पोंचवावयाचें, उत्कृष्ट संस्कृतीचा प्रसार बहुजन समाजांत लोकशाही पद्धतीनें करावयाचा आणि त्या घटनेंत भांडवलशाही किंवा व्यक्तिसत्ता ह्यांचा शिरकाव होऊं नयवयाचा नाहीं ह्या हेतूनें इंग्लंडमध्यें एक उपक्रम करण्यांत आला आहे, त्या विषयीची माहिती मराठी रंगभूमीच्या पुरस्कर्त्यांस विचार प्रवर्तक होईल ह्यांत शंका नाहीं.

" पीपल्स एंटरटेन्मेंट सोसायटी "

" पीपल्स एंटरटेन्मेंट सोसायटी " ह्या नांवाची संस्था त्या देशांत स्थापन झाली आहे. जनमनरंजनाची व्यवस्था नाट्यप्रयोग, संगीताचे जलसे इत्यादि मार्गांनीं करण्याचें सामर्थ्य अंगीं असलेल्या संघ बनवणें आणि प्रत्येक लहानमोठ्या शहरांत नाट्यप्रेमी लोक एकत्र आणून त्यांचे सहायानें हें कार्य करणें हे तिचे मुख्य उद्देश आहेत. तिचे मूळचे सभासद, सहकारी सोसायट्या आणि नाट्यकलेचें जीवन केवळ तिकीट विक्रीच्या उत्पन्नावर अवलंबून ठेवणें अनिष्ट आहे ह्या मताच्या ध्येयवादी व्यक्ती हे होत. ह्या सोसायटीचें सर्व भांडवल तिच्या सभासदांनीं तिच्या भागांत घातलेल्या पैशानें निर्माण झालें आहे. एकपासून दोनशें पौंडांपर्यंत प्रत्येकाच्या इच्छेप्रमाणें सभासदांस भाग विकत घेतां येतात. इंडस्ट्रिअल ॲन्ड प्रॉव्हिडंड सोसायटीज ॲक्ट ह्या कायद्यासाठी सोसायटी नोंदलेली आहे आणि त्यानेंच भाग धारणाच्या मर्यादा निश्चित केलेल्या आहेत. भागांच्या पैशावर तीन टके ह्या दरानें व्याज सभासदांस दिलें जातें आणि सर्व खर्च भागून निवळ शिल्लक उरते तिच्यामधून पाहिलेल्या नाट्यप्रयोगांच्या प्रमाणांत तिकिटांच्या किंमतींवर रिबेट दिलें जातें. माउविक्रीचे सहकारी संघ किंवा स्टोअर्स ह्याच पद्धतीनें चालतात. ते आपल्या सभासदांस त्यांस हवा असलेला माल पुरवतात. प्रस्तुत नाट्यसंघ आपल्या सभासदांस मनोरंजन देतो आणि त्यांचेकडून मिळालेल्या तिकिटांच्या पैशामधून निवळ नफा उरेल त्यांतून रिबेट देतो. संघाचा कारभार सहकारी संस्थांच्या लोकशाही पद्धतीनें चालतो. हजारो लोक ह्या पद्धतीनें स्वतःच्या करमणुकीसाठी खेळ, जलसे इत्यादींची व्यवस्था आपल्या प्रतिनिधींचे मार्फत करतात हें त्याचें वैशिष्ट्य आहे. जनतेच्या जीवनास लागणाऱ्या अनेक वस्तूंपैकीं मनोरंजन ही एक गोष्ट आहे आणि चांगल्या प्रतीचा व वेताच्या किंमतीचा हा माल आपणांस मिळत जावा अशी तरतूद अनेक व्यक्ती संघटनेनें करतात. ही सहकारी व्यवस्था येथें अंमलांत आणली गेली आहे. घंदेवाइक नाटक मंडळ्यांच्या सहायानें ठिकठिकाणीं सोसायटी खेळ करवीत आहे. हौशी नटनटींच्या मंडळांकडूनहि प्रयोग केले जात आहेत.

श्री. मुकुनायराव (नानुदादा) ओगले ह्यांचें शोचनीय निधन

सुप्रसिद्ध कारखानदार ओगले बंधूंपैकीं एक कर्तबगार भागीदार श्री. मुकुनायराव ओगले ता. १५ ऑक्टोबर रोजीं बंगलोरहून अलवाईस जात असतां आमगळींत अकस्मिकपणें मरण पावले, हें नमूद करण्यास दुःख होतें. अत्यंत प्रतिकूल परिस्थितींत त्यांनीं कारखान्याचा विस्तार केला. कंदील करण्याचा कारखाना काढण्यांत त्यांनींच पुढाकार घेतला. त्यांनीं परदेशांत प्रवास करून अनुभव मिळविला, त्याचा पुरेपूर फायदा महाराष्ट्रास व हिंदुस्थानास दिला. कंपनीच्या आपत्काळांतून तिचा आजचा झालेला विस्तार त्यांनींच मुख्यतः घडवून आणला. मृत्युसमयीं त्यांचें वय ५५ वर्षांचें होतें. त्यांच्या मृत्युमुळें ओगले बंधूंचें व महाराष्ट्राचें झालेलें नुकसान ठरकर भरून येण्यासारखें नाहीं.

भिवंडी कल्याण तालुका को. सुपरवायझिंग युनिअन

या युनिअनची वार्षिक जनरल सभा ता. ११-९-४४ रोजी भिवंडी येथें श्री. शिवराम कृष्णाजी पाटील, युनिअनचे चेअरमन, यांचे अध्यक्षतेसाठीं भरली होती.

युनिअनचें कार्यक्षेत्र भिवंडी कल्याण, शहापूर, मुरबाड व साष्टी तालुक्यापुरतें असून एकूण ६७ संस्था या युनिअनला सामील झाल्या आहेत. युनिअनचे कार्यक्षेत्रांत शहापूर तालुक्यास कर्जनिवारण कायदा लागू झाला असून त्या बोर्डाचें कामकाजहि सुरू झालें आहे.

युनिअनचे कार्यक्षेत्रांत भिवंडी, मुरबाड व साष्टी तालुक्यास खरेदी-विक्री युनिअन्स स्थापन झालीं असून तालुक्यांतील सर्व भागांत अन्नधान्य वाटपाची पद्धत या युनिअन्सनी आपले सेंटर्स काढून उत्तम रीतीनें चालविली आहेत. तसेंच बेलापूर विविध कार्यकारी सोसायटी व बदलापूर कंझ्युमर्स या सोसायटयांनीं आपल्या भागांत पुरवठा करण्याची जबाबदारी घेतली असून वाटप पद्धत खेड्यांतील जनतेस चांगल्या प्रकारें करण्याचें श्रेय या संस्था मिळवून जनतेंत आपला विश्वास निर्माण करीत आहेत. युनीयनचें खेळतें भांडवल १½ लक्ष रुपयांवर आहे.

ग्रेन डेपोंची प्रगति

भातकोठार व पालेमोडी कर्जाबाबत मागें (२९-१२-४३) अर्थात उल्लेख केलेलाच होता. त्या दृष्टीनेंही ग्रेन डेपोजमध्यें दिवसेंदिवस प्रगती दिसून येत आहे. एकूण ३७ ग्रेन डेपोज सुरू असून त्यांची सांपत्तिक परिस्थिति खालीप्रमाणें आहे.

(१) भाताचें येणें कर्ज ३९४८ मण (२) शेअर्स १३११ मण (३) रिझर्व्ह फंड १०३ मण (४) बँन्केकडून खरेदी १४६७ मण (५) भाताचा नफा १०४८ मण (६) भात रूपानें असलेल्या कर्जाची किंमत २५०७१ रुपये.

नवीन ग्रेन डेपोजही काढण्याचे प्रयत्न सुरू आहेत व ते यशस्वी होत आहेत. सहकारी चळवळींतील सभासदांस चळवळीचा अभ्यास व माहिती होण्यास सहकारी वाङ्मयाची जरूरी असलेमुळें जनरल मीटिंगचे दिवशीं अशी लायब्ररी (फिरतें वाचनालय ठेवण्याचें) काढण्याचें ठरून सभेंत कांहीं उदार गृहस्थांकडून व अधिकाऱ्यांकडून देणग्याही मिळाल्या व अशा चांगल्या कार्यास बँकेनेंही उदार अंतःकरणानें हातभार लावला आहे.

दुधाचें रेशनिंग सुरू होणार!

दिल्ली व इतर मोठीं हिंदी शहरें ह्यांत कोणत्या तरी स्वरूपांत दुधाचें रेशनिंग लवकरच सुरू करण्यांत येईल, असें प्रसिद्ध झालें आहे. युद्धापूर्वी, हिंदुस्थानांतील माणशीं दुधाचा खप वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळा होता. कटक येथें तो दर आठवड्यास माणशीं २½ औंस होता, तर शिकारपूर येथें तो ५९ औंस होता. आतां लोकांना पूर्वी इतकें दूध मिळत नाहीं. तेव्हां त्याची जास्त गरज आहे अशांना तें उपलब्ध करून द्यावें, असा सरकारचा हेतु आहे. इंग्लंड व स्वित्झरलंड हे देश वगळून बाकीच्या कोणत्याहि युरोपिअन देशांत लहान मुलांसेरीज इतरांना दूध मिळत नाहीं. लहान मुलांना तें शक्य तितक्या मोठ्या प्रमाणांत मिळावें अशी योजना असते. तीन वर्षांपर्यंच्या मुलांना जर्मनींत दर आठवड्यास १८४ औंस दूध मिळतें. इंग्लंडमधील मुलांना १४० औंस मिळूं शकतें. बेल्जम, फ्रान्स, नेदरलंडस, नॉर्वे, स्वित्झरलंड येथील मुलांसहि १८४ औंस दूध मिळूं शकतें. इटलींत मात्र ७ औंसांवरच त्यांस भागवावें लागतें.

पुणें जिल्हा सहकारी खरेदी विक्री संघ

श्री. व्ही. डी. कारखानीस, असिस्टंट रजिस्ट्रार, को-ऑपरेटिव्ह सोसायटीज, पुणें. आणि श्री. डी. डी. चितळे, मॅनेजिंग डायरेक्टर, पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक, लि. ह्यांच्या सह्यांवर खालील विनंतिपत्रक काढण्यांत आलें होतें.

"पुणें जिल्ह्यांतील ग्रामीण व नागरी जनतेच्या हिताच्या दृष्टीनें आपल्या जिल्ह्यांत एक जिल्हा सहकारी खरेदी व विक्री संघ स्थापन करणें जरुरीचें दिसतें. विशेषतः शेतकरी ऋण विमोचन कायद्याची जों जों अधिक तालुक्यांतून अम्मलबजावणी सुरू होईल तों तों तेथील शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीनें अशा संस्थेची तर फारच जरुरी भासूं लागेल. तसेंच ग्रामीण जनतेच्या दृष्टीनें दैनंदिन गरजेसाठी लागणारा भुसार, किराणा, कापड इत्यादि माल योग्य त्या ठिकाणाहून खरेदी करून आणून तो त्यांना त्यांच्या सहकारी पुरवठा मंडळ्यांमार्फत पुरविण्याच्या दृष्टीनेंही अशा संस्थेचा विशेष उपयोग होईल असें वाटतें. तरी अशी एक सहकारी संस्था पुणें जिल्ह्यासाठी स्थापन करावी किंवा कसें, तसेंच ती स्थापन करण्याचें ठरल्यास तिचें भांडवल किती असावें, तिची घटना कोणत्या स्वरूपाची असावी, वगैरे बाबत विचार करण्यासाठी पुणें जिल्ह्यांतील कांहीं प्रमुख सहकारी बंधु-भगिनींची प्राथमिक सभा सोमवार तारीख २३ आक्टोबर १९४४ रोजीं दुपारीं ४ वाजतां पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह. बँकेच्या दिवाणखान्यांत भरविण्याचें आम्ही ठरविलें आहे.

वरील पत्रकास अनुसरून प्रो. वा. गो. काळे ह्यांच्या अध्यक्षतेखाली नियोजित सभा भरली आणि तीमध्यें पुणें जिल्ह्यासाठी खरेदी विक्री संघ स्थापन करण्याचें ठरलें.

जी. जी. दांडेकर मशीन मर्क्स लि., भिवंडी

वरील कंपनीस ३० जून, १९४४ अखेर सुमारें १६००० रु. घसारा व बोनससाठी बाजूस काढून संपलेल्या वर्षी ६२,९४९ रुपये निवळ नफा झाला. त्यांतून गुडविलच्या १४,००० रुपयांपैकीं १३,९९९ रुपये लिहून टाकण्यांत आले. ऑर्डिनरी भागांस ६%+२% डिव्हिडंड मिळालें. पुढील वर्षाच्या हिशेबांत ४०,९१८ रु.नफा ओढण्यांत आला. १९४२-४३ मध्यें कंपनीच्या नफ्याची रकम ३०½ हजार रुपये होती. कंपनीजवळ तरता पैसा बराच शिल्लक दिसतो, कारण तिनें सुमारें ४½ लक्ष रुपये सरकारी रोख्यांत गुंतविले आहेत. ठेवींचा आंकडा १ लक्ष, ३६ हजार रुपये आहे. अडचालाचे वर्षी कंपनीनें सुमारें ५ लक्ष रुपये किंमतीच्या मालाची विक्री केली व वर्ष अखेरीच्या शिलकी मालाची किंमत १ लक्ष, २७ हजार रुपये आहे. कंपनीची सालोसाल प्रगति होत असून तिच्या नफ्याचा आकडा व डिव्हिडंडचें प्रमाण वाढत आहे. कंपनीच्या वसूल भांडवलाचा आकडा ५ लक्ष रुपये आहे. त्या कारणानें युद्धोत्तर परिस्थितींतहि कंपनीस अडचण येणार नाहीं. मेसर्स दांडेकर इंजिनिअर्स लि. कडे कंपनीची मॅनेजिंग एजन्सी आहे व तिचे प्रमुख कंपनीचे उत्पादक श्री. गोपाळ गणेश दांडेकर हे आहेत.

बँकांच्या शाखांमधील रोख पैशाची सुरक्षितता

(ले: एका बँकेच्या शाखेंतील नोकर)

बँकांकडील ठेवींमध्यें बेसुमार वाढ झाल्यामुळें आपला पैसा गुंतविण्यासाठी बँकांनीं निरनिराळ्या उद्योगधंद्यांच्या ठिकाणीं आपल्या शाखा काढण्याचा उपक्रम जोरांत सुरू केलेला दिसतो. परंतु शाखांमध्यें असलेल्या पैशाच्या सुरक्षिततेबद्दल अलीकडे वारंवार ऐकू येणाऱ्या लुटालुटीच्या बातम्यांवरून शंका येण्यास जागा आहे. काशीपासून रामेश्वरपर्यंत काठीला सोनें बांधून नेलें तरी हिंदुस्थानांत चोरी होत नसें असें म्हणतात, परंतु त्या मनोवृत्तीचा हिंदुस्थान आतां राहिला नाहीं. सरकार व बँकेचा अधिकारी वर्ग झालेल्या प्रकाराबद्दल योग्य ती दक्षता घेईलच. परंतु शाखांमध्यें काम करीत असलेल्या नोकरवर्गावर सद्यःपरिस्थितींत किती जबाबदारी पडते व त्या दृष्टीनें शाखांची परिस्थिति काय आहे हें प्रथम पाहिलें पाहिजे.

कित्येक शाखांमध्यें एकच मनुष्य काम करीत असतो व अशा लुटालुटीचे प्रकार हे इतक्या झटपट रीतीनें उरकले जातात कीं त्याची कल्पना सुद्धा कोणाला लवकर येत नाहीं. भोवतालचें लोक सुद्धा ऐनवेळीं मदतीसाठी पुढें येतातच असें नाहीं. किंबहुना अशावेळीं बरेचसे लोक स्वतःच्या जिवाच्या भीतीनें शक्यतों दूर राहण्याचा प्रयत्न करतात. बँकेंत काम करणाऱ्या इसमाजवळ प्रतिकाराचें साधन नसतेंच. असा प्रकार झाल्यानंतर त्या नोकराच्या बचावाकडे लक्ष दिलें जातेंच असेंही नाहीं. संकटांत सापडलेल्या नोकराच्या मनोवृत्तींत व चौकशी करावयास आलेल्या अधिकाऱ्यांच्या मनोवृत्तींत त्यावेळीं तरी जमीन अस्मानाचें अंतर असतें. याशिवाय आपणांवरील जबाबदारी झटक्यतों दुसऱ्यावर टाकून एकाद्या प्रसंगांतून आपण निभावून जाण्याच्या मनुष्याच्या सहज मनोवृत्तीस अपवाद असतोच असेंही नाहीं.

स्थानिक परिस्थित्यनुरूप पैशाच्या ने-आण करण्याच्या व्यवस्थेसंबंधीं व पैसा हातळण्यासंबंधीं निश्चित असे नियम बँकांनीं केलेले नसतात व अशा प्रसंगीं या संबंधींच्या नियमांची उणीव व जरूरी स्पष्ट भासते. ज्या त्या गांवापुरतें अशा तऱ्हेचें नियम बँकांनीं नोकर वर्गास चालून दिल्यास त्या नियमांची अम्मलबजावणी कसोशीनें करणें एवढींच जबाबदारी त्या नोकर वर्गावर पडेल व आपल्या कामाची व जबाबदारीची निश्चित दिशा त्यांस ठरवितां येईल.

याशिवाय, कॅशिअरला दिलेला कौंटर शक्य तो बंदिस्त असावा व काम चालू असतां त्याला तो बंद करून घेतां यावा रोजचा शिलकी पैसा बँकेच्या ऑफिसांतच बंदोबस्तानें ठेवण्याची व्यवस्था असावी व व्यवहार चालू असतानां लोकांना बँकेंतील पैसा शक्यतों दिसणार नाहीं अशा रीतीने ठेवला जावा. कॅशिअरला आपल्या व पैशाच्या बचावासाठी हत्यार बाळगण्याची परवानगी मिळवून यावी. या योगानें संकटाच्या वेळीं प्रसंगावधान राखून स्वतःचा बचाव करण्याची संधी तरी त्याला मिळवून दिल्यासारखें होईल. बँकेच्या शिपायांना पैशाच्या बाततींत हात घालण्यास शक्यतों कमी संधी दिली जावी. या योगानें बँकेच्या व्यवहारातील गुप्तपणा राखण्यास मदतच होईल.

नोकरवर्गाच्या व पैशाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीनें पैशाशीं संबंध येणारा सर्व नोकरवर्ग वेळोवेळीं बदलला असतां जास्त फायदेशीर होईल. याशिवाय बँकेच्या शिलकी पैशाचा व नोकरवर्गाच्या जीविताचा विमा उतरल्यानें घोरवापासून वाटणारी भीति अंशतः कमी होण्यास मदत होईल.

सहकारी खरेदी–विक्रीचें महत्त्व

माळशिरस ता. स. वि. सहकारी संस्थेची अकलूज येथें शाखा

ता. ४-१०-४४ रोजीं दुपारीं ३ वाजतां अकलूज येथें माळशिरस तालुका खरेदी विक्री सहकारी संस्थेचीं शाखा उघडण्यांत आली. सभेस अध्यक्ष मुंबई प्रां. न्यांकेचे लोकप्रिय मॅ. डायरेक्टर सो श्रीयुत व्हीं. एल. मेथा हे अध्यक्ष होते. आरंभीं स्वागताध्यक्ष श्री. मा. तु. कुलकर्णी यांनीं सेल सोसायटीची प्रगति कशी होत गेली हें सांगून ही संस्था स्थापन झालेपासून ८ वर्षे 'अ' वर्गात आहे हें नमूद केलें आणि संस्थेनें गेल्या दोन वर्षांत शेतकऱ्यांचा सुमारें रु. १५ लाख चा ५५ हजार खंडी माल विकणेंत आला, हें विशद करून नियोजित अध्यक्ष यांची सभेंतील लोकांना ओळख करून दिली आणि आपलें भाषण संपविलें. त्यानंतर मि. अबचट सुपरवायझर यांनीं सभेस आलेले निरनिराळ्या अधिकारी लोकांचे संदेश वाचून दाखविले. त्यानंतर अध्यक्ष, श्री. मेहता यांचें भाषण झालें. ते म्हणाले, " माळशिरस तालुक्यांत सहकारी चळवळ श्रीयुत मारुतराव कुलकर्णी, युनियन प्रेसिडेंट, यांचे नेतृत्वाखालीं फोफावत आहे याबद्दलची खातरी आजच्या या समारंभावरून दिसून येते. सहकारी संघटनेमार्फत शेतकरी आपल्या मालाचा क्रय-विक्रय करितात याची महती त्यांना पटल्यामुळें आज आपणांस अकलूज शाखा उघडण्याचा प्रसंग आला आहे. आपणांस प्रत्येक व्यापारी पेठेंत सहकारी खरेदी-विक्रीच्या शाखा उघडण्याचा योग येईल अशी मला उमेद आहे. आपल्या तालुक्यांत सहकारी क्रय-विक्रय मंडळानें केलेली कामगिरी हल्लींच्या कंट्रोलचा विचार करितां खरोखर प्रशंसनीय आहे."

यानंतर श्री. पाळेकर, असि. रजिस्ट्रार, यांनीं "सहकारी चळवळ खेडेगांवांत वाढत गेल्यास शेतकऱ्यांना आपली सर्वांगीण उन्नती आणि स्वावलंबन हीं लवकर साध्य होण्यासारखीं आहेत. हा कालव्याचा भाग असलेमुळें येथील शेतकरी इतर तालुक्यांतील शेतकऱ्यांचे मानानें सधन आहेत आणि त्यांनीं ही चळवळ हातीं घेतली तर आपला तालुका एक सहकारी चळवळीचे आदर्शभूत केंद्र बनेल " अशी आशा व्यक्त केली.

यानंतर मे. मामलेदारसाहेब यांनीं भाषण केलें. त्यांनीं आपल्या भाषणांत शेतकऱ्यांची खरी उन्नति होण्यास सहकारी संघटना हाच एक मार्ग आहे आणि या संघटनेमार्फत वागल्यास शेतकऱ्यांची खात्रीनें सुधारणा होईल, परंतु ही संघटना लोकांचे अंगीं येणेंस शिक्षणाची आवश्यकता आहे असें सांगितलें. त्यानंतर श्री. नवलेबुवा यांनीं "सर्वांनीं एकजुटीनें प्रयत्न करून ही खरेदी-विक्री संस्था वाढविली याचें श्रेय श्री. नानासाहेब कुलकर्णी यांना आहे आणि त्यांचेच निश्चयामुळें आम्हीं सर्व एक झालों" असें सांगितलें. यानंतर मे. हर्डीकर यांचें भाषण झालें. त्यांत त्यांनीं थोड्या शब्दांत उत्पादक क्षेत्रीं कशी कराची याची माहिती सर्व लोकांस पटेल अशी सांगितली. त्यानंतर श्रीयुत बेदरकर यांनीं शिंदिवाडी गांवांत सहकारी संघटनेमार्फत झालेली प्रगती सांगून लोकांच्या उन्नतीस हाच एक मार्ग आहे हें सांगितलें. यानंतर श्रीयुत दाते यांनीं खरेदी विक्री संस्थेचें महत्त्व लोकांना पटलें हें आजच्या समारंभाचे द्योतक आहे आणि अशी संघटना केल्यास बँकिंग युनियन सुद्धां आपलें तालुक्यांत होईल असें भाषण केलें.

पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि. पुणें.

सहकार सप्ताह, १९४४.

पुणें शहरांतील कार्यक्रम

स्थळ:—बँकेचा दिवाणखाना वेळ:—सायंकाळीं ७ वाजतां

तारीख	वार	वक्ते	विषय
२९।१०।४४	रविवार		सप्ताहाचें उद्घाटन.
३०।१०।४४	सोमवार	सौ. इंदिराबाई देवधर.	स्त्रिया व सहकारी चळवळ (५॥ ते ६॥)
३१।१०।४४	मंगळ.	श्री. भीमराव जोशी	सहकारी सोसायट्यांच्या निवडणुकी
		प्रो. एस. व्ही. कोगेकर.	मुंबई सरकारची १५ वर्षांची योजना.
१।११।४४	बुधवार	श्री. दा. वा. पोतदार.	नागरी सहकारी चळवळ.
२।११।४४	गुरुवार	श्री. य. धों. ओगले.	गृहमंडळ्यांचा कारभार
३।११।४४	शुक्रवार	प्रो. शं. रा. भागवत.	सहकारी कन्झुमर्स चळवळ.
४।११।४४	शनिवार	प्रो. घ. रा. गाडगीळ.	समारोप.

जिल्ह्यांतील कार्यक्रम

तारीख	वार	स्थळ	प्रमुख वक्ते
२९।१०।४४	रविवार	सासवड, ता. पुरंदर.	श्री. य. धों. ओगले
२९।१०।४४	रविवार	मंचर पेठा आंबेगांव.	श्री. ग. र. तुळशीबागवाले.
२९।१०।४४	रविवार	जुन्नर, तालुका जुन्नर	श्री. दा. ग. बापट.
३०।१०।४४	सोमवार	तळेगांव	श्री. य. धों. ओगले
२।११।४४	गुरुवार	कुरकुंभ, ता. दौन्ड	श्री. मो. ना. पाटसकर
३।११।३४	शुक्रवार	उंडवडी कडेपठार ता. भिमथडी	श्री. मुगुटराव सा. काकडे

वेळगांव डि. सें. को. बँक लि.

ह्या बँकेची वार्षिक साधारण सभा बँकेचे चेअरमन श्री. उगरगोळ वकील यांच्या अध्यक्षतेखालीं रविवार ता. २४।१०।४४ रोजीं झाली. अहवालाच्या सालीं बँकेला एकूण नफा ४७१२१-१४-० झाला. भागीदारांना ५ टके नफा वाटण्यांत आला. यंदाच्या वर्षी बँकेचें शेअर भांडवळ ८२,३५० रु. नीं वाढलें असून तें साल अखेर ३,११,९०० रु. झालेलें आहे. बँकेनें मॅनेजिंग डायरेक्टरची एक नवीन जागा निर्माण केली आहे.

दि बँक ऑफ सिटिझन्स, लि., वेळगांव

वरील बँकेनें १ ऑगस्ट १९४४ रोजीं ६,००० नवीन शेअर्स विक्रीस काढून त्यांपैकी ४,००० शेअर्स जुन्या भागीदारांस व फक्त २,००० शेअर्स नव्या ग्राहकांना देण्यांत येतील, असें जाहीर केलें होतें. ह्या २,००० शेअर्सकरितां, शेअरमागें ५ रुपये प्रीमियम असूनहि, जवळ जवळ दुप्पट अर्ज आले, असें समजतें. जुन्या भागीदारांनीं शेअर्सकरितां अर्ज करण्याची मुदत ३० सप्टेंबर रोजीं संपली.

* *

पूना गेस्ट हाऊस

टेलिफोन नं. ७७९

संस्थापक :
कै. नानासाहेब सरपोतदार

* *

गांवोगांवीं विक्रेते पाहिजेत.

A 9

क्विनीनचे ऐवजीं मलेरियाकरतां खात्रीचा अनुभविक उपाय म्हणून 'एनाईन' वापरतात.

अलपाईन प्रॉडक्टस् (इंडिया) पुणें २

पैसा व ज्ञान देणारीं पुस्तकें !

श्रीमंत कसें व्हावें ? संपत्तीचे सुंदर मार्ग दाखवून हजारों रु. मिळवून देणें. वाचून लक्षाधीश व्हाल ! कि. १॥ रु. काम आणि कामिनी. काम शास्त्रावरील अपूर्व ग्रंथ ! कि. १॥ रु. मृत्युलोकचा प्रवास ! मरणोत्तर आत्म्याच्या अद्भुत हालचालींचें कथानक ! कि. १ रु. लिहा. विभट आणि मंडळी, कराड जि. सातारा.

पुण्यांतील
आदर्श निवासस्थान व भोजनालय
छाया लॉजिंग व बोर्डिंग हाऊस
बुधवार चौक, पुणें २.

हें पत्र पुणें, पेठ सांवुदा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व ए. आण्णा वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' सांवुदा, घ. नं. ९२४।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.

खालील पत्त्यावर चौकशी करावी.

व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाविलास' पुणें ४.

अर्थ

वर्गणीचे दर.

वार्षिक वर्गणी
रु. ४
(टपाल खेरीज माफ)
किरकोळ अंकास
दोन आणे.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष १० पुणें, बुधवार, तारीख १ नोव्हेंबर, १९४४ अंक ४३

"Consent of the Central Government has been obtained to this issue under Defence of India Rule 94-A. It must be distinctly understood that in giving this consent the Government of India do not take any responsibility for the financial soundness of any schemes or for the correctness of any of the statements made or opinions expressed with regard to them."

दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.

स्थापना : १९३५
हेड ऑफिस : पुणें शहर

विक्रीस काढलेलें नवीन भांडवल

रु. १०,००,०००

(प्रत्येकीं रु. ५० च्या २०,००० भागांत विभागलेलें)

वरील शेअर्स ता. ४-१०-४४ रोजीं बँकेच्या रजिस्टरवर असलेल्या शेअर होल्डरांना त्यांच्या प्रत्येक जुन्या १ शेअरला १ नवीन शेअर असे रु. ५ वाढीनें देऊं केले आहेत. पहिल्या शेअर-होल्डरांनीं घेऊन उरलेले शेअर्स इतरांस तेवढ्याच वाढीनें (रु. ५) देण्यांत येतील. अर्ज पाठविण्याची शेवटची तारीख १५-१२-४४ ही आहे.

—डायरेक्टर बोर्ड—

श्री. धों. कृ. साठे, चेअरमन

श्री. व्ही. पी. वर्दे, प्रो. व्ही. जी. काळे, श्री. एन. जी. पवार, श्री. टी. व्ही. रानडे, श्री. आर. सी. सोहोनी, श्री. एस. जी. मराठे, श्री. एम. आर. जोशी, श्री. एफ. डी. पदमजी, श्री. एम. व्ही. गोखले, श्री. व्ही. एच. देशमुख.

विशेष माहितीसाठीं लिहा.

सी. व्ही. जोग, मॅनेजर

देना बँक

देवकरण नानजी बँकिंग कं. लिमिटेड

देना बँकेच्या ठेवीदारांच्या फायद्यासाठी

सेव्हिंग्ज इन्शुअरन्स योजना

तपशीलाकरितां भेटा अगर लिहा :

हेड ऑफिस : मुंबई आणि स्थानिक शाखा

देना बँकेच्या सर्व कचेऱ्यांत, हिंदुस्थान सरकारचे १० रुपये व १०० रुपये किंमतीचे प्राइझ बाँड्सहि विकत मिळतात.

व्ही. पी. बेडेकर
आणि सन्स लि.
मुंबई.

मसाल्याचे व्यापारी

पुणें एजंट—
द. ना. हेजीब

—राष्ट्रीय काटकसर—

युद्धकार्याची गरज लक्षांत घेऊन डबे वा कागद यांची बचत करणें भाग आहे. ही पॅकिंग-बाबतची अडचण लक्षांत घेऊन—

—गोल्डन कोको—

सुटा मिळण्याची सोय सर्व प्रमुख व्यापाऱ्यांकडे करण्यांत येत आहे. सुटा कोको घेण्यानें पैशाचीही बचत होते. मात्र आपणांस गोल्डन कोकोच मिळत आहे अशी खात्री करून घ्या. नांव लक्षांत ठेवा.

साठे बंधू, "गोल्डन कोको"

—सर्वत्र मिळतो—

साठे कोको व चॉकोलेट कारखाना, पुणें २.

विविध माहिती

बव्हाच्या रोटीचें रेशनिंग नाहीं.

ग्रेट ब्रिटनमध्यें चालू युद्धांत रोटीचें रेशनिंग कधींच करण्यांत आलेलें नाहीं. ४ पौंड वजनाच्या रोटीची किंमत ९ पेन्सच्या वर गेलेली नाही. ओट, राय, बार्ली, इत्यादि गव्हांत मिसळून रोटी बनविण्याची पाळी मागें आली होती, परंतु आतां ब्रिटिश लोकांना शुद्ध गव्हाची बाटेल तेवढी रोटी स्वस्त दरानें मिळूं शकते.

इंग्लंडमधील काळाबाजार

बेकायदा व्यवहार करण्याबद्दल ज्या आठवड्यांत कोणाचाहि लायसेन्स रद्द झाला नाहीं, असा इंग्लंडमध्यें एकहि आठवडा जात नाहीं. प्रत्येक प्रकरणाची कसोशीनें चौकशी केली जाते व शिक्षा झालेले लोक फारशी तक्रार करीत नाहींत. कोणत्या तरी प्रकारच्या काळ्या बाजारांत त्यांचा व्यवहार चालू असला पाहिजे, हें त्यावरून स्पष्ट दिसतें.

स्वीडनमधील सहकारी चळवळ

युद्धजन्य परिस्थितींतहि स्वीडनमध्यें सहकारी चळवळीची उत्कृष्ट प्रगति होत आहे. तेथील एकूण ६४ लक्ष वस्तीपैकी किमान २४ लक्ष लोकांचीं ८ लाख कुटुंबें सहकारी संघटनेचीं सभासद आहेत.

म्युनिसिपॅलिटीकडील बिलांचे पैसे घरपोच मिळणार

मुंबई शहर म्युनिसिपॅलिटीच्या केलेल्या कामाबद्दल तिनें बिलांची आदा करावयाची रकम चेकनें करण्याबाबत म्युनिसिपल कमिशनर व इंडियन मर्चंटस चेंबर ह्यांत पत्रव्यवहार होऊन, चेंबरच्या सभासदांना खालील अटींवर सवलती मिळाव्यात असें ठरलें:—

(१) बिलांवर "पोस्टानें क्रॉस्ड-ऑर्डर चेक पाठवावा" असें प्रामुख्यानें लिहिण्यांत यावें.

(२) १०० रुपयांवरील रकमा म्युनिसिपॅलिटीनें क्रॉस्ड-ऑर्डर चेकनें साध्या टपालानें पाठवाव्या व त्याचा तपशील देणारें एक कार्डहि त्याबरोबर स्वतंत्र टाकावें.

(३) चेंबरच्या सभासदांनीं चेकची पोच उलट टपाली द्यावी. तशी ती न दिल्यास वरील सवलत रद्द होईल.

(४) १०० रुपयांपर्यंतच्या रकमा रोखीनें चीफ अकौंटंटच्या कचेरीतच पूर्वीप्रमाणें मिळतील.

उत्तर आफ्रिकेंतील युद्ध स्मारक

आल-आलमेन येथें एक बाग तयार करून त्यांत उत्तर आफ्रिकेंतील वाळवंटी युद्धांत मरण पावलेल्या ८,००० ब्रिटिश व ब्रिटिश साम्राज्यांतील सैनिकांस पुरण्यांत येईल. बाग तयार करण्यासाठी व नांवाचे दगड रोवण्यासाठी एक लक्ष रुपये मंजूर करण्यांत आले आहेत. युद्धसमाप्तीनंतर, ह्या युद्धक्षेत्रास भेट देणाऱ्या मृत सैनिकांच्या नातेवाइकांसाठी उतरण्याची सोयहि करण्यांत यावयाची आहे.

सहकारी सोसायट्या व त्यांचे सभासद

सबंद जगांत एकूण ८,१०,००० सोसायट्या असून त्यांच्या सभासदांची संख्या १४ कोटि, ३० लक्ष आहे, अशी माहिती इंटरनॅशनल लेबर आफिसनें प्रसिद्ध केली आहे. ग्रेट ब्रिटनमध्यें उपभोक्त्यांच्या सोसायट्यांची प्रगति चांगली झाली आहे. तेथील टोअर्सचे पटावर ९० लक्ष सभासद आहेत.

अॅक्चुअरीच्या परीक्षा

इन्स्टिट्यूट ऑफ अॅक्चुअरीजच्या परीक्षा युद्धपरिस्थितीमुळें गेलीं कांहीं वर्षे बंद ठेवण्यांत आल्या होत्या, त्या पुनः येत्या वर्षी सुरू होणार आहेत. हिंदुस्थानांतील विमा कंपन्यांची अॅक्चुअरींचीं कामें शक्यतोंवर फेलोजकडूनच करविलीं जावीं, अशी दुरुस्ती विमा कायद्यांत करण्यांत आली आहे, परंतु अॅक्चुअरीच्या परीक्षा मात्र बंद आहेत. त्या लवकर सुरू झाल्यामुळें, हिंदी विद्यार्थ्यांची सोय होणार आहे.

"देना बँके"च्या बऱ्हाणपूर येथें दोन शाखा

देवकरण नानजी बँकिंग कंपनी लि. च्या बऱ्हाणपूर (मध्यप्रांत) येथील दोन शाखांचा उद्घाटन समारंभ मंगळवार ता. ३१ रोजीं निमार जिल्ह्याचे डे. कमिशनर खान बहादूर एफ. के. खान ह्यांचे हस्तें झाला. "देना बँके"च्या शाखांची संख्या आतां ३० झाली आहे.

श्री. कागल ह्यांचा दौरा

श्री. बी. आर. कागल (अॅड. ऑफिसर, जमशेदपूर) ह्यांची हेल्थ सर्व्हे अँड डेव्हलपमेंट कमिटीनें हिंदुस्थानांतील प्रमुख शहरांच्या शहरविस्तारयोजनांची पहाणी करण्याकरितां नेमणूक केली आहे. श्री. कागल त्यासाठी हिंदुस्थानभर दौरा काढणार आहेत. पुणें व खडकी येथें त्यांचा १ ते २ व ३ ते ५ नोव्हेंबर असा मुक्काम होणार आहे. त्यांच्या पहाणीचे आधारावर कमिटी आपल्या शिफारसी करील.

जनावरांचीं प्रदर्शनें

ऑल इंडिया कॅटल शो कमिटीनें १९४३-४४ मध्यें जनावरांचीं एकूण ४० प्रदर्शनें भरविलीं, त्यांत ५५ जातींच्या ९,००० जनावरांनीं भाग घेतला. एकूण १८,००० रुपयांचीं बक्षिसें वांटण्यांत आलीं. १९४४-४५ मध्यें ५० प्रदर्शनें भरवून २७,००० रुपयांचीं बक्षिसें देण्यांत येतील.

विवाह केल्यामुळें जागेचा राजीनामा देणार

इजिप्त सरकारचे ग्रेट ब्रिटनमधील वकील, डॉ. हसेन पाशा (वय ५५ वर्षे) ह्यांनीं मिस मेरी प्रीस्ट (वय २३ वर्षे) हिच्याशीं ता. २४ ऑक्टोबर रोजीं विवाह केला. इजिप्शन कायद्याप्रमाणें, जबाबदारीचीं कामें करणाऱ्या अधिकाऱ्यांस परदेशी स्त्रीशीं विवाह करण्याची मनाई असल्याकारणानें, डॉ. हसन पाशा ह्यांना आपल्या जागेचा राजीनामा द्यावा लागेल. मिस प्रीस्टनें मुसलमानी धर्म स्वीकारला आहे.

ब्रिटिश निर्गतींत घट

१९३८ चे मानानें आतां ब्रिटिश निर्गत व्यापार निम्म्यावर आला आहे. १९३८ सालीं निर्गतीची किंमत राष्ट्रीय मिळकतीच्यां १०.२% होती; आतां तत्सम प्रमाण २.८% वर आलें आहे.

युद्ध संपेपर्यंत थांबा

इराणमधील तेलाच्या खाणींचे बाबत करार करण्यासाठी रशिया, इंग्लंड व अमेरिका ह्यांची चढाओढ लागली आहे, परंतु युद्धसमाप्तीनंतरच ह्यासंबंधांत बोलणीं करण्याचें इराणच्या सरकारनें ठरविलें आहे.

नुकसानभरपाई मागण्याची मुदत वाढविली.

मुंबईमध्यें गेल्या एप्रिलमध्यें झालेल्या स्फोटामुळें नुकसान पावलेल्यांनीं नुकसानभरपाईची मागणी करण्याची मुदत ३१ ऑक्टोबरअखेर होती, ती आतां ३० नोव्हेंबरअखेर वाढविण्यांत आली आहे.

अनुक्रमणिका

	पृष्ठ
१ विविध माहिती ...	३५४
२ हिंदी बँकांची प्रगति	३५५
३ नगर-सुधारणा ...	३५६
४ फिलिपाइन्सवर अमेरिकेची चढाई ...	३५६
५ स्फुट विचार	३५७
हिंदुस्थान सरकारचें औद्योगिक धोरण—आंतरराष्ट्रीय औद्योगिक परिषदेंत हिंदी प्रतिनिधी-हिंदी विमा कायदांत सुधारणा—के. गुरुनाथराव ओगले—शोकप्रदर्शन व स्मारक—पुणें सहकारी सप्ताह	
६ बँक ऑफ महाराष्ट्र लि.	३५८
७ पत्नींच्या नांवाचें उत्पन्न	३५९
८ सहकारी बँकांचे अहवाल	३५९
९ औद्योगिक शेअर्सच्या किंमतींत वाढ	३६०
१० संगमनेर व्यापारी असोसिएशन	३६०

अर्थ

बुधवार, ता. १ नोव्हेंबर, १९४४

हिंदी बँकांची प्रगति

लहान हिंदी बँकांस वाव पाहिजे

दक्षिण हिंदुस्थानांतील जॉइंट स्टॉक बँकांच्या असोसिएशनतर्फे बँकांची एक परिषद् मद्रास येथें नुकतीच भरविण्यांत आली होती. रिझर्व्ह बँकेचे एक डेप्युटि गव्हर्नर, मि. वजाहत हुसेन, हे परिषदेंत उपस्थित होते. मि. टी. टी. कृष्णमाचारी ह्यांनीं आपल्या भाषणांत गेल्या तीन-चार वर्षांतील बँकिंगच्या प्रगतीचा आढावा घेतला. बँकांच्या ठेवींत वाढ झाली त्या प्रमाणांत त्यांचा व्यवहार वाढलेला नाहीं, ह्यावरून देशांतील आर्थिक परिस्थिति सुधारल्याचें दिसत नाहीं असें अनुमान त्यांनीं काढलें. लहान बँकांनीं देशाच्या अंतर्गत भागांत चालविलेलें काम मोठ्या, सर्वीक बँकांच्या शाखांना नीट करतां येणार नाहीं व लहान बँकांची जागा त्या घेऊं शकणार नाहींत, असें त्यांनीं सांगितलें. लहान बँकांचा व्यवस्थेचा खर्च बेताचा असतो, स्थानिक लोकांशीं बँकरचा प्रत्यक्ष परिचय असतो व त्यामुळें बेताच्या व्याजानें त्या कर्जे देऊं शकतात. ह्या सर्व गोष्टी लक्षांत घेतां, लहान बँकांना केवळ त्यांचा आकार लहान म्हणून, मोठ्या बँकांशीं प्रतिकूल स्पर्धेंत कायद्यानें टाकणें योग्य होणार नाहीं. बँकेचें किमान शेअर भांडवल ५०,००० रु. असलें पाहिजे, असें कंपनी कायद्यांतील १९३६ च्या दुरुस्तीनें ठरविलें आणि आतां ही मर्यादा १,००,००० रुपयांपर्यंत नेण्याचा हिंदुस्थान सरकारचा बेत आहे. ही गोष्ट लहान बँकांस अत्यंत जाचक होणार आहे. बँकांचें भाग भांडवल स्थानिक लोकसंख्येच्या प्रमाणांत व शाखांच्या संख्येवर अवलंबून असावें, अशीहि दुरुस्ती कायद्यांत सुचविण्यांत येणार आहे.

बँकेचा विस्तार तिच्या भाग भांडवलाच्या प्रमाणाबाहेर असूं नये, हें तत्त्व ठीक आहे, परंतु त्यासंबंधांत नियम पाळणें अवघड आहे. बँकांच्या एकूण जिंदगीपैकी किमान ३०% रकम तरती पाहिजे, अशीहि एक सुधारणा सुचविली जाईल असें कळतें. ही अट विशेषतः लहान बँकांना जाचक होईल, हें उघड आहे. रिझर्व्ह बँक आपल्या सभासद बँकांस कांहीं विशिष्ट परिस्थितींत विशिष्ट अटींवर अडचणीचे प्रसंगीं आपल्या नियमानुसार मदत करूं शकते, परंतु ह्यासंबंधांतील कायदा आज फारसा सहायकारक नाहीं. त्यांत सुधारणा करावी, अशी श्री. कृष्णमाचारी ह्यांची सूचना आहे. इंपीरिअल बँकेकडे रिझर्व्ह बँकेच्या कामाची एजन्सी आहे, परंतु इंपीरिअल बँकेच्या भागीदारांत विदेशीयांचें प्राबल्य आहे आणि तिची व्यवस्था बहुंशीं विदेशीयांकडेच आहे. त्याकारणानें, सरोसरीच्या हिंदी बँकांचा ह्या व्यवहाराशीं संबंध येत नाहीं व रिझर्व्ह बँक आणि इतर हिंदी बँका ह्यांच्या व्यवहारांची एकतानता होत नाहीं. हिंदुस्थानाच्या राजकीय दर्जाचा हा परिणाम आहे, अशी ह्या परिस्थितीवर श्री. कृष्णमाचारी ह्यांनीं टीका केली. इंपीरिअल बँकेस हिंदी बँकिंगच्या आकांक्षांबद्दल ओलावा वाटत नाहीं, परंतु एजन्सीच्या व्यवहारांचें मोठें घोरलें कमिशन मात्र तिला मिळतें, तेव्हां त्या कमिशनमध्यें इतर बँकांस वाटा मिळावा, असें त्यांनीं सुचविलें.

मि. कृष्णमाचारी ह्यांनीं दिग्दर्शित केलेल्या मुद्यांचा समावेश, असोसिएशननें मि. वजाहत हुसेन ह्यांस सादर केलेल्या पत्रकांत करण्यांत आला होताच, परंतु कित्येक बँकांनीं रिझर्व्ह बँकेच्या शेड्यूलमध्यें जागा मिळविण्यासाठी शेअर भांडवल वाढविण्याची परवानगी मागितली असतांना ती मिळाली नाहीं, ही गोष्ट त्यांचे प्रामुख्यानें नजरेस आणण्यांत आली. सध्याची वेळ भांडवलवाढीस सोयीची असल्यानें, सरकारनें बँकांना भांडवल वाढविण्यास मुक्त हस्तें परवानगी यावी, अशी रिझर्व्ह बँकेनें सरकारास सूचना करण्याबद्दल पत्रकांत आग्रह धरण्यांत आला होता. मि. हुसेन ह्यांनीं बँकांच्या असोसिएशनचें लहान बँकांच्या व्यवहारवाढीबद्दल जें म्हणणें होतें, त्यास सर्वसाधारणपणें पुष्टी दिली. भांडवलवाढीच्या अर्जासंबंधीं त्यांनीं खुलासा करतांना, योग्य कारणासेरीज कोठल्याहि बँकेचा अर्ज नामंजूर करण्यांत आलेला नाहीं असें सांगितलें. मद्रास प्रांतांतील ६० बँकांनीं भांडवल वाढविण्याची परवानगी मागितली, त्यांपैकी ३६ बँकांना ती मिळाली. बँकेवरील जनतेचा विश्वास ठेवींच्या वाढीचे रूपानें वाढत आहे किंवा नाहीं, हें पाहूनच भांडवल वाढविण्याची परवानगी दिली जाते. ज्यांचे अर्ज नामंजूर केले, अशा पांच बँकांचीं त्यांनीं उदाहरणें घेऊन, रिझर्व्ह बँकेच्या धोरणांत तक्रारीस कशी जागा नाहीं, हें पटवून दिलें. अर्ज आला कीं तो मंजूर करणें हिंदी बँकिंगच्या हितकारक वाढीस पोषक होणार नाहीं, हा त्यांचा मुद्दा होता. बिगर शेड्यूल्ड बँकांच्या कांहीं अडचणींचा उल्लेख असोसिएशननें आपल्या पत्रकांत केला होता, त्याबाबत मि. हुसेन ह्यांनीं खुलासा केला व कांहीं अडचणी दूर होणें अगदी शक्य आहे असें सांगितलें.

उडत्या बाँबबद्दलें लंडनमधील घरांचें नुकसान

जर्मन उडत्या बाँबच्या प्रसर हल्ल्यांचे काळांत लंडनमधील २३,००० घरांचा नाश झाला व ११,०४,००० घरांची कमीअधिक प्रमाणांत नादुरुस्ती झाली. ह्या ११,०४,००० घरपिकी विशेष नुकसान पावलेल्या घरांची संख्या सुमारें ३,००,००० इतकी भरेल. दुरुस्तीचें काम चालू आहे. १०,००० झोपड्या तातडीनें बांधण्यांत येत आहेत. थंडीमध्यें लंडन शहरवासीयांच्या हालांत कोळशाच्या तुटवड्याची आणखी भर पडणार आहे.

नगर-सुधारणा

तत्त्व आणि महत्त्व

[प्रो. काळे ह्यांनी कोल्हापूरच्या नगरपालिकेस नव्वद वर्षे पुरी होऊन तिला नवीन व उच्च दर्जा प्राप्त झाला आणि तिनें नगर सुधारणेचें कार्य योजनात्मक पद्धतीनें उत्साहपूर्वक रीतीनें चालू केलें, ह्यासंबंधांतील उत्सवांत केलेल्या भाषणांतील कांहीं उतारे.]

नागरिकांचें जीवन सुखकारक करण्याचे प्रयत्न होण्यास आणि त्यांस यश येण्यास प्रथम त्यांच्यापैकी सुज्ञ लोकांस असल्या सुधारणांचें महत्त्व पटलें पाहिजे आणि त्यांनीं आपल्या बांधवांस अनुकूल करून घेतलें पाहिजे. चांगले व रुंद रस्ते, सार्वजनिक स्वच्छता, शिक्षणाच्या उत्तम सोयी, उद्यानें, क्रीडांगणें, हवा व उजेड ह्यांचा भरपूर पुरवठा असलेलीं घरें, शुद्ध पाण्याची व दिव्यांची सोय, इत्यादि गोष्टी व्यक्ती, कुटुंबें, समाज व राष्ट्र ह्यांच्या जीवितास आवश्यक आहेत. ह्याविषयींची आस्था अनेकांस वाटत नाहीं. आधुनिक शास्त्रीय शोध व पद्धति ह्यांचे योगानें मानवी सुखसोयींत भर घालण्याचीं साधनें उपलब्ध झालीं आहेत व त्यांचा विनियोग करण्याची इच्छा सामान्य नागरिकांत दृढमूल होणें आवश्यक आहे. पुढारलेल्या देशांत आणि ह्या देशांतील प्रगमनशील शहरांत नवीन उपाय व योजना ह्यांच्या सहाय्यानें रोगराई, साथी इत्यादि आपत्तींस आळा घालण्यांत आला आहे. ह्या अनुभवापासून बोध घेण्याची जनतेच्या मनाची तयारी केली जाणें अगत्याचें आहे. आपण ज्या गावांत रहातों आणि जेथें आपलीं मुलेंबाळें लहानाचीं मोठीं होऊन नांदणार त्या ठिकाणाविषयीं प्रत्येकास प्रेम आणि आस्था वाटली पाहिजे. आपला देश सर्व दृष्टींनीं सुंदर व आदरणीय करण्याच्या प्रयत्नास हातभार लावणें हें आपलें कर्तव्य आहे. नागरिकत्वाचीं कर्तव्यें आणि जबाबदाऱ्या ह्याविषयींची जाणीव जनतेमध्यें जागृत रहाणें आवश्यक आहे.

अज्ञान आणि व्यक्तिस्वार्थ ह्यांच्यामुळें अशा पुनर्रचनेस विरोध होत असतो. मुंबई, पुणें ह्यांसारख्या शहरांतहि अशा विरोधाची भूमिका समजुतदार समजल्या जाणाऱ्या लोकांनीं घेतलेली प्रसिद्ध आहे. पुण्यांत फुले मार्केट हें एक नगराचें भूषण मानलें जातें. परंतु शनवारांतील जुनी, गैरसोयीची मंडई सोडून तेथें व्यवहार करण्यास तीव्र विरोध झाला होता आणि मार्केटाचें भव्य शिखर उभारण्याच्या योजनेच्या निषेधार्थ सभा भरलेल्या मीं पाहिल्या आहेत. देवालयें जशीं मानवी पारमार्थिक संस्कृतीचीं प्रतीकें आहेत, तशींच सार्वजनिक ऐहिक स्वास्थ्यासाठी उभारलेलीं भुवनेंहि मानवतेचीं प्रकट रूपें आहेत, अशी भावना निर्माण होणें इष्ट आहे. कोल्हापूर नगरपालिकेच्या सुधारणांच्या योजनांचें सामान्यतः स्वागत केलें जाऊन त्यांस लोकांचा पाठिंबा मिळत आहे हें उत्तेजनात्मक आहे आणि आपल्या जुन्या जमान्यांतून नवीन युगांत संक्रमण होत असल्याचें स्पष्ट दिसत आहे.

नगरें आणि खेडीं ह्यांमध्यें आरोग्य, शिक्षण, पाणीपुरवठा, स्वच्छता इत्यादि बाबींची व्हावयाची व्यवस्था स्थानिक स्वराज्याच्या कक्षेंत येते. मुख्य राज्यकर्त्या संस्थेचीं जीं अनेक कर्तव्यें असतात त्यांची, सोयीसाठी मध्यवर्ती, प्रांतिक व स्थानिक अशी विभागणी करण्यांत आली आहे. ह्या वाटणींत कांहीं बाबी मध्यवर्ती व्यवस्थेसाठी राखीव म्हणून ठेवण्यांत येतात आणि कांहीं स्थानिक स्वराज्यसंस्थांवर सोपवण्यांत येतात. कांहीं कामांत एक प्रकारची हिस्सेदारी असते. ह्या सर्व राज्यकर्त्या गटांनीं पहावयाचा कारभार त्यांच्या त्यांच्या परीनें लौकिक दृष्टीनें सारखाच महत्त्वाचा असतो. लोकांच्या जीविताचें आणि मालमत्तेचें रक्षण करण्याचें मध्यवर्ती राज्यकारभाराचें जसें जिव्हाळ्याचें कार्य आहे, तसेंच, लोकांच्या आरोग्याची काळजी घेणें हें स्थानिक स्वराज्य संस्थांचें काम अधिक नाहीं तरी तितक्याच महत्त्वाचें आहे; परंतु स्थानिक स्वराज्य संस्था राजकीय घटनेस अनुसरून मध्यवर्ती राज्यव्यवस्था मंडळानें घालून दिलेल्या मर्यादित कक्षेमध्यें वावरावयाच्या असल्यानें त्यांच्या कारभारासाठी करण्यांत येणारी पैशाची तजवीज अपुरी रहाते. स्थानिक कामें महत्त्वाचीं व विविध, पण तीं पार पाडण्यास लागणाऱ्या उत्पन्नाच्या बाबी मात्र मर्यादित, अशी परिस्थिति निर्माण होते, आणि नगरपालिका, लोकलबोर्डस् व खेड्यांतील पंचायती ह्यांची उत्पन्न-खर्चाच्या संबंधांत कुचंबणा होते. ह्याविषयींच्या तक्रारी नेहमी चालतात आणि त्या मिटवण्याचे मार्ग स्थानिक संस्थांस अधिक उत्पन्नाच्या बाबी तोडून देणें आणि ग्रँटसच्या मार्गानें त्यांस सढळ हातानें द्रव्यसहाय्य करणें हे होत. ज्या कामाची जबाबदारी मध्यवर्ती सरकारावर पडली असती ती स्थानिक स्वराज्य संस्थांनीं उचलली असल्याकारणानें त्यांस स्वतःच्या उत्पन्नापैकी योग्य हिस्सा देणें त्या सरकाराचें सरळ कर्तव्य ठरतें. हा लोकांच्या पैशाच्या योग्य वांटणीचा प्रश्न आहे. (अपूर्ण)

फिलिपाइन्सला स्वतंत्र करण्यासाठी अमेरिकेची चढाई.

आतां जपानच्या ताब्यांत असलेल्या फिलिपाइन्सवर अमेरिकेनें आघात करण्यास ता. २० ऑक्टोबर रोजीं प्रारंभ केला आहे, ह्या दृष्टीनें खालील माहिती उद्बोधक होईल. ह्या बेटांचें क्षेत्रफळ १,२१,००० चौरस मैल, म्हणजे ग्रेट ब्रिटन व आयर्लंड ह्यांच्या क्षेत्रफळाएवढें आहे. फिलिपाइन्समध्यें ७,००० बेटांचा समावेश होतो, परंतु त्यांपैकीं फक्त ९,७७३ बेटांना स्वतंत्र नांवें आहेत. एक चौरस मैलापेक्षा ज्यांचें क्षेत्रफळ भरतें, अशीं बेटें फक्त ४६२ च आहेत.

फिलिपाइन्स बेटें अत्यंत डोंगराळ आहेत व कांहीं मोठ्या प्रमुख बेटांतील पर्वत पुष्कळच उंच आहेत. शेतीच्या उत्पादनांत मुख्यतः तांदूळ, नारळ, साखर, ह्यांचाच भरणा आहे. साखर उत्पादन करणाऱ्या देशांत फिलिपाइन्सचा अनुक्रम पांचवा आहे. १९३९ च्या शिरगणतीप्रमाणें, तेथील लोकसंख्या १ कोटि, ६० लक्ष असून त्यांपैकी १ कोटि, ५८½ लक्ष फिलिपिनों आहेत. विदेशीयांत मुख्यतः चिन्यांचा (१,१७,४८७) भरणा आहे. १९३९ सालीं तेथें २९,०५७ जपानी व ८,७०९ अमेरिकन होते. फिलिपिनोंपैकी १ कोटि, २६ लक्ष लोक ख्रिस्ती (रोमन कॅथोलिक) आहेत. एकूण लोकसंख्येपैकी ४% मुसलमान आहेत. स्पेन व अमेरिका ह्यांचेमधील युद्धानंतर १८९८ मध्यें फिलिपाइन्सचें प्रभुत्व अमेरिकेकडे गेलें. १९३५ सालीं फिलिपाइन्सचें कॉमनवेल्थ सरकार प्रस्थापित करण्यांत आलें व १९४६ सालीं तो देश पूर्णपणें स्वतंत्र व्हावा, अशी कायद्यांत व्यवस्था केलेली होती. परंतु मध्यंतरीं ७ डिसेंबर १९४१ रोजीं जपाननें त्या बेटांवर स्वारी करून आपली सत्ता तेथें प्रस्थापित केली. फिलिपाइन्समधून जपान्यांची हकालपट्टी झाल्यावर तेथील स्वतंत्र सरकारास मान्यता देण्याचें व त्याच्या स्वातंत्र्याचें रक्षण करण्याचें अमेरिकेचें आजचें धोरण आहे.

स्फुट विचार

हिंदुस्थान सरकारचें औद्योगिक धोरण

युद्धोत्तर काळांत हिंदुस्थानचें औद्योगीकरण मोठ्या प्रमाणावर व योजनात्मक रीतीनें घडवून आणण्याची आवश्यकता सरकार आणि जनता ह्या दोघांस सारखीच मान्य आहे. ह्यामुळें हिंदी उद्योगधंद्यांचे पुढारी आणि हिंदुस्थान सरकार ह्यांनीं औद्योगिक उन्नतीच्या योजना आखल्या आहेत. त्या सरकारचे औद्योगिक व योजनाकारक खात्याचे मंत्री, सर आर्देशीर दलाल, ह्यांनीं प्रस्तुत विषयाचे संबंधांत आपल्या काय कल्पना आहेत आणि त्यांस मूर्तस्वरूप देण्यासाठी कोणत्या प्रकारची तयारी चालू आहे ह्याचें दिग्दर्शन गेल्या आठवड्यांत मुंबईमध्यें भरलेल्या औद्योगिक सल्लागार समितीच्या सभेंत केलें. त्यांनीं सांगितलेल्या माहितीवरून हिंदुस्थान सरकारचा विचार भरीव कार्य करण्याचा असून हिंदी उद्योगधंद्यांस शक्य तितकें विस्तृत उत्तेजन देण्याचा आहे असें दिसून येतें. युद्धोत्तर काळांत हा विचार किती प्रमाणांत कृतीमध्यें वठतो ह्यावर अर्थात्च हिंदुस्थानचें औद्योगिक व आर्थिक भवितव्य अवलंबून आहे. तथापि, आखण्यांत येणाऱ्या योजना आणि त्यांस मूर्तस्वरूप देण्याचे योजलेले मार्ग ह्यांस विशिष्ट महत्त्व आहे ह्यांत संशय नाहीं. युद्धोत्तर काळांत नवीन धंद्यांची स्थापना व जुन्यांची वाढ व्हावयाची असतां जकातीचें व इतर संरक्षण मिळेल किंवा नाहीं ह्याविषयींची शंका येणें स्वाभाविक आहे. ह्या प्रश्नास सर आर्देशीर दलाल ह्यांनीं दिलेलें उत्तर समाधानकारक आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. सध्यांचें औद्योगिक संरक्षणाबाबतचें हिंदुस्थान सरकारचें धोरण अधिक व्यापक व प्रभावी करण्याचा सरकारचा मानस असल्याचें त्यांनीं जाहीर केलें आहे. टारिफ कमिशनच्या शिफारसींस अनुसरून नवीन हिंदी धंद्यांत जकातीचें वगैरे संरक्षण दिलें जाण्यापूर्वी कांहीं अटी त्यांनीं पुऱ्या केल्या पाहिजेत, असें शिफारस करणाऱ्या टारिफ बोर्डावर बंधन घालण्यांत आलेलें आहे. ह्या अटी जाचक असल्याची तक्रार आज कित्येक वर्षे केली जात आहे. त्या शिथिल करण्याचें आणि धंदेवाल्यांच्या संरक्षणाविषयक मागण्यांची चौकशी करण्यासाठी टारिफ बोर्डाची कायमची स्थापना करण्याचें सरकारनें ठरवलें आहे असें सर आर्देशीर ह्यांनीं सांगितलें. नुसत्या संरक्षणाचाच नव्हे तर औद्योगिक प्रगतीच्या संबंधांतील भांडवलविषयक व इतर महत्त्वाच्या प्रश्नांचे बाबतींतल्या प्रश्नांचा विचार करण्यासाठी उच्च दर्जाचें असें एक बोर्ड स्थापण्याच्या कल्पनेचाहि परामर्श घेण्यासारखा आहे असें ते म्हणाले. हिंदुस्थानचें पूर्ण औद्योगीकरण होण्यास ब्रिटिश सरकारचा पाठिंबा आहे हें स्टेट सेक्रेटरी, मि. एमरी, ह्यांच्या एतद्विषयक उद्गारांचा उल्लेख करून त्यांनीं निदर्शनास आणिलें आणि ह्या ध्येयास अनुसरून हिंदुस्थान सरकार झपाट्यानें पुढें जाईल असें आश्वासन दिलें.

आंतरराष्ट्रीय औद्योगिक परिषदेंत हिंदी प्रतिनिधी

अमेरिकेंत आंतरराष्ट्रीय औद्योगिक परिषद् बोलावण्यांत आली असून तिच्या चर्चेंत भाग घेण्यासाठी हिंदुस्थानचे प्रतिनिधी गेले आहेत. हिंदी धंदेवाल्यांच्या वतीनें ह्या देशाची बाजू तेवीं योग्य रीतीनें मांडण्याकरितां जें मंडळ नियुक्त करण्यांत आलें आहे त्यांचें नेतृत्व मुंबईचे नामांकलेले व्यापारी सर चुनीलाल भाईचंद मेथा ह्यांस देण्यांत आलें आहे. सर चुनीलाल ह्यांस निरोप देण्याचा एक समारंभ मुंबईमध्यें मेल्या आठवड्यांत झाला. त्याप्रसंगीं इंडियन मर्चंट्स चेंबरचे अध्यक्ष, श्री. प्राणलाल देवकरण नानजी, ह्यांनीं हिंदी धंदेवाल्यांचे दृष्टीनें अमेरिकेंत भरणाऱ्या परिषदेंत ह्या देशाच्या औद्योगिक गरजा व आकांक्षा कशा स्पष्टपणानें मांडल्या जाव्या ह्याविषयीं विवेचन केलें आणि सर चुनीलाल ह्यांनींहि आपल्या भाषणांत ह्याच विषयाची उद्बोधक चर्चा केली. जागतिक शांततेच्या रक्षणाचे प्रयत्न आजवर राजकीय व धार्मिक पुढाऱ्यांनीं केले आहेत, ते निष्फळ ठरल्यानें जगांतील व्यापारी वर्गानें तो प्रश्न आतां हातीं घेतला पाहिजे, पण तसें करतांना केवळ आर्थिक तत्त्वांचा उच्चार न करतां निरनिराळ्या देशांच्या अडचणी लक्षांत घेऊन त्या दूर होण्याच्या दृष्टीनें आंतरराष्ट्रीय देवघेवीची घडी त्यांनीं बसवली पाहिजे असें त्यांनीं सांगितलें. अनियंत्रित व्यापारानें हा आंतरराष्ट्रीय प्रश्न सोडवतां येईल असें मत अलीकडे युरोपांत व्यक्त केलें जात आहे, पण हीच तर हिंदी स्वदेशी धंद्यांची मुख्य अडचण आहे आणि त्यांचें योग्य रक्षण झाल्यावांचून जागतिक आर्थिक प्रश्न सुटावयाचा नाहीं असें सर चुनीलाल ह्यांनीं बजावलें. हिंदुस्थानांत राष्ट्रीय सरकार स्थापन होण्याचें अगत्य ह्या औद्योगिक संरक्षणाकरितां तीव्रतेनें भासत असल्याचेंहि त्यांनीं सांगितलें. जेव्हां जेव्हां जागतिक स्वरूपाच्या व महत्त्वाच्या परिषदा भरतात तेव्हां तेव्हां राष्ट्रीय वृत्तीच्या प्रतिनिधींनीं त्यांमध्यें उपस्थित होऊन आपली बाजू निर्भीडपणानें पुढें मांडणें अत्यावश्यक आहे असें त्यांनीं सुचवलें. अमेरिकेंत भरणाऱ्या औद्योगिक परिषदेंत चर्चेसाठी प्रश्न येतील त्यांचे संबंधांत हिंदी व्यापार व धंदे ह्यांच्या रक्षणाविषयीं खबरदारी घेतली जाण्याची जरूरी प्रतिपादायी लागेल असें सांगून हिंदी कापसाच्या निर्गतीचे बाबतींत अमेरिकेच्या ह्या धंद्याच्या संबंधांतील धोरणामुळें कशा अडचणी येण्याची भीति आहे हें त्यांनीं दाखवलें. परिषदेंत परवानगी मिळाल्यास हा प्रश्न उपस्थित करून हिंदी कपाशीच्या व्यापाराचें रक्षण होईल अशी तरतूद होण्याविषयीं आपण सूचना करणार असल्याचें सर चुनीलाल ह्यांनीं सांगितलें. हिंदुस्थानच्या औद्योगिक उन्नतीची योजना यशस्वी होण्यास ह्या देशाच्या निर्गत व्यापारांत मोठी कूस राहिली पाहिजे आणि ती रहाण्यास कपाशीची निर्गत मोठ्या प्रमाणांत झाली पाहिजे आणि ह्याकरितां अमेरिकन कपाशीच्या जागतिक स्पर्धेंत हिंदी कपाशीस व्यापारांत योग्य वाटा मिळणें आवश्यक आहे अशी विचारसरणी त्यांनीं अंगिकारली.

हिंदी विमा कायद्यांत सुधारणा—नव्या विधेयाचा मसुदा

हिंदी विमा कायद्यांत १९४१ मध्यें विस्तृत सुधारणा करण्यांत आली. त्यानंतरच्या अनुभवांस अनुसरून आतां त्या कायद्यांत आणखी दुरुस्ती करण्यांत यावयाची आहे आणि त्याकरितां हिंदुस्थान सरकारनें एक ४१ कलमांचें विधेयक तयार केलें आहे. विमा कंपन्या क्लेम्सचे पैसे देण्याचे बाबत निष्कारण विलंब लावतात व हयगय करतात, अशा कित्येक तक्रारी आल्याकारणानें त्या नाहींशा व्हाव्यात याकरितां कडक उपाययोजना करण्यांत यावयाची आहे. क्लेम्सचे पैसे वेळेवर न देणाऱ्या कंपन्यांचा परवाना काढून घेतला जाईल. योग्य क्लेम्सचे पैसे वकशीर दिले गेले नाहींत अशी सुपरिंटेंडन्ट ऑफ इन्शुरन्सची खात्री झाल्यास, रजिस्ट्रे

शन पुनः चालू राहील. वरील कडक नियमास विमा कंपन्यांनी विरोध दर्शविलेला आहे, परंतु त्यांतील मूळ तत्त्वाबाबत मतभेद होण्याचें प्रयोजन नाही. विमा कायद्याप्रमाणें कंपन्यांना डिपॉझिट रकमा ठेवाव्या लागतात व सोयीसाठी ब्रिटिश इंडीतील कंपन्यांनी ठेवलेली डिपॉझिटस संस्थानी सरकार मान्य करतात व संस्थानी इंडीतील कंपन्यांनी ठेवलेली डिपॉझिट्स ब्रिटिश हिंदी सरकार मान्य करतें. सहाजिकच ही डिपॉझिट्स परत करतेवेळीं दोन्ही ठिकाणच्या विमाअधिकाऱ्यांची संमति घेतली जाणें इष्ट आहे व त्या दृष्टीनें कायद्यांत दुरुस्ती होणार आहे. विमा कंपनीच्या एकूण जिंदगीपैकीं विमा फंडाची रक्कम स्वतंत्रपणें गुंतविली जावी व आयुर्विम्याचें काम करण्याऱ्या कंपनीचा लाइफ फंड त्याचा उद्देश पार पाडण्यास पुरेसा आहे अशी सुपरिंटेंडेंट ऑफ इन्शुअरन्सची खात्री झाली तरच त्या कंपनीला इतर प्रकारच्या विम्याचें काम करण्यास परवानगी मिळावी अशीहि दुरुस्ती कायद्यांत केली जाणार आहे. आयुर्विमा कंपन्यांचा भक्कमपणा वाढविणें हा नियोजित विलाचा उद्देश आहे.

कै. गुरुनाथराव ओगले-शोकप्रदर्शन व स्मारक

ओगले ग्लास वर्क्सचे एक चालक व "प्रभाकर" कंदिलाचे जनक, श्री. गुरुनाथराव ओगले ह्यांच्या अकाली निधनाबद्दल शोक प्रदर्शित करण्यासाठी नागरिकांची जाहीर सभा २५ ऑक्टोबरें रोजीं केसरी मराठा संस्थेच्या दिवाणखान्यांत श्री. दा. वा. पोतदार ह्यांच्या अध्यक्षतेखाली भरली होती. अध्यक्षांच्या प्रास्ताविक भाषणानंतर श्री. आ. रा. भट ह्यांनीं मृताच्या स्मृतीला गौरवपर पुष्पांजलि अर्पिणारे संदेश वाचून दाखविले व दुःखप्रदर्शनाचा आणि स्मारकाचा मुख्य ठराव मांडला. त्याला श्री. दा. वि. गोखले, श्री. न. वि. गाडगीळ व श्री. न. गं. आपटे ह्यांनीं समयोचित भाषणें करून पाठिंबा दिला. मराठा चेंबरनें पुढाकार घेऊन के. गुरुनाथराव ओगले ह्यांचें समयोचित स्मारक करावें, अशा आशयाचा तो ठराव आहे. के. गुरुनाथरावांचे चुलत बंधु श्री. य. धों. ओगले ह्यांनीं त्यांच्या आठवणी सांगितल्यावर सभेनें दोन मिनिटें स्तब्ध उभें राहून ठराव संमत केला. श्री. चिं. वि. चितळे ह्यांनीं अध्यक्षांचे आभार मानले. स्मारकाच्या ठरावास अनुसरून चेंबरच्या कार्यकारी मंडळानें योजना आखून कार्यास प्रारंभ केला आहे, असें समजतें.

पुणें सहकारी सप्ताह

सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक, पुणें, ह्या संस्थेच्या विद्यमानें रविवार, ता. २९ ऑक्टोबर रोजीं सायंकाळीं सहकारी सप्ताहाचा प्रारंभ करण्यांत आला. प्रो. काळे अध्यक्ष आणि मुख्य वक्ते होते. श्री. चितळे, श्री. करंदीकर व श्री. येरवडेकर ह्यांचींहि भाषणें झालीं. प्रो. काळे ह्यांनीं आपल्या भाषणांत सहकाराचें ध्येय, तत्त्वें व व्यवहार ह्यांचें विवेचन करून ह्या संघटनेचें संवर्धन कोणत्या पद्धतीनें व मार्गानें होणें अगत्याचें आहे ह्यावर विचार प्रदर्शित केले आणि सेंट्रल बँकेशीं व पुण्यांतील इतर सहकारी संस्थांशीं संलग्न असलेल्या कार्यकर्त्यांचें त्यांचा उत्साह व कार्यतत्परता ह्याबद्दल अभिनंदन केलें. रावसाहेब सोले, बँकेचे चेअरमन, ह्यांनीं अध्यक्षांचें समयोचित शब्दांनीं आभार मानल्यावर उद्घाटनाचा समारंभ समाप्त झाला.

बँक ऑफ महाराष्ट्र लि. शेडयूल्ड बँक झाली

बँक ऑफ महाराष्ट्र लि.चें नांव रिझर्व्ह बँकेच्या दुसऱ्या शेडयूलमध्यें दाखल करण्यांत आलें असल्याचें वृत्त प्रसिद्ध झालें आहे. कित्येकांनीं, महाराष्ट्र बँक पहिल्या शेडयूलमध्यें न आल्याकारणानें इतर कांहीं शेडयूल्ड बँकांपेक्षां तिचा दर्जा कमी आहे काय? अशी शंका गैरमाहितीमुळें व्यक्त केली आहे. वास्तविक सर्वच शेडयूल्ड बँकांची यादी दुसऱ्या परिशिष्टांत दिलेली असते. रिझर्व्ह बँक कायद्याला एकूण पांच परिशिष्टें आहेत. पहिल्या परिशिष्टांत, बँकेच्या पांच शेअर रजिस्टरांचें क्षेत्र स्पष्ट करून सांगितलेलें आहे; दुसऱ्या परिशिष्टांत शेडयूल्ड बँकांची यादी आहे; तिसऱ्यांत रिझर्व्ह बँक व इंपीरिअल बँक ह्यांचेमधील कराराचा तपशील आहे; चवथ्यांत भागीदारांना द्यावयाच्या डिव्हिडंडसंबंधीं नियम आहेत व पांचव्यांत बँकेनें दर आठवड्यास प्रसिद्ध करावयाच्या हिशेबाचा तक्ता दिलेला आहे. सर्व एक्सचेंज बँका, इंपीरिअल बँक, वगैरे शेडयूल्ड बँकांचीं नांवें दुसऱ्या परिशिष्टांत आहेत व त्यांतच नव्या शेडयूल्ड बँकांचीं नांवें दाखल झालीं म्हणजे सरकारी गॅझेटांत त्याप्रमाणें घोषणा होते.

आयुर्वेद रसशाळा पुणें लि.

वरील कंपनीस ३१ मे, १९४४ अखेर संपलेल्या वर्षी २४,०४५ रु. निवळ नफा झाला. साधारण भागीदारांना ४½% (इनकमटॅक्स ह्यांतून कापून द्यावयाचा) डिव्हिडंड मिळणार आहे. कंपनीनें अहवालाचे वर्षी २,७२,३१७ रुपयांची विक्री केली. कच्ची, पक्की व तयार होत असलेलीं औषधें ह्यांच्या शिल्लक मालाची किंमत ३,८१,९३२ रुपये आहे.

मोफत वाचनालय रौप्य उत्सव

पुण्यांतील श्रीगणेश मोफत वाचनालय व ग्रंथालय संस्थेस विजयादशमीस २५ वर्षें पूर्ण झाल्यानें येत्या वर्षअखेर संस्थेचा रौप्यमहोत्सव साजरा करण्यांत येणार आहे. संस्थेच्या इमारत-निधीचे पूर्वतयारीसाठी संस्थेचे चिटणीस श्री. हरि भालचंद्र देशपांडे हे मदत गोळा करण्यासाठी फिरणार आहेत. तरी इच्छेनुसार इमारत-निधीसाठी चिटणीस, श्रीगणेश मोफत वाचनालय, ८ कसबा पेठ पुणें, या पत्त्यावर मदत पाठवावी असें सदर संस्थेचे चिटणीस कळवितात.

कपास खरेदी-विक्रींत २५ लक्ष पौंडांचा तोटा

मार्च, १९४४ अखेर संपणाऱ्या तीन वर्षांत ब्रिटिश सरकारनें सूत व कापड ह्यांच्या किंमती स्थिर राखण्यासाठी कपास चाऊक खरेदी करून विकली, त्यांत सरकारला २५ लक्ष पौंड तोटा आला.

हिंदी स्त्रीच्या तान्यांत लष्करी भाजीचा मळा

सदर्न आर्मी हेडक्वार्टर्सच्या भाजीपाल्याच्या मळ्याची व्यवस्था जत संस्थानच्या रहिवासी सार्जंट राजुल शहा (वुमेन्स ऑक्झिलिअरी कोअर) ह्या स्त्री जैन बी. एजी. पदवीधराकडे सोपविण्यांत आलेली आहे.

गीता प्रचारासाठी ९ लक्ष रुपयांची देणगी

संयुक्त प्रांतांतील एका धनिकानें आपली सर्व संपत्ती (सुमारें ९ लक्ष रुपये) मथुरा येथें गीतामंदिर बांधण्यासाठी व गीतेच्या शिकवणीसाठी पुस्तकें व मासिक प्रसिद्ध करण्यासाठी देऊन टाकली आहे.

पत्नीच्या नांवानें उत्पन्न लिहून ठेवलें

पतीस प्राप्तीवरील कर द्यावा लागणार नाहीं

६ मे, १९३७ रोजीं श्री. डी. आर. शहापुरे ह्यांनीं आपल्या हिशेबाच्या वहींत आपण पांचवी बायको करीत असून कुटुंबीयांच्यासाठी पैशाची व्यवस्था करीत असल्याचें नमूद केलें. ह्या व्यवस्थेप्रमाणें, ह्या पांचव्या पत्नीस तिच्या हयातींत, २०,००० रुपयांच्या भांडवलावरील उत्पन्नाचे दरसाल ६०० रुपये मिळावयाचे होते. हें २०,००० रुपये श्री. शहापुरे ह्यांनीं आपल्या धंद्यांतच गुंतविलेले होते. ह्या भांडवलावर पत्नीचा कांहींहि अधिकार नव्हता. हें भांडवल पत्नीच्या नांवें वर्ग करण्यांत आलेलें नाहीं, ह्या मुद्यावर इनकमटॅक्स अधिकाऱ्यांनीं भांडवलावरील उत्पन्न हें श्री. शहापुरे ह्यांचेंच उत्पन्न आहे असें ठरविलें व त्यावर कर बसविला. मुंबई हायकोर्टांत हें प्रकरण गेलें, तेव्हां हायकोर्टानें श्री. शहापुरे ह्यांच्या वहींतील नोंदीचा अर्थ "पत्नीस तिच्या हयातींत उत्पन्न तोडून दिलें आहे" असाच केला. पतीनें आपल्या पत्नीचें पोषण केलेंच पाहिजे असा कायदा असला तरी प्रस्तुत व्यवस्थेशी त्या जबाबदारीचा संबंध नाहीं; ६०० रुपयांच्या उत्पन्नाचा विनियोग पाहिजे त्याप्रमाणें करण्यास पत्नीस मोकळीक होती, पत्नीच्या हयातींत पतीस ह्या उत्पन्नाचा कांहींहि प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष फायदा मिळावयाचा नव्हता; इत्यादि मुद्दे मांडून हायकोर्टानें इनकमटॅक्स कायद्याच्या १६ (१) (क) ह्या कलमांत श्री. शहापुरे ह्यांचें प्रकरण बसत नाहीं असें ठरविलें व त्यांचेवर ६०० रुपयांच्या उत्पन्नावर कर बसविता येत नाहीं, असा निवाडा केला.

दि मराठा मार्केट पीपल्स को. बँक लि., मुंबई

बँकेचें वसूल भांडवल २७,६२० रुपये असून तिचेकडे ४ लक्ष, ६८ हजारांच्या ठेवी आहेत. जिंदगीपेकी ७७ हजार रु. रोख, ३ लक्ष ७४ हजार रु. रोख्यांत व ५२½ हजार रुपये कर्जात गुंतलेले आहेत. बँकेस 'अ' वर्ग मिळाला आहे, खेळतें भांडवल व व्यवहार वाढला आहे. नफा ६,८५६ रुपये झाला.

इंदूर परस्पर सहकारी पेढी, मर्यादित, इंदूर

अहवालाचे वर्ष अखेर पेढीचे पटावर १,४७९ सभासद होते. ठेवींचा आकडा ८½ लक्ष रुपये झाला आहे. भाग भांडवल ९८,८०० व गंगाजळी आणि इतर रिझर्व्हे धरून १ लक्ष, २½ हजार रुपये आहेत. गेल्या वर्षीच्या मानानें ह्या वर्षी कर्जाची रकम ५५½ हजार रुपयांनीं घटली आहे व ती २ लक्ष, २१¹ हजार रुपये आहे. थकलेल्या बाकीची रकम ८०½ हजार रुपये आहे. अहवालाचे वर्षी पेढीस १२,४२० रुपये नफा झाला. ५% प्रमाणें डिव्हिडंड देण्यांत आलें.

सातारा जिल्हा को. लँड मार्गेज बँक लि., कराड

मागील वर्षीत २१ सभासदांनीं त्यांजकडे असलेलें कर्ज (२१,१२५ रु.) मुदतीपूर्वी फेडलें, तर अहवालाचे साठीं आणखी १० सभासदांनीं असेंच १३,५५० रुपये कर्ज फेडलें. नवीन कर्जमागणी येत नाहीं, परंतु बँकेच्या विशेष प्रचारामुळें अहवालाचे वर्षी ७४ अर्ज दाखल झाले. ५१ सभासदांना ३९,५५० रुपये कर्ज वाटण्यांत आलें. बँकेस वर्ष अखेर ४,३७६ रुपये नफा झाला. ५% डिव्हिडंड वाटण्यांत आलें. बँकेचें सभासदांकडून येणें कर्ज ३ लक्ष, ३९ हजार रुपये आहे.

न्यू इंडिया इंडस्ट्रीज लि.

(Approved Re-treaders and Approved Contractors)

२६ लॅमिंग्टन नॉर्थ, मुंबई ११.

अध्यक्ष:—श्री. ग. स. मराठे, ॲक्चुअरी.

महाराष्ट्रांतील रबराचा प्रमुख कारखाना

★ गिरणीचे रोलर्स ★ रबरी हातमोजे ★ छापखान्यांचे रोलर्स
★ रीमोल्ड टायर्स ★ रबरी वॉशर्स ★ सॉलिड व्हील्स

व इतर रबरी माल तयार होतो.

पु. म. मराठे
मॅनेजिंग डायरेक्टर.

गिरगांव मुंबई नं. ४

महिंद्रकर ब्रदर्स
तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

औद्योगिक शेअर्सच्या किमतींत वाढ

युद्धजन्य परिस्थितीमुळें औद्योगिक कंपन्यांचे नफे वाढले व इतरांच्या हल्ल्याचें भय कमी झालें, त्या प्रमाणांत ह्या हिंदी कंपन्यांच्या मालांची किंमतहि वाढत गेली. पैसे गुंतविण्यास इतरत्र जागा नसल्या कारणानें व मे, १९४३ मध्यें नव्या कंपन्यांच्या स्थापनेवर बंधनें घातल्याकारणानें, शेअर बाजाराकडे पैशाचा ओघ चालु राहिला आणि औद्योगिक कंपन्यांचे भागास तेजी आली. ऑगस्ट १९३९ मध्यें कंपन्यांच्या भागांची किंमत १०० मानली, तर १९४१-४२, १९४२-४३ व १९४३-४४ मध्यें त्यांची शतमानानें तुलनात्मक किंमत किती वाढली, हे दर्शविणारे आकडे खालीं दिले आहेत:—

	ऑगस्ट १९३९	१९४१-४२	१९४२-४३	१९४३-४४
बँका	१००	११०·८	११७·५	१५५·५
कपास गिरण्या	१००	१७७·२	२१३·५	२६९·५
कोटसा	१००	१२५·३	१३३·८	१९०·४
ताग गिरण्या	१००	१२९·८	१३१·९	१७०·०
खाणी	१००	१०४·६	१०६·८	१५५·२
सिमेंट	१००	१२५·७	१५८·१	२००·०
इंजिनिअरिंग	१००	१४४·५	१४९·७	१९६·६
चहा	१००	१३६·३	१५९·१	२२६·४
साखर	१००	१५३·३	१८९·३	२६५·४
इतर	१००	१५६·१	१६७·८	१९९·६
सरासरी	१००	१४५·२	१५९·३	२९०·१

१९२७-२८ मधील प्रातिनिधिक शेअर्सची व रोख्यांची किंमत १०० मानली, तर गेल्या तीन वर्षांत शतमानानें त्या किंमतींत किती वाढ घट झाली, हें खालील आकडे सांगतील:—

	१९४१-४२	१९४२-४३	१९४३-४४
सरकारी रोखे	११५·९	११५·०	११७·२
ठराविक व्याजाचे शेअर्स	१५५·९	१४४·९	१६४.३
कपास (२२ शेअर्स)	१११·०	१४६·६	१९८·८
ताग (२० शेअर्स)	५७·२	५३·९	६५·६
कपास (१३ शेअर्स)	१५२·५	१६१·३	२२७·२
लोखंड-पोलाद (३ शेअर्स)	५०४·३	४४१·५	५५५·९
चहा (१९ शेअर्स)	७७·७	८६·९	११८·०
साखर (३ शेअर्स)	१०७·२	१४१·७	२११·४
सिमेंट (१ शेअर)	१९३·९	२३५·९	२७८·४
कागद (२ शेअर्स)	३२३·९	३५९·९	४६८·०
सरासरी	१२९·९	१३८·६	१८२·२

संगमनेर व्यापारी असोसिएशन

वरील संस्थेस संगमनेरचे मूळ रहिवासी, न्यू सिटिझन बँकेचे मॅनेजिंग डायरेक्टर, श्री. डी. डी. देशपांडे ह्यांनीं व श्री. कुं. सो. फिरोदिया, एम. एल. ए. ह्यांनीं नुकतीच भेट दिली. श्री. देशपांडे ह्यांनीं बँक व तिचेपासून फायदे ह्याची विस्तृत माहिती सांगितली. श्री. फिरोदिया ह्यांनीं, व्यापाऱ्यांनीं त्यांची शेती असल्यास ती सुधारावी व इतर जोडधंदे सुरू करून उत्पन्न वाढवावें, असा उपदेश केला.

* *
पूना गेस्ट हाऊस
टेलिफोन नं. ७७९
* *

संस्थापक :
कै. नानासाहेब सरपोतदार

जिकडे तिकडे प्रशंसा
इमिटेशन दागिन्यांवर रासायनिक क्रिया करून खऱ्या सोन्याचा पत्रा चढविला जातो त्यामुळें दागिना केव्हांही खराब होत नाहीं, ही पूर्ण खात्री झाली. सोन्याचा पत्रा चढविलेल्या चार बांगड्या किं. आठ रु. गरजेस्तव दागिना परत करणें झाल्यास वर चढविलेल्या सोन्याचे सर्वच्या सर्व पैसे परत देऊं.
भट कं. सांगली, S. M. C.
भट कंपनी शाखा—बुधवार पेठ, पुणें २.

पैसा व ज्ञान देणारीं पुस्तकें !
श्रीमंत कसें व्हावें? संपत्तीचे सुंदर मार्ग दाखवून हजारों रु. मिळवून देतें. वाचून लक्षाधीश व्हाल ! किं. १॥ रु. काम आणि कामिनी. काम शास्त्रावरील अपूर्व ग्रंथ ! किं. १॥ रु. मृत्युलोकचा प्रवास ! मरणोत्तर आत्म्याच्या अद्भुत हालचालींचें कथानक ! किं. १ रु. लिहा. विघट आणि मंडळी, कराड जि. सातारा.

पुण्यांतील
आदर्श निवासस्थान व भोजनालय
छाया लॉजिंग व बोर्डिंग हाऊस
बुधवार चौक, पुणें २.

डोक्यांतील उवा १ तासांत मारण्याचा आश्चर्यकारक शोध
लायसॉफ
बाटली किंमत १ रु. ट. ख. निराळा
दोन वेळा उपयोग
दि मागोरा केमिकल कं. लि.
— हिराबाग, पुणें २ —

हें पत्र पुणें, पेठ सांवुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व ना. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' सांवुर्डा, घ. नं. ९२७।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.

खालील पत्त्यावर चौकशी करावी.

व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

अर्थ

वर्गणीचे दर.

वार्षिक वर्गणी
रु. ४
(टपाल खर्चासह)
किरकोळ अंकास
दोन आणे.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष १० पुणें, बुधवार, तारीख ८ नोव्हेंबर, १९४४ अंक ४४

JUST PUBLISHED

INDIAN RURAL PROBLEM

BY

Sir Manilal Nanavati and Prof. J. J. Anjaria.

(Issued by the Indian Society of Agricultural Economics, Bombay).

Price Rs. 8

(Postage extra).

Sole Selling Agents :—

THE CO-OPERATORS' BOOK DEPOT.

9, BAKEHOUSE LANE,
FORT, BOMBAY.

देना बँक

देवकरण नानजी बँकिंग कं. लिमिटेड

अधिकृत भांडवल...	...रु.	१,००,००,०००
वर्गीकृत भांडवल...	...रु.	५०,००,०००
खपलेलें भांडवल...	...रु.	५०,००,०००
रिझर्व्ह फंड...	रु.	११,००,०००
एकूण ठेवी ३१-१०-४४	...रु.	७,०८,९६,४४०
एकूण वर्किंग फंड ... „	...रु.	७,९०,४३,३३६
खात्यांची संख्या... „ ...		३०,५८१
शाखांची संख्या... ...		३०

देना बँकेच्या सर्व कचेऱ्यांत, हिंदुस्थान सरकारचे १० रुपये व १०० रुपये किंमतीचे प्राइझ बाँडसुद्धां विक्रत मिळतात.

मलेरियावर

यशस्वी इलाज

ॲनोफेलिन

(ANOFELIN)

आयुर्वेद रसशाळा पुणें लि.

—राष्ट्रीय काटकसर—

युद्धकार्यांची गरज लक्षांत घेऊन डबे वा कागद यांची बचत करणें भाग आहे. ही पॅकिंग-बाबतची अडचण लक्षांत घेऊन—

—गोल्डन कोको—

सुटा मिळण्याची सोय सर्व प्रमुख व्यापाऱ्यांकडे करण्यांत येत आहे. सुटा कोको घेण्यानें पैशाचीही बचत होते. मात्र आपणांस गोल्डन कोकोच मिळत आहे अशी खात्री करून घ्या. नांव लक्षांत ठेवा.

साठे बंधू, "गोल्डन कोको"

—सर्वत्र मिळतो—

साठे कोको व चॉकोलेट कारखाना, पुणें २.

गिरगांव
मुंबई नं. ४

महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक,
पुणें

विविध माहिती

न्यू इंडिया इंडस्ट्रीज लि., मुंबई

वरील कंपनीस ३१ मार्च, १९४४ अखेर संपलेल्या वर्षी ११ हजार रुपये निव्वळ नफा झाला. भागीदारांना १०% (कर कापून घ्यावयाचा) डिव्हिडंड मिळणार आहे. कंपनीची वार्षिक सभा ता. ११ नोव्हेंबर रोजी भरणार आहे.

बँक ऑफ सिटिझन्सची बेळहोंगल शाखा

दि बँक ऑफ सिटिझन्स लि. च्या बेळहोंगल येथील शाखेचा उद्घाटन समारंभ ता. १९ ऑक्टोबर रोजी श्री. एस. एन. अंगडी ह्यांच्या हस्ते झाला.

पुण्याची लोकसंख्या ५½ लाखांवर गेली

पुण्याची लोकसंख्या आतां ५,६०,००० झाली आहे, तिला पुणें रेशनिंग कचेरीनें ५ जुलै, १९४४ अखेर संपलेल्या वर्षांत ११,५२,५२८ टन धान्य व २,११,८१९ मण साखर ह्यांचा पुरवठा केला.

कोयनेलचा पुरवठा

१९४२-४३ अखेर हिंदुस्थानांतील कोयनेलचा साठा १,८९,००० पौंड इतका होता. १९४१-४२ अखेर तो २,२०,००० पौंड होता. नेहमीच्या कोयनेलच्या झाडांपासून कोयनेल मिळूं लागण्यास ७ वर्षे लागतात; रशियन पद्धतीनें ३½ वर्षांत तें मिळूं शकतें. अशीं झाडें ६०० एकरांत १९४३ साळीं लावण्यांत आलीं. १९४४ साळीं ह्याचप्रकारें १,५०० एकरांत लागवड होईल व १९४५ साळीं आणखी १,२५० एकरांत लागवड होईल.

इंजनांची आयात

हिंदुस्थान सरकारनें २५५ ब्रॉड गेजचीं व ३७७ मीटर गेजचीं इंजनें अमेरिकेंतून मागविलीं आहेत, त्यांपैकी ३० सप्टेंबर अखेर अनुक्रमें ४८ व १७४ इंजनें हिंदुस्थानांत येऊन दाखल झालीं आहेत.

सरकारी अधिकाऱ्यांस महागाई भत्ता

१,००० रुपयांपर्यंतच्या पगाराच्या ज्या अधिकाऱ्यांस अद्याप महागाई भत्ता मिळत नाहीं, अशांना तो देण्याचें मुंबई सरकारनें ठरविलें आहे. विवाहित अधिकाऱ्यांना १०% व अविवाहित अधिकाऱ्यांना ५% महागाई भत्ता मिळेल. लहान मुलें असलेल्या विधुरांचा समावेश विवाहितांत केला जाईल.

न्यू स्वदेशी मिलची ३० लक्ष रुपयांस खरेदी

शेठ नेमाणी ह्यांच्या मालकीची, अहमदाबाद येथील न्यू स्वदेशी मिल्स बिर्लाशेठजींनीं ३० लक्ष रुपयांस खरेदी केली आहे.

अमेरिकन सैनिकहानि

युद्धास प्रारंभ झाल्यापासून आतांपर्यंत अमेरिकेचे ४,८७,६९० सैनिक कामास आले आहेत.

डेक्कन लाइफ इन्शुअरन्स कंपनीज असोसिएशन

महाराष्ट्रांतील आयुर्विमा कंपन्यांची ही असोसिएशन नुकतीच स्थापन झाली आहे. प्रोग्रेसिव्ह इं. कंपनीचे सेक्रेटरी श्री. गाडगीळ हे तिचे अध्यक्ष असून औंध न्यूच्युअलचे मॅ. डायरेक्टर श्री. जोशी हे तिचे सेक्रेटरी आहेत.

ब्रह्मपुत्रा नदीवर प्रचंड पूल

बंगाल व आसाम ह्यांमधील दळणवळण सुधारण्याच्या दृष्टीनें सरकारनें एक प्रचंड योजना आखली आहे, तींत ब्रह्मपुत्रेवरील पूल समाविष्ट आहे. ह्या नियोजित पुलाची लांबी ८×४००′= ३,२००′ व ४×१००′=४००′ म्हणजे एकूण सुमारें ३,६०० फूट होईल. इतक्या लांबीचा दुसरा पूल हिंदुस्थानांत नाहीं. पुलास एकूण सुमारें २ कोटि रुपये खर्च येईल.

हिंदी ग्रंथालयांतील ग्रंथांची संख्या

इंडियन लायब्ररी असोसिएशननें १९३८ साळीं हिंदी ग्रंथालयांची डायरेक्टरी तयार केली, त्यांत एकूण २६९ ग्रन्थालयांची माहिती येऊं शकली. त्यांची वर्गवारी पहातां, हिंदी ग्रंथालयांचें पुस्तकांच्या बाबतीमधील दारिद्र्य दिसून येतें.

ग्रंथांची संख्या	ग्रंथालयांची संख्या
१,००,००० पेक्षा अधिक	६
५०,००० ते १,००,०००	१०
२०,००० ते ५०,०००	४२
१०,००० ते २०,०००	७४
५,००० ते १०,०००	१३७

सुएझ कालव्याचे शेअर्स-जर्मनीची लुडबुड

तांबडा समुद्र व भूमध्यसमुद्र ह्यांस जोडणाऱ्या सुएझ कालव्याची मालकी एका कंपनीकडे आहे. तिच्या एकूण निर्णायक ८,००,००० भागांपैकी ३,५३,०२४ भाग ब्रिटिश सरकारचे हातीं आहेत व बाकीचे भाग इतरत्र जगभर विखुरलेले आहेत. जर्मनीनें फ्रान्स ताब्यांत घेतल्यानंतर तेथील सुएझ कालव्याचे भाग मिळवून स्वतःकडे बहुसंख्य भाग घेतले आहेत, अशी मध्यंतरीं गप्प होती. फ्रान्स जर्मनीस शरण आला, तेव्हांपासून कंपनीच्या भागीदारांची सभा झालेली नाहीं. आणखी कांहीं काळ खरी परिस्थिति कांहींच समजणार नाहीं.

अ. भा. ग्रामोद्योग संघ

वरील संघाच्या महाराष्ट्रांतील कार्याचें नेतृत्व श्री. बा. गं. खेर ह्यांनीं पत्करलें असून श्री. गंगाधरराव देशपांडे ह्यांनीं कर्नाटकांतील कामाची धुरा स्वीकारली आहे.

नव्या व्यापारी कॉलेजाचा नामकरण विधि

डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या नव्या व्यापारी कॉलेजास "दि बृहन्महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्स" हें नांव दिल्याचें जाहीर करण्याचा समारंभ ता. ११ नोव्हेंबर रोजीं, रिझर्व्ह बँकेचे पहिले हिंदी गव्हर्नर सर चिंतामणराव देशमुख ह्यांचे हस्तें होणार आहे. बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेटनें दिलेल्या २ लक्ष रुपये देणगीच्या प्रीत्यर्थ, नव्या कॉलेजास हें नांव देण्याचें सोसायटीनें ठरविलें, हें प्रसिद्धच आहे.

परदेशी माल लवकरच येणार

फाउंटनपेन्स, रेडिओ सेटस, घड्याळें, रेशमी माल, इत्यादींची बरीच आयात परदेशांतून लवकरच होणार आहे, असें हिंदुस्थान सरकारचे कंट्रोलर जनरल ऑफ सिव्हिल सप्लाईज, श्री. देसाई, ह्यांनीं लखनौ येथें सांगितलें.

श्री. पी. जी. केतकर ह्यांचें निधन

मुंबई प्रां. सहकारी बँकेचे बँच अकौंटंट, श्री. पी. जी. केतकर हे ता. १० ऑक्टोबर रोजीं अलाहाबाद येथें मरण पावले, हें नमूद करण्यास अत्यंत खेद वाटतो.

अनुक्रमणिका

	पृष्ठ		पृष्ठ
१ विविध माहिती ...	३६२	६ स्फुट विचार ...	३६५
२ हिंदुस्थानांतील धान्य परिस्थिति	३६३	औद्योगिक योजनेची चर्चा-सासरेचा दरमाणशी खप.	
३ मुबलक बटाट्यांचा पुरवठा	३६३	७ एक्सचेंज बँकांचें महत्त्व	३६६
४ नगर-सुधारणा ...	३६४	८ दीर्घकालीन कर्जाचें वाढतें प्रमाण	३६६
५ आघाडीचे पाठीमागील युद्धतयारी	३६४	९ जिल्हा बँकांची घटना	३६७
		१० बँकांचे अहवाल ...	३६८

अर्थ

बुधवार, ता. ८ नोव्हेंबर, १९४४

हिंदुस्थानांतील धान्य परिस्थिति

सरकारी प्रयत्न व धोरण ह्यांचें निवेदन

गेल्या आठवड्यांत हिंदुस्थान सरकारचे अन्नमंत्रि, सर ज्वालाप्रसाद श्रीवास्तव, ह्यांनीं धान्य परिस्थितीवर मध्यवर्ती असेंब्लींत विस्तृत भाषण केलें व अन्न खात्यानें बजावलेल्या कामगिरीबद्दल स्वतःची थोडीशी पाठ पण थोपटून घेतली. हिंदुस्थानांत आतांपर्यंत ६½ लक्ष टन धान्याची आयात झाली आहे, ९५ हजार टन धान्य वाट चालत आहे व डिसेंबर, १९४४ अखेर आणखी ३ लक्ष टन धान्याचें आश्वासन मिळालेलें आहे, अशी माहिती त्यांनीं सभागृहांत सांगितली. सबंद हिंदुस्थानासाठी मध्यवर्ती नियंत्रणाचें एकमुखी धोरण आखण्याची आवश्यकता अन्नखात्यानें एकसारखी पुरस्कारिली व अखेर सर्व प्रांत व संस्थानें ह्यांची त्यास मान्यता मिळविली, ही मोठीच गोष्ट खात्यानें केली, असें ते म्हणाले. देशाच्या ज्या घटकांजवळ जरूरीपेक्षा अधिक अन्न आहे, त्यांनीं तें इतर घटकांना दिलें पाहिजे, ह्या तत्त्वाप्रमाणेंच आतां धान्याची वाटणी चालू आहे. धान्याच्या किंमती निश्चित करण्यांत अन्नखात्यास यश आलें आहे व मध्यवर्ती आणि प्रांतिक सरकारांजवळ पुरेसे साठे निर्माण करून धान्याचे स्थानिक तुटवडे पडूं न देण्याची व्यवस्था झाली आहे, असेंहि ते म्हणाले. सरकार धान्य परिस्थिति आटोक्यांत आणूं शकतें, ह्याविषयीं लोकांत विश्वास निर्माण झाला आहे आणि ही गोष्ट सर्वांत महत्त्वाची आहे, असें अन्नमंत्र्यांनीं सांगितलें. युद्धोत्तर काळांत हिंदी लोकांना पुरेसें, चांगलें व सात्विक अन्न मिळावें ह्या दृष्टीनें योजना आखण्यासाठी अन्नखात्यांत एक नियोजन विभाग उघडण्याचा आपला बेत त्यांनीं जाहीर केला.

प्रांतांतील धान्य पुरवठा व रेशनिंगची प्रगति ह्यांचा अन्नमंत्र्यांनीं आढावा घेतला आहे व हिंदुस्थानांत कोठेंहि कोणासहि दररोज अच्छेरापेक्षा कमी धान्याचें रेशन मिळूं नये, अशी सरकारची खटपट असल्याचें त्यांनीं सांगितलें. आतां ४६० गांवांतील ४½ कोटि लोक रेशन पद्धतीनें अन्न खात आहेत. धान्याच्या आयातीचे संबंधांतील परिस्थिति आशादायक असल्यकारणानें, येतें वर्ष विशेष अडचणी अथवा संकटें न येतां पार पडेल असा आपला विश्वास त्यांनीं व्यक्त केला. धान्य जमा करणें, जास्त धान्य असणाऱ्या विभागांनीं तें इतरांस खुषीनें देणें, रेशनिंगखालीं अधिक लोकसंख्या येणें, भावनियंत्रण चालू राहाणें, वहातुकीची परिस्थिति सुधारणें, अन्न खात्याची कडक देखरेख राहणें, आयात चालू राहणें व बिनसरकारी पुढाऱ्यांनीं सहकार्य करणें, ह्या गोष्टींवरच अन्नपरिस्थिति सुधारणें अवलंबून राहील, असा त्यांनीं आपल्या भाषणाचा समारोप केला.

आपल्या फूड ॲडव्हायसरी कौन्सिलमध्यें भाषण करतांना, मुंबई प्रांताच्या गव्हर्नरांनीं गेल्या दोन वर्षांपूर्वीची व आजची अन्नपरिस्थिति ह्यांची तुलना केली. दोन वर्षांपूर्वीचें अनिश्चितपणाचें व भीतिग्रस्त वातावरण, साठेबाजीची प्रवृत्ति, आयात व वहातुक ह्यांच्या अडचणी, जादा धान्य असणाऱ्या प्रांतांच्या धोरणांत निश्चितणाचा व एकमुखीपणाचा अभाव, अपुऱ्या धान्यामुळें अडचणींत असलेल्या विभागांची धान्य मिळविण्याची धावपळ, इत्यादि गोष्टींचें चित्र रेखाटून त्या मानानें आजची परिस्थिति किती कमी असमाधानकारक आहे, हें दाखवून दिलें. खासगी व्यापाऱ्यांची जागा सरकारनें स्वतः घेऊन, आज मुंबई सरकार धान्याची प्रांतांत आयात करीत आहे व धान्य खरेदी करीत आहे, व विक्रीच्या बाबतहि सरकारनें स्वतःकडे एकमेवाद्वितीय अधिकार घेतले आहेत, त्याकारणानें दोन वर्षांपूर्वीचा भीषण काळा बाजार आतां आवळला गेला आहे. मुंबई शहरांतील नियंत्रणाच्या व रेशनिंगच्या यशस्वीपणाकडे व यासंबंधांत मुंबईस मिळालेल्या अखिल भारतीय नेतृत्वाकडे त्यांनीं अभिमानानें बोट दाखविलें. सर पुरुषोत्तमदास ठाकूरदास, ह्यांनीं गव्हर्नरांच्या विधानास सर्वसाधारपणें पुष्टि देऊन, फूड कौन्सिलच्या सूचनांचा सरकार आदरपूर्वक विचार व स्वीकार करतें, ह्याबद्दल समाधान व्यक्त केलें.

युद्धपूर्व भावानें बटाट्यांचा मुबलक पुरवठा

चांगल्या बटाट्यांचा तुटवडा आपणांस येथें वारंवार भासतो, ह्या दृष्टीनें त्यासंबंधांतील ग्रेट ब्रिटनमधील परिस्थिति काय आहे हें समजणें उद्बोधक होईल. बटाट्यांचे बाबतींत ग्रेट ब्रिटनला परदेशांवर अवलंबून रहावें लागत नाहीं. १९३९ सालीं तेथें ४,५४,३२७ एकरांत बटाट्यांची लागवड झालेली होती; १९४४ मधील तत्सम आकडा ९,५०,००० एकरांवर गेला आहे. बटाट्यांच्या शेतकऱ्यांस यावयाची किंमत निश्चित करण्यांत आली आहे व बटाटे लावणारास सरकार दरसाल १० पौंड बक्षीस देतें. बटाट्यांचें दरएकरीं उत्पादन वाढविण्याचा कसून प्रयत्न चालू आहे. कांहीं चांगल्या शेतांत दर एकरीं १० टन बटाटे निघतात, तर कांहींत ३ टनहि निघत नाहींत. दरएकरीं उत्पादन निदान ७ टन तरी व्हावें, अशी खटपट चालू आहे. लोकांना पुरेसे बटाटे मिळत आहेत व इतर अन्नपदार्थांच्या अपुऱ्या पुरवठ्यामुळें बटाट्यांचा खप वाढत आहे. बटाट्यांची विक्रीची किंमत युद्धापूर्वीच्या किंमतीइतकीच कायम राखण्यांत आलेली आहे व त्याकरितां सरकारनें १९४०–४१ मध्यें २ लक्ष पौंड; १९४१–४२ मध्यें १ कोटि ४४ लक्ष पौंड; १९४२–४३ मध्यें २ कोटि, ३० लक्ष पौंड व १९४३–४४ मध्यें २ कोटि, ८० लक्ष पौंड खर्च केले.

नगर-सुधारणा

कोल्हापूर शहराची प्रगति
(मागील अंकावरून चालू)

पेशाच्या वाटणीचें हें तत्त्व रिजन्सी कौन्सिलनें मान्य करून त्याची अंमलबजावणी करण्याचें ठरवून आपला निर्णय जाहीर केला आहे हें अभिनंदनीय आणि स्तुत्य आहे. कोल्हापुरची लोकसंख्या एक लाखाचे घरांत आली आहे आणि हें नगर व्यापार, उद्योगधंदे व व्यवहार ह्यांचें केंद्र बनलें आहे. शहरांच्या वाढीबरोबर अनेक अवघड सार्वजनिक स्वरूपाचे प्रश्न व अडचणी उद्भवतात असा सर्वसाधारण अनुभव आहे; आणि ह्या नियमास कोल्हापूर अपवाद होऊं शकत नाहीं. न झालेल्या कामांची मागची बाकी पूर्ण करून त्यास प्रगतीची व सुधारणेची नवी जमा आपल्या नांवावर चढवून घ्यावयाची आहे. हें कार्य अर्थातच वेळाचें व पैशाचें आहे आणि तें योजनात्मक पद्धतीनें एकापुढें एक पाऊल टाकून पुरें केलें पाहिजे. कोल्हापूर नगरींत ह्या तऱ्हेच्या सर्वांगीण सुधारणा घडवून आणण्यासाठी एक बृहद् योजना आंखली जात असून ती यशस्वी व्हावी ह्याकरितां सरकारनें तज्ज्ञांचें सहाय्य आणि पैशाची मदत देण्याचें ठरवलें आहे. तिच्या परिपूर्ततेसाठी सरकार भांडवली स्वरूपाच्या व चालू खर्चांप्रीत्यर्थ ग्रँट्स आणि कर्ज देईल आणि नगरपालिकेच्या उत्पन्नांत भर पाडण्याचीं साधनें तिला उपलब्ध करून देईल. भांडवली खर्चाची तरतूद झाली कीं कार्यभाग झाला असें पुष्कळदां वाटतें; पण त्याच्याबरोबर चालू खर्चांत वाढ व्हावी लागते हें विसरतां कामा नये. देखरेख, डागडुजी, व्याज, सिंकिंग फंड इत्यादि बाबींची तरतूद योग्य रीतीनें न केली गेल्यास सुधारणा थोड्याच काळानें वाया जाऊं लागण्याची भीति उत्पन्न होते. तसें होऊं नये ह्याकरितां करवाढ करणें आवश्यक होतें. अपेक्षेच्या मानानें खर्च वाढतो आणि त्यासाठी उत्पन्नांत वाढ करावी लागते. सुधारणा आणि प्रगति ही फुकट मिळत नाहीं; त्यांस किंमत द्यावी लागते, ह्याचा अनुभव अशा प्रसंगीं येतो.

जनतेचा योगक्षेम चांगला चालावा म्हणून तिनें दिलेल्या पैशाचा विनियोग तिच्याच हितार्थ तिनें करावयाचा आहे हें राज्यव्यवस्थेचें सूत्र ध्यानांत आलें असतां मध्यवर्ती व स्थानिक कारभाराच्या क्षेत्रांत अधिकार व उत्पन्न ह्यांची वाटणी कोणच्या तत्त्वावर व्हावी हें उघड होतें आणि राज्यघटनेच्या या दोन घटकांमध्यें वाटणीविषयीं घासाघीस उत्पन्न झाली असतां तिचा समाधानकारक निकाल कसा करावा ह्या प्रश्नास उत्तर मिळतें. कोल्हापुरांत प्रगतीच्या मार्गानें पुढें पाऊल टाकलें जात आहे असें दिसतें. ही प्रगति त्रिविध आहे. संघटनात्मक, द्रव्यविषयक व व्यवहारासंबंधीं. त्यांतली पहिली गोष्ट स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कारभारासाठी कायदे व नियम ह्यांची चौकट तयार करण्यासंबंधांतली आहे. पद्धतशीर नगररचना, स्थानिक स्वराज्य संस्थांचीं कर्जे व त्यांचे हिशेब, इत्यादि विषयांच्या नियमनाकरितां आवश्यक असलेल्या कायद्यांची व नियमांची तजवीज झाली आहे.

आपला इतिहास आपण स्वतः ध्येयप्रेरित हातांनीं बनवीत आहों ह्याची जाणीव नागरिकांनीं जागृत ठेवली पाहिजे. प्रवाहपतित राहून निसर्ग नेईल तिकडे जाणें हें कमकुवतपणाचें लक्षण आहे. सद्बुद्धीनें सामाजिक इतिहासास वळण लावणें ह्यांत खरें पौरुष आहे. कोल्हापूर नगरपालिकेच्या स्थित्यंतरांचें सुंदर चित्र श्री. जयंतराव नाईक ह्यांनीं "कोल्हापूर नगरपालिकेचा इतिहास." ह्या आपल्या चित्तवेधक व बोधप्रद ग्रंथांत काढलें आहे. ह्या कामांत इतिहाससंशोधक, ध्येयवादी समाजसेवक आणि उत्साही कार्यकर्ता असें त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे निरनिराळे पैलू खुलून दिसत आहेत. मागील इतिहासांतून नवा इतिहास निर्माण होत असतो आणि त्याच्या गतीवर बुद्धिपुरःसर केलेले प्रयत्न किंवा त्यांचा अभाव ह्यांचा परिणाम कसा घडून येतो हें श्री. नाईक ह्यांनीं संगतवार दिलेल्या तीन खंडांच्या माहितीवरून स्पष्ट होतें. ज्यास त्यांनीं "क्रांतिकाल" असें संबोधिलें आहे त्याच्या प्रारंभाच्या अवस्थेंत आज नगरपालिका आहे. ह्या स्थितींत लोकशिक्षण व प्रचार ह्यांचें कार्य ह्या प्रगतीस आवश्यक असून त्याचाहि प्रारंभ आज होत आहे. श्री. नाईक ह्यांच्या उद्योगाचा आणि स्फूर्तिदायक व कार्यप्रवण ग्रंथाचा उपयोग ह्या कार्यांहि होवो अशी इच्छा प्रदर्शित करून त्यांचें प्रकाशन मी करतों. (समाप्त)

आघाडीचे पाठीमागील वैद्यकीय तयारी

नॉर्मंडीमध्यें दोस्त सैन्य उतरलें, तेव्हां ८ लक्ष लोकांना रक्तांतरासाठी पुरेल एवढें सांठवलेलें रक्त, पेनिसिलीनचे ६ लक्ष डोस व १० हजार पौंड सल्फा औषधें तयार ठेवण्यांत आलीं होतीं. जखमी सैनिकांच्या यातना थांबविण्यासाठी ६½ लक्ष मॉर्फिआच्या सुया तयार होत्या. नॉर्मंडींत सैनिक पुढें सरकले, तशी तेथील जखमी सैनिक इंग्लंडमध्यें आणणारीं व तेथून माल घेऊन जाणारीं विमानें ह्यांची ये-जा सुरू झाली. प्रत्येक वहतुकीच्या विमानांत १८ जखमी सैनिकांची सोय होती व त्यांचेबरोबर एक नर्स असे. ६०० ते ८०० जखमी सैनिकांची सोय असलेलीं प्रचंड अमेरिकन विमानें इंग्लंडांत तयारच होतीं, त्यांतून अमेरिकन जखमी सैनिक तात्काळ अमेरिकेस नेण्यांत येऊं लागले. इस्पितळांत पोचूं शकलेल्या प्रत्येक १०० सैनिकांपैकी ९७ सैनिकांचे प्राण वांचले. गेल्या महायुद्धांत ८९% जखमी सैनिकच जिवंत राहूं शकले. अगदीं रणक्षेत्राजवळ, लढाईपासून ५ मैलांचे टापूंत अवघड शस्त्रक्रिया करण्यांत आल्या, रक्तांतराची उत्कृष्ट व्यवस्था झाली, जखमी सैनिकांचें तात्काळ स्थलांतर होऊं शकलें व सल्फा औषधें यशस्वी झालीं, ह्याकारणानें शस्त्रक्रियेनंतर मरण पावणाऱ्या सैनिकांचें प्रमाण मागील युद्धाचे मानानें निम्म्यावर आलें. चालू महायुद्धांतील हत्येचीं शस्त्रास्त्रें फारच संहारक असल्याकारणानें, हात-पाय तोडावे लागल्याचीं उदाहरणें जास्त घडलीं, परंतु युद्धापूर्वीची त्यासंबंधांतील भीति वस्तुस्थितीपेक्षा फारच ज्यास्त होती, असें आढळून आलें. कोणत्याहि अमेरिकन जखमी सैनिकाचे दोन्ही हात-पाय तोडण्याची जून अखेर पाळी आलेली नव्हती. पॅसिफिक महासागरांतील बेटांमधील जंगलें, आफ्रिकेंतील वाळवंट व अल्युशियन्समधील बर्फ ह्या सर्वांना तोंड द्यावें लागलेल्या सैनिकांस रोगांमुळें मृत्यु येण्याचें प्रमाण फारच थोडें आढळलें. गेल्या महायुद्धांत तें दर हजारी १५·६ होतें, तें आतां फक्त ०·६ झालें आहे; म्हणजे त्यांत ९५% पेक्षा जास्त उतार झाला आहे. त्याचें कारण रोगप्रतिबंधक इलाज व सैनिकांचा वक्तशीर, प्रमाणबद्ध आहार हें आहे.

स्फुट विचार

औद्योगिक योजनेची मध्यवर्ती असेंब्लीत चर्चा

मध्यवर्ती असेंब्लीमध्यें हिंदी औद्योगिक पुढाऱ्यांनीं तयार केलेल्या युद्धोत्तर औद्योगिक अभिवृद्धीच्या पंचदशवार्षिक योजनेस हिंदुस्थान सरकारनें पाठिंबा देऊं नये ह्या आशयाचा एक ठराव सर झियाउद्दीन अहंमद ह्यांनीं गेल्या आठवड्यांत पुढें मांडला. त्यांचे दृष्टीनें ही योजना दोन महत्त्वाच्या बाबतींत सदोष आहे. सामान्य जनतेची क्रयशक्ति वाढविण्याची आणि बेकारीच्या निवारणाची तरतूद तीमध्यें नाहीं अशी तक्रार करून योजना सफल होण्यास राष्ट्रीय जबाबदारीच्या मध्यवर्ती सरकारच्या हातांत राजसत्ता असणें अगत्याचें आहे ही औद्योगिक संवर्धनाचे योजनेच्या मुळाशीं असलेली अट पुरी होण्याची काय व्यवस्था सर आर्देशीर दलाल ह्यांनीं केली आहे असा प्रश्न त्यांनीं विचारला. आज हिंदुस्थानांत पैशाची किंमत विलक्षण उतरली आहे ती वाढून म्हणजे बाजारभाव कमी होऊन लोकांच्या प्राप्तींतून त्यांस चरितार्थाचीं साधनें सोयीनें उपलब्ध होणें आवश्यक आहे, परंतु औद्योगिक व आर्थिक उन्नतीची योजना आखणारांनीं आपल्या स्वतःच्या फायद्याचें सध्याचें प्रमाण अबाधित राखण्याची मात्र व्यवस्था चालवली आहे अशी त्यांनीं टीका केली. बहुसंख्य हिंदी जनतेच्या म्हणजे शेतकरी वर्गाच्या उन्नतीची आणि खेड्यांतील व लहान उद्योगधंद्यांची काळजी योजना तयार करणारांस वाटली नाहीं असें, सर झियाउद्दिन ह्यांचें म्हणणें आहे. दुसऱ्या कांहीं वक्त्यांनीं त्यांच्या मुद्यांस सर्वसाधारण रीतीचा पाठिंबा दिला आणि निरनिराळ्या औद्योगिक योजनांची छाननी करून असेंब्लीस स्वतःचा त्यांवरील अभिप्राय सादर करण्यासाठी एक समिती नेमली जावी अशी एक उपसूचना मूळ ठरावावर मांडण्यांत आली. सर विठ्ठल चंदावरकर ह्यांनीं पंचदशवार्षिक योजनेस पाठिंबा दिला आणि राष्ट्रीय मध्यवर्ती मंत्रिमंडळ अधिकारारूढ होणें अगत्याचें असलें तरी ती इष्ट घटना अस्तित्वांत येईपर्यंत स्वस्थ न बसतां भावी औद्योगिक प्रगतीची तयारी करण्यांत हिंदुस्थान सरकारनें प्रकट केलेला उत्साह अभिनंदनीय आहे असें ते म्हणाले. हिंदी कारखानदारांस शेतीच्या सुधारणेचें महत्त्व अवगत असून राष्ट्रीय भूमिकेवरच आर्थिक प्रगति होणें अगत्याचें आहे असें त्यांचें मत असल्यानें सर्वांनीं, सर आर्देशीर ह्यांच्या प्रयत्नांस हार्दिक पाठिंबा यावा ह्यांतच सर्व देशाचें खरें हित आहे, अशा आशयाचें भाषण करून सर विठ्ठल ह्यांनीं सर झियाउद्दिन ह्यांच्या टीकेस उत्तर दिलें. पंचदशवार्षिक योजनेनें मूठभर भांडवलदारांच्या तेवढा फायदा होईल आणि तिचा सामान्य जनतेस मुळींच उपयोग होणार नाहीं अशी तक्रार कांहीं सभासदांनीं केली तर स्थूलमानानें विचार करतां ती योजना योग्य आहे असा अभिप्राय इतरांनीं व्यक्त केला. प्रांतिक सरकारांनीं स्वतःच्या योजना तयार केल्या तरी अखिल भारतीय स्वरूपाच्या बृहद् योजनेशीं त्या सुसंगत असल्या पाहिजेत, राष्ट्रीय महत्त्वाचे धंदे सरकारी नियंत्रणाखालीं आणणें आवश्यक होईल, शेतीच्या धंद्याचें संरक्षण करणें व जनतेची राहणी सुधारणें ह्या बाबींकडे लक्ष पुरवावें लागेल, हे मुद्दे असेंब्लींत झालेल्या चर्चेमध्यें महत्त्वाचे होते.

साखरेचा दरमाणशी खप

दरमाणशी खपाच्या जागतिक आकड्यांवरून केवळ हिंदुस्थानांत साखरेच्या उत्पादनास किती वाव आहे ह्यासंबंधीं निश्चित अनुमान काढणें चुकीचें ठरेल; कारण साखरेचा खप हा रहाणीच्या मानावर पुष्कळ अवलंबून असतो. १९३२ सालीं हिंदी साखरेच्या धंद्यास संरक्षण मिळालें, तेव्हांपासून ह्या धंद्याची एकसारखी वाढ होत गेली आहे. त्या सालीं हिंदुस्थानांत १,५८,००० टन साखर तयार करणारे फक्त ३२ कारखाने होते; १९४३–४४ मध्यें त्यांची संख्या १५८ झाली व त्यांत १२½ लक्ष टन साखर निघूं शकली. हिंदुस्थान देशांत साखरेचा एकूण उठाव पुष्कळ असला, तरी दरमाणशी खप मात्र अगदी कमी आहे व त्यांत वाढ होण्यास पुष्कळच वाव आहे. शेती व उद्योगधंदे ह्यांच्या वाढीबरोबर जनतेची रहाणी सुधारल्यास त्याचा परिणाम साखरेच्या खपावर तात्काळ होईल. दरमाणशी साखरेच्या खपाचे तुलनात्मक देशवार आकडे खाली दिले आहेत.—

देश	दरमाणशी खप (शेर)
अमेरिका	५१½
ग्रेट ब्रिटन	५६
न्यू झीलंड	५७½
ऑस्ट्रेलिया	५७
फ्रान्स	२७
जर्मनी	२९½
क्युबा	४४
डेन्मार्क	६४
हिंदुस्थान	२½

हिंदी राष्ट्रीय कर्जातील दीर्घकालीन कर्जाचें वाढतें प्रमाण

१९३८–३९ मध्यें ग्रेट ब्रिटनच्या एकूण राष्ट्रीय कर्जाच्या ७१·५% इतकें कर्ज १० वर्षांपेक्षा ज्यास्त मुदतीचें होतें; १९४२–४३ अखेर अशा कर्जाचें प्रमाण ४२·६% वर आलें. ह्याचा अर्थ, युद्धकाळांत ग्रेट ब्रिटननें कर्ज उभारलें तें मुख्यतः अल्प मुदतीचेंच होतें. हिंदुस्थानाची ह्या संबंधांतील परिस्थिति ह्याच्या उलट व अधिक समाधानकारक आहे. १९३९ सालीं हिंदुस्थान सरकारच्या एकूण कर्जापैकी १६% कर्ज १० वर्षांपेक्षा अधिक मुदतीचें होतें; १९४४ मध्यें अशा कर्जाचें प्रमाण ३३·४% झालें आहे. एकूण कर्जातील ट्रेझरी बिलांचा हिस्सा बराच कमी होत आला आहे. खालील तक्ता ह्या दृष्टीनें मार्गदर्शक होईल:—

कर्जाचा प्रकार	मार्च, १९४२ अखेर रकम (कोटि रु.)	एकूण कर्जाशीं प्रमाण (%)	मार्च, १९४४ अखेर रकम (कोटि रु.)	एकूण कर्जाशीं प्रमाण (%)
बिन मुदतीचीं	१६४·१८	१७·४	२८३·८९	२१·३
१० वर्षांवरील	२६१·७७	२७·८	४४५·६७	३३·४
५ ते १० वर्षांचीं	६८·७५	७·३	८५·३८	६·४
५ वर्षांखालील	११७·१६	१२·५	१८२·८६	१३·७
ट्रेझरी बिलें	१३६·९८	१४·६	११०·६१	५·३

हिंदी बँकिंग क्षेत्रांत एक्सचेंज बँकांचें महत्त्व

हिंदी बँकिंग क्षेत्रांत अद्याप विदेशी एक्सचेंज बँकांचें केवढें मोठें महत्त्व आहे, ह्याची कल्पना खालील तक्ता स्पष्टपणें देईल. रिझर्व्ह बँकेनें प्रसिद्ध केलेल्या आकड्यांत, इंपीरिअल बँक (२९८ कचेऱ्या), एक्सचेंज बँका (८४ कचेऱ्या), इतर शेडयूल्ड बँका (१४०० कचेऱ्या), इतर बँका (१,५३१ कचेऱ्या), ह्या सर्वांच्या व्यवहाराचे आकडे पाहिले, तर ८४ कचेऱ्या असलेल्या १६ विदेशी एक्सचेंज बँका भांडवल, ठेवी, गुंतवणूक, बिलडिस्काउंट, इत्यादि सर्व बाबतींत बाकी उरलेल्या सगळ्या हिंदी बँकांचा व्यवहार एकत्र केला, तरी त्यांस सहज मागें टाकूं शकतात! मुंबई येथें बँकर्स क्लिअरिंग हाऊस आहे, त्यांच्या ३३ सभासदांची यादी पाहिली, तर त्यांपैकी १३ सभासद-बँका एक्सचेंज बँकाच आहेत. स्वाभाविकच, त्यांचें क्लिअरिंग हाउसच्या व्यवहारांत प्राधान्य आहे. गेल्या दोन तीन वर्षांतच कांहीं मोठ्या हिंदी बँका निघाल्या, त्यामुळें हिंदी सभासद बँकांची संख्या एवढी तरी होऊं शकली. ३१ डिसेंबर १९४० रोजी मुंबई क्लिअरिंग हाउसच्या सभासद बँकांची संख्या ३० होती, त्यांपैकीं हिंदी बँका फक्त १३ च होत्या!

(आंकडे लक्ष रुपयांचे आहेत)

बँकांचा प्रकार	वर्ष	वसूल भांडवल व रिझर्व्ह	ठेवी	गुंतवणूक	बिल डिस्काउंट, कर्जे इ.
१ इंपीरिअल बँक	१९४२	११,३८	१६४,४६	११६,४१	३३,७९
१ „	१९४१	११,४८	२१४,५३	१३०,२०	४०,६०
१६ एक्सचेंज बँका	१९४२	१४२,२५	२६०६,३८	१४४१,३६	५१३,२५
१६ „	१९४१	१४२,४१	२६८५,१६	१५२६,६८	५०८,८०
४४ इतर शेडयूल्ड बँका	१९४२	१६,२५	१८६,३४	१०१,७७	६०,६८
५७ „	१९४१	२३,६७	३१६,६५	१६४,२५	१०७,३१
४४१ बिगर शेडयूल्ड बँका	१९४२	६,७१	३४,८०	६,१६	२१,८०
४६१ „	१९४१	७,१८	४७,२४	११,१५	२४,२६

ट्रामवेज विकत घेण्याचें ठरलें, परंतु पुढची व्यवस्था?

कलकत्ता कॉर्पोरेशननें तेथील ट्रामवे कंपनीस २७ जून रोजीं नोटीस देऊन, १ जानेवारी १९४५ पासून ट्रामवे कंपनीची व्यवस्था स्वतःकडे घेण्याचें जाहीर केलें आहे. कंपनीचें हौरा म्युनिसिपॅलिटी, हौरा ब्रिज कमिशनर्स व भारतमंत्री ह्यांचेशी स्वतंत्र करार आहेत, ह्यासंबंधांत कलकत्ता कॉर्पोरेशननें काय केलें आहे, कॉर्पोरेशननें ट्रामवेज चालविण्यास लागणाऱ्या मुबलक पैशाची पुरेशी व्यवस्था केली आहे काय; ट्रामवे कंपनीनें आपल्यां नोकरांस बडतर्फीच्या नोटीसा दिल्यानंतर कॉर्पोरेशननें ठरावीक दिवशीं ट्रामवेज आपल्या ताब्यांत घेतल्या नाहींत तर कसा घोटाळा होईल; त्यामुळें कंपनीचें होणारें नुकसान कॉर्पोरेशनला भरून द्यावें लागून शिवाय जनतेची किती गैरसोय होईल, इत्यादि प्रश्नांचा विचार कंपनी व कॉर्पोरेशन ह्यांच्या प्रतिनिधींनीं एकत्र बसून करावा अशी कंपनीनें सूचना केली आहे.

जपानी वृत्तपत्रें फक्त दोन पृष्ठांचीं

जपानमध्यें १ नोव्हेंबरनंतर प्रसिद्ध होणाऱ्या वृत्तपत्रांचा आकार दोन पृष्ठांपेक्षा अधिक असतां कामा नये, असा तेथें नियम करण्यांत आला आहे.

प्रगतिपथावरील नवा

मै ला चा — द ग ड

सन १९४३ अखेर

नव्या कामांत	११० टक्के वाढ
चालू कामांत	१०७ टक्के वाढ
आयुर्विमानिधींत	८० टक्के वाढ

— आपला विमा किंवा एजन्सी आजच घ्या —

दि औंध म्यूच्युअल लाइफ ॲश्युरन्स सोसायटी लि., पुणें.

आर. जी. साठे, सुपरिंटेंडेंट — व्ही. जी. जोशी, मॅनेजिंग डायरेक्टर

दि बँक ऑफ इंडिया लि.

[स्थापना : १९०६]

अधिकृत भांडवल	...	...	...	रु. २,००,००,०००
वसूल झालेलें भांडवल	...	...	...	रु. १,००,००,०००
रिझर्व्ह फंड	...	...	...	रु. १,२३,००,०००

मुख्य कचेरी: ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

मुंबईमधील शाखा: बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

इतर शाखा: अहमदाबाद (भद्र, मुख्य ऑफिस), अहमदाबाद (एलिस ब्रिज शाखा), अहमदाबाद (स्टेशन शाखा), अमृतसर, अंधेरी (मुंबई शेजारी), बांद्रे (मुंबई शेजारी), कलकत्ता (क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्क्वेअर), जमशेदपूर कराची, मद्रास, नागपूर (क्रिन्जवे), नागपूर (इतवारी बझार), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत, मुंज (कच्छ).

लंडन एजन्ट्स: वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

डायरेक्टर्स: सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. (अध्यक्ष) श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के. नाईट; मि. ए. गोडिस; सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, जी. बी. ई., के. सी. आय. ई.; मि. दिनशा के. दाजी; श्री. रामनिवास रामनारायण.

करंट डिपॉझिट अकाउंट्स:

दररोजच्या रु. १०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षां कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

बिल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते, सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

एजंट:—एच्. ए. करीममाई

'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

जिल्हा बँकांची घटना

डायरेक्टर निवडून येण्यासाठी किमान लायकीची आवश्यकता

(लेखक:—श्री. वा. चिं. भानु.)

दरसालचा सप्टेंबर महिना म्हणजे आपल्या पुणें शहरांतील सहकारी संस्थांच्या वार्षिक निवडणुकीचा मोसम. या मोसमांत कुठेंही चार पांच सहकारी जमलेले पहा, त्यांच्या बोलण्यांत एकच विषय. अमुक कॉसमासला उभा आहे, अमुक रुपीला डोकावतो आहे; अमुकानें मर्चंट बँकेंत शिरकाव केला तर अमुक सेंट्रलसाठीं घरटीप करून मतदारांचे ठेंबरठे झिजवूं लागला आहे. हिरव्या यादींत कोणकोण घ्यावेत, पिवळ्यांत कोण आले, अमक्या बँकेच्या वतनदारांत यंदा कोण वशिला मारतोय, मारे गर्दी! याच बरोबर कांहीं सहकारी अड्ड्यांवर खलबतखाने सुरू होऊन कोणाला उचलून धरायचा व कोणाला सपशेल पाडायचा, कोणाला नुसती तोंडी सहानुभूती दाखवावयाची तर कोणाला कसा कट्टर विरोध करायचा; कोणाला गनिमी काव्यानें फसवायचा तर कोणाला कसा चकवायचा यासंबंधानें वाटाघाटी—गुप्त वाटाघाटी—चालूं होतात. चर्चिल अन् रूझवेल्ट, किंवा स्टॅलिन अन् जपानचा प्रतिनिधी यांचीं सुद्धां खलबतें व मुलाखती इतक्या हिरीरीनें होत नसतील! पण आमच्या पुण्यांतल्या कांहीं जणांना या सप्टेंबर महिन्यांत निवडणुकींचें वारें शिरून जणूं काय सारें जग या आमच्या पुण्यांतल्या निवडणुकींवरच अवलंबून राहणार आहे असें वाटतें! दिवसानुदिवस सहकारी बँकांच्या निवडणुकी ज्यास्त ज्यास्त लढविल्या जाणार, अशीं चिन्हें दिसत आहेत. निवडून येण्यासाठी अप्रस्तुत मार्गांचा अवलंब एकानें केला कीं दुसऱ्यासहि करावा लागतो ह्यामुळें निवडणुकींत चांगल्या उमेदवारांची कुचंबणा होणार असें दिसतें.

अशा मार्गानें निवडून येणाऱ्या उमेदवाराचे हातीं हजारों रुपयांची उलाढाल करणाऱ्या सहकारी संस्थांचा कारभार जाणार आहे असा नुसता विचार जरी मनांत आला तरी अंगावर शहारे येऊन कांटा उभा राहतो व वाटूं लागतें कीं, कौन्सिलें, बोर्डे आणि म्युनिसिपालिट्या व सहकारी संस्थांचीं कारभारी मंडळें यांच्यांत आतां काय भेद उरला आहे? कौन्सिलें वगैरेंचा मतदार संघ सरकारच्या कृपेनें पुष्कळसा अशिक्षित तरी आहे. पण आमच्या सहकारी संस्थांचा मतदार संघ चांगला सुशिक्षित, समंजस, जाणता व संस्थेच्या कारभाराची जोखीम व जबाबदारी जाणणारा असतांना निवडणुकीच्या वेळीं मात्र भांग प्याल्यासारखा अगर आंधळा व बहिरा कसा होतो व उमेदवाराची लायकी लक्षांत न घेतां वगवशिला, भाडभींड, किंवा प्रसंगीं मतांच्या रोखीचे विक्रीला कसा बळी पडतो याचें मोठें आश्चर्य वाटतें. यावरून मला एकच अत्यंत अप्रिय व कटु पण सत्य असें विधान करावेसें वाटतें कीं अद्याप आपल्या समंजस म्हणविणाऱ्यांनाही मताधिकाराच्या जबाबदारीची; किंवा सार्वजनिक कार्यातील जबाबदारीची यथायोग्य जाणीव झालेली नाहीं!

सहकारी संस्थेंत, विशेषतः जिल्हा मध्यवर्ती बँकेंत, पैशाचा व्यवहार असतो. जनतेचा विश्वास संपादन करून बँकेचे चालक ठेवीदारांचा पैसा लक्षावधि रुपयांनीं गोळा करीत असतात व त्या पैशाचा व्यवहार कसा करावा हें ठरविणारे बोर्डाचे सभासद मात्र कसे निवडून येतात याचें अगदीं वरवरचें दिग्दर्शन प्रारंभीं केलें आहेच. सहकारी कायद्यांच्या अनेक कलमांचा कांटेरी लगाम जिल्हा बँकांना आहे म्हणूनच केवळ जिल्हा बँकांतला ठेवीदारांचा पैसा सुरक्षित आहे असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं.

कायद्याच्या कलमांच्या बंधनाबरोबरच सहकारी बँकांच्या विशेषतः जिल्हा बँकांच्या बोर्डावर निवडणुकीस उभे राहणाऱ्या उमेदवारांना कांहीं विशिष्ट बंधनें असावींत असें आतां खास वाटूं लागलें आहे. हल्लीं बँकेचा रु. १० पासून ५० रु. पर्यंतचा एक भाग घेणारासही उमेदवार म्हणून उभें राहतां येतें आणि प्रारंभींच अमळ भडकपणानें दर्शविलेल्या मार्गानें निवडणुकी लढवून निवडूनही येतां येतें. जून महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यांत एक भाग खरेदी केला कीं ७०—८० लाखांपर्यंतच्या खेळत्या भांडवलाचा कारभार करणाऱ्या बोर्डावर निवडून येण्यास कोणीही पात्र होऊं शकतो, इतकेंच नव्हे तर रिझर्व बँकेचे पहिले हिंदी गव्हर्नर सर चिंतामण देशमुख, प्रिन्सिपाल धनंजयराव गाडगीळ, प्रो. वामनराव काळे इत्यादि नामवंत अर्थशास्त्रज्ञानाही उपदेश करण्याचा आव आणूं शकतो! अर्थात हा एक केवळ काल्पनिक दाखला म्हटला, तरी वास्तविक पहातां अशांना केवळ खटपटी लटपटीनें अधिक मतें मिळवितां आलीं, येवढ्याचसाठी लक्षावधी रुपयांच्या उलाढालीचे संस्थेंत कारभारी होतां यावें हा सहकाराचा विपर्यास आहे असें मी कां म्हणूं नये?

म्हणून सहकारी विचारवंतांना माझी अशी नम्र विनंती आहे कीं निदान पहिल्या प्रथम जिल्हा बँकेच्या बोर्डावर निवडून येणाऱ्यांना कांहीं तरी विशिष्ट लायकीचीं बंधनें असावींत असें स्पष्टपणें म्हणण्याची वेळ आली आहे. सहकाराची चळवळ सुरू होऊन आतां ४० वर्षे होऊन गेलीं. प्रारंभींचें प्रचारकार्य आतां पुष्कळ झालें आहे. सांप्रत जिल्हा बँकांजवळ त्यांना झेंपणार नाहीं इतका पैसा ठेवीच्या रूपानें आपल्या पायांनीं चालत येतो आहे. अशावेळीं डायरेक्टरांचे बोर्ड अधिक चाणाक्ष, अधिक कर्तव्य तत्पर, अधिक दूर दृष्टीचें, अधिक व्यापकतेनें विचार करण्यास समर्थ व अधिक तज्ञ असें होईल तरच या ठेवींचा उपयोग सर्व सामान्य जनतेला व राष्ट्राला उपकारक असा होईल.

जिल्हा बँकेचे बोर्डावर जे डायरेक्टर असतात त्यांचे मुख्य दोन विभाग पडतात. एक बँकेला जोडलेल्या सोसायट्यांचे प्रतिनिधींनीं निवडून दिलेले व दुसरा बँकेच्या वैयक्तिक सभासदांनीं निवडून दिलेले. सोसायटयांच्या एकंदर कारभाराची जी सहकारी खात्यांकडून दरसाल हिशेब तपासणी होते त्या तपासणींत उत्तम, मध्यम, कनिष्ठ व हीन असे चार दर्जे दर्शविण्यास अ, ब, क व ड अशी वर्गवारी ठरविणेंत येते. तेव्हां फक्त अ आणि ब वर्गातीलच सोसायट्यांच्या प्रतिनिधींना बँकेच्या बोर्डावर निवडून येण्यास पात्रता असावी. शिवाय जो उमेदवार उभा राहणार असेल त्यानें आपापल्या इहींच्या सुपरवायझिंग युनियनचे बोर्डावर निदान ३ वर्षे तरी काम केलें असलें पाहिजे व तो स्वतः थकबाकीदार असतां कामा नये. वैयक्तिक सभासदांपैकीं त्यांना उमेदवार म्हणून उभें राहावयाचें असेल त्यानें बँकेचे कमींत कमी १,००० रुपये किंमतीचे शेअर्स घेतलेले असावेत. त्याचें शिक्षण निदान मॅट्रिक पासपर्यंत तरी असलेंच पाहिजे. शिवाय त्यानें

बँकेच्या कार्यक्षेत्रांतील कोणत्याही एका नागरी प्राथमिक सोसायटीचे पंचकमिटीत ३ वर्षे काम केलेलें असलें पाहिजे, व तो स्वतः थकबाकीदार असतां कामा नये. सोसायट्या व वैयक्तिक सभासद यांच्यातर्फे निवडून येणाऱ्यांची संख्या समान असावी. कलेक्टर किंवा सहकारी खातें यांना बोर्डावर प्रतिनिधि नेमण्याचा अधिकार आतां बिलकूल असूं नये. त्याऐवजीं सहकारी खात्यानें कांहीं नामांकित व व्यवहारकुशल अशा सभासदांचीं नांवें साधारण सभेला सुचवावींत व त्यामधून सभेनें दोघांची निवड करून घ्यावी. असें झाल्यास नेमणुकीमुळें जो बगलशिलेबाजीनें होयबांचा शिरकाव बँकेच्या बोर्डावर होतो तो बंद होऊन नामवंत व तज्ज्ञ अशांपैकीं दोन सभासद साधारण सभेच्या बहुमतानें व मानानें बँकेच्या बोर्डावर येऊं शकतील कीं ज्यांना सर्रास निवडणुकींचा हेदोसधुळा घालण्याची फुरसूद नाहीं किंवा इच्छा नाहीं पण आपल्या ज्ञानाचा व अनुभवाचा फायदा मात्र संस्थेस देण्यास जे आनंदानें तयार आहेत.

अशा धर्तीनें निवडून आलेल्या बोर्डाची मुदत ३ वर्षांची असावी व दरसाल त्यांपैकी फक्त $\frac{1}{3}$ सभासदांचीच निवडणूक व्हावी. म्हणजे एकदां निवडून आलेला डायरेक्टर निदान ३ वर्षे तरी बोर्डावर राहील. बोर्डाचे चेअरमनची निवडणूक अशीच ३ वर्षांची असावी. असें झाल्यास काम करण्याची लायकी व इच्छा आणि फुरसद असणाऱ्या होतकरू मंडळींना दरसाल निवडणुकीचे दिव्यांतून पार पडण्याचें कारण पडणार नाहीं!

मीं वर सुचविलेली घटना सर्वस्वी विनतोड आणि ठाकसेठीक आहे असें मला म्हणावयाचें नाही. त्यांतील मुख्य हेतूला विघाड न आणणारे फरक करण्यास वाव नाहीं असेंहि नाहीं. पण केवळ विचारांना चालना देण्यासच हा अमळ नाजुक प्रश्न थोड्या फार कठोरपणानें विचारवंतापुढें मांडला आहे.

दि मिरज स्टेट बँक लि.

१९४१–४२ मध्ये वरील बँकेकडे २२ लाखांच्या ठेवी होत्या. जून १९४४ अखेर त्या ४६ लक्ष, ६५ हजार रुपयांवर गेल्या आहेत. भाग भांडवल २० हजार रु. कायम आहे व त्यावर गेल्या वर्षी ४४,६७७ रुपये निवळ नफा सुटला. भागीदारांना १४% डिव्हिडंड व ४% बोनस देण्यांत आलें व बाकीच्या रकमेचा विनियोग बँकेच्या शिरस्त्याप्रमाणें रिझर्व्ह व इतर फंड मजबूत करण्याकडे करण्यांत आला.

वेंगुर्ला को. अर्बन बँक लि., वेंगुर्ला

वरील बँकेच्या एकाहि सभासदाकडे कर्ज अगर व्याज थकबाकी म्हणून राहिलेलें नाहीं. बँकेला 'अ' वर्ग मिळालेला आहे. बँकेच्या एकूण ३$\frac{1}{2}$ लक्ष रुपयांच्या खेळत्या भांडवलापैकी ७९$\frac{1}{2}$ हजार रुपयांचीं कर्जे दिलेलीं आहेत. रोख्यांतील गुंतवणूक गेल्या वर्षापेक्षा दुपटीहून अधिक (२ लक्ष, २०$\frac{1}{2}$ हजार रु.) झाली आहे.

वेळगांव पायोनियर अर्बन को. बँक लि.

" अहवाल सालीं बँकेच्या शेअर भांडवलांत व ठेवींच्या रकमांत बरीच वाढ झाली आहे. कर्जाच्या रकमेंत विशेष घट झाल्यानें बँकेचा नफा १,४९० रुपयांनीं घटला आहे. " एकूण २३ लक्ष, रुपये खेळत्या भांडवलापैकी ५$\frac{1}{2}$ लक्ष रुपये भांडवल बँकेचें स्वतःचें आहे. कर्जे व इन्व्हेस्टमेंटस ह्यांचे मानानें जवळील व बँकांतील शिलकांचा आकडा (१३ लक्ष रु.) जास्त दिसतो.

* *

पूना

गेस्ट

हाऊस

टेलिफोन नं. ७७९

संस्थापक :

कै. नानासाहेब सरपोतदार

* *

जिकडे तिकडे प्रशंसा

इमिटेशन दागिन्यांवर रासायनिक क्रिया करून खऱ्या सोन्याचा पत्रा चढविला जातो त्यामुळें दागिना केव्हांही खराब होत नाहीं, ही पूर्ण खात्री झाली. सोन्याचा पत्रा चढविलेल्या चार बांगड्या किं. आठ रु. गरजेस्तव दागिना परत करणें झाल्यास वर चढविलेल्या सोन्याचे सर्वच्या सर्व पैसे परत देऊं.

भट कं. सांगली, S. M. C.

भट कंपनी शाखा–बुधवार पेठ, पुणें २.

पैसा व ज्ञान देणारीं पुस्तकें !

श्रीमंत कसें व्हावें? संपत्तीचे सुंदर मार्ग दाखवून हजारों रु. मिळवून देतें. वाचून लक्षाधीश व्हाल ! किं. १॥ रु. काम आणि कामिनी. काम शास्त्रावरील अपूर्व ग्रंथ ! किं. १॥ रु. मृत्युलोकचा प्रवास ! मरणोत्तर आत्म्याच्या अद्भुत हालचालींचें कथानक ! किं. १ रु. लिहा. विघट आणि मंडळी, कराड जि. सातारा.

पुण्यांतील

आदर्श निवासस्थान व भोजनालय

छाया लॉजिंग व बोर्डिंग हाऊस

बुधवार चौक, पुणें २.

" मागोरा "चा अभिनव व आश्चर्यकारक शोध

ढेकणांच्या उदवत्त्या

(ABC)

BUG COILS (ABC)

प्रत्येक उदवत्ती रात्रभर जळते व तोंपर्यंत ढेकूण आपलें ठिकाण सोडून बाहेर येत नाहींत. विशिष्ट धुरामुळें हा चमत्कार होतो. बॉक्समध्यें १२ तांबड्या उदवत्त्या तांबड्या पॅकिंगमध्यें बॉक्स किं. रु. १८, ट. ख. निराळा.

दि मागोरा केमिकल कं. लि.,

हिरावाग, पुणें २

हें पत्र पुणें, पेठ सांवुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' सांवुर्डा, घ. नं. ९२७।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.

हालील पत्त्यावर चौकशी करावी.

व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

अर्थ

वर्गणीचे दर.

वार्षिक वर्गणी
रु. ४
(टपाल खेरीज माफ)
किरकोळ अंकास
दोन आणे.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष १० पुणें, बुधवार, तारीख १५ नोव्हेंबर, १९४४ अंक ४५

डोक्यांतील उवा १ तासांत
मारण्याचा आश्चर्यकारक शोध

लायसॉफ

बाटली किंमत १ रु. ट. ख. निराळा
दोन वेळा उपयोग
दि मागोरा केमिकल कं. लि.
— हिराबाग, पुणें २ —

देना विमा कंपनी

मध्यें
तुमचा विमा उतरवा

जिंदगी ★ आग ★ मोटर

सुरेश के. देसाई, मॅनेजर. हिंमतलाल गांधी, मॅ. डायरेक्टर.

देवकरण नानजी बिल्डिंग्ज, एल्फिन्स्टन सर्कल, कोट, मुंबई.

न्यू इंडिया इंडस्ट्रीज लि.

(Approved Re-treaders and Approved Contractors)
२६ लॅमिंग्टन नॉर्थ, मुंबई ११.
अध्यक्षः—श्री. ग. स. मराठे, ॲक्चुअरी.

महाराष्ट्रांतील रबराचा प्रमुख कारखाना

★ गिरणीचे रोलर्स ★ रबरी हातमोजे ★ छापखान्यांचे रोलर्स
★ रीमोल्ड टायर्स ★ रबरी वॉशर्स ★ सॉलिड व्हील्स

व इतर रबरी माल तयार होतो.

पु. ग. मराठे
मॅनेजिंग डायरेक्टर.

गिरगांव मुंबई नं. ४

महिंद्रकर ब्रदर्स
तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

विविध माहिती

ब्रिटिश सहकारी सोसायट्या

ब्रिटिश सहकारी सोसायट्यांची किरकोळ विक्री १९४३ साली ३३ कोटि, १५ लक्ष पौंडांची झाली. १९४२ चे मानानें हा आकडा १ कोटि, २१ लक्ष पौंडांनीं ज्यास्त आहे. सोसायट्यांच्या समासदांत १,५७,३५० ची भर पडून त्यांची संख्या ९०,८२,२१८ झाली. भाग भांडवलांत १९४२ साळीचे मानानें २ कोटि पौंडांची भर पडून तें २० कोटि पौंडांवर गेलें.

सहकारी सप्ताहाचा समारोप

पुणें सेंट्रल को. बँकेतर्फे साजरा होणारा सहकारी सप्ताह चालू साली ता. २५।१०।४४ ते ३।११।४४ अखेर उत्साहानें साजरा झाला व नेहमीप्रमाणें एक आठवडाभर तज्ज्ञ व्याख्यात्यांच्या माहितीपूर्ण भाषणांचा लाभ श्रोत्यांस मिळाला. सप्ताहाचा समारोप बँकेचे चेअरमन, रा. सा. खोले ह्यांच्या अध्यक्षतेखाली श्री. बापुसाहेब गुप्ते ह्यांच्या हस्तें झाला. त्या दिवशीं समयोचित भाषणें झाल्यावर श्री. गुप्ते ह्यांनीं सहकारी चळवळीसंबंधीं आस्थापूर्ण विचार व्यक्त केले व निष्ठावंत कार्यकर्त्यांचा अभाव इतर चळवळींप्रमाणें ह्या चळवळीसहि फार तीव्रतेनें भासत आहे, असें सांगितलें.

हिंदी लोकांचें ब्रह्मदेशांत गुंतलेलें भांडवल

ब्रह्मदेशांत तांदळाची लागवड वाढवून त्या देशास तांदळाचे निर्गत व्यापारांत महत्त्वाचें स्थान प्राप्त करून देण्यास मुख्यतः तेथें गेलेल्या मद्रास प्रांतीय चेट्टी लोकांचे परिश्रमच कारणीभूत झालेले आहेत. चेट्टी लोकांचे सुमारें ७५ कोटि रुपये ब्रह्मदेशांत गुंतलेले असावेत, असा ब्रह्मदेशच्या प्रांतिक बँकिंग कमिटीनें १९३० साली अंदाज केला होता. रंगून सारख्या शहरांतील घरांत व कापडाच्या व इतर दुकानांत हिंदी लोकांनीं पुष्कळ पैसा गुंतविलेला होता, तो वेगळाच. ब्रह्मदेशाची मुक्तता झाल्यानंतर, हिंदी लोकांच्या नुकसानभरपाईचा प्रश्न प्रामुख्यानें पुढें येईलच.

सोलापूर तालुक्याचे दोन तालुके झाले

सोलापूर तालुक्याचे उत्तर सोलापूर व दक्षिण सोलापूर असे दोन भाग ता. १।१०।४४ पासून करण्यांत आले आहेत. त्या दोघांच्याहि मामलेदार कचेऱ्या सोलापूर येथेंच आहेत.

कलकत्ता शहरांत मलेरिया कां वाढला ?

कलकत्ता शहराच्या पूर्व विभागांत मलेरिया वाढला आहे, त्याचीं मुख्य कारणें (१) ब्रह्मदेशांतील निर्वासितांची गर्दी, (२) कलकत्ता सोडून गेलेल्या नागरिकांनीं परत येतांना आणलेला मलेरिया, (३) मलेरियानें पीडिलेल्या भुकी लोकांचें कलकत्त्यांत आगमन व (४) भोवतालच्या भागांतील कालव्यामधील वहातुक हीं असल्याचें कलकत्ता म्युनिसिपॅलिटीच्या आरोग्याधिकाऱ्यांनीं सांगितलें. लोकांत ताण उरलेलें नसल्याकारणानें, मलेरियाचा प्रसार सुलभ झाला आहे, असेंहि ते म्हणाले.

संयुक्त प्रांताची आघाडी

भाव नियंत्रणाबाबत भरण्यांत आलेले खटले व झालेल्या शिक्षा, ह्या बाबतींत सर्व प्रांतांत संयुक्त प्रांतानें आघाडी मारली आहे.

टाटा केमिकल्स लि.

वरील कंपनीस ३० जून, १९४४ अखेर संपलेल्या वर्षी ९३ लक्ष रुपये तोटा आला. महापुरामुळें कंपनीचें उत्पादन कार्य दोन महिने पूर्णपणें बंद होतें. मजुरांचा तुटवडा, मलेरियाचा प्रादुर्भाव, इत्यादि कारणांचीहि भर पडून सोडा ॲश पुंट बसविण्यास विलंब लागला व सोडा ॲशचें उत्पादन फेब्रुवारीमध्यें सुरू झालें. त्यास मागणी चांगली येऊं लागली, तोंच कोळशाचा तुटवडा पडूं लागला व त्यामुळें उत्पादन मंदावलें. टाटा ऑइल मिल्स कं. लि. ला यावयाचें विक्रीच्या एजन्सीचें कमिशन तिनें घेतलें नाहीं. त्या कंपनीबरोबर झालेला करार दोन वर्षांनीं वाढविण्यांत आला आहे.

अमेरिकेंत कपाशीचें उत्पादन

अमेरिकेंत चालू मोसमामधील कपाशीच्या पिकानें उच्चांक गांठला आहे. दर एकरीं उत्पादन २९३.३ पौंड आलें आहे. एकूण उत्पादन १,२३,२०,००० गाठी होईल, असा अंदाज आहे.

शिवसमुद्रम् येथील वीजगृह

शिवसमुद्रम् येथील वीजगृह अपघातामुळें बंद पडलें, त्यामुळें म्हैसूरमधील उद्योगधंद्यांवर किती मोठा परिणाम होईल, ह्याबद्दल भीति वाटत होती. दुरुस्ती करण्यासाठी रात्रंदिवस सुमारें एक हजार लोक झटत होते. १ जुलै १९४४ रोजीं चार यंत्रें दुरुस्त झालीं व दोन यंत्रें सुरूहि झालीं. अपघातापूर्वी, शिवसमुद्रम् व शिमोगा येथील वीजगृहांत मिळून दररोज ९½ लक्ष युनिटस वीज तयार होत असे; आतांची रोजची सरासरी ८½ लक्षांची आहे. उद्योगधंद्यांना आतां विजेचा तुटवडा भासण्याचें प्रयोजन नाहीं. अपघातामुळें कांहीं कारखाने बंद पडून थोडी बेकारी निर्माण झाली, ती अल्पकालिक ठरली व सरकारनेंहि बेकार झालेल्यांना दुसरीकडे काम देण्याची खटपट केली.

प्रमुख देणेकरी राष्ट्र, म्हणून फायदेशीर परिस्थिति

"युद्धसमाप्तीनंतर, ग्रेट ब्रिटन हें सर्वत्र जगांत अग्रेसर देणेकरी राष्ट्र होईल. ह्या परिस्थितीचा आपण पुरेपूर फायदा करून घेतला पाहिजे. ज्यांनीं आपणांस कर्जे दिलीं, त्यांस माल विकूनच आपण कर्जफेड करूं शकूं. ह्या दृष्टीनें आपण नीट कार्यक्रम आखला, तर आपली परिस्थिति भरभक्कम होईल."

—लॉर्ड ढढले गॉर्डन, ह्यांचें भाषण.

इंग्लंडमध्यें स्वस्त दुधाचा सुबलक पुरवठा

मार्च, १९४३ अखेर संपलेल्या वर्षी ग्रेट ब्रिटनमधील दुधाच्या उत्पादकांस तेथील सरकारनें ९ कोटि पौंडांची मदत केली. त्यावर्षी युद्धपूर्व वर्षापेक्षा ५ कोटि गॅलन जास्त दुधाचें उत्पादन झालें. लोक एकूण १ अब्ज गॅलन दूध प्याले; हा आकडा युद्धपूर्व सरासरीपेक्षा ३० कोटि गॅलननीं मोठा आहे. प्राथमिक शाळांत जाणाऱ्या मुलांपैकी ७९% मुलांस व वरच्या शाळांतील मुलांपैकी ६०% मुलांस दूध मिळण्याची खास व्यवस्था झालेली आहे. ग्रेट ब्रिटनमध्यें दरमाणशीं दुधाचा खप युद्धकाळांतहि वाढला आहे व दुधाची किंमत स्थिर राखण्यांत आली आहे. "अर्था" च्या गेल्या अंकांत, बटाट्यांचे बाबत तेथें कशी व्यवस्था झालेली आहे, हें सांगितलें होतें. त्याचप्रमाणें, गव्हाच्या रोटीस तेथें रेशनिंग नाहीं, हेंहि प्रसिद्धच आहे.

अनुक्रमणिका

	पृष्ठ		पृष्ठ
१ विविध माहिती ...	३७०	सार्वजनिक नीतिमत्ता व कार्यक्षमता सुधारण्याची आवश्यकता–हिंदी कपाशीचें भवितव्य.	
२ रू. डे. बोर्डाच्या सभेंतील चर्चा	३७१	८ छापखानदारांच्या कामाच्या अटी	३७४
३ प्रो. दाणी ह्यांची निवड	३७२	९ व्यभिचार व घटस्फोट	३७४
४ प्रांतिक सहकारी परिषद्	३७२	१० आर्थिक पहाणी ...	३७५
५ श्री. कागल ह्यांचा दौरा	३७२	११ रोख पैशाची सुरक्षितता	३७५
६ कै. श्री. पां. जी. केतकर	३७२	१२ सारस्वत बँकेची प्रगति	३७६
७ स्फुट विचार ...	३७३		
धान्याचें उत्पादन वाढलें, तर आतां उपासमार कां?–			

अर्थ

बुधवार, ता. १५ नोव्हेंबर, १९४४

रूरल डेव्हलपमेंट बोर्डाच्या सभेंतील चर्चा

प्रांतिक रूरल डेव्हलपमेंट बोर्डाची सभा गेल्या आठवड्यांत मुंबई येथें भरली होती. तीमध्यें कित्येक महत्त्वाच्या प्रश्नांचा विचार झाला. त्यांत प्रा. धनंजयराव गाडगीळ ह्यांनीं केलेल्या विशिष्ट सूचना अंतर्भूत झाल्या होत्या. मुंबई सरकारानें शेतीचा धंदा आणि शेतकरी वर्गाचें जीवन ह्यांत सुधारणा करण्याच्या हेतूनें कांहीं योजना हातीं घेतल्या आहेत. उदाहरणार्थ, विजापूर जिल्ह्यांत जमिनींस बांध घालून तिची उत्पादकता वाढवण्याची मोठी योजना अंमलांत आणली जात आहे. सरकारच्या म्हणजे जनतेच्या पैशांतून असल्या कामांवर लाखो रुपये खर्चले जात असतां ज्या शेत कसणाऱ्या लोकांच्या हितासाठी ह्या योजना अंगीकारण्यांत आल्या आहेत त्यांसच त्यांचा पूर्ण फायदा मिळावा आणि जमीनदार, सावकार वगैरेंनीं आपला खंड व व्याजाचा दर वाढवून किंवा अन्य तऱ्हेनें त्यांचा स्वतःच्या पोळीवर तूप ओतून घेण्यासाठीं उपयोग करून घेऊं नये अशी कायदेशीर व्यवस्था सरकारनें करणें अगत्याचें आहे ह्या आशयाची सूचना प्रा. गाडगीळ ह्यांनीं केली होती. संवर्धनात्मक योजनांचा साकल्यानें विचार होऊन त्यांच्या अंमलबजावणीबरोबरच त्यांचे संबंधांतील संरक्षणात्मक कायदे केले जावे आणि अशा रीतीनें योग्य निर्बंध घातले जाऊन शेतकऱ्यांच्या पदरांत सुधारणांचें फळ नीट पडेल अशी तजवीज वेळींच केली जावी असें आपलें म्हणणें त्यांनीं डेव्हलपमेंट बोर्डापुढें मांडलें. त्यांनीं सुचवलेले कायदे करण्याचे कामीं सरकारास कांहीं अडचणी भासल्या तरी सार्वजनिक पैशानें होत असलेल्या सुधारणांचा मुख्य हेतु सफल होण्यासाठी शक्य ती खबरदारी घेण्यांत आली पाहिजे ह्या तत्वास डेव्हलपमेंट बोर्डानें मान्यता देऊन सरकारास त्याप्रमाणें शिफारस केली. जमीन सुधारणा कायद्यांत जमिनींच्या मालकांस मिळावयाच्या संडाचे बाबतींत वरील दृष्टीनें सुचवण्यांत आलेल्या दुरुस्तीसहि बोर्डानें पाठिंबा दिला.

जिंदगीच्या वाटणीमुळें शेतांचे तुकडे उडतात आणि ते निरनिराळ्या क्षेत्रांत विभागलेहि जातात, त्यामुळें शेतीच्या उत्पादकतेंत घट होते. शेती फायदेशीर होण्यास असल्या जमिनीच्या तुकड्यांचे मालकी हक्कास बाध न येतां एकीकरण होण्याची आवश्यकता प्रतिपादली जात आहे आणि ह्या धोरणाची अंमलबजावणी पंजाब आणि मध्यप्रांत येथें झाली आहे व होत आहे. मुंबई प्रांतांत सतरा वर्षांमागें एकत्रीकरणाविषयींच्या कायद्याचा मसुदा विधिमंडळांत मांडण्यांत आला होता. पण त्यावेळीं विशिष्ट कारणांमुळें विरोध उत्पन्न होऊन तो सरकारास मागें घ्यावा लागला होता. हा प्रश्न पुन्हां उपस्थित करण्यांत आला आहे आणि मुंबई सरकारनें त्यासंबंधांत कायद्याचा मसुदा तयार केला आहे. शेतांच्या तुकड्यांचें एकत्रीकरण त्यांच्या मालकांच्या खुशीवर अवलंबून ठेवावें का त्या बाबतींत सरकारास योग्य वाटेल तेथें सक्ती करण्याचा त्यास अधिकार असावा ह्या प्रश्नावर बोर्डाचा अभिप्राय विचारण्यांत आला असतां, ज्या गावांत एकत्रीकरणाचा कायदा अमलांत आणणें ठरेल तेथील जमीन मालकांच्या बहुमतानें ही योजना हातीं घेतली जावी, तथापि जरूर दिसेल तेथें सक्तीचीहि तरतूद कायद्यांत असावी अशा आशयाचें मत बोर्डानें व्यक्त केलें. युद्धांतून परत येणाऱ्या शिपायांस शेतीसाठी जमिनी मिळवून देण्याविषयींच्या कायद्याचा मसुदा त्यापुढें मांडण्यांत आला होता त्याची चर्चा झाली आणि त्यांतील कित्येक कलमांत दुरुस्त्या सुचवण्यांत आल्या. त्यांपैकीं कांहीं सूचना सरकारच्यातर्फे मान्य करण्यांत आल्या आणि इतरांचा योग्य विचार होईल असें आश्वासन देण्यांत आलें.

शेतकरी कर्जनिवारण कायद्यामध्यें सुचवण्यांत आलेल्या दुरुस्त्यांची चर्चा बोर्डानें केली. प्रांतांतील सर्व भागांत ह्या कायद्याची अंमलबजावणी लवकरच चालू करण्यांत येणार असून तिच्या खाली येणाऱ्या शेतकऱ्यांस पिकांसाठी कर्जे दिलीं जाणें आणि त्यांच्या मालाची विक्री होणें ह्याकरितां सहकारी पतपेढ्या व विक्रीसंस्था काढण्याची तजवीज होत असल्याचें सरकारतर्फे सांगण्यांत आलें. कर्जदार शेतकऱ्यांचें कर्जफेडीचें सामर्थ्य आतां त्यांच्या जिंदगीच्या ऐशी टक्क्यांवरून साठ टक्क्यांवर उतरण्यांत आलें आहे. कर्जाची रकम निश्चित करणाऱ्या बोर्डानें आपला त्याविषयींचा निर्णय जाहीर केला म्हणजे फेड हप्तेबंदीनें व्हावयाची असते. ह्यासंबंधांत प्रांतिक सहकारी जमीनगहाणाच्या बँकेची अशी सूचना होती कीं त्यावर जिंदगीच्या पन्नास टक्क्यांइतकी रकम सावकार घेण्यास कबूल होतील तर आपण ती रोख देण्यास तयार आहों. कर्जदार शेतकरी आणि सावकार ह्यांचा संबंध कायमचा तुटावा आणि धनकोचें देणें सहकारी बँकेनें एकदम रोखीनें फेडून शेतकऱ्यांकडून पुढें वसूली करण्याची कायदेशीर व्यवस्था डेव्हलपमेंट बोर्डास मान्य झाली. परंतु ही तजवीज सार्वत्रिक व सक्तीची होऊं नये आणि कोणत्या शेतकऱ्यांची जमीन गहाण घेऊन तिच्यावर पैसे चावण्याचे हें ठरवणें बँकेवर सोंपवलें जावें असें तिच्या अधिकाऱ्यांचें म्हणणें पडलें. कर्जाच्या प्रकरणांची निवड करण्याची मुभा बँकेस देण्याचें तत्त्व बोर्डास मान्य न झाल्यानें हा प्रश्न अनिर्णीत राहिला. तसेंच, पिकांच्या तारणावर सोसायट्या आणि बँका कर्जे देणार त्या व्यवहारांत नुकसान आल्यास त्याचा पाच टक्केपर्यंतचा हिस्सा स्वतः सोसण्याची तयारी सरकारनें दर्शवली आहे. बँकांनींहि अल्प व्याजानें कर्जे देण्याचें कबूल केलें आहे. परंतु सरकारच्या कल्पनेपेक्षा अधिक नुकसान आल्यास तें भरून काढण्याची तयारी सरकारनें ठेवली

पाहिजे, नाहींतर सहकारी संस्थांस धक्का बसण्याची भीति आहे असें त्यास बजावण्यांत आलें. शेतीचें उत्पादन वाढवण्याचे दृष्टीनें सहकारी तत्त्वावर आणि रशियन संयुक्त पद्धतीनें या धंद्याचे दुहेरी प्रयोग सरकारनें करावे या सूचनेवर चर्चा झाली, तीमध्ये सहकारी संघटनेस अनुसरून प्रयत्न व्हावा आणि रशियन पद्धतीचें अनुकरण करूं नये असा बहुमताचा अभिप्राय व्यक्त करण्यांत आला.

प्रांतिक सहकारी परिषद्

गेल्या शनिवारी आणि रविवारी मुंबई येथें सर विजयराघवाचार्य ह्यांच्या अध्यक्षतेखालीं प्रांतिक सहकारी परिषद् भरून तिच्यामध्यें महत्त्वाचे अनेक विषय मान्य करण्यांत आले. प्रांताचे गव्हर्नर सर जॉन क�ॉलव्हिल ह्यांनी परिषदेचें उद्घाटन केलें. त्यांनीं आपल्या भाषणांत सहकारी चळवळीविषयीं सहानुभूति व्यक्त करून परिषदेच्या सूचनांचा योग्य परामर्श घेण्याचें आश्वासन दिलें. सर जनार्दन मदन ह्यांनीं प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूटचे अध्यक्ष या नात्यानें स्वागतात्मक भाषण करतांना चळवळीचा उद्बोधक आढावा घेऊन तिच्यापुढें आलेल्या प्रश्नांचा उल्लेख केला. सर विजयराघवाचार्य ह्यांनीं आपल्या भाषणांत युद्धपरिस्थितीमुळें सहकारी चळवळीचें पाऊल कोणत्या मार्गानें पुढें पडत आहे ह्याचें विवेचन करून तिच्या उत्कर्षाची दिशा दाखवली. जमीन गहाणाच्या बँकांची स्थिति, शेतकरी कर्जनिवारणाच्या कायद्याचे परिणाम, पतपेढ्यांच्यां देखरेखीची व्यवस्था, सहकारी कायद्याची दुरुस्ती, मालविक्रीची सहकारी मध्यवर्ती संस्था, दुधाचा पुरवठा, खेडेगांवी व लहान उद्योगधंदे, इत्यादि विषयांवर परिषदेनें ठराव पास केले. परिषदेंत उत्साहाचें वातावरण होतें आणि ती यशस्वी झाली ह्यांत शंका नाहीं.

प्रो. दाणी ह्यांची नवीन डायरेक्टर म्हणून निवड

आयुर्वेद रसशाळेच्या भागीदारांची नववी वार्षिक सर्वसाधारण सभा कंपनीच्या मुख्य इमारतींत कंपनीचे अध्यक्ष, डॉ. रा. ह. भडकमकर, यांचे अध्यक्षतेखालीं भरली होती. सभेंत डायरेक्टरांचा वृत्तांत व ३१ मे १९४४ असेरचा हिशोब तपासनिसांनीं तपासलेला ताळेबंद व नफातोटा पत्रक मंजूर करण्यांत आलें. प्रेफरन्स शेअर होल्डरना ५ टक्के व ऑर्डिनरी शेअर होल्डरना इन्कमटॅक्ससहित ४॥ टक्के डिव्हिडंट मंजूर करण्यांत आलें. प्रो. पी. जी. दाणी बी. ए. बी. एससी. (लंडन) ह्यांना नवीन डायरेक्टर म्हणून निवडण्यांत आलें. कंपनीचा कारभार अत्यंत दक्षतेनें चालू आहे. रसशाळेची उत्तरोत्तर ह्यापेक्षां जास्त भरभराट होवो.

टाउन प्लॅनिंग कमिटीचे सभासद, श्री. कागल, ह्यांचा दौरा

हिंदुस्थान सरकारच्या हेल्थ सर्व्हे ॲन्ड डेव्हलपमेंट कमिटीच्या वतीनें श्री. बी. आर. कागल हे टाउन प्लॅनिंग संबंधीं माहिती मिळविण्याकरितां सबंध हिंदुस्थानभर दौऱ्यावर आहेत. त्यांनीं ता. ५ रोजीं मराठा चेंबरला भेट दिली, त्याप्रसंगीं पुण्यांतील उद्योगधंद्यांच्या वाढीच्या दृष्टीनें येथील शहर रचनेसंबंधीं आपले विचार चेंबरच्या कार्यकारी मंडळानें त्यांचेपुढें मांडले. श्री. कागल ह्यांनीहि विस्तृत भाषण करून टाउन प्लॅनिंगचें महत्त्व, त्यासंबंधांत परदेशांमध्यें झालेली प्रगति, जागृत लोकमताची आवश्यकता, इत्यादि गोष्टींची माहिती सांगितली. बिगर शेतकी पट्टी कशी जाचक होत आहे व त्यामुळें शहरांच्या विस्तारास अशी अडचण येत आहे, ह्याच्या तक्रारी त्यांचेपुढें मांडण्यांत आल्या, त्या वरती पोचविण्याचें त्यांनीं मान्य केलें.

के. श्री. पी. जी. केतकर

कळविण्यास अत्यंत खेद वाटतो कीं श्री. पी. जी. केतकर, मुंबई प्रॉ. को. बँकेचे बँच ॲकौंटंट, हे तारीख ११-१०-१९४४ रोजीं अलाहाबाद येथें दिवंगत झाले. श्री. केतकर यांनीं मुंबई प्रॉ. को. बँकेंत १९२५ सालीं नोकरी पतकरली व सन १९२७ ते १९३१ पर्यंत सातारा जिल्ह्यांत काम करून सहकारी चळवळीचा पाया भरभक्कम करण्यास हातभार लावला. नंतर ३ वर्षे पश्चिम खानदेश जिल्ह्यांत ते होते. सन १९३४ मध्यें त्यांची बारामती येथें नेमणूक झाली. तेथील त्यांची प्रशांत सात वर्षांची कारकीर्द अत्यंत महत्त्वाची होती. गेल्या महायुद्धानंतर आलेल्या मंदीची झळ, जमिनी व शेतकी माल यांच्या अत्यंत उतरलेल्या किंमतीमुळें शेतकऱ्यांना अत्यंत कष्टकारक झाली होती. त्यामुळें विशेषतः पुणें जिल्ह्यांतील नीरा कॅनाल भागांतील सोसायट्यांची स्थिति फारच खालावलेली होती व त्यामुळें बँकेचें सोसायट्यांकडील येणें बरेंच थकलें व बऱ्याच सोसायट्या रद्द झाल्या. अशा चमत्कारीक व अत्यंत बिकट वेळीं त्यांची नेमणूक त्या भागांत झाली. त्यांनीं अत्यंत परिश्रम घेऊन, निरनिराळ्या योजना आखून, कर्जदार सभासदांस सूट देऊन व लांब मुदतीचे हप्ते देऊन कर्जदार व सोसायट्या यांना आपली परिस्थिति सुधारण्यास निरनिराळे मार्ग आखून दिले. ही त्यांची त्या भागांतील कामगिरी सहकारी चळवळीला पोषक अशी झाली. त्यावरून त्यांची योग्यता व सहकारी चळवळीबाबत त्यांना वाटत असलेली आस्था व्यक्त होते. ते उदार अंतःकरणाचे, विद्वान व तत्त्वनिष्ठ होते व त्यांना साहित्याची फार आवड होती.

ते १९४१ सालीं मुंबई येथें आल्यापासून दुर्दैवानें त्यांची प्रकृति ढासळली आणि कफ व क्षयरोग यांचा मिलाफ होऊन शेवटीं त्यांतच त्यांचा अंत झाला. या त्यांच्या अकाली निधनानें सहकारी चळवळीच्या व मुख्यतः मुंबई प्रॉ. को. बँकेच्या आधारस्तंभांपैकीं एक प्रमुख कार्यकर्ता गेला असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. त्यांच्या निधनानिमित्त बारामती येथील सहकारी चळवळींतील पुढाऱ्यांची व कार्यकर्त्यांची दुखवटयाची सभा तेथें भरली होती. त्याचप्रमाणें मुंबई प्रॉ. को. बँकेचे नोकर वर्गातर्फे ता. ३१।१०।४४ रोजीं बँकेचें मॅनेजिंग डायरेक्टर श्री. वैकुंठ ल. मेहता यांचे अध्यक्षतेखालीं सभा भरविण्यांत आली. श्री. देवधर यांनीं त्यांच्या कांहीं आठवणी सांगून आपला मौल्यवान सहकारी गेल्याबद्दल दुःख प्रदर्शित केलें व श्री. गायतोंडे यांनीं त्यांच्या अकाली निधनाबद्दल दुखवटयाचा व बँकेचा नोकरवर्ग, त्यांचें कुटुंब व इतर आप्तेष्ट यांचे दुःखांत सहभागी असल्याचा ठराव मांडला; व तो सर्वांनीं उभे राहून मंजूर केला. परमेश्वर त्यांच्या आत्म्यास शांति देवो.

ग्रेट ब्रिटनचा युद्धखर्च

युद्धास प्रारंभ झाल्यापासून पांच वर्षांत ग्रेट ब्रिटनचा एकूण युद्धखर्च २३ अब्ज, ६७ कोटि पौंड झाला. त्यापैकीं १० अब्ज, ५१ कोटि पौंड करांचे रूपानें वसूल करण्यांत आले. म्हणजे, एकूण खर्चापैकी ४४·४% खर्च सरकारच्या उत्पन्नांतून झाला. पांचव्या वर्षांत हेंच प्रमाण ५१·४% पडलें.

स्फुट विचार

धान्याचें उत्पादन वाढलें, तर आतां उपासमार कां !

देशांतील अन्नपरिस्थितीवर मध्यवर्ती असेंब्लींत गेल्या आठवड्यांत चर्चा झाली. युद्धापूर्वीच्या तीन वर्षांत सरासरीनें ७ कोटि ३८ लक्ष एकरांत तांदूळ होत असे. गेल्या वर्षी लागवडीचें क्षेत्र ८ कोटि एकर एवढें झालें. सर्व प्रकारच्या धान्यांच्या लागवडीसाठीं युद्धापूर्वी १९½ कोटि एकर जमीन असे; गेल्या वर्षी ती २० कोटि, ६३ लक्ष एकर झाली. उत्पादनाचे आकडे पहातां, युद्धापूर्वीचें तांदळाचें उत्पादन २ कोटि, ६५ लक्ष टन होतें; गेल्या वर्षी तें ३ कोटि, ६ लक्ष टन भरलें. म्हणजे, जितक्या तांदळाची ब्रह्मदेशांतून आयात होत असे, त्याच्या दुपटीइतकें (४० लक्ष टन) उत्पादन वाढलें. सर्व प्रकारच्या धान्यांचें उत्पादन युद्धापूर्वी ५ कोटि, ५५ लक्ष टन होतें तें गेल्या वर्षी ६ कोटि, १० लक्ष टन भरलें. वरीलप्रमाणें लागवडीचें व उत्पादनाचे आकडे देऊन शिक्षण, आरोग्य व जमीन ह्या खात्याचे सेक्रेटरी मि. जे. डी. टायसन, ह्यांनीं "अधिक धान्य पिकवा" मोहिमेचें यश सिद्ध करण्याचा प्रयत्न मध्यवर्ती असेंब्लींत केला. युद्धापूर्वी जेवढा तांदूळ ब्रह्मदेशांतून हिंदुस्थानांत येत असे, त्याच्या दुपटीइतकी वाढ स्थानिक उत्पादनांत जर झाली आहे, तर नेहमी तांदूळ खाणाऱ्या प्रांतांना व जिल्ह्यांना तो कां मिळत नाहीं व देशांत लोकांची अद्यापि उपासमार कां होत आहे, असा मार्मिक प्रश्न सर कावसजी जहांगीर ह्यांनीं आपल्या भाषणांत विचारला व "खरें सांगावयाचें म्हणजे माझा ह्या आकड्यांवर विश्वास बसत नाहीं" असें त्यांनीं सांगितलें. सुमारें २० लक्ष लोक उपासमारीनें मरण पावले व ३० लक्ष लोक रोगराईस बळी पडले, ही गोष्ट नजरेआड करतां येणार नाहीं असें श्री. भुलाभाई देसाई हे म्हणाले. अन्नमंत्री सर ज्वालाप्रसाद श्रीवास्तव ह्यांच्या मूळ सूचनेस विरोधी पक्षानें सुचविलेल्या दोन दुरुस्त्या असेंब्लीनें मंजूर केल्या.

सार्वजनिक नीतिमत्ता व कार्यक्षमता सुधारण्याची आवश्यकता

डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या नव्या व्यापारी कॉलेजाचें "बृहन्महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्स" हें नांव जाहीर करण्याचा समारंभ शनिवार, ता. ११ रोजीं रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर, सर चिंतामणराव देशमुख, ह्यांच्या हस्तें झाला. त्यावेळीं प्रिन्सिपॉल कर्वे ह्यांनीं, कॉलेजच्या उद्घाटनापासूनच्या प्रगतीचा आढावा घेतला व कॉलेजला मिळालेल्या सार्वत्रिक पाठिंब्याचा उल्लेख करून बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि. च्या देणगीचें वैशिष्ट्य स्पष्ट करून सांगितलें. सोसायटीच्या उत्पादकांच्या स्वार्थत्यागपूर्वक राष्ट्रीय सेवेच्या ध्येयानेंच प्रेरित झालेले सिंडिकेटचे संस्थापक व चालक हे आहेत व ही प्रथा अशीच पुढें चालू राहून समाजाच्या औद्योगिक प्रगतीस चालना मिळो, अशी इच्छा त्यांनीं प्रदर्शित केली. सर चिंतामणराव देशमुख ह्यांचें भाषण विचार परिप्लुत व मार्गदर्शक असें झालें. कॉमर्स कॉलेजांतील शिक्षणाचें ध्येय कोणतें असावें, हें त्यांनीं विशद करून सांगितलें आणि सार्वजनिक व्यवहारांतील नीतिमत्ता व कार्यक्षमता सुधारण्याच्या आवश्यकतेवर त्यांनीं विशेष भर दिला. इतर देशांशीं हिंदुस्थानास यशस्वी स्पर्धा करावयाची असल्यास, त्यांच्याशीं केवळ बरोबरी करून भागणार नाहीं, त्यांचेपेक्षा आपण सरस झालें पाहिजे असें त्यांनीं सांगितलें. हिंदुस्थानांत नैसर्गिक संपत्ति विपुल आहे, मांडवल उभारतां येईल किंवा मिळवतां येईल, लोकसंख्याहि मुबलक आहे, परंतु तिच्या घटकांचा दर्जा सुधारण्यावरच आपलें भवितव्य अवलंबून आहे, हें त्यांच्या भाषणाचें सार होतें. वैयक्तिक स्वार्थापेक्षा राष्ट्रीय हितास प्राधान्य देणारी व ध्येयासाठी कार्यक्षमतेनें परिश्रम करणारी निष्ठावंत पिढी निर्माण होणें आवश्यक आहे आणि त्यासाठी शिक्षकवर्गानें स्वतःची शिकवण आपण स्वतः आचरणांत आणली पाहिजे, असें त्यांनीं सांगितलें. आर्थिक व औद्योगिक क्षेत्रांत कोणत्याहि जातीचा अगर पक्षाचा जन्मसिद्ध हक्क असूं शकत नाहीं, हें सर अर्देशिर दलाल ह्यांनीं कॉलेजाच्या उदघाटनाचे वेळीं सांगून, महाराष्ट्रीय तरुणांसहि व्यापारी क्षेत्रांत योग्य स्थान मिळण्याची शक्यता स्पष्ट केली. सर चिंतामणरावांनीं ह्या मुद्याचा उल्लेख करून, वंशावरहि हें प्रभुत्व अवलंबून नाहीं; मनूच्या काळापासून हिंदवासीयांस आर्थिक प्रगतीचें महत्त्व पटलेलें होतें; आतां आर्थिक व्यवसाय अधिक गुंतागुंतीचे व व्यापक स्वरूपाचे झाले आहेत त्यांत ज्यास्त अभ्यासपूर्वक पडावें लागतें, वगैरे गोष्टी स्पष्ट करून सांगितल्या. समारंभास आलेल्या संदेशांतील सर सकलातवाला ह्यांच्या पत्रामधील वाक्य येथें उद्धृत करण्याजोगें आहे:—"व्यापारी कॉलेजांतून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांत, व्यापारी व्यवसाय करून "नफा" मिळविण्याची वृत्ति निर्माण व्हावी; व्यापारी मंडळ्यांत राहून "सेवा" करण्याची वृत्ति निर्माण होऊं नये, अशी माझी अपेक्षा आहे."

हिंदी कपाशीचें भवितव्य

अमेरिकेनें आपल्याजवळील कपाशीचा शिलकी साठा उठविण्यासाठी त्याच्या निर्गतीस सरकारी मदत देण्याचें ठरविलें असल्याचें प्रसिद्ध झाल्यापासून, हिंदी कपाशीशी हितसंबंध असणाऱ्यांत खळबळ उडाली आहे. हिंदी कपाशीची किंमत सुमारें ३३ रुपयांनीं एकदम उतरली आहे. चालू युद्धापूर्वीच्या सहा वर्षांची सरासरी पाहिली, तर हिंदी उत्पादनाच्या ५५% कपास निर्गत झालेली आहे, व ३१ ऑगस्ट, १९३९ रोजीं हिंदी शिलकी कपास फक्त १०,६२,००० गाठी होती ती ३१ ऑगस्ट, १९४४ अखेर ४०,००,००० गाठींवर गेली आहे. अशा परिस्थितींत, अमेरिकेनें आपली कपास निर्गत करण्यासाठी विशेष मदत करण्याचें ठरविल्यास, हिंदी कपाशीच्या निर्गतीवर त्याचा अतिशय प्रतिकूल परिणाम होणें स्वाभाविक आहे. अमेरिकेचें आर्थिक बल एवढें मोठें आहे, कीं त्या बलाचे आधारावर परराष्ट्रीय व्यापार नियंत्रित करण्याचें त्या देशानें ठरविलें, म्हणजे हिंदुस्थानाशारख्या देशास कांहींच वाव सापडणार नाहीं. सर पुरुषोत्तमदास ठाकूरदास ह्यांनीं ह्यासंबंधांत एक पत्रक प्रसिद्ध करून हिंदुस्थान सरकारचें लक्ष ह्या प्रश्नाकडे वेधलें आहे.

अमेरिकेनें परराष्ट्रांत गुंतविलेलें भांडवल

अमेरिकन कंपन्या व व्यक्ती ह्यांनीं परराष्ट्रांत गुंतविलेल्या रकमांची वेरीज १२ अब्ज, ३० कोटि डॉलर्स एवढी होते. त्यांपैकीं, ब्रिटिश साम्राज्यांत ५ अब्ज, ८० कोटि डॉलर्स गुंतलेले आहेत. दक्षिण अमेरिका खंडांतील देशांत गुंतलेल्या देशांची रकम २½ अब्ज डॉलर्स भरते. जर्मनींत सुमारें १½ अब्ज डॉलर्स अमेरिकेनें गुंतविलेले आहेत.

छापखानदारांच्या कामाच्या अटी

गैरसमज व भांडणें टाळा जामा नको

छापखानदार व छपाईचें काम करून घेणारीं गिऱ्हाइकें यांचेमध्यें अनेक वेळां गैरसमज निर्माण होऊन खटके उडतात व कित्येक प्रसंगीं निष्कारण भांडणें होतात. छापखानदार व गिऱ्हाइक या दोघांचेहि दृष्टीनें, कामाच्या संबंधांत कांहीं ठराविक नियम बंधनकारक असले तर सोईचें होईल. गिऱ्हाइकास छापखानेवाल्यांच्या अडचणी समजत नाहींत व जादा कामाबद्दल मोबदला देण्यास तो तयार नसतो. वेगळा मोबदला मिळणार नसल्याकारणानें छापखानदारहि गिऱ्हाइकाच्या जादा गरजा पुऱ्या पाडण्यास नाखुष असतो. इलिनॉइज येथील छापखानदारांनीं आपल्या कामासंबंधीं कांहीं नियम केले आहेत ते खाली उद्धृत केले आहेत त्यांवरून या विषयावर चांगला प्रकाश पडेल.

(१) गिऱ्हाइकानें दिलेली ऑर्डर, छापखानदारास व गिऱ्हाइकांस या दोघांसहि योग्य वाटतील अशा अटींवरच फक्त रद्द करतां येईल.

(२) स्केचेस तयार करणें, चित्रें काढणें, इत्यादि कामाबद्दल स्वतंत्र मोबदला दिला पाहिजे.

(३) चित्रें, ब्लाइज, इत्यादींवर छापखान्याची मालकी राहील.

(४) त्यांत बदल केल्यास त्याच्या खर्चाचा वेगळा आकार पडेल.

(५) गिऱ्हाइकानें मूळ कामांत मागाहून बदल केला तर त्याबद्दल स्वतंत्र आकार पडेल.

(६) छपाईचें काम झाल्यावर टाइप मोडला जाईल. फॉर्म कांहीं दिवस राखून ठेवणें असल्यास त्याला वेगळा आकार पडेल.

(७) गिऱ्हाइकानें प्रुफें पाहून तीं दुरुस्त करून 'ठीक' असल्याचें सांगितल्यावर, त्याप्रमाणें छपाई करण्याची जबाबदारी छापखान्यावर आहे. राहून गेलेल्या चुकांची जबाबदारी छापखान्यावर नाहीं.

(८) प्रेस प्रुफें पहावयाचीं असल्यास, गिऱ्हाइकानें छापखान्यांत वेळेवर हजर राहिलें पाहिजे. विलंब लागल्यास स्वतंत्र आकार पडेल.

(९) पोस्ट कार्डे व तिकीट लावलेलीं पाकिटें यांवर छपाई हवी असल्यास, तीं गिऱ्हाइकानें पुरविलीं पाहिजेत. तीं तशीं पुरविलीं नाहींत, तर छापखाना तीं आणण्याबद्दल मूळ किंमतीवर १०% इतका जादा आकार घेईल.

(१०) तीस दिवसांपेक्षा अधिक काळ गिऱ्हाइकाचा कागद छापखान्यांत पडून राहिला, तर गिऱ्हाइकानें त्याबद्दल माफी दिली पाहिजे. गिऱ्हाइकानें पुरविलेला कागद छपाईस अयोग्य असेल किंवा चांगल्या तऱ्हेनें बांधलेला नसेल तर छपाईस लागणाऱ्या विलंबाबद्दल गिऱ्हाइकानें नुकसानभरपाई द्यावी लागेल.

(११) छपाईचें काम गिऱ्हाइकास देतांना १०% कमी अगर जास्त छपाई झाली असली तरी योग्य इतकेच कागद छापले असें समजलें जाईल.

(१२) गिऱ्हाइकानें पुरविलेल्या मालापैकी छापखान्यांत उरलेला माल गिऱ्हाइकाच्या खर्चानें व त्याच्या जोखमीवर साठवून ठेवला जाईल.

(१३) काम पुरें होण्यास ३० दिवसांपेक्षा जास्त काळ लागणार असल्यास, दर महिन्याच्या पहिल्या तारखेस मजुरी व माल यांच्या किंमतीच्या ७५% इतक्या रकमेचें बिल केलें जाईल व काम पुरें केलें म्हणजे उरलेल्या सर्व रकमेचें बिल करण्यांत येईल.

(१४) तीस दिवसांत बिलाचे पैसे दिले पाहिजेत. छपाईचें काम मिळाल्यापासून पांच दिवसांचे आंत गिऱ्हाइकानें तक्रार असल्यास कळविली पाहिजे.

(१५) कराराच्या दिवसानंतर छापखानदाराचे अधिकाराबाहेरील परिस्थितीमुळें कामाचा खर्च कमी अधिक झाल्यास, बिल त्याप्रमाणें केलें जाईल.

(१६) वरील अटी मान्य आहेत असें समजूनच काम स्वीकारलें जाईल. अटींत बदल करून हवा असल्यास, उभयपक्षानें त्याप्रमाणें लेखी कागद केला पाहिजे.

व्यभिचार सिद्ध झाला तरी घटस्फोट नाहीं

मुंबई हायकोर्टात सन १९२६ च्या 'इंडियन अँड कलोनिअल डायव्होर्स ज्यूरिसडिक्शन ॲक्ट' खालील पुढीलप्रमाणें केस निकालासाठी आली होती. अर्जदार हे एक स्कॉटिश गृहस्थ होते; त्यांनीं जाब देणाऱ् बाईशीं सन १९३० मध्यें रंगून येथें लग्न लावलें; त्यानंतर सप्टेंबर १९४१ मध्यें ब्रह्मदेश जपानच्या ताब्यांत गेला त्यावेळीं जे लोक इकडे निघून आले त्यांत हें जोडपेंही निघून आलें; परंतु प्रत्येकजण स्वतंत्र रीतीनें आला. कारण त्याच सुमारास हे वेगवेगळे राहात होते. अर्जदार वादीचें असें म्हणणें होतें कीं त्याची बायको हिचा मुंबईत एका लष्करी अधिकाऱ्याशी अनैतिक संबंध असल्यानें त्याला त्याचे बायकोपासून सोडचिठ्ठी मिळावी; मुंबई हायकोर्टास या बाबतींत कायद्याप्रमाणें दाद देतां येते कीं नाहीं असा प्राथमिक मुद्दा निघाल्यावरून त्या मुद्द्यावरच सदरचा अर्ज फेटाळला गेला. वर नमूद केलेल्या कायद्याप्रमाणें लग्न रद्दबातल ठरवावयाचें असल्यास असें लग्न हिंदुस्थानांत झालें असलें पाहिजे व ब्रह्मदेश हा १९३५ च्या घटनाकायद्याप्रमाणें हिंदुस्थानापासून विभक्त झाला असल्यानें रंगूनला लागलेलें लग्न हिंदुस्थानांत लागलें असें म्हणतां येणार नाहीं. सदरच्या कायद्याप्रमाणें नुसता व्यभिचार हिंदुस्थानांत झाला एवढ्यावरून विवाह रद्द होण्याची दाद मिळणार नाहीं, तर ते हिंदुस्थानांत एकत्र राहिले होते असें सिद्ध होऊन व्यभिचार सिद्ध झाला तरच मुंबई हायकोर्टाला अर्जदार यास दाद देण्याचा अधिकार प्राप्त होईल.

दि पूना फार्मर्स लि.

डेअरी, पोल्ट्री, बेकरी, शेती, व्यापार, कॅटल ब्रीडिंग, इत्यादि सर्व प्रकारचा व्यवसाय करण्यासाठी वरील खासगी लिमिटेड कंपनी नोंदण्यांत आलेली आहे, तिचें अधिकृत भांडवल ५ लक्ष रुपये आहे. 'ब्लॉसम व्हीट फ्लेक्स'चे श्री.भास्कर पांडुरंग सहस्रबुद्धे, श्री. मुरलीधर चतुर्भुज लोहिया, श्री. दलपतराम मायाशंकर दवे व 'सकाळ'चे श्री. नारायण भिकाजी पराळेकर हे कंपनीचे पहिले डायरेक्टर आहेत. कंपनीनें डेअरीचा धंदा सुरू केला असल्याचें समजतें.

शु. य. माध्यंदिन ब्राह्मणसमाजाची आर्थिक पहाणी

निरनिराळ्या समाजांच्या सर्वांगीण उन्नतीकरतां हल्ली अनेक संस्था कार्य करीत आहेत; त्यांपैकीं पुणें येथील श्रीशुक्लयजुःशाखीय माध्यंदिन ब्राह्मणसभा ही एक संस्था होय. संस्थेतर्फे प्रतिवर्षाप्रमाणें याज्ञवल्क्य आश्रमांत श्रीज्ञानेश्वर महाराजांचा उत्सव दिनांक ११ ते १३ नोव्हेंबर १९४४ पर्यंत साजरा करण्यांत आला; त्याला जोडून रविवार दिनांक १२ रोजीं दुपारीं ३ ते ७ पर्यंत प्रतिभा प्रेसचे रा. द. भ. ऊफ अण्णासाहेब लोखंडे यांचे अध्यक्षतेखालीं पुण्यांतील शाखीय व्यापारी व कारखानदार यांचें संमेलन भरवण्यांत आलें होतें; त्यावेळीं पुण्यांतील या समाजाचें 'व्यापारी क्षेत्रांतील स्थान' या विषयीं पुढीलप्रमाणें माहिती संस्थेचे चिटणीस रा. वि. त्र्यं. शेटे यांनीं सांगितली.

ब्राह्मण वर्गांतील कोणत्या एका विशिष्ट समाजानें व्यापारी पेशा पूर्वापार पत्करलेला असेल तर तो माध्यंदिन ब्राह्मण समाजानेंच होय. इ. स. १ ल्या शतकापासून पैठणच्या राजांबरोबरच तेथील माध्यंदिन सराफ-सावकारांची माहिती आपणांस मिळूं शकते. पैठण हें महाराष्ट्रांतील त्यावेळचें व्यापारीकेंद्र असल्यानें पैठणच्या पेढीबाबतच्या धंद्यांत या समाजाचा बराच मोठा भाग होता. पूर्वी समाजांत हुंडी, सराफी व सावकारी यांची गणना व्यापारी क्षेत्रांत प्रामुख्यानें केली जात असे; साहजिकच हा धंदा करणारा माध्यंदिन समाज व्यापारी क्षेत्रांत आघाडीवर असे. आधुनिक काळीं व्यापाराचें व कारखानदारीचें क्षेत्र इतकें व्यापक झालें आहे व समाजाच्या गरजा इतक्या वाढल्या आहेत कीं त्या फक्त मारवाडी व गुजराथी समाजच बहुसंख्येनें पुरवीत आहे. माध्यंदिन ब्राह्मण समाजाची पुण्यांतील कुटुंब संख्या २,००० सरासरीनें आहे; त्यांत व्यापारी व औद्योगिक क्षेत्रांत १२० कुटुंबें समाविष्ट होतात. त्यांची वर्गवारी पुढीलप्रमाणें आहे:- छापखाने व प्रकाशन १०, सराफ व सावकार २०, किराणाभुसार १५, घड्याळांचे व्यापारी ५, स्टेशनरी ५, सायकलींचे दुकानदार ५, मोटारचे व्यापारी ४, शिंपीकाम करणारे ९, पेंटर्स ५, औषधीसामानांचे व्यापारी २, निरनिराळ्या मालांचे कारखानदार १२, कापडव्यापारी ६, सिनेमा २, व इतर किरकोळ व्यापार करणारे १८. यांतील बहुसंख्य लोक मालाची वाटणी करणारे दुकानदार आहेत; उत्पादक मालांचे कारखानदार २।३ जण फक्त आहेत. समाजांतील प्रमुख औद्योगिक कार्यकर्त्यांत रबरी मालाचे कारखानदार श्री. कृ. म. जंगली, छापखानावाले व प्रकाशक श्री. द. म. लोखंडे व दे. श्री. जोशी, मशीन टूल्स करणारे श्री. मो. ग. जोशी, डेक्कन एजन्सीजचे श्री. दि. द. देशपांडे, व्यापारी श्री. दास्ताने, पुस्तक प्रकाशक श्री. कापर्डेकर व सिनेमा उद्योगांतील पाठकबंधु व श्री. गं. न. पाठक ह्यांचा उल्लेख करतां येईल. इतर दृष्टीनें समाजाची पाहणी केली तर बहुसंख्य तरुण लोक नोकरी पेशाकडे किंवा शिक्षक, डॉक्टर, वकील, इंजीनिअर या व्यवसायांकडेच सहजासहजीं वळलेले दिसून येतात. त्यामुळें पुणें शहराच्या नव्या पद्धतीच्या संघटनात्मक औद्योगिक व व्यावसायिक जीवनांत या समाजाचें जेवढें महत्त्व त्याच्या पूर्वपरंपरेला धरून दिसून यावयास पाहिजे तेवढें दिसून येत नाहीं. थोरले माधवराव पेशवे यांच्या अंतकाळच्या विनंतीला मान देऊन त्यांचें कर्ज निवारण्याकरतां तीन कोट रुपये एक रकमेनें विनादस्त देणारे वानवळे सावकार याच शहरांत या शाखेंतच जन्मले होते हें लक्षांत धरलें म्हणजे या समाजानें याहून व्यापारांत जास्त पदार्पण केलें पाहिजे हें स्पष्ट होतें.

बँकांच्या शाखांमधील रोख पैशाची सुरक्षितता

संपादक, "अर्थ" यांस सा. न. वि. वि.

"अहो मिस्टर टोणगांवकर, तिजोरी उघडी टाकून काय पैसे मोजतां! पैसे कसे सुरक्षित ठेवावे याबद्दलचा 'अर्थ' मधील लेख वाचला नाहींत वाटतं तुम्हीं!" माझ्या सहकारी मित्रांनीं मला पैसे मोजीत असतां विचारलें.

मागच्या महिन्यापर्यंत बँकेंत 'अर्थ' येत नव्हता त्यामुळें मला नकारार्थी उत्तर द्यावें लागलें. परंतु सायंकाळीं त्यांचे घरीं तो आक्टोबर ता. २५ मधील बँकेच्या शाखांमधील रोख पैशाच्या सुरक्षितेसंबंधींचा लेख वाचतांक्षणीं मी आश्चर्यानें आइस्क्रीमच बनलों. अशा तऱ्हेनें बँकांच्या बाबतींत गैरसमज पसरेल म्हणून मी त्यांचें प्रत्येक विधान किती चुकीचें आहे तें दाखवूं इच्छितों.

पूर्वी काठीला सोनें लावून काशीपासून रामेश्वरापर्यंत जातां येत असे तरी चोरी होत नव्हती. पण हल्लीं कालाच्या गतीबरोबर समाजांतील लोकांवरील आपत्तीमुळें दानत देखील बदलत चालली आहे. परंतु असें जरी आहे तरी बँकांतील नोकर वर्ग व शिपाई देखील पूर्ण इमानी आहेत. ते तसेच पूर्वी होते, आज आहेत व पुढेंही राहतीलच.

लुटालुटीचा प्रकार एक-दोन बँकांतशाला म्हणून तो तसा सर्वत्र होईलच असें नाहीं. ज्या शाखेंत एकच मनुष्य काम करतो त्या शाखा नसून उपशाखा आहेत. शाखेंत एकापेक्षां अधिक लोक काम करीत असतात व तेथें जर असा लुटालुटीचा प्रसंगच आला तर भोंवतालचे लोक अवश्य धांवून येतील व चोरांना पकडून देतील. इतकें मात्र खरें, कीं बँकेंत काम करणाऱ्या व्यक्तींच्या लोकप्रिय-अप्रियतेवर ती मदत अवलंबून राहील.

कॅशरजवळ आजपर्यंत प्रतिकाराचें साधन नव्हतें व त्याची जरूरी पण भासली नाहीं. पण समजा त्याला प्रतिकाराचें साधन दिलें, तरी त्याला ऐनवेळीं त्याचा उपयोग करतां येईलच असें थोडेंच आहे!

असला प्रकार झाल्यानंतर अधिकाऱ्यांच्या व नोकरांच्या मनोवृत्तींत जमीन अस्मानाचें अंतर राहणारच. नाहींतर शिस्त राहणार नाहीं. याचा अर्थ असा नव्हे कीं, त्यांच्या हृदयांत सहानुभूतीचा ओलावा नाहीं.

पैशांची ने-आण करण्यासंबंधीं बँकेनें नियम केलेले नाहींत हें म्हणणें बहुतांशीं खरें असलें तरी हल्ली हें काम बँकेंतील दोन इसमांनीं करावें अशी पद्धत बहुतेक बँकांनीं स्वीकारली आहे.

कॅशिअरला दिलेला कौंटर सर्व ठिकाणीं बहुतेक बंदिस्तच असतो. बँकेच्या शिपायांना पैशाच्या बाबतींत शक्यतों कमी हात घालण्यास रहावा, असें म्हणणें म्हणजे इमानी शिपायांबद्दल अविश्वास व अनुदारपणा दाखवणें होय.

ज्यावेळीं जाळपोळ व लुटालूट असले प्रकार होत होते त्यावेळीं ती टोळधाड एका बँकेच्या एका शाखेवर पण आली होती. परंतु बँकेंतील एकदोघांनीं सांगितलें कीं ही बँक शेतकऱ्यांची आहे. त्यावेळीं लोकांचा मोर्चा दुसरीकडे गेला. ह्यावरून, बँकेच्यासंबंधीं जनतेंत सहानुभूति असण्यावर लुटालुटीचे प्रकार कांहीं अंशीं अवलंबून असूं शकतात, हें दिसून येईल.

बँकेच्या हिताच्या दृष्टीनें नोकर वर्गाच्या वारंवार बदल्या होत असतातच. तेव्हां असा जनतेचा निष्कारण गैरसमज करून देऊं नये.

प्रकाशक गोविंद टोणगांवकर.

सारस्वत को. बँकेची प्रगति

चेअरमन, श्री. व्ही. पी. वर्दे, ह्यांचें वार्षिक सभेंतील अध्यक्षीय भाषण

आपल्या बँकेकडील ठेवींचा आकडा १९४१-४२ अखेर १६½ लक्ष रुपये होता, तो एका वर्षापूर्वी २३½ लक्ष रुपये झाला व आतां तो सुमारें ३४ लक्ष रुपये झाला आहे. बँकेचे व्याजाचे दर व मुंबईमधील प्रमुख बँकांचे व्याजाचे दर साधारणतः सारखेच असतांनाहि ही वाढ दिसून येत आहे. एकूण ठेवींपैकी ५०% ठेवी सेव्हिंग्ज व २५% ठेवी मुदतीच्या आहेत, ह्यावरून सभासदांची सहकारी वृत्ति दिसून येते. सिल्व्हर ज्युबिली सर्टिफिकेटांस अजूनहि मागणी येत आहे व त्यांवरील व्याजाचा दर थोडा उतरला असला तरी त्यांची लोकप्रियता कायम आहे. एकूण देण्यांच्या ९४% रकम रोख व सरकारी रोख्यांत मिळून तरती आहे. सहकारी बँकांकडील ठेवींची मर्यादा वसूल भांडवल व रिझर्व्ह ह्यांच्या आठ पटींची ठरविण्यांत आली आहे, तिचें उल्लंघन होत असल्यानें, बँकेनें ठेवी मर्यादित न केल्यास, नियमभंगामुळें होणाऱ्या नुकसानीस डायरेक्टर व्यक्तिशः जबाबदार रहातील, असें रजिस्ट्रारनें कळविलें. डायरेक्टरांनीं कांहीं ठेवी परत करून बँकेची प्रगति थांबविण्याऐवजीं व्यक्तिशः जबाबदारी पत्करण्याचें ठरविलें व नंतर बँकेचें भांडवल वाढविण्याचा व को. बँक्स असोसिएशनमार्फत आठ नंबरचा जाचक नियम बदलून घेण्याचा प्रयत्न त्यांनीं केला. ह्या दोन्ही बाबतींत त्यांना यश आलें. भागांसाठी प्रचंड मागणी येऊन कित्येक अर्ज नाकारावे लागले. भांडवल व रिझर्व्ह ह्यांच्या बारापट ठेवी स्वीकारण्यास बँकांना दोन वर्षे सवलत मिळाली आहे, परंतु आपल्या बँकेकडे येणाऱ्या ठेवींचा ओघ इतका मोठा आहे, कीं लवकरच ही सवलत अपुरी पडूं लागेल. प्रत्येक नव्या भागापोटीं जमा झालेल्या वाढाव्याची (२ रुपये) रकम (१५,०२८ रुपये) रिझर्व्ह फंडाकडे वर्ग करण्यांत आली आहे. बँक धारण करीत असलेल्या रोख्यांची बाजारभावानें किंमत पडलेल्या किंमतीपेक्षा ६८,०४० रुपयांनीं अधिक असल्याकारणानें व रिझर्व्ह फंडाखेरीज इतर फंड ठेवींची मर्यादा ठरवितांना विचारांत घेतले जात नसल्याकारणानें, इनव्हेस्टमेंट फ्लक्चुएशन फंडांतील ५० हजार रुपये रिझर्व्ह फंडाकडे वर्ग करण्यांत आले. अहवालाचे वर्षी येणें कर्जाचा आकडा सुमारें ९५ हजारांनीं वाढून तो ४,१७,८२७ रुपये झाला आहे.

डायरेक्टरांनीं किमान ५० भाग धारण केले पाहिजेत

" बँकेच्या व्यवस्थापक कमिटीच्या सभासदांनीं बँकेचे किमान ५० भाग धारण केलेले असले पाहिजेत, अशा अर्थाची दुरुस्ती नियमांत सुचविण्यांत येत आहे. ह्या संबंधांत भागीदारांनीं कृपा करून गैरसमज करून घेऊं नये. सहकारी रजिस्ट्रारनीं अशा अर्थाची सूचना १० वर्षांपूर्वीच केली होती. बँकेची जिंदगी ५० लाखांचे घरांत जात आहे, भांडवल ५ लाखांवर नेण्यांत येत आहे व कमिटीचे सभासद खात्याच्या नियमापेक्षा अधिक घेतल्या जाणाऱ्या ठेवींबद्दल व्यक्तिशः जबाबदार रहात आहेत, अशा परिस्थितींत 'सहकारी तत्त्वाचें उल्लंघन होत आहे' असें म्हणून कमिटीच्या सूचनेस विरोध करूं नका. कित्येक बँकांनीं अशाप्रकारें डायरेक्टरांच्या किमान लायकीची मर्यादा वाढविलेली आहे. "

पूना गेस्ट हाऊस

टेलिफोन नं. ७७९

संस्थापक :
कै. नानासाहेब सरपोतदार

पैसा व ज्ञान देणारीं पुस्तकें !

श्रीमंत कसें व्हावें? संपत्तीचे सुंदर मार्ग दाखवून हजारों रु. मिळवून देतें. वाचून लक्षाधीश व्हाल! किं. १॥ रु. काम आणि कामिनी. काम शास्त्रावरील अपूर्व ग्रंथ! किं. १॥ रु. मृत्युलोकचा प्रवास! मरणोत्तर आत्म्याच्या अद्भुत हालचालींचें कथानक! किं. १ रु. लिहा. विपट आणि मंडळी, कराड जि. सातारा.

पुण्यांतील
आदर्श निवासस्थान व भोजनालय
छाया लॉजिंग व बोर्डिंग हाऊस
बुधवार चौक, पुणें २.

—राष्ट्रीय काटकसर—

युद्धकार्याची गरज लक्षांत घेऊन डबे वा कागद यांची बचत करणें भाग आहे. ही पॅकिंगबाबतची अडचण लक्षांत घेऊन—

-गोल्डन कोको-

सुटा मिळण्याची सोय सर्व प्रमुख व्यापाऱ्यांकडे करण्यांत येत आहे. सुटा कोको घेण्यानें पैशाचीही बचत होते. मात्र आपणांस गोल्डन कोकोच मिळत आहे अशी खात्री करून घ्या. नांव लक्षांत ठेवा.

साठे बंधू, " गोल्डन कोको "

—सर्वत्र मिळतो—

साठे कोको व चॉकोलेट कारखाना, पुणें २.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' भांबुर्डा, घ. नं. ९२४।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3454

जाहिरातींचे दर,
सालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
(टपाल खर्चासह माफ)
किरकोळ अंकास
दोन आणे.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष १० पुणें, बुधवार, तारीख २२ नोव्हेंबर, १९४४ अंक ४६

व्ही. पी. बेडेकर
आणि सन्स लि.
मुंबई.
मसाल्याचे व्यापारी
पुणें एजंटः—
द. ना. हेजीब

देना बँक
देवकरण नानजी बँकिंग कं. लिमिटेड
देना बँकेच्या ग्राहकांसाठीं
इन्व्हेस्टमेंट सर्व्हिस
तपशीलाकरितां भेटा अगर लिहा :
हेड ऑफिस : मुंबई आणि स्थानिक शाखा
देना बँकेच्या स्थानिक कचेऱ्यांत हिंदुस्थान सरकारचे प्राइझ बाँडस विकत मिळतात.

"Consent of the Central Government has been obtained to this issue under Defence of India Rule 94-A. It must be distinctly understood that in giving this consent the Government of India do not take any responsibility for the financial soundness of any schemes or for the correctness of any of the statements made or opinions expressed with regard to them."

दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.
स्थापना : १९३५
हेड ऑफिस : पुणें शहर
विक्रीस काढलेलें नवीन भांडवल
रु. १०,००,०००
(प्रत्येकीं रु. ५० च्या २०,००० भागांत विभागलेलें)
वरील शेअर्स ता. ४-१०-४४ रोजीं बँकेच्या रजिस्टरवर असलेल्या शेअर-होल्डरांना त्यांच्या प्रत्येक जुन्या १ शेअरला १ नवीन शेअर असे रु. ५ वाढीनें देऊं केले आहेत. पहिल्या शेअर-होल्डरांनीं घेऊन उरलेले शेअर्स इतरांस नेवढ्याच वाढीनें (रु. ५) देण्यांत येतील. अर्ज पाठविण्याची शेवटची तारीख १५-१२-४४ ही आहे.
—डायरेक्टर बोर्ड—
श्री. धों. कृ. साठे, चेअरमन
श्री. व्ही. पी. वर्दे, प्रो. व्ही. जी. काळे, श्री. एन. जी. पवार, श्री. टी. व्ही. रानडे, श्री. आर. सी. सोहोनी, श्री. एस. जी. मराठे, श्री. एम. आर. जोशी, श्री. एफ. डी. पदमजी, श्री. एम. व्ही. गोखले, श्री. व्ही. एच. देशमुख.
विशेष माहितीसाठी लिहा.
सी. व्ही. जोग, मॅनेजर



पुणें चीफ एजंट :
मे. श्रीदत्त एजन्सी
रविवार पेठ, पुणें २.

कोल्हापूर विक्रेते :
मे. भागवत आणि कं.
कांच टाइन

सातारा जिल्हा एजंट :
मे. जोशी आणि मंडळी
भवानी पेठ.

शेअर बाजार

(श्री. व. वि. लोणकर, एम. ए., बी. कॉम., १२८६ अ, शिवाजीनगर, पुणे ५)

सुमारें दीड महिन्यांपूर्वी 'अर्था'त सुचविलें होतें कीं गुंतवणीदारांनीं जे शेअर्स संख्येनें कमी व आकारानें लहान असे उचलावेत. त्यांमध्यें किती जोरदार तेजी झाली आहे हें त्यावेळचे भाव व परवांच्या शुक्रवारचे बंद भाव हे पडताळून पाहिलें असतां दिसून येईल. साधारणतः अपोलो ३।९ वरून ४।७, इ. टी. २।११ वरून ३।६, मोरारजी ५९० वरून ६६०, इंदूर ६६५ वरून ७८७।८, सिंप्लेक्स २३१ वरून २६३ असे आहेत. गाळे विकणारांविरुद्ध आहेत त्यावरून बाजार 'वृषभी' (Bullish) आहे व जोपर्यंत ते तेजीवाल्यांच्या बरेचसे विरुद्ध जाणार नाहींत तोपर्यंत तो 'ऋषभी' (Bearish) होईल असें मानण्याचें कारण नाहीं. आतांपर्यंत एकएक निवडक शेअर्स वर जात होते. मागील आठवड्यांत मात्र झालेली तेजी सर्वसाधारण आहे आणि मंदीवाल्यांची कापाकापी बरीच झाली, यावरून प्रमुख भावना तेजीचीच झालेली आहे असें दिसून येईल. टाटाची व्यालें पुढील-वर्षी कमी होण्याचें कारण दिसत नाहीं. आतांपर्यंतची त्यांची कमाई पूर्ववत कायम आहे असें ऐकिवांत येते. तसेंच सिमेंटलाही नफा उत्तम झाला आहे व भांडवल वाढविणार अशी बातमी आहे. अशा पक्षीं ऑर्डिनरी व डिफर्ड ३८१ वरून ३९७।८ व २०६६।४ वरून २१३६ आणि सिमेंट २३१ वरून २४३ पर्यंत चांगलेच मजबूत आहेत. ३॥ टक्क्यानें परवां शतक गांठलें. १९४३ च्या फेब्रुवारीपासून भाव ९४-९५ होते तेव्हांपासून तो घेऊन ठेवणें श्रेयस्कर आहे व भाव चढले तरी पढावयाचें नाहींत याचीं कारणें तितकीच जबरदस्त आहेत हें 'अर्था'त आम्हीं एकसारखे प्रतिपादन करीत आलों आहोंत व त्याप्रमाणें घडलें आहे असें म्हटलें असतां अनौचित्याचा दोष मात्र आमच्या पदरीं येईल. असो एकंदरीनें मध्यंतरी बाजार शांतता होणार म्हणून जो उगाच भलतीकडे पडला होता तो शहाण्यासारखा वर आला आहे. तो, किरकोळ बातम्या सोडतां, बरच राहील असें वाटतें.

सोन्याच्या खाणींपासून म्हैसूर सरकारची प्राप्ती

म्हैसूर संस्थानांतील सोन्याच्या खाणींचें एकूण उत्पादन १९४३-४४ मध्यें २,२१,९७६ औंस झालें. १७,७२८ औंस चांदी निघाली. त्या दोघांची मिळून किंमत ४ कोटि, ३६ लक्ष रुपये भरली. रॉयल्टीबद्दल म्हैसूर सरकारचा त्या किंमतीमधील वाटा २० लक्ष रुपयांचा असून सोन्यावरील जकातीचें उत्पन्न १ कोटि, ६० लक्ष रुपयांपेक्षा अधिक आहे. संस्थानांतील खाणींत २३½ हजार लोक काम करीत आहेत, त्यांपैकी एकट्या सोन्याचे खाणींतच २०½ हजार कामगार आहेत. खनिज धातूंबाबत जनतेचें कुतूहल वाढत आहेत. नव्या खाणी खणण्याचा परवाना मागणारे १७२ अर्ज गेल्या वर्षी संस्थानाच्या सरकारकडे दाखल झाले.

विविध माहिती

अमेरिकन रेडिओंची आयात

उधार-उसनवार व्यवस्थेखाली ४०,९१७ रेडिओ अमेरिकेतून ह्या देशांत आयात करण्यांत आले आहेत. त्यांपैकीं २७,७०१ रेडिओ खासगी व्यापाऱ्यांमार्फत विकण्यांत आले. त्यांचे बाबतींत मुळांत ठरल्याप्रमाणें उधार-उसनवार पद्धतीचा अवलंब करतां आला नाहीं आणि त्यांची किंमत डॉलर्सच्या स्वरूपांत रोखीनें यावी लागली.

ओडिअन थिएटर्स, लि.

ग्रेट ब्रिटनमधील ओडिअन थिएटर्स लि. च्या थिएटरांत गेल्या वर्षी एकूण १८ कोटि प्रेक्षकांनीं बसून बोलपट पाहिले. तिकिट-विक्रीचें उत्पन्न १ कोटि, ६० लक्ष पौंड आलें, त्यापैकीं ८० लक्ष पौंड करापायीं भरावे लागले. एकूण उत्पन्नापैकीं करमणुकीच्या कराच्या वाट्यास युद्धापूर्वी १३% रकम जात असे; आतां हें प्रमाण ३९% झालें आहे. सबंद जगभर थिएटरांचें जाळें पसरविण्याची व फिल्म्स तयार करणाऱ्या कांहीं स्टूडिओंवर निर्णायक अधिकार मिळविण्याची कंपनीची पूर्वतयारी चालू आहे. कंपनीच्या भागीदारांस गेल्या वर्षीच्या नफ्यावर २०% डिव्हिडंड मिळालें.

आगबोटींचा तुटवडा, परंतु मिशनऱ्यांस प्राधान्य

१०६ मिशनऱ्यांना हिंदुस्थानांत येण्यास ब्रिटिश सरकारनें खास वहातुकीची सवलत दिली आहे. आणखी बराच काळ वहातुकीची अडचण तीव्र रहाणार असली, तरी मिशनरी सोसायट्यांच्या विनंतीचा सहानुभूतिपर विचार केला जाईल, असें मि. एमरी ह्यांनीं कॉमन्स सभेंत सांगितलें.

पुणें शहरांतील दोन कंपन्यांमधील औद्योगिक वांधे

पूना इलेक्ट्रिक सप्लाय कंपनी लि. व तिचे कामगार ह्यांचेमधील वांध्यामध्यें पंच म्हणून मि. ई. एम. नानावटी ह्यांची मुंबई सरकारनें नेमणूक केली आहे. सदर्न रिटिंग वर्क्समधील संप श्री. बापुसाहेब गुप्ते ह्यांच्या मध्यस्थीनें मिटला आहे.

दौंड-बारामती रेल्वे कं. लि.

दौंड-बारामती रेल्वे कं. लि. ची खास साधारण सभा नुकतीच भरली होती, तीमध्यें कंपनी गुंडाळण्यांत यावी व त्यासाठी श्री. पी. के. गोडबोले व मि. एन. जी. भरूचा ह्यांस लिक्विडेटर नेमण्यांत यावें, असें ठरलें.

एक रुपयावाल्या नव्या नोटा

नव्या एक रुपयावाल्या चलनी नोटा लवकरच व्यवहारांत खेळूं लागतील. सध्याच्या नोटांपेक्षा ह्या नोटा फारशा वेगळ्या नाहींत.

हिंदी आर्थिक परिषद

हिंदी आर्थिक परिषदेचें २० वें अधिवेशन दिल्ली येथें ता. ३० व ३१ डिसेंबर आणि १ जानेवारी रोजीं अलिगढच्या मुस्लिम विश्वविद्यालयांतील प्रो. हैदर ह्यांच्या अध्यक्षतेखाली भरणार आहे.

गिरगांव मुंबई नं. ४ महिंद्रकर ब्रदर्स तयार कपड्याचे व्यापारी बुधवार चौक, पुणें

अनुक्रमणिका

	पृष्ठ		पृष्ठ
१ विविध माहिती	३७८	कारी सहाय–फूड ॲडव्हायझरी कौन्सिल–अमेरिकन गिरण्या व युद्धोत्तर स्पर्धा–चंदनाचें तेल.	
२ शेअर बाजार	३७८	६ सहशिक्षणाची चंदी...	३८२
३ असेंब्लीमधील कांहीं प्रश्नोत्तरें	३७९	७ यांत्रिक इस्यारांचा धंदा	३८२
४ "केंद्रल कोर्टास काम द्या"	३८०	८ शेअर अंडरराइट कसे करतात	३८३
५ स्फुट विचार... जनसेवा की नफेबाजी–स्वस्त अन्नपुरवठ्यास सर-	३८१	९ खरेदी-विक्री संघाबद्दल	३८४

अर्थ

बुधवार, ता. २२ नोव्हेंबर, १९४४

असेंब्लीमधील कांहीं प्रश्नोत्तरें

उद्योगधंदेवाल्यांची एक परिषद सध्यां अमेरिकेंत युद्धोत्तर कालांतील आंतराष्ट्रीय व्यापाराचे संबंधांतील प्रश्नांची चर्चा करीत आहे आणि तींमध्यें ह्या देशांतून गेलेल्या हिंदी धंदेवाल्यांचे प्रतिनिधी भाग घेत आहेत. ह्या शिष्टमंडलाचें नेतृत्व सर चुनिलाल भाईचंद मेहता ह्यांचेकडे असून ते हिंदी धंद्यांची परिस्थिति व गरजा ह्याविषयीं येथील लोकमत अमेरिकन जनतेपुढें स्पष्टपणें मांडीत असल्याच्या बातम्या इकडे प्रसिद्ध होत आहेत. स्टर्लिंग शिलका, डॉलर हुंड्या, हिंदुस्थानचा युद्धखर्च व त्याचा ह्या हुंड्यांवर परिणाम, हिंदी हुंडणावळीचा दर, आंतरराष्ट्रीय व्यापारांत ह्या देशाचें स्थान, हिंदी उद्योगधंद्यांचें भवितव्य, इत्यादि प्रश्नांवर त्यांनीं निर्भीड रीतीनें मतप्रदर्शन केलें आहे. इकडे मध्यवर्ती असेंब्लींत असल्या विषयांवर प्रश्न विचारून सभासदांनीं त्याचें संबंधांत सरकारकडून माहिती काढण्याचा प्रयत्न चालविला आहे. ह्यांपैकीं कित्येक प्रश्नोत्तरांचे योगानें त्यांविषयक्या परिस्थितीवर विशेष उजेड पडला आहे असें मात्र म्हणतां येत नाहीं. विधिमंडळांत विचारण्यांत येणाऱ्या प्रश्नांचें स्पष्ट उत्तर देणें कित्येक वेळां सरकारास गैरसोयीचें असतें आणि कांहीं प्रश्न अप्रस्तुत असतात व कांहींचीं खुलासेवार उत्तरें देणें सरकारचे मतानें सार्वजनिक हितास पोषक नसतें. ह्यामुळें माहितीच्या दृष्टीनें अनेक प्रश्न निष्फळ होतात आणि त्यांस देण्यांत आलेल्या उत्तरांत माहितीचा पूर्ण आभाव असतो.

अलीकडे हिंदुस्थानांत रिझर्व्ह बँकेमार्फत सोन्याची विक्री होत आहे त्यासंबंधांतील प्रश्नोत्तरें वरील वस्तुस्थितीचीं उत्कृष्ट निदर्शक आहेत. हें सोनें कोठून येतें आणि इंग्लंड व अमेरिका ह्यांचे वतीनें येथें विकल्या जाणाऱ्या सोन्यापैकीं दक्षिण आफ्रिकेमधून किती येतें ह्याची आपणांस कांहीं माहिती नाहीं असें फडणवीस, सर जेरेमी राइसमन, ह्यांनीं एका प्रश्नास उत्तर देतांना सांगितलें. युद्धसमाप्तीनंतर सोन्याची किंमत उतरण्याचा संभव असल्यानें तें विकत घेणाऱ्या जनतेचें नुकसान होऊं नये म्हणून त्याची विक्री सरकारनें थांबवावी ह्या सूचनेस उद्देशून ते म्हणाले कीं सोनें खरेदी करण्याची कोणावरहि सक्ती नाहीं आणि तें विकत घेणाऱ्यास त्याच्या किंमतीच्या भवितव्याची कल्पना आहे. दक्षिण आफ्रिकेचें सोनें कोणत्या भावानें विकत घेण्याचा करार तो देश व इंग्लंड ह्यांमध्यें झाला आहे ह्या प्रश्नाशी हिंदुस्थान सरकारास कांहीं कर्तव्य नाहीं असेंहि त्यांनीं पुढें सांगितलें. सरकारचे वतीनें हिंदी बाजारांत चांदीची विक्री होत आहे तिचा उपयोग व्यवहारांत खेळणाऱ्या चलनापैकी कांहीं पैसा परत खेचून घेण्याकडे होईल असा अभिप्राय त्यांनीं व्यक्त केला.

अमेरिकेवर निघणाऱ्या डॉलर हुंड्यांचा एक साम्राज्यनिधि ब्रिटिश सरकारनें निर्माण केला आहे, त्यासंबंधांत हिंदुस्थानच्या दृष्टीनें प्रश्न विचारण्यांत आले. ह्या निधींत हिंदुस्थानचा हिस्सा आहे त्याचा उपयोग ह्या देशास अमेरिकेंतून माल आणण्याकडे करतां येईल अशी व्यवस्था केली जाण्याची आवश्यकता हिंदी धंदेवाल्यांकडून प्रतिपादिली जात आहे. ब्रिटिश साम्राज्यांतील देशांचें बाहेरील राष्ट्रांकडून येण्याबद्दलच्या हुंड्यांचा स्वतंत्र निधी बनवून युद्धकार्याकडे त्याचा विनियोग करण्याचें १९३९ मार्ली ठरलें आणि ह्या व्यवस्थेस अनुसरून अगदी निकडीची मागणी असेल आणि ती युद्धप्रयत्नाशीं विसंगत नसेल तर तेवढ्या पुरता डॉलर्सचा पुरवठा केला जातो असें सर जेरेमी ह्यांनीं सांगितलें. जरूरीचे यंत्रांचे भाग हिंदी कारखानदारांस अमेरिकेंतून आणतां येत नाहींत ह्याचें कारण डॉलर हुंड्यांचा अभाव नसून त्या सरकारकडून पुरवण्यांत येत नाहींत ह्या तक्रारीस वरील उत्तर होतें. हिंदुस्थानावर युद्धखर्चाचा वाजवीपेक्षा अधिक बोजा पडतो व इंग्लंडच्या वतीनें येथें खरेदी केलेल्या मालाच्या योग्य किंमती दिल्या जात नाहींत असें कांहीं प्रश्नांत सुचविण्यांत आलें असतां त्यांस नकारात्मक उत्तरें सर जेरेमी ह्यांनीं दिलीं. ज्यांचा उपयोग झालेला नाहीं आणि होण्यासारखा नाहीं अशा विमान गृहांवर पहिली कोटि रुपये खर्च झाले आहेत कीं नाहीं असा प्रश्न विचारण्यांत आला असतां असल्या गृहांची आपणांस माहिती नाहीं असें त्यांनीं सांगितलें.

युनायटेड किंग्डम कमर्शल कॉर्पोरेशन ह्या नांवाची ब्रिटिश सरकारच्या भांडवलावर व्यवहार करणारी एक व्यापारी कंपनी हिंदुस्थानांतून बाहेरच्या देशांत माल पाठवण्याचा धंदा करीत आहे. तिला मोठ्या प्रमाणांत नफा होतो आणि त्यावर प्राप्तीवरील कर हिंदुस्थान सरकारनें घेतलेला नाहीं अशी टीका प्रश्नांचे मार्मानें करण्यांत आली. तिला उत्तर देतांना सर जेरेमी म्हणाले कीं ही कंपनी १९४१ मध्यें स्थापन झाली, तिच्या व्यवहाराची माहिती हिंदुस्थान सरकारास वेळच्या वेळ पुरवली जाते, तिला वाजवीपेक्षां फाजील नफा झालेला नाहीं आणि तिच्यावर प्राप्तीच्या कराची आकारणी रीतसर चालू झाली आहे. ह्या कामीं सरकारची दिरंगाई झाली आहे असें म्हणतां येत नाहीं आणि तपशीलवार हिशेब तयार करण्यास वेळ दिला पाहिजे असें त्यांनीं पुरवणीदाखल सांगितलें. तलम कापडाचा हिंदुस्थानांत तुटवडा आहे, त्याचा फायदा घेऊन ब्रिटिश व अमेरिकन कारखानदार ह्या जातीचा माल इकडे पाठवण्याच्या तयारींत आहेत काय ह्या प्रश्नास व्यापार मंत्र्यांनीं असें उत्तर दिलें कीं वरील कापडाच्या आयातीस परवाने लागतात आणि ते देण्यांत आलेले नाहींत. त्यांनीं असेंहि सांगितलें कीं कोळसा व गिरण्यास लागणारा इतर माल ह्याविषयींची परिस्थिति अनुकूल झाल्यास हिंदी जनतेच्या उपयोगासाठी व जरूरीच्या निर्यातकरितां मिळून पाचशे कोटि वार कापड उपलब्ध होऊं शकेल.

" फेडरल कोर्टास कांहीं तरी काम द्या "—सर जॉन बोमंट ह्यांची सूचना

मुंबई हायकोर्टाचे सेवानिवृत्त सर न्यायाधीश, सर जॉन बोमंट, ह्यांनीं ईस्ट इंडिया असोसिएशन (लंडन) मध्यें एक निबंध वाचला, त्यांत त्यांनीं हिंदी संयुक्त (फेडरल) कोर्टाबाबत व्यक्त केलेल्या विचारांस हिंदुस्थानांत पुरेशी प्रसिद्धि मिळालेली दिसत नाहीं. सर जॉन बोमंट ह्यांच्या सारख्या अधिकारी गृहस्थांच्या, त्यांच्या अनुभवावर आधारलेल्या मतांस विशेष महत्त्व आहे. १९३५ च्या गव्हर्न्मेंट ऑफ इंडिया ॲक्टानें हें फेडरल कोर्ट अस्तित्वांत आणलें. प्रत्येक फेडरल राज्यघटनेंत अशा कोर्टाची आवश्यकता असतेच. मध्यवर्ती फेडरल सरकार व फेडरेशनमध्यें सामील होणारे घटक ह्यांचेमधील वांधे व घटकां-घटकांतील वांधे ह्यांचे निर्णय करण्याचें काम फेडरल कोर्टाचें असतें. परंतु " हिंदी फेडरेशनचा कोठेंच पत्ता नसतांना फेडरल कोर्ट अस्तित्वांत आणण्यांत घोडचूक झाली " असा सर बोमंट ह्यांचा अभिप्राय आहे. हिंदी फेडरल कोर्टास सध्या मुख्यतः कांहीं थोड्या विशिष्ट बाबतींत (२०५ वें व २१३ वें कलम) अपीलें ऐकण्याचेंच काम करावें लागतें; अव्वल (ओरिजिनल) अधिकाराचा उपयोग करण्याचा प्रसंग फेडरल कोर्टास येत नाहीं. " अशीं अपिलेंच केवळ ऐकण्यासाठी फेडरल कोर्टासारखें खर्चिक श्रीमंतीचें कोर्ट स्थापन करण्याची आवश्यकता नव्हती. फेडरल कोर्टाचा वार्षिक खर्च किमान २५,००० पौंड असेल, परंतु १९३७ सालापासून आतांपर्यंतची सरासरी काढली तर त्या कोर्टास वर्षांतून तीन ते चार आठवड्यांपेक्षां अधिक काम पडलेलें नाहीं. " प्रिव्ही कौन्सिल हें अपिलाचें अखेरचें कोर्ट आहे, तो दर्जा फेडरल कोर्टास देण्यांत यावा, अशी एक सूचना मध्यंतरी करण्यांत आली होती, ती अंमलांत आली असती तर इंग्लंडमध्यें अपिलांसाठी जावें लागलें नसतें. परंतु सर जॉन बोमंट हे मुंबई हायकोर्टाचे सर न्यायाधीश असतांनाच त्या हायकोर्टानें ह्या सूचनेस विरोध केला होता. बाकीचीं हायकोर्टें सूचनेस अनुकूल होतीं. स्थानिक हितसंबंध व मतें ह्यांपासून दूर असलेल्या व इंग्लंडमधील सर्वोत्कृष्ट न्यायाधीशांची बुद्धिमत्ता उपयोगांत आणूं शकणाऱ्या प्रिव्ही कौन्सिलची प्रतिष्ठा हिंदी फेडरल कोर्टास येणें अशक्य आहे, असें मुंबई हायकोर्टाचें म्हणणें होतें. तथापि, फेडरल कोर्टास रिकाम्या वेळांत कामास लावण्यासाठी इन्कम टॅक्सबाबत प्रकरणें त्याकडे सोपवावीं, अशी मुंबई हायकोर्टानें सूचना केली. इन्कम टॅक्सचा कायदा सबंध हिंदुस्थानास सारखाच लागू असल्या-कारणानें, त्याच्या अर्थासंबंधानें सर्वत्र एकवाक्यता असणें इष्ट आहे आणि त्यासाठी इन्कम टॅक्स कायद्याखालील प्रकरणांचा अखेरचा निर्णय एका मध्यवर्ती कोर्टाकडे असावा, अशी ही भूमिका होती. तथापि, " ही सूचना अंमलांत आलेली नाहीं व फेडरल कोर्टाच्या न्यायाधीशांचा वेळ व जनतेचा पैसा ह्यांचा अपव्यय चालूच आहे " अशी सर बोमंट ह्यांची कडक टीका आहे. आज नाहीं तरी कालांतरानें फेडरल कोर्ट हेंच अखेरचें अपील कोर्ट असणें इष्ट आहे, असेंच सर बोमंट ह्यांचें मत आहे. वादी, प्रतिवादी व त्यांचे स्थानिक सल्लागार ह्यांच्या अनुप-स्थितींत, ६,००० मैल दूर अपिलाचें काम चालविण्यांतील तोटे सहज लक्षांत येण्याजोगे आहेत. प्रिव्ही कौन्सिलला स्थानिक परिस्थिति, संवयी, आचारविचार ह्यांची पूर्ण माहिती असणें अशक्य आहे. परंतु आजच्या अनिश्चित परिस्थितींत फेडरल कोर्टास अखेरच्या अपील कोर्टाचे अधिकार देण्यास त्यांचा विरोध आहे.

दि बँक ऑफ इंडिया लि.

[स्थापना : १९०६]

अधिकृत भांडवल	... ... रु.	२,००,००,०००
वसूल झालेलें भांडवल	... ... रु.	१,००,००,०००
रिझर्व्ह फंड	... ... रु.	१,२३,००,०००

मुख्य कचेरी: ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

मुंबईमधील शाखा: बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

इतर शाखा: अहमदाबाद (भद्र, मुख्य ऑफिस), अहमदाबाद (एलिस ब्रिज शाखा), अहमदाबाद (स्टेशन शाखा), अमृतसर, अंधेरी (मुंबई शेजारीं), बांद्रे (मुंबई शेजारीं), कलकत्ता (क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्क्वेअर), जमशेदपूर, जुनागड, कराची, मद्रास, नागपूर (किंग्जवे), नागपूर (इतवारी बझार), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत, वेरावल, भुज (कच्छ).

लंडन एजन्ट्स: वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

डायरेक्टर्स: सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय.(अध्यक्ष), श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के. नाईट; मि. ए. गेडिस; सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, जी. बी. ई., के. सी. आय. ई.; मि. दिनशा के. दाजी; श्री. रामनिवास रामनारायण.

करंट डिपॉझिट अकाउंट्स:

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ¼% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षां कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते, सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

एजंट:—एच्. ए. करीमभाई

जिकडे तिकडे प्रशंसा

इमिटेशन दागिन्यांवर रासायनिक क्रिया करून खऱ्या सोन्याचा पत्रा चढविला जातो त्यामुळें दागिना केव्हांही खराब होत नाहीं, ही पूर्ण खात्री झाली. सोन्याचा पत्रा चढविलेल्या चार बांगड्या किं. आठ रु. गरजेस्तव दागिना परत करणें झाल्यास वर चढवि-लेल्या सोन्याचे सर्वच्या सर्व पैसे परत देऊं.

भट कं. सांगली, S. M. C.

भट कंपनी शाखा—बुधवार पेठ, पुणें २.

" मागोरा "चा अभिनव व आश्चर्यकारक शोध

ढेकणांच्या उदबत्त्या

(ABC)

BUG COILS (ABC)

प्रत्येक उदबत्ती रात्रभर जळते व तोंपर्यंत ढेकूण आपलें ठिकाण सोडून बाहेर येत नाहींत. विशिष्ट धुरामुळें हा चमत्कार होतो. बॉक्समध्यें १२ तांबड्या उदबत्त्या तांबड्या पॅकिंगमध्यें बॉक्स किं. रु. १८, ट. ख. निराळा.

दि मागोरा केमिकल कं. लि.,

हिराबाग, पुणें २

स्फुट विचार

व्यापारांत जनसेवा कीं नफेबाजी ?

समाजाची आधुनिक आर्थिक घटना व्यक्तिनिष्ठ नफ्याच्या पायावर उभारली गेली असल्यानें तिला भांडवलशाही हें दूषणात्मक नांव प्राप्त झालें आहे. तयार माल विकत घेणारी सामान्य जनता आणि मजुरी मिळवणारा कामकरी वर्ग ह्यांच्या हिताचें कांहींहि होवो, आपल्या पदरांत अधिकांत अधिक फायदा पडला म्हणजे झालें अशा भावनेनें व्यवहार करणाऱ्या धंदेवाल्यांच्या आपमतलबी वृत्तीचा निषेध ह्या नांवांत अभिप्रेत आहे. वास्तविक पहातां उद्योगधंदे आणि व्यापार ह्यांस भांडवल पुरवणारे आणि त्यांचे व्यवहार करणारे लोक समाजास आवश्यक आणि उपयुक्त असलेली अशी कामगिरीच बजावीत असतात आणि व्याज व नफा ह्यांच्या स्वरूपांत त्यांस मिळणारा मोबदला हें त्यांच्या समाजकार्याचें मोल होय. परंतु नफा किती व कसा घ्यावा ह्यास प्रत्यक्ष व्यवहारांत मर्यादा रहात नाहीं आणि धंदेवाले वैयक्तिक फायद्याच्या मागें लागून समाजसेवेचें आपलें कार्य विसरतात असा सामान्य अनुभव येतो. त्यास अनुलक्षून बृहन्महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्सच्या नामकरण समारंभाचे प्रसंगीं पाठवलेल्या आपल्या संदेशांत सर सोराबजी सकलातवाला ह्यांनीं त्या संस्थेच्या विद्यार्थ्यांस योग्य उपदेश करून त्यांच्या कार्याच्या स्वऱ्या उद्दिष्टाची त्यांस ओळख करून दिली हें योग्य झालें. हा संदेश मुळांत पुढें न आल्यानें 'अर्था'च्या गेल्या अंकांत त्याचा आशय अपेक्षेपेक्षां निराळ्या स्वरूपांत व्यक्त केला गेला. तो आतां उपलब्ध झाल्यानें सर सोराबजी ह्यांच्या संदेशाची पार्श्वभूमी आम्हीं वर विशद केली आहे. व्यापारांत नफा मिळवणें योग्य आहे, तरी स्वतःच्या सामाजिक कामगिरीस फायद्यापेक्षा कमी लेखणार नाहींत असे विद्यार्थी बृहन्महाराष्ट्र कॉलेज शिकवून तयार करील अशी आशा त्यांनीं व्यक्त केली. व्यापारांत पडणाऱ्या तरुणांनीं समाजास आवश्यक वस्तू व आर्थिक सुखसोयी योग्य किंमतींत पुरवून स्वतःच्या चरितार्थाचें साधन ह्या समाजसेवेच्या मोबदल्यांत मिळवावें आणि अशा रीतीनें स्वहित व लोकहित साधून सामाजिक प्रगतीस सहाय करावें असा त्यांचा उपदेश आहे. व्यापारांतील नफ्याचें सामाजिक तत्व आणि आर्थिक स्वरूप हीं त्यांनीं आपल्या संदेशांत मार्मिक रीतीनें स्पष्ट केलीं आहेत. त्यांकडे लक्ष वेधणें अगत्याचें आहे.

स्वस्त अन्नाच्या पुरवठ्यास ब्रिटिश सरकारचें द्रव्यसहाय

इंग्लंडमध्यें अन्नपुरवठ्याची व्यवस्था आणि शिधापद्धतीची अंमलबजावणी पूर्णपणें यशस्वी झाली आहे हें प्रसिद्ध आहे. त्या देशांतील लोकांस लागणाऱ्या अन्नाचा मोठा भाग शांततेच्या काळांतहि बाहेरून आयात करावा लागतो. ह्या दृष्टीनें पहातां ब्रिटिश सरकारानें युद्धपरिस्थितींतहि लोकांच्या अन्नाचा पुरवठा अबाधित राखला आहे, एवढेंच नव्हे तर त्याच्या किंमतीहि मर्यादेपलीकडे जाऊं दिलेल्या नाहींत हें कौतुकास्पद आहे ह्यांत शंका नाहीं. हिंदी मध्यवर्ती विधिमंडळाच्या दोन्ही सभांत अन्नपुरवठ्याच्या सरकारी व्यवस्थेवर लोकनियुक्त सभासदांनीं कडक टीका नुकतीच केली. इंग्लंडमध्यें तेथील सरकारानें खाद्यपदार्थांचा पुरवठा किंमती वाढूं न देतां चालू ठेवण्यांत जें यश मिळवलें आहे तें त्यांच्या डोळ्यांपुढें असलें पाहिजे. तथापि सामान्य जनतेस महत्वाचे खाद्यपदार्थ स्वस्त किंमतींत मिळावे म्हणून ब्रिटिश सरकार आपल्या तिजोरीमधून द्रव्यसहाय देत आहे ह्याची माहिती सर्वांस असणें आवश्यक आहे. ब्रेड, बटाटे, दूध, मांस, साखर, अंडीं इत्यादि पदार्थांच्या किंमती मर्यादेंत राखण्याकरितां आणि त्यांचा व्यापार करणारांचें नुकसान भरून काढण्यासाठी ब्रिटिश सरकार प्रतिवर्षी सुमारें २८० कोटि रुपये खर्चीत आहे. इंग्लंडमध्यें खाद्यपदार्थांची विक्री व त्यांच्या किंमती नियंत्रित आहेत आणि जनतेस अन्न स्वस्त भावानें पुरवलें जाण्यासाठी एवढें मोठें द्रव्यसहाय तें देत आहे. हिंदुस्थानांत सरकारनें ही व्यवस्था डोळ्यांपुढें ठेवून तीस अनुसरून येथें प्रयत्न करून पहाण्यासारखा आहे. लहान मुलांस दुधाचा पुरवठा करण्याचे बाबतींत अशा प्रकारची योजना मुंबई शहरांत अंमलांत आणलेली आहे. तिचा विस्तार केला जाणें अगत्याचें आहे. ब्रिटिश सरकार सध्या खाद्यपदार्थांच्या किंमती मर्यादेंत ठेवण्यासाठी प्रतिवर्षी जो मोठा खर्च करीत आहे त्याची वाटणी खालीं दिली आहे:—

	दशलक्ष पौंड
ब्रेड, पीठ	६४
मांस	२३
बटाटे	२७
अंडीं	१५
साखर	१५
दूध	१७
चीज	३
बेकन	२
इतर	४८
	२१४

फूड ॲडव्हायसरी कौन्सिलचें गेल्या दोन वर्षांतील कार्य

मुंबई सरकारनें १९४२ सालीं एक फूड ॲडव्हायसरी कौन्सिलची योजना केली. मुंबई शहरांतील अन्नविषयक सर्व प्रश्नांवर सरकारला सल्ला देणें, हें ह्या कौन्सिलचें काम आहे. सरकारी व बिनसरकारी मिळून ३८ सभासदांचें तें बनलेलें आहे. रोजच्या निकडीच्या प्रश्नांच्या विचारासाठी कौन्सिलची एक स्टँडिंग कमिटीहि आहे. मुंबई सरकारच्या मुंबई शहरांतील अन्नपुरवठ्याच्या प्रश्नांबाबत कौन्सिलनें उत्कृष्ट कामगिरी बजावली आहे. त्याची माहिती देणारें १६ पृष्ठांचें एक चोपडें मुंबई सरकारनें प्रसिद्ध केलें आहे. दूध, कापड, केरोसीन, ओषधें, इत्यादिसंबंधांतील प्रश्नांकडे कौन्सिलनें लक्ष पुरविलें असलें, तरी धान्य पुरवठ्याचा प्रश्न हाच सर्वांत महत्त्वाचा होता, हें उघड आहे. (१) मुंबई शहरासाठी हिंदुस्थानाबाहेरून, इतर प्रांतांतून व मुंबई प्रांतांतून धान्य मिळविणें, (२) मिळविलेला साठा अपव्यय थांबवून जतन करणें, (३) मिळविलेलें व जतन केलेलें धान्य योग्य प्रमाणांत वाटणें व (४) सक्षम व अत्यावश्यक धान्यांच्या किंमती मर्यादेंत राखणें (तुटीप्रमाणें महागाईहि उपासमारीस कारणीभूत होते). ह्या चारी बाबतींत फूड ॲडव्हायसरी कौन्सिलनें सरकारास योग्य मार्गदर्शन केलें.

मुंबई शहरांतील रेशनिंग सर्व हिंदुस्थानास नमुनेदार झालें आहे, हें सुप्रसिद्धच आहे. प्रस्तुत पुस्तिकेस गव्हर्नरांचे सडेतोड सर हेन्री नाइट यांनी आठ ओळींची प्रस्तावना लिहून फूड ॲडव्हायझरी कौन्सिलचे मनःपूर्वक आभार मानले आहेत. पुस्तिकेची किंमत आठ आणे आहे.

अमेरिकन गिरण्यांतील यंत्रांची कार्यक्षमता व युद्धोत्तर स्पर्धा

सर फ्रँक पूँट यांच्या नेतृत्वाखाली ब्रिटिश गिरण्यांच्या प्रतिनिधींचें एक मंडळ नुकतेंच अमेरिकेस गेलें होतें. त्या मंडळानें आपला अहवाल सादर केला आहे, तो पहातां ग्रेट ब्रिटनच्या मानानें अमेरिकेनें किती प्रचंड प्रगति केली आहे हें दिसून येतें. अमेरिकेच्या स्पर्धेत ब्रिटिश गिरण्यांचा टिकाव लागून त्यांचेशी हिंदी गिरण्यांस पुढें स्पर्धा करावी लागणार आहे, हें येथें लक्षांत घेतलें पाहिजे. हिंदुस्थानांतील गिरण्यांची यंत्रसामुग्री ब्रिटिश यंत्रसामुग्रीच्या नमुन्याचीच असल्याकारणानें, युद्धोत्तर काळांत हिंदी गिरण्यांची अमेरिकन गिरण्यांबरोबर तुलनाच करतां येणार नाहीं, कारण हिंदी गिरण्यांतील यंत्रें जुनीं व फार वापरलेलीं आहेत. गेल्या तीस वर्षांत ब्रिटिश गिरण्यांनीं कांहींहि प्रगति केलेली नाहीं; अमेरिकन गिरण्यांतील प्रत्येक क्रिया तत्सम ब्रिटिश क्रियेच्या मानानें अधिक कार्यक्षम झालेली आहे. सूत काढण्याचे बाबतींत अमेरिकन गिरण्यांपेक्षा ब्रिटिश गिरण्यांना २२% ते ९८% अधिक खर्च येतो व कापड विणण्याची मजुरी पाहिली, तर ब्रिटिश गिरण्यांना तिचेपायीं १२९% ते २०३% ज्यास्त रकम खर्चावी लागते. अर्थात्, ह्याचें कारण, ब्रिटिश यंत्रसामुग्रीपेक्षा अमेरिकन यंत्रसामुग्री फारच कार्यक्षम आहे, हें होय. अमेरिकेंतील एकूण मागांपैकी ९५% माग ऑटोमॅटिक आहेत, तर ग्रेट ब्रिटनमधील फक्त ५% माग ऑटोमॅटिक आहेत ! त्या कारणानें, एक ब्रिटिश कामगार फार तर ६ ते ८ माग चालवूं शकतो, तर प्रत्येक अमेरिकन कामगाराकडे सुमारें ६० माग सोपविलेले असतात ! आधुनिक व अत्यंत कार्यक्षम यंत्रामुळें मजुरीचे खर्चांत होणारी बचत पुढील स्पर्धेच्या काळांत निर्णायक ठरणार आहे. आणि त्या बाबतींत हिंदी गिरणीवाल्यांना बरीच मजल मारावयाची आहे. जुन्या, मोडक्या यंत्रांवर काम करणाऱ्या कामगारांची कार्यक्षमता कमी होते व त्यास त्यामुळें मजुरीहि पुरेशी मिळणें अशक्य होतें, ह्या गोष्टीहि विचारांत घेतल्या पाहिजेत. युद्धानंतर नवीन यंत्रसामुग्री बसवावी लागेल, त्यावेळीं हिंदी गिरणीवाल्यांनीं दीर्घ दृष्टीनें सर्व प्रश्नांचा विचार केला पाहिजे.

चंदनाचें तेल–म्हैसूरचें संबंध जगांत अग्रेसरत्व

संबंध जगांतील, चंदनाच्या एकूण झाडांपैकी ८५% झाडें एकट्या म्हैसूर संस्थानांत आहेत. पूर्वी हें सर्व लाकूड परदेशी निर्गत होई व तेथें त्यापासून तेल काढण्यांत येई. गेल्या महायुद्धाचे वेळीं चंदनी लाकडाची निर्गत बंद पडली, त्या संधीचा फायदा घेऊन म्हैसूर सरकारनें आधुनिक शास्त्रीय पद्धतीनें चंदनी तेल काढण्याचा उपक्रम सुरू केला. म्हैसूरमधील चंदनी तेलाच्या कारखान्याइतका मोठा कारखाना जगांत दुसरा कोठेंहि नाहीं. चंदनी तेलाच्या एकूण उत्पादनापैकी ७५% उत्पादन म्हैसूर सरकारच्या कारखान्यांत होतें. कांहीं खासगी कारखानेहि तेल काढतात. जाचक जकातींपासून बचाव व्हावा म्हणून न्यूयॉर्क येथें म्हैसूर सरकार दरसाल ५० टन लाकडाचें तेल काढून घेऊन अमेरिकन पेठेंत विकतें. सबंद जगांत दरसाल सुमारें २,५०० ते ३,००० टन लाकडापासून तेल काढण्यांत येतें. प्रत्येक टनापासून सरासरीनें १०५ ते ११० पौंड तेल निघतें. एकूण उत्पादनाच्या ९०% तेल सुगंधी मालांत वापरण्यांत येतें आणि बाकीच्या तेलाचा उपयोग औषधी कामाकडे केला जातो.

सहशिक्षणाची बंदी यशस्वी ठरली

बारा वर्षांवरील मुलांमुलींसाठीं स्वतंत्र शिक्षणसंस्था असणें हितावह ठरल्यावरून विभक्त शिक्षणाची पद्धति रशियांत आणखी २८ शहरांत अंमलांत आणण्यांत आली आहे. त्यामुळें मुलांचें व मुलींचें वर्तन सुधारलें आहे, शिक्षकांचें क्षात्रगणावरील वजन वाढलें आहे व मुलें आणि मुली ह्यांचा एकमेकांबद्दलचा आदरही वाढला आहे. सहशिक्षण बंद केलें, ह्याचा अर्थ दोघांची शिक्षणाची पात्रता सम नाहीं, असा मात्र अर्थ नाहीं. चांगल्या वर्तणुकीसाठीं व व्यवस्थितपणासाठीं गुण देण्याची पद्धत रशियन शाळांत सुरू करण्यांत आलेली आहे. वडीलधाऱ्या माणसांस आदर दाखविणें, कांहीं ठराविक वयाखालील विद्यार्थ्यांनीं एकट्यांनीं सिनेमास न जाणें, वगैरे सुधारणा घडून आणलेल्या आहेत. रशियाच्या घटक प्रांतांत येत्या वर्षीं सुमारें ८० हजार शिक्षकांची तूट भासेल, ती भरून काढण्याचा प्रयत्न चालू आहे. शिक्षकांचा पगार व रहाणीचा दर्जा ह्यांत वाढ करण्यांत आली आहे.

हिंदी यांत्रिक हत्यारांच्या धंद्यास संरक्षण

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सतर्फे हिंदुस्तान सरकारकडे नुकतेंच एक पत्रक धाडण्यांत आलें आहे. या पत्रकांत, अशा तऱ्हेची मागणी करण्यांत आली आहे, कीं "युद्धसमाप्तीनंतर हिंदी यांत्रिक हत्यारांच्या धंद्यास संरक्षण मिळेल" असें सरकारनें आश्वासन द्यावें.

यांत्रिक हत्यारें म्हणजे यंत्रें करणारी यंत्रें होत. लेथ्स, भोंकें पाडण्याचीं यंत्रें इ. यंत्रांचा यांत्रिक हत्यारांत समावेश होतो. शांततेच्या काळांत उद्योगधंद्यांच्या वाढीसाठीं व युद्धकाळांत युद्धसामुग्रीच्या उत्पादनासाठीं यंत्रांची व पर्यायानें हीं यंत्रें करणाऱ्या यंत्रांची अत्यंत मोठी जरूर आहे. यांत्रिक हत्यारांशिवाय कोणत्याही मोठ्या राष्ट्रांचें भागणें शक्य नाहीं. पाश्चात्य देशांत हा धंदा अत्यंत पुढारलेला आहे. त्या मानानें हिंदी यांत्रिक हत्यारांचा धंदा अजून बाल्यावस्थेंत आहे.

हिंदुस्थानांत हल्लीं लेथ्स, प्लेनिंग, ड्रिलिंग व शेपिंग मशीन्स व पॉवर प्रेसेस तयार होतात. आणखी कांहीं प्रकारची यंत्रेंही तयार करण्याचें घाटत आहे. ह्या धंद्यावर हल्लीं सरकारी नियंत्रण आहे. यामुळें कारखानदारांस शिलकी यंत्रें तयार करून ठेवणें शक्य झालेलें नाहीं. शिवाय युद्धकाळांत हा धंदा सुरू केल्यानें त्यांत बरेंच भांडवल गुंतवणें अपरिहार्य झालें आहे.

युद्धानंतर जर हिंदुस्थानची औद्योगिक वाढ व्हावयाची असेल तर या धंद्याची जोपासना होणें आवश्यक आहे.

श्री. चिं. का.

शेअर अंडरराइट कसे करतात ?

कंपन्यांच्या भाग-विक्रीच्या जाहिरातींत "अमुक भाग अमुक कंपनीनें अथवा व्यक्तीनें अंडरराइट केले आहेत" अशा अर्थाचा मजकूर पुष्कळ वेळां आपण वाचतों. जे भाग लोकांत खपले जाणार नाहींत, ते सर्व किंवा त्यापैकीं कांहीं ठराविक भाग घेण्यास जो तयार असतो, त्यास अंडररायटिंग म्हणतात. अंडरराइट करणारी कंपनी किंवा व्यक्ति आपल्यावरील जबाबदारी कमी करण्याच्या दृष्टीनें, इतरांशीं असेच अंडररायटिंगचे करार करते. समजा, एका फर्मनें एका कंपनीनें विक्रीस काढलेले सर्व १,००,००० शेअर्स अंडरराइट केले आहेत, व ठराविक दिवशीं त्यासाठी डिपॉझिट ठेवण्याचें तिनें कबूल केलें आहे. हे शेअर्स उघडपणें विक्रीस निघण्यापूर्वी अंडरराइटर फर्म त्यापैकी शक्य तेवढे शेअर्स दुसऱ्यांकरवीं अंडरराइट करवून घेते व त्याचे पैसे गोळा करून कंपनींत भरते. समजा, अशा रीतीनें ६० हजार शेअर्सबाबत फर्मची जबाबदारी इतरांनीं उचलली, तर फक्त ४० हजार शेअर्सबाबत जबाबदारी फर्मवरती उरते. जोंपर्यंत शेअर्सची उघड विक्री चालू आहे, तोंपर्यंत अंडरराइट करणाऱ्या फर्मचे नांवें शेअर्स अॅलॉट केले जात नाहींत. सर्वच्या सर्व शेअर्स लोकांत खपले गेले, तर अंडरराइट करणाऱ्या फर्मची जबाबदारी आपोआपच संपते. परंतु वरील ४० हजार शेअर्सपैकी कांहीं शेअर्स न खपतां उरले तर बाकीचे शेअर्स अंडरराइट करणाऱ्या फर्मचे गळ्यांत पडतात. एकाद्या कंपनीच्या १,००,००० शेअर्सपैकीं ५०,००० शेअर्स अंडरराइट करण्यांत आले व ८०,००० शेअर्स खपले, तर अंडरराइट करणाऱ्या फर्मवरील प्रमाणबद्ध जबाबदारीस अनुसरून, तिनें निम्मे शेअर्स अंडरराइट केले आहेत ह्यासाठी उरलेल्या २०,००० शेअर्सपैकी १०,००० शेअर्स त्या फर्मला स्वतः घ्यावे लागतील. अंडरराइट करणारी फर्म शेअरविक्रीची स्वतः जाहिरात करते त्यासाठीं व इतर कामासाठीं तिला १% ते १०% पर्यंत कमिशन मिळूं शकतें. अर्थात्, अंडरराइट करणाऱ्या फर्मवर पडणारी जोखीम व बाजारांतील प्रचलित व्याजाचा दर ह्यांवर कमिशनचा दर अवलंबून असतो. चांगल्या कंपन्यांच्या शेअर्सवर १% ते २% कमिशन पुरेल व ५% च्या वर कमिशनचा दर साधारणतः जाणार नाहीं. कंपनीच्या आर्टिकल्समध्यें घालून दिलेल्या मर्यादेतच हा दर राहील, हें उघड आहे. फर्मला मिळणाऱ्या कमिशनच्या दरापेक्षां शक्य तेवढ्या कमी दरानें शेअर्स सब-अंडरराइट केले जातात, म्हणजे इतर व्यक्ती व फर्म ह्यांचेकडून ठराविक शेअर्सची हमी घेतली जाते. कधीं कधीं सब अंडररायटिंग कमिशनबरोबर ओव्हररायडिंग कमिशनहि अंडरराइट करणाऱ्या फर्मला दिलें जातें. कंपनीच्या अंडररायटिंगच्या एका व्यवहाराचें उदाहरण घेऊन, ह्या हिशेबाचा खुलासा चांगला होईल.

एका कंपनीनें प्रत्येकी १० रुपयांचे ५० हजार शेअर्स विक्रीस काढले व तिनें "क्ष" फर्मशीं ४% अंडररायटिंग व १% ओव्हररायडिंग कमिशनच्या अटीवर अंडररायटिंगचा करार केला. पुढें "क्ष" नें 'अ' ह्यांनीं २०,००० व 'ब' ह्यांनीं १०,००० शेअर्सचा सब अंडररायटिंगचा करार केला. कंपनीकडून "क्ष" ला २५,००० रुपये मिळतील, त्याची वाटणी खालीलप्रमाणें होईल:—

	शेअर्सची किंमत (रु.)	कमिशन (रु.)
"क्ष" नें अंडरराइट केलेले पैकीं सब अंडरराइट केलेले	५,००,०००	
'अ' २,००,०००		
'ब' १,००,०००		
	३,००,०००@१%	३,०००
	२,००,०००@४% व १%	१०,०००
		१३,०००
'अ'	२,००,००० @ ४%	८,०००
'ब'	१,००,००० @ ४%	४,०००
	५,००,०००	२५,०००

अंडररायटिंगचा व्यवहार, ही एक प्रकारची सोदतच असते. विक्रीस काढलेले सर्व शेअर्स खपले तर अंडररायटरला कमिशन मिळतें, परंतु शेअर्स गळ्यांत पडत नाहींत. सर्व शेअर्स खपले नाहींत, तर करारांत ठरल्याप्रमाणें शेअर्स अंडररायटरला स्वतः घ्यावेच लागतात. शेअरविक्रीवर देण्यांत येणारें कमिशन हें वेगळ्या स्वरूपाचें असतें. ठराविक भाग खपवले तर ठराविक कमिशन मिळावयाचें असा हा व्यवहार असतो. अंडररायटिंगचा व्यवहार करणारी कंपनी, फर्म अथवा व्यक्ती हिची न खपलेले भाग स्वतः घेण्याइतकी आर्थिक पात्रता असणें आवश्यक आहे. अशी त्यांची पात्रता असल्याबद्दल डायरेक्टरांनीं आपली खात्री करून घेणें जरूर असतें. शेअर्सप्रमाणें सरकारी व निमसरकारी रोखेहि अंडरराइट करण्याची पद्धति आहे. ऑगस्ट १९४४ मध्यें मुंबई, मद्रास प्रभृति सहा प्रांतिक सरकारांची कर्जे विक्रीस निघालीं, तीं जाहीर केलेल्या मुदतींत न खपल्यामुळें अंडररायटर्सना कांहीं रकमेचीं कर्जे स्वतः घ्यावीं लागलीं, हें प्रसिद्धच आहे. सरकारी व निमसरकारी रोख्यांचे बाबतींत अंडररायटिंगचा दर अल्प असणार हें उघड आहे. अर्थात् रोख्यांवरील व्याजाचा दर व परिस्थिति ह्यावर कर्जास मागणी येणार हें लक्षांत ठेवलें पाहिजे. सुरक्षितपणाच केवळ उपयोगी नाहीं, कर्जावर पडणारें व्याज ही बाबहि महत्त्वाची आहे, आणि जनतेस कर्जरोखे आकर्षक वाटले नाहींत, तर अंडररायटर्सना पुढें येऊन स्वतः कर्जासाठीं अर्थ द्यावे लागतील, हें स्पष्ट आहे. रोखे अंडरराइट करणारा, आपली जबाबदारी कमी करण्यासाठी ह्या रोख्यांच्या खपाची अंशतः जबाबदारी उचलणारांत शक्य तेवढे रोखे वाटून देतो.

प्रदर्शन

दिपवाळीनंतर रांगोळी व चित्रा हीं दोन प्रदर्शनें दरसाल होत असतात. त्यांतच चालू साली हाताच्या चित्रांच्या प्रदर्शनाची नवीन भर पडली. हें प्रदर्शन पुणें येथील फर्ग्युसन आर्ट क्लबनें सुरू केलें असून पहाणारांची गर्दी होत आहे. याच्यामध्यें उषास्वप्न, कृष्णजन्म, तपोभंग, वेणूनाद वगैरे चित्रें असून त्यांची हालचाल प्रसंगास योग्य अशा रीतीनें होत असते. प्रदर्शनाची व्यवस्था आर्ट क्लबचे श्री. मित्र हे जातीनें ठेवीत असून डिसेंबर अखेरपर्यंत तें चालू राहणार आहे.

सहकारी खरेदी विक्री-सोसायट्या यशस्वी कशा होतील ?

सहकारी मनोवृत्तीची आवश्यकता

आपणाकडे खरेदी विक्री सोसायट्यांचा प्रसार अद्यापि व्हावा तसा झाला नाहीं. सहकारी खरेदी-विक्री सोसायट्या चालविण्यास लोकांचें सहकार्यच मनापासून मिळत नाहीं असा अनुभव येतो. बहुधा शेतकऱ्याचे शेतांत पीक यावयास सुरवात झाल्याबरोबरच त्या खेड्यांतील अडत्यामार्फत नजीकच्या शहरांतील व्यापारी आपल्या कुटांना खर्चासाठी कांहीं रक्कम व धान्य ठेवण्यास पोतीं पुरवून आपलीं गिऱ्हाइकें बांधून टाकतो व मग सहजच त्या शेतकऱ्यास आपला सर्व माल त्या व्यापाऱ्यास विकणें क्रमप्राप्त होतें. पीक आल्याबरोबर पडेल त्या भावांत तें विकून टाकल्यामुळें चढत्या भावाचा फायदाही त्यास मिळत नाहीं. माल थोडा असल्यामुळें त्या मालाची प्रतही त्यास लावतां येत नाहीं व अर्थातच हा सर्व फायदा त्या व्यापाऱ्यासच मिळतो.

सेल व परचेस सोसायट्यांत मालाची प्रतवारी लावणें, योग्य भाव येईपर्यंत माल शिल्लक ठेवणें व जरूर लागल्यास त्याच मालतारणावर सभासदाला कर्ज देऊन त्याची सर्वांची ओढ तात्पुरती कमी करणें इ. सोई केल्या असतांना सुद्धां सेल व परचेस सोसायटीमार्फत व्यवहार करण्याची गोडी अद्याप शेतकऱ्यांस लागलेली दिसत नाहीं. याचा अर्थ, अशा तऱ्हेनें माल विकणें शेतकऱ्याला गैरसोईचें तरी वाटत असावें अगर सोसायट्यांमार्फत माल विकल्यामुळें होणारा फायदा त्यांच्या लक्षांत तरी येत नसावा.

वास्तविक आपल्याकडील शेतकऱ्यांत जमा-खर्चाचा हिशेब करून त्याप्रमाणें व्यवहार करण्याची अगोदर पद्धतच कमी. सर्व साधारण येईल ती जमा व होईल तो खर्च असाच त्यांचा व्यवहार असतो, अशामुळें त्यांतल्यात्यांत माहितगार इसमच त्यांचा सर्वसाधारण पुढारी बनतो व त्याच्या सल्ल्यानें प्रत्येक गोष्ट चालते. हे पुढारी साहजीकच आपल्या वजनाचा फायदा करून घेण्याच्या मार्गाला लागतात व कोणतेंही कार्य करावयाचें झाल्यास यांच्या सहाय्याशिवाय होतच नाहीं. हाच अनुभव 'क्रेडिट' सोसायट्यां आपणाकडे स्थापन करतेवेळीं आला.

याशिवाय अशा सोसायट्या चालवण्यास विश्वासू व कर्तबगार नोकरवर्गाची अत्यंत आवश्यकता असते. पगार कामाच्या मानानें कमी, मोहाच्या जागांस भरपूर वाव, अशी परिस्थिति झाल्यावर त्यांतून तावून सुलाखून निघालेल्या नोकरवर्गासही आणखी बऱ्याच आपत्तींना तोंड द्यावयाचें असतें. सोसायटींत भांडणें व तट असल्यास नोकरवर्गाच्या कामाचें चीज होतेंच असें नाहीं. व्यापारांतील माहितगार लोक स्वतः धंदा करण्याची शक्यता असल्यामुळें या भानगडींत सहसा पडावयास तयार असत नाहींत. पडल्यास त्यांचा उपयोग नेहमींच सोसायटीस इष्ट होईल असें सांगतां येत नाहीं.

तात्पर्य, सोसायट्यांचा प्रसार करतेवेळींच त्याबरोबर लोकांमध्यें सहकारी तत्त्वाचा प्रसार करून व्यापार व उद्योगधंद्याची अद्यावत् माहिती घेतलेला विश्वासू व कार्यक्षम नोकरवर्गही निर्माण करण्याची आवश्यकता अद्यापीहि तीव्रतेनें जाणवत आहे.

एच. व्ही. सहस्रबुद्धे

* *

पूना

गेस्ट

हाऊस

टेलिफोन नं. ७७९

संस्थापक :

कै. नानासाहेब सरपोतदार

* *

पैसा व ज्ञान देणारीं पुस्तकें !

- श्रीमंत कसें व्हावें ? संपत्तीचे सुंदर मार्ग दाखवून हजारों रु. मिळवून देतें. वाचून लक्षाधीश व्हाल ! किं. १॥ रु. काम आणि कामिनी. काम शास्त्रावरील अपूर्व ग्रंथ ! किं. १॥ रु. मृत्युलोकचा प्रवास ! मरणोत्तर आत्म्याच्या अद्भुत हालचालींचें कथानक ! किं. १ रु. लिहा. विपट आणि मंडळी, कराड जि. सातारा.

पुण्यांतील

आदर्श निवासस्थान व भोजनालय

छाया लॉजिंग व बोर्डिंग हाऊस

बुधवार चौक, पुणें २.

—राष्ट्रीय काटकसर—

युद्धकार्याची गरज लक्षांत घेऊन डबे वा कागद यांची बचत करणें भाग आहे. ही पॅकिंग-बाबतची अडचण लक्षांत घेऊन—

—गोल्डन कोको—

सुटा मिळण्याची सोय सर्व प्रमुख व्यापाऱ्यांकडे करण्यांत येत आहे. सुटा कोको घेण्यानें पैशाचीही बचत होते. मात्र आपणांस गोल्डन कोकोच मिळत आहे अशी खात्री करून घ्या. नांव लक्षांत ठेवा.

साठे बंधू, "गोल्डन कोको"

—सर्वत्र मिळतो—

साठे कोको व चॉकोलेट कारखाना, पुणें १.

हें पत्र पुणें, पेठ सांवुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनी छापिलें व ८८ शनिवार वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' सांवुर्डा, घ. नं. ९२४।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
(टपाल हंशील माफ)
किरकोळ अंकास
दोन आणे.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष १० पुणें, बुधवार तारीख २९ नोव्हेंबर, १९४४ अंक ४७

महाराष्ट्रीय उत्पादन, कारखानदारी व व्यापार यांच्या संघटनेसाठी व संवर्धनासाठी प्रयत्न करणारी प्रमुख संस्था

महाराष्ट्र कारखानदार संघ

संघाचीं कांहीं प्रमुख कार्यें

(१) युद्धकालीन नियंत्रणें, तत्संबंधींचे परवाने आणि रिटर्नस्, रजिस्ट्रार ऑफ कंपनीजकडे वेळोवेळीं पाठविण्याची रिटर्नस, फॅक्टरी ॲक्टाखालील तरतुदी, प्राप्तीवरील कर आणि जकाती, वाहतुकीच्या सोयी व लायसेन्सेस आणि ट्रेड-मार्कस व पेटंट्स यांचें रजिस्ट्रेशन इत्यादि अनेक बाबतींतील कायद्याचीं कामें संघाचे तज्ज्ञ प्रतिनिधी आपल्यासाठीं करूं शकतील.

(२) मध्यवर्ति वा प्रांतिक सरकाराच्या दरबारीं आपली कांहीं कामें असल्यास संघ त्याचा योग्य तो पुरस्कार व शक्य ती खटपट करूं शकेल.

(३) संघाच्या सदस्याच्या सहकार्यानें भागूं शकणाऱ्या आपल्या गरजा, देवघेवी, मालाचा उठाव व विक्री, भांडवलाचा पुरवठा आणि व्यापारी एजन्सीज इत्यादि गोष्टी परस्परांत सुलभ देण्याच्या कामीं संघ जरूर ती मध्यस्थी करूं शकेल.

(४) संघ फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स ॲण्ड इंडस्ट्रीज, न्यू दिल्ली, या मध्यवर्ति सरकारमान्य संस्थेचा आणि ऑल इंडिया मॅन्युफॅक्चरर्स ऑर्गनायझेशन, मुंबई, वगैरे प्रबळ व्यापारी संस्थांचा सभासद आहे.

(५) संघाच्या व फेडरेशन वगैरे व्यापारी संस्थांच्या कामकाजाची आणि संघामार्फत सरकारी अधिकाऱ्यांशीं सभासदांसाठी केलेल्या पत्रव्यवहाराची अधिकृत माहिती व महाराष्ट्राच्या औद्योगीकरणास साहाय्यक असा मजकूर प्रसिद्ध करणारें मासिक 'संघटित महाराष्ट्र' आपणास संघामार्फत वाचावयास मिळूं शकेल.

(६) केवळ कारखानदारच नव्हे तर कारखान्यांत भांडवल गुंतविणारे, कच्च्या वा पक्क्या मालाची पैदास, पुरवठा व विक्री करणारे अडते, दुकानदार, एजंटस, कोठारी, शास्त्रीय तज्ज्ञ, सामान्य गिऱ्हाइकें इतकेंच नव्हें तर महाराष्ट्राच्या औद्योगिक व व्यापारविषयक भरभराटीविषयीं आस्था असलेले सर्वच लोक संघाचे सभासद होऊं शकतील.

वार्षिक वर्गणी फक्त दहा रुपये.

संघ कचेरी,
९५२, सदाशिव, पुणें २.
गोखले हॉलजवळ.

स. वा. दातार,
B. Sc., LL. B.
कार्यवाह.

देना बँक
देवकरण नानजी बँकींग कं. लिमिटेड

मुख्य कचेरी : मुंबई व २९ शाखा

देना बँकेच्या बचतीच्या योजना आपणांस भविष्यकाळासाठी शिलक टाकण्यास उपयोगी पडतील.

देना बँकेस अगदी स्वतःची बँक समजा.

अमरेळी आणि राजकोट येथें देना बँक लवकरच शाखा उघडणार आहे.

सांडू टोमॅटो कम्पाउन्ड
(ए. बी. सी. व्हिटॅमिनयुक्त)
स्फूर्तिदायक, पाचक व पौष्टिक. मूक न लागणें, पंडुरोग, रिकेट्स व अशक्तता यांवर अत्यंत उपयोगी.
ओरिजिनल ब्राम्ही तेलाचे कारखानदार.
द. कृ. सांडू ब्रदर्स, चेंबूर, लिमिटेड.
मॅन्यु. केमिस्टस व ड्रगिस्टस.
चेंबूर, मुंबई.

पुणें चीफ एजंट :
मे. श्रीदत्त एजन्सी
रविवार पेठ, पुणें २.

कोल्हापूर विक्रेते :
मे. भागवत आणि कं.
कांच लाइन

सातारा जिल्हा एजंट :
मे. जोशी आणि मंडळी
भवानी पेठ.

विविध माहिती

उडत्या बाँबचा थिएटरांच्या उत्पन्नावर परिणाम

उडत्या बाँब हल्ल्यामुळें कांहीं थिएटरांच्या उत्पन्नांत फार घट झाली आहे, असें जनरल थिएटर कॉर्पोरेशन ह्या ब्रिटिश कंपनीच्या अध्यक्षांनीं नुकतेंच सांगितलें.

बेल्जमचें सोनें जर्मनीनें लांबविलें, परंतु फ्रान्सनें परत दिलें

नॅशनल बँक ऑफ बेल्जमनें नोव्हेंबर, १९३९ सालीं ४ कोटि, १० लक्ष पौंड किंमतीचें सोनें सुरक्षिततेसाठी बँक ऑफ फ्रान्सच्या स्वाधीन केलें. १९४० सालच्या जर्मन स्वारीनंतर, तें सोनें अमेरिकेकडे पाठविण्याबद्दल बेल्जमच्या बँकेनें बँक ऑफ फ्रान्सला सूचना दिली असतांना, तिनें तें डाकारला धाडलें. ह्विशी सरकारच्या हुकुमान्वयें तें १९४१ सालीं बेल्जममध्यें परत करण्यांत आलें व तेथून त्या सोन्यानें बर्लिन शहर गांठलें. नॅशनल बँक ऑफ बेल्जमनें झालेल्या तक्रार करून अमेरिकेंतील कोर्टांत बँक ऑफ फ्रान्सविरुद्ध कारवाई केली आणि त्या सोन्याच्या किंमतीइतक्या अमेरिकेंतील फ्रेंच सोन्यावर जप्ती हुकूम मिळविला. बँक ऑफ फ्रान्सनें ह्याविरुद्ध अपील केलें, परंतु अखेर बँक ऑफ फ्रान्सनें नॅशनल बँक ऑफ बेल्जमची नुकसानभरपाई करण्याचें आतां मान्य करून हें प्रकरण मिटविलें.

कमर्शिअल बँक लि., कोल्हापूर

वरील बँकेचें वसूल भांडवल ५० हजार रुपये असून रिझर्व्ह व इतर फंड १३ हजार रुपयांचे आहेत. कोल्हापुरांत नव्या बँका स्थापन झाल्या असतांहि व बाहेरील बँकांच्या शाखा तेथें आल्या असतांहि गेल्या वर्षी कमर्शिअल बँकेचें भांडवल ३½ लक्ष रुपयांनीं वाढून तें १२½ लक्ष रुपये झालें. बँकेनें ६½ लक्ष रुपये कर्जाऊ दिलेले असून ५½ लक्ष रुपये रोख व इतर बँकांत तरते ठेवले आहेत. गेल्या साली बँकेस १८,८३१ रुपये निवळ नफा झाला, त्यापैकी ७½ हजार रुपये रिझर्व्ह व इतर फंडांत टाकण्यांत आलें. भागीदारांस ८·२% करमाफ डिव्हिडंड मिळालें.

बडोदें संस्थानाची औद्योगिक पुनर्घटना

युद्धानंतरच्या बडोदें संस्थानांतील औद्योगिक पुनर्घटनेसाठी श्री. महाराजसाहेबांनीं एका सल्लागार समितीची स्थापना केली आहे. या समितीचे सर होमी मेहता अध्यक्ष व सर सुलतान चिनाई, डॉ. मथाई, मि. तुलसीदास किलाचंद, मि. एम. सी. घीया आणि नायब दिवाण राजरत्न एस. व्ही. मुकर्जी हेहि एक सभासद आहेत. या समितीचे चीफ सेक्रेटरी म्हणून श्री. आर. एस. कानुगो यांना नेमण्यांत आलें आहे.

भाज्यांची वाढती लागवड

अधिक खाद्यपदार्थ पिकवण्याची मोहीम म्हैसूरमध्यें फार मोठ्या प्रमाणावर सुरू झाली असून २५००० एकर जमिनींत रताळ्यांची लागवड केली असून ६००० एकर टोमॅटो, २५०० एकर विलायती भाज्या व १३,००० एकर कांदा वगैरे भाजांच्या लागवडीखाली आहेत.

म्हैसूर लॅंप वर्क्सचा नफा

म्हैसूर लॅंप वर्क्सला गतवर्षी ४,००,३१६ रुपयांच्या मालविक्रीतून २,१५,९९५ रु. नफा उरला. नफ्याचें प्रमाण ५००% पेक्षाही अधिक पडतें.

प्रां. सहकारी बँकेच्या भांडवलांत वाढ

बँकेच्या ता. २३ सप्टेंबर रोजीं भरलेल्या विशेष सर्वसाधारण सभेनें ५० रुपये किंमतीचे आणखी २०,००० भाग काढून, बँकेचें भाग भांडवल १५ लक्ष रुपयांचें २५ लक्ष रुपये करण्याचें ठरविलें. त्यास अनुसरून आतां १४,००० भाग भागीदारांस दर भागामागें १० रुपये जास्त घेऊन म्हणजे प्रत्येक भागाचे ६० रुपये घेऊन देण्याचें बँकेच्या बोर्डानें ठरविलें आहे. ज्यांचे जवळ एक भाग आहे, अशांना एक नवीन भाग, व पुढील प्रत्येक दोन भागांस एक नवीन भाग ह्याप्रमाणें भाग घेण्याचा भागीदारांस अधिकार दिलेला आहे. भागांसाठी अर्ज व शेअरची रक्कम ३० डिसेंबर १९४४ पूर्वी बँकेकडे जाणें जरूर आहे. नवीन भाग डिव्हिडंडकरितां १ जानेवारी १९४५ पासून पात्र रहातील.

कोळशाचें उत्पादन वाढविण्याचे प्रयत्न

खाणीतून कोळसा खणून काढणारी अमेरिकन यंत्रसामुग्री हिंदुस्थानांत दाखल झाली आहे, त्यामुळें हिंदी कोळशाचें उत्पादन बरेंच सुधारेल, अशी अपेक्षा आहे. हीं यंत्रें चालविणारे अमेरिकन तज्ज्ञहि अर्थातच येथें उतरले आहेत. कोळशाचें मोठ्या प्रमाणावर उत्पादन केल्यास तो लवकर संपून जाईल ह्या भीतीनें खाणीवाले कोळसा फार काढण्यास उत्सुक नसतात. आजच्या नफ्यावर भारी दरानें कर यावा लागतो, ही गोष्टहि त्यांच्या ह्या धोरणाच्या मुळाशी आहे. खाणीवाल्यांना अधिक कोळसा काढण्यास उत्तेजन मिळावें, ह्या दृष्टीनें ठराविक उत्पादनावरील उत्पादनास बोनस देण्याचें सरकारनें ठरविलेलें आहे. ह्या बोनसवर एक्सेस प्रॉफिट टॅक्स नाहीं. खाणींतील मजुरांची कार्यक्षमता वाढावी, त्यांनीं खाणी सोडून दुसरीकडे कामास जाऊं नये, इत्यादि दृष्टीनींहि सरकारनें उपाययोजना चालविली आहे.

उडत्या बाम्बमुळें होणाऱ्या नुकसानीचा विमा

शत्रूच्या वैमानिक हल्ल्यामुळें व्यक्तींच्या होणाऱ्या नुकसानीचा विमा उतरणारी एक योजना ग्रेटब्रिटनमध्यें अमलांत आहे. उडत्या बाँबच्या हल्ल्यास प्रारंभ झाल्यापासून ह्या विम्याचें महत्त्व वाढलें आहे. विमेदारानें दरमहा दरशेंकडा १ शिलिंग हप्ता दिला म्हणजें विमा कंपनी विमेदारास मृत्यु आल्यास किंवा अंधत्व आल्यास किंवा हातपाय गमवावे लागल्यास १०० पौंड नुकसाभरपाई देते. प्रत्येक तिमाहीस द. शे. ५ शिलिंग हप्ता दिल्यास विमेदाराची जखम बरी होईपर्यंत त्यास ठराविक साप्ताहिक मदत मिळते. ऑगष्टमधील एका दिवशीं अशा प्रकारच्या ६० लक्ष पौंडांचे विमे उतरण्यांत आले. उडत्या बाँबचे भीतीचे काळीं रोज २० लक्ष पौंडांचे विमे सरासरीनें उतरले जात.

इटालियन युद्धकैद्यांची ब्रिटिश युद्धकार्यांस मदत

८० हजार इटालियन युद्धकैदी आतां इंग्लंडमध्यें आपण होऊन युद्धकार्यांस सहाय करीत आहेत. ह्या "सहकारी" युद्धकैद्यांचें लष्करी तत्त्वावर गट पाडण्यांत आले आहेत. सामान्य जनतेशीं भाषण करण्याची त्यांस परवानगी देण्यांत आलेली आहे व कोणी घरीं बोलाविल्यास ते आमंत्रण स्वीकारूं शकतात. कामासेरीज त्यांना रेल्वे, बसेस व ट्रामगाड्या ह्यांत बसून प्रवास करतां येत नाहीं.

अनुक्रमणिका

	पृष्ठ		पृष्ठ
१ विविध माहिती ...	३८६	५ सहकारी दिन ...	३९०
२ पतपेढ्यांच्या देखरेखीची व्यवस्था	३८७	६ कामगार टिकविणें व शिकविणें	३९०
३ सहकाराचे आद्य प्रवर्तक	३८८	७ सहकारी बँका ...	३९०
४ स्फुट विचार... ...	३८९	८ डरल प्रॉडक्टस कं. लि.	३९१
ग्रामसुधारणेसाठी शिक्षण-संस्था—ब्रिटिश कर्जफेड—उसाची जागा धान्य पेरणीस—बाँबे को. कार्टेली—सल्फेटचा नियोजित कारखाना.		९ नॉन क्रेडिट व्यवहार परिषद	३९४
		१० म्हैसूरमधील सरकारी कारखाने	३९४
		११ पिंपरे सोसायटीच्या सभासदांची आर्थिक पडाणी	३९५

अर्थ

बुधवार, ता. २९ नोव्हेंबर, १९४४

पतपेढ्यांच्या देखरेखीची व्यवस्था

सहकारी परिषदेचा ठराव

मुंबई येथें नुकत्याच भरलेल्या प्रांतिक सहकारी परिषदेनें चर्चिलेल्या प्रमुख प्रश्नांचा आशय आणि त्यांचें स्वरूप ह्यांचें विवेचन करणें आवश्यक आहे. त्यांमध्यें शेतीविषयक प्राथमिक पतपेढ्यांच्या देखरेखीच्या सध्याचे व्यवस्थेंत केल्या जावयाच्या महत्त्वाच्या फेरबदलास अग्रस्थान दिलें पाहिजे. ह्या व्यवस्थेस लागणारा खर्च अलीकडे तिच्यासाठी उपलब्ध असलेल्या उत्पन्नांतून भागणें कठिण झालें आहे. 'सोसायट्यांकडून येणारी वर्गणी, बँकांनीं दिलेली मदत आणि सरकारची ग्रँट ह्या उत्पन्नाच्या तीन बाबी देखरेखीच्या खर्चास अपुऱ्या ठरल्या आहेत, आणि सुपरव्हायजरांस योग्य पगार व भत्ता देणें अशक्य झालें आहे. तसेंच, शेतकरी कर्जनिवारणाच्या कायद्याच्या अंमलबजावणीचें क्षेत्र विस्तृत होणार असून त्या क्षेत्रांत येणाऱ्या सोसायटयांच्या सभासदांस कर्जे दिलीं जातील त्यांची देखरेख करण्याचें काम वाढणार आहे. त्याच्याबरोबर सोसायटयांच्या सभासदांस अल्प व्याजाच्या दरानें कर्जे मिळावीं अशी सरकारची इच्छा असून त्यांचेकडून घेण्यांत येणारी देखरेखीची फी माफ करणें आवश्यक झालें आहे. कर्जनिवारणाच्या कायद्याचे अन्वयें सोसायटयांच्या सभासदांचीं कर्जे हलकीं केलीं जातील तेव्हां ह्या संस्थांस नवीन मर्यादित कर्जाच्या व्यवहारांत तोटा आल्यास त्यांतला विशिष्ट अंश भरून काढण्याची जबाबदारी सरकार उचलणार आहे. ह्या सर्व गोष्टी लक्षांत घेतां शेती पतपेढ्यांच्या देखरेखीची व्यवस्था स्वतःच्या नियंत्रणासाठी घेऊन तिचा एकंदर खर्च स्वतःच भागवण्याची आवश्यकता सरकारास भासली. परिषदेच्या विषयनियामक समितीमध्यें ह्या प्रश्नाचा सांगोपांग विचार झाला आणि देखरेखीच्या वाढत्या खर्चाच्या आणि पतपेढ्यांच्या खर्चात बचत करण्याच्या आवश्यकतेच्या दृष्टीनें तिनें सरकारच्या नव्या योजनेस मान्यता दिली आणि परिषदेनें तिनें सुचवलेला ठराव मंजूर केला. ह्या योगानें देखरेखी विषयींचा सर्व अधिकार सरकारच्या हातीं गेला ह्याची पूर्ण जाणीव तिला होती.

देखरेखीच्या चालू व्यवस्थेंत तीन भाग आहेत. पहिला भाग सोसायट्यांच्या सुपरव्हायजिंग यूनिअन्स ह्यांचा आहे. त्या ह्यापुढें आहेत तशाच रहातील. त्याचप्रमाणें, सुपरव्हायजर्सच्या नेमणुका, बदल्या वगैरे करणें, त्यांसाठी होणाऱ्या खर्चाकरितां पैशाची तजवीज करणें इत्यादि बाबतींतले अधिकार एका प्रांतिक समितीच्या हातीं आहेत, तीहि कायम रहाणार आहे. ह्या दोहोंच्यामध्यें जिल्हा निहाय सुपरव्हायजिंग यूनिअन्सचीं बोर्डस आहेत त्यांचा देखरेखीशी असलेला संबंध मात्र आतां तुटणार आहे. परंतु सुपरव्हायजर्स जवळजवळ सरकारी नोकर होणार असल्यानें आणि आजहि त्यांचेवर ह्या संस्थांचा अधिकार चालत नसल्यानें हा बदल त्यांस विशेष बाधक होणार आहे असें नाहीं. देखरेखीचें काम प्रांतिक समितीच्या सल्ल्यानें पण सर्वस्वी सरकारच्या जबाबदारीनें व्हावयाचें असल्याकारणानें तें एकहाती चालणें इष्ट आहे. हा एक नवीन प्रयोग आहे आणि त्यांत बँका व जिल्हा बोर्डे ह्यांचा संबंध न रहातां तो एकहाती सरकारनें चालवल्यास त्याचा अनुभव उपयुक्त ठरण्यासारखा आहे. जिल्ह्यांतील बोर्डस ऑफ सुपरव्हायजिंग यूनिअन्सचें मुख्य कार्य त्यांचे हातून गेल्यामुळें ह्या संस्थांचें पुढें काय करावयाचें हा प्रश्न मात्र येथें उपस्थित झाला. त्यास उत्तर म्हणून परिषदेनें असें सुचवलें आहे कीं ह्या बोर्डांची पुनर्घटना करण्यांत यावी आणि त्यांमध्यें सुपर्व्हिजन कमिटी व शिक्षण कमिटी अशा दोन समित्या आहेत त्यांची एकच कमिटी बनवण्यांत यावी आणि तिनें देखरेखीशिवाय उरलेलीं सर्व कामें करावीं.

ह्या योजनेच्या अनुषंगानें परिषदेनें प्रांतिक इन्स्टिट्यूटच्या जिल्ह्यांतील कार्यासंबंधानें कांहीं फेरबदल ध्वनित केले आहेत. इन्स्टिट्यूटचें शिक्षण, प्रचार, लोकमताचा अंदाज इत्यादि प्रकारचें निश्चित कार्य आहे तें जिल्हानिहाय केलें जाण्यास पुनर्घटित जिल्हा बोर्डे उपयोगी पडतील. त्यांच्या पुनर्घटनेबरोबर इन्स्टिट्यूटचें कार्य, त्याचें उत्पन्न, त्याचा इतर सहकारी संस्थांशीं संबंध इत्यादि गोष्टींचा विचार व निर्णय करणें सोयीचें होणार आहे. हें लक्षांत घेऊन परिषदेनें एक समिती नेमली आहे आणि तिनें ह्या प्रश्नाची चर्चा करून योग्य दिसतील त्या शिफारसी इन्स्टिट्यूट व सरकार ह्यांच्या विचाराकरितां कराव्या असें ठरवलें आहे. आज इन्स्टिट्यूटकडे शिक्षण व प्रचार हींच दोन मुख्य कामें आहेत आणि तीं डिस्ट्रिक्ट बोर्ड ऑफ सुपर्व्हिजनच्या शिक्षण समितीमार्फत व्हावयाचीं आहेत. हें कार्य मोठ्या समाधानकारक रीतीनें होत आहे असें म्हणतां येत नाहीं. ह्याचें कारण त्या समितीची घटना आणि तिचा एका बाजूनें प्रांतिक इन्स्टिट्यूट व दुसऱ्या बाजूनें जिल्हा बोर्ड ह्यांच्याशीं असलेला दुहेरी संबंध हें आहे. ह्यापुढें देखरेखीचें काम सरकार एकहाती करणार आहे, तशाच रीतीनें इन्स्टिट्यूटला स्वतःचें काम जिल्हानिहाय स्वतंत्रपणानें करतां आलें पाहिजे. बिनसरकारी कार्यकर्त्यांची प्रांतिक मध्यवर्ती प्रातिनिधिक संस्था ह्या नात्यानें इन्स्टिट्यूटला जिल्ह्यांमध्यें कार्य करतां येईल अशी योजना केली जाणें अगत्याचें आहे. परिषदेनें नेमलेली समिती ह्या दृष्टीनें योग्य शिफारसी करील अशी आशा आहे. आज इन्स्टिट्यूटचें कार्यक्षेत्र संकुचित आहे आणि त्याचें उत्पन्न व अधिकार अत्यंत मर्यादित आहेत. ह्या परिस्थितींत योग्य दिशेनें सुधारणा झाली पाहिजे.

ब्रिटिश सहकाराचे आद्य प्रवर्तक

"रॉकडेल पायोनिअर्स" शतसंवत्सरी

इंग्लंडमधील लँकेशायर परगण्यांतील रॉकडेल ह्या नांवाच्या टहान गांवी सन १८४४ च्या ऑक्टोबर महिन्यांत सामान्य स्थितींतल्या, विशेषतः कामकरी वर्गातील लोकांच्या उपयोगी जिनसा विकण्याच्या उद्देशानें एक सहकारी सोसायटी रजिस्टर करण्यांत आली आणि तिचें दुकान २१ डिसेंबर १८४४ रोजीं उघडण्यांत आलें. ह्या छोटेखानी प्रयत्नाचा हळूहळू विस्तार होऊन आज ब्रिटिश सहकारी चळवळीची त्याच्या पायावर टोलेजंग इमारत उभी राहिली आहे. वरील सोसायटीचें नांव "रॉकडेल सोसायटी ऑफ एक्विटेबल पायोनिअर्स" असें होतें आणि त्याची यथार्थता पूर्णपणें सिद्ध झाली आहे. ह्या सोसायटीची स्थापना २८ समासदांनीं केली आणि त्यांमध्यें कारागीर, कामकरी, किरकोळ उद्मी इत्यादि लोकांचा भरणा होता. त्यांच्या दुकानाचें सेल्सें भांडवल प्रारंभीं केवळ १४ पौंड होतें आणि त्यांनीं विक्रीसाठी फक्त पांच जिन्नस ठेवले होते. सोसायटीचें २८ पौंडांचें भांडवल जमवण्यास पुष्कळ काळ लागला आणि तें लहान हप्त्यांनीं वसूल करण्यांत आलें. ह्या ब्रिटिश सहकारी चळवळीच्या आद्य प्रवर्तकांनीं केलेल्या उपक्रमास येत्या २१ डिसेंबरला शंभर वर्षें होत असल्यानें त्याचे निमित्तानें शतसांवत्सरिक उत्सव इंग्लंडमध्यें व इतरत्र साजरा होत आहे. हिंदुस्थानांतहि हा प्रसंग त्या दिवशीं सहकारी कार्यकर्त्यांनीं साजरा करणें उचित असून तसा आदेश मुंबई प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूटकडून देण्यांत येणार आहे. त्यास अनुसरून ठिकठिकाणीं सभा भरवल्या जातील अशी आशा आहे.

सहकारी कार्यक्षेत्राचा विस्तार

एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभीं इंग्लंडमध्यें "औद्योगिक क्रांति" होऊन "यांत्रिक युग" चालू झालें तेव्हां मूठभर लोकांच्या संपत्तींत झपाट्यानें वाढ होऊं लागली, पण कामकरी वर्गाची स्थिति अत्यंत हलाखीची झाली. ह्या लोकांची रहाणी सुधारण्याचे संघटनात्मक प्रयत्न करण्यांत आले, पण त्यांतले बहुतेक अयशस्वी ठरले. यांत्रिक युगांतील सामान्य जनतेचें दारिद्र्य, असहायता व दास्यत्व ह्यांस तोंड देण्याचे हेतूनें "रॉकडेल पायोनिअर्स" नीं स्वावलंबन, परस्पर-सहाय व व्यावहारिकपणा ह्यांचे पायावर नवीन घर्तीची आर्थिक संघटना करण्याचें ठरवलें. स्वतःपुढें उच्च नैतिक ध्येय ठेवून मालविक्रीच्या सोसायट्यांच्या दुकानांपासून त्यांनीं प्रारंभ केला. त्याचें अनुकरण इंग्लंडांत व स्कॉटलंडमध्यें होऊन ह्या सहकारी चळवळीचा प्रसार सर्व युरोपभर व इतर खंडांत झालेला आहे. ग्रेट ब्रिटनमध्यें "रॉकडेल पायोनिअर्स" च्या तत्त्वावर वीस हजार स्टोअर्स आज चालले आहेत आणि त्यांच्या समासदांची संख्या ९० लक्ष आहे. सहकारी कुटुंबियांची संख्या एकूण ब्रिटिश लोकसंख्येच्या एकतृतीयांशाइतकी असून सामान्य उपयोगाच्या जिनसांच्या व्यापाराचा एकदशांश व्यवहार सहकारी स्टोअर्सच्या मार्फत होत आहे आणि त्यांत प्रतिवर्षी ६०० कोटि रुपयांची उलाढाल होते. ब्रिटिश सहकारी संस्थांनीं स्वतःचें कार्यक्षेत्र वाढवून मालाचें उत्पादन, बँकिंग व विमा, इत्यादि व्यवहार मोठ्या प्रमाणावर चालवले आहेत आणि त्यांची संघटना लोकसत्तात्मक, स्वतंत्र व बळकट आहे. प्रचार आणि शिक्षणकार्य ह्यांच्या क्षेत्रांतहि त्यांची कामगिरी मोठी आहे.

ब्रिटिश सहकारी संघटनेच्या पाठीशीं "रॉकडेल पायोनिअर्स" चें ध्येयवादित्व, उत्साह, चिकाटी, लोकशाहीवरील दृढ विश्वास, परस्पर सहकारित्व व वैयक्तिक आणि सामुदायिक स्वातंत्र्य हीं आजहि अबाधित व प्रभावी आहेत. हिंदुस्थानांत परिस्थिति थोडी भिन्न असली, तरी दारिद्र्य, अज्ञान व विषमता हीं येथेंहि पसरलीं असून त्यांचें निराकरण करण्यासाठी झगडणें अगत्याचें आहे. ह्या कामीं सहकारितेची कास धरतांना "रॉकडेल पायोनिअर्स" च्या कर्तृत्वापासून येथील कार्यकर्त्यांस स्फूर्ति मिळण्यासारखी आहे. "पायोनिअर्स" च्या शतसांवत्सरिक उत्सवाचा प्रसंग साधून हिंदी सहकारी चळवळीस चालना देण्याचें कार्य आमच्या नेत्यांनीं करणें उचित आणि आवश्यक आहे.

वारणा व्हॅली सहकारी खरेदी विक्री संघ लि.

संघाचें शेअर भांडवल १५,९५० रु. असून संघाच्या सर्व शाखांत अहवालाचे सालीं ४४११ गाड्या माल विक्रीसाठी आला. कोणतीही शाखा तोट्यांत नव्हती. संघानें आपला नेहमीचा व्यापसंभाळून चहा, साखर व पेंढ पुरवठ्याचा व्यवहारही कांहीं शाखांतून सुरू केला आहे. सरकारी धान्य खरेदीचा नवीन व्यवहारही संघानें मिळवला आहे. गुदस्त सालचा २९ रु. नफा मिळवून अहवालाचे सालीं संघाला एकूण नफा ७,६८० रु. इतका झाला.

अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि. सांगली

समासदांची संख्या ६७७ असून भांडवलांत गतवर्षापेक्षां २१,९९० रु. ची वाढ झाली आहे. ठेवीमध्येंही १,३२,००० रु. ची वाढ झाली आहे. बँकेस चालू सालीं ८,८१३ रु. नफा झाला असून भागीदारांस ६½% प्रमाणें डिव्हिडंड देण्याचें ठरलें आहे. उरलेल्या नफ्याचा विनियोग रिझर्व्ह फंड, इमारत फंड वगैरे उपयुक्त तरतुदीसाठी करण्यांत आला आहे.

LIFE INSURANCE
FOR THE MILLIONS & MILLIONAIRES MADE EASY
BY THE
BOMBAY CO-OPERATIVE INSURANCE SOCIETY, LIMITED
Policies issued from Rs. 150/- to any amount. All profits go to Policy-holders.
Government Representation on the Board of Directors. Special Concession to Co-operative Institutions.
For further details enquire from
KULKARNI & Co.
CHIEF ORGANISERS,
Navasari Building, Horaby Road, Fort. BOMBAY.

स्फुट विचार

ग्रामसुधारणेसाठी शिक्षणसंस्था

ग्रामीण जीवनाच्या अभ्यासू निरीक्षणांत डॉ. भगत ह्यांस असें दिसून आलें कीं ग्रामोद्धाराच्या ज्या योजना सध्या आखल्या जात आहेत, त्या यशस्वी होण्यास शेतकरी वर्गातील तरुणांस योग्य शिक्षण देऊन खेडेगावांचे स्फूर्तिदायक व सहायक पुढारी बनवणें आवश्यक असून त्यासाठी खास शिक्षणसंस्था चालवल्या गेल्या पाहिजेत. खेडेगावी जनता आज अज्ञानांधकारांत व दारिद्र्यांत दिवस कंठीत आहे आणि तिच्यांत जागृति व उत्साह निर्माण झाल्यावांचून देशाच्या आर्थिक उन्नतीचा प्रश्न सुटावयाचा नाहीं. ह्याकरितां ग्रामसुधारणेच्या योजना अंमलांत आणल्या जात असतां त्या फलद्रूप होण्यास खास व युक्त शिक्षण घेतलेल्या तरुण व व्यवहारचतुर शेतकऱ्यांचें मार्गदर्शन खेडेगावी जनतेस मिळण्याची आवश्यकता डॉ. एम. जी. भगत, एम्. ए., पी. एच. डी. ह्यांनीं प्रसिद्ध केलेल्या एका पत्रकांत प्रतिपादिली आहे.

त्यांची अशी सूचना आहे कीं, प्रांतांत व संस्थानांत शेतकरी सेवामंडळें स्थापन केलीं जावीं आणि त्यांनीं वरीळ शिक्षणाचें काम चालवावें. प्राथमिक, उच्च दर्जाचें व संशोधनात्मक असे शिक्षणाचे तीन प्रकार असावे आणि सूचित सेवामंडळ पक्षातीत, बिनसरकारी व स्वतंत्र स्वरूपाचें असावें असें त्यांचें म्हणणें आहे. होईल तोंवर सहकारी संघटनेचा उपयोग ग्रामसुधारणेंत व्हावा असें त्यांचें मत आहे. त्यांनीं सुचवलेल्या सेवामंडळाचें कार्य असें महत्त्वाचें आहे तसेंच तें मोठ्या खर्चाचें आहे. ह्या कारणानें सरकारच्या भरपूर सहायावांचून तें चालू होणें आणि यशस्वी ठरणें कठिण आहे. मुंबई सरकारच्या युद्धोत्तर पुनर्घटनेच्या योजनेंत ग्रामीण सुधारणा कार्याचें संबंधांत शिक्षणाची तरतूद आहे. तसेंच, डॉ. भगत ह्यांनीं सुचवलेलें कार्य करण्यास लायक व तयार असें प्रांतिक सहकारी इंस्टिट्यूट ह्या प्रकारचा कार्यक्रम मर्यादित क्षेत्रांत आज चालवीतच आहे. सरकारास, तशी इच्छा असल्यास, ह्या अनुभवी व सुसंघटित संस्थेचा विस्तृत कार्यक्रमासाठी पूर्ण उपयोग करून घेतां येईल. निराळें सेवामंडळ स्थापण्याचे ऐवजीं इन्स्टिट्यूटला योग्य संधि व सहाय सरकारनें दिल्यास डॉ. भगत ह्यांच्या कल्पनेस मूर्त स्वरूप देणें अवघड नाहीं. तथापि, मुंबई सरकारचें धोरण असल्या योजनेस अनुकूल नाहीं असें मानण्यास जागा आहे, आणि स्वतंत्र व सुसज्ज असें ग्रामसेवामंडळ सर्वच प्रांतासाठी चालवण्याच्या मार्गांत दुर्लंघ्य अडचणी आहेत अशी वस्तुस्थिति आहे. तथापि, डॉ. भगत ह्यांनीं प्रस्तुत महत्त्वाच्या प्रश्नाकडे सरकार व कार्यकर्ते ह्यांचें लक्ष वेधून त्याच्या चर्चेस उपयुक्त चालना दिली आहे ह्यांत शंका नाहीं.

ब्रिटिश कर्जफेड अपायकारक होतां कामा नये

"ब्रिटिश कारखान्यांनीं हिंदुस्थानांत निर्मात करून हिंदी उद्योगधंद्यांची गळचेपी करणें केव्हांहि योग्य होणार नाहीं, परंतु हिंदी कारखानदार आयात जकातींच्या सहायानें ब्रिटिश माल हिंदुस्थानांत अजिबात येऊं देणार नसतील, तर ग्रेट ब्रिटननें हिंदुस्थानाचें देणें कसें फेडावें!" ब्रिटिश सायकल अँड मोटर-सायकल कारखानदारांच्या तक्रारीस अनुलक्षून वरील मार्ग्य एकॉनॉमिस्ट ह्या ब्रिटिश साप्ताहिकानें केलें आहे. ब्रिटिश सरकार आपलें हिंदुस्थानाचें देणें माल पाठवूनच फेडूं शकणार हें उघड आहे. युद्धोत्तर चढाओढीच्या काळांत हिंदी कारखान्यांचा टिकाव लागावयाचा असल्यास त्यांस संरक्षण वाजें लागेल आणि सहाजीकच त्या प्रमाणांत परदेशी मालाची आयात कमी होणार. ब्रिटिश मालाचा ओघ येथें चालू ठेवल्यानें कर्जफेडीची सोय होईल हें खरें, परंतु त्याचा हिंदी उद्योगधंद्यांवर होणारा परिणाम लक्षांत घेतला पाहिजे. कर्जफेडीमुळें हिंदी उद्योगधंद्यांची गळचेपी होणार असेल, तर कर्जाची फेड न झाली तरी चालेल, असें म्हणण्याची वेळ यावयाची! कोणत्या प्रकारच्या मालाच्या स्वरूपांत कर्जफेड करून घ्यावयाची, हें ठरविण्याचा अधिकार हिंदुस्थानास नसला, तर कर्जफेड अपायकारक होण्याचा संभव आहे.

उसाची जागा धान्य पेरणीस द्या

अधिक धान्याच्या उत्पादनास मदत व्हावी, ह्या हेतूनें बॉंबे बोर्ड ऑफ फूड क्रॉप्स ॲक्टचें ४ थें कलम पुणें, नाशीक, सोलापूर, अहमदनगर व ज्यांना ३ रें कलम आधीं लागण्यांत आलें होतें असे इतर जिल्हे ह्यांना लागू करण्यांत आलें आहे. ऊस लावणारांवरील नवीं बंधनें खालीलप्रमाणें आहेतः—(अ) सासर कंपन्याः—१ उसाइतक्याच क्षेत्रांत धान्य पेरलें पाहिजे. २ पूर्वीच्या अगर त्यापूर्वीच्या वर्षी जेवढ्या क्षेत्रांत उस लावला होता त्याच्या निम्म्या जागेंत ऊस लावला पाहिजे. ३ कंपन्यांनीं गूळ करतां कामा नये. (ब) उसाचे इतर बागाइतदारः—कालव्याचे क्षेत्रांतील अगर बाहेरील जागेंत ऊस लावणारांनीं, प्रत्येक एकर उसामागे दोन एकर धान्य पेरलें पाहिजे. जेथें पाण्यावर भुइमुगाची लागवड केली जाते, अशा ठिकाणीं प्रत्येक एकर उसामागें १½ एकरांत धान्य व ½ एकरांत भुइमूग पेरला पाहिजे.

बॉंबे को. ऑपरेटर

वरील त्रैमासिकाचा २८ व्या वर्षाचा दुसरा अंक प्रसिद्ध झाला आहे. त्यांत इंटर नॅशनल लेबर ऑफिसनें प्रसिद्ध केलेल्या "सहकारी संस्था व युद्धोत्तर आर्थिक पुनर्घटना" ह्या पुस्तकाचा श्री. वेकुंठराय मेहता यांनीं परिचय करून दिला आहे. न्याय्य व समतोल अशी समाज रचना सहकारी संघटनाच घडवून आणूं शकेल, असा व्यापक दृष्टीनें विचार करणारांचा सर्वांचाच विश्वास आहे आणि हिंदुस्थानांत सहकाराचें महत्त्व विशेष आहे, ह्या दृष्टीनें वरील परिचय मार्गदर्शक आहे. मुंबई प्रांताच्या सहकारी कायद्यांतील कांहीं कलमांच्या अर्थाची छाननी श्री. गजेंद्रगडकर ह्यांनीं आपल्या लेखांत केली आहे. मुंबई प्रांतांतील खोती व तालुकदारी पद्धतीची तपशीलवार माहिती श्री. वाय. एस. महाजन ह्यांच्या लेखांत आली आहे. संपादकीय स्फुटांत नेहमीप्रमाणें चालू महत्त्वाच्या सहकारी घडामोडींचा परामर्श घेऊन त्यावर अधिकारवाणीनें मतें व्यक्त केलेलीं आहेत.

सल्फेटचा नियोजित कारखाना सरकारी मालकीचा राहणार

हिंदुस्थानांत दरसाल किमान ३½ लक्ष टन कृत्रिम खतांचें उत्पादन सुरू करणें आवश्यक आहे, असें हिंदुस्थान सरकारनें ठरविलें आहे. त्यासंबंधांत सल्ला देण्यासाठी नेमण्यांत आलेल्या तज्ञ मंडळाच्या रिपोर्टाचा विचार करण्याकरितां, व मंडळाच्या विचारविनिमयांत भाग घेण्यासाठी सरकारनें नेमलेले स्वागत मंडळ व प्रांतिक सरकारांचे प्रतिनिधी ह्यांची बैठक दिल्ली येथें नुकतीच

साठी. ३½ लक्ष टनांचें उत्पादन करणारा एकच मोठा कारखाना काढावा, असें बैठकींत सर्वसाधारण मत पडलें. सरकारनें दोन कारखाने काढण्याचें ठरविल्यास, एक हिंदुस्थानच्या उत्तर विभागांत व एक दक्षिण विभागांत असावा, असा विचाराचा कल दिसला. कृत्रिम खतांच्या उत्पादनास सल्फेट ऑफ अमोनियापासून प्रारंभ करावा, हाच दल दुमत नव्हतें. हें उत्पादन कोणत्या पद्धतीनें करावें, हें तज्ञ मंडळानें दाखवून दिलेलेंच आहे. नवीन काढण्यांत यावयाचा कारखाना सरकारी मालकीचा व सरकारी नियंत्रणाखालीं रहावयाचा आहे, असें बैठकींत सरकारतर्फे सांगण्यांत आलें.

सहकारी दिन

महाराष्ट्रांत ठिकठिकाणीं सहकारी दिन उत्साहानें साजरा करण्यांत आला, त्याची माहिती आमचेकडे आली आहे. माळशिरस को. सु. यूनियननें ता. २९-४-४४ ते ४-११-४४ अखेर सहकारी सप्ताह पाळला. अकलूज, सुदूस, माळशिरस, नातेपुतें, महाळुंग, तिरवंडी, इत्यादि गांवीं सभा भरविण्यांत आल्या. नगर येथें सें. को. बँकेचे दिवाणखान्यांत सहकारी दिनानिमित्त सभा भरविण्यांत आली होती. प. खानदेश डि. बोर्ड ऑफ सुपरवायझिंग यूनियन्सनें धुळें म्युनिसिपॅलिटीच्या दिवाणखान्यांत सभा घेतली होती. वाशीं सें. को. बँकेनें साने मेमोरिअल हॉलमध्यें सहकारी दिन साजरा केला. बँकेच्या इमारतीवर सप्तरंगी निशाण लावलें होतें. माढा को. सु. यूनियननें जगदंबा को. के. सोसायटीचे कचेरींत सभा भरविली. भिवंडी को. सु. यूनियनचे ऑफिसांतील सहकारी दिनाचे वेळीं रॉकडेल पायोनियर्सच्या उपक्रमाची माहिती सांगण्यांत आली. नाशिक जिल्ह्यांतील आंडगांव येथें सहकारी दिन पार पडला. वाई ता. को. यूनियननें वाई येथें यूनियनच्या कचेरींत सभा भरवून दिवस साजरा केला. कराड अर्बन को. बँकेंत दि. ब. काजी ह्यांचें भाषण झालें. कार्यकर्त्यांनीं आपलेपणानें सभारंभाची माहिती पाठविली, त्याबद्दल आम्हीं त्यांचे आभारी आहों.

पूना गेस्ट हाऊस

संस्थापक :

के. नानासाहेब सरपोतदार

टेलिफोन नं. ७७९

महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्यांचे व्यापारी

गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें

कामगार टिकविण्याचें व शिकविण्याचें महत्त्व

छापखानदारांचें यश त्यानें आपले जुने कामगार टिकविण्यावर, नवे कामगार शिकवून तयार करण्यावर व जुन्या कामगारांस नव्या गोष्टी शिकविण्यावर पुष्कळ अंशीं अवलंबून असतें. पुरेसे कामगार नसतील तर जादा वेळ काम करून घ्यावें लागतें व तें समाधानकारक होत नाहीं. विशेषतः सध्यांच्या युद्धपरिस्थितींत नवी यंत्रसामुग्री विकत घेणें, नव्या पद्धति अंमलांत आणणें, इत्यादिपेक्षां कामगारवर्ग समाधानांत ठेवणें, ही गोष्ट फार महत्त्वाची आहे. इतर ठिकाणीं अधिक पगारावर कामासाठीं जाऊं पहाणारांना, कारखान्यांतील कामाची शाश्वति पटली तर छापखान्याच्या कार्यक्षमतेंत निश्चित भर पडेल. आपले कामगार टिकविण्यासाठीं, छापखानदारानें खालील गोष्टी कराव्यात, असें एका अमेरिकन मासिकानें सुचविलें आहे:-(१) त्यांचें काम टिकाऊ स्वरूपाचें आहे, हें त्यांस समजावून द्या. (२) त्यांच्या कामाचें महत्त्व त्यांस पटवून द्या. (३) योग्यतेप्रमाणें तात्काळ बढती द्या, त्याची मागणी येण्याची वाट पाहूं नका. (४) कामगारास काम करण्यास हुरूप वाटेल, अशी व्यवस्था करा व (५) प्रत्येक लायक माणसास त्याची चांगल्या कामावर नेमणूक होईल, असें आश्वासन द्या.

नवे कामगार तयार करण्यासाठीं खालील सूचना करण्यांत आलेल्या आहेत:-(१) काम कसें करावयाचें, हें तोंडानें सांगण्यापेक्षां प्रत्यक्ष दाखवा. (२) कंटाळा किंवा थकवा आल्यास बदलून दुसरें काम द्या. (३) किरकोळ कामें तात्काळ शिकवा. (४) कामगारांना सहज समजेल अशा रीतीनें म्हणजे मोळ्यानें, स्पष्ट व सोप्या भाषेंत त्यांच्याशीं बोला. (५) सुरवातीस सोपें व नंतर अवघड कामें द्या. (६) काम न झाल्यास सहानुभूतिपूर्वक दोष काढा; चांगल्या कामाची प्रशंसा करा.

एकाच प्रकारचें काम येणाऱ्या कामगारांना नेमून मनुष्यबळाच्या टंचाईच्या आजकालच्या कालांत चालत नाहीं; वेगवेगळीं कामें करतां येणाऱ्या कामगारांना प्राधान्य देणें युक्त आहे.

सांगली स्टेट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.

बँकेच्या शेअर भांडवलांत गतवर्षापेक्षा ७०० रु. वाढ झाली असून सोसायट्यांनीं चालवलेल्या स्वस्त धान्याचे दुकानाकरितां बँकेनें २,९०० रु. भांडवल पुरवलें आहे. मंगळवेढें येथील फुड-ग्रेन सिंडिकेटला बँकेनें १,७५,००० रु. कर्जाऊ देऊन संस्थानच्या धान्यखरेदीस मदत केली आहे. चालू सालीं बँकेस ६,३२२ रुपये निव्वळ नफा होऊन भागीदारांस वसूल झालेल्या भांडवलावर द. द. ५८१० प्रमाणें डिव्हिडंड देण्याचें ठरलें आहे.

श्री लक्ष्मी सेंट्रल को ऑपरेटिव्ह बँक लि., फलटण

बँकेचें शेअर भांडवल ६०,९०० रु. असून मागील सालापेक्षा चालू सालीं ठेवीमध्यें ३,२३,८३१ रु. ची वाढ झाली आहे. प्रतिवृत्ताचे सालीं बँकेस ६१५५-१-९ रु. नफा झाला असून ६½% प्रमाणें भागीदारांस डिव्हिडंड देण्याचें ठरलें आहे. उरलेल्या नफ्याचा विनियोग रिझर्व्ह, रीबेट, देणगी इ० कडे करण्यांत आला आहे.

रूरल प्रॉडक्ट्स कंपनी, लि.,

[९५२ सदाशिव, (मोखले हॉलजवळ) पुणे २]

यशस्वी प्रयोगांतून धंद्याची उभारणी

वायां जाणारीं फळें कारणीं लावण्याचें महत्त्व

महाराष्ट्रांत औद्योगिक उन्नतीचे जे निरनिराळे प्रयत्न होत आहेत, त्यांत महाराष्ट्रांत जास्त उत्पन्न होणाऱ्या अगर वायां जाणाऱ्या पदार्थांपासून टिकाऊ माल तयार करून त्यांतून पैसा निर्माण करणें हा अत्यंत महत्त्वाचा प्रयत्न आहे. महाराष्ट्रांत पावसाळ्याचे आरंभीं जांभळें, आंबे हे किती तरी वायां जातात. त्याचप्रमाणें श्रावणाचे महिन्यांत लिंबें, मार्गशीर्ष महिन्यांत संत्रीं वगैरेंही वायां जातात. तसेंच फाल्गुन आणि चैत्र महिन्यांत त्याचप्रमाणें कार्तिक, मार्गशीर्ष महिन्यांत टोमॅटोही बरेच वायां जातात. या पदार्थांत संरक्षक द्रव्यें असल्यानें संरक्षक अन्न म्हणून यांचा फार उपयोग होतो.

श्री. न. गं. आपटे यांचे यशस्वी प्रयोग

महाराष्ट्रांत इतकीं फळें होत असल्यानें व तीं वायांही जात असल्यानें त्यांपासून टिकाऊ पदार्थ करण्याचा मोठ्या प्रमाणावर प्रयत्न होणें इष्ट आहे. केवळ विलायती कंपन्यांच्या अनुकरणानें महाराष्ट्रांत उपयोग होण्याजोगा नाहीं. येथील मालापासून उपयुक्त पदार्थ तयार करण्यास कांहीं विशिष्ट पद्धतीनेंच प्रयत्न करावयास पाहिजेत. त्याचप्रमाणें या धंद्यांत लागणारी यंत्रसामग्रीही शक्य तों विलायती नसणें चांगलें. या हेतूनें रूरल प्रॉडक्टस कंपनीचे उत्पादक श्री. आपटे यांनीं प्रयोग केले व त्यांत यशही मिळविलें.

श्री. आपटे यांनीं या धंद्यास लागणारीं महत्त्वाचीं साधनें म्हणजे कॅपिंग मशीन, रस काढण्यास लागणारा चार लाटांचा चरक—या चरकानें रस व चोथा निरनिराळा होऊन निरनिराळ्या बाजूस पडतो-माल कढत स्थितींत भरण्यास लागणारें डबल जॅकेटचें भांडें त्याचप्रमाणें उष्णता देण्यास उपयुक्त असें स्टीम जॅकेट पॅन वगैरे यंत्रसामग्री स्वतः कल्पून व येथेंच करवून घेतली आहे.

यास्तेरीज संत्रीं, मोसंबीं, लिंबें यांच्या सालींत तेल असतें तें वाया जाऊं नये म्हणून त्यांतून ऊर्ध्वपातनपद्धतीनें तेल काढण्याचें यंत्रही तयार करवून घेतलें आहे. कांहीं पदार्थ झटकन् वाळवितां यावे यासाठी एक शेगडीच्या साहाय्यानें तापविता येईल अशी भट्टी (Dryer) तयार करवून घेतली आहे. त्याचप्रमाणें रस योग्य प्रकारें मिसळण्यासाठी होमोजिनायझरही तयार करण्यांत आला आहे. यास्तेरीज कमी उष्णतेनें रस आटविण्याचें यंत्र (Vacuum boiling pan), स्क्रूप्रेस वगैरे साधनें तयार होत आहेत. या योगें माल निर्माण करण्यांत सुलभता येणार आहे व त्या प्रमाणांत उत्पादनाची किंमत कमी कमी होत जाणार आहे. साखर करण्यास लागणारें सेन्ट्रिफ्यूगल यंत्रही तयार करून घेण्यांत येत आहे. ही यंत्रसामुग्री बाजारभावानें घेतल्यास यास सुमारें २० हजार रुपये पडतील. अशा रीतीनें स्वरोखरीच शेतांतील ऊस व फळें यांपासून पेय तयार करतां यावें अशी साधनसामग्री निर्माण करण्यांत येत आहे. अशा रीतीनें हा धंदा संपूर्णतः स्वदेशी केला आहे व त्याबरोबर या कारखान्यांत तयार होणारा माल हा जगांतील कोणत्याही उत्कृष्ट कारखान्यांत तयार होणाऱ्या मालाच्या तोडीचा निघत आहे हें ध्यानांत ठेवण्याजोगें आहे.

तयार होणारा विविध माल

(१) **टोमॅटोचे पदार्थ:**—यांत टोमॅटो केचप, टोमॅटो सॉस, टोमॅटो चटणी, टोमॅटो ज्यूस वगैरेंचा समावेश होतो. टोमॅटो केचप हा सप्लाय डिपार्टमेंटकडून पास होऊन त्याप्रमाणें पत्रही आलें आहे. त्याचप्रमाणें बाजारांतही वरील सर्व माल अनेकांना पसंत पडला आहे.

(२) **मँगोचटणी:**—हा पदार्थ रायवळ, हिरवा आंबा व गूळ अथवा साखर यांपासून तयार करतात. तोही माल बाजारांत पसंत पडला असून चालू आहे. टोमॅटो व आंबा यांचे पदार्थ लष्करांत मोठ्या प्रमाणांत वापरतात. त्याचप्रमाणें आपल्या वापरांत हे पदार्थ येण्यास हरकत नाहीं.

(३) **लिंबाचा रस, लाइमज्यूस, कार्डिअल लेमन (ड्रिंक):**—हे लिंबापासून तयार होणारे पदार्थही तयार करण्यांत येतात. हे पदार्थ विलायती मालाच्या तोडीचे आहेत.

(४) **ऑरेंज अथवा संत्रा ड्रिंक :**—हें पेय विलायती मालाच्या तोडीचें व बाजारांतील कोणत्याही देशी मालापेक्षा सरस असें आहे.

(५) **कोरॅम्बो :**—हें कोकम अथवा रातांबे यांचा रस काढून त्यांत फक्त साखर मिसळून तयार करण्यांत आलें आहे. हें पित्तशामक असून याची चवही जराशी तुरट (Vimto) असल्यानें ग्राहकांना फारच आवडतें.

(६) **जांभळाचा रस व विर्याची पूड :**—यांचा मधुमेहास फारच उपयोग होतो. हा रस उत्कृष्ट असल्याबद्दल डॉ. रा. ह. भडकमकर व त्याचप्रमाणें निखिल भारतीय आयुर्वेद महामंडळ, काशी, यांचे अभिप्राय आहेत. हा रस सुमारें सात वर्षे न आंबतां टिकण्याचा दाखला वैद्यपंचानन कवडेशास्त्री यांनीं स्वतःजवळ या बाटल्या ठेवून तपासून दिला आहे.

(७) **पाचक व पाचकचूर्ण :**—हे पदार्थ आल्याचा रस, लिंबाचा रस वगैरे मिश्रणानें व आयुर्वेदीय पद्धतीनें तयार करून विलायती पद्धतीची भरणी करून ठेवले आहेत.

या बाबतींतही उत्कृष्ट अभिप्राय मिळाले आहेत. पाचकचूर्ण हें आलें वाळवून पूड करून लिंबाचा रस घालून वाळवून सैंधव वगैरेपासून तयार केलें आहे. हेंही बरेंच रुचकर व औषधी आहे.

गत वर्षातील मालनिर्मितीचा आढावा.

मागील वर्षांत सुमारें ५२०० पौंड टोमॅटो केचप व ३५०० पौंड मँगोचटणी एवढे पदार्थ तयार केले. हायड्रेस्टिन्ह जसजसें लागलें तसतसें तयार करण्यांत आलें. वरील पदार्थ तयार करण्यास लागणाऱ्या खर्चाची व त्यांच्या विक्रीपासून होणाऱ्या उत्पन्नाची थोडीशी माहिती दिल्यास या धंद्यांत होणाऱ्या फायद्याची कल्पना येण्याजोगी आहे. ५२०० पौंड टोमॅटोचा रस तयार करण्यासाठी सुमारें २६०० रुपये खर्च झाला. या खर्चांत

बारामती येथें कारखाना नेण्यास लागणारे ३०० रुपयांचा समावेश झाला आहे. टोमॅटोचा रस यापासून सुमारें ८ आणे पौंड पडला. टोमॅटो अर्थातच २॥ आणे शेर याप्रमाणें घ्यावे लागले. आतां सध्या उरळी येथें शेत संडानें घेतलें आहे त्यामुळें टोमॅटो कमी भावांत पडेल. म्हणजे १ ते १। आणा शेरपर्यंत पडेल व त्या प्रमाणांत टोमॅटोच्या रसाची किंमत कमी पडेल. वरील टोमॅटोच्या रसाचा केचप करण्यास साधारणपणें २ आणे दर पौंडास खर्च येतो व बाटल्यांस १२ औंशी बाटल्या भरल्यास ६ आणे व २४ औंशी बाटल्या भरल्यास ४ आणेप्रमाणें खर्च येतो. अशा रीतीनें १० औंशी बाटल्या भरल्यास दर पौंडीं १० आणे व बाटल्यांस ६ आणे म्हणजे दर पौंडीं रु. १ प्रमाणें खर्च येतो. मालविक्रीचा सध्याचा किमान भाव ११॥ रुपये डझन म्हणजे ७॥ पौंडांस ११॥ रुपये असा आहे. म्हणजे सुमारें १ पौंडास १॥ रुपयाप्रमाणें भाव येतो. याच मालाचा कमाल भाव रुपये १३ आहे. २२ औंशी बाटल्या भरल्यास त्याचा डझनाचा खर्च सुमारें १४ रुपये आहे व त्याची विक्रीची किमान किंमत २० रुपये आहे व कमाल किंमत २७ रुपये आहे. या किंमती घाऊक व्यापाराच्या आहेत. लहान बाटलीची किरकोळ विक्रीची किंमत १॥ रुपया आहे व मोठ्या बाटलीची ३ रुपये आहे. मॅंगोचटणीचा हिशेब पुढीलप्रमाणें आहे. २ पौंडी बाटलीची किंमत अदमासें १। रुपया पडली आहे, व त्याच बाटलीची घाऊक किंमत डझनास २४ रुपयेप्रमाणें आहे. त्याच बाटलीची किमान किंमत प्रत्येक डझनास २१ रुपयेप्रमाणें आहे. अशा रीतीनें टोमॅटो केचप, मॅंगोचटणी व पाचक या सर्वांमध्यें रुपयास सुमारें ८ आणेप्रमाणें फायदा आहे.

सर्वसाधारणपणें या धंद्यांस ग्रॉस (ठोक) फायदा ५० टक्केपर्यंत आहे व इतर कायम खर्च वजा जातां निवळ नफा २० टक्के तरी राहील यांत संशय नाहीं. कच्चा माल आपले शेतावरील असल्यास हा फायदा २० टक्क्यांवरून २५ टक्क्यांपर्यंत जाईल व मालाचें उत्पादन सुमारें २५००० पौंड झाल्यावर कायम खर्च कमी होऊन निवळ नफा वाढेल.

कंपनीच्या भांडवलविषयक गरजा

अशा प्रकारें भक्कम पायावर या कंपनीची उभारणी करण्यासाठीं जास्त भांडवलाची उभारणी करण्याचें चालकमंडळानें ठरविलें आहे. वरील २,५०,००० पौंडांचें उत्पादन २।३ वर्षांत गांठण्यास निदान ५०,००० रुपये जादा भांडवल गुंतविणें आवश्यक आहे.

या ५०,००० रुपयांच्या जादा भांडवलांतील सुमारें निम्म्या भांडवलाचा उपयोग मुख्यतः कायम स्वरूपाची यंत्रसामग्री करवून घेण्यांत होणार आहे. त्यांत प्रामुख्यानें व्हॅक्युअम पॅन व त्यास लागणारीं पंप व एंजिन, जास्त लागणारी स्टीम जॅकेट पॅन, माल सांठविण्यास लागणारीं कांचेचीं भांडीं व भाड्यानें न मिळाल्यास इमारत यांचा समावेश होईल.

उरलेलें निम्में भांडवल चालू खर्च म्हणून लागेल. या भांडवलाची उलाढाल (Turnover) वर्षांतून तीनदां होणार असल्यानें २,५०,००० पैकीं सुमारें ८०,००० पौंड मालांतच चालू भांडवल गुंतून राहील व त्यास कच्चा माल कंपनीच्या शेतांतीलच असला तर सुमारें २५,००० रुपये पुरतील असें वाटतें. याप्रमाणें कार्यक्रम पुरा होण्यास सुमारें २ ते ३ वर्षे लागतील.

शेअर्सचें आणि खेळतें विद्यमान भांडवल व मालाचा अंदाज

या कंपनींत सध्या एकूण भांडवल २१,००० रुपयांचें गुंतलेलें आहे. त्यांपैकीं सुमारें ६,००० रुपये श्री. आपटे यांचे शेअर्सचे स्वरूपांत आहेत. सुमारें ११,००० रुपये कर्जाऊ घेतलेले आहेत व सुमारें चार हजार रुपये अन्य भागीदारांचे आहेत. या एकवीस हजारांत सुमारें अकरा हजार रुपयांचा कायम स्वरूपाचा माल आहे. सुमारें दोन हजार रुपये उरळी येथील शेतांत गुंतले आहेत, एक हजार रुपयांचा चालू माल आहे व उरलेले सात हजार रुपये मालाचे रूपांत आहेत. शिल्लक असलेला सर्व माल किमान बाजारभावानें विकल्यास टोमॅटो केचचे ३२ × १४० = ४४८० रुपये व मॅंगोचटणी किमान भावानें विकल्यास ३,२५० रुपये, लिंबाचें कॉंडियल किमान भावानें विकल्यास सुमारें १,५०० रुपये इतर पदार्थ जांभळाचा रस वगैरे याप्रमाणें विकल्यास सुमारें २,५०० रुपये येतील. म्हणजे एकूण अकरा ते बारा हजार रुपये येतील. परंतु हाच माल कमाल किंमतीनें विकल्यास ही रक्कम सुमारें चौदा हजारांपर्यंत जाईल. अशा रीतीनें अकरा ते बारा हजार रुपये कायम भांडवल व सुमारें सात ते आठ हजार रुपये खेळतें भांडवलावर सुमारें ७,००० रुपये ग्रॉस नफा होईल. यांत कायम स्वरूपाचा सुमारें ३,५०० रुपयांचा खर्च वजा घातल्यास सुमारें ३,५०० रुपये निव्वळ नफा राहूं शकेल. अकरा हजार रुपयांवरील व्याज ६६० रुपये वजा जातां व दहा हजार रुपयांवर रिझर्व्ह फंड वगैरे वजा करतां १५०० रुपये तरी भागीदारांस डिव्हिडंड म्हणून वाटतां येतील. म्हणजे सुमारें १५ टक्के नफा खात्रीनें वाटतां येईल. कंपनीचें स्वतःचें शेत, वाढतें उत्पादन वगैरे गोष्टींची भर पडल्यास हें पंधरा टक्क्यांचें प्रमाण २० टक्के होणें हें अगदीं क्रमप्राप्त आहे व तेवढें तरी कायम भांडवल गुंतविणारास देतां येईल असें या वर्षाच्या अनुभवानें म्हणण्यास हरकत नाहीं. यांत अनपेक्षित अशा कांहीं गोष्टी वजा करून निदान १२ टक्के फायदा शेअर्सवर देणें शक्य होईल.

आनुषंगिक उत्पादनांतून जादा फायद्याची शक्यता

कारखान्यांत तयार होणाऱ्या मालापासून कांहीं आनुषंगिक पदार्थ तयार होतात. त्यांत संत्रीं, मोसंबीं वगैरेंच्या सालींतील तेल, पाचकचूर्ण नं. १, नं. २, नं. ३ वगैरे होत. मोठ्या प्रमाणावर माल निर्माण केल्यावर यांचें प्रमाण वाढतें व त्यापासून पैसा निर्माण होतो. पाचकचूर्ण नं. १ हें पाचक तयार केल्यावर उरलेल्या पदार्थांपासून तयार करण्यांत येतें. त्याच्या पुड्या दर डझनास ८ आणेप्रमाणें विकतात. या पुड्या करण्यास २ आणे खर्च येतो व डझनास ६ आणे मिळतात. दर पौंडास नऊ पुड्यांप्रमाणें पडतात. म्हणजे १ पौंडास चार आणे मिळतात. आलें-लिंबाच्या रसाची निदान निम्मी किंमत यांतून निघेल. त्याचप्रमाणें पाचकचूर्ण नं. २ चेंही आहे.

सुमारें ५०,००० रुपये गुंतविल्यास ५० हजार रुपयांचें १२ टक्क्यांनीं व्याज रु. ६००० होईल. सध्याच्या कल्पनेप्रमाणें आनुषंगिक (By products) मालांतूनच यांतील बराचसा भाग निघेल. पाचकचूर्ण नं. १ व नं. २ हीं अदमासें ४,००० डझन प्रत्येकीं निघतील. त्याचप्रमाणें संत्र्याच्या सालींतील तेल १०,००० पौंड संत्राद्वारें केल्यास सुमारें ४० पौंड निघेल. या सर्वांची किंमत अदमासें ४००० रुपये होईल. त्याचप्रमाणें

ट्रामट्रोचे बियांतूनही कांहीं पैसा निघेल. मागील वर्षी टोमॅट्रोचे बियांपासून ६५० रुपये मिळाले आहेत.

वरील रक्कम ठेवी घेऊन उभारावी असें कंपनीच्या चालकांनीं ठरविलें आहे.

कंपनीची घटना.

ही कंपनी प्रायव्हेट लिमिटेड आहे. तिचें अधिकृत व विक्रीस काढलेलें भांडवल रु. ९५,००० असून तें प्रत्येकी रु. १०० च्या ९०० पांच टक्के प्रेफरन्स शेअर्समध्यें व प्रत्येकी रु. ५ च्या १,००० शेअर्समध्यें विभागलेलें आहे. त्यांपैकीं सुमारें १४ हजार रुपये दर्शनी किंमतीचे शेअर्स खपलेले आहेत.

कंपनीच्या विद्यमान शेअरहोल्डरांत श्री. न. गं. आपटे यांचे खेरीज श्री. चंद्रशेखर गोविंद आगाशे, श्री. धोंडो कृष्ण साठे, श्री. गणेश सदाशिव मराठे, ॲक्चुअरी, श्री. न. प. केळकर, श्री. आत्माराम रावजी भट, श्री. विश्वनाथ हरि देशमुख, ग्वाल्हेरचे डॉ. यशवंत गोविंद आपटेप्रभृति गृहस्थ आहेत.

कंपनीची व्यवस्था श्री. न.गं. आपटे, बी.एजी., एम. एस.सी., यांचेकडे आहे.

कंपनी मुदतीच्या ठेवी स्वीकारणार आहे. सर्वसाधारणपणें ठेवीची किमान रक्कम एक हजार रुपये व कमाल रक्कम दोन हजार रुपये ठरविण्यांत आली आहे. तीन वर्षें मुदतीच्या ठेवीवर द. द. ४॥ टक्के, चार वर्षें मुदतीच्या ठेवीवर ५ टक्के व पांच वर्षें मुदतीच्या ठेवीवर ५॥ टक्के व्याज दर सहा महिन्यांनीं (पाठविण्याचा खर्च ठेवीदाराला सोसावा लागेल). ठेवीदाराच्या इच्छेनुरूप घरपोंच देण्यांत येईल.सोईसाठी,कांहीं थोड्या रकमेच्या ठेवी एक वर्षाच्या मुदतीच्या चार टक्क्यांनीं कंपनी घेणार आहे.

शेअर-होल्डरांच्या ठेवीवर अर्धा टक्का व्याज जास्त देण्यांत येईल.

ठेवीची रक्कम The Rural Products Company Ltd. या नांवें क्रॉस्ड ऑर्डर चेकनें पाठवावी अगर कंपनीच्या कार्यालयांत रोख भरावी.

मोठ्या कंपनीची बचताही मोठी

म्यूच्युअल लाइफ इन्शुअरन्स कंपनी, न्यूयॉर्क सिटी, ह्या कंपनीच्या १९४१ च्या रिपोर्टांत ४८ पृष्ठें होतीं; वेष्टन हें वेगळें. १९४३ च्या रिपोर्टांत वेष्टनासकट फक्त १२ पृष्ठें आहेत. १९४१ च्या रिपोर्टाचा आकार ५½" × ७½" असा होता, १९४३ चा रिपोर्ट ९" × ३⅝" ह्या आकाराचा आहे. आंतील समासाची रुंदी १ इंचाची तीन अष्टमांश इंचावर आली आहे. रिपोर्टांत आवश्यक तेवढ्याच गोष्टींचा उल्लेख केलेला असून, भागिदारांना कांहीं तपशील हवा असल्यास त्यांनीं कंपनीकडे लिहून तो मागवावा, अशी त्यांस सूचना करण्यांत आली आहे. म्यूच्युअल कंपनीस दरसाल १० लक्ष रिपोर्ट छापावे लागतात. १९४१ च्या रिपोर्टास १,५१,७८३ पौंड कागद लागला. १९४३ च्या रिपोर्टाची छपाई त्याच्या एक-पंचमांश म्हणजे ३१,०७५ पौंड कागदांत मागली. छपाईच्या खर्चांत ११,५०८ डॉलर्सची बचत झाली.

'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

डोक्यांतील उवा १ तासांत मारण्याचा आश्चर्यकारक शोध

लायसॉफ

बाटली किंमत १ रु. ट. ख. निराळा

दोन वेळां उपयोग

दि मागोरा केमिकल कं. लि.

— हिराबाग, पुणें २ —

व्ही. पी. बेडेकर आणि सन्स लि.
मुंबई.
मसाल्याचे व्यापारी
पुणें एजंट:—
द. ना. हेजीब

प्रगतिपथावरील नवा

मे ला चा — द ग ड

सन १९४३ अखेर

नव्या कामांत	११० टक्के वाढ
चालू कामांत	१०० टक्के वाढ
आयुर्विमानिधींत	८० टक्के वाढ

— आपला विमा किंवा एजन्सी आजच घ्या —

दि ओंध म्यूच्युअल लाइफ ॲश्युरन्स सोसायटी लि., पुणें.

आर. जी. साठे, सुपरिंटेंडेंट
व्ही. जी. जोशी, मॅनेजिंग डायरेक्टर

नॉनक्रेडिट व्यवहार करणाऱ्या संस्थांची परिषद्

श्री. वैकुंठराय मेहता यांचें मार्गदर्शन

नंदुरबार येथें ता. १४-९-४४ रोजीं पश्चिम खानदेशांतील नॉनक्रेडिट सोसायट्यांची व नॉनक्रेडिटचा व्यवहार करणाऱ्या क्रेडिट सोसायट्यांची परिषद् श्री. वैकुंठराय मेहता यांचे अध्यक्षतेखाली भरविण्यांत आली. सदर परिषदेस जिल्ह्यांतून सुमारें २०० कार्यकर्ते हजर होते. ईशस्तवनानंतर स्वागताध्यक्ष खानसाहेब यू. बी. इनामदार यांनीं आलेल्या प्रतिनिधींचें व पाहुण्यांचें अंतःकरणपूर्वक स्वागत केलें. परिषदेचे अध्यक्ष श्री. वैकुंठराय मेहता यांनीं सोप्या भाषेंत सहकारी चळवळीची महत्त्वाची बाजू (नॉनक्रेडिट व्यवहार) फारच सुंदर रीतीनें पटवून दिली. ते म्हणालेः—"जरी नॉनक्रेडिट संस्था अलिकडे बऱ्याच निघाल्या आहेत तरी क्रेडिट संस्थांचेच प्रमाण प्रामुख्यानें जास्त दिसून येतें. नॉनक्रेडिट संस्थांची अगर व्यवहाराची वाढ अलीकडीलच आहे, कारण आरंभींचें, घोरण माफक व्याजाच्या दरानें कर्जे देऊन शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा कमी करण्याचा होता. शेतकऱ्यांची सर्वांगीण उन्नति होण्यासाठीं नॉनक्रेडिट संस्थांची वाढ होणें अत्यंत आवश्यक आहे, हें तत्त्व अलीकडे पटूं लागल्यामुळें अशा तऱ्हेच्या संस्था बऱ्याच काढण्यांत येत आहेत. त्यांच्यापुढील अडचणी म्हणजे जरूर लागणारा माल कसा किफायतशीर रीतीनें मिळेल व शेतांतील मालाची विक्री किफायतशीर रीतीनें कशी होईल हा आहेत. ह्या जिल्ह्यांत, ह्या बाबतींत नंदुरबार सहकारी खरेदी विक्री संघानें प्रत्यक्ष काम करून उदाहरण घालून दिलें आहे. आजचें आर्थिक प्रश्न विशेष गुंतागुंतीचे झालेले आहेत व ते केवळ पतपेढ्यांमार्फत पैशाचा पुरवठा करून सोडविण्यासारखे नाहींत. मालपुरवठा व विक्रीसंबंधींची योजना सहकारी संस्थामार्फत होणें सर्वांगीण उन्नतीच्या दृष्टीनें अगत्याचें आहे व म्हणूनच प्रॉव्हिन्शियल को-ऑपरेटिव्ह इन्स्टिट्यूटनें डिस्ट्रिक्ट बोर्डाच्या शिक्षण-कमिट्यांना आजच्यासारख्या परिषदा भरविण्याबद्दल उत्तेजन दिलेलें आहे. नॉनक्रेडिट व्यवहारांत मार्ग दाखविण्याचें काम मुंबई येथील मार्केटिंग सोसायटीचें आहे. त्या संस्थेचा मुख्य उद्देश मालविक्रीची व्यवस्था करणें असा आहे. ह्या संस्थेनें तज्ज्ञ नेमून, बाजाराशीं निकट संबंध ठेवून, आपणास वारंवार योग्य सल्ला द्यावा अशी आपण अपेक्षा केल्यास चुकीची होणार नाहीं.

"ह्या भागांतील मनीक्रॉप म्हणजे कपाशी व भुईमूग होय. गांवठी कपाशीला आतां कोठेंच मान नाहीं. तरी ती पेरण्याचें टाळावें. जरीला कपाशीला सरकारी मान्यता आहे. ती जिनिंग व प्रेसिंग करूनच विक्री करणें हितावह असतें. अलीकडे मालविक्रीचा, विशेषतः कपाशी विक्रीचा प्रश्न बराचसा विकट झालेला आहे. ह्या अडचणींतून मार्ग काढणेसाठीं नॉनक्रेडिट सोसायट्यांचा संघ पूर्वखानदेशांत स्थापन करण्यांत आला आहे. तसाच इकडे झाल्यास चांगलें. अनुभविक व व्यवहार-कुशल नोकर नेमणें हें केव्हांहि हितावह आहे. व्यापारी स्वतः व्यवहारांत तज्ज्ञ असतो व तो आपुलकीच्या भावनेनें आपल्या व्यवहारांत लक्ष ठेवतो. आमचे व्यवहार करणारे चालक शेतीच्या धंद्यांत माहितगार असले तरी व्यापारांत तज्ज्ञ आहेत असें म्हणवत नाहीं. म्हणून तज्ज्ञ कामगारांची नेमणूक करणें आवश्यक आहे. हल्ली आहेत त्या कामगारांना अगर उमेदवारांना तज्ज्ञ करण्याकरितां शिक्षण देणें जरूर आहे म्हणून त्यासाठी शिक्षणवर्ग चालविले पाहिजेत. तसेंच आपणांस व्यवहारांत मार्ग दाखविण्याकरितां व हिशेबांची तपासणी करण्याकरितां एक फेडरेशन (संघ) काढणें जरूर आहे. संस्थेच्या कामगारांना कायमचें काम पुरेल, इतके व्यवहार संस्थेनें हातीं घेणें आवश्यक आहे. सरकाराशीं संबंध ठेवून मार्गनियंत्रित वस्तू पुरवठ्याचें कार्य हातीं घेतल्यानें हा हेतु सहज साध्य होऊं शकेल. आपल्या संस्थांच्या व्यवहारांवर युद्धानंतर बराचसा परिणाम होण्याचा संभव आहे. तरी जरूर ती सबरदारी आतांपासून घेणें इष्ट आहे. शेतीची उत्पादनशक्तिहि वाढविण्यांत आली पाहिजे. म्हणून बेटर अगर जॉईंट फार्मिंग संस्था काढणें जरूर आहे. सरकारनें शेतकऱ्यांची सुधारणा करण्याकरितां एक मोठी योजना नुकतीच आखलेली आहे."

म्हैसूर सरकारच्या मालकीचे कांहीं कारखाने

म्हैसूर संस्थानच्या सरकारी साबण कारखान्यांत १९४३-४४ मध्यें एकूण ५०० टन साबण तयार झाला. त्याच्या विक्रीची किंमत सुमारें ११ लक्ष रुपये भरली व निवळ नफा २ लक्ष, ८३ हजार रुपये झाला. कारखान्याचें यशवंतपूर येथें स्थलांतर करण्याचा विचार आहे.

लोखंडाच्या व पोलादाच्या कारखान्यास २०½ लक्ष रुपये नफा झाला होता. पिग आयर्न फरनेस बसविण्याचा विचार चालू आहे. त्या फरनेसला ३२ लक्ष रुपये पडतील. ॲसिटिक ॲसिडच्या उत्पादनाचे प्रयोग चालू आहेत. विशिष्ट प्रकारच्या पोलादाच्या उत्पादनासहि लवकरच प्रारंभ होईल.

चंदनाच्या झाडांच्या लाकडाच्या तुटवड्यामुळें १९४३-४४ मध्यें फक्त ७९½ हजार पौंड तेल गाळण्यांत आलें. त्यापूर्वीच्या वर्षी १ लक्ष, ३५ हजार पौंड तेल निघालें होतें. विक्रीच्या १३½ लक्ष रुपये किंमतीपैकीं ७½ लक्ष रुपये निवळ नफा समजण्यास हरकत नाहीं.

सरकारी रेशीम विणण्याच्या कारखान्यांत पॅरेशूटचें ५४ हजार वार कापड व १७ हजार वार नेहमींच्या वापराचें कापड विणण्यांत आलें. पॅरेशूटसाठी धागे व दोरेहि करून देण्यांत आले. ह्या फॅक्टरीस ५० हजार रुपये नफा राहील.

विजेच्या उपकरणांच्या कारखान्यांतील उत्पादन १२½ लक्ष रुपयांचें भरून निवळ नफा २½ लक्ष रुपये उरला. फॅक्टरीनें ५०० ट्रॅन्स्फॉर्मर्स तयार केले.

सरकारी चिनीमातीच्या कारखान्यांत २½ लक्ष रुपयांचा माल तयार झाला. लाख व रंग तयार करणाऱ्या कारखान्यानें १ लक्ष ६७ हजारांची विक्री करून ४१ हजार रुपये नफा मिळविला.

हिंदी मालाचा परदेशांत प्रचार

युद्धोत्तर काळांत हिंदी मालाची निर्गत वाढविण्यासाठी परदेशांत प्रचार व जाहिरात करण्याचें हिंदुस्थान सरकारनें योजिलें आहे. ह्यासंबंधांत व्यापारी संस्थांकडून सूचना मागविण्यांत आल्या आहेत.

दक्षिण आफ्रिकेतील शाळांमधील भाषा

दक्षिण आफ्रिकेतील १६% लोक फक्त आफ्रिकन्स भाषा बोलतात; १९% लोक फक्त इंग्रजी भाषा बोलतात व ६५% लोकांना दोन्ही भाषा येतात. दोन्ही भाषा येणारांचें प्रमाण गेल्या २५ वर्षांत ४०% वरून ६५% वर आलें आहे. शाळांत दोन्ही भाषांतून विषय शिकविले जातात. एकोप्याचे दृष्टीनें हें हितकारक आहे, असें सांगण्यांत येतें.

पिंपरें येथील सोसायटीच्या मेंबरांची पुणें सें. को. बँकेनें केलेली आर्थिक पहाणी

युद्धामुळें वाढलेल्या किंमतीचा फायदा सोसायटीच्या मेंबरांना आपली कर्जफेड करण्याच्या दृष्टीनें कितपत होतो हें पहाण्याच्या उद्देशानें पुणें सें. को. बँकेनें,वडापुरी गांवच्या सोसायटीची पहाणी केली होती. त्याच उद्देशानें गेल्या सप्टेंबर अखेर पिंपरें येथील सोसायटीची पहाणी त्यांनीं केली आहे.

सदर खेड्याची वस्ती २०० असून रु. १६९९-१५-३ साऱ्याची १९३९ एकर जमीन सदर गांवठाणासाठी आहे. सदरहु खेडें बागायती असून जमिनीचा बराचसा भाग विहिरीच्या पाण्यासाठी भिजतो. पाणस्थळ भागांत अंजीर व मोसंबीची लागवड असून उरलेल्या भागांत ज्वारी व बाजरीचें पीक काढलें जातें.

अंजीर व मोसंबी सारखीं फळें ही निदान आपणाकडे तरी जीवनांतील आवश्यक बाब समजली जात नसून ती एक चैनीची बाब समजली जाते व त्यामुळें सदर मालाला मुंबई-पुण्याशिवाय दुसरी सोयीची बाजारपेठ नाहीं. शिवाय हा माल टिकाऊ स्वरूपाचा नसल्यामुळें पुढें किंमत येईल म्हणून शिलक ठेवतां येत नाहीं व त्यामुळें सदरहू फळांचे भाव रोजच्या मागणी पुरवठा तत्त्वावर अधिक अवलंबून असल्यास त्यांत आश्चर्य नाहीं. त्यामुळें युद्धकालीन परिस्थितींत सुद्धां वाढलेल्या भावाचा फायदा सदरहु शेतकऱ्यांस मिळावा तसा मिळत नाहीं. अर्थातच या गांवच्या सोसायटीतील मेंबरांच्या वार्षिक उत्पन्नांत फारशी वाढ दिसून येत नाहीं.

पिंपरें येथील सोसायटीची स्थापना १९१७ सालीं होऊन तिचे आज १०२ सभासद आहेत. शेअर कॅपिटल १,८६५ रु. असून सोसायटीचा रिझर्व्ह फंड ४,२२० रु. आहे. १९३९-४० सालीं सोसायटीनें सभासदांस १७,६९८ रु. चीं कर्जें दिलीं असून १९४२-४३ सालीं १०,६४९ रुपयांची कर्जें सभासदाकडे आहेत.

सोसायटीला १९३९-४० सालीं बँकेकडून १९,४५४ रु. कर्जाऊ द्यावे लागले व १९४२-४३ सालीं तिनें ६,२०८रु. बँकेचें कर्ज घेतलें.

पिंपरे सोसायटी १९३९-४० सालीं तोट्यांत होती; १९४२-४३ सालीं तिला ३,०८१ रु. नफा झाला आहे.

मेंबरांची आर्थिक दृष्ट्या पहाणी करतेवेळीं सदर मेंबरांचे शेतीच्या उत्पन्नाचे व बिगर शेतीच्या उत्पन्नाचे आकडे तसेंच त्यांचेकडे असणाऱ्या सोसायटीकडील कर्जाचे व इतर बाहेरील कर्जाचे आकडे देऊन सदर सभासदाच्या कुटुंबांत मिळवती व न मिळवणारी किती मंडळी आहेत ही माहिती दिली असती तर सभासदाचीं कर्जफेडीची शक्ती अधिक बरोबर अजमावतां आली असती असें वाटतें.

खेड्यांतील निर्माण होणाऱ्या फळांची विक्री सहकारी संस्थेमार्फत केली असतां तिचा फायदा सभासदांस होईल व अंजिरें सुकवून ठेवण्याचा एक नवीन धंदाही गांवकऱ्यास उपलब्ध करून देतां येईल.

इ. ऑ. कोअरमधील नोकर

वुइमेन्स ऑक्झिलिअरी कोअर (इं.) मध्ये एकूण २,२१० युरोपियन, ३,२५२ हिंदी व ३,९३७ अँग्लो इंडियन स्त्रिया आहेत.

विश्व ब्राह्मणसमाज वेटर लिव्हिंग को. सोसायटी सोलापूर

वार्षिक जनरल सभा

ता. १।१०।१९४४ रविवारीं सायंकाळीं ९ वाजतां येथील शुक्रवार पेठेंतील श्रीकालिका मंदिरांत विश्व ब्राह्मण समाज वेटर लिव्हिंग को. ऑ. सोसायटीची वार्षिक जनरल सभा श्री. नामदेव एकनाथ मैंदर्गीकर यांचे अध्यक्षतेखालीं अतिशय परिणामकारक व व्यवस्थित झाली. सभेस सभासद व समाजांतील इतर मंडळी मिळून सुमारें १०० पर्यंत हजर होती. अहवाल, ताळेबंद, मॅ. बोर्ड, सेक्रेटरी, ऑडिटर, यांची निवड वगैरे मामुली ठराव झाल्यावर विधायक कार्यक्रम आंखण्यांत आला. त्यांत विद्यार्थी पैसाफंड, साहित्योपासक मंडळ, संस्थेचा दवाखाना, महिलामंडळ वगैरे गोष्टींची सुरवात करून बोर्डिंगकरितां रक्कम जमविण्याची सुरवात म्हणून श्री. नंदा त्र्यंबक जडे यांनीं गणपतराव जडे यांचें नांवें १०१ रु. ची देणगी व अध्यक्षांनीं १५१ रु. ची देणगी जाहीर केली. आणि एक मंडळ नेमून या कार्यास सुरवात करण्यांत आली. चालूं वर्षी अशा रितीनें बरीचशी विधायक व उपयुक्त कामगिरी संस्था हातीं घेणार आहे. तसेंच दवाखाना सुरू होतांच श्री. भगवान नरहर आवसेकर यांनीं ११०० रु. (अकराशें) रुपयांची शिक्षण प्रसाराकरितां दिलेली देणगी अद्याप रक्कम न पडल्यामुळें या कामीं देण्याचीं तयारी त्यांनीं दाखविली आहे. शेवटीं श्री. पारखे व देगांवकर मास्तर यांनीं करावयाच्या प्रयत्नाबद्दल विशेष माहिती दिल्यावर आभारप्रदर्शन व ईशस्तवन आणि शेवटीं कोजागिरी निमित्तानें दुग्धपान होऊन सभा संपली.

ता. २।१०।४४ रोजीं सोसायटीतर्फे गांधी जयंति उत्सव साजरा करण्यांत आला. अध्यक्षांचे हस्तें १०० मुलांमुलींना खाऊ देण्यांत आला.

माढा ता. को. सुपरवायझिंग यूनिअन लि.

ह्या यूनियनच्या कार्यकारी मंडळानें प्रत्यक्ष सोसयट्यांना भेटी देऊन वसुलीचा प्रयत्न करून थकबाकीचें प्रमाण उतरविलें. सामुदायिक पद्धतीनें जीवनक्रम सुधारण्याविषयीं माहिती दिली. बचत करून शिलकी रकमेंतून सरकारी कर्जरोखे घेण्याचा किंवा पतपेढ्यांत ठेवी ठेवण्याचा सल्ला देण्यांत आला. अधिक धान्य पिकविण्याबाबाबत प्रोत्साहन दिलें. सहकारी संस्थांमार्फतच माल विक्री करण्याचा प्रचार केला. यूनिअन हद्दींत एकहि सोसायटी 'ड' वर्गात नाहीं, 'क' वर्गातील सोसायट्यांची संख्या १३ ची १० झाली आहे व 'अ' वर्गात ७ ऐवजीं १२ सोसायट्या आहेत. वसुली समाधानकारक आहे. तालुक्यांतील इंग्रजी शिक्षणाची गैरसोय दूर करण्याचा प्रयत्न चालू आहे. आसि. रजिस्ट्रार व ऑडिटर ह्यांनीं यूनियनच्या कामाची प्रशंसा केली जाहे. यूनिअनचे चेअरमन श्री. गणपतराव बोंडिबा साठे हे आहेत.

जपानांतील सहकाराचें जाळें

सबंद जपान एकूण ८ लक्ष, १० हजार सहकारी सोसायट्या आहेत आणि त्यांच्या सभासदांची एकूण संख्या १४ कोटि, १० लक्ष एवढी आहे.

महाराष्ट्रांत लेखी मॅरंटी देणारे
पहिले व फक्त १ च
गोल्ड मेडॅलिस्ट व मराठी वळणाचे स्पेशॅलिस्ट
पेन्टर वेडेकर, ए. जी.,
बुधवार चौक, पुणें २ (सिटी)
बाहेरगांवची कामें रेल्वे, मोटार अगर पोस्टानें पाठवूं.

जिकडे तिकडे प्रशंसा
इमिटेशन दागिन्यांवर रासायनिक क्रिया करून खऱ्या सोन्याचा पत्रा चढविला जातो त्यामुळें दागिना केव्हांही खराब होत नाहीं, ही पूर्ण खात्री झाली. सोन्याचा पत्रा चढविलेल्या चार बांगड्या कि. आठ रु. गरजेस्तव दागिना परत करणें झाल्यास वर चढविलेल्या सोन्याचे सर्वच्या सर्व पैसे परत देऊं.
भट कं. सांगली, S. M. C.
भट कंपनी शाखा–बुधवार पेठ, पुणें २.

पैसा व ज्ञान देणारीं पुस्तकें !
श्रीमंत कसें व्हावें ! संपत्तीचे सुंदर मार्ग दाखवून हजारों रु. मिळवून देतें. वाचून लक्षाधीश व्हाल ! कि. १॥ रु. काम आणि कामिनी. काम शास्त्रावरील अपूर्व ग्रंथ ! कि. १॥ रु. मृत्युलोकचा प्रवास ! मरणोत्तर आत्म्याच्या अद्भुत हालचालींचें कथानक ! कि. १ रु. लिहा. विघ्नहर आणि मंडळी, कराड जि. सातारा.

पुण्यांतील
आदर्श निवासस्थान व भोजनालय
छाया लॉजिंग व बोर्डिंग हाऊस
बुधवार चौक, पुणें २.

–राष्ट्रीय काटकसर–
युद्धकार्याची गरज लक्षांत घेऊन डबे वा कागद यांची बचत करणें भाग आहे. ही पॅकिंग-बाबतची अडचण लक्षांत घेऊन—
–गोल्डन कोको–
सुटा मिळण्याची सोय सर्व प्रमुख व्यापाऱ्यांकडे करण्यांत येत आहे. सुटा कोको घेण्यानें पैशाचीही बचत होते, मात्र आपणांस गोल्डन कोकोच मिळत आहे अशी खात्री करून घ्या. नांव लक्षांत ठेवा.
साठे बंधू, "गोल्डन कोको"
—सर्वत्र मिळतो—
साठे कोको व चॉकोलेट कारखाना, पुणें २.

मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानी असलेली
शेतकऱ्यांची प्रांतिक बँक
म्हणजेच
बॉम्बे प्रॉव्हिन्शियल को-ऑपरेटिव्ह बँक, लि.
(सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली)
स्थापना १९११.
मुख्य कचेरी–सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरिअल बिल्डिंग, ९, बेक हाउस लेन, कोट मुंबई.
टेलिफोन नं. २५४६१ तारेचा पत्ता 'फार्मर बँक'
अधिकृत भांडवल :: रु. १५,००,०००
काढलेलें भांडवल :: रु. १३,२५,०००
भरलेलें भांडवल :: रु. १३,११,५००
खेळतें भांडवल १९४४ जून अखेर ४ कोटी ७३ लक्ष
.....शाखा व उपशाखा.....

१ बारामती	(जि. पुणें)	२३ नाशिक	(जि. नाशिक)
२ नीरा	"	२४ लासलगांव	"
३ सातारा	(जि. सातारा)	२५ मालेगांव	"
४ कऱ्हाड	"	२६ नांदगांव	"
५ किर्लोस्करवाडी	"	२७ घोटी	"
६ कोरेगांव	"	२८ सटाणा	"
७ इस्लामपूर	"	२९ येवलें	"
८ शिराळें	"	३० धुळें	(जि. पश्चिम खानदेश)
९ तासगांव	"	३१ दोंडाईचें	"
१० वाई	"	३२ नंदुरबार	"
११ भिवंडी	(जि. ठाणें)	३३ साक्री	"
१२ कल्याण	"	३४ शहादें	"
१३ पालघर	"	३५ शिरपूर	"
१४ अक्कलूज	(जि. सोलापूर)	३६ शिंदखेडें	"
१५ अहमदनगर	(" अहमदनगर)	३७ तळोदें	"
१६ बेलापूर रोड	"	३८ दोहद	(जि. मडोच व पंचमहाल)
१७ कोपरगांव	"	३९ गोध्रा	"
१८ पाथर्डी	"	४० झालोद	"
१९ राहुरी	"	४१ पनवेल	(जि. कुलाबा)
२० शेवगांव	"	४२ नडियाद	(जि. खेडा)
२१ बाभोरी	"	४३ आनंद	"
२२ विरमगांव	(जि. अहमदाबाद)		

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात आणि इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेड ऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा.
व्ही. एल्. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.

हें पत्र पुणें, पेठ सांगली क. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' सांगली, क. नं. १२७।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.

खालील पत्त्यावर चौकशी करावी.

व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

अर्थ

वर्गणीचे दर.

वार्षिक वर्गणी
रु. ४
(टपाल खेरीज माफ)
किरकोळ अंकास
दोन आणे.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष १० पुणें, बुधवार तारीख ६ डिसेंबर, १९४४ अंक ४८

व्ही. पी. बेडेकर
आणि सन्स लि.
मुंबई.

मसाल्याचे व्यापारी

पुणें एजंटः—
द. ना. हेजीब

JUST PUBLISHED

INDIAN RURAL PROBLEM

BY

Sir Manilal Nanavati and Prof. J. J. Anjaria.

(Issued by the Indian Society of Agricultural Economics, Bombay).

Price Rs. 8
(Postage extra).
Sole Selling Agents :—
THE CO-OPERATORS' BOOK DEPOT.
9, BAKEHOUSE LANE,
FORT, BOMBAY.

"Consent of the Central Government has been obtained to this issue under Defence of India Rule 94-A. It must be distinctly understood that in giving this consent the Government of India do not take any responsibility for the financial soundness of any schemes or for the correctness of any of the statements made or opinions expressed with regard to them."

दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.

स्थापना : १९३५
हेड ऑफिस : पुणें शहर

विक्रीस काढलेलें नवीन भांडवल

रु. १०,००,०००

(प्रत्येकीं रु. ५० च्या २०,००० भागांत विभागलेलें)

वरील शेअर्स ता. ४-१०-४४ रोजीं बँकेच्या रजिस्टरवर असलेल्या शेअर-होल्डरांना त्यांच्या प्रत्येक जुन्या १ शेअरला १ नवीन शेअर असे रु. ५ वाढीनें देऊं केले आहेत. पहिल्या शेअर-होल्डरांनीं घेऊन उरलेले शेअर्स इतरांस नेवढ्याच वाढीनें (रु. ५) देण्यांत येतील. अर्ज पाठविण्याची शेवटची तारीख १५-१२-४४ ही आहे.

—डायरेक्टर बोर्ड—

श्री. धों. कृ. साठे, चेअरमन

श्री. व्ही. पी. वर्दे, प्रो. व्ही. जी. काळे, श्री. एन. जी. पवार, श्री. टी. व्ही. रानडे, श्री. आर. सी. सोहोनी, श्री. एस. जी. मराठे, श्री. एम. आर. जोशी, श्री. एफ. डी. पदमजी, श्री. एम. व्ही. गोखले, श्री. व्ही. एच. देशमुख.

विशेष माहितीसाठी लिहा.

सी. व्ही. जोग, मॅनेजर



पुणें चीफ एजंट :
मे. श्रीदत्त एजन्सी
१०० रविवार पेठ,
मोती चौक, पुणें २.

कोल्हापूर विक्रेते :
मे. भागवत आणि कं.
कांच लाइन

सातारा जिल्हा एजंट :
मे. जोशी आणि मंडळी
भवानी पेठ.

विविध माहिती

देना बँकेच्या तीन नव्या शाखा

देवकारण नानजी बँकिंग कं. लि. च्या अमरेळी येथील शाखेचें उद्घाटन शुक्रवार, ता. ८ रोजीं श्री. रतिलाल मुळजी गांधी, बी. ए., एम. एल. सी. ह्यांच्या हस्तें होणार आहे. राजकोट येथील शाखेचें उद्घाटन सोमवार ता. ११ रोजीं राजकोटचे ठाकूरसाहेब हिज हायनेस श्री. प्रद्युम्नसिंहजी ह्यांच्या हस्तें होईल. मनमाड उपशाखेसहि ता. ११ रोजीं प्रारंभ होईल. अशा तऱ्हेनें देना बँकेच्या शाखांची संख्या आतां ३३ होईल.

"डॉ. कोटणीस" चित्रपटाची प्रसिद्धि

डॉ. कोटणीस ह्यांच्या जीवनवृत्तांतावर श्री. व्ही. शांताराम हे इंग्रजी भाषेंत बोलपट काढीत आहेत, त्यास अमेरिकेंत प्रसिद्धि देण्याचें काम मि. फाझलभाई हे न्यूयार्क येथें करीत आहेत असें वृत्त प्रसिद्ध झालें आहे.

सरकारी इंजिनियरला सहा महिने कारागृहवास.

मुंबई सरकारच्या औद्योगिक खात्यांतील इंजिनियर, मि. एम्. ई. हॅस्केल, ह्यांनीं निशात इंडस्ट्रीजचे भागीदार मि. लोबो ह्यांचेकडून कंत्राट देण्याबद्दल व पुऱ्या केलेल्या कामाच्या बिलांतील बाकी देण्याबद्दल ४२५ रुपये लांच घेतला, ह्या आरोपावर त्यांना मुंबईच्या चीफ प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेटनीं ६ महिने सक्तमजुरीची शिक्षा ठोठावली. मि. हॅस्केल ह्यांस सरकारी नोकरींत दरमहा १,२०० रुपये पगार मिळत होता.

जुन्या यंत्रसामुग्रीची खरेदी

लँकेशायरच्या गिरण्यांतील वापरलेली यंत्रसामुग्री खरेदी करण्याचा कांहीं हिंदी गिरणीवाल्यांचा विचार असल्याचें समजतें. कांहीं सामुग्री आगबोटींत जागा मिळण्याची वाट पहात आहे.

असेंब्लीची बैठक

मध्यवर्ती असेंब्लीच्या अंदाजपत्रकाच्या बैठकीस दिल्ली येथें ता. १२ फेब्रुवारी रोजीं प्रारंभ होईल.

सिमेंटच्या किंमती थोड्या उतरल्या

आसाम, बेंगॉल सिमेंट कं. लि. खेरीजकरून बाकी सर्व कंपन्यांनीं उत्पादन केलेल्या पोर्टलंड सिमेंटच्या किंमती ७० रुपयांवरून ६८ रु. १२ आण्यांवर सरकारनें १ डिसेंबर, १९४४ पासून उतरविल्या आहेत.

आगगाडीच्या फळीवरून प्रवास करणें बेकायदा

आगगाडीच्या डब्यावरून किंवा पायरीवरून व फळीवरून प्रवास करणें आतां भारत संरक्षण कायद्याच्या ताज्या नियमानें बेकायदा ठरविलें आहे. हा नियम मोडणाराची उचलबांगडी कोणताहि रेल्वे नोकर किंवा पोलीस अधिकारी करूं शकेल. सहा महिने तुरुंगवास व दंड अशी ह्या गुन्ह्यास शिक्षा सांगितलेली आहे.

बचतीची मोहीम

बचतीच्या मोहिमेचा पंधरवडा मुंबई प्रांतांत साजरा होणार आहे. त्यास प्रारंभ प्रांताचे गव्हर्नर ता. १२ रोजीं रेडिओवरील भाषणानें करतील.

पॉवेल्स लि.

वरील कंपनीस ३० जून, १९४४ अखेर संपलेल्या वर्षी ७४,४२७ रुपये नफा झाला. भागीदारांस ४½% करमाफ डिव्हिडेंड मिळालें.

३ लक्ष रुपयांस ३०० एकरांची खरेदी

रावबहादुर शेंबेकर ह्यांची राजेगांव (ता. दौंड, जि. पुणें) येथील ३०० एकरांची इस्टेट श्री. श्री. र. राजगुरु व श्री. देशपांडे ह्यांनीं श्री. न. गं. आपटे ह्यांचे सहकार्यानें सुमारें ३ लक्ष रुपयांस नुकतीच खरेदी केली आहे, असें समजतें. खरेदी करणाऱ्या गृहस्थांचा विचार महाराष्ट्रांतील शेतीस अनुषंगिक धंद्यांची वाढ करण्याचा असून ज्यांना असे धंदे काढावयाचे असतील त्यांना जागा व कच्चा माल ह्यांचा पुरवठा व विक्रीची व्यवस्था करण्याचा आहे. राजेगांव जी. आय. पी. च्या डिव्हिजळ रेल्वे स्टेशनपासून ईशान्येस दोन मैलांवर असून भीमा नदीचे काठीं आहे. वालचंदनगरचें रेल्वे स्टेशन डिव्हिजळ हेंच आहे. जमिनीलगत सव्वा मैलाचा डोह आहे, त्यांतून ४० अश्वशक्तीच्या इंजनांच्या सहाय्यानें जमिनीस पाणी पुरविलें जातें. सध्यां तेथें ऊंस, संत्रीं, मोसंबीं, पेरू, द्राक्षें इत्यादि पिकें उभीं आहेत.

म्हैसूरमध्ये सहकाराची प्रगति

म्हैसूर संस्थानांत चालू वर्षी ८१ क्रेडिट सोसायटच्या नवीन उघडल्या असून एक मार्केटिंग सोसायटीहि उघडली आहे. या सोसायटच्यांनीं ४५,०८,८२१ रुपयांची उलाढाली केली. सत्तर सोसायटच्यांनीं आपले स्टोअर्स सुरू केले असून त्यामार्फत ५,६२,४११ रु. ची विक्री व ५,४९,९३० रु. ची खरेदी करण्यांत आली.

THE BRIHAN MAHARASHTRA SUGAR SYNDICATE, LTD., POONA 2.

NOTICE.

The tenth Annual General Meeting of the Shareholders of the Brihan Maharashtra Sugar Syndicate, Ltd., Poona 2, will be held on Sunday the 31st December, 1944 at 3 P. M. at the Tilak Smarak Mandir, Poona 2, to transact the following business :—

(1) To receive and adopt the Directors' Report and Audited Statements of Accounts for the year ended 30th September, 1944.

(2) To sanction the payment of a Dividend for the above mentioned period.

(3) To elect Directors in place of those who retire but are eligible for re-election.

(4) To appoint Auditors for the current year and fix their remuneration.

By order of the Board of Directors,
C. G. AGASHE & Co.,
Managing Agents.

Poona, 3rd December, 1944.

Note :—The Transfer Books of the Company will be closed from 16th of December, 1944 to 7th of January, 1945 (Both days inclusive).

The Dividend when declared will be made payable at the Bank of Maharashtra, Ltd., Poona, on and after the 7th of February, 1945.

अनुक्रमणिका

	पृष्ठ		पृष्ठ
१ विविध माहिती ...	३९८	स्वार्थत्याग–कापड व्यापाऱ्यांची कानउघाडणी.	
२ तीनशे एकरांची खरेदी	३९८	६ बेलापूर कं. लि. ...	४०२
३ बँकांच्या नियंत्रणासाठी स्वतंत्र कायदा ...	३९९	७ उद्योगी नागपूर ...	४०२
४ शेअर बाजार ...	४००	८ डिस्ट्रिक्ट जज्जांची नेमणूक	४०३
५ स्फुट विचार... ...	४०१	९ भागांचें तारण ...	४०३
मित्रराष्ट्रांची जर्मनीत चाल-			
इंग्लंडचा युद्धप्रयत्न व			

अर्थ

बुधवार, ता. ६ डिसेंबर, १९४४

बँकांच्या नियंत्रणासाठी स्वतंत्र कायदा

शाखा काढणारांवर भक्कम शेअर भांडवलाच्या अटी

आतांपर्यंत हिंदी बँकिंगच्या नियंत्रणासाठी स्वतंत्र असा कायदा अस्तित्वांत नाहीं. हिंदी कंपनी कायद्यांत कांहीं कलमें बँकिंग-संबंधाचीं आहेत एवढेंच. रिझर्व्ह बँकेचे त्यावेळचे गव्हर्नर, सर जेम्स टेलर, ह्यांनीं १९३९ सालीं हिंदी बँकिंग कायद्याचा एक मसुदा तयार करून रिझर्व्ह बँकेतर्फे हिंदुस्थान सरकारास सादर केला होता. रिझर्व्ह बँकेनें ह्या मसुद्यास प्रसिद्धी देऊन हितसंबंधी संस्था व व्यक्ती ह्यांचीं मतें मागविलीं. मध्यंतरींच्या युद्धकाळांत व्यापक प्रमाणावर बँकिंगचा कायदा तयार करून त्यास विधिमंडळाची संमति मिळविण्यास हिंदुस्थान सरकारला फुरसत झाली नाहीं. अगदी जरूरीच्या अशा कांहीं दुरुस्त्या मात्र कंपनी कायद्यांत करून बँकिंगविषयक कलमें सुधारण्यांत आलीं. बँकिंगची व्याख्या स्पष्ट करणारी दुरुस्ती १९४२ सालीं झाली व मार्च, १९४४ मध्यें बँकांच्या भांडवलाची रचना सुधारणाऱ्या व बँकांच्या मॅनेजिंग एजंटांच्या व मॅनेजिंग डायरेक्टरांच्या करारांवर नियंत्रण घालणाऱ्या दुरुस्त्या करण्यांत आल्या. युद्धकाळांतील बँकिंगची वाढ व बँकिंगच्या धंद्याची प्रवृत्ति लक्षांत घेऊन, १९३९ च्या मूळ योजनेंत आतां सरकारला बरीच सुधारणा करावी लागली आहे. बँकिंगच्या कायद्याच्या सुधारणेचा विषय लोकांपुढें आज इतका दीर्घकाल आहे, कीं नव्या बिलाच्या विचारासाठी फार मोठी मुदत ठेवण्याचें सरकारास कारण वाटलेलें नाहीं. १९४५ च्या मार्चपूर्वी बिलाचें कायद्यांत रूपांतर करून टाकण्याचा सरकारचा विचार दिसतो.

नव्या कायद्यांतील प्रमुख बाबी

बँकिंग कायद्याच्या बिलांतील मुख्य बाबी खालीलप्रमाणें आहेत:—(१) बँकिंगची सुटसुटीत व्याख्या, (२) किमान भांडवलासंबंधी निर्बंध, (३) बँकिंगच्या क्षेत्राबाहेरील व्यवहार करण्याची बँकांस बंदी, (४) ब्रिटिश हिंदुस्थानाबाहेर नोंदलेल्या अथवा स्थापन झालेल्या बँकांचा कायद्यांत समावेश, (५) लिक्विडेशनचें काम लवकर संपण्याची व्यवस्था, (६) जरूर तेव्हां बँकांचे हिशेब रिझर्व्ह बँकेनें तपासण्याची तरतूद, (७) ठेवीदारांच्या हितास विघातक अशा रीतीनें कारभार करणाऱ्या बँकांवर इलाज करण्याची मध्यवर्ती सरकारास सत्ता व (८) ताळेबंदाच्या खास ठराविक नमुन्याप्रमाणें ताळेबंद तयार करण्याची सर्व बँकांवर सक्ती व वक्तशीर माहितीचे तक्ते मागविण्याचा रिझर्व्ह बँकेस अधिकार. ह्या आठ महत्त्वाच्या बाबींपैकी किमान भांडवलाविषयींच्या नियोजित निर्बंधांचा विचार येथें केला आहे.

किती शाखांस किती किमान भांडवल हवें ?

बँकेचें वसूल भांडवल व रिझर्व्ह हीं मिळून ५०,००० रुपयांचीं असलीं म्हणजे झालें, अशी आजच्या कायद्याची अट आहे. ही मर्यादा वाढवून १,००,००० रुपये आतां करण्यांत यावयाची आहे. ह्या रकमेपेक्षा कमी भांडवलाच्या आकाराची बँक ह्यापुढें निघूं अगर राहूं शकणार नाहीं. कोणत्या बँकेनें कोठें व किती शाखा उघडाव्या, ह्यावर सध्या कोणत्याहि प्रकारचें नियंत्रण नाहीं. नव्या कायद्यानें ह्याबाबत जबर अटी घालण्याचें योजिलें आहे. २० लक्ष रुपयांचें वसूल भांडवल व रिझर्व्ह असणारी बँक कोठेंहि, कितीहि शाखा उघडूं शकेल, परंतु त्यापेक्षा कमी भांडवल व रिझर्व्ह असणाऱ्या बँकांस खालीलप्रमाणें बंधनें पाळावीं लागतील. उदाहरणार्थ:—

बँकेचें किमान भांडवल व रिझर्व्ह किती पाहिजे ?

	(रु.)
एका प्रांतांतील बँकेस दुसऱ्या प्रांतांतील शहरांत शाखा उघडण्यास	२०,००,०००
संस्थानी हद्दींतील बँकेस ब्रि. हिंदुस्थानांत शाखा उघडण्यास ...	२०,००,०००
मुंबई प्रांतांतील बँकेस मुंबईंत शाखा उघडण्यास	५,००,०००
बंगाल प्रांतांतील बँकेस कलकत्त्यांत शाखा उघडण्यास ...	५,००,०००
एक लक्ष लोकवस्तीवरील प्रत्येक शहरांतील शाखेस... ...	२,००,०००
इतर प्रत्येक ठिकाणच्या शाखेस ...	१०,०००

ब्रिटिश बँकांची जाहिरात

ब्रिटिश हिंदुस्थान किंवा ग्रेट ब्रिटन ह्याबाहेरील ठिकाणीं नोंदलेल्या बँकांनीं वरील तक्त्यांत नमूद केलेल्या किमान भांडवल व रिझर्व्हच्या आकड्याइतकी रकम रोख अथवा सरकारी रोखे ह्यांच्या स्वरूपांत रिझर्व्ह बँकेकडे ठेवली पाहिजे, असें नवा कायदा सांगतो. ह्याचा अर्थ, संस्थानी हद्दींत स्थापन झालेल्या बँकांना २० लक्ष रुपये रिझर्व्ह बँकेंत ठेवावे लागतील. ब्रिटिश बँकांवर जें बंधन नाहीं, तें क्षेजारच्या संस्थानीं हद्दींत नोंदलेल्या बँकांवर घालण्यांत येत आहे, ह्या गोष्टीवर टीका झाल्याविना राहणार नाहीं. ब्रिटिश बँका मजबूत असून त्या कोणतींहि बंधनें सहज पाळूं शकतील, हें खरें असलें तरी त्यांना कायद्याच्या सामान्य नियमांतून वगळणें इष्ट दिसत नाहीं. ब्रिटिश बँकांच्या मजबुतीची जाहिरात हिंदुस्थान सरकारनें कां करावी !

वरील तक्त्यावरून असें दिसून येईल, की शाखांसाठी आवश्यक ठरविलेल्या भांडवल व रिझर्व्ह ह्यांच्या आकड्यांचे संबंधांत शेडयूल्ड व बिगर शेडयूल्ड बँका ह्यांस एकाच पातळीवर ठेवण्यांत आलें आहे. शेडयूल्ड बँकेस कोणतीहि जास्त सवलत मिळावयाची नाहीं. शाखांच्यासाठी आवश्यक केलेल्या भांडवलाच्या नव्या अटी फक्त सुमारें २५ प्रमुख हिंदी बँकांस जाचक होणार नाहींत. कारण, त्या सर्व बँकांचें वसूल भांडवल व रिझर्व्ह हीं २० लक्ष रुपयांवर आहेत. बाकी सर्व हिंदी बँकांनीं ह्या नव्या बंधनांचा विचार केला पाहिजे.

भांडवल वाढविण्यांतील अडचणी

वरील जाचक अटी बँका कशा पाळूं शकतील ? ज्यांचें वसूल भांडवल व रिझर्व्ह हीं एक लक्ष रुपयांखाली असतील, त्यांना भांडवल वाढवावें लागेल; त्याखेरीज त्यांचें अस्तित्वच टिकणार नाहीं. बाकीच्या बँकांना आपल्या शाखा कायम राखावयाच्या असतील, तर त्यांना वरील तक्त्याबरहुकूम भांडवलांत वाढ करावी लागेल. अर्थात् ज्यांनीं आवश्यकतेबाहेर पसारा मांडला असेल, त्यांना एवढें मोठें भांडवल उभारणें कठीण जाईल. शिवाय, भांडवल मिळालें तरी वाढलेल्या भांडवलावर मूळ डिव्हिडंडच्या दरानें कितीतरी जास्त डिव्हिडंड वाटावें लागेल, त्यासाठी नफाहि पुष्कळ वाढणें जरूर आहे व तो कांहीं एकाएकी वाढूं शकणार नाहीं. २० लक्ष रुपयांचें भांडवल व रिझर्व्ह असणारी बँक चांगल्या तऱ्हेनें किफायतशीर चालण्यास तिचें खेळतें भांडवल किमान दोन कोटि रुपये तरी हवें. बँकांच्या खेळत्या भांडवलांत व व्यवहारांत एकदम मर कशी पडणार ? आणि ती पडण्याचा संभव विशेष नसला, तर भांडवल तरी सुलभतेनें कसें खपणार ? अर्थात्, बँकांच्या जबाबदार अधिकाऱ्यांनीं ह्या सर्व अडचणींचा विचार करूनच आपलें धोरण आखलेलें असलेंच पाहिजे, कारण ह्या अटी सरकार एकाएकी लादूं पहात आहे, असें कोणासहि म्हणतां येणार नाहीं. भांडवल व शाखांची संख्या आणि ठिकाणें ह्यांचा संबंध जोडला जाणार आहे, ही गोष्ट गेलीं चार-पांच वर्षें सर्वांस माहीत आहे. तथापि, आगामी बंधनांची नुसती कल्पना असणें वेगळें व प्रत्यक्ष कायद्याच्या तपशीलवार अटी नजरेसमोर येणें वेगळें. महाराष्ट्रांतील बहुतेक बँकांना आगामी कायद्याचा चौकटींत येण्यासाठी आपलें धोरण ठरवावें लागणार आहे. अर्थात्, कित्येकांनीं वेळींच पूर्व तयारी केली आहे.

कांहीं महाराष्ट्रीय बँकांचें उदाहरण

बँकिंगच्या नियोजित कायद्याप्रमाणें न्यू सिटिझन बँक व महाराष्ट्र बँक ह्यांस प्रत्येकीं २० लक्ष रुपयांचें वसूल भाग भांडवल व रिझर्व्ह पुरीं करावीं लागतील, कारण त्या दोघांच्याहि प्रांताबाहेर शाखा आहेत. प्रेसिडेन्सी इं. बँकेची मुख्य कचेरी पुणें येथें असून मुंबईस शाखा आहे, ह्याकरितां तिला ७ लक्ष रुपये व भारत इं. बँकेची पुणें येथील मुख्य कचेरी व चार-पांच शाखा-उपशाखा आहेत ह्याकरितां तिला सुमारें २½ लक्ष रुपये ह्याप्रमाणें वसूल भांडवल व रिझर्व्ह हीं पुरीं करावीं लागतील. वरील चारहि बँकांनीं नव्या कायद्याचा मसुदा जाहीर होण्यापूर्वीच शेअरविक्री चालू केलेली आहे व त्यांस पाठिंबाहि चांगला मिळत आहे. चालू शेअरविक्री पुरी झाल्यावर आणखी भाग त्या सर्वांना अर्थात् विकावे लागतील व आवश्यक भांडवल-रिझर्व्हची अट पार पाडावी लागेल.

मुदत व रकम ह्यांबाबत सवलतींची आवश्यकता

भांडवल व रिझर्व्ह ह्याबाबत अटी कायद्याचा अंमल सुरू झाल्यापासून दोन वर्षांचे अवधींत बँकांना पुऱ्या पाडाव्या लागतील. ही दोन वर्षांची मुदत फारच थोडी आहे. ती वाढवून घेण्याचा संघटित प्रयत्न बँकांनीं केला पाहिजे. नाइलाजानें शाखा कमी कराव्या लागल्या तर त्यांत कमीपणा मानतां कामा नये. वीस लाख रुपये भांडवल व रिझर्व्ह असणारी बँक ही मोठी बँक व बाकीच्या बँका लहान व स्थानिक स्वरूपाच्या असा नव्या कायद्याचा मथितार्थ दिसतो. ही वीस लक्षांची अटहि निदान दहा लाखांवर आणण्याचा प्रयत्न करतां येण्याजोगा आहे. मोठ्या व वजनदार बँकांना वरील अट जाचक होत नसल्याकारणानें, मध्यम व लहान आकाराच्या बँकांसच आपली रास्त बाजू नेटानें पुढें मांडावी लागणार आहे; मोठ्या बँकांच्या सहकार्याची त्यांनीं अपेक्षा करणें व्यर्थ आहे.

शेअर बाजार

(श्री. व. वि. लोणकर, एम्. ए., बी. कॉम्., १२८६ अ, शिवाजीनगर, पुणें ५)

मागील आठवड्याभर बाजार मागें न पाहतां बरच चाललेले आहेत व लक्षणावरून हाच क्रम पुढील आठवड्याभर रहावा. शुक्रवारीं ढाईंग १८४७।८, नागपूर ४२३।८, सिंथेटिक्स २८७, स्वदेशी ५९२, मोरारजी ७३८–१२, अपोलो ४।७, इ. डी. ३।६, कोहिनूर ६१६, असे मजबूत आहेत. अजून ढाईंग व कोहिनूर यांत पुढें जाण्यास विशेष अवसर दिसतो. मात्र न्यू मेटल्स सावध असावयास हवे. गोकाक अजून बराच रेंगाळत ३२१ वर आला आहे. मंदिवाल्यांच्या कापणीमुळें व वृषभांच्या (Bulls) टेक्यामुळें टाटा डिफर्ड व आर्डिनरी २१८३–१२, व ४०७ असे वर घेतले गेले आहेत. साडे तीन टक्का कागद १००–०–६ आहे तरी मागणी चांगलीच आहे व रहावी. एकूण बाजार तेजीत आले आहेत. सावध गुंतविणारांनीं त्याचा फायदा घेतलेला बरा. पुढें येणारी ८।१० दिवसांची सुट्टी लक्षांत ठेवावयास हवी. नुकतेंच सिमेंटनें सात रुपये व्याज जाहीर केलें आहे. २४७ च्या भावांत त्यामुळें सिमेंटला काय आकर्षण शिल्लक राहिलें आहे हें कळत नाहीं. केवळ युद्धोत्तर काळ चांगला आहे म्हणावें तर लोखंड, पोलाद, गिरण्या यांना काय वाईट येणार आहे हें विचारण्यासारखें आहे. घोरणी मंदीवाले ऋषभ (Bears) यापासून काय बोध घेतील हें सांगावयास नको.

त्रावणकोर स्टीम नॅव्हिगेशन कं. लि.

वरील आगबोट बहातुकीची कंपनी त्रावणकोर संस्थानांत नोंदण्यांत आली असून तिच्या भाग भांडवलापैकी ५१% भांडवल संस्थानानें घेतलें आहे. बाकीचें सर्व भांडवल शिंदा स्टीम नॅव्हिगेशन कं. लि. नें घातलें आहे. ह्या नव्या कंपनीचें अधिकृत भांडवल २५ लक्ष रुपये असून त्यापैकी १० लक्ष रुपयांचें भांडवल विकण्यांत आलेलें आहे. संस्थानाचे दिवाण हे डायरेक्टर बोर्डाचे अध्यक्ष आहेत.

स्फुट विचार

मित्रराष्ट्रांच्या सैन्यांची जर्मनींत चाल

युरोपांतील पश्चिम आघाडीवर मित्र सैन्यें जर्मनीमध्यें घुसलीं आहेत. ह्या वेळेपर्यंत मित्रराष्ट्रांच्या सैन्यांचा प्रतिकार स्वतः पादाक्रांत केलेल्या शेजारच्या देशांच्या प्रदेशांत शत्रू करीत होता. आतां त्यास प्रत्यक्ष स्वतःच्या देशाचा बचाव करण्याची पाळी आली आहे आणि त्या कारणानें त्याच्या लढायांची तीव्रता वाढली आहे. तथापि, ब्रिटिश, अमेरिकन व फ्रेंच फौजा हळु हळु जर्मनींत प्रगति करीत आहेत. जर्मन कितीहि कडवेपणानें लढले तरी त्यांचा पराजय आतां दृष्टिपथांत स्पष्टपणें आला आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. जर्मन राष्ट्र सर्व दिशांनीं घेरलें गेलें आहे एवढेंच नव्हे तर त्याचा एकामागून एक भाग मित्र राष्ट्रांच्या ताब्यांत येऊं लागला आहे. ही प्रगति सध्या मर्यादित असली तरी अंतिम विजयाचा तो निश्चित प्रारंभ आहे ह्यांत संशय नाहीं. जग जिंकावयास निघालेल्या हिटलरला स्वतःचा देश गमवावा लागत आहे. ह्या परिस्थितींत सर्वस्वी हताश होईपर्यंत तो आपल्या लोकांस लढवीत राहील ही गोष्ट लक्षांत घेऊन मि. चर्चिल ह्यांनीं आपले युद्धप्रयत्न चिकाटीनें चालू ठेवण्याची सूचना ब्रिटिश जनतेस नुकतीच दिली आहे. युद्धाचा शेवट जवळ आला ह्या भावनेनें ब्रिटिश राष्ट्रानें यत्किंचितहि ढिलेपणा करतां कामा नये असें त्यांचें सांगणें असून युरोपांतल्या लढाया बंद होण्यास आणखी सात-आठ महिनेहि लागण्याचा संभव आहे असा इषारा त्यांनीं दिला आहे. लोकांच्या मनांत भलत्या आशा उत्पन्न करावयाच्यो नाहींत, इतकेंच नव्हे तर त्यांचीं मनें अधिक स्वार्थत्यागास व अडचणींस तोंड द्यावयाच्या निश्चयास तयार करावयाचीं हें मि. चर्चिल ह्यांचें आजपर्यंत धोरण आहे आणि त्यांचें परवांचें युद्धविषयक भाषण त्यास सर्वस्वी धरून आहे. युरोपांतलें युद्ध संपल्याबरोबर जपानशीं अधिक जोरानें लढण्याची तयारी इंग्लंडला ठेवावयाची आहे ह्याचीहि आठवण त्यांनीं लोकांस करून दिली आहे. युरोपांतील पश्चिम आघाडीवर चाललेल्या लढायांच्या बातम्या येत आहेत त्यांवरून जर्मनांस स्वतःच्या देशांत हळु हळु माघार घ्यावी लागत आहे हें स्पष्ट दिसतें. तथापि, मि. चर्चिल ह्यांनीं दिलेल्या सावधगिरीची सूचना ध्यानांत बाळगली जाणें आवश्यक आहे.

इंग्लंडचा प्रचंड युद्धप्रयत्न व स्वार्थत्याग

गेल्या पांच वर्षांत इंग्लंडला कोणत्या प्रचंड प्रमाणांत युद्धाचे पायीं मनुष्यप्राण, द्रव्य व संपत्ति वेचावी लागली आहे, ह्याची माहिती ब्रिटिश प्रसिद्धीखात्याचे मंत्री, मि. बेंडन ब्रॅकन ह्यांनीं प्रकट रीतीनें दिली आहे. ब्रिटिश जनतेचा अपूर्व स्वार्थत्याग, तिची चिकाटी व शिस्त आणि तिचा दृढनिश्चय ह्यांची उत्कृष्ट कल्पना त्यांनीं दिलेल्या आकड्यांवरून येते. युद्धापूर्वी इंग्लंडच्या मालकीचें सोनें अमेरिकेंत होतें तें सर्व विकण्यांत येऊन त्याच्या सहायानें लढाऊ सामुग्री बनवण्यांत आली आणि बाहेरच्या देशांनीं पुरवलेल्या मालाची किंमत देण्यांत येऊन तो खरीदला आहे. युद्धपरिस्थितीमुळें ब्रिटिश जनतेस स्वतःचीं घरें सोडून स्थलांतर करावें लागलें आहे आणि अशा लोकांची संख्या सवांदोन कोटींच्या घरांत गेली आहे. साडेपांच हजार कारखान्यांची सरबी झाली आहे आणि जबर करांच्या ओझ्यामुळें श्रीमान व मध्यम स्थितींतल्या लोकांचा वर्ग बहुतेक नाहींसा झाला आहे. पांच वर्षांच्या अवधींत इंग्लंडनें एक लक्ष विमानें बनवलीं. सहा हजार मारमारी जहाजें आणि सदुसष्ट लक्ष टन वजनाचीं व्यापारी जहाजें इंग्लंडनें ह्या मुदतींत तयार केलीं आणि पंचेचाळीस लक्ष सैनिकांची फौज उभारली. शत्रूच्या हल्ल्यांमुळें ब्रेट ब्रिटनमधील एक तृतीयांश घरें नादुरुस्त झालीं, सत्तर लक्ष पुरुष लढाऊ पंथांत गुंतले आणि तितक्याच स्त्रिया कारखान्यांत काम करण्यास व इतर युद्ध कार्यक्रम पार पाडण्यास तयार झाल्या. होमगार्डमध्यें स्थानिक बचावासाठी साडेसतरा लक्ष लोकांची भरती झाली. म्हणजे, अगदी लहान मुलें, वृद्ध गृहस्थ व आजारी माणसें वगळून बाकी सर्व ब्रिटिश जनता युद्ध-प्रयत्नांत सामील झाली. शेतीची जमीन तेरा दशलक्ष एकरांची एकोणीस दशलक्ष झाली आणि ह्या रीतीनें अन्नसामुग्रीची पैदास वाढवण्यांत आली. युद्धांत पावणेदोन लक्ष सैनिक कामास आले आणि शत्रूच्या बाँबला अर्धा लक्ष लोक बळी पडले. एक कोटि, तीस लक्ष ब्रिटिश घरांपैकी पंचेचाळीस लक्ष पडलीं किंवा नादुरुस्त झालीं. समुद्रावर एक कोटि, पंधरा लक्ष टन वजनाचीं जहाजें बुडालीं. निर्गत व्यापारांत सत्तर टक्के घट झाली. सुमारें चौदाशे कोटि रुपयांचें ब्रिटिश भांडवल परदेशांत होतें तें संपून सुमारें तीन हजार कोटि रुपयांचें देणें इंग्लंडला झालें आहे. वरील माहिती, युद्धपरिस्थिति आतां अनुकूल झाल्यामुळें गुप्त ठेवण्याचें कारण राहिलेलें नाहीं म्हणून ब्रिटिश सरकारनें ती प्रसिद्ध केली आहे. तिचा उपयोग ब्रिटिश जनतेचा उत्साह वृद्धिंगत होण्यास आणि जगास इंग्लंडचा त्याग, निश्चयीवृत्ति व धैर्य ह्यांची कल्पना येण्यास झाल्यावांचून रहाणार नाहीं.

कापड व्यापाऱ्यांची कानउघाडणी

मुंबईमधील कापड व्यापाऱ्यांच्या सभेंत हिंदुस्थान सरकारच्या औद्योगिक व बिनलष्करी पुरवठ्याच्या खात्याचे चिटणीस सर अकबर हैदरी ह्यांनीं त्यांच्या काळ्या बाजारांतील कारवायांस उद्देशून नेमक्या आठवड्यांत चांगलीच कान उघाडणी केली. कापडाच्या किंमती योग्य प्रमाणांत उतराव्या ह्या उद्देशानें सरकारनें नियंत्रणाची विशिष्ट योजना अंमलांत आणली आणि तीमध्यें व्यापाऱ्यांचें सहकार्य मिळवण्यासाठी त्यांस सवलतीहि दिल्या. गिरणीवाले आणि कापड विकत घेणारी जनता ह्यांचा सदरहु योजनेस पाठिंबा मिळाला, पण व्यापारांनीं त्यांस देण्यांत आलेल्या नफ्यावर संतुष्ट न रहातां काळ्या बाजारांत भरमसाट किंमतींचा व्यवहार चालू ठेवला. सरकारची स्वस्त कापडाची योजना अयशस्वी करण्याचा चंग व्यापाऱ्यांनीं बांधला असल्याचें सर अकबर ह्यांस आढळून आल्यानें त्यांनीं ह्या लोकांस बजावलें कीं दोन महिन्यांच्या अवधींत कापड बाजारांत इष्ट सुधारणा झालेली न दिसल्यास सरकार सध्याचा काळा बाजार बंद पाडण्यासाठी कडक उपाय योजील आणि त्या योगानें व्यापाऱ्यांचा धंदा बसल्यास त्या आपत्तीची जबाबदारी त्यांच्या शिरावर राहील. स्वतःस मिळणाऱ्या नफ्याची मर्यादा सरकारनें वाढवून द्यावी अशी व्यापाऱ्यांची मागणी होती, तिला उद्देशून सर अकबर म्हणाले कीं त्यांचेपैकी कित्येक काळ्या बाजारांत पंचवीस टक्के फायदा उकळीत असतां त्यांस पाच टक्क्यांच्या वाढाव्याची आवश्यकता भासूं नये! काप-

ढाच्या व्यापारांत जेवढे मध्यस्थ व दलाल आहेत तेवढे अन्य व्यवहारांत क्वचित आढळतील, अशा स्थितींत व्यापाऱ्यांनी समजूतदारपणानें वागून काळ्या बाजार बंद करावा, नाहींतर स्वतःचा धंदा गमावण्यास तयार व्हावें असा स्पष्ट इषारा गंभीर शब्दांत त्यांनीं दिला. ह्याचा योग्य परिणाम होऊन कापडाच्या काळ्या बाजारास आळा बसून जनतेची आजची कुचंबणा नाहींशी होईल अशी आशा आहे.

दि बेलापूर कं. लि.

मक्रम रिझर्व्हें व रोख्यांत गुंतवणूक

३० सप्टेंबर, १९४४ अखेर संपलेल्या वर्षी वरील कंपनीस २ लक्ष, ५३ हजार रुपये घसारा खातीं घालून १२ लक्ष, ५५ हजार रुपये नफा झाला. त्यांतून प्रत्येक १००च्या मागास ९ रु. डिव्हिडंड देण्यासाठी ६ लक्ष, ७७ हजार रुपये लागतील. रिझर्व्ह फंडांत १½ लाखाची भर पडेल, कराच्या तरतुदीसाठी ३ लक्ष रुपये लागतील व रहाण्याच्या घरांच्या योजनेसाठी १ लक्ष रुपये राखून ठेवले जातील. "कामास मजूर मिळणें अत्यंत कठीण होतें. दररोज कारखान्यांत ऊस पोचविण्यास बैलगाड्याहि मिळेनात. खतांचाहि तुटवडा होता. विलायती खतांच्या अभावीं भुइमुगाच्या पेंढीवर अवलंबून रहावें लागलें व कित्येक प्रसंगीं तीहि वेळेवर हातीं न आल्याकारणानें पिकांस वक्तशीर मिळूं शकली नाहीं. कायद्याप्रमाणें मोठ्या प्रमाणावर धान्य पिकविण्याची सक्ती असल्याकारणानें १९४५-४६ च्या मोसमासाठी फारच कमी प्रमाणांत ऊंस मिळूं शकेल. कंपनीच्या जागेवर ३,७४९ एकरांत ऊंस लावलेला आहे, असा ३० सप्टेंबर, १९४४ चा आकडा आहे. चालू पीक खतांच्या तुटवड्यामुळें व अनिश्चित पुरवठ्यामुळें नेहमीइतकें चांगलें नाहीं." कंपनीचें वसूल भांडवल ३७ लक्ष, ६० हजार रुपये आहे व तिनें रिझर्व्ह फंड, रिझर्व्ह अगेन्स्ट इनव्हेस्टमेंट, कॉंटिन्जन्सीज फंड, क्रॉप इन्शुअरन्स फंड, घरें बांधण्याची योजना, कराची तरतूद, इत्यादि नांवांनीं सुमारें २२ लक्ष रुपयांचे फंड निर्माण केलेले आहेत. त्यांत चालू वर्षी सुमारें ६ लाखांची भर पडणार आहे. १९४३-४४ करतां कंपनीनें १० हजार रुपये इनकमटॅक्स दिला. कंपनीनें ८ लक्ष रुपये सरकारी रोख्यांत गुंतविलेले आहेत; गेल्या वर्षी हा आकडा फक्त १२ हजार रुपये होता.

उद्योगी नागपूर

नागपूर शहरांतील लहानमोठे उद्योगधंदे, विमा कंपन्या, बँका, कारखाने यासंबंधीं नागपुरांतील व नागपूर बाहेरच्या व्यापारी वर्गाला उपयुक्त ठरणारी अशी समग्र माहिती देणारें एक प्रकाशन 'उद्योगी नागपूर' या नांवानें लवकरच प्रसिद्ध करण्यांत येणार आहे. या प्रकाशनाची पृष्ठसंख्या डेमी साईजचीं सुमारें ५०० पृष्ठांएवढी रहाणार असून त्याची किंमत ५ रु. ठेवण्यांत येणार आहे. व्यापाऱ्यांच्या माहितीकरितां त्यांत हिंदुस्थान व प्रांतिक सरकारांनीं वेळोवेळीं काढलेलें हुकूमहि समग्र देण्यांत येतील. या प्रकाशनांतील कांहीं पृष्ठें व्यापाऱ्यांच्या जाहिरातींसाठीं ठेवण्यांत येतील. शिवाय, युद्धोत्तर पुनर्घटनेच्या प्रश्नांवर अधिकारी लेखकांचे प्रसिद्ध होतील.

यासंबंधीं कोणास अधिक माहिती हवी असल्यास त्यानें ना. मो. केळकर, चंदनबाईचा बगीचा, शिरस पेठ, नागपूर (सी. पी.) या पत्त्यावर पत्रव्यवहार करावा.

"मागोरा"चा अभिनव व आश्चर्यकारक शोध
ढेकणांच्या उदवर्त्या
(ABC)
BUG COILS (ABC)
प्रत्येक उदवर्ती रात्रभर जळते व तोंपर्यंत ढेकूण आपलें ठिकाण सोडून बाहेर येत नाहींत. विशिष्ट घुरामुळें हा चमत्कार होतो. बॉक्समध्यें १२ तांबड्या उदवर्त्या तांबड्या पॅकिंगमध्यें बॉक्स किं. रु. १८, ट. स. निराळा.
दि मागोरा केमिकल कं. लि.,
हिराबाग, पुणें २

'अर्थ' ग्रन्थमाला.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

पुण्यांतील
आदर्श निवासस्थान व भोजनालय
छाया लॉजिंग व बोर्डिंग हाऊस
बुधवार चौक, पुणें २.

—राष्ट्रीय काटकसर—
युद्धकार्याची गरज लक्षांत घेऊन डबे वा कागद यांची बचत करणें माग आहे. ही पॅकिंग-बाबतची अडचण लक्षांत घेऊन—
-गोल्डन कोको-
सुटा मिळण्याची सोय सर्व प्रमुख व्यापाऱ्यांकडे करण्यांत येत आहे. सुटा कोको घेण्यानें पैशाचीही बचत होते. मात्र आपणांस गोल्डन कोकोच मिळत आहे अशी खात्री करून घ्या. नांव लक्षांत ठेवा.
साठे बंधू, "गोल्डन कोको"
—सर्वत्र मिळतो—
साठे कोको व चॉकोलेट कारखाना, पुणें १.

डिस्ट्रिक्ट व सेशन्स जज्ज ह्यांची नेमणूक— आय. सी. एस. कशाला ?

सर जॉन बोमंट ह्यांनीं ईस्ट इंडिया असोसिएशनमध्यें वाचलेल्या आपल्या निबंधांत हिंदुस्थानांत—विशेषतः मुंबई प्रांतांत डिस्ट्रिक्ट व सेशन जज्जांच्या नेमणुका होतात,त्यासंबंधीं आपले विचार निर्भीडपणें व्यक्त केले. प्रत्येक जिल्ह्यासाठी एक डिस्ट्रिक्ट व सेशन्स जज्ज नेमलेला असतो. त्यांस अत्यंत विस्तृत फौजदारी अधिकार असतात व डिस्ट्रिक्ट जज्ज ह्या नात्यानें तो सबजज्जांकडील अपीलें ऐकतो. आपल्या जिल्ह्यांतील सर्व दिवाणी कोर्टांचीं कामें नीट चाललीं आहेत किंवा नाहींत हें पहाण्याचें काम त्याचें असतें व त्याचे मार्फतच हायकोर्ट आपल्या देखरेखीचें काम बजावतें. वकीलवर्ग, सबजज्जांची वढती व आय. सी. एस. ह्यांतून डिस्ट्रिक्ट जज्ज नेमले जातात. एकूण डिस्ट्रिक्ट जज्जांपैकी साधारणतः निम्मे आय. सी. एस. पैकी असतात. "कांहीं आय. सी. एस. मधील लोक न्यायखात्याकडे वर्ग होण्यास तयार असतात. परंतु कित्येक अशा नेमणुकीस विरोध दर्शवितात. सरकारी कारारभांत भाग घेण्याच्या बुद्धीनें मनुष्य आय. सी..एस. मध्यें जातो. त्याला जज्ज व्हायचें असेल तर तो वकिलीच्या धंद्याकडेच वळेल" असें सर जॉन बोमंट ह्यांचें मत आहे. कित्येक सनदी नोकरांनीं जज्जांचें काम चांगल्या रीतीनें केलेलें आहे. हे लोक हुशार व कार्यक्षम असतात व त्यांनीं कठोर परीक्षा देऊनच आपली लायकी सिद्ध केलेली असते. तथापि "प्रारंभींच्या शिकाऊ तरुण वयांत ज्यांनीं सरकारी नोकरी केली, अशांत स्वतंत्र वृत्तीचा अभाव दिसून येतो, सरकारी बाजूनेंच प्रत्येक प्रश्नाकडे पहाण्याची त्यांची प्रवृत्ति होते व ज्या प्रकारच्या गोष्टी आपण स्वतः केल्या आहेत, अशांना आतां बेकायदा ठरविण्यास ते उत्सुक नसतात. कोर्टांत स्वतः कामें केलेलीं नसल्या कारणानें इतर जज्ज कामें कशीं चालवितात, हें त्यांस पहावयास मिळत नाहीं व वकिलांशीं युक्तीनें वागणें त्यांस साधत नाहीं. सरकारी नोकरांतून जज्जांची निवड करणें हें घटनेच्या मूलतत्वांशीं विसंगत आहे. इतर कोठें दुसरे जज्ज मिळूं शकत नसतील, अशा अपरिहार्य परिस्थितींत गोष्ट वेगळी. फार काळापूर्वी अशी परिस्थिति होती, परंतु अजूनहि ती तशीच आहे काय व वकील वर्गातून लायक जज्ज मिळूं शकत नाहींत काय, हा महत्वाचा प्रश्न आहे. मुंबई प्रांतापुरतें बोलावयाचें झाल्यास, प्रांतिक न्यायखात्यांतून व वकील वर्गांतून कार्यक्षम जज्ज सहज मिळूं शकतील व त्यांतील सर्वोत्कृष्ट जज्जांना हायकोर्टांत चढती देण्यासहि हरकत नाहीं. वकील वर्ग आपल्यास न्यायाधीशाची जागा पुढें मागें मिळूं शकेल अशी नेहमी अपेक्षा करीत असतो आणि ती वाजवीहि पण आहे. हिंदुस्थानांतील वकीलवर्ग वजनदार व जागरूक आहे व त्यास निष्कारण तक्रारीस जागा देणें शहाणपणाचें ठरणार नाहीं." वरील शब्दांत सर बोमंट ह्यांनीं आपले विचार सडेतोडपणें मांडले आहेत. हायकोर्टांतील कांहीं जागा सनदी नोकरांसाठी राखून ठेवलेल्या असत, त्या हिंदी घटना कायद्यानें रद्द केल्या असल्या तरी सनदी नोकर इतरांपेक्षा कमी वयाचे असतांना डिस्ट्रिक्ट जज्ज होत असल्याकारणानें त्यांस श्रेष्ठत्व प्राप्त होऊन हायकोर्टांतील बहुसंख्य जागा सहज मिळवितां येतात हा मुद्दा सर बोमंट ह्यांनींच स्पष्ट केला आहे. हिंदी वकील वर्गातून लायक जज्ज मिळण्याची सुलभता व सनदी नोकरांतून त्यांची निवड करण्याची अनिष्टता ह्यांचें विवरण सर बोमंट ह्यांच्या सारख्या अनुभवी सेवानिवृत्त सरन्यायाधीशानें केलें आहे, त्याकडे लक्ष वेधणें हा येथें उद्देश आहे. जज्जांच्या नेमणुका करण्याची पद्धत बदलण्याचा प्रश्न अर्थातच लोकांच्या हातीं नाहीं, हिंदुस्थान सरकारच्या अधिकारांतहि तो येत नाहीं. सर जॉन बोमंट ह्यांच्या निबंधवाचनानंतर कांहीं उपवक्त्यांनीं आय. सी. एस. जज्जांच्या नेमणुकीचें समर्थन केलें, त्यांत अनपेक्षित कांहीं नाहीं नाहीं, परंतु त्यास सर बोमंट ह्यांनीं योग्य उत्तरें देऊन आपल्या मूळ मुद्यांचेंच समर्थन केलें.

लिमिटेड कंपन्यांच्या भागांचें तारण

लिमिटेड कंपन्यांचे शेअर्सचे तारणावर पुष्कळ वेळां बँका व इतर संस्था पैसे कर्जाऊ देतात. कित्येक कंपन्यांचे नियमांत " कंपनीचा, तिच्या प्रत्येक शेअरवर पहिला बोजा असेल " अशा अर्थाचा मजकूर असतो. ह्याचा अर्थ, एकाद्या कंपनीस तिच्या भागीदारानें कांहीं देणें असल्यास, तें देणें वसूल होईपर्यंत भागीदाराचे शेअर्स दुसऱ्यास वर्ग न करूं देण्याचा अधिकार कंपनीस आहे, असा होतो. हा अधिकार शेअर्सपुरताच नसून त्यावरील डिव्हिडंडवरहि राहूं शकतो. एकाद्या भागीदारानें बँकेकडून भागांच्या तारणावर कर्ज काढलें व बँकेनें कर्जाच्या वसुलीचे पोटीं शेअर्स स्वतःच्या नांवानें वर्ग करून कंपनीकडे मागितले, तर अशा शेअर्सवर कंपनीचा पहिला बोजा असल्याकारणानें कंपनीचे भागीदाराकडील येणें वसूल होईपर्यंत शेअर्स वर्ग करण्यास कंपनी तयार होणार नाहीं. सहाजिकच, कर्ज देणाऱ्या बँकेचें तारण कमी होईल. शेअर्स वर्ग केले, तर मात्र कंपनीनें त्यावरील आपला बोजा सोडून दिला आहे, असा अर्थ होतो. मि. मेयर निसिम ह्यांच्या एशियन कंपनीमधील शेअर्सबद्दल झालेला मुंबई हायकोर्टाचा ह्यासंबंधांतील निवाडा बोधप्रद आहे. मि. निसिम ह्यांच्या नांवें एशियनचे २६,००० शेअर्स होते. मि. निसिम ह्यांनीं एका बँकेस ते तारण देऊन बँकेकडून कर्ज घेतलेलें होतें. श्री. जमनादास मेहता ह्यांनीं मि. निसिम ह्यांच्यावरील कर्जाची जबाबदारी पत्करून वरील २६,००० शेअर्समध्यें हितसंबंध निर्माण केला होता, असें सांगण्यांत आलें व त्याप्रमाणें हे शेअर्स श्री. जमनादास मेहता ह्यांच्या नांवानें वर्ग करण्यांत यावे, अशी बँकेनें एशियन कंपनीकडे मागणी केली. अर्थातच, कंपनीनें ती अमान्य केली. कंपनीच्या आर्टिकल्सप्रमाणें, मि. निसिम ह्यांच्या भागांवर कंपनीचा बोजा असल्याकारणानें मि. निसिम ह्यांच्या एशियनमधील भागांचें इतर ठिकाणचें तारण निरुपयोगी ठरलें, असा हायकोर्टाच्या निवाड्याचा अर्थ होतो.

बाँबहल्ल्यांस बळी

जुलै १९४४ मध्यें ग्रेटब्रिटनवर झालेल्या बाँबहल्ल्यांत २,४४१ लोकांना मृत्यु आला व ७,१०७ लोक जखमी होऊन त्यांस इस्पितळांत ठेवून घ्यावें लागलें.

म्हैसूरमध्यें २२६ गांवांत वीज

म्हैसूर संस्थानांतील २२६ गांवांत व खेड्यांत उजेड, पाणी तापवणें, पिण्याचें पाणी व शेतीसाठी विहिरींतून पाणी काढणें वगैरे कामासाठी व दळण्याच्या, तांदूळ सडण्याच्या व तेलाच्या गिरण्यांसाठी विजेचा उपयोग केला जातो.

पूना गेस्ट हाऊस

संस्थापक :
के. नानासाहेब सरपोतदार
टेलिफोन नं. ७७९

महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्यांचे व्यापारी
गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें

प्रगतिपथावरील नवा

मै ला चा — द ग ड

सन १९४३ अखेर

नव्या कामांत	११० टक्के वाढ
चालू कामांत	१०० टक्के वाढ
आयुर्विमानिधींत	८० टक्के वाढ

— आपला विमा किंवा एजन्सी आजच घ्या —

दि औंध म्यूच्युअल लाइफ ॲश्युरन्स सोसायटी लि., पुणें.

आर. जी. साठे
सुपरिंटेंडेंट

व्ही. जी. जोशी
मॅनेजिंग डायरेक्टर

दि ब्रिटिश इंडिया जनरल इन्शुअरन्स कं. लि.

(स्थापना : १९१९)

आम्ही आयुर्विम्याखेरीज करून आग, मरीन, अपघात, इत्यादींचे सर्व प्रकारचे विमे स्वीकारतों.

—: चेअरमन व मॅनेजिंग डायरेक्टर :—
सर होमी मेहता, के. बी. ई., जे. पी.

पुणें शाखा :
मोति-माणिक मॅन्शन,
लक्ष्मी रोड.

हेड ऑफिस :
मेहता हाऊस,
अपोलो स्ट्रीट, मुंबई.

न्यू इंडिया इंडस्ट्रीज लि.

(Approved Re-treaders and Approved Contractors)
२६ लॅमिंग्टन नॉर्थ, मुंबई ११.
अध्यक्ष:—श्री. ग. स. मराठे, ॲक्चुअरी.

महाराष्ट्रांतील रबराचा प्रमुख कारखाना

★ गिरणीचे रोलर्स ★ रबरी हातमोजे ★ छापखान्यांचे रोलर्स
★ रीमोल्ड टायर्स ★ रबरी वॉशर्स ★ सॉलिड व्हील्स

व इतर रबरी माल तयार होतो.

पु. ग. मराठे
मॅनेजिंग डायरेक्टर.

हें पत्र पुणें, पेठ शनवार पे, नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' शनवार पे. नं. ९२७।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.

खालील पत्त्यावर चौकशी करावी.

व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

अर्थ

वर्गणीचे दर.

वार्षिक वर्गणी
रु. ४
(टपाल हंशील माफ)
किरकोळ अंकास
दोन आणे.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष १० पुणें, बुधवार तारीख १३ डिसेंबर, १९४४ अंक ४९

व्ही. पी. बेडेकर
आणि सन्स लि.
मुंबई.

मसाल्याचे व्यापारी

पुणें एजंट:—
द. ना. हेजीब

देना बँक
देवकरण नानजी बँकींग कं. लिमिटेड.

अधिकृत भांडवल...		...रु. १,००,००,०००
वर्गीकृत व खपलेलें भांडवल		...रु. ५०,००,०००
रिझर्व्ह फंड...		...रु. ११,००,०००
एकूण ठेवी ...	...३०-११-४४	...रु. ७,२२,४७,६५१
एकूण वर्किंग फंड...	"	...रु. ८,३८,५७,३८२
खात्यांची संख्या...	" ...	३२,०४३
शाखांची संख्या...	...	३३

देना बँकेच्या सर्व कचेऱ्यांत, हिंदुस्थान सरकारचे १० रुपये व १०० रुपये किंमतीचे प्राइझ बाँड्सहि विकत मिळतात.

" Consent of the Central Government has been obtained to this issue under Defence of India Rule 94-A. It must be distinctly understood that in giving this consent the Government of India do not take any responsibility for the financial soundness of any schemes or for the correctness of any of the statements made or opinions expressed with regard to them."

दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.

स्थापना : १९३५
हेड ऑफिस : पुणें शहर

विक्रीस काढलेलें नवीन भांडवल
रु. १०,००,०००

(प्रत्येकीं रु. ५० च्या २०,००० भागांत विभागलेलें)

वरील शेअर्स ता. ४-१०-४४ रोजीं बँकेच्या रजिस्टरवर असलेल्या शेअर-होल्डरांना त्यांच्या प्रत्येक जुन्या १ शेअरला १ नवीन शेअर असे रु. ५ वाढीनें देऊं केले आहेत. पहिल्या शेअर-होल्डरांनी घेऊन उरलेले शेअर्स इतरांस तेवढ्याच वाढीनें (रु. ५) देण्यांत येतील. अर्ज पाठविण्याची शेवटची तारीख १५-१२-४४ ही आहे.

—डायरेक्टर बोर्ड—
श्री. धों. कृ. साठे, चेअरमन

श्री. व्ही. पी. वर्दे, प्रो. व्ही. जी. काळे, श्री. एन. जी. पवार, श्री. टी. व्ही. रानडे, श्री. आर. सी. सोहोनी, श्री. एस. जी. मराठे, श्री. एम. आर. जोशी, श्री. एफ. डी. पदमजी, श्री. एम. व्ही. गोखले, श्री. व्ही. एच. देशमुख.

विशेष माहितीसाठी लिहा.

सी. व्ही. जोग, मॅनेजर

सांडू टोमॅटो कम्पाउन्ड
(ए. बी. सी. व्हिटॅमिनयुक्त)

स्फूर्तिदायक, पाचक व पौष्टिक. भूक न लागणे, पडुरोग, रिकेट्स व अशक्तता यांवर अत्यन्त उपयोगी

ओरिजिनल
ब्राम्ही तेलाचे
कारखानदार.

द. कृ. साडू ब्रदर्स, चेंबूर, लिमिटेड.
मॅन्यु. कमिस्टस व ड्रगिस्टस
चेंबूर मुंबई

पुणें चीफ एजंट :
मे. श्रीदत्त एजन्सी
१०० रविवार पेठ,
मोती चौक, पुणें २.

कोल्हापूर विक्रेते :
मे. भागवत आणि कं.
कांच लाइन

सातारा जिल्हा एजंट :
मे. जोशी आणि मंडळी
भवानी पेठ.

विविध माहिती

अमेरिकन उत्पादनांत प्रचंड वाढ

१९३९ साली अमेरिकेनें ४,६२,१०० टनांच्या वहातुकीच्या आगबोटी तयार केल्या, १९४३ मध्यें त्यांचें उत्पादन १,९७,८४,३०० टनांचें झालें. मॅग्नेशियमचें उत्पादन ६७ लक्ष पौंडांवरून ३९ कोटि पौंडांवर गेलें. कृत्रिम रबराच्या उत्पादनाचा आकडा २½ हजार टन होता तो ९ लक्ष टन झाला आहे.

नादुरुस्त इंजनांचें प्रमाण-तुलनात्मक आकडे

हिंदुस्थानांतील उतारूंच्या आगगाडयांच्या डब्यांत युद्धापूर्वी जेवढीं माणसें बसून प्रवास करीत असत, त्यांच्यापेक्षा ३२% अधिक माणसें आतां प्रवास करतात. मालगाडींत ८½% अधिक माल भरतो. आजारी इंजनांचें प्रमाण पाहिलें असतां इंग्लंडमध्यें किरकोळ नादुरुस्तीसाठी विश्रांति घेणारीं एकूण इंजनांच्या १४·३४% इंजनें आहेत तर हिंदुस्थानांत त्यांचें प्रमाण १५·९१% पडतें. मोठ्या दुरुस्तींत असलेल्या इंजनांचें प्रमाण इंग्लंडमध्यें ५·६६%, अमेरिकेंत ५·२% व हिंदुस्थानांत ५·५% आहे. इंजनांची तंदुरुस्ती हिंदुस्थानांत चांगल्या तऱ्हेनें राखण्यांत येते, असा निष्कर्ष वरील तुलनात्मक आकडयांवरून काढण्यांत येत आहे.

ब्रिटिश आगबोटींची खरेदी

ब्रिटिश आगबोटींची खरेदी करण्यासाठी हिंदुस्थान सरकारचे प्रतिनिधी इंग्लंडमध्यें गेले आहेत. अशा आगबोटी पुढें हिंदुस्थानांत बांधता याव्या, ह्या दृष्टीनेंहि बोलणीं होतीळ. आपल्या आगबोटी देऊन हिंदुस्थानचें देणें कांहीं अंशीं फेडण्यास इंग्लंडला ही संधी चांगली आहे.

भुइमुगाची पेंड

भुइमुगाच्या पेंडीचा मुंबई सरकारनें नियंत्रित केलेला भाव टनास ६० रुपये आहे. बिन गळक्या, बिन ठिगळाच्या, बिन रफूच्या भक्कम पोत्याचाहि त्या किंमतींत समावेश होतो.

म्हैसूर शुगर कं. लि.

वरील कंपनीनें ३० जून, १९४४ अखेर संपलेल्या वर्षी २,७४,५८७ टन ऊंस गाळला व २०,२१० टन साखर तयार केली. कंपनीला ढोक व निवळ नफा अनुक्रमें १८ लक्ष रु. व ७½ लक्ष रुपये झाला. व भागीदारांस २०% डिव्हिडंड मिळालें. कंपनीचें वसूल भांडवल २१ लक्ष रुपये असून तिचा रिझर्व्ह फंड ४२ लक्ष रुपये आहे. डिव्हिडंडचा दर न वाढवितां, कंपनीचा पाया भक्कम करण्याचें धोरण डायरेक्टरांनीं स्वीकारलें आहे.

असेंब्लीची येती बैठक

मध्यवर्ती असेंब्लीच्या अंदाजपत्रकाच्या बैठकीस ता. ८ फेब्रुवारी रोजीं प्रारंभ होऊन ती ५ एप्रिलपर्यंत तरी चालेल. ता. १५ फेब्रुवारी रोजीं रेल्वे बजेट व २८ फेब्रुवारी रोजीं मध्यवर्ती बजेट असेंब्लीस सादर करण्यांत येईल. बिनसरकारी ठरावांस तीन व बिनसरकारी बिलांस दोन दिवस मिळतील.

कलकत्ता शहरांत मलेरियाचें ठाणें

कलकत्ता शहरास मलेरियानें चांगलेंच ग्रासलें आहे. तेथील किमान एक लक्ष लोक तरी त्या रोगानें पछाडलेले आहेत. दुष्काळामुळें लोकांची रोगप्रतिकारक शक्ति नाहींशी झालेली आहे आणि त्यांतच कलकत्त्याच्या सदोष ड्रेनेज पद्धतीची भर पडली आहे. विशेषतः पूर्वभागास त्याचा फारच उपद्रव होतो.

कोळशाच्या खाणींची खरेदी

सिंगाराणी येथील कोळशाच्या खाणींच्या मालकी हक्काची खरेदी, शेअर्सची किंमत बाजारभावानें हिशोबांत, घेऊन १ कोटि १० लक्ष रुपये देऊन निजाम सरकारनें केली. सिंगाराणी कोलायरीज कं. लि. चे शेअर्स व डिबेंचर्स हैद्राबाद डेक्कन कंपनी लि. धारण करीत होती, त्याबद्दल व कोळसा आणि इतर खनिज पदार्थ ह्यांचें उत्पादन करण्याच्या संडाबद्दल मिळून ही रक्कम दिली गेली. सिंगाराणी कोलायरीज लि.कडे संडानें असलेल्या क्षेत्रांत एक अब्ज टन कोळसा असावा असें तज्ज्ञांचें म्हणणें आहे. १८८३ साली ह्या कंपनीनें कोळसा काढण्यास प्रारंभ केला व आतांपर्यंत फक्त २½ कोटि टन कोळसा खणून काढण्यांत आला आहे.

शेडयूल्ड बँकांत वाढ

रिझर्व्ह बँकेच्या दुसऱ्या शेडयूलमध्यें ५ बँकांची भर पडली असून शेडयूल्ड बँकांची संख्या ७९ वरून ८४ वर गेली आहे.

"दि टाइम्स" चा ५०,००० वा अंक

'दि टाइम्स' ह्या ब्रिटिश वृत्तपत्राचा ५०,००० वा अंक २५ नोव्हेंबर रोजीं प्रसिद्ध झाला त्यानिमित्त त्यास इंग्लंडचे राजेसाहेब व मुख्य प्रधान ह्या दोघांनीं संदेश पाठविले होते.

आगगाडीच्या पायरीवरून प्रवास

जी. आय. पी. रेल्वेच्या आगगाडयांच्या पायरीवर उभें राहून प्रवास केल्याबद्दल मुंबईमधील कोर्टात ऑक्टोबर महिन्यांत १६३ लोकांना शिक्षा झाली.

हिंदी कागदाचें उत्पादन

हिंदी गिरण्यांतील कागदाचें उत्पादन थोडें सुधारलें असल्याकारणानें, लोकांना वापरावयासाठी पूर्वीपेक्षां ज्यास्त कागद उपलब्ध करून देणें शक्य होत आहे, असें हिंदुस्थान सरकारनें जाहीर केलें आहे.

सर विश्वेश्वरअय्या 'डॉक्टर' झाले

पाटणा विश्वविद्यालयानें सर एम. विश्वेश्वरअय्या ह्यांस डी. एससी. पदवी अर्पण केली आहे.

"ब्रिटिश साम्राज्य पैसे लुबाडणारी टोळी नव्हे."

"ब्रिटिश साम्राज्य ही एक बळजबरीनें पैसे लुबाडणारी व ज्या पैशावर ग्रेटब्रिनचा नैतिक अधिकार नाहीं असा पैसा ब्रिटनमध्यें आणणारी एक प्रचंड संघटना आहे, अशी भाषा कधीकधी अमेरिकेंत ऐकूं येते. वस्तुतः साम्राज्यांतील कोणत्याहि भागांतून ब्रिटिश सरकारास एका पैचीहि प्राप्ति होत नाहीं, हें सत्य आहे." वरील उद्गार अमेरिकेंतील ब्रिटिश वकील लॉर्ड हॅलिफॅक्स ह्यांनीं शिकॅगो येथील आपल्या भाषणांत काढले. अमेरिकेच्या संडउसनवार मदतीमुळें, निर्गत व्यापाराची काळजी न करतां ग्रेटब्रिटन युद्धाकडे संपूर्णपणें लक्ष पुरवूं शकला; युद्ध संपतांच तात्काळ निर्गत व्यापार सुरू होण्यावरच ग्रेट ब्रिटन पुनः पूर्ववत् होणें अवलंबून आहे, असेंहि ते म्हणाले.

हालचालयुक्त व चित्तार्कषक.
चित्रकला प्रदर्शन
आर्यन सिनेमाजवळ, पुणें शहर
वेळः—३॥ ते रात्रौ १० वाजेपर्यंत

अनुक्रमणिका

	पृष्ठ
१ विविध माहिती ...	५०६
२ ठेवीदारांच्या हितासाठी बँकांवर कडक देखरेख	५०७
३ फ्रान्समधील चलन-व्यवस्था	५०८
४ स्फुट विचार... ...	५०९
वैमानिक वहातुक परिषदेची इतिश्री-हिंदी आरमार आणि जहाजांचा धंदा-धान्य गोळा करण्याची व्यवस्था- गुजची निर्बंधित किंमत	
५ रत्नाकर बँक लि. ...	५१०
६ व्यापारी शिक्षणाचें राष्ट्रीय महत्त्व ...	५११
७ वैयक्तिक रेशनकार्डास प्रारंभ	५११
८ पेनिसिलिन	५१२
९ गव्हाच्या पिकाचा अंदाज	५१२

अर्थ

बुधवार, ता. १३ डिसेंबर, १९४४

ठेवीदारांच्या हितासाठी बँकांवर कडक देखरेख

नव्या कायद्याचीं बंधनें

बँकांच्या नियंत्रणासाठी करण्यांत येत असलेल्या स्वतंत्र कायद्यामधील तपशीलवार कलमें पाहिलीं असतां, प्रस्तुत कायदा किती व्यापक स्वरूपाचा आहे ह्याची कल्पना येते. ठेवीदारांच्या हितास जपणें, हें त्या कायद्याचें मुख्य उद्दिष्ट आहे. शेडचूल्ड बँकांनीं रिझर्व्ह बँकेंत आपल्या रोजच्या ठेवींच्या विशिष्ट प्रमाणांत किमान रकम राखली पाहिजे, असें रिझर्व्ह बँक कायदा सांगतो, व ही रकम न ठेवणाऱ्या बँकांस दंडहि ठेवलेला आहे. तथापि, दंडादाखल भारी व्याज देऊन, शेडचूल्ड बँकांस आपलें रिझर्व्ह बँकेकडील डिपॉझिट जरूरीप्रमाणें काढून घेतां येतें व डिपॉझिटचा मूळ उद्देश सफळ होत नाहीं. ठेवीदारांच्या पैशांपैकी अगदी थोड्या भागाची ही गोष्ट झाली. उरलेल्या रकमा शेडचूल्ड बँकांनीं कशा व कोठें गुंतवाव्या, ह्यावर तर मुळीच बंधन नाहीं. कंपनी कायद्यानें बँकांचें किमान भांडवल, नफ्याच्या किमान हिश्याचा रिझर्व्ह फंडाकडे विनियोग, ठेवींच्या कांहीं किमान प्रमाणांत रोख रकम राखणें, इत्यादि बाबतींत बँकांवर बंधनें घातलेलीं आहेत व तीं मुख्यतः बिगर-शेडचूल्ड बँकांसच लागू पडतात, कारण शेडचूल्ड बँकांच्या संबंधीं नियम रिझर्व्ह बँक कायद्यांत वेगळे दिलेले आहेत. तथापि, हीं सर्व बंधनें ठेवीदारांच्या हितसंरक्षणास पुरेशीं नाहींत, असें आतां आढळून आलें आहे आणि सरकारनें नव्या कायद्यांत कडक उपाययोजना केली आहे.

सरकारी नियंत्रण कशासाठी?

बँकिंगसारख्या धंद्याच्या तपशीलांत सरकारनें किती हात घालावा, ह्यास कांहीं मर्यादा असूं नये काय? असा विचार प्रस्तुत समयीं मनांत येणें स्वाभाविक आहे. कायद्याचीं बंधनें अगदी जरूरीपुरतींच असावीं व बँकांनीं आपल्या विशिष्ट परिस्थितीप्रमाणें स्वतःवर आपण होऊन बंधनें घालून घ्यावीं ही गोष्ट सर्वांत उत्तम. इंग्लंड, फ्रान्स, इत्यादि देशांत बँकांवर कायदेशीर बंधनें फारच थोडीं आहेत. तेथील बँकांनीं मध्यवर्ती बँकेंत किती रकम ठेवावी हें सर्वस्वीं त्यांचेवरच सोपविलेलें आहे. तेथील बँकिंगची प्रगति स्पृहणीय नाहीं असें कोण म्हणेल? असें असतांना, हिंदी बँकांवरच सरकारी नियंत्रणें इतकी कां असावीं? ह्याचें उत्तर, मेल्या कांहीं वर्षांतील बँकिंगच्या पंचास मिळत चाललेल्या अनिष्ट वळणामध्यें आढळून येईल. मोठ्या, नामवंत व जुन्या बँकांशीं स्पर्धा करून नव्या बँकांना पुढें यावयाचें असल्याकारणानें, त्यांस आपल्या प्रतिस्पर्ध्यांपेक्षा खालच्या पातळीवर येऊन व्यवहार करण्याचा मोह उत्पन्न होतो आणि एकदा खोडी व मजबुती ह्यांचा पाया सुटला म्हणजे तोल संभाळणें कठीण जातें. अशा बँकांच्या व्यवहाराचें प्रभावी नियंत्रण सरकारी कायद्यानेंच केल्यासेरीज भागणार नाहीं, हें उघड आहे.

इष्ट गोष्ट आतां अपरिहार्य झाली

रिझर्व्ह बँकेनें १९३९ सालींच ह्यासंबंधांत आपलें म्हणणें हिंदुस्थान सरकारास कळवून व इष्ट योजनेच्या विधेयकाचा मसुदा तयार करून, पाठविला होता. नवीन बँकिंग कंपनीज ॲक्ट ह्याच सूचनांवर आधारण्यांत येणार असला तरी त्यांतील कलमांनीं बँकांस मूळ कल्पनेपेक्षा पुष्कळच घट्ट बांधून टाकलेलें आहे, असें दिसून येईल. बँकांनीं घ्यावयाचीं कर्जे, रोख बाळगावयाच्या रकमा, रिझर्व्ह बँकेस सादर करावयाचे हिशेबाचे तक्के, बँकांची तपासणी, बँकांवर इलाज करण्याचे सरकारचे अधिकार, इत्यादींसंबंधीं सरकारनें घातलेल्या बंधनांची माहिती खाली दिली आहे, तीवरून सरकार बँकांच्या दैनंदिन व्यवहारावर कसें नियंत्रण ठेवूं पहात आहे, हें लक्षांत येईल. १९३९ सालीं जी गोष्ट इष्ट वाटली, ती आतां अपरिहार्य झाली आहे. आग लागल्यावर ती विझविण्याच्या प्रयत्नास लागण्यापेक्षा, तिचा प्रतिबंध करणें हेंच योग्य, ह्या न्यायानें बँकिंगविषयक कायद्यास उशीर झाला असला तरी झापुढें मात्र दिरंगाई न करण्याचें सरकारचें धोरण निश्चित दिसतें.

कर्जावर निर्बंध

बँकिंग कंपनीनें आपल्या स्वतःच्या न वसूल केलेल्या भाग भांडवलावर बोजा निर्माण करतां कामा नये. असा बोजा बेकायदा ठरेल. आपल्या स्वतःच्या शेअर्सचे तारणावर कर्ज देण्यास बँकांना बंदी करण्यांत आलेली आहे. त्याचप्रमाणें, आपल्या डायरेक्टरांस किंवा ज्या फर्म्स व कंपन्या ह्यांत आपल्या डायरेक्टरांचा किंवा बँकेचा स्वतःचा भागीदार, डायरेक्टर, मॅनेजिंग एजंट, ह्या नात्याचा संबंध आहे अशांना विमर-तारण कर्जे देण्याचीहि बँकांना बंदी केलेली आहे.

रोख रकम व ब्रि. हिंदुस्थानांत गुंतवणूक

कायद्यास प्रारंभ झाल्यानंतर दोन वर्षांपासून प्रत्येक बँकेनें ब्रिटिश हिंदुस्थानांतील आपल्या रोजच्या एकूण देण्याच्या २५% इतकी रकम रोख, सोनें, मान्य केलेले व इतर ठिकाणीं तारण न दिलेले रोखे (ज्यांची बाजार भावानें होणाऱ्या किंमतीपेक्षा ज्यास्त किंमत हिशेबांत धरतां कामा नये) ह्यांच्या स्वरूपांत राखली पाहिजे. देण्याचा आकडा ठरवितांना वसूल भांडवल, रिझर्व्ह, नफा-तोटा खात्यांतील शिल्लकी नफा, रिझर्व्ह बँकेकडून घेतलेलें कर्ज, हीं विचारांत घेण्याचें प्रयोजन नाहीं. ब्रिटिश हिंदुस्थान व ग्रेट ब्रिटन ह्यांचे बाहेर स्थापन झालेल्या बँकेनें ११

(२) ह्या कलमाप्रमाणें रिझर्व्ह बँकेकडे ठेवलेले डिपॉझिट किंवा रिझर्व्ह बँक कायद्याच्या ४२ व्या कलमानुसार शेडयूल्ड बँकेनें ठेवलेली रक्कम ही वरील १५% मध्यें मोजण्यास हरकत नाहीं. ह्याप्रमाणें बँका आपले पैसे ठेवतात किंवा नाहीं, ह्यावर रिझर्व्ह बँकेची दैनंदिन देखरेख रहावी, ह्याकरितां प्रत्येक बँकेनें रोजच्या माहितीचा ठराविक तक्ता दर आठवड्यास रिझर्व्ह बँकेकडे पाठविला पाहिजे. ब्रिटिश हिंदुस्थानांतील आपल्या ३१ डिसेंबर रोजींच्या देण्याच्या किमान ७५% इतकी तरी रक्कम बँकांनीं ब्रिटिश हिंदुस्थानांतच गुंतविलेली असली पाहिजे.

प्रत्येक बँकेनें दरमहा ठराविक नमुन्याप्रमाणें व ठराविक वेळेस आपली ब्रिटिश हिंदुस्थानांतील येणीं-देणीं दाखविणारा तक्ता रिझर्व्ह बँकेकडे धाडला पाहिजे. बँकेनें दिलेल्या कर्जांची व गुंतविलेल्या रकमांची वर्गवारी (व्यापार, उद्योगधंदे आणि शेती) रिझर्व्ह बँक दर सहामाहीस मागूं शकेल व ती तिला योग्य वाटेल त्या स्वरूपांत एकत्रित स्वरूपांत प्रसिद्ध करूं शकेल.

बँकांतील कित्येक ठेवींच्या खात्यांत वर्षानुवर्ष व्यवहार होत नाहीं. ब्रिटिश हिंदुस्थानांतील अशा ज्या खात्यांत १० वर्षे व्यवहार झालेला नाहीं, त्यांचा तपशील दरवर्षी बँकांनीं रिझर्व्ह बँकेकडे पाठविला पाहिजे व प्रत्येक खात्यांतील बाकी त्यांत नमूद केली पाहिजे.

हिशेबाचें वर्ष संपल्यानंतर तीन महिन्यांचे आंत बँकांचे ताळेबंद व नफातोटा पत्रक रिझर्व्ह बँकेकडे रवाना झालीं पाहिजेत. ब्रिटिश हिंदुस्थानाबाहेर स्थापन झालेल्या बँकांनीं आपल्या ऑडिट झालेल्या हिशेबांचे तक्ते प्रामुख्यानें दिसतील अशा रीतीनें ब्रिटिश हिंदुस्थानांतील आपल्या शाखांतून टांगून ठेवले पाहिजेत.

तपासणी, रिपोर्ट व उपाययोजना

मध्यवर्ती सरकार रिझर्व्ह बँकेस कोणत्याहि बँकेची तपासणी करण्यास, तिचे हिशेब तपासण्यास व सरकारकडे रिपोर्ट करण्यास, खालील प्रसंगीं सांगूं शकेल:—सरकारच्या मतें (१) बँकेच्या ठेवीदारांच्या हितसंबंधांस धोका आहे, (२) बँकेला आपलीं देणीं देतां येत नाहींत, (३) प्रस्तुत कायदा पाळण्यांत बँकेनें कसूर केलेली आहे, (४) बँकेनें किंवा बँकेच्या अधिकाऱ्यानें कायदा मोडून गुन्हा केला आहे किंवा गुन्हा होण्याचा संभव आहे, (५) इतर कांहीं कारणांसाठी तपासणी करणें इष्ट किंवा आवश्यक आहे.

ठेवीदारांच्या हितास विघातक अशा रीतीनें बँकेचा व्यवहार चालू आहे अशी वरील रिपोर्टावरून सरकारची खात्री झाल्यास, सरकार बँकेला नव्या ठेवी स्वीकारण्याची बंदी करूं शकेल, शेडयूल्ड बँकेचें नांव शेडयूलमधून काढून टाकूं शकेल, बँक किंवा गुंडाळण्यांत यावी, असा अर्ज करण्यास रिझर्व्ह बँकेस सूचना देऊं शकेल. ह्याप्रमाणें काढलेला हुकूम हिंदुस्थान सरकारास केव्हांहि रद्द करतां येईल किंवा बदलतां येईल. बँकेस योग्य मुदतीची सूचना देऊन, रिझर्व्ह बँकेनें सादर केलेला रिपोर्ट प्रसिद्ध करण्याचा हिंदुस्थान सरकारास अधिकार आहे.

लिक्विडेशनच्या कामांत दिरंगाई नाहीं

सहाव्या कलमापासून वरील अठ्ठाविसाव्या कलमांपैकी कोणत्याहि कलमाचा भंग झाल्यास, तो भंग होण्यांत बुद्धिपुरस्सर हात असलेला बँकेचा प्रत्येक डायरेक्टर व अधिकारी ह्यांस जितके दिवस भंग चालू आहे, त्या प्रत्येक दिवसागणिक ५०० रुपयांपर्यंत दंडाची शिक्षा कायद्यानें सांगितली आहे. जिंदगीच्या ठराविक प्रमाणांत रोख रकम राखणें वगैरे संबंधांतील कलमांची अंमलबजावणी करण्यांत एकाद्या बँकेनें कसूर केली, तर तीस दिवसांत कलमांचे चौकटींत येण्याविषयीं रिझर्व्ह बँक तिला नोटीस देईल व ह्या मुदतींतहि बँक त्याप्रमाणें वागूं शकली नाहीं तर रिझर्व्ह बँक ती बँक गुंडाळण्यांत यावी असा कोर्टाकडे अर्ज करील. एकाद्या बँकेस तात्पुरत्या काळापुरतीं आपलीं देणीं देणें अशक्य होत असल्यास व तिनें कोर्टाकडे तसा अर्ज केल्यास, त्या बँकेविरुद्ध दावे व कारवाया कांहीं ठराविक काळ कोर्टास इष्ट वाटेल त्या अटींवर बंद रहाव्यात, असा हुकूम कोर्ट देऊं शकेल. ही मुदत एकूण तीन महिन्यांपेक्षां ज्यास्त मिळणार नाहीं. "बँकेचा अर्ज मंजूर केल्यास तीं आपलीं देणीं भागवूं शकेल," असा रिझर्व्ह बँकेचा रिपोर्ट अर्ज करणाऱ्या बँकेनें दाखल केला पाहिजे. परंतु विशेष कारणांसाठी ह्या रिपोर्टाची अट दूर करण्याचा कोर्टास अधिकार आहे. बँक कोर्टामार्फत लिक्विडेशनमध्यें जावयाची असल्यास रिझर्व्ह बँकेलाच ऑफिशिअल लिक्विडेटर म्हणून नेमण्यांत येईल. आपल्या घेणेकऱ्याचे पैसे रुपयांत सोळा आणे परत करतां येण्याजोगी बँकेची परिस्थिति आहे, असें रिझर्व्ह बँकेचें सर्टिफिकेट मिळालेल्या बँकेसच आपण होऊन व्यवहार गुंडाळतां येईल. कोर्टापुढें हें काम चालू असतांनाच, बँकेस आपलीं देणीं भागवितां आलीं नाहींत, तर रिझर्व्ह बँकेच्या अर्जावरून कोर्टामार्फत वाइंडिंग अपचा हुकूम कोर्ट देऊं शकेल.

नियम करण्याचा अधिकार

प्रस्तुत कायद्यास धरून व कायद्यांतील तरतुदी अंमलांत आणण्यास आवश्यक असे नियम रिझर्व्ह बँकेच्या सल्ल्यानें करण्याचा हिंदुस्थान सरकारास अधिकार आहे. कायद्याप्रमाणें पाठवावयाच्या तक्त्यांतील तपशील व तक्ते पाठविण्याची पद्धत ह्यासंबंधांत हे नियम विशेष खुलासा करतील. हे सर्व नियम सरकारी गॅझेटांत प्रसिद्ध झाल्यापासून सहा महिन्यांचे आंत अंमलांत येऊं शकणार नाहींत. रिझर्व्ह बँकेनें करावयाच्या व्यवहारांत, "१९४५ च्या बँकिंग कंपनीज ॲक्टाप्रमाणें बँकेचा व्यवहार करणें" अशी भर घालून, रिझर्व्ह बँकेच्या कायद्यांतील १७ वें कलम दुरुस्त करण्यांत आलें आहे.

फ्रान्समधील चलनव्यवस्था—सोनें विक्री बंद

फ्रान्स बंधमुक्त झाल्यावरोबर तेथें अंमलांत आणावयाच्या चलनव्यवस्थेची तपशीलवार योजना अगदी तयार ठेवण्यांत आली होती, परंतु अद्याप ती अंमलांत आणण्यांत आलेली नाहीं. फ्रान्समधील दळणवळणाचीं साधनें नाश पावलीं अथवा नादुरुस्त झालीं असल्याकारणानें, पॅरिससारख्या मध्यवर्ती केंद्रांतून सबंध फ्रान्सचा राज्यकारभार चालविणें अशक्य झालें. प्रत्येक जिल्ह्याची व्यवस्था स्थानिक अधिकारीच पहात आहेत. नवीन नोटा प्रसृत करावयाच्या मार्गांतील ही अडचण अति महत्त्वाची आहे. नव्या चलन व्यवस्थेच्या अंमलबजावणीस जसजसा विलंब होईल, त्या मानानें तिला राजकीय विरोधहि वाढत्या प्रमाणांत होऊं लागेल. तूर्त तरी तेथें महागाई वाढत चालली आहे व चलनविस्तारास आळा अद्याप बसूं शकत नाहीं. सोन्याची खरेदीविक्री मात्र बंद करण्यांत आली आहे.

स्फुट विचार

वैमानिक वहातुक परिषदेची इतिश्री

शिकॅगो (अमेरिका) येथें युद्धोत्तर वैमानिक वहातुकीचा विचार करण्यासाठी एक आंतरराष्ट्रीय परिषद नुकतीच भरली होती, तीमध्यें महत्त्वाच्या मुद्यांवर इंग्लंड व अमेरिका ह्यांत मतभेद असलेले आढळून आले आणि परिषद निष्फळ ठरली ! अमेरिकेचें आर्थिक व औद्योगिक बळ इतर सर्व राष्ट्रांपेक्षां अनेक पटींनीं मोठें असल्याकारणानें, वैमानिक वहातुकीचे संबंधांत खुल्या स्पर्धेस वाव ठेवला, तर इंग्लंडसारख्या राष्ट्रांना त्या वहातुकींत स्थान राहणार नाहीं, अशी इंग्लंडला भीति वाटत आहे. म्हणून, ह्या वहातुकीवर कांहीं बंधनें घालून प्रत्येक राष्ट्रास योग्य वाव मिळावा, अशी इंग्लंडची मागणी होती. अर्थात, " प्रत्येक राष्ट्राच्या " वतीनें इंग्लंडची कारवाई चालू असली, तरी ब्रिटिश हितसंबंधाचा विचार त्याचे बुडाशी प्रामुख्यानें होता हें उघड आहे. इंग्लंडनें थोड्याशा सवलती देऊं करून, एका २१ सभासदांच्या आंतरराष्ट्रीय कौन्सिलकडे सर्व मुद्यांचा असेर निर्णय सोपविण्यास तयारी दर्शविली, परंतु खुल्या स्पर्धेची आपली भूमिका सोडण्यास अमेरिका तयार झाली नाहीं. आंतर-राष्ट्रीय आर्थिक व व्यापारी घडामोडींत आजचें अमेरिकेचें अग्रेसरत्व व इंग्लंडप्रभृति राष्ट्रांचें दुय्यम स्थान, ह्यांचें प्रस्तुत परिषदेचा निष्फळपणा हें निदर्शक समजावयाचें काय ? आंतरराष्ट्रीय स्वरूपाच्या संघांमध्यें इंग्लंडचें त्याच्या साम्राज्यांतीट देशांच्या सहकार्यानें नेहमीच बहुमत होणार असलें, तर अशा संघांत अमेरिकेसारखी स्वावलंबी व महाबलवान राष्ट्रें सामील होऊन आपलें भवितव्य दुसऱ्याचे हातीं कां देतील ?

हिंदी आरमार आणि जहाजांचा धंदा

किनाऱ्याच्या लांबीच्या दृष्टीनें जगांतील देशांमध्यें हिंदुस्थानचा नंबर बराच वर लागतो. किनाऱ्याची लांबी आणि देशाचें संरक्षण व व्यापार ह्यांचा निकट संबंध आहे. शत्रूपासून देशाचें संरक्षण करण्यासाठी समुद्रवेष्टित देशांस आरमार सिद्ध ठेवावें लागतें आणि व्यापारी जहाजांच्या वहातुकीची व्यवस्था करणें आवश्यक होतें. जथ्थ्यत आरमार राखून व्यापारी जहाजांच्या धंद्यास उत्तेजन देण्याचें धोरण राष्ट्रीय सरकारें अंगिकारतात तें स्वाभाविकच होय. हिंदुस्थानांत मात्र राष्ट्रीय आरमार आणि व्यापारी जहाजांचा धंदा ह्यांचेकडे परवापरवापर्यंत दुर्लक्षच झालें आहे आणि सरकारचें उत्तेजन ह्या संबंधांत मिळवण्याच्या लोकांच्या प्रयत्नास म्हणण्यासारखें यश आलें नव्हतें. तथापि, ह्या प्रश्नाचें महत्त्व युद्धविषयक गरजांनीं सरकारच्या निदर्शनास आणलें आणि गेल्या आठवड्यांत सर अझीजउल हक आणि व्हाइसरॉय लॉर्ड वेव्हेल ह्यांनीं केलेल्या एतद्विषयक भाषणांवरून युद्धोत्तरकाळांत हिंदुस्थानांत जहाजांचा धंदा मोठ्या प्रमाणावर चालू होण्याचें महत्त्व सरकारास पटलें आहे असें दिसून येतें. किनाऱ्यालगतची वहातुक आणि खुल्या समुद्रावरील वहातुकींचा योग्य हिस्सा हिंदी मालकीच्या आणि हिंदी व्यवस्थेखालील जहाजांस मिळाला पाहिजे अशी लोकमताची मागणी आज कित्येक वर्षांची जुनी आहे. जहाजांच्या तुटवड्याचा कटु अनुभव प्रस्तुत युद्धकाळांत आल्यामुळें सरकारच्या धोरणांत इष्ट असा बदल होत आहे. त्याचा परिणाम विधायक कृतींत होणें मात्र अत्यंत महत्त्वाचें आहे.

धान्य गोळा करण्याची सरकारी व्यवस्था

मुंबई प्रांताप्रमाणें हिंदुस्थानांत कित्येक भागांत धान्याची वाटणी ठराविक किंमतीनें जनतेंत व्हावी म्हणून सरकारांनीं सक्तीच्या खरेदीची व्यवस्था केली आहे, तिची पहाणी करून हिंदुस्थान सरकारच्या अन्न खात्याचे खास अधिकारी मि. बटलर ह्यांनीं स्वतःचा तिच्या संबंधांत अभिप्राय सादर केला आहे. शेतकरी वर्गाकडून ठराविक प्रमाणांत आणि निश्चित किंमतीनें सक्तीनें धान्य खरेदी करण्याची योजना अंमलांत आहे ती पुष्कळांशी यशस्वी झाली असून कित्येक ठिकाणीं तिच्या बाबतींत घडलेल्या चुका अपवादात्मक गणल्या पाहिजेत असें त्यांचें म्हणणें आहे. तुटवड्याच्या भागांस धान्य पुरवतां येऊन त्याच्या किंमती स्थिर राखण्यांत यश येणें हा सक्तीच्या सरकारी खरेदीच्या व्यवस्थेची यशस्विता सिद्ध करण्यास पुरेसा समाधानकारक पुरावा आहे असा मि. बटलर ह्यांचा सिद्धांत आहे. मामुली परिस्थितींत हिंदुस्थानची धान्य निर्गत महत्त्वाची नाहीं आणि धान्याची खोडी आयात होते तेव्हां ती अंतर्गत किंमतीपेक्षां स्वस्त भावानें होते. ह्या दृष्टीनें पहातां, हिंदी शेतकऱ्यांस आपल्या मालास चांगला भाव मिळावा आणि त्यांची रहाणी सुधारण्यास मदत व्हावी ह्या हेतूनें सरकारी नियंत्रणाची व्यवस्था सध्याच्या पद्धतीस धरून युद्धपरिस्थितीची गरज भागल्यानंतरहि चालू रहावी अशी त्यांची सूचना आहे. त्यांनीं असेंहि सुचवलें आहे कीं धान्य जमविण्याची सक्तीची योजना सरकारनें अंगिकारली असतां खेडेगावीं लोकांसहि धान्य पुरवण्याची जबाबदारी त्यावर येऊन पडते आणि ती त्यानें स्वीकारली पाहिजे. मि. बटलर ह्यांच्या शिफारसी येणेप्रमाणें आहेत:—शेतकऱ्यांच्या जरुरी इतकें धान्य त्यांच्यापाशी राहूं देऊन बाकीचें सरकारनें घ्यावें. ब्रिटिश प्रांत आणि संस्थानें ह्यांचेमध्यें धान्य योजनेचा मेळ घालण्यांत यावा. घाऊक व्यापाऱ्यांनीं केवळ सरकारच्या वतीनें धान्य साठवणीचा व विक्रीचा व्यवहार करावा. धान्याच्या व्यवस्थेची देखरेख नीट व्हावी म्हणून खास अधिकाऱ्यांची योजना केली जावी. धान्य व्यवहारांतील लाचलुचपतीचें उच्चाटन करण्याचा प्रयत्न व्हावा. धान्य व्यवस्थेच्या देखरेखीची कार्यक्षम व्यवस्था आज अंमलांत नसल्यानें साठे नासतो, नाहींसा होतो, इत्यादि अडचणी उद्भवल्या आहेत, त्यांचा उल्लेख मि. बटलर ह्यांनीं केला आहे आणि त्या संबंधांत योग्य तजवीज केली जाण्याचें महत्त्व प्रतिपादिलें आहे. ह्या संबंधांत आणि धान्यांचे भाव निश्चित करण्यांत मध्यवर्ती सरकारनें पुढें पाऊल टाकावें असें त्यांचें म्हणणें आहे.

गुळाची नियंत्रित किंमत किती असावी ?

मुंबई कॅनॉल्स इरिगेटर्स असोसिएशननें गव्हर्नरांचे सल्लागार, सर हेनरी नाइट, ह्यांस एक पत्र पाठवून गुळाच्या नियंत्रणासंबंधीं आपलें मत कळविलें आहे. वास्तविक, गुळाच्या किंमतीवर नियंत्रण बसविण्यांत वेडें नये, परंतु किंमत नियंत्रित करण्याचें सरकारनें ठरविलेंच तर ती किंमत १८ ते २० रुपये मण किंवा ५४ ते ६० रुपये पक्का इतकी तरी किमान असावी, असें असो-

सिएशनचें म्हणणें आहे. १४ रुपये मण किंवा ४२ रुपये पट्टा असा दर ठरविण्यांत येणार आहे, अशी माहिती बाहेर आली आहे, परंतु ही किंमत ऊस करणारांस मारक ठरणारी आहे, कारण नियोजित नियंत्रित दरानें दर एकरी उत्पन्न १,३०० रुपये येईल व खर्च मात्र १८०० ते २,००० रुपये होईल, असा असोसिएशनचा युक्तिवाद आहे. मुंबई कालव्याखालील जमिनी निकृष्ट असल्याकारणानें, त्यांत दर एकरी फक्त ३० पट्टे गूळ सरासरीनें होतो, असें असोसिएशननें आपल्या पत्रांत नमूद केलें आहे. उसाच्या व गुळाच्या उत्पादनाची किंमत वाढली आहे, ह्यांत संशय नाहीं, तथापि गूळ करून त्याच्या पैशांतून व्यवहार व निर्वाह करणाऱ्या शेतकऱ्याप्रमाणें इतर उपभोक्त्या खेडेगांवी जनतेचाहि विचार सरकारास करणें भाग आहे. उत्पादन खर्चाचा व दर एकरी उत्पादनाचा आकडा शक्य तितका अचूक ठरवून त्यावर नियंत्रित किंमत आधारावी लागेल, हें उघड आहे. ऊस व गूळ करणें नुकसानकारक होऊं नये, ही असोसिएशनची मागणी अर्थातच रास्त आहे.

दि रत्नाकर बँक लि., कोल्हापूर

३० जून अखेरचा आढावा

ता. ६ ऑगस्ट, १९४३ रोजीं वरील बँकेनें कोल्हापूर व सांगली ह्या दोन ठिकाणीं धंद्यास प्रारंभ केला. ४ जानेवारी, १९४४ रोजीं बँकेची स्टॅच्युटरी सभा भरली व २७ ऑक्टोबर रोजीं ३० जून, १९४४ अखेरचा अहवाल साधारण सभेस सादर करण्यांत आला. बँकेचे ऑर्डिनरी व डिफर्ड मिळून ६,०८,५०० रुपयांचे भाग खपले असून वसूल भांडवल ३,०४,१५५ रुपये आहे. ठेवींचा आकडा ६½ लक्ष रुपयांवर आहे. बँकेनें सुमारें २ लक्ष रुपये रोख व बँकांत ठेवले असून ७ लाखांवर रकम कर्जाऊ दिलेली आहे. प्राथमिक खर्च ५,२५४ रुपये झालेला आहे. पहिल्याच अकरा महिन्यांत तिला १०,८२३ रुपये निवळ नफा झाला आहे. बँकेचें हिशेबाचें वर्ष डिसेंबर अखेर आहे, त्यावेळीं पहिला वार्षिक आढावा प्रसिद्ध होईल. बँकेची स्थापना मजबूत भाग भांडवलावर झाली असून पैसे किफायतशीर गुंतवण्यास पहिल्यापासूनच प्रारंभ झाला आहे. श्री. बी. बी. पाटील, बी. ए., एलएल. बी., सांगली हे बँकेचे चेअरमन असून श्री. री. एन. गरगटे, बी. ए., एलएल. बी., हे मॅनेजर आहेत.

उत्तर किती चुकलें ?

आपल्या जवळ एक सहस्रांश इंच इतका पातळ मोठा थोरला एक कागद आहे, असें समजा. कागदाचे दोन सारखे तुकडे करून एकावर एक ठेवा. ते पुनः मधें फाडून एकावर एक असे ठेवा. ते पुनः फाडून आठ तुकडयांची रास करा. अशा रीतीनें ५० वेळा करा, रास किती उंच होईल ? कांहीं लोक २ इंच, तर कांहीं लोक १ फूट; कांहीं लोक १०० फूट असें उत्तर देतील. सुमारें १ कोटि, ७० लक्ष मैल, असें खरें उत्तर आहे ! पहिल्यांदा प्रथम कागद फाडला, तेव्हां २ तुकडे झाले; दुसऱ्यांदा फाडला तेव्हां ४ म्हणजे २ च्या वर्गाइतके झाले. ५० वेळा कागद फाडल्यावर २ चा ५० वा वर्ग इतके तुकडे होतील. २ चा ५० वा वर्ग म्हणजे ११,२६,००,००,००,०००,००० एवढा प्रचंड आंकडा होतो. एक इंच जाडींत १,००० तुकडे बसतात, ह्या हिशेबानें त्यांची रास १,१२,६०,००,००,००,०० इतकी इंच उंच होईल. त्याचे १७,००,००,०० मैल होतात !

दि बँक ऑफ इंडिया लि.

[स्थापना : १९०६]

अधिकृत भांडवल	...	...	रु.	२,००,००,०००
वसूल झालेलें भांडवल	...	...	रु.	१,००,००,०००
रिझर्व्ह फंड	...	...	रु.	१,२१,००,०००

मुख्य कचेरी : ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

मुंबईमधील शाखा : मुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

इतर शाखा : अहमदाबाद (मद. मुख्य ऑफिस), अहमदाबाद (एलिस ब्रिज शाखा), अहमदाबाद (स्टेशन शाखा), अमृतसर, अंधेरी (मुंबई शेजारी), थाणे (मुंबई शेजारी), कलकत्ता (क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्क्वेअर), जमशेदपूर जुनागढ, कराची, मद्रास, नागपूर (किंग्जवे), नागपूर (इतवारी बझार), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत, वेरावल, भुज (कच्छ).

लंडन एजन्ट्स : वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

डायरेक्टर्स : सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. (अध्यक्ष), श्री. अंबालाल साराभाई, सर जोसेफ के. नाईट, मि. ए. गेडिस, सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, जी. बी. ई., के. सी. आय. ई., मि. दिनशा के. दाजी, श्री. रामनिवास रामनारायण.

करंट डिपॉझिट अकाउंट्स :

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षां कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

बिल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते, सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

एजंट :—एच्. ए. करीमभाई

डोक्यांतील उवा १ तासांत
मारण्याचा आश्चर्यकारक शोध
लायसॉफ
वाटली किंमत १ रु. ट. ख. निराळा
दोन वेळां उपयोग
दि मागोरा केमिकल कं. लि.
— हिराबाग, पुणें २ —

'अर्थ' ग्रन्थमाला.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

व्यापारी शिक्षणाचें राष्ट्रीय महत्त्व

प्रो. काळे ह्यांचें भाषण

बृहन्महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्स, पुणें ह्या संस्थेच्या विद्यार्थ्यांचें स्नेहसंमेलन गेल्या शनिवारीं झालें. त्या प्रसंगीं प्रो. काळे ह्यांनीं आपल्या भाषणांत हिंदुस्थानास व्यापारी शिक्षणाचें महत्त्व किती आहे आणि त्याचें स्वरूप कसें असलें पाहिजे ह्याचें विवेचन केलें. डे. ए. सोसायटीनें व्यापारी कॉलेज काढून आपल्या शैक्षणिक कार्यास नवीन दिशा लावली आहे ह्या गोष्टीच्या औचित्याचा उल्लेख करून व्यापारी व्यवसायाचा व्याप आणि त्याची सामाजिक उपयुक्तता हीं विशद करून सांगितलीं. राष्ट्रीय संपत्तीचें उत्पादन, विभागणी व उपभोग ह्यांस सहाय देऊन जनतेच्या रहाणींत सुधारणा घडवून आणणें ही व्यापारी व्यवसायाची कामगिरी आहे; आणि तो मानाचा व उपकारक धंदा आहे. व्यापाराची उत्पादकता जुन्या अर्थशास्त्रज्ञांसहि मान्य नव्हती आणि सध्याहि व्यापारी म्हणजे दुसऱ्यास लुबाडणारा, परपुष्ट, आपमतलबी दलाल अशी कल्पना सामान्य जनतेंत पसरली आहे. ह्याचें कारण मुख्यत्वें करून व्यापाऱ्यांच्या काळ्या बाजारांतील कारवाया हें होय; आणि हा खरा लोकहितकारक व्यापार नव्हे. तथापि, युद्धोत्तर काळांत हिंदुस्थानांत औद्योगिक उन्नति मोठ्या प्रमाणावर होण्यास समाजसेवादक्ष व कार्यक्षम धंदेवाल्यांची संख्या किती तरी पटींनीं वाढणें अगत्याचें आहे. सामान्य व्यक्तींच्या संपत्तीच्या वाटा द्विगुणित, त्रिगुणित होण्यास सहाय करणारे व्यापारी देशास हवे आहेत.'

प्रो. काळे पुढें म्हणाले कीं व्यापारी, व्यवसायाचें तपशीलवार तंत्र समजणें आणि त्याच्या घडामोडींचें व्यावहारिक ज्ञान होणें एवढीच व्यापारी शिक्षणाची व्याप्ती असतां कामा नये. ह्या तंत्राच्या मुळाशीं कोणतीं सूक्ष्म तत्त्वें आहेत आणि कोणत्या प्रेरक शक्तींनें व्यापारास उत्पादक गति व दिशा प्राप्त होते ह्याचें आकलन करण्याचें सामर्थ्य व्यापारी शिक्षणानें मिळालें पाहिजे. दूर दृष्टीनें व्यापारी धोरण आखणें आणि तें कृतींत उतरवणें ह्यास खोल अभ्यास व तीक्ष्ण बुद्धि ह्यांची आवश्यकता असते. व्यापारी शिक्षण पद्धतींत अशीं कर्तृत्ववान् माणसें तयार करण्याचा गुण असला पाहिजे. त्याचबरोबर गुणी व कार्यक्षम लोकांस स्वतःचें कौशल्य, आत्मविश्वास व धडाडी हीं प्रकट करण्यास योग्य संधी आणि वाव मिळणें अगत्याचें आहे. भांडवलवाल्या कारखानदारांस आणि धंदेवाल्यांस व्यापारी शिक्षण घेतलेल्या तरुणांचें महत्त्व वाटत नाहीं असा अनुभव इंग्लंडमध्येंहि येतो. हिंदुस्थानांतील ह्या संबंधांतली परिस्थिति प्रगतीस अत्यंत प्रतिकूल आहे. शिक्षित तरुणांस येथें संधी मिळत नाहीं. ह्यासाठी हिंदुस्थानची आर्थिक उन्नति युद्धोत्तर काळांत व्हावयाची असेल तर प्रस्तुत दोन्ही बाबतींत सुधारणा होणें अत्यंत आवश्यक आहे. औद्योगिक प्रगतीसाठी यांत्रिक व शास्त्रीय तज्ञ बाहेरून आणण्याची जरूर प्रथम थोडी फार भासेल. परंतु ह्या जागा हिंदी तज्ज्ञांनींच भरण्याची व्यवस्था झाल्याबांचून खरी प्रगति घडून येणार नाहीं.

व्यापारी शिक्षण घेतलेल्या तरुणांनीं निरनिराळ्या धंद्यांतलें आपलें काम चोखपणानें करून मिळणाऱ्या संधीचा पूर्ण फायदा घेण्याची आणि स्वतःची व देशाची आर्थिक सेवा करण्याची धमक अंगीं आणली पाहिजे. कोणीहि शिक्षित तरुण एकदम मोठा व्यापारी बनूं शकत नाहीं; पण कमकमानें, अंगीं कुवत असल्यास, प्रत्येकास धंद्यांत वर चढतां येणें शक्य आहे. व्यापारी पेशा प्रामाणिकपणानें व चोख रीतीनें चालवल्यास तो इतर व्यवसाया इतकाच समाजहिताचा व बहुमानाचा आहे ह्याची प्रचीति शिकलेल्या तरुणांनीं आत्मविश्वासानें व स्वतःच्या कृतीनें समाजास आणून दिली पाहिजे. युद्धोत्तर काळ ह्या घटावास अनुकूल असाच आहे. इतर धंद्यांत गर्दी झाली तरी उद्योग-व्यवसायांत होतकरू व शिकलेल्या तरुणांस वाव पुष्कळ मिळणार आहे. बृहन्महाराष्ट्र कॉलेजांतील प्राध्यापक वर्ग आणि शिक्षण-पद्धति हीं कार्यक्षम आहेत. ह्या कॉलेजांतील विद्यार्थ्यांनीं देशाच्या औद्योगीकरणास सहाय देऊन स्वार्थ व परमार्थ साधावा असा उपदेश करून प्रो. काळे ह्यांनीं आपलें भाषण संपवलें.

पुणें रेशनिंग हद्दींत वैयक्तिक रेशनिंग कार्डांस प्रारंभ कसा होईल ?

पुणें रेशनिंग हद्दींत वैयक्तिक रेशन कार्डांस लवकरच प्रारंभ होईल. हीं कार्डें सुरू झालीं, म्हणजे सध्याच्या कौटुंबिक रेशन कार्डांबरोबर वैयक्तिक रेशन कार्डेंहि लायसेनदार दुकानदाराकडे दाखल केल्याविना रेशन मिळणार नाहीं. विक्रीची नोंद मात्र कौटुंबिक रेशन कार्डावरच होईल. रेशनिंग इन्स्पेक्टर घरोघर जाऊन वैयक्तिक कार्डें वाटतील व त्या कार्डावरं ज्याचें नांव असेल, त्याची सही घेतील. एका दुकानांत नोंदलेल्या कौटुंबिक रेशन कार्डांतील व्यक्तींचीं वैयक्तिक कार्डें वाटून झालीं, म्हणजे, दुसऱ्या दुकानांतील कार्डें, अशा रीतीनें सबंद रेशनिंग हद्द पुरी केली जाईल. कार्ड धारण करणारा एक महिन्यापेक्षा अधिक काळ पुणें सोडून जात असेल तर त्यानें आपलें कार्ड भाग कचेरींत दिलें पाहिजे. एक आठवड्यापेक्षा जास्त परंतु महिन्यापेक्षा कमी, मुदतीची गैरहजेरी होणार असेल, तर त्याप्रमाणें भाग कचेरीस कळविलें पाहिजे व आपल्या कार्डावर दुसरा कोणी रेशन घेणार नाहीं अशी काळजी घेतली पाहिजे. भाग कचेरींत कार्ड ठेवल्यावर त्याची पावती दिली जाईल व पावती दाखल करतांच कार्ड परत मिळेल.

उसाची लागवड

मुंबई प्रांतांत ब्रिटिश हद्दींत १,०४,००० एकरांमध्यें व संस्थानी हद्दींत ५८,००० एकरांमध्यें मिळून १,६२,००० एकरांत उसाची लागवड झालेली आहे. गेल्या वर्षीच्या लागवडीच्या आकड्यापेक्षा हा आकडा ०·२% नें ज्यास्त आहे व दशवार्षिक सरासरीपेक्षा तो ३४·२% नें ज्यास्त आहे.

दररोज १०० उडते बाँब

४ सप्टेंबर अखेर ब्रेटब्रिटनवर एकूण ८,०७० जर्मन उडते बाँब आले, म्हणजे रोजची सरासरी सुमारें १०० पडली.

ब्रेट ब्रिटनमध्यें तेलाच्या खाणी

ब्रेटब्रिटनमधील तेलाच्या खाणींत सप्टेंबर, १९३९ मध्यें २३८ टन तेल निघालें; आतां वार्षिक उत्पादन १ लक्ष टनांवर म्हणजे २ कोटि, ६० लक्ष गॅलनवर गेलें आहे. युद्धामुळें तेलाची व पेट्रोलची मरज वाढली व तेलाच्या खाणींकडे विशेष लक्ष पुरविलें गेलें. युद्धाच्या काळांत एकूण ७ कोटि, ८० लक्ष टनांचें उत्पादन झालें आहे.

पेनिसिलिन हिंदुस्थानांत उपलब्ध

पुण्याचे डॉ. घारपुरे हे शिफारस करणार

हिंदी नागरिकांच्या औषधोपचारासाठी सुप्रसिद्ध पेनिसिलिन औषध आतां अमेरिकेच्या वॉर प्रॉडक्शन बोर्डानें उपलब्ध करून दिलें आहे. मध्यवर्ती सरकारनें नेमलेली एक समिती त्याची दरमहा प्रांतांत वाटणी करून देईल. मुंबई शहरांतील तीन दुकानदारांस पेनिसिलिन मिळालें आहे, त्यांचेकडूनच मुंबई प्रांतांतील डॉक्टरांस तें विकत घेतां येईल. मुंबई शहरांतील डॉ. परमार, डॉ. तिरोडकर व डॉ. शिरोडकर ह्यांस आणि पुण्याचे सिव्हिल सर्जन डॉ. शाळ, डॉ. मोदी व डॉ. के. बी. घारपुरे ह्यांस असेसर्स नेमण्यांत आलें आहे. अहमदाबादेसहि तिघांची असेसर्स म्हणून नेमणूक झाली आहे. प्रत्येक असेसर दरमहा एकूण ४० लक्ष युनिटस पेनिसिलिन डॉक्टर्स, खासगी बाळंतपणाचीं इस्पितळें, इत्यादींस मिळण्याबाबत सर्टिफिकिटें देऊं शकेल व त्यांच्या आधारें दुकानदारांकडून तें प्रत्यक्ष मिळवितां येईल. पेनिसिलिनचा ज्यावर उपचार चालू असेल, अशा रोग्याच्या केसचा ठराविक नमुन्याप्रमाणें केस रिपोर्ट सेंट्रल पेनिसिलिन कंट्रोल बोर्डाकडे पाठवावा लागेल.

अमेरिका-बलवत्तम औद्योगिक राष्ट्र

जागतिक उत्पादन शक्तीच्या निम्म्याइतकी शक्ति आतां एकट्या अमेरिकेची झाली आहे. युद्धसमाप्तीनंतर सर्व जगांत अमेरिका हें औद्योगिक बाबतींत बलवत्तम राष्ट्र झालेलें आढळून येईल. जगाचें सर्वांत मोठें घेणेंकरीहि तें बनेल.

हिंदी गव्हाच्या पिकाचा सरकारी अंदाज

लागवड व उत्पादन

	१९४३-४४	१९४२-४३	+किंवा-
लागवड (एकर)	३,३७,४०,०००	३,४४,१७,०००	-२%
उत्पादन (टन)	९६,९०,०००	१,१०,३२,०००	-१२%
दर एकरी उत्पादन (पौंड)	६४३	७१८	

निर्गत व आयात

	१९३९-४०	१९४०-४१	१९४१-४२
निर्गत (टन)	७,८००	४५,०००	१,८५,०००
आयात (टन)	८५,५००	१८,८००	१८,१००

१९३९-४० मध्यें आयात-निर्गत मिळून एकूण ७७,७०० टनांची आयात झाली होती; १९४०-४१ मध्यें आयातीपेक्षा निर्गत २६,२०० टन इतकी अधिक झाली व १९४१-४२ मध्यें तर आयात वगळून निवळ निर्गत १,६६,९०० टन इतकी झाली!

सात वर्षांत ३ अब्ज, १९ कोटि रुपये खर्चण्याची योजना

युद्धोत्तर सात वर्षांच्या कार्यांत हिंदुस्थान सरकार ३ अब्ज, १९ कोटि रुपये खर्चून ५,००० मैल लांबीचे नवे आगगाडीचे रस्ते तयार करणार आहे व तिसऱ्या वर्गाच्या उतारूंचे हाल कमी करणार आहे, अशी पुनर्घटनेची योजना प्रसिद्ध झालेली आहे.

सातांपैकी तीन ट्रॅक्टर्स आले

मद्रास सरकारनें खंड-उसनवार मार्गानें मागविलेल्या सात ट्रॅक्टर्सपैकी तीन ट्रॅक्टर्स त्यास मिळाले आहेत.

महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्यांचे व्यापारी

गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें

पूना गेस्ट हाऊस

संस्थापक :

कै. नानासाहेब सरपोतदार

टेलिफोन नं. ७७९

न्यू इंडिया इंडस्ट्रीज लि.

(Approved Re-treaders and Approved Contractors)

२६ लॅमिंग्टन नॉर्थ, मुंबई ११.

अध्यक्ष:—श्री. ग. स. मराठे, ॲक्चुअरी.

महाराष्ट्रांतील रबराचा प्रमुख कारखाना

★ गिरणीचे रोलर्स ★ रबरी हातमोजे ★ छापखान्यांचे रोलर्स

★ रीमोल्ड टायर्स ★ रबरी वॉशर्स ★ सॉलिड व्हील्स

व इतर रबरी माल तयार होतो.

पु. ग. मराठे

मॅनेजिंग डायरेक्टर.

हें पत्र पुणें, पेठ शनवार फ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' शनवार, फ. नं. १२७।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.

खालील पत्त्यावर चौकशी करावी.

व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

अर्थ

वर्गणीचे दर.

वार्षिक वर्गणी
रु. ४
(टपाल खेरीज माफ)
किरकोळ अंकास
दोन आणे.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष १० पुणें, बुधवार तारीख २० डिसेंबर, १९४४ अंक ५०

व्ही. पी. बेडेकर
आणि सन्स लि.
मुंबई.

मसाल्याचे व्यापारी

पुणें एजंटः—
द. ना. हेजीब

हालचालयुक्त व चित्ताकर्षक
चित्रकला प्रदर्शन
आर्यन सिनेमाजवळ, पुणें शहर
वेळः—३॥ ते रात्रौ १० वाजेपर्यंत

सुपर फॉस्फेट

एका खतां पोटी । दाणे कोटी कोटी ॥
सोनें कनवठीं । किसानाच्या ॥

यंदा : आनंदराव पाटील आनंदांत होते. कारण, पडीत उपळलेली जमीन सुपीक झाली. जमिनीचा पोत सुधारून पीक भरपूर आलें. रिकाम्या पोत्यांत दाणे आले.

यंदा : लहानुनें लक्ष्मीचें लग्न ठरविलें, कारण त्याची मुसंब्याची झाडें चांगलीं पोसलीं. बाग फळानें बहरली. फळें रसदार झालीं. पैसा भरदार आला.

यंदा : संदूजी खुषीत होता. कारण शेतांतील ऊस चांगला पोसला. उसाचें पाणी पुष्कळ पडलें. गूळ कित्येक पट्टे अधिक आला.

पण

यंदा : सावकार नानासाहेब नाखुष होते. कारण सावकारींची सद्दी संपली.

हें झालें कशानें !
सुपर फॉस्फेट वापरल्यानें

आर. ए. सी. आय. लि.,
कर्वे रोड, पुणें ४.

दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.

स्थापना : १९३५

हेड ऑफिस : पुणें शहर

—शाखा—

डेकन जिमखाना, मुंबई, जळगांव, खडकी, गिरगांव (मुंबई), नागपूर

—डायरेक्टर बोर्ड—

श्री. धों. कृ. साठे, चेअरमन

श्री. व्ही. पी. वर्दे, प्रो. व्ही. जी. काळे, श्री. एन. जी. पवार, श्री. एस. जी. मराठे, श्री. आर. सी. सोहोनी, श्री. टी. व्ही. रानडे, श्री. एम. आर. जोशी, श्री. एफ. डी. पदमजी, श्री. एम. व्ही. गोखले, श्री. व्ही. एच. देशमुख.

विक्रीस काढलेल्या नवीन दहा लाख रुपयांच्या भागांस फारच जास्त मागणी आली.

विशेष माहितीसाठी लिहा.

सी. व्ही. जोग, मॅनेजर

विविध माहिती

विंचुरकर आणि कंपनी

मेसर्स विंचूरकर आणि कंपनी ह्या नावानें मिरज ज्युनिअर संस्थानांत व्यवहार करीत असलेल्या फर्मच्या तीन भागीदारांपैकी श्री. व्ही. आर. मडकमकर हे फर्ममधून निवृत्त झाले आहेत आणि फर्ममध्यें आतां सरदार के. आर. विंचुरकर व सरदार व्ही. डी. पानसे हे दोघे राहिले आहेत.

बिजेचें कार्यक्षम उत्पादन

ग्रेट ब्रिटनमध्यें वीज उत्पादन करण्यास १८८८ सालीं विद्युत्गृहांना प्रत्येक युनिटमागें १२ शेर कोळसा लागे; आतां अर्धा शेर कोळशांत तेवढीच वीज निर्माण करतां येते.

सोलापूर स्पिनिंग अँड वीव्हिंग कं. लि.

वरील कंपनीचें वसूल मांडवळ ३२ लक्ष रुपये आहे. रिझर्व्ह व इतर फंडांत सुमारें १॥ कोटि रुपये आहेत. ३१ मार्च १९४४ अखेर संपलेल्या वर्षी कंपनीस ६९ लक्ष रुपये नफा झाला. कंपनीच्या प्रत्येक १,००० रुपयांच्या भागास ४०० रुपये डिव्हिडंड मिळणार आहे. कंपनीच्या प्रत्येक भागाची ५० रुपयांच्या २० भागांत विभागणी करण्यांत यावी, अशी कांहीं भागीदारांची सूचना आहे, त्यावर डायरेक्टरांनीं मतें मागविलीं आहेत.

कोयनेल

कोयनेल हें मलेरियावरील जालीम औषध सिंकोना झाडाच्या सालीपासून तयार करतात. १६३८सालीं पेरुच्या स्पॅनिश गव्हर्नरची पत्नी कौंटेस ऑफ सिंकोना, हिचा हिवताप एका झाडाच्या सालीच्या उपयोगामुळें बरा झाला, तेव्हांपासून त्या झाडास सिंकोना हें नांव मिळालें. ह्या औषधाची कीर्ति युरोपभर पसरली व त्यास मागणी वाढली. दक्षिण अमेरिकेंतून त्याची निर्गत होऊं लागली. १८५४ सालीं डच सरकारनें कित्येक झाडें जावामध्यें नेऊन लावलीं, तेथें त्यांचा प्रसार झाला. चालू महायुद्धापूर्वीपर्यंत कोयनेलच्या व्यापारांत डच लोकांसच प्राधान्य होतें. सिलोन व हिंदुस्थान येथें ब्रिटिश सरकारनेंहि सिंकोनाची लागवड केली. सिलोनमध्यें ती यशस्वी ठरली नाहीं, परंतु हिंदुस्थानांत मात्र तिला बरें यश आलें आहे.

उडत्या बाँबचा कारखाना

जर्मनीच्या लक्झेंबर्ग सरहद्दीजवळ उडत्या बाँबचा एक कारखाना उघडकीस आला, त्याचें वर्णन मोठें उद्बोधक आहे. दररोज ५०० उडते बाँब तयार करणारा तो कारखाना एका जुन्या लोखंडाच्या खाणीच्या दोन बोगद्यांत स्थापन केलेला आहे. डोंगराच्या कडेपासून आंत तीन मैल खोल काम चालतें व वहातुकीसाठी विजेच्या आगगाड्या आहेत. बोगदा बांधून काढण्यासाठी हजारो टन सिमेंट लागलें असलें पाहिजे. कारखान्यावर बाँबहल्ल्यांचा कांहींहि परिणाम होऊं नये, अशा रीतीनें तो योजिलेला आहे व त्याची यंत्रसामुग्री व कार्यपद्धति मोठ्या आधुनिक कारखान्याच्या पद्धतीस साजेशीच आहे. कारखान्यांत काम करणारे सर्व कामगार रशियन, पोलिश, इटालियन असून त्यांचें २०० जर्मन यांत्रिक तज्ज्ञांच्या देखरेखीखाली काम चालतें. कामगारांना खाणींचे बाहेर कधींच जाऊं देत नाहींत, असें म्हणतात.

शेअर बाजार

(श्री. व. वि. लोणकर, एम. ए., बी. कॉम., १२८९, पुणें ५)

मागील पंधरा दिवसांत बाजारांत झालेली चढउत्तर चमत्कारिक म्हणावी लागते. विशेषतः डिफर्डमध्यें कडमांची (Bears) सरसहा कत्तल झाली आहे असें दिसतें. एक दलालही कमकुवत ठरल्याचें जाहीर झालें आहे. त्यावरून परवांचा डिफर्डमधला वृषभ-कदभ समर प्रसंग बराच हातघाईचा ठरला असें म्हणावयास हरकत नाहीं. एका मारवाडी आसामीनें ४००० डिफर्डची उचल करून घेतली आहे असें म्हणतात. डिफर्डच्या मागोमाग गिरण्याही पुन्हा वर चढण्याच्या प्रयत्नांत होत्या पण वरच्या भावांत बरीच वेंचाण येत आहे. काल परवांच बाहेर पडलेल्या न्यू झिकटोरियाच्या नफातोट्यावरून गिरण्यांच्या कमी झालेल्या व होणाऱ्या नफ्यांची स्पष्ट कल्पना आतां येऊं लागली आहे. या गिरणीला मागील वर्षी ९० लाखांवर नफा झाला होता. यंदा तो ३८ लाखांवर इतका खालीं आला आहे. त्यापैकी कर व जादा कर अनामतीकरता ३० लाख खर्ची पडले असून घसारा टाकून राहिलेल्या ५ लाखांतून ऑर्डिनरी शेअरला केवळ २ आणे व प्रेफरन्सला ६ टके सु. ५ आणे असें व्याज देण्यांत आलें. मागील वर्षी याच शेअर्सना अनुक्रमें ८ आणे व रु. १-३ वर व्याज मिळालें होतें. याच अहवालाबरोबर सोलापूरचाही अहवाल बाहेर पडला आहे. तेथेंही हाच प्रकार दिसतो. मागील वर्षी सोलापूरलाही ९० लाखांवर नफा होता तो यंदा ६४ लाख झाला आहे. कंपनीचे अध्यक्ष श्री. भाभा यांनीं सांगितलें कीं मागील वर्षी नफ्यापैकी करभरणी करून राहणारे ६½ टके तेही यंदा व्याज द्यावयास उरत नाहींत इतकी करभरणी जाचक झाली आहे.

शितावरून भाताची परीक्षा या न्यायानें सर अकबर हैदरी यांनीं म्हटल्याप्रमाणें कोठल्याच गिरण्यांना यंदा मागील वर्षीप्रमाणें अचाट नफे होणार नाहींत, कोठलीच गिरणी २० टक्क्यांवर पैसा सध्यां मिळवूं शकत नाहीं. तेव्हां गिरण्यांमध्यें तेजी झाली तरी तात्पुरती रहावी. तसेंच यापुढें गिरण्यांत पैसे गुंतवतांना ज्यांचे प्रमाणित नफे चांगले आहेत असें समजतें.-उदा० डांईंग, सिंप्लेक्स, कोहिनूर, बी. आय. सी.-त्यांचेच शेअर्स घेणें चांगले.

वरील इषारा देतांना हेंहीं निदर्शनास आणणें जरूर आहे कीं जरी नफे कमी झाले असले तरी बाजारभावांत वेडीवाकडी पडझड होण्याचें कारण नाहीं. इतर गिरण्यांत पैसे गुंतविणारांनीं घाबरण्याचें कारण नाहीं. कारण रोजच वाढणारें चलन व उतरते व्याजांचे दर हे कोठल्याही परिस्थितींत बाजार लीलेनें उचलून धरतील.

महाराष्ट्र बँकेचे सर्व शेअर खपले

बँक ऑफ महाराष्ट्र लि. नें १० लक्ष रुपयांचे २०,००० भाग प्रत्येकी ५ रुपये वाढीनें विक्रीस काढले व १५ डिसेंबर पर्यंत पहिल्या भागीदारांनीं घेऊन उरलेले भाग इतरांस तेवढ्याच वाढीनें देण्यांत येतील, असें बँकेनें जाहीर केलें. पहिल्या भागीदारांतच हे सर्व १० लक्ष रुपयांचे भाग खपले, असें समजतें. प्रीमियमचे १ लक्ष रुपये रिझर्व्ह फंडांत जाऊन बँकेच्या मजबुतींत आणखी भर पडून रिझर्व्ह फंडाचा आकडा भरदार होईल.

अनुक्रमणिका

	पृष्ठ		पृष्ठ
१ विविध माहिती	४१४	राकेल—लॉर्ड वेव्हल आग्नेय	
२ शेअर बाजार	४१४	औद्योगिक प्रगति—ग्रेट-ब्रिटन—प्रवाशांचें आकर्षण	
३ युद्धोत्तर हिंदी रेल्वे वहातुक	४१५	८ बँकांचा कायदा	४१८
४ वृहन्महाराष्ट्र शु. सिं.	४१६	९ शिक्षणाची प्रगति	४१८
५ साखरेचा धंदा	४१६	१० हिरडा	४१९
६ तुमचें अन्न	४१६	११ झेकोस्लोव्हाकिया व हिंदुस्थान	४१९
७ स्फुट विचार	४१७		
रशिया आणि इराणमधील			

अर्थ

बुधवार, ता. २० डिसेंबर, १९४४

युद्धोत्तर हिंदी रेल्वे वहातुक

तिसऱ्या वर्गाच्या उतारूंचे हाल चालू रहाणार ?

हिंदुस्थान सरकारचे युद्ध–वहातुक मंत्री, सर एडवर्ड बेंथॉल, ह्यांनीं आपल्या एका मुलाखतींत हिंदी रेलवेजच्या युद्धोत्तर विस्तारासंबंधीं विचार व्यक्त केले. रेल्वे वहातुकींत सुधारणा करणें, हें मध्यवर्ती सरकारचें उद्दिष्ट असलें तरी शिक्षण, आरोग्य, इत्यादि बाबींवरहि सरकारला मोठा खर्च करावा लागेल आणि केवळ रेल्वेजवरच भरमसाट खर्च करून भागणार नाहीं, हें त्यांनीं स्पष्ट केलें. दहा-पंधरा वर्षांपूर्वी रेल्वेजच्या करभारांत मोठी तूट येत असे आणि मध्यवर्ती सरकारच्या अंदाजपत्रकांतील वाढावा अथवा तूट रेल्वे बजेटावर अवलंबून राही. एकट्या रेल्वेजच्या उत्पन्न-खर्चावर सरकारचें सबंद आर्थिक धोरण हेलकावे खात रहाणें इष्ट नसल्याकारणानें, रेल्वेजची वाढ ही प्रमाणबद्ध होणें अगत्याचें आहे. सर एडवर्ड बेंथॉल ह्यांनीं रेल्वेजच्या विस्ताराची ही मर्यादा मान्य करून व्यावहारिक पायावर रेल्वेवाढ करण्याचें आपलें धोरण स्पष्ट केलें हें योग्यच झालें.

रेल्वे व मोटर वहातुक ह्यांमधील स्पर्धा टाळून दोन्ही वहातुकींस वाव देण्याचें धोरण सरकारनें अंगीकारलें आहे. वहातुकीशीं प्रत्यक्ष सबंध येणाऱ्या प्रांतिक सरकारांचें मत प्रत्यक्ष रेल्वे व रस्ते आखण्याचे कामीं महत्त्वाचें मानलें जाईल. रेल्वेच्या फाट्यांमुळें मोटर वहातुक वाढावी व नव्या रस्त्यांच्या योजनेमुळें आगगाडयांनाहि अधिक काम मिळावें, अशा दृष्टीनें आखणी केली जावयाची आहे. म्हणजे मोटर रस्त्यांच्या आखणींतहि रेल्वेजचा हितसंबंध आहे. मोटारींच्या वहातुकीवर सरकारचें नियंत्रण रहावें, अशीहि एक कल्पना आहे. म्हणजे आगगाडया व मोटारी ह्यांची वहातुक एकमेकांस पोषक व सुसंघटित करण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. रशियांतील कार्यक्षम मोटर वहातुकीमुळेंच तो देश युद्धप्रसंगीं वहातुकीचा ताण सहन करूं शकला; हिंदुस्थानानें ह्या बाबतींत रशियाचें अनुकरण करण्यासारखें आहे असें सर बेंथॉल ह्यांनीं सांगितलें.

रेल्वेचे फाटे टाकण्याचें वेळापत्रक व कार्यक्रम ह्यांचीहि आपली कल्पना सर बेंथॉल ह्यांनीं स्पष्ट केली. जे रेल्वे-फाटे कालांतरानें फायदेशीर होतील किंवा जे देशाच्या आर्थिक सुधारणेसाठीं अत्यावश्यक आहेत, अशांची रचना करतांना इतर मोठ्या उद्योगधंद्यांतील मंदी वगैरेचा विचार करण्यांत आला पाहिजे, म्हणजे इतर ठिकाणीं बेकारी होईल त्यावेळीं रेल्वेचीं कामें मोठ्या प्रमाणावर चालू करावींत व प्रारंभीं मात्र जरा हळुहळु कामें चालवावींत, असा त्यांच्या म्हणण्याचा आशय आहे. रेल्वेज तयार करतांना सरकारनें फक्त रेल्वेपुरतेंच बघणें हें केव्हांहि इष्ट नाहीं; त्या योजनांचे आर्थिक परिणाम काय होतील ह्याचाहि विचार झाला पाहिजे, असें त्यांनीं सांगितलें.

तिसऱ्या वर्गाच्या उतारूंच्या युद्धोत्तर सुखसोयींची सगळीकडे जाहिरात चालू आहे; तथापि सर बेंथॉल ह्यांनीं त्याविषयीं काढलेले उद्गार फारसे आशादायक नाहींत. हिंदी जनतेचें दारिद्र्य लक्षांत घेतलें असतां, सोईपेक्षा स्वस्ताईच लोक पसंत करतात आणि ह्या दृष्टीनें सुखसोईवर करावयाच्या खर्चामुळें रेल्वेजना प्रत्यक्ष फायदा कांहींहि होणार नाहीं; चांगले ढबे, ज्ञानाची व घुण्याची सोय, स्वच्छ व शीतल वेटिंग रूम्स, तिकिटें काढण्याची सोइस्कर व्यवस्था, इत्यादि गोष्टी घडवून आणण्याकरितां रेल्वेला भाडें वाढवावें लागलें, तर तें उतारूंना खपणार नाहीं व आम्हांला गर्दी असली तरी चालेल, गैरसोई खपतील, स्वच्छता नको, परंतु मेहेरबानी करून भाडें वाढवूं नका अशी उतारू गळ घालतील, हा सर बेंथॉल ह्यांचा युक्तिवाद समर्थनीय नाहीं. हिंदी जनतेस तो अपमानकारकहि वाटेल. तिसऱ्या वर्गाच्या दारिद्र्याचा व अडाणीपणाचा फायदा आज दीर्घकाल वरच्या वर्गाच्या उतारूंस मिळत आलेला आहे. तथापि, वरच्या वर्गाचा प्रवास जगांतील इतर कोणत्याहि देशांतील रेल्वे प्रवासाशीं तुलना करूं शकेल, अशी सुधारणा घडवून आणूं पहाणाऱ्या सर बेंथॉल ह्यांस तिसऱ्या वर्गाच्या उतारूंच्या अगदी साध्या सोईहि करणें परवडणार नाहीं, अशी आतां भीति वाटूं लागली आहे. हिंदी लोकांच्याकडे पहाण्याच्या विशिष्ट दृष्टिकोनाचा हा परिणाम आहे. हिंदुस्थानाच्या पैशानें निर्माण करण्यांत येणाऱ्या सोईचा फायदा बहुसंख्य दरिद्री जनतेस मिळणार नसेल, तर त्या खर्चाचा उपयोग काय ? आजच्या रेल्वे प्रवासांतील गैरसोई व धोके हे पुढें दूर होण्याची आशा व सुखसोईचें आमीष सर बेंथॉल ह्यांनीं निराधार ठरवून तिसऱ्या वर्गाच्या उतारूंचा गैरसमज दूर केला आहे.

हिंदी कपास

हिंदी कपाशीच्या उत्पादनाची किंमत १९४२–४३ मध्यें ६७ कोटि रुपये भरली; १९४३–४४ मधील उत्पादनाची किंमत ८९ कोटि झाली. ह्याचें कारण कपाशीच्या बाजारभावांत वाढ हें नसून, उत्पादनच अधिक झालें हें होय. १९४३–४४ मधील उत्पादन ५४,५०,००० गांठी झालें, १९४४–४५ मधील अंदाजी उत्पादन ४५,००,००० गांठी भरेल. एकूण ८०,५०,००० गांठी उपलब्ध होतील.

स्टॉक एक्सचेंजला सुटी

ता. २३ डिसेंबर, १९४४ ते १ जानेवारी, १९४५ अखेर, स्टॉक एक्सचेंज बंद राहील.

बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट, लि.

(वार्षिक सभा : ३१ डिसेंबर, १९४४)

वरील कंपनीच्या हिशेबांतील गेल्या तीन वर्षांचे कांहीं तुलनात्मक आकडे साठी दिले आहेत:—

	१ ऑक्टोबर ते ३० सप्टेंबर अखेर		
	१९४१-४२	१९४२-४३	१९४३-४४
वसूल भांडवल	६,७५,३४१	७,९४,०१९	७,९८,१७०
रिझर्व्ह फंड	...	...	१,२५,०००
बेल्केअर फंड	...	...	५०,०००
डि. ई. फंड	३,७५९	३,९५८	७८,९५८
इनकमटॅक्ससाठी तरतूद	१,८७,५००	२,५२,५००	२,५२,५००
डिपॉझिटस व कर्जे (बिगर तारण)	१२,८७,५०५	१८,६६,४०७	२७,३८,६०२
डिस्टिलरी	...	१,४४,६४८	३,६९,२२४
स्तर्ते, केमिकल्स, इ.			
शिल्लक माल	४,५५,७५२	५,२८,८१४	९,१५,८०७
उभी पिकें	८,४७,१८०	७,७३,५९८	१४,१९,५३८
शिल्लक साखर व गूळ	१,३९१	६,३६,२८०	१२,६५,४९८
साखर व गूळ विक्री	१९,३६,२१६	२०,६७,९७७	२१,५७,९९०
दिलेलें व्याज	७२,८२६	८४,५१६	१,६३,६०५
मॅ. एजंटांचें नफ्या-वरील कमिशन	३२,९९७	५१,८१०	१७,४१०
निवळ नफा	३,७७,००३	५,९१,८९०	२,००,२२०

वरील तक्त्यावरून, सिंडिकेटचे पैसे, डिस्टिलरी, शिल्लक, माल, शिल्लक साखर व गूळ इत्यादींत मोठ्या प्रमाणावर कसे अडकून पडले आहेत हें दिसून येईल. त्यामुळें, द्यावयाच्या लागणाऱ्या व्याजाचा आकडा गेल्या वर्षीच्या मानानें सुमारें दुप्पट होऊन तो १,६३,६०५ रुपये झाला.

मागच्या वर्षापेक्षा या वर्षी फायदा बराच कमी झाला त्याला अनेक कारणें झालीं. त्यांतील मुख्य कारणें प्रतिकूल हवामान, पाण्याचा अपुरा पुरवठा, उत्पन्न झालेल्या साखर व गूळ यांच्या विक्रीस झालेला कमालीचा उशीर, केमिकल्सचा अपुरा पुरवठा, गूळ उत्पादनावर व विक्रीवर सरकारी नियंत्रण, मजुरी व वहातूक यांचे गतवर्षीपेक्षा वाढलेले दर हीं आहेत.

स्पिरिटच्या कारखान्याचें कामही कल्पनेपेक्षा मंदगतीनें होत होतें याचे मुख्य कारण म्हणजे कारखान्याच्या इमारतीला लागणारें सामान सरकारी नियंत्रणासाठीं असल्यामुळें त्याचे परवाने निरनिराळ्या सरकारी खात्यांतून मंजूर होण्यास अंदाजापेक्षा फार जास्त वेळ लागला. यंत्रसामुग्रीचें काम मात्र बरेंच झालें आहे; व आतां नियंत्रित मालही किंमतीस मिळण्याची व्यवस्था होत आहे व या तऱ्हेनें जर प्रगति चालू राहिली तर स्पिरीट तयार करण्यास फारसा उशीर लागणार नाहीं अशी आशा आहे.

ता. ३० सप्टेंबर १९४४ रोजीं उभ्या असलेल्या उसाचें क्षेत्र २,००९ एकर २० गुंठे आहे. त्यापैकीं १,१९५ एकर ऊंस १९४४-४५ च्या हंगामांत गाळितासाठी दिला जाईल, ८४ एकर नवीन लागवडीकरितां बेणें म्हणून उपयोगांत आणली जाईल, आणि ७३० एकर २० गुंठे (आडसाली व आडसाली-खोडवा) सन १९४५-४६ चे हंगामाकरितां राखून ठेवण्यांत येईल. ४,५४४ एकर क्षेत्रांत घाण्याची पिकें लावलीं आहेत.

हिंदुस्थानांतील साखरेचा धंदा

सुधारलेल्या जातींच्या उसासाठी हिंदुस्थानांत आतां सुमारें ३५ लक्ष एकर जमीन आली आहे. इंडियन शुगर कमिटीनें चौकशी केली त्यावेळीं साखरेचा उतार ६% होता; आतां हें प्रमाण १०% वर गेलें आहे. कपास कापडाच्या गिरण्या सोडल्या तर उसाचा धंदा हाच सर्व हिंदी उद्योगधंद्यांत अग्रेसर झाला आहे. सुमारें १,००,००० कामगार आणि ३,००० पदवीधर व यांत्रिक तज्ज्ञ यांची उपजीविका त्यावर अवलंबून आहे. ऊस लावणारे शेतकरी हे वेगळेच. हिंदी साखरेच्या धंद्यांत सुमारें ३३ कोटि रुपये भांडवल गुंतलेलें आहे व साखरेचें वार्षिक उत्पादन १३ लक्ष टनांवर आहे. ४४० रुपयांस एक टन ह्या हिशेबानें त्याचे ५७ कोटि रुपये होतात. १९१० आणि १९१४ ह्या दरम्यानचे काळांत हिंदुस्थानांत सालिना सरासरीनें ७,२३,९१५ टन साखरेची आयात होत असे. आतां हिंदुस्थान साखरेच्या बाबतींत स्वयंपूर्ण झाला आहे. ३९ लक्ष टन गूळ निघतो, तो अर्थात् वेगळाच. साखरेपेक्षां गुळांत अन्नाचा भाग जास्त आहे. हिंदुस्थान सरकारनें हिंदी साखरेच्या धंद्यास दिलेली १५ वर्षांची संरक्षणाची मुदत ३१ मार्च, १९४६ रोजीं संपते. त्या नंतरच्या धोरणाचा विचार त्यावेळच्या एकंदर परिस्थितीचें परिशीलन करून सरकारास करावा लागेल.

तुमचें अन्न*

हिंदुस्थानाच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांचा लोकांस परिचय व्हावा, त्या ज्ञानाचे द्वारा लोकमत निर्माण व्हावें व त्यामुळें योग्य राष्ट्रीय धोरणास वळण लागून तें कृतींत उतरावें, ह्या हेतूनें टाटा सन्स लि. नें छोटेखानी पुस्तकांची माला गुंफण्याचें योजिलें आहे. सध्याचा अत्यंत महत्त्वाचा प्रश्न अन्नपुरवठ्याचा असल्याकारणानें त्या मालेंतील पहिलें पुस्तक " तुमचें अन्न " ह्या नांवाचें असून त्यांत अन्नाच्या प्रश्नाचें अगत्य व तो सोडविण्याचा मार्ग ह्यांचें वर्णन आलें आहे. पीपल्स प्रॉ. फूड कौन्सिलचे अध्यक्ष व सुप्रसिद्ध कार्यकर्ते श्री. एम. आर. मसानी ह्यांनीं हें पुस्तक लिहिलें आहे. शक्य तितक्या लोकांच्या हातीं हें पुस्तक पडून त्याचा प्रसार व्हावा, ह्या दृष्टीनें पुस्तकाची मांडणी चटकदार, उठावदार व सुबोध अशीच केलेली आहे, विद्वत्ताप्रचुर ग्रंथाचें त्याचें स्वरूप नाहीं. पुस्तक लोकप्रिय झालें, तर त्याची प्रमुख हिंदी भाषांत रूपांतरें प्रसिद्ध करण्यांत येतील. खेडेगावांच्या सुधारणेची केंद्रें व इतर शैक्षणिक वगैरे संस्था ह्यांस हें पुस्तक विकत घेतां येणें शक्य न झाल्यास, तें त्यांस विनामूल्य देण्याचा टाटांचा विचार आहे. चित्रें, तक्ते, वगैरेंच्या सहाय्यानें पुस्तक आकर्षक करण्यांत आलें आहे. प्रस्तुत उपक्रमाबद्दल टाटांचें अभिनंदन केलें पाहिजे.

* पृ. सं. ८२. किं. १ रु. प्रकाशक : टाटा सन्स लि. करितां पब्लिकेशन्स लि., मुंबई.

स्फुट विचार

रशिया आणि इराणमधील राकेल

इराणांतील राकेल तेलाच्या विहिरी प्रसिद्ध आहेत. त्यांमधून तेल काढून तें जगांतील देशांस विकण्यास जें भांडवल आणि औद्योगिक घटनाबल लागतें तें इराणच्या लोकांत नसल्यानें तेथील सरकारनें हा धंदा चालवण्यास परकी राष्ट्रांतील धंदेवाल्यांस व सरकारांस योग्य मोबदला घेऊन परवाने दिले आहेत. ह्या धंद्यांत ब्रिटिश व अमेरिकन राष्ट्रांचा प्रामुख्यानें हात आहे. आपणहि ह्या उद्योगांत पडावें असें वाटून अलीकडे रशियानें इराणच्या सरकारकडे त्या देशाच्या उत्तर भागांत तेलाचा धंदा करण्यास रीतसर परवाना मिळावा अशी मागणी केली होती. पण ती इराणच्या सरकारनें साफ नाकारली आहे आणि ह्या घोरणानें जगांत आश्चर्य उत्पन्न केलें आहे. दुसऱ्या देशास परवानगी देण्यांत आली आहे तशी ती रशियास कां दिली जाऊं नये हा कुतूहलजन्य प्रश्न येथें उद्भवतो. बाहेरचे भांडवलवाले देशांत आले असतां त्यांचें राजकीय दडपण त्यांचे बरोबर येतें तें राष्ट्रीय भावनेच्या इराणी सरकारास नको आहे, हें त्याचें उत्तर आहे. रशियास तरी इराणी तेल कशास हवें आहे हा प्रश्नहि येथें अप्रस्तुत नाहीं. कारण रशियाच्या मालकीच्या स्वतःच्या प्रदेशांत तेलाचा भरपूर साठा व पुरवठा असून त्या राष्ट्रास ह्या महत्त्वाच्या पदार्थाची कधींच वाण भासलेली नाहीं, व पुढें भासण्यारखी नाहीं. तेलाच्या आंतरराष्ट्रीय धंद्यांत व व्यापारांत आपली भागीदारी असावी ह्या बुद्धीनें रशियन राज्यकर्त्यांनीं प्रस्तुत डाव टाकला असावा. युद्धोत्तर काळांत रशियास परदेशांतून जरूरीची यंत्रसामुग्री आयात करावी लागेल. तिचा मोबदला देण्याचें सामर्थ्य स्वतःमध्यें असावें म्हणूनहि रशिया इराणी तेलाच्या भानगडींत पडत आहे असा कांहींचा तर्क आहे. तें कांहींहि असो, इराणचा नकार हा रशियाच्या इप्रतीचा प्रश्न आतां होऊन बसला आहे आणि रशियन राज्यकर्ते येन केन प्रकारेण स्वतःचें म्हणणें इराणवर लादल्यावांचून राहणार नाहींत. युद्ध चालू आहे तोंपर्यंत रशियाची मागणी आपण तूस मान्य करतां येत नाहीं अशी सोडवणूक इराणी सरकारनें आपल्या नकारांत करून ठेवली आहे, पण तेवढ्यानें काम भागेल असें वाटत नाहीं. झारशाहींत उत्तर इराणमध्यें रशियाचें वर्चस्व स्थापण्यांत आलें होतें पण बोल्शेव्हिक राज्यकर्त्यांनीं ह्या बाबतचे सर्व हक्क सोडून दिले. त्यांचें पुनरुज्जीवन करून मध्यपूर्व एशियांत स्वतःचें राजकीय वजन प्रस्थापित करण्याचा सध्याच्या रशियन पुढाऱ्यांचा बेत दिसतो. हें केवळ अर्थकारण आहे, कीं राजकारणहि प्रस्तुत प्रश्नाच्या बुडाशीं आहे ?

लॉर्ड वेव्हल आणि औद्योगिक प्रगति

कलकत्ता येथें युरोपियन धंदेवाल्यांच्या असोसिएटेड चेंबर्स ऑफ कॉमर्सच्या सभेंत भाषण करतांना व्हाइसरॉय, लॉर्ड वेव्हल, ह्यांनीं हिंदुस्थानांतील राजकीय, युद्धविषयक व आर्थिक परिस्थितीचें समालोचन केलें. सध्याची देशांतील राजकीय कोंडी फोडली जाण्याचे बाबतींत नवीन किंवा आशाजनक उपाय सुचवणें त्यांस शक्य झालें नाहीं. युद्ध चालू असे तोंपर्यंत हिंदुस्थानच्या राजकीय घटनेंत किंवा राज्यव्यवस्थेंत विशेष बदल करणें व्यावहारिक आहे असें त्यांस वाटत नाहीं. तथापि, युद्धपरिस्थिति हिंदी जनतेस जाचक होऊं नये आणि युद्धोत्तर काळांत व्हावयाच्या आर्थिक पुनर्घटनेची पूर्व तयारी योजनात्मक रीतीनें केली जावी ह्यासंबंधांत हिंदुस्थान सरकार योग्य प्रयत्न करीत असल्याचें व्हाइसरॉय ह्यांनीं सांगितलें. मोठ्या प्रमाणावरील कारखान्यांचा प्रसार देशांत होणें आवश्यक असलें तरी शेतीच्या धंद्याची व शेतकरी वर्गाच्या हितसंबंधांची जोपासना दक्षतेनें केली जाण्याचें महत्त्व त्यांनीं प्रतिपादलें. अन्नपुरवठ्याची व्यवस्था आपल्या सरकारनें समाधानकारक रीतीनें चालवली असल्याची ग्वाही देऊन आपल्या मंत्रिमंडळाच्या कामगिरीबद्दल त्यांनीं धन्यता प्रकट केली. मालाचा पुरवठा आणि त्याच्या किंमती त्यांच्या नियंत्रणाबाबतच्या योजनांचा परिणाम समाधानकारक होत असल्याचें सांगून हिंदुस्थानच्या स्टर्लिंग शिलकांचा विनियोग बेताबेतानें आणि सबड व संधी ह्यांस अनुसरून केला पाहिजे असें त्यांनीं सुचवलें. युद्धोत्तर आर्थिक संवर्धनाच्या रस्ते, कालवे, सार्वजनिक आरोग्य इत्यादि विषयांच्या योजना प्रांतिक सरकारांनीं मध्यवर्ती सरकाराच्या सहकार्यानें आखणें आवश्यक आहे असें ते म्हणाले. इंग्लंड व हिंदुस्थान ह्या देशांत परस्परांविषयीं विश्वास नांदला पाहिजे आणि ब्रिटिश व हिंदी कारखानदारांनीं परस्पर-सहकार्यानें हिंदुस्थानच्या आर्थिक प्रगतीचा प्रश्न सोडवावा असा सल्ला लॉर्ड वेव्हल ह्यांनीं दिला.

ग्रेट ब्रिटन—प्रवाशांचें आकर्षण !

वरील नांवाचें एक चोपडें ट्रॅव्हल अँड इंडस्ट्रिअल डेव्हलपमेंट असोसिएशन ऑफ ग्रेट ब्रिटन ह्या संस्थेनें नुकतेंच प्रसिद्ध करून परदेशांतून प्रवासी आकर्षण करण्याचा प्रयत्न केल्यास ग्रेट ब्रिटनला सालिना १० कोटि पौंड प्राप्ति होऊं शकेल असें दाखवून दिलें आहे. १९२१ ते १९३८ ह्या काळांत प्रवासी आकर्षणाच्या धंद्यापासून ग्रेट ब्रिटनला सालिना सरासरीनें २ ते ३ कोटि पौंड मिळाले. म्हणजे, युद्धोत्तर काळांत हें उत्पन्न सुमारें चौपट करण्याचा प्रयत्न दिसतो. सरकारच्या सूचनेवरूनच वरील चोपडें तयार करण्यांत आलें आहे, ह्यावरून ब्रिटिश सरकारचें त्यांत असलेलें लक्ष स्पष्ट होतें. (१) परराष्ट्रांतून प्रवासी आकर्षण करण्याचें धोरण सरकारनें स्पष्टपणें अंगीकारून निर्गत व्यापारवाढीच्या प्रयत्नाप्रमाणेंच तिकडे लक्ष यावें, (२) ह्यासाठी सरकारनें एक स्वतंत्र संघटना निर्माण करून त्यासाठी लागणाऱ्या खर्चाची जबाबदारी उचलावी व (३) होटेल्सचे ह्या दृष्टीनें राष्ट्रीय महत्त्व लक्षांत घेऊन सरकारनें त्यांस सर्वतोपरी सहाय करावें अशा तीन सूचना ह्या चोपडकांत करण्यांत आलेल्या आहेत. ग्रेट ब्रिटन हें प्रवाशांचें आकर्षण झालें म्हणजे इतर देशांतील लोकांप्रमाणें हिंदुस्थानांतील लोकहि प्रवासासाठी व चेनीसाठी त्या देशाकडे ओढले जातील व त्यामुळें हिंदी पैसा ग्रेट ब्रिटनमध्यें वाढत्या प्रमाणावर खर्च होऊं लागेल. ब्रिटिश मालाची आयात हिंदुस्थानांत झाली म्हणजे त्याचे पैसे येथून त्या देशाकडे जावे लागतात. हिंदी प्रवासीच ग्रेट ब्रिटनमध्यें पैसे घेऊन गेले, म्हणजे ब्रिटिश मालाचा उठाव त्या देशांतच हिंदी पैशानें होऊन, मालाच्या किंमतीइतकें हिंदी देणें निर्माण होतें व मालाची प्रत्यक्ष निर्गत झाल्यासारखाच परिणाम घडून येतो. उपभोक्त्यांकडे माल न पाठवतां मालाकडे उपभोक्ते ओढून नेणें, एवढाच दोहोंत फरक आहे. ब्रिटिश रहाणीचा जवळून परिचय झाला, म्हणजे हिंदी प्रवाशांत हिंदुस्थानांत परत आल्यावरहि ब्रिटिश मालाची चटक लागणार व ब्रिटिश माल येथें मोठ्या प्रमाणावर खेंचून लागण्यास सहाय होणार, हें ओघानेंच आलें. ग्रेट ब्रिटन हें प्रवाशांचें आकर्षण बनल्यामुळें, हिंदी प्रवाशांच्या खर्चाचा काय परिणाम होईल, हें उदाहरण म्हणून वर दाखविलें आहे.

बँकांच्या नियंत्रणासाठी स्वतंत्र कायदा

आणखी कांहीं कलमांचा खुलासा

नव्या बँकिंग कायद्याचें नांव "बँकिंग कंपनीज ॲक्ट, १९४९" असें राहील. कोणत्या तारखेपासून तो अंमलांत येईल, हें हिंदुस्थान सरकार गॅझेटांत जाहीर करील. कंपनी कायदा व इतर कायदे ह्यांतील नियमांत प्रस्तुत कायद्याच्या नियमांनीं भर पडत आहे; बँकिंग कंपनीज ॲक्टांतील तरतुदी, तसें स्पष्ट म्हटलें असल्याविना, इतर कायद्यांतील तरतुदींची केवळ जागा घेणार नाहींत. सहकारी बँकांना हा कायदा लागू नाही. रिझर्व्ह बँकेनें तशी सूचना केल्यास, बँकिंग कंपनीज ॲक्टांतील सर्व किंवा कांहीं कलमांची अंमलबजावणी एका वेळेस ६० दिवसांपर्यंत, कांहीं किंवा सर्व बँकांच्या बाबतींत, त्याप्रमाणें गॅझेटांत जाहीर करून, तहकूब ठेवण्याचा हिंदुस्थान सरकारास अधिकार आहे. तातडीचे प्रसंगीं, रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर किंवा त्यांच्या गैरहजरींत डेप्युटि गव्हर्नर वरील मध्यवर्ती सरकारचे अधिकार उपयोगांत आणूं शकतील.

'बँके'ची व्याख्या

मागणी येतांच परत केली पाहिजे, अशा ठेवी स्वीकारणें, म्हणजे 'बँकिंग,' अशी कायद्यांतील व्याख्या आहे. बँकांनीं 'बँकिंग' सेरीज इतरहि कोणत्या प्रकारचे व्यवहार करण्यास हरकत नाहीं, त्यांची यादी कायद्याच्या ६ व्या कलमांत दिलेली आहे. ह्या यादींत नसलेला कोणताहि व्यवहार करण्यास बँकांना बंदी आहे. बँकिंगचा व्यवहार करणाऱ्या प्रत्येक कंपनीच्या नांवांत "बँक," "बँकर" किंवा "बँकिंग" ह्यांपैकी एक तरी शब्द आलाच पाहिजे. कोणत्याहि कंपनीच्या नांवांत वरीलपैकी एकहि शब्द आला, तर ती बँकिंग कंपनीच समजली जाईल व त्या कंपनीस प्रस्तुत कायदा लागू होईल. मालाची खरेदी-विक्री, व्यापार, इत्यादींत कोणत्याहि बँकिंग कंपनीनें प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रीतीनें पडतां कामा नये. ह्यांत अर्थातच स्टॉक्स व शेअर्स ह्यांचा समावेश होत नाहीं. कित्येक प्रसंगीं कांहीं जिंदगी बँकांना आपल्या व्यवहारांतील येण्याच्या पोटीं स्वीकारावी लागते, परंतु वरील कलमांप्रमाणें त्यांबाबत व्यवहार करणें कायदेशीर नसतें. अशी मालमत्तेची, ती हातीं आल्यापासून सात वर्षांत, बँकांनीं विल्हेवाट लावली पाहिजे.

व्यवस्थापक व त्यांचे करार

बँकांना खालील प्रकारचे व्यवस्थापक नेमतां येणार नाहींत:— (१) मॅनेजिंग एजंट, (२) ज्यांची प्राप्ती पूर्णतः अथवा अंशतः कमिशन किंवा कंपनीच्या नफ्याचा हिस्सा ह्यांवर अवलंबून असेल, असे व्यवस्थापक; (३) कंपनीच्या जिंदगीच्या मानानें ज्यांचें वेतन भरभसाट असेल, असे व्यवस्थापक किंवा (४) ज्यांचा कंपनीशीं व्यवस्थेबाबत पांच वर्षांपेक्षा दीर्घ मुदतीचा करार झालेला आहे, असे व्यवस्थापक. हे करार वाटेल तितक्या वेळा परंतु प्रत्येक प्रसंगीं पांच वर्षांच्या मुदतींचे, ह्याप्रमाणें वाढविता येतील.

अधिकृत, खपलेलें व वसूल भांडवल

बँकांच्या किमान भांडवलाविषयींच्या अटी "अर्था"च्या ता. ६ ऱ्या अंकांत विस्तारानें दिलेल्या आहेत, त्यांचा पुनरुच्चार करण्याचें प्रयोजन नाहीं. बँकांच्या वसूल भांडवलाचें खपलेल्या व अधिकृत भांडवलाशीं काय प्रमाण असावें, हें खालील वाक्यांत सांगितलें आहे. "अधिकृत भांडवलाच्या निम्यापेक्षां कमी इतकें खपलेलें भांडवल असतां कामा नये व वसूल भांडवल खपलेल्या भांडवलाच्या निम्यापेक्षां कमी असतां कामा नये." ह्याचा अर्थ, अधिकृत भांडवलाचा आकडा वसूल भांडवलाच्या चौपटीपेक्षां मोठा कधींहि राहूं शकणार नाहीं. अधिकृत भांडवलाचे मोठे फुगीर आकडे व वसूल भांडवल हीं प्रमाणशीर नसल्यास, लोकांची दिशाभूल होते, ती टाळण्यासाठी ही उपाययोजना आहे. १९४२ साली हिंदुस्थानांत एकूण ४८ बँका बुडाल्या अथवा गुंडाळण्यांत आल्या, त्यांचें अधिकृत भांडवल १ कोटि, ८२ लक्ष रुपये होतें, तर वसूल भांडवल पुरें १२ लक्ष रुपयेहि नव्हतें! बँकांच्या भांडवलांत फक्त ऑर्डिनरी शेअर्सच असले पाहिजेत; मात्र १ जुलै, १९४४ पूर्वी खपलेले प्रेफरन्स शेअर्स चालू रहातील. कंपनीच्या वसूल भांडवलाशीं भागीदाराच्या शेअरच्या रकमेचें जें प्रमाण पडेल, त्या प्रमाणांतच त्याला मताधिकार मिळावयाचा आहे.

मुंबई प्रांतांतील शिक्षणाची प्रगति

	१९४२-४३	१९४३-४४
शिक्षण संस्था	२२,५८२	२२,१५४
विद्यार्थी	१८,०९,७३४	१८,४६,७४१
शाळांतील मुलग्यांचें एकूण पुरुष लोकसंख्येशीं प्रमाण	१२·१८%	१२·३५%
शाळांतील मुलींचें एकूण स्त्री लोकसंख्येशीं प्रमाण	४·९०%	५·०९%
शिक्षणावरील प्रत्यक्ष खर्च (रु.)	४३६ लक्ष	४८३ लक्ष
शिक्षणावरील अप्रत्यक्ष खर्च (रु.)	५८ लक्ष	६२ लक्ष
मॅट्रिकच्या परीक्षेचे विद्यार्थी	१७,८८९	२०,८२३
आर्टस व सायन्स कॉलेजांतील एकूण विद्यार्थी	१२,९९०	१६,७३२
त्यांपैकी विद्यार्थिनी	२,६१८	३,३००
व्यावसायिक कॉलेजांतील एकूण विद्यार्थी	४,३०९	५,४१७
यांत्रिक व औद्योगिक शाळांतील विद्यार्थी	४,५०७	५,६५८
प्राथमिक शाळा	१९,०३७	१९,४३७
त्यांतील विद्यार्थी	१५,३६,२००	१५,४६,२००
प्राथमिक शिक्षणावर प्रत्यक्ष खर्च (रु.)	२२७ लक्ष	२५८ लक्ष

मुंबईप्रांतांत एकूण २१,६५७ गांवें व खेडीं आहेत, त्यांपैकीं १३,३२३ ठिकाणीं शाळा आहेत. प्रत्येक ५·७ चौरस मैलास एक शाळा, असें १९४३-४४ मध्यें सरासरी प्रमाण पडलें.

शिक्षणावरील एकूण सुमारें साडेपांच कोटि रुपये खर्चाची वाटणी खाली दिली आहे:—

	१९४३-४४	
	रकम	%
सरकारी	२,२२,३०,२५२	४०·५
बोर्डे	९४,२९,२३९	१७·२
फी	१,६४,३३,३९९	३०·०
इतर मार्ग	६७,६०,७४२	१२·३
	५,४८,५३,६३४	१००·०

हिरडा

(टॅनिंग अँड डायिंग सबस्टन्स)

ले:—श्री. के. जे. तवनप्पा, बेळगांव

हिंदुस्थानांत आबालवृद्धांस हिरड्याचे वैद्यकीय उपयोग माहीत आहेत परंतु त्याची व्यापारी पैदास व महत्व हीं फारच थोड्यांच्या परिचयाचीं आहेत. हिरड्याची पैदास हिंदुस्थान-ब्रह्मदेशची मोनापली आहे. मजुरांच्या तुटवड्यामुळें ब्रह्मदेशांत माल गोळा करणें परवडत नाहीं. पूर्वापार आमच्या देशांत हिरड्याचा उपयोग कातडें कमावण्यासाठी व सुताचे रंगासाठी लोक करीत आले आहेत, परंतु अनलाईन कलर निघाल्यावर रंगासाठी तो कोणी वापरीत नसत. परंतु युद्धामुळें खाकी व ब्ल्यू ब्लँयक सरकारी कापड ऑर्डर व इतर कामाचे रंगासाठी आमच्या देशी गिरण्यांनीं लाखों पोतीं हिरडा वापरून त्याचें देशी महत्त्व पटवून दिलें. " केमिस्ट्री अँड इंडस्ट्री " ह्या ब्रिटिश मासिकानें ' एंपायर वॉर मटिरियल रिसोर्सेस ' नंबरमध्यें हिरड्याचें महत्त्व वर्णिलें आहे.

हिरडा हिंदुस्थानांत सर्वत्र जंगलांत पिकतो परंतु ब्रिटिश प्रांतापेक्षां संस्थानांत व रयतावी जमिनींत अधिक होतो. मुंबई इलाखा व संस्थानें, मध्यप्रांत व संस्थानें या भागांतच ७० टक्के पिकतो. शिवाय बिहार, ओरिसा, मद्रास, म्हैसूर येथें बाकी ३० टक्के होतो. एकंदरीत १॥· हंड्रेटवेटचे मापाचीं सुमारें १५ लाख पोतीं पिकतात. पैकीं ८--९ लाख पोतीं साली़ंना मुंबई व कलकत्ता बंदरांतून इंग्लंड, जर्मनी, हॉलंड, बेलजियम, फ्रान्स, अमेरिका, आस्ट्रेलिया, जपान वगैरे देशांस जातात. पैकीं इंग्लंड एकटे निम्मे घेते. मुंबई इलाख्यांत बेळगांव कारवार, सातारा, पुणें व नाशिक जिल्ह्यांत मिळून अंदाजें २ लाख पोतीं व कोल्हापूर आणि त्याच्या जहागिरी, आजरे तालुका, (इचलकरंजीपैकीं) बावडा, मलकापूर, भोर स्टेट, जंजिरा स्टेट मिळून ५ लाख पोतीं होतात. पैकीं बेळगांवची ८० हजार पोतीं. पिकांत निवडून नं. १ व नं. २ असें ग्रेड करितात. नं. १ ग्रेड ५० हजार पोतीं चालू १० वर्षांत सर्व मद्रास इलाख्यांत देशी कातडी कारखान्यांत खपतो. नं. २ चा माल कांहीं होलनटस व कांहीं कश करून सालपटें तेवढींच अमेरिका बहुधा, व बाकी जर्मनींत खपतो. पुर्णेपैकीं जुन्नर व आंबेगांवचीं माल आणि भोरपैकीं थोड्या भागाचा मिळून ५० हजार पोतीं पुर्णेपैकीं भिमडी गांवचें नांवानें B. 1. क्वालिटी सदराखाली मुंबईहून परदेशीं जातो. बाकी सर्व मिक्स करून राजापूर बंदरवरून R. 1 R. 2 क्वालिटी नांवानें मुंबईहून परदेशीं जातो. ग्रेडस " युनायटेड टॅनर्स फेडरेशन " लंडन या संस्थेनें R. 1, B. 1, J. 1 & tows in alls असे स्टँडर्ड नमुने ठरविले असून, त्याशिवाय नॉन फेडरेशन क्वालिटीचाही व्यापार होऊं शकतो. मध्यशांत पैकीं जबलदोर, मांडला, बालाघाट, रायपूर जिल्ह्यांत २ लाख पोतीं व तेवीळ, रेवा, बस्तार, कॉंकेड संस्थानांत मिळून ६ लाख पोतीं पिकतो. हा सर्व J. 1 & J. 2 सदराखाली कलकत्त्याहून परदेशीं रवाना होतो. कांहींसा कानपूर, राजकोट, आग्रा वगैरे ठिकाणीं खपतो. शिवाय देशभर व्हिलेज टॅनिंगसाठी मोठ्या प्रमाणांत खपतो. याशिवाय हिरडा एक्सट्रॅक्टही कांहीं प्रमाणांत होतो. याच्या दोन फॅक्टऱ्या-पैकी एक सरमपूर व दुसरी राणीमंज येथें आहे. तिसरी आंबाघाट कोल्हापूर) येथें निघाली असून फॅक्टरी पूर्णत्वास पोंचली आहे; परंतु एक्सट्रॅक्ट लिक्विड फॉर्ममध्यें साधारण डांबरासारखा असतो तो मरणेस लाकडी पिपा मिळत नसलेमुळें काम अडलें आहे. कंपनीस सॉलिड फॉर्म मध्यें कच्चें मात शिजवून जसें उकडे तांदूळ तयार करतात त्याप्रमाणें तयार करून पोतींत भरतां येईल अशा प्रोसेसनें काम करून देणाऱ्या केमिस्टच्या शोधांत कंपनी असून त्यांना तो अद्याप मिळाला नाहीं. ह्या पद्धतीनें सध्या सरगपुरास माल निघतो.

झाडें आपोआप वाढतात त्यामुळें मालकास रॉयल्टी चांगली व बिनासर्च मिळते. माल जंगलांत गोळा करणेची मजुरी, गाडीभाडें, हमाली, ग्रेडिंगची मजुरी, खाली पोतीं अशा तऱ्हेनें मालाची ९५ टक्के किंमत लोकांस वाटली जाते शिवाय फक्त बेळगांवच्या हिरड्यावर रेलवेस २ लाख रु. भाडें मिळतें.

आणखी एक गोष्ट आश्चर्याची म्हणजे आमचे रेलवेचे रेट इतके विचित्र आहेत कीं बेळगांवचा हिरडा बंदरापर्यंत भाडें देऊन तेथून जहाजाचें भाडें देऊन C. I. F. लंडन, लिव्हरपूलला २॥· रु. स १ हंड्रेडवेट शांतता कालांत देण्यास परवडतें तेंच बेंगलोरच्या कारखान्यास तीच पडतर ३ रु. १ हें होते. तरी देशांत टॅनिंगचे कारखाने निघणेसाठी आणि रेलवे दर देशी कातडी कारखान्यास पोषक ठरविणें अगत्याचें आहे.

झेकोस्लोव्हाकिया व हिंदुस्थान

झेकोस्लोव्हाकियाची लोकसंख्या १३ कोटि असून त्याचें क्षेत्रफळ ५४,२४६ चौ. मैल आहे. युरोपांतील राष्ट्रांत क्षेत्रफळाचे दृष्टीनें त्याचा तेरावा व औद्योगिक सामर्थ्याच्या दृष्टीनें पांचवा अनुक्रम लागत होता. १९३० च्या शिरगणतीप्रमाणें, त्या देशांतील ३५% लोकांची उपजीविका शेतीवर अवलंबून होती, ३५% उद्योगधंद्यांत होते, १३% व्यापार, वहातुक वगैरेंत गुंतलेले होते व १७% नोकरी व इतर व्यवसाय ह्यांत होते. इतर औद्योगिक राष्ट्रें व झेकोस्लोव्हाकिया ह्यांत फरक असा, कीं ९२% औद्योगिक व व्यापारी उचकमांत प्रत्येक १ ते ५ माणसें कामावर होतीं, ५·९% मध्यें ६ ते १९ माणसें व २·२% मध्यें २० पेक्षा अधिक कामगार होते. युरोपांतील युद्ध संपत येत असल्याकारणानें, झेकोस्लोव्हाकियाचा हिंदुस्थानाशीं पूर्ववत् व्यापार कसा सुरू होईल ह्याविषयीं चर्चा चालू आहे. झेकोस्लोव्हाकियाची मशिनरी ह्या देशांत सुप्रसिद्धच आहे. विशेषतः हिंदी साखर कारखान्यांत हेक मशिनरी फार मोठ्या प्रमाणावर बसविण्यांत आलेली आहे. कांचसामान, कागद, बूट, इत्यादिसाठीहि झेकोस्लोव्हाकिया प्रसिद्ध आहे. 'बाटा' हें नांव सबंद हिंदुस्थानांत महशूर आहे.

ब्रिटिश निर्यात व्यापारास मोकळीक

जर्मनीच्या पराभवानंतर, ब्रेटब्रिटनला अमेरिकेकडून लेंड-लीजनवार मिळणारी मदत निम्म्यानें कमी होणार आहे. युद्ध चालविण्यास आवश्यक अशाच बाबींची आयात चालू राहील. नागरिकांच्या जीवनोपयोगी वस्तूंची आयात बंद होईल. त्याप्रमाणेच, पूर्वी ठरल्याप्रमाणें अशा वस्तूंची निर्यात सुरू करण्यास ब्रेट ब्रिटनला मोकळीक मिळेल. अमेरिकेतून येणाऱ्या जीवनोपयोगी मालाची रोखीनें किंमत द्यावी लागेल.

सुताच्या अपुरा पुरवठा

मद्रास प्रांतांतील चित्तूर जिल्ह्यांत पुरेशा सुताचे अभावी १५,००० मागांपैकी १०,००० माग बंद आहेत.

"मागोरा"चा अभिनव व आश्चर्यकारक शोध

ढेकणांच्या उदवत्त्या

(ABC)

BUG COILS (ABC)

प्रत्येक उदवत्ती रात्रभर जळते व तोंपर्यंत ढेकूण आपले ठिकाण सोडून बाहेर येत नाहीत. विशिष्ट घुरामुळे हा चमत्कार होतो. बॉक्समध्ये १२ तांबड्या उदवत्त्या तांबड्या पॅकिंगमध्ये बॉक्स किं. रु. १-८, टे. स. निराळा.

दि मागोरा केमिकल कं. लि.,
हिरवाग, पुणें २

महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्यांचे व्यापारी

गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें

पूना गेस्ट हाऊस

संस्थापक :
के. नानासाहेब सरपोतदार
टेलिफोन नं. ७७९

साडू हार्टिना

उत्तीव लवकरचें, वार लागणें, उत्तीव कमी जास्त होणें, रक्तचा दाब जास्त होणें व हृदयाची धडधड यांवर खात्रीची गुणकारी.

ओरिजिनल ब्राम्ही तेलाचे कारखानदार.

ए. के. साडू ब्रदर्स, चेंबूर, लिमिटेड. केमिस्ट्स व ड्रगिस्ट्स. बेंबई. ४००.

पुणें चीफ एजंट :
मे. श्रीदत्त एजन्सी
१०० रविवार पेठ, मोती चौक, पुणें २.

कोल्हापूर विक्रेते :
मे. भागवत आणि कं.
कांच लाइन

सातारा जिल्हा एजंट :
मे. जोशी आणि मंडळी
भवानी पेठ.

-राष्ट्रीय काटकसर-

युद्धकार्याची गरज लक्षांत घेऊन डबे वा कागद यांची बचत करणें माग आहे. ही पॅकिंग-बाबतची अडचण लक्षांत घेऊन—

-गोल्डन कोको-

सुटा मिळण्याची सोय सर्व प्रमुख व्यापाऱ्यांकडे करण्यांत येत आहे. सुटा कोको घेण्यानें पैशाचीही बचत होते. मात्र आपणांस गोल्डन कोकोच मिळत आहे अशी खात्री करून घ्या. नांव लक्षांत ठेवा.

साठे बंधू, "गोल्डन कोको"
—सर्वत्र मिळतो—
साठे कोको व चॉकोलेट कारखाना, पुणें १.

न्यू इंडिया इंडस्ट्रीज लि.

(Approved Re-treaders and Approved Contractors.)
२६ लॅमिंग्टन नॉर्थ, मुंबई ११.
अध्यक्ष:—श्री. ग. स. मराठे, ॲक्चुअरी.

महाराष्ट्रांतील रबराचा प्रमुख कारखाना

★ गिरणीचे रोलर्स ★ रबरी हातमोजे ★ छापखान्यांचे रोलर्स
★ रीमोल्ड टायर्स ★ रबरी वॉशर्स ★ सॉलिड व्हील्स

व इतर रबरी माल तयार होतो.

पु. ग. मराठे
मॅनेजिंग डायरेक्टर.

हें पत्र पुणें, पेठ शनवार नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनी छापिलें व ए. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनी 'दुर्गाविलास,' शनवार, पे. नं. १२७११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

जाहिरातीचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
(टपाल खर्चासह माफ)
किरकोळ अंकास
दोन आणे.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति। —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष १० पुणें, बुधवार तारीख २७ डिसेंबर, १९४४ अंक ५१

व्ही. पी. बेडेकर
आणि सन्स लि.
मुंबई.
मसाल्याचे व्यापारी
पुणें एजंटः—
द. ना. हेजीब

देना विमा कंपनी
मध्यें
तुमचा विमा उतरवा
जिंदगी ★ आग ★ मोटर
सुरेश के. देसाई, मॅनेजर.
हिंमतलाल गांधी, मॅ. डायरेक्टर.
देवकरण नानजी बिल्डिंग्ज, एल्फिन्स्टन सर्कल, कोट, मुंबई.

गुरांचा खुराक

हा खुराक सर्व-गाय, म्हैस, घोडा, शेळी—जनावरांना, कोंबडीं, बदकें इत्यादि प्राण्यांना व इतर पाळीव पक्ष्यांना उपकारक ठरला आहे.

हा खुराक नित्य दिल्यानें पुढील गुण अनुभवास येतातः—

(१) जनावरांचीं हाडें मजबूत होऊन रक्तशुद्धि होते व तें शरीरांत चांगल्या तऱ्हेनें खेळूं लागतें.
(२) प्राण्यांना जखम झाली असतां ती लौकर भरून येण्याची प्रवृत्ति रक्तांत उत्पन्न होते.
(३) प्राण्यांची पचनक्रिया सुधारते व त्यांना तरतरी येते.
(४) दूध देणाऱ्या जनावरांचा गर्भाशय दृढ होऊन गर्भधारण व गर्भपोषण चांगलें होतें.
(५) दुभत्या जनावरांचें दूध वाढतें.
(६) कोंबड्या व बदकें हीं मोठीं अंडीं घालूं लागतात व त्या अंड्यांची कवचीहि बळकट होत.

आय. ए. सी. आर. लि.
कर्वे रोड, पुणें ४



पुणें चीफ एजंट :
मे. श्रीदत्त एजन्सी
१०० रविवार पेठ, मोती चौक, पुणें २.

कोल्हापूर विक्रेते :
मे. भागवत आणि कं.
कांच टाइन

सातारा जिल्हा एजंट :
मे. जोशी आणि मंडळी
भवानी पेठ.

विविध माहिती

आसामसाठी संयुक्त प्रांतीय मजुरांची रवानगी

आसाममधील "अधिक धान्य पिकवा" मोहिमेस जोर आणण्यासाठी संयुक्त प्रांतांतील १०,००० मजुरांना तेथें पाठविण्याचा हिंदुस्थान सरकारचा विचार आहे, असें समजतें.

पोलिश प्रश्नाबाबत इंग्लंडचें धोरण

पोलंडच्या पूर्वेचा भाग रशिया व्यापणार आहे. ह्यामुळें पोलंडचें जें नुकसान होईल, तें भरून काढण्यासाठी त्यास जर्मनीचा कांहीं भाग तोडून द्यावा, अशी इंग्लंडची योजना आहे. ही योजना प्रत्यक्ष अंमलांत आणल्यास, पूर्वेकडील १,०७,००,००० पोल लोकांना आपलीं घरेंदारें सोडून दुसरीकडे जावें लागेल. जर्मनांनाहि आपला प्रदेश सोडतेवेळीं सर्वस्वाचा त्याग करून दुसरीकडे निघाल्यासाठी आश्रय द्यावा लागेल.

दारिद्र्य व राजकीय पारतंत्र्य ह्यांचा काय संबंध !

"दारिद्र्य नाहींसें करण्याचा प्रयत्न करण्याऐवजी राजकीय स्वातंत्र्याच्या मागें लागणें हें फाजील व पोकळ अभिमानाचें लक्षण आहे."—पंजाब प्रांताचे अर्थमंत्री, सर मनोहरलाल.

जळगांव येथील प्रदर्शन

डेप्युटी डायरेक्टर ऑफ ॲग्रिकल्चर, रावबहादुर रेगे, ह्यांनीं जळगांव येथील शेती व जनावरें ह्यांच्या प्रदर्शनाचें उद्घाटन केलें. कपास व भुइमूग ह्यांच्या सर्वोत्कृष्ट नमुन्यास प्रत्येकीं १०० रुपयांचीं बक्षिसें देण्यांत आलीं.

पुलगांव कॉटन मिल्स

वरील कंपनीस ३० जून, १९४४ अखेर संपलेल्या वर्षी ९ लक्ष, ४० हजार रुपये नफा झाला.

हिंदी कस्टम्सचें वाढतें उत्पन्न

	रुपये
नोव्हेंबर, १९४३	४,१९,००,०००
ऑक्टोबर, १९४४	८,६२,००,०००
नोव्हेंबर, १९४४	९,२३,००,०००

खेडेगांवांतील पुस्तकालयें

मुंबई सरकारच्या प्रौढ शिक्षण योजनेप्रमाणें खेडेगांवांत स्थापन करण्यांत आलेल्या पुस्तकालयांची यादी ता. २३ च्या सरकारी गॅझेटांत प्रसिद्ध झाली आहे. ३१ मार्च १९४४ रोजीं अशा पुस्तकालयांची संख्या १,५६५ होती. त्यांपैकी २५९ उत्तर भागांत, ४६९ मध्य भागांत व ८३७ दक्षिण भागांत होती. त्यांची भाषावार वांटणी कानडी ६६५, मराठी ६१३, गुजराती २३६ व उर्दू ३६ अशी करतां येईल. १५ पुस्तकालयांत एकापेक्षां अधिक भाषांतील पुस्तकें होतीं.

हिंदी रेल्वेजचें उत्पन्न

१ एप्रिल ते ३० नोव्हेंबर	रुपये
१९४३	१,१५,८६,००,०००
१९४४	१,३६,६१,००,०००

							सन १९४५				
+	+	+	+	नोव्हेंबर	+	+					
जुलै	आक्टोबर	+	+	मार्च	+	डिसेंबर					
एप्रिल	जानेवारी	मे	ऑगस्ट	फेब्रुवारी	जून	सप्टेंबर					
रविवार	सोमवार	मंगळवार	बुधवार	गुरुवार	शुक्रवार	शनिवार	१	८	१५	२२	२९
सोमवार	मंगळवार	बुधवार	गुरुवार	शुक्रवार	शनिवार	रविवार	२	९	१६	२३	३०
मंगळवार	बुधवार	गुरुवार	शुक्रवार	शनिवार	रविवार	सोमवार	३	१०	१७	२४	३१
बुधवार	गुरुवार	शुक्रवार	शनिवार	रविवार	सोमवार	मंगळवार	४	११	१८	२५	+
गुरुवार	शुक्रवार	शनिवार	रविवार	सोमवार	मंगळवार	बुधवार	५	१२	१९	२६	+
शुक्रवार	शनिवार	रविवार	सोमवार	मंगळवार	बुधवार	गुरुवार	६	१३	२०	२७	+
शनिवार	रविवार	सोमवार	मंगळवार	बुधवार	गुरुवार	शुक्रवार	७	१४	२१	२८	+

(हें कॅलेंडर गतवर्षीप्रमाणें श्री. जी. टी. सोनार, क्लार्क, नंदुरबार को. सु. यूनियन ह्यांनीं तयार करून लोकांच्या कागदाची बचत व्हावी ह्या हेतूनें 'अर्थ' मध्यें प्रसिद्धीसाठी पाठविलें आहे.)

अनुक्रमणिका

	पृष्ठ		पृष्ठ
१ विविध माहिती ...	४२२	६ बिहार प्रांताची सहकारी परिषद	४२७
२ बँकांवर युद्धपरिस्थितीचे परिणाम	४२३	७ सहकारी स्टोअर्सना कर्ज	४२७
३ विवाहापेक्षा घटस्फोट ज्यास्त!	४२४	८ शुगर केन कमिटी ...	४२७
४ कपाशीची लागवड...	४२४	९ सहकारी इन्स्टिट्यूटचा वार्षिक अहवाल ...	४२८
५ स्फुट विचार... ...	४२५	१० रॉकडेल पायोनिअर्स	४२९
मेटब्रिटनचें परराष्ट्रीय देणें– उसाची लागवड–"कोठार तळा"–सहकारी मालवाटणी		११ शेतकऱ्यांचें दारिद्र्य	४३०
		१२ धान्य व अन्न प्रश्न	४३१

अर्थ

बुधवार, ता. २७ डिसेंबर, १९४४

बँकांवर युद्धपरिस्थितीचे परिणाम

जगाच्या मोठ्या भागावर पसरलेल्या प्रस्तुत युद्धाच्या योगानें राष्ट्रीय आर्थिक जीवनाच्या ओघांत सर्वत्र बदल होऊन त्यास निराळी दिशा लागली आहे. लढाऊ सामुग्रीची बनावट आणि तिची वहातुक ह्यांवर राष्ट्रांची शक्ती युद्धांत एकवटावी लागते, बिन-लढाऊ उपयोगाचा माल दुर्मिळ होऊन त्याच्या किंमती चढतात, युद्धखर्च भागवण्यासाठी राष्ट्रीय सरकारांस करबाढ मोठ्या प्रमाणावर करावी लागते आणि कर्जाच्या आश्रयानें जरूर त्या प्रचंड रकमा उभाराव्या लागतात, जनतेस नित्याच्या चरितार्थास लागणाऱ्या वस्तूंच्या पुरवठ्याचें व किंमतीचें नियंत्रण करणें अपरिहार्य होतें व चलनाचा विस्तार आवश्यक होऊन महागाईस त्याची मदत होते. अशा रीतीनें उद्योगधंदे, व्यापार, व्यवसाय ह्या सर्वांचें मामुली स्वरूप व त्यांचा ओघ बदलला असतां बँकिंगच्या व्यवहारांत बदल होणें क्रमप्राप्तच आहे. लोकांच्या हातांत अधिक चलन खेळतें आणि त्याचा ओघ ठेवींच्या मार्गानें बँकांकडे वळतो आणि उद्योगधंदे व व्यापार ह्यांसाठी त्यांचा विनियोग ह्या संस्थांस करतां न आल्यानें त्यांतला पुष्कळसा पैसा सरकारी कर्जरोख्यांत गुंतवण्यावांचून गत्यंतर रहात नाहीं. जनतेची बचत स्वतःपाशीं ठेव म्हणून ठेवून घेणें आणि तिच्यापैकी कांहीं रकम रोकड व तरती राखून बाकीच्या पैशाचीं व्यापार-उद्योगाच्या सोयीसाठी कर्जे गरजू लोकांस देणें हा बँकांचा मुख्य व्यवहार होय. पण वर वर्णिलेल्या युद्ध-परिस्थितींत बँकांतील वाढलेल्या ठेवींचा पैसा पूर्वीच्या मानानें अधिक मोकळा व तरता रहातो आणि त्यांतला केवळ अल्प अंश व्यापाऱ्यांस कर्जे देण्यांत वापरला जातो. मुख्यत्वेंकरून सरकारी रोख्यांत जनतेच्या बचतीचा पैसा गुंतवण्याचें कार्य बँकांकडे येतें आणि कमी व्याजानें पण मोठ्या प्रमाणांत रकमा अशा रीतीनें गुंतवल्यामुळेंच त्यांचा नफा न घटतां स्थिर राहूं शकतो.

गेल्या पांच वर्षांत बँकांच्या येण्याच्या बाजूंची वाटणी कशी बदलत गेली आहे आणि ही प्रवृत्ति ब्रिटिश बँकांत, हिंदुस्थानांतील जॉइंट स्टॉक बँकांत आणि सहकारी बँकांत कोणत्या दिशेनें होत आहे ह्याची तुलनात्मक कल्पना मुंबई प्रांतांतील सहकारी बँकांच्या चालकांस यावी, ह्या हेतूनें प्रो. काळे ह्यांनीं अलीकडे जे आकडे गोळा करून त्यांची बोधप्रद मांडणी एका चोपडीत केली आहे आणि ते बँबे को-ऑपरेटिव्ह बँक्स असोसिएशननें प्रसिद्ध केलें आहे. (Recent Trends in Co-operative Banking in Bombay Province: 1– Provincial Bank and Central Banks) प्रो. काळे ह्यांनीं प्रथम ब्रिटिश बँकांचे संबंधांतले आकडे दिले आहेत, त्यांवरून असें दिसतें कीं युद्धाच्या पहिल्या पांच वर्षांत त्या बँकांतील ठेवी २१६ कोटि पौंडांवरून ४११ कोटि पौंडांवर गेल्या आणि अशा रीतीनें त्यांमध्यें ८८ टक्के वाढ झाली. पण ह्या वाढलेल्या ठेवींचा विनियोग ब्रिटिश बँकांनीं कसा केला! १९३९ सालीं रोख्यांतील गुंतवणीचें ठेवींशीं प्रमाण २७·७ टक्के होतें तें १९४४ मध्यें ५९ टक्क्यांवर चढलें आणि कर्जाचें प्रमाण ४५·५ टक्क्यांवरून १८·८ टक्क्यांपर्यंत घसरलें. हिंदुस्थानांतील शेडयूल्ड बँकांचा विचार करतां त्यांची संख्या अलीकडे वाढली आहे हें ध्यानांत बाळगलें पाहिजे. त्यांतल्या ठेवी २३६ कोटि रुपयांच्या ८११ कोटि रुपये झाल्या, म्हणजे २४३ टक्क्यांनीं वाढल्या, परंतु त्यांनीं दिलेली कर्जे १०५ कोटि रुपयांचीं २१० कोटि झालीं म्हणजे केवळ १०० टक्के अधिक झालीं. ह्या शेडयूल्ड बँकांनीं दिलेल्या कर्जांचें त्यांच्या ठेवींशीं प्रमाण १९३९ मध्यें ४५ टक्के होतें, तें १९४४ मध्यें २७ टक्क्यांपर्यंत खालीं आलें. इंपीरिअल बँकेच्या रोख्यांतील गुंतवणुकीचें प्रमाण ६० टक्के १९३९ मध्यें होतें, तें पांच वर्षांनीं तसेंच स्थिर राहिलें, पण दिलेल्या कर्जांचें प्रमाण ३४ टक्क्यांवरून २४ टक्क्यांवर उतरलें. हिंदी जॉइंट स्टॉक बँकांच्या व्यवहारांतील फेरबदलाची प्रवृत्ति ब्रिटिश बँकांच्या वळणावरच आहे हें वरील तुलनात्मक आकड्यांवरून दिसून येईल.

मुंबई प्रांतांतील सहकारी मध्यवर्ती बँकांकडे वळलें असतां हाच प्रकार स्पष्ट आढळतो. प्रांतिक सहकारी बँक व सेंट्रल बँका ह्यांच्या ठेवींची रकम पांच वर्षांत ४०३ लक्षांची ७९५ लक्ष रुपये झाली, म्हणजे दुप्पट झाली. नुसती प्रांतिक बँक घेतल्यास ही वाढ १२७ टक्के झाली आणि सेंट्रल बँका स्वतंत्र एकत्र घेतल्या तर वाढीचें प्रमाण ७३ टक्के होतें. ह्या सर्व बँकांचीं कर्जे मात्र २३४ लक्षांचीं ३२० लक्ष रुपये झालीं, म्हणजे त्यांत फक्त ३६ टक्क्यांची वाढ झाली. नुसत्या सेंट्रल बँका हिशेबांत घेतल्या असतां कर्जांची वाढ फक्त २ टके झाल्याचें दिसतें. प्रांतिक बँकेतील वाढ मात्र ८५ टक्के झालेली आहे. ठेवी वाढल्या आणि त्यांच्या प्रमाणांत बँकांनीं दिलेलीं कर्जे वाढलीं नाहींत, ह्याचें कारण शेतीच्या मालास चांगला भाव आल्यानें प्राथमिक पतपेढ्यांच्या सभासदांनीं आपलीं थकलेलीं कर्जे फेडलीं आणि नवीन कर्जे लहान प्रमाणावर घेतलीं हें आहे. ह्याचा परिणाम बँकांची कर्जरोख्यांतील गुंतवण वाढण्यांत होणें स्वाभाविक आहे. प्रांतिक बँकेची गुंतवण १५३ टक्क्यांनीं वाढली, सेंट्रल बँकांच्या गुंतवणुकींत १७० टक्क्यांची वाढ झाली आणि दोहोंच्या वाढींचा आकडा १६४ टके झाला. रोकड, इतर बँकांत ठेवलेली शिल्लक व रोख्यांतील गुंतवण ह्यांची एकूण रकम मिळून बँकांचा तरता पैसा होतो. त्याचें प्रमाण बहुतेक सेंट्रल बँकांत विलक्षण वाढलें आहे आणि कांहीं बँकांत तें शंभराचेवर किंवा जवळ असें आहे. युद्ध समाप्तीनंतर ठेवी कमी होतील तेव्हां बँकांचे व्यवहारांस कोणतें वळण अग्रक्रमें श्रेयस्कर व इष्ट आहे ह्याचा विचार होऊन ह्या संस्थांनीं एव्हां-

पासून आपलें घोरण व्यवस्थित रीतीनें आखावें अशी प्रो. काळे ह्यांची सूचना आहे. मालाच्या तारणावर कर्जे देण्याची व्यवस्था सेंट्रल बँकांस करावी लागेल आणि शेतकरीकर्जनिवारणाच्या कायद्याच्या अंमलबजावणीमुळें ह्या व्यवहारांत विस्तार होईल. त्यावेळीं बँकांस पैशाची टंचाई भासण्याचा संभव आहे आणि चालू खर्च व व्याजाची प्राप्ती ह्यांचा योग्य मेळ घालावा लागेल. प्रो. काळे ह्यांनीं दिलेले तुलनात्मक आकडे बोलके असून बँकांच्या व्यवहाराच्या दृष्टीनें सूचक आहेत. जॉइंट स्टॉक आणि सहकारी बँकांनीं स्वतःचें घोरण सुरक्षित रीतीनें आखण्याकडे त्यांचा उपयोग करावा अशी अपेक्षा आहे.

विवाहांपेक्षा घटस्फोट जास्त ?

१९४० साली अमेरिकेंतील प्रत्येक ५ किंवा ६ विवाहांपैकी एकाचा शेवट घटस्फोटांत झाला. चालू वर्षी, ४ किंवा ५ विवाहांत एक घटस्फोट असें तेथें प्रमाण पडेल. युद्धपरिस्थितीमुळें सध्या विवाहांस चालना मिळाली आहे, त्याची गति कमी होतांच घटस्फोटांचें प्रमाण वाढत जाईल. आघाडीवर निघणारा सैनिक तातडीनें विवाह करून जातो, तो परत आल्यावर त्यास आपली पत्नी कल्पनेइतकी आकर्षक वाटणार नाहीं व लष्करी वेषांत दिसणारा वीर साध्या वेषांत पुढें पत्नीला बावळट वाटूं लागेल. युद्ध संपल्यावर अमेरिकेंत घटस्फोटांचें पेव फुटेल! विवाह टिकविण्याचा पती व पत्नी ह्यांनीं आतांपासूनच कसून प्रयत्न केला, तरच ही आपत्ति कमी होईल. गेल्या वर्षी कॅलिफोर्नियामध्यें लॉस एंजल्स कौंटींत ३३,००० विवाह झाले आणि घटस्फोटांची संख्या २४,००० भरली. म्हणजे १० विवाह झाले तर घटस्फोट होऊन ८ मोडले! १९४५ सालीं विवाहांपेक्षा घटस्फोटांचीच संख्या तेथें अधिक भरेल, अशीं चिन्हें दिसत आहेत. विवाहाची घाई करण्यांत मुख्यतः मुलींचाच दोष असतो, ही गोष्ट विसरतां कामा नये. आघाडीवर निघालेला व परत येणारा सैनिक ह्यांच्या मनःस्थितीमधील फरक नीट अभ्यासून त्यास घरीं आल्यावर त्याच्या अपेक्षेच्या शक्य तेवढ्या मोठ्या प्रमाणांत सुख मिळावें, असा प्रयत्न मागें राहिलेल्या पत्नीनें करावा, असा त्यांस उपदेश करण्यांत येत आहे. युद्धजन्य परिस्थितीचा समाजावर कसा परिणाम होतो, ह्याचें हें उत्कृष्ट उदाहरण आहे.

ओरिसाची नवी राजधानी–"भुवनेश्वरी"

ओरिसा प्रांताच्या सरकारनें भुवनेश्वर हें शहर आपली नवी राजधानी म्हणून नियुक्त करावें अशी प्रांतिक असेंब्लीची शिफारस आहे. भुवनेश्वर कटकच्या (सध्याची राजधानी) दक्षिणेस १६ मैलांवर आहे. हें फार प्राचीन गांव आहे. त्याचें आम्रतीर्थ असेंहि नांव आहे. ५ ते १२ शतकेंपर्यंत केसरी घराण्यांतील राजे येथें राज्य करीत होते. काशीच्या तोडीचें हें शहर करण्याचा त्यांचा बेत होता. शहराजवळील भुवनेश्वर तलावाभोंवतीं २०० देवळें आहेत. मुख्य भुवनेश्वर महादेवाचें देऊळ फार उंच होतें व त्याभोवतीं ७ हजार मूर्ती त्या वेळीं होत्या.

न्यू सिटिझन बँक ऑफ इंडिया लि.

वरील बँकेच्या डायरेक्टरांनीं क्यु. प्रे. व ऑर्डिनरी शेअर्सवर ५% व डिफर्ड शेअर्सवर ६% इंटेरिम डिव्हिडंड ३० सप्टेंबर अखेरच्या पहिल्या सहामाहीकरितां जाहीर केलें आहे. बँकेच्या शेअर्सची विक्री ३ जानेवारी रोजीं निश्चित बंद होणार आहे. प्रेफरन्स शेअर्स सर्व खपले आहेत.

कपाशीची लागवड कमी करण्याची सक्ती

तपशीलवार योजना

हिंदुस्थानांतील कपाशीची लागवड ह्यापुढें कडक रीतीनें मर्यादित केली जाणार आहे. पांच वर्षांची योजना प्रथम अंमलांत येईल. इंडियन सेंट्रल कॉटन कमिटीच्या जानेवारी अखेरच्या बैठकींत ह्या योजनेचा तपशीलवार विचार होईल व हिंदुस्थान सरकार योग्य तो कायदा तयार करून त्यास मध्यवर्ती विधिमंडळाची मान्यता मिळवील.

धान्याचें उत्पादन वाढविण्याची आवश्यकता, हिंदी कपाशीस परराष्ट्रीय बाजारपेठेंत मिळणारा वाव, कपाशीस येत्या पांच वर्षांतील अपेक्षित मागणी व सध्या पडून असलेला कांहीं प्रकारच्या कपाशीचा मोठा साठा, हीं सर्व लक्षांत घेऊनच योजना आखण्यांत येईल. १९४२-४३ मध्यें हिंदी कपाशीचें क्षेत्र, १,९२,००,००० एकर होतें, त्यांत १९४५-४६ सालीं व १९४६-४७ सालीं ३१,००,००० एकरांची घट व्हावी, असा उद्देश आहे. त्यानंतर तात्कालिक परिस्थिति लक्षांत घेऊन किती कपास लावली जावी, हें ठरविण्यांत येईल. मुख्यतः आखूड व मध्यम लांबीच्या धाग्याच्या कपाशीचे क्षेत्रांतच घट करविली जाईल.

ज्या प्रकारच्या कपाशीचें क्षेत्र मर्यादित केलें जाणार नाहीं, त्या प्रकारच्या कपाशीचे क्षेत्रांत वाढहि करण्यांत येतां कामा नये. कालव्याचें पाणी आखूड धाग्याच्या कपाशीस मिळणार नाहीं. कपाशीच्या लागवडींतील घट सकीनें घडवून आणली जाईल. ज्या प्रांतांत व संस्थानांत कपाशीचें क्षेत्र अशा प्रकारें कमी होईल, त्यांना जनावरांसाठी लागणारी पेंड बाहेरून आयात करतां येईल. कपाशीची मेसळ करण्यास मध्यवर्ती सरकारच्या कायद्यानें बंदी केली जाईल.

वाडा पेटा सहकारी खरेदी-विक्री युनियन, लि.

डायरेक्टर ऑफ सिव्हिल सप्लाइजची भेट

३०-६-४४ अखेर संपलेल्या वर्षी युनियननें एकूण २,६४,१८३ रुपयांची खरेदी करून २,४२,७७२ रुपयांची विक्री केली. वर्षअखेर शिलकी माल ५०,१२० रुपयांचा होता. ठोक नफा १४,५३१ रुपये व निवळ नफा ४,४७८ रुपये झाला. वाडा येथें युनियनचीं चार दुकानें आहेत व पेट्यांत एकूण नऊ केंद्रें आहेत. नियंत्रित मालाप्रमाणें अनियंत्रित मालाचाहि व्यवहार चालू आहे, त्यामुळें भरमसाट भावास आळा बसला आहे. नोकरांच्या बदल्या तालुक्यांतील सर्व दुकानांवर केल्या जातात. पेट्यांतील लोकांनीं सुमारें ५६ हजारांच्या ठेवी युनियनकडे ठेवल्या आहेत. डायरेक्टर ऑफ सिव्हिल सप्लाईज, मि. बूथ, ह्यांनीं युनियनला ता. १३ डिसेंबर रोजीं भेट दिली, त्यावेळीं त्यांनीं खालील शेरा लिहून ठेवला:—

"ह्या युनियनला भेट देऊन, पेट्यांत जीवनोपयोगी मालाच्या वाटणीच्या कामाची माहिती समजून घेण्याची मला संधी मिळाली, ह्याबद्दल आनंद होतो. सध्याच्या परिस्थितींत हें काम फारच महत्त्वाचें आहे आणि सहकारी मार्केटिंग व पुरवठा संघटनेचा तो कणा म्हणून उपयोगी पडेल. श्री. देशमुख ह्यांस सहकारी खात्यानें युनियनकडे मॅनेजरचें काम करण्यासाठी पाठविलें आहे. त्यांची मुदत आणखी एक वर्ष तरी वाढविणें त्या खात्यास शक्य होईल, अशी मला आशा आहे."

स्फुट विचार

ग्रेट ब्रिटनचें परराष्ट्रीय देणें

ग्रेट ब्रिटननें आपलें युद्धकालीन देणें भागविण्यासाठी परराष्ट्रांतील सरकारी रोखे विकले असले, तरी तेथील औद्योगिक मंडळ्यांचे भाग मात्र आपल्या तिजोरींतून फारसे बाहेर काढलेले नाहींत. उदाहरणार्थ, आपले हिंदुस्थान सरकारचे रोखे व हिंदी रेल्वेजमधील हितसंबंध हे ब्रिटिश सरकारनें मोडून कांहीं अंशीं देणें भागविलें, परंतु ताग, कोळसा, चहा, पेट्रोल, इत्यादींच्या कंपन्यांचे शेअर्स ब्रिटिशांनीं सोडलेले नाहींत. सरकारी व निमसरकारी रोख्यांवर व्याजाचा दर अत्यल्प असतो व कंपन्यांच्या शेअरवर डिव्हिडंड चांगलें सुटतें. ब्रिटिश सरकारकडून मिळावयाच्या हिंदुस्थान सरकारच्या रकमा ग्रेट ब्रिटनमध्यें पडून आहेत, त्यांवर व्याजाचा दर अत्यल्प मिळतो. म्हणजे, ब्रिटिश राष्ट्राच्या हिंदुस्थानांत गुंतलेल्या रकमेवरील डिव्हिडंडमधून तें हिंदुस्थानास यावयाचें व्याज सहज भागवूं शकतें, इतकेंच नव्हे तर त्या हिशेबांत त्यास नफा उरतो. हिंदुस्थान सरकारच्या येण्याची रकम फारच मोठी असल्याकारणानें त्यावरील व्याजाबद्दल हुंडत घालत बसण्यांत आज कांहींच फायदा नाहीं. तथापि, परराष्ट्रांचें देणें भागवितांना ग्रेट ब्रिटननें घेतलेली सावधगिरी लक्षांत यावी व त्याचा हिंदुस्थानवर होणारा परिणाम नजरेंतून जाऊं नये, एवढ्यासाठी ब्रिटिश धोरणाची माहिती वर थोडक्यांत दिली आहे.

उसाची लागवड कमी करणें चुकीचें !

चालू वर्षी निरनिराळ्या प्रांतांस मिळावयाच्या साखरेंत घट होणार आहे व १९४४-४५ मधील उसाचें उत्पादन कमी होणार आहे, ह्या दोन घटनांसंबंधी आपले विचार श्री. एम्. पी. गांधी ह्यांनीं एक पत्रक काढून व्यक्त केले आहेत. वाढती लष्करी मागणी, आजूबाजूच्या देशांची मागणी व स्थानिक मागणी भागविण्यासाठी साखरेचें उत्पादन वाढविण्याकरितां १९४३ सालीं जोरानें प्रचार सुरू झाला व त्यामुळें साखरेचें उत्पादन १५% वाढलें. तथापि, संयुक्त प्रांत व बिहार येथें शेतकऱ्यांस उसाची ठरवून दिलेली किंमत धान्याच्या बाजारभावाचे मानानें फार कमी असल्याकारणानें उसाची लागवडहि कमी झाली. मुंबई प्रांतांत उसाच्या क्षेत्रांत ठराविक प्रमाणांत धान्य पेरण्याची सक्ती करण्यांत येत असल्याकारणानें, ह्या प्रांतांतहि साखरेचें उत्पादन पुष्कळच कमी होईल. अशा रीतीनें, साखरेचें हिंदी उत्पादन लष्करी मागणी व निर्गत ह्यांत सुपच कमी झाल्याविना, लोकांच्या गरजा भागविण्यास समर्थ होणार नाहीं. मुंबई प्रांतांतील साखरेचें उत्पादन प्रांताच्या गरजेच्या निम्म्या इतकें सुद्धा नाहीं आणि इतर ठिकाणच्या पेक्षा मुंबई प्रांतांतील उत्पादन अधिक किफायतशीर आहे, ह्या गोष्टी लक्षांत घेऊन मुंबई सरकारनें साखर-कारखान्यांवर उसाची जमा धान्याच्या पिकांस देण्याची सक्ती करूं नये, असें श्री. गांधी ह्यांचें म्हणणें आहे.

"कोठार-तज्ज्ञां" साठी शिक्षणक्रम

धान्य साठविण्याच्या पद्धतशीर योजनेचे अभावीं हिंदुस्थानांत दरसाल सुमारें ३३½ लक्ष टन धान्य नाश पावतें, असा अंदाज आहे. मणास सरासरीनें १० रुपये, ह्या ठोकळ हिशेबानें, त्याची वार्षिक किंमत ९० कोटि रुपयांवर जाते. ह्या धान्यावर ७० लक्ष लोकांचें पोट भरूं शकलें असतें ! एकट्या गव्हाचेंच उदाहरण घेतलें, तर वार्षिक १ कोटि टनांच्या उत्पादनापैकी ३ लक्ष टनांचा नाश होतो. सध्याच्या धान्यटंचाईचे काळांत असा नाश अक्षम्यच ठरेल. हिंदुस्थानांत सरकारनें आतां कांहीं महत्त्वाच्या केंद्रांत धान्याचीं कोठारें बांधण्याचें ठरविलें आहे. पंजाबांतील कोठारांतून ८०,००० टन, सिंध व मध्यप्रांत ह्यांतील कोठारांतून प्रत्येकीं २५,००० टन, आसाम व ओरिसा ह्यांत प्रत्येकीं १०,००० टन, व पूर्वविभागांतील संस्थानांत २५,००० टन इतक्या धान्याच्या साठ्याची सोय करण्यांत यावयाची आहे. कोठारांसाठी लागणारा मांडवली खर्च मध्यवर्ती व प्रांतिक सरकारें ह्यांत निम्मा निम्मा वाटला जाईल. कांहीं महत्त्वाच्या बंदरांत मध्यवर्ती सरकार कोठारें बांधणार आहे, तीं वेगळींच. कोठारांत धान्य ठाकण्यापूर्वी तें नीट तपासण्याची आजवर व्यवस्था नव्हती, ती करण्यांत येणार आहे. साठा करण्याचें आणि किडीचा उपद्रव थांबविण्याचें शिक्षण देण्यासाठी हिंदुस्थान सरकार खास शिक्षणवर्ग चालविणार आहे, असें समजतें.

मुंबई प्रांतांतील सहकारी मालवाटणी

हिंदुस्थानांत आणि विशेषतः मुंबई प्रांतांत मालाची खरेदी-विक्री सहकारी पद्धतीनें करण्याची प्रथा विशेष विस्तार पावलेली नाहीं. तथापि, युद्धपरिस्थितीमुळें नित्याच्या जरूरीच्या जिनसा मिळणें दुष्कर झालें, त्यांच्या किंमती कडाडल्या आणि त्यांची वाटणी रॅशनिंगच्या पद्धतीनें करणें अपरिहार्य झालें. अशा स्थितींत सामुदायिक रीतीनें मालाची खरेदी-विक्री केली जाण्याची आवश्यकता लोकांस भासली आणि त्यासाठी सहकारी संघटनाचा आश्रय करण्याचें महत्त्व त्यांस पटूं लागलें. ह्या कामीं सरकारनेंहि सहकारी संस्थांस उत्तेजन देण्याचें ठरवलें आणि नियंत्रित केलेल्या मालाची वाटणी त्यांचेमार्फत वाढत्या प्रमाणावर होऊं लागली. सहकारी पद्धतीच्या मालवाटणीची प्रगति मुंबई प्रांतांतील निरनिराळ्या जिल्ह्यांत कशी चालली आहे ह्याचें निरीक्षण करून ह्या कामीं कोणत्या अडचणी येत आहेत ह्याची माहिती काढणें आणि त्यांत सुधारणा सुचवणें ही कामगिरी श्री. नगरशेट ह्यांनीं उत्तम रीतीनें बजावली असून त्यांच्या श्रमाचें फळ एका इंग्रजी पुस्तिकेच्या स्वरूपांत मुंबई प्रांतिक सहकारी इंस्टिट्यूटनें जनतेस उपलब्ध करून दिलें आहे. (Co-operative Distribution in Bombay " by M. P. Nagarsheth, B. Com., Bombay Provincial Co-operative Institute, Price Re. 2-8-0) सहकारी खरेदी-विक्रीच्या संघटनेचा व कार्याचा प्रथम इतिहास देऊन त्यासंबंधांतली आजची स्थिति काय आहे हें त्यांनीं आकड्यांनिशी दाखवलें आहे. निरनिराळ्या जिल्ह्यांत प्रगति कशी व किती झाली आहे हें त्यांनीं दिलेल्या माहितीवरून समजतें. प्रगति व सुधारणा ह्यांचे बाबतींत त्यांनीं केलेल्या सूचना उपयुक्त आहेत. श्री. नगरशेट ह्यांची पुस्तिका मार्गदर्शक होण्यासारखी आहे.

हिंदुस्थानचे नवे कडनवीस

सर जेरेमी रेमन ह्यांचे जागीं सर आर्किबाल्ड रोलंड्स ह्यांची कडनवीस म्हणून नेमणूक करण्यांत आली आहे. एक्झिक्युटिव्ह कौन्सिलच्या हिंदीकरणाचे धोरणास अनुसरून, कडनवीसीचें पद एखाद्या हिंदी गृहस्थास मिळेल, अशी बऱ्याच मंडळींची आशा फोल ठरली आहे.

कोळशाच्या अभावीं कारखाने बंद

कोळसा व रसायनें ह्यांच्या पुरेशा पुरवठ्याचे अभावीं गेल्या चार महिन्यांत सुमारें २० हिंदी काच कारखाने बंद ठेवावे लागले.

कृत्रिम रबराचें उत्पादन

कृत्रिम रबराच्या व्यापारी प्रमाणावरील उत्पादनास ग्रेट ब्रिटनमध्ये अद्याप प्रारंभ झालेला नाहीं. एका ब्रिटिश कंपनीस १९४३ साठीं परवाना दिला, परंतु तिच्या कारखान्याची उभारणी अद्याप पुरी झालेली नाहीं.

गुळाचा नियंत्रित भाव

महाराष्ट्र व कर्नाटक ह्यांत तयार होणाऱ्या गुळाची किंमत मर्यादित रहावी ह्यासाठी मुंबई सरकारनें पहिल्या प्रतीच्या गुळाची घाऊक किंमत १४ रुपये मण (८२⅔ पौंड) म्हणजे ४२ रुपये पट्टा अशी नियंत्रित केली आहे.

रेल्वे रस्ता तयार करण्यासाठी युद्धकैदी

सयाम व ब्रह्मदेश ह्यांस जोडणारा रेल्वे रस्ता व मोटार रस्ता तयार करण्याचे कामीं जपाननें सुमारें ६०,००० श्वेतवर्णीय युद्धकैद्यांचा उपयोग केला. त्यांतील बहुसंख्य युद्धकैदी ब्रिटिश व ऑस्ट्रेलियन होते. आशियांतील लोकहि कामावर लावले होते. त्यांचेमधील मृत्यूचें प्रमाण श्वेतवर्णीयांतील प्रमाणापेक्षा अधिक पडलें असलें पाहिजे.

रेल्वेवरील ताण आणखी एक वर्ष तरी चालू राहणार

येत्या कांहीं महिन्यांत हिंदी रेल्वे वहातुकीवर कमालीचा ताण पडेल, असें रेल्वे वहातुक मंत्री सर एडवर्ड बेंथॉल ह्यांनीं एका मुलाखतींत नुकतेंच सांगितलें. पुरेशा वॅगन्स हातीं येण्यापूर्वी १९४५ साल संपत येईल व नंतर मात्र परिस्थिति सुधारण्याची आशा आहे.

कै. न्या. मा. गो. रानडे यांच्या स्मरणार्थ स्थापन झालेली

मागोरा केमिकल कंपनी लि., पुणें

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

(१) श्री. ए. व्ही. रानडे (चेअरमन), (१) मेसर्स व्ही. आर. रानडे ॲण्ड सन्स लि. पेकीं सी. पार्टनर (२) डायरेक्टर, नवयुग चित्रपट लि. (१) चेअरमन, क्लब ऑफ महाराष्ट्र लि., ... पुणें

(२) सरदार खंडेराव रामराव ऊर्फ बापुसाहेब विंचूरकर, बी. ए., एलएल. बी. (व्हा. चेअरमन), (१) फर्स्ट क्लास सरदार, (२) एक्स ऑफिशिओ डायरेक्टर, कृष्णा शुगर मिल्स लि. (३) पॉर्टनर, विंचुरकर ॲण्ड को., कृष्णा शुगर मिल्सचे मॅनेजिंग एजंट्स ... पुणें

(३) संगीत-कला-निधि मास्तर कृष्णराव फुलंब्रीकर, सुप्रसिद्ध गायक व संगीत दिग्दर्शक पुणें

(४) श्री. वामन काशिनाथ जोगळेकर, मेसर्स लक्ष्मण भार्गव जोगळेकर, प्रसिद्ध व्यापारी यांच्यापैकीं पुणें

(५) श्री. एन. जी. रानडे, प्रसिद्ध कॉंट्रॅक्टर व व्यापारी, पुणें

(६) सरदार गोविंदराव बळवंतराव ऊर्फ दाजीसाहेब पटवर्धन, (१) फर्स्ट क्लास सरदार (२) डायरेक्टर, ॲग्रिकल्चरल प्रॉडक्टस लि., (गूळ कंपनी) (३) डायरेक्टर, न्यू प्रॉव्हि. इन्शु. कं. लि. (४) डायरेक्टर, पेपर ॲण्ड पल्प कन्स्ट्रक्शन्स लि., (५) डायरेक्टर, चित्तपावन उद्योगनिधि-मंडळ ... ... पुणें

(७) प्रो. बी. डी. सट्टीगिरी, एम्. ए., एलएल. बी. (१) प्रोफेसर ऑफ इंग्लिश, एस. पी. कॉलेज (२) डायरेक्टर, नवयुग चित्रपट लि. (३) चेअरमन, महाराष्ट्र टेक्स्टाइल्स लि. भोर ... ... पुणें

(८) श्री. हरि केशव जोशी, बी. एससी. (१) डायरेक्टर, हंस पिक्चर्स लि. मॅनेजिंग डायरेक्टर्स टू नवयुग चित्रपट लि. ... ... पुणें

(९) डॉ. एन. एन. गोडबोले, एम्. ए., बी. एससी., पीएच. डी. (बर्लिन), बनारस हिंदु युनिव्हर्सिटी (एक्स-ऑफिशिओ) ... ... बनारस

(१०) श्री. गोविंद महादेव गोळे, बी. एससी., मॅनेजर व चीफ केमिस्ट, चांगदेव शुगर मिल्स लि. पुणतांबें (एक्स-ऑफिशिओ) ... ... पुणतांबें

(११) श्री. महादेव वासुदेव गोळे, (१) डायरेक्टर, न्यू प्रॉव्हि. इन्शु. कं. लि. (एक्स-ऑफिशिओ) पुणें

(१२) श्री. राजाराम यशवंत रानडे, बी. ए., सोल पार्टनर मेसर्स आर. वाय. रानडे ॲण्ड को. मॅने. एजंट्स टू मागोरा केमिकल कं. लि. (एक्स-ऑफिशिओ) पुणें

दी मागोरा केमिकल कं. लि.—तिच्या अनेक शोधामुळें व मालामुळें जनतेच्या परिचयाची झालेलीच आहे. कराची, मद्रास, कलकत्ता इत्यादि दूरच्या ठिकाणीं कंपनीचा माल जाऊं लागला आहे. रा. सा. नवलकर, एम्. ए. ग्रुप ऑफ एक्साईज पूना डिव्हिजन यांच्या हस्तें ४ महिन्यांपूर्वी बॉन्डेड लॅबोरेटरीचें उद्घाटन होऊन अखिल महाराष्ट्रांत टिंक्चर्स तयार करण्याचा मान 'मागोरा' ला मिळाला आहे. हल्ली कंपनीचीं जवळजवळ ६० तऱ्हेचीं टिंक्चर्स व इतर औषधें अनेक डॉक्टर्स वापरीत असून त्यांच्या गुणाबद्दल त्यांनीं प्रशंसा केली आहे. त्याचप्रमाणें कीटकनाशक इत्यादि २० तऱ्हेचे जिन्नस बाजारांत चालू आहेतच. आतां डॉक्टर्सना लागणारीं सर्व तऱ्हेचीं **इंजेक्शनस्, टॅब्लेटस्, एक्स्ट्रॅक्टस** तयार करण्याची योजना आंखली असून त्यासाठीं जास्त पैशाची जरूर आहे. मध्यंतरी आम्हीं ठेवी घेण्याचें बंद केलें होतें, परंतु वरील गोष्टीसाठीं पुनः जास्त ठेवी घेण्याचें ठरविलें आहे. रु. ५०० पेक्षां कमी रकमेची ठेव स्वीकारली जाणार नाहीं. जास्त माहितीसाठीं लिहा.

मुदत व दर

१ वर्ष द. द. शें. ५ टक्के २ वर्षें द. द. शें. ५॥ टक्के ३ वर्षें द. द. शें. ६ टक्के

आर. वाय. रानडे ॲण्ड को.
मॅनेजिंग एजंट्स.

हिराबाग, पुणें २.

बिहार प्रांताची सहकारी परिषद

श्री. वैकुंठराय मेथा यांचें अध्यक्षीय भाषण

गेल्या आठवड्यांत पाटणा येथें बिहारची प्रांतिक सहकारी परिषद् भरली होती, तिचें अध्यक्षस्थान श्री. वैकुंठराय मेथा ह्यांनीं मंडित केलें होतें. त्यांचें अध्यक्षीय भाषण अपेक्षेप्रमाणें विचार-परिप्लुत आणि स्फूर्तिदायक झालें. चालू युद्धामुळें सर्व देशांत भावी आर्थिक व सामाजिक घटनेबाबत विशिष्ट ध्येयें व रचना ह्यांचेसंबंधांत नव्या कल्पना उत्पन्न झाल्या असून त्यांस अनुसरून राष्ट्रीय योजनात्मक धोरणें आखण्यांत येत आहेत. त्यांचे दृष्टीनें हिंदुस्थानांतील सहकारी संघटनेचा विचार करण्याची आवश्यकता प्रतिपादून श्री. वैकुंठराय ह्यांनीं बिहार प्रांतांतील सहकारी संस्थांच्या परिस्थितीची छाननी केली. चौदा वर्षांमागें आर्थिक मंदीची लाट उसळली त्यावेळीं ह्या देशांतील प्रांतिक सरकारांनीं शेतकऱ्यांस सहाय देण्यांत दिरंगाई केली. अलीकडे शेतीच्या मालाच्या किंमती चढल्यामुळें सहकारी पतपेढ्यांच्या सभासदांचीं थकलेलीं कर्जें फेडलीं जाण्यास मदत झाली आहे ह्यांत शंका नाहीं. इतर प्रांतांशीं तुलना करतां बिहारमध्यें जुन्या कर्जाची फेड आणि नव्या कर्जाचें प्रमाण ह्यांमध्यें कमी सुधारणा झालेली आहे. अगदी अलीकडे कदाचित् प्रगति झाली असण्याचा संभव आहे. तथापि सहकारी संस्थांशीं संबंध असलेल्या शेतकऱ्यांचें प्रमाण त्या प्रांतांत अत्यंत अल्प आहे. ह्या प्रवृत्तीस अनुलक्षून बिहार सरकारनें प्रांतिक बँक व सेंट्रल बँका ह्यांचेमार्फत शेतकऱ्यांस, ते सहकारी पेढ्यांचे सभासद असोत वा नसोत, कर्जें मिळण्याची योजना अंमलांत आणली आहे तिचा श्री. वैकुंठराय ह्यांनीं निर्देश केला. सहकारी वृत्तीचा ज्या पैशाच्या व्यवहारांत परिपोष होत नाहीं ती व्यवस्था समाधानकारक नाहीं असें मत देऊन उसाच्या धंद्याबाबत सरकारनें मालाच्या किंमती व विक्री इत्यादींचे बाबतींत जी खास नियंत्रणात्मक योजना अंमलांत आणली आहे ती बिहारमध्यें सार्वत्रिक होऊं शकणार नाहीं असें ते म्हणाले. तथापि, सहकारी कर्जें, सहकारी मालविक्री व सहकारी नियमन ह्यांची सांगड घातली जाण्याच्या आवश्यकतेस त्यांनीं पाठिंबा दिला. खेडेगावांमध्यें शेतकऱ्यांस जोडधंदे उपलब्ध करून दिल्याबाबतून ग्रामीण जनतेची रहाणी सुधारणार नाहीं आणि युद्धोत्तर कालीन पुनर्रचनेच्या योजनेंत ह्या प्रश्नास महत्त्वाचें स्थान मिळणें अगत्याचें आहे असें त्यांनीं सांगितलें. सूत कातणें व कापड विणणें ह्या धंद्यांस सहकारी संघटनेच्या कक्षेंत आणतां येईल आणि ह्याच प्रकारचें संघटन शेती व तिच्याशीं संबंध असलेल्या सर्व व्यवहारांत करणें इष्ट आहे ह्या मुद्यावर त्यांनीं विशेष जोर दिला. मालाची विक्री व वाटणी ह्यांचे बाबतींत सध्या सहकारी संस्था बाहतें कार्य करीत आहेत, तें टिकाऊ आणि विस्तृत होण्यासाठी प्रयत्न करणें आवश्यक आहे असें त्यांनीं सांगितलें.

जॉइंट स्टॉक बँका अलीकडे लहानमोठ्या शहरांत आपल्या शाखांचीं जाळीं पसरीत आहेत, त्यांच्या सहकारी मध्यवर्ती व शहरी बँकांवर होणाऱ्या परिणामांची चर्चा ह्यापुढें श्री. वैकुंठराव ह्यांनीं केली. जुन्या सराफी पेढ्यांची जागा ह्या बँका घेत असल्यानें स्थानिक गरजांसाठी स्थानिक पैसा स्थानिक लोकांनीं उपयोगांत आणण्याचें कार्य सहकारी बँकांनीं स्वतःच्या अंगावर घेणें आवश्यक आहे असें त्यांनीं प्रतिपादलें. युद्धोत्तर कालांतील पुनर्घटनेमध्यें सहकारी बँकांच्या ह्या कार्याचें विशेष महत्त्व आहे ही गोष्ट त्यांनीं निदर्शनास आणली. शेवटीं, समाजसेवेविषयीं आस्था बाळगणाऱ्या निःस्वार्थी कार्यकर्त्यांची संख्या सहकारी संघटनेंत वाढण्याची आवश्यकता त्यांनीं प्रतिपादली आणि सहकारी चळवळींत सरकारी नियंत्रण येतें ह्या कारणास्तव तिच्यापासून दूर रहाणाऱ्या कार्यकर्त्यांनीं हें अलिप्तपणाचें धोरण बदलणें कां आवश्यक आहे ह्याचा खुलासा केला. सहकारी तत्त्वावर आर्थिक संघर्षनें होण्याची सबरदारी लोकांनीं एव्हांपासून घेतली नाहीं तर युद्धोत्तरकालीन आर्थिक धोरणाची गाडी अनिष्ट रुळांवर जाण्याची भीति आहे असें त्यांनीं बजावलें. भांडवलशाही आणि राजकीय नोकरशाही ह्या दोन्ही अनुभवानें अपयशस्वी ठरल्या असल्यानें सहकारी तत्त्वाच्या लोकशाहीचा पुरस्कार आपणं केला पाहिजे असा संदेश श्री. वैकुंठराय ह्यांनीं आपल्या भाषणाच्या अखेरीस दिला.

सहकारी स्टोअर्सना अल्प व्याजानें कर्ज

मद्रास सहकारी परिषदेचा ठराव

मद्रास प्रांतांतील मध्यवर्ती सहकारी बँकांची परिषद् मद्रास येथें नुकतीच भरली होती. त्या परिषदेंत सहकारी स्टोअर्सना मध्यवर्ती बँकांनीं दोन प्रकारें सहाय्य करावें असें ठरलें:—

(१) लोन सोसायट्या व स्टोअर्स ह्यांना बँकांच्या व्यवस्थापक बोर्डावर प्रतिनिधित्व देण्यांत यावें, व (२) स्टोअर्सना कर्जे व कॅश क्रेडिट अल्प व्याजानें यावींत. ह्या ठरावाप्रमाणें मध्यवर्ती बँका मध्यवर्ती सहकारी स्टोअर्सना ४% व्याजानें कर्जे देतील. घाउक व प्राथमिक स्टोअर्सनाहि त्यामुळें मध्यवर्ती स्टोअर्सकडून त्यामानानें माफक दरानें कर्जे मिळूं शकतील. स्टोअर्स सोसायट्यांना खेड्यांच्या कर्जाची मुदत पांच वर्षे करण्यांत यावी व त्यासाठी खातीं बदलण्याची विनंति मद्रास सरकारास करण्यांत यावी, असेंहि परिषदेंत ठरलें. मद्रास प्रांतानें ह्यासंबंधांत घालून दिलेलें उदाहरण अनुकरणीय आहे.

इं. सें. शुगरकेन कमिटी

हिंदुस्थान सरकारनें इंडियन सेंट्रल शुगरकेन कमिटी नेमली आहे. उसाबाबत संशोधन करणें व साखरेच्या धंद्याबाबत सुधारणा सुचविणें हें ह्या कमिटीचें काम राहील. "सोसायटी" म्हणून कमिटी रजिस्टर केली जाईल. इन्स्टिट्यूट ऑफ शुगर टेक्नॉलॉजी प्रस्तुत कमिटीच्या नियंत्रणाखालीं जाईल. साखरेच्या एक्साइज ड्यूटीतून कमिटीचा सर्व भागविण्यांत येईल. साखरेच्या उत्पादनाप्रमाणें कमिटीचें उत्पन्न बदलेल आणि कोणत्याहि वर्षी सर्व भागूं शकला नाहीं तर सरकार कमिटीला बिन-व्याजी कर्ज देईल. ज्यावेळीं कमिटीचे सर्वांपेक्षा अधिक उत्पन्न होईल, त्यावेळीं हें कर्ज फेडण्याकडे त्या वाढाव्याचा प्रथम विनियोग केला जाईल. कमिटी विषयवार उपसमित्या नेमून आपलें काम उपसमित्यांत वाटून देईल.

मुंबई प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूटचा वार्षिक अहवाल

(३० जून, १९४४ अखेरचा वार्षिक अहवाल इन्स्टिट्यूटच्या वार्षिक सभेत ता. १६ डिसेंबर रोजी मंजूर करण्यांत आला. त्याचा गोषवारा खाली दिला आहे.)

३० जून, १९४३ अखेर इन्स्टिट्यूटचे ११९ सभासद होते, त्यांपैकी ८० व्यक्ती होत्या. ३० जून, १९४४ अखेर १४५ सोसायट्या व १२३ व्यक्ती मिळून २६८ सभासद पटावर आले. आजीव सभासदांची वर्गणी ५०० रुपयांची उतरवून १२५ रुपये करण्यांत आली व ९ आजीव सभासद अहवालाचे वर्षी नोंदण्यांत आले. ११ जुलै १९४३ रोजी इन्स्टिट्यूटचा रौप्यमहोत्सव साजरा करण्यांत आला व त्यानिमित्त मुंबईप्रमाणें प्रांतांतील इतर ठिकाणींहि सभा भरविण्यांत आल्या. इन्स्टिट्यूटचें शैक्षणिक कार्यक्षेत्र निश्चित करणारा सरकारी ठराव प्रसिद्ध झाल्याबरोबर एज्युकेशन सुपरवायझर नेमण्याचें काम इन्स्टिट्यूटनें हातीं घेतलें. एज्युकेशन कमिटीमार्फत धारवाड, विजापूर, बेळगांव, पूर्व खानदेश, नाशिक, सेडा व रत्नागिरी ह्या जिल्ह्यांत व प्रत्यक्ष मुंबई शहरांत झालेल्या शैक्षणिक कार्याचें, भरविण्यांत आलेल्या वर्गांचें व परिषदांचें वर्णन व केलेल्या प्रचाराची माहिती ही रिपोर्टांत देण्यांत आली आहे. जेथें एज्युकेशन सुपरवायझर्स नेमलेले नव्हते, अशा फक्त दोन जिल्ह्यांत ऑनररी कार्यकर्ते कांहीं कार्य करूं शकले. एक्झिक्युटिव्ह कमिटीनें शिक्षण समिति, प्रकाशन समिति व संशोधन समिति अशा तीन सब-कमिट्या नेमल्या. शिक्षण समितीनें सहकारी शाळांची योजना तयार केली, तिला अनुसरून २४ जुलै रोजी अहमदाबाद, पुणें व धारवाड येथें शाळा सुरू करण्यांत आल्या. प्रकाशन समितीनें डॉ. भगतकृत "शेतीच्या मालाची विक्री," श्री. एन्. डी. वैद्यकृत "सहकारी हिशेब" व श्री. एच्. एम्. गजेंद्रगडकरकृत "सहकारी कायदा" हीं तीन पुस्तकें प्रसिद्ध करण्याचें योजिलें. देवधर मेमोरिअल ट्रस्ट ह्या मालेंतील पहिलें पुस्तक म्हणून भडोच सें. को. बँकेचे मॅनेजर श्री. नगरशेठ ह्यांस अन्नवाटणींत सहकारी संघटनेनें केलेलें कार्य ह्या विषयावर पुस्तक लिहिण्यास विनंति करण्यांत आली. वर्ष संपल्यानंतर हें पुस्तक इन्स्टिट्यूटचे हातीं आलें. (आतां तें प्रसिद्ध झालें आहे.)

शेतकी पतपेढ्यांच्या सभासदांवर युद्धजन्य परिस्थितीचा काय परिणाम झाला आहे ह्याची पहाणी करण्याचें को. बँक्स असोसिएशनच्या सूचनेवरून संशोधन समितीनें ठरविलें. सरकारनें ह्यासाठी १,००० रुपयांची ग्रँट मंजूर केली. जेथें ॲग्रि. डेटर्स रिलीफ ॲक्ट लागू आहे आणि लागू नाहीं अशा दोन्हीं क्षेत्रांचा पहाणींत समावेश व्हावा, असें सरकारनें सुचविलें. समितीनें प्रश्नपत्रिका तयार केली व तिचीं जणांची माहिती मिळविण्याचें कामीं नेमणूक केली. प्रत्यक्ष कामास प्रारंभ ऑगस्ट, १९४४ मध्यें झाला.

एक्झिक्युटिव्ह कमिटीनें सरकारशीं विचारविनिमय करून, युद्धोत्तर काळांतील सहकारी चळवळीच्या वाढीसंबंधीं विचार करून सरकारला सूचना करण्यासाठी इन्स्टिट्यूटचे चेअरमन, प्रांतिक बँकेचे चेअरमन व रजिस्ट्रार यांची एक कमिटी नेमली. प्रो. डब्ल्यू. आर. नातू ह्यांनीं कमिटीचे सेक्रेटरी म्हणून काम केलें. कमिटीचा प्रारंभीचा अहवाल ता. १५-३-४४ रोजीं सरकारकडे धाडण्यांत आला व पक्का अहवाल ता. ३ ऑगस्ट, १९४४ रोजीं रवाना झाला.

बी, खतें, वगैरेंचा सवलतीचे दरानें पुरवठा करण्याचें सरकारनें ठरविलें, त्याचा फायदा घेण्यासाठीं सहकारी संस्थांनीं त्या जिनसांची मागणी एकत्र करून ती ज्या त्या भागाच्या डे. डायरेक्टर ऑफ ॲग्रिकल्चरकडे पाठवावी, असें एक पत्रक इन्स्टिट्यूटच्या सेक्रेटरींनीं पाठविलें. अन्नपुरवठ्याचे कामीं सरकारनें सहकारी संस्थांचा शक्य तितका उपयोग करून घ्यावा, अशी विनंति चेअरमननीं प्रांतांतील सर्व जिल्हाधिकाऱ्यांना पत्र पाठवून केली. बॉबे को. क्वार्टर्लीत ह्या विषयावर लेख प्रसिद्ध झाले. शेतकी पतपेढ्यांच्या सभासदांचे आर्थिक परिस्थितींत आतां सुधारणा घडून आलेली आहे, तिचा उपयोग सहकारी चळवळीचा पाया भक्कम होण्याकडे केला जावा ह्या दृष्टीनें त्यांनीं साठविलेला पैसा पतपेढ्यांकडे ठेव म्हणून ठेवला जावा, अशी सूचना चेअरमननीं एका पत्रकाद्वारा केली.

इन्स्टिट्यूटच्या मुख्य कचेरीनें अहवालाचे वर्षांत दोन ट्रेनिंग क्लासेस यशस्वी रीतीनें चालविले, एक लँड मॉर्गेज बँकांचे नोकरवर्गासाठी व एक परचेस अँड सेल सोसायट्या, मध्यवर्ती बँका वगैरेंसाठी. त्याचा अनुक्रमें १६ व १२ लोकांनीं फायदा घेतला.

सटाणा को. सीड सप्लाय अँड सेल सोसायटी लि., सटाणा, ह्या संस्थेच्या इमारत खर्चास मदत म्हणून सर ललुभाई सामळदास मेमोरिअल फंडाच्या मॅनेजिंग कमिटीनें ३,००० रुपये मंजूर केलें. इमारतीचें नांव "सर ललुभाई सामळदास मेमोरिअल बिल्डिंग" असें ठेवण्यांत येईल व त्यांतील एक हॉल सटाण्यास येणाऱ्या शेतकऱ्यांस विश्रांतीसाठी राखून ठेवण्यांत येईल, ह्या अटींवर हे पैसे दिले जातील.

अखिल भारतीय सहकारी दिन ६ नोव्हेंबर रोजीं साजरा झाला. २६५ सोसायट्यांनीं दिलेल्या ३६,४७७ रुपयांच्या देणग्यांस कायद्याच्या ४२ व्या कलमाप्रमाणें मंजुरी दिली गेली.

खाकुर्डी कोऑपरेटिव्ह के. सोसायटी रौप्य महोत्सव

खाकुर्डी को. के. सोसायटी, खाकुर्डी, ता. मालेगांव, ही संस्था ता. १३-७-१९१८ रोजीं स्थापन झाली. तिचा रौप्य महोत्सव ता. २९-१०-१९४४ रोजीं नाशिक जिल्ह्यांतील शेतकऱ्यांचे पुढारी आमदार भाऊसाहेब हिरे, बी. ए., एलएल. बी., एम्. एल्. ए. यांचे अध्यक्षतेखाली साजरा करण्यांत आला. सदर सोसायटी सध्यां 'अ' वर्गांत असून ती स्थापन झाले तारखेपासून आजपर्यंत मालेगांव तालुक्यांतील सहकारी चळवळीचे पितामह मे. लोटन नाथू पाटील हेच तिचे चेअरमन म्हणून काम करीत आले आहेत.

सभेचे वेळीं मे. चिंधू हिलाजी पाटील, हेडमास्तर खाकुर्डी, मे. एस. जे. बूच बँक इनस्पेक्टर मालेगांव, मे. एम. जी. निकम सुपरवायझर मालेगांव सु. यु., मे. बूचा मास्तर ए. सुपरवायझर साहेब मालेगांव भाग शिक्षण प्रसारक मंडळ मालेगांव यांचीं भाषणें झालीं. मे. निकम सुपरवायझर यांनीं सोसायटीचा गेल्या पंचवीस वर्षांचा त्रोटक इतिहास वाचून दाखविला. सोयायटीचे ग्रुप सेक्रेटरी श्री. गं. ग. कुलकर्णी यांनीं आलेले संदेश वाचून दाखविले.

अध्यक्षांचे हस्तें सोसायटींतील कार्यकर्त्यांना सुमारें २०५ रुपये किंमतीचीं चांदीचीं भांडीं बक्षिस देण्यांत आलीं. अध्यक्षांचे शेतकऱ्यांनीं बचत कशी करावी. सोसायटीपासून फायदे, याबद्दल उद्बोधक भाषण झालें. हारतुरे-पानसुपारी होऊन सायंकाळीं कुस्त्या व रात्रौ जेवणानंतर करमणुकीचे कार्यक्रम झाले.

रॉकडेल पायोनिअर्सचा शतसांवत्सरिक उत्सव

मुंबई प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूटच्या आदेशाप्रमाणें इंग्लंडांत सहकारी चळवळीची संस्थापना करणाऱ्या रॉकडेल बेथील रॉकडेल पायोनिअर्स सोसायटीचा शतसांवत्सरिक उत्सव मुंबई प्रांतांत ठिकठिकाणीं साजरा झाला. त्या प्रसंगीं, इन्स्टिट्यूटनें पाठविलेला खालील ठराव समंत होऊन त्यावर समयोचित भाषणें झालीं.

अभिनंदनाचा ठराव

" रॉकडेल पायोनिअर्स सोसायटीच्या शतसांवत्सरिक महोत्सवाचे प्रसंगीं शहरांतील सहकारी बांधवांचा ही जाहीर सभा इंग्लंडांतील सहकारी जनतेचें अभिनंदन करून इतर देशांतील सहकारी बांधवांशीं बंधुत्व भाव व्यक्त करीत आहे.

रॉकडेल प्रणेत्यांचा सेवाभाव, चिकाटी, दूरदृष्टी, संघटनाचातुर्य ह्या गुणांचा आम्ही हिंदी सहकारी बांधव गौरव करितों व मजुरांच्या उन्नतीसाठी शंभर वर्षांपूर्वी इंग्लंडमध्यें ह्या गुणांची जेवढी जरूरी होती तेवढीच आज हिंदुस्थानांत शेतीच्या व शेतकऱ्यांच्या पुनर्घटनेसाठी ह्या गुणांची जरूरी आहे असें आमचें ठाम मत आहे.

रॉकडेल प्रणेत्यांच्या कर्तृत्वापासून व त्यांच्या कार्याच्या मूलभूत व सर्वमान्य तत्त्वापासून येथील कार्यकर्त्यांस स्फूर्ति मिळो व सहकार्याच्या द्वितीय शतकांत ह्या देशांत सहकाराच्या कंझ्यूमर्स व इतर सर्व शाखांचा राष्ट्रव्यापी विस्तार होवो. "

मुंबई येथील सभेंतील सर जनार्दन मदन ह्यांचें भाषण

" फ्रेंच राज्यक्रांतीमुळें राजकीय अधिकारांबद्दल युरोपियन राष्ट्रांत जागरूकता निर्माण झाली, तरी औद्योगिक क्रांतीमुळें निर्माण झालेल्या मजूर वर्गाचे हाल थांबविण्यास ती समर्थ नव्हती. कामकरी लोकांना स्वावलंबनाचा मार्ग पत्करून स्वतःची उन्नति करून घेण्यावेरीज गत्यंतर नव्हतें. रॉकडेल स्टोअर हा अशा प्रकारचा पहिलाच प्रयत्न नसला, तरी सर्व अडचणी दूर सारून यशस्वी होणारा अजरामर स्टोअर तोच ठरला. त्यांतूनच पुढें सहकारी स्टोअर्सचें जाळें पसरलें. १८६४ साली स्थापन झालेल्या को-ऑपरेटिव्ह होलसेल सोसायटीनें उत्पादनासहि प्रारंभ केला. हिंदुस्थान व सिलोन ह्या देशांत त्या सोसायटीच्या मालकीचे मळे आहेत. इंग्लंडमध्यें खपणाऱ्या प्रत्येक सात पेल्यापैकी एक पेला चहा ह्या मळ्यांतील पत्तीचा असतो ! हिंदुस्थानांत ब्रिटिकेन अर्बन सोसायटी १९०६ सालीं स्थापन झाली. युद्धानें स्टोअर्सच्या चळवळीस चालना दिली आहे. रेशनिंग बंद झालें, तरी हे स्टोअर्स चालू रहातील अशी आशा आहे. "

पुणें येथील सभा

प्रांतिक सहकारी इंस्टिट्यूटच्या आदेशास अनुसरून पुणें येथें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेच्या दिवाणखान्यांत गेल्या गुरुवारीं रॉकडेल पायोनिअर्सच्या शतसंवत्सरीच्या निमित्तानें प्रो. काळे ह्यांच्या अध्यक्षतेखालीं सभा भरली होती. श्री. द. दि. चितळे ह्यांनीं प्रास्ताविक व स्वागतपर भाषण केलें. अध्यक्षांनीं सभेचा उद्देश थोडक्यांत समजावून सांगितला आणि रॉकडेल पायोनिअर्सचें कार्य व त्यापासून घ्यावयाचा बोध ह्यांचें विवेचन श्री. दा. बा. पोतदार व असि. रजिस्ट्रार श्री. एन. व्ही. नायक ह्यांनीं केलें. पायोनिअर्ससंबंधानें आदर व्यक्त करणारा ठराव श्री. य. गो. ओगले ह्यांनीं पुढें मांडला आणि त्यास अनुमोदन व दुजोरा श्री. दा. ग. बापट व श्री. शंकरराव मोरखले ह्यांनीं दिल्यावर प्रो. काळे यांनीं समारोपाचें भाषण केलें. श्री. चितळे ह्यांनीं आभार प्रदर्शन केल्यावर सभेचें काम समाप्त झालें.

महिंद्रकर ब्रदर्स
तयार कपड्यांचे व्यापारी
गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें

पूना गेस्ट हाऊस
संस्थापक :
के. नानासाहेब सरपोतदार
टेलिफोन नं. ७७९

महाराष्ट्रांत लेखी गॅरंटी देणारे
पहिलें व फक्त १ च
गोल्ड मेडॅलिस्ट् व मराठी वळणाचे स्पेशॅलिस्ट्
पेन्टर बेडेकर, ए. जी.,
बुधवार चौक, पुणें २ (सिटी)
बाहेरगांवचीं कामें रेल्वे, मोटार अगर पोस्टानें पाठवूं.

प्रगतिपथावरील नवा
मै ला चा — द ग ड
सन १९४३ अखेर
नव्या कामांत ११० टक्के वाढ
चालू कामांत १०० टक्के वाढ
आयुर्विमानिधींत ८० टक्के वाढ
— आपला विमा किंवा एजन्सी आजच घ्या —
दि औंध म्यूच्युअल लाइफ अॅश्युरन्स सोसायटी लि., पुणें.
आर. जी. साठे सुपरिंटेंडेंट
व्ही. जी. जोशी मॅनेजिंग डायरेक्टर

'अर्थ' ग्रन्थमाला.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

शेतकऱ्यांच्या दारिद्र्याचा प्रश्न कसा सुटेल !

" बहुजन समाजाच्या आर्थिक जीवनाच्या दृष्टीनें सहकारी चळवळ यशस्वी व्हावयाची असेल तर बहुजन समाजाची उत्पादनक्षमता वाढविली पाहिजे. शेतकऱ्यानें जास्त पिकविलें पाहिजे व त्यानें जेवढें पिकविलें त्याला जास्तींत जास्त किंमत आली पाहिजे. उत्पादन वाढविण्यासाठी शेतीच्या तुकड्यांचे सहकारी पायावर एकत्रीकरण केलें पाहिजे. वर्षातून तीन महिने बिनपगारी मोकळा असणाऱ्या शेतकऱ्याला जोड धंद्यांची सोय करून दिली पाहिजे. म्हणजे आजचा त्याचा आंतबट्ट्याचा व्यवहार बंद होईल व त्याच्या खिशांत कांहीं तरी शिल्लक पडेल. त्यानें केलेल्या उत्पादनाला योग्य किंमत येण्यासाठी मार्केटिंग देखील सहकारी तत्त्वावर सुरू केलें पाहिजे. आर्थिक सहाय्य, उद्योगधंद्यांची जोड आणि विक्रीची व्यवस्था या त्रिमूर्तीची उत्कृष्ट सांगड घातल्याखेरीज शेतकऱ्यांच्या दारिद्र्याचा प्रश्न सुटणार नाहीं. " विना सहकार नहि उद्धार " या बोलीचा अर्थ हाच आहे. "— दि. ब. काजी यांचें कराड अर्बन को. बँकेंत भाषण.

लासलगांव मर्चंटस को-ऑपरेटिव्ह बँक, लि.

(स्थापना ता. १७–११–१९४४)

लासलगांव येथील व्यापारी लोकांच्या सोयीसाठी व्यापारी मंडळीनीं स्थापन केलेल्या वरील बँकेची पहिली साधारण सभा ता. ८ डिसेंबर १९४४ रोजीं शुक्रवारीं रात्रीं ९ वाजतां लासलगांव येथील श्री. लक्ष्मीनारायण मंदिरांत, श्री. एम्. डी. चावडा, बी. ए., सीनियर इन्स्पेक्टर बी. पी. सी. बँक लि. नाशिक विभाग यांचे अध्यक्षतेखालीं होऊन, खालीलप्रमाणें बोर्ड ऑफ डायरेक्टर्स यांची निवड करण्यांत आली.

(१) मे. रामकिसन मोतीलाल डागा (चेअरमन)
(२) मे. श्रीराम शंकरलाल पलोड, (व्हा. चेअरमन)
(३) मे. रावजी दादा अप्पा, डायरेक्टर
(४) मे. सुशालचंद जसराज बरमेचा, डायरेक्टर
(५) अनराज भुरमल संचेती, डायरेक्टर

तसेंच राधाकिसन सदर बँकेच्या बोर्ड ऑफ कंट्रोल कमिटीवर मे. राधाकिसन मयाराम डागा (चेअरमन) व मे. भीकचंद दलीचंद सांड यांची निवड करण्यांत आली.

इचलकरंजी सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लिं., इचलकरंजी

(वार्षिक सभा ३१–१२–४४.)

ही बँक कै. " श्रीमंत नारायणराव बाबासाहेब अधिपती " इचलकरंजी यांचे आश्रयाखालीं सन १९३० सालीं स्थापन झाली. बँकेचा अहवाल नुकताच प्रसिद्ध झाला आहे. बँकेचें वसूल शेअर भांडवल रु. ३४,९७५ आहे व फंडाची रक्कम रु. ४०,६५३ आहे. ठेवी निरनिराळे खात्यांवर मिळून ५,१०,७८६ रु. इतक्या आहेत. बँकेस चालू वर्षी रु. ५,११५ इतका नफा झाला आहे. भागिदारांना ६ टक्के डिव्हिडंड देणेबद्दल डायरेक्टरांची शिफारस आहे. नफ्यापैकीं बराच भाग रिझर्व्ह वगैरे फंडांत घालणेची बँकेनें प्रथा ठेविली आहे, ती अभिनंदनीय गोष्ट आहे. चालू वर्षी बँकेनें आजरें (जि. बेळगांव) येथें आपली शाखा उघडली आहे. इचलकरंजी येथील धान्य पर्चेसिंग एजन्सी कोल्हापूर दरबारनें या बँकेस दिली होती. तें काम बँकेनें उत्तम तऱ्हेनें केलें आहे. स्थापनेपासून गेलीं चौदा वर्षें बँक " अ " वर्गांत आहे, यावरून बँकेचे आर्थिक स्थैर्याबद्दल कोणाचींहि खात्री पटेल.

मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं असलेली

शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

बॉम्बे प्रॉव्हिन्शियल को-ऑपरेटिव्ह बँक, लि.

(सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली)

स्थापना १९११.

मुख्य कचेरी–सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरिअल बिल्डिंग, ९, बेक हाउस लेन, कोट मुंबई.

टेलिफोन नं. २५४६१ तारेचा पत्ता ' फार्मर बँक '

अधिकृत भांडवल :: रु. १५,००,०००
काढलेलें भांडवल :: रु. १३,२५,०००
भरलेलें भांडवल :: रु. १३,११,५००

खेळतें भांडवल १९४४ जून अखेर ४ कोटी ७३ लक्ष

.....शाखा व उपशाखा.....

१ बारामती (जि. पुणें)		२३ नाशिक (जि. नाशिक)	
२ नीरा	„	२४ लासलगांव	„
३ सातारा (जि. सातारा)		२५ मालेगांव	„
४ कऱ्हाड	„	२६ नांदगांव	„
५ किर्लोस्करवाडी	„	२७ घोटी	„
६ कोरेगांव	„	२८ सटाणा	„
७ इस्लामपूर	„	२९ येवलें	„
८ शिराळें	„	३० धुळें (जि. पश्चिम खानदेश)	
९ तासगांव	„	३१ दोंडाईचें	„
१० वाई	„	३२ नंदुरबार	„
११ भिवंडी (जि. ठाणें)		३३ साक्री	„
१२ कल्याण	„	३४ शहादें	„
१३ पालघर	„	३५ शिरपूर	„
१४ अकलूज (जि. सोलापूर)		३६ शिंदखेडें	„
१५ अहमदनगर („ अहमदनगर)		३७ तळोदें	„
१६ बेलापूर रोड	„	३८ दोहद (जि. भडोच व पंचमहाल)	
१७ कोपरगांव	„	३९ गोध्रा	„
१८ पाथर्डी	„	४० झालोद	„
१९ राहुरी	„	४१ पनवेल (जि. कुलाबा)	
२० शेवगांव	„	४२ नाडियाद (जि. खेडा)	
२१ बांबोरी	„	४३ आनंद	„
२२ विरमगांव (जि. अहमदाबाद)			

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात आणि इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेड ऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल्. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.

रेशनपुरतें धान्य मिळालें, तरी अन्नधान्न सुटत नाहीं

शेतीचें उत्पादन वाढवून धान्यपरिस्थिति सुधारण्याचे सरकारी प्रयत्न हिंदुस्थानांत जोमानें चालू आहेत, परंतु त्यांचा लोकांना भरपूर धान्य मिळण्याच्या व्यावहारिक स्वरूपांत परिणाम झाल्याचें दिसत नाहीं. उदाहरणार्थ, तांदळाची लागवड व उत्पादन हीं वाढलीं आहेत, त्यासंबंधांतील आकडे मध्यवर्ती असेंब्लींत नुकतेच सांगण्यांत आले, त्यावर झालेल्या चर्चेचा रोख "मग अद्याप उपासमार कां होत आहे?" ह्या सर कावसजी जहांगीर ह्यांच्या एकाच प्रश्नानें व्यक्त करतां येईल. "अधिक धान्य पिकवा" मोहिमेच्या गाजावाजाच्या प्रमाणांत प्रत्यक्ष निष्पत्ति झाली नाहीं, असेंच म्हटलें पाहिजे. हिंदुस्थान हा शेतीप्रधान देश असल्याकारणानें, शेतीचें उत्पादन वाढविण्याचे प्रयत्न ह्यापेक्षां अधिक यशस्वी होणें आवश्यक आहे. ह्यासंबंधांतील [illegible]टनचे आकडे नुकतेच उपलब्ध झाले आहेत, त्यांवरून त्या देशानें केलेल्या प्रगतीची कल्पना येते व तेथील परिस्थिति कौतुकास्पद व हेवा उत्पन्न करणारी वाटते.

ब्रिटिश शेतीचें उत्पादन दुप्पट झालें

जर्मनीचे अविरत बाँबहल्ले, जर्मनींची केव्हां स्वारी होईल ह्याची कायम भीति व त्यासाठी संरक्षक उपाययोजना, युरोपांत उतरून जर्मनीचा पाडाव करण्यासाठीं करावयाची लष्करी तयारी, दारूगोळा व इतर युद्धोपयोगी मालाचें असंड उत्पादन, बंद झालेल्या बागायतीमुळें झालेली गैरसोय, युद्धानंतर निर्गत व्यापार पुनः सत्वर चालू व्हावा ह्यासाठीं पूर्व तयारी, इत्यादि अवधानांतूनहि शेतीचें उत्पादन चार वर्षांचे अवधींत दुप्पट करून दाखविण्याचा विक्रम ब्रिटिश जनतेनें केला आहे! गव्हाची लागवड १९३९ सालीं १७½ लक्ष एकरांत झाली व गव्हाचें उत्पादन १६½ लक्ष टनांचे वर गेलें नाहीं. १९४४ सालांतील गव्हाची लागवड ३२½ लक्ष एकरांत झालेली आहे व अपेक्षित उत्पादन ३१½ लक्ष टन एवढें आहे. बार्ली, ओट, राय, इत्यादि धान्यांची लागवड व उत्पादन ह्यांतहि अशाच प्रकारें वाढ झालेली आहे. सर्व प्रकारच्या धान्यांचा एकत्रित विचार केला, तर १९३९ सालीं ५३ लक्ष एकर त्यांच्या लागवडीखालीं होते, त्यांत आतां ७८% वाढ होऊन ९४½ लक्ष एकरांत धान्य पेरण्यांत आलें आहे. उत्पादनाचा आकडा १९३९ सालीं ४४½ लक्ष टन होता तो आतां ८६½ लक्ष टनांपर्यंत गेला आहे.

हिंदी उत्पादनांतील अत्यल्प वाढ

हिंदुस्थानांतील सर्व प्रकारच्या धान्यांच्या लागवडींच्या व उत्पादनाच्या आकड्यांची वरील आकड्यांशीं तुलना करणें बोधप्रद होईल. सर्व प्रकारच्या धान्यांच्या लागवडीखालीं युद्धापूर्वी १९½ कोटि एकर जमीन असे, गेल्या वर्षी ती २० कोटि, ६३ लक्ष एकर झाली. म्हणजे, लागवडीच्या क्षेत्रांत सुमारें १ कोटि, १३ लक्ष एकरांची भर पडली. हीच वाढ शतमानानें व्यक्त करावयाची म्हटल्यास, लागवड ५·८% वाढली असें म्हणतां येईल. ब्रिटिश धान्यांच्या लागवडीची तत्सम वाढ ७८% आहे. उत्पादनाचे आकडे पाहिले, तर धान्यांचें उत्पादन ५ कोटि, ५५ लक्ष टनांवरून ६ कोटि, १० लक्ष टनांवर गेलें आहे. म्हणजे वार्षिक उत्पादनांत ५५ लक्ष टनांची भर पडली आहे. ग्रेटब्रिटनमधील धान्यांचें उत्पादन सुमारें ९४ वाढलें, तर हिंदी धान्यांचें उत्पादन १०% पेक्षां ज्यास्त वाढलेलें नाहीं.

दूध, भाजीपाला, फळें ह्यांकडे दुर्लक्ष

हिंदुस्थानांत अन्नपुरवठ्याच्या प्रश्नाचा विचार करण्यांत येतो, त्याकेळीं फक्त धान्याचीच बाब लक्षांत घेतली जाते. वास्तविक पाहतां, मुख्य धान्याच्या कांहीं प्रमाणांत दूध, भाज्या, फळें इत्यादि संरक्षक संवर्धक बाबींचाहि समावेश अन्नांत होणें अत्यंत महत्त्वाचें असतें. परंतु, जेथें पोटभर भाकरीचीच बानवा तेथें मुखशुद्धीची चौकशी कोण करणार! मनुष्यामध्यें रोगप्रतिबंधक शक्ति आणण्यास व त्याची ताकद राखण्यास, त्याचप्रमाणें शरीराची वाढ करण्यास संरक्षक व संवर्धक अन्नांचा फार उपयोग होतो. गेलीं पन्नास वर्षे, हिंदी कामगार, शेतकरी व मध्यमवर्गीय लोक ह्यांच्या अन्नाच्या कसदारपणांत बिघाड होत चालला आहे. त्यांना मुख्यतः धान्यावरच निर्वाह करावा लागतो. सध्याच्या युद्धपरिस्थितींत तर संरक्षक व संवर्धक अन्नांचा तुटवडा तीव्रतेनें भासूं लागला आहे. हिंदी लोकांना धान्याचें रेशनिंग झालें म्हणजे पुरें, अशी सरकारची चुकीची समजूत होण्याचा संभव आहे. हिंदुस्थानांत धान्यापलीकडे अन्नाचा विचारच होऊं शकत नाहीं, ही गोष्ट चिंतनीय आहे.

ग्रेट ब्रिटन व हिंदुस्थान

ग्रेट ब्रिटनमध्यें गेल्या पांच वर्षांत भाज्यांची लागवड दुपटीपेक्षां ज्यास्त झाली आहे व भाजीपाल्याच्या लागवडींतहि ६६% वाढ झालेली आहे, ह्यावरून वरील गोष्टींकडे ब्रिटिश सरकार कसें लक्ष पुरवीत आहे, हें दिसून येईल. ग्रेट ब्रिटनमध्यें लोकांना वाटेल तेवढी गव्हाची रोटी मिळूं शकते, दुधाचा सप युद्धकालांतहि वाढला आहे, युद्धपूर्व भावानें बटाट्यांचा मुबलक पुरवठा होत आहे, वगैरे गोष्टींवरून, बाहेरून येणाऱ्या अन्नावर प्राधान्येंकरून संसार करणाऱ्या ग्रेट ब्रिटनमध्यें शेतीच्या उत्पादनाचे बाबतींत युद्धकालांतहि केवढी क्रांति घडून येऊं शकली व तेथील लोकांचें पोषण व संवर्धन कसें होत आहे, ह्याची कल्पना येईल. हिंदुस्थानसारख्या शेतीप्रधान देशाचें मात्र अजून धान्याच्या खाईचें ग्रहण सुटलेलें नाहीं. दूध, फळें, भाज्या वगैरे जिनसांचा तर विचारच दूर राहिला.

प्रचाराचें महत्त्व

येथें अशी परिस्थिति का, हें नीट लक्षांत आणून धान्याबरोबर भाजीपाला वगैरेंचाहि पुरवठा वाढविण्याचा प्रचार जोमानें होणें अगत्याचें आहे. हिंदी लोकांना धान्यापलीकडे दुसरें कांहीं लागतच नाहीं, ही समजूत निराधार आहे. त्यांना फळें व भाजी खाणें परवडतच नाहीं, हीच गोष्ट सत्य आहे. जनतेचें दारिद्र्यच ह्या सर्वास कारणीभूत आहे, आणि तें दूर झाल्याविना व धान्य खरेदी केल्यानंतर दूध व फळें खाण्यास हाताशीं पैसा शिल्लक राहिल्याविना हा प्रश्न समाधानकारक सुटणार नाहीं. असें असलें तरी संरक्षक व संवर्धक अन्नाबाबत प्रचार चालू ठेवून त्यांचें महत्त्व लोकांना पटवून देणें अगत्याचें आहे. त्याचा उपयोग झाल्याशिवाय रहाणार नाहीं. अधिक धान्याबरोबरच दूध, भाज्या, फळें इत्यादींचा स्वस्त व मुबलक पुरवठा सरकारनें घडवून आणला पाहिजे. महाराष्ट्रांतील कामगारांच्या मानानें अधिक सकस अन्न खावयास मिळण्याच्या पंजाबी कामगारांची वाढ व त्यांचा उत्साह इंग्रजांच्या तोडीचा असतो. ह्यावरून पुरेसें व चांगलें अन्न खावयास मिळालें तर हिंदी मनुष्याची कार्यक्षमता पुष्कळच प्रभावी होईल हें सिद्ध होतें.

≡ पुणें सदाशिव (नवी) पेठेंतील १९ प्लॉटसची ≡

यशवंत बाग

१२ प्लॉटस गांवठाणांतील व त्यांना लागून ७ प्लॉटस टी. पी. स्कीममधील.

यशवंत बागेची मार्गदर्शिका



यशवंत बागेंतील १९ प्लॉटस्चा नकाशा



सूचना—पुणें येथील टिळक रोडवरील साहित्य परिषदेच्या ऑफिसवरून जो रस्ता चिमणबागेकडे जातो त्या रस्त्याच्या पलीकडे ट्रेनिंग कॉलेज फॉर मेनच्या क्रीडांगणास लागून हे प्लॉटस् आहेत.

— त्वरित भेटावें अगर लिहावें —

दयानिवास, नारायण पेठ,
कॉमनवेल्थ कॉलनी, पुणें. } म. य. दातार.

हें पत्र पुणें, पेठ शनवार घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' शनवार, घ. नं. ९२७।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.